



पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

२१

बाळाजी बाजीराव : उत्तरहिंद

१७४१-१७६१

संपादक—गो. स. सरदेसाई, बी. ए.

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं)

[किंमत—३ रुपये ८ आणे किंवा ६ शिलिंग]

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३२

No. 182

Facsimile of a letter from Jankoji Sindia. *(Died on 14-1-1761)*

Facsimile of the handwriting of Mahadji Sindia. *(Died on 12-2-1794)*

श्री

Facsimile of the handwriting of Ramchandra Malhar. *(Died 4-10-1754)*

No. 48

Facsimile of the handwriting of Vishwasrao Ballal. *(Died on 14-1-1761)*

श्री

श्रीसकलगुणअळंकर्ण मैत्रावर्यसिरोमण
राजमान्य राजश्री अमृतराऊजी
स्वामी गोसावी यासी

श्नेहाभिलांसी नारो शंकर कृतानेक असीरबाद विनंती उपरी. येथील क्षेम
ा फाल्गुण सुध १० * * * * पूर प्रांत रामपुरा लस्करात
णोन स्वकीये लिहिणें. * * * बहुत दिवस आपणांकडील वर्तमान
ळत नाही, तरी कृपापत्री सर्वदां सांभालीत असावे. याउपर श्रीमंत उभयेता
दासवासी आपणावरी कृपा करीत होत. प्रस्तुत श्रीमंत राजश्री नाना-
हेबाचे पाया * * * नाहीं यामुले चित उद्विग्न आहे. आम्ही येथ मराठि-
ची चाकरी श्रीमंताचे आश्रयेकरून करीत होतो. प्रस्तु(त) श्रीने यैसे केलिया
ची वृती काही ठिकाणीं नाहीं. आवंदा आपणास वरषपर्यंत अकसाखाली घातले
हे. मोकासियांचा यैवज बंद करून घेतला व रोजमरा खर्चासहि देत नाहीत.
णि नस्ती खेकटी माल्वे प्रातीची काहाडोन आपणांवरी काविषी[१] करितां,
ंतासी अर्ज करावा तरी मरजीस वोकीफ[२] नाही परंतु आपले मुरब तुम्हासारिखे
ंतां काये चिंता आहे? दाजी! ये समई उपरला कराल तरी श्रीमंताचा जप्त[३] या
कावरी विशेषच राहातों. याजकरितां रा राणोजी सिंदे व रा रामचंद्रबावा रा
ारजी होलकर यासी आमचेविषी श्रीमंताची ताकीदपत्रे मसुदायाप्रो पाठवावे
णि येथील निर्गम करून पुढे श्रीमंताचे पदरीं आपण पडो यैसे करावे. आपले
री लोक सामान आहे ते आपण जाणतच आहेत. आवंदा श्रीमंत राजश्री
पासाहेब पुणियात आंगिकार करून ठेवीत होते. दोन हजार फौज तैनांत व
ा करावी, बोली देखील रघुनाथजी प्रभू यासमक्ष केली. परंतु आपण दाहा
रा वरसे होलकराची चाकरी केली होती, आणि आवंदा यासमागमे फौज कमी,
शब्द ठेवितील, त्यामुले श्रीमंत राजश्री आपासाहेबास विनंती करून निरोप
न समागमे आलो. धारे सोनगड येथे कामकाजहि उतम केले. दाहा वीस
स खस्त जाले. परंतु मराठे बयेमान आणि उभयतांचा प्रसंग यैकोन बुधीस
जाला; आणि आपणावरी फारसी गाड आहे. तरी दाजी खामखा उपराला

१ कहर ? २ माहीत, मर्जी जाणणारा नाहीं. ३ दबाव.

श्रीमंताकडोन करऊन पदरी घेवणे. भाईपणाची शर्त होईल. आपण स
प्रकारे कुंटुबीचे असो. बहुत ल्याहावे तरी उपरोध दिसोन येतो. कृपा लो
आसों दीजे बहुत काये लिहिणे हे विनती.

¶*Naro Shankar being displeased with the treatment meted out to hi by both Holker and Sindia, expresses his desire to be entertained in Peshw service.*

No. 2] [*16-5-17*

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसावी यांसी

 श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलकृत राजमान्य
पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील कुशल ता जेष्ट शुध त्रयोद
मंदवार मुकाम ग्वालेर यथास्थित असे. विशेष. आपलें पत्र छ ८ रबिलोवल
सादर जालें ते आजी छ ११ रोजी त्रितीय प्रहरीं प्रविष्ट होऊन लेखनार्थश्र
परम समाधान जाले. छ ७ रोजीं राजश्री सवाईजीची भेटी जाली. तेच दिव
साइकाली आपण त्यांचया डेऱ्यास गेलो; आजी गुरुवारी ते आमच्या डेरि
येतील. जेष्ट वद्य प्रतिपदेस निरोप घेऊन येऊन. तुम्ही आमचे वाटेचे सुम
आसणें म्हणोन लिहिलें ते तपसिलें कलों आलें. येसियास आपली त्यांची भे
जाली. उतम गोष्टी जाहाली. आम्हाकडील वर्तमान तरी आपण कूच कर
गेल्यावरी पांच सात दिवस दाणादुणा मेलऊन या रानांतून कालहरण केलें; आ
राजश्री अंताजी माणकेश्वर यांचे मुकासे ग्वालेर हवेली बगैरे गावचे थोडें बहु
काम केलें. दाणा अवघ्या लस्करास मिलाला परंतु वैरणीचा तोटा. याकरि
हलुहलू ग्वालेरीस आलों. येथून कूच करून अंत्रींस जाऊन तेथून पुढें पछो
व सुकलारी गुजरोला या प्रांतीचे अंताजी माणकेश्वर यांचे तर्फेचें कामकाज कर
लस्करासहि दाणा वैरण मिलेल; आणि आपलीहि मार्गप्रतीक्षा करून. आ
वाटेचे सुमारेंच आहों. आपणाकडील वर्तमान वरचेवरी लिहीत असावे; अ
तेथून कूच करून सत्वरीच यावें. विशेष काये लिहिणे ?. कृपा केली पा
हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to the Peshwa referring to the latter's visit to Sa Jaising and communicating his own future plans.*

BALAJIRAO PESHWA AND EVENTS IN THE NORTH (1741-1761)

Since the publication of the section referring to "The Battle of Panipat" a number of important documents and despatches have been discovered and are here incorporated in a fresh section. The prefatory note to the first section stands complete in itself. The letters here presented supplement in many important details the main thread of events already described. It is enough for the purpose of this note to touch the more salient points brought out by the new papers.

(1) The disaster of Panipat is often traced to the differences and mutual jealousy between the two ablest generals of the Peshwa—Sindia and Holkar—who not only controlled the military dispositions in the North but wielded a vast amount of power in the state itself. When the strong hand of Bajirao was removed, these two could no longer see eye to eye and fell out completely, although the exact reason for their differences remained unexplained to this day. A letter of 1746 helps us to account for the origin of the rupture which was in course of time fanned into a blaze by interested parties. The quarrel goes back to as early as 1744 and its cause could have been easily removed by mediation or adjustment on the part of the Peshwa. But owing either to pre-occupation or intentional disregard, he neglected to do this apparently preferring to play off the two Maratha generals against each other, so as to enhance his own prestige.

(2) Rajputana at this period presents the sight of a land torn into a thousand factions, a veritable field of battle between crows and kites. The contest for the throne of Jaipur involved almost every Rajput state and the rival claimants were so unwise as to call to their aid both the Marathas and the Emperor's forces. The latter was anxious to regain the ground that had been lost by his predecessors. But no tangible results were achieved and the Imperial army retreated rather ingloriously as they were not supported from the capital owing to complications on the Eastern front where the Vazir, Safdarjung, who had led an army against the Rohillas, suffered a severe defeat, himself being wounded and his army routed. The gravity of the situation was enhanced by the rumoured advance against India from the North-west of the fierce hordes of Ahmedshah Abdali, the king of Kabul. To avert the complete disruption of his dominions the Emperor entered into a pact with the Marathas which is given in full as the very first paper by Mr. Rajwade in his first volume. Its correct date is June 1752.

This agreement provided that the provinces of Ajmere and Agra and the Chauth from the rest of the Empire should be ceded to the Marathas in return for their help in keeping peace in the empire and warding off its enemies.

(3) In 1752 Sindia and Holkar were called to the south by the Peshwa "to rid the Deccan of Mussalman rule once for all." Owing to the sudden demise of Ghaziuddin, who died of poison administered by his

step-mother, the Peshwa's plans took an adverse turn and his high hopes were frustrated. He then entered into negotiations with Salabatjang as the outcome of which both Sindia and Holkar suffered loss of territory, a result which so displeased Holkar that there were strong rumours of his leaving the Peshwa's service altogether. The Peshwa was much perturbed over this and tried to appease Holkar through the intercession of his (the Peshwa's) mother and son.

(4) The letters of Antaji Manakeshwar for the year 1753 may tire the reader with their verbosity but are none the less important as they give interesting details of the squabbles at the court of Delhi in which Antaji and the Peshwa's ambassador Hingne favoured opposite factions. Abdali is reported to be hovering near Attock and demanding his annual blackmail of fifty lacs.

(5) The siege of Kumbher and the subsequent developments at Delhi are clarified in the news-letter of 17th July 1754. The Marathas, who were now the guardians of the Empire, were requested to chastise Surajmal Jat who had the audacity to raid the Imperial Capital itself. Upon the approach of the numerous Maratha forces under Raghunathrao the Emperor on the advice of evil counsellors changed his mind and left his capital with the intention of helping the Jat against his former allies. Being apprised of this treachery, Holkar patched up a treaty with Surajmal and surprised the Imperial army at Sikandra and plundered the enemy's camp so completely that he captured the Zenana also. He was soon joined by Raghoba and Jayapa at Patpatganj ; the helpless monarch was dethroned and the Maratha victory was complete on receipt of a fine of 82 lacs of rupees from the new Vazir. The breach between Jayapa and Malharrao over the Kumbher affair had widened and Jayapa in disgust departed on his new enterprise of Marwar.

(6) The absence of Sindia and Holkar in the South in 1756 was the signal for the intrigues of the wily Rohilla Najibkhan, the Jat, and Madhosing. The last was the inveterate and implacable foe of the Marathas and plundered Holkar's provinces adjacent to his state.

(7) In December 1756 the Abdali descended upon Delhi at the invitation of Najib who at the head of a well organised party welcomed him as a counterpoise to the all-conquering Maratha influence. The Abdali carried everything before him and carried off considerable spoils. But before he returned, he released Ghaziuddin and reinstated him in his former position as Vazir on the condition that he would drive the hated Marathas out of the Doab. The perfidious Ghaziuddin, who seems to have no other guiding principle except that of self-aggrandizement, assented to the proposal and in April-May 1757 we find him capturing Maratha outposts in the Doab and threatening the territory of Shuja-ud-daula, when Raghunathrao hurrying from the south with fresh troops reached the vicinity of Delhi. Immediately a strong force under Sakharam Bapu and Vithal Shivdeo was detached into the Doab, and effecting a junction with Shuja succeeded in re-occupying the lost territory. The Vazir found it convenient to come to terms with the Marathas, and the Rohillas, left isolated in the field, laid down their arms in disgust.

(8) An interesting letter from Raja Keshavrao of 1760 may help to throw light on the vexed question of the abandonment by the Peshwa of the traditional Maratha guerilla tactics in this campaign. Abdali was a master of the craft and the plains of the North were ill-suited for *guerilla* warfare. Raja Keshavrao advised the Peshwa instead to send a large army with a heavy park of artillery organised on the European model. This accounts for the employment of Ibrahimkhan Gardi in Maratha service and the despatch of a large and well-equipped army against the Afghans, under the command of Sadashivrao Bhao.

No. 3] [6-2-1747

श्री

श्रीमंत राजेश्री बावा स्वामीचे सेवेसी

पोष्य विठल सिवदेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ७ सफर मु॥ पलाच्या जाणून स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. रा। बाळाजी गणेश बाबुराऊ नरसी याची रवानगी स्वामींनी केली. पत्रें दिली ती पावली. राहून आपला बंदोस्त करणें त्यावरून स्वस्तता जाली; परंतु नरवरकराच्या तोंडात देऊन आंत्री घेतली. पलाच्यास येऊन वृतबंधास आम्ही गुतलों. उभयेताच्या फौजा राजश्री अंताजीपंत यासमागमे देऊन मगरोणीस पाठविले. नरवरकराची फौज आली. झुंज जाले. त्याची फौज मोडली. देवीसिंग बकशी पडला. दोनच्यार सरदार मेले. तीस पसतीस सिपाई मारले गेले. तीस घोडे घेतले तरी अद्याप तहावर येत नाहीं. वकील आले होते ते गेले. आंत्रीसिवाय मामला करीत नाहींत. आंत्री महासायासे करून घेतली. घ्यावी तेव्हां मुलकांत लोकेशना+ होती. यांत स्वामीची आज्ञा होईल तैशी वर्तनूक करूं. स्वामीचे येणे जाले तर उतम आहे. आज नरवरचे पांच परगणे सुटतात. नरवरास शेह दिल्यानें दोनच्यार लक्ष रुो शहरची खंडणी होईल. पुढें चमीलकांठा च्यार दिवस फौजेचे पोट भरेल. एकदां स्वामीचे येणे या प्रांतास जालिया इकडील बंदोबस्त उत्तम होईल. स्वामींनी आमचे आम्हावर टाकल्यास आमची कुवत कोठवर? स्वामीचे येणे या प्रांतास होते याकरितां पुढें आलों. केवळ दुराग्रहच नवता. दुसरी पत्रे स्वामींनी पाठविलीं तेव्हां इकडे येणे जालें. इकडील गैरबंदोबस्त जाला तरी स्वामीचाच बदनक्ष आहे. विशेष काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Vithal Sivdeo's Narwar Campaign.*

No. 4] [3-3-1742?

पा। छ ८ मोहर(म)

श्री

सेवेसी चर्णरज अंबाजी दादाजी सां दोन कर जोडून नमस्कार विज्ञापना. येथील सेवकाचे वर्तमान ता। छ ६ मोहरमपावेतो स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे. यानंतर राजश्री सुभेदार नागपूर येथे आले. राजश्री रघोजी भोसले याचे काही कामकाज आहे त्याचा आंगीकार केला आहे. तो कार्यभाग करून

+ दुर्लौकिक.

आण देवगडचा पैकाहि यावा, त्यास येक दोन रोज लागतील आण मग मजल दरमजल देशास येतील. राजश्री सदासिवपंत याची पत्रे स्वामीस उदेपुरीहून आली ती कासीद घेऊन येत आहे त्यावरून राजश्री मल्हारबा व राजश्री राणोजी सिंदे याजकडील वर्तमान विदित होईल. हली राजश्री राणबा व गंगोबा होलकराचे सुरोंजेकडून उजिनीस येत आहेत. राजश्री मल्हारबा व रामचंद्रबावा कालेबागावर नवाब कमरदीखान याचे उद्योसे[1] गेले. त्यास त्याही कूच करून गेलेवर त्या प्रांते टकापैका वसूल करीत आहेत. नवाब निजामनमुळुक नांदेड पावेता जाऊन बुलगे नांदेडी ठेऊन सडे होऊन म्हसवेस गेले; आण तेथून कवालास जाणार यैसे वर्तमान आजीचे आहेत. हाजी हसन याणे आपा रडी याचे भावासी लढाई करून त्यास जिवंत धरला आण गढी घेतली हे वर्तमान नवनीदराये दिवाण याणी नवाबास समाचार सांगितला, त्यावरून दिवाणजीस सिरपाव दिला व हाजी हसन यास हस्ती व घोडे वस्त्रें सिरपाव पाठविला. राजश्री महिपतराऊ राजश्री सुमंताचे पुत्र येथे आहेत त्याजकडे समाचार पुसत असतों. परंतु त्यास काही ठाउक नाही. राजश्री सुमंत लस्करास जाऊन मिलाले. लस्करीं गेलवर काही त्याचे पत्र आले नाही. असल ते वर्तमान ते सेवेसी लिहीत असतो. राऊत येथे आहेत त्याची खर्ची होऊन आज पाच सात रोज जाहले, केवल खर्चास नाही, मग पाच सात रुपये उसणे करून दिले आण राहून घेतले. शहरी सर्व विकत. पोटास पाहिजे. येथून उठोन यावयास जाहले मग उसणे करून रुपये दिले. पुढां काये आज्ञा ती केली पाहिजे. सेवेसी स्रुत होये हे विज्ञापि.

¶*The Peshwa's agent at Aurangabad gives news of the movements of Ranoji Sindia, Malharrao Holkar and Nizam-ul-mulk.*

No. 5] *[11-7-1742*

पो छ २७ जमादिलोवल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र मल्हार कृतानेक विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा आषाढ वद्य ५ पंचमी स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. राजश्री मल्हार कृष्ण यासी यैवजाचे तरतुदेविसी आज्ञा केली होती त्यास बहुतेक त्यांनी येथील येथे

---

१ उद्देशें.

दिल्हा. बाकी त्याजकडे येकाहतर हजार रुपये राहिले ते औरंगाबादेस त्यानी पाविले. सांप्रत आपली छावणी इकडे जालियामुळें फिकीरींत पडले. यकाहतरी पैकी तूर्त काही राा धोंडोपंत घेऊन आले आहेत. ते सेवेसी निवेदतील. राहिले ते औरंगाबादेस कोणास देविले पाहिजेत. सेवेसी शृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Ramchandra Malhar to the Peshwa : informing the latter that Malhar Krishna has sent the money required. This Malhar Krishna and Ranoji Sindia were stationed in Bundelkhand to collect tribute when the former together with Ranoji's son Jyotiba were murdered. The whole letter is in Ramchandra Malhar's own handwriting.*

No. 6] [*30-6-1742 ?*
[*19-6-1743 ?*

पो छ १० जमादिलावल.

श्री

पुरवणी राजश्री नाना व तथा
राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी पत्रें पाठविलीं तीं छ ८ जमादिलावलीं पावलीं. दिलीचें वर्तमान व जयेसिंग याच्या पुत्राची व अभयेसिंग याची भेटी जालियाचे वर्तमान लिहिलें तें कळों आलें. राजश्री मल्हारजी होलकर व राजश्री राणोजी शिंदे याजकडील वर्तमान तपसिलवार लिहिलें त्यावरून बहुत समाधान जालें. स्वामीचें तपोबल बहुत या प्रभावें सेवक लोकांस उत्तम प्रकारें येष येतें, आणि तेंहि स्वामीकार्य करून कीर्तीस पात्र होत आहेत. छावणीस राहिले उत्तम गोष्ट जाली. याउपरी भाद्रपदमास समीप येतांच हजार फौज बऱ्हाणपुरीं स्वामीनी ठेविली म्हणजे घासदाणियाचा उपद्रव रयेतीस लागणार नाहीं, विदित जालें पाहिजे. स्वामीनी प्रतिनिधी यांजकडील ठाणियाचा मजकूर लिहिला त्यास सर्वत्र सातारियामधें समस्त लोक बोलतात कीं ये समई राजश्री पंतप्रधान यानी ठाणी रक्षिलीं म्हणून बोलतात. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*The writer congratulates the Peshwa on the successes gained by his Sardars and advises the addressee to keep a strong force near Burhanpur.*

No. 7] [*11-3-1745*

श्री

पुा राजश्री रामचंद्रबावा गोसावियांस

विनंती उपरी. भेलशास सुरंग लागले होते * * त्यामुले * गाववाले याणी दहशत खाऊन कौल घेतला. ठाणे खाली करून दिल्हे.

छ १८ सफरी सोमवारी श्रीमंताचे निशाण चढले. आपल्यास कलावें म्हणून लिा असे. श्रीमंताचा त्याचा सलूख तह अद्यापपर्यंत बसला नाही. बसलियाउपरी आपल्यास लेहून पाठवून. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The capture of Bhilsa is reported to Ramchandra Baba.*

No. 8] [*25-5-1743*

श्रीशंकर

श्रीमंत सकलगुणालंकरण
माहाराज राजेश्री बाबा[१]
स्वामीचे सेवेसी

पाौ नारो सामराजे कृतानेक साा नमस्कार विनती. येथील वर्तमान ताा छ ११ माहे रबिलाखर मुकाम सवाई जयेपूर येथास्तित जाणौन श्वामीनी आपले स्वस्तिक्षम लिही ती आज्ञा केली पाहिजे. विशेष. येथील वर्तमान तरी आजी जेष्ट शुद १३ मंगलवारी गुलाबसिंग याजला सिरपाऊ देऊन च्यार हजार फौज देऊन तुम्हास तंबी पोहोचाऊन भदावर व कछवा धारेत अमल करावा व किलेजातची बदोबस्ती करून बुंदेल्यासी सामील हावे, त्यानी यानी मिलो(न) तमाम बुधलखंड व दतिया वोडस भदावर व (क)छवा धार मालेवेसुधा गनिमाचा नीरे[२] काढावा, यैसा करार करून सर दरबारात विडा घेऊन आला आहे. बकसीरामाने याजला लिहिले की भदावर किलेदारच राा नारो शंकर यासी ठीक केले आहे. भेटीअती सेवेसी विनंती करीन म्हणोन लिा आहे. त्याजवरून याजला पुस्तगरमी फारसी जाहली. तुम्ही देखतपत्र किलेजातीची बंदोबस्तीस न चुकावे. याची द्रष्ट नजर आहे. यान खामखा कबूल केले कीं राा लक्ष्मण नारायेण याजला काढून देतो. हें ऐकून मुनसी जेयेगोपाळ यांसी व गुलाबसिंगासी कजिया सर दरबारांत जाहला ते समई मी नव्हतो. मुनसीनें सांगितले व मुन्सीनें तुम्हांसही लिहिले आहे. त्याजवरून सेवसी निवेदन होईल. सारांश की बंदोबस्तास आस[३] न कीजे न कीजे न कीजे. ठाणी जतन कीजे. सविस्तर मुजरद कासदासमागमे लिा असे. कृपा निरंतर असो दीजे हे विा

---

१ रामचंद्रबाबा. २ कोळ्यांचें मोठें जाळें. भावार्थ, झाडून सारे खरडून काढावें.
३ आस=आळस.

रा। बाबूरावजी स्वामीस सां। नमस्कार विनती. येजमानास लिहिले आहे त्याजवरून श्रुत होईल. द्रष्ट स्वप्न आहे. बंदोबस्तास न चुकावें. कागद जतन ठेवणे हे वि॥.

¶*Naro Samraj to Ramchandra Baba (?) writing from Sawai Jaipur warns the addressee to be on the look-out since the Rajputs have concerted plans for ousting the Marathas from the north.*

No. 9] *[1743-44?*

श्री

पुरवणी[+] राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. स्वामी प्रतिवर्षी नर्मदा उतरतांच लोकास निरोप देत असतात. फौज आपल्या वळणानी जात आसती. त्यास स्वामीनी येंदा फौजेस निरोप देऊ नये. गंगा उतरलियावर फौजेस निरोप द्यावा. राजश्री मल्हारजी होलकर व राजश्री राणोजी सिंदे फौजसहवर्तमान मालवियांत स्वामीनी ठेविले पाहिजेत. लोकास दोन वरषे जाली आहेत राहाणार नाहीत. परंतु आस्विनमासपावेतो फौज ठेवावी. स्वामीनी त्याचे कारभारी समागमे आणावे. निमे फौज देशास त्याची आणावी. त्याची समजावी(ष) करून, हे लोक वाटे लावावे. मग त्याजपासी जे असतील, ते आपल्या घरास येतील. याप्रमाणे स्वामीनी विचार केला आसेल परंतु सूचना लिहिली आसे. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*The writer Purandare suggests to the Peshwa when and how he should disband the forces.*

No. 10] *[1744-45*

श्री

पु॥[१] राजश्री मल्हारजी * * * *
व राणोजी सिं(दे)

आसीर्वाद सु॥ खमस आर्बै(न) * * * * * * * लिहिले की रोहिल्याकडील * * * * * * * * बरेच जाहाले तेथील बंदोबस्त * * * * * * * डचे रोखे त्याजकडील

+ पत्र सातान्याहून पुरंदऱ्याचें. १ हें पत्र पुष्कळ ठिकाणीं फाटलें आहे.

कारभारी व * * * * * * गोविंदपंत हुजूर आहेतच. बुंधेल-खडचे कार्य मातबर आहे अगत्य तो उद्योग करावा. आम्ही ग्वालेर वगैरे कामे करीत येतो म्हणून विस्तारे लिहिले. ऐशियास रोहिल्याकडील बोली मात्र ठहरली परंतु ठाणी आमचे स्वाधीन व्हावयास किरकोल गावची वाटणी ठीक होऊन * * * दाराचे स्वाधीन मुलूक व्हावयास व गुा बाकी पसतीस हजार आहे ती उगऊन द्यावयास निदानपक्षी पंधरा दिवस या प्रांती लागतील. नाहीतर काम मलमलीत रा * * * * * * * * चे नाही तथापि अष्टे प * * * * * * * * वगैरे ठाणी तो * * * * बुंधेलखंडचे कामाचे * * * बुंधेलखंडास गेलियाखेरी * * * * * * * * खातरखवा लागता दिसत नाही. मांगेहि तुम्ही पारपत्य उत्तम प्रकारे केले. पुढेहि बाकी झाडून घेणे व तिसाचे हिशाचा मुलूक घेणे हे गोष्ट होत नाही. तेहि निलाजरेपणावर आले आहेत यास्तव तुम्ही किरकोल काम ग्वालेर * * * * चे त्यास महिना * * * * * * * * * लाविता त्वरेने वोडसे * * * * * * * * बुंधेलखंडचे सरदेस * * * * * * * * * खडचे मामलेदार तुम्हाकडे * * * * * * येऊन पोहचतील. सारांश तुम्ही ते प्रांतीचा चालता गाडा करून देऊन सत्वर चैत्र सरला नाही तो बुंधेलखंडात दाखल होणे. आम्हीहि मागाहून जेथे तुम्ही असाल तेथे आठा चहू दिवसाचे अंतरियाने येऊन पोहचतो. चंदेरीचा तह व कठोरवाले याचा उपसर्ग वारणे जरूर आहे. येथीलहि ठाणी हातास आली पाहिजेत. खेचीचा तह तुम्ही केला न केला ते काही लिहिले नाही. त्याजकडे स * * * * * * दोन तीन परगणे आहेत ते * * * * पाहिजेत आमचे * * * * * * ठेयाचे मुकामी खेची * * * * * * * असेल परंतु हा कालवर न लि * * * * जाहाले नाही ऐसे दिसते. जर जाहाले नसले तर तेहि कार्य जरूर आहे. साराश जगराज वगैरे मोठे लबाड आहेत. विना तुम्ही बेजरब तोंडावर हाटल्याखेरीज आइकणार नाहीत छ २ * * *

लेखन सीमा.

¶*Malharji Holkar and Ranoji Sindia are ordered to expedite the settlement of the province of Bundelkhand. Directions regarding general procedure in the north are further given by the writer.*

No. 11] [17-1-1745

पो छ. २१ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री बावा स्वामीचे सेवेसी

अज्ञाधारक गोपाल केशव साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना यैसीजे. येथील वृत तागाईत छ १४ जिल्हेज आपले कृपेकडून येथास्तित असे. विषेश. या प्रांतीचे वर्तमान गतवर्शी राजश्री लक्षुमणपंत दादा व राजश्री गोविंद बलाल व राजश्री दादो माहादेऊ फौजेसह येऊन कितेक जमीदार मारून काहडले आनी ठाणी बसविली. मुलूक अमली होता त्याची लावणी जालीच होती. तेथील जमाबंद्या आकारून वसूल चाली लाविला आणि कूच करून गेले. तदनंतर मागे प्रज्येन्येकाली जमीदारानी बहुत हरामखोरी केली. ठाणियासी येऊन मोरचे लावले. मुलूक मारला. मरट मालथोनकर व कराटे व धामोणीचा किलेदार सवाई राऊत मिळोन शाहडुबर व हवेली वगैरे गाव कुल मारले. नित्ये उठोन ठाणियासी येऊन लागत. त्यामधे राजे सभासिंग यानीहि पुन्ये खर्चून कुल जमीदार उभे करून कजियास प्रवर्तले. दुर्गसिंग कोटेकर पूर्वीच आम्हास भेटला आणि मुचलका लेहोन दिल्हा कीं सरकारचा मुलूक मजकडे राजियाकडून होता तो सोडून दिल्हा. कमाविसदार बरोबर देणे, आमल बसऊन देतो. तदनंतर सैन्याचे आगमन जालियानंतर मजला सरदाराचे उरुबरु[1] घेऊन जावे. ते कृपाळू होऊन चाकरी सांगतील ते करीन, पोटास देतील ते घेऊन. याप्रमाणे करार करुन आम्हाकडील कारकून बाजी हरि विस्वास देऊन घेऊन गेला. सन्मास ठेविला परंतु येक पैसा दिल्हा नाही. तदनंतर राजश्री गोविंद बलाल यासी व त्यांसी कटाक्ष जाला. पुन्हा सलुखहि जाला. तिसरा हिसा सरकारात घ्यावासा ठहरला, लिहिलीं पुसली करून उभये पक्षीचे कमाविसदार घेऊन गेला आणि हरामखोरी करून उभये पक्षीच्या ठाण्यावर रात्रौ आले. राजश्री गोविंद बलाल याजकडील कारकून येक व ये देसीच बरकंदाज कोठ्यात होते ते पळोन हव्यास गेले. आम्हाकडील बाजी हरि ग्रहस्त होता व माणसे खानदेसी व आहिरवाडि-याची होती. यासी त्यासी युध्येप्रसंग जाला. पंत मारास व जमातदारांस गोळ्या लागोन ठार जाले व कितेक जखमीहि जाले. कुल वस्तभाव घोडीपिढी लुटून नेली. सा महिने विस्वास देऊन ठेविले. सेवटी हा विचार केला. यैसा

---

१ समक्ष, सन्मुख.

हगामा आज सा महिने पुरवला. आम्हाकडल्या तालुक्यात येक गढी नवती. आम्ही दाहा बारा गढ्या सिध केल्या व नरसीगडची गढी मातबर केली. दारु गोळी सामान व सिबंदी मातबर ठेऊन बंदोबस्ती केली. ठाणियाच्या बळे सालमजकुरी मुलकाची लावणी उतम जाली. दाहा पंधरा हजार बीज तगाई दिल्ही. खरीफाच्या हंगामाचे दिवस आले. गुदस्ताची बाकी व साल मजकूरचा तसनीचा वसूल चालीस लावला. यैसियास जे सभासिंग याजकडील कमोदसिंग मळहोरकर व नारायेणजी हटेकर वगैरे यानी जमाव स्वार ५०० पाचसे व बरकंदाज दोन हजार हती नौबद निशाणे व कबिले सुधां पचमनगर व बटियागरावर आले. तेथे राजश्री गोविंदपंताकडील कमाविसदार * * याजला आस्रा बसावयासी नवता म्हणोन निघाले ते हटीयासी गेले. त्यानी येऊन उभये स्थली मातबर खंडणी च्यार पांच हजार ठहराऊन रोक घेतल्या. हलीं आमची गढी बटीयागरानजीक अजंनी आहे तेथे येऊन मुा केला आहे. आणि तमाम मुलकाच्या खंडण्या करितात. जे गाव भेटत नाहींत ते गाऊ लुटून जाळून टाकितात. आमची ठाणी मातबर सरंजामानसी आहेत. त्यामुले ठाणियास लागूं पावत नाहीत. वरच्यावरी जमाव स्वार बरकंदाज येतच आहेत आणि खंडण्या घेतच आहेत. कुल मुल्रक उज्याड जाला. राजश्री गोविंदपंत व आम्ही व राजे प्रीतिसिंग तिही तालुखियांत तहसील बंद जाली. येक रुपया वसूल येत नाही. त्याची काही या प्रांती पूर्वी जागीरहि नवती परंतु राजियांचेच मानस. राजे प्रीतिसिंग गढ्याकोट्यांत आहेत परंतु बाहेर निघत नाहीत. चालीस पनास राऊत व से पनास बरकंदाज हद्यास पाठऊन दिल्हे. तेथून येक ठाणेदार व राजे मजकुरांकडील मिलोन चालीस पनास राऊत व दोन तीनसे बरकंदाज रामनगर जटासंकर नजीक येथें येऊन राहिले. यासी त्यासी गाठ पडोन युध्ये प्रसंग जाला. उभयेपक्षी दाहा पंधरा माणूस ठार जाले. काही जखमी जाली. कच खाऊन माघारे गेले. अमित्रानी सेर होऊन दाहा पाच गाव मारून जाळून टाकले. प्रस्तुत आम्हीं से दोनसे राऊत जमा केले आहेत व राहिली गढाकोटाहून काही स्वार बरकंदाज आले आहेत. येकत्र जालियावर ईश्वरसता प्रमाण. परंतु त्याजकडील दिवसानदिवस जमाव होतच आहे. त्यास याप्रमाणें प्रसंग घडोन आला आहे. आपली स्वारीचे आगमन बुंधेलखंड प्रांतास होते म्हणोन वदंता यैकोन पुढे सेवेसी दरशणास यावे हे मानस. परंतु कूच जाल्याचे वर्तमान तथ्ये न आले याजकरिता सेवेसी विनंतीपत्र लिहिले आहे. राजश्री लक्ष्मणपंत दादा व रा। गोविंदपंत काल्पी मोहबा व कोचकनार प्रांती आहेत.

प्रस्तुतकाले कोण्हीकडून उपराला होता दिसत नाही * * * यैसियात कोण्हीकडून दोन हजार फौज तरी येऊन पोहचती तरी आवघ्याची शरम राहती. नाहीतर ईश्वरसता प्रमाण. जाले वर्तमान सेवेसी कळावे याजकरिता लिहिले आहे. अमित्राचे पारपत्ये करणार स्वामी समर्थ आहेत. गढ्या ठाणी आहेत त्यास तो काही चिंता नाही. परंतु मुलकावरी कशाला निर्माण जाला आहे. सरकारचा पैसा बुडतो याजकरिता वारंवार विनंती लिहिली जाती. जेणेकडोन हरामखोराचे पारपत्ये होये, आनि मुलकास स्वस्थता होये ते करणार आपण समर्थ आहेत. विशेष काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Gopal Keshav reports to Ramchandra Baba the troubles Sabhasing Bundela has been creating in the Peshwa's provinces of Bundelkhand and asks for relief.*

No. 12] [*11-3-1745*

श्रीरामोजयत

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

पोष्ये येसवंतराव माहादेव सां दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. पत्र पाठविलें तें उतम समईं प्रविष्ट होऊन लेखनार्थश्रवणे आनंदावाप्ति जाहाली. यैसेच सर्वदा आलिया वार्तिका-समवेत प्रेसितपत्रीं सांभालीत असिलें पाहिजे. यानंतर छ १८ सफरी भेलसियाचे ठाणे घेतलें. पुढे रोहिल्याचा बंदोबस्त होणे आहे, तोहि विचारे करून होईल म्हणून लिहिलें. त्याजवरोन बहुत संतोष जाला. राजश्री स्वामीचे पुण्यप्रतापें-कडोन व वडिलांचे पुण्यप्रभावेंकडोन आपणास येशप्रातीच आहे. आपण जो मनसबा अंविलंबितील तो सिधीस पावतच आहे. संतोषवृत वरचेवरी लिहित जावें. बहुत काये लिहिणें कृपा लोभ आसो दिल्हा पाहिजे हे विनती.

¶*Yeshwantrao Mahadeo congratulates the Peshwa on the fall of Bhilsa.*

No. 13] [*10-7-1745 ?*

पौ छ १२ रजबु

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक राघो पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वृत ताा छ २० माहे जमादिलाखर मुाा सिरोज स्वामीच्या कृपाकटाक्षें यथास्थित

असे विशेष. इकडील वर्तमान पूर्वी हुंड्या पाठविल्या त्या पत्रीं लेखन करावयाचें करून पाठविले आहे. प्रस्तुत या प्रांतीचें वर्तमान उभयता सरदार सेनासह- वर्तमान बुंधेलखंड प्रांते आले. त्यास कालपी प्रांते वगैरे मुलकांत चुरखीकराने सभोवते मवास जमा करून हंगामा करून अमल उठविला होता. त्यास लस्करच्या स्वारीपूर्वी राजश्री नारो शंकर यांणीं सडे स्वारीनसी चुरखीकरावरी गेले होते. त्यास तेथील सरदार बाहेर निघोन माारनिलेसी युध्धप्रसंग उतम प्रकारचा केला. निदान राजश्री नारोपंती स्वामीच्या प्रतापेकरून कष्ट मेहनत करून मुख्य चुरखीकरास जिवें मारिले. तदनंतर सरदार आले, तेव्हां गडी खाली करऊन सरकारचे ठाणे बसविले. त्या(उ)परी लस्कर दरमजल स्वार होऊन आजी शहाडौरायाचे रोखें आले. दरमजल देशास येतात. शेवेसी कळावें येदंनि(मि)त्य लिहिले असे. बुंधलखंडाच्या ऐवजी तूर्त हुंडिया ४०००२ अखे चाळीस हजाराच्या दो आगळ्या कासिदासमागमें औरंगाबादेच्या पाठविल्या आहेत, त्या यादीप्रमाणे प्रविष्ट होतील. राजश्री लक्ष्मणपंत सरदारांच्या भेटी चुरखीवरी घेऊन, कालपी प्रांते बंदोबस्तास राहिले. श्रुत हीय हे विज्ञाप्ति.

¶*The activities of Holkar, Sindia and Naro Shankar in Bundelkhand are reported to the Peshwa.*

No. 14] [*7-6-1746*

[१]मीरखा टोके हमवारे शाद

कामबाशद

ॐ तहवर व जलादत दस्तगाह

आंकीं, जैतपुरास मोर्चे व सुरंग चालऊन दोन सुरंग उडविले. त्या दहशतीनें जैतपूरवाले कौलास येऊन कौल घेऊन जागा खाली करून देऊन गेले. जैतपूर फत्ते जालें म्हणोन राजश्री मल्हारबा व जयापा यांणीं लिहिलें त्याजवरून खुशवक्ति जाली. जागा बांका होता लेकिन तुम्ही सर्वांनीं मेहनत व तरतूद

---

१ का. सं. प. या. ६९ पहा.

2196

करून जागा फत्ते केली. शाबास आफरी तुमची व लोकांची असे. सदैव तिकडील खुशखबर कलमी करीत जाणें. जाणिजे छ २.८ जमादिलौवल. जियादा काय लिहिणें

राजा शाहू नरपति
हर्षनिधान बाळाजी
बाजीराव मुख्य
प्रधान.

लेखन
सीमा

¶*The surrender of the stronghold of Jaitpur.*

No. 15] [*1745*

श्री

शेवेसी विज्ञापना. राजश्री त्रिंबक विनायेक याजला जैतपूरच्या मुकामीहून पत्रे पाठविली. त्यासी त्यानी पत्रार्थ स्वामीस श्रृत केलाच असेल. तदनंतर अजितागाईत आपली स्थीतरीत पूर्वी कैलासवासी याजपासून स्वामीसेवा करितो. येकनिष्ठेचा विचार जो आहे तो स्वामीचे चित साक्ष असे; सेवक लोकानी परिहार ल्याहावा येसे नाही. राणोजी सिंदे सोबती मातबर होते. परस्परे मर्जी रक्षून स्वामीकार्यास तत्पर होतो. त्यामुले कामेहि उमदी उमदी होऊन आली. मधेमधे त्याच्याहि बुधीस काही विपर्यास जाला. त्यामुळे कितेक स्वामीकार्यास नाश होऊ लागला. ते केवल आपलीच बोढ सेवटास न्यावी या विचारे वर्तनूक करू लागले. आम्ही काही दुसरी गोष्टी दिसो न दिल्ही. येक स्वामीची मरजी जाणून सेवा मात्र केली, कोणी बोढ दुसरी न दाखविली, हे सर्व हारद्र स्वामीस निवेदन आहे. गतवर्षी संबळगडचे अनुसंधान आम्हाकडे आले. त्याचा निश्चये सर्वानी मिलोन केला. सेवटी ते कार्य प्राप्त जालियाउपर ममता निर्माण होऊन कार्ये मोडून दुसरीकडे गेले. त्याचा परिणाम न जाला. सेवटी सांप्रत अवंदा तेच करार केले. आमचा मात्र अपमान करावा येवढी गोष्टी मात्र केली. तेच वेळेस सोबतीची पूर्ती जाली. त्यासी देवीगतीने राणबास देवआज्ञा जाली. तेव्हा मग तर बोलता नयेसे जाले. लोकिक विरोध दिसोन येतो. त्यासी आम्ही सर्वहि टाकून दुसरा विचार तिळतुल्य न दाखविला. लग्न सिध

करून मुलकगिरीस चालिलो. त्यासी थोर कार्ये सरकारचे बुंधेलखंडचे. त्याचे वर्तमान धारेचे मुकामी आले की कामकाज सुरलीत चालते. त्यासी येकले रा। जयापा व बावा गेलिया कार्ये होईल येसे जाणून डोंगरपूरप्रांते फौजा बहुत दिवस गेल्या नवत्या, बंदोबस्त करणे, यास्तव तिकडे गेलो. दुसरे बावाच्या मनात दुरभिमानाचा कारभार करावा, आमची हेकडता दर्शवावी या पश्चात्तापेकरूनहि तिकडे गेलो. यामुले स्वामीनी पत्री शब्द लाऊन लिहिले की पेरणी टाकून पैलाटिया[१] उपडावयासी गेलेत. बुंधेलखंडामधे पेरणी केलीच होती त्याचे संरक्षण बावा येऊन करतील. आम्ही इकडे नवाच राणवा काहडून सेत पिकवावे येदनिमित्ये मेवाड प्रांते आलो. त्यासी कार्येहि उतम योजून आलो. कोणाचा नाश न होता उतम लाभ व्हावा येसा इत्यर्थ केला होता. तों राजश्री जयाजी सिंदे यांची येक दोन पत्रे आली की बुंधेलखंडचे कामकाज मातबर आहे. बुंधेलियानी बदल खाला आहे. विना मातबर फौज असलियाखेरीज सिध्दीते पावणार नाही. यास्तव निकट जाणून अतिसत्वर आले पाहिजे. त्यावरून साहेबकाम मातबर जाणून जयापाची ममता धरून, रातचा दिवस करून, लांबलांब मजलीने येऊन जैतपुरास सामील जालो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar being severely reprimanded by the Peshwa for not having joined Jayapa Sindia in Bundelkhand writes in explanation that there was some coolness between himself and Ranoji over the Sambalgad affair and before reconciliation could be effected Ranoji Sindia died. To avoid unpleasantness with his son, Jayapa, he undertook the Dongarpur expedition thus giving Jayapa a free hand in Bundelkhand. On receiving word for help from Jayapa he hastened towards Bundelkhand and had, on the day of writing, reached Jaitpur.*

No. 16] [*1-2-1747?*

श्री

श्रीमत राजश्री बावा स्वामीचे सेवेसी

पो॰ये अंताजी माणकेस्वर सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। फालगुण सुध ३ मुकाम पलाछा प्रांत नरवर सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे. श्रीमंत राजश्री रामचंद्रबावा फौजेसुधा कोचकनार प्रांत बुंधेलखंड येथेंच आहेत. पुढे

---

१ कापसाच्या काड्या.

पटणियाकडे जावयाची वार्ता आहे. आम्हास ग्वालेर प्रांतास व राजश्री विठलपंत तात्यासी पाठविले आहे. त्यासी मवास मुलूख. थोडीबहुत मामलत विल्हे लागली. रा। विठलपंतांकडील मामलत नरवरकर न करीतच. तेव्हा अंत्रीची गढी फार मातबर, तीन कोट, खंदक भारी, येसी जागा होती. त्यासी मोर्चे लाविले. सवा महिना नाना प्रकारचा श्रम पडला. सुरंग पंधरा उडविले तेव्हा गढी फते जाली. विठलपंताचे ठाणे बसविले. आता येऊन पलाईचास मोर्चे लाविले. याउपर मामलतहि उत्तमच होईल. पुढे तुवरघोरची आमल करणेच आहे. हे काम जालियावर तिकडे जाऊ. श्रीमंत राजश्री बावानी पत्रे आम्हास उभयेतास मागती बोलाविले त्यासी येथील गुंताहि उरकला नाही व रा। बावाहि येक रुपया न देत, अथवा आठपंधरा दिवस थोरली फौज आणून साहित्य न केले. याजउपरी मुलूक या प्रकारचा मात्रगमनी, आपलें फौजेनसी होईल ते करावे येसे आहे. निसबतीचे लोक देखील स्वार १७०० सतरासे त्यास पैका दुसाला रुपये साहा लक्ष कबज होते. लोकास श्रम भारी पडतो. त्यासी मुलकात दुसाला तिजाई सरकारची देखील दोन अडीच लाख रुपये व लो क ची मामलत ते भरीस घातली. पुढे निकाल कैसा करावा? कर्जे जेथवरी मिलत तेथवरी घेतच आहो. उरले संकट स्वामीचे स्वामीस आहे. तिजाईचे सनदेविसी सेवेसी विनंती पूर्वीच दोन वेला लिहिली आहे त्याप्रमाणे देवणार स्वामी समर्थ आहेत. विनंती उदास न करावी. सेवकास सर्वप्रकारे आसरा स्वामीच्या पायाचा आहे. आम्ही सेवा मात्र करावी. स्वामीच्या नावास शब्द लावून न घ्यावा. सामान मातबर वागवावे. वरकड संकटातून काढणार स्वामी समर्थ आहेत. कांहीं झांसीस कर्जे मिलाली ती घेतली कांहीं मुलकात निर्माण जालें ते घेतले. आणि लस्करची समजाविसी केली. लोक छावणीमुले फार बुडाले. पडली घोडी आद्याप तेथेच राहिली आहेत. केवल तिजाईचा येवज भरीस पडलियानेच निसबतीची समजाविसी न जाली. ऐसी हजार रुपये कर्ज झासीस घेतले तेव्हा समजाविसीचा निकाल पडिला आहे. येसे वर्तमान आहे. सर्व संकट स्वामीस आहे. रा। विठल-पंताचा आमचा येक हात करून दिल्हा त्याप्रमाणे त्याच्याच मायेत आसोन त्याच्या कार्यावरी तत्पर आसो. त्याचा मुलूक सोडविती. वरकड सेवकावरी पेच शंभर पडिले. त्याचा परिहार करणार स्वामी वडील आहेत. आमची फजिती जाली तरी तेही संकट स्वामीस आहे. विस्तार काये लिहिणे? बहुत काये लिहिणे कृपा करीत जावी हे विज्ञाप्ति.

¶*Antaji Manakeshwar writes how zealously Vithal Sivdeo and himself have been exerting themselves to settle the province of Gwalior.*

2199

No. 17] [6-12-1747

श्री

राजश्री माहादाजी पंत गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो॥ मलारजी होळकर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. श्रीराणाजीकडून राजश्री किशोर पंचोली व जयसिंग सगतावत पिंपळेकर या उभयतांस श्रीमंताच्या दर्शनानिमित्य पाठविले आहेत. माधोसिंगाकडून कणीराम आले आहेत हे सविस्तर आपणास विदित करितील. आम्हापासींहि छ १४ जिल्हेजी सटगांव पा॥ नेर या मुकामी येऊन भेटी घेतली. सविस्तर सांगितलें. त्यावरून श्रीमंतास व आपणास पत्रें लिहिली आहेत तरी याचा कार्यभागाचा विचार श्रीमंतास विदित करून त्यांच्या आपल्या मतें मनास आणून कर्तव्य तें करावें. श्रीमंताचे आगमन या प्रांते जाले तरी उतमच. कदाचित श्रीमंताचे आगमन व्हावयास अवकाश नसिला तरी जे काय लिहिणे ते श्रीमंताचे आज्ञे प्रमाणें आम्हास ल्याहावें. तदनुसार वर्तणूक करूं. वरकड सविस्तर रा॥ गोविंदपंताही श्रीमंतास व आपणांस व विठल प्रभू या समागमे पाठविली आहेत त्यावरून व यांच्या जबानीवरून कळो येईल व कणीरामहि जबानी सांगतां प्रसंगे येईल. रा॥ छ १४ माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Malharji Holkar despatches envoys from Madhosing and the Rana of Udaipur to secure the Peshwa's help in Madhosing's favour.*

No. 18] [1747?

श्री

राजश्री मल्हारजी होळकर काका गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ जयाजी सिंदे रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. राजश्री पांडुरंग सिवदेव पुरंदरे यास सालगुदस्ता श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबी तालुके प्रांत नरवर येथील घासदाणा व नजरेची कमावीस सांगितली. त्यास मानिले प्रांत मजकुरी गुदस्तापासून गेले. परंतु नरवरकरानी हरामजादगी करून गतवर्षी फौजेचा शह पोंचला नाही याकरितां सदरहू अमलाचा रुपया गुदस्ता व सालमजकुरी वसूल दिल्हा नाही. मारनिले आजीपर्यंत हैरान जाहाले. यैशा(स) प्रांतमजकुरास बगर शह पोहचल्याविना सुप्रयुक्तिनें वसूल देत नाहीं. याकरितां

2200

श्रीमंतानीही आज्ञा केली आहे कीं नरवरास शह पोहचऊन मारानिलेचा मामला सुरलीत चालोन वसूल होये ते करणे. त्यास आपला तिकडील गुंता उरकोन प्रांतमजकुराकडे अगोधर येणे जाहाले तरी नरवरकरास शह पोहचऊन सालगुदस्त व सालमजकूरचा पैका राहिला आहे तो वसूल होऊन याचे पदरी पडे ते गोष्ट केली पाहिजे. आम्हीही लौकरीच येऊन पोहचतो. अतःपर आमच्या येवयास विलंब नाहीं. आपण त्या प्रांते आल्यावरी रा। पाडुरंगपंत येऊन भेटतील. वर्तमान निवेदन करितील. तदनुरुप यांचे साहित्य होऊन ये ते गोष्ट केली पाहिजे.

¶*Jayaji Sindia asks Malharrao Holkar to chastise the chief of Narwar for withholding the Maratha dues from his state.*

No. 19] [*1747 ?*

श्री

श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीजीचे सेवेसी

विनंती ऐसीजे. माहाराज खावंद आहेत. मल्हारबास आज्ञा केली असेल, त्याजप्रमाणे ते कार्यभाग करून देतील. राजश्री जयाजी सिंदे व बावा याणी तो आपल्या हुकुमावर कामकाज ठेविले आहे. मामलतीचे वर्तमान राणाजीकडे मेजमानीपैकी बाकी व सालमजकूरच्या पटियापैकीं बाकी राहिली आहे. ते नित्य उठोन तगादा करितो; देऊं दिलाऊं ऐसे म्हणतात. प्रज्येन्यहि ये प्रांतीं नाहीं, याजमुळे खराबी या मुलकांत आहे. हा एक याजला बयेना काढावयासी जाला. महाराज धणी आहेत. या लोकास जाणतच आहेत. पैका आपल्या प्रतापाच्या भये करून देतात. फार कस्टी, न मागता देता दुःख वाटते, नाइलाज जाणून देतात. पाऊस पाणी काही पडला तर झाडबाकी लवकर होईल. नाहीतर दिवसगत लागेल. मुलकांत माणसास देखील पाणी प्राशन करावयासी मिळत नाहीं, याजमुळें तमाम मुल्क उजाड जाहाला. उदेपुरातहि तेच गत जाहली आहे. शहर उजाड करून राणाजी ढेबर तलावावर जाऊन राहणार ऐसा विचार आहे. सेवेसी कळावे हे विज्ञाप्ति.

¶*Famine conditions in the North are reported to the Peshwa. Jayapa Sindia and his minister Ramchandra Baba are seen working in co-operation.*

No. 20] [Jan. 1748

श्री

सेवेसी विनंती उपरी. दिलीहून रा। बापूजी माहादेऊ यांची दोनतीन पत्रें आलीं. त्यांत मजकूर कीं, नादरशा मारून इरानचा दुसरा पातशाहा जाहाला. त्यास पठाण सामील होऊन अटक उतरला. प्रस्तुत लाहोरच्या सुभेयानें सिकस्त खादली. यास्तव पातशाह बाहीर निघाले. स्वामीसहि यावे याविसीं बहुतसें सांगोन पाठविलें म्हणौन आज्ञा. यैसियास, पूर्वी नादरशाहाने दिली घेतली तेव्हां पातशाहाची कुमक न जाहाली. फौजा वसईस गुतल्या, यास्तव श्रीमंत राजश्री राऊसाहेब वैकुंठवासी बहुत दिलगीर जाहाले होतें. कां कीं, पातशाहावर उपकार करावयाचा तैसा प्रसंग बनोन येणार नाहीं. आणि हाली ईस्वरइछेने पातशाहाची कुमक करणे, त्यांची आपली येकवाक्यता होणे, यांस असा समय दुसरा नाहीं. दिगांतरीं कीर्ति होईल आणि बहुत उपयोगासहि येईल. पोटासहि गेल्याने देतीलच; परंतु जलदीने प्रसंगास पोहचलें पाहिजे. स्वामी थोर, मनसबाहि भारी. फौजाहि जमा व्हावयास विलंब दिसतो; नवाबाच्याहि भेटी कितीकां दिवसीं होतील कलत नाहीं; याप्रकारें येथील विलंब आहे. आणि पातशाहाची कुमक करणे तरी जलदीने गेलें पाहिजे. तें साधकाचें कर्म आहे. स्वामी सर्वज्ञ आहेत. आम्ही येथाज्ञाने लिहितों. नेर्क[१] मसलत ते ते धणी करितील. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*The death of Nadirshah and the impending invasion of Delhi by his successor the Abdali are announced. The Peshwa is advised to send his contingents to the succour of the Empire. This is the first of the Abdali's invasions of India : he suffered a defeat on this occasion.*

No. 21] [1748

श्रीनिवास

पुरवणी श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. सविस्तर वृत मुख्यपत्रीं लिहिले आहे त्यावरून विदित होईल. उतरेकडील व दरबारचें वर्तमान स्वामीकडें आले तें स्वामीनीं कृपा करून राजश्री गोविंदरायांस लिहिले त्यावरून आम्हांसहि अवगत जाहले. उतरेकडील वर्तमान सांप्रत शहरातून पत्रें आली याचप्रमाणे पादशांची फते जालि-

---

१ योग्य.

यांचे वृत्त खरे. वजीर अजम निधन पावले येणेकरून वृधास बहुत निराश्रयास आणि नाना प्रकारचा संदेह वाटोन गडबडेत आहेत. नासरजंग यास पैगाम वृधांनीं केला होता. म्हणें की तुम्ही भागानगरास जाऊन बाकी साकीचा ऐवज उसूल करून व पठाण समस्त गेलेसालाप्रमाणे गाव करून येणे येसें सांगून पाठविलें होतें. उतर प्रतिउतर अद्यापि नाहीं. सित्धता करितात. यावर कोण्हे-कडे जातात पाहावे. श्रीमंत बुंदी प्रांतें आहेत हें वर्तमान वृध्राचेहि लस्करांत आहे. विदित होये. दाभाडियांचे वर्तमान तर येकहि सिधांत नाहीं जो लिहावा. राजश्री दमाजी गायकवाडास आणवावें त्या विचारास आधी त्यांचें माधवराव आणविले. ते आलेयाउपरी त्यांचे आगमन व्हावयाचा विचार करितात. विना-दमाजी व देवाजी येक जालियाखेरीज मामला होत नाहीं हे बाईच्या मते आद्यापि दमाजीस भावत नाहीं म्हणूनहि येकतो. परंतु दमाजीहि तरतुदेचे पुरुष म्हणावे तर तेंहि तसेच. यांचे धणीपण व देवजीहि सिरोपस्त व्हावयाचे हेहि तसेच. असे अवघेच आरथ कचे आहेत. सिळेपणानेंच आजीवर घालविले पुढेहि तसेंच आहे. रावजी धावती करावयाच्या रीतीने करितात. ईश्वरइछेनें सीघ्र उलगडा जालिया उतम आहे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Letter informing the Bhausaheb of the victory of the Emperor over the Pathans (Abdali's), of the Nizam's doings and the complications arising about the Dabhades owing to the undecided attitude of Damaji Gaikwar.*

No. 22] [*18-3-1746*

श्री

पुा. राजश्री रामचंद्रबावा स्वामी गोसावी यांसी

विनती उपरी. प्रस्तुत तुम्ही कोठे गेला, काये वर्तमान? तुमची व राजश्री जयाजी सिंदे यांची भेटी कधी होणार? राजश्री मल्हारजी होलकर व जयाजी सिंदे येकत्र जाहले न जाहलें? पुढे मनसुबा काये केला आहे? पटणे प्राते जावयाचे दिवस बाकीस राहिले नाहीत. बहुतकरून तिकडे जाणे घडत नाही व न जावे. गेलियानी आम्हीं येथे दरबारी आहों या गोष्टीस पेचपाच बहुत पडतील. यांस्तव विचारे, करून पाहता तिकडे न जावे व दिवसहि तिकडे जावयाचे नाहीं. यास्तव न जाणे. बुधेलियांनी लबाडी केली आहे त्यास नसीहत उतम प्रकारे करून करारप्रोाा पैका व जागा त्याजपासून घेऊन सुरलीत करावें. इलावर्दीखानाची व रघोजी भोसले यांची लढाई होत होती त्यास कोण कोणे

तऱ्हेने विल्हेस लागले त्याची बातमी उतम प्रकारे राखून वर्तमान वरच्यावरी लिहीत जाणे. वरकडहि तिकडील नवल विशेष वर्तमान लिहीत जावें. छ ६ रबिलौवल हे विनंती.

The Peshwa to Ramchandra Baba, inquiring about the movements of Jayaji Sindia and Malharrao Holkar and also the result of the battle between Aliwardi Khan and Raghuji Bhosle.

No. 23] [*7-12-1749?*

श्री

विनंती सेवक रामचंद्र मल्हार कृतानेक विज्ञापना. ताा छ ७ मोहरम स्वामीच्या कृपावलोकनेकडून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर आज्ञापत्र सादर जाहालें. नवाबाचे भेटीचा प्रसंग आहे यास्तव तुम्हीं जलदीने आटपाआटोप करणे. डोल्यास वेथा आहे तेहि आठांचो रोजी बरी होईल म्हणोन आज्ञा. यैसियास खावंदाचे कृपादृष्टीकडून सर्वेही बरेंच होईल. परंतु डोल्यांचे वेथेने व शरीरपीडेने बहुतच कष्टी केलें आहे. दुसरें येथेहि राजश्री. जयाजीबावा देवास जाणार, ते येत तोंवर आटपाआटप करून बाहीर निघालें पाहिजे. हें टाकून आलियाने येथील कार्यें राहातें आणि तेथे दुखणेकरी काये कार्याचा? यास्तव येथील आटपाआटप करितों आणि आपा आलियावरी फौजसुधा त्यास घेऊन सेवेसी येतों. मग जे पांयांपासीं विनंती करणे ते करूं. खावंदहि कृपालु होऊन मान्य करितील. नवाबाची भेटी होऊन गुंता उरकेस्तव अवघे जमा होतील. आमच्या डोल्यांचें व शरीरवेथेचें वर्तमान रुबरू जासुदांस आज्ञा करून पुसिले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

Ramchandra Malhar writes to the Peshwa that he will shortly be coming to him after the return of Jayajibawa and after settling other urgent matters.

No. 24] [*27-1-1750*

छ २ रबिलोवली मगलवारी
साईकाली पत्र रवाना

श्रीशंकर

श्रीमंत सकलगुणालंकरण माहाराज राजेश्री नाना स्वामीचे सेवेसी.

पौ नारो सामराज कृतानेक सिरसाा नमस्कार विनंती. एथील कुशल जाणोन माहाराजानी आपले स्वस्तिक्षेम लिही ती आज्ञा केली पाहिजे विशेष.

माहाराजानी कृपा करून सेवकास आज्ञापत्र व श्रीजीस व राये सिवदास व विद्याधर येसी पत्रे पाठविली ते ज्यार्ची त्यासी आज्ञाप्रा प्रविष्ट केली. त्याची उत्तरे मागून पाठऊन देऊ. हली राणाजीचे फौजसी व श्रीजीचे फौजसी छ २९ माहे सफरी रविवारी दोन प्रहरापासून सोमवार साइकालपावेतो युध्य जाहल. श्रीजीची फते जाहली. माधोसिंगजीकडील निशाण व हती व नौबतसुधा येक हती व कुली तोफखाना वगैरे बहिरची लूट श्रीजीकड आली. राणाजीकडील फौज पलाली. त्याचे मुकामावरी श्रीजीच्या सैन्याचा मुकाम जाहला. येश श्रीजीस आले. युध्यात उभयपक्षी लोक बहुत मारिले गेले. सेवेसी विदित होये. दुसरे रा खंडेराव होलकर व भोपतराम चारणे बुंदीवाला हे उभयेता येकीकड उभ होते. त्यासी युध्याचे समई येकत्र होऊन श्रीजीकडील बुनगियावरी घातले. नारायेणदासजीनी बुनगियाच्या रक्षणास्तव सेकावताची फौज ठेविली होती. त्यानी याजला मारून काढिले. परंतु बुनगे लुटिले. राणाजीकडील भारतसिंग कामास आला म्हणोन वर्दता आहे. सेवेसी दुसरे खासगत वर्तमान विद्याधरजीस रुाचेविसी विनंती केली. त्यास त्यानी उत्तर दिल्हे की तुम्ही मुलकात आमचा अमल बंद करून आपला अमल केला. तुम्ही आपल्या खावंदाकड जाणे. खर्चाचा आपणापासी पैसा मिलत नाही. त्यासी प्रसंगोचित जो जाबसाल होणे त जाहला. परंतु ते प्रस्तुत आपले गडबडीत आहे. सविस्तर वर्तमान मागून सेवेसी पा हली रुाविसी ताकीदपत्रे विद्याधर व नारायेणदास व सिवदासजीस लेहून पा. प्रस्तुत नारायेणदास हजुर हलफेलीत आहेत. त्यास सामोपचार लिा की रायेजीस व दिवाणजीस साजगुानरुप निकाल करून देवणे. मलर्जाचे जागा तुम्ही आहा व युध्याचेही महद येश त्यानीच संपादिले. सेवेसी विदित होय व अजु[1]ऱ्याचेविसी रागेजून लिा त्यासी अमर्यादा होती हे खरच परंतु नाइलाजी उपाय नाही. दररोज रुा १ देतात. त्यात सरकारचे घोडा व खासदार व आम्ही व माणूस व आमचे तट्टु, जयपूरची वस्ती, येसे असोन जाहले वर्तमान तो ल्याहावे लागते. आम्हापासी जो पैसा बाकी राहिला तो सरकारचा. निमखहरामी दगा होणार नाही. खातरेस आले तरी अजुरा देणे. नाही तरी आम्हास तो द्यावा लागला. बहुत काये लिहिणे ? कृपालोभ असो दीजे.

¶Naro Samraj reports an action between Ishwarsing and Madhosing in which the latter's force was routed. Khanderao Holkar in the field as the ally of Madhosing shared the same fate.

---

१ पगार.

No. 25] [Beginning 1750

श्री

पुा श्रीमंत पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. झुलपुकारजंग बकसी जाटास समागमे घेऊन नारनोल प्रांते गेला. इस्वरेसिंग यासी बिघाडाचा प्रसंग जाला. बखतसिंग जाऊन बकसीस सामील जाला. यानी रामसिंग राठोड यास पत्रे पाठविली. तेहि आपल्या मेंड्यावर आलें; केवल सामील न जालें. ईस्वरेसिंगास दबाव बराच बसला. त्यावर रा केशोराये राजामलाचे पुत्र राजश्री छत्रेपतीस टिका व स्वामीकडे येत होते. तों राजे ईस्वरेसिंग याची पत्रे त्यास आली कीं कांही दक्षेणी फौज घेऊन येणे. त्यासवरून बकसीराम व सोपेकर कमाविसदार राजश्री बावाकडील यैसे आम्हाजवल सालबाईस आलें. वर्तमान सांगितले. आम्हासहि तूर्त कार्य नवतें. तिकडे जावे परंतु रोजमाऱ्याचा खर्च व काही रवानगी पुरता तऱ्ही यैवज मेलवावा हा आदमास पाहून त्यास मुदा सांगितला. त्यानी केशोरायास पत्र लिहिलें की त्याचे उतर आलें की तूर्त त्यास खासानसी न आणने; थोडी बहुत फौज घेऊन येणे. त्यावरून दीडहजार स्वार तयार करून त्यासमागमें दिल्हे. विजेपूरपर्येंत गेले. तों वर्तमान आलें की त्याचा सलूख होऊन बखतसिंगाच्या मारफातीने भेटी जाली. सतावीस लक्ष मामलत चुकली. आगऱ्याचा सुभा इजारा ईस्वरेसिंगास दिल्हा हे वर्तमान वजिरास विदित जालियावर त्यानी नवलरायास लिहिले कीं ईस्वरेसिंग त्यास पैका देईल तो आम्हीच देऊ; तुम्ही जाऊन आगऱ्यास दाखल जाला त्यावरून आमच्या मुलकास सेह बसला. मुल्क वसवसी; काही निमित्य जालें म्हणजे आवई घालावी. आम्ही ईस्वरेसिंगाकडे जावे आथवा फौज पाठवावी. मागें कांही फितुर जाला तर स्वामी शब्द ठेवतील. आम्हास यैसे सामर्थ नाही की विना आज्ञेखेरीज वर्तनूक करावी. कमाविसदार लटका बोभाट लिहिता त्यांच्या सांगितल्यावरून स्वामीची पत्रे निषेध करून येतात. काही न करता शासन होते; याकरिता फौज माघारी आणविली. त्याचा सलूख जाला. जाट आपल्या घरास आले यैसे कलो आलियावर फौज माघारी आणिली. सांप्रत मुक्काम मजकुरी आहों. सवा महिना रोजमऱ्यास यैवज नाही. कमाविसदार सनदें-

खेरीज पैसा देत नाहीत. कर्ज कोठे मिलत नाही. तीन महिने दिवस आहेत. पुढे कार्य काये करावें. नवलराये आगऱ्यास आहे. सेह राखला पाहिजे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञाप्ति.

¶*The letter describes a Rajput affair—between Ishwarsing and Bakhatsing. Ishwarsing, finding that he had to fight against odds, approached the writer for succour which was given to him. In the meanwhile a compromise was effected between them.*

No. 26] [*2-4-1750*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
श्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता। छ ९ जमादिलोवल मु॥ पलाचा नजीक नरवर जाणून, श्वामीचे कृपेकरून येथास्तित असे विशेष. ये प्रांतीचे वर्तमान सर्व पूर्वी पत्रे सेवेसी पाठविली त्यावरून विदित जाले असेल. नवल विशेष वर्तमान. वजीर कनोज प्रांते गंगातीरी आहेत. रा। नवलराये आंतरवेदीत हिंदुसिंग चंदेल याजवर चिचेंडीवर चालोन आली. यास हिंदुसिंग पळोन कालपीस आला. नवलरायाची फौज चिचेंडीस येऊन, आपला बंदोबस्त केला. भोगनीपुरावर राजश्री बापू बाजीराव गेले होते त्या मुक्कामावर फौज आली. कालपीस सेह दिल्हा. तों चंदेल दैवगतीने मृत्य पावला. नवलरायानी रा। बापूस मामलतीविसी येक दोन पत्रे पाठविली. त्यानी स्वामीच्या श्नेहावर द्रिष्टी देऊन, कूच करून इटावियांवर जाऊन, हुताशेनी केली. नवलराये कालपीच्या रोखे आलियास तमाम मुलकात आवाई पडिली. परंतु विशेष करू न पावले. आम्ही कालपी प्रांते जावें, तों सालबाईस मोर्चे होते. सालबाई जागा मातबर. सुरुंग लागत नाही. किला आहे, निमे झांसी आहे. परंतु स्वामीच्या पुण्यकरून फालगूण वद्य ५ पंचमीस स्थल हस्तगत जाले. नरवरकराचे जागें तमाम घेतले. सालबाई लोहगंड होता; त्यात सालबाईस मोर्चे लाविल्यावर त्यानी आपला भगीरथ प्रेत्न केला. उदगाधवाले पोवार वगैरे फौज ठेऊन, पलाच्यास येऊन लागलें. लस्करावर रात्री आवाई करावी; प्रेत्नास न चुकले. त्याचे मोकासी त्यानी त्याचे साहित्ये केले. परंतु पराभवास पावऊन जागा घेतला. लोहगडास मोर्चे रा। गोविंदराव सिवदेव व पायेदल व तोफ यैसी ठेऊन पलाच्यासी येऊन पोवाराचे

पारपत्य करावे, ह्या उदेशे आलों. तो सैद झुलपकारजंग मीरबकसी पूर्वी आगरे प्रांते आले होते. जे समई पातशाहा फरोखाबादेच्या रोखे आले, ते समई हे आपल्या जिल्ह्यात आले. तेव्हा जाठाची त्याची लढाई जाली. जाठानी थंडे बरेच केले होते : राणा गोहदकरहि जाठाकडे गेला होता; दोन तीन हती जाठाकडे आले. येक हती राणाकडे आला. त्यावर जाठानी नव लक्ष मामल (चु?)कऊन, पांच हजार स्वार आपला लेक सुरजमलाने बराबर दिल्हा. त्याजबा राण्याकडील फतेसिंग दोशा स्वारानसी गेला असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Shivdeo to the Peshwa, giving details of Maratha activities in Bundelkhand and the Doab.*

No. 27] [*16-4-1750*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक गोविंद तमाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ १९ माहे जावल मुकाम मौजे रियां नजीक मेरता प्रांत मारवाड लस्कर रामसिंगजी व सवाईजी स्वामीचे कृपाकटाक्षें येथास्थित असे विशेष. येथील विस्तार प्रयेक पुर्वणीवरून सर्व श्रुत होईल. सारांश, कालीची लढाई तर अवग्र दीड प्रहरपरियेंत मीरबकसी व बखत्सिग व रामसिंगजी व ईश्वरसिंग या उभयेतांचे हरावलांसी केवल तोपखानियासींच जाहाली. चारी घटका दिवस बाकी राहताना ते आपले मुकामावर पर्तून गेले. तदनंतर हेहि आपले मुकामावर पर्तून (आले) सेंपनास माणूस उभयेपक्षीचें कामा आले. आजी त्यांही तिकडून चाली घ्यावी यांही इकडून चढून जाऊन सर्फजंग[1] घेऊन नीट घोडी चालऊन तरवारतरवारी जुंज घ्यावे हा मनसुबा ऐकिला जात होता. त्यासी, तूर्त तर त्यांही स्वारी न करितां चौकी मात्र कायेम ठेविली. उद्याची वदंती आहे. त्याजवरून, सवाईजीनी रामसिंगजीकडील मातबर रजपूत व आपले मातबर रजपूत मुतसदी बोलाऊन, त्रितिये प्रहरीं युध्य अथवा सल्लख याचा निरधार परिपक्क करायाचे ते करावें म्हणून मनसुबा चितीं धरिला दिसतो. त्यासी पाहावें, सेवटीं निरधार काये ठहरतो; त्याप्रमाणे विनंती सो केली जाईल.

---

१ निकराचा हल्ला, literally, forming line of battle.

मुख्यता सवाईजीचा मनोरथ कीं, तिकडें मीरबकशी, त्याचाहि पला भारी. दुसरें, इकडें रामसिंगजीचे नवें राज्य. बरेंवाईट जाहलियां उभयेपक्षी अपेशाचे कारण. यास्तव कोणेहि रीतीने सौरष्यता घडोन येशास पात्र जाहलियांच उतम. त्यासी पाहावें. जे काहीं निश्चयात्मक ठहरेल त्याप्रमाणे सो विनंती करीन. तूर्त तर यांजकडे फौज पंचतीस हजार व चारीसें रेहकला वगैरे तोफखाना. यासिवाये उतम सरंजाम जेंगी येकवट जाहला आहे. व बख्तसिंगजीकडें स्वथा मीरबकशी व बिकानेरचा राजा व रूपनगरवाल्याचा धाकटा बंधु वरकड रजपूत मिलून वीसपंचेवीस हजार फौज व तोपखानाहि उतम जमा जाहला आहे. जसें सवाईजी इछिताल तैसेंच तिकडे मीरबकशीहि केवल कलह इछित नाही. याजवरून दिसते कीं, कमबेश[१] मामिलत ठहरून उभयेपक्षीं सौरष्यताच घडोन सर्व आपलेले स्थळाची वाट धरितील. इतकियावर जे होऊन येईल ते लिहिले जाईल, हे विज्ञप्ति.

¶*Govind Tamaji reports the contest for the Jodhpur throne between the cousins Ramsing and Bakhatsing.*

No. 28] [*3-7-1750*

श्री

राजश्री दौलतराऊ सिरके गोसावी
यासी

अखंडितलक्षेमीआलंकृत राजमान्ये श्नो रामाजी भोसले रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन कीजे विशेष. आपण पत्र बहुता दिवसा कृपा करून पाा तें पावोन साद्यंत वृत निवेदन जाले. आम्हाकडील वर्तमान तर आम्ही मजल दरमजल भामेहून सतरुसींस यावयास स्वार जालो ते कुरकुंबास आलो. तो श्रीमंत राजश्री पंतप्रधान चांभारगोंदियास होलकर व सिंदे याचे समजाविसीस आले. मग कुरकुंबी मुकाम करून भेटीस गेलो. येक मजल राजश्री पंतप्रधान यासमागमे गेलो. कितेक भाषण परस्पर निवेदन जाले. आम्हासीहि अभिमानपुरस्कर बोलले आहेत. मग आम्हास आज्ञा केली कीं सतरुशीस राजदर्शनास जाणे. रा रघोजीबावाहि तेथे आहेत. भेटी घेणे, काये विचार सांगतात तें मनास आणनें. याप्राा आज्ञा जाली त्याप्रमाणे येऊन राजदर्शनास आले. तीर्थस्वरूप राजश्री रघोजीबावाचीहि भेटी जाली. त्यास

---

१ कम्बेश—कमी अधिक.

हे पुढें येऊन वराड दरोबस्त आपणाकडे करून हातरोखा घेतला. आम्ही घरोबियाने त्यांसी मायावादे कितेक बोललो परंतु त्यांणी आमचा आव्हेर केला. त्यास तुम्ही तेथे माहाराज मातुश्री आईसाहेबाजवळ आहां, तर आमचे साकल्य वृत निवेदन करावे कीं कैलासवासी माहाराज याणी आमचा विभाग करून दिल्हा आहे त्याप्राा श्रीमंत राजश्री पंतप्रधान यासी आईसाहेबापासून शृत करून आमचे सुदामतप्राा सरंजाम होऊन येई तों अर्थ करावा. प्रस्तुत येथील प्रसंग विज्वरच जाला आहे तों तुम्हास विदित आहे. आमचा विचार सर्व आपणास ठावका आहे. त्याप्राा श्रीमंत आईसाहेबास निवेदन करून राा पंतप्रधान यांचे पत्र व आईसाहेबाचे येक पत्र यैसी आम्हास पाा. आपण स्वार होऊन येतो. राा रघोजीबावा तेथें येणार आहेत. प्रसंगानरूप जें बोलणे बोलोंन लिाप्रमाणें निवेदन करून उतरें पाा. बहुत काये लिहिणें? राा छ ९ माहे साबान हे विनंती.

¶*The writer refers to the breach between the Peshwa and his Sardars—Sindia and Holkar—and their subsequent reconciliation.*

No. 29] *[30-7-1750?*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद बलाल कृतानेक सांा नमस्कार विनंती. ताा भाद्र५८ वद्य त्रितीयापावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसें विशेष. जगमनपूरवाला राजा सुमेरसा आम्हाकडे होता. येकनिष्टपणे राहोन जुजभांडणे सरकारी कामकाज उतम प्रकारे केलें. कोताई तिळमात्र केली नसतां वैशाखमासी त्याचे बुधीचा भ्रंश जाला. मनमाने ते बोलावें, मनास येईल तें करावें, यैसी जिकीर प्राप्त जाली. उगीच माणसें मारूं लागला. आपली अंगोली हाताची कापून सदासिवास वाइली आणि श्रीभागीरथी श्नानास म्हणून सिवराजपुरास गेला. तेथेहि त्या राज्यासी कजिया केला. तेथून येताना नवलराये बक्षी याजला भेटोन त्यांचेहि अस्वासन घेतले जे जमिदार कोचकनार जागियांतील पेशजी पळोन येमुनापार गेले होते ते आणून मसलत मनसबा कजिया करावा यैसा तह करून जगमनपूर येथें आला. कनारचे गांव मारिले. जेथें गढी नव्हती उगीच ठाणी होतीं तीं दोन तीन ठाणी घेतली. मुलकाची खराबी करूं लागला. येमुनेपलीकडे कनारचा गांव मौजे भरतालेची गढी आहे तिजला जाऊन मोर्चे लाविले. गढींत सामान मजबूद होतें; कांहीं इलाज चालेना. पांच साता रोजानी कूच करून उठोन येमुनेआलीकडे आला. सर्व

जमीदार सामील जालें. मोठासा दंगा केला. तेव्हां आम्हाकडील ठाणेदार होते त्याणी सविस्तर वर्तमान राजश्री बापूस लिहितांच ते फौजेनसी कालपीहून आले. फौजेसी सुमरसांसी गांठ पडली. झुंज जाले. थोडी माणसे इकडील पडली. त्याजकडील माणसें बहुत मारलीं गेलीं. तेव्हां पलोन नदीच्या बेहडांत गेला. फौजेने चहूंकडून घेरला. रात्र जाली. रात्रीचा निघोन चालिला तेव्हां मागती झुंज जाले. बापूस तरवार लागली. अंधारी रात्र, बेहडाची जागा, सेवटीं पलोन गेला. कनारेस राहून सर्व जमीदार येक जाले. तीन च्यार हजार बंदूख पांच सातसें स्वार जमा होऊन यांजपासून तीन कोशाचे अंतरे येऊन राहिला. तेथून श्रावण शुध आष्टमी सोमवारी कूच करून मौजे गोहन म्हणून कनारचा गांव होता त्याजवर गेला. हें वर्तमान बापूस कलतांच तेहि तयारी करून त्याजवर गेले. त्याची याची गाठ पडली. जुज उतम जाले. त्यांजकडील माणसें बहुत मारली गेली. इकडीलहि माणसें थोडीं पडलीं. बापूनी मेहनत उत (म) केली. लोकानी शर्त करून खासा सुमेरसासीच गांठ घातली. सुमेरसा जिवे मारला. प्रस्तुत बापू तेथेंच आहेत. तिकडील कामकाज असेल तें करून, राजश्री नारोपंत यांजकडील जागियांतहि कजिया जाला आहे दाहा बारा गढी जमिदारानी घेतली दगा केला आहे त्यांचें उपराली-यासी जातील सुमेरसा भला आसोन त्यास विपरीत बुध निर्माण जाली त्याचें फल पावला. रांगडे लोक हरामजादे. दुरंदेसी विचारीत नाहीत. मनमाने त्या लटिक्या खबरी पुणे सातारियाच्या उठऊन तेव्हाच फिसाद करितात. यास्तव हमेशा फौज या प्रांती बारमाही असावी तेव्हाच हे दबतात. रयतेची निशा करून लावणी करावयाचे दिवस. आणि गव्हा [अपूर्ण]

¶*Govind Balal reports disturbances in the Doab territory under Maratha rule.*

No. 30] *[18-8-1750*

छ १७ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री नाना
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक वेंकाजी रंगनाथ साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत श्रावण वद्य त्रियोदसी मुकाम परगणे साहवल स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. वैशाख मासीं आज्ञापत्र आलें कीं येथें मामलेदार उभे

राहिले आहेत, तुमचें वर्तमान काये तें लेहून पाठवणें. त्यासप्रा मजकूरचें वर्तमान तरी विना फौजेसिवाये बंदोबस्तांत येत नाहीं. यानंतर जेष्ट मासीं पत्र सेवेसी लिहिलें होतें तें सेवेसीं निवेदन जाहालेंच असेल. या उपरांतिक परगणे कोटीची खंडणी करून चेखंडीचें प्रगणियांत जाऊन धामधूम केली. येक ठाणें बाम्हणी म्हणून घाटावर ठाणें होतें तें मारून ठाणें बसविलें. लढाई जाहाली. आपल्याकडील पांच सात भले माणूस व प्यादे कामास आले. तीन घोडीं ठार जालीं. ठाणें मात्र बसविलें. बाबू मदतीस येणार होता तो न आला. मग थोडके फौजनें पारपत्य न होये यैसें दिसोन आलें. त्यामधें प्रजिन काल समीप आला. नाइलाज जाणून चेखडीचें काम राहिलें. मग रेवियास गेलों. तों बाबूपासीं फौज नव्हती. साहित्य न जाहालें. मग सिबंदी दूर केली. पोटापुरतें मात्र मेलविले. परगणें मजकूरच्या खंडाणिया न जाहाल्या. प्रसंग पाहून वमूल घेतला. परगणें पथरटची खंडणी कुल जाहाली नाहीं. जमीदार रोज येक वर्तमान नाना प्रकारचें उठवितात आणि मामलियात फिसाद करितात, तें पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. नाइकी मात्र रक्षून आहों. बाबूकडील पैसा दोन वरसें आला नाहीं. दोन बरसाची खंडणी येक लक्ष जाहली त्यामधें वसूल पंधरा हजार दिल्हे. बाकी राहिले ते देऊ दिलाऊ करितो. जर कदाचित धरणे बसवावें तरी दरवाजे मना करितो. मिष्ट भाषण मात्र बहुत करितो, आण रुपया देत नाहीं. आम्ही दोन्ही तोडीत नाहीं. विना पुरतें पारपत्य केल्या खेरीज पैसा प्राप्त होत नाहीं. त्याहीमधें मनसुरआळीचा अमल येमुने-आलिकडेस होता. त्यास नवलराम बक्षी व रोहिले पठाण व बंगस यासी लडाई जाहाली. खासा नवलराम व कितेक फौज मारली गेली त्यामुलें इकडील रान मोकलें पडलें आहे. यैसियामध्यें फौजेचें साहित्य जाहालियानें मुल्क हस्तगत होईल. यांत स्वामी खावंद आहेत. फौजा सनिद आहेत. परंतु कोण्हीं फुकाचें साहित्य करीत नाहींत. यानंतर परगणें सोहावल्यांत राजे- जगतराज व राजे सभासिंग याणी सावकारास इनाम गांव करून दिल्हे आहेत. आज दोन वरसें कजिया करितो परंतु मानीत नाहींत, तेव्हां त्याचे अमलदार उठऊन दिल्हे. मग त्याचे अमलदार सिंगपूरच्या ठाणियांत बसून लबाडी करितात. रोज उठून कजिया करितात, आणि स्वामीची पत्रें पूर्वीं व हलीं आलीं परंतु मानीत नाहींत. सोहवलचे तपे तीन बुंदेलियाकडे आहेत. जसोव तपे सिवरा-जपूर व तपे रौड येथील कुल आमल आमचा चालत नाहीं. तपे रउड आम्हां जवल आहेत, तेथील येक गांव मारून आणिला तरी त्याची मदत आमानासिंग करितो. तेणेकडून पारपत्य होत नाहीं. सोहवलच्या गढ्या दोन बुंदेलियाकडे

आहेत तेहि देत नाहींत. ते पष्ट म्हणतात कीं गढीस मोरचे लावाल तेव्हां देऊं यैसें म्हणतात. परंतु आम्ही स्वामीचे प्रतापें मोरचे लाऊन चऊ दिवसा घेऊं, परंतु मागिल पुस्टपत्र पाहिजे येदनिमित्य घडून येत नाहीं. राजेश्री गोविंद बलाल याचे हातीं आहेत. यानी साहित्य केलिया बुंदेलेचेनें कांहींच होणें नाहीं. ये रीतीचें सेवकाचें वर्तमान आहे. सविस्तर वर्तमान जासूद सेवेसीं निवेदन करितां सेवेसीं निवेदन होईल. सेवेसीं शृत होये हे विज्ञापना.

¶*Venkaji Rangnath reports his activities in the Doab and Bundelkhand.*

No. 31] [*20-9-1750*

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारिक सेवक राघो नीलकंठ साष्टांग नमस्कार विज्ञापना यैसीजे. पूर्वी दोन च्यार विनंतीपत्रें सेवेसीं पाठविलीं ते प्रविष्ट होऊन सविस्तर वर्तमान विदित जाहालें असेल. यानंतर वर्तमान यैसे. मनसूर आलीखान वजीर याची फौज सरदार नवलरायेसहित बुडविली म्हणोन वजीर मजकूर हजार [illegible]स फौजेनसी पठाणावर गेला आहे परंतु अली महमदखान रोहिला वगैरे पठाणांहि बलफल धरला. जमाव बहुत करून युध्यास सिध्य जाला आहे. त्यासी वजीर मजकूरहि त्याजवर जावयासी पुढें फार संदेह[१] आणितो. मग ईश्वरीइच्छा प्रमाण. सलाबतखान यासी वरचेवर बोळावयासी ताकीदपत्रें पृथ्वीपदाचीं आलींत कीं पत्रदर्शणी तुम्ही वजीर मजकुराजवळ जाऊन सामील होणें. त्यासी खानमजकूर अजमेरींत आहेत. च्यार लक्ष रुपये बाकी राजारामसिंगाकडे राहिले आहेत या आसेस्तव फसले आहेत. कांहीक फौज मागारे दिलीस पाठविली. थोडी फौज जवळ राहली आहे म्हणोन मार्गाचाहि खेत्रा मानीत असतील. यानंतर राजा इसरीसिंग रुपनगरासी कजिया करनार. तेथील राजा बहादुरसिंग व राजा सावतसिंग हे भाऊ परस्परें भांडतात राज्याकरितां. यासी पाहावें कसें कजिया चुकतो. विनंती यैसीजे. प्रजन्य फार जाला. नदी नाले पूर विशेष म्हणोन च्यार दिवस घरी राहिलों. आतां विजयादशमीचे मुहूर्तांने तिकडे स्वार होऊन स्थलास पावलियाणं सविस्तर वर्तमान सेवेसीं विनंती लिहिली जाईल. बहुत काय लिहिणे हे विज्ञापणा. आश्विन सुद्य प्रतिपदा गुरुवार.

¶*News from the North that the Vazir has planned a campaign against the Rohillas and called in to his aid Salabatkhan Mir Bakshi from Ajmere is reported to the Peshwa.*

---

१ संशय, भीति, अडचण.

No. 32] [26-9-1750

श्री

श्रीमंत महाराज राजश्री सुभेदार साहेबाचे सेवेसी

खिजमतीस मिजी अदलबेग कुरनिशात. महत्वल मकसुद[1] आंकीं येथील खैर छ ९ माहे जिलकाद जाणोन साहेबीं आपली खैर ल्याहावयास हुकूम फर्माविला पाहिजे. दिगर नवलराये बक्षी मनसुर अलीखांचा गारत जाला. सैदसलाबतखां बक्षी सार्वभौमाचा अजमेरच्या मैदानांत आहे हे हकीकत तपशिलवार पूर्वी साहेबांस लेखन केलें आहे त्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत्य सावकारी चिट्ठी छ ४ जिलकादीं लिहिलें आलें तेथें हकीकत ऐसी कीं मनसुर अलीखां लढाईस पठाणावर गेले होते ते छ १६ सवालीं मारले गेले, आणि फौज गारत जाली. दोन तीन शहरें कनोजच्या पठाणांनीं लुटलीं. पठाणांची फत्ते जाली. दिगर सैद सलाबतखां बक्षी सार्वभौम राजे ईश्वरसिंग याजवर आले होते ते अजमेरच्या मैदानांत आहेत. राज्याचा याचा कधीं सलूख होतो कधीं बदलतात ऐशी हकीकत आहे. साहेबांस कळलें पाहिजे. बंदगीस रोषन होय हें अर्जदास्त दिगर वकिलांचा हकीकतीचा लाखोटा प्रविष्ट केला आहे, त्यावरून कळेल हें अर्जदास्त.

¶*News from the North : the defeat of Mansur Ali and the death of his officer Navalrai is reported to Malharrao Holkar.*

No. 33] [September 1750

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब
पंतप्रधान स्वामीचे सेवेसीं

आज्ञाधारक राघो नीलकंठ साष्टांग नमस्कार विज्ञप्ति यैसीजे. पूर्वी कितीक विनंतीपत्रें सेवेसीं पाठविलींत; प्रविष्ट होऊन सविस्तर वर्तमान विदित जाहालें असेल. परंतु येकही उत्तर सरकारेंतून आलें नाहीं म्हणोन कासीदजोडी पाठविली आहे ते सेवेसीं पोहचतील. दाहा दिवसाचा वायेदा केला आहे. इकडील वर्तमान यैसेजे. सलाबतखान अजमेर व राजा इसरीसिंग दसऱ्या करावयासी जेनगरास येणार आहेत व राजा रामसिंग मेडतास व राजा बख्तसिंग नागोदास

---

[1] हेतु.

आहे. कासीदजोडी हजुराहून आलियावर तिकडे रवाना होऊं तेथें गेलियावर सविस्तर वर्तमान सेवेसीं लिहिलें जाईल. यानंतर रूपनगर येथील वगैरे राजकारणे आहेत. तिकडे गेलियावर कलों येईल. भावाभावाचा परस्परें कजिया आहे. येका भावानें सेवकास लिहिलें आहें कीं, तुम्ही सत्वर येणें, भेटीनंतर वर्तमान सांगितलें जाईल. त्यास तेथें गेलियावर जें असेल ते स्वामीचे सेवेसीं विज्ञापना लिहिली जाईल व नवाब मनसूर अलिखान वजीर अलीमहमदखान रोहिलाकडे गेला आहे. तिकडील वर्तमान अलियावर सेवेसी विनंती केली जाईल. बहुत काय लिहिणे हे विज्ञापणा.

¶*Ragho Nilkanth gives the Peshwa news of the movements of Ishwarsing, Madhosing and the Vazir Mansur Ali.*

No. 34] [*December 1750*

श्री

पुर्वेणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सो

विनंती. राजश्री सवाईजीकडील वर्तमान तर राठोंडाकडील मोहीम सर करून मीरबकशीस सांभरेहूनच दिलीस मार्गस्त करून जयेपुरास दाखल जाहले. दसरा व दिपावली संपादिली. बकशीजीस घरीं आणून जियोफत[1] येथासांग करून निरोप द्यायानिमित्य बहुत विचारिले. परंतु त्यास हजूरची ताकीद निपट येऊन पावली याजकरितां मेजमानी न घेतां परभारेंच कूच करून गेले. त्यामागें सौरष्य संपादनार्थ दिवान हरि गोविंद व पुरणचंद या उभयेतांसी जयेनगरीहून कांहीक लक्ष दोनी लक्ष नगद निशा होऊन जायानिमित्य पाठविलें. तदनुरूप लक्षा येकाची निशासहित मशारनुले मीरबकशीसमीप जाऊन पावले. जगनाथ पुरोहित व दौलतराम भंडारी हे उभयेताहि गेले होते ते तों रुकसत होऊन आले. जगनाथ पुरोहितासी रामसिंगजी समीप पाठऊन भंडाऱ्यासी आपणासमीप ठेऊन घेतले. तो अद्यापिवर येथे आहे परंतु याचे ऐवजी रामसिंगजीनी दुसरा भंडारी उभा केला. याजमागे रजपूतलोक समागमेच त्यासच चौकीनिमित्य मुकरर करून ताकीद लिहिली आली आसे. तोहि सांप्रत येथून बिदा होऊन जाणार आहे. मीरबकशीस तर दिलीकडील ताकीद विशेष, तिकडील जाणे जरुर. वजीराकडीलही वर्तमान विश्कलित जाहलें. येसमई केवल निग्रहहि करणे उतम

---

१ मेजवानी.

नव्हे म्हणून जे कांहीं मिळाले तेच लाभ जाणून निशा कची पकी जे यानी दिधली ते घेऊन येथापूर्वक नारनोलचा जिला याजला सोपून पुढें गेले. त्यासी हरि गोविंद दिवान दोनी हजार फौजेनिसीं ते प्रांती बंदोबस्तानिमित्य राहिला आहे व मेवात प्रांती मेवाती यांही व जाटांही धूम उठविली याजमुले बदअमली जाहली आहे. त्याजकरितां दिवान हरि गोविंदजीसी ताकीद तिकडील बंदोबस्ती लिहिली गेली आसे व येथून वकील पुरणचंदजीहि दिलीनिमित्य बिदा जाहले आहेत. हेहि त्याच प्रांती होऊन जाणार. सुरजमल जाट बकशीचे शामील असतां त्यासी उमेदवार पुत्राचे पत्र्याचा करून निरालें केलें व राजा रामसिंगजी-कडून लाख दोनी लाख देऊं केलेत. त्यांत मुबलग बाकी राहिली व जागाही कपर्दिकेच न मिलाली. इतके दिवस मोहीम सर होते याजकरिता जाग्याची तजवीज न जाहली. ऐस्या कितेक प्रसंगामुले तोहि दुखवलासा दिसतो. जनवार्ता कीं मेवातियासीं त्याचाच इशारा आहे. त्यासी पाहावे काये घडोन येतें. तूर्त तर सर्व धाकटे मोठे रजपुतांसी घरासी बिदा केलें आहे.. किशनसिंग नेणवेकर येथें येऊन पावला. त्यासी रावराजा दिलेलसिंगाप्रमाणे सामोरे जाऊन भेटून बहुमान केला. राजश्री माहाराव दुर्जनसाल कोटेकर यानी राजश्री मल्हार-राऊ होलकर यांची आमदनी नरमदेवर जाणून वेणीराम भट यांसी पाठविलें आहे. राजश्री केशोदासजीस देवलोक जाहल्यानंतर त्यांचे जाप(बा?)यासी भूशण वस्त्रें देऊन रिसालाबदल ठेविलासा करून कृपा केली व दीक्षित सदाशिव नामे रा गंगाराम पुंडरीक यांचा पुतण्या रावजी असतांहि त्यांजकडील जवाब-सवाल यांचेच निाने होता. वाकीफकार म्हणून रावजीचे प्रत्यामना ठहराऊन कुली जवाबसवाल सोपून रिसालाहि त्यांचेच गला घातिला. याचा विस्तार पूर्वी राजश्री सवाईजीचे पत्रासहित त्याही आसीरवादपत्र लिहून सेवकाचे विनंती-पत्रानरूप सो सरकारचे जोडीसमागमे पाठविलें असे त्याजवरून सर्व सो श्रुत जाहलें असेल. सारांश अतां सरदारांचे आगमन जाहल्याने त्याजसमीप काही निशापातीसहित पाठऊन केशोदासजीचे निमित्यानरूप कलह संदीस न करितां घडोन दिवसोंदिवस उभयेपक्षी पहिल्याहूनहि अधिकोतरें ऐक्यता संपादून स्नेहाभि-वृधिते पावावी या हेत तजवीज ठहराविलीसी दिसते व निजमनोरथहि बहुत करून आहे. येतदनिमित्ये राजश्री सटवाजी राजोले याजकडील ग्रहस्त यादोपंत नामे त्यासीहि आग्रेहकडून ठेऊन घेतलेसे आहे की इतके दिवस ठेविल्यासी रिक्तहस्त काये म्हणून पाठवावे? त्यासी वार्ता कीं राजश्री मल्हारराऊ होलकर इंदुरी पावले. वरकड सरदार मागून येणार. त्यांचे आगमनाआगोदर पाठ-वावयाची तजवीज ऐकिली जाते. पाहावे कोणे रीतीने निशापाती देऊन कोणा-

सहवर्तमान पाठवितात. त्याप्रमाणे विनंती करणेत येईल. राजश्री सवाईजीस व रावजीस थैल्या सादर जाहल्या होत्या त्याची उतरें सो पावतात. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*The letter deals with complications in Rajputana and reports the movements and doings of Sawaiji Ishwarising of Jaipur.*

No. 35] [*17-4- 750*

श्री

पुर्वणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सो

विनंती. काली छ १९ रोजी संध्याकालीं राजश्री सवाईजीनी मीरबकशी व बख्तासिंगजीकडील लडाईचा मजकूर ऐकून जे कोणी रजपूत लोक लहान मोठे आपले व राजा रामसिंगजीचे होते त्या सर्वासी बोलाऊन दरबार करून येकमते विचार ठहराविला कीं तोफखानियाचें भांडण तर सिव्यागालीतुल्य आहे, आतां नीट कमरबंदी करून घोडीच उचलावी, जयदाता भगवान आहे म्हणून बोलिले. तेव्हां सर्वाहीं हेच म्हटलें कीं आम्ही तर चाकर लोक हुकमी आहो. माहाराजानी मात्र पाठीमागें उभे राहावे व तमाशा पाहावा. हे गोष्ट प्रगट दरबारात होऊन मग एकांत जाहला. रामसिंगजीकडील पाचसात रजपूत व जगु पुरोहित व दौलतराम भंडारी वगैरे व यांजकडील राव केशोदासजी व दिवान विद्याधर व हरि गोविंद व हरनाथसिंग व जसवंतासिंग व राव सरदारसिंग हे सर्व येकांती होते. यानी कितेक दुरंदेशीचा मजकूर केला. त्यासी सवाईजीनी राव केशोदासजीस विचारिलें कीं तुमचा काये मसलहत? यांहीं पाहिले कीं आपण हरि हकीम यासह ज्यांचे मध्यस्थीने जवाब सवाल लाऊन बाहियार्थ दोशनिवारणेनिमित्य विचारीत असतां सिवाये मर्जी दुसरी किमर्थ गोष्ट सांगावी? हेच उत्तर दिधलें कीं मामिलतची गोष्टीस तर मी वाकीफ नाहीं कीं पहिले कसी जाहली व आता काये रदबदल दरपेश आहे. त्यासी जोवर मामिलत येथास्वरूप देऊन रस राहे तोवर तर केवळ जुंझावर गोष्ट टाकणे सलाहदौलत नाहीं. इतकियावर जे पंचाचा सलाह असेल तो करावी. मज माहाराजानी हरावली सोंपिली मी हजर आहे. महाराजीं मात्र सिरावर उभे राहावे. तेच सुवडो कीं हे शेरीर माहाराजाचेपुढे कामा येतो. इतकियांत अंतस्ती वर्तमान कळलें की हकीमाचे मारफतीने भला माणूस मीरबकशीकडे येऊन पावला तेव्हां सेवटी हे ठहराऊन सर्व उठोन उभे राहिले कीं जर मीरबकशी स्वार होऊन उभे राहंतील तर तमाशा पाहतां कसे बनते? आपणही फौजेनसी स्वार होऊन चाली घ्यावी. नाहीतर येकदोनी

दिवस मागती रदबदल पाहावी. त्यासी हकीमजीस त्याच्या भल्या माणसा-समागमे मीरबकशीसमीप पाठविले. ते रात्रौ तर न आले. आजी छ १० रोजी सर्व निरधार करूं येईल; येवंच बोली लागली. यांचे मन सलुखावर व तुरुकही सलूखच इच्छितो. येक बख्तसिंगाची ओढ तोड काये होऊं सकतें. कमबेश तुरकासी मामिलत करून काये ते घेतील ऐसा योग दिसतो. अजी ते लडाईसच चढणार होते, ते गोष्ट राहिलीसी तूर्त आहे. विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Ishwarising getting reports of a battle between Meer Baksi and Bakhatsing holds a durbar in which he consults his Sardars and ministers about what he should do in the matter.*

No. 36] [*1750*

श्री

श्रीमत राजश्री नानासाहेब
पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापणा येसीजे. पत्र लिहिलियावर वर्तमान मुरारजी साहुकाराचे दुकाणी कासिद जोडी दिलीहून ११ रोजात उजेनीस आली. त्यास लिहिले होते की, वजीरासमागमे जाटाची फौज होती ते आली. महमदखान रोहिलासी मिलाली. येका केला की तुम्ही आम्ही जमीदार लोक आहो आज तुम्हावर आहे पुढे येसेच आम्हावरहि होईल. त्यासी तुम्ही रात्री शबिनास निघून या. वजिराचे डेरावर त्यासी त्या रोहिलाने रात्रीस चालून आलेत. मनसुरअलीखान याचे डेरावरच येऊन पडेलेत वजिर मजकूर कामास आला. फौज लुटून घेतली; किती पलाली. येसे वर्तमान आले होते; त्याप्रमाणे सेवेसी विनंती लिहिली आहे. सत्यमिथ्या वर्तमान दिलीहून वकिलाणे सेवेसी लिहिले असेल. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*News-letter to the Peshwa from Ujjain reporting the battle between the Rohillas and the Vazir Mansur Alikhan.*

No. 37] [*1750?*

श्री

शेवेसी विज्ञापना. पातशाहाजीस आर्जी वजिरास कागद तुम्हाकडील ऐसी पाठवून द्यावी म्हणून आज्ञा त्यास आम्हाकडील आर्जी व पत्र सिद्ध जालें आहे.

मीरबक्षीकडील पत्राकरितां महबूबसिंगास बोलाऊन ताकीद केली आहे. त्यांजकडील पत्रें सिद्ध होऊन आली म्हणिजे शेवेसीं पाठवितों. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer informs the addressee that he will forward the letters for the Emperor as soon as Mahbubsing submits the proper drafts.*

No. 38] *[25-1-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक गोविंद बल्लाल कृतानेक सां नमस्कार विनंती. ता माघ शुद्ध दशमीपावेतो स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. आज्ञापत्र सादर जाले. नेहमी फौज हमेशा ठेवावी लागली त्याजमुळे सरकारी कर्ज जाले, त्याची मदत तुम्हास करावी लागेल म्हणून आज्ञा. त्यास आम्ही तो सर्वस्वे स्वामीचे बारगीरदाखल आहों, आम्हास कोण्हे गोष्टीचा उजूर[1] आहे येसे नाही. स्वामिसेवा जाणतो. स्वामीचे पुन्यप्रताप थोर आहे. ईश्वर सर्व उतमच होईल, आनि यास शत्रु पादाक्रांत होतात. कर्जहि स्वामी मनावर धरितील तर फेडितीलच. सविस्तर चिरंजीव बाबूराव याजला लिहिले आहे ते सेवेसी विनंती करतील. इकडील वर्तमान तर रा मल्हारजी होलकर व रा जयाजी सिंदे याणी जयेनगरचे कामकाज करून बंदोबस्त करून रा राजी माधोसिंग याजला बसऊन वजिराचे मदतीस पुढे कूच केले. याजउपरी जे वर्तमान होईल ते साद्यंत लिहीत जाऊन. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Govind Balal communicates to the Peshwa the news of the march of Sindia and Holkar to the succour of Nawab Safdarjang after seating Madhosing on the Jaipur throne.*

No. 39] *[17-2-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंती. सेवक रामचंद्र बलाल भुसकुटे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ १ रबिलाखर मुकाम (२ अक्षरें फाटली) लुद परगणे

---

१ तक्रार.

आसेर येथें स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन लस्करांतून स्वार जालों ते माघ वद्य सप्तमीस खरगोणास सुखरूप पावलों. सरकार बिज्यागडचें वर्तमान मनास आणितां वसुलाचा ताल नाहीं. अर्जानी बहुत. कोणी. उदमी बेपारी मन घालून * दि करित नाहीं या प्रकारचे आहे. यानंतर मकडाईकडील मजकूर तरी मीरखान टोंके तों आम्ही आलिया अगोदर पंधरा दिवस उठोन बुंदेलखंडांत गेले. चिरंजीव राजश्री नारोपंत तो जाऊन तेथे गुंतले. त्याचें भारी सामान. आराब बहुत. मीरखान गेलियावरी येक दोन वेला बाहिर निघोन जुजें जालीं. दाहा वीस इकडील दाहा वीस तिकडील पडिले. पाच सात घोडी पडिलीं. परंतु वरचेवरी झटपट करून जात. आमचें सामान मीरखान गेलियावरी राहिले तें कलतच आहे. ही अटकल पाहोन छ २१ रबिलोवल माघ वद्य ८ गुरुवार प्रात:कालापासून सर्व साहित्य करून फौज च्यार पांचसें पाईदल दोन अडीच हजार आराब सुधां सामान घेऊन प्रहर दिवसा बाहेर निघोन चालोन घेतले. ते आपल्या लस्करावर उठावणी करींतच आले. मेटाकोट्याची मोर्चेबंदी तों होती परंतु सामान बहुत यास्तव रेटेनात. पांच सात वेला उठवण्या केल्या. वीस पंचवीस माणूस जखमी जालें. सात आठ * माणूस जायां जालें. व घोडींहि वीस पंचवीस जखमीं, दाहा पंधरा ठार पडिलीं. ऐसें करितां येक प्रहर जूज जालें. परंतु त्याणी जुमेस[1] खादला नाहीं. त्याचा तो निश्चय हाच कीं सफेजंगी करून छिपाबरडपावेतों पिटून घालावें; ऐसा अनर्थ येऊन पडिला. मारावें किंवा मरोन - खस्त व्हावें. दुसरा अर्थ नाहीं. बाजारबुणगे यानें तों पळ काढिला. यैसे वर्तमान जालें. तेव्हां चिरंजीव राजश्री नारोपंती खावंदाचे नांव निदान समई घेऊन हिमत बांधोन, सर्व सरदारांस ताकीद केली, आणि लुटी माफ करून उठावणी केली. त्या समई राजश्री संताजी व रखमाजी आटोले व पागेचे लोक राजश्री गोविंदराव मोहिते व गंगा विठल बक्षी व तावजी यादव व आपाजी चव्हाण वगैरे आसामी वीस याणी व रामजी पाटील परदेसी खरगोणकर याणी उठावणी करून मर्दुमी बहुतच केली. मध्येच ढिगांत पडोन कमरगा तोडून अरपार गेले. तों निशाणानी कल खादला. मग येकदाच चोहींकडून उठावणी होतांच मोहरा फिरविला. मग त्याणी पळ काढूं लागले. खावंदाचा प्रताप थोर त्या योगेंकरून, मारीत मारीत दरवाजापावेतों गेले. नगारे व नौबती व निशाणे तों पांच सात घेतलीं. पंचवीस च्यालीस स्वार पडिले. पांच सासें माणूस कापून काढिलें. सात आठ घोडीं व सा उंटें व सें सवासें

१ कच, दबाव, भीति.

जेजाळा व तीनसें बंदुखा व तीन च्यारसें तरवारा नामी सरदार सात आठ मारले गेले. दोन तीन धरून आणिले. वरकड गरीब गुरब मेले गेले त्याची संख्या कोणी केली! तशा प्रसंगामध्यें हजार पांचसें सामान चांगलें अनखी असतें, तरी तेच दिवसीं किला हस्तगत जालाच असता. परंतु सामान थोडकें यास्तव राहिले. आपण फालगुनी पूर्णिमापर्यंत जाऊन पोहोंचतों. ऐसियासी स्वामीनी क्रुपा करून हजार पांचसें राऊत चांगले नावाचे माणूस पाठविलियानें कार्यसिधी होऊन लौकरच पंधरा दिवसानी मागती राऊत स्वामीजवल पोहचतील. तेथील प्रसंग पाहून फौज पाठविली तरी उत्तम आहे. नाहीं तरी आम्ही आपले खटकर्म करीतच आहों. येकबाल हाच खावंदाचा प्रताप थोर आहे. जेथें नांव घेऊन तेथें कार्यसिधी होईल. सरकारची मदत आहे ती स्वामीस विदितच आहे. आणि सरंजामी राऊत पांचसें करार केले त्यापैकीं कांहीं आले कांहीं यावयाचे आहेत. ते सामान ज्याप्रमाणें दात्रुत्व त्याप्रमाणें आले आहेत. त्याचे सामान आहे. राहिले येतील तेही तैसेच येतील. परंतु येथें चिरंजिवानी च्यारसे राऊत राजश्री बाबूराव खडागले व फतेसिंग भोसले वगैरे चाकर ठेविले. येकून फौज सरंजामीसुधां नवसें व दीडसे पागा व सरकारचे तैनाती दोनसे येकूण बारासें होणार. व पाईदल साडेतीन हजारपावेतों आहे. पैकीं ठाणे काली भितस च्यारसें व किरकोल नाकेबंदी पांचसें बाकी भांडते माणूस अडिच हजार प्यादे आहेत. खर्च भारी होता म्हणून खेद करावा, त्यासी रानांत इजत राहिली पाहिजे यास्तव बालगणे लागलें. खांवंदाचा नक्ष व आपली इजत राहिली म्हणजे सर्व गोष्टी अनुकूल होतील. बदनक्ष घेऊन आलो तरी खावंद शब्द लावितील. आणि नक्षा राखोन कार्य करून आलों तरी जिवापेक्षां खर्च होईल तो खावंदापासून भांडोन झगडोन घेऊं, हा निश्चये करून मेहनत करितों. स्वामीचे पुण्येकरून येश यावें तें येईल. जाल्या जुजांत घोडीं पडिलीं त्याची याद अलाहिदा पाठविली असे. त्यावरून सविस्तर कलेल. वरकड परगणे असेरचा बंदोबस्ती करावी म्हणून आजी तपे राजगड परगणे मजकूर येथें आलों. शहरावरी दबाब डोंगराचे बलें दिल्हा असें. डोंगरी गावाचा अमल च्यारी सिरे घेतला तरी बेजार होणार नाहीं. ता। बहादरपुरा व शहरचा चौत्रा येथें मैदानी अमल बसवावयासी सामान भारी पाहिजे, तें तों नाहीं. याकरितां डोंगरांत बसोन दबऊन जोंवरी जें करणें तें करूं. मग मकडाईस जाऊन. आधींच सामान आम्हांजवल भारी त्यांत बहादरपूर तर्फेत फौजदारी आपली म्हणून राजश्री महिपतराऊ कवडे याणी सनदा आपले कमाविसदारास दिल्ही. आणि आम्हांस रागीजोन लिहिले कीं तुम्हांस सनद चुकोन दिल्ही. तैसेच राजश्री मानाजी निकम

माजरोदाविसीं हिसके खातात. इतकेहि कर्ज वारून आपण काम करावयाचें तें करितों. परंतु स्वामीनी त्यास ताकीदपत्रें पाठविलीं पाहिजेत, आणि ते आर्जे लिहितील त्यास सनद न द्यावी. म्हणजे दाहापांच हजार खंड दंड करणें तो करून जाऊ. पत्राचें उत्तर ल्याहावयासी आज्ञा करिणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramchandra Ballal Bhuskute to the Peshwa describing very vividly a battle which Naropant (Bhuskute ?) fought at Makdai. He enumerates the casualties and asks the Peshwa to send reinforcements.*

No. 40] *[12-2-1751*

छ १४ जमादिलौवल

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक गंगाधर येशवंत व रामाजी यादव कृतानेक सां नमस्कार विनंती. उपरी: येथील कुशल माघ वद्य त्रयोदसीपावेतो स्वामीच्या प्रतापेकरून येथास्थित असो. विशेष. कृपा करून आज्ञापत्र पाठविले ते पावोन बहुत संतोश जाला. "राजश्री माधोसिंगाची राज्यस्थापना जाली असेल. परस्परें आयेकण्यात आला, परंतु सविस्तरे न लिहिले. आत:पर सविस्तरे लिहिणें. तेंथील गुंता उरकलाच आसेल. प्रस्तुत सा सुबे दक्षण सोडवावयाचा मनसबा आहे. मोठा प्रसंग आहे. राजश्री मल्हारबास बोध करणें तसा करून घेऊन येणें," म्हणून पत्री आज्ञा केलीं. त्यासी, इकडील वर्तमान, जैपुरास मुकाम आलियावर ईश्वरसिंग लयातें पावले. माधोसिंग याची राज्यस्थापना झाली. खंडणीचा व गुदस्ताची बाकी सुधा करार जाला ते वृत शेवेसी लिहून पाठविले आहे. श्रुत जाले आसेल. याउपरी, त्याच्या लोकासी व लस्करच्या लोकासी शहरात कजिया जाला. त्यामुळे आठच्यार रोज बिघाडात गोस्टी होती. प्रस्तुत राजे माधोसिंग यानीं पैगाम करून पूर्वेवतप्रमाणे सलूख राखिला. जैपुरचे कामकाज होऊन कूच जाले. वजिराकडीलहि मातबर भले माणूस आले आहेत. बोलीचा प्रसंग होत आहे. करार जालियामागून विनंतीपत्र शेवेसी लिहून पाठऊन. येथून आगरियासि दोचौ रोजानी दाखल होऊन. वजीरहि तेथे येणार. पठाणास तंबी केलिया सर्वास दहशत होती; मनसबियाच्या तोंडास आले; आल्यासारखे फड प्रसंग नक्ष राखिला पाहिजे, हा सरदारांचा मनोदये आहे. उगेच माघारें फिरलियासि शोहरत[१] होऊन दंगा होऊ पाहतो. तिकडीलहि कार्यें मोठेच आहे.

१ शोहरत=प्रसिद्धी, आवई.

हा समये वारंवार येणार नाही. जर खामखा तिकडेच यावें यैसें असिले तरी पत्री आज्ञा लिहून पाठवावे. उभयेतां सरदारास घेऊन येतों. प्रस्तुतहि बोध केला, परंतु आल्यास नक्ष राखून जावे हा विचार. उतर येईल त्याप्रमाणे वर्तनूक होईल. स्वामी पुण्येंवान, प्रतापी आहेत. स्वामीच्या पुण्येंप्रतापें सर्व येश प्राप्त होतें. सारांस, दक्षेणेंचा मनसबा मातबर स्वामीनीं योजिला आहे. त्यासी जैसा निकट आसिला तैसेच आज्ञापत्र ताबडतोब पाठवावे. सर्वेहि कामे येकीकडे ठेऊन धण्याच पायांपासी सिध आहेत. कोणेविशीं खावंदाच्या आज्ञे-खेरीज नाहींत. सर्व वृतांत राजश्रीनी उभयेतानी शेवेसी लिहिला आहे त्यावरून श्रृत होईल. श्रृत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa had asked Sindia and Holkar to return to the south with their forces as he had planned a campaign to wipe out the Nizam and clear the country of Muhammadan rule. Gangadhar Yeshwant and Ramchandra Yadao, Holkar's ministers, inform the Peshwa that the two generals have been called to his help by the Vazir to put down the rebellious Rohillas and would prefer to defer their move southward till they have settled this business.*

No. 41] [*24-3-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांप्रति

वासुदेव दीक्षित अनेक आसीर्वाद उपरी. येथील क्षेम चैत्र शुध नवमी रवि-वार जाणऊन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. आपण भागानगर प्रांतांत. गेलियावर पत्र येऊन बहुत दिवस वर्तमान कलले नाहीं तरी सविस्तर येणारा समागमें लिहून पाठवावें. तेणेंकरून संतोष होईल. या प्रांतींचे कितीक वर्तमान राजश्री बनाजीपंत वकील यामी वरचेवर लिहिलेंच आहे. सांप्रत * गायेकवाड मोडल्याचें वर्तमान (त्या) ही आपणांस लिहिलें असेल त्यावरून विदित होईल. यानंतर इंद्रप्रस्थीचें वर्तमान राजश्री केशवराव हरकारे यानी छ ९ रबिलाखरचे पत्र येथें छ ६ जमादिलवलीं आले तेथें लिहिलें कीं, वजीर छ २६ रबिलवलीं रुकसत होऊन माहाबतखानाचे रेतींत डेरे दाखल जाले. तेथून छ ३ रबिलाखरीं कूच करून किसनदासाचे तल्यावर डेरे दाखल जाहाले. राजश्री मल्हारजी, होळकरही जवळ आले आहेत. आज उदईक भेटी होतील. पुढें उभयेतानी येमुनापार उतरोन पठाणासी युद्धप्रसंग करून त्यांस अंतरवेदींतून काढावें हा निश्चयें केला आहे. पुढें होईल तें पाहावे. यानंतर फेरोजजंग यानी दक्षणेस यावयाची तयारी केली. जागाजागा पत्रें लिहून फौज दाहा हजार जमा

केली. कांहीं हजुरीहू(न) उमराये तैनात होणार असें करून दक्षणेस यावें. राजश्री बापूजी माहादेव यानी अश्वासन बहुत दिल्हें आहे. या प्रकारचें वर्तमान आलें तें आपणास कळावें म्हणून लिहिले असें. बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

¶*Vasudeo Dikshit to the Peshwa, who is at this time in the Karnatak, informing the latter that the Vazir has taken the field against the Rohillas to oust them out of the Doab. Vigorous action will commence when Malhar Rao joins him. Dikshit also refers to the defeat of the Gaikwad near Satara.*

No. 42] *[20-2-1757*

श्रीशंकर

श्रीमंत माहराज राजश्री
दादासाहेब महाराजाचे सेवेसी

विनंती. आज्ञांकित बापूजी अनंत मुकाम शहर अवरंगाबाद सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ३० माहे जमादिलावल दोन प्रहरपर्यंत स्वस्थिक्षेम असूं. याजउपरी येथील वर्तमान तर राजश्री जीवनराव कसबे फुलबरी जवळ पडोन * * ठाणियास दहशत टाकली आहे. प्रा दाभाडीचे ठाणें मोंगलाकडील आहे. त्यास येथून हिमतखानानें कुमक दोनुसें गारदी पाठविले ते प्रांत मजकुरीं पावले नाहींत. परतून माघारा शेहरास आले. लोकाच्या तलबा हिमतखानावर बहुत चढल्या, पैसा द्यावयास मिलत नाहीं, याजकारितां लोक पुढें कामाकाजास चालत नाहीं. हिमतखान शहराबाहीर निघत नाहीं. येथें तमाम सावकारापासून नख्त यैवज घेतला होता त्यापैकीं मुरादखानास दीड लक्ष त्याची हुंडी लस्करास पाठविली. सिपाई लोक चाकरी टाकून आपले घरास जातात. याप्रमाणें येथील वर्तमान आहे. हिंदुस्थानचें वर्तमान तर शहरांत की, आबदाली परतून दिलीस आला आहे. सुजायतदवला याजला दक्षणचा सुभा देत होता. त्यास सुजायतदवल्यानें सुभ्याच्या सनदा न घेतल्या कीं, तमाम तिकडील मऱ्हाटे आपले इष्टत्वी आहेत. मी तिकडील सुभा करनार नाहीं. याजकारितां नजिबखान रोहिला याणें दक्षणच्या सनदा घेतल्या आहेत. नजिबखानची व राजश्री मल्हारजी होळकर याची लढाई जाहली. होलकराणें शि.ाईगिरीची शर्त केली. याजकारितां नजिबखान या देशात सत्वर चालून येत नाहीं. याप्रमाणें तिकडील वर्तमान आहे. येथें धारण तर दर रुपये :

८।३ कणीक	८। ८ बाजरी पीठ
८८ ८ तांदूल	८।।॰ बाजरी
८।९ दाल तुरीची	८८२ तूप

८।२ दाल मुगाची	८८७ तेल
८।३ दाल मसूर	८८८ गूळ
८८२ साखर	८।५ हरभरे

येणेंप्रमाणें शहरांत धारण आहे. शेहराबाहेरून रस्त[१] येत नाहीं. येथें आवाई कीं मातुश्री ताराबाई याणी रामराजे तख्तीं बसविले. आतां इकडील बल मोंगलाचें खुटलें. याजकरितां नबाव पुढें कूच करून जात नाहींत. सारांश ताराबाई याची शूत्रधारी होती ते गेली. आतां याचा विलाज सुटला. यैसे वर्तमान आहे. सेवेसी शृत होय हे विज्ञप्ति.

¶*Bapuji Anant, from Aurangabad, reports to Dadasaheb rumours about affairs in the North. Ahmadshah Abdali, having returned to Delhi, has appointed Najibkhan to the Subha of the Deccan. He further refers to a battle between Malharrao Holkar and Najibkhan in which the former overpowered his opponent.*

No. 43] [*1751*

श्री

विज्ञापना. साहुकारी वर्तमान आगऱ्याहून आले आहे कीं पठाणास पूर्वी राजश्री मल्हारजी होलकरनीं तटा केले त्यास पठाण घाबरे होऊन परागंदा जाले. त्यानीं व रोहिले यानीं एक होऊन मागती फौजबंदी करून वजिरासी सल्य करावे म्हणून सांगून पाठविले. परंतु वजीरानें न ऐकिता तिरस्कार केला यांजवरून एक लढाई जाली. तीन प्रहरपर्यंत जाली. परंतु उभयताहीं कायम राखिले इतके वर्तमान आले. पुढें आणखी एक लढाई मातबर होणार म्हणून. काये होईल ते पहावे. स्वामीचे पुण्यप्रतापे येश मल्हारबास प्राप्त होईल. सलाबतजंग अद्याप हैद्राबादेस आहेत. निघून येण्याचे फिकीरीत आहेत. परंतु हैद्राबादेचा मामला आफ्तर आहे याजकरितां तेथील बंदोबस्त करून निघणार. मार्गी पाणी नाहीं. एक दोन पाणी जालियावर निघतील यैसीहि बोलणे आहे. गाजुदीखान येथापूर्व आहेत. सांप्रत वर्तमान याप्रा आहे. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter from the North referring to Holkar's encounter with the Rohillas.*

---

१ धान्याधुन्याच्या खेपा.

No. 44] [13-12-1752

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेशी

विनंती. सेवक अंताजी माणकेश्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। मार्गेश्वर शुध ७ सप्तमी मुकाम इंद्रप्रस्थ स्वामीचे कृपेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. पूर्वी अजुरदार कासिदांच्या जोड्या तीन पत्रें देऊन बिसा रोजांचे मुदतीनें पाठविल्या होत्या त्या सेवेसी पोहचल्या असतील. वृत त्यावरून सविस्तर सेवेसी विदित जाले असेल. येथील वर्तमान तरी आजी छ ५ सफर मंगलवार प्रात:काली प्रहरादिवसास नवाब गाजदीखान यांचे पुत्र इमादनमुलुक यांस मीरबक्षीसीची वस्त्रे पातशाहानी दिल्ही. हती व घोडा तुरा कलगी समशेर सिरपेंच व जवाहीर दिल्हे. थेरले नवाब निजामनमुलुक यांस ज्याप्रमाणें दिल्हें होते त्याप्रमाणें यांस देऊन निजामनमुलुक किताब दिल्हा व दक्षणेच्या सुभेदारीचे विडेहि दिल्हे. पातशाहानी पुत्राप्रमाणे पोटासी धरून बहुत गौर केला. नवाब गाजदीखान यांचे घर जप्त न करावें व मीरबक्षी व दक्षणेची सुभेदारी यांचे पुत्रास व्हावी हा विचार कोणाच्याही चितांत नव्हता. स्वामी कां म्हणतील तरी वजिरासारिखा मुर्दई[1] रात्रदिवस पातशाहास अर्ज करून मीरबक्षी आपले पुत्रास [पुढील बंद गहाळ] जंगास दक्षिणेची सुभेदारी द्यावी, सुरजमहल जाट व माधोसिंग यांस आगरे याचा सुभा द्यावा येणेप्रो रदबदली सख्त केली. याउपरी आम्ही कूच करून डेरे बाहीर देऊन राहिलो आणि पातशाहास अर्जी पाठविली जे आम्हास निरोपाचे विडे पाठवावे, आम्ही जाऊं. त्यावरून पातशाहानी आम्हाकडे खोज्या पाठऊन खातरदास्त आमची बहुत केली जे गाजदीखानाचे पुत्रास मीरबक्षी देतो व दक्षणेची सुभेदारी देतो. आगरे अजमेर राजश्री पंतप्रधान याकडे आहे तसेंच करार आहे. याप्रो खातरजमा करून आमचे डेरे शहरांत आणविले. व वजीर पोटचा लबाड आहे. आम्हासी गोड गोष्टी बोलतो व सरदारांसहि * * * *णियांची लिहितो. परंतु सलाबतजंगास लिहितो जे तुम्ही बल धरून मऱ्हाठियांस झुंज करणे, म्हणजे आम्ही व जाट व राजे घेऊन मालवियांत येतो येसें पत्रावर पत्र रवाना करितो. व सलाबतजंग याची पत्रें वजिरास होती तीं आम्ही वाटेस चौक्या ठेऊन घेतलीं त्यांत लिहिलें जे आम्ही मऱ्हाठियांची पऱ्हवा राखीत नाही. तथापि मऱ्हाठियाची

१ बंडखोर दावेदार.

2226

फौज भारी असिली तरी येसमई आम्ही सला करून पुढे यांची फौज चहुकडे गेलियावरी मागती आम्ही समजोन घेऊन, तुम्ही चिंता न करणें. येसीं पत्रें बजिनस आम्हाजवल आहेत. येंदा आम्हास कर्ज मुबलक जालें. परंतु आम्ही छाती थोर करून कर्जदार होऊन चाकरी स्वामीची करून दाखविली. पुढें ऊर्जित करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Manakeshwar to the Peshwa concerning the intrigues in the capital carried on by the Vazir Nawab Safdarjang with the Jats and Madhosing to drive the Marathas out of Malwa.*

No. 45] [*13-12-1752?*

श्री

श्रीमंत राजश्री बाबा स्वामीचे सेवेसी

पोष्य अंताजी माणकेश्वर कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। मार्गेश्वर शुध ७ सतमी मुकाम इंद्रप्रस्थ स्वामीचे कृपेकरून शेवकाचें वर्तमान यथास्थित आंसे विशेष. स्वामीकडील बहुत (दिवस झाले) पत्र येऊन वर्तमान कलत नाही (त्यामुले) चितास समाधान वाटत नाही. (तरी स्वकीय कुशल ले)हून सेवकाचा सांभाल (सदैव करणार स्वामी समर्थ आहे.) छ ९ सफरी गाजदीखान याचे (पुत्रास) * * * * * * पातशाहानी मीरबक्षी(ची वस्त्रे दिल्ही.) हातीं घोडा समसेर कलगी[१] दिल्ही. निजामनमुलुक मरातीब दिल्हा, पातशाहानी कृपा बहुत केली, येविसीचा मजकूर सविस्तर श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीच्या व राजश्री भाऊसाहेबांच्या पत्री लिहिला आहे त्यावरून सेवेसी विदित होईल. आम्ही स्वामीच्या कुटुंबातील असोन पत्र पाठऊन परामृष घेतला नाही ही गोष्ट स्वामीपासून दूर आहे. हरयेकविसी सांभाल करीत गेले पाहिजे. आमचा घराऊ मजकूर खर्चावेंचाविसी उभयेता श्रीमंत स्वामीस लिहिला आहे. तरी लिहिल्याप्रमाणें नेमणूक करून चालविणार स्वामी समर्थ आहेत. प्रस्तुत आबदाली पठाण अटक उतरत आहे. त्याची चिंता स्वामींनी न करावी. वरकड स्वामीकडील व मोगलाचे व आपले फौजेचें वर्तमान सविस्तर लिहून पाठवावयास स्वामी समर्थ आहेत. आम्हावरी कृपादृष्टी करून माया निष्ठुर न करावे. आम्हापासी फौज सरकारचे नेमणुकेची आडीच हजार आहे व पातशाहाच्या वकिलाचे आज्ञेप्रा। फौज आणखी अडीच हजार ठेविली आहे. येकूण पाच हजार आहे. पाच

---

१ पागोट्यावरचा अलंकार.

हजार फौजेने नक्ष स्वामीचा दिलीत ज्याप्रा पनास हजार फौजेचा त्यांप्रा सेवकाचा (आहे. आ)मचे विस्मरण पडो न देणे. नेमणुकेची विनती केली आहे त्याप्रमाणे लिहून पाठवावी. वरकड आम्ही आपल्या जीवापेक्षा शंभर वाटे छाती थोर * * * * कर्जे करून स्वामीचे नाव [राखिले] आहे. सेवेसी * * * श्रुत * * होये हे विज्ञापना.

¶*Antaji Manakeshwar posted with the Emperor at Delhi writes news from the court and explains how anxious he is about maintaining Maratha prestige.*

No. 46] [*13-12-1752*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री सखारामपंत
स्वामीचे सेवेसी

पोष्य अंताजी माणकेस्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा मार्गेश्वर सुध ७ मुकाम इंद्रप्रस्थ सुखरूप आसो विशेष. आपल्याकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाही याजकरिता चितास समाधान वाटत नाही. तरी येसे सर्वदा न करावे. सदैव पत्र पाठऊन संतोषवीत गेले पाहिजे. आम्हाकडील वर्तमान पातशाहाचे व गाजदीखानचे पुत्राचे व वजिराचे व आबदाली पठाण वगैर कितेक तपसीलवार श्रीमंत राजश्री पंतप्रधान व श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यासी पत्रे लिहिली आहेत ती आपण आक्षरशाहा वाचून पाहावी. त्याजवरून सर्व विदित होईल. पत्रामध्ये आम्ही आपल्या कितेक मनसब्याच्या गोष्टी लिहिल्या आहेत. त्यास आपण श्रीमंतास विनंती करून ज्या मतलबाच्या गोष्टी लिहिल्या आहेत ते काम करून देविले पाहिजे. आमचे घरचे वर्तमान लेहून पाठविणे. आपल्याकडील दरबारचे वर्तमान व राजकी वर्तमान सविस्तर वरचेवर लेहून पाठवीत जावे. सदैव येणारा वार्तिकासमागमे पत्र पाठऊन संतोषवीत गेले पाहिजे. माया निष्टुर न करावी. श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे नेमणूक आडीच(हजार फौ)जेची आहे व पातशाहाचे (नेमणुके)ची फौज आडीच हजार येकूण पाच हजार आहे. श्रीमंत पत्रे वकीलास राायाविराजित लिहीता आम्हास अखंडित लिहीता हे विनंती आपण करावी. येविसी स्वामीस रागास आले तरी चिंता नाही. रागास येणार नाही. हे विनंती.

¶*Antaji Manakeshwar writes to Sakharam Bapu from Delhi: He feels offended at not being addressed by the Peshwa in the same manner as the Hingnes.*

2228

श्री

हिसेब अजमास माहालप्रांत अंतरवेदी निसबत गोविंद बलाल सुहूर सन सलास खमसेन मया व अलफ. जमा कारकीर्दीअमल नवलराय निसबत वजीर रुपये : ८५०९४४८≡

यासी आकार सन इसने रुपये

९२६६६॥ परगणे देवलाली.
९७७०७। परगणे बि * * *
७०६२३ परगणे डेरापूर
३०४१६ परगणे * * * पूर
१५०६९८ परगणे बिरबन
७२८२१ परगणे बलबेर
४०५१४ परगणे देवहा
२८५० परगणे नाना मढू

५५८२९५।॥

७६६४४ ॥ बाकी सालगुदस्त सन इहिदेपैकीं ८३२१०।
वजा सिबंदी ६५६५।॥
बाकी रुपये

६३४९४०।

पैकीं वजा सिबंदी रुपये.

५००० बालाजी गोविंद समेत पालखी
८११५० प्यादे आसामी २४८५
८१०० कारकून आसामी ३०
२२००० गद्या पाडावयासी
३९०० पडिली घोडीं

१२०१५०

बाकी वसुली जमा. ९१४७९०।· रुपये

२६७३७३।।।= वसूल

२४७४१६ ।= बाकी माहालीं

९१४७९०।.

पैकीं बाकी २४७४१६।= रुपये

जमा सालमजकूर बद्दल ७९६६९४८≡

नवलराय जमा रुपये

८९०९४४८≡

पैकीं वजा माहाल मजकूर:

९००० बालाजी गोविंद

८११९० प्यादे २४८९

८१०० कारकून ३०

९४२९०

बाकी जमा रुपये १००४ [फाटले] १०॥-

¶*This is a list of the Districts in the North under the management of Govind Ballal and Navalrai, together with the assessment of each.*

No. 48] *[11-1-1753*

श्री

अखंडितलक्ष्मुमी आलंकृत राजमान्य राजश्री
दिनकर माहादेव गोसांवी यांसी

सेवक विश्वासराऊ बलाल नमस्कार. सूरसन सलास खमसैन मया व अलफ. तीर्थरूपांकडून लष्करांतून तुम्हांस पत्र आलें तें पाठविलें आहे त्यावरून सविस्तर कळेल. राजश्री जयाजी शिंदे यांजकडे राजश्री रामाजी अनंत दाभोळकर गेले होते ते मशारनिलेस घेऊन आज तृतीय प्रहरीं येथें आले. याउपरी राजश्री मल्हारजी होळकर याचा रुसण्याचा भाव आहे तोहि दूर होऊन उभयतांचीं समाधानें होतील, कांहीं चिंता आहे ऐसें नाहीं. होईल वृत्त तें मागाहून पाठविलें जाईल. तुम्ही तेथील वृत्त व भावगर्भ सर्व हरद्र मनास आणून वरचेवर लेहून पाठवीत जाणें. आळस येकंदर करीत न जाणें. जाणिजे. छ ९ रबिलौवल.

¶*Vishvas Rao Balal writes to Dinkar Mahadeo that Sindia and Holkar have been reconciled.*

No. 49] [14-1-1753

श्रीम्हाळसाईश

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक हरि नारायेण कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल तागाइत पौष शुध १० भानुवासरे मुकाम पुणे जाणून स्वकीय लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशष. पूर्वी साकल्य वर्तमान दोन तीन पत्री लेहून पा होता तो सेवेसी निवेदन जालाच असल. हलीचे वर्तमान तरी राजश्री त्रिंबकराऊ मामा यानी आम्हास वाफगावीहून येथे बोलाविले आणि साकल्य वर्तमान पुसिले. जे येथास्थित होते ते निवेदन केले तो राजश्री जयाजी सिंदे हेहि येथे आले. त्यानी यानी मजकूर करून रा संताजी वाबले व सेटियाजी राऊत यैसे रातोरात वाफगावास रवाना केले. तेथून राजश्री मलारजी होलकर पोश शुध ९ मंदवारी येथे आले. पुढे सामोरे श्रीमंत राजश्री राऊसाहेब व राजश्री मामा व रा जयाजी सिंदे येसे जाऊन त्यासी घेऊन येऊन तेसेच वाडियांत मातुश्री ताईसाहेबाची भेटी घेतली. त्यासी दुसरे दिवशी रा मलारबा आपले हवेली बोलत बसले होते. तेथे रा जिवाजीपंत अणा होते त्यासी बोलत होते की आम्हास सत्वर निरोप देवणे. आम्ही फौज धरली आहे. त्यापैकी नवे फौजेस काही आदियापि पुरती नालबंदी दिल्ही नाही. मागील समजावीस पुरती जाली नाही. दिलीवर आहमदखान पठाण येतो त्याची आवाई फार जाली आहे. तो पलीकडेच आहे तो जाऊन पोहचावे म्हणजे गोष्ट कार्याची. नाहीतर तो भारी जालियावर मग कार्यास येणार नाही, येसा कितेक विचार आहे, तरी आम्हास सत्वर निरोप देवणे येसे म्हणत होते. रा बाबूजी नाईक याचे पूर्वीहि वर्तमान सविस्तरे लि।।च होते की ते बरेवजेने फजीत पाऊन गेले. याची येकनिष्टता स्वामीच्या पायासी आहे. तेथे आणिखी दुसरा अर्थ किमपि दिसत नाही. परंतु घरातच रुसावे, जे करणे ते घरातच करावे परंतु आणिखी विशम भाव कोणे प्रकारे दिसत नाही. आह्मणहि येथे आले की लोकिकात जाले आहे की रुसले, ते परिमार्जन करावे. परंतु चितात कित की राजश्री रामचंद्रबावा दरबारी नसावे. येसा कित जो आहे तो काही निघत नाही येसे दिसोन बोलीचालीवरून येते. त्याजकडील फौजेचा मजकूर तरी धिराजी पवार व सेटियाजी जाधव वगैरे किरकोल पथके येसी ठेविलीच आहेत. मुजफरखान गारदी हाहि ठेविला आहे. याचा कारभारी हिराचंद कार्येत येथे येऊन बोली दरमाह दीड लक्ष रुपये घ्यावे आणि मुजफरखान याने चाकरी करावी येसा करार

करून गेला. वीस हजार रुा त्यासी हुंडी करून दिल्हे. वस्त्रें देखील दिल्ही येसे वर्तमान आहे. मागाहून जे होईल ते लिहिले. जाईल. बहुत काय लिहिणे? लोभ कीजे हे विज्ञाप्ति.

¶*Hari Narayan to the Peshwa giving news from Poona.*

No. 50] [*24-1-1753*

श्री

श्रीमत राजश्री भाऊसाहेब
स्वामींचे शेवेसी

विनंती सेवक अंताजी माणकेश्वर कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत पौष वद्य ५ पंचमी मुक्काम इंद्रप्रस्थ स्वामींचे कृपेकडून शेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. प्रस्तुत नवाब वजीर यांचीं पत्रें दक्षणेहून आलीं कीं, स्वामींचा व सलाबतजंगाचा सलूख होऊन, आपण आरकाटाकडे गेले. सरदार घरास आले. यैसें साकल्य वर्तमान वजिरांनीं सांगितलें. या प्रांतींचें वर्तमान तरी पहिले सरदार देशास गेलियापासून सुरजमल जाट, राजे माधोसिंग व राजे बखतसिंग यांसी जाऊन, भेटून आपण दिल्लीस येऊन वजिराची भेटी घेऊन करार केला कीं, नवाब बाहादुर यानें मऱ्हाठियांच्या घरांत पातशाही घातली. पातशाहा व राजश्री पंतप्रधान पगडी बदलोन भाऊ जाले. तेव्हां तुमची वजारत कोठें राहिली? आगरें, अजमेर दोन सुभे दिल्हे. तेव्हां आमची स्थळें कोठें राहिली? याउपरी सरदारसुद्धां फौजा दक्षणेंत गुंतल्या आहेत तों आपण नवाब बाहादर ठिकाणी लाऊन, पातशाहा आगरेयास घेऊन * * * उभयेतां राजे वगैरे * * * जमा करून जो खर्च तुम्हांस व पातशाहास लागेल तो देतों आणि दक्षणियांचा अंमल उठऊन देऊ. थोडीशी फौज अंताजी माणकेश्वर दिल्लीस येणार ती मार्गींच ठिकाणी लाऊन. यैसा इमानप्रमाण करून नवाब बहादर श्रावणमासींच ठिकाणीं लाविले. तों तिकडे राजे बखतसिंग अपमृत्यें मृत्य पावले. तेव्हां पातशाहास परिच्छिन भये वाटलें कीं, आपलियास मारतील. तेव्हां बापूजी माहादेव यांच्या गळा पाडिले जे. नवाब बहादर मारिला. आता आम्हास आश्रा राजश्री पंतप्रधान यांखेरीज नाहीं. ते दूर राहिले. तुमची फौज आमचे चाकरीस रवाना जाली आहे. ती ग्वालीयेर प्रांतीं आहे. परंतु फौज थोडी आहे. पांच सात हजार फौज जरूर रात्रीचा दिवस करून आणवणें म्हणजे तुम * * * तीन वेळां लिहिलीच आहे. तरी पाऊण लाखाची सनद पाठवावयास स्वामी समर्थ आहेत. लक्ष्मण शंकर व नारो शंकर देशास गेले, याकरितां राजश्री गोविंद बल्लाळ यांजवरी मुबादला यैवजाची सनद पाऊण

लाखाची पाठवावी म्हणजे साहुकारांचा पैका साहुकारांस पावतां करूं. विनंती उदास न करावी. मौजे कामरगाव हा शेवकाचा वतनाचा गांव; त्यास स्वामी कृपाळू होऊन, मौजे मजकूर मुकासा दिल्हा. त्यास च्यार वरसें जालीं. नवाब गाजदीखान दक्षणेस चालिले, तेव्हां आम्ही विनंती करून कामरगांव इनाम आपणांकडे करून घेतला. परवाना घेऊन राजश्री जयाजी आपाजी शिंदे यांजवळ दिल्हा आहे. त्यास मौजे मजकूरचा परवाना स्वामींनीं करून घेतलाच असेल त्याप्रमाणें सलाबतजंगापासूनहि घेऊन ठेवावा. ज्याप्रमाणें स्वामींनीं मुकासा शेवकास दिल्हा, त्याप्रमाणें इनाम गांव करून घ्यावा. इंद्रोजी पाटील स्वामींस * * * प्रकारें करून सांगतील. राजश्री * * * पागा रदबदली करितील तरी सर्वथा चित्तांत न आणावी. शेवकासच स्वामींनीं गांव द्यावा. येविसीं पूर्वी सेवेशी विनंती लिहिली आहे. देशांत आमची मोठीत दौलत मौजे कामरगांऊ. वणजारा तेथील पाटील सरकारांत नरसिंग दिा पागा याच्या विद्यमानें चाकरीस राहिला. तो गांवची रदबदली करील तरी सेवकाचा अपमान न करावा. गाजदीखानानें गांव दिल्हा अथवा पातशाहानें दिल्हा तरी सरकारचा. आम्ही बारगीर. परंतु माझा गांव मजलाच द्यावा. जतीचेही रुपये येक हजार सरकारांत आमच्या भावापासून घेतले ते दिल्हे. याउपरी कामरगांवाविसीं आम्हीं वारंवार ल्याहावें यैसे न करावें. थोर कारभार, विस्मरण पडेल. आमचा तों जीवप्राण कामरगांवासी लागला आहे. परगणें कुरोली, मंडराळेंविशई च्यार वेळां लिहिलेंच आहे, आपल्या चित्तास येईल तें करावें. इतकाहि आगत्येवाद सेवकाचा नाहीं यैसा नसावा. आम्ही घरचे खानजाद आहों. जेवढी मातबरी वाढवाल तेवढी स्वामींच्याच कामाची. वरकड सविस्तर पुरवणी आलाहिदा सेवेशीं लिहिली आहे त्याजवरून कळेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Antaji Manakeshwar reports the intrigues of the Vazir, the Jat and Rajput princes to eject the Marathas from the North.*

No. 51] [*25-1-1753*

श्रीम्हाळसाईश

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक हरि नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत पौश वद्य ७ गुरुवार मुकाम पुणे जाणून स्वकीय लेखन करा-

वयास आज्ञा केली पाहिजे विशष. येथील वर्तमान तरी राजश्री मलारजी होलकर व जयाजी सिंदे निरोप घेऊन गेले. रा जयाजी सिंदे पौश वद्य ४ सोमवारी संध्याकाली निरोप घेऊन चांभारगोंदियास गेले. रा मलारजी होलकर वद्य ५ मंगलवारी रा बाजी भिवराऊ याचे पुत्र मलारराऊ याचे घरी भोजन करून त्रितीय प्रहरी येथून वाफगावास गेले. श्रीमंत राजश्री राऊसाहेबी उभयेता सरदाराचे बहुत समाधान केले. त्याजवरून सरदारहि उभयेता बहुत संतोश पावले. पौश वद्य ४ सोमवारी उभयेताचे घरास जाऊन भोजनास सांगितले. राजश्री मलारजी होलकर याचे घरी आधी श्रीमंत राजश्री राऊसाहेब उभयेता गेले आणि भोजनास त्यास सांगितले. त्यानीहि ते समई उभयेतास वस्त्रे च्यार कडी येसी दिल्ही. बराबर जे कोण्ही ग्रहस्त होते त्यासहि वस्त्रे दिल्ही. त्याप्रमाणे राजश्री जयाजी सिंदे यानी दिल्ही. स्वामीनी रा जयाजी सिंदे याजकडे कराराची यादी करून पाठविली होती तेणेप्रमाणे सनदा करून दिल्हा. रा मलारजी होलकर याजकडे किरकोल गाव पाटिलकीचे वगैरे सुमारे गाव २५ पंचवीस येसे इनामपत्रे करून दिल्ही. मोगलाई जागीर जेणेप्रमाणे परगणे करार यादी होतें तेणेप्रमाणे सनदा दिल्ही. गंगाधरपंत यास गाव सात इनामपत्रे करून दिल्हे व रामाजी यादव यास च्यार गाव इनामपत्रे करून दिल्हे. जयाजी सिंदे यास आकरा गाव इनामपत्रे करून दिल्हे व जागीर यादीप्रमाणे सनदा दिल्हा. त्याजपासून पंचवीस लक्ष रुपये सरकारात द्यावे. निमे रा मलारजी होळकर याजकडे साडेबारा याची याद त्याजपासून हफ्तेबंदीची करून घेतली. केवल निशा तूर्त जाली नाही. परंतु करार जाला त्याप्रमाणे पैका देतील. तूर्त त्याचे समाधान जे गोष्टीने जाले तैसा विचार करून त्यासी निरोप दिल्हा. महिनाभर वाफगाव व कोऱ्हाले इतकी जागात राहवे येसा करार जाला. रा गंगाधरपंत व रामाजीपंत व संताजी वाबले येथेच आहेत. सनदा घेऊन दो चो रोजानी मागून जाणार व आणिखी कितेक त्याचे खासगत सावकारी गुंते व सरकारचे गुता येसे उगऊन जाणार. जयाजी सिंदे व मलारजी होलकर याचे उभयेताचे चितात सेवगाव याचे वाटणीब्रदल विक्षप पडला येसे बाह्यातकारे वर्तमान आहे. आंतरयामी त्याचे ते जाणत. रा मलारबा तो येकनिष्ठ आहे. परंतु लोकिकात जाले होते [अपूर्ण]

¶In this letter the writer Hari Narayan informs the Peshwa how Malhar Rao Holkar was placated through the mediation of Vishvas Rao and the Peshwa's mother.

2234

No. 52] [3-2-1753

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
साहेबाचे सेवेसी

॥ ८ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री दताजी सिंदे कृतानेक दंडवत विनंती. येथील क्षेम ता। पुश वदे आमावाशापावेतो साहेबाचे कृपेकडून वर्तमान येथास्तित आसे विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेबा-बराबर तुमची रवाणगी केली आहे. त्यास ते मजल दरमजल जातात, तुम्ही आद्यापि गेला नाही म्हणौन आज्ञा केली. त्यास आपलीहि तयारी जाहाली आहे. त्यास येका दोन रोजा निघोन मजल दरमजल जाऊन श्रीमंत राजश्री दादासाहेबा-पासी पोहोचतो. साहेबास कलावे म्हणोन लिहिले आसे. विशेष काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Dattaji Sindia promises to join the Peshwa's forces without loss of time.*

No. 53] [8-2-1753

छ २१ जालौवल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक अंताजी माणकेस्वर कृतानेंक साष्टांग नमस्कार विज्ञापना. सेवकाचें वर्तमान ता। माघ शुध ५ पंचमी मुकाम इंद्रप्रस्थ येथास्थित असें. आम्ही हस्तनाफुरास विजयादशमीस दाखल जालियातागाईत कासीद जोडी सात अजुरदार करून सविस्तर वर्तमान दिलीचे पातशाहा व वजीर व मीरबक्षी वगैरे यांचे व रजपुताचें व जाटाचे सादेंत पठाणाचें आदिकरून सविस्तर विस्तार सात वेला लिहिला तोंच मागती कोठवरी ल्याहावा ? मागील विस्तार याजकरितां न लिहिला. परंतु येकाहि पत्राचे उतर न आलें, याजवरून आपूर्व आहे. आसों. प्रस्तुत आबदाली पठाणाची फौज भारी अटक उतरली. याउपरी तेथेच मुकाम केला आणि पुढे त्यानी आपला येलची[1] मातबर इतबारी दोन हजार फौजनसी दिलीस पातशाहाकडे पाठविला, तों आजी तीन दिवस येऊन दिलीस दाखल जाला. त्यांस सालगुदस्ता पठाण आटक उतरला होता ते समई नेवाब[2] बाहदर यानें आबदाली पठाणास रुपये पनास लाख देऊन समजाऊन मागती

१ येल्ची—वकील. २ खोजा जावेद.

2 The Emperor's favourite, murdered in 1752.

अटकपार करून दिल्हा. जे समई सरदार दिलीस आले त्या समयातील गोस्टी हे आहें. याजमुले सरदाराचाहि उपर उतमच जाला. आसों. प्रस्तुत नवाब बाहदर मृत्य पावला. अता पठाण मागती आटक उतरून हदेवरी येऊन मुकाम करून येलची येथे पाठविला. त्याचा यांचा जाबसाल जाला कीं सालगुदस्तां नवाब बाहदर याने रुपये पनास लाख दिल्हे ते साल गुदस्ताचे दिल्हे. पुढे साल दरसाल आमचे पनास लाख रुपये द्यावे. त्यास येंदाचे सालचे पनास लाख रुपये देणे म्हणजे रुपये घेऊन मागती अटक उतरून जाऊन. नाही तरी दिलीस येतों. जुझावयाची तयारी करणे. येणेप्रा जाबसाल येलचीचा जाला. ते दिवसी येलचीस वस्त्रें मेजमानी दिल्ही आणि उतर दिल्हे की, याचा जाबसाल आम्ही आठा दिवसानी देऊन. त्याजवरी पातशाहानी वजीर व तमाम आमीर बोलाऊन दरबार केला. सर्वास पुसिलें की, याउपरी पठाणाच्या येलचियासी जाब काये द्यावा तो सांगणे. नाहीतरी तो दिलीस येईल. कदाचित दिलीस न आला तरी लाहोर वगैरे तीन सुभे मिलोन दाहा क्रोडींचा मुल्लक पठाण घेतील. नाही तरी जुझावयाचा सरंजाम करून सारें सरदार आटकेवरी जाणे. त्याजवरून सर्वानी येकच उतर दिल्हे की, हजरत आबदालीची मोहीम मऱ्हाठियानी कबूल केली. हजरतनी त्यास आजमेर आकबराबाद दोंन सुभें नामांकित दिल्हे व दरोबस्त बाविसा सुभियांची चौथ दिल्ही व पैका देऊन सर्व येख्तार मराठियांचा ठेविला. हे मसलत मऱ्हाठियासी पुसावी. त्याजवरी नवाब वजीर आखेर थोंर त्यानेच जाबसाल सर्वासी केला की मऱ्हाठें साल गुदस्तां अंतरवेदीत कामास आलें. पुढेहि चालीस हजार फौज त्याची दो महिनियानी येऊन दाखल होईल. आजी दिलीतहि त्याची फौज पांच हजार आहें. आणखी पाच हजार हे आठापंधरा दिवसा जमा करून दहा हजार फौजनसी आजी तयार आहेत व आपण तीस हजार फौजनसी आजी तयार आहे. येकूण मऱ्हाठेसुध्धा आजी चालींस हजार फौज माझी आहे.

¶Antaji Manakeshwar, left with the Emperor with an army of five thousand while Sindia and Holkar have gone South, writes home about the situation that has developed as a result of the menace from the Abdali, who advancing as far as Attock, sent his envoy to Delhi to demand fifty lacs as his annual subsidy. The counsellors advised the Emperor to refuse the Shah's demand as the Marathas have agreed to drive away his enemies in return for Ajmer, Akbarabad and the chauth of all twenty-two subhas. The letter is incomplete.

2236

No. 54] [20-2-1753

श्रीम्हाळसाईश

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक हरि नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत माघ बहुल त्रितीया भौमवासर मुकाम कोऱ्हले नजीक गंगातीर जाणून स्वकीय लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशष. स्वामीकडील वर्तमान बहुत दिवस कलत नाही. आम्ही येथून पाच सात पत्री साकल्य वृतांत लेहून पाठविला ते सेवेसी पावला किंवा नाहीत हे न कळे. कासीद जोडी येक पाठविली व जासुदाची जोडी दोन वेला दोन पाठविल्या आणिखी कोण्ही येथून जोड्या रवाना जाल्या त्याजसमागमे च्यार पत्रे पाठविली परंतु उतर आदियापि आले नाही. येथील वर्तमान तरी राजश्री मलारजी होलकर माघ शुध १ रविवारी सा घटिका दिवसा वाफगावीहून स्वार होऊन घोडनदीचे काठी मुकाम लाखणगावावर केला. तेथून मजल दरमजल मुकाम मजकुरास आले. येथे या प्रांती तमाम गावगणा बाभला तोडून फिरंगी कळेचे गाडे करवीत आहेत. पुणियाहून येक गाडा फिरंगी समागमे घेऊन आले त्याप्रमाणे येथे करितात. श्रीमंत राजश्री राऊसाहेबाचे पत्र येथे यास आले की तुम्ही सिनरचे ठाणे घेऊन देणे. त्यासी रा। धिराजी पवार यानी सिनरास पाठविले. त्यानी त्याजसमागमे दोघे भले माणूस येथे पाठविले. सिनरकराचे मजकूर की जेणेप्रमाणे पूर्वी मोगलाचा इजारा होता तेणेप्रमाणे सरकारात कबूल करून रुपये घ्यावे, परंतु ठाणे न घ्यावे; येसा हेत धरून येथे आले. त्यासी यानीहि येक साल इजारा त्यापासून घ्यावा येसा विचार केला आणि मालजामीन व फैलजामिन त्यानी द्यावा येसा निश्चय केला परंतु मालजामीन त्यासी कोण्ही होत नाही. मग यानी त्यास परनिष्ट गोष्ट सांगितली की तुम्हास ठाणेयाचे आगत्य आसल तर मालजामीन मातबर देणे, नाहीतर ठाणे खाली करून देणे. इतकियावर येकत नसाल तर आम्ही येऊन तेथे लागलो मग कोण्हाचे येकणार नाही, ठाणे घेईन तेव्हा उठण. त्याजवर सिनरास राजश्री फतेसिंगाकडे जाबसाल लेहून पाठविला आहे. तेथून त्याचा जाब आलियावर जो निश्चय होणे तो होईल. राजश्री नवाब सलाबतजंग याचे येथे वर्तमान आहे की नांदेडावर गेले. वराड प्रांती रघोजी भोसले यानी धामधूम मांडली आहे म्हणून तिकडे जाणार आणि नवाब याची बातमीहि याजपासी बसली आहे. दिलीकडील वर्तमान येथे आले होते की पातशाह आपले हवेलीत आहेत. मनसूर अलीखान आपले हवेलीत आहेत.

काबलास आबदुलखान पठाण आटक उतरोन आला. त्याची थोडीसी फौज लाहोरास आली. मीरमनू ते येकत्र होऊन दिलीवर येणार म्हणून वर्तमान आहे. माधोसिंग जयनगरकर यानी फौज जमा केली आहे म्हणून वर्तमान आहे. येथे वकील हिंदुस्थानचे तमाम आले आहेत. माधोसिंगाचे वकील येथे आहे. बिजयसिंग, बखतसिंगाचा लेक, याचा वकील येथे आला आहे. सुरजमल जाट याचा वकील आला आहे. गोपालसिंग करोलीकर याचा वकील येथे आहे. याजपासी तूर्त फौज तीन च्यार हजार जमा जाली आहे. त्रिचनापलीकर महमदखान त्याचे पत्र यास आले होते. त्यात मजकूर लिहिला होता की तुम्ही आम्हास वडील आनुर्दीखानाचे जागा आहा. आम्ही इकडे फुलचेरीचे फिरंगी याचे पारपत्य केले. पाच हजार पायेदल गारद केले. पंधरा हजार फौज लुटली आणि मातबर फिरंगी कैद केले. तूर्त आम्हापासी पायेदळसुधा चालीस पनास हजार फौज आहे. तुमच्या दरशनाचा हेत होता. ते तुम्हीहि या प्रांती येणार म्हणून येकिले होते त्याजवरून संतोश जाला होता. त्यास तुमचे येणे तो जाले नाही. तर पूर्वी गाजदीखानाचा कागद पाठविला होता की आमच्या हमराह होणे व पातशाही परवाना पाठविला की गाजदीखानाचे ताबे राहणे. त्यासी ते गोष्ट तो तैसी जाली. तर फिरोन पातशाही परवाना आलादा आमच्या नावे होये येसे केले पाहिजे. तूर्त तुमची पत्रें श्रीरंगपटणचा राजा व आणखी मातबर आम्हासमागमे आहेत व गरमातबर पालीगर यास पत्रे पाठवणे की तुम्ही जैसे त्रिचनापलीकराचे हमराह तैसे राहणे. यैसे त्याचे पत्रे यासी आली होती त्यासी उतरेहि दिल्ही. राजश्री राघो गोविंद याजवर रागे फार आहेत. त्यानी मौजे जांबगाव पा। गांडापूर येथील वसूल घेतला आणि गावास चिठी पाठवीत. तेव्हा त्याचे माणूस जाऊ सांगे की रा। मलारजी होलकर बदलून चालिले. म्हणून त्या गावकरियानी यास येऊन सांगितल. त्याजवरून रागे त्याजवर फारच आहेत. म्हणतात की आम्ही बदलून चालिलो असतो तर हा येथे कैसा राहता, हे उगेच आमची बदनावे करितात, हे काये गोष्ट आहे म्हणून त्याजवर रागे भरायास कारण इतके. मागे पुणियास रा। गंगाधरपंत राहिले होते. सरकारातून सनदपत्र कराराप्रमाणे करून घेऊन, नायगावास त्याचे घरी पुत्राची मुंज आहे तेथे आले आहेत म्हणून वर्तमान आहे. मातुश्री आईसाहेबाची पत्रे याजकडे येतात. परंतु याचा येक भाव आहे. यासिवाय आणखी आढलत नाही. स्वामीचे पत्र यास आले त्यात मजकूर लि॥ होता की तुम्ही फालगुणमासपरियेंत या प्रांतीच राहणे. कदाचित जाणे जाले तरी सेंधवे नागलवाडी पुढे न जाणे म्हणून लि॥ होते, यैसे हे बोलत होते.

सिनरची मामलत चुकल आणि गंगाधरपंत येथे येतील. मग पुढे कुचाचा मजकूर होणे तो होईल. मजलाहि पुसत असतात की श्रीमंताकडील काही वर्तमान आले की नाही? तरी मजला आज्ञापत्र पाठवणे त्यात मजकूर मजला त्याह्यायोग्य आसल ते लिहिला पाहिजे. येथे सरदार याजपासी धिराजी पवार आहेत त्यांची पाचाशा स्वाराची बोली पुत्राचे नावे केली आहे. त्याचा जैसा सरंजाम पहिला आहे तो सरकारातून करून घ्यावा म्हणून बोली आहे. रा उदाजी पवार आहेत त्याचा पुत्र यानी आपल्यापासी ठेवावा येसा विचार आहे. मुजफरखान गारदी येथे येणार म्हणून वर्तमान आहे. यानीहि येथे दोनसे गारदी दाहावीस फिरंगी ठेविले आहेत. तोफाचे सामान बहुत उतम करितात. दररोज तोफापासी जाऊन बसावे आणि तेथेच कारभार करावा येसा इश्क तोफेच्या गाड्याचा व तोफेचा फार लागला आहे. तूर्त हें विनंतपित्र याचे कासिदासमागमे पाठविले आहे. येथून कूच जालियावर साकल्य वृतांत सेवेसी लिहिला जाईल. येथे मजपासी जासुदाच्या जोडे च्यार राहिले आहेत ते वरचेवर वर्तमान पुणियास लेहून पाठवितो. सेवेसी श्रृत होय. स्वामीकडील साकल्य वृतांत आज्ञापत्री लिहिला पाहिजे. तेणेकरून सेवकास आल्हाद होत जाईल. बहुत काय लिहिणे कृपावृधि कीजे हे विज्ञाप्ति. पुणियात गेलो होतो तेव्हां श्रीमंत राजश्री राऊसाहेबी आज्ञा केली की तुम्ही वरचेवर वर्तमान आम्हापासी पाठवीत जाणे, आम्ही लस्करात पावते करू, येसी त्याचीहि आज्ञा आहे. येथून कोण्ही याचे कासीद येतील मजला कलतील त्याजसमागमे वर्तमान सेवसी लिहीन व कूच जालियावर सरकारची जोडी रवाना करीन. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶This letter refers to the reconciliation of Holkar and the Peshwa. It also mentions the keen interest he has evinced in artillery on the European model.

No. 55] *[20-2-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान तथा राजश्री भाऊसाहेब स्वामींचे शेवेसी

विनंती सेवक अंताजी माणकेश्वर साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत माघ वद्य ३ तृतीया, मुक्काम इंद्रप्रस्थ सुखी आसों विशेष. दिल्लीस आलियातागाईत दाहाबारा जोडी अजुरदार करून पंधरा रोजांचे पधरा

रोजा वर्तमान पातशाहाचें व वजिरांचें व आमिरांचें, पठाणांचें, रजपुतांचें, जाटाचें वर्तमान तपशीलवार सात बंद लिहीत गेलों. उतर येक मात्र जाब भालकीचे मुक्कामींचा आला. च्यार पांच जोडी दिल्लीचे काशीद, राजश्री दामोदर माहादेव वकील यांचें वळखीचे होते, त्यांजवळ पत्रें कांहीं लस्करांत, कांहीं मार्गी, कांहीं नाशकाआसपास येकूण च्यार जोडियांनीं पत्रें दामोदरपंतांजवळ दिल्हीं; त्यांनीं सेवेसी दिल्हीं असतील किंवा नाही. दूर पंथ; सरकारच्या कामांकाजांचे मतलब अक्षरशा पत्रें वांचून उत्तराची सविस्तर आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. आबदाली पठाण आटक उतरला. परंतु पुढें येत नाहीं. त्याचा वकील येलची येथें आला. पातशाहांची भेटी जाली. त्यांस आणखी पंधरा रोज ठेऊन घेतला आहे आणि फौजांची तयारी होत आहे. आमची पहिली फौज चार हजार आहे आणिखी वजीरांचे आज्ञेवरून चिरंजीव तात्या, आमचें पुत्र, ग्वालीयेरीहून महिनेदार जाट, पठाण मिळोन येक हजार स्वार, माघ शुद्ध ९ दिल्लीस दाखल जाले. परंतु दिल्लीचा कारभार आहे. बाहेर निघावयास येक मास लागेल. पुढें पठाणाची यांची गांठ चैत्रमासीं पडेल. आसो. तूर्त राजे माधोसिंग जैनगरींच इतके दिवस होते, व राजे बखतसिंग यांचे पुत्र आपलें ठिकाणींच होते. सुरजमल जाट दिल्लींतून गेलियातागाइत आपल्या मुलुकांतच आहे. प्रस्तुत पातशाहाचा व वजिराचा कजिया घरांत वाढला आहे. वजिराचे लगामीं जाट व रजपूत पुरते आहेत; तेव्हां वजिराचा जोड भारी. वजीर दुसरा पातशाहाच आहे. तुराणियांमध्यें फूट आहे, च्यार चौघरचे, कोणी कोणाचे हुकमांत नाहीं. येसें असतां नवाब बाहादर यांनीं सारी पातशाहाची चौथ व दक्षेणची येख्त्यार व अजमेर आगरे दोन सुभे दरोबस्त दिल्हे व पहिलें फार करून हिंदुस्थान तुमचेच पदरीं पडिलें. लाहोरचे चौथाईचा तगादा रोज मीर मन्नूच्या वकिलास लागलाच आहे. याजमुळें जाट, रजपूत, वजीर, कोणास चित्तापासून समाधान नाहीं. याजमुळेंच खोज्या[१] मारिला गेला. ऐसियासी सलाबतजंगासी स्वामींनीं सल्ला केला, हें तुराणी यांस कांहीं समाधान नाहीं. परंतु वजिराचें मनांत समाधान कीं, जालें तें उतम जालें. स्वामींनीं सल्ला केलियाउपरी, श्रीमंत् राजश्री दादासाहेबांची रवानगी गुजराथप्रांतीं केली. त्यांचीं प्रांत खानदेश येथील पत्रें, वकिलास व आम्हांसही आलीं कीं, अपण सत्वरच अहमदाबादेस येतों. तिकडील साद्यंत लिहिणें. त्याजवरून आमचीं व वकिलांचीं पत्रें व पातशाहांचीं पत्रें श्रीमंतांस गुजराथप्रांतीं गेलीं आहेत कीं, सत्वर

---

१ खोजा जावेद.

येणें; त्यांचीं उत्तरें काये येतील तीं पाहावीं. नबाब वजीर यांसी पत्रें देशींहून, राजश्री सुभेदारांचीं व दामोदरपंतांचीं येत असतात. राजश्री आपांचीं पत्रें आढळलीं नाहींत व येतही नाहींत. नवाब वजीर दक्षणेचे वर्तमान पंधरवडियाचे पंधरवडा सांगत असतात कीं, सरदार लौकरी येत नाहीं. मल्हारराऊ चाकरी टाकून मोगलाईंत येतात. वाफगांऊचा वाडा पाडिला, घरें जाळलीं. श्रीमंत राजश्री पंतप्रधान व नवाब सलाबतजंग अकृत्रिम येक जाले. उभयेतां मिळोन मल्हारराऊ यांजवरी इतराजीही करणार. गाजदीखानांनें सरदार वगैरे सर्व जो मुल्क, गांवखेडें दिल्हे त्याप्रमाणें सलाबतजंगापासून घेऊन सरकारांत ठेविलें. कोणास कांहीं दिल्हें नाहीं. त्याजप्रमाणें वकिलाचे जाहापूरही दिल्हें नाहीं. म्हणून सरदार, वकील सर्व खट्टे आहेत. येकदिल कोणी नाहीं. श्रीमंतांनीं सर्वांस जाब दिल्हा जें, तुम्हांस गाजदीखानांनीं हें देणें दिल्हें होतें. पुन्हा पातशाहा गाज(दी)खानांच्याच पुत्रास सुभा देतील. तरी मागती आम्हीं तुम्हांस देऊं. यैशा खबरी तेथून लिहिणार वजिरांस व बापूजी माहादेव यांसही लिहितात. येथें सारें दिल्लींत लोक, वजीर, वकील बोलतात. वजीर राजश्री सुभेदारांस लिहितात जें, उत्तम पक्ष राजश्री पंतप्रधान तुम्ही येक आसावें. तथापि तुमचा त्यांचा रिणानुबंध तुटला तरी आम्ही सर्व प्रकारें तुमचें आहों, यैसें लिहितात. चित्तापासून आमचा संतोश तरी वजिरांसही नाहीं व कोणांसही नाहीं. जितकी घरांत फूट होईल तितकी उतमच आहे. फौजाही सरदार या प्रांतें लौकर न येत तर फार बरें. मागेंच यांनी दंगा माजऊन मुल्कांत फितुर करावा हा निश्चये होता, परंतु फौज स्वामींची दिल्लींत आली. सर्वांची रजाबंदी आम्ही केली. त्याजमुळें जिकडील तिकडे दबलें. आतां घरच्या फितुराच्या गोष्टी तमाम दिल्लींत लोक बोलतात. मल्हारबांनीं चाकरी सोडली. या मुलकांत मल्हारबांचा लौकिक मोठा. यांत मागती रजपूत व जाट येकत्र वजिरांनीं करावें यैसा करार करून सर्वांस बोलाऊं गेलीं. बहुधा सर्व येतील. आम्हांस सांगतात पठाणांसाठीं फौजा जमा होतात. पठाण इतकियांत दबोन राहिला तरी आणि(खी महि)नाभर सरदारांची वाट पाहावी कीं, सरकारचे चाकर होऊन येतात किंवा बागी होऊन येतात. मग जें करणें तें करितील. व स्वामींचीं आज्ञापत्रें आम्हांस १ येक व बापूजी माहादेव यांस येक आलें कीं, याउपरी सलाबतजंगाचा आमचा अकृत्रिम सला जाला. तुम्ही याउपरी गाजदीखानांच्या पुत्रांस तेथेंच राहूं देणें. त्यांची मीर बक्षी त्यांस आहे. दक्षणेची सुभेदारी साफ त्यांस न देणें, त्यास इकडे घेऊन न येणें. सालाबतजंगांस सनद खिलत देवविणें, यैसी आली. यापूर्वीं नवाब

१ बंडखोर.

वजीर त्यांच्या चित्तांत हेंच होतें. त्याजवरून नवाब वजीर यांनीं आम्हांस नेऊन सांगितलें कीं, राजश्री पंतप्रधान यांच्या चित्तांत असेल त्यांस मजला दक्षणेची सुभेदारी द्रेणें. तुम्ही त्यांस लिहून मजला त्यांचें पत्र आणणें. त्याप्रमाणें सनद त्यांस देईन. चित्तापासून सलाबतजंगांकडे मनोगत वजिरांचें आहे. परंतु स्वामींसही पूर्वीं मुजरद जोडी पाठविली आहे. तरी साफ नवाब वजिरांस पत्र आमच्या कागदाबराबर पाठवणें कीं, नवाब सलाबतजंगांस दक्षेणेची सनद वस्त्रें देणें. माझी मालुमीतही[1] लिहिणें व बापूजी माहादेव यांसही मागती साफ लिहिणें कीं, तुम्ही सलाबतजंगाचेंच साहित्ये करून सनद वजिरांपासून देवविणें. गाजदीखानांच्या पुत्रांस सनद न देवणें. दिल्ही तर आम्हांस शब्द नाहीं, यैसें लिहिणें. स्वामी म्हणतील कीं, यैसें कायें कारण? तरी वकिलांचा आम्ही गिला करीत नाहीं. स्वामींची आज्ञा आम्हांस व त्यांस आली त्याप्रमाणें आम्ही उभयेतांनीं वर्तणूक करावी. तथाप वजीर आजी जबरद(स्त) दुसरा पातशाहा व तमाम रजपूत, जाट त्यांचें लगामीं. त्याची मीर-बक्षीचा पातशाहाचा या दिवसांत कलहे आहे. वजिरांचें मनोगत सलाबत जंगांसच आसावी यैसें असतां, स्वामींवरी ठेविलें आहे. त्यांचें पत्र मजला येईल तेंच करीन. परंतु दक्षणेहून किताका गृहस्तांचीं लिहिलीं येथें येतात कीं, मागती गाजदीखानांचा पुत्र उभा करावा. त्याजवरून बापूजी माहादेव, दक्षणेच्या लिहिल्यावरून, मागती गाजदीखानांच्या पुत्रांचें साहित्यें करूं लागले. गाजदीखानांच्या पुत्रांनीं गुलसनाबाद साहाणक वगैरे त्यांची रजावंदी कळेल तैसी करून दिल्ही. त्यांनीं दक्षेणची लिहिलियारून हा मागती उत्पात मांडिला. वजीर याजमुळें बापूसी गैररजावंद आणि वजिरांसी यांनी खांदें[2] बांधिला आहे. वजिरांची जंड रजपूत, जाट सुद्धां भारी. येखांदा डोहणा जाला तरी उत्तम नाहीं. याजकरितां आम्ही वजिरांचा लगाम राखिला. बापू मागती मीर बक्षीस सुभेदार करावयाची तजवीज करितात तें कांहीं आम्हांस कळों देत नाहीं. आमचे माणूस कोठे जाऊं देत नाहींत. आमचे घरीं कोणांस येऊं देत नाहींत. नवाब वजीर आजी पांच महिने रोजमरा फौजेस द्यावयास तयार. परंतु तेही गोष्टी होऊं देत नाहीं. आम्ही आग्रह करावा तरी याची जंड भारी. मानमानें तैसें येखादें तुफान घेऊन आमचे * * च बुडवितील याजकरितां आग्रह न करितां त्यांचेच मर्जीनें आसों. परंतु हें केवळ स्वामींची मर्जी न राखीत. वजिराची मर्जी न राखीत. वजीर हातचा गेला तरी मोठा बखेडा

---

१ माहिती. २ शत्रुत्व.

2242

होईल, याजकरितां वजिरांस मात्र येकांतीं आम्ही राजी राखिलें कीं, तुम्हांस इमारत श्रीमंतावरी. मी खासगी चाकर आहे. श्रीमंत तुम्हांस निराले नाहींत. तुम्हांस श्रीमंतांचा कागद बजिन्नस आणून देतों जें. सलाबतजंगांस वस्त्रें देणें, सनद देणें. आम्ही सर्वप्रकारें नवाबाचे आहों. माझीं मालुमातीची पत्रें आणून देतों, तोवंर साहेबीं सनद महकुफ करावी यैसें अंत्र राखून सेवेसी पूर्वीही येक जोडी रवाना केली व हाल्लीं जोडी रवाना केली असें. तरी येविशीं सविस्तर पत्र वजिरांस लिहिणें व बापू(स) ही लिहिणें. गाजदीखानांच्या पुत्रांस साफ न देणें म्हणून स्वामींचें आज्ञापत्र आम्हांस व बापूंस आले म्हणून आजी आम्ही राजश्री बापूंसही साफ जाब दिल्हा कीं, तुम्ही हें श्रीमंतांचें मर्जीखेरीज करितां हें कामाचें नाहीं व वजीरही राजी नाहीं. साराच डोहणा कोणांच्या बोलें करितां? हें कार्याचें नाहीं. याउपरी श्रीमंतांचें दुसरें उत्तर येतोंपरियेंत दोघांस महकुफ राहूं देणें परंतु गाजदीखानांच्या पुत्रांस सनद न देणें. तें ते नाइकेत म्हणून व्दाही दिल्ही, त्याजवरून परम श्रमी जाले व वजिरांस अर्जी लिहिली कीं, हजरत श्रीमंतांचें पत्र सत्वरच हजरतीस येते. त्याप्रमाणें हजरत ज्यांस देणार त्यांस देतील. पत्र खामखा सत्वरच येत. याप्रमाणें काम करून महिना सवा महिनीयाचे मुदतीनें काम पाडिलें. याजकरितां राजश्री बापूजी माहादेव आम्हांवरी फार श्रमी जाले. इतराजीही फार केली, ती पत्रीं लिहितां न ये. परंतु स्वामींची मर्जी सलाबतजंगांकडे; तेच वजिरांची मर्जी. यैसें असतां याचे जालहापूर व कोणांचे मुलूक कांहीं कोणांस नाहीं म्हणून देशींहून कितीकांनी यांस लिहिलें; त्याजवरून यांनी मागती लालुच पाहून या उत्पातांत पाडिलें म्हणून आम्हा यांची बेमर्जी आजी पांचा महिन्यांत केली कीं, खावंदाची मर्जी नाहीं. वजीर आजी बिघडतों. तमाम मुलुकांत डोहणा होईल म्हणून अमर्यादेनें विनंती केली. याची आज्ञा स्वामींनीं जें करणें असेल तें सविस्तर निवडून सेवकास करावी. काडीचा गुंता ठेऊन न ल्याहावें. नाहीं. जे मर्जी स्वामींची असेल त्याच प्रमाणें वर्तणूक करून. वजीर रजपूत येक, मीरबक्षी, खानखाना कमरदीचा पुत्र येक. यांत आपल्यांत आपण कलहे मोठा. बापूंस मोगलीयांकडे होणें. याजमुळें वजीर पहिल्यापासून हिंदुस्थानाचा बिघाड रजपुतांस घेऊन करणार. आम्ही चोरून वजिराचा दोर राखिला. उजागर तों बापूंची आज्ञा येक गोष्टी कोणांसी बोलावयास संमंध नाहीं. परंतु सरकारचें काम बुडतें. याजकरितां वजिरांची रजावंदी सर्वप्रकारें आजीतागाइत राखिली. कोठें फितूर होऊं न दिल्हा. आतांही स्वामींचें उत्तरें येईतोंपरियेंत बंदोबस्त राहील. पुढें जें होणार तें हो. आमचें पाघरूण थोर नाहीं. फोडून लिहितां येत नाहीं. दुसरें, वजिरांची रजावंदी न राखावी, त्यानें चाकरीस

बोलाविलें तरी न जावें, गाजदीखानांच्याच पुत्रांस दक्षेण व्हावी, यैसेंच असिलें तरी सेवकांस साफ ल्याहावें. आमचें कांहीं येथें ठेविलें नाहीं. आजीतागाइत फौज चाकरीस पातशाहांच्या, वजिरांच्या व तुराणियांच्या बापू जेथें जेथें पाठवीत असेत तेथें तेथें पाठवीतच आहों. खर्चास कोठें कांहीं आम्हांस तरी आलें नाहीं. वजिरांची आमची अंतस्तें वळख म्हणून वजीर मात्र जें बोलणें तें बोलत असतात. प्रस्तुत वजिरांचें मतें पातशाहांची व आपली चाकरी मात्र करावी, मीरबक्षींकडे न जावें. बापूंची मर्जी तूर्त वजिरांकडे येकंदर चाकरीस साफ न जावें. मीरबक्षींस दक्षेण व्हावी ही चीड मोठी वजिरांस. या पेंचांत आम्ही पडिलों आहों. परंतु स्वामींचें आज्ञापत्र यें तोंवरी वजीर राजी राखोन त्याची चाकरी करून, मीरबक्षींची दक्षेणेची सनद होऊं देणार नाहीं. परंतु वकील कांहीं आमची स्थित राहूं देणार नाहींत. स्वामींस देशांत बहुतांस गिल्ला आमचा फार लिहितील. आम्ही गरीब आमचा बच्याव कैसा होतो? राजश्री जयाजी शिंदे यांचें पत्र वजिरांस, वकिलांस आजीतागाइत कांहीं आलेंच नाहीं. हें काये कळत नाहीं. सारांश स्वामी थोर प्रिथ्वीची पाळण करितात. राजश्री मल्हारबा थोर सरदार सलाबतीचे आहेत. स्वामींनीं सर्व प्रकारें त्याचा गौर करून समाधान करून, उभयेतां सरदार यांची रवानगी सत्वर या प्रांतें करावी हें उत्तम आहे. या मुलुकांत लोकांनी व दिल्लींत मनमानेसारिखे तर्क केलें जें, याच्या घरांत फूट जाली. हें यैकोन सर्वांस हर्षच जाला. तर यैसें न करावें. सरदारांवरी कृपा करूनच त्यांची रवानगी करावयास स्वामी समर्थ. म्हणजे सर्वांचीं तोंडें काळीं होतील. आणि कोणींच लबाडी करणार नाहीं. स्वामींनीं तो कृपाच केली असेल. परंतु येथें थोरथोरच बोलतात, याजकरितां लिहिलें आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब या प्रांतें कदाचित आलेच तरी संवत्सर प्रतिपदेइतके येतील. परंतु श्रीमंत आले तरी सरदारांची रवानगी जरूर पाहिजे. स्वामी म्हणतील कीं, इतकी गोष्टीचें प्रयोजन वारंवार सरदारांचे लिहावयाचें काये? तर इतका विस्तार पत्रीं लिहिणार नाहीं. सेवेसी आलियाउपरी रुबरू विनंती करीन; त्या वेळेस स्वामींच्या चित्ताची निशा होईल. मुख्यें चित्तांत असलें तरी साफ वजिरांस पत्र आमचें मालुमांत घालून, सलाबतजंगाचें सनदेचे ल्याहावें. नाहीं, गाजदीखानांच्याच पुत्रास देणें असेल तरी तैसेंच लिहिणें व आम्हांस साफ ल्याहावें जें, राजश्री बापू माहादेव म्हणतील तेंच करणें. तुम्ही वजिरांचे चाकरीशीं व रजावंदीशीं प्रयोजन कायें? तरी तैसेंच साफ लिहिणें. त्याप्रमाणें आजी पांच माहिने वर्तणूक केली, त्याप्रमाणें मृगसालपावेतों याचेंच आज्ञेनें वर्तणूक करून सेवेसी येऊन. जर स्वामींची आज्ञा येईल कीं, बापूंच्याच विचारें वरकड वर्तणूक करणें परंतु वजिरांची चाकरी वजीर सांगेल त्याप्रमाणें

करणें, त्याची रजावंदी राखणें, बखेडा होऊं न देणें, तरी तैसेच वर्तणूक करून. ज्याजती फौजेचे शिबंदीचे रुपये मागेंच मेळऊन फेडिलें असते. आम्ही मेळवावें कोठून? आम्हांसी कोणांसी दर्शनासी संमंध नाहीं. जो कारभार करणें तो बापू करितात. चाकरी मात्र जें जें हे सांगतात तें करितों. वजिरांसी आम्ही आर्जी लिहिली कीं, श्रीमंताची मर्जी आहे कीं, सलाबतजंगास सनद आहे. तरी साहेबीं गाजदीखानांच्या पुत्रांस न देणें. येविशई श्रीमंतांचें पत्र साहेबांस आणून देतों. त्यानें पत्र येई तों महकूफ केलें यामुळें राजश्री बापूंनीं आम्हांवरी इतराजी फारच केली. देशीं फार फार गिल्ला लिहिला. आम्हांसहि इतका बखेडा करावयास प्रयोजन नव्हतें. परंतु स्वामींनीं आम्हांस लिहिलें आहे जें, सलाबतजंगाचें साहित्य करणें म्हणून इतका उत्पात केला आणि तूर्तच वजीर, रजपूत बखेडा करितील, डोहणा भारी होईल, याजकरितां केलें. पुढें आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करून. बापूंनीं, मीरबक्षीनीं व खानखानांनीं येक होऊन कांहीं पातशाहांसी करार केलें. त्याजमुळें रजपूत, वजीर, जाट येक जाले. वैर वाढलें. वजिरांस दगा करावा, तें वजिरांस कळलें; त्याजउपरी वजीर, बापूंसीं तों स्वामींच्या नांवाकरितां बोलत नाहीं परंतु त्यांसी वैर राखितों. बहुधा वजीर, मोगल बादशाहा इतकियांत येखादियासी दगाही आपल्या आपण कोणास करितील, गर्दी होईल, यैसेंहि दिसते. बापूंचे बखेडे मोठे. बरें जाले तरी बरें. नाहीं, दरोबस्त हिंदुस्तानचा डोहणाच होईल. श्रीमंत राजश्री दादासाहिबांस सत्वर राजश्री बापूंनीं बोलाविलें व पातशाहांचीहि चिठ्ठी पाठविली आहे; तो मनसबा कांहीं दुसरा नाहीं. तुराणियांकडे पातशाहांस करावें आणि श्रीमंतांस तिकडे करावें आणि वजिरांसी कलागत करावी, दंगा करावा. परंतु असाध्य काम. वजीर, जाट, रजपूत मिळोन थोडें तरी च्याळीस पंनास हजार फौज. मोंगलांपाशीं पांच हजार फौज नाहीं. याजकरिता श्रीमंत राजश्री दादासाहिबांस या बखेडियांत घालावें यैसें आमच्या चित्तापासून नाहीं. बरें, वकील काये करिता पाहावें त्यापेक्षां पातशाहा वजिरां-पासून खर्चास घेऊन, पठाणांवरी शह द्यावा हें उत्तम आहे; परंतु आपला कारभार वकील शेवटास जाऊं देणार नाहींत, श्रीमंतहि यैकणार नाहींत, नाहीं तर वजीर, श्रीमंत येक करून तमाम रजपूत, जाट यांची मामलत विल्हेस लाऊन देतों. असो. आम्हास ज्याप्रमाणें स्वामी आज्ञा करितील त्याप्रमाणें वर्तणूक करून. पुढें सालगुदस्तां सलाबतजंगासी जुंझोन लोक आपलें आपलें घरास आले; आम्हास हिंदुस्थानास छावणीस पाठविलें त्याजवरी छावणी करून पुढें दिल्लीची मसलत सांगितली. दिल्लींत दररोज स्वारास पीटास रुपया येक १ लागतो. यैशा मसलतीची चाकरी सांगितली तीही कबूल करून, पुढें कर्जदार होऊन काय

फळश्रुत होईल पाहावें. त्यास लोक आडसाले जाले. पुढें मृगासाल जालियाउपरी कांहीं कोणी राहणार नाहीं. त्यांत दिल्लीची चाकरी. दुसाला आमची मुलुकगिरी जाली. आतां मृगसाल घालऊन आम्हांस श्रावणमासीं सेवेसी येणेंयाची आज्ञाही लिहिली पाहिजे. स्वामी मोघमच लिहितील कीं, त्या प्रांतीं श्रीमंत राजश्री दादासाहेब येतील अथवा सरदार येतील तें आज्ञा करील त्याप्रमाणें वर्तणूक करणें, तरी यैसें * * * न ल्याहावें. दुसालां चाकरी करून छावणी करून वरीसभर दिली(ची) चाकरी करून मागती राहाणें होणार नाहीं. याजकरितां मृगसालपरियेंत राहून येऊं. याची आज्ञा ल्याहावी जरूर. दिल्लीस सरदारही न आले श्रीमंतही न आले, आम्ही ज्येष्ठ मासीं कूच करून स्वार जालों आणि नवाब वजीर यांणीं फारसा आग्रहच केला तरी येक स्वार व चिरंजीव तात्या व नारोपंत मुजुमदार यांसी ठेऊन, त्यांची उत्तम प्रकारें रजावंदी राखोन आम्ही येऊन; याचीही आज्ञा ल्याहावी. वजिरांची रजावंदीस्तव चिरंजीवास येक हजार स्वारानशी ठेवावें किंवा न ठेवावें? सरदार अथवा श्रीमंत दिल्लीस आलेच तरी आम्हांकडे गुंता नाहीं; परंतु कांहीं दिल्लीच येणार नाहींत, वजीर तर राहावयाचा आग्रह करील, याजकरितां हेंही निवडून ल्याहावें. या पत्राचा मजकूर सरदारांस न कळावा. आमची पातशाहाची मुलाजमत केली ते दिवशीं पातशाहांनीं साहेबनौबत, हत्ती, उंटें व चाकर सर्व सरंजामसुधां नौबत दिल्ही. आम्ही आग्रह केला परंतु त्यांनीं तूर्त दुमाही रोजमुराही त्यांस देऊन पाठविलें कीं, तुम्हांस पुढें पायाही (बी?) लाऊन देऊन; हें देणें राजश्री पंतप्रधान यांचेंच समजणें. त्याजवरून घेतलियाची विनंती पूर्वी सेवेसी लिहिली आहे. त्याची आज्ञा सरकारची करणें तें केली पाहिजे; त्याप्रमाणें वर्तणूक केली जाईल. तूर्त लोकांत * * * * होई ऐसें न करावें. वरकड सेवकावरी कृपाळू होऊन कागदपत्र यैसा लिहीत आसावा जें सेवकाची प्रतिष्ठा चौघांत वाढे. तेंही सर्व प्रताप स्वामींचा आहे. आम्ही घरचे लेक खानाजाद आहों. तूर्त बापूंची मर्जी फारच निकड आढळली कीं मीरबक्षींस दक्षेण देवावी आणि वजिरांची चाकरी फौजेनें न करावी व आतांच च्यार कलागती आणून पाडाव्या. श्रीमंत गुजराथेंत, सरदार देशीं आणि डोहणा माजवावा. म्हणून बापूंस विनंती केली कीं, तूर्त महिनाभर महकूफ करणें. श्रीमंतांचें दुसरें आज्ञापत्र येईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें. इमानें न करीत म्हणून स्वामींच्या पायांची आण घातली आणि वजिरांस आर्जी लिहिली कीं, हजरत श्रीमंतांचे हजरतला पत्र येईल त्यांस सनद द्यावी. त्याजवरून वजीर खुशी जाला, इतका मात्र आमचा अन्याये जाला; याजवरून आम्हांवरी आतां काये प्रयोग होतील ते पाहावें,

तूर्त दिल्लींत आतांच मनमान तैसें बखेडे जाले आहेत. वजिरांचे चाकरीस आतां हे जाऊं देत नाहींत; परंतु हें उत्तम नाहीं व आम्हांस कांहीं लाभही दिसत नाहीं. दीड हजार फौज नवी ठेविली त्याचा पैका तरी मिळवून परभारें फिटतें तरी बरें तेंही नाहीं. कोठें काये कोणास यांनीं केलें असेल न कळें. आम्हांस म्हणतात तुम्हा काये प्रयोजन आहे? आम्ही सांगू त्याप्रमाणें चाकरी करणें. श्रीमंत पैका देतील तेही मान्य करून पांच महिने वर्तलों व पुढेंही वर्त (वर्तेन) परंतु वजीर चाकरीस बोलावील तरी आम्ही जाऊं; त्यांची रजावंदी राखूं; हें बापूंच्या चित्तास येत नाहीं. हें दगा खावयाचें लक्षण आहे, याजकरितां वजीर बोलावितील तरी आम्ही जाऊन त्यांची चाकरी करून, त्यांची रजावंदी राखूं. याची मागती फिर्याद सेवेसी बापू लिहितील. त्यांत येखादें तुफानही घेऊन लिहितील, याजकरितां सेवेसी लिहिलें आहे. आमच्या खासगत कामकाजाचे जाबसाल आम्ही फार लिहिलें, त्याचें उत्तर येकही येत नाहीं. यांत आमचा जीव कोणें प्रकारें वांचतो? याकरितां सेवेसी आतां पुरवणी अलाहिदा लिहिली त्याची विनंती उदास न करितां, त्याचीं उत्तरें लिहिल्याप्रमाणें देऊन, सेवकाचा तरणोपाये होये तो करणार स्वामी समर्थ आहेत. फार लिहितों याचा विशाद न मानावा. दूर पथ, याजकरितां लिहिलें. स्वामींनीं लिहिलें कीं, नवाब वजीर दक्षेणची सुभेदारी आपल्या पुत्रांस द्यावी असें असेल तरी हें कार्याचें नाहीं. तरी हे गोष्टी सर्वथा नाहीं. मीरबक्षी मात्र पुत्रांस व्हावी हा अर्थ चित्तापासून होता; परंतु तोही स्वामींवरी दृष्ट देऊन न घेतला व दक्षेणची सनद चित्तापासून सलाबत-जंगांस द्यावी. तऱ्ही स्वामींचा उजुर केला कीं, राजश्री पंतप्रधान यांचे खत मजला तुम्ही जो कोणी आणून त्यांस देईन तेंही स्वामींवरी ठेविलें; तथाप गाजदी-खानांच्याच पुत्रांस बापूंनीं आग्रह करून देविली, स्वामींचीं उत्तरें लौकर निवडून वजिरांच्या नांवें न आलीं, आम्हांस न आलीं, तरी यानें वस्त्रें घेतलीं-याउपरी यांस आज्ञा जाली तरी फजीत करून मागती फिरऊं. जैशी आज्ञा येईल तैशी वर्तणूक करून. सविस्तर उतराची आज्ञा निवडून ल्याहावयास स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶Antaji Manakeshwar in his usual verbose style informs the Peshwa of the intrigues of the two rival factions at the court of Delhi. He says serious differences between himself and Bapuji Hingne have arisen as the latter favoured the claims of the son of Gaziuddin (Mirbakshi) contrary to the desire of the Vazir and the Peshwa's interests. He also touches on the reported defection of Malharji Holkar and urges a rapprochement so that the affairs in the North may not get out of hand.

No. 56] [April 1753

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. स्वामीच्या घरांतील खबर काडीनेंकाडी[1] वजिराच्या घरास पंधरा दिवसाची डाक (ब)सली आहे. स्वामीच्या सरकारांत नेहमी वर्षासनें चौघा-जणांचीं वजिराचीं आहेत ते खबर जे भोजन देखिल करितां ते देखिल सांगून पाठवितात. सदैव जालें वर्तमान येतें. आम्ही वजिराचे चाकरीमुळें राबता बहुत केला आहे त्याजमुळें सर्व वर्तमान आम्हांस सांगतात. वजिरानीं खबर सांगितले कीं सरदाराचा अपमान श्रीमंतानी केला. सलाबतजंगाच्या कामा-काजांत त्यास येऊं दिल्हें नाहीं. जे गांव व जे परगणें गाजदीखानानें दिल्हे होते त्याप्रमाणें सलाबतजंगापासून घेऊन सरदारास न दिल्हे. वकिलाचे जालहापूर परगणा वकिलासही न दिल्हा. याजमुळें सरदार आपले घरीं येऊन बैसले. श्रीमंत आर्काटाकडे गेले. दामाजी गायेकवाड व श्रीमंत राजश्री दादा-साहेब गुजराथेस गेले. आणखी घरातील वर्तमान काडीनेंकाडी विस्तार सांगितला. देशींहून ही किताकाची लिहिलीं किताका प्रकारें आलीं. त्यांत मजकूर नाना प्रकारें आहे. फार पत्रीं फोडून लिहितां येत नाहीं. आमचें पाघुरूण लांहाण आहे. जें वजिराचें बोलणें आहे त्याचा अर्थ धरून सेवेसी लिहितों. स्वामी खावंद आहेत. सरदार आपण वाढविले, त्याप्रमाणें त्यानी कामेंही मोठीं मोठीं केलीं. पुढें त्याची उमेद उत्तम प्रकारें राहिली तरी आणखी थोर कामें करितील. नाहीं तर श्रेमी[2] चाकर दुशमन बराबर; कामांत अंतर पडेल. आपण समर्थ आहे. गावखेडियाची विशये काये? स्वामीच्या भाग्याचे बिभागी आहेत. वरकड सेवक या प्रसंगी जितके दिवस राहील तितके दिवस येथून सरकार-कामाची फिकीर न करणें. वजिराच्या खबरी राजश्री मल्हारजी होलकर याची घरची पुरुशोपंत दर आठवडा लिहितो व राजश्री आपांचे[3] घरची रामराऊ लिहितो. विषेषे आमचे लोकास आखेर सालीं दोन वर्षें होतात पुढें लोक कांहीं राहाणार नाहीं. सरदार कांहीं वैशाख जेष्टांत या प्रांतीं येतां दिसत नाहीं. पातशहा व वजीर कांहीं निरोप खुशीनें देणार नाहींत. जेव्हां फौज व येक सरदार चाकरीस येथें ठेवावा तेव्हां चांगला समाधानें निरोप देतील. याजकरितां तेथून कोणी सरदार फौज येथें ठेवणें असेल त्यांस अगोदर पाठवणें. केवल दोन वर्षें जालीं.

---

१ इत्थंभूत, बारीकसारीक. २ असंतुष्ट. ३ जयापा.

याउपरी मागती आम्हांसच राहा म्हणतील, लोक राहणार नाहीं. याची आज्ञा निवडून साफ लिहिणें जरूर जरूर. कोणी फौज येंदा पाठवावयाची नसली तरी आपली मर्जी असेल की पातशहा वजीर यांची रजावदी राखणेच तरी पुत्रांस दोन हजार फौज जथोन ठेऊन त्याची रजावदी राखोन आम्हांस जरूर येणेंच आहे. हें कलम निवडून जैसें असल तैसें साफ निवडून ल्याहावें. या पत्राचीं उत्तरें वैशाखमासीं आम्हांजवळ पावतील तेव्हां आवकाश कोणता राहिला? याजकरिता दुसरी फौज येथें चाकरीस पाठवावी आथवा दोन हजार फौज पुत्र ठेऊन रजावदी राखून येणें अथवा झाडून येणें यैसी तीन गोष्टींतून येक निश्चय निवडून लिहिला पाहिजे. संधयुक्त न ल्याहावें. तथाप सरदार इंदुरास उजनीस छावणीस आले तऱ्ही आम्हापासून येका महिनियानीची वाटेवरी आहेत, कांहीं या प्रांतास येणार नाहींत. येथें वैशाख जेष्टांत येते तरी सर्व त्यासच पुसतों. याजकरितां हा मजकूर सविस्तर निवडून ल्याहावावें. फौजेचे नेमणुकेची सनद लिहिल्याप्रमाणें पाठऊन द्यावी. दिलीची लाहोरची मोहीम; त्या फौजेचे नेमणूकेची खलखल व्हावी यैसा अर्थ नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter from the Peshwa's agent at Delhi giving details of the movements and doings of Vazir Safdar Jang.*

No. 57] [*About March 1753*

करून घ्यावी. सलाबतजंगाचा मामा येथे वकील आहे. त्यानेही रात्रदिवस पेगम केले जे, पंनास लाख निदान पंच्याहत्तर लक्ष रुपये घ्यावे; परंतु दक्षणेची सुभेदारी सलाबतजंगास द्यावी. जाट व माधोसिंग व बखतसिंग राठोड यांचे पुत्र यानी बहुत पेगाम केला कीं आगरे अजमेर दोनी सुभे द्यावे. येसें शत्रूनी येक महिना रात्रदिवस पातशाहास अर्ज करीत गेले. परंतु रा। सरदारांनी पातहाशासी करार केला जे हुजूरचाकरीस दाहा हजार फौज पाठवितो. त्यापैकीं आमची रवानगी पांच हजार फौजेनिसी केली. पांच हजार फौज समयास दिलीत येऊन दाखल जालियावरी पातशाहास बहुत आनंद जाला व मऱ्हाठेयांवरी इतबार बहुत बसला * * * ठी व रा। बापूजी माहादेव यानी विचार करून तमाम तुराणी यांचा जोडतोड करून पंचवीस हजार फौज जमा केली व जेथवरी आम्हास फौज मिळाली तेथवरी आम्ही ठेवीत गेलो. येकूण तीस पस्तीसहजार फौज जमा करून पातशाहाच्या दोनी दरवाजियास बैसलो. आणि पातशाहाची कृपा संपादून येवढे कार्य करून घेतले व पातशाहाची ममता इमादनमुल्क याजवरी बहुत पहिलियापासून होती म्हणून सर्व गोष्टी होऊन स्वामीच्या पुण्यप्रतापें घडोन आल्या. पुढें आठां चौ रोजानी दक्षणचे सुभेदारीचा परवाना व वस्त्रें याच

निजामनमुलुकास करून घेतो. आगरे अजमेर दोनी सुभे स्वामीकडे आहेत त्याप्रमाणे करार आहेत. सलाबतजंगाच्या वकिलाची रदबदली आजीतागाईत वजिराचे मारफातीसच होती. त्यास आजी वजिराचे रुबुरु सलाबतजंगाचे वकिलांस पातशाहानी साफ जाबसाल दिल्हा जे दक्षणेची सुभेदारी निजामनमुलुकयांस दिल्ही व त्याचा येख्तार राजश्री पंतप्रधान यांकडे आहे; ते दक्षणेचा बंदोबस्त करितील. सलाबतजंग यानी येक भागानगरचा सुभा खाऊन निजामनमुलुक यांची चाकरी करावी. पाचा सुभ्यात दखलगिरी करावयास प्रयोजन नाहीं. नवाब गाजदीखान यानी आम्हास नजरेचा पैका द्यावयास केला आहे तो व बालाजीराऊ यास द्यावयास केला आहे तो निजामनमुलुक देतील. दक्षणेची सुभेदारी निजामनमुलुकाची आहे व येख्तार बालाजीराऊ यांचा आहे याप्रमाणे साफ जाब सलाबतजंग याचे वकिलास पातशाहानी दिल्हा. याउपरी सलाबतजंगाचें पारपत्य स्वामीनी उतम प्रकारें करावें. आजी दिलींत वजीर मोठाच आहे. परंतु स्वामीचा नक्ष मोठा जाला तो आनंद पत्रीं कोठवर ल्याहावा? जें काम आजी पनास हजार फौज दिलींत असोन व्हावें तें काम येवढेच फौजेने स्वामीच्या कृपेकरून होऊन आलें. कदाचित स्वामी म्हणतील कीं पनास हजार फौजेचें काम होतें तें पाच हजार फौजेने कैसें जालें? तरी रा। बापूजी माहादेव यानी आमचा व दुराणी याचा जोड घालून दिल्हा म्हणोन कार्य होऊन आलें व ह्या कार्यांत रा। बापूजी माहादेव यांनीं बहुत श्रम करून स्वामीकार्य केलें. आजी पंधरा रोज जाले वजिरानी पातशाहासीं सख्त रदबदली * * * (पुढील कागद गहाळ)* * *

¶*News-letter from Delhi—of which unfortunately both the beginning and the end are missing—referring to the intrigues at the court of Delhi. The writer Antaji Manakeshwar says it was his presence with a strong force that saved the day for the Marathas. The Emperor agreed to assign Ajmer and Agra to the Marathas. The Nizam is to administer the Deccan Subas with the advice and under the supervision of the Peshwa.*

No. 58] *[June 1753*

श्रीशंकर

सेवेसी विज्ञापना. स्वामीनी तिकडील वर्तमान लिहिले ते सविस्तर कळले. श्रीरंगपटणचे बेवीस लाख करून उलटलो म्हणोन लिहिले. ऐसियासी पूर्वी तीर्थरूप कैलासवासी राव गेले तेव्हां येकवीस लाख देत असता न घेतले. आधिक आशेमुळे गोष्ट साध्य न जाहाली. तसाच विचार सालमजकूरचाहि होता. स्वामीचे जाणे फाल्गून मासी जाहाले. त्याजवर मोर्चे लाऊन घेऊन म्हट-

2250

त्यास आवघड. आम्ही व आणीक फौज असली तरी गैर हंगाम आवघडच. स्वामीनी मनसुबा उतम केला. पायंडा पडला. पुढे दरसाल थोडे बहुत तरी करार करील. मातबर फौज गेल्यास जाजतीहि देईल. बहुधा स्वामीनी दर सालेचेहि करार केलेच असेल. नासिले केले तरी तो पुण्यात विल्हे लाऊन घेईल. स्वामीच्या प्रतापापुढे कार्य कोणतेहि नासत नाहीं. हिकडील मजकूर तर दिलीत वीसपंचवीस लाख रुपये पातशाहा तूर्त व पुढें थोडे बहुत देत असता आम्ही न घेतले. राणाजीच्या धाकट्या भावाचा नाथजीचा पक्ष केला असता तरी मनसुबा सिध्ध जाहाल्यावरी पंधरा देस होता, तथापि तिकडे घराऊ पेच याजमुले रुपये टाकिले व पातशाहाची मर्जीहि मोडिली. असो; आम्हास स्वामीचे आज्ञेपेक्षा कोणता मजकूर? पुढे थोडासा मनसुबा जिवट हिकडेच दिसतो. भुजनगरच्या- पासून थोडीबहुत * * दाहापाच ठहरतील तेव्हडे घेऊन त्यास बराबरी घेऊन सुभे ठठा व मुलतानलगते आहेत तेथे परगण्यापरगण्यापासून जे मिलेल ते घेऊन यावे. रुपये मिलणे न मिलणे हे स्वामीचे आदृष्ट; परंतु हिकडे आल्यासारिखा श्रम करावा, मर्दुमी करावी. होणे कांहीं चाकराच्या हाती नाहीं. दुसरे सुरतचेहि राजकारण उतम आहे. होईल तेव्हा खरे. असो; तूर्त आम्ही छावणी करितो. पोटास नाहीं. पुढील रुपयाचे आशेवरी करितो. * * * * * कडील हिकडे रुपये वारले तरी बराता करू. घरास आलो तरी समजावीस नालबंदी यास ऐवज स्वामीस द्यावाच लागेल. गुजरातच्या रसदा म्हणाव्या, आठरा लाख रुपयाचे छतीस देखील व्याज जाहाले. व गैर ठाणे व गैर रवानगी वगैर आम्ही गुदस्तापासून पाचसात खर्चिले. येकूण आणिक येक वर्ष भिटावयास समग्र पाहिजे. येवंच ऐवज तिकडेच स्वामीस द्यावा लागेल तो हिकडे थोडक्यावरी वारेल असा हिशेब; तथापि हिकडे मेहनत करून रुपये मिलाले तरी बराता कशास करू? जसे बनेल तसे करू; परंतु येकदा लांबवर जावेसे मनात आहे व सुरतचाहि कारभार होत आहे, याअर्थे छावणी करितो. मल्हारबा जयापा याणीहि तिकडे येणे म्हणोन आमचे भिडेने कागद लिहिले; परंतु तिकडे जात नाहीं. बिरमगावापासून वीसपंचवीस कोसी छावणी करितो. मुलूख काठेवाडासारिखा कोठे नाहीं. उज्याड आहे. हा मोठा दोष. हे विनंती+.

¶*Raghunathrao congratulates the Peshwa on his successful expedition in the South and on exacting tribute from the Raja of Seringapatam, and gives an account of his activities in the North.*

+ पत्र रघुनाथरावाचें नानासाहेबास. बहुधा स. १७५३ च्या पावसाळ्यांतलें असावें. जयापाचा मृत्यु १७५५ च्या जुलै महिन्यांत झाला.

No. 59] [1754

श्री

शेवेसी विज्ञापना. चिठी पाठविली त्यात आज्ञा की राजश्री नारोपंताकडील तोफा व दिवाण हर गोविंद याजकडील तोफा येका जागा करून जागा योजून प्राथःकाली येक प्रहर मार द्यावा व साईकाली येक प्रहर मार द्यावा आणि जाटास निसनाबुद करावे म्हणून लिहिले व राजश्री आपाकडून उजेनीच्या तोफा आणवितो व मुजफरखान गारदी बमये तोफखाना व . मालवियातून आणिख तोफा आणून छयावणी करून जाटाचा निसनाबुद करावा म्हणून आज्ञा. त्याजवरून सांडणीस्वार इंदुरास रवाना करावयासी तयार केले आहेत; तर थोर तोफा कितेक आणाव्या? च्यार तोफा बारा बारा सेरा गोलयाच्या व पाच तोफा दाहा दाहा सेराच्या व गरनाला दोन व च्यार सेरी पाच सेरी दाहा बारा आहेत त्यातून ज्या तोफा आणावयाच्या आज्ञा होईल त्याप्रमाणे मुजरत सांडणीस्वार पाठऊन तोफखाना आज्ञेप्रमाणे आणवितो. वशडियाच्या तोफा फते(सिं)ग व माणिकराव याजला पाठऊन दोन्ही तोफा आणविल्या आहेत. तरतूद करून निसनाबुद जाटास करावे उतमच आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. प्रतिउतर आले म्हणिजे सांडणीस्वार रवाना होईल हे विज्ञापना+.

¶*Gangadhar Yeshwant, Holkar's Diwan, seeks orders regarding pieces of artillery to be brought over from Indore for bombarding the Jat stronghold. Can this refer to the siege of Kumbher in 1754?*

No. 60] [17-7-1754

नकल

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री कृष्णरावजी स्वामीचे सो

पो पुरुशोतम माहादेव सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा आषाढ वदी १२ मुकाम इंद्रप्रस्थ येथास्थित जाणून स्वकीये कुशल लेखण करीत असिले पाहिजे विशेष. बहुत दिवस जालेत, स्वामीकडील पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. पूर्वी दोन जोड्या विठोजी वगैरे जासूद आले होते ते कांहीं येक दिवस सैन्यात ठेऊन कुंभेरचे मुकामीहून हुंडीपत्रासहित स्वामीकडे राा केले ते पावले असतील, परंतु पावलियाचे उतर न आले. चांदवडचे कागदापत्राचे काम सिध होऊन हस्तगत जालेच आसेल. इंद्रप्रस्थास आलियावर पातशाही फर्मान करून घतलेत तेथीलहि पत्र लिहिल्याप्राा करून घेतलीच असतील. इकडील वर्तमान तर कुंभेरीस सुरजमल जाठ त्याने पातशाहासी विरुध करून तमाम शहर लुटले.

+ पत्र गंगाधर यशवंताचें.

त्याजवरून पातशाहानी जाटाचे पारपत्यास वारंवार पत्रे येजमानास लिहिलीत की पत्रदर्शनी स्वार होऊन जाटवाडियासी येणे. आम्हीहि तोफखानियासुधा येतो. जाट खारीज[1] करून पुढे पातशाहीचा बंदोबस्त करणे त्याजवरून येजमान मजल दरमजल चाललेत. जयेनगरास येऊन तेथील फैसला[2] करून जाटवाडियासी येऊन मुख्य जाट कुंभेरीस होता तेथे मोर्चेबंदी करून बसले. पातशाहानी कराराप्रा तोफखानियासुधा यात्रे तो न आले. जाट व आपन येक जालेत. पूर्वी खंडेराव बाबा व तात्या पुढे इंद्रप्रस्थास गेले होते तेव्हांच पातशाहची मरजी पूर्ववत प्रा न देखिली. गाजुदीखानाचा पुत्र येऊन भेटला. वचनाप्रा आले होते. त्याप्रा गाजुदीखानाचा पुत्र आपले फौजेनसी येऊन येजमानास शामील जाला हेहि पातशाहास दु:सह जाले. त्यावरून पातशाह व खानखाना वजीर गाजुदीखानाचे पुत्रासी आकस करून गेले. तेव्हां येजमानही त्यासी वचनप्रा केले की तुम्ही काही चिंता न करणे. तुम्ही आम्हाकडे आलेत म्हणोन खानखाना तुमची आकस करितो तरी चिंता काये आहे? जाटाचे पारपत्य जालियावर जाऊन तुम्हास वजिरी देवऊ असे प्रमाण केले. हे वर्तमान पातशाह व खानखाना ऐकून खानखानाने पातशाहास तोफखाना व फौजसुधा बाहीर काहडले. जाटाचे साहित्यास्तव येजमानास शह दिल्हा. येमुना उतरून सिकंदरा चालीस कोस आहे तेथे येऊन राहिले. तेव्हां येजमानहि जरूर जाणोन जाटाचा फैसला तीस लाखावर केला आनि तेथून कूच करून सडे आपले फौजेनसी वृंदावनी येमुना उतरोन पातशहास खबर न देता रातोरात धावले. श्रीमंत दादासाहेब व जायापा सिंदे हे आपले फौजेनसी (मथुरेस राहिले). येजमानानी आपले फौजेनसी पातशाहसी गाठ घातली. रात्रीचा समय. पातशाह व वजीर हे उभयेता सडे पळोन गेले. पातशाही बेगमा मलकाजमानी वगैरे साडेतीनसे बायेका धरल्या. लशकर तमाम लुटले. पातशाह किलियात दाखल जालेत. दुसरे दिवशी येजमान पटपटगंजापासी मुकाम करून फौज व तात्यास येमुना उतरून शहरात पाठविले. कबिलेहि पाठविले. शहरातून किलियासी जाऊन अहमदशाह कैद करून आजुजिदीन नामे शाहजादा होता त्यास तख्तावर बसविले. आलमगीर नाव ठेविले. गाजुदिखानाचे पुत्रास वजीरी देविली. बक्षिगिरी खानदौराचे पुत्रास देविली. मागून श्रीमंत व आपाहि आलेत. साडेब्यायंशी लक्ष रुपये वजिरानी यांसी करार केले आहेत. त्यासाठी तात्या शहरात गेलेत. लौकरीच निर्गम होईल. जयाजी सिंदे मारवाडात रामसिंगास राज्य द्यावयासी गेलेत. श्रीमंत व सुभेदार इंद्रप्रस्थी आहेत. येथील बंदोबस्त

१ हद्दपार. २ निकाल.

जालियानंतर जाटाचे पारपत्य येथास्थित करावे हा उद्योग आहे. नवाब मनसूर-आलीखान आपले फौजेनसी गोमतीचे तीरी पापडघाटापासी छयावनी केली आहे. येजमानाचा त्याचा स्नेहच आहे. त्यासहि इंद्रप्रस्थास आणून त्यासी वजिरासी ऐक्यंता करून पातशाहीचा बंदोबस्त करावा ऐसा विचार आहे. जयापाचें मनात विशम फारसे येऊन श्वतंत्र मोहीम करून राठोडासी लढाईस गेले. होईल प्रसंग तो कलेल. बहुतेक कललाच आहे. पातशाहावर येजमान गेले तेव्हां सर्वास हटकिले की तुम्ही चला अगर तुम्ही आपली फौज बराबर देणे. त्यानी गरूरी[१] मनी अणून फौज न पाठविली. येक राऊत दोहीं लशकरचा न आला. मग येजमान सडे फौजेनसी सांता प्रहरांत पोहचून फते केली. श्रीने येश दिधले. निमित्य की दुसरा कोन्ही शामील नव्हता. हे फते जालियावर सर्व हात चोलीत राहिले. पहिले फौज न द्यावयासी कारण हेच की पातशाही तोफखाना भारी व वीस हजार मोगली फौज; आपली पुरी पडनार नाही. जरी हे येकलेच गेले तरी काये करितील? फजीत होऊन येतील म्हणजे हलके जाले; यात हितच आहे. हा कुभाव क्षुल्कानी मणी आनून न गेले. श्री जींने निराले यांसच येश दिधले. निमित्य की विशम कोनाचेही मनात येत नाही. प्रस्तुत लौकिकात कोव्यावधीचा लुटीमुले भ्रम जाला. पाहता मऱ्हाष्ट लशकर ज्याचे हाती लूट आली तो घेऊन गेला. पाहता याजकडे हातीं चालीस पंचेचालीस आले ते श्रीमंताचे नजर केले. त्यापैकी दाहाबारा यासी दिधले. बाकी सरकारात ठेविले. वरकड लूट दिसता पदार्थ कितेक रथ उंट घोडी आली ये जातीचे वर्तमान आहे. तेथून द्रव्याचा निर्वाह करून घेऊन पुढे आवकाश तो देशास यावयाचा नाहीं. कदाचित श्रीमंत दादासाहेब आले तरी येतील. येजमान तरी शंभरावाव्याने येत नाहीत. बलात्कार जाला तरी न कले. त्यास स्वामीनी सनदपत्राचे काम करून घेऊन लिहिले पाहिजे (ती) येजमान संतोष पावत * * * * * * * *

¶*This important news-letter from Purushottam Mahadeo reports that Raghunathrao, being ordered by the Emperor to punish the rebellious Jat Surajmal, invested his stronghold of Kumbher. Evil counsels prevailing, the Emperor changed his mind and prepared to join Surajmal in destroying his southern allies. Getting wind of the treachery, Holkar swooped down upon Sikandra, surprised the Imperial army and encircled the Padshah. One Azizud-din was seated on the Imperial musnud and Gazi-ud-din's son, a steadfast ally, was appointed Vazir on the condition of paying the Marathas 82 lakhs of rupees. The writer at the end refers to the differences between Holkar and Sindia who undertook the Marwad campaign and left Delhi on his new enterprise.*

---

१ मगरुरी, गर्व.

No. 61] [पो 20-8-1754 ?

पो छ १ जिल्काद

श्री

राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. आपलीं पत्रें शनवारीं संध्याकाळीचीं दोन प्रथक प्रथक जोड्या पाठविल्या, त्या रविवारीं संध्याकाळीं येकामागें येक यैशा पावल्या. त्या उभयेतांस इनाम देविल्या. प्रा दर रुा ४ प्रमाणें आठ दो जोडीस दिल्हें. स्वामीस कळावें. राजश्री जनार्दनपंत शनवारीं प्रात:काळच्या प्रहर दिवसास येऊन सामील जालें. चाकरीच्या कामास कांहीं यांचा गुंता नाहीं. माहागाई भारी, रस्त कोठून येत नाहीं. याकरितां त्यांच्या पोटाची बेगमी जरूर जरूर करून पाठवावी. त्याप्रमाणें राजश्री मुरारपंत त्रिंबकपंत चाकरीस हजर आहेत. त्यांची चाकरी रोहिल्यांचें लढाईत चांगली जाली. त्यांसहि पोटास पाठवावें. जैतसिंग गुजर आम्हाजवळ काली दाखल जाले. तूर्त यास लाऊन ठेविलें आहे. दुखवतां येत नाहीं. रोहिल्याचें पारपत्य जाल्यावरी मग यासी मामलतीची गोष्टी बोलावयाचीं ते बोलूं. त्यांत स्वामीची मर्जी असेल तेच आज्ञा करावी. राजश्री विठल आपदेव आम्हापासून कालीं साहा कोसावरी होते; त्यांस पत्र पाठविलें होतें. त्यांचें उत्तर त्यांणीं पाठविलें कीं आम्ही दुसरिया कामास जातों. त्यास आजी राजश्री तात्याचें पत्र त्यांस आलें तें पाठविलें आहें. आतां उदेक सोमवारीं पावतील. सशये नाहीं. फौज तरी बरीच जमा जाली आहे. मेरटेंत नजीबखानाचा चुलता व चुलतभाऊ बकशी यैसें जमा तीन हजारच तूर्त आहेत. पांचसे तों पहिलें विल्हेस लढाईत लागलेंच आहेत. लढाई मोठी जाली. लोक त्याचे फार मारिलें. आम्हाकडील घोडीं पडली. लोक जखमी व ठार फार. असो. साहेबकाम जालें. पहिली लढाई व हत्ती घेतलियाची खबर पहिलीच लिहिली. आजी तागाईत पत्रें साहा पाठविलीं तीं पावलीं कैसी नाहींत हें न कळे. सांडणिस्वार येक स्वामीकडील येक राजश्री तात्याकडील आले तेच दिवशीं त्यांस दुरोजा बेगमी च्यार रुपये उभयेतांस देऊन पत्रें देऊन रवाना केले. परंतु दोन दिवस हापडामध्येंच[१] होते. अनंदराऊ मायाजींची चिठी आली होती. ते सुखरूप पावले असतील. रोहिल्याची प्रास (प्राज्ञा) बाहेर निघोन आम्हावरी यावयाची नाहीं. तोफा चिखलाच्या निराळ्या पावणार नाहींत. आम्हीच

१ हापड हें मेरटेजवळ एक स्थळ, मीरटच्या दक्षिणेस २५ मैल.

तजविजीनें त्यांस काढावयाची तजवीज करितों. निघाले तरी उत्तम न निघालें तरी मग हला करून मारितों. परंतु शहर लुटलें जाईल तें पुन्हा वसणार नाहीं म्हणून तीन रोज धरून मात्र बसलों आहों. शंभर वांटें त्यांस काढून गंगापार लावावयाची तजवीज करितों. न जालें तरी हला करून मारावें प्राप्त जालेंच आहे. यास कुमक गंगापारीहून मिरापुरास हजार बाराशें आले आहेत, त्याचे बातमीस डांक बसविली आहे. पांच सात कोशीं आलियाउपरी त्याजवरी फौज पाठऊन मारितों. यांची, व येतात त्यांची, स्वामींनीं चिंता न करावी. आहों इतकेंच पुरें. आमचे मारिलेले रोहिले आहेत, चिंता नाहीं. परंतु दिल्लीकडील मात्र फौजेची बातमी आम्हाकडें नाहीं. स्वामींनीं दिल्लीकडील बातमी राखावी. आम्हीहि माणसें पाठवितों. परंतु आम्हास दोन कामें आहेत; मेरटेंतील व गंगापारचे येणार ते फौज, यैशी आहेत. याजकरितां दिल्लीकडील बातमी राखोन त्यांकडील मुकाबलियास असावें. हापडामध्यें अनंदराऊ मायाजी यांस ठेविल आहे त्यास तगीर न करावें. कारकून सरकारचे पाठवावें. यैवज सरकारांत घ्यावा परंतु बाम्हणास धंदा सांगितला त्याचा दूर मात्र न करावा. हें कासीद सोमवारीं संध्याकाळीं स्वामीपाशीं पावलें तरी इनाम द्यावे. येथून रविवारीं येक प्रहर रात्र गेलियाउपरी रवाना केले आहेत. रूपरामाकडील कागदपत्र सारें होते ते झाडून आम्ही दीननाथपंत कारकून आमचा रूपरामाकडे आहे त्याजकडे पाठविलें आहेत. ते रूपरामास देतील. परंतु तिसा लाखांची मामलत कुंभेरीवरी जाली ती टीप रूपरामाची कबुलात सरकारांत असेल ती रूपराम मागतो ती आम्हाजवळ नाहीं. सरकारांत असेल ती द्यावी अथवा रूपरामाची खातरजमा करावी. येक पत्र मालुमातीचें[1] दत्ताजी शिंदे यांस दाहा हाजारांचे रूपरामास द्यावें कीं जैनगरचें खर्चाचे रुपये अंताजीपंतीं तुमचे सरकारांत दिल्हे. रूपराम म्हणतो ते रुपये माझे; तुमचा रूपरामाचा करार असेल तरी देणें. अंताजीपंताकडें गुंता काये? आला ऐवज सरकारांत जमा धरिला. यांजकडे गुंता नाहीं. तुम्हासी वचन असेल तेणेंप्रमाणें करावे यैसें पत्र जरूर द्यावें, म्हणजे आमचे रुपये रूपराम देईल. राजश्री जनार्दनपंत आम्हावरी रुसतात तरी दोन माहाल त्यांकडें जफ्तीस सारंगपूरचे देऊन संनद आमच्या लाखोटियांत घालून पाठवावी. अनमान न करावा, काहीं जात नाहीं. फौजेस यैवज कोठून देणार? रोजमुरां जनार्दनपंत मुरारपंत त्रिंबकपंत यांचा जरूर पाठवावा. रूपरामास आमच्या कारकुनाची निरवणूक करावी. तूर्त जलाली बीलरामचें

१ माहितीचें.

रुपये जाठानीं घेतलें. त्यांत चौथाई माहाल मजकूर देऊन यैवज तीन हिसे घ्यावा. पुढें समजावें. तूर्त सारा पैका बुडवावासा नाहीं. आम्ही पत्रें फार पाठविलीं तीं न पावलीं हें काय ? हे विज्ञापना.+

¶*The expedition against the Rohillas referred to in this document needs to be cleared up. The writer Antaji Manakeshwar writes to Sakharam Bapu about the situation at Delhi.*

No. 62] [*May 1755*

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री जायापाचे मर्जीचे वर्तमान वरचेवरी सेवेसी लिहीत गेलो. प्रस्तुत स्वामी रूपनगरी आटकोन राहिले सबब आम्हास पत्र मारनिलेनी लिहिले आहे, तेच बजिनस सेवेसी पाठविले आहे. सारांश, अगोधर आमचा शह पडिला. आतां स्वामीचा शह पडिला; यामुळें फारच वाईट मानिलें आहे. त्याचे काम होणे जाणे ईश्वराधीन आहे; परंतु ते याप्रकारे लिहितात. आम्ही वारंवार किती स्वामीस ल्याहावें ? गोसाव्याचा सालजाब वाटेने येता केला असता तरी कामास येता. तेथें राहावयाचें काम काय होतें ? रामराव आपणाजवळ आले ते स्वामीची भीड राखून बोलतात. जायापाहि साफ लिहीत नाहींत. स्वामी धणी. त्याणी, इकडे न यावें, तिकडेच जावें, असे कसे ल्याहावें बोलावे ? चाकर लोकास अमर्यादा होते. यांजकरितां आम्हास लिहिलें. आम्ही सालजाब आज तीन मास खेळविले. परिणाम नाहीसा देखिला. कोठे मुक्काम न करिता शह तोडून आलों यैसे आहे. अद्यापहि जे धण्याच्या चित्तास मानेल ते करावें. आम्ही काय ल्याहावें ? कासीद मुदतीने रवाना केला. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The whole letter is in Sakharam Bapu's hand. He writes to Raghoba about the attitude of Jayappa Sindia and others.*

No. 63] [*1754*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादा
साहेब स्वामीचे सेवेशी

विज्ञाप्ति ऐसीजे गाजुदीखान वजीर याचे मानस कीं पातशाहा दुसरा करावा व पैकाहीं समयानुसार देऊं. बंदोबस्त सर्व स्वामीचा आसावा. त्यास हे स्वामीचे आगमनाचा मार्ग लक्षितात. श्रुत होये. कृपा केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Dadasaheb is informed that Ghaziuddin solicits his help to place another Emperor on the Delhi musnud.*

+ अंताजी माणकेश्वराचें पत्र सखाराम बापूस—रघुनाथरावाची स्वारी कुंभेरवर झाली त्यानंतरचें.

No. 64] [1754 ?

श्रीसांबदुर्गा

सेवेसी विज्ञापना यैसीजें. आज्ञापत्र सादर जालें. तेथें आज्ञा कीं संध्या काळीं कारकून बोलाविला असतां दीडप्रहर रात्रपांवेतों न आला, म्हणोन शब्द लाऊन लिहिलें तें कळलें. त्यासी कारकून बोलावयास कोणी आले नसतां शब्द लाऊन लिहिलें हे अपूर्व * * * * सिंगा-कडील मामलत उर * * * मैन आज्ञा त्यासी त्याचा प्र * * * * * नाहीं जें केलें असलें तें उत्त(म) * * * * * खावंद आहेत. * * * * * * यावयास सरकारच्या तोफां व राजश्री मल्हारजी होळकर यांजकडील तोफा होतील तेव्हां तुम्ही आपली फौज पाठवणें, म्हणोन आज्ञा. त्यासी तोफां आलियानंतरी फौजेची रवानगी करितों; परंतु सिंदे होळकर वगैरे याजकडील मातबर फौज गेलिया कार्य होईल. यावरी मर्जी. राजश्री गंगाधर येशवंत व तुम्ही जाऊन गुजराची तहशील करणें, म्हणोन आज्ञा. यैसियास गंगाधरपंता-कडोन निरोप आल्यानंतरी कारकून पाठऊन देऊं. ऊष्णाचे उपद्रवाकरितां माझें जाणें होणार नाहीं. सविस्तर अर्थ राजश्री कृष्णाजी गोपाळ विनंती करतील. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*This letter though fragmentary gives some information regarding Sindia and Holkar. The writer and the date are both unknown.*

No. 65] [June 1754

श्री

सेवेसी विनंती. राजश्री बगाजीपंत याजकडील पत्र पाठविलें ते पावलें. त्याजवरून सर्व वर्तमान कलले. तीर्थरूप राजश्री नाना स्वामीचें पुण्य समर्थ. येणेकडून असें दिसतें (कीं) पूर्वी तीर्थरूप कैलासवासी नाना याणी महमदशाह पातशाहा तख्तीं बसविला. त्याप्रमाणेंच हेहि शाहजाद्यास आपले हाते राजीं बसऊन आपला स्थापित असा करोन येतील. सेवेसी श्रुत होये. बगाजी-पंताचा कागद माघारा पाठविला आहे हे विज्ञापना.

¶*The letter refers to the revolutionary changes at Delhi when Ghazi-ud-din dethroned Ahmedshah and had another puppet Aziz-ud-din seated on the imperial musnud.*

The following extract from the Peshwa's Diary bearing on this event will be read with interest.

[25-6-1754

छ ३ रमजान खमसखमसैन

सिलिकबंद जमा. "१६२। कमावीस नजर. दिलीस नवा पातशाह बसविला म्हणोन राजश्री दादाची पत्रे आली. सबब लोकानी नजरा केल्या त्या जमा"

नजर करणारांत बळवंतराव गणपत, बाबा सरनाईक, रामाजी मल्हार चिटणीस, मल्हारपंत नि॥ मजमदार, बगाजीपंत पारसनीस, हरि बलाल कारकून नि॥ फडणीस, हैदरखान, निराजी त्रिंबक, महिपतराव पोतनीस, वासुदेव नाईक दि॥ पोतदार, गोविंदराव चिटणीस, हरि विठ्ठल, गोपाळराव गोविंद वगैरे लोक आहेत.

No. 66] [*1754*

श्रीमोरया.

शेवेसी विज्ञापना. चिठी पाठविली, तेथ आज्ञा कीं राजश्री दामोदर माहादेव यांची चिठी आली कीं कामाकाजाचा निर्गम निकड जालियाखेरीज होत नाहीं. त्यास राजश्री गंगोबास पाठवून द्यावें. निकड जालियाविना कामाकाजाचा निकाल कैसा होतो ? याजकरितां राजश्री गंगाधरपंतास गांवात आजी लौकर पाठवावे; म्हणून आज्ञा. त्यास नवाब वजीर व अकबत महमुदखान यांजकडून चिठ्या आल्या कीं "आम्ही ज्यासीं बोलावयाचे त्यांसी आजी बोलतो. आपणाकडील पैकियाचे ताकिदीस आजी न पाठवावें. ते आलियानें आमचें बोलणें तैसेंच राहतें. उदईक राजश्री गंगाधरपंतास व सेटिबास पाठवावें," यैसें त्याचें लिहिलें आलें. याजकरितां आजी गावांत पाठवावयाचें महकूफ केलें. उदईक पाठऊं. याहीवर जैसी आपली आज्ञा तैसी वर्तणूक करूं. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter refers to some financial transaction with the Vazir.*

No. 67] [*January 1755*

(मु)क्कामीहून आली ती छ ९ रबिलाखरी पावली. वर्तमान कलले. पत्रीं आज्ञा, मारवाडचे काम सत्वर उरकोन चिरंजीव राजश्री दादाकडे सत्वर जाणे, काशी प्रयाग, ग्वालेरचा बंदोबस्त ठीक करून घेणे म्हणून विस्तारे आज्ञा केली.

यैसियास येथील वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिले आहे. प्रस्तुत नागोरे जोधपूर येथील दाणाघास(?) मोर्चे लाविले. रसद बंद केली. जोधपुरास सुरंग बहुत नजीक गेलें आहेत. खावंदाचे प्रतापे करून येथील कार्याची निर्गमता थोडके दिवसांत करून आज्ञेप्रमाणे श्रीमंत राजश्री दादासाहेबाकडे जातो. राणाजी-कडील रुपया सत्वर वसुलात आणून कर्जदारास पावे ते करणे म्हणून आज्ञा. यैसियास राणाजीकडील रुपयाचा तपशील पूर्वी सेवेसी लिहिले आहे व श्रीमंत राजश्री दादासाहेबानीं तपशीलवार लिहिले असल त्यावरून विदित होईल. सेवेशी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*The writer, probably Jayapa Sindia, replies he will join Dadasaheb after the investment of Nagore.*

No. 68] [*30-4-1755?*

पौ छ १९ शाबान

श्री

तीर्थरूप राजश्री नाना व तथा राजश्री भाऊ स्वामीचे
सेवेसी

आपत्यें रघुनाथानें चरणावरीं मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागाईत छ १७ रजबपावेतों वडिलांचे आसीर्वादे कसबे पोहरी तालुका नरवर येथें येथास्तित असे. विशेष. किला ग्वालेर हस्तगत करावयास्तव दरकूच या प्रांती मुकाम मजकुरास आलों. किला खाली करून द्यावायाचा पेगाम गोहजवाला जाट बलजू वगैरे याचा आहे. करार ठहरला नाही. करारमदार ठरोन किला खाली करोन देतील. त्यास किला साध्य जालियावरी सविस्तर सेवेसी लेहून पाठवीन. येते वेळे जितके खेचीचे काम होईल तितके करून येत असो. थोडे बहुत जाहले आहे. बाकी राहील तेहि स्वामीचे प्रतापे होईल. बहुत काय लिहिणे? कृपा केली पाहिजे विज्ञापना.

¶*Refers to the capitulation of the fort of Gwalior.*

No. 69] [*Beginning of 1755*

हकीकत हिंदुस्तान वगैरे दिलीपासून चालीस कोस फुजीलखान व अफजलखान वगैरे पठान जमियेत दाहा हजार स्वार राखितो. सारभुम नरमाईल जाणून त्याने सोखी आरंभली. यास्तव सारभुमाने दूरवर विचार न करिता टोपीवाले वगैरे पानिपत करनालचे वाटेने पाठविले. त्यास पठान गालब जाला. त्याने फौज

लुटून घेतली. घोडी वगैरे मालियेत नेली. हाती डेरे दांडें नेले. लोक मारले फार गेले. काही येक जीव घेऊन पळाले. याजवरून सारभुमास बहुत चटपट लागली. त्रिवर्ग येकविचार करून बाहेर निघाले. सारभुम शालमारीबागावर जाऊन उतरले. खानदौराचा लेक पुड सात कोस पानिपत करनालचे वाटेवर. त्यापुड गाजुदीखानाची फौज थानेस्वराअलाकड नौ कोस. त्यास पुड सारभुमाने जलदी करून जावे तर साजसरंजाम व खर्च व जमियेत कळतच आहे. काही भूपतीची सेना नारनोळ परगन्यास आली होती. तेथे माधोसिंगाचे लोकाही लुटून घेतले. काही पळाले. आता तमाम लोकास ताकीदपत्रे पाठविली आहेत की जलद येऊन पोहोचने. भूपती पुड जायासही वसवास करीत आहेत की थोडे जमियेतीनसी बाहेर निघालिया मुदयाच्या काबत आल्या उपाये नाही. पुड भगवंतइछा प्रमाण. सरकारच्या फौजा तेथे होत्या या दबावाकरता कोन्ही डोई काडीत नव्हते. आता सीक वाहगुरुवाले वगैरे मवास खवले आहे. श्रीमंत राजश्री दादास व मल्हारजीसही पत्रें पाचारावयास आली असतील. श्रीमंत दादा व मल्हारजी शाहापुरापासून तेरा कोस आहेत. रजपुत लाबेवाला त्याच्या गडीस माहासरा केला होता तो रुजू जाला.

जयापाच्या चौकिया नागोरेभवत्या बदस्तुर गोसावी रदबदलेत पडला आहे. नागोऱ्यातील येक तले पान्याचे आटले. येक आहे. गावातून लोक निघून जात आहेत. शहर नागोऱ्यात निरख. आफू वीसा रुपई सेर आहे. मीठ रुपयाचे दीड सेर ८८१॥ धान्य रुपयाचे ८१३ तेरा सेर आहे. लाकूड तर नदारद. कोन्ही आफू चोरून गावात जात होता त्यास धरून उंटावर बसऊन शहर बाहर केले. ज्यालोरचा किला हातास आला असता मागती त्याच्या लोकानी घेतला येसे वर्तमान आहे. किल्यात येते रात्री चिठिया नागोरच्या आल्या त्यात लिहिले आहे की पनासा लाखाची बोली आज जाली आहे. साकल्य मागून होईल ते लिहून.

नागपूरचे वर्तमान कृष्णाजी गोविंद व केसो आपा वगैरे व आपाची धोंडाजी कुल मंडली. राजश्री जानोजीपासी गेली. सर्वाही जानोजीचे आज्ञेत आसावे. जमिलबेगखानाचे लेकाचा नायेब बाळापुरी आहे तो बागी होऊन खोजे शरीफ यासी भांडत आहे. सबब की माहालातील पैसा वसूल नाही. हुजिरीहून तनखा जाल्या आहेत. सिबंदी पाचसे स्वार व हजार प्यादा आहे. लोकानी बतंग केले तेव्हा बाळापूरचे नायेबास लिहिले की खर्चास पाठवणे. त्याने साफ उतर लिहिले की परगन्यात अमल नाही. आम्हापासून रसद घेतली आहे ते देणे

---

१ खर्चून गेले ?

आणि पुढे तुम्ही आपला नायेब पाठऊन देणे. पैसा इतक्यावर आपनापासी नाही. साफ उतर केले होते. यामुळे धनी व नौकर भांडत आहेत. मोंगलाईचे अमलाची बदवकरी[१] वराडात जाली आहे.

गुजरातेपलाकड खमाच (?) आहे. तेथे नुरुदीमहमदखान मोमीनखानाचा लेक भांडायास सिध जाला आहे. शंकराजी माहादेऊ सरकारचे तरफेने सेना घेऊन नाना प्रकारची उपाध करीत आहित, भोताले पुरे होते ते जाळले. फैसला जाला नाही. विशष वर्तमान सरकारात आले असल ते खरे.

नवाब सलाबतजंग सिन्याहून पुडे कोस अठावीस गेले. गदवालवाल्यावर च्यार लाख रुो मोकरर जाले होते त्यापैकी यैक्ज आला तो फिरंगी घेऊन बसले आहेत. यामुळे कारभारी स्रमी. राजश्री माहादाजीपंत फौजेसुदा बिदनूर प्रांते गेले. मोंगलाच व त्याचा पनासा कोसाचा तफावत आहे. बिदनूर व श्रीरंगपटण येथील वकील आले आहेत. जाबसाल लागला आहे फैसल जाले नाही.

¶*News-letter giving news about the potentates of India in 1755. (i) The Emperor is having much difficulty with the rebels in the province of Panipat ; (ii) The siege of Nagore is being pressed with vigour ; (iii) Janoji Bhonsle has been recognised as the rightful successor to Raghuji by the Nagpur Sardars.*

No. 70+] [*4-9-1755*

भाद्रपद वद्य दशमीस

पत्रे आलीं मारनिलेकडून

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
मुकासीबावा व राजश्री बाजीपंतबावा
व गणेशपंत दिवाणजी स्वामीचे सेवेसी

पोष्य अतांजी माणकेश्वर सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तो श्रावण वद्य १३ त्रयोदसी मुकाम नजीक कोच यमुनातीर जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी सविस्तर लिहावें. आम्हाकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री दादासाहेबांनीं राजश्री गोपाळराव गणेश यांस कुराजाहानाबादेचा मामला अंतरवेदीतील राजश्री गोविंद बलाल यांकडे होता तो दूर करून सनदा देऊन आमचे हातीं दिल्हे जे यांचा अमल बसऊन देणे. त्यावरून आम्ही दरकूच काल्पीस गेलो. राजश्री

---

१ अप्रतिष्ठा. + पु. २—ले.५२ मध्यें ह्याच मजकुराचें पत्र आलें आहे.

हरीपंतबावांची भेटी जाली. अंतरवेदीतून राजश्री गोविंद बलाल आले. त्यास गोविंद-पंत मामला सोडीत नाहींत. दरबारास जाऊन फडच्या करून यैसें बोलिले. आम्ही पार जावें इतकियांत राजश्री दताजी सिंदे यांची पत्रें मारवाडांतून आलीं जे राजश्री जयाजी सिंदे यांस दगा जाला तरी तुम्ही पत्रदर्शनी स्वार होऊन दाहा हजार फौजेनिसीं येणे मग पत्र वाचणे, यैसी लागोलाग च्यार पांच पत्रें आलीं. त्यास वरकड कामें टाकावी सारिखी जालीं. येक मारवाड सर जाले तरी तमाम हिंदुस्थानांत बंद होईल. साहेबकाम भारी जाणून अंतरवेदीत न जातां दरकूच मारवाडांत चालिलो. आम्ही देशीहून आलों ते समई पांच हजार फौज होती. जाजती विठल सिवदेव नारो शंकर वगैरे याकडील अडीच हजार फौज नवी ठेविली. येकूण साडे सात हजार व जाजती भदावरकर शेवढेकर व राजे गोपालसिंग व जाट वगैरे अडीच हजार फौज ठेऊन दाहा हजारानिसी बारा बारा कोसांच्या मजली करून मारवाडांत चालिलों. श्रीमंताचे पुण्येकरून ईश्वर उतमच करील. आपणांस कळावें म्हणऊन लिहिलें असे. राजश्री हरिपंतबावा कालपीस सुखरूप आहे. वरकड दरबारचे वर्तमान सविस्तर लिहावें. राजश्री विठल सिवदेव येथून कंबर बांधोन आले आहेत. आपण घडीघडीची बातमी राखावी. चिरंजीव आपा व बाबूराऊ तुम्हाकडे येतील. त्यास सालाबादप्रमाणें सेतसनदा व कोकणची दस्तकें व वेठे बिगारी गवत कापावयाचे वगैरे जे सालाबाद प्रो असेल ते दप्तरी रुजू पाहून कागदपत्र सनदा वराता साल मजकुरी लिहून घेऊन मुलांचे हवाला करणे. राजश्री मल्हाररावबावा रास्ते यांस पत्र पाठविले आहे ते त्यांस द्यावें. आमचे तीन महाल इटावे फुफुद शुकोबा(रा)बाद अंतरवेदींत जागिरीचे आहेत तेथील मक्ता श्रीमंत राजश्री दादासाहेबांनी करून मामला गोविंद बलाल यांकडे आमचे तर्फेनें दिल्हा असतां राजश्री नारो शंकर श्रीमंतापासी रदबदली करीत आहेत. जाजती चढ लावितात म्हणून ऐकिलें. त्यास आम्ही जागीर मुफत मेळविली नाही. कष्ट मेहनत करून मेळविली आहे. यैसें असतां नारोपंती चढ जाजती करावा हे उतम नाही. नारोपंतास रु॥ बहुत जाले तरी दानधर्म करावा अथवा श्रीमंतास नजर द्यावी. येविसी श्रीमंतास विनंती करून नारोपंतास निक्षून ताकीद करवावी. फिरोन आमच्या मामलियाचे नांव हे सरदारी बाग तुमचा आहे; वाळला तरी नुकसान तुमची; कल्याण असिले तरी तुमचे. दुशमन फार आहेत. सावध राहून थोरले यजमान भाशेस गोवणे हे विनंती.

¶*Antaji Mankeshwar writes that he is proceeding post-haste towards Nagore to relieve Dattaji Sindia who is hard pressed by the Rajputs.*

2263

No. 71] [पौ 4-10-1755

पौ छ २७ जिल्हेज

श्री

सेवेसी विज्ञाप्ति. गोविंद तमाजी याजवर राजे माधोसिंग यानी काये तुफान ठेऊन त्याचे घरी चौकी ठेविली. बेअबरुनवर गोष्ट आली. तेव्हा त्यानी विषप्रलयेकरून मृत्य पावले म्हणोन वर्तमान आले आहे. स्वामीस विदित व्हावे याजकरिता लिहिले असे हे विज्ञाप्ति.

¶*News is reported to the Peshwa regarding Govind Tamaji who put an end to his life by taking poison owing to the fact that guards were placed over him by Madhosing.*

No. 72] [9-10-1755 ?

छ २१ सफर

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी अंनत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान स्वामीचे कृपावलोकनेकडून ताा छ २ मोहरम मुाा नागोर येथास्थित आसे विशेष. छ २१ जिल्कादचे व छ २४ जिल्कादचे आज्ञापत्र सादर जाहले ते छ २९ जिल्हेजी पावोन लेखनार्थ कलला. येथील सविस्तर वृत राजश्री दताजी सिंदे व राजश्री जनकोजी सिंदे याचे पत्री सेवेसी लिहिले आहे त्यावरून विदित होईल. स्वामीनी जैनगरकराकडून तीन लाख रुपये देविले होते, त्यापैकी येक पैसा आला नाही. राजश्री दामोदर माहादेव याजकडून रोहिल्याबाा येवज देविला तोहि आला नाहीं. दिलीस माणसें मागती पाठविली आहे, उतर येईल त्याप्रमाणे सेवेसी लिहून पाठऊ. जाटाकडील येवज दोन लाखपैकी बारा हजार बाकी राहिले वरकड येवज आला. राणाजीकडील वसूल * * त येणे आहे याजकरिता उदेपूरची वकिली राजश्री विष्णुपंताकडे जाहाली. तरी तेथील वसुलाची हरतजवीज होऊन वसूल होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Ramaji Anant reports progress in the work of realizing money.*

No. 73] [20-10-1755

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ताा आस्विन शुध १९ पावेतो स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान्

यथास्थित असें विशेष. इकडील वर्तमान दोन तीन पत्रें पाठविली त्याजवरून विदित जाहालेंच आहे. राजश्री गोपालराऊ गणेश यांजला कुरा व कडा येथील सनद स्वामीनी देविली. त्यास मीहि येथे येऊन त्याजला राजी केलें. इकडे चहूकडे गडबड, फौज तैनातीस नाही; याजकरितां नवी फौज ठेऊन बंदोबस्त केला. दरमजलीनी सेवेसी येतों. हिसेब आज्ञेप्रा सर्व घेऊन येतों. पा भूगाव परगणा नवाब वजीर यानी नवाब अहमदखान पठाण फरुकाबादवाले यांजला जाहागीर दिल्ही. हे वर्तमान आम्हास कलले. भूगाव परगणा इटावे फफुंद सकुराबाद याजला लागला आहे. तेथे पठाण येऊन बसलियास तिनी परगण्यासी नित्य कजिया करितील. आमचा दस्त राहो देणार नाही. याजकरिता दिलीस वजिरासी पैगाम करून परगणा इजारा करून घेतला आणि वजिराची सनद नवाब अहमदखान याची तगिरी करून सनद घेऊन परगणा दस्त केला आहे. सनद आणून आपणाजवल ठेविली. सर्व परगणियाचा हिसेब घेऊन सेवेसी येतो. वर्तमान विदित करीन. हजार हुनरीने जागा घेतली. सर्व स्वामीची जागा आहे. हे वर्तमान सेवेसी येऊन विदित करीन. श्रीमंत राजश्री दादा स्वामीनी सनद पाठविलीच आहे परंतु स्वामीस वर्तमान विदित व्हावे याजकरिता लिहिले आहे. वरकड सावंत चिरजीव बाबूराव यास लिहिले आहे ते सावंत विदित करितील. जयेनगरी माधोसिंग यानी मामलेदार जिवे मारिले आणि दिलीस वकील पाठऊन पातशाहा वजीर याजला विनंती केली की, आपण मराठे याचा खून केला. तुम्ही बाहेर निघावे. आम्ही सामील होतो. त्यास वजिराने सांगितले कीं, आपणावर सिबंदीचा पैसा चढला आहे. पोटास नाही. त्याजवर माधोसिंग वगैरे यानी सांगितले की, तुम्ही बाहेर निघा आम्ही खर्च चालऊ. जाट, माधोसिंग, वजीर, रोहिलें च्यारी आसामी येक जाहाले. पुढे तोंफखाना व पातशाहा बाहेर निघणार. उपद्रव दिसतों. स्वामीनी या प्रांते मातबर सरदार मातबर फौज पाठविलिया बंदोबस्त राहील. दिलीत गडबड आहे. बाहेर निघणार. या प्रांते फौज नाही. मारवाड प्रांते राजश्री दताजी सिंदे आहेत, त्याजवर जावें, त्याजला तेथून उधळून लावावें आणि तमाम मुल्क दस्त करावा; हा मनसबा आहे. वरचेवर दिलीची लिहिली स्वामीस येतच असतील. आइकिले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. वरचेवर जे होईल तें लिहीत जाईन. मी सेवक, मजला आज्ञा जाहाली ते मी करीन. परंतु दिलीस जामिनी गुंतली. स्वामीच काढून देतील. भूगाव परगण्याची सनद आणिली, तेव्हा पेसगी[१] तूर्त पंनास हजार रुा दिलीत दिल्हे आहेत. सेवेसी सावं (त) तेथे आलि-

१ आगाऊ दिलेली खर्ची.

यावर विदित करीन. वरकड सावंत चिरंजीव बाबूराव यासी लिहिले आहे. ते विदित करितील. या पत्रामागोमागे मीहि येतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Govind Ballal describes to the Peshwa the efforts that the writer took in helping Gopalrao Ganesh to settle in his province and how he managed to establish his influence in the districts bordering on those occupied by Ahmadkhan Pathan. He further relates how Madhosing tried to subvert the Maratha influence in Delhi by promising succour to the Emperor and by persuading him to come out.*

No. 74] [*About 20th October 1755*

(पहिला बंद गहाळ)

(आश्वि) न सुध पंचमीस जाल्या. खासा अनरुधसिंगानी दोशा राऊतानसी आम्हाकडे यावे याप्रमाणे करारमदार केला. तो त्यास खबर बिजेसिंगाकडील लोक व बखतवारमल दिवाण बिकानेरकर याची खबर कल्ली की दोन तीन हजार फौजनसी मदतीस आज उद्या येतात. त्यावरून दुसरे दिवसी विघाडाची गोष्ट सांगितली. छ ९ मोहरमी त्यानी रामगडीहून कूंच केलें आहे. आमचे रोखे येतात. त्याजबराबर शाहापूरवाला उमेदसिंग याचे लोक व बाहादुरसिंग रुपनगरवाला याचे लोक व करोलीकर गोपालसिंग याचे लोक व उमेदसिंग बुंदीवाला याचा भाऊ दीपसिंग बराबर आहेत. यासिवाये त्याची घरची फौज बराबर आहे म्हणोन बातमी आली आहे. आसपास आमचे लोक आहेत. येका दो रोजानी याची त्याची झटपट होणार आहे. ईश्वरकृपेने त्याचें पारपत्य होईल. ते बहुतच संनिध आले, तरी स्वामीचे प्रतापेंकरून शत्रूचे पारपत्य येथायुक्त केलें जाईल. त्याची चिंता आहे ऐसे नाही. स्वामीचे आसीर्वादेकरून त्याचा आमचा मुकाबला जाल्यानंतर फत्तेच होऊन येईल. याउपर जे वर्तमान होईल ते वरचेवर सेवेसी विनंतीपत्रें पाठवीत जाऊ. आम्ही तर आपले तर्फेच त्यासी सामदामदंडभेद करावयास चुकलो नाही. ते होऊन गर्व धरून आम्हावर येतात. त्याची चिंता नाहीं. स्वामीचे तेजप्रतापेकरून उतमप्रकारे पारपत्य होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Marwad Campaign, 1755.*

No. 75] [*October 1761*

श्रीमोरया

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री सखारामपंतबापू स्वामी पोष्य गंगाधर येशवंत साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन

करीत आसिले पाहिजे विशेष. साप्रत आपणाकडून पत्र येवोन परामर्ष होत नाही. तरी सदैव पत्रीं संतोषावाप्ति करावी. इकडील वर्तमान तर आम्ही दिली प्रांतातून जाट, नजीबखान वगैरे ज्यांचे त्यापरी सौख्य राखोन दरमजल विजयादशमीस इंदुरी आलों. येथें श्रीने घात केला यामुले च्यार रोज येजमानास आवरोध जाला. तदनंतर माल्वे प्रांती बंदोबस्तास फौज पागा वगैरे रवाना करून आपल्या श्रीमंतांच्या लिहिल्याप्रमाणें स्वार होऊन यावें या उदेशांत होतो. हे वर्तमान माधोसिंगास कललियानंतर राजसिंग घोडचढा वगैरे मालवे प्रांती रवाना केले आणि नेणवियावर निकट केली. इकडील विलग टाकून श्रीमंतांचे आज्ञाप्रमाणे तिकडेच यावे, तर तिकडे बखेडा, इकडेहि बखेडाच; टाकून येता न ये. इकडे स्वार होऊन आलो. मासपक्षांत कछवियाचे पारपत्य होऊन बंदोबस्त होऊन येईल. राजे-रजवाडे हरामखोरी धरितात, त्यांचे पारपत्य करून सत्वरी आपल्याकडे येतात. राजश्री सुभेदारास श्रीमंतांचे पायाखेरीज दुसरे लक्ष कदापि नाही. स्वामीसेवेखेरीज आर्थ जाणत नाहीं. दुसरे, आपण म्हणतील, दक्षेणेत धण्यावरी काम पडले, हाजीर नाहित; याकारितां मनांत वाटेल. त्यासी, जरी राजश्री सुबेदार नर्मदेपार जाहाले म्हणिजे नजबिखान व सुज्यातदौला वगैरे सर्व हिंदुस्थान येक जाहाले. नर्मदेपावेतो दक्षणचे मोगल ते हे येकच जाहाले म्हणिजे फार जड पडेल. याकारितां शह हिंदुस्थानांत दिल्हा. हें खरे जाणौन मनसबा येथार्थच आहे यैसे जाणौन दुरंदेसीने[1] विवेक आसो द्यावा. आपण सूज्ञ आहेत. श्रुत होये हे विनंती.

¶*Gangadhar Yeshvant writes to Sakharam Bapu that the disturbances created by the Rajputs make Holkar's presence in the North essential to Maratha prestige in consequence of which his march to the south has to be postponed.*

No. 76] [*6-11-1755*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जनकोजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचे वर्तमान तागाईत छ १ सफर मो नागोर स्वामीचे आसीर्वादे येथास्थित असे विशेष. येथील

---

१ दुरंदेशी—दूरदृष्टी.

वर्तमान व जोतपुराकडील व जालोराकडील व कछव्याचे फौजेचे अनरुधसिंग दिडवाण्यामध्ये येऊन दाखल जाल्याचे सविस्तर पुरवणी पत्री तपसीलवार सेवेसी विनंती लिहिली आसे त्यावरून विदित होईल. सारांश स्वामीचे तेजप्रतापे सर्वहि रांगडे पादाक्रांत होतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Jankoji Sindia writes from Nagore to the Bhausaheb.*

No. 77] *[November 1755*

श्री

सेवेसी विज्ञापना. अनरुद्धसिंग खंगोरांत यानी रामगडीहून कूच करून दीडवाणियास आल्याचे वर्तमान पूर्वी सेवेसी विनंतीपत्र लेहून पाठविले ते प्रविष्ट जाले असेल. ते समई तपशीलवार वर्तमान आले नव्हतें म्हणोन मोघमच सेवेसी विनंती लिहिली होती. मागाहून तपसीलवार वर्तमान आले त्यावरून सेवेसी लिहिले असे. अनरुद्धसिंग रामगडीस असतां त्याजपाशीं जमाव सेखावंत कुली सरदार व राजावंत कुली व नरोके कुली व कुभावणी व नाथावत खंगोरात व चव्हाण वगैरे रजपूत माधोसिंगाकडील जमाव होता त्यास सामील उमेदसिंग शहापूरवाल्याचे लोक व बहादरसिंग रुपनगरवाल्याचे लोक व गोपालसिंग करोलीकर यांचे लोक व हाडे बुंदीकर यांचा बंधु व गौडसोपारकर हे येऊन सामील जाले. मागून बखतवरमल दिवाण बिकानेरकर व बिजेसिंगाकडील लोक असे जमावासुद्धा रामगडी असतांच सामील जाले. जमाव भारी म्हणोन गर्वारुढ होऊन कूच केले. यास्तव त्याचा मनोदये कीं दरकूच नागोरास जाऊन बिजेसिंगास सामील होऊन लढाई करून आम्हास नागोरी * * * द्यावा हा विचार करून कूच केले. त्याच दिवशी आम्हाकडील लोकानीं त्यांचे चंडोली शी(गाठ) घातली. तेथें आम्हाकडील लोकांची कामेकाजे उत्तम प्रकारे जाली. त्याचे फौजेतील रजपूत सातशे-आठशे ठार जागाच केले. त्यासिवाय जखमी केले. हजार बारासे घोडे घेतले. चालीस पन्नास उंटे घेतली. तोफा २ दोन व गंजिफा गाड्या दोन रहकेले चार दारु व गोल्याच्या वगैरे लढाईच्या सामानाच्या गाड्या दोन ऐशा लुटून कछव्याकडील मुरदे देखील काढूं दिल्हे नाहीं.

चंडोलाचा मोड करून माघारे हाटविले. त्या लडाईत आम्हाकडील लोक जखमी व मयत बितपशील.

जखमी	मयत
१ मर्तुजाभाई तरवारेची जखम	१ कासिबा फालके वलद संताजी फालके पाडलीकर
१ कुसाजी जवार यास मांडीस गोली	१ उदाजी घारगे याजकडील भला माणूस दिंमत नरसिंगराव सिंदे
१ नाईकजी जाधवजी गोली गुडघ्यास	२
४० किा असामी गोली तरवारचे	२९ घोडी ठार
४३	
४९ घोडी जखमी	

येणेंप्रमाणें जखमी व मैत जाले. जुंज चार घटिका * * परियेंत होत होते. आम्हाकडील लोकानीं मोठी श * * * * कछव्याचा रेच मोडून थंडे केले. उपरांतिक अनरुद्धसिंग यानीं मध्यें बुनगे घालून * * यासी फौज व तोफखाना व प्यादे (ठे)ऊन दररोज दोन कोस आडीच कोस दरकूच दीड * * * ण्याचे सुमारे येऊं लागला. आमचे लोक असपास रात्रदिवस राहतच होते. नित्यानी त्याची तटे व उंटे बैल संध पाहून अणीतच होते. तेव्हां निदान जाणोन अनरुद्धसिंग जीव वाचवावयास छ १४ मोहरमी दीडवाण्यास येऊन पावला ते दिवशीं आम्हाकडील लोकांनीं मार्गातील विहिरी बुजवून जागाजागची तली रोखून उभे राहिले. लोकानीं बहुतच निकड करून कछव्याचे रजपूत तीनसे चारशे मारले. सेंभर सवासे घोडे घेतले. तीन तोफा सांडविल्या. प्रातकालपासून दोन प्रहर रात्रपर्यंत तीन कोस चालला. मार्गामध्यें पाण्यावाचून त्याचे लष्करचे रजपूत व माणसे व घोडी उंटे बैले वगैरे बहुत मृत्यु पावले. तेणेकरून बहुतच सिकिंदा जाला. कछव्याच्या लोकांची दीडवाण्याहून पुढें यावयाची हिंमत न जाली. बिजेसिंगाकडील लोक दौलतपूरचे व दीडवाणें मिलोन चारपांच हजार सामील जाले तरी कूच करावयाची हिंमत न जाली. या जुंजांत लोक जखमी व मयत.

जखमी	मयत
१ राणोजी भोई ये * * * माडीस तीटरी * * * टून निघाली हा * * * वाचले असे	१ निबाजी सिंदे नांदूरकर
	१५ घोडी ठार
	१६

2269

१ राणोजी जाबूलकर मानेच्या
 सुताटीजवळ गोळी जखम भारी
२१ किा असामी तरवारचे व
 गोळयाचे जखमी
२३
३९ घोडी जखमी.

येणेंप्रमाणें दुसरें जुजांत जखमी व मयेत जाले. लोकांनीं दोनी जुजांमध्यें शर्त केली. कामेकाजे उत्तम प्रकारे जाली. दीडवण्याच्या असपास आमच्या लोकांच्या चौक्या रात्रदिवस उभ्या राहून त्याची रसद व कहीं मना केली. बिकानेरची रसद कछव्याच्या लष्करांत जात होती. त्याची बातमी आपल्या लोकांनीं राखून दौलतपुरासंनिध गांठ घालून रसद लुटली. सेंभर सवासे माणूस मारले. वरकड माणसे दौलतपुरियांस पलोन गेली. त्यामुळें रसद त्यांचे लष्करांत जाऊं पावत नाहीं. याजकरितां महर्गता विशष जाली आहे. तीन चारशेर धाण्य जाले असे. वैरणीचा तोटा बहुत आहे. दीडवाण शहर चांगले म्हणोन त्यास सामान पुरविले. त्यामुले आजपर्येंत त्याचे मुक्काम दीडवाणीयांतच आहेत. नाही तरी मार्गेच लुटला असतां. अनरुद्धसिंगानीं विचार केला कीं आपले जाणे (नागोरे) होत नाहीं. नागोरास (जावे तरी) जाऊं देत नाहीं. त्यानीं फौजेचे बल पाहिले तो ती बल न धरी आण आम्ही आपल्या तोफखान्याची व लोक जमा करून त्याजवर जावयाची सिद्धता केली. हे वर्तमान येकोन स्वामीचे तेजप्रतापेकरून भयाभीत होऊन लाच्यार जाणोन सलुखाचा संदर्भ लावून राजश्री नरसिंगराव सिंदे व खानाजी जाधवराव व राणोजी भोईटे व रामराव निलकंठ याची भेटी आस्विन वद्य ११ एकादशीस दोनसे राऊतानें अनरुद्धसिंग येऊन भेट घेतली. परस्परे बोलणीचालणी बहुतच जाली. ठेराव जाला नाहीं. येथें येऊन करारमदार करावा येैसा त्यानीं करार केला असे. परस्परे शफतपूर्वक जाली असे. तो नागोरवाल्याचीही रदबदली करीत असे. येथें चौपांचा रोजांत येणार आहे म्हणोन पत्रे आम्हाकडील सरदाराची आली असत. अनरुद्धसिंग येथें येऊन जो ठराव होऊन निछयामध्यें येईल ते सेवेसी तपशीलवार विनंती लेहून पाठवूं. अनरुद्धसिंग खंगारोत याणी बिजेसिंगास पत्र लेहून नागोरास पाठविले होते. ते व बख्तवरमल दिवाण दिंमत राजा गजसिंग बिकानेरकर याचे पत्र येैसी चौकीवर सांपडली होती ते सेवेसी पाठविली आहेत. त्याजवरून त्याचे कसकसे हाल जाले व त्याची फौज किती आहे ते साद्यांत विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The movements of the various Rajput sardars and an action in which they were worsted are reported to the Peshwa.*

2270

श्री

फेरिस्त माहालानिहाय प्रांत हिंदुस्थान सुा सीत खमसैन मया व अलफ

१ प्रांत बुंदेलखंड निा गोविंद बल्लाळ
१ प्रा भोवरासे निा मेघशाम बापूजी
१ प्रांत अंतरवेद निा बापूजी माहादेव
१ प्रांत अंतरवेद निा अंताजी माणकेश्वर
१ प्रांत अंतरवेद निा गोपाळराव गणेश
१ प्रांत अंतरवेद निा गोविंद बल्लाल
१ प्रांत बुंदेलखंड वगैरे माहाल निा हरि विठल
दिा मेघःशाम बापूजी व गोपालराव बापूजी
१ पा शाहाबाज निा विठल सिवदेव
१ पा ग्वालियेर निा विठल सिवदेव
१ पा दुराव निा सिवाजी विठल
१ पा कालाबाग निा त्रिंबक हरि
१ पा बेरसे निा राघो गोविंद
१ माहाल निा नारो शंकर
१ सा सेवढे निा नारो शंकर
१ पा उज्वाड निा धोंडो नारायेण
१ सा उदेपूर निा गोविंद कृष्ण
१ पा भेलसे निा राघो गोविंद
१ पा चंदेरी निा हरबाजी कृष्ण
१ पा चंदेरी निा सदाशिव दामोदर
१ पा इदोर व अ थ ई खेडे ?
निा गोपाल केशव
१ पा इदोरे व अ थ ई खेडें ?
निा मोरो राघव
तालुके उबारी निा रामचंद्र गोविंद
१ माहाल निा विश्वासराव लक्ष्मण
१ पा सामखेडा निा सदाशिव त्रिंबक
माहाल निा जगजीवन पवार
१ पा नरवर निा सटवोजी जाधवराऊ

१ पा आष्टे नि॥ विष्णु माहादेव
१ ता कपवाई पा रणोद नि॥ धोंडो कृष्ण
१ पा कुरोली मडरायेल नि॥ बाजी सखदेव
१ पा उदेपूर बासोदे नि॥ भगवंतराव अनंत
१ सा खेचीवाडा नि॥ विष्णु माहादेव
१ पा संबलगड नि॥ मनोहर कोनेर
१ सा सेवढे नि॥ भिकाजी ना॥ रास्ते
१ सा मंडले नि॥ महिपतराव केसो
१ तालुके उंबारी पा गुन्हा नि॥ पांडुरंग कृष्ण
१ किले माडवे व सोनगड
१ प्रांत अहीरवाड नि॥ गोपाल केशव

३७

चंदेरी नि॥ हरि दामोदर
१ प्रांत मालवा नि॥ जनकोजी सिंदे
१ पा सिरसी पांडोणी नि॥ जनकोजी सिंदे
१ प्रा॥ बुंदी नि॥ जनकोजी सिंदे
१ पा पाटण केशवरायाचे
१ ठाणे बिझरावण वगैरे गाव नि॥ जनकोजी सिंदे
१ पा आष्टे नि॥ विष्णु माहादेव
१ प्रा॥ मालवा नि॥ कृष्णाजी पवार
१ पा खुटावद नि॥ माहादाजी अंबाजी
१ जलाली बिलसद नि॥ भगवंतराव अनंत
१ अकबरापूर बिरबलाचे
१ सावेर व सुज्यालपूर
१ प्रा॥ मालवा नि॥ मल्हारजी होळकर
१ किले ग्वालेर नि॥ गोपालराव गणेश

---

१ पा रेवा मुकुंदपुर नि॥ मानाजी पायगुडे

¶*A list of the provinces recognising Maratha suzerainty and the officers by whom they are managed.*

No. 79] [21-1-1756

पो छ १८ रबिलाखर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेशी

विज्ञापना ऐसीजे. जयेनगरप्रांती येतांच मागती राजश्री जनकोजी सिंदे याची पत्रे आली. स्वामीचीहि आज्ञापत्रे एकदोन पावली. त्यांत अज्ञा कीं जयेनगरचा मुल्क जालून फना करणें. त्याजवरून जेथवरी आमचा हात पोहचला तेथवरीं मुल्क जाळिला. या मोहिमेमुळें कर्ज फार जाले. आगरियाच्या साहुकारांत पत चांगली होती व राजश्री गोविंद बल्लाल यानीं उपराला सरंजामपैकीं व कर्जाऊ उभारणी केली आणि मोहीम सिद्धीस नेली. सुरजमल जाटाच्या चित्तापासून आम्हास दगा करावा, पुत्र दहा हजार निवड करून व माधोसिंगाचा बकसी मिलोन कोठे तरी दगा करावा ऐसे होते. परंतु स्वामीचा प्रताप थोर. सेवकानेंच त्याचा मुल्क मारून त्याच्या उरावरून आलो. त्याणीच शेवकाची दहशत खादली. स्वामीची कृपा चित्तापासून मजवरी आहे ते कृपेनें जेथें जाईन तेथें स्वामीचा नक्ष राखीन. स्वामी खानाजादावरी अधिकोत्तर कृपा करीत असिलिया सेवकापासून मोठी मोठी चाकरी होऊन येईल. खाजगत वर्तमान तरी आमच्या- फौजेंत एकाच्या चित्तात नव्हते जे मारवाडांत जावे. मारवाडांत पांचसेर दाणे व एका रुपयाचे गवत एका घोड्यास पुरेना. पाणी दीडशा हातावरील व मार्ग कठीण. मध्यें आडवे जाट कछवे वगैरे फौजा. येवढे संकटांत न जावे. अंतरवेदींत असावे. परंतु राजश्री जयाजीअपासारिखा सरदार मारिला गेला. राजश्री दत्ताजी सिंदे याची पत्रे नानाप्रकारची आली. मुख्य निरोपाचे समईहि मजला आज्ञा होतीच व राजश्री अपाहि माझा हरएकविसीं भरंवसा राखीत होते या गोष्टींवरी नजर देऊन आपले सर्व स्वार्थ एकीकडे ठेवून जिवाचा संकल्प करून जेथवरी कर्ज मिळेल तेथवरी मेलऊन येऊन पोहचलो. येथें आलियाउपरी राजश्री जनकोजी बावा व दत्ताजी बावा संतोषी जाले. पुढें स्वामीचा पुण्यप्रताप तरी याउपरी उत्तमच मनसबा घडोन येईल. गोहदकर जाठ याणी आतां अम्हासी चांगला सलूख केला. फौज चाकरीस सांगाते दिल्ही आहे व निमे मुल्क वाटून द्यावा त्याच्या वाटण्या केल्या आहेत. याउपरी गोहदकराविसी तेथें कोणी पुण्य वेचील तरी स्वामीनीं ध्यानास अणावे. भदावरकर राजे यास टिका करून हत्ती सिरपाव व वस्त्रे घोडा श्रावणमासीच दिल्हा. हत्ती घोडा सिरपावाचे परभारे दहा हज्रार निराले करून निव्वल सरकारची नजर पन्नास हजार रुपये करून साहा

महिनियाचे मुदतीनें सावकारी निशा करून आम्ही घेतली. याखेरीज त्याणी आम्हास कांहीं कबूल करून टीप जेष्टमासचे मुदतीची करून घेतली आहे. ते मुदतीस त्याजपासून घेऊन तेहि कलम सरकारचे सरकारांतच जमेस येईल. परंतु राजश्री नारो शंकर त्यासी अदावत करितील तरी त्यास स्वामीनीं ताकीद करून भदावरकरास गौरसीचे पत्र पाठवावें. नारोपंताचे कारकून आम्ही बोलाविले त्याणी साफ उत्तर पाठविले जे राजा भिकारी आहे. दहा पंधरा हजार करार कराल तरी आम्ही येऊं नाहीं तरी तुम्ही जाणा ते जाणा. मग आम्ही परभारे केले. सरकारचे केले तेहि सरकारचे व आम्हास देऊ केले तेहि सरकारचे, याप्रमाणें आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶[*Antaji Manakeshwar sent to succour Dattaji Sindia in Marwar, reports his proceedings.*

No. 80]

पौ छ १८ रबिलाखर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसीं

विज्ञापना ऐसीजे. प्रस्तुत बिजेसिंग बिकानेरास गेला तो पलत फिरतो. बिकानेराभोंवते बारा कोस पाणी विहीर देखील नाहीं. जयेनगरची फौज घेरली त्यांत बिजेसिंगाचे लोक बिकानेरवाले व रूपनगरवाले झाडून पंचवीस हजार आहेत. परंतु आमच्या लस्करांत माहाकाल. च्यार सेर दाणे रुपयाचे आहेत. हे आठा चौं दिवसानीं रात्रीं पलोन जातील तऱ्ही लुटींतच आहों. नाहीं तरी महिना पंधरा दिवसा सडऊन बुडऊं. परंतु बिजेसिंग हातीं लागतां दिसत नाहीं. माधोसिंग पांच लाख रुपये नजर देऊन आपले फौजेस मोकलें करावयास सिद्ध आहे, परंतु याजला सोडावें ऐसें नाहीं. बिजेसिंग याचेंच नांव तूर्त ठेवावें लागतें. फौज आम्हांपासी भारी. यास पैका किती पाहिजे? येथें कोरा रोजमराच दीड लाख रुपये महिनियास लागतो. ऐसें असतां साल गुदस्तां समजाविसी नालबंदीपैकीं वरात रुपये ७०,००० सत्तर हजारांची राजश्री हरि विठल यांजवरी दिल्ही होती ते सालगुदस्तां त्याणी दिल्ही नाहीं. साल मजकुरीं देतो ऐसें मान्य केलें असतां हालीं हरि विठल याचें पत्र आलें जे श्रीमंतानीं वरात मना केली कीं रुपये न देणें. सुरजमलाकडील यैवज नेमून

दिल्हा त्यास इसनेचे रसदेबद्दल रुपये येक लाख नेमून घेतले होते तो हिसेब पुणियांत येकंदर हिसेबीं आला होता तो हिसेब न पाहतां नेमून घेतले होते ते सरकारचे रुपये आम्हीं घेणार नाहींत. सुरजमलाकडील नेमणुकेपैकीं येक रुपया साता लाखांत वसूल जाला नाहीं. पांच महिने ब्राम्हण बैसले आहेत. त्याचा मतलब रजपूत आपण येक व्हावें. शहाजादा बाहेर काढावा. तमाम हिंदुस्थानांतून मऱ्हाटे बाहेर घालवावे! तेथें रुपये देणे कलतच आहे! साता लाखांपैकीं सरकारचें येक लाख, दुबारा नेमणूक करून घेतली आहे ते सहा लाख आमचे. त्यांत मागती राजश्री मल्हारजी होलकर यांस देविले येक लाख त्रेसष्ट हजार रुपये. वरकड आम्हांकडे. त्यांत येक कवडी वसूल नाहीं! वसूल जालियाउपरी सरकारचे लाख रुपये सरकारांत वसूल देऊं. राजश्री मल्हारजीबावांचे त्यांच्या ब्राम्हणांजवल देऊं. आमचे आम्हीं घेऊं. आमचें सिबंदीचे दाहा लाख सरकारांत आसिले तरी सरकारचे लाख रुपये आम्हीं दुबारा घेणार नाहीं. परंतु येक ताकीद सरकारची सुरजमल जाटास परभारी पाठवावी जे तुम्हांकडील दरोबस्त सालाचे सात लाख रुपये राजश्री अंताजीपंतास देविले, त्यास येक रुपया अद्यापि दिल्हा नाहीं हें तुम्हांस उत्तम आहे यैसें नाहीं. हें पत्र पावतांच सात लाखांची निशा अंताजीपंताची करणें म्हणून जरूर ताकीद पाठवावी. आमचे घरी चिरंजीव व्यासरायाचें आमच्या पुत्राचें लग्न आहे. साहित्य उपसाहित्य काडीचें नाहीं. शाहाजी माने यास मौजे धामोरी गांव जागीर दिल्हा. सनद स्वामींनी दिल्हा असतां अमल अद्याप मिलत नाहीं व राजश्री नारो बावाजीकडून नेवास परगणियांत येका हजाराची वसुली तावरें यास देविला. सनद दिल्हा असतां गांव अद्याप पावला नाहीं. पिपलगाऊ मालवी येथील आंबराईपैकीं इरसाल झाडें पस्तीस स्वामींनी सनद करून दिल्हीं असतां मागती गोपाळ शंकराकडे देविले. त्यास आम्हांस सनद दिल्हीं असतां या मुलकांत आम्ही असोन मागें दुसरियास द्यावें? आम्ही आलियाउपर मग देणे तरी द्यावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Antaji Manakeshwar informs the Bhausaheb what he has been doing against Bijesing and his chances of success and further requests him to write to Surajmal to pay at once to the writer the sum of 7 lacs already agreed upon to enable him to pay the rojmura to the Army which is long in arrears.*

2275

No. 81] [22-1-1756

श्री

* * * * राजश्री पंत (प्रधान)
* * * स्वामीचे सेवेसीं

* * * गोविंद बल्लाळ कृतानेक सां नमस्कार * * * * ताा पौष वद्य पंचमीपावेतो स्वा(मीच्या कृपात्र) लोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील सविस्तर वर्तमान पेशजी (पत्री) लिहिलेच आहे त्याजवरून विदित जाले * * * * आली देशास यावें स्वामीचे चर * * * इकडील बंदोबस्त करून चिरं(जीवासी) पुणियासी यावे हा विचार * स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले. तुम्ही देशास (आल्यास) जागा खाली पडेल. जमीदार हरामजादे * करितील यास्तव तुम्ही देशास न येणे. तिकडील बंदोबस्त राखणे म्हणोन आज्ञा * थील जमीदार मोठे हरामजादे, हमेशा फौज जबरदस्ती असिली तरीच दबतात. फौज (नसल्यास) फिसाद व्हावयासी विलंब नाहीं; परंतु * * * येऊन हिसेबचा फडशा करावा हे ज * * * स्वामीनी आज्ञा केली कीं न येणे त्याजवरून * * * विचार केला. इकडे राहून बंदोबस्त * * देशास येतो तर इकडील बंदोबस्त * * राहता हेहि खरेच आणि दे * हिसेब फडशा करावयास्तव त * * * जावयाच्याहि विचारात होतो * ची आज्ञा जाली त्याजवरून * * महिने राहिले. स्वामीनी फौज आम्हाकडे तैनातिस पाठविणे. फौज * * या प्रांती ठेऊन बंदोबस्त करून देशास येऊं. वरकड वर्तमान चिरजीव बाबू * * लिहिले आहे त्याजवरून विदित करितील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Ballal to the Peshwa saying that the writer will first restore order in the province in the North by curbing the recalcitrant zamindars and then return to the South as directed by the addressee.*

No. 82] [*January 1756*

२ श्री

पुरवणी श्रीमत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. तेव्हा राजश्री जानकोजी सिंदे यांचीं पत्रें आलीं कीं, जोतपूर प्रांते जाऊन ती फौज मारून काढणे. त्यावरून कूच करून जोतपूर प्रांतें गेलों.

फौजेची आवाई ऐकोन बिजेसिंगाचा पुत्र फौजसुधां पलोन गेला. अंमल जागां जागां पूर्ववतप्रमाणे बसला. उपरांतिक मागती नागोराहून पत्रें राजश्री जनकोजी सिंदे यांची आली की फौज त्या प्रांते ठेऊन सडे सेपनासानिसीं भेटीस येणें. त्यावरून चिरंजीव तात्या फौजसुधां जोतपूर प्रांते ठेऊन आम्ही सडे नागोरास आलों. राजश्री दताजी सिंदे व राजश्री जनकोजी सिंदे यांची भेटी जाली. त्याणी कितेक मनसबा वि(चा)रिला. आम्हास जो अर्थ सुचला तो सांगितला. तेव्हां बिजेसिंगाची मामलत केली. जालोर व अजमेर दोन किले द्यावे, पंनास लक्ष रुपये नख्त द्यावे व निमे मुलूक वांटणी करून द्यावा; येणेप्रमाणे करार जाला आहे. राहाताना येक जोतपूर मात्र त्यांजकडे राहिलें आहे, तेंहि संकटास्तव राहिलें. लस्करांत च्यार (सेर) दाणा व च्यार सेर वैरण; तेहि न मि(ले). दिवसेंदिवस कमी पडत चालिले. फौज बुडाली. बाकी कांही राहिली नाही. यैसें चौंकडून संकट जाणून मामलत केली आहे. निमे मुलूक घ्यावा, त्यास राजे रामसिंग याणी थोडे बहुत पैकियाची वाट केली तरी निमे मुलूक घेतला तो त्यांजकडे द्यावा. काहीच यैवजाची तरतूद न होये, तरी मग सरकारांतच मुलूक ठेऊन आपला अंमल करावा. पंनास लक्ष रुपये करार केले; पैकीं पंचवीस साल मजकुरीं द्यावें, पंचवीस राहिले ते दोन सालांत पुढिल्या द्यावे यैसा करार केला आहे. तहसिलेबदल आठ च्यार दिवस येथें मुकाम आहे. उपरांतिक येथून कूच करून जयनगर प्राते जाणे होईल. तिकडीलहि, हे विज्ञापना. [अपूर्ण]

¶*Terms of the treaty proposed by Sindia, on behalf of Ramsing, to Bijesing are reported to the Peshwa.*

No. 83] [*29-3-1756*

श्री

राजश्री मल्हारजी बाबा होलकर सुभेदार गोसांवी यांसी सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो अंताजी माणकेश्वर आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल ता। फालगुण वद्य १४ मु। नजीक रूपनगर सुखी आसो. या प्रांतीचे वर्तमान आम्ही याजपासी राजश्री जयापाचा काल जालियाउपरी आलो ते साद्यंत पूर्वी दोन वेळा तपसील सेवेसी लिहिलाच आला. जें आमच्यानें श्रमसाहास जाले ते जीवापेक्षा दाहा हजार फौज घेऊन केले. याचे श्रीमंतास त्यानी काये लिहिले असेल न कले. प्रस्तुत बिजेसिंगाने मामलत पनास लाखांची

\+ पत्र अंताजी माणकेश्वराचें.

केली. निमे मुलूक वाटावा. जालोर किला दिल्हा. नागोर जोतपूर बिजेसिंगाकडे राहिलें. याप्रो सलूख करून येक महिना जाला. कूच केले आहे. साहेबांस कलावे म्हणून लिहिलें असे. आपण सदैव कृपा करून पत्री सांभाल करीत आसावा. माया निष्ठुर न करावी. आमचेविशी श्रीमंतासही विनंती करून सर्व प्रकारे ते कृपाच करीत ते करावयासी आपण वडील आहेत. पहिलेपासून आपले आहो त्यापेक्षा कृपा करून सांभालास अंतर न करावे. आपणाकडील साद्यंत वर्तमान लिहून संतोषवीत असावे. आता प्रस्तुत मारवाडचा गुंता नाहीं. पुढें होईल वर्तमान तें तपसीलवार लिहून पाठऊन. आपला गुंता त्या प्रांती कितीकां दिवसांचा आहे ? या प्रांती कधी येणार ते लिहून संतोषविले पाहिजे. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ आसो दिल्ही पाहिजे हे विनंती.



¶Antaji Manakeshwar from the vicinity of Rupnagar reports the treaty patched up between Bijesing and Ramsing, the rival claimants of Marwar, according to which the Marathas will receive 50 lacs while the two cousins divide the kingdom among themselves.

No. 84] *[19-4-1756*

श्री

श्रीमंतर माहाराज राजश्री पंत
प्रधान साहेबांचे सेवेसी

प्रतिपूर्वक निंबाबाई शिंदे दंडवत विज्ञापना. येथील कुशल तागाईत चैत्र वद्य ५ पंचमी जाणून साहेबाचे कृपावलोकनें येथास्थित असें. साहेबांकडील कांहीं

वृत्त कळत नाहीं तेणेंकरून चिंतार्णवीं असों. तरी आनंदरूपाचें वृत्त लेखन केलें पाहिजे. मारवाडांतील वर्तमान चिरंजिवाचीं पत्रें आम्हास आली नाहींत परंतु मालव्यातून वर्तमाने येतात कीं मारवाडचा तह जाला. लष्कर नागोरावरून कूचे करून मेडत्यावरी आलें, ऐसें वर्तमान आहे. चिरंजीवाचीं पत्रें आलियावरी सेवेसी लेखन होईल. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हें विज्ञाप्ति.

¶*Nimbabai Sindia—Ranoji Sindia's wife—communicates to the Peshwa the news that her sons have arrived at a peaceful understanding with the Rajputs and have withdrawn their forces towards Medta.*

No. 85] [*9-5-1756*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक दताजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचें वर्तमान तागायत छ ९ साबान मो रूपनगर स्वामीचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. तेथें आज्ञा मारवाडचा गुंता सत्वर उरकोन मोकलें होणें. अत:पर स्वारीचे दिवस राहिले नाहीं म्हणून तपसिलें आज्ञा. यैसियास आज्ञेप्रमाणें बिजेसिंगासी तह करून नागोरीहून कूच केल्याचें वर्तमान तपसिलें पूर्वीं सेवेसीं लिहिलें आहे त्यावरून विदित जालें असेल. प्रस्तुत रूपनगरास येऊन मोर्चे लाविले आहेत. राजश्री समसेरबहाद्दर छ ९ साबानीं येथें आले त्यानी मोर्चे लाविले आहेत. मोर्चे संनिध गेले आहेत. थोडके दिवसांत येथील कार्य स्वामीचे तेजप्रतापें उरकोन मागाहून तपसीलवार सेवेसीं विनंतीपत्र लेहून पाठऊं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Dattaji Sindia writes to the Peshwa that after finishing the Marwar affair he has invested Rupnagar.*

No. 86] [*26-5-1756*

पा छ ९ सवाल

श्रीगजानन प्रसन्न

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. शेवकाचें वर्तमान छ २६ साबान मुकाम नजीक मडफा प्रांत बुंदेलखड स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. माघ मासीं झांसीस येणे जाले. तदनंतर

विसा रोजानी तयारी करून राजश्री दतबाकडे मारवाड प्रांते जावयाची सिद्धता करून कूच केले तों श्रीमंत मातुश्री सगुणाबाई झांसीस तेच दिवसीं दाखल जाली. त्याजमुळें आठदाहा दिवस मुकाम जाले व राजश्री समसेरबाहादर यांचीहि पत्रे आली कीं तुम्ही पुढे न जाणे समागमेंच सामील होऊन जाऊ. याजवरून पंधरा रोजांचा गुंता पडला. याउपर कूच करून दरमजल जावें या उद्देशे नरवरपर्यंत आलो तों राजश्री दतबाची पत्रें पांच सात मुजरद जासुदासमागमे आली की तुम्ही राजश्री गोविंद बलाल याजकडे जाऊन त्याचे मामलतीचा बंदोबस्त करणे. त्यावरून दरमजल कडे व सहजातपूर श्रीगंगातीरीं गोविंद बल्लाल यांची भेटी जाली. तदोतर सासातसे स्वारानसी श्रीप्रयागस्नान करून मागती मशारनलेसमागमे बुंदेलखंडांत आलो. याचा तहरह लौकरच होईल. तदनंतर मशारनलेपासून निरोप घेऊन झांसी प्रांते जाऊ. दोन वरसे दरबारी राहाणें जालें याजमुळे आमचे खासगत मामलतीचा बंदोबस्त राहिला नाही. च्यार मास राहून पारपत्य करून बंदबस्त करावा तरी चाकरीची आज्ञा वारंवार जाली त्यावरून इकडे येणें जालें. प्रस्तुत यांचे मामलतीचा बंदबस्त उतमच आहे. बखेडा कोठे राहिला नाही. यास्तव झासीस जावयाचा विचार करून जाऊ. अखेर सालहि जाले. सोढे वगैरे जाटाकडील पैसा आला नाहीं. विनापारपत्याखेरीज पैसा येणार नाही. पुढें सेवढियाचा मुलुक आज्ञेप्रमाणे वाटून घ्यावा लागतो. ये गोष्टीस फौज सुधां च्यार महिने मेहनत करावी तेव्हां बंदबस्त होणें तो होईल. आमचे मुलकांत राहणें न जालें याजकारितां निमे वसूल निमे बाकी मामलतीत राहिली. सरकारचा पैसा तों कराप्रमाणें द्यावाच लागतो. साहुकारांचे कर्ज घेऊन भरणा करावा लागतो. फौजेस देखील पोटास कर्ज खावेंसे जाले आहे. मुलकांत पैसा येणे तो जबरदस्ती पोहोचल्याखेरीज येत नाही. शेवेसी विदित व्हावे. पुढे आज्ञा होईल तेणेप्रमाणे वर्तणूक केली जाईल. करनाटक प्रांती स्वामीस मेहनत भारीच पडली. मुरारजी घोरपडे व मुजफरखान यानी हरामखोरी केली. तेणे प्रमाणे सज्यावार[1] जाले. यैसा वाखा त्याचा कधीच जाला नसेल. स्वामी धर्ममूर्तिप्रतापेंच शत्रू पादाक्रांत होऊन शरणागत जाले. स्वामीचा तपप्रताप वर्णावयात येत नाही. ईश्वर सलामत राखो. स्वामी गरीबनवाज़ बहुतांचे छत्र आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Naro Shankar's letter to the Peshwa referring to his activities during the past year. It sounds a note of optimism on the peaceful atmosphere in the North and the addressee's successes in the South.

---

१ शिक्षा पावले.

No. 87] [1755?

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विष्णुपंत स्वामीचे
सेवेसी

पो गोपाळराव गणेश सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २ सवालपावेतो मु ग्वाल्हेर येथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहित गेले पाहिजे विशेष. श्रीमंताची आज्ञा घेऊन किले ग्वालेरीस आलो. राजश्री बाबूराव भास्कर यास फौजसहवर्तमान अंतरवेदीत कुराज्याहानाबादचे बंदोबस्तास पाठविले आहेत. किल्हे ग्वाल्हेरीचा जकिरा उतरावयासी दिसगत लागली यास्तव आम्ही राहिलो. जकिरा व जाटास उतरून किल्याचा बंदोबस्त जालियावरी आम्ही अंतरवेदीत जाऊन. राजश्री गोविंद बलाल याचे (मा)नस कीं महिना दोन महिने मनसब्याखाली घालून हुजूरचा जाब आणवावा. येविसी आम्हीहि साद्यांत वर्तमान श्रीमंतास लिहिले आहे. प्रसंगी आपण आहेत. साहित्य करून गोविंदपंतास ताकीदपत्राविसी श्रीमंतास विनंती करावी. बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Letter announcing that Gopal Ganesh has occupied the fortress of Gwalior on its evacuation by the Jats.*

No. 88] [19-10-1756

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील सेवकाचें वृत्त स्वामीच्या कृपाकटाक्षेंकरून ता आश्विन वा ११ मुकाम जनस्थान यथास्थित असे विशेष. राजश्री अंताजी माणकेश्वर राजश्री गोपाळराव गणेश याजकडील अंतर्वेदचे मामलतीचा बंदोबस्त करून द्यावयानिमित्य ग्वालेर प्रांतींहून स्वार जाले ते फौजसह प्रांत भदावर व कछवाघार येथील सरदेस येऊन राहिले. कांहीं दिवस प्रांत मजकुरीं राहून मागती मारवाड प्रांतें जावें हा मनसबा करून प्रांत मजकुराहून ग्वालेरीकडे आले. जातां येतां व मुलकांत मुकाम करून राहिले तेव्हां धामधूम फार केली. खरींफे गावगनांची कापून नेलीं व पाटील पटवारी गावांतील जमीदार मातबर पाहून धरून आणून पैकाहि घेतला. आम्हाकडील तालुकदार त्या प्रांतीं होते त्यानी पंत मारनिलेपासीं जाऊन धामधुमेविषयीं विनंती बहुतसी केली. परंतु कोणाचेंहि ध्यानावर न घेतां मुल्क

बळेंच लुटिला. खरीपाची तहशील बुडविली. येके धणियाचे सेवक असतां याप्रमाणें अंताजीपंतीं मुलकाची खराबी करावी हें उचित नाहीं. आम्ही देशीं गुंतलों. तिकडे त्यांणीं मनास येईल त्याप्रमाणें धामधूम करून जमीदार नागविले. येणेंकरून अंमलांत खलेल होऊन खरीपाचे तहशिलेंत भदावर व कछवाघार मिलोन पाऊण लक्ष रुपयांचें नुकसान पडलें. याप्रमाणें तेथील तालुकदारांचीं पत्रें नाशकास आलीं, त्या वेळीं व आगोधर पुणियांत असतां राजश्री लक्ष्मण नारायण आमचे तर्फेनें झांसीस आहेत त्यांची पत्रें याप्रा पंत माारनिल्हेच्या कर्तृत्वाचीं आलीं तेव्हांहि स्वामींजवळ विनंती केली व आतां बजिन्नस कमावीसदारांची महालो-महालचीं लिहिलीं आलीं त्यांवरून सेवेसीं विनंती लिहिली असे. मुलकाचे नुकसानीचा इनसाफ करणार महाराज समर्थ आहेत. आधींच यंदा पर्जन्यानें उघाड दिली यामुळें महागाई पडोन रयत आनास आजीज जाली. कोणे गोष्टीची आस्त राहिली नसतां आम्ही महाराजांची मर्जी संपादन करून आलों. देशीं पैका कर्जें काढून भरला. मुलकांत बाकी बेमुबलग राहिली ते व सालमजकूर उगवणें त्यांत याप्रमाणें विघ्नें जालीं. या सेवकाचा तरणोपाय कोणे प्रकारें होईल, येशि-याशी स्वामी कृपाळू आहेत. मामलत इजारियानें भारी बसली. याकरितां सेवकास रा आंताजीपंत यांणी याप्रा नुकसान केलें त्याबद्दल आज्ञा कर्तव्य ते करून ज्यांत तरणोपाय होत तें केलें पाहिजे व राजश्री पंत माारनिल्हेसहि (?) येक ताकीद लिहून पाठवावी जे तुम्ही भदावर कछवाघार प्रांतचे गांव जातां येतां व तेथें फौजेसह मुकाम करून लुटून खराबी केली, पिकें कापून नेलीं, तर तो मुलूक कांहीं दुसऱ्याचा नाहीं. तुम्ही सरकारचे चाकर असोन याप्रां सरका-रचेच मुलकाची खराबी करून नुकसान केलें हे गोष्ट कार्यास येणार नाहीं. नुकसान केलें त्याचा पैका राजश्री नारो शंकर याजकडील कारकुनाचे विद्यमानें होईल तेणेंप्रमाणें तुम्हांस देणें लागेल, यांत अंतर होणार नाहीं. ऐसें ताकीदपत्र पंतमाारनिल्हेस द्यावयास आज्ञा करावी, आणि या नुकसानापासून सेवकाचा निभाव होय हें करावें. मुलकांत अनावृष्टीमुळें महागाई जाली हे आफत. तशामध्यें रा अंताजीपंतीं रयत लुटून खलेल केले याकरितां विनंती सेवेसीं लिहिलेली असे. निभाव करणार महाराज समर्थ आहेत. यानंतर राजे सावंतसिंग वोडसेकर यांसी माघारें घेऊन जावें म्हणून आज्ञापत्र सेवकास पाठविलें व राजे मजकूर यांसहि जाण्यानिमित्त एक पत्र पाठविलें तें पावलें. राजे मजकूरहि नाशकास दाखल जाले. पत्रें त्यांस दाखविलीं व करारमदार हुजूर ठराविला तोहि त्यांस सांगितला. परंतु राजे नगरसेटीच्या उपद्रवाकरितां तीर्थवासच करून राहूं म्हणून श्रमी होत आहेत. नगरसेटीनें राजा देशास आलियावर राज्याचे

प्रांतांत सक्ती करून पैका मुबलक घेतला. सात्र महाजन व जमीदार लुटले यामुळें दरोबस्त मुलूक उजाड जाला आहे. हें वर्तमान तिकडून लिहिलें आलें व राजांनींहि सांगितलें. परंतु स्वामींनीं (एक ओळ फाटली) पाठवून द्यावे जे राजियाकडील कर्जवामाचा बंदोबस्त हुजूर करून कारकून फैसलियावर पाठविले आहेत ; त्याप्रां तुम्ही वर्तणूक करून मुलकांत मनमानेसा पैका जाजती घेतला असेल तो वाजबी रुजुवातीनें तुम्हाकडे लागेल त्याप्रो फिरोन देणें. याप्रमाणें नगरसेटीस[1] एक पत्र पाठवून कारकुनाचीहि रवानगी सत्वर केली पाहिजे. म्हणजे राजियांचें समाधान करून घेऊन जाऊं. भदावरचे राजियाकडील करारमदार जालियाप्रा त्यांसहि पत्रें पाठवावीं व हाती सिरपाव बा देणें तो उत्तम द्यावयाची आज्ञा करावी म्हणजे राजियाचें समाधान होईल. तैनाती फौज जे योजून देणें त्याचीहि आज्ञा करून रवानगी केली पाहिजे. किरकोळी गांवखेड्याबा कामें मागाहून करून पाठवितों. तुम्ही आज्ञा घेणें म्हणोन सेवकास आश्वासन दिलें त्यावरून स्वार होऊन आलों. परंतु अद्यापि गावखेडियाबा जाबसाल न जाला. तर स्वामी कृपाळु आहेत. किरकोळी देशच्या गांवाबा कार्य राजश्री अंताजी विश्वनाथ सेवेसी विनंती करितील तेणेंप्रा करून दिल्हे पाहिजे. राजश्री (एक ओळ फाटली) आले आहेत त्याज बाहि कुमकी खर्चाचा जाबसाल समक्ष मनास आणून सेवकास सनद करून पाठविली पाहिजे.

यो[2]नंतर सेवेसीं विज्ञापना ऐसीजे. वोडसेकर राजियाचें मानस कोणाचें सांगितल्यावरी बहकले आहे कीं, सरकारांत जे वाटणीशिवाय जागा जफ्त जाली ते अर्ज करून सोडवावी. परंतु जागा घेतली ते कैसी सुटणार? सेवेसी सूचनार्थ विनंती हेच कीं एक खेडे साधुणूकपैकीं न सोडावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Shankar to the Peshwa, complaining that Antaji Manakeshwar has ravaged his provinces in the North and requesting the Peshwa to issue orders to him to stop all these activities. The writer further requests the addressee to write to Savantsing of Odsa by way of consoling him.*

No. 89] [*24-10-1761*

छ २९ रबिलाखर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं

विज्ञप्ति येसीजे. छ २४ रबिलावलीं राजे नागरमल व याकुबअलीखान व अबदुल आहदखां सर्व मंडळी येक जागा होऊन नजीबखानापासीं गेले आहेत.

---

१ (नगरसेटीचें नांवें एक पत्र?) २ अक्षर वेगळें.

दो गोष्टी * * विचार मसलत होती कीं नागरमल यासी ठाकूर सुरजमलापासीं पाठविलें पाहिजे. कां कीं ठाकूर सुरजमलास समजाऊन दिलीजवळ आणावें, नजीबखानाची व ठाकराची भेट होये, मग ठाकराचे पुत्रास नजीबखानाबराबर घेऊन सर्व मंडळीनें पातशाहापासी जावें. दुसरे हाहि विचार आहे कीं सर्वांनी नजीबखानसुधां येकत्र होऊन वचनप्रमाण राजेरजवाडे वगैरेसी करून मग पातशाहापासीं जावें या विचारांत आहेत. अद्याप ठैरल नाहीं. ठैरलियावर सेवेसी विनंती करूं. छ २९ रबिलौवलीं नजीबखानास रुखसत[1] जाली. हसी हिसाराकडे बंदोबस्तास जाणार. छ मजकुरीं राजे नागरमल यास ठाकूर सुरजमलाकडे रुखसत केलें की ठाकरास घेऊन दिलीस यावें. तोवर नजीबखानहि पंधरा दिवसानीं फिरून दिलीस येईल. मग ठाकराची व याची भेट होऊन मग पातशाहाकडे जावयाचा विचार ठैरल तो विनंती सेवेसी लिहूं. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*News letter to the Peshwa from Delhi written by his Vakil Bapuji Mahadev Hingane.*

No. 90] [*Date of receipt 23-11-1761*

छ २९ रबिलाखर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञप्ति येसीजे. राजे दलेरसिंग व रूपराम व मोहनसिंग ठाकूर सुरजमलापासीं छ ८ रबिलावलीं दनकोरास गेले होते. पांच रोज ठाकरापासी राहून जाबसाल पका केला. छ १६ रबिलावलीं दिलीस आले. छ १७ रोजीं नजीबखानापासीं गेले. जाबसाल नजीबखानाचा व ठाकराचा सल्लक ठैरला. परगणे झझर वगैरे ठाकूर सुरजमलापासीं बाहल राहिले. कांहीं यैवज देणे सालबसाल ठैरला. त्याचे जामीन राजे नागरमल ठैरले. ये गोष्टीची शपथ अणभाष व्हावयासी फिरोन राजे चेतराम व दलेरसिंग नजीबखानाचे तर्फेनें कुरान घेऊन ठाकरापासीं गेले.

---

१ निरोप.

आतां ठाकराचें व नजीबखानाचे भेटीचा मजकूर आहे. ये गोष्टीचे जाबसालास च्यार दिवस ठाकरास लावणें यास्तव श्रीगोवर्धनचे मेळ्यास गेले. या उभयेतांसहि बराबर नेले. पुढें होईल ते विनंती सेवेसी लिहूं. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*This and the previous letter report some intrigue between Surajmal and Najib.*

[1761-62?

No. 91]

श्री ३

पुरवणी साहेबाचे शेवेशी

रांगड्याचे लागले आहेत. पाहावे. राजश्री सुभेदाराकडील दबाव आहे. याच्या चितात बिघाड उत्तम प्रकारें करावा यैसा विचार आहे. प्रस्तुत त्रिवंडी शामराम याचे कारण बहुत. याचे विचारे मसलतीनें राजे चालत आहे. राजकारणात बहुत पेशं[१]. सर्व कारभार त्याचे हस्ते होत आहे. सर्व मुतसद्दी मुसाहिबे[२] त्याचे विचारे कारभार करितात. त्यानी हा विचार करून राजे बाहीर काढिले. राज्यापासीं दहा बारा हजार फौज उणी थोर पावेतो सामील होईल. सेखावत तमाम येणार आहेत. भारी जमाव एका जागा करावयाचा विचारे आहे. नजीबखान यासी पैगाम बहुत आहे. आकुबवलीखान मथुरेस होते ते दिल्लीस गेले यैसे वर्तमान आहे. त्याजकडील वकील राज्याकडे आला आहे. कागदपत्र त्यासी राजकारण आहेच. शहाआलम यासी पैगाम बहुत लाविले आहे. भला माणूस त्याजकडे पाठवावयाचा विचार आहे. सर्व राजे रजवाडे एका जागा होऊन पका विचार करून भारी राजकारण करावे या डौलात आहेत. पुढें जो विचार होत जाईल ते सविस्तर लिहीत असो. राजश्री जनकोजी सिंदे याजकडील वर्तमान उज्जनीस गेले यैसे वर्तमान यैकितो. परंतु निश्चये वर्तमान कांहींच नाहीं. सैन्यातून राजश्री सुभेदाराची पत्रे अली. वर्तमान तथ्य कांहीं आले नाहीं. निश्चये वर्तमान ध्यानास आलिया सविस्तर लिहीत असो. राजे माधोसिंगजी यानीं मातबर हवेली राहावयास दिल्ही होती ते घेऊन पदमसिंग गोगावत पैनासिंगाचे बंधू यास रहावयास दिल्ही. आम्हास राहावयास दुसरी जागा देविली

---

१ वजनदार. २ स्नेही.

आहे. प्रस्तुत सैन्यांत राज्याबरोबर गेलो आहे. येथील कारभार आल्पबुधी सर्व दबावाचा सर्व साहेबास श्रुत आहे. सर्व गोष्टीनें गौर सांभाल करावयाचा साहेब धणी समर्थ आहेत. विशेष काय लिहिणे? कृपा वरधमान केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*The writer reports the attitude of the Rajput Princes and their intrigues against the Marathas with Najib Khan and Shah Alam.*

No. 92] [*2-12-1761*

पौ छ ३० जावल

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादा
साहेब साहेबाचे शेवेसी

विनंती. सेवक चिंतो कृष्ण चरणावर * * क ठेऊन सिरसाष्टांग नमंस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा छ ४ माहे जावलपर्यंत येथास्थित आसे विशेष. अंतरवेद प्रांताहून उजेनीस आलो. पुढे देशास यावे तो हाडोती प्रांते माधोसिंगाच्या फौजेन तमाम ठाणी उठविली. धूम केली. त्यावरून राजश्री सुभेदारानी आम्हासहि समागमे घेतले. कूच दरकूच पाा मांगरोल प्रांत हाडोती प्रांा कोटे येथे * * * * त्यासी गाठ घातली. त्यास कछव्या * * * * * * राजसिंग घोडचढा व नंदलाल दिवा * * * * कविराम व सुरतराम वगैरे सरदार (ऐ) से दाहा बारा हजारा फौज व तोफा व रहेकले व बाणाचे उंट वगैरे जुंजाचा सरंजामेनसी होते. त्यास छ १ जाली मागील चार घटका दिवस राहाता गाठ पडली. त्यास च्यार घटका रात्रपावेतो गोलागोलीचे युध्ध जाले. उपरांतिक रात्र जाली म्हणोन च्यार प्रहर रात्र कंबरा बांधून घोड्यावर उभेच राहिलो. छ २ जावली इंदुवासरी जुंज प्रात:कालापासून अस्तमानपर्यंत जाले. साहेबाचे प्रतापे फौज तमाम कछव्याची मोडून कुल लुटून घेतली. घोडी उंटे वगैरे सरंजा(म) कुल * * लुटला. त्याजकडील मोठे मोठे पटाईत * * * * कितेक घायाल होऊन पडले. से दोनसे मात्र पलून गेले. ईश्वरे येश स्वामीस दिल्हे. येणेकरून हिंदुस्थानात नक्ष जाला. आम्ही डावे बाजूस होतो. येथानशक्त शेवाचाकरी केली. सरकारपागेस से सवासे घोडे आले. त्यासिवाये उंटे आली आसेत. आम्हाकडील लोक कितेक पडले व जखमी जाले त्याची याद मागाहून शेवेसी विनंतीपत्री * * * * रून पाठऊ. राजश्री मल्हारजीबावा-

च्या (डा)व्या हातच्या मनगटास गोलीची जखम लागली. गोली चाटून गेली. स्वामीचे कृपेकरून खैर जाली. चिंता न करावी. सेवकावर कृपा करून आज्ञापत्र पाठऊन परामृष करणार स्वामी समर्थ आहेत. शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Chinto Krishna reports to Raghoba a severe action between Holkar and Madhosing. Madhosing's army was routed.*

No. 93] [*2-12-1761*

पौ छ ३० जावल

श्री.

राजश्री सखारामपंतबापू गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री खानाजी जाधवरात्र दंडवत विनंती. येथील कुशल ता। छ ४ जमादिलावल मुकाम मांगरूळ प्रांत हंडोती जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. इकडील वर्तमान तर राजश्री माधोसिंग याची फौज दाहा बारा हजार येऊन कोट्यांचे प्रागण्यात धामधूम करीत होता. त्यास राजश्री सुभेदार व आम्ही मिलोन कचव्याचे फौजवर गेलो. त्यास छ ३ जमादिलावली इंदुवारी येक प्रहरा दिवसा उपरांतिक तो अस्तमान होईपरयेंत जुंज जाले. कचव्याचे फौजचा मोड जाला. त्याजकडील थोरथोर पटाईत कामास आले व बुनगे व तोफखाना लुटला. दाहाबारा हजारानतून च्यारतीनसे स्वार पलोन गेले. नाहीं तर फौज आगदीं संतेनासास मिलोन दिल्ही. ईश्वरे आपल्यास येस दिल्हे. हिंदुस्थानात मोठा नक्ष जाला. कछवे मोठा जोराने भारी जमाव करून आले होते की. नर्मदेपावेतो अंमल करावा. श्रीभगवंतकृपेकरून त्याचेच पारपत्य जाले. पलोन गेले. संतोषाचे वर्तमान आपल्यास कलावें. राजश्री मल्हारजीबावा सुभेदार यास गोलीची जखम डाव्या हतास लागली आसे. चाटून गेली. हालकी आहे. चिंता न करावी. ईस्वरे खैर केली. विशेष काय लिहिणे? लोभ आसो दीजे हे विनंति.

¶*Khanaji Jadhao to Sakharampant, informing him of an engagement between Madhosing and himself in which the former sustained a severe defeat. Malharrao Holkar who assisted Jadhao received a slight wound on his left hand.*

No. 94] [5-12-1761

पौ छ ३ जाखर

श्री.

राजश्री सखारामपंतबापू गोसावी यांसी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नो खानाजी जाधवराव दंडवत विनंती उपर. येथील कुशल ता। छ ७ जौवल मुकाम बडोदे प्रा। सोपार जाणोन स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. इकडील वर्तमान तर राजश्री माधोसिंग याची फौज दाहाबारा हजार येऊन प्रो नेणव्यास मोरचे लाविले. त्यास राजश्री सुभेदार व आम्ही यैसे पांचसा हजार फौजेनी कूच दरकूच मुकुंदबारीपरंत आलो. आखेराम पंचोळी याच्या भेटी जाल्या. उपरांतिक आखेराम कोटेवाले याही तीन हजार फौज घेऊन आम्हास सामील जाले हे वर्तमान कछेव्याचे फौजेस नेणव्यांस गेले. त्याही कूच आमचे दहशतीने कूच करून हडोतीचे प्रगण्यात येऊन धामधूम करून तमाम ठाणीं उठविली. आम्ही कूच दरकूच छ १ जमादिलावली गाठून आठ प्रहरपरयेंत कमरा बांधोन उभे राहिलो. त्यास छ २ जमादिलावली जुंझ च्यार प्रहर होऊन कछव्यांचे फौजेचा मोड जाला. त्याजकडील थोर थोर पटाईत कामास आले व काही जखमी. दोनकसें पलीन गेले. बाकी आवघे कतल केले. दोन हती तोफखाना व जेजाले वगैरे सरमजाम लुटून घेतला. ईश्वरे थोर येस दिल्हे. हिंदुस्थानात नकशा राहिला. राजश्री सुभेदार याचे डावें हाताचे मणगटावर गोली चाटून गेली. ईश्वरे थोर खैर केली. कांहीं चिंता नाही. सरकारपागेत घोडीं व उंट मिलोन सेदीडसे आले आहेत. आम्ही डावे बाजूस होतो. सरकार चाकरी केली ते आपणास श्रीमंत राजश्री सुभेदार यानी लिहिले आहे त्यावरून कलो येईल. सिंद्याच्या निशाणास शब्द लागो दिल्हा नाही. सदैव पत्र पाठऊन संतोषवीत जावे. विशेष काये लिहिणे? लोभ आसो दींजे हे विनंती.

¶*Khanaji Jadhao describes how he and Malharrao inflicted a crushing blow on the army of the Kachhawas led by Madhosing. Malharrao Subedar received a slight wound on his wrist.*

No. 95] [29-1-1757

पैा छ १४ रजब

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक अंताजी माणकेस्वर कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ता। माघ शुध ९ नवमीं मुकाम नजिक बारापुले यथास्थित असे विषेष.

2288

अटकेपलीकडून आबदाली दिलीस दाखल जाला. पातशाही चाकर तमाम त्याणी भेदले. वजीर येकलाच व आम्ही राहिलो. त्याजवरी वजिरासहि अवसान न पुरे तेव्हा तोहि जाऊन भेटला. त्यास कैद केले. त्याजवरी आम्हासी आबदालीच्या वजिरासी दोन लढाई जालियावरी आम्ही बुनगे पुढे घालून निघोन फरिदाबादेस दाहा कोस येऊन बुनगे मथुरेस रवाना करून माघारे सडे फौजनसी जाऊन बारापुल्यावरी उभे राहून त्याची फौज आली त्यासी लढाई घेऊन त्यास मोडून घातलियाचे तपसीलवार वर्तमान सांप्रत आजी दाहा दिवसात दोन जोड्या कासीद तपसीलवार वर्तमान लिहून सेवेसी रवाना केले त्याजवरून सर्व वर्तमान स्वामीचे ध्यानास आलेच असेल. प्रस्तुतहि तपसीलवार पाच बंद वर्तमान सविस्तर श्रीमंत राजश्री नानासाहेबाचे पत्री लिहिले आहे त्याजवरून सर्व अर्थ स्वामीच्या ध्यानात येईल. सारांश वकिलाचें आचरणाचा अर्थ सेवकानी कोठवर ल्याहावें ? त्याचे अनुष्टान सबल, यासी कोणाचाहि विलाज नाहीं. या दिवसात श्रीमंत राजश्री दादासाहेब व रा। मल्हारजी होलकर यानी सनिध असावे म्हणजे शत्रूचे निर्मूल होऊन शत्रू येथील पैसा नेणार तो सर्व सरकारात लागेल येविसीं विनंतीपत्रे श्रीमंत राजश्री दादासाहेबास पाठविलीच आहेत. सारांश सेवकाचे श्रमसाहास कोणेप्रकारे आहेत हे स्वामीच्या ध्यानात यावे. सर्वांनी तमाशाच पाहिला. सेवटपरियेंत पुढेहि तमाशाच पाहणार. परंतु स्वामीच्या पुण्यप्रतापेकरून सेवक सरकारच्या मुलकास उपसर्ग लागो देणार नाही. स्वामीकार्यावरी जीव हजीर आहे. फौजेस नेमणूक सालगुदस्ता सालमारी मिळोन येक रुपया नाही. तीन साल स्वारी मेहनत या प्रकारची. साहुकाराची कर्जे कोठवरी घेऊन खावी ? सर्व गोष्टीचा परिहार करणार स्वामी समर्थ आहेत. तूर्त आमचे जागिरीचा येवज राजश्री गोविंद बलाल यासी ताकीद करून देवणार स्वामी समर्थ आहेत म्हणजे कर्जदारास थोडेबहुत पाऊन पत राहील. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Manakeshwar from Barapula reports the news of the descent of the Abdali upon Delhi and the writer's movements consequent to it.*

No. 96] [30-1-1757

पौ छ १४ रजब

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक अंताजी माणकेश्वर कृतानेक सां। नमस्कार विज्ञापना. शेवकाचें वर्तमान ता। माघ शुध १० मुकाम खिदराबाद नजीक इंद्रप्रस्थ

च्यार कोस स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. सविस्तर वर्तमान पेसजी लिहिले ते विदित जाले असेल * * (पुढील दोन तीन ओळी मजकूर फाटला आहे * *) द्वाही फिरविली * * (खान) खानास वजारतीचा खिलत दिल्हा. * * * खा न जि * * या खानाचा पुत्र त्यास वकील मुतलख केले. याप्रमाणे करून किल्यात आणून पोहचाविलें. व गाजदीखान कदीम वजीर यांस कैदेंत ठेविले आहेत. सुरजमल जाट व नागरमल व नजीबखान रोहिले वगैरे सर्वांची अर्जी याप्रमाणेच होती कीं गाजुदीखान राजश्री मल्हारजी होलकर यांचा पुत्र व श्रीमंत राजश्री दादासाहेब याचा पगडीबंद भाऊ, याजला कायेम न करावें. सारी सलतनत[1] मराठियांच्या घरांत घातली आहे. याचें घर खाणून झाडा घेणे. यास सोडाल तरी मागती मराठियास जाऊन भेटून आमचा सत्यानाश करील. (पुढील सुमारें तीन ओळीं मजकूर फाटला आहे.) सारांश चकत्याचा हक त्यांस नादरशहाप्रमाणे दिल्हा. वजीर मात्र मऱ्हाठियांचे आदावतीने दुसरा केला. पुढें पातशाही करावयास अबदाली राहात नाही यैसे दिसते. महिनाभर राहून पैसाटका जमा करून जाईल यैसा रंग दिसतो; परंतु जालें वर्तमान सेवेसी लिहिले आहे. आम्ही श्रीमंत राजश्री दादासाहेबांस दो च्यार वेला लिहिलें आहे. यासमई स्वारी येऊन पोहचती तरी सर्व होते. अबदालीस आणखी महिना पंधरा दिवस येथें लागतील इतकियांत श्रीमंताची स्वारी आलीवरी जें चाहतील तें करितील. असो. पुढें होईल वर्तमान तें लिहून पाठऊन. प्रस्तुत आम्ही येथें नजीक राहावें उतम नाही. नाहक रात्रदिवस मुदई[2] दंगा करवितील याकरितां मथुरेस राहून जैसे होईल तैसे पाहून दिलीपासून पंचवीस तीस कोस राहून. विदित जालें पाहिजे. यापूर्वीचें वर्तमान तरी माघ शुध प्रतिपदेस नजीबखान रोहिले अबदालीस जाऊन मिळाले व दिलीतील सैदसलाबतखान व खानखाना व सेरजंग व बापूजी माहादेव वकील वगैरे जितके होते त्याणी मिलोन आजी दोन महिने अबदालीस पत्रें पाठऊन आणविले. ते जाऊन भेटले. तेव्हां नवाब व पातशाहाची हिंमत उठली कीं आधी शत्रू भारी, त्यांत घरची फौज जाऊन भेटली. तेव्हां वजिरानी आपली स्वारी तयार करविली कीं, अबदाआलीस जाऊन भेटावें. आतां

---

१ दौलत. २ दंगेखोर.

त्यांस किल्यांत आणावें. झाडा शहरचा व किल्याचा द्यावा मग तो जे करील तो करो. तों आम्हास अगोधरच दोन दिवस सडे फौजेनिसी दिलीपासून पुढें वजिरानी रवाना केलें होतें. तेहि तिकडून आले. दिलीपासून साहा कोसावरी अबदालीच्या वजिराची व आमची लढाई जाली ते फारच जाली. आमची घोडीं माणसें फार पडलीं. आम्ही माघारे सरोन दोन कोसी राहिलो. त्याचा मुकाम दिलीपासून साहा कोसांवरी जाला. इतकियांत प्रात:काली गाजदीखान वजीर अबदालीस जाऊन भेटला. तमाम दिलीचे फितुरी अगोधरच जाऊन भेटिले होते. खानसामा व नागरमल व बालगोविंद सावकार वगैरे निमे लोक पलोन जाटाकडे गेले. आम्ही प्रात:कालीं घोड्यावर बसतांच पुढें अबदालीची फौज, मागें नजीबखान रोहिल्याची फौज. आम्हावरी चढाई केली. तेंसमई आम्हास निघोन किल्याखालें रेतींत आमच्या लस्करांत येताना मोठे अरिष्ट आम्हावरी पडत गेले. तेव्हाहि लढाई भारी पडली परंतु बुनगियांत येऊन हती कबिले बुनगे सर्व तयार करून पुढें घालून, पाठीवरी फौज येसा कजिया होत फरिदाबादपरियेंत आलो. मग त्यांचा लाग उठला. तेव्हांहि लढाई आम्हावरी भारीच पडली परंतु स्वामीच्या प्रतापेकरून लस्करचा सुतलीचा तोडा जाऊं न दिल्हा. फरिदाबादेस पावलो. खोज्याचे सराईहून तेहि फिरले. अबदाली ते दिवसीं शहराभोंवत राहिला. कांही फौज पटपटगंजावरी येमुनापार राहिली. कांहीं आमच्या तलावरी राहिली. वजीर गाजदीखान याजवळ चौकी बसविली आणि जागा जागा त्यांचे समागमी फोडून फोडून प्रथक प्रथक (पुढील दोन ओळी मजकूर फाटला आहे.) नजीबखान रोहिला येऊन किल्यातील पातशाही लोक झाडून काढून दिल्हे. पातशाहा पुत्रासमेत कबिलेंदेखील पूर्वस्थल त्यांचे होते त्यांत नेऊन कारागृही घातले. तमाम पातशाही लोक किल्यांतून काढून दिल्हे. अबदालीनें आपला बंदोबस्त केला. बक्षी किल्यांत ठेऊन किल्याची सारी तयारी करविली. जवाहीरखाना, सिलेखाना, जामदारखाना वगैरे झाडून जप्ती केली. शहरांत द्वाही फिरविली. कुतबा पढले. झाडून बंदोबस्त केला आहे. सारांश गोष्टी अबदालीची फौज चालीस पनास हजार सारी आहे. दिलीस काही भारी नवतें. परंतु येथून खानखाना, बापू वकील, नजीबखान सैदसलाबतखान नागरमल पाचसात मिलोन त्याजकडे वकील पाठऊन भेद देऊन त्यास दरकूच साहा कोसावरी आणून वीस हजार स्वार येकदांच भेटीस गेला. तेव्हां खानसामा व नागरमल व बाहादरखान बलोच हे मोर्च्यास म्हणून गेले ते तिकडेच सुरजमलाकडे गेले. दामोदर माहादेव तिघे भाऊ व जलालुदीखान (पुढील एक किंवा दोन ओळ मजकूर फाटला आहे.)

2291

म्हणून त्यास आणावयास निघाले. कबिले खजाना सर्व घेऊन गेले. येक बापू व त्रिंबकपंत दोघे सडे मात्र जब्रांत राहिले. तेहि जाऊन भेटिले. याप्रमाणे दिलीची अवस्था जाली. याउपरी येक आम्हीच फसलो. वजीर घाबिरा जाला. सारी फौज पाच हजार वजिराजवल राहिली. अवसान न पुरे मग जाऊन भेटिले. ते मात्रागमनी. त्याणी कैद केले. आम्ही फरिदाबादेस बुनगे आणून घालविलें. दुसरे दिवसीं बुनगियात दोन हजार फौज ठेऊन मथुरेस रवाना केलें. आम्ही फरिदाबादेहून बंदरपूरचे सराईस दिलीपासोन साहा कोसावरी सडे फौजेनिसी जाऊन मुकाम केला. दुसेर दिवसीं सरवरखान अबदालीच्या वजिराचा सरदार च्यार हजार फौजेनिसी बारापुलाअलीकडे तीन कोस आम्हावरी चालोन आला. आम्ही तयार जालो. येक प्रहर लढाई जाली. त्याजवल तोफखाना नवता. त्याचा मोड जाला. स्वामीच्या शेवकास येश आले. च्यारसें घोडे पाडाव आले. त्याणी आपलीच घोडी च्यारसें मारली. च्यार-पाचसे अबदालीचे हे[१]मजात रणात मारिले गेले. निशाणे नगारे घेतले. मोडून बारापुलापरियेंत घातले. त्याआलीकडे आम्हावरी आजितागायेत फौज त्यांची आली नाही. आजी बापूजी माहादेव याणी त्यास बीर[२] देऊन नजीबखान व अबदालीचे जाहानखान वीस हजार फौज आम्हावरी रवाना केली आहे. दोन कोस आल्यावरी आम्ही दाहा कोस टाला देऊन मागती सालेमाराकडे जाऊन येका रात्रीतून तीन जागा घोड्यावरी बसून फिरतो. स्वामी म्हणतील कीं पातशाही त्याणीं घेतली असतां तुम्ही कां तेथें खराब होता व घोडी माणसें मारीत फिरता? तरी आम्ही येथून निघतांच अंतरवेद झाडून गेली. येक माणूस अबदालीचे दहशतीने राहात नाही. आम्ही थोडेच आहोत परंतु दोन लढाया मातबर जुजोन पांचसातसे माणूस त्याचे मारिलें. त्याजमुलें दहशत भारीच वागवितात. बापूजी माहादेव याणी स्वामीच्या नावाची अर्जी अबदालीस दिल्ही कीं लाख फौजेनिसी चाकरीस हजीर आहो व पातशाही मुलूक अंतरवेदीचा सोडून देतो. तमाम मवास मारून पेशकसी आणून खजानादाखल करितो यैसी अर्जी दिल्ही. त्यावरून बापूस खिलत दिल्हा. मेहरबान जाले. शहर तमाम नागऊन दोन क्रोड रुपये तहसील करून वोला धरून पैका खजानियात देतो येसा तिघानी करार करून खिलत घेतले. येक राजा जुगलकिसोर वकील बंगाला, किसनचंद वकील पठाणाचा तिसरा बापू वकील परंतु शहरात येक माणूस मातबर कोणी

---

१ मोठेमोठे.   २ भर.

2292

राहिला नाही. शहर मातबर म्हणून घरोघर पटी करून चालीस पंनास लाख रुपये जमा जाले तरी न कले. वरकड काहीं नाही. वजिरास दोन क्रोड रुपये मागतात. त्याणी पंचवीस लाख कबूल केले आहेत. नाही तरी जीव हजीर आहे येसे साफ म्हणतात. खानखानास येक क्रोड रुपये मागतात तो कवडी देत नाही. अबदालीनी बापूजी माहादेव यांस पुसिलें कीं तुम्ही आपल्या खावंदाची अर्जी दिल्ही असतां राजा अंताजी माणकेस्वर आमचे फौजेसी लढाई कजाखी करीत कां फिरतो ? तेव्हा बापूनी सालजाब केला जे हा बाळाजीरायाचा चाकर नाही, वजिराचा चाकर आहे, त्याजवरी फौज पाठऊन तंबी करणे. तेव्हां नजीबखानास अबदालीनें बोलाऊन सांगितले कीं, वजीर कैदेत, पातशाहा कैदेत. किला माझा. तुम्ही सारे भेटला, कोणी पलाले असतां राजा अंताजी पंडित हें कां काम करितो ? नजीबखानाने जाब दिल्हा कीं हा त्यांच्या घरचा मातबर सरदार आहे, वजिराचा चाकर नाही. तेव्हां नजीबखानास आज्ञा जाली कीं अंताजीपंतास पत्रें तुम्ही पाठऊन त्याचा इरादा व मतलब काये आहे तें मनास आणणे. त्याजवरून नजीबखान रोहिले याचें पत्र बजिनस आले कीं तुमचा मतलब काये आहे ? भेटी घेणे. त्याचे उतर आम्ही पाठविले जे वजीर भेटावयास गेले ते फार सुख पावले. आम्ही तरी त्यांचे हमजात पाचसातसे मारिले आहेत व फौजबंद आहों. हिंदूचा परमद्वेषी; आम्ही भेटत नाहीं. परंतु मुदा हाच कीं श्रीमंत स्वामीचा अमल जेथवरी आहे त्या मुलुकास काडीइतका उपसर्ग न द्यावा, येक राऊत श्रीमंताच्या मुलुकात न पाठवावा हाच कौलकरार इमानप्रमाण करावें. आम्ही सरोन आपल्या मुलुकाच्या मेंड्यांवरीं[१] जाऊन. जरीकरितां येका खेड्यास उपद्रव लागला तरी आम्ही व समसेरबाहादर नारो शंकर व गोविंद बलाल याचे पुत्र वगैरे व सुरजमल जाट आम्ही येकत्र होऊन जे खिजमतगारी घडेल तें करून यैसा जाब वकील नजीबखानाकडे पाठविला. अबदालीने सांगितलें कीं मों अटक उतरलियापासून दिलीपरियेंत येकाने तरवार बोढिली नाहीं. येथें अंताजीने मात्र येवढें काम केलें. तस्मात मराठे भारी. अतिशय मराठियांचा धाक वागवितो. परंतु बापूजी माहादेव यास आमचा उत्कर्ष न साहावे. तो नानाप्रकारे आम्हावरी प्रयोग करितो. सुरजमल आपल्या ठिकाणीच आहेत. नित्य येतों येसीच पत्रें पाठवितात. त्रिंबक मुकुंद सुभेदार यांस जाठाकडे पाठविलें. त्याणे आम्हासच बोलाविले. आपण येत नाही. पातशाही गेली आतां तेथे आपलें काये काम आहे ?

---

१ सीमेवर.

आपले जागा राखोन राहावे यैसा जाब पाठविला. येका गावास मथुरेजवळ मोर्चे लाऊन बसला आहे. समसेर बाहादर तरी नारो शंकरानी आजी दोन महिने फौजेसुधां आमच्या मुलुकात गोहद पछोरच्या गांवगनास मोर्चे लाऊन लुटून खंडणिया घेतात. दाहा पत्रें वजिराचीं व आमचीं गेली परंतु येत नाहीत. हे जालियावरी तीन पत्रें आजी दाहा रोजांत पाठविली कीं सडे यावे येथे शह देऊन. परंतु ते समर्थ, नारो शंकर त्यांचे मंत्री. गोविंदपंताच्या पुत्रास व त्रिंबकराऊ धोंडोपंत यांस पत्रें पाठविली त्याणी लिहिलें कीं पैका देणे. तेव्हा आम्ही लिहिले कीं नालबंदी व रोजमरा आम्हीच देतो, येणे. परंतु येत नाहीत, अथवा अंतरवेदींत जमा होऊन मेंड्यावरी येत नाहीत. तीन लढाया मिलोन दोनसे घोडे पडिले. दोनसे माणूस कामास आले. जखमी घोडे माणूस फार आहे. असो. किल्यांत शहरांत बंदोबस्त झाडून जाला. जे पलाले ते गेले. राहिले ते अबदालीचे कैदेत आहेत. जेवढें फितुरी तेवढे मात्र मोकले आहेत. रोहिले वगैरे याणी मोठा दगा केला. जरी सरकारची फौज चालीस हजार असती तरी यांस बुडऊन हिंदुस्थानची पातशाही स्वामीची होती. जरी हा ठरला तरी भारीच आहे. साल गुदस्ता मारवाडचे मोहिमेस नवे फौजेची दरोबस्त नेमणूक नाही व हालीं सालची दरोबस्त येका रुपयाची नेमणूक नाही. यैवज अंतर-वेदीचा आमचे जागिरीचा गोविंद बलाल यांकडे इटावे सकुराबाद फफुंदेचा यैवज इजारियाप्रो होता तो यैवज येणे. त्यास त्यांची आमची भेट भाद्रपदमासीं जाली. पंतानी आपल्या पुत्रावरी चिठी करून दिल्ही कीं, दसरा करून यैवज देणे. देखील कबजे घेतली आणि गोविंदपंत देशास गेले. मागून पुत्रास चिठी पाठविली की, येक रुपया सरंजामाचा न देणे. श्रीमंतानी पैका आम्हापासून घेतला आणि अंताजीपंतास न देणे म्हणून सांगितला. त्याजवरून कवडी त्याणी दिल्ही नाही. फुकाचे भेटिले नाहीत. कागद पाठविले त्याचें उतर पाठविले कीं तुमचे आमचे नातें काये आहे? येक ग्वालेरीचा मख्ता येक लाख पस्तीस हजार. तो शागीर्दपेशास पाहिजेत. तेव्हा दरोबस्त सालाची फौज बारा हजार त्याच्या कबजास ठिकाणच नाही. स्वामी म्हणतील जाजती फौज का ठेविली तरी बजिनस जनकोजी सिंदे याच्या पत्रा * * * गेलो दिाची मनस * * * * * * येथे स्वरूप * * * * * * म्हणून ठेविली होतीच व जागा * * * करून माहाल नेमणूक करून सनदा घेतल्या. नेहमीच स्वामीच्या घरात जागा केली होती. परंतु त्यांच्याच घरास आग लागली. जागाहि अबदालीने मारून आपला दस्त केला यासी इलाज काय?

2294

अंतरवेदीचा बंदोबस्त राहावा म्हणून पातशाही चाकरी करार करून येथेहि थोडी बहुत जागा करून घेतली होती. लाला बाल गोविंद या * * व सेट नगरसेट याणी थोरपणा करून आजीतागायेत कर्ज देऊन चालविलें. समजाविसी नालबंदीस ठिकाणा नाहीं. याउपरी रा। गोविंद बलाल यास उत्तम प्रकारें ताकीद करून अंतरवेदीचा आमच्या जागिरीचा यैवज तूर्त इजारियाप्रमाणे देवावा म्हणजे परभारे तेवढा तऱ्ही यैवज नगरसेट बाल गोविद यांस पावता करून पुढें स्वामीची भेटी जालियावरी फौजेचा हिसेब पाहून. मग फौजेची (पुढील चार पांच ओली मजकुर फाटण्यांत गेला) मारवाडची मोहीम निक(डीने) केली. येंदा अंतरवेदीचा बेहदा[1] उठला. कोणीच न राहात तेव्हां हेहि कबूल करून बहदा राखिला. पुढे अबदालीचा हंगामा जाला. आपल्या जिवापेक्षा जेथवरी होते तेथवरी चुकत नाही. या चाकरीचा मजुरा स्वामीच्या ध्यानात येऊन सेवकाचा मजुरा न जाला तरी आमचें दैव खोटे. सारांश सावकारानी पैका स्वामीच्या नावावरी पंधरा लाख रुपये चारिले. त्यास जागाहि केला होता. इश्वरे त्यास अपाये केला इलाज नाहीं. स्वामीच्या सरकारकामासाठीं हें डोईवरी घेतलें. परंतु स्वामीच्या वरकड सरदारानी रिकामेरानीं आमचा तमासाच पाहिला. परंतु येकानेहि उपराला केला नाहीं यावरून अपूर्व आहे. सारे चाकर मेहरवानीचे. आम्ही इतराजीचे चाकर! परंतु आपल्या दैवें घ्यावें. येथून आम्ही कागद पाच सात वेला श्रीमंत राजश्री दादासाहेबांस व राजश्री मल्हारजी होलकर सुभेदार यांस लिहिलीच आहेत. सेवेसी विदित जाले पाहिजे. श्रीमंत मातुश्री सगुणाबाई श्रीप्रयागास माघस्नानास आली आहेत. त्यांचीं पत्रें आम्हास आलीं कीं माघस्नान करून मथुरेस यात्रा करून जेष्ट मासीं देशास जावयाचें आहे तरी तिकडील वर्तमान सुरक्षित असिले तरी व. तुमचे विचारें यावें यैसें असिलें तरी उतर पाठवणें म्हणजे येऊं. त्यास पत्राचें उतर आम्ही पाठविले आहे कीं, तूर्त आबादालीची धामधूम फार आहे, हा प्रसंग उतम नाही. माघस्नान करून काल्पीवरून देशास जावें, मथुरेस येणेस वाट उतम नाही यैसे लिहिलें आहे. स्वामीस विदित व्हावें म्हणऊन सेवेसी विनती लिहिली असे. सुरजमल जाठ नागरमल खानखाना बापू वकील यानी सतंतर पनास लाख रुपये नेहमी निराली बशर्ती नजर करार आबदालीसी केली आहे की गाजदीखानास नेहमी आटकपार धरून

---

१ अमल.

2295

न्यावे. हिंदुस्थानात न ठेवावे. हिंदुस्थानात राहिला तरी मराठे त्याचे साहित्य करितील आण (पुढील दोन तीन ओळी फाटल्या) पैसा घेतील याप्रो * * * मसलत पकी ठरली आहे हें विज्ञापना.

¶*In this lenghty document Antaji Manakeshwar traces the success of the Abdali to the treachery of Najib and other chiefs of the Delhi court who openly sided with him when he drew near the capital, and welcomed him. The Vazir Gaziuddin, a staunch adherent of the Marathas, surrendered to the invader and on the advice of the traitors was thrown into prison for his partiality towards the Marathas. Antaji later on bitterly complains against Bapuji Hingne, Govindpant Bundele, Naro Shankar and others for keeping themselves aloof when he requisitioned their help.*

No. 97] [*January 1757 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीचें आज्ञापत्र आले कीं तुम्ही व राजश्री अंताजी माणकेस्वर येसे स्वार होऊन राजश्री नारो शंकर याजकडे वोडशे प्रांतास जाणे. त्यावरून सिधता करीत आहो. परंतु दीड महिना रोजमरा पाहिजे. निसबतीचे लोक देखील सोलासत्रासे राऊताचा भरणा आहे. रोजमऱ्याची बेगमी करून देणार स्वामी समर्थ आहेत सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Antaji Manakeshwar and some other Sardar informing Raghoba that they are moving towards Orcha according to instructions.*

No. 98] [*6-2-1757*

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्यविराजित राजश्री
विष्णुपंत दाजी स्वामीचे सेवेसी

पोष्य लक्ष्मण आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत छ १६ माहे जमादिलाखर मुकाम मौजे पाडला परगणे गंगराड नजीक चेमेली, आपले कृपेंकरून येथास्थित असें विशेष. दिलीकडील वर्तमान तरी आबदालीनें तमाम शहरांतील हवेल्या खणोन मालमालियेत काढून नेली. तीन च्यार क्रोडी माल सांपडला. लेकाबरोबर देऊन आपले देशास रवाना केलान; आपण शहरांतून निघोन सालेमारबागाजवळ राहिला आहे. आमच्या फौजा

पलवलेवर आहेत. आठां चौरोजांहीं त्याची याची गांड पडेल. बरीशी होणार आहे. खानखाना वजिरी करितो, गाजुदिखान त्याचे कैदेंत आहे. वरकड वर्तमान राजश्री भास्करपंती लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. आपण सत्वर यावें. मातुश्री ताईचीं पत्रें आलीं तीं पाठविलीं आहेत. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजें हे विनंती.

हेच पत्रीं राजश्री अंताजीपंत व कृष्णाजीपंतास साष्टांग नमस्कार; लोभ करीत जावें हें विनंती.

वेदशास्त्रसंपंन्न राजश्री शास्त्रीबावांस दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार. कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Laxman Apaji writes how Delhi is being squeezed of its wealth by the Abdali. The Maratha army is shortly expected to attack him.*

No. 99] [*10-2-1757*

(पहिला बंद गहाळ.)

सेवेसी विज्ञापना. देशीहून कोणी सरदार येत नाही. येक अंताजीस मारून फरिदाबादेवरून काढिले म्हणजे मालवियाल अमल तुमचा होईल. अंतरवेद वगैरे जागियाची कथा काये? याप्रा मसलत देऊन खासा अबदालीचा पुत्र व त्याचा वजीर पंनास हजार फौजेतील निवड करून आपले माणसें बा वाटाडें देऊन माघ शुध १४ चतुर्दसी बुधवारी फरिदाबादेवरी दिलीपासून * दाहा कोसावरी दोन प्रहरा दिवसा तीन * फौजा करून आले. ज्याप्रा लिहिले आहे * या प्रां बापूजी माहादेव याची आर्जीच बजिनस आबदालीस होती ती अर्जीच बजिनस मागून आबदालीने पाठविली (ती) आम्हाजवल आहे. दोप्रहरा तीन फौजाचा गराडा पडिला. निघावयास जागा नाही. आमची फौज पहिली जखमियाबा वगैरे बुनगियात फार होती. आम्हाबा साहा हजार फौज सात हजार मात्र होती. ते संकट जाणून दीढ प्रहर त्यांसी युध्य जाले. चौकडून या रीतीचा वर्षाव. जेथवरी लढाईचा आवर्त (?) लोकाचे सिपाईगिरीची शर्त होती तेथवर केली. ती मेहनत पत्री लिहिता काही सत्य वाटणार नाहीं. त्या समई सातसें आठसे घोडे गोलियाने तरवारानी ठारच त्याच ठिकाणी पडिले. सातसे आठसें लाहाण थोर येक हजार माणूस ठार ठिकाणीच पडिले. जोहर होऊन चुकले. त्यात स्वामीचे दरबारी तरवार मारिली. आसामी दोनसे वरकड लाहाण मोठे स्वार सिलेदार बारगीर मिलोन येक हजार माणूस ठार जाले.

येकाचा मुडदा काढावयास फुरसत नाहीं. च्यार घटिका दिवस राहे तोवरी घोरंदर याप्राा जाले. अबदालीकडील घोडे आमच्या करोलानी तीनसे च्यारसें तेथें मारिले. व सात आठसें पठाण त्याचाहि खासा रणास आला. मग निदान माहासंकट जाणून निघालो. दोन कोसपरियेत मागती पाठीवरी त्याच्या फौजा. हे झोंबी संध्याकालपरियेत आली. संध्याकाल जालियावर तेहि सरोन गेले. आम्ही सरोन मावारे राहिलो. त्यासमई दोनसे तीनसे घोडे आणिक त्याजकडे उ * व पाडून जखमी होऊन गेले. याप्राा जालियावरी बापूची आर्जीच आबदाली मोहरनसी पाठऊन दिल्ही. लस्करचा सत्यानास जाला तेव्हा चौथे दिवसी मथुरेस बुनगियात आलो. येथे येतांच सुरमजल जाट सडा पांचसे स्वारानसी आम्हास भेटीस आला. भेटी जाली. मागती त्यास बहुता प्रकारे भर दिल्हा कीं तुम्ही चला, तुम्ही आम्ही मागती जाऊन. त्यानें साफ सांगितले कीं इरानचा पातशाहा पनास हजार फौज घेऊन येऊन हिंदुस्थानची पातशाही घेतली. तेथे येकानी गोली वाजविली नाही. येक मेला नाही. माझी कथा काये? मजला साफ तिकडे येवत नाहीं. तुमचेंच कर्म की तुम्हीं येवढे कर्म केले. आमची प्राप्त नाही. व आबदालानेहि आश्चिर्य मानिले की वीस हजार फौज मराठे असिले तरी आपल्यात इशनास पाऊ देणार नाहीत. हिंदुस्थानची फौज तरी आबदालीचे फौजेपुढे शभरापुढे पांच हजार पलतात. ठरतां त्याच्या मुकाबिले स्वामीचे खानाजाद मात्र पहिलेहि दोन ती वेल व हाली या भारी सग्रामास ठरले त्यास आपूर्वक जाले! हिंदुस्थानास जाले की पातशाही खावंद मराठे खरे! आणीक याची फौज जमा जाली तरी हेच मात्र आबदालीस बुडवितील येसा भरवसा पुरला. सुरजमलास आपल्या किल्यात गेला. आगरियापासून दिलीपर्येत वस्तीहि येक माणूस नाही. हे अवस्था जाली. ते आतां खासा दिलीत आहेत. पुत्र निवड आम्हावरी आली ती पुढे पलवल होडलपरियेत दिलीहून पंचवीस तीस कोसावरी आहेत. सुरजमलास पत्र पाठविले कीं मुलक सोडणे पैका देणे भेटीस येणे चाकरी करणे. त्याजवरून आम्हास सुरजमलान सांगितले कीं मजला भेटता पुरवत नाही, झुंजता पुरवत नाही. वकील पाठऊन जाबसालात पैकियाच्या बोलीचालीत पंधरा रोज गोवितो. लाख दोन लाख दरबारी खर्चेहि करितो इतकियात तुमच्या फौजा आल्या तरी मीही चाकरीस हजर व पैका त्यास कवडी देणार नाहीं. तुम्हास पैका देईन. पंधरा दिवसा तुमची फौज न आली तरी मग मामलत करून पैका त्याजला देऊन याचीच चाकरी करून येसे बोलून किल्यात गेला. आम्ही मात्र मथुरेंस आहो. आम्हास त्याचे फौजेसहि आता पंचवीस कोस तफावत आहे. अंतरवेदीत त्याजकडील पाच राऊत उतरले नाहीत.

आम्ही इकडे लढाई घात * * त्याचे तोंड आम्हावरी व अगरियाच्या किल्यांत दस्त करावे हे आवई. तेहि इकडेच व सुरजमल मोठी आसामी पैकियाची तीहि इकडे याजकरितां अंतरवेद चुकोन सारा रोख इकडील आम्हाकडीलच जाला आहे व अंतरवेदीत जमीदारानी मात्र कोठे कोठे लबाडी केली असेल तरी न कले. अबदालीचे कुत्रे (नाही). बाळाजी गोविंद, धोंडो दत्तात्रय, त्रिंबकराऊ सिवदेव अंतरवेदीत दिलीपासून सतर कोसावरी आहेत व समसेर बहादर नारो शंकर यानी दोन मास आमच्या ग्वालेरीच्या मुलुकाची सत्यानास करून आतासें भदावरात चमलकांठी आहेत. सारांश गोष्टी आम्ही सर्वास दोन महिने लिहीत गेलो, व आजीं वीस बावीस रोज अलीकडे अबदाली दाखल जालियावरी सर्वास लिहीत गेलो परंतु सर्वानी आमची मशकरीच केली की अबदाली कोठील ? उगेच आम्हास लटके लिहितात यैसें करून आम्हास सर्वानी घालविले. आमचे घरचे काम नवते. हिंदुस्थानची पातशाही सारी स्वामीची आहे. पातशाही राखावी. या पातशाहावरी येहसान करून आणिक जें याच्या घरात असेंल ते सर्व घेऊन यास राखावें म्हणून दाहा बारा हजार आपली मराठी असोन सर्वानी तमाशाच पाहिला. आमचे मात्र घर बुडविलें! तरी हा महिन्या पंधरा रोजा हिंदुस्थानचा झाडा घेऊन जाईल. आमचे हजारो मेले तो हक आमचा पातशाहीवरी जाला आहे. दिलीच्या पातशाहीसाठीं सगल्या हिंदुस्थानचे पाच माणुसे (मे)ले नाहीं. आमचे हजारो त्याच्या कामावर मेले. इतका सत्यानास जाला म्हणून चमल उतरून येत नाही. हिमत सोडीत नाही. श्रीमंत ये तोवरी त्याचे आसपास माराकुटी करीतच फिरतो. स्वामीनी दुसरा अर्थ चितात न आणावा. हे जालियावरी अबदाली व अलमगीर पातशाहा यांसी किलेयात सांगितले * तुझे पातशाहीत निमकहलाल मराठियानी केले. हजारो खासा हजारो घोडे माझे मारिले. थोडके असता हजारो घोडे हाजारो माणूस मेले. माझा मुकाबिला घेतला. तुमचे पातशाही राखतील तरी मराठेच राखतील. हिंदुस्थानी निमकहराम आहेत. उगेच न झुजता उठोन मजला भेटिले. मी आपले गरजेस सर्वासी गोड बोलालो परंतु याची संग्रह कामाची नाहीं. मग जितके पहिले फितुरांस मिलालें होते तितकियास आणून तोंडावरी थुंकला. पैजारा मारिल्या. सर्वावरी दांड केला. सर्वाच्या हवेलीस खणत्या लाविल्या. खानखाना वजीर केले होते त्यास येक क्रोड रुपये लाऊन कैद केले. हवेली खाणितात. नजीबखान रोहिले कैद केले. बापू वकील यांस तीस लाख रुपये (दंड) केला परंतु याने कबुलात लिहून देऊन पैका प्राथकाली भरितो यैसा करार करून रविवारी दिलीहून

पळाला, यैसी खबर आमची आताच आली व बापूचे कारकून लोक त्या पलातील आताच आले. गाजदीरखानाच्या हवेली खणून येक घोडीचे जवाहीर मोहरा मिलोन निघाले. दोन घोडीची भरती अबदालीची जाली. वरकड खणित्या लाऊन सर्व माणसाचे माणूस कैदेत आहे. मुख्ये या कजियात आमचें वाईट होणियात काही राहिलें नाहीं. पुढे ही वाचलो तरी हा कजिया वारिलियावरी सर्व येथास्थित जालियाउपरी खावंदास जे विनंती करणें बापू वकीलाचीं व आपले सरदारी(ची) ती करून. खावंदाच्या चितांस न आली तरीं भगवे करून श्रीस जाऊन बसून !! दुसरा विचार काये आहे? सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Manakeshwar describes to the Peshwa the severe action he fought against the Abdali's forces at Faridabad. He says it is his bold stand against the invader that has saved the Maratha provinces in the North and enhanced Maratha prestige.*

No. 100] [*February 1757*

[पहिले दोन बंद नाहींत.]

३

सेवेसी विज्ञापना. गोविंद बलाळाच्या पुत्रासमागमे धोंडोपंत त्र्यंबकराऊ व ते मिलोन पाच हजार आहेत. त्यास बहुत लिहिले परंतु न आले. सेवटी त्यांनी नालबदी रोजमरा मागितला तो मी आपल्या जिवावरी कबूल केला परतु न आले. सर्वांनी तमाशाच सेवटपरियेत पाहिला. विलाज नाही. समसेर बहादूर नारो शंकर व अंतरवेदीचे आले आसते तरी याचे हाल करितो. फौज लाख म्हणत होते, निदान पनास हजार हरकारे यानी खरी सांगितली. परंतु करार फौज तीस पस्तीस हजार. जाजती नाही. जरीकरिता स्वामी वीस हजार फौजनसी पावतील तरी आम्ही हारोल होऊन यासी लुटितो. दोन क्रोडीची स्वारी होईल. स्वामीबाा समसेरबावा नारोपत अंतरवेदकर सर्व झक मारून येतील, गुता नाहीं. याहून स्वारी कोणती आहे? दीढ क्रोड रुो यानी कबूल केले ते शहर पातशाहा खानखाना वगैरे सर्व पटी करून त्यास देणार तेच स्वामीचे पदरी पडतील. पातशाहीवरी येईसान[1] होईल. गाजदीखान तुमचा पगडीबदल भाऊ म्हणौन त्यास धरून आटकपार नेतात त्याचा सूड घेतलासा होईल व आबदाली बुडेल. त्याचा खजिना हाती लागेल. पुन्हा आटक कोणी उतरणार

---

१ कृपा.

2300

नाहीं. तूर्त सुरजमलासी घासाघास न करावी. हे काम करून दिली व दिलीचा तोफखाना आपण येक होऊन मग पुढे सुरजमलासी बोलू. तूर्त हेच कलागत वाढऊन कामाची नाही. छ ६ जमादिलोवल माघ शुध ८ मागती आबदालीनी जुना पातशाहा आलमगीर बाहेर काढिला, त्यासच तख्ती बसविलें व खानखानास वजिरी दिल्ही. सुज्यातदौलास मीरबक्षीची खिलत पाठविली. सर्व मागती येका गाजदीखाना आम्हा निराले करून येक जाले. दीढ क्रोड रुपये याजला जाठ सुज्यातदोला व खानखाना शहर सर्वांनी मिलोन यास देऊन याची रवानगी करावी, महमदशाहा पातशाहाची कन्या आबदालीस द्यावी, आवरंगजेबाची कन्या आबदालीच्या पुत्रास द्यावी हा ठराव जाला आहे. आबदाली आपला करून त्यास पैका कन्या देऊन वाटे लाऊन गाजदीखान मऱ्हाटियाचा लेक भाऊ त्यास नेहमी अटकपार करून केदारेस कैदेत ठेवावा. खानखाना जाठ सुज्यातदौला येक करून मराठियासी जोर धरावा. सुरजमलास स्वामींचे भये आतिशये व इकडे गाजदीखानाचे. स्वामी आलियावरी गाजदीखान पातशाही तोफखाना घेऊ स्वामीस सामील होऊन जाटाचे नेसनाबूद करणार. खानाखानाचा पैसा हवेली खाणून स्वामीस द्यावा आपण घ्यावा यैसे मसलत नित्य करितां हे जाठ खानखाना सुज्यातदौला यास गुरू बापूजी माहादेव होऊन त्यानी उभे केले कीं गाजदीखान कलीचा कांटा ठिकाणी आबदालीस आणून लाऊन जाट दिली सुज्यातदौला येक करावे. फुटीमुले मारले जाल यैसे बापूजीबावानी केले. गाजदीखान नेहमी धरून नेतात. हे जोड करणार इतकियात आम्ही सुरजमलहि नादी लाविले आहेत हेहि राखिले. सुरजमल जाठ यानी आडीच महिने मुरसानियांसी मोरचे लाविले तेथे आनयासे गुतले. आम्ही त्याचे घरात बुनगे मथुरेस ठेविले आहे. आम्ही सुभेदारास त्यास नादी लावावयास त्याजपासी ठेविले आहे. तुह्मी सरकारची मामलत सर्व करून देतों यैसे बोलून गोविला व आबदाली आहे तोवर सुरजमलाची प्राज्ञा नाही कीं दिलीकडे येईल. याजपासी पैका बहुत आहे. हिंदूचा परम द्वेसी, यासी कदापि सोडणार नाही. याजकरिता जिवें मारिला तरी हा निघत नाही. मथुरेपासी भावाबदाची जागा मुरसाने आहे त्यास अडीच महिने लागला. आणीक पधरा रोज लागतील. सुज्यातदौलास मीरबकसीचा व तोफखानियाचा खिलत पाठविला. त्यास येक महिना यावयास पाहिजे. दोन

---

१ अलमगीर २ रा.

पारडी भारी. जाट व सुज्यातदोला हे आपल्या जागा गुतले आहेत. यैसे करिता आबदाली कदाचित स्वामीच्या येणिया आगोधर कूच करून गेला तरी पिछा करावयासी म्हणून दिलीस यावे. मधे जैनगरचे कामास न आटकावे. जाटाचे कामास न आटकावे. आबदालीवरी जातो यैसे म्हणून दिलीस यावें. जरीकरितां जवल असिले तरी पिछा करून लुटून. दूर गेला तरी दिलीस गाजदीखानाची वारसा करून खानखानापासून वजिरीची नजर घेऊन गाजदीखानास धरून दिल्हे त्याची गुन्हेगारी घेऊन. आबदालीचे हफ्ते तीन करार दिढा क्रोडीचे आहेत. येक पनास रोखच घेतले, दुसरा कर्नालावरी द्यावा, तिसरा लाहोरावरी द्यावा. ते दोन हफ्ते सरकारांत घेऊन मागती दिली. आम्ही येक होऊन सारा तोफखाना याचा काढून घेऊन यास पातशाहासहि समागमे घेऊन म्हणजे जाट सहज वेगला सुज्यातदौला वेगला जाला. येकास येक मिल्ह पावणार नाही. पैका देतील. रोहिलियाने क्रोडी रुपयाचा मुल्क खाऊन काही न द्यावे. नजीबखान पनासा लाखाचा गाजदीखानाचा मुल्क खाऊन फितुरास मिलोन गाजदीखानाचे घर बुडऊन बाधून दिल्हा तो मुलूक दिलीभोवताचा आहे. हा अभिश्राप त्याजवरी देऊन हस्तगत करून. परंतु वकील आम्हांस दगा देऊन स्वामीस भुरले घालून मसलत सेवटास जाऊ देतील यैसा भरवसा नाही. वकिलाकडे पैसा सरकारचा वसूल जाला तो कडाकुरडा गोविंदपंताचा पैसा. हे सरकारकिफायित बहुत आहे. श्रीमती आम्हांस पुणियाहून हा मार लिहिला होता त्यास वकिलाच्या अनुष्ठा(ना) पुढे कोणाचे काही चालणार नाही. च्यार रुो खर्च करून सर्व वारापाणी करितील हा भरवसा आहे; परतु सुचला आर्थ लिहिला. जर हे स्वारीची मसलत सेवकावरी च्यार महिने दिल्ही तरी स्वारी चौ महिन्याची मातबर अकारून दाखऊन. तीन वरसे आम्हास जाली. मग आम्ही आज्ञा घेऊन जावे. पुढे स्वामी खावद आहेत. च्यार महिने दुसरियास न पुसावे. मी सांगेन तेच ध्यानास आणावे; नाही तरी आम्ही लाहाण चाकर. स्वामी खावद चितास येईल ते करावे; परंतु स्वार येंदाची फसेल, फौज थोडी हा आर्थ चिता न आणावा, व सुभेदार आपण मिलोन वीस हजार फौजनसी तम्ही असतील. ग्वालेरी प्राती समसेर बहादूर नारो शकर आहेत. अतरवेदीत बालाजी गोविंद धोडोपत त्रिबकराऊ आहेत. रिकामेच आहेत. यासी बोलाऊ पाठवावे व आम्ही या शेहास गुतलो. येथे पहिलेहि अंतरवेदच्या मुलुकासाठी छावणीस राहून दिलीस आलो. आतां तूर्त येथे आम्ही राहून अतरवेद राखून आबदालीवरी शह देऊन आहो. दिलीवालियावरी आहो ते कामाचे आहो व पहिली सनदी फौज

आहे ती गैरसनदी फौज ठेविली पाच सात हजार; त्याची जागा वजिरापासी करून घेतली. पैसा त्याजवळ नाही म्हणून त्या यैवजास जागा लाऊन घेतली. येक मास दिलीस होतो. भेटी गोस्टी बोलीचालीखाली येक मास गेला. सनद-पत्र तयार जाली तो हे आरिस्ट जाले. वकिलाची आमची दिलीत येक मास भेट नाहीं. आमचा जाबसाल पातशाहा वजिरासी त्याचे विद्येमाने नाही. आलाहिदा जाबसाल आहे हे परम दुख त्यास. आम्हा नाना प्रकारे प्रयोग तरी केले, मोरेकरी तर घातले, गिला रात्रीदिवस जेथवरी करणे तेथवरी केला, परतु गाजदीखान वजिराची आमची क्रिया होती त्याने आम्हासी जिवे प्राण ठेविले होते. ईस्वर त्याचे याप्रा केले. सर्वानी मिलोन त्याचे घर बुडविले की हा मराठियाचे तिली आला हे बरे नाही; आसो तो दुसरा पातशाच होता. पातशा-हाचे रुबरू सनदपत्र सर्व करून दिल्ही. आता खानखाना बापू वगैरे सर्व येक. ते आम्हास गाजदीखाहून अधिक वैरी समजतात. याजकरितां स्वामीपासी लबाड्या मनमाने सारिखिया करितील; नाही तरी मी सनदा पायाशुध करून घेतले ते स्वामीनी घेऊन बारा हजार फौजेचे तीस लाख रुपये सरकारातून दिल्हे आणि वकिलाचेच यैकिले तरी आमचा दुराग्रह नाही. मजसारखा कमाऊ चाकर स्वामीस मिलणार नाही. कोणी आजीतागाई(त) मजसारिखी परराज्यात आंगेजणीची चाकरीहि केली नाही व च्यार खेडी निराली कोठे मेलविली नाहीत. त्याजवरी मोठी कृपा त्याज मान भीड फार. आमचे दैवच यैसे आहे. आसो; सुचला मार लिहिला आहे. इतके करून सर्व सोडून यावयाची आज्ञा जालीच तरी पत्र येईल त्याच क्षेणी स्वार होऊन येऊन. चाकर लोकांस उजूर नाही. गोविंद बलाल यानी सरंजामाची कवडी दिल्ही (नाही.) साहुकाराचा पैका कोठवरी खावा? याची फिकीर स्वामीस आसावी. आम्ही जिवापेक्षां आंगीजणी करून जेथवरी द्रिष्टी चालल तेथवरी तरतूद बांधितो; परंतु खावंदाच्या चितास न ये तरी विलाज काये? मुख्य जैनगर प्रांती सटवोजी राजाले यानी कजिया केला. तेथे प्रथम न गुंतावे, जाटाकडे न गुंतावे तरी स्वारी साधोन सारी कामे होतील; नाही तरी स्वारी चांगली होणार नाही. गुदस्ता कर्नाटकात स्वारी फसली; आता कोणी बुधी चोरील तरी आम्ही गरीब. विलाज काये? सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Manakeshwar to Raghunathrao : reports the activities of the Abdali at Delhi and discusses the course of action the latter should determine upon to check them before it is too late.*

2303

No. 101] [February 1757

श्री

पुर्वणी जिमत माहाराज राजश्री पंडित प्रधान
नाना धर्मधुरंधर स्वामीचे सेवेसी

(अ)बदाली जाला. पातशाहा व वजीर नावास ठेविला आहे. याचा इतबार नाहीं. चाहील तेव्हां दूर करील. दिल्लीचा मूळ करार येमुनेचा. मुरादाबाद, सुहारनपुर व संभल व बरेली व शाहाजाहापुर व लखनऊचे हदेपरियेंत तो रोहिले व पठाण तें तों अबदालीचेच जाणावें. अंबेर व जोधपुरचे राजे तों आबदालीचे चाकर म्हणवितात व त्यांहींच यास बोलाविलें कीं आम्हास मऱ्हाठियाचे हातें सोडवा. तुमची चाकरी करीत जाऊं. त्यांच्यानें आबदालीस भांडवत नाहीं. येक जाट मात्र आहे. परंतु त्यासहि येकल्याच्यानें काये होईल? पैकाहि देऊन सलुक करून मुल्क रक्षील. जरी कोण्ही त्याचा पाठराखा होईल तरी भांडेलहि परंतु त्यास माहाराष्ट्राचें भये आहे. अबदाली जरी हे मारून काढतील तरी कोण जाणें आमचीं काये करितील? उंदड त्याचें समाधानहि केलें. त्यानंतर आतां जरूर जाणून तोहि रफीक[१] आहे. सारांश कीं अबदाली मारून व हरप्रकारें उछेद करावा, तोंवरी कोणी निद्रा सुखरूप न करावी. इतकाच अर्थ आहे. यांत सर्व आलें. आम्ही लोक सातां पिढियाचे दिल्लीचे पातशाहाचे चाकर होतों तदनंतर माहाराजाचेच आश्रित व पदरचें आहोंत याचा विस्तार किती लिहावा? आज्ञापत्रहि पावलें होतें कीं वरचेवरी वर्तमान आम्हास लिहीत जाणें. व राजश्री रघुनाथराऊजी दादा व मल्हारराऊ वगैरेंस जे लिहावयाचें ते लिहीत जाणें. त्यावरून कांयीत आहोंत. वरचेवरी ज्यास जें लिहावयाचें तें लिहीत आहों. परंतु माहाराजांही येक पत्र राजश्री दादास येविषयीं येक पत्र पाठविलें पाहिजे: येद्यपि मजवरी कृपा करून पत्रोतर पाठविताती तथापि माहाराजाचें लिहिलियानें विशेष आहे. हें विनंती.

¶Letter of Raja Keshav Rao, the first part of which is unfortunately missing, reports that the Northern potentates—both Muslims and Rajputs—have sent in their allegiance to the Abdali.

No. 102] [5-3-1757

श्रीदत्तात्रेय

श्रीमंत राजेश्री पंतप्रधान ताा राजेश्री भाऊ स्वामी

सेवक देवराव मेघशाम साा नमस्कार विनंती उपरी. क्षेम ताा छ १४ माहे जमादिलाखर मुाा झांसी स्वामीचे कृपावलोकनेकडून सेवकाचे वर्तमान

१ स्नेही, दोस्त.

यथास्थित असे. कृपा करून सरकारचे जासुदासमागमें आज्ञापत्र सादर केले ते सिरसां वदून सनाथ जालो. हस्ताक्षरी यात्रा उतम प्रकारें केली म्हणून आज्ञा. तरी सेवकाच्याने यात्रा कोठे होती? हा सर्व प्रकार स्वामींच्या कृपेचा. मात्र यात्रेचें सर्व श्वामींचे पदरी पडले हे खरें. स्वामीचे प्रतापें त्रिस्थ(ल) यात्रा होऊन कासीवास आठ महिने उतम प्रकारें करून प्रयागास माघस्नानास्तव आलों. दाहा बारा रोज मोगलाने हसीलासाठी करासाठी परम श्रमी केले. माणूस तो दो तीरीहून बाहेर जाऊ न पावेसें केलें. नवी यात्रा देशची व पुण्याची राजेश्री मोरो बल्लाळ व राजेश्री बज्याबा कन्हाडची व वाईची यात्रा विश्वनाथ वैद्य करमाळ्याची यात्रा नागपुरची यात्रा चिन्मयेनंदन ऐसी सात हजार जमा जाली. यांसही हासील मागूं लागला. तेव्हां सर्वांनी सेवकास मध्यस्ती सांगितली. मग नवाब महमदकुलीखानास मातुश्रीचे देवडीवरी आणून वस्त्रें व घोडा येक कडी दोन ऐसी सरकारांतून इनायेत जालीं. मग आमचे डेरियास आला. आम्हीही वस्त्रें घोड येक दिल्ही. दोनचार वस्त्रें देसची मागितली तेंहि दिधले. कुली यात्रेची परवानगी कासीची यात्रा हजार माघश्नानास आली होती ते कासीस सुरक्षित जावी व दक्षणची सासात हजार त्याचा हाशील प्रयागापासून कासीस पावेतों सोडविला. भिकाजी नाईक मऱ्हाटे, रामाजी मल्हार चंदावरकर, सखोबा नाईक यासी देशास वाटे लाविले. हासील न घेविला, सोडविला. मातुश्रीचे यात्रेस कोणास कांही(न) म्हणावे, माणसे येतील ते येऊ द्यावी, जातील ते जाऊ द्या, ऐसे त्याचे दस्तक आम्ही आपले डेरियांत करून घेऊन. त्याचा दिवाण यासी आपले डेऱ्याजवळ उतरलें. मोगल बोलला कीं माझी लक्षा रुपयांची प्राप्त बसविली. आम्ही त्यास सांगितले, सर्व श्रीमंताचे स्नेहावरी नजर देऊन सोडणें. माघश्नानास यात्रा पनास सहस्त्र व गोसावी पंनास सहस्त्र होते. हे श्रय सर्व स्वामीचे प्रतापाचें. त्यांत अब्दालीची गडबड खातरेस न आणिली. मोगलही श्वामीशरण हगाम्यांत आणला. गोसावियाचेथें राजेश्री बाजी जाऊन ताकीद केली होती. माघश्नानाचे सेवटीं उगीच निर्बोण्यासी (?) गिरीसी कजिया जाला. मधें पुरीनी आपले मठातून बाण सोडले. शमवीत असतां कलह वाहडला. गिरीपुरीसीं युधास प्रारंभ जाला. ते दिवसीं यात्रा कुली लुटली जावी, तेथें श्वामिपुण्य. पुढें आम्ही यात्रा सोडून फौजसुद्धां यात्रेस धारसा दिल्हा. यात्रे पुढें जाऊन उभे राहून युध्य किल्याचे तों(डे) पडलें. गिरीपुरी भाडले. पांचसें गोसावी ठार पडले. पुरी पळाले. गिरीची फते जाली. आम्हास मोठे संकट

पडले. वेणीतीरी आंम्ही येके तोडे; किला जायास जागा कोठे नवती. * * (वेळे)स श्वामिचे पुण्य आडवें येऊन आपेश न येतां कुशल जालें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶Devrao Meghsham Lapate from Jhanshi describes his pilgrimage to the Peshwa and Bhausaheb. The troubles of the pilgrims, the exaction of taxes, the quarrels of the rival sects of Gosawis and other matters are well described. This Devrao was a confidential adviser of Raja Shahu and was, it seems, at this time deputed to accompany Sagunabai in her pilgrimage to Benares.

No. 103] *[5-3-1757*

श्रीदत्तात्रेय

पुरवणी उभयतां साहेबांचे सेवेसी

विनंती उपरी. गोसावियाचे युध्य जालियावरी आम्हीं त्यास सांगून मोगलाहातीं पाठविले की, तुम्ही कूच करून जाणें. दुसरे दिवसी ते कूच करून गेले. मग आम्ही गंगेपार जाऊन येक दोन रोज राहून कासीची यात्रा कुली देसची यात्रा केली राजश्री मोरोबा व राजश्री बजाबा कुली फुकट उतरून देऊन सिवलाल नसेकची मोगल बाा देऊन कासीस यात्रा पावली. भिकोजी नाईक वगैरे(या)त्रा देशास वाटे लावली. ते दिवसीं सेवकाचे देवार्चन गडी पोहून आणीत होता. देवांसहित देवार्चन भागीरथीवास देवासहित जाला. मो(टा) खेद जाला. आतां सर्व देवार्चन आमचे श्वामींस कल्पून. चिरंजीव बापूची मुंजी वेणीतीरी करून कूच करून मजल दरमजल झासीस येऊन पावलों. येथं मातुश्री माहेरास्तव (?) पांच सात रोज राहणार. त्यांवरी मजल दरमजल येऊन पाये पाहतों. शुज्यायेतदौलाचा आब्दालीचा पूर्वीपासून रुणानबंध नाहीं. यास्तव लखनऊस फौज जमा करून प्रयागचे महाकुलीखानास[२] बोलाऊन नेले आहे. आपले तयारीत आहे. परतु आबदालीचे धाकें गर्भगळित जाले आहेत. प्रयाग करोन मातुश्रीचे कुचाचे समई वस्त्रें पाठविली. आम्ही सर्वमंडळीसहित किल्यांत गेलों होतों. जो वट चाळीस वरशें कपाट उघडलें नवतें ते श्नेहेकडून श्वामींचे प्रतापेकडून किली आणऊन कपाट उघडून वटाचे दर्शण केलें. मोठा लाभ हाच मेळविला. वाटेस कोचेंत[३] राजश्री दामोदरपंत सहकुटुंब दिलीहून पळून

---

१ रास्ते ? २ महंमद पाहिजे. ३ जालोनेजवळ बुंदेलखंड काल्पीचे अलीकडे.

सहकुटुंब आले आहेत. त्याचे बंधु बापूजीपंत दिलींत आहेत. त्यांस आब्दालीचे भेटीस किल्यांत बोलाऊनं मागें त्याचे घर खणती लाऊन (लु)टलें. पुरुशोतमपंत देवराव त्याचे बंधु, समशेर बाहादर याचे कटकांत आगऱ्यावरी आहेत. आम्ही जाऊन भेटी घेतली. दामोदरपंत वेडे जाले आहेत. शरीरीं कंपवात, देहभान नाहीं, ऐसी आवस्था त्यांची पाहिली. समशेर बहादर व राजश्री नारोपंत कबिले बुणगे झाशीस ठेवून आगऱ्यावरी गेले आहे. पुढेंही जाणार. राजश्री अंताजी माणकेश्वरासी आब्दालीचे फौजेसी युध्य जाले. सरदार बहुत पडले. परतु सावरून मथुरेस येऊन तेथून पुढे जयनगराकडे जाणार आहेत. पुन्हा जमा जाले आहे. राजश्री अंताजीपंती फौज थोडी असतां ऐकतों कीं शर्त केली. आजुणही दिलीभोवतेच आहेत. राजश्री दादासाहेब व मल्हारबा इंदुरास आले म्हणून वार्ता असे. बहुत काये लिहिणें लोभ असों दिल्हा पाहिजे हे विज्ञापना.

¶*Devrao Meghasham describes the pilgrimage he made in the company of Sagunabai Peshwa, and mentions details of the proceedings of the Abdali at Delhi and the attitude of Shuja-ua-dowla towards him.*

No. 104] [*5-3-1757*

श्रीदत्तात्रेय

पुरवणी श्रीमंत राजश्री उभयेता साहेबांचे सेवेसी

विनंती उपरी. आबदालीचे वर्तमान तरी दिलींत किल्यांत आहे. खानखानाचे मायेपासून तीन करोड रुपये घेतले. व खानखानास वेगलच तानून क्रोड रुपये घेतले. बजिरापासून पंनासा लक्षाचें जवाहीर व पंनास लक्ष रोो नख्त घेऊन कैदेंत ठेविलें आहेत व खानखानाहि कैदेंत आहे. आबदालीनें आपला पुत्र ज्याहनखान व दाहा सहश्र फौज व बुणगें अवघे लाहोरास वाटे लाऊन आपण सडा होऊन दिलींत आहे. कुल शहरास सांप्रत खणत्या लावल्या आहेत. पांच रुपयेपावेतों माणसापासून निघाले ते घेऊन खजान्यांत दाखल करितो. कुली शहरांत व बाहेर फौज उतरली आहे. शहरांत जो ज्यांच्या घरीं राहिला तो त्याचेंच घर समजून वर्तणूक करितो. माणसें बहुत मारलीं गेलीं, व स्त्रिया बहुत नगरांत भ्रष्टल्या. कितेकानी प्राण दिल्हे व कितेकानीं जळप्रवाह केला. जितक्या बादशाहजाद्या होत्या तितक्यांस आपले लेकांस विवाह करून दिल्या. जितक्या पातशाहाच्या बाइका व शाहजाद्यांच्या बाइका होत्या त्या आपल्या घरांत निका पढून घातल्या. जेथवरी चांगली बाइको हिंदूची होती तेथवर लोकानी बाटविल्या व आपलाल्या घरांत घातल्या. कोण्ही म्हणतात कीं आपल्या

देशास जाईल. कोण्ही म्हणतात अंतरवेदींत उतरेल. त्यासहि भय स्वामींच्या प्रतापाचें बहुत आहे. आपल्याहि फौजा लाहणथोर भोंवताले कोण्हीं जवळ, कोण्ही अगरियांत, कोण्ही मथुरेस, व कोण्ही सकुराबादेस येस्या उस्यांपांइंता आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब व राजश्री मल्हारबा इंदुरीहून पुढें चालिल्यावरी त्यांचे सलाबतीनें दिली सोडून जाईल असें दिसतें. स्वामीच्या पुण्येप्रताप तेज्यापुढें हा जाईल असें दिसतें. याहीवरी स्वामीच्या प्रतापें पराभव पावेल यांत संदेह नाहीं. याउपरी आम्हांसहि जे दिवसीं स्वामीचे पाये द्रिष्टीस पडतील * * * तो सुदिन सोनियाचा होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Devrao Meghsham Lapate after describing the horrors inflicted by the Abdali on Delhi and the hardships endured by the Emperor's family gives his surmise as to the future plans of the Abdali.

No. 105] [पौ 12-3-1757

पौ छ २१ जमादिलाखर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. पत्रे लिहून लखोटा जालियावरी माणसें रवाना जालियावरीचे वर्तमान. आबदाली खासा दिलीस दाखल जाले. तमाम शहराभोवत्या फौजा आहेत. आम्ही त्यांची आतांच एक चौकी दोन हजार फौजची बुडविली. तीन कोस आम्ही शहरापासून होतों. तेथे चालोन आले. मागती पाठीवरी दोन कोस घेऊन मग वेढले. परंतु दोन हजार झाडून बुडविले. त्यात दोन प्रहरा सारे फौजेची शर्त वेचली. निसत्व फौज जाली, तेव्हां हजार बारासे मारिले. हजार घोडे सापडले. वरकड त्यानी घोडी मारि(ली) वरकड जखमी गेले. परंतु दोन हजार बुडवावयासी सारे फौजेस जीवेप्राणे मेहनत करावी लागली. मग सरून साहा कोसावरी जाऊन आताच उतरलो. पातशाहा पुत्रासमेत बुरजामधें चिणले. वजीर व खानखाना त्याचा मामा यासी आबदालीने आपल्याजवल ठेविले आहेत. दोन क्रोड रुपये वजिरास लाविले व येक क्रोड खानखानास लाविले. शहरास दोन क्रोड लाविले आहेत. शहरात पनास लाख मिलता कठीण. वजीर खानखानाने साफ सांगितले की आमचे घरचा झाडा घेणे नाहीं तरी जाटावरी चालणे, पाच क्रोड रुपये देवितो. याप्रा। जाबसाल होऊन किल्यात दाखल जाले. कुतबा पढले. द्वाही शहरात फिरविली. नजीबखान

रोहिले यासी कारभार शहरचा वगैरे सोपला आहे. त्याजवरी फार मेहरवानी आहे. याप्रा जाले. बापू वकील यानी स्वामीची आर्जी दिल्ही कीं बालाजी-रायाचा वकील मी आहे. ते लाख फौजनिसी चाकरीस येतात. तमाम मुल्ख पातशाही सोडून देतात. याप्रा स्वामीच्या नावाची व सिकीयाची आर्जी दिल्ही. त्याचे दुसरे दिवसी हे फौज दोन हजार पठाण बुडविले. तेव्हा बापूस सांगून पाठविले की हा गनीम कोण आहे ? बापूने सांगितले हे वजिरांचा चाकर आहे. त्याजवरी जा(हा)नखान दाहा हजार फौजनिसी पाठऊन धरून आणा. किल्याच्या दरवाजियासी चौकीवरी पारसनीस आहे त्यास पनास देऊन दिवसाचे दिवस वर्तमान आम्हास लिहित असतो. बहुधा सुरजमल सारा मुल्क सोडून थोर जागे मात्र बलावील. नाही तरी नजीबखानाचे हते पैका देईल ते पाहावे. जरी करिता श्रीमंत राजश्री दादासाहेब सरदार लौकर पावत नाहीत तरी दोन महिनियात जाट राजे याची मामलत जाली आणि सारे येकवट जाले तरी परम कठीण पडेल. आता सत्वर येते तरी जाट राजे वगैरे राहिले ते सामील होऊन यासी काढून दिलीहून देतील. सर्वानी राजियानी व जाटानी आमच्या लोकानी तमासाच पाहिला कीं काये होते. परंतु दिलीचे फाटक होते तोवर सर्वास बरे होते. आता फाटक तुटले. धरणीकंप जाला. आता काही उतम नाहीं. तथापि आताहि समसेरबाहादर नारोपंत गोविंदपंताचे पुत्र वगैरे जमा होते तरी ते दाहा हजार आम्ही दाहा हजार वीस हजार येक जालियास जाट आजी सिध आहे. जाट आम्ही बोलावलियावरी जिल्हा जाटाचा आम्ही राखू. परंतु सर्वाच आम्ही करावे मग परत करावी तरी आम्ही येथून निघता याचे राहाणेच कठीण आहे. अंतरवेदीत जाणे त्याचे जाले तऱ्ही बरे. सर्वानी तमाशाच पाहावा तरी सारा तमाशाच होईल. हे कोणाच्या ध्यानात येत नाही. जरीकरिता सुरजमल पैका देऊन त्याचा चाकर होत नाही तरी आम्ही त्यास मिळून येक मास थांबाथाब श्रीमंत व सरदार ये तोवरी करितो. जरीकरिता जाट धर न धरीच, मिळाला तरी मग आमची जड कोठवरी ? थारा कैसा धरावा ? तेव्हा मग निघावेसेच होईल. आमचे सरदार आहेत त्याच्या मते हे दिलीस गेले यानी आबदाली फते येक-ल्यानीच घ्यावी तर लाखों फौजा तीन पातशाहात जिंतून हिंदुस्थानची पातशाही घेतली. धरणीकंप जाला. दोनसे दोनसे कोसावरी वीस हजार फौजचे धणी सुज्यातदौला जाट, माधोसिंग, बिजेसिंग वगैरे यासी कंप सुटला. आम्ही तरी दिलीभोवते आजी चार दिवस मारामार करीत आहो. जे आम्ही केले व करितो त्याचे चौथा वाटा आमचा येकच सरदार येऊन करिता तरी फारच होती. ती

हिमत सर्वांची कळून चुकली. स्वामीस मात्र बहुताचा भरवसा, परंतु येका पासूनही औघड काम घडले नाही व पुढेही घडणे दूरच आहे. हे येक रा मल्हारजी होळकर व राजश्री दताजी सिंदे याचीच आहेत. वरकडास दूर आहे. त्यांचा शागिर्द सेवक आपल्या जीवापेक्षा सिध्र आहे. सारांश जरीकरिता श्रीमत फौजा सरदार सत्वर येत नाहीत तरी हिंदुस्थानचा सरकारच्या मुलुकाची फजिती होईल आणि सारे येकवट जालियावरी फार भारी पडेल. फार करून आम्ही राजे व जाट यांसी सल्लख राखोन महिना पंधरा दिवस फुटोन देत नाहीं, परंतु दिवसगत जालिया उतम नाही. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Antaji Manakeshwar to the Peshwa, giving news of the doings of the Abdali at Delhi.*

No. 106] [*13-3-1757*

[वरील मजकूर फाटला.]

(म)नास संतोष जाहला. पत्री लि * * * * * च्या प्रयेत्नात * * बहुत दिवस बै * * * त्यास छ १७ जमादिलावली किला हस्तगत जाहला. हे संतोषाचे वृत साहेबास कलावे म्हणौन पत्रीं लिहिलेवरून परम हरशोत्करष चितास जाहला. आपण येशस्वी दिग्विजयी प्रतापी पराक्रमीच आहा. याचप्रमाणें तुम्हासी श्रीभवानीशंकर येश सदोदित प्राप्त करील. इरान पठाण लाहोर मुलतान आदिकरून अमल करीत दिलीनजीक पाच कोसावरी येऊन् सालेमारबागात उतरला. दिलीवाला अर्कात[1] आहे. किला खाली करून देणे किंवा युधासी उभे राहाणे म्हणतात. दिलीवालेत काही युधाचा व्होष राहिला नाही. हिंदुस्थानचे रजपूत तिकडील संधानात आहेत म्हणौन तपसिले लिहिले ते श्रवण जाहले. ही गोस्टी आपण समजेसांत आणिलें नसालच. दुसरी गोष्टी राजश्री रघुनाथपंत तिकडे मोहिंमेस गेले आहेत. कोंणप्रसंग कसा हे काही कलत नाही. आपण कर्नाटकांत बहुत दिवस न गुंतता या रानी येऊन मातबर फौज पंत मारनिलेच्या उपरालेस रवाना करून पाठऊन द्यावी. कदाचित इरानी पठाण रजपुताची गोस्टी यैकून वक्रता चितांत आणील तरी त्याच्याहि येशाच्या संभावितेस आपणच पात्र आहेत. ईस्वर आपल्यासच येशकीर्ति देईल; परंतु उपायास व्यवधान नसावे यास्तव हे पत्र लिहिलं आसे. साहेबाच्या चितात आपल्यास दरशन अविलंबेकरून द्यावे; आणि तुमचे विजय

---

१ बाले किला.

आलंकार आवलोकन करावे हेच सर्वात्मना आहे. येविसींचा आर्थ राजश्री शेषो नारायेण यासी आज्ञा केली आहे त्यावरून कळेल. जाणिजे रा छ २२ माहे जमादिलाखर बहुत लिहिणे तरी आपण सूज्ञ आसां.

लेखन
सीमा.

¶*The writer exhorts the addressee to return from the Karnatak at once and to proceed to the North to give succour to Raghunathrao in fighting against the Pathans.*

No. 107] [*16-3-1757*

पौ चैत्र शुध पंचमी

श्रीपांडुरंग

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

पोष्य रामराव नीलकंठ कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत फाल्गुण वद्य ११ पावेतों यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेहावयास आज्ञा केली पाहिजे विशेष. इकडील हिंदुस्थान प्रांतीचें वर्तमान पठाणाचे सावकारी नवा रोजाचे छेडे आगरे जयपुरचे आले. पेशजीं वर्तमान आपणास लिहिलें होतें कीं माघारा गेला. * * * * दोन मजलीपलीकडे जाऊन द्रव्य मार्गस्त केलें आणि तेथोन परतला ते मथुरा येऊन मारली. प्रहरपर्यंत कतलाम केला. येणेप्रमाणें माहा आनर्थ जाला. जाटाचे फौजेने सिकस्त खाऊन किलेदाखल जाला. राजश्री शमशेरबहादर व नारो शंकर आंताजी माणकेश्वर आगऱ्यावर आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब व मलारजीबावा रामपुऱ्याच्या राणांत आहेत. फौज जमा जाली नाहीं. याप्रमाणें वर्तमान सावकाऱ्यांत आलें तें सेवेसीं लेखन केले असे. इकडील लोक वसवास फार करितात. पुन्हां वर्तमान आलियावर वरचेवर लिहीत जाऊं. आपणांकडील विस्तारें वृत्त सदैव लेखन करीत असावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramrao Nilkanth writes news from the North to the Bhausaheb: "Raghunathrao and Malharrao are at Rampura and Samsher Bahadur, Naro Shanker and Antaji Manakeshwar are at Agra."*

No. 108] [28-3-1757

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ ७ रजबूपावतों वर्तमान यथास्थित असे विशेष. शहरींहून चैत्र शुध द्वितीयेचें पत्र कृष्णाजी भैरव थथे याचे चैत्र शुध शष्टीस पुण्यास आलें. त्यांत मजकूर, दिलीमधें पठाणानें अमिराच्या वगैरे मातबर लोकांच्या हवेल्या खटल्या. त्याजमधें पंचवीस कोटी धन प्राप्त जाले. यासिवाय जवाहीर सांपडलें. त्यास पठाणानें आपल्या लेकाबराबर दहा हजार फौज देऊन द्रव्य व उत्तम हस्ती व घोडे वगैरे जिनस व बुणगे सर्व लाहोरास रवाना केलें. आपण निघोन जाटावर येतों हा दबाव घातला आहे. दिलीपासून बारा कोस फरिदाबाद आहे तेथें येऊन कर्तलाम[1] केले. मुलकांत दबाव घातला आहे. त्या प्रांती पल सुटला. मुल्लक उज्याड होतो. मथुरेस लोक होते ते सर्व पलाले. आगऱ्यातील लोक तेही पलतात. गनीम वीस हजारपावेतों जवलच आहेत व जाटाची फौज पंधरा हजार आहे. परंतु यांच्यानें कांहीं होत नाहीं. पठाणापासी वीस हजार फौज आहे व दिलींत पंचवीस हजार फौज चाकर ठेविली. श्रीमंत राजश्री दादासाहेब व मल्हारजी होलकर जयनगरानजीक तिसा कोसावर जाऊन पोहचले असें वर्तमान लिहिलें होते त्यावरून सेवेसी लिहिले असे. दुसरा मजकूर रघुनाथ नाईक नवाले याचें पत्र नासिकाहून पुण्यास आलें. त्यांत मजकूर कीं वकिलानी पठाणाची बदनजर पाहिली याजकरितां दिलीतून रात्रीस पलोन आगऱ्यास आले याप्रमाणे लिहिलें होतें. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*This letter refers to the rich spoils which Ahmadshah Abdali secured when he plundered Delhi during his third invasion.*

No. 109] [March 1757

श्री

पुा[2] श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. आज्ञापत्री आज्ञा, बालाजी गोविंद याचे आज्ञेप्राा वर्तणूक करणे. तरी प्रस्तु(त) आबदालीचे लढाईत आहो; यातून जगलो तरी देशी येऊन; देशी

---

१ सर्रास कत्तल. २ पत्र अंताजी माणकेश्वराचें.

आलियाउपरी सरदारी करणेचे कपाली आसली तरी बालाजी गोविंदाच्या आज्ञेप्रा वर्तणूक करून. सन इसनेत दिलीत गेलो, पातशाहानी साहेबतैनात माही-मरातीब दिल्हे. स्वामीस पुसिले त्याची उतरे स्वामीनी दाहा वेळा लिहिली की, नौबतीस या सरंजामास दाहा हजार फौज आसावी, त्याची जागीर मेळवावी म्हणजे तुमची सरदारी कायेम, यैसी दाहा पत्रे मजपासी आहेत. त्याजवरी पातशाही खालसे इटावे, फर्कुद, शुकुवाबाद, कालिंज पातशाही ते नाना प्रकारे छेद करून जागीर करून घेतली. मागती श्रीमंत रा दादासाहेबी कृपा करून आम्हास सरकारचे सिकियानसी जागीर दिल्ही. त्याप्रा पुणियात स्वामीनी कृपालु होऊन सनदा दिल्ह्या. आम्ही आपली खुशीने गोविंद बलाल कमाविसदार केला, त्याची फले आम्हास याप्रा प्राप्त जाहाली. आसो. श्रीमंत रा दादासाहेबी व स्वामीनी मजला दाहा वेळ वचन दिल्हे आहे जे तुम्ही जितका जागा आपल्यास परभारे मेळऊन आणाल तो तुमचा तुम्हास द्यावा. आमच्या पदरास झट मात्र न आणावें. त्याजवरून थोडे बहुत मेळविले. आपणहि दोन वर्षे कृपा करून चालविले. पुढे वीस हजार फौजेची जागा मेळऊन वीस हजार फौजनसी चाकरी करावी, लोकासारखे सरकारचा खालसा मुलूक जागीर न मागावा यैसे उमेद; त्यास आम्हास हा नतिजा, यैसे हरामखोर चाकर आम्ही! येवढी इतराजीच तरी आमचेच काये मरते? त्यास दीड महिना आबदालीस लढाई करितो. हजारो घोडे माणूस कामास आले. शंभर कागद ज्यास पाठविले त्यानी शंभर पनासा कोसावरी आसावे, इकडे तोंड न करावे, त्याजवरी मेहरवानी!! आम्ही मरावे, येवढे ढाल डोईवरी घ्यावे तेथे प्राप्त सुलाची पोली होईल त्याजला खावद दुसरा, यैसेच आपले कपाल निवडले त्यास स्वामीस दोश काये? सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Antaji Manakeshwar remonstrates with the Peshwa upon having confiscated his jagir in the Doab granted to him by the Emperor for his meritorious services.*

No. 110] [*March-April 1757*

2

सेवेसी विज्ञापना. सेवकाचा दुराग्रह की गढ्या न घ्याव्या तरी तेहि नाही. तूर्त अबदालीच्या पिछाडीस च्यार रोजचालीन हलका जाला. रोहिले फुटतील, वरकड फुटतील तरी फतेच होईल. नाही तरी तो लाहोरास जाईल. आपण त्याचे मागे मागे करनालपर्यंत गेलियाने हिंदुस्थानास कीर्ति होईल. पुढे अखेरसाल दोन महिनियाने आले. मग जैपूरच्या रानात छावणी करून

मुल्क जप्त केला तरी चिंता काये? केवल गढियास लागावे तेव्हां मास पक्ष येथेच गेला. ते अबदालीसाठी धावोन आला ऐसे लोकास दिसणार नाही. रोहिले जाट वगैरे याजवरी इभरत राहणार नाही. सुचला अर्थ लिहिला आहे. रागास न यावे. आपल्या चितास येईल त्याप्राा कर्तव्य ते करावे. सेवक लोकांनी सुचली गोष्टी ती विनंती करीत असावी. करणे न करणे खावंदाचा येख्तार. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Manakeshwar counsels Raghoba not to linger in Rajputana but boldly to start in pursuit of the Abdali if Maratha prestige is to be maintained.*

No. 111] *[5-4-1757 ?*

श्री

विनंती सेवक अंताजी माणकेस्वर कृतानेक साां नमस्कार विज्ञापना यैसीजे. स्वामीचे आज्ञापत्र शंकराजी राम याजबाा आले. तेथे आज्ञा कीं हुजूर येणे. येसियासी सेवकास आज्ञेखेरीज दुसरा विचार नये. परंतु सरकारचे हतीं २ दोन त्यास आजार बहुत जाला. तलावरून सुटत नाहीत. मातबर हती टाकिता येत नाहीं. उपाये बहुत केले. येका दो दिवसा थोडीसी फुरसत होताच सेवेसी शनिवारी दाखल होतो. अबदाली खासा वृंदावनावरी होता. नजीबखान मथुरेवरी. जाहानखान आगरियात. सरवरखान ढवलपुरीं. ते सर्वत्र येकत्र मथुरेस जाले. तेथून दिलीस दरकूच गेले. पाच लाख रुपये सुरजमलानी अबदालीस नजर कबूल केली. दोन लाख रुपये मुतसदियास. रुपये येकूण सात लाख रुपये करार जाटानी जुगुलकिसोर याचे विद्यमाने करार केले. त्यांची बशर्त दिलीस जावे तेव्हा निमे द्यावे. दिलीहून पुढील मजलीवरी निमे याप्राा करार करून जुगुलकिसोर व येक येलेची[1] ठेऊन घेतला. कवडी देईल यैसे तो नाही; परंतु याप्राा ठराव जाला. अगरियाचा किलेदार भांडला. रयतपुरे च्यार मारिले. साहुकारांनी पाच लाख करार केला. वसूल दिलीस गेलियावरी देऊन यैसा करार केला. गाजदीखान आगरियांस किला खाली करावयांसी आला होता. जानहखान आगरियातून मथुरेस आला तेव्हा गाजदीखान अंतरवेदीत गेला. अबदालीची गाट तोडिलीसी जाली. पुढे फरकाबादेस जाईल कीं मधे राहील न कले. दिलीस च्यार जोडीं रवाना केले तेथे आम्हाकडील वकील अबदालीच्या लस्कारात इरानचा त्याचा आप्तविसी आम्हाकडे वरीसभर चाकर आहे. तो तेथे

---

१ वकील.

आहे. दिलीहून कूच जालियाची खबर येताच सेवेसी पावती होईल. याउपरी खावंदाची मर्जी असली तरी दिलीच्या रोखे थोडे थोडे चलावे. तोहीं अनायासें दिलीहूनही जाईल. स्वामीची सलाबत भारी पडली म्हणून त्याने माघारें घेतले. स्वामीची मर्जी दिलीकडे चलावयाची असली तरी रस्ता कामाचा नाहीं. ज्या मार्गे अबदाली आला गेला त्या मार्गे दोन सेर दाणें व वैरण मिळणार नाही. उजवे हाते टाकून चारा दाणा पाहून चालावें. अबदालीपासून हमेशा जाहनखानाची फौज लाहोरा ता पंधरा कोस हमेशा पुढे चालत असे. पुढील चौकसी करून नित्य बातनी ल्याहावी याप्रा सेवकास आज्ञा जाली तरी पुढे पंधरा कोस ज्या रोखे आज्ञा होईल त्या रोखे चालोन पुढील मजली मजलीची चौकसी करून सेवेसी पाठऊन. अबदालीचा पुत्र खजिना घेऊन लाहोरास जात होता त्यामार्गी आला जांट याने आडवा जाला तो माघारा सरून गडमुक्तेस्वराकडे आला. बहुधा येकच होतील. सेवकाचे विचारे जेनगर प्रांती गढियांस लागावे हे तूर्त नाही. तूर्त त्याच्या शहांस मार्गे असावे येसे आहे. त्यास स्वामी खावंद आहेत. जे खावंदाची मर्जी असेल तें सेवकाचीं संतोश. विनंती रा शंकराजी राम करितील त्याची आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. याउपरी जैसी आज्ञा येईल ते सेवकास प्रमाण. बातमीस जागा जागा पनास कासीद आहेत. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Manakeshwar reports the movements of Ahmedshah's forces to Raghoba and asks him to start immediately in pursuit.*

No. 112] [*5-4-1757*

पौ छ १९ रजब

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आंताजी माणकेस्वर कृतानेक सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता चैत्र वद्य १ प्रतिपदा सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विषष. स्वामींचे आज्ञापत्र आले तेथे आज्ञा की आबदालीची बातनीची चौकसी करून बातमी वरचेवरी लिहीत जाणे. त्याजवरून बातमीची चौकसी उतम प्रकारे केली आहे. नेहमी आबदालीच्या लस्करास वकील इरानचा भला माणूस मातबर चाकर आम्हाजवळ आज आठ महिने (आहे) * * * नेहमीच त्याच्या लस्करास * * * * (जा ?) टाचे घरी डाककारकून नेहमी

(बसविला आहे). आगरियात व रोहिल्याचे घरी नेहमी कारकून आहेत. पनास जोडी कासीद नेहमीच आहेत ते सर्व जागीजागा आहेतच. प्रस्तुत आबदालीचा जाहनखान सरदार आगरियावरी होता. काही लोक दवलपुरी होते ते मथुरेस आले. मथुरा वृंदावनावरी खासा व रोहिले होते ते सर्वत्र एकत्र होऊन कूच करून दिलीस गेले. पुढे दिलीस राहातील किंवा जातील याजकरिता च्यार जोडी कासीद दिलीस वकिलाकडे आमच्या आम्ही रवाना केले आहेत * * * * * * * * * * * * * आहे. येका दोन रोजा फुरसत जालियास आम्ही सेवेसी येतो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Abdali's march back to Delhi from Muttra and Brindaban is reported by Antaji to Raghoba.*

No. 113] [*6-4-1757*

(वरील भाग फाटलेला आहे.)

विनंती. सेवक अंताजी माणकेस्वर कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ता। चैत्र वद्य द्वितीया सौम्यवासर मुकाम मल्हारण स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. येक दोन पत्रे स्वामीची आली तेथे आज्ञा कीं कूच करून हुजूर येणे. त्यावर पत्रदर्शनी यावें परंतु दोन हतीस आजार बहुत जाला. औषध उपाये बहुत केला. त्यामुले दोन मुकाम जाले. काली मंगलवारी कूच केले. आजी मुकाम मजकुरास आलो. शुक्रवारी सेवेसी दाखले होतो वि[फाटले]

¶*Antaji Manakeshwar is repairing to the presence of Raghoba.*

No. 114] [*Date of receipt 20-4-1757*

पैा छ १ शाबान

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री बापूसाहेब
स्वामीचे शेवेसी

सेवक रावो लक्ष्मण कृतानेक सां। नमस्कार विनंती विज्ञापना यैसीजे. पहिल्या पत्रावरून वर्तमान ध्यानास येईल व आम्हांसमागमें श्रीमंताचे पत्र नवाबास होते तेथे मार लिा होता कीं सरदारांचा व तुमच्या वडिलाचा कौलकरार आहे तोच आमचा आहे. त्याजवरून नवाबानी आम्हांस पुसिलें कीं आमच्या चितांत श्रीमंत रवुनाथरावजीसी कौलकरार करावयाचे आहे. तुम्हांसमागमें बेलभंडार पाठविला असेल तर आम्हांस देणें व आम्ही आपली नानरोटी रावजीस देतों.

त्यास आम्हांस कांहीं श्रीमंताची आज्ञा शफतप्रमाण करणें म्हणोन नवती. बेलभंडाराची गोष्ट आंम्ही आपल्या मतें कैसी करावी ? हे ध्यानास आणून नवाबांसी उतर केले कीं आम्हांस श्रीमंताची आज्ञा आहे कीं जे गोष्टींत नवाबाची खातरजमा होईल ते करणें. परंतु श्रीमंताच्या व आपल्या भेटीस बहुत दिवस लागत नाहींत. हे गोष्ट रुबरूच[१] जाली तर बहुतच उतम आहे. दुतर्फा खातरजमा आहे. त्याच्या चितांत की शफतप्रमाण भेटीपूर्वींच करावें. आमच्याहि चितांत होते कीं ये गोष्टींत उतमच आहे. कांही आपलें नासत नाहीं. याचा निग्रहच पाहिला तर शफतप्रमाण करावे. आपले ममतेत याजला ओढावें. इतकियांत नवाबास कोण्ही सांगितले कीं तुम्हीं श्रीमंतासी नवा शफत करितां येणेकडून राजश्री सुभेदारांस विशम वाटेल. जर हेच गोष्ट करणे आहे तर सुभेदाराच्या विद्यमाने करावी. याजवरून तूर्त हे गोष्ट राहिली. आम्हीं श्रीमंतासहि लिहिलें आहे कीं आज्ञा होईल तर शफत (प्रमाण) करून घेऊन. त्यास सांप्रत स्वामीचे आगमन * टीहि होतील हे गोष्ट स्वामीनीच करून द्यावी. दुसरे स्वामीकडे आम्हास पाठवीत होते. तेथे हाच विक्षेप घालणारानी घातला कीं केवल श्रीमंताकडेच जाबसाल लागला तर सुभेदारास वाईट वाटेल. यास्तव भवानीदासास पाठविले असे कीं जाबसाल करणे तो त्याच्या विच्यारें करावा. त्यास आम्हीं स्वामीचे येथें असतां परभारा जाबसाल होऊ लागलियावर स्वामीचे तर्फेने असलियाचा वकर[२] काय ? तर हे गोष्ट स्वामीचे हांतीच आहे. जे ग्रहस्त स्वामीपासीं जाबसालास येतील त्याजला सांगावें कीं तुम्हीं आलांत आणि आमचा वकील काय म्हणोन नाही आला ? हे गोष्ट कार्याची नाहीं. नवाब रुबरू आमच्या वकिलास सांगतील आणि वकील येऊन आम्हांस सांगतील तेव्हांच आमची खातरजमा आहे दोन च्यार दिवस आधिकआगले ये गोष्टीकरिता जाबसालामुलें लागतील परंतु स्वामीचे आम्हीं येथें आहोंत हे पुरते ध्यानास येईल. गंगातीरपावेतों स्वारी येऊ द्यावी. तेथून हे गोष्ट जाल्याविना आलीकडे उतरावयाची तजवीज न केली तर सहजच आम्हांस पाठवितील. याजलां अद्याप सरकारची कैद कांहींच ठाऊक नाहीं. ज्यांस जाणतात त्यासच जाणतात. आम्ही विनंती केली ते आपणाकरितां केली नाहीं. सरकारचे कैदेकरितां केली असे. स्वामी सर्वज्ञ आहेत. ध्यानास येईल तें करावे. स्वामीपासून पत्रे नवाबास येतील तें आम्हांकडेच पाठवीत जावी. हें पत्र वाचून ध्यांनातच

---

१ समक्ष. २ प्रतिष्ठा.

आशये ठेवावा. आम्हास अद्याप नवाबानी खर्चास येक पैसा दिल्हा नाहीं. तर चिंता काय आहे ? जाबसाल आमचे हाती असल्याने सर्व होईल. सर्वाविशई स्वामित्व स्वामीचें आहे. वरकडाच्या मनसुब्याने काय होते ? नवाबांसी शफत प्रमाण करणें आहे तर नवाबास येक पत्र ल्याहावें कीं आम्हीं वकिलांस सांगितलेंच होतें कीं जे गोष्टीत नवाबाची खातरजमा होये ते गोष्टीचा शफतप्रमाण करणें. करार हाच कीं पूर्वी तुमच्या वडिलाचा व सरदारांचा कौलकरार आहे तो आम्हास प्रमाण. तेणेप्राा तुम्हीं व आम्हीं चालावें व पुढें नवा मनसबा जो होईल तेथे तुमच्या व आमच्या विचारें ठहरेल तैसें करीत जावें. येविशई आम्ही श्रीमंतास विनंतीपत्र लिहिलें आहे. श्रीमंताचे पत्र येविशई स्वामीस येईल. नवाबानी स्वामीस पत्र लिहिविलें आहे ते तयार जालियावर सेवेसी पाठवितों. व गाजुदीखानाकडील सलुखांचे वर्तमान पुरते कललें म्हणजे लिहून पाठवितों. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ragho Laxman reports talks with Nawab Shuja-ud-dowla. "The Nawab", he says, "is anxious for a close alliance directly with you but is advised that such an act would incense Holkar". The writer requests Bapu to see to it that he is not ignored.*

No. 115] [*23-4-1757*

श्री

श्रीमंत राजश्री सखारामपंत बापू स्वामीचे सेवेसी

पोा गोपाळराव बापूजी सांा नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ ४ साबान मुकाम कसबे सिवली प्रांत आंतरवेद येथास्तित आसे विशेष. इकडील सविस्तर वर्तमान श्रीमंताचे पत्रावरून निवेदन होईल. सारांष आंतरवेदीतील आमल उठला. राा बालाजी गोविंद यावर शह पुर्ता दिल्हा. त्यानी आम्ही येक व्हावे तरी आम्हाकडेहि फौज रवाना केली. ते भारी. आमचे सामान थोडके. तथापि खावंदाचे प्रतापे येक वेळ गांठी घालितो. खासा स्वारी अथवा फौज या प्रांते आल्याविना या जाग्याची स्तित राहत नाही. गाजदीखान व पठाण यानी येसमई आगापिछा ध्यानास आणिला नाही. याचे पारपत्य जाल्याखेरीज आमल राहत नाहीं. विदित जाले पाहिजे. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sakharam Bapu is informed that Ghaziuddin and the Rohillas have captured Maratha posts in the Doab.*

No. 116] [23-4-1757

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांप्रति

वासुदेव दीक्षित अनेक आसीर्वाद उपरी. येथील क्षेम वेशाख शुध ९ मंदवार जाणऊन स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. दिलीकडील वर्तमान नवाब सलाबतजंग यांचा वकील नागरमल याजकडून अठरा दिवसांनी जोडी कासदांची अवरंगाबादेस आली ती त्यांजकडे पुढें गेली, त्याचे वर्तमान वलजी मिर्धा कासदांचा याणे जबानी सांगितलें कीं पठाणाचा लेक खजाना घेऊन जात होता त्यास वाटेमध्यें दिलीपलाकडे शंभरा कोसांवर 'सीनद म्हणोन जागा तेथील आला जाट व नानकपंथी सीख असे एकत्र होऊन बळ बांधोन पठाणाचे लेकास आडवे होऊन मारून घेतला. खजाना अवघा घेतला. मात्रेरकोट म्हणून जागा लाहोरचे सुभ्याची होती, तेथे गाठी घातली, त्याजला मारिलें, खजाना घेतला, फौज लुटली, हें वर्तमान या पठाणास कळतां हा तिकडे चालिला. तेव्हां सुरजमल जाट फौजबंदी करून पठाणामागें लागला आहे. गाजदीखान दोघा शहाजादियास घेऊन वेगळा होऊन राहिला. या प्रकारचें वर्तमान मिरध्यानें सांगितलें. आपणांस कळावें म्हणून लिहिले असे. बहुत काय लिहिणे हें आशीर्वाद.

¶*News-letter from Vasudeo Dikshit to the Peshwa reporting the defeat and death of the son of the Abdali near Sirhind.*

No. 117] [30-4-1757

श्रीकृष्णोजयति

श्रीमंत माहाराज राजश्री पंडितप्रधान बालाजीराव
स्वामीचे सेवेसी

शुभचिंतक स्नेहांकित राजा केशवराऊ कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ ११ माहे साबान मुकाम झांसी जाणून स्वकुशललेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. काली छ १० साबानी सविस्तर वर्तमानाचें पत्र पाठविले आहे. औरंगाबादेहून चिरंजीव राऊ मुकुंदराऊ सेवेसी रा। केलियावरी पावलेच असेल. वरचेवरी लिहावयास अंतर पडत नाहीं. सांप्रती अबदाली पठाण दिलीहून सरहिंद लाहोरचे मार्गे गेला. परंतु जाता जाता जे जे मार्गी हरगात्र कसबे येताती ते मारून कतल करून लुटून जातो. पैका व घोडा व उंट व बईल हती पार सोडीत नाही. गरमीकरितां त्याचे लोक बहुत मरताती व

आजारी होताती व याचे मुलकातही कोण्ही दुंदी झाला म्हणून जातो असे म्हणताती. मागती परतून येणार हेही म्हणताती. व दिलीत नजीबखान जो वजीराचा पूर्वी चाकर होता व सहारनपुरचा मुल्क त्यास दिधला व फौजदारी दिधली त्याने जागिरा लोकाच्या जबत[१] करून सर्व मुलक आपले खाले खाले घेऊन अबदाली येतांच त्यास भेटून त्याजपासून मीरबक्षीगिरी दिलीच्या पातशाहाची करून घेतली. पंधरा वीस हजार त्याजपासी आहे. तो दिलीत आहे. पातशाह त्याजआधीन आहे. पातशाहापासी फौज नाही. नांवास मात्र आहे व इकडील मुलकास आबदाली प्रसन होऊन, विजारत खानखानास दिधली होती, ते मागती बाहाल करून दोन्ही पातशाहजादे दिलीचे पातशाहाचे लेक त्याजबाा देऊन अंतरवेदाकडे पाठविले होते तो तिकडेच आहे. अहमदखान बंगश फरुखाबादचा त्यास भेटला व अलीमाादाचे लेक व हाफीज अहमद त्याजकडे रुजू झाले. सुजाउदौला नाजीम अवध प्रयागहि जवाबस्वाल त्यासी करितो परंतु भेटत नाहीं. त्याचा जाबसाल राऊ मल्हार होलकराकडे आहे. असो. सर्व पठाणास अबदालीची हिमायेत[२] जाली. वजीरहि प्रस्तुत त्यामधेच मिलाला. याजकरिता अंतरवेदीतून ठाणी महाराष्ट्राची लुटली व लुटत जाताती. हे वर्तमान आम्ही वरचावरी श्रीमंत रघुनाथराऊ दादा व मल्हारराऊ यांस वरचावरी लिहितो. त्याचे उतर आम्हास आले की जयेपुराकडील काम करून मग दिलीस जाऊ. पाहावे कधी येताती. रोहिले जयेपुराकडील कामकाज जालियावरी आगरियाकडे येत तरी आगरियाजवल येमुना उतरतील म्हणजे अंतरवेदचा अमल आपला राहील. पाहावे काये करिताती. दिलीकडे गेले तरी नजीबखानाचे पारपत्य जालियावाचून दिलीचे काम काही होणार नाही. सारांश जोवरी अबदाली जोवरी परतून (न) ये तोंवरीच इकडील काम जे होणे ते करावे व हे पठाण रोहिले मोडावे. तो जरी आला व हे व ते येक जालियावरी मग मोठ सामान व मोठी फौज पाहिजे. माहाराजास तेथून आणिखी इतकीच फौज व सरंजाम पाठविलियावाचून मुकाबिला चांगला अबदालीचा घेवणार नाही. पठाण व रोहिले सर्व येक जाले तरी फार श्रम देतील. अगोधरी पारपत्य करावे. आजी झासीत वर्तमान आइकिले व लिहीलीही आली की राहीन (?) नामे पठाण गया प्रांती आहे त्याने गया मारली. असे जालिया वारणासीस उपद्रव संभवित आहे. कोणता मुल्क आहे जेथे पठाण नाहीत? संपूर्ण दक्षणेपासून गुजरात मालवा व पूर्व संपूर्ण

---

१ जप्त २ आश्रय, आधार.

2320

पठाणानें भरली आहे! इश्वर न करो याचे राज्य हो. परम हिंदूचे द्वेशी आहेत. लाहोर मुलतान काबूल मुलतान तरी पठाणाचा मुलकच आहे. याचे जमावाबा तुरानी व इरानी मोगल नाहीत व आमची महाराष्ट्राचीहि सेना नाहीं. दुसरे ज्या सेनेत जे पठाण आहेत ते आपले पठाणाकडेच जाणावे. त्याजपासून काम होईल हे न जाणावे. याजकरता याचे पारपत्य सत्वरच केले पाहिजे, हेच सलाह आहे. माहाराज प्रतापी आहेत. सर्व होईल. परंतु आम्ही सुचावणी केलीच पाहिजे व महाराजाहि येकिलीहि पाहिजे हे विनंती.

¶*This is an important letter from Raja Keshav Rao to the Peshwa wherein the writer explains the serious situation in the North and discusses the measures the Peshwa should take to avert the danger. " The Abdali brought about revolutionary changes at Delhi. Najibkhan, the Rohilla chief who invited him to Delhi has been appointed commander-in-chief (Mir Bakshi). Gazi-ud-din has been placated by being reinstated in his former position of Vazir and has been despatched into the Doab to rid the province of the Maratha intruders. Raghoba and Malharrao are lingering uselessly at Jaipur. Only a well-equipped powerful force can cope with the situation."*

No. 118] *[April 1757*

श्री

सेवेसी विज्ञापना. दिलीकडील वर्तमान सिवराम नाईक भिडे शहरीहून पुण्यांस लिहिलें आलें की पठाणानी दिलीतील अमीर व रयत कुल लुटली. पैका दाहा क्रोडपावेतों घेतला. उतम बायका लोकांच्या व अमिरांच्या घेऊन लाहोरास रवाना केल्या. दिलीहून कूच करून फरिदाबादेवर आले. तेथे कतलाम[1] करून, तेथून कूच करून बालमगडावर आले. जाटांचे गावांस मोर्चे लाविले आहेत. आगरे व मथुरा अगदी पलाली. राजश्री समसेर बहादर व नारो शंकर व जाट व अंताजी माणकेश्वर येकत्र होऊन पठाणावर जाणार. श्रीमंत राजश्री दादासाहेब व मल्हारजी होलकर उदेपुराकडे आहेत. याप्रों शहरास वर्तमान आलें. आढललें वर्तमान सेवेसी विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. सेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*A letter giving the purport of a news-letter of Shivram Naik Bhide describing the horrid ravages perpetrated by the Pathan armies in the North. The letter also reports a possible counter-attack to be led by Samsher Bahadur, Naro Shankar, the Jats and Antaji Manakeshwar.*

---

१ सर्रास कत्तल.

No. 119] [April 1757

\+
५

सेवेसी विज्ञापना. सारांश गोष्टी मारवाडची मोहीम करून दुसाला चाकरी झाली. माहागाईने बुडालो. देशास येऊन कर्जाचा परिहार करावा तों पातशाहा वजीर अंतरवेदीत निघोन आले. सरदार कोणी नाहीं. यासमई डोईवरी घेऊन पातशाहा वजिरासी सलूख करून चाकरीस त्याच्या जाऊन त्यास माघारे दिलीस नेले. पुढे आबदालीची मोहीम प्राप्त जाली. त्यासमई चुकलो नाही. थोडाबहुत खर्च करार करून त्यास च्यार खेडी लाऊन घेऊन सनदपत्र घेतली. पुढे आमीन पाठवावे तो आबदाली येऊन सर्व विल्हेस लागला. समागमे फौज गणती आकरा साडे आकरा हजार बोली लोकांची जाजती फार त्यास यैवज आंतरवेदीची आमची जागीर इटावे शुकुराबाद फफुद त्याची कमाविसी गोविंद बल्लाळ याजकडे दोन वर्षे आमच्याच पथकास तेथील येवज पावला. येंदा (?) भाद्रपदमासी गोविंदपंत भेटले. पुत्रावरी चिठिया येवजाच्या इजारियाप्रा करून देऊन आपण देशास गेले. त्या चिठीवरी साहुकाराचा पैका घेऊन काम चालविले. तो गोविंदपंताचें पत्र त्याच्या पुत्रास व आम्हास आले की श्रीमंतानी तुम्हाकडील येवज मना करून सरकारात घेतला, तुमचा तालुका बारिला येसी सारी हरामखोरी आम्हावरीच आली. येक वरसात येका रुपयाची नेमणूक नाही. तीन साला मुलुकगिरी मेहनत याप्रकारची. नेमणूक येका रुपयाची नाहीं. वरकड चाकरानी मोठिया चाकरिया आंगेजणीच्या फार करून सरकारात मुलूक मेळऊन घातला. याजमुळे त्याजवरी कृपा, त्याची बहुमान व इतबार, त्यास पैकियाची नेमणुक वरचेवरी. आमचे पदरीची चाकरीची कांहीच आगेजणी नाही. मेलविली च्यार खेडी ती स्वामीनी कृपालु होऊन दिल्ही. त्याचे लगाम येकाचे हाती, घोडे येकाचे हाती. तोहि यैवज मना केला तेव्हा आमचे कपाल खोटे. आम्ही उदंड मेहनत केली. उदंड खेडी मेलविली. तऱ्ही आमचे कपाल याचप्रकारे. बाल गोविंद व सेट मिलोन स्वामीच्या नावावरी कर्जे हा काल देतात. त्यांचा निर्गम न जाला तरी आमचा प्राण सावकाराजवल हजीर आहे. आता कृपालु होऊन रा गोविंद बलाळ यास ताकीद होऊन आमचा जागिरीचा येवज आम्हाकडे देवावा म्हणजे थोडा बहुत भरवसा साहुकारास पुरेल. गोविंद बलाळाकडील येवज न देविला तेव्हा जागीर दूर जालीसी जाली येसीच असेल तरी ल्याहावे. आम्ही देखिली वाट आपली करून मग कर्जेदार सरदारी स्वामीची आहे. स्वामी चौकसी करून सर्व करितीलच. सेवेसी.

\+ पहिले चार बंद गहाळ.

सेवेसी विज्ञापना. श्रीमंत मातुश्री सगुणाबाई प्रयागास आली. आम्हास मथुरेस यावयाविसी लिहिले; तो हा प्रसंग. आम्ही साफ लिहीले की न येणे, काल्पीवरून जाणे. माझी निसरसांड न करिता माझी अंतरवेदीत जागीर बाहल राखोन पस्ट गोविंद बलालास ताकीद होऊन इजारियाप्रो येवज माझा मजला देविला पाहिजे. म्हणजे जुने फौजची बेगमी होईल. नवी फौजेची सिबंदी भारी जाली तरी त्यांचा ठिकाणा ज्या पातशाहीत बुडाली त्याचे नीट जालियावरी त्याजपासूनच लाऊन घेईन. पूर्वी स्वामीचे वचन होते जे तुम्हास पातशाहाने माहीमरातीब व साहेबनौबत दिल्ही म्हणता त्यास जागीर मेलवणे. ते प्रमाण करून मेलविली. स्वामींनी कृपालु होऊन ते जागीर साहेबनौबत माहीमरातीब व जागीर दिल्ही. त्याजवरी आता बारा हजार फौज परवानगीखेरीज ठेऊन पातशाही लढाईस सामील जालो. तरी याच्याच गला पडून याची जागाही थोडी बहुत करून घेईन. अंगावरी पडणार नाही. परभारे सरदारी वाढऊन, मातबर फौज ठेऊन, मातबर चाकरी करून, फौजेस जागा मेलवावी तीहि सेवकाकडे नसावी याप्रा सेवकाचे कपालाचा इनसाफ जाला तरी सारीच उमेद वारिली. रा मल्हारजीबावा व दताजीबावा आम्हास साहेबप्रा आम्हास परंतु आमच्या प्रतीचे चाकर सेवकाप्रा आणीक करितील आणि परभारे आपले सरदारीस चार खेडी मेलऊन आपले सरदारीचे बोझे खावंदावरी न टाकीत तरी मग काये पाहिजे? माझाच द्वेश सारा मुलूक कां करितो? माझी उमेद सर्वथा न मोडावी. आंतर-वेदीच्या माझ्या माहालाची सनद ताजी मजकडे पाठऊन द्यावी तरी दाहा हजार फौजनसी चाकरी करून तितका येवज मेलऊन घेऊन. मी निराश्रित गरीब चाकर, माझा कोण आहे? माझी आबरू न घ्यावी. नाउमेद मजला नाहक न करावे याची विनंती कोठवरी सेवेसी लिहून? दुसरे या पंधरा दिवसात श्रीमंत व मल्हारबा येतात तरी आबदाली बुडऊन हाच आबदालीचा पैका व दिलीचा पैका श्रीमंतास प्राप्त होतो. जाट सुज्यातदौला सर्व पादाक्रांत होऊन लाहोरचा सुभा दरोबस्त सरकारचा होतो. परंतु पंधरा दिवसात न आले तरी हे सारे बलावले तरी अनर्थ आहे. भारी पडेल. सेवेसी श्रुत होय.

¶*An incomplete letter in which Antaji Manakeshwar protests against the unfair treatment meted out to him in confiscating the revenue of the divisions assigned to him. He further on requests Raghunathrao to ride forth towards Delhi without the least delay to be in time to intercept the Abdali's homeward march.*

'No. 120] [11-5-1757

श्री

श्रीमंत राजश्री साहेब

अर्जदास्त अर्जदार बंदेगी बंदेकमीन कमतरीन बंदेगाह खेमा मिरधे रामराम विनंती विज्ञापना. येथील क्षेम तागायत वैशाख वध्य ८ सोम्यवासरे द्वितीय प्रहर साहेबाचे नेकनजरेकरूं खानाजादाच वृत्त येथास्थित असे. विनंती सांप्रत येथील वर्तमान तरी शहरचा व किल्याची सावधानीं तरतूद फार करितात. शहराबाहेर चौ हजारा स्वारानसीं त्रिवर्ग बक्षी पालीप्रमाणे रात्रंदिवस चौकीस उभे राहतात. काली मंगलवारीं प्रहर दिवसा सांगानेरास दारुगोली सा गाडे भरून पाठविले, तेथे दलेलसिंग राजावत आहेत. तेथील बंदोबस्त फार आहे. येथील मरजी बिवाडाची दिसते. तमाम पटाईत ठाकर सरदार लोक याजला प्रथक प्रथक श्रीजी बोलाऊन त्याची खातरजमा करून बेलभंडार करून घेतात. सेकावतानी येथ कृत्रिमेकरून निशानें पठापटीची सुभेदारजीच्या निशानाप्रमाणे केली आहे. आनेक प्रकारे रांगाडे उपाये करितात. दुसरे दिल्लीकडील वर्तमान तरी गाजुदीखान व शाहाजादा वजीर फरोकाबादेवर दहा पंधरा हजारा फौजेनसी आहे. गाजुदीखानानें आपल्याकडील वकील सुजावतदवले याजकडे पाठविला होता. त्यास त्याजकडील राजबारगीर गोसावी याचा चेला दहा हजार फौजेनसी दाऊगंजावर पडला आहे. त्यानें याजकडील वकील फिरविला. मागाहून सुजावतदवलाहि येणार. नवलगंजावर त्याचा मुक्काम आहे. पुढें सत्वर येणार. त्याचा व गाजुदीखानाचा बिघाड परिछिन्न जाला. कुतुबखान रोहिला लडाईत मेला म्हणून वर्तमान आले. त्याजवरून साहेबाचे शेवेशी लिहिले होत. सांप्रत वर्तमान आले कीं मोड जालियावर जिव घेऊन येमुना उतरून पार पलोन गेला. शेवेशी श्रुत होय. राजेश्री बापूजी महादेव वकील भरथपुरीहून कूच करून दिल्लीस गेले. तेथ पोहचलियाचे वर्तमान आहे. बहुत काय लिहिणे हे अर्जदास्त.

¶*News letter to the Peshwa reporting that the Rajputs of (Jaipur ?) are determined to make a stand against Holkar and are busy preparing for the action. The report further says that a clash is likely to occur between Ghazi-ud-din and Shuja-ud-daula.*

2324

No. 121] [13-5-1757

श्री

श्रीमंत राजश्री साहेब

॥ऽ अर्जदास्त अर्जदार बंदेगी बंदेकमीन कमतरीन बंदेगाह खेमा मिरधे रामराम विनंती विज्ञापना. येथील क्षेम ता। वैशाख वद्य १० भृगुवासर प्राथकाळ साहेबाचे नेकनजरेकरून खानाजादाचे वृत येथास्थित असे. विनंती. सांप्रत येथील वर्तमान तरी शहरचा किल्याचा बंदोबस्त फार करितात. सेकावत काली गुरुवारी बाहेरील डेरे उपडोन शहरात येऊन राहिले. वरक(ड)हि आपले जागा सावधाने तरतूद फार करितात. दिलीकडील वर्तमान तरी गैव्हर[1] शाहजादा दिलीहून छ २० साबानी कूच करून तालकटोरियासी डेरियात दाखल जाला. पुढेहि मजल दरमजल जयेपुराकडे येणार म्हणून वर्तमान तथ्य आहे. येथील मरजी परिछिन लढाई करावयाची आहे. साहिबाचे सेवेसी श्रुत होय. काली गुरुवारी राजे दरसाये मुसाहिब अवगड वगैरे किल्याचा बंदोबस्त करावयासी गेले होते. कळावे बहुत काय लिहिणे अर्जदास्त[2].

¶*It is not clear to whom the letter is addressed. Ali Gohar is reported to have marched out of Delhi and to be going towards Jaipur.*

No. 122] [28-5-1757

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री बापूसाहेब
स्वामीचे सेवेसी

सेवक राघो लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ ९ रमजान मुकाम दर लष्कर नवाब सुज्यायेतदौले स्वामीच्या कृपावलोकनेकरून येथास्थित असें. स्वानंदलेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशेष. येथील वर्तमान तपशीलवार श्रीमंतांचें पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून श्रुत होईल. सांप्रत त्रिंबकदासाची छ २३ साबानची अर्जी नवाबास आली कीं राजश्री बापूसाहेब व राजश्री तात्या पंचवीस हजार फौज घेऊन अंतरवेदींत येतात, याजवरून नवाब बहुत संतोष जाले कीं माझे कुमकेस आले. नवाब सर्वस्वे स्वामीचा म्हणवितो, दुसरी गोष्ट कांहीं जाणत नाहीं. नवाबांनीं आपलें पत्र खलिता श्रीमंतास दिल्हा आहे तोहि सेवेसी पाठविला असें. शफतप्रमाणचा मजकूर

---

१ अलीगौहर ? २ बातमीपत्र औरंगाबादचें.

सर्व श्रीमंतांचे पत्रीं लिहिला असें. जैशी आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करून कदाचित स्वामीचें आगमन सत्वर या प्रांतें होतें तर बहुतच उत्तमच आहे. नवाब तर दो चौ रोजा मेदीघाटावर दाखल होतात. नवाबाजवळ फौज सांप्रत हजार दाहा आहे, व जागां जागां आयोध्यां वगैरेंस फौज दाहा हजार आहे. तोफखाना हजार बाराशें जरब लहान थोर आहे; परंतु समागमें तूर्त दोनशें जरब लहान मोठी आहे; आणिक तोफखाना आणविला आहे तो येईल तेव्हां खरा. सख्य स्वामीशीं करावें हा त्याचा पूर्ण मनोदय आहे. आपण या प्रांतांत सत्वर येतात तर बहुत उत्तम आहे. पठाणावर शह मातबर पडतो, नवाबहि मार्गप्रतीक्षा करीतच आहे. बहुत काय लिहिणें सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Ragho Laxman to Sakharam Bapu to say that Shuja welcomes the timely assistance of the Marathas in his encounter with the Rohillas.*

No. 123] [*28-5-1757*

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री **दादासाहेब स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक राघो लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना ऐसीजें. सेवकाचें वर्तमान तागाईत छ ९ रमजान मुकाम अकबरपूर प्रांत लखनऊ स्वामीच्या कृपावलोकनेंकरून येथास्थित असें विशेष. नवाब सुज्यायेतदौले त्याची भेट वैशाख वद्य ९ नवमीस घेतली. स्वामीचें पत्र नवाबांस प्रविष्ट केलें. आज्ञेप्रमाणें जबानी वर्तमान निवेदन केलें. त्यास नवाब सर्व प्रकारें सलुखांत आहे. स्वामीच्या भेटीची व स्नेहाची फारशी इच्छा करितात, त्यांचा मनोदय कीं सरदारांसी स्नेह वडिलापासून आहे तोच स्नेह राउजीसी आहे; परंतु नवीन रावजींसी स्नेह व्हावा आणि शफतप्रमाण जालें म्हणजे खातरजमा जाली. कोणे गोष्टीचा मल राणार नाहीं. दोन च्यार वेळ बोलिलें कीं तुम्हांसमागमें बेलभंडार पाठविला असेल तर आम्हांस देणें. आम्ही आपली नानरोटी रावजीस देतों ते यांजला प्रविष्ट करणें. त्यास आम्ही व खूबचंद बोलिलों कीं आम्हास खावंदाची आज्ञा आहे कीं जें गोष्टींत नवाबाची खातरजमा होय तें तुम्ही करणें. आम्ही ये गोष्टींस हजरच आहोंत, परंतु श्रीमंतांची व तुमची भेट सत्वरींच होईल. रुबरुच हे गोष्ट जाली तर बहुत उत्तम. आम्हास शफतप्रमाण करणें म्हणोन आज्ञा नव्हती याजकरितां टाळाटाळ केली. नवाबाचा मनोदय तर फारसा आहे. स्वामीची आज्ञा आली पाहिजे म्हणोन येणेंप्रमाणें ठहराव केला असें. नवाबांनीं आपलें पत्र खलिता स्वामीस दिल्हा आहे ते सेवेसी पाठविला असे,

प्रविष्ट होईल. त्यांत अलाहिदी चिठ्ठी आहे. त्यांत आमचे जबानीवर लिहिलें असें त्याचा मजकूर हाच कीं भेटीअंतीं शफतप्रमाण कराल तर उत्तम; अथवा भेटीपूर्वींच वकिलाकडून कराल तर उत्तम. यावर स्वामीची आज्ञा जैशी येईल तेणेंप्रमाणें वर्तणूक करून. येविषयीं पूर्वपत्रीं विनंती लिहिली आहे. जैशी आज्ञा येईल तैशी वर्तणूक करून. शेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Ragho Laxman reports to Raghoba his conversations with Shuja-ud-daula.*

No. 124] [*25-8-1757*

पो छ ३० जिल्हेज

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक गोपाळराव गणेश कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ ९ माहे जिल्हेज स्वामीचे कृपादि(ष्टी) करून मुकाम जाजमऊ यथास्थित असो विज्ञापना. स्वामीचे आज्ञापत्र आजुरदार कासीदजोडीसमागमें रेवाडी नजीकचे मुकामीहून आले ते पावले. लिहिले वर्तमान कळो आले. पत्री आज्ञा कीं नवाब सुजातडौलास प्रस्तुत घेऊन न येणे. जाबसालाखाली गोवणे. तो दिलीवरी आल्यानंतर आज्ञा करू त्याप्रमाणें करणे. त्यास आम्ही पूर्वी च्यार दिवस जाले, जोडी सेवेसी पाठविली आहे, त्याजसमागमें वर्तमान लिहिले आहे. नवाब सुजातडौला आम्ही लखनऊस गेलियानंतर आपल्याकडे यावयासी सिधच जाला असे. पुढे अलीबेगखान याणे यावे. मागाहून मारनिलेने यावे, हा विचार ठराऊन आम्ही पुढे आलो. अलीबेगखान लखनऊहून कूच करून मोहनेस आला आहे. दो चव रोजानी जाजमऊस गंगा उतराव(या)सी येईल. तदोतर त्याजलाहि सांगणे ते सांगोन नवाबास लेहूं. विचारें करून राहिला तरी उत्तमच आहे. कदाचित आलाच तरी त्याजला घेऊन येऊं. प्रा सिंगरार राजश्री सखारामपंत बापूनीं आम्हास सांगितलें त्याप्रमाणें नवाबाजवळ सनद करून घेतली. एक निशानी खोजे तमकीनखानाची होणे राहिली आहे. त्याचा हात घोड्यावरून पडला यास्तव मोडला होता. ते सनद मागाहून येईल; आणि प्रामजकूरचा बंदोबस्त करून श्रीक्षेत्रचा मजकूर केला; परंतु प्रस्तुत स्थळ हस्तगत होत नाही. स्वामीची व नवाबाची भेटी जालियावरी भिडेने होऊन येईल अथवा जोरानें होईल. आम्ही प्रस्तुत जाजमऊस असो. मागें गर्दीमुळें नव्या दाहावीस गढ्या बद(ल)ल्या होत्या त्याचे पारपत्य करणे जरूर असे. एक मास लागेल. दसरा येथे करून पतकसुधा सेवेसी येतो. रसदीच्या ऐवजाविसी आज्ञा केली त्यास ते तजविजींत असो. सालगुदस्ताचे आफतीमुळें

सरकारात फाजील आसे. त्यासिवाय राजश्री अंताजी माणकेश्वर यांजला लक्ष रुपये दिल्हे आहेत तेहि सालमजकुरी पडतील. पथकास नालबंदी द्यावयाची आहे तेहि जिकडे आज्ञा होईल तिकडे घेतली जाईल. स्वामीस हिशेबच लिहिला तरी रागास येतील यास्तव भरणियाची तजवीज करून हुंडी पाठवितों; आणि मीहि सेवेसी मागाहून सत्वरीच येतो. बुधेलखंडांत आमानसिंग व हिंदुपत उभयेता भावासी कटाक्ष मागेच जाला. त्यास आमानसिंग कामास आला. हिंदुपत राज्य करितो. अमानसिंगाचा दुसरा भाऊ खेतसिंग तिसरा भाऊ होता, मारनिले जिवंत असतां त्यास राज्य दिले होते. त्याणे आम्हाकडे वकील पाठविला की तुम्ही फौज सुधा येऊन आमची मदत करून आम्हास राजी बसवणे आणि मुलूक निमे तुम्ही सरकारात घेणे, निमे आम्हास देणे. त्यास हे कार्य केलियानें मुलूख हस्तगत होतो. आज्ञा जालियानंतर हे कार्य करून. दीड हजार फौज आम्हाजवळ आहे. तेथून दोन हजार फौज येईल तरी उत्तम आहे. नाही तरी आम्हास आज्ञा करावी. फौज ठेऊन कार्यभाग करून सेवसी येऊं. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.+

¶*Gopal Ganesh Barve communicates to Raghunathrao that Shuja refuses to part with the holy places. He also refers to the succession affair in Bundelkhand where Khetsing is seeking Maratha help to secure for himself his father's kingdom.*

No. 125] [*3-6-1757*

पौ छ १९ रमजान

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बापू स्वामीचे
शेवेसीं

सेवक धोंडो दत्तात्रय कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ १९ माहे रमजान मुकाम मेणपुरी प्रांत अंतरवेद स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून जाणून स्वकीये कुशललेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते पावोन लिहिले वर्तमान कलले. या प्रांतीचे वर्तमान तरी गाजदीखान व पठाण सर्व फर्काबादेस आहेत. आपण लिहिले की आगऱ्याचे रोखें यावे. त्यास स्वामीची स्वारी यमुना उतरलियावर आम्हीं येऊन दाखल होऊ. इकडील

\+ गोपाळराव गणेश बर्वे, दादासाहेबाचा मेहुणा व सरदार याचें पत्र.

सविस्तर वर्तमान राजश्री बाळाजी गोविंद यांणी लिहिले आहे त्याजवरून सेवेसी विदित होईल. भेट होईल तो सुदिन आहे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ करीत असिले पाहिजें हे विनंती.

¶*Dhondo Dattatraya communicates to Sakharam Bapu the whereabouts of Ghazi-ud-din and the Rohillas and promises to join the addressee after he crosses the Jumna.*

No. 126] [*9-6-1757*

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक राघो लक्ष्मण कृतानेक साष्टांत नमस्कार विनंती विज्ञापना ऐसीजें. येथील सेवकाचें वर्तमान तागाईत छ २१ माहे रमजानपावेतों स्वामीच्या कृपावलोकनेंकरून यथास्थित असें विशेष. स्वामीनी कृपा करून आज्ञापत्र पाठविलें तें मस्तकीं वंदिलें. पत्रीं आज्ञा केली कीं अंतरवेदींत पठाण व गाजुदिखान मिळून यांनीं अमलांत खलेल केलें. सबब राजश्री सखारामपंत बापू व राजश्री विठल शिवदेव व राजश्री अंताजी माणकेश्वर व राजश्री गंगाधर येशवंत पंचवीस हजार फौज देऊन पाठविले असेत हे बंदोबस्त करितील, व नवाब सुज्यायेतदौले बहादर यानींही सामील व्हावें, भेटी व्हाव्या, कितेक कार्यें कर्तव्यें आहेत ते करावींत. ये विषयीं नवाबासहि पत्र स्वामीचें आलें तें नवाबास प्रविष्ट केलें. त्याचें उत्तर खलिता पत्र सेवेसी पाठविला असें; प्रविष्ट होईल. येथील वर्तमान तर नवाब गाजुदीखान व शहाजादे गंभीर नदीवर कुल रोहले पठाण जमा करून आहेत, व नवाब सुज्यायेतदौले गरा नदीवर कसबे सांडी येथें आहेत. यांची त्यांची तफावत आठा कोसाची आहे. युद्धाचा प्रसंग आहे. सांप्रतकालें सादुल्लाखान व दुंदेखान रोहले यांनीं नवाब सुज्यायेतदौले यांजकडे सलुखाचा पैगाम करून नवाबाचा साला सालारजंग याजला वेऊन गेले आहेत. रोज तीन जाले. सलुख कोणें प्रकारें होतो हें अद्याप कळत नाहीं. आम्हांस तर म्हणतात कीं तुमच्या फौजा येत तोंपावेतो आम्ही कालवंचना करितो. अंतरयामी सख्य करीत असतील तर न कळें. परंतु सलुखावर घातलें आहे. पाहावें काय होईल. गाजुदीखान बहुत प्रपंची आहे. आपल्या फौजा पेरोजाबादेसी कुहाबाद येथें आल्या म्हणोन ऐकतों. राजश्री बापूकडेहि पत्रें पाठविली आहेत. जर गाजुदीखानाचें पारपत्य करणें आहे तर तूर्त नवाबावर उपकार ठेऊन याजला सामील करून शत्रूचें पारपत्य करावें. नवाब गोष्टी तर बहुत सख्यतेच्या सांगतात. गाजुदीखानाशीं सख्य व्हावें ऐसें नाहीं. परंतु शाहाजाद्याच्या निमित्येंकरून सख्य होईल तर न कळें. यांचा विश्वासहि नाहीं.

सुज्यायेतदौले याजपाशीं फौज हजार पंधरा सोळा जमा जाली. तोफखाना जरब तीन च्यारशें आहे. गाजुदीखानाजवळहि फौज बारा चौदा हजार आहे. याउपरी वर्तमान होईल तें शेवेसी लिहून पाठवीन. श्रुत होय हें विज्ञापना.

¶Ragho Laxman reports the movements of Ghazi-ud-din and Shuja to Raghoba. He warns the addressee against relying too much on Shuja's alliance.

No. 127] [*9-6-1757*

पो छ १ शौवल

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री बापूसाहेब स्वामीचे सेवेसी

सेवक राघो लक्ष्मण कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २१ रमजान स्वामीच्या कृपावलोकनेंकरून येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान नवाब सुज्यायेतदौले बहादर याजपासी फौज हजार पंधरा सोळा जमा जाली. तोफखाना जरब तीनसें च्यारसें आहे. गरानदीवर काा सांडी येथें मुकाम करून आहेत व गाजुदीखान व शाहाजादें गंभीर नदीवर रोहले पठाण फौज हजार बारा चौदा जमा करून आहेत. तोफखानाहि से पनास जरब आहे. याचा त्यांचा हर्षामर्ष आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबाचें पत्र नवाबास आलें होतें कीं अंतरवेदींत पठाण गाजुदीखान यानीं अमलांत खलल केलें. सबब राजश्री सखारामपंत बापू व राजश्री गंगाधरपंत व राजश्री विठल सिवदेऊ व राजश्री अंताजी माणकेश्वर यांजला पंचेवीस हजार फौज देऊन पाठविलें असे, हे बंदोबस्त करीतील. तुम्हींहि सामील व्हावें. शत्रूचें पारपत्य करून पुढें जे जे कार्य कर्तव्य आहेत ते करावी, भेटी व्हाव्या, येसें पत्र नवाबास लिाा होते व येणेंप्राा आम्हांसहि आज्ञापत्र होतें. त्यास नवाबानी(हि) श्रीमंतास उतर लिाा कीं मजला तूर्त पार उतरावयाची फुरसत नाहीं. तूर्त लढाई रुबेकार[१] आहे. आणि नवाबानी स्वामीसहि पत्र लिहिविलें आहे कीं तुम्ही सत्वर अम्हांस सामील व्हावें. शत्रूचे पारपत्य करून गंगा उतरावयासी मेंदीघाटास यांवे. येथे नावा तयार आहेत. परंतु पत्र तयार जाले नाहीं. दरबार बहुत सुस्त. कोणे गोष्टीचा बंदोबस्त उतम दिसोन येत नाहीं. गाजुदीखानाचा व याचा तफावत आठा कोसाचा आहे. दुसरें सादुलाखान व

---

१ सन्मुख, जवळ ठेपलेली.

दुदेखान् रोहेले यानीं नवाबाकडे सलुखाचा पैगाम करून नवाबाचा शालक सालारजंग याजला आपल्यापासीं घेऊन गेले आहेत. काल हफ्ज रहमत रोहला याची व सालारजंगाची भेट होणार होती. पाहावे सव्ळूख कैसा होतो. नवाब तर बोलतात कीं मजला गाजुदीखानांसी सलूख करणें नाहीं. तुमच्या फौजा येतात तोंपावेतों कालवंचना करितों. आणि आंतरयामी सव्ळख करतील तर न कळे. तूर्त सलुखावर घातले आसे. याचा विश्वासहि पुरत नाहीं. गाजुदीखान प्रपंची आहे. युक्ति प्रयुक्तीस चुकणार नाहीं. जर त्याचें पारपत्य करणे जरूरच आहे तर कनोजेपावेतों स्वामीनी यांवे. याजलाही पुरतें कलेल. हे आले म्हणजे सलूख याचा होतो न होतो कलल. शत्रूचें पारपत्य करणें तर तूर्त याजवरच उपकार ठेवावा कीं आम्ही तुम्हाकर्ता जलद आलो. याजला सामील करून शत्रूचें पारपत्य (अपूर्ण).

¶*In the absence of a large Maratha force in the North, the Vazir with the Rohillas as his allies recaptured the Maratha outposts in the Doab and rendered Maratha rule null and void. In 1757 Raghunathrao went north at the head of a powerful army and the first thing he had to attend was the re-establishment of the Maratha posts. Vithal Sivdeo and Sakharam Bapu therefore crossed into the Doab and Shuja, the Nawab of Oudh, was requested to join forces in the campaign against the Vazir. Shuja, the reporter writes, being himself threatened by the Rohillas is prevented from coming to the assistance of Vithal Sivdeo. He is however prepared to refuse an understanding with the Vazir and hold on stubbornly, provided the Maratha force detached under Vithal Sivdeo arrives in time.*

No. 128] [*9-6-1757 ?*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक रावो लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. ताजा कलम: छ ९ रमजानीं नवाब गाजुदिखानाकडून वकील जसवंतराऊ कायेस्थ नवाब सुज्यायेतदौले याजकडे आला. रात्रौ मुलाजमत जाली. दोन च्यार घटका खलबत जालें, व हफजरहमत रोहले याजकडूनहि वकील आला आहे. सव्ळख करून येकत्र व्हावें हा मनोदय गाजुदिखानाचा आहे. रोहलेहि याच पैगामांत आहेत. पाहावें होतां काय होईल. आम्हांशी नवाब बोलिले, मजला

गाजुदिखानासी सलूख करणें नाहीं. याहिवर न कले. नवाबाचे घरीं कारभारी माणूस मातबर येख्तियारी कोण्ही नाहीं, जें करणें तें आपणच करावें; आणि आपण तर विषयासक्त! दरबार बहुतकरून करीतच नाहींत. जाबसाल लोकांचा उगवत नाहीं. फौज दाहा हजार आहे, परंतु आराम तलबी तोफखाना आहे. दोनशें तीनशे जरब लाहाण मोठी आहे, परंतु लोकांचा दुमाहा चौमाहा चढला आहे. पैसा त्याजला मिळत नाहीं. कदाचित लढाईचा प्रसंग जाला तर लोक खामखा झुंझतीलसें दिसत नाहीं, व गाजुदीखानापाशीं फौज मातबर नाहीं, की यांसी प्रसंग करावा. त्याजला बळ पठाण व रोहिल्याचें आहे. त्यांनीं चित्तावर धरिलें तर यांजला भारी[1] आहे. याजकरितां शशपंज नवाब आहे. जातीनें मात्र शिपाई बेश परंतु वर्तमान ये रीतीचे आहे. स्वामीची स्वारी या प्रांतें जालिया उभयतांस दबाव आहे. त्यांत सुज्यायेतदौला तर सख्यत्वाविशी इछितो, व आफजरहमत रोहला नवाब गाजुदिखानास भेटावयास गेला म्हणोन वर्तमान आहे; व सुज्यायेतदौलाच्या मुलकांत जमीदारा बहुत भारी, अद्यापि लढाईचा प्रसंग नाहीं तोंच जागांजागांचे आमील उठऊन दिल्हे. मुलकाचा बंदोबस्त यथास्थित नाहीं. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Ragho Laxman reports that Shuja is holding negotiations with the Vazir, while assuring the writer of his friendship for the Marathas. The writer further adds, "Shuja is licentious in his habits and will be useless as an ally."*

No. 129] [*13-6-1757*

पौा छ २ शौवाल

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामीजीचे सेवेसी

सेवक नारो केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ २९ रमजानपरियेंत मुकाम आवले आपले कृपेकडून सुखरूप जाणून स्वकीयानंदलेखनाज्ञा केली पाा विशेष. सांभालपत्रें पाठविलीं ती उतम समई पाऊन परम आनंद जाहला. यानंतर इकडील हलचे वर्तमान तर वजीर शाहाजादे बमें फौज रोहिले मोतुल(?) फरकाबादेवर आहेत. सुज्यातदवला कूच करून बिलगराऊ म्हणून गाव आहेत तेथे आला. पुढे हरोलीस गोसांवियासी रुकसत केले. गोसावी याची फौज साठीपालीवर आहे. याचे फौजेस व गोसावी-

---

[1] संकट.

यासी पाचा कोसाचा तफावत आहेत. रोहिल्यांची कही गेली होती. तिने काही ठानवेली(?) केली. त्याजवरून गोसावियाचे फौजेसी याचे कहीची काही जगझड. मागती याची कही मुरडोन आपले फौजेत आली. गोसांवी याची फौज आपले जागा कायेम राहिली. त्याजवरून सुज्यातदवलाकडून येक भला माणूस जाबसालानिमित्य आला आहे. जाबसाल होऊन भेटी होणार येसा मनसुबा आहे. पुढे काय होईल ते पाहावे. परंतु सारांश हेच की रोहिल्यानी आपालियासी करारात आंतर केले. येवज वगैरे कितेक प्रो सालसी न राखिली. त्यास येवज घेणे तो काये? परंतु याचे सर्व प्रकारे सिष्टकृत्य करून करोडोची मामलत सोडविलियाने आपणहि स्वार होऊन हाफिजीकडेस गेलो. तेथील जे वर्तमान होईल ते सेवेसी लिहीत जाऊं. बहुत काय लिहिणे? कृपा निरंतर असो दीजे हे विनंती.

¶*Naro Keshav reports the movements of the Vazir and Shuja-ud-daula.*

No. 130] [*19-6-1757*

पो. छ ३ शौवाल

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री दादा स्वामीचे सेवेसी

विनंती. शेवक राघो लक्ष्मण कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील शेवकाचें वर्तमान ताा छ १ शवाल मुाा काा सांडी दरलस्कर नवाब सुज्यायेतदौले बाहादर माहाराजांच्या कृपाव्लोकनेकरून येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान नवाब मुकाम मजकुरीं मुकाम करून आहेत व शाहाजादे नवाब गाजुदीखान व रोहेले व अहमदखान पठाण गंभीर नदीवर येथून आठ दाहा कोसावर मुकाम करून आहेत. लढाई दरपेश[1] होत. परंतु आज आठ नव रोज जाले कीं सादुलाखांन रोहेले व दुंदेखान यानी नवाबाकडे सलुखाचा पैगाम करून नवाबाचा साला सालारजंग याजला घेऊन गेले. सालारजंग रोहल्याच्या लस्करांत पांच रोज होते. सलुखाच्या गोष्टी परस्परें जाल्या. परंतु सिध्धांत ठहरत नाहीं. सांप्रत सालारजंग व सादुलाखानाकडील दिवाण मोहानारायण व हाजी आहमद पीरजादा यैसे आले ते येथेंच आहेत. रदबदल करितच आहेत. गाजुदीखानाच्या चितांत कीं दाहा वीस लक्ष रुपये घेऊन या..ला समागमें घ्यावें. हे गोष्ट यांजला अनुकूल पडत नाहीं. हे म्हणतात कीं गाजुदी-

---

१ जवळ ठेपलेली;

खानांसी तर मी सलूख करीत नाही. शाहाजाद्यानी येथें यावे. मजला कलेल तैसा मी आदब बज्यावीन. प्रगट तर येणेंप्राा बोलतात. अंतस्थ कांही रदबदल असेल तर न कले. दुसरें सादुलाखान व दुंदेखान रोहेले व सरदारखान यांसी व नवाब सुज्यायेतदौले यांसी पगडीबदल भाईचारा जाला, शफत प्रमाण जालें कीं जर सलूख जाला तर आम्हीं गाजुदीखानापासीं आहोंत, नाहीं तर आम्हीं उभयेतांसही सामील होणार नाहीत. याउपर न कले काये करतील. हफज रहमत रोहेले याजवळ जमाव फौज भारी आहे. तोही सलूख मानीत नाहीं. फौज गाजुदीखानाकडे रोहेले पठाण सुधां स्वारप्यादा हजार तीस चालीस आहे व नवाब सुज्यायेतदौलापासी स्वार प्यादा हजार पंचवीस आहे व तोफखाना जर(ब) लाहाण मोठी सातसें आठसें येणेंप्राा असे व (अपूर्ण)

¶*Ragho Laxman writes to Raghunathrao news from the camp of Shuja-ud-daula. It seems that the Vazir Ghazi-ud-din with the Rohillas as his allies led an expedition against Shuja-ud-daula. After some stray fighting the Rohilla chiefs tried to patch up an understanding between the two but Shuja is holding out.*

No. 131] [*20-6-1757*

पो छ ४ शौवाल

श्री

श्रीमंत राजश्री सखारामपंत बापू स्वामीचे सेवेसी

पोष्य त्रिबकराव सिवदेव कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २ माहे शौवाल मुाा भोईगाव येथास्थित जाणोन स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पात्रोन लिहिले वृत अवगत जाहाले. यानंतर या प्रांतीचे वर्तमान पठाणाचे दंग्यामुलें फरकाबादवाला पठाण व गाजुदी-खान याणी बहुतेक ठाणी घेतली होती ते आपले आगमनाचा उत्कर्ष पाहून ठाणी तों सोडिली. तेथे सरकारची ठाणी बसली. बाकी किरकोली कांहीं ठाणी जमीदाराकडे राहिली आहेत व मामलतहि थोडीबहुत चुकणे आहे तेंहि आपले प्रतापेकरून कार्य सत्वरच उरकून येईल. गाजुदीखान व सुज्यातदौला यांचे (जुंज) लागले आहे. त्यास यास पाचा कोसाचे आंतर आहे. यैशास आपले फौजेसुधा आगमन जाहाले असतां फरकाबादवाले व गाजुदीखानाचे पारपत्य होऊन येश आपणास येतच आहे. वरकड आमचे खासगत वर्तमान राजश्री शंकराजीपंत सेवेसी आलेच आहेत, सर्व कचेंपकें वृत साद्यंत आपणास निवेदन कारितील

त्यावरून सविस्तर आपणास विदित होईल. येंदा लोकावर मेहनत भारी पडली असतां नालबंदी समजाविसी व रवानगी यास अद्यापि ठिकाण नाही. त्यामुळे लोक बहुत हैरान करितात तो आर्थ पत्रीं कोठवर ल्याहावा? बरें ये गोष्टीची कालजी आपणासच आहे. शंकराजीपंत सेवेसी विनंती करितील ते मान्य करून साहित्य करणे आपलेच हाती आहे. येविसीचा भरवसा आपला धरला आहे. आपण फरकाबादेच्यासुमारे आल्यानंतर आम्हासहि आज्ञा होईल तरी दर्शनास येऊं. समक्ष काही चाकरी घडोन आल्यास उतम आहे. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶ *"On getting news of your advance upon Delhi," writes Trimbak Sivdeo to Sakharam Bapu, "the Rohillas evacuated our posts in the Doab. They now threaten Shuja-ud-daula."*

No. 132] [*25-6-1757*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

पोष्य त्रिंबक मुकुंद साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागायत आशाढ सुध ८ शेनवार संध्याकालपावेतों मुकाम लस्कर नवाब वजिरासनिध नजीक फेरोखाबाद श्रीगंगातीरीं आसों. स्वामीची आज्ञे घेऊन स्वार जालो ते दरकूच वजिरापासी दाखल जालो. येताच लडाई महकूब केली. वजिरानी आपल्या व श्रीमंताच्या लिहिल्याप्रमाणें कूच तेच क्षेनी केले. सुजायेतदौलानी मामलाहि केला होता. तेहि यानी घेतला नाहीं. सर्व आपल्यावर व श्रीमंतावर टाकले. हें वर्तमान सर्व तपसीलवार गुरुवारीं दो प्रहरां पत्रें स्वामीकडे रवाना केलीं आहेत. श्रीमंत राजश्री बापूनी व तात्यानी आपण आज्ञा केली होती. लाख गोष्टीची गोष्ट केली. लडाई होणें न पावे. आज्ञेप्रमाणें लडाई राहविली. सुजायेतडौला तुमचे पाडाव आहे. फौज भारी याची फार होती. शाहाजादे वजीर व आहमदखान पठाण व रोहिले येैसे व जगहजखान यैसे फौज तीस चालीस हजार जमा जाली होती. त्याचें पारपत्य करते परंतु मर्जी श्रीमंताची, सबब राहिले. वजिरानी व शाहजादे व अहमदखान व सर्व रोहिले म्हणाले कीं आम्हीं फजित जालों. करोड रुपयांची मामलत राहिली. आम्ही जाब दिधला कीं सर्व श्रीमंताची भेटी जालिया सर्व तुमचे मुदे कबूल करितों. चिंता नाही. वजिरानीं श्रीमंताचा आपला हुकूम कोन्ही चाकर न मानी यैसा माणून कूच केलें. स्वामीसिवाय दुसरें जाणत नाहीं.

याचा इस्तार पहिले लिहिलाच आहे. मुख लढाई टाळून दि * ली. दुसरे गजहजखान कूच करून गेला होता. परंतु मागती त्यानें भले माणूस दरमीन घातले आहे. तो भितो कीं मी कैसा पार पडेन? मऱ्हाटे वाटेस लुटतील हें वर्तमान त्यास आहे. वजिराचे वचनावर आम्ही लिहिलें आहे. येथें घडीघडीचें वर्तमान जैसे आहे काये तें सेवेसीं ल्याहावें. रागास न यावें. खबरदारी कामाची आहे. जें जें वजिरानीं सांगितलें तें सेवेसीं लिहिलें. वजीर बहुत स्वामीसी येकनिस्ट आहे. आपण श्रीमंत राजश्री बापूस व तात्या स्वामीस सांगणें जे श्रीमंत तात्यांनीं मजला सांगितलें त्याप्रमाणे म्या चाकरी केली. श्रीमंत राजश्री गंगाधरपंत तात्यासी माझे बाबे विनंती करणें कीं आम्ही काही दुसरे जाणत नाहीं. चाकरी मात्र जाणतो. येतेवेळेस मजला श्रीमंत राजश्री तात्यानी सांगितले होते की, खबरदार, लढाई होऊ न देणे. तेप्रमाणे वर्तन त्याचे केले. लढाई वाचविली. आजी शेनवारी शाहाजादे वजीर गंगा उतरोन फरोखाबादेस गेले. आम्ही पारच आहे. लस्कर उतरून देऊ तेव्हा आम्ही उतरोन येऊन. जगहजखानाचे बातमीत राहावे. त्यानेहि आवाई खाली आहे. आपणास जैसे सुचेल तैस त्याचे पारपत्य जाले तर बरच आहे. नाही, दुरोन पलोन गेलाच तर इलाज नाही. मुख नजीबखानाचे पारपत्याकारणे वजीरहि आपणासी येतात. नबाब अहमद न येतात. आम्हास वजीर घडीघडी सला पुसतात. जैसे सुचते तेणेप्रमाने उतर निरोतर करितो. येथे दलेलसिंग राजे नागरमलाकडील ग्रहस्त मातबर वजिरापासी तेच आहेत. आम्ही सर्वासी मिलोन आहो. जोवर येकवेल वजिराची तुमची श्रीमंताची भेटी जाली म्हणजे लक्ष काम जाले. हे काम मोठे आहे. श्रीमंत राजश्री बापूची व श्रीमंत राजश्री तात्या मर्जी नाजूक आहे. आपण त्यांची निशा करावी कीं तो माझा चाकर की तुमचा चाकर. दुसरे चितात न आणा. सर्व यश श्रीमंता व तुम्हासी येईल. फौजा वजिराची व अहमदखान व शाहजादे आले तर ते चांगलीच आहे. राजे नागरमलाकडून दलेलसिंगास ल्याहावे की त्रिंबकपंत श्रीमंतानी व राजे अंताजीपंती पाठविले आहे. दुसरे चितात न आणावे. बहुत काय लिहावे हे विनंती. चिरंजीव राजश्री तात्याबास व दाजीबास आशीर्वाद.

¶*Trimbak Mukund explains how he averted an encounter between the Pathans and the Rohillas. He also writes about the awe that the Marathas had inspired in the hearts of the enemy.*

2336

No. 133] [25-6-1757

श्री

विनंती उपरी. राजे नागरमलाची डांक बसली आहे. तेथें कागद द्यावा म्हणजे आम्हांस पावेल. दो रोजांत डांकेचा जाब येथें येतो. डांके बराबर पत्राचें उत्तर पाठवीत जावें. सुजायेतदौलाकडे राजश्री जिवाजीपंतास पाठवावें तर सरदाराची पत्र श्रीमंत राजश्री सुभेदाराचें पत्र श्रीमंत राजश्री तात्यापासून घेऊन पाठवावें. कांहीं याद बाबत पैका आला तर सरकारचें काम होईल. श्रीमंत राजश्री बापूसाहेबास विनंती करून पत्र देतील तर रो(हि?)ल्यासही ताकीद द्यावी. राजश्री राघोपंत कांहीं लस्करांत आले नाहींत. त्यांजला पत्रें पाठविलीं आहेत. रो(हि)ल्यास पत्रें ताकीद वेतली पाहिजे. दोन वरसें ब्राम्हण तेथें असोन पैका देत नाहींत. असो. ताकीदपत्र दिधलें तर घेऊन पाठवावें. हफज रहिमतखानास पत्र ल्याहावें. आमची त्याची भेटी आजी होणार. जाली मजकूर कादर वाडी (?) सुधा करून. परंतु राजश्री राघोपंत आसते तर बरें होतें. ते वाकीफ होते. त्यानी आपणां लिहिलेंच असेल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The writer gives directions for carrying on smoothly correspondence and communications.*

No. 134] [28-6-1757

पौा छ १४ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामीजींचे सेवेसी

सेवक नारो केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना यैसीजे. येथील क्षेम ताा छ १० सवाल मुाा बरेली कुशलरूप जाणून स्वकीयानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. इकडील वर्तमान तर वजिराचा सुज्यातदौलाचा सला रोहिल्याचे विद्येमाने होऊन वजीर शाहजादेसहित फरोखाबादेनजीक वालतेगाऊचे घाटीं गंगा उतरतात. दौचोहू रोजी झाडून फौजासहवर्तमान पार होतील. तेथून दरकूच आपले आज्ञेप्रोा इंद्रप्रस्थास चालतात. मार्गी आपली वजिराची भेटीहि होईल. रोहिले आम्हास म्हणाले की, तुम्ही बरेलीस जाणे. आम्हीहि मागांहून दोचौहू रोजी येऊन पोहचतो. तेथे आलियावर यैवजाची वाट करणें ते करून. यैशास, बापूसाहेब, रोहिल्यावर पुरता दबाव पडलियाखेरीज यैवज येत नाही. आम्ही सेवक लोक तगादा सख्त करितो. यैवजाचा निकाल होईल तेथवर

करातच आहों. स्वामी संनिध आहेत. यांनीहि सांप्रतकाले वजिरास आपण तिकडेस बोलाऊन घेतलें. त्याजवरोन वसवास मानिला असे. आपले तेजप्रतापे यैवजहि देतील. परंतु बाजदबरसाद रोहिल्यांचे सिष्टकृत्य जरूर करणे पडेल. रोहिले ठिकाणी लागलियास सर्व बंदोबस्त हिंदुस्तानचा सहजातच होईल. रोहिल्यांस मनसबा पडला आहे कीं, वजीर व दक्षिणी येकत्र जाले. सुज्यात-दौलासी तऱ्ही सामील करोन घ्यावें, की त्याची आपली सरद मुलकाची येक आहे. आम्ही तुटलियावर तुमचा टिकाव होणे मुसकील आहे. यैसे सुज्यातदौलास भासऊन येकचित करोन घ्यावे, यैसा मनोदये यांचा. परंतु सुज्यातदौला यांचा इतबार धरीत नाही. प्रस्तुत तो या भानगडींत सुज्यातदौलासी व रोहिल्यासी चितसुध नाहीं. परंतु आपणहि सुज्यातदौलाकडेस आनुसंधान करावे की रोहिल्यांसी आइक्यता न होये. मी सेवक पदरचा असे. विशेष काये लिहिणे, कृपा लोभ असो दीजे, हे विज्ञाप्ति.

¶Naro Keshao reports to Sakharam Bapu that a treaty has been arranged between the Vazir and Shuja-ud-daula. He warns the addressee about the Rohillas and remarks that unless they are put down at an early date they would prove a great obstacle to Maratha supremacy in the north.

No. 135] [*June 1757*

श्री

पुा २. श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी विज्ञापना. नवाबाच्या चितांत होतें की मऱ्हाटी फौज बोलाऊंन शत्रूचें पारपत्य करावें. स्वामीनी राजश्री सखारामपंत बापूसमागमें राजश्री गंगाधरपंत तात्या व राजश्री विठल सिवदेव व राजश्री अंताजी माणकेश्वर पंचेवीस हजार फौज अंतरवेदींत फरोखाबादवाल्याच्या पारपत्यास पाठविले, तेहि अंतरवेदींत आले. नवाबानी आम्हांस सांगितलें कीं, तुंम्ही त्याजला पत्रें लिहून फौज बोलावणें. त्यावरून यथून पत्रें राजश्री बापूस व राजश्री तात्यास लिहिलीं कीं, नवाब मार्गप्रतीक्षा करितात. स्वामीचें पत्र नवाबास आलेच होतें कीं आम्ही च्यार सरदार पंचेवीस हजार फौज आंतरवेदींत पाठविले आहेत. तुंम्हीहि सामील होऊन शत्रूचें पारपत्य करावें. त्याजवरून नवाबानी राजश्री बापूस व राजश्री तात्यास पत्रें लिहिलीं कीं तुंम्हीं सत्वरे येणें. तुंम्ही व आम्ही मिळोंन शत्रू पराभवाते पावऊंन. येणेंप्रा पत्रे गेलीच आहेत व साप्रत आंजहि आणिक पत्रें उभयेतांस पाठविलीं की जलद मेंदीच्या घाटावर गंगा उतरावयास येणें. तेथून कनोज नजीक आहे. दो घाटावर मिळोंन फौज

उतरल. आमच्या पत्राचे उतर राजश्री बापूनी व राजश्री तात्यानी लिा कीं आंम्ही आठा दाहा मजलीवर. आम्हांस यावयास पांच सात रोज पाहिजेत. कदाचित आंम्ही येऊंन पोहचों तोंपावेतों लढाई होऊन चुकली अथवा सलूक जाला तर आंम्ही येऊंन काये करावें ? याजकरितां नवाबास विचारून आम्हांस बोलावीतच आसतील तर आठच्यार दिवस रदबदलमुलें लांबणीखालें घालावें. तोपावेतों आंम्ही येऊंन पोहचतों. यावरून नवाबास विचारिले कीं तुंम्ही फौज बोलाविली आणि मधें सलूख केला तर त्यानी येऊंन काये करावें ? तेव्हा नवाब बोलिले मजला प्रथम तुमचा पुरता भरवसा येत नाहीं. जर तुमचा भरवसा पुरता आहे तर मजला सलूख करणें नाहीं. मी तुमची वाट पाहातों. नवाबानी आपले तर्फेने त्रिंबकदासाचा भाचा भवानीदास राजश्री बापूकडे व राजश्री तात्याकडे पाठविला आहे. त्याजला जाऊंन सा रोज जाले. तो बापूपासी पंताच्या मुलकांत पावला आसेल. बहुतेक फौज पंताच्या मुलकातून कूच करून इकडे येत आसतील. नवाबानीहि लिहिलें कीं तुंम्ही पोहचतां तोंपावेतों रदबदलीवर घालितों. तुंम्ही आलियावर तुमच्या विचारें कर्तव्य ते करूंन. शफतप्रमाण करावा म्हणोन नवाबाच्या चितांत बहुत हेत आहे. तर बापूची भेट जालियावर बापूच्या विचारें होणें तर होईल. आपल्या फौजा यावयास आणिक आठ रोज पाहिजेत ये रीतीचें वर्तमान आहे. राजश्री बापूजी माहादेव वकील दिलीस गेले. त्यांजकडून वकील पनासा स्वारानसीं नवाबाकडे आला आहे म्हणोन रा नरसिंग हरकारे सांगत होते. येका दों रोजां त्याची मुलाजमत होईल व पातशाहाचा फर्मान नवाबास आला कीं आंम्ही शाहजाद्यास लिहिलें व गाजुदिखानास लिहिलें आहे, तुम्हासी कजिया करणार नाहींत व [अपूर्ण]

¶*A news-letter to Raghunathrao pertaining to the succour which the Nawab Shuja asks from the Marathas in order to defeat the Rohillas and the Vazir. The Marathas—Sakharam Bapu and others—promise the help asked for but on the definite undertaking that the Nawab would start no negotiations with the enemy, which the Nawab gives.*

No. 136] [*June 1757*

श्री

साहेबाचे शेवेसी. मानाजी पायेगुडे, सयाजी बोरगे सा दंडवत विज्ञापना. राजश्री सुभेदार व रा विठलराऊ व बलोचे याचे मोर्चे येमुना किनारेयाने काशमीर दरवाज्याकडे कायेम जाहाले. फारच नेटबाजीने मोर्चे जातात. आम्हास काबल

दरवाज्यास मोर्चेबंदी करावयासी रा सुभेदारानी सागितले त्यावरून काबल दरवाज्यास जाऊन मोगलपुरियाचे मोगल आवघे सामील करून आज घेतले. परंतु मोगल म्हणतात आपली जमेत बरकंदाज वगैरे बहुत आहेत त्यास तूर्त काही पोटास पाहिजे म्हणजे च्यार हजार माणूस तयार होऊन तुमचे पुढे काम कारेगार करितो. याखेरीज आपणास सामान येणेप्रो पाहिजे. तोफ समेत सामान दोन तीन व जेजाला वीस व गाडदी दोनसे व बेलदार पंचवीस व बाणदार पांच व बाणाच्या कैच्या याप्रो सरजाम आम्हास मोगलानी सागितला आहे. याजकरिता शेवेसी लिहिले आहे. या सरंजामाविना मोर्चेबंदी काईम होणार नाही हे ध्यानास आणून सरजाम प्रात:काली आम्हाकडे आल्याने कार्यावर पडेल. मोगलाचे मनोदये रक्षणार्थ तूर्त च्यार हजार रुपये दिल्याने उपयोगी फारच आहे. सारांश या आंगेच दिली जेरजप्तीस लवकर येईल ऐसे दिसते परतु तरतुदेस ढील कामास नये हे विज्ञापना.

आमचे लस्कर जिनसीजवल आहे. येथून मोर्चेबदीस काबल दरवाज्यास अगर लाहूर दरवाज्यास दीड कोस लाबण आहे. यास्तव आमची फौज मोर्चेबदीस गेल्याने येथून कूच करून समीप जाणे लागेल. याची आज्ञा काय ते करावी. मोगलपुऱ्यांतील मोर्चेबदीस बल पडिल्यास उपयोगी आहे. रा समशेर बहादर व गाजदीखान यासहि हिकडे पाठवावयाची तरतूद केल्याने उतम आहे. इकडील बदोबस्त पाहावयास शाहाणा माणूस पाठविल्याने साहिबाची खातरदास्त होईल. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Manaji Paygude describes how batteries were mounted and kept ready for an attack at the several gates of Delhi.*

No. 137] [*11-7-1757*

श्री

श्रीमंत राजश्री बापू
स्वामीचे सेवेसी.

पोष्य जनार्दन राम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ २३ सवाल सोमवार मुकाम नजीक परगणे शाहाना स्वामींचे कृपेंकरून सुखरूप असों विशेष. ठाणे शाहाना व नरसिजा जखेरा खानपूर ही स्थलें हस्तगत जाहाली. गड मुख्तेश्वरास फौज पाठविली आहे. तेंहि ठाणें खालीं जाहलेयाचे वर्तमान आलें म्हणजे सेवेसीं लिहून पाठऊं. वरकड इकडील वर्तमान सविस्तर राजश्री धोंडोपंत सेवेसीं पाठविले आहेत हे निवेदन करितील

त्यावरून कळेल. पंत मशारनिले अर्ज करावयाबद्दल पाठविले आहेत. स्वामींनी कृपा करून शाहाना नरसाणा जखेरा गडमुक्तेश्वर येथील जती सांगोन सनद करून देविणार स्वाम असेत. सेवेसीं बहुत काय लिहिणें? च्यार परगणियाचे देहाये झाडे जमाबंदी तनखा कानगो चौधरी याचे रुजुवातीनें लिहून आकार करून मागाहून पाठवितों. रोहिल्याचे अमलदारानीं चौधरी कानगो धरून घेऊन गेले, यामुळें तूर्त कागदपत्राचा शोध लागत नाहीं. दोन दिवस थीरथार जाहला म्हणजे अवघेच रुजू होतील. सारांश, मेहेरबानगी करून जती आम्हांकडे सांगावी. यांत आपण खावंद आहेत. बहुत काय लिहिणें? शाहाना परगणियांत दोन तीन जागे पठाणाचे आहेत. गढ्या मातबर आहेत. पठाण बखेडेखोर आहेत. याचें पारपत्य येथास्थित जाले म्हणजे परगणियाची रयेत बेवसवास राहील. सरकारचे सिलकेचा दाणादुणा पांच सात हजार रुपयांचा ठाण्यांत आहे. याजकरितां दोन तोफा आठ दाहा दिवसाचे अवकाशानें पाठवाव्या म्हणजे तिनी जागे घेऊन गढ्या पाडून टाकितों. सेवेसीं विदित असावें हे विज्ञापना.

¶Janardan Ram informs Sakharam Bapu of his exertions to restore order in the Doab.

No. 138] *[Date of receipt 13-7-1757*

पौ छ २९ सवाल

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

सखाराम भगवंत स्वामी गोसावी यांसी.

पोष्य रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. तुम्ही दोन च्यार वेळा लिहिले कीं सुज्यातदौला याचे मदतीस जावे लागेल; आणि तो म्हणतो कीं मी तुम्हास रुपया देणार नाहीं. ऐसियासी रुपये न घेतां त्याचे मदतीस जावे यात सरकारची किफायत कोणती? तरी तुम्ही राजश्री गंगाधर यशवंत याचे भिडेने रुपये न घेतां मदतीस न जाणे. मारनिलेची भीड सरकारच्या काय कामाची? जिकडे रुपया मिळेल तिकडे जावे व मुलूख मेळवावा व जती मुलुकाची करावी. हरतऱ्हेने रुपया मेळवावा यात तुमचेहि स्वरूप आहे आणि सरकारचीहि किफायत आहे. येथेहि राजश्री मल्हारजी होळकर याचे भिडेनेच काम दिरंगाखाली आलें. आणि जयनगरची मामलत वगैरे कितेक कामे होतात त्यात तफावत पडती. तरी तुम्ही येकंदर

कोणाची भीड न धरिता हरतजविजीने रुपया मेळवावा. जिकडे रुपया मिळेल तिकडे मदतीस जावे यात सरकारची किफायत आहे व तुमचे स्वरूपायोग्य आहे. तरी सारांश गोष्ट हेच कीं फौज खुशाल राखावी आणि कांहीं रुपये व लूक मिळेल तो अर्थ करावा. पुणियापासून रुपये मेळवावयास निघालो ते अद्यापि कांहींच फळास येत नाहीं हें अपूर्व आहे. तुम्हास पुढें पाठवावयाचे कारण हेच कीं मुलूकजप्ती करून अमल बसवावा, रुपये मेळवावे. कोणाचे मदतीस पाठविले नाही. काही विशेष काम नाही. यात्रेस पाठविले नाही. तीर्थास पाठविले नाही. एक कांहीं मेळवावें यास्तव पाठविले ते तो कांहीं होत नाही, हेच अपूर्व आहे. पत्र लिहिले याजवरून दिके[1] न होणे. पुढें तजवीज कोणती योजली, काय विचार तो लिहिणे. आम्ही जयनगरची मामलत जसी तसी विल्हे लावितो. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao writes to his Diwan Sakharam Bapu that he does not favour the alliance with Shuja unless it is adequately recompensed. He admonishes the addressee for his dilatoriness and has the same complaint against Holkar whose influence he is too weak minded to shake off.*

No. 139] [*18-7-1757*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बापूसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्रिंबक मुकुंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. सेवकाचें वर्तमान तागायत श्रावण सुध २ सोमवार मुकाम लस्कर नवाब वजीर जाणऊन सेवकाचीं पत्रें जे आजिपावेतो लिहिलीं ते राजश्री आताजीपंत नानासच लिहीत गेला. त्याची उत्तरें आली कीं, जे तुम्हीं पत्रें लिहिता ते श्रीमंतास दाखवितों. हालीं यैकिलें कीं, ते मेरटेकडे गेले आहेत. त्यास आम्ही आजी सोमवारी मुकाम खेरिज[2] केला. उदईक मंगळवारीं सिकदार (?) नवाब वजीर व अहमदखानसुद्धां घेऊन सेवेसीं दाखल होतील. भेटीनंतर सविस्तर वर्तमान नवाब वजीर आहमदखान निवेदन करतील. सेवकहि विनंती करील. कृपा सेवकावर असावी हे विज्ञापना. मिति श्रावण सुध २ सोमवार प्राथकाल.

¶*Trimbak Mukund informs Bapu that the Vazir and Ahmedkhan Bangash are coming to pay their homage.*

---

१ कष्टी. २ बाहेर ?

2342

No. 140] [Date of receipt 28-7-1757

पौ छ ११ जिल्काद.

श्री

स्वामीचे सेवेसी विनंती सेवक रामराऊ नारायेण कृतानेक विज्ञापना. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते श्रीगोंदास येऊन श्रीमंत राजश्री जनकोजीबाबाची व पाटीलबाबाची भेट घेऊन माहाराजाचे आज्ञेनरुप उभयेतास विनंती केली. त्यावरून तिन्ही कामे कबूल केली आहेत. खर्चाचा ताळा मात्र पडला म्हणजे कारकून समागमे घेऊन सेवेसी येतो. येथे केवल स्वामीचे अज्ञा प्रमाण. दुसरे काही जाणत नाहीत. अविलंबेच तिन्ही कामें घेऊन सेवेसी येतो. दर्शनाआंती सर्व विदित केले जाईल. सो श्रुत होये हे विज्ञाप्ति.

स्वामीचे सेवेसी पाटीलबाबानी विनंती पत्र लिहिले आहे त्यावरून शृत होईल हे विनती.

¶Ramrau Narayan informs the Peshwa that the Sindias readily agreed to the Peshwa's desire.

No. 141] [31-7-1757

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
जनार्दनपंत स्वामी गोसावी

पोष्य सखाराम भगवंत नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. गढीचे काम मातबर, त्यास फौज भारी पाहिजे, म्हणोन विस्तारे लिहिले ते अवगत जाले. ऐशास येथून रा माणिकराव व निबाजी खटके व विठल आबदेव गेलेच आहेत; व हली राजश्री रेणकोजी अणाजी फौज सुधां रवाना केले आहेत. येऊन पोह्चतील. व तुम्हीहि तेथे स्वार व प्यादे नवे ठेविलेच आहेत. आणखी लागतील तरी विचार पाहून ठेवणेच जाले ठेवावे. गढीचे काम फते जालियावरी सिबंदीस ऐवजहि तेथे निघेलच आणि आपणहि तो अजमास पाहून जे करणे ते करितच असतील व करतील हे निशाच आहे. तेथील तेथेंच सिबंदीचा ऐवज तुम्ही विचारे काढालच. वरकड कामकाजाचा मजकूर तरी तुम्हावरी काम भारीच पडले

आहे; व सरकारी काम निष्ठेने करितां, चाकरीस चुकत नाहीं हे सविस्तर वर्तमान येथून श्रीमंतासहि लिहिले आहे. तुमचे चाकरीचा मजराच होईल. शिबं(दी) आणखी ठेवणेच, तरी ठेऊन सर काम करून घ्यावें. पुढें त्याचे ऐवजाचा मजकूर काय आहे? तुम्ही तेथंच सर्व कर (पुढें मजकूर नाहीं).

¶*Sakharam Bapu to Janardan Ram giving orders about the Sarangpur affair.*

No. 142] *[31-7-1757*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
मुरारपंत स्वामीचे सेवेसीं

पोष्य जनार्दन राम सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। श्रावण वा। प्रतिपदा रविवार जाणोन स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. येथील वर्तमान तरी तुम्हापासून निरोप घेऊन आलो ते श्रावण सुध चतुर्दशीस येथे सारंगपुराजवळ येऊन राहिलों. गावांतील किल्यात रोहिल होते. फौजेच्या दहशतीनें निघोन गावाबाहेर गोसावियाचा किला आहे, तेथे किला बलाऊन लढाईस उभे राहिले आहेत. त्यास लढाईचा प्रसंग आला आहे तरी तुम्हापासी स्वार व प्यादे सामान काय असेल ते घेऊन येथें सामील व्हावें. सरकारचे काम येऊन उभे राहिले आहे. हे काम विल्हेस लागले म्हणजे अवघेच उत्तम; नाही तर विचार जो आहे तो सर्व तुम्हास कलतच आहे. तर पत्र पाहताच आधी स्वार होऊन सरकारी कामास रुजू व्हावे. श्रीमंताकडून निंबाजी खटके व मांणिकराव फौज सुधां इकडे येत आहेत; त्यांचे वर्तमान काय, ते कोठे आहेत, कोणत्या मार्गे इकडे येणार, त्याचा शोध करून त्यास पत्र लिहून त्याची बातमी राखोन त्यांसी पत्रे लिहून त्यांजला जलदीनें आम्हांकडे पाठऊन देणे. तुम्ही आपल्याकडील सामान जें तयार होईल तितके करून लौकर येथे यावें. निंबाजी खटके व माणिकराव इकडे रवाना कले म्हणोन श्रीमंत वारंवार लिहितात; परंतु ते अद्याप कोठे आहेत हे कळत नाहीं. तर त्याचा शोध आधी आधी करणे. अनमान कराल तर श्रीमंताची शफत तुम्हास असे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Janardan Ram to Murarpant requisitioning help to resist the Rohillas of Sarangpur.*

No. 143] [29-9-1758

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक अंताजी माणकेश्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता भाद्रपद वद्य १३ पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. दंडा राजपुरी व जंजिरा याचे फर्मानाकरितां आज्ञापत्र सादर जालें तें पावलें. त्यास येथून येक दोन रोजीं दिलीस जातो. तेथें गेलियावर आज्ञेप्रमाणे फर्मान तयार करून सेवसी पाठवीन. पूर्वी आज्ञापत्रें हुजूरची आलीच होती त्याचे विस्मरण सेवकास नव्हतेच. तो दुसरे आज्ञापत्र आले. त्यास पहिले आज्ञापत्र जनकोजी सिंदे यांच्या लस्करी पावलें. दुसरे आज्ञापत्र जैनगरीं पावलें. त्यास येथून दिलीस गेलियावर फर्मान दंडाराजपुरी आपली वतनाची जागा तेथील फर्मान व जंजिऱ्याच्या किलेदारास परवाना की किला राजश्री बाळाजीराव प्रधान यास देविला आसे तरी पत्रदर्शनी किला खाली करून देणे म्हणोन माझे जेथवर ज्ञान चालेल तेथवर दिलीस जाताच दुसरे दिवसी फर्मानास काम चाली लाऊन फर्मान तयार करून मुजरद कासिदाची जोडीसमागमे माफजतीने सेवेसी प्रविष्ट करीन. परंतु स्वामीने तेथून मसोदे करून पाठवावे. कोण कोण कागद कैसे पाहिजेत तितके मसोदे पाठवावे. त्याप्रो दुसरे फर्मान तयार करून पाठवीन. जोपावेतो मसोदे येत तोंपावेतो फर्मानाचा खोलंबा करीत नाहीं. फर्मान तो करून येथाज्ञानें पाठवितोंच. परंतु दुसरेहि फर्मान मसोदे येतील त्याप्रो करून सेवेसी पाठवीन. जे कागदपत्र दो महिन्यानी तयार होणार ते सेवक पंधरा रोजात तयार करून सेवेसी पाठवीन. या कार्यास कदापि अंतर होणार नाही. रा जनकोजी सिंदे याजला एक ताकीदपत्र आमच्या कागदांत घालून पाठवावे कीं कीं पाछाहा वजीर यांचा हिसा निमे करारमदार आम्ही केला आहे. त्याप्रो कागदपत्र अंताजी माणकेश्वर याजपासी शिक्यानसी करार केलेच आहेत त्याप्रो तुम्ही त्यासी वर्तणे. फौज त्याची जिकडे तुम्ही चाकरी सांगाल तिकडे करितील त्याचा हिसा अंताजी माणकेश्वर याचे विद्यमाणे देत जाणे. त्यास अंतर सर्वथा न करणे. तुमच्या बुधीस कोणी भ्रंश करील अथवा आदिनाबेग संदीपबेग यास लिहील ते सर्वथा न यैकणे म्हणोन सेवकाच्या लखोट्यांत येक पत्र अगत्यरूप विनंती लिा त्याप्रमाणे पाठवणार स्वाम समर्थ आहेत. स्वामी काम सांगोन गेले आहेत ते बज्याऊन सेवकास अणिले पाहिजे. त्याचा परिणाम येथास्थित जाला पाहिजे ही सेवकाची सर्व चिंता स्वामीखेरीज कोण जाणणार? मी खावंद

चाकरीस जीवे प्राणे हाजर आहे. माझे सर्व प्रकारे अभिमान स्वामीस आहेत. माझेविसी निशा असो. सर्वा जागा लक्ष स्वामीच्या पायाकडे राहून चितानरूप बंदोबस्त होईल. लाहोर प्रांती सरदाराच्या फौजा प्रो पाठऊन बंगालियासी सिध आसो. रा जनकोजीबावाचा हेत आपला खाशाचा बंगालियाचा आहे. परंतु पातशाही वजीर त्यास समागमे जाणार नाहीत. संवशयात पडतील याजकरिता पातशाहा आम्ही लाहोर प्रांती जावयासी सिध आसो. परंतु बंगालियाचे काम कासी प्रयागचे काम विना पातशाहा वजीर आम्ही तिवेच निराले गेलियावाचोन स्वामीच्या मनोदयानरूप होत नाही. कासीत व प्रयागात सरदार राहिले तरी कामास न ये व पातशाहाखेरीज बंगालियाचे जाजती येवज येणे नाही याजकरि(ता) खोलून सारे जनकोजीबावास लिहिणार धणी समर्थ आहे. तहप्रा अंतर न करावे हे लिहिले पाहिजे. श्रीमंत रा नानासाहेब आम्हावरी क्रोधे आहेत. स्वामीनी शांत करून शेवकास आज्ञा करणे ते करावी. आज्ञेखेरीज मी काही * * * * * सर्व चिरंजीवास आज्ञा करतील त्याप्र * * * * हे विज्ञा * * *.

¶*Antaji Manakeshwar to Raghunathrao : communicates the intentions of the Emperor and advises on the plan of campaign.*

No. 144] [*15-9-1757*

श्रीवरद

श्रीमंत राजश्री दादा
साहेब स्वामीचे सेवेसी

विनती सेवक रेणको आनाजी सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम प्रताप साहेबाचा ता छ ३० जिल्हेज मुा नजीक ज्वालापूर येथास्थित असे. यानतर साहेबाचे प्रतापे रोहिला फौज गंगा उतरोन पलीकडे गेला, येथील जमीदार राव इमामुदीन रोहिल्यासमागमे होता तो त्याजबराबर पलीकडे गेला. त्यास दिलासा बहुत सांगून पाठविला. परतु तो आला नाही. त्याचा भोगीया राव जामदार त्यास दिलासा कौल पाठऊन आनविला. येऊन भेटला. त्याचे प्रगणियाची हकीकत मनास आनिली. यादी आलाहि(दा) दिलीहून पाठविली आहे. त्याजवरून विदित होईल. ज्वालापूर परगणा साल गुदस्ता कुल बाब कुल कानू आकार

३५००० ज्वालापूर प्रगणा सिवाये जकात

2346

२०००० दून प्रांत श्रीनगरवाल्याचा तेथील तपे च्यार नजीबखान रोहिल्याने जबरदस्तीने घेऊन ज्वालापुराखाले घातले

६००० सहजपूर गढी

५००० सवडी

८००० बसतपूर

१००० मालकोट

२००००

सिवाये जकात

५५०००

सदरहू पचावन हजार रुा आहेत. च्यान्ही तपे दून प्रांतचे विसा हजाराचे यांतच रोहिल्याची फौज पडली होती. फौज पलीकडे गेल्यावर या च्यान्ही तप्यात आपली ठाणी बसविली. यापलीकडे दून दुसरी. श्रीनगरवाल्याची तपे तीन तेथे आम्ही जबरदस्तीने ठाणी नवी बसविली. तेथील आकार तेथल्या लोकाची जबानी

१५००० सतोरे

१५००० कलोखर

१५००० कल्यानपूर

४५०००

सदरहू तिन्ही तप्यात ठाणी नवी बसविली. त्याजवरून श्रीनगरच्या राज्याने वकील आम्हापासी पाठविला की, हे तिन्ही तपे सोडून द्या तुम्हास काही नजर देतो. ते आम्ही कबूल न केले. तिन्ही तपे पचेतालीस हजार रुा ज्वालापुरात आधिक येतील. साहेबाची चाकरी केली. त्याउपर श्रीनगरवाल्याने वकील साहारंगपुरास रा जनार्दन राम याजपासी पाठऊन, त्यास काही नजर कबूल करून, त्याचे राऊत दोनसें, कारकून येक, कलाखर प्रगणियाचे ठाणे सहसपूर त्या गावास घेऊन आले. त्या कारकुनाने आम्हास पत्र लिहिले; ते बजिनस साहेबापासी पाठविले आहे. त्याचे चितात नवे तीन तपे आम्ही घेतले, ते सोडावे. पहिलेपासून च्यार तपे ज्वालापुराखाले च्यार वरसे आहेत; तेहि सोडावे; येसा बखेडा आरंभिला आहे. या प्रकारची त्याची रीत. रोहिला फौजेसुधा दुनेमधे होता. त्याजभोवते आम्ही श्रम करून मेहनत केली. फौज

लुटून घ्यावयाचा प्रसंग. ते समई जनार्दनपंतांसें उदंडदा लिहून पाठविले. साहेबी त्यास आज्ञापत्रे पाठविली. परंतु आले नाहीत. आता रोहिला पलीकडे गेला. आमची मानसे पनास साठ कामास आली. घोडी वीस पंचवीस मेली. साहेबाचे प्रतापे रोहिल्यास काढून टाणी आम्ही बसविली. तेथे बखेडा करावयास फौज पाठविली. आपणहि मागून येणार. जबरदस्तीने आम्हापासून सातहि तपे सोडऊन देणार. यैसे वर्तमान त्याचे. येविसी साहेबी कृपावंत होऊन रा॥ जनार्दनपंतास येक ताकीदपत्र पाठवावे. की, दुन प्रांत श्रीनगरवाल्याचा. सातहि तपे यांजकडे आम्ही दिल्हे आहेत. हे तेथे अमल करतील, तुम्ही तेथे बखेडा न करणे. कारकून राऊत पाठविले ते बोलाऊन घेणे. यैसे पत्र त्यास पाठवावे. येक पत्र राजा श्रीनगर प्रतीतशाह त्यास लिहून पाठवावे की, दुन प्रात सात तपे यांस दिल्हे आहेत. तेथे हे अमल करतील. यैसे पत्र राज्या व येक सनंद सातहि तप्यास लिहून पाठवावी की, यासी रुजू होऊन रु॥ भरने. याप्रो॥ पत्रे साहेबी पाठविली पाहिजेत. म्हणजे पहिला आकार ज्वालापूर व च्यान्ही तपे दुनचे मिळोन पंचावन हजार रु॥ आहेत. हे तिन्ही तपे नवे पचेताळीस हजार येकून लाख रु॥ वसूल होऊन साहेबास प्रविष्ट करीन. हारद्वारात ज्वालापुरांत आपले ठाणे आहे. पलीकडे गंगा उतरोन चांडा प्रगणा तोहि श्रीनगरवाल्याचा ज्वालापुराखाले नजीबखानाने घातला होता. तेथे येथील जमीदार राव इमादुदीन रोहिले पाच सातसे घेऊन राहिला आहे. नावा त्याच्या हाती आहेत. से दोनसे मानूस रोहिले नावेत बसोन आलीकडे हरिद्वारापासी येतात. हरिद्वारात आपले ठाणे. त्यांसी यांसी जुंझ होते. या प्रकारचा बखेडा येथे आहे. यामुळे येथील जमीदार राव जामदार म्हणतो की, तुम्ही कूच करून जाल तर, येखादे दिवसी पलीकडून रोहिले आलीकडे उतरोन येतील. याचे दहशतीने आम्हास येथे राहवत नाहीं. निदान तुम्ही कूच करून जाता तर, दोनसे राऊत, पांचसे प्यादे ठेऊन जा. तेव्हा बंदोबस्त राहील. येविसी साहेबाची आज्ञा लिहून पाठवावी. त्याप्रा॥ येथील बंदोबस्ती करून मी कूच करून साहारंगपुरास जाईन. तेथून येमुना उतरोन पलीकडे सरहिंद मुलकात जाऊन, साहेबाचे प्रतापे अमल बसवीन. साहारंगपुरापासी उतरोन जावयास पलीकडे सरहिंद प्रांतचा प्रगणा बुढिया तेथे जावे लागते. तो प्रगणा मजला साहेबी सनद करून दिल्ही आहे. जनार्दनपंत म्हणतात, बुढिया प्रगणियाची पहिले सनद आम्हास दिल्ही आहे, तो प्रगणा तुम्हास देत नाही. येविसीहि त्यास आज्ञापत्र द्यावे की, यांस पलीकडे उतरोन जावयास तो प्रगणा याचा यास देणे. यैसे पत्र त्यास दिल्हे

पाहिजे. सरहिंद प्रांतची जमीदार वगैरे लोकाची पत्रे आली आहेत कीं, तुम्ही येऊन पोहचने. त्यास कृपावंत होऊन थोडीबहुत फौज पाठवावी. पलीकडे जाईन. बहुत काय लिहू? कृपा केली पाहिजे. हे विज्ञप्ती.

¶*Renako Anaji informs the Peshwa that the Rohila force has evacuated the Doon Division in favour of the Marathas. He further says the Raja of Shrinagar is reported to have offered Janardan Ram a large sum as the price of his assistance to get back his territory. The Peshwa is requested to restrain Janardan Ram.*

No. 145] -[*12-9-1758* ?

पौ छ ८ मोहरम

श्रीपांडुरंग

पुरवणी श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामी माहाराजाचे शेवेसी

विज्ञापना. श्रीमंत राजश्री दादासाहेब याणी आज्ञापत्रे पाठविली कीं हुजुर येणे, त्यावरून प्रस्थाने बाहेर निघालो होतो इतकियांत संस्थान सेवढे येथील राजा मृत्यु पावला. मग श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे जावयाचे राहिले. मग फौज सुधा सेवढ्याच्या मुलकांत आलो. त्याचे वकील आले आहेत. गुदस्तांची बाकी नारो शंकर सुधा आहे व नवा राज्यटिका याची नजर यैसी आहे. ठहर-ल्याउपर सेवेसी मागाहून लेहून पाठवितों. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे जावें तर तूर्त बाकीचा कझ्या व नजराणा च्यार महिने राहतो. दिवसगत लागते. सबब राहिलो. राजे प्रीतिसिंग सेवढेकर व राव रामचंद्र याणे राज्य दिल्हे, तेव्हां राजे प्रीतसिंग याचे लिहिले घेतले कीं आमचा वौंष आहे तोपावेतों सेवढ्याचें राज्य आमचें. वौष बुडाला तर राज्य तुमचे. याप्रमाणे राजे प्रीतिसिंग याणी राव रामचंद्र दतियेकर यांस लेहून दिल्हे. याजकारितां आतां सेवढ्याचा राजा मृत्य पावला. त्याचा वौंष नाहीं यामुळे राव इंद्रजिते[१] म्हणतात कीं राज्य सेंव-ढ्याचे आमचे आहे. आम्हास देणे. नजराणा राज्याचा देवू. परंतु सेवढ्याचा किला मातबर आहे. दतियाचा किला व सेंवढ्याचा किला तों मातबरच आहे. यैसे दोन किले दतियावाल्याचे हातास गेल्यावर धामधूम व फिसाद होईल, बळकट होतील, यैसें समजोन राजे प्रीतिसिंग याचा भाऊ करणजू याचे पुत्र चौघे आहेत, व नारायेणजू[२] हाली राजा मेला याचा मानलेला भाऊ आहे, येसे दोघेजण आहेत.

---

१. दतियाचा राजा. २. प्रीतिसिंगाचा वडील मुलगा.

यातून राज्यटिका ठहरला नाहीं; परंतु ठहरेल तो मागाहून लेहून पाठवितों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The question of the succession of the Sevadha state is discussed and communicated to the Peshwa.*

No. 146] [*10-10-1758*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ७ सफर मुा लाहोर यथास्तित असों. यानंतर देवजी घोरपडे व सुलतानजी नलवडे व राणोजी नलवडे व सुलतानजी रोकडे राजश्री अंताजी माणकेस्वर याज-समागमे होते. त्याजकडील पत्रें स्वामीस पूर्वी आलीं होतीं कीं ब्यान्ही आसाम्या जुंझी पडल्या हे वर्तमान सर्वांस कलले व त्याचे घरीही वर्तमान गेले आहे. आजी छ मारचे मुकामी पत्रें रा अंताजीपंताच्या लस्करांतून, रा सटवोजी जाधव अम्हापासी आहेत त्यास आली कीं आववे सुखरूप आहेत. तीं पत्रे स्वामीचे सेवेसी पाठविली आहेत ती पाहावी आणि स्वामीनी तीं पत्रें व आपले अभयपत्र त्याच्या मुलामाणसास लेहून पाठवावे म्हणजे वर्तमान कलोन माणसेमुले आनंद पावेत ते करावें. नाहक चौघाचे घरीं श्रमी होत असतील. याजकारिता सेवेसी विनंती लिहिली आसे. पत्र पावतांच वर्तमान लेहून पाठवावे. सदरहू पत्रे कागलास रवाना करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶*Vithal Sivdeo requests the Bhao to write letters to the relatives of Deoji Ghorpade, the Nalvade brothers and Sultanji Rokade that they are hale and hearty and not dead as was reported.*

No. 147] [*22-10-1757 ?*

श्रीशंकर

पुरूषोत्तम महादेव व रामराव (?)

तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. कितेक प्रकारें मजकूर लिहिले ते सर्व कलले. अहमदखान बंगस यांचे येकनिष्टेचा प्रकार लिहिला त्यास जे घराण-दार असतात त्यांची दुरंदेशीसी तरा निरालीच असते. आजपर्यंत त्यानीं दुरदेसीनेच वर्तन आले. याकरितां त्यांचा इतबार धरून येथून ममतेचे व कृपे-

चेच भाव वजिरासीं बोलण्यांत आले. हफिजाविसी वजिरानी फारसी खातरजमा पुरऊन मजकूर केला होता. त्याजवरून कितेक प्रकारें रयातीचे[१] मजकूर त्याचेविसींहि बोलण्यांत आले होते. कारण कीं फौजसुधां येऊन भेटावें आणि मनसब्यास सामलि व्हावें व कांहीं नजरदाखल खर्चास तूर्त पाठवावें ह्याच गोष्टी ठराऊन ठीक करतों ऐसें वजिरांचे जाबसालांत होतें म्हणून तुम्हांस बा दिल्हें. त्यास नजरेचे यैवजाविसी अनमान करितात. वरकड गोष्टी गोडनरम प्रकारें बोलतात. त्यास ज्या गोष्टी वजीर बोलून गेले होते त्या त्यांचे कार्याच्या सरकार तर्फेच्या रया (तीच्या) होत्या. असो. नेक समजोन करणे तसें करतील. तुम्ही येव्हांच हफिजासी साफ तोडून बोलावे कशास? छावणी तर जालीच आहे. पुढें बाजतबरसात समजोन करणें तसें केलें जाईल. फौज सुधां पठाण व रोहिले हंगामी भेटीस येऊन सामील जाल्यास रयातहि होणे तसी होईल. तुम्ही आहा तसेच तेथें राहणें. आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें.

छ ८ * सफर पत्रें पाठविली

¶*Purshottam Mahadeo and Ramrao are requested to persuade Hafiz, the Rohilla Chief, to send in his forces as previously promised.*

No. 148] *[5-12-1757*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी,

विनंती सेवक बापूजी बलाल साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागायत छ २२ रबिलावल मुकाम नजीक दिली सा कोस अंतरवेदींत येथास्थित असें विशेष. स्वामीकडील पत्रें आलीं तीं पावलीं. श्रीमंत राजश्री विस्वासराव राजश्री बाबूराव बावा व दतबा औरंगाबादेकडे आले आहेत म्हणून लिहिलें तें कळलें. इकडील वर्तमान तरी पातशाही मुलूक जत केला होता त्यास दिलीची मामलेत जाली. यैन खंडणी समाईक साडेबारा लाख रुपये सखारामपंताबा लाख रुपये व दोन तोफा आणीत होते त्याचे दीढ लक्ष येकून पंधरा लक्ष खंडणी

---

१ कृपा. *(९) खोडून केल्यासारखे दिसतात.

जाली. मुलूक सोडिला. पांच हजार फौज दिलीस रहावी असा करार जाला. जेव्हां याप्रमाणें खंडणी जाली. वसूल फौज राहील ते करील. नजीबखान यास काढून दिल्हा. त्याणे ठाणी अंतरवेदींतील उठविलीं. यास्तव राजश्री मल्हारबा व विठलपंत, पायेगुडे व वजीर जनार्दन राम यैसे त्याजवर जाणार. खासा गडमुक्तेश्वराकडे जाणार आहेत याप्रमाणें मनसबा आहे. जाटाकडील मामलेत पहिल्याप्रमाणें तिसाला तिसा लक्षाची जाली. फौजेस पोटास तों नाहीं. वरकड आबादीचा विचार कलतच आहे. विदित जालें पाहिजे. पुढील सालापासून दिलीचे साडेबारा लाख सखाराम पंताचे पनास हजार या प्रमाणे दरसाल घ्यावे, पुढें तेरा असा करार ठरला. पांच हजार फौज दिलीस ठेवावी हाहि करार सरकारचा आहे. कललें पाहिजे. पातशाहास फार बरें वाटत नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bapuji Balal's letter to the Peshwa communicating news from Delhi. The tribute from Delhi is fixed at 15 lacs. Najibkhan has been completely ousted from Delhi affairs and is consequently creating mischief in the Doab.*

No. 149] [*1757?*

श्रीशंकर

विनंती उपर. चिठी पाठविली ते पावली. वर्तमान कलले. या ग्रहस्ताचा कारभार सुस्त व लटका व वोढा आणखीकडे याकरतां आम्हीं पहिलेच दिवसीं बखसीस आणून सत्वरच कार्यभाग उरकावयाची बुनियाद[१] घातली होती. मग सला यैसी पडली. काये चिंता आहे? खावंद प्राक्तनवान. बापू! तुम्ही यषस्वी, तुम्हीच आखंड म्हणता कीं नानासाहेबाचे प्राक्तनाचा गूण यैसा आहे की मुश्कील काम आपल्या आपण असान[२] होऊन थोडक्यात प्रयत्नात सत्वर होऊन येते व दादासाहेबाचे प्राक्तनाचा गूण यैसा आहे जे प्रथमता आसान काम आसेल तें कठीणसें दिसून आयासें विलंबे होते यैसे तुम्हीच बोलता तेच निदर्शनासहि येते. मग इत्की त्वरा व बेदिमाग्वी काशास पो? काल जुमा होता व मिर्जा मनूचा दिवस फात्याचा[३] होता म्हणून वजीर दरबारास गेला नाहीं. जाबसाल न जाला. आजचा नेम केला आहे. रो अंताजीपंत आम्ही आज धरणे देऊन बसून त्याजला

---

१ पाया. २ असान = सुलभ. ३ प्रार्थना.

2352

पातशाहापांसी नेतों व जो जाबसाल ठेरतो तो येऊन सांगतो. निश्चित नाहीं. कामहि मातबर आपणहि मातबर. मातबरीप्रमाणेच मातबरीने काम घ्यावें. त्वरा न करावी. आपण दीर्घदर्शी व सूज्ञ आहेत. विशेष लिहावेसे नाही हे विनंती.

¶*Letter addressed to Sakharam Bapu condemning the dilatoriness of Raghunathrao.*

No. 150] [*End of 1757*

श्री

शेवेसी विज्ञापना. स्वामीचे आज्ञेप्रमाणे कूच करून सालेमारबागाअलीकडे येऊन मुकाम केला. त्यास एक दोन बातन्या आल्या. चाळीस कोसपावेतो कोण्ही आले नाहीं. परस्परें वर्तमान सेवेसी आले आसल. यैसियास आम्ही पुढें सरहंदपावेतो जावे की मुकाम करोन राहावें? इकडेहि मोगलपुरियाचे वगैरे कार्य जरूर कर्तव्य आहे. तर जे आपण+ आज्ञा कर्तव्य ते करावी. सडे आलो आहो, सरहंदपावेतो जाऊं. येथें राहून मोगलपुरियाचे काम करावयाची आज्ञा आली तर येथें राहून हे कार्य करूं. बुनगे तेथे राहिले आहे; त्याजला इकडे पाठवायासी आज्ञा करावी. निश्चय जो करणे तो करोन जलद पत्र सादर करावें. तदनुसार वर्तनूक करूं. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This incomplete letter refers to the Punjab campaign probably of Raghunathrao.*

No. 151] [*1757 end ?*

श्री

साहेबाचे शेवेसी मानाजी पायगुडे साष्टांग दंडवत विज्ञापना. काल तिसरे प्रहरीं लाहुराकडील फौजेचे बातमीस स्वार पाठविले होते ते वीस कोस नजीक सोनपतचे सरदेपावेतो जाऊन बातमी मनास आणितां पलीकडे वीस कोसपर्यंत कोठें फौजेचे बातमीचा ठिकाण नाहीं यैसें ठीक लाऊन आज तिसरे प्रहरी स्वार आले. आनखीही वरचेवर बातमीपुरता शोध करून शेवेसी लेहून पाठऊं. हे विज्ञापना.

¶*Manaji Paygude with the advance-guard sending news about the movements of enemy's forces.*

\+ येथून अर्धे पान फाटलें.

No. 152] [1757

श्री

विनंती उपरी. बारगीर काल येथून गेले तो वरचेवर आवाई जाली. आम्ही धांवलो. तुम्हीहि रागे भरला, तेव्हां तुमच्या गोटांत लपाले. अंधार पडल्यावर निघाले ते तों पुढें दो ती कोसावर राऊत पुढें ठेविले. देसास कागद पाठवितों. रााा अंताजीपंताकडे सांडणीस्वार गेला, यैसी त्यास पुरती बातमी कळली कीं तिकडे जावयाचा निभाव होत नाहीं. तेव्हां फजीत पावतो यैसे जाणून, रा गंगाधरपंत तात्याकडे रात्री गेले, कीं आम्हांस भेटवा; त्यावरून त्यांची चिठी आली. त्यावरून आतांच बावाजी पोवार समजावयास पाठविला; परंतु रा अंताजीपंतास तुम्ही रागे भरून लिहिले आहे त्याची वाट काय? पोवाराकडील तिघे, आमचा एक होता, निश्चयेपूर्वक परवांच गेले. परंतु कालच्या पत्रावरून ते तुम्हावर आम्हावर श्रमी होतील, त्याचा विचार पडला आहे. याचे निवारण काय करणे ते आपण तेच करावे. बहुत काय लिहिणे हे विनंती. विठल आपदेव याजबाा फौज जाती, त्यास दोन रोजमरे पाहिजेत; त्याचा ऐवज आद-मासे पाच हजार देवावे. आमचे यैवजी वजा घ्यावे. परंतु कूच जाले आहे ते तो आज फुटतात. त्यास तळावर यैवज असला तर देवावा, नाहीं तर मजलीस त्याचे स्वार घेऊं, तेही आम्हापासून कोसीदुकोसी राहतील. हे विनंती.

¶*Vithal Shivdeo's handwriting. Antaji Manakeshvar seems to be referred to. (The paper belongs to a northern campaign.)*

No. 153] [1757 ?

श्री

शेवेसी नारो महादेव सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ ८ रबिलावलपावेतो मुकाम पूठ श्रीभागीरथीघाट येथे सुखरूप असे विशेष. आपण सरकारचे पत्र राजश्री गोपाळपंत नानास पाठविलें कीं श्रीगंगेस पूल बांधावयाचा आहे याकरितां राजश्री बाळाजी खंडेराव पाठविले आहेत हे सामान पुलाचें जें मागतील तें त्यांस देणे. त्याजवरून माारनिल्हेनी सामान सुतळी गोणपाट मुजीचे रसमुज(?) लोखंड कोळसे सण बेगारी लोहार सुतार छकडे टोकरी व नावा देऊन मजला घाटावर रवाना केले. मागाहून आणखी सामान येत आहे. मी छ ६ रबिलावली घाटास दाखल जालों; आणि राजश्री बाळाजी खंडेराव याची भेट घेतली. सामानाविषई त्यानी पुसिलें. त्यास सांगितले कीं आम्हाबराबर आले तें तयार आहे. मागाहून आणखी येत आहे. दुसरे जें लागेल ते

आणऊं. मग त्यानीं सांगितले कीं होळकराचा पूल तो तयार जाहला. आम्ही लष्करांत लिहिले आहे. तेथून उत्तर आलियावर काय तें सांगो. याप्रकारचें वर्तमान आहे. मजला स्वामीनी राजश्री गोपाळपंत नानाचे तैनातीस दिले, ते तैनातीस आहे. अद्यापि कांही कामकाज नाहीं. मजला तो आश्रय एक आपला आहे. कामकाज सांगणारे आपण समर्थ असत. कोणाची इच्छा करावी? कृपाळू जे दिवशी आपण होतील ते दिवशीं उर्जित करितील हा तो भरंवसा आपलाच पूर्ण आहे. घरीहून पत्र आलें कीं चिरंजिवाचें लग्न योजिले आहे, तर खर्चाची बेगमी करावी. त्यास मी कोठून करावी? सर्व बेगमी करणार आपण समर्थ आहेत. रोजमरा बाकी एक राहिला आहे. त्याची परवानगी नालबंदीची परवानगी कांही खर्चबाबेची परवानगी जालियाने हे श्रेय आपणासच आहे. ब्राम्हणाचे लग्न होईल. बहुत मी काय लिहावे? शेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶Naro Mahadeo as directed by the Peshwa supplies material to Balaji Khanderao for the construction of a bridge over the Ganges.

No. 154] [*1757*

श्री

विनंती उपरी. श्रीमंताची बिनी आली. आमचे डावे हाते गुमटाकडे डेरे होणार. स्वामी मागे आहे. राजश्री नारो शंकर व समशेर बाहादर शहराचें आंगे, कदांचित स्वेवर धावतील याजकरिता चौकीस ठेविले आहेत. तेहि येतील. आपणास कलावे म्हणून लिहिले असे. श्रीमंत जवल अर्ध कोसावर आल्यास विना भेटी राहिल्यास उतम दिसणार नाही. आमचा तुमचा करार की विना नागरमलास भेटल्यासिवाये न भेटावे. हे तो जवल नेहटले आहे. त्याचा विचार काये तो करार करून पाठविला पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶This refers to some campaign in Rajputana in which Raghunathrao seems to have taken part. The writer is Vithal Shivdeo.

No. 155] [*8-1-1758?*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री सखारामपंत बापू
स्वामीचे सेवेसी

पो गोविंद बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता मार्गसीर वद्य १४ मुा नजीक कुबरमोठ? जाणून स्वकीय कुशललेखन करीत आसिले

पाहिजे विशेश. इकडील वर्तमान साद्यंत श्रीमंत राजश्री दादा स्वामीचे पत्री लिहिले त्याजवरून अवगत होईल. रा गंगाधर बाजीराव याचे पथक आणविले. त्यास तूर्त काम सोईस लागत चालिले. दोन महिनेयाचे काम फौजेचे आहे दोन महिने दोनी पथके ठेवणे. दोन महिनेयानंतर येक पतक ठेवणे. येक स्वामीनी घेऊन जावे. पुढे बदलेयास फौज छावणीस येईल तेव्हां ही जाईल. हजार विनंतीची विनंती हे आहे. दोन महिने फौज राहो देणे. दोन महिनियात हे कामे करून बंदोबस्त करितो. विनंती श्रीमंत रा· दादा स्वामीस करून दोन महिने दोनी पथके राहो देणे म्हणजे आम्ही चाकरी केली न केली सर्व ध्यानास येईल. परस्परे कोणी सांगेल ते खरे. वरकड वरचेवर वर्तमान लिहीत जाऊन. येथे जिवासी गाठ आहे. नित्य जुजासी गाठ. येथे कजिया आणि खावंदाची मरजी राखली पाहिजे. त्यास दोन महिने दोनी पथके राहिली पाहिजे. फौज गेलियास फजिती आहे. अंतरवेदीत दुसरी फौज नाही जे येऊन मदत करील. आमचे आम्ही संभालावे. वरकड वरचेवर वर्तमान लिहीत जाऊन. पूर्वी मुजरद जोडी पाठविली आहे त्याजबराबर साद्यंत लिहिले आहे. त्याचे उतर पाठवीजे. बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनंती. रामाजी सखाजी पिरोजाबादेस होते. त्याजला उठऊन ठाणे जाटास द्यावयाची आज्ञा जाली. त्याजवर रामाजी सखाजी याजला सांगोन त्याजला उठऊन देऊन जाटाचे ठाणे बसऊन दिल्हे हे विनंती.

¶*Govind Ballal describes to Sakharam Bapu the precarious situation in the north and requests him that the two squadrons of Gangadhar Bajirao should be allowed to remain for two months at least so that he may be able to restore order in the province.*

No. 156] *[21-3-1758*

श्री

सेवेसी राजाराम गोविंद विज्ञाति यैसीजे. इकडील वर्तमान विस्तारे विनंतीपत्रें पूर्वी सो पाठविली होती, त्याजवरून वृत्त श्रुत जालें असेल. हली वर्तमान तरी हाफिजाकडील फौज मुलामोहसन नामे छ ११ रजबी घेऊन फरुकाबादेजवळ आला. आतां येथून अहमदखानाचीहि फौज दो चो दिवसांत एकत्र होऊन स्वामीचे सेवेशी रवाना होतील. नवाब वजिरांनीं पत्रे सेवेशी पाठविली आहेत. अतःपर दिरंग लाविणार नाहीतसे दिसते. वजीरहि स्वामीचे सेवेशी येऊ म्हणतात. त्याही स्वामीचे सेवेशी विनंती लिहावयासी सांगितले कीं स्वामीचे अभयपत्र जहागीर द्यावयाचे बिलाशर्त आले म्हणजे आपली फौज घेऊन, सो येऊन

हजर होईन. याचीहि फौज घेऊन येईन; परंतु याजकरितां आमचे चालवावे हे शर्त नसावी. यांत माझी आबरू नाहीं. तरी आबरू रक्षून कृपा करणार स्वामी समर्थ आहेत ऐसे म्हणतात. येविसींचा विस्तार पूर्वी सो विनंती लिहिली आहे. जैशी आज्ञा येईल तैसी यासी सांगू. सेवेशी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Rajaram Govind informs Raghunathrao that the Nawab Vazir ? is seeking terms on the condition that his jagir is made over to him.*

No. 157] [*27-4-1758*

श्री

सेवेसी राजाराम गोविंद विज्ञाप्ति असीजें. इकडील वर्तमान पूर्वी सेवेसी विनंती-पत्रें पाठविलीं आहेत त्यांजवरून वृत्त श्रुत जालें असेल. हालीं वर्तमान छ १८ शाबानीं नवाब * व अहमदखानाकडील खलीलखान व इस्लामखान बक्षी वगैरे याजसमागमीचे जमातदार व हाफिजाकडील मुल्ला मोहसन व याचे जमातदार ऐसें कूच करून फरुकाबादेहून दाहा कोंस छबारामहूस आले आहेत. करारांप्रमोजीब फौजा अद्यापि कांहीं आल्या नाहींत. इटावियास आल्यानंतरी फौजा जमा होतील, म्हणोन म्हणता (त) व काही हालींहि दररोज जमा होतात आहेत. झांहून इटावियास गेलियावरी जमा होतील. इटावियापाशीं येमुना उतरलियावरी मी येकला मात्र वजिरापाशीं निरोप मागून पुढें येक दोन दिवस सेवेसी येऊन पोंहचेन. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Rajaram Govind writes probably to Raghoba that the Rohilla force that was to assemble to help the Marathas has not yet been mobilised.*

No. 158] [*29-4-1758*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक पुरुषोत्तम माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञाप्ति. येथील कुशल तागाईत छ २७ माहे शाबान मुकाम इटावा श्रीयेमुना उत्तरतीर स्वामीचें कृपावलोकनें करून येथास्थित असो विशेष. इकडील वर्तमान पूर्वी विनंतीपत्रें सेवेसी पाठविलीं त्यांजवरून वृत्त श्रुत जालें असेल. हल्लीचें वर्तमान छ २६ मिनहूस स्वामीचें आज्ञापत्र सादर जालें. त्यांत आज्ञा कीं नव दाहा महिने जाहाले, अद्यापि फौजा न आल्या. आतां आली तरी कामाची काय? तुम्ही व वजीर येमुना दक्षणतीरास उतरून आला असिला तर जलद मजल दरमजल येणें. उत्तरतीरीं असला तर वजिराहींही न यावें. तुम्ही व राजाराम गोविंद

यांहीं वजिराचा निरोप मागून हजूर येणें म्हणोन आज्ञा; त्यास सरकारचें पत्र वजिरास दिल्हें आणि निरोप मागितला. त्याजवरी वजिरांनीं पत्र वाचून कष्टी जाहाले आणि म्हणाले कीं आज आठ नव महिने मेहनत केली ते व्यर्थ जातें, असें कितीक प्रकारें भाषण जालें. सारांश उदईक कूच करून वजीर मजल दरमजल स्वामीकडे येतात. आम्ही त्यांस निरोप मागितला. त्यांणीं निरोप न दिल्हा. आपण सडा होऊन बाहिरबुणगाह व कबिले वगैरे आटोला[1] मागें ठेऊन जरिदां[2] स्वामीपाशीं येऊन पोहचतों, यास्तव आम्हास निरोप न दिल्हा. उदईक ते व आम्ही येमुना उतरून बराबरच सेवेसी येतों. वजिरांनीं विसा लाखांची टीप लिहून पाठविली आहे, ती सेवेसी पाठविली आहे. येमुना उतरलियावरी अहमदखानाची व हाफिजाची फौज आम्हाबराबर कितीक येते (ते) सेवेसी लिहून पाठऊं. येमुना उतरेल तेव्हां आम्हास भरवसा येईल. जर कदाचित उदईक येमुना न उतरले तरी आम्ही वजिराचा निरोप घेऊन हजूर सत्वरच येतों. श्रुत होये. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*Purushottam Mahadeo ordered to repair to his province immediately reports he is being delayed by the Vazir. " The Vazir ", he says " thinks that the sudden departure of Raghunathrao will set at naught the good work of the last ten months."*

No. 159] [*17-5-1758*

छ २० रमजान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारीक रावो नीलकंठ सा नमस्कार विज्ञापणा येसी जे. पूर्वी दोन तीन विज्ञापणा पाठविली आहे. ते प्रविष्ट होऊन सकलार्थ सेवेसी विदित जाहाले असेल. विशेष. विनंती येसीजे. बंगालाचे रुपये अकरा लाख दरबारखर्चासहित चुकले. त्याची निसा सध्या नख्त होता दिसत नाही. दोन लाख नख्त, बाकीची किस्तेबंदी[3], याप्रमाने निसा जाली. शाहाजाद्या याची जागीर वगैरे काम करून देऊन, अलिवारदाखान याचे हवेलीत दाखल करून दिले. साहारंगपूर वगैरे तालुका नजिबखानाखडील, येथील फौजदारी राजश्री विठल सिवदेव याचे वडील

---

१ आटाला = सामानसुमान, खटले. २ जरिदा = सडा. ३ हप्तेबंदीनें देण्याची फेड.

2358

पुत्राचे नात्री जाली. याणी व वजिरानी मिळून खान मजकुरावर जाऊन, त्यासी तालुकातून काढून, तेथे अमल करावा; यैसे करार जाला. परंतु वजीर खासा जातां दिसत नाही. तोपखाना व फौज आपली समागमे करून देईन यैसे दिसत आहे. राजश्री मुधोजी भोसले देसास जानार; राहात नाही. याजबरोबर अनीकहि लोक दिा विठलपंताकडील देसी जानार. रा अंताजीपंतासी व यासी श्नेह वैसाख सुध १० बुधवारी जाला. वरकड वर्तमान राजश्री कृष्णराऊ बलाल सेवेसी विनती लिहीत आहेत, त्यावरून विदित होत असेल, आण होईल. बहुत काय लिहिणे. हे विज्ञापणा.

¶*Ragho Nilkanth supplies to Raghunathrao news about the part-payment of the revenue due from Bengal, and the grant of the Foujdari of Saharanpur—Najib's province—to Vithal Shivdeo's son.*

No. 160] [*3-6-1758*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचें शेवेसी

विनंती सेवक आंताजी माणकेस्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा वैशाख वद्य १३ शनवार मुा सोनपथ सुखी असो. स्वामीची आज्ञापत्रे वरचेवरी आली कीं हुजूर भेटीस येणे. त्या (जवरून) गुरुवारी दिलीहून निवालो आजी सोनपथास पावलो. पुढे दरकूच सेवेसी येतो. पर्जन्य मार्गी अतिशये लागला आहे. परंतु तेसेच येत आहो. वजीर फारच यावयाचा अतिशये करीत होता. परंतु स्वामीची आज्ञा नवती याजकरिता तूर्त राहाविला आहे. सुरजमल पलवलेआलीकडे आहेत. विठलपंत रेवाडीवरी आहेत. शाहाजादा विठलपंतापासी आहेत. नागरमल दलेलसिंग याचे विठलराऊ सुरजमलाचे येकचित आहे. नागरमलाचे चितात निश्चये विठलपंतास सुरजमलास अतिशये करून शाहाजादा सुरजमलाकडे देऊन आपण मश्चेस्तीसी म्हणून जाऊन तिकडेच राहून बखेडा वाढवावा येसे आहे. होता होईल ते खरे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Manakeshvar to Raghunathrao giving details of the plans and movements of the Jats and other Sardars.*

No. 161] [*25-6-1758*

श्रीगजानन

रा व्यंकटराऊ व रा यादोराऊ हरि स्वामी गो

विनंती उपरी. संभुव्याचे मुकामीहून पूर्वी पत्र पा होते. रा कृष्णाजीपंताचे लिावरून तैसेच जावजी कदमाची रवानगी केली. त्या तो प्रकार तैसाच

होता. त्यावरून दीड प्रहर रात्रपर्यंत चतुर्थीचा गुंता उरकून कूच केले. तो रातोरात दीड प्रहर दिवसात खजुरीपा पावले. दोन कोस हेलपटा पडला. येथे आलों तो श्रीमंताचा मुकाम जाला होता. आम्ही तैसेच चढेस्वारी खेचे सुमारे चाललो. दोन तीन कोस पुढे जाऊन उभे राहिलो तोंच बो उभयेता भटजी आले. त्याच्या भेटी जाल्या. त्यापूर्वी रा कृष्णाजी गोपाल भेटले. त्यानी सांगितले की तुंम्ही सत्वर यावे म्हणोन दपाटा (?) लिहिला व थोडेसे श्रीमंत रागेहि भरले म्हणौन लिहिले, यैसे बोलले तों स्वारी खासा येऊन पोहचली. तोवर बसलो होतो घोडेखाली उतरोन उभयेता भटजीसह तो स्वारी आली. श्रीमंती पालखी उतरोन भेटले. पंधरा विसास भेटले. नजर पाच मोहरा केल्या. वंदन करावे लागले. मर्जीसाठी येणेप्राो जाल्यावर फारच समाधान पावले. पालखीत बसून चालले. आंम्ही पालखी धरून च्यार पावले चालताच हात धरून घोड्यावर बसणे, यैसे बरोबर (न) चालणे यैसे बोलले. तो स्वारी पुढे गेली. पाठीमागून रा चिंतो आनंत व चिंतो विठल व आबाजी माहादेव व हरिपंत यैसे रावर्त (?) चवघेजण मुतसदी भेटल. त्यानी सांगितले कीं श्रीमंत बरोबरच चालणे. इतक्यांत रा त्र्यंबकराऊ मामाची व महिपतराऊ पानसे बक्षी व फडणीस चिटणीस भेटले. घोड्यावर बसून धावत श्रीमंताची पालखी आटोपली. श्रीमंती पुसले कीं तुम्ही यावयासी विलंब काय कारणास्तव केला? उतर केले की खासा स्वारी सिपरी कोलारसचे सुमारे नरवराकडून ग्वालेरीस चालली. सबब झासीहून चवदा कोस मजल करून स्वामीकडे येत होतो. मग आपली स्वारी आहारचे मार्गे आली. यास्तव आठरा कोसाचा कूच करून येऊन स्वामीचे पाय पाहिले. त्यावरून बहुत खूश जाले. रियासी आलो. सरकारच्या दरबार जाला. सव्य हस्ताकडे जागा बसावयासी आम्हास दिली. डावीकडे त्र्यंबकराऊ मामास बसविले. देशाचे व सरदाराचे वृत पुसले. तेणेप्राो सागावयाची रीतीने सागितले. समर्पक उतरे जाली. पदोपदी समाधान पावले. वस्त्रे पुढे ठेविली. वंदन जाले. फारच खूश जाले. लिहिता विस्तार आहे. डेरे राहुट्या बरोबर आहेत किंवा नाहींत पुसले. सागितले. चुकामुक पडली. साहेबाचा आजचा मुकाम झासीचा यैकिला होता, सबब बुनगे परभारे वाटे लाविले. सडेच आभुक्त आहो. त्यावरून उतर कले की फारच हेलपाटा पडला. मग सरकारची राहुट्याचा * * वगैरे सरंजाम देविला. जवल उतरणे यैसे बोलले. तुम्ही नारोपंतास लिहून पो की खासा स्वारी झासीस आली हे लिहीणे. त्याणी सत्वर आम्हाकडे यावे. आमचे लक्ष राखावे.

जलद लिहिणे. ते राहिले तर सर्डे राहून तीनसे राउतानसी फौज दरोबस्त आम्हाकडे पा. उतर केले की आज्ञेप्रो लिहितो; आणि बोलले की निरतर वर्तमान लिहीत जावे, येसे लिा. उतम म्हटले. रा आनंदराऊ मोरश्वर पाछे-परकर भेटीस न आले म्हणौन रागे भरले की त्याचे पारपत्य करीत होतो परंतु तुम्हाकडे पाहून तसेच राहिलो. त्यास तुंम्हीच रागे भरोन फजीत करणे. उतर केले की दूर करितो. त्या उप्रांत बालले की गरिबास दूर न करणे; परतु तुम्हीच तोडावर देणे. माझी जागा आसून भेटीस न आला हे कोण शाहाणपण? त्याचा आन्याये जाला, क्षमा करावी येसे बोललो. उतर केले की तुम्हाकरिता क्षमा केली. झासीचे वृत पुसले. उतर केले कीं नवी वस्ती थोडी थोडी होत आहे. स्वामी प्रतापे सर्व उतम होईल. विडवर फार या प्रांते आहे. हे सर्व सुचविले. श्नान करावे येसे उतर केले. मग निराल्या राहुट्या दिल्ह्या. तेथे येऊन राहिलो. हिसेबाचा कारभारी यानी उहू केला. उतर केले मग विनंती करू. कृष्णाजी गोपाल केवल लबाड आहे. सागता विस्तार आहे. उगेच हाताखाली घेतला आहे. तुम्हास सविस्तर कलावे म्हणौन लिा आसे. घरांत वाचून दाखवणे. तुम्ही उभयेता व जावजी कदम सरनोबत यासी वाचून दाखवणे. उद्या फार करून येथे मुकाम सोमवाराकरिता होणार. छ १८ सवाल रविवार मुा खजुरा हे विनंती. पूर्वी लिाप्रो साहित्य करणे. शाकभाजी पानेपत्रावली खडीसाखर पा. श्री लक्ष्मीस व बाइकास खाली उतरोन देवणे. जावजीबावास सविस्तर सांगितले आहे. * * * * बायेकास यादोपताचे घरी ठेवणे.

¶*Raghoba returning home.*

No. 162] *[24-7-1758*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्रिंबकराव सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागायेत छ १८ माहे जिल्काद जाणून स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशष. श्रीमंत राजश्री दादा स्वामीनी देशास जावे म्हणोन आज्ञा केली. त्यावरून राजश्री गोविंद बलाल याजपासून निरोप घेऊन जेष्ट वद्य प्रतिपदेस निघोन मालवे प्रांती प्रगणे आगरास आशाढ सुध त्रयोदसीस आलो. येथील बंदोबस्त पंधरा दिवसामध्यें करून कूच करून स्वामीदर्शणास येतो. राजश्री समशेरबाहादर याणी हिंदुपताची मामलत चुकऊन खिचीवाडे या प्रांतास

आले. रा। गोविंदपंत व राजश्री माहादाजी गोविंद उभयता श्रीमंत राजश्री दादा स्वामीकडे जाणार होते. श्रीमंत राजश्री दादा स्वामी लाहूर प्रांतीचा बंदोबस्त करून अबदालीचा पराभव करून माघारे जयनगर प्रांतास आले. रा। जनकोजी सिंदे उमेदसिंग शाहापुरवाला उदेपूरच्या राज्याचा पटाईत रजपूत त्याचे स्थलास लागले आहेत. त्यास शाहापुरावरून मार्गी येता उमेदसिंगाची मामलत चुकऊन राजश्री जनकोजी सिंदे यासी मारवाड प्रातास रवाना करून मजल दरमजल देशास श्रावण अखेरपरयेत येतील. वरकड वृत सेवेसी आलियावर निवेदन करू. मजला स्वामीच्या चरणाखेरीज दुसरा आर्थ नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Trimbak Sivdeo, returning South, writes to the Bhausaheb of Raghoba's victory over the Abdali and the conquest of the Punjab.*

No. 163] [*5-9-1758*

पौ छ ४ सफर उर्फ
आश्विन सन तिसा

श्रीकृष्णोजयेति

श्रीमंत माहाराज धर्मधुरंधर अधिकप्रताप माहाराज पंडितप्रधान बालाजीराव स्वामी गोसावी याचे सेवेसी

स्नेहांकित राजा केशवराव कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ १ मोहरम भाद्रपद शुध ३ मुकाम झासी जाणून स्वकुशल लेखनाआज्ञा केली पाहिजे विशेष. कृपा करून पत्रोत्तर पाठविलें, ते पाऊन परम संतोष पावलो. आम्ही दिल्ली आबदाली तेथें आला त्या दिवसापासून आपले धर्म-संरक्षणार्थ सोडली. सर्व घरें वस्तभाव टाकून कुटुंब पुत्रपौत्र दोन्ही अग्निहोत्रे पित्रापुत्राची घेऊन माहाराजाचे छायेखाले माहाराजाचा झासी किलियाजवल येऊन शहरांत राहिलो. राजश्री नारो शंकर असतांच त्याही आणिले व जागा घर माहाराजाची आज्ञा त्यांस पावली. त्या साहित्याने सुखरूप स्नान संध्या करून या प्रांतीची तीर्थें केली. तो सर्व माहाराजाकरितां आम्हास प्राप्त जाला. आतां माहाराजावाचून आश्रये नाहीं. आज्ञा निरोपिली कीं लाहान थोर वर्तमान सदैव लिहीत जाणे. त्यास आज्ञेप्रमाणें पूर्वी लिहिले. सांप्रतीहि लिहिले असे. सारांश माहाराजास ईश्वरे संपूर्ण समुद्रवलयांकित पृथिवीचे राज्य जालें, असा प्रताप ब्राम्हणांत तो कोणाचा यैकिला नाही. दिलीचे पातशाह वजीर व पातशाहजादे दुर्भाग्येकरून परस्पर घरफुटीमुळे हलके जाले. सदैव कोणाचा

काल येकरूप असतो? आता ईश्वर माहाराजाचे हातें संपूर्ण विश्वास अन देणार. पूर्वील मुलकाखेरीज लाहोरचा सुधा अटकपावेतो दा करोडाचा मुलक या साली माहाराजाचा जाला. आतां पश्चमेस मुलतान काबल व पूर्वेस बंगाला व आयोध्या प्रयाग राहिली. त्यांत कितेक मुलक माहाराजाखालींच आहे. कुरुक्षेत्र व प्रयाग व वाराणसी व गया येथे येवनाचे नाव काशास? माहाराजासारिखा गोब्राम्हण-प्रतिपालक असता हा मनोरथ संपूर्ण विश्वाचा जाला पाहिजे. एका वरसाचे काम असे. सरदार तो या साली दक्षणे महर्गमुळे न जाता छावणीस राहिले. त्यास आज्ञा जाली म्हणजे पारपत्य जाल्यांतच आहे. आम्ही आपले स्वास्थ्या-विषई लिहावे तरी माहाराजाचे पदरचें आहोत. आम्हास काये चिंता? वये आमचे सेवटास तीर्थवासायोग्य जाले ते करितों. पुत्रपौत्राचा निर्वाह माहाराज विश्वकुटुंबी आहेत तो करितील. आम्हास चिंता नाही. कृपा वर्धमान केली पाहिजे हे विनंती.

¶*Raja Keshavrao to the Peshwa informing him that he has repaired to Jhansi owing to the fresh inroads of the Abdali in the North, especially in Delhi. The Imperial power at Delhi, he says, has been considerably impaired owing to domestic troubles. He further compliments the Peshwa for the valour he displayed in conquering the northern territory up to Attock.*

No. 164] [*27-9-1758?*

छ २२ सफर

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री बापूजी महादेव व याचे बंधू व त्रिंबक मल्हार माारनिलेकडील ऐसे कैद केले आहेत. हती घोडे उंटे सर्व वस्तभाव त्याची जप्त केली आहे. त्यास मर्जीप्रो रुपया कबूल केला तरी याचा फैसला करितो. न करी तरी हुजूर वडिलाकडे पाठऊन देतो. रवाना छ २३ मोहरम. बहुत काय लिहिणे हे विनंती.+

¶*The Peshwa is informed by Raghunathrao (?) of the arrest of Bapuji Mahadeo Hingne and his brother and Trimbak Malhar until they agree to make the payment.*

+ पत्र रघुनाथरावाचें नानासाहेबास असावें, (पहा खं. ६ ले, ३८३, ३३४ व ४७१.)

No. 165] [15-10-1758

छ १२ रावल सन तिसा

श्रीकृष्णोजयेति.

श्रीमंत माहाराज राजमान्य राजश्री
रघुनाथराव दादा स्वामीचे सेवेसी

स्नेहांकित राजा केशवराव कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ताा छ १२ सफर मुकाम झासी जाणून स्वकुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. बहुत कृपा करून स्वामीनि आमचे पत्राचे उतर लेहोन पाठविले. त्यांत आज्ञा की, "जरी तुम्हास पुढे झासीत राहाणे आसेल तरी सुखरूप राहाणे. व जरी दिलीस जायाचे आसेल तरी तेथे जाणे. पूर्ववत तुम्हापासून पातशाह व वजीर काम घेतील. जरी म्हणाल तरी सर्वास तुम्हाविषई पत्रें साहित्याची पाठऊ." आशास माहाराजाही जे कृपेकरून लिहिले ते प्रमाण. आम्हास पातशाह वजीर अखंड बोलावितातो व लिहितातो. कोण्ही वर्जीत नाहीत. आगर तेथून विरोधेकरून निघालो नाही. आपला स्वधर्म मुख्य जाणून, आबदाली दिलीस आला, तेव्हा नीट पातशाहापासून निरोप घेतला कीं, "तुम्ही आबदालीसी युध करिता तरी, आम्ही तुम्हाबाा मरायास सिध आहो; जरी तुम्ही हात जोडून भेटता तरी, आम्ही दोनी दिवस येथून जातों की तो दुष्ट, आमचा धर्म न राहे; तेव्हा काये?" असे म्हटले. त्याही आम्हास म्हटले की, "भांडायास आम्हास शक्ति नाही. तुम्ही दोनी दिवस कोठे जाणे. स्वस्थ होईल मग येणे." यावरी आम्ही नीट पुसोन आज्ञा घेऊन, निघोन मथुरेस आलो. तो मागाहून अबदाली येऊन, तेथील ते अवस्था केली; दोनी दिवस आगोधर आम्ही सकुटुंब निघोन नीट आगरियामधे शमशेर बाहादूर व राजश्री नारो शंकरास भेटोन, याचे विचारें झांसीस माहाराजाचा तालुका धर्मराज्य जाणून तेथेंच स्थिती करून आग्निहोत्रें दोन्ही पितापुत्राची चालतातो व येथें राहनेहि रिकामे नाही. पातशाह वजीर यासी सदैव पत्रे लिहितो व त्याची उतरे सदैव येतातो व ते वारंवारा बोलावितातो. परंतु तेथील स्थिती नीट नाही. आम्ही जाऊन काये करावे? येक माहाराजाचे आश्रये करून झांसीस आहोत. येथे आल्यास, येथून माघस्नानास प्रयागास जाऊन आलो. दुसरेदा वैशाखस्नान श्रीप्रयागी करून आलो. हे पुण्य माहाराजाचे आश्रये करून आम्हास प्राप्त जाले. जरी माहाराज दिली प्रांती आसते, तरी माहाराजाजवल येतो. दिलीची व वजीर पातशाह वगैरेची रीती स्थित सर्व माहाराजास विदित आहे. पूर्वील अवरंगजेबापासून आम्ही पाहात

आलों ते नाही. याजकरिता माहाराजाचे धर्मराज्यांत राहून, स्नानसंध्या करून कालक्षेप उतम करीत आहो. पुढे माहाराज या प्रांतास येतील व आज्ञा करतील म्हणजे माहाराजाचे दर्शन घेऊ. माहाराजास आमचा निर्वाह करणें आशक्य नाही. ब्राम्हणानेकरून निर्वाह होत आसता, येवनान्न कशास अंगिकार करावा? काकमांसं शुनैमुक्तं स्वल्पंतादपि दुर्लभं आसे येवन राज्याचे आसे.[१] लक्षावधि आम्हासारिखे महाराचाचे संगृही असतां, आम्हास उणें नाही. आम्हीहि माहाराजाचे त्रिपुरुषांपासून स्नेही आश्रित आहोत. नवे नाहीत. विशेष काये लिहावे? हे विनती.

¶*Raja Keshavrao, Peshwa's agent at Delhi, intimates to him that it was not on account of any differences with the Emperor or his Vazir that he left Delhi and went to Jhansi. "Both he and the Emperor are", he says, "in cordial correspondence since then. He left Delhi because he could not tolerate the interference of the Abdali with his religion whom he was prepared to face provided the Emperor showed enough strength and firmness."*

No. 166] [*16-12-1758*

पौ छ १७ रजब सन तिसा

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री रावजी

स्वामीचे शेवेसी

पोष्य सदासिव बलाल कृतानेक सां नमस्कार विनंती. ता मार्गेस्वर वद्य २ मंदवार मो सिरसा येथे आसो विशेष. स्वामींनी पत्रे पाठविली पावली. कल्याण-सिंग यास स्वामीचे पत्र होते ते भल्या माणसाबा मौजे आमखेडा येथे पाठविले. त्यास गडीत भल्या माणसास न घेतले. पत्र मात्र घेऊन गेला. चोपदार आणि प्रात:कालापासोन दरवाजे याजवल भला माणूस बसला, तो आस्तमानपर्यंत बसला तेव्हां उतर दिले ते बजिनस पाठविलें आहे. गोंद लाविली होती त्यास आंतील मार कलावयाकरिता आंम्ही लाखोटा पोडून पाहिला. गव्हार माजला आहे! बरे, आंम्हास पत्र लिा आसो. स्वामी खावंद साहेबसुभा आहेत. स्वामीचे पत्री सोखी जबरदस्ती लिहिली आहे. जर आपणात खावंदगिरीचे तेज आसेल तरी गव्हारांचे पारपत्य आति सत्वर करावे. जर स्वामीची फौज व राजश्री भाऊ येतील तरी आमेखेडियांत कल्याणसिंगास जिवत धरून, स्वामीपासी आणून

---

१ हा श्लोकार्ध बालबोधींत आहे.

हजीर करूं तरीच तोंड दाखऊ. नाही तर तोंड दाखवणार नाही. तीर्थयात्रेस याच मार्गे जाऊ. हे स्वाम न करीत तरी, स्वामीचे तेज नाही. पत्र पाहिल्यावर आंगाची आग्न जाली, ते ईस्वर जाणे ! पंचम ब्राह्मण तेथे गेला आहे. त्यास समीप येऊ न द्यावा. काडून द्यावा. आणि पत्र पावेल ते क्षणी राजश्री भाऊची बिदा करावी. राजश्री गंगाधरपंती उमेद महता याकडे दोन वेल पाा जे, त्या गावासी खरखस्ता न करणे. परंतु न आइकिले. राजश्री गंगाधरपंतास आम्ही लिा. त्याणी दोनसे प्यादे आंम्हापासी पाा. आम्ही शभर माणूस जमा केले. तेव्हां त्याचे न चालिले. येरवी गावावर चालोन येणार होता. आम्हांस काडून देणार होता. राजश्री गंगाधरपंताची काडीमात्र कानगी नाही. स्वामीचे पत्र त्यास पाा नाही. श्रमी होतील यास्तव गांव पेसर्जा जालिले यामुळे सिरसा व गिदोसा उजाड जाले. गोरगरीब रयेत पळाली. आमचे काम बंद जाले. खबर घेणे आसेल तर, सत्वर घ्यावी. नाही तरी आज्ञा जैसी कर्णे आसेल तैसी करावी. . गव्हाराचा गर्व परिहार कराल, तरचि स्वामीचे तेज आहे. सेवेसी श्रृत होये. हे विज्ञापना. राजश्री आपा स्वामी यासी साा नमस्कार. श्रीमंताचे पत्रावरून सर्व विदित होईल. लक्ष रक्षावा. हे विज्ञापना.

¶*Sadasiv Balal reports to his master the disorders raging in Bundelkhand. "Only a strong man of the Bhau's calibre can cope with this situation", he remarks.*

No. 167] *[28-12-1758*

छ १ जाावल सन तिसा

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गंगाधर येशवंत कृतानेक साां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा मार्गसीर्ष वद्य १३ मुाा कााा चांदवड स्वामीच्या कृपावलोकनेकरून येथास्तित आसे विशेष. पत्र पाा तें पाऊन हर्श जाहला. राजश्री सुभेदार याचे शरीरी वेथा अतिशये जाहली. सांप्रत्य ईस्वरइछेने व स्वामीचे कृपेने आरोग्यता आहे. राजश्री जनकोजी सिंदे व राजश्री दताजी पाा तिकडे गेलेत. सुबेदार सेंदवियास आले. मांडव्यापासून सेंदवियापर्यंत भिलाचा दंगा बहुत. याच्या बदोबस्ताकरिता तेथे राहिलेत. सरहंदेस पत्रे रवाना करावी म्हणून आज्ञा. त्यासीं आम्ही इकडे आलो. पत्रा(ची) रवानगी केली. भेटी होऊन पाये द्रिष्टीस (पड)तील तो सुदिन आसे. शेवेसी श्रृत होये हे विज्ञप्ति.

¶*Gangadhar Yeshwant reports the illness of Malharrao Holkar to Raghunathrao.*

No. 168] [10-2-1759 ?

श्री.

चिरंजीव राजश्री भाऊ यांसी बाळाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. छ ९ जमादिलाखरची पत्रे पाठविली ती छ १० मिनहूस पावली.

माहादाजी गोविंद याचे पत्र आले. आगरियाचे किल्याचे राजकारण आहे. तीन लाख रुा द्यावे लागतात व किलेदारास दाहावीस हजाराची जागीर द्यावी लागेल. न घेतल्यास जाट घेईल म्हणून लिहिले ते कळले. ऐसियास ते स्थल घेतल्यास जाटासी अति विरोध पडला व वजीरहि पातशाही स्थल गेले म्हणजे वाईट मानील. तथापि अपूर्व स्थल आहे ते घ्यावे. त्यास हिंदुस्तानास फौजा दसरियानंतर निघतील दबाव पडत जाईल त्या दिवसात घ्यावे. कोणी वेढा घालू सकणार नाही. कुमक होईल हा उतम पक्ष. दसरियापावेतो राजकारण राखून त्या दिवसात करावे. जर राजकारण तुटत असेल अथवा दुसरियाचे हाती स्थान जात असेल तर येव्हाच करावे. परंतु दतबास आगोधर इतला देऊन करावे. येथूनहि त्यास पत्र पाठवावे.

गोविंद बलाल याची पत्रे आली त्याचेहि उतर गेले पाहिजे म्हणून

जगतराज मृत्य पावले. राज्यावर वडील लेकाची स्थापना करावी. त्यास जगतराज असतां धाकटे लेकास आधिकारिले केले आहे. त्यास हे राजकारण समसेरबाहदर यांसहि ठावके आहे. हाली गोविंद बलाल याणी लिहिले आहे वडील लेकाची स्थापना केल्यास पंधरा (ल)क्ष रुा नजर घ्यावी. येविसी काये आज्ञा म्हणून विस्तारे लिहिले ते कळले. त्यास गोविंद बलाल ते काम मन घालून करणार नाहीत व तूर्त ते अंतरवेदीत आहे. कागदीपत्री रुा येत नाही. तूर्त काही लिहू नये. पुढे समसेरबहादर अथवा विठलपंतास रवाना करावे. यानी जाऊन करावे तूर्त होणार नाही.

लिहिले ते कळले. ऐसियास ती पत्रे
येथे आली नाहीत. तेथूनच उतरे
द्यावी.

छ ११ जमादिलाखर हे आसीर्वाद.

¶*Peshwa's letter to the Bhausaheb containing instructions regarding the occupation of the fort of Agra and the succession after the demise of Jagatraj Bundele,*

No. 169] [*21-3-1759*

पौ १८ स * * सितैन

श्री

शेवेसी विज्ञप्ति ऐसीजे. दिनचर्येचें वर्तमान छ २१ रोज बुधवार माहे रजब आखर रोज. दोन घटका दिवस बाकी राहातां स्वार जाले. स्वारी पालखीची. बसालतजंगाचे डेऱ्यास गेले. त्याणी येक मोहर पांच रुपये नजर केले. घटकाभर तेथें बसून संध्याकाळीं आपल्या डेऱ्यास आले. हुकूम कूच. वकील रामनारायेण याची दिलीहून अर्जी आली ते गुजरानली. वजिराचा व सिंद्याचा बिघाड जाला होता तो सल्लुक जाला. जनकोजी सिंदे व दत्ताजी सिंदे दिली-पलिकडे साठ कोस कर्नालेस गेले. इरादा लाहोरास जावयाचा आहे. शहाजादा प्रयागास गेला. सुजायतदौला मनसुर आलीखानाचा लेक त्यास भेटला. पांच लक्ष रुपये दाहा हाती व दाहा घोडे नजर केले. प्रयागच्या किल्याची सनद करविली. जगतशेट बंगल्यांत त्याचा भाचा हुकूमचंद शहाजाद्यापासी आला. बंगाल्यास शहाजाद्यास घेऊन जाणार. त्याचा खर्च कबूल केला म्हणून आर्ज जाली.

छ २२ रोज गुरुवार दोन घटिका दिवस आल्यावर स्वार जाले. स्वारी पाल-खीची. मजलीस मुतवजे[१] जाले. मुसाफत तीन कोस सतर जरीब मुकाम मौजे जाखपली परगणे जलपली सरकार खमम प्रहर दिवसा डेरेदाखल जाले. झुलपि-कारजंगानी आपलें कुटुंब कोंडपलीस होतें तें खममचे किल्यास पाठऊन आपण व अपाराव जमीदार येलुराकडे गेले म्हणून अर्ज आली. आखर रोज तीन घटिका

---

१ मुतवजे=गमन करते.

दिवस राहातां खिलवतेंत आले. बसालतजंग व गुलाम नक्षबदखां व राये रायां व बिरजनाथ बारयाब जाले. जाबसाल करून येक घटिका दिवस राहातां बरखास्त. हुकूम कूच.

छ २३ रोज शुक्रवार घटका दिवस आल्यावर स्वार जाले. स्वारी पालखीची. मजलीस मुतवजे जाले. वाटेने येतां स्वारी हतीची मुसाफत साडेच्यार कोस जरिदी मुकाम मौजे बहिरामपाला परगणें नालकुडपली येक प्रहर दोन घटका दिवसा डेरे दाखल जाले. अखर रोज पांच घटिका दिवस राहातां स्वार जाले. स्वारी पालखीची. शाहा गुजराथी फकीर याच्याथें गेले घटका येक तेथें बसले. भाजी व भा(अपूर्ण)

¶*News from the court of Hyderabad is reported. There is a reference to Sindia's differences with the Vazir and their subsequent reconciliation.*

No. 170] *[22-3-1757*

पो छ १८ रमजान

श्री

तीर्थरूप राजश्री नाना वडिलांचे सेवेसी

आपत्ये सगुणेने नमस्कार विनंती. येथील कुशल ताा चैत्र सुध त्रितीया मंदवार मुक्काम झोंसी नजीक प्रयाग गंगापार सुखरूप पावलों विशेष. कुरा-जाहानाबाद येथील मुकामीहून पत्र लिहिलें त्याजवरून श्रवन जालेंच आसेल. उपरांत तेथून कूच करून फाल्गुन वद्य चतुर्दसीस प्रयागास आलों. दखणीराऊ दिवाण नवाब महमदकुलीखान यांकडील प्रयागापासून पांचा कोसावरी अलम-चंदावरी येऊन भेटला. वेणीसंगमी त्रिरात्री राहून तीर्थविध उरकिला. उपरांत कालीं चैत्र सुध द्वितीयेस पार उतरोन येथें मुक्काम केला. उदईक कूच करून पुढें श्रीस जात असों. नवाब सुजातदौला यांजकडील नारायेणराव पंचवीस स्वारानसी जांगिराबादेचे मुकामीं येऊन भेटला. नवाब सुजातदौला यांचा व बलवंतसिंगराजे यांचा बिघाड जाला होता, यामुळें नवाबानें बलवंतसिंगावरी मोहीम केली. बलवंतसिंग पार उतरोन पलोन गेला, त्याजवरी याणी पूल बांधोन पार गेले. लतीबपुरचा किला नवाबाने घेतला. जबरदस्ती पोहचलियावरी बलवंतसिंगानें सलूख केला. पंचवीस लाख रुपये देऊं केले. कार्य जालियावरी नवाबाने बलवंतसिंगाची ठाणी माघारीं दिल्हीं. नवाब अयोध्येस गेले. नवाब महमदकुलीखान प्रयागाचा सुभा आजी येऊन दाखल जाला. राजश्री गोविंद बलाल व रा गोपालराव गणेश यांचा आंतरवेदीतील माहालांविशीं पेशजीपासून

कजिया लागला आहे. रा। हरि विठल मधें पडोन निमेनिम माहाल वाटून घ्यावे म्हणून करार केला. त्यापैकीं कांहीं माहाल तेव्हांच गोविंदपंताकडे दिल्हे. बाकीं च्यार पांच माहाल द्यावयाचे राहिले ते आजी उद्या देतो, असेच करितां आठा-दिवसी देत नाहीं म्हणून सांगितले. उभयेतानी समजलियाची पत्रें वडिलांस लिहिली होती. त्याचें प्रत्योत्तर आले कीं निमेनिम समजला, उतम केले; निमेनिम आमल करून येकमते राहाणे म्हणून. ते पत्र गोविंदपंती दाखविलें. त्याजवरी हरि विठल व हे उभयेता ब्रम्हवर्ताचे मुकामी येकत्र करून वर्तमान मनास आणिले. कोण्हे गोष्टीचा तह न बने. हरि विठल काल्पीस गेले. उभयेता जागिरांबादपावेतों समागमें आले. तेथें गोपालराव यांसी सांगितले कीं तीर्थरूपांच्या पत्राप्रमाणें आमल गोविंदपंताचे स्वाधीन करणें. त्याणी उत्तर दिल्हे कीं बाहालीची सनद आलियाखेरीज आमल देत नाहीं. त्याजवरी गोविंदपंतास सांगितले कीं दुसरी सनद आणवून आमल करणें. त्याणी उत्तर दिल्हें कीं याच पत्रावरून आमल घेऊ. सेवटीं उभयतांचे रहस्य न जाले. त्यांचा मुकाम जागिराबादेवरी आहे. आम्हीं पुढे आलों. वडिलांस कलावे, म्हणून लिहिले असे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶Sagunabai communicates to Nana news from the North—her reception by Shuja's officer, Shuja's expedition against Balwantsing and the bickerings between Govindpant Bundele and Gopalrao Barve. This Sagunabai is the widow of Janardanpant, the Peshwa's brother, and appears to have stayed on in the North for a couple of years.

No. 171] *[15-4-1759*

छ ९ सवाल तिसा

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जनकोजी सिंदे कृतानेक दडवत विज्ञापना. सेवकाचे वर्तमान तागाईत छ १७ साबान मोकाम सतलुज नदी स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशष. आज्ञापत्रे छ २९ रबिलाखरची पाठविली ती छ १९ जमादिलाखर पावली. तेथे आज्ञा कितेक मनसब्याचा आर्थ व बंदोबस्ताविसी वगैरे वर्तमान तपसीलवार आज्ञापिलें, ते कलले. ऐसियास आज्ञेप्रमाणे सर्वही बंदोबस्त उतम प्रकारे होऊन येईल. वरकड अर्थ अलाहिदा पुरवणीपत्री सेवेसी विनंती लिहिली असें त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶Jankoji Sindia from his camp on the bank of the Satlaj assures Raosaheb that the task assigned to him will be executed faithfully.

No. 172] [7-5-1759
[27-5-1760

श्री

सेवा विज्ञापना विज्ञाप्ति ऐसीजे. उदेपूरचा पैका राणाजी देत नाहीं एतद्विषी सरकारची पत्रे द्यावयाची आज्ञा केली पाहिजे.

२ राणाजीस पत्र कीं तुम्हाकडे पट्याबा चौसाला रुपये व मबलग येणे व जनकोजी सिंदे याच्या विद्यमानें ऐवज ठरला तो पत्र दर्शनीं रोजीन्यासुद्धा[1] ऐवज राजश्री गोविंद कृष्ण याचे पदरी घालणे. फिरोन बोभाट आलिया फौज पाठवून रुजू घेतला जाईल. मुरवत राहणार नाहीं. म्हणून पत्रे

१ राणाजीस पत्र

१ जसवंतराव प्रधान यास पत्र

२

१ राजश्री मल्हारजी होळकर यास पत्र कीं राणाजीस शह पोहचाऊन पट्याबद्दल वगैरे रुजुवाती चौसाला झाडबाकी राजश्री गोविंद कृष्ण याजकडे ऐवज देवणे म्हणून पत्र.

१ गोविंद कृष्ण याच्या नांवें पत्र कीं राणाजीकडील पट्याबद्दल वगैरे रुपये येणे ते बेमुरवत होऊन ज्या रीतीनें निवतील त्या रीतीनें सरकारचा पैसा रोजीन्यासुद्धा घेणे. येतद्विषी राजश्री मल्हारजी होळकर यास पत्र दिल्हे असे. कलेल तैसा निकाल करून झाडबाकी करून घेणे म्हणून पत्र

४

चार पत्रे द्यावी. देणें.

छ ११ सवाल जेष्ठ सितैन

¶*The letter contains drafts of four despatches to be sent to the Rana of Udaipur, Malharrao, Jasvantrao, the minister of the Rana, and Govind Krishna regarding the payment of the money due from the Rana who refused the payment.*

---

१ दैनिक खर्च.

No. 173] [28-9-1759

श्री

दत्ताजी सिंदे यांस पत्र द्यावें कीं राजश्री गोपाळराव गणेश यांणीं शाहाजाद्याचें राजकारणाचा प्रसंग लिहिला त्यास शाहाजाद्या चांगला माणूस आहे. ' तुम्हास उपयोगीं पडल्यास शाहाजाद्याचें राजकारण राखून ठेवावें. पाहून थोडें बहुत खर्चासही गोपाळराव यांचें मार्फतीनें द्यावें लागेल. येणेंप्रमाणें लिहून श्रीमंतांस दाखवावें. येणेप्रमाणें आज्ञा जाहाली.

छ ६ सफर सूरसन सितैन अश्विन.

¶*Dattaji Sindia is advised to open negotiations with Shahzada as he may prove a useful instrument.*

No. 174] [10-11-1759

श्री

शेवेसीं नारायेणदास विज्ञापना ऐसीजे. आपले वडील बंधु गोवर्धनदास श्रीनाथजी द्वारावरून माहायात्रेस जाणार. ऐसियास कृपाळू होऊन मार्गी कोणे-विशई उपसर्ग न लागे येविशई सरकारचे कमाविशदारास व मोंगलास साहित्यपत्र

१ बलवंतसिंग कासीचा राजा
१ प्रयागचा सुभा
फारसी १ सुंदरशा गयाचा राजा
फारसी १ राम नारायेण पटणवाला
फारसी १ मनसुर आलीखानाचा नायक अयोध्येस आहे त्यास
१ शाहदाढा येथील कमाविसदारास पत्र कीं तुम्हीं खरगोन नर्मदेपावेतों स्वार प्यादे देऊन पोंहचावणें म्हणोन नारो बलाल
१ कृष्णराव रामचंद्र कमाविसदार सरकार बिज्यागड व
१ इंदुरच्या कमाविसदारास जिवाजी शिंदे कृष्णाजी पवार
२ शाहज्यापूर व सारंगपूर येथील कमाविसदारास
१ उजेन येथील कमाविसदारास पत्र कीं सिरोजपावेतों बदरका देऊन पावतें करणें म्हणून. पुढें श्री नाथजीस जातील, स्वार वगैरे देऊन पावते करणें म्हणोन.

१ गोविंद बलाल यास

१ माहादाजी गोविंद झासीकर

१ गोविंदपंत वैद्य रुजू गणेश संभाजी

१ गोपालराव गणेश बर्वे कुराजैनाबाद

३ अमानसिंग वगैरे बुंधले

१ मशारनिले हिंदुपत ३

१ जगत राज * ३ पाहडसिंग

१ सभासिंग २

—

३

१ बगेल्यास

१ अंतरवेदींत रूपराव खेचर जमीदार

१ प्रतापगडच्या राजास

१ वकिलास पत्र जे प्रयागचे सुभा यास सांगून मशारनिलेचे सर्व प्रकार साहित्य करणें म्हणोन प्रयोगचे वकिलासी येक पत्र * * यादवराव याचा * *

१ उदेपूरचे राणाजीस पत्र कीं मशारनिले तेथ व नाथाजीद्वारावरीच सा महिनें राहतील तरी हरयेक गोष्टीचा परामृश करणें. आपले पदरचे आहेत सर्व प्रकार मशारनिलेचा साहित्य होय तो अर्थ करणें. परंतु येतात तेव्हां बदरका देऊन उजण बुरानपूर पावत करणे. जे काय गोष्टी सांगतील ते मान्य करून कार्या करून दिल्हें पाहिजे.

१ उदेपूर येथील वकिलास गोविंद कृष्ण पत्र कीं मशारनिले तेथें येत आहेत तर मार्ग कठीन. ऐसियासी तुम्ही राणाजीस सांगून स्वार वगैरे पुढें पाठऊन मशारनिलेस घेऊन जाणें. तेथून श्री नाथजीद्वारास जातील तरी बदरका देऊन पावता करणें. तेथें कांही दिवस राहातील. सर्व प्रकार गौर करणें. तेथून परतून येतां वेळे बदरका देऊन उजेण बुरानपूर पावत करणें

२ याखेरीज बुदिका वावदे पालपूर व नवलाई वगैरे राजास
पत्र द्यावें दस्तक राहा(दा)रीचे
१ वासुदेव संभाजी कमाविसदार देपाळपूर
त्रिंबक राजदेव कादार नवलाई.

—

२९

येकून येकुणतीस पत्रें द्यावयाची आज्ञा करावी. सदरहूप्रमाणें पत्र देणें म्हणोन. येणेप्रमाणें साहित्यपत्रें व येक पत्र सेट गोवर्धनदाससेट यास कीं साहित्यपत्रें पाठविलीं ते पावतील सुखरूप यात्रेस जाणें ऐसें देणें. छ १९ रबिलावल सुर सितैन कार्तिक.

लिहिणे.

¶*The paper gives the names of the Peshwa's officers in the North. Letters have been issued guaranteeing a safe passage to one Gowardhan Das going on pilgrimage.*

No. 175] *[15-11-1759*

पो छ २४ रबिलोवल
कार्तिक सितैन

श्रीवेणीमाधव

श्रीमंत माहाराज राजेश्री
पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती आज्ञाधारक त्रिंबकराव कृतानेक नमस्कार विज्ञापना. सेवकाचें वर्तमान तागायत छ २४ मोहरमपर्यंत माहाराजाचे कृपेकरून मुकाम श्री प्रयाग येथास्थित आसे विशेष. माहाराजाचें कृपापत्र पाऊन चित्तास परम धैर्य व आनंद प्राप्त जाला. सेवकाचेविषईं आज्ञा जाली कीं श्रीमंत राजश्री दादासाहेब त्या प्रांतीं येतील. त्यांस तुम्ही सर्व आर्थ विदित करणें. तुम्हांपासून सेवा घेऊन ऊर्जित करतील. त्यास माहाराज कृपावंत जालिया माझें ऊर्जित हो यांत कोण संदेह आहे ? मुख्य माहाराजांची कृपा पाहिजे. मी सेवक पदरचा श्रीवेणिमाधवाचे चरणाजवळ माहाराजाचे सुभचिंतनी तत्पर व सेवेंत सादर आहे. रात्रंदिवस श्रीवेणीमाधवास हेंच मागतों कीं माहाराजाच्या आयुष्याची व प्रतापाची यशाची वृधी होये व त्रिस्थळींत सरकारचा आमल होये. मनोरथाचा दाता श्रीवेणिमाधव आहे. सर्वहि घडोन येईल. सांप्रत या स्थलीं बकाउलाखान

सुजाउदौलाच्या तरफेनें सुबा व गुलाम हुसेनखान चेला किलेदार आहे. मीर बहरी किलेदाराकडे आहे. यात्रकरांस पहिलेसारखा उपसर्ग नाहीं. माफिक मामूल महसूल घेतो. व सरकारची लिहिली पुसली ज्याजपासीं आसली त्यास मुजोहिम[1] होत नाहीं. सेवक यात्रकरांचे कार्याविषईं तिलतुल्य आंतराये करीत नाही. मिरजा कोचक पहिला सुबा लखनौत सुजाउदौलाच्या कैदेत आहे. बंगाल्यातहि परस्परें विरुध आहे. या प्रांतीं फौजा आलिया बंगाल्यापावेतो मुल्क हस्तगत होणे काही कठीन नाही. व सेवकाच्या चाकरीचा मुजरा त्यासमई दिसोन येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*One Trimbakrao from Prayag writes to the Peshwa that good treatment is being meted out to pilgrims by the new Suba.*

No. 176] [*24-11-1759*

पो छ ७ माहे जमादिलावल सन तिसा

श्रीकृष्णोजयति

श्रीमंत माहाराज राजश्री पंडितप्रधान माहाराजाचे सेवेसी

पो राजा केशवराऊ सा। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ ३ राखर मोकाम झासी जाणून स्वकुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. गाडदी चांडाल याही मोठा दगा केला होता. परंतु माहाराजाचे मोठे सुकृत कीं श्रीमंत भाऊसाहेबाचे कुशल जालें. आम्ही शुभचिंतकाही कुशल वर्तमान कललियावरी ईश्वराधना केली. माहाराजाचा धर्म आड आला व अबदाली दुष्ट चांडाल येंदा मागती आपले देशातून लाहोरपावेतो आला. त्यामुले दिली आगरे तो गडबडले. दिलीचे लोक वजीर आदिकरून कबिले सर्वाही जाटाचे मुलकांत पाठऊन सडे जाले. तो आलीकडे आला तरी दिली सोडतील व राजश्री दताजी व जनकोजी सिंदे याही नजीबखान वगैरे रोहिले यास जेर केले आहे परंतु पर्जन्यकाला व जागा कुबल[2] याजकरिता नजीबखान दगा करून वाचला. या दुष्टानेच मथुरेत कतल केला होता. आताहि अबदालीस पैका पाठऊन यानेच बोलाविले व तो आला म्हणूनच रोहिले तंग[3] धरून बसले. परंतु माहाराजाचा प्रताप येसा आहे की सरदार त्यासगट उतम प्रकारे पारपत्य करून सर्वास नेस्तनाबूद करितील.

---

१ त्रास देणें, २ कठीण, ३ नेट,

माहाराजास सर्वाकरून वर्तमान पावतच आहे तथापि आम्हीही वरचावरी विनंती केलीच पाहिजे, म्हणून करितो. माहाराजाचे छायेखाले माहाराजाचे आश्रये करून आहोत. शुभचिंतन करून आहोत. विदित असावे हे विनंती.[१]

¶*Raja Keshav Rao congratulates the Peshwa on the escape of his cousin from the murderous assault of Mu farkhan. He further informs the Peshwa of the descent of the Abdali into India at the invitation of Najibkhan.*

No. 177] [*3-1-1760*

छ १७ जाखर माघ
सितैन मंगलवार

श्रीमोरया

शेवेसी विदनापना. इकडील वृत सर्वदा पत्री लिहिले आहे. पूर्वी लाकोडेस रांगड्याची फौज च्यार हजार व पायेदल जमा होऊन त्यांस मारून लुटून पस्त केले. जोतासिंग नाथावत व राजावत व सेकावत चव्हाण वगैर कछवे वीस सरदार मारले गेले, त्या दिवसापासोन रांगडा कोण्ही जमाव करून बाहेर निघेनासे जाले. जागाजागा थांगा धरोन राहिले. पूर्वी राजश्री जनकोजी सिंदे याजकडील पत्रे आली होती त्यावरून तोफखाना आम्ही माघारा लाऊन सडे होऊन दरमजल त्या प्रांतास जात होतो. तेणेकडोन रांगडे बहुतच वारो[२] प्याले. आम्ही व पुढील फौजा जे दिवसी येकत्र जालो तेच दिवसी राजश्री जनकोजी सिंदे याजकडोन पत्रे आली. त्यांत गिलज्याकडील बहुतसी गर्मीचा मजकूर नवता आणि इकडील रांगडियानी जमाव करून वल्गना आरंभिली. याचे पारिपत्य करून खारिस्त[३] केला पाहिजे म्हणून बलवाडा जागा भारी कुरुपाची होती तेथे जरबा देऊन ठाणे बसवावे म्हणजे इकडील थोडा बहुत बंदोबस्त * * सिंद्याकडे बातमीची पत्रे पाठविली त्याचीही उतरे आलियावर जो मनसबा कर्तव्य तो करावा यैसे जाणून बलवाडियासीं मोरचे लावले. थोरल्या तोफा रामपुरियासीं माघाऱ्या पाठविल्या होत्या त्या आणविल्या. मोरचे व तोफखानियाचा मार देऊन गाव बहुत जेर केला. विक्रमाजित व राजावत व सेकावत व सुलतानवत वगैरे होते ते बहुत बजिद होऊन कौलास आले. त्यांस जीवदान देऊन ठाणियांत आपले लोक बसविले. येणेकरून तमाम जाग्यास द(ह)शती भारी पडोन रुजू जाले. मामलतीचा प्रकार आपल्या आपण बोलू लागले.

---

१. पत्राचे खालीं तीनचार ओळी औपचारिक मजकूर लेखकाचा मुलगा राव बद्रिनाथराव यानें लिहिला आहे. २ गर्वभरित झाले ? ३ बाहेर घालविणें, हद्दपार करणें.

उन्हेर इसरदेव्राल्यानी आमचा हाडोतीचा मुलूक बळाविला आहे तो सोडोन घ्यावा. त्याच्या वतनाची मात्र खेडी त्यांजकडे ठेऊन वरकडाची मामलत करावी. झिलांवेकराकडील देखील अनुसंधान आले. आठ पंधरा दिवसात येथील निर्गम करून घ्यावा. पुढील विचार पाहून मनसबा करावा तो अकस्मात राजश्री जनकोजी सिंदे याची पत्रे आली की अबदालीची फौज वीस पंचवीस हजार ज्याहनखान व अबदुल संमदखान वगैरे सरदार शतद्री नदी उतरोन अलीकडे आहि * * करिता आम्ही नजीबखानाचा शह (टाकून) यापासी येमुना उतरोन आलो तर * * कामे टाकून इकडे सत्वर यावे म्हणून लिहिले. त्यावरून आम्ही उचित मनसबा जाणून तोफखाना माघा(रा) लाविला. इकडील कामे मागे पुढे करावयासी येतील. मागे दुसाला नुकसानी जाली पुढेहि येक साल होई ते पुरवली व स्वामीचीही आज्ञा की तिकडील इकडील विचार पाहून मनसबा कर्तव्य तो करावा म्हणून. त्यास छ १३ जमादिलावली कूच केले. अथ:पर या प्रांती कोठे येक क्षण न गुंततां मोठाल्या मजली करून गिलज्याचे पारपत्यासी जात आसों. होईल वर्तमान तें शेवेसीं वरचेवर विनंतीपत्रें लिहिली जातील. तिकडील वृत सर्वदा लेखन करावयांसी आज्ञा करावी. शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Malharrao pleads his activities in Rajputana as an excuse for his delay in going to Sindia's succour who is hard pressed by the Abdali and the Rohillas.*

No. 178] *[4-1-1760*

छ १७ जाखर सितैन

श्रीमोरया

शेवेसी विज्ञापना. आज छ १४ जमादिलावली दिलीकडोन बातमीची पत्रे आली कीं राजश्री दताजी सिंदे कुंजपुऱ्याहून सडे होऊन पुढे गिलज्याचे तोंडावर गेले. राजश्री जनकोजी सिंदे व राजश्री गोविंदपंत व वजीर नवाब गाजुदीखान माघे बुणगियांत राहिले होते. राजश्री दताजी सिंदे यांची व गिलज्याची फौजसी गाठ पडली. प्रहर सा घटकापरियेंत परस्परे युध्यप्रसंग जाले. उपरांतिक उभयेताही आपलाले ठिकाणी कायेम राहून मुकाम केले तों तेच दिवसी रात्री गिलज्या ज्याहनखान व अबदुल समदखान फौजेसहित दऊढियापासी येमुनेचा घाट उतरोन अंतरवेदीत गेला. पुढे नजीबखान रोहिला व ते येकत्र होणार आहेत. त्याजमाघे राजश्री दताजी सिंदेहि येमुना उतरोन अंतरवेदीत जाणार. शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*An action near Kunjpura between Dattaji Sindia and the Abdali is reported.*

No. 179] [10-1-1760

पो छ २८ जामादिलाखर
माव मास सुा सितैन मया
व अलफ

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री नाना स्वामी
गोसावी यास

आश्रित कृष्णंभट पाटणकर अनेक आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. पौष वद्य अस्टमीपर्यंत श्रीकृष्णातीरी श्रीमदभिस्टचिंतनपूर्वक स्नानसंध्या करून सुखरूप असो. यानंतर आपल्या शरीरी सावकाश नाहीं हें वर्तमान यैकोन चितास स्वस्थता नाहीं. तथापि आपण व दोन ब्राम्हण श्रीकृष्णातीरी स्वमतिने यथाशक्तया ईश्वरआराधनास आरंभ केला आहे. श्रीकृपेने सत्वरच आरोग्य होईल. चिंता न करावी. संक्रमणसंबंधी शर्करायुक्त तील पाठविले आहेत. स्वीकारून सदैव सर्वप्रकारें सांभाल करणार आपण समर्थ आहेत. सूज्ञतमेष्वलमातिलेखनेनेत्याशी:सहस्त्रमजस्त्रं.

¶*Krishnabhat makes inquiries about the Peshwa's health.*

No. 180] [12-1-1760

छ ३ जमादिलाखर
भोमवार

श्री

स्वामीचे शेवेसी विनंती सेवेक रावजी माहादेव साष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील कुशल तागाईत पौश्य वद्य दशमीपर्यंत येथास्थित असे. यानंतर राजश्री सुभेदाराकडील पत्रे वद्य पंचमीस बाविसा दिवसाची आली. सांप्रत बलवाडियास मोर्चे लाविले आहेत तेही फते जाले असल किंवा होईल. लाहोराकडे जात होते, परंतु सिंद्याचे कूच अद्यापि जाले नाही आणि बुंदी पाटण पर्यंत मुल्लक उज्याड होईल. माधोसिंगही राहिली ठाणी घेईल. मुलकाचाही बंदोबस्त जाला नाही याजकरितां तूर्त ठाणेमजकुरास मोर्चे लाविले आहेत. सिंद्याचा व रोहिल्याचा (मुका)बला पठाणावर जाणार म्हणून उ * (व)र्तमान आहे. वरकड वर्तमान मागून जे येईल ते सेवेसी निवेदन करीन. वरकड वर्तमान

राजश्री बापूजीपंत दिा फडणीस हे विनंती करतील. आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. तूर्त बरवाडियास मोर्चे लाविले तेव्हा गुतले. ते आलियावर काये विचार होऊन वर्तमान येईल ते सेवेसी लिहून पाठवीन हे विज्ञप्ति.

¶*News letter from Raoji Mahadev, describing the movements of Holkar.*

No. 181] [*24-1-1760*

छ १० रजब सितैन फाल्गुन

श्रीमोरया

श्रीमंत राजेश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक गंगाधर येशवंत व आनंदराव राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम छ ९ जाखर मुकाम नजीक कोटपुतली स्वामीच्या कृपाव-लोकनेकरून येथास्थित आसें विशेष. इकडील पूर्वी येक दोन वेला लिहिले आहे. जैपूर प्रांतीहून गिलज्यांचे पारपत्यास्तव दिलीकडे आलो. त्यास आम्ही आल्यापूर्वीच राजश्री जनकोजी सिंदे याचे व गिलज्याचे जुंज होऊन दतबा निधन पावले. राजश्री जनकोबा बाबा या मावारे आले त्याची आमची मुकाममजकुरी गाठ पडली. पाटलाचे वर्तमान येकून खेद विशेष जाला. ईश्वरे आनुचित केले. होणारास उपाये नाहीं. पुढे गिलज्यांचें पारपत्य जलद जालें पाहिजे. याजमुळें मनुष्ये बुनगे सर्व माघारे लाऊन सडे जालो. गिलजे रोहिले जमाव भारी जाला आहे आणि हावभरी जाले आहेत. त्याजला तजविजीने तंबी करून दहशत बसविली पाहिजे. छ मजकुरी कूच करोन पुढे जात आसो. स्वामीच्या पुण्यप्रतापेंकरून अमित्राचे पारपत्य होऊन येईल. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*An important letter from Gangadhar Yeshwant, Holkar's Diwan, giving the news of the defeat of Sindia's army by the Abdali and the death of Dattaji.*

No. 182] [*End of January 1760*

छ २७ जमादिलाखर
सितैन माघ

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनती सेवक जनकोजी सिंदे कृतानेक सां विज्ञापना. येथील सेवकाचे वर्तमान तां छ जावलपर्यंत येथास्थित असे विशेष. स्वामीचें आज्ञापत्र छ २४

2379

राखर पाठविले ते छ १८ माहे मजकुरी पावले. पत्रीं कितेक वर्तमान लिहिले त्यावरून सर्व कळू आले. तदनंतर सेवकाचे वर्तमान तरी छ २० रोजी दिलीचे मुकामी गिलज्याची गाठ पडली. पारचे रोहिले व नजीबखांन फौजेसुधा त्यास सामील जाले. त्यांचे आमचे जूज जाले. ते समई तीर्थस्वरूप राजश्री काकाबाबास गोल्या लागोन लढाईंतच राहिले. ईस्वरे अनुचित गोस्ट केली. बरे. त्याची सता प्रमाण. उपरांत आम्हांसहि गोली उजव्या हाताच्या दंडास लागली आहे. थोडकीच असे. तदनंतर बुनगियांत येऊन सर्वांस संभाळून कोटपुतलीचे मुकामी आलो, तो राजश्री मल्हारजी बावा होलकर फौजेसुधा येऊन भेटले. तदोतर बुनगे ठेऊन सडे उभयेताहि होऊन गेलो. हे पत्र स्वामीस पावताच फौजेची तयारी करून याप्रो सत्वरीच पाठवावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶*Jankoji Sindia to Sadashivrao Bhao writing about an encounter between Ahmadshah and Dattaji Sindia and the death of the latter. The writer also received a bullet on his right shoulder. The battle took place on 10th January 1760 at Delhi.*

No. 183] *[3-2-1760*

छ १५ जमादिलाखर

सितैन माघ

श्री

विनंती सेवक रावजी माहादेव कृतानेक विज्ञापना. राजश्री सुभेदाराकडून पत्रे आली ती सेवेसी पाठविली आहेत. ध्यानास आणून पत्राच्या उत्तराची आज्ञा करून उतरे सत्वर येतील म्हणजे कासीद ताबडतोब * * * आबदालीची फौज सर (हिंद) आलीकडे येऊन सिंदियासी त्यास युध जाले. कायेम उभयेता राहिले. गिलजे यमुना उतरोन आंतरवेदीत गेले. नजीबखान व गिलजे येकत्र जाले. सिंदियाची पत्रे राजश्री सुबेदारास आली. यानी बावडी[१]यासी मोर्चे लाविले होते. तो घेऊन दरकूच दिलीच्या सुमारे सिंदियाकडे गेले. उभयेता येकत्र होऊन रोहिलियात भेद करून फोडावे, सुज्यातदौलास वजिरी देऊ करावी येसे करून हलाखाले घेऊन गिलज्याचे पारपत्ये करावे येसे आप * * मानस दिसते. स्वामीनी * आगोधर येणेप्रमाणे आज्ञा केली आहे. प्रस्तुत

---

* 10-1-1760

१ बलवाडा.

2380

आज्ञा पत्री करणार स्वामी समर्थ आहेत. राजश्री जनकोजी सिंदे व दताजी सिंदे यासी पत्र द्यावे की येकचिते चालून गिलज्यास तंबी करावे. वरकड धोंडाजी नाईक विनंती करतील हे विज्ञापना.

¶*Raoji Mahadeo reports to the Peshwa that there was a clash between the armies of Sindia and the Abdali after which the latter's army crossed the Jumna into the Doab. He further writes that Najib has entered into an alliance with the Abdali.*

No. 184] *[3-2-1760*

छ १५ जाखर
सितैन माघ

श्रीमोरया

सेवेसी विज्ञापना. कर्जपटीचा मजकूर कार्तिकचा वायेदाविसी स्वामी आज्ञा समक्ष केली. येथे आलिया कोणे गोष्टीने युक्तीस न पडे. खर्च बहुत. आये थोडा. लोकास रोजमरा पाहिजेत, पागाचा खर्च केलाच पाहिजे, खेरीज नित्य खर्च स्वामीसी बोलल्याप्रा काही तजवीज करणें जरूर. मग निकाल काढू(न) कलेल त्या रीतीने राजश्री वेकाजी हरीची रवानगी केली. मारनिले सविस्तरें विनंती करतील. आजपावेतो येका पैस्यास * * * नाही नित्य लोकाचे * * * ले दुसरे काही सुचत नाही. तूर्त (हा) मनसबा थोर आला. त्यास आत:पर तिकडे जाऊन स्वामीच्या प्रतापे कार्यसिध्धी करितों. वायेदा तो सनिध आला. तोपावेतो दिवस जाण्यायेण्याचे गलबलीत जातील. आमचा येत्न चालल्यास स्वामीकार्यासी सेवकलोकापासोन आंतर होणार नाही. राजश्री सुबेदाराचेहि मनोगत सर्व प्रकारें साहेबाचे चरणापासी. दुसरा आर्थ जाणत नाहीत. येदा खर्चामुळे डोहात आहेत. पार करणार स्वामी समर्थ आहेत. श्रुत होये हे विज्ञापाना.

¶*The writer Gangadhar Yeshvant Chandrachud narrates to the Peshwa his monetary difficulties, but assures him that in spite of them, his new venture will have the full support of his master.*

2381

No. 185] *[8-2-1760*

छ २० रजब सितैन

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक गणेश संभाजी साा नमस्कार विज्ञापना. ताा माघ वद्य ७ पावेतो मुकाम काल्पी येथे स्वामीचे कृपाअवलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे. विज्ञापना येसीजे. उजनीच्या मुकामीहून विनंतीपत्र पाठविले तेथे फौजविसी आर्थ लिहिला होता. त्यास फौज तो आली नाहीं. सेवक दरमजल सिरोंजेस आलो तो अबदाली रेटून दिल्लीत दाखल जाला. सिंदे त्याच्या मोहऱ्यावर होते. फौज छावणीची सडी होती. मागती रोहिल्यासी तीनच्यार मास लडाई होतच होती. त्यावर आकस्मांत तोही आला. त्याजवर हे लढाईस गेले. बुनगे पहिलेंच मागे ठेविले होते. सडे बुनगे पाठीवर होते. फौजसुधा युधास गेले. यमुनातीरी वढे होते. जंगल मोठे. राबतास राऊत दिसेना येसा बोरु व झाडी, खारजमीन पाणी येसा जागा होता. दताजी सिंदे येकांगवीर[१] जाऊन लागलेच आराबियावर[२] पडले. चांगले च्यार घटका युध जाले. त्याचे चांगले चांगले माणस पडले. परतु ईश्वरास करणे तदनसार दतबास गोली लागोन ठार जाले. मग इकडील फौजेने सहजच चल खोदला. तो जनकोजी सिंदे सावरोन त्यासन्मुख जाले. याणी च्यार घटिका जूज केले. यांच्या दंडावर गोली लागली. तेणेकरून हे माघारे फिरले. मग ते मागे लागले. नुकसान फारच जाले. राा मल्हारराव करवलीकर जाटाची फौज व माधोसिंगासी सलूकसा करून त्यांची काही फौज घेऊन आले होते. तेथे जनकोजीबावा चालीस कोस गेले. त्यास सामील जालियावर ते व हे, बुनगे ग्वालेरीस राा गोविंद बलाल याजसमागमे देऊन, आपण दिलीस गेले. त्यास काल वर्तमान आले कीं आ(ब)दाली व रोहिले सारी फौज बाहेर निघोन येक लडाई बहुतच झाली. दोन्हीकडील माणसे फार जायां झालीं. सेवटी आ(ब)दालीने सिकस्त खादली मग लाहोरच्या वाटेने चालिला. हे मागें तो पुढें, याप्रो जात आहे. याप्रकारचें वर्तमान. त्या समयात दरकूच मी चालिलो. ढाकोणीस आलो. तेथे राजश्री समशेर बाहादर बावाची फौजपैकी पाचेकसें राऊत.

(पुढील बंद गहाळ.)

¶*This first sheet of Ganesh Sambhaji's letter to the Peshwa gives details of Dattaji and Jankoji Sindia's encounters with the Abdali.*

---

१ धाडसी वीर. २ तोफखाना.

No. 186] [1-3-1760

पौ छ १३ साबान
सन सितैन

श्रीकृष्णोजयेति

श्रीमंत महाराज राजश्री पंडित प्रधान बाळाजीराव नाना
स्वामीचे सेवेसी

पो राजा केशवराव सां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता छ १२ रजब मोकाम झासी जाणून स्वकुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री मल्हारराऊ होळकर सुबेदार व जनकोजी सिंदे व नारो शंकर नारनोल प्रांती म्हणजे दिलीहून पनासा कोसावरी जैपूरचे रोखे तेथून जैपूर तीस ४० कोस तेथे आहेत व आबदाली व नजीबखान व दुंदेखान देखील कुल रोहिले त्याजबा भारी फौजेने आलवर प्रांती आहे व तोपखाना व सामान भारी त्याजबा आहे. व सरदाराची फौज सडी कुल बुनगा पूर्वीच उजैनीकडे वाटे लाऊन आबदालीचे मुकाबिलियावरी राहोन कहीकबाड व रसद जाऊन देत नाही. याजमुळे त्याचे लस्करात अन माहाग फार. रुपयास तेल दीडसेर मिळत नाहीं. दुसरे अबदालीचे लोक जेथें जातातीं ते मारुन लुटोन कतल करितातीं व बंद करितातीं. याजकरितां कोण्ही त्याचा इतबार करीत नाहीं. कौल त्याचा नीट नाहीं. याजकरितां कोण्ही त्यास रुजू होत नाही. व त्याचे वकील जैपुरास राजा माधवसिंगापासी व सुरजमल जाटापासी येऊन पैगाम केला आहे की तुम्ही पैका पाठवा व भेटीस रफीक व्हा. आम्ही तुम्ही मिळोन मऱ्हाटे सरदारास हिंदुस्तानातून दक्षणेस पा(ठ)ऊ तुम्हासहि त्याचा उपसर्ग होत आहे. असा पैगाम आहेत. या जाबसालात नजीबखान रोहिला आहे ज्याने अबदालीस बोलाऊन येथवरी काम केले आहे. परंतु सुरजमल जाट जाब देतो की मी रयेत आहें. तुम्ही दिलींत नीट पातशाहीवरी कायेम व्हा व मऱ्हाटे सरदाराचे पारपत्य करा. त्याची मामलतीप्रमाणें मी तुम्हास पैका देईन, तोवरी माझ्याने काही होत नाही. याजप्रमाणें माधोसिंगहि म्हणतो व सलूक तिकडील तोडीत नाही. अबदाली व सरदाराचा निवाडा जालियावरी जिकडे बल पाहातील तिकडे होतील. सारांश गोष्टी इतकी आहे. अबदालीनें जो पातशाहाजादा पटणियाकडे जाऊन तख्तावरी बसविला आहे त्यास आपणाजवळ बोलाविले आहे की तुजला दिलीतें पातशाहा करितो व सुजाउदौलास अयोध्येहून त्याजबा बोलाविले आहे की तुजला त्याचे

वजीर करितो. व पैकियाचाहि पैगाम केला आहे. पांहावे ; जरी ते येतील तेव्हा त्या सर्वास हाताखाले घालोन मग काये करील याचा विश्वास नाही. पैका तो सर्वापासोन घेईल व हे सर्वास कलले आहे. कोण्ही त्याजपासी येत (अपूर्ण).

¶*News letter from Delhi: the Peshwa's agent Keshaorao writes to him an account of the encounters of the Abdali and the Holkar and Jankoji Sindia.*

No. 187] [*10-3-1760*

छ १४ सन सीतैन

श्रीकृष्णोजयेति

श्रीमंत माहाराज राजश्री पंडित प्रधान बालाजीराव नानासाहेबाचे सेवेसी पो राजा केशवराव सांा नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ताा छ २१ माहे रजब मुकाम झासी जाणून स्वकुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. पूर्वी कितेक पत्रे सेवेसी हिंदुस्तानाचे व आबदाली व रोहिलें व राजा माधवसिंग व जाट वगैरेचे वर्तमानाची व सरदार याचे वर्तमान सविस्तर लिहिलें ते पत्रे जरी सेवेसी पावली असतील तरी सार्थक आहे. परंतु या दिवसांत आबदालीची डुंडीमुले[१] जागा जागा मार्गात गवाराही धूम केली. कासिदास धरोन मारिताती. व वाट चालत नाही. आमचे कासदही कितेक लुटले मारले गेले. पत्रें गेली. याजकरितां कुल पत्रे पावली नसतीलसे वाटते. प्रस्तुतचे वर्तमान तरी राजश्री मल्हारराऊ होलकर सुबेदार व जनकोजी सिंदे हे जमाव करुन मेवात प्रांत दिलीहून ५० कोसावरी होते. त्याहून पंधरा वीस कोस जाटाचे किले व मुलूक व जैपुर तीस कोस येकीकडे राहिले. परंतु याही फौज सडी समागमे ठेऊन बाहीरबुनगा अगधी कबिलियासगट मालवियासी वाटे लाऊन आबदालीचे तोंडावरी होती. आबदाली मगरुर. त्याहीवरी नजीबखान रोहिला आणिक कुल रोहिले त्याजबाा असतां आबदालीची फौज भारीच जाली. त्याने नीट पैगाम राजे माधवसिंग व जाट व कुल राजे व शुजायेदौलास माणसे लिहिली पाठविली की भेटीस या अगर फौज व पैका द्या. त्यास इकडील सरदाराचे भये, तिकडे त्याचेही भये. त्यास सलूक ठेऊन वरच्यावरी जाबसाल राखत आहेत हे देखोन राजश्री मल्हारराऊ पोख्ती तजवीज्य केली की, आबदालीसी जूज करायाचा काबू[२] नाही, याचा मुलक जाऊन मारावा. मग सहजच इकडोन हे फिरतील. राजे रजपुताचा जमाव इतफाक[३] होणार नाही. मग अबदाली व रोहिला आपले मुलक राखायास

---

१ दंगा. २ ताकद. ३ एक विचार.

2384

येईल तरी आम्ही दुसरेकडे निघोन जाऊ. याचा हात आपणावरी पडो न देऊ. हे करोन नीट त्याचे तोंडावरोन निघोन दिलीकडे येऊन येमुना तरोन सिकंदराबाद अंतरवेदांत येमुनापार दिलीहून २० कोस नजीबखानाचा तालुका तेथे ठाणे नजीबखानाचे मारून लुटून पुढे गंगेअलीकडील त्याचा मुलक मारिताती. व आम्हास राऊ मजकुराहीं लिहिलें आहे की रोहिलियाचा मुलक गंगेआलीकडील व गंगेपलीकडील फकराबाद कुल रोहिलियाचा मुलुक मारितो. तो सहज तिकडोन इकडे येईल तरी आम्ही दुसरेकडे निघोन. याप्रकारें त्यास खराब करीत आहो. तुम्ही खातरजमेनें झांसीतच असणे. व तिकडील मोकासदारांची खातरजमा करणें की आपले जागा कायेम आहेत. त्यावरून आम्ही झांसी व काल्पी येथे मोकासदारास लिहोन पाठविलें की, आब्दालीकडील कोण्ही इकडे येत नाही. तुम्ही खातरजमा असो दीजे. त्यावरोन झांसीचे लोक साहुकार आपलाले कबिले घेऊन दतिया वोंडछा व बुधेलखंडात जात होते ते राहिले व मोकासदारास (अपूर्ण)

¶*Raja Keshav Rao reports to the Peshwa developments in the North. On his arrival in India, Ahmedshah Abdali effected a union with the Rohilla forces and has invited other potentates—the Jats, the Rajputs under Madhosing, and Shuja—to fight under his flag against the Marathas. The Rajputs though afraid to open hostilities with the Marathas could not ignore the powerful Abdali and opened negotiations with him. Malhar Rao and Jankoji, to prevent the consummation of their alliance, invaded Rohilla territory.*

No. 188] *[14-3-1760*

छ १४ साबान
सन सितैन

श्रीकृष्णो जयति

श्रीमंत माहाराज राजश्री प्रधान पंडित बालाजी राऊजी स्वामीचे सेवेसी

पो राजा केशवराव सां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता छ २९ रजब मुकाम झासी जाणून स्वकुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. पूर्वी दोन च्यार पत्रे वरचेवरी वर्तमानाची पाठविली आहेत त्यावरोन आबदाली व सरदार राजश्री मल्हारराऊ व राजश्री जनकोजी वगैरेचे वर्तमान विदित जालेच असेल. सांप्रत मल्हाराऊ वगैरे सिकदराबाद नजीबखानाचा तालुका अंतरवेदीतील मारोन, मागून

अबदाली आला; मग तेथून चालोन मथुरेपासी यमुना उतरोन भरतपुरास सुरजमल जाटाचे तालुकियास आले. मागे सिकंदराबादेजवल गंगाधरपंत तात्या फौजेनिसी होते. यांची व अबदालीचे फौजेची झटपट जाली. गंगाधरपंतहि निघोन जाटाचे मुलकांत आले. सारांश अबदाली व रोहिले सर्व सामील जाले. फौज भारी, सामान तोपखानियाचा फार, याजकरितां जूज करणें इकडोन बनत नाही. हात त्याचा पडो न देता कावादावा करितातो व दक्षणेकडील कुमकेचा मार्ग पाहातातो. कोण्ही आलियावरी सर्व मिलोन जे पारपत्य करयाचे ते करितील. नजीबखान रोहिला व आणिक सर्व जमाव रोहिलियाचा मुराबाद बरेली प्रांतीचा सर्व येक होऊन अबदालीस शामील जाले आहेत. मागून आणिक अबदालीची फौज काबलेकरोन येते म्हणोन वार्ता आहे. खरे लटके आलियावरी कलेल. माहाराजें या शत्रूचे पारपत्य करावें, उपेक्षा न करावी. धण्यातून कोण्ही येणार त्याजबा फिरंगी तोपखाना सामान दिधला पाहिजे. या शत्रूची उपेक्षा न करावी. जाट व माधवसिंग व शुजाउदौला सर्व यास भितातो. दताजी सिंदे याची तो अवस्था जाली. याजकरिता गरूर अबदालीस व रोहिलियास फार जाला आहे. दुसरे आपली फौजहि तधीपासोन त्याचे तोंडास नीट झोंबत नाही. येक मल्हारराऊ युक्तीने त्याजला लागून खराब करावे म्हणोन उपाये करितातो परंतु अबदाली व रोहिले वरकड मोगलासारिखे नव्हेत, कजाक आहेत. धावायास व व जुजायास बलकट आहेत. दिलीतील पातशाहाची ते गती जाली. मोगलाई बुडालीसी जाली. येक पातशाहजादा मात्र पटणिपांत आहे. तख्त करोन बसला परंतु दिलीस येऊन पातशाही करी असे सामर्थ्य नाही. अबदाली जरी त्यास आणून बसवील तरी न कले. परंतु काये गरज? (ज)री पातशाही हातास आली तरी आपणच कां करीना? रोहिले म्हणतातो की मोगलाची पातशाही दिलीतील गेली. पठाणीची कदीम पातशाही जाली व यास मोठा द्वेष माहाराष्ट्राचा आहे व भयेहि हेच मानितातो. दक्षणेत माहाराजाचा जये मोगलावरी जाला हेहि यास कलले. याजकरिता दक्षणपावेतोहि हांव याची आहे. जोवरी सरदार हिंदुस्तानांत माहाराजाचे आहेत तोवरी दक्षणेस हे येणार नाहीत. यांचा टिकाव न होये तेव्हा हे दक्षणेपावेतों येतील. सर्वाप्रकारें माहाराजाही कुमक लौकरी करावी. नाही तरी अंतरवेदीतील व बुंदेलखंडातून अमल साचा उठेल. आतांपासून सर्व लोक गडबडले आहे व लाहोर दिलीचा तों अमल अगदी उठला. करोडो रुपयाचा मुलक त्याचे हाती लागला तेव्हा त्याचे बल आणिकच होत जाले. जाले वृतांत सर्व विनंती करावी म्हणून लिहितो. क्षमा करावी.

2386

येथार्थ न लिहावे तरी आम्हास योग्य नाही. माहाराजाचे आश्रयांत आहों. शुभचिंतन करावे हा धर्म आहे हे विनंती.

¶*An important letter from Raja Keshav Rao to the Peshwa giving a vivid picture of the terror and awe the Abdali inspired in the hearts of all. "Malhar Rao's efforts to defeat him with his usual guerilla tactics have proved useless as the Abdali is a master of his craft. Only a well trained army equipped with powerful artillery can hope to succeed against this enemy".*

No. 189] [*12-6-1760*

पौ छ ६ जिल्काद नकल

श्रीमोरया

राजश्री गोपालराव गणेश गोसांवी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो[1] मलारजी होलकर व जनकोजी सिंदें दंडवत विनंती उपरी. रुपराय खिचराच्या पारपत्याखेरीज माहाल सुरलीत होऊन आमल चालणार नाही म्हणोन लिहिले. त्यास राजश्री गणेश संभाजीस पत्र लिहिले आहे. त्याजला बोलाऊन कार्यसिधि करून अमल सुरलीत करणे. जर त्याचे येणे न होये तर तुम्ही स्वार प्यादे नवी सिबंदी ठेऊन जमाव पुरकस करून श्रमसाहास करून खिचराचे पारपत्य करणे बंदोबस्त करणे. खर्चवेच लागेल तो माहालचा माहाली वसूल करून उगवणे. हिसेबी मजुरा पडतील. सुा इहिदे सितैन मया व अलफ छ २७ सवाल. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Gopalrao Ganesh Barve is authorised to enlist new men to put down the rising of Rupraya Khichar in case Ganesh Sambhaji fails to send him help.*

No. 190] [पौ *31-8-1760 ?*

छ १९ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवेसी. पूर्वी सुरजमल जाट यांची भेट ते समई जाहाली. त्याणी सर्वप्रकारें शफतप्रमाण स्वामीसी रिफाकत करावयाविसी केली. स्वामीही त्यास आपले म्हणून त्याजपासून कार्य घ्यावे हे वर्तमान लिहिलेच आहे. येशियास

---

१ स्नेह.

त्याजला येक पत्र समाधानाचे बदनसिंग व सुरजमल यांस पाठवावे कीं तुमची फलाणियाची भेट होऊन बोलीचाली प्रमाण जाले त्याप्राा त्याच्या लिहिल्यावरून कलो आले. येशियास तुम्ही सर्वप्रकारें आमचे आहा. बाबूराऊ बोलिले आहेत त्याप्राा अमलात येईल, संदेह नाही. समाधान असो देणें. आम्ही मालवियांत येतो तुम्ही फौजबंदी तयार असो देणे याप्रमाणें पत्रे अगत्य पाठविली पाहिजेत. मुख्य खुलासा जाटांचा, आपल्या मुलकास उपद्रव न व्हावा, खंडणी नजर न मागावी. आमचे मुलकात गडकोट आहित, बुनगे जतन करून चाकरीस दाहा-हजारानसीं हरोलीस जेथे पुढे करून घेतील तेथें हाजीर आहो. सर्वप्रकारें कृपा करावी. याविरहित दुसरा मुदा नाही. आम्ही येविशी स्वामीच्या तर्फेने त्यांची तसैली[1] केली आहे. सेवेसी विदित असावे, विदित होये हे विनंती.

¶*The paper refers to the conditions on which Surajmal Jat is prepared to take up arms to fight under the Maratha flag, i.e. (i) his state will not be molested, (ii) no tribute is to be levied from him.*

No. 191] [*14-9-1760*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे शेवेसी

पो कृष्णाजी अनंत साा नमस्कार विनती उपरी. येथील कुशल ताा भाद्रपद शुध पंचमी मुकाम दिली जाणून स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष. बहुत दिवस जाहाले. आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नवते. त्यास हाली पत्र आले. त्यावरून बहुत संतोष जाहाला. ऐसेच निरंतर पत्र पाठऊन आपणाकडील साकल्य वर्तमान लिहून आनंदवीत असावे. यानंतर इकडील वर्तमान तरी श्रीमंत दरमजलीने देशीहून चमल नदीवरी आले. तेथे उभयेता सरदाराच्या भेटी जाल्या. तेथून दरकूच मथुरेस आले. तेथून राजश्री बलवंतराव याजबरोबर दाहा हजार फौज देऊन पुढे दिलीस रवाना केले. येथे येताच किलेदार, पातशाई किल्यात, अबदालीकडील किलेदार होता. त्याणे गोली वाजविली. त्यावरी पातशाही किल्यास मोर्चे लाविले. मागाहून खासा स्वारी आलियास दोनतीन रोज किला जुजला. उपरांत किलेदार सलुखाने बाहेर निघाला. पातशाई किल्यांत सरकारी ठाणे बसले. अबदालीची फौज

---

१ खात्री.

खासा व नजीबखान सुज्यातदौलेसुधा पनास हजार येमुनेपलीकडे परतीरी पटपट गंजावरी उतरले आहेत. आपली फौज आलीकडे उभयेता सरदारसुधा आलीकडे आहे. प्रस्तुत पलीकडे उतरोन जावे तरी येमुनेस पाणी फार याकरितां उतार होये तोपर्यंत अवकाश आहे. मार्ग जालियानंतर पलीकडे उतरतील. प्रस्तुत सुज्यातदौलेयाच्या मारफातीने सलुखाचा प्रकार होत आहे. परंतु सलुखाने प्रांते[1] लागतो असा प्रकार दिसोन येत नाही. येक जूज जालियावरी काये होणे ते होईल. वरकड आम्ही सरकारसेवा करून सुखरूप आहो. धन्याचीही कृपाच आहे. आपण वडील सर्व प्रकारे आमचा सांभाल करीत असावे. उपरोधिक ल्याहावेसे नाही. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Krishnaji Anant reports to Naropant Nana the capture of Delhi by Sadashiv Rao. Peace negotiations carried on through the mediation of Shuja-ud-daula are not likely to succeed as both the combatants are determined to fight to a finish. The Jumna is in flood which has prevented the armies from coming to grips.*

No. 192] [*20-10-1760*

श्री

तीर्थस्वरूप राजश्री नाना वडिलांचे सेवेसी

आपत्ये बालकृष्णाने चरनावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ १० रबिलोवलपावेतो मुाा कुंजपुरा वर्तमान येथास्थित आसे. विशेष. वडिलाकडील बहुत दिवस आसीरवादपत्र पाठऊन सेवकाचा साभाल करीत असिले पाहिजे. वडिली आसीरवादपत्र पाठविले ते पावोन परमसमाधान जाहालें. यैसेच निरंतर पत्र पाठऊन संतोषवीत आसिले पाहिजे. हिकडील वर्तमान तरी आबदल समदखान व कुतुबशाहा यैसे दोघेजन मारिले. झुज जाहाले. आपलेहि लोक जखमी पाचसातसे जाहाले आहेत. कुजपुरा लुटून फस्त केला. पैकाही सापडला आहे. पुढी गिलज्याचेहि पारपत्य करावयासी उमेदवार जाहाले आहेत. तोहि लुटून घेतील. काही चिता नाही. श्रीमंताचे पुन्य समर्थ आहे. समंधखानाचीहि फौज दाहा हजारपावेतो होती परंतु येकदाच हला केला. त्याची फऊज दाहा हजार कापून काढिली. घोडेही च्यार पाच हजार आली. निदान प्रमाणें वर्तमान जाहाले आहे. पैका कोणाकडील वसूल

---

१ निकाल.

जाहाला नाही याउपरी लोकास पेका देतीलसे दिसते. देतील तेव्हा आमच्या हातास येई. आपणास कलावे म्हणऊन लिहिले आहे. माहादाजी बारवकर यास देवआज्ञा जाहाली. आपणास कलावे म्हणू लिहिले आहे हे विज्ञापना.

सेवेसी गंगाधर बाबाजी जोशाचे कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. आपण कृपा करून स्मरण करून पत्र पाा ते पावले. नित्य नित्य हमेशा पत्रे शेवेसी लिहित असतो. पावत नाही त्यास अन्याय काये? वरचेवर साभाल करावया आपण वडीलच आहेत. आश्रा दुसरा कोणाचा? असो. वरकड वर्तमान राजश्री बालकृष्णपंती लिाा आहे. कलेल. कुंजपुऱ्यास समनखान वगैरे मारले. द्रव्यहि दाहापावेतो सापडले. मोजदाद चारपावेतो जाली. हे विज्ञापना.

¶*The action at Kunjpura and its favourable effect on the temper of the Maratha army is reported by Balkrishna.*

No. 193] *[20-10-1760*

श्री

तीर्थस्वरूप राजश्री नाना व तथा राजश्री आणा
वडिलांचे सेवेसी

आपले बाळकृष्णाने च्यरनावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार. विनंती. येथील क्षेम ताा छ १० रबिलोवलपावेतो मुाा कुंजपुरा वर्तमान येथास्थित आसे विशेष. वडिलाकडून बहुत दिवस आर्सावादपत्र येऊन वर्तमान कलत नवते. त्यास हाली छ १९ मोहरमचे पत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाहाले. येसेच निरंतर आसीर्वादपत्र पाठऊन सेवकाचा सांभाल करीत आसिले पाहिजे. हिकडील वर्तमान तरी लोकाकडील येवज आद्यप येक पैसा वसूल जाहाला नाही. फोजेस रोजमुरा तीन महिने मिलत नाही याप्रमाणे लोकांची हलाकी. याप्रमाणे हलाकी जाहाली आहे. येथे कुंजपुरेयावर आज चार रोज आलो. त्यापासून दाणा लुटीचा मिलो लागला. त्याउपरी समंधखान येथे दाहा हजार फउजेनिसी होता तो युध्य करून लुटिला. त्याचे सीर कापून भाल्यावर लाऊन लस्करात फिरविले व कुतुबशा त्याचा सरदार होता तोही त्याप्रमाणेच मारिला. त्याची लूट लोकास सापडली व घोडीही दोन चार हजारपावेतो होती तितकीही लोकाणी आणिली. आपल्याकडील लोक जखमी फार जाहाले. परंतु ठार कोणी मातबर जाहला नाही. खंडेराव दरेकर व हैबतराव जाधव भुईजकर या दोघाजनास गोळीची जखम जाली आहे परंतु हलकीच आहे. पेकाही दाहा

पंधरापात्रेतो सापडला. लोकाणी पाच लक्षेपर्यंत हल्याचे दिवसी लुटिला. आता पेका सापडला आहे. याउपरी लोकास काही दिल्हे तरी आमच्या हातास येईल. माझी खर्चाविसी बहुत हलाकी आहे. दाणा महर्ग बहुत जाहाला. रुपयाचे दीड पायेली दाणा जाला आहे. दोनशे रुपये घो(ड्या)स व मानसास आजपात्रेतो लागले. गिलज्याची लडाई पुढे होनारच आहे. याप्रमाणे वर्तमान आहे. आपणास कलावे म्हनून लिहिले आहे. घरी कोकणात खर्चाविसी हलाकी जाहाली आसेल ती ईश्वर जाणतच आसेल. हिकडे आलो परंतु येक पेशाची मिलखत दिस(त) नाही. कर्जदार (व्हावे) येसे दिसते. वडिलास कलावे म्हनून लिहिले आहे हे विज्ञापना. राजश्री बालकृष्णपंत दाजीस व केसोपंत दाजीस साष्टांग नमस्कार सांगणे. लोभ करीत जाणे हे विनंती.

वेदमूर्ति राजश्री बापुभटजीस साष्टांग नमस्कार सागणे. राजश्री माहादाजीपंत दाजी जोसी यासी साष्टांग नमस्कार सांगणे. लोभ करीत आसिले पाहिजे.

¶*One Balkrishna allured to the North by the prospect of plunder writes in a gloomy strain as things are going wrong. The letter depicts the desperate straits to which the army was reduced months before the day of the final action. The capture of Kunjpura though bringing in money and grain relieved the situation but slightly.*

No. 194] [*20-10-1760*

(श्री)

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
अंतोबा नाईक थथे स्वामीचे सेवेसी

सेवक विसाजी बलाल पाटणकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। आस्विन सुध ऐकादसी मु॥ कुंजपुरा जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. आपणाकडील बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नव्हते. त्यांस आमच्या जासुदासमागमे पत्रे अधिक मासची पाठविली तीं पावली. लि॥ वर्तमान कलले. परम संतोष जाहला. घरचे वर्तमान सविस्तर लिहिले नाही. त्यास श्रावणमासी तीर्थस्वरूप दादा आले असतील, त्यांस सविस्तर वर्तमान पुसोन आपण लेहून पाठवावे. माहागांवी गाय घेऊन दिल्ही म्हणोन लिहिलें, उत्तम केले. जे लागेल ते देत जावे. आबाल कोणे गोष्टींची होऊ न द्यावी. आपण वडील आहेत, काही नुन्यता पडो देणार नाहीं. आम्हाविसी काही चिंता न करावी, हा कालपरियंत सुखरूप आहे. ईश्वर

2391

कृपेंकरून पुढे जेष्ट अखाडमासी घरास येऊ. आमचे घरची माणसें श्रमी बहुत होत असतील. तीन वर्सें घरास गेलो नाही. परभारेंच निघोन दुसाला छावणींस आलो. लग्न जाहल्यावरी घरास जावें हा बेत होता, परंतु ऋणानबंधे ज्ञाण न जाहले. जे समयी त्याचा व आपला ऋणानबंध असेल ते दिवसी भेट होईल. वरकड राजकी वर्तमान तरी, आबदली यमुनेपलकडे आहे. आपल्या फौजा अल्याड आहेत. यमुनेस उतार जाहल्यावरी काय होणे ते होऊन येईल. मुा मजकुरावरीहून कुरुक्षेत्र सोळा कोस आहे. एका दोहो रोजी येथून कूच करून कुरुक्षेत्रास जाऊन. येथे तीर्थविध करून, पुनरपि दिलीस जाणार. येथे आबदाली आहे. परम संकटाचे दिवस आले आहेत. ईश्वर काय करील ते न कले. बरे असो. * * * * असेल तर, माहागात्री पाठऊन * * * * * * * पत्र लेहून पाठवावे. बहुत का * * * * * .

¶*One Visaji Balal Patankar writes from Kunjpura to Antoba Naik in the South giving the positions of the two armies. The Maratha army, he says, will march to Kurukshetra (Panipat), there perform religious ceremonies and thence return to Delhi. The Abdali's army is encamped beyond the Jumna.*

No. 195] [*15-11-1760*

श्री

चिरंजीव राजश्री राघोपंत यासी

नारो गंगाधर आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ६ रबिलाखर मुा दौंड वर्तमान येथास्थित असे विशेष. माहादजी जासूद याजबरोबर तुम्ही पत्र पाठविले ते पावोन वर्तमान कलो आले. दोला वाणी याजबराबरचा मजकूर लिाा तो सविस्तर कलला. त्यास माहादू व दुसरा जासूद असे दोघेजण त्याजकडे पाठविले आहेत त्याजला घेऊन पुण्यास जा म्हणोन सांगितले आहे. तेथे आल्यावर त्याचा प्रकार जसा करावयाचा तसा करावा अथवा लस्करात आला तर मनात आणीतच आहो. वरकड वर्तमान तर हिंदुस्थानातून कागद आले. समदखान सरहिंदवाला वगैरे दोनच्यार येकून दाहापंधरा हजार फौज-सुधा कुंजपुऱ्यास येऊन जमा जाहले होते. त्याजवर श्रीमंत राजश्री भाऊसाहेब लागले. लडाई जाली. समदखान व आणखी येक दोघे सरदार मारले गेले. दोघेजण धरिले गेले आहेत. कुंजपुऱ्याचे ठाणे फते जाहाले. त्याठिकाणी

काही द्रव्यहि हस्तगत जाले असे वर्तमान आहे. राजश्री नारो शंकर व जयनगरच्या वकीलाची पत्रे आली.

¶*Naro Gangadhar in his letter to his son refers to the Bhausaheb's victory at Kunjpura.*

No. 196] [*17-11-1760*

श्री

सेवेसी नारो गंगाधर कृतानेक नमस्कार विज्ञापना. ता। कार्तिक सुध नवमीपावेतो स्वामीचे कृपेकडून कुशल असो विशेष. इकडील वृत्त तर आजी दैंडिहून कूच जाले. सिधटेकावर मुकाम होईल. सिधटेकी काही दिवस मुकाम होतील. बहुधा चतुर्थी वद्यपावेतो तेथेच मुकाम राहील. पुढे नगरावर जाणार. मुली पाहावयासी जिकडे तिकडे माणसे पाठविली आहेत. घडोन येईल ते खरे. हिंदुस्थानच वर्तमान तर श्रीमंत राजश्री (अपूर्ण).

¶*An incomplete letter from Naro Gangadhar who is accompanying the Peshwa North. The Peshwa is looking out for a suitable maiden for his marriage.*

No. 197] [*27-11-1760*

श्रीराम

तीर्थरूप राजश्री नाना स्वामी वडिलांचे
सेवेसी

अपत्यें लक्ष्मणानें व कृष्णाने कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. यैथील कुशल ता। छ १८ राखर मु। पानिप(त) वडिलांचे कृपे यथास्थित जाणून स्वकुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. वडिली निबाजी व विठोजी जासुदांसमागमें पत्रें पाठविलीं होतीं ती दिलीआलीकडे जासूद लुटले गेले पत्रें गेलीं. जैासूद आलें. कुशलतेचे वर्तमान जबानी जासुदानी सांगितलें. त्याआलीकडे सरकारच्या कासिदासमागमें वडिलांचे पुण्याचे मुकामचें पत्र आलें ते ह्यांच मुकामी पावले. लिहिले वर्तमान कलले. इकडील वर्तमान तर श्रीमंत दिलीहून उभयता सरदारसुधा निघालें. दिलीस रा। नारो शंकर ठेविलें. अली-

गोहराचा लेक वलीहद केला. आणि दरजमजल कुंजपुऱ्यांस आलें. दुसरे दिवसी प्रात:काली हल्ला केली. तेथे कुतुबशा अबदुल समदखान वगैरे वीस हजार स्वार प्यादा गिलज्यांकडील होता. किंचित् हत्यार धरिलें. उपरांतिक मोडिलें. तमाम लुटलें. सरदार सारे मारले गेले. त्याच हल्याने ठाणे कुंजपुराहि सर जाहाला. आतील नजाबतखान कुटुंबसहवर्तमान धरला गेला. त्याची चीजवस्त काही लुटली गेली. काही हस्तगत जाहाली. काही भूमिगत द्रव्य त्याचें व वरील मिळून साहा साडे साहा लक्ष नख्त दोन लक्षांचा गला हातांस लागला. नज्याबतखान गोली लागली होती मेला. वरकड कैदेत आहेत. तेथून पुढे कुरुक्षेत्रावरून सरहिंदेकडे जाऊन तो प्रांत काबीज करून तिकडील जमीदार सीख जाट सामील करून फौज तवाना[2] करावी. हा मनसबा करून पुढे येक मजल चालिले तों गिलज्यास कुजपुऱ्याचे वर्तमान कल(ले), तोंच दिलीआलीकडे बागपतच्या घाटांस ते येऊन आलीकडे उतरावयास लागले. काही नावा काही दाडग्या उतारा(ने) तडका[3] उतारावयास लागले. हे वर्तमान येताच श्रीमंत माघारे फिरले. मजल दरमजल मुकाम मजकुरास आलें. तो तेहि सारे उतरून आलीकडे पाच कोस आले. दुसऱ्या तिसऱ्या दिवसीं येथे आलें. त्यांची श्रीमंतांची दोहो कोसांची तफावत आहे. तेहि तोफखाना पसरून उतरलें आहेत. श्रीमंतहि गात्र पाठीसी देऊन पुढे तोफखाना देऊन (बसले) लें. नित्य त्यांच्या आमच्या फौजेसी जुजे होतात. आजपावेतो कहीवालियानी व जुजात मिळून हजार बाराशे घोडी तीन च्यारसे उंट व च्यार हती त्यांकडील आली. महिना त्याचे यांचे गाठी पडून जाहालें. छ १३ मिनहूस ते सरदारांकडे उजवी बाजूस चालून आलें. हेहि बाहीर निघालें. जूज मातबर जाहालें. त्यास मोडून गोटांत घातलें. तीन च्यारसें मारलें. पाच सातशे जखमी जाहाले. सेदीडसे घोडें आलें. आपलें तीस चालीस ठार सें दीडसें जखमी याप्रा जाहालें. संध्याकाल जाहाला, नाहीं तर तेच दिवसी पारपत्य उतम होतें. त्याणी गोट सोडून पल काढिला होता. परंतु संध्याकालामुळें फौजा फिरल्या. परंतु ते म्हणत होते की मराठ्यासी आमची गाठ पडताच पडतील, ते महिना गाठ पडली व जुजेहि जाहाली, परंतु त्याचाच रेच मोडला याप्रा जाहालें. पुढेहि जे होईल तें लिहूं. हिकडील राजेरजवाडे दुलग, दोहीकडे यत नाहीत.

---

१ राज्यवारस; युवराज. २ हुशार, ताजी,
३ लगेच.

आमच्या फौजेस येक मात्र वोड. पैका तूर्त नाही. वरकड उतमच आहे. श्रीमंत भाऊसारिखा अवसानाचा सरदार दुसरा कोणी नसेल. गिलज्याचें पारिपत्य सत्वरीच करितील. आम्ही मंडलीसहवर्तमान कुशल असों. कुंजपुऱ्यापैकीं दोन घोडें आम्हाकडे आलें. चिरंजीव नारायेणराव मंडलीसह सुखी आहेत. राजश्री त्रिंबकपंत नाना कुशल आहेत. पत्रें येतात. घनबादादांची पत्रे येतात. कुशल आहेत. वडिली तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावें. बहुत काय लिहिणे? कृष्ण जोसी संगमेश्वरकर मोर्च्यांत मुदबखाजवल बसलें होतें. गोला लागून मृत्यु पावलें. मस्तकी लागला. मोठे वाईट जाहालें. मोठा माणूस गेला. कलावें कृपा कीजे हे विज्ञप्ति.

चिरंजीव राजश्री सदोबास आसीर्वाद. सर्व वडिलास लिहिल्यावरून कलेल. तिकडील सविस्तर वर्तमान लिहून पाठवणे हे आसीर्वाद.

¶*This is an important letter which summarises the position, plans and moves of both the parties and mentions a very successful engagement having taken place between the two combatants on November 23rd. The Marathas were strong and hearty and felt complete confidence in their General's ability and courage. When Kunjpura was captured the Bhao proceeded one stage towards Sirhind to take into confidence the Sikhs and the Jats and start a combined action against the Afghans. The Bhao retraced his steps suddenly, having received the news of the Abdali having crossed at Bagpat. The paper doubtless makes an important addition to our present knowledge of that decisive event.*

No. 198] *[1-12-1760*

पैा छ २४ रबिलाखर
मुकाम नागतळे

श्री

राजश्रियाबिराजित राजमान्य राजश्री
माहादाजीपंत दाजी स्वामीचे सेवेसी

पोष्य लक्ष्मण नारायण साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाईत छ २२ रबिलाखर मुक्काम करमेले सुखरूप असों विशेष. येथें छ २० रबिलाखरीं आलों. आणखी येथें येक दोन मुकाम आहेत, उपरांत कोणीकडे जातील तें पाहावें. दिलीकडील मजकूर तरी कुंजपुऱ्याहून पत्रें अश्विन सुद्ध

त्रयोदशीचीं आलीं. कुंजपुरा छ ७+ रबिलौवलीं घेतला, मोर्चे लाविले होते; दुसरें दिवशीं हल्ला करून घेतला. दाहा हजार फौज त्यांची लुटून पस्त[१] केली. लूट फार जाहाली. आपणांकडील शें दोनशें माणूस सरदारासुद्धां ठार जालें व हजारपावेतों जखमी जालें. मातबर कोणी पडिला नाहीं. दादु माहात आढळाचा मात्र पडला. तीन च्यार लांख रुपये सांपडले, आणखी सांपडतील; खणत्या लाविल्या आहेत. गहूं दाहा हजार खंडी सांपडला. रोजमरा गल्याचा देऊं लागले. समनखान व कुतुबशाहा या दोघांस धरून आणून डोकीं कापून भाल्यास लाऊन फिरविलीं. मोठी फत्ते जाली. काल जयनगराहून वकिलाचीं पत्रें बाविसा रोजाचीं आलीं. त्यांत मजकूर दिलीचे खालीं वीस कोसावर पठाण उतरला, याप्रमाणें वकिली वर्तमान आहे. पुण्याहून राजश्री गणेशपंत पेठ्ये यांणीं पत्रें पाठविलीं तीं आपणांकडे पाठविलीं आहेत, त्यांजवरून सविस्तर कलेल. लोभ कीजें हें विनंती.

¶*Laxman Narayan reports to Mahadaji news received from Delhi. "The Maratha army carried by assault the stronghold of Kunjpura where they secured loot and grain beyond expectation. The Abdali crossed the Jumna 40 miles south of Delhi."*

No. 199] *[12-3-1761*

पौ छ १० साबान

श्री

तीर्थस्वरूप राजश्री नाना वडिलांचे सेवेसी

अपत्यें मोरोबाचें सां नमस्कार विनंती. ता छ ४ साबानपावेतों मुा सिरोंज येथे क्षेमं असे विशेष. वडिलीं पत्र पाठविलें पावलें. आले न आले त्याचा झा(डा) कलला. त्यास आपल्या लिहिण्यांत औदासीन्य बहुत आढळलें. त्यास वैराग्य प्राप्तच आहे. परंतु विचारें जे वैराग्य तें उचित, यास्तव सांतवन चिताचे ठायी करून, अस्थिकांस व सूज्ञ जनास दर्शनलाभ द्यावा. विशेष काय लिहावे ? आपण सर्वजाण आहेत. देशमुखानी पत्र आपल्यास लिहिले आहे त्यावरून कलेल. बहुत काये लिहिणे ? लोभ कीजे हे विनंती. वो चिमण जोसी व उपाध्ये यांस सां नमस्कार विशेष. लिहिण्यास जागा आहेसे काय ? जाणावे. हे विनंती.

¶*Moroba tries to console the distracted mind of Nana Fadanavis.*

+ 17-10-1760. १ उध्वस्त, निःसत्त्व.

No. 200] [26-4-1761

श्री

श्रीमंत राजश्री महिपतरावजी स्वामीचे शेवेसी

सो। आपाजी विस्वनाथ व सिवराम भास्कर व रामचेंद्र माहादेव कृतानेक आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल ता। चैत्र वद्ये ७ सप्तमी मु। उजनी यथास्थित जाणौन स्वकीये लेखन करीत आसावे विशेष. ग्वालेरचे मुकामी राजश्री मल्हारजीबावा होलकर वगैरे फौजा तमाम येकत्र जालियावर, श्रीमंत सौभाग्यवती पारवतीबाई यास देशास रवाना केले, ते समई राजश्री दमाजीबावा समसेरबहादर यास बो। घेऊन आले ते मजल दरमजल सेऊरपरियेंत आले. तो तेथे गुजराथे प्रांतीहून पत्रें आली जे, खंबाइतकर मोगल व भडोचकर व कमालुदीखान बाबी याणी हिंदुस्थानचे वर्तमानावरून बहकोन, तमाम मुलुकांत दंगा करून गावे मारूं लागले व सरकारच्याहि परगण्यात दंगा केला. हे वर्तमान आलियावर, आपण आज्ञा दिल्हीयावर मजल दरमजल येजमानसहवर्तमान गुजराथ प्रांतास गेलों. इकडील बंदोबस्तहि लौकरच धण्याचे पुण्येंकरून होईल. बंदोबस्त जालियावर सत्वरीच येतील. कळावे हे विज्ञापना.

¶*The letter gives the movements of Holkar and Damaji Gaekwar just after the disaster of Panipat. Parvatibai comes back to Maharashtra. The Moghals at Cambay and Broach rose in revolt upon hearing the overthrow of the Marathas.*

No. 201] [30-4-1761

पौ छ ४ सवाल वैशाख

श्रीरामोजयति

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

शामजीबावा स्वामी गोसावी यांसी

पोष्य बाबूराव बावाजी सां दंडवत प्रो विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २४ रमजानपर्यंत यथास्थित जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कळो येत नाहीं यास्तव चित सापेक्षित आसे; तरी ऐसे नसावे. निरंतर प्रेशितपत्री कुशलार्थ लेखने सांभाळावें. उतेरकडील वर्तमान इकडे मनस्वी बोलतात यामुळें चितास समाधान नाहीं. श्रीमंताचे कल्याणे सर्वांचे कल्याण. आपली मंडळी समागमें ते सर्वहि अक्षतमरिष्ट देशास यावे हा निजध्यास लागला आहे. वर्तमान तथ्य कळावें, सबब मुदाम मनुष्य पाठविले असे; तरी आपणाकडील व श्रीमंताकडील संतोषवृत्त

लिहिले पाहिजे. प्रस्तुत आपण कोठे आहेत श(रीर प्र)कृत कशी आहे हे सविस्तर लेहून कळवावें. राजश्री नाना व रामराव कोठे आहेत राजश्री तुकोबा कडील आदिकरून वर्तमान * * * बहुत काय लिहिणें ? लोभ असावा हे विनंती.

पोष्य पांडुरग दादाजी सां दडवत प्रो विनंती पूर्वममतेस अंतर नसावें. पदरचे आहो हे विनंती.

¶*Baburao Buwaji seeks news from the North.*

No. 202] *[6-5-1761*

पौ छ १३ जिल्काद जेष्ट इसने

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बापूजी माहादेव व पुरुषोत्तम माहादेव कृतानेक सा नमस्कार विज्ञाप्ति. येथील कुशल ता छ ३० रमजान मुा मथुरा स्वामीच्या कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र व गाजुदीखां वजीर व ठाकूर सुरजमल जाट यास पत्रे पाठविली ते त्यास देऊन उतर पाठवणे व शाह कैसा आपले वतनास गेला व पातशाह कोण जाला व वजीर कोण कैसा काये मजकूर ? जयेनगरीहून व दिलीहून सविस्तर पत्रे आली परंतु काही तुम्हाकडील पत्रे न आली म्हणोन आज्ञा. वजीर जाटाचे पत्राची उतरे घेऊन सो प्रविष्ट करू. येथील वर्तमान रजबचे महिनियात पांच पत्रे कासिदाबराबर पाठविली. त्यांतून दोन पत्राचे उतर आले. आणिक कांहीं उतरे आली नाहींत. ते पत्रे सो प्रविष्ट जाली न जाली हे न कळे. त्या पत्रांत विस्तारे वर्तमान सो विनंती लिहिली होती. हाली वर्तमान संकलित लिहिले आहे त्यावरून मनन करावे. पाणिपतावर जुंज जालियावर तीदिवसा शाह दिलींत पोहचला. तीर्थस्वरूप रा बापूजी माहादेव त्याचे येख्तियारीत आले व भरथपूर येथून राजे नागरमल व देवेलसिंग दिलीस गेले. या दोवाही नजीबदौलाचे विद्यमाने शाहचे कूच आगरियाकडे मुकरर करविले. शाहचा डेरा आगरियांत राहे आणि नजीबखां पुढे कूच करी येसे ठराऊन हे दोघे भरथपुरी ठाकूर सुरजमलाजवळ मामलतीसाठी आले. शाह यांचा मार्ग लक्षीत बारापुलयावर डेरा दिल्हा. ठाकूर सुरजमलापासी आले तेव्हां तीर्थस्वरूप बापूजी माहादेव यानी आवसर पाहून शाहवलीखानाचे मारफातीने कौलवचन शाहचे व शाहवलीखानाचे स्वामीच्या

येकोपियास्तव सफाईच्या गोष्टी केल्या आणि आपला जिमा केला की शाहनें खातरजमेने वतनास कूच करावे. आम्ही श्रीमंत स्वामीपासी सलुक व दोस्ती करून देऊ. जिमा आमचा झाला. तुम्ही येक मातबर आपला मुख्त्यार करून कागदपत्र त्याजपासी देऊन आम्हासमागमें देणे येसी रदबदली केली. यावर शाहवलीखानाने सर्व मानिले. नवाब याकूबआलीखा हिंदुस्थानचे कारभारास वाकीफ आणि रास्तबाज दाना शाहवलीखानाचा चुलत भाऊ यास स्वामीकडे पाठवावयाचे मोकरर केले. मर्जीप्रा हदहदूंद[१] सो जाऊन ठैराऊन कलह परस्परे दूर करावावया, व जुंजास आम्ही इछित नव्हतो ये गोष्टीची मांजरत[२]? करावी इतक्या गोष्टी शाहाचे रुबरु करार जाल्या. शाहाने व शाहवलीने इतक्या गोष्टीचा करार देखून खातरजमेने कूच केला. कूच दरकूच जातात. छ २१ रमजानी लाहोरास पोहचला. विजारितीचे खिलत व कलमदान याकूफअलीखानाचे स्वाधीन केले की गाजुदीखानास पोहचाऊन देणे. आणिक सलतनत[३] शाहआलम आलीगौहर यास व बक्षिगिरी नजीबखानास शाह सांगोन गेला. गुरे ? रमजानचे दिवसी ठाकूर सुरजमल व गाजुदीखां मथुरेस आले. रा गंगाधरपंत यास रा सुभेदारापासून बोलाऊन घेतले व दिलीहून याकूबआलीखां व तीर्थरूपहि आले. खिलेत[४] व कलमदान गाजुदीखानास दिल्हे. खिलेत घेतल्यावर याकूबआली-खानासी पैगाम[५] केला की तुमचे जाणे श्रीमंत स्वामीपासी मसलत[६] नाही. सलां[७] व हद मोकरर करणे. सलाह येथेच आहे. त्याने जाब दिल्हा की शाहने आम्हास सांगितले की तुम्ही स्वामीपासी जाऊन माजरत ? करून त्याची मर्जी दरयाफ्त[८] करून येणे. येसा विचार आहे. येथे अद्याप फैसला जाला नाही. पुढे काये होईल ते पाहावे. येथील सरदाराची मर्जी आहे कीं गाजुदीखानास दिलीमध्ये दाखल होऊन आपला बंदोबस्त करून दुसरा पातशाह करावा. आथवा बदस्तुर आलमगिराचे राहे या गो—(अपूर्ण)

¶*An important letter of the Hingne brothers announcing that they opened negotiations with Ahmedshah Abdali who was anxious to end hostilities against the Marathas. He therefore despatched an envoy with Bapuji Mahadeo and began his homeward march.*

---

१ मर्यादा, हद्द. २ खातरजमा ?
३ दौलत, पादशाही. ४ पोषाख.
५ बोलणें. ६ योग्य.
७ तह. ८ समजून घेणें.

2399

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
आमणाजीपंत स्वामी गोसावी यांसी

पोष्य विसाजी कृष्ण नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. तुम्हाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी यैसें न करितां निरंतर पत्र पाठऊन संतोषवीत जावें. यानंतर राजश्री त्रिंबकराव मामा श्रीयात्रेहून आले. त्यांही सांगितलें कीं आजीजखान स्वार प्यादे जमा करितो. जगदेव सरकार तालुक्यास उपद्रव देणार म्हणोन. त्यावरून तिकडील सरकारच्या मामलेदारास व तुम्हालगते संवस्थानिक तुमची कुमक करीत यैसें आहेत, त्यांस सरकारचीं पत्रें व तुम्हास पत्र तुमची जासूदजोडी आली होती त्याजबराबर देऊन पाठविलीं आहेत; पावलीं असतील. सारांश तुम्ही बहुत सावधपणें राहून ठाण्याठुण्याचा बंदोबस्त येथास्थित करून खबरदारीनें राहावें. वरचेवरी आपणाकडील वर्तमान लेहून पाठवीत असावें. इकडील वर्तमान तर प्रस्तुत आमचा मुकाम कित्तुर प्रांतीं आहे. येथील गुंता उरकून घेऊन सत्वरींच कृष्णापार होऊन देशीं जातों. वरकड वर्तमान आधिकोत्तर लिहिजेसें नाहीं, येथास्थित आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब आला जाटाच्या मुलकांत आहेत. थोरले श्रीमंत त्या प्रांतें होळकर व राजश्री बापूजी नाईक व गोपाळराव गोविंद वगैरे सरदार च्याळीस पंनास हजार फौजेनशीं ठेऊन खांसा सडे चौपांचा हजारानसीं देशीं आले. टोंक्यास दाखल जाहाले. श्रीमंत राजश्री दादासाहेब पुण्यास आहेत, तुम्हास कळावें म्हणऊन लिहिलें असें. श्रीमंत दादासाहेबाजवळ हालीं पंचवीस तीस हजार फौज आहे, व आम्हीहि इकडून जातों. येकूण आजीं देशीं च्याळिस पंनास हजार तयार आहे व पंनास साठ हजार हिंदुस्थानांत आहे. बाजतबरसात जो कर्तव्यार्थ असेल तो उत्तम प्रकारें करितील. रवाना छ २३ सवाल सन इहिदे सितैन. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Visaji Krishna writes news of his own whereabouts and that of the Peshwa who is reported to have retired upon Tonke leaving behind a strong force under Gopalrao Govind and Holkar. The rumour about the Bhausaheb having reached Jat territory seems to have gained currency as it is referred to by the writer.*

No. 204] [2-6-1761

श्रीशंकर

यादीपत्रें येणे प्रा। ल्याहावयाची आज्ञा करावी. सुरू सन इहिदे सीतैन छ २० सवाल.

मातुश्री आईसाहेबास पत्र कीं स्वारीतून आल्यावर साहिबाचे पाय पाहावे हा हेत होता. परंतु दिलीकडील मनसब्याचे अडचणीमुळे फौजेची तरतूद करणे. कर्ज फेडावयाचा प्रकार येकीकडे राहून कर्ज घेऊन तरतूद करावी लागते. कितेक अर्ज सांगोन पाठवणे आहेत यास्तव राजश्री सिदभट दीक्षितास पाठवावे व माधवराव विस्वनाथ यासहि पाठवावे. आम्ही विनंतीचे प्रकार बोलल त्याप्रा। दीक्षित मागती सत्वरच सेवेसी येऊन विनंती करतील. आम्ही देव धनी येक साहिबास जाणतो. साहेबाखेरीज दुसरा अर्थ जाणत नाही. मनसब्याचे पेंच उलगडल्यावर दर्शन घ्यावे हेच इच्छा सेवकाची आहे. येणेप्रा। पत्र.

कितेक मजकूर साहेबाचे सेवेसी अर्ज करावयाचे आहेत तर तुम्ही येणे. माधवराव विस्वनाथ यांसही बलाविले आहे. त्यांसही साहेबाचा निरोप देवऊन उभयता सत्वर समागमेच येणे म्हणून सिदभट दीक्षितास पत्र.

माधवराव विस्वनाथ यांस पत्र कीं साहेबाचे सेवेसी यावे हा हेत होता परंतु गुत्यामुळे योग न घडे. त्यास कितेक अर्ज मातुश्रीसाहेबास करावयाचे आहेत यास्तव साहेबास विनंतीपत्र पा। आहे व राजश्री सिदभट दीक्षितासही पत्र पा। आहे तर तुम्हीही साहेबाचा निरोप घेऊन येणे. लौकरच सांगणे ते सांगोन रवानगी करूं म्हणून माधवराव विस्वनाथ याचे नावे पत्र.

येणेप्रा। तीन पत्रें देवावी.

¶*Orders to issue letters to Tarabai and others. The Peshwa, as can be seen from the contents of this, has been completely crushed by the defeat at Panipat.*

No. 205] [पो। *19-6-1761*

छ १९ जिलकाद.

श्रीमोरया

सो। विज्ञापना :—

राजश्री नारो शंकरास आगर त्यांजकडील चिमणाजी वामन यासी आपल्याकडे पाठवितो. झासीची माम- हिंदुस्थानचे विपरीत वर्तमान यैकोन निजामआली बसालतजंग अंतस्ते येक जाले. हे श्रीमंत राजश्री दादासाहे-

लत त्यासी कमाविसींने अगर इजारियाने मारनिलेस सांगावी. त्याचा त्या मुलकांत दबाव, यास्तव पुढील सालापासून त्यासीच सांगावें. बाबूराव कोनेर यासी हुजूर पाठऊन द्यावे म्हणौन आज्ञा. यैसियासी उतम तेच स्वामी करितील. परंतु अदियापी नारो शकर अथवा चिमणाजी वामण आले नाहीत. प्रस्तुतचा समय, कारकूनच जाऊन आमल करितील असे नाही. यास्तव नारो शंकर यासी ताकीद हुजुरीहून होऊन सत्वर ते प्रांतास जात ते करावे व त्याजसमागमे अणीकहि फौज अदिकआगली रवाना केलिया त्या प्रांतात बदोबस्त होईल. पंत मशारनिले इकडे आलियावर बाबूराव कोनेरहि लौकरच शेवेसी येतील १

बास कलले. यांची त्यांची चितसुध असी दादाची पत्रे आली. त्यावरून तिकडे जाणे जरूर जाले म्हणौन आज्ञा. यैसियासी साहेबाची स्वारी गेली ते फार जलदीने. जाणेच होते तर हालक्या मजली करून जावे. थोडी बहुत फौज ठेवायाची होती म्हणजे दोहीकडीलहि बदोबस्त होता. प्रस्तुत स्वारी देशासी गेली. येणेकरून दक्षणेतहि कोण्ही डोई उचलू पावणार नाहीत. निजामअली बसालतजंग याचा मनसुबा किती? ते परसातील भाजी. सहजात ते कार्य होऊन बदोबस्त होईल.

सरकारच्या फौजा पौकी राजश्री विठलराव सिवदेव राजश्री बहिरो अनंत उभयेता. त्यापैकी बहिरोपत यांच्या लोकाचा ती वर्षांचा गवगवा याजस्तव ते पथकसुधा शेवेसी आलेत. त्याच्या फौजेच मागील निर्गम होऊन पुढे नवी फौज ठेऊन लोक येतसे करावे. ताजी फौज आल्या कामी पडेल. येविसीची आज्ञा करावयासी स्वामी समर्थ आहेत.

शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar's letter to the Peshwa, asking for Naro Shankar to be at once dispatched to the North.*

No. 206] [*20-6-1761*

श्रीराम

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामी वडिलाचे

शेवेसी

विनंती. सेवक आनंदराऊ माधव मुा बिठूर कृतानेक सिरसां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा जेष्ठ वद्य ३ त्रितीयापावेतो वडिलाचे आसीर्वादे

2402

करून सुखरूप आसो. विसेष. पत्र पा। ते प्रविष्ट जाले. वाचून बहुत आनंद जाला, तो श्रीईस्वर जाणे. विसेष. राजा गंगासिंगास खातरजमेचा परवाना पाठविला तो मशारनिलेस पावता केला. चचेडीचा किला मात्र खाली करून दिल्हा. प्रगन्यातील गढिया आद्याप दिल्ह्या नाहीत. सरकारात रूजू आहे. प्रस्तुत देशकालविचार पाहून तालुकदाराच्या हातून मामला करीत आहेत. पुढे जेव्हा जोरतलबी तुमची होईल त्यव्हा सर्व आमल पूर्ववतप्रमाणे होईल. सिवराजपुरची गढी राणी देत नाही. मामला करा म्हणौन सांगतात. परंतु त्याजला काही दबाव पोहचून काही मामला होत नाही. आपल्या तरफेने मामला करावा त्यव्हा जो हात उचलून पैसा देतील तोच घेने लागला. याप्रमाणे मामल्या(चा) विचार आहे. नाही तऱ्ही चचेडी व सिवराजपुर, बिठूर मिलून वीस पंचवीस हजाराचा मामला या सालाचा ठरेल. परंतु आपण या प्रांतास समयानसार आला आहा तर येकदा आपले हातें फौज फाटा देऊन चदेल्याचे येकदा पारपत्य कीजे. पुढे ईस्वरे इच्छा आहे तर उतम होईल. सांप्रत तर सर्वासी सलूख ठेऊन जो ज्या रीतीने समजतो त्याच रीतीने त्याजला हस्तगत करून पुढील तरदूत उतम रीतीने होऊन येईल. वरकड सर्व वर्तमान रा। सदाशिव कृष्ण व सरकारी फडनीस माहाली आहेत त्यांचे लिावरून विदित होईल. राजकी वर्तमान तर शाहजादा पूर्वेकडून येत होता तो कर्मनाशेपावेतो आला. इकडून सुजातदौलाहि श्रीकासीपावेतो गेला होता. दाहापंधरा कोस कासी पुढे राहिली होती. जेव्हा सुजातदौला लखनऊहून स्वार जाला त्यव्हा येका मुकामी पूर्वी प्रयागाचा सुभेदार मिर्जा कोचक होता, त्याजला पूर्वी कैद करून लखनऊस ठेऊन गेला होता. त्याजला जिवे मारिले व त्याचे पुत्रास जिवे मारून पुढे शहजाद्याचे भेटीस गेला. त्यव्हा ज्या मनसुब्यावर शहजादा आला की, मिर्जा कोचकास सोडून काही फौज देऊन दिलीकडे रवाना करावा, त्यासी सुजातदौलाने लागलाच जिवे मारून टाकिला. त्यव्हा सारा मनसबा खुंटला. त्यव्हा मागती शहजादा माघारा पूर्वेस गेला. सुजातदौलाहि छावनीस आपल्या देशास येईल. याप्रमाणे इकडील वर्तमान आहे. श्रीमंत रा। भाऊसाहेब बैरागीचे वेश घेऊन श्रीअसुधेस आहेत. येक निंबाजी पोवार नामे आगोधर बिठुरास दाहापंधरा दिवस येऊन राहिला. त्यव्हा वर्तमान त्याने सांगितले की, श्रीमंत रा। भाऊसाहेब जिवंत आहेत. बैरागी जाले आहेत मजला आज्ञा प्रगट करावयाची नाही. परंतु जे मी सांगतो हे सत्य आहे. त्यव्हा मागती निंबाजी पोवार बैरागी जाला आहे तो मागती श्रीगंगापार गेला. आसुधेस जातो म्हणौन

श्रीस्वामी बालसरस्वती याजला पुसोन गेला आहे. त्याजबरोबर श्रीमंतांचा पुरोहित माधोराम गंगापुत्र वगैरे क्षेत्राहून च्यारपाच ब्राम्हण बरोबर गेले होते. त्यव्हा श्रीमंतांच्या उपाध्याचा कागद त्याने भावास पाठविला आहे की, श्रीमंत रा। भाऊसाहेब आसुधेस बैरागियांचे मेल्यांत आहेत. तर तुम्ही काही खर्चास घेऊन लवकर येणे. त्यव्हा आम्ही गंगापुत्रास दाहावीस रुपये खर्चास देऊन आज रवाना केला आहे. त्याप्रमाणें वर्तमान आले आहे. तर मागाहून आनखी लिहून पाठवितो. विसेष. सेवकाचा कालक्षेपचा मजकूर पूर्वी सेवेसी लिहिला होता. त्यव्हा आभयेपत्र आले की, रा। गंगाधर हरि जेव्हा हुजूर भेटीस येतील त्यव्हा तुम्ही येणे; त्याजला रुबरू तुम्हाविशाई सांगू म्हणोन पत्री आज्ञा आली. त्यासी सांप्रत ठाणे मजकुराचा बंदोबस्तामुले सेवक सेवेसी हाजीर न जाला. रा। गंगाधर हरि सेवेसी आहेत तर मजला कृपावंत होऊन जेव्हा आज्ञा करणे ते पत्री सादर करावे. लाहोराचे स्वारीस आपण नेमनूक दोनसे रुपये केली आहे. पुढे जे आज्ञा कराल तेप्रमाणे केले जाईल. तीर्थरूप मातुश्रीसुधा स्वामीचे कुटुंबात आहो. सर्वांचा कालक्षेप चालविने माहाराजास आहे. आम्ही सर्व प्रकारे सेवक पदरीचे आहो. समर्थाचा आश्रय धरला आहे. विसेष काये लिा ? कृपा लोभ आसो दीजे, हे विज्ञाप्ति.

¶*This is a news letter from the North giving details of news especially about Shuja-ud-daula, Mirza Kochak. It repeats towards the end the interesting news about the Bhausaheb being alive and living as a recluse at Ayodhya.*

No. 207] [*11-11-1761*

पौ छ १३ राखर

श्री

श्रियासह चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्री माधवराव यांप्रती सौभाग्यवती पार्वतीबाई अनेक आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपण जानोजी भिताडा याजबरोबर पत्रे पाठविली ती पावोन लेखनार्थ श्रवण जाला. त्यावरून संतोष जाला. ऐसेच निरंतर पत्री संतोषवीत असिले पा. वरकड इकडील सविस्तर वर्तमान विसाजी कृष्ण याचे पत्रावरून विदित होईल. ध्यानात आणून कर्तव्यार्थ करावा. वरकड चिरंजीव लक्ष्मीबाई येथे आम्हाजवल असत. कलले पाहिजे. या प्रांतीचा बदोबस्त केल्यास उतम. बहुत काये लिहिणे? लोभ कीजे हे आसीर्वाद.

¶*Parvatibai to Madhavrao, acknowledging the receipt of some letters sent with Janoji Bhintada. Laxmibai, the widow of Vishwasrao, is staying with her.*

No. 208] [1761 ?

श्री २

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी

सां नमस्कार विज्ञापना. शह चुकला. आगरेयावर फौजा येऊन दबाविते तर आगरें सहजात सुटतें. ढोलपूरचा रस्ता मोकळा होता. चमेलघाट हातीं राहता. कुभेरी दिघे आसपास असल्यास तहरह होता. तूर्त लांबणीवर काम पडले. गोहदकर अमानत राहिला. गालेरच्या आसपास दोन कोशी अमल करितो; असा प्रकार आहे. श्रीमंताचा पुण्यप्रताप थोर आहे. बरेच होईल. चिंता नाही. सर्व वर्तमान स्वामीस वरच्यावरी कळतच आहे. मी विशेष ल्याहावे ऐसे नाहीं. कृपा करून सबनिसीची असामी चिरंजिवाचे नावे करून दिल्ही पाहिजे. वेतन फारसे नाहीं. तीनसे रुपये आहेत. चिरंजीव निळोपंत दरसाल आपल्या दर्शनास येतच आहेत. आपण कृपा करितात. मजला चिरंजिवाची पत्रें येत असतात. आसामीविसी विनंती करितील. चिंतावर धरून आसामी करार करून दिल्ही पाहिजे. आसामी स्वामीची. मी पदरचा आहे. शेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

राजश्री हरिपंत तात्या व राजश्री आपाजीपंत गोधळेकर स्वामीस सां नमस्कार. विनंती लिहिले परिसोन सदैव कृपा करीत जावी हे विनंती.

¶*A report to the Peshwa concerning the tactical situation and military dispositions.*

No. 209] [17-9-1763

छ २३ रजब

श्री

श्रीमंत महाराज राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक माहादजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील सेवकाचे वर्तमान तागायेत छ ९ माहे रबिलोवल मुा नाा फागी प्रांत जैपुर स्वामीच्या आसीर्वादें येथास्थित असे. यानंतर मुलराज व नंदराम हे शाहापासून राजश्री पुरषोत्तम माहादेव यांजसमागमे आम्हाजवल आले. सर्वहि समाचार विस्तारयुक्त सांगितला. त्यास आम्हीहि यांचें बहुतसे समाधान करून माहाराजांचे सेवेसी विदा केले असेत. साद्यंत अर्थ विदित करितील त्यावरून श्रुत होईल. कृपा करणार स्वामी समर्थ असेत. +सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Sindia to Raghunathrao that the envoys from Ahmedshah are being sent to the addressee's presence to negotiate terms of peace.*

+ येथून अक्षर खाशाचें.

EXTRACTS FROM THE PESHWAS' DIARIES

One section of the Peshwa Daftar is known as the Peshwas' Diaries and contains (1) Cash accounts of daily receipts and disbursements, (2) Money transactions other than cash and (3) Miscellaneous orders of the Peshwas on various matters referred to them. Selections from these diaries were published by Rao Bahadur Wad in nine volumes each dealing with a different period. Those selections are by no means exhaustive and many fresh points required by the student of history can yet be discovered in the Diaries after a careful scrutiny. An attempt is here made to extract a few more items of information and present them in chronological order with a view to give the reader a fair idea of their form and contents. The subjects referred to are, as will be seen, of a very miscellaneous nature.

The extracts refer to the years 1720-21, 1723, 1728-30, 1734-38, 1754-55, 1767-68, 1795-96, and, as far as Bajirao II's personal accounts are concerned, 1805-11 and should therefore be sufficiently representative of the whole period.

An item of special interest in the year 1728-29 is the itinerary of Bajirao I and his brother. It will be remembered that the year inaugurated an important era of aggression by the two brothers and the detailed description of their movements given in the extracts will enable the students to follow clearly the references made in letters dealing with the conquest of Northern India. The itinerary described will, it is believed, be found to be much fuller and more accurate than that given in Rao Bahadur Wad's selections.

As most of the extracts contain many disconnected items of information, no attempt has been made to give an English summary of each. It should also be noted that at certain places where the items appeared to be long and extensive, only their substance, and that too in modern language, has been given. A brief English note dealing with an individual year or subject has in certain places been substituted.

A few more items (Nos. 281-389) have been added by way of a supplement at the end. They were discovered during the examination of the Daftar and were found to fill up some of the gaps existing in an important document published long ago by Rajwade under the title " Purandare Rojnishi ".

No. 274

This is an entry in cryptic code from Bajirao's personal diary, made in his own hand.

पेशवे दप्तरांतून निवडलेले व

२२

पेशव्याच्या रोजनिशींतील उत

[किंमत—२ रुपये १४ आणे किंवा ५ शिलिंग ३ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी. ए.

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३२

ITEM No. 1 : 1720-1729

No. 1] [*21-12-1720*

राजमंडळ

छ २ रबिलोवल

स्वारी राजश्री पंतप्रधान

सुा इहिदे अशरीन
मया व अलफ

खासुदगी

सरजामी—नावजी सावंत पंचसहस्त्री हे भिलवडीस वेढा मोगलाचा पडला; त्यात स्वामीकार्यावरी ठार जाले म्हणून याचे पुत्रास पंचसहस्त्री करार केली.

¶*The siege of Bhilavdi referred to in this note is a fresh item of interest not known hitherto.*

No. 2] [*12-10-1721*

महाल सरदेशमुखी

छ १ मोहरम कार्तिक मास

स्वारी राजश्री चिमणाजी बलाळ

सुा इसने अशरीन
मया व अलफ

मुकाम शाहुनगर
नजीक किले सातारा

छ मजकुरी पहाटे राजश्री छत्रपती स्वामीचे कूच होऊन किले प्रतापगडास स्वारी जाली.

¶*Shahu's visit to Pratapgad is herein mentioned.*

No. 3] [18-10-1721

राजमंडळ

छ ७ मोहरम सुा इसने अशरीन मया व अलफ

स्वारी राजश्री पंतप्रधान

दफाते

राजश्री आनंदराव रघुनाथ यासी दिलीस रवाना निजामनमुलुक याजबराबर केले, त्यास खर्च बेगमीस हुजुरून सरदेशमुखीच्या ऐवजपैकी देविले

रुो १००००

¶*Anandrao Raghunath Sumant is despatched to Delhi by Shahu with Nizam-ul-mulkh.*

No. 4] [13-2-1723

राजमंडळ

छ १८ जमादिलोवल सुा सलास अशरीन मया व अलफ

स्वारी राजश्री पंतप्रधान

छ मजकूरी निजामनमुलुक याची भेटी जाली.

[19-2-1723

२४ जमादिलोवल

छ मजकुरी निजामनमुलुक याचा निरोप घेऊन दक्षिणप्रांती स्वारी.

[4-3-1723

७ जमादिलाखर

छ मजकुरी नवाब ऐवजखान याचा निरोप घेऊन बागल्याकडे स्वारी.

¶*Bajirao's visit to Nizam-ul-mulkh and Aivajkhan is referred to in this entry.*

ITEM No. 2 : 1728-1735

No. 4a]

¶*Itinerary of (1) Bajirao Ballal, (2) Chimaji Appa, (3) Pilaji Jadhao.*

There are numerous letters of these persons which it is difficult to date. Their itinerary for the few years given below will enable such letters to be fixed in point of time. There is nothing else of historical import in this list. Similar lists are given by Wad but are often defective and not infrequently incorrect.

No. 5]

मुकाम पंतप्रधान तिस्सा अशरीन मया अलफ

रबिलाखर कार्तिक

छ २ ता. २५-१०-१७२८ तळवडे लोणंद

छ ४ ता. २७-१०-१७२८ तरडगांव, पा। फलटण

छ १० ता. २-११-१७२८ सेलगांव, पा। इंदापुर

छ ११ ता. ३-११-१७२८ बिटगाव, पा। वांगी भीमातीर

छ १२ ता. ४-११-१७२८ केम

छ १४ ता. ६-११-१७२८ लव्हे नजीक लव्हारे

छ १५ ता. ७-११-१७२८ खांडवी वाडी

छ १६ ता. ८-११-१७२८ पिंपरी, पा। पांगरी

छ १७ ता. ९-११-१७२८ तुळजापुर

छ २२ ता. १४-११-१७२८ सारोळे, पा। काटी

छ २४ ता. १६-११-१७२८ पाद्री, पा। भोसे

छ २५ ता. १७-११-१७२८ करकम

जमादिलाखर पौष

छ १ ता. २२-१२-२७२८ झरी

छ २ ता. २३-१२-१७२८ झरी दुधनातीर उत्तरभाग

छ ४ ता. २५-१२-१७२८ मेथे, पा। वसमत

छ ६ ता. २७-१२-१७२८ वाघोली, पा। वासीम

छ ७ ता. २८-१२-१७२८ पिंपळें, पा। वासीम

छ ९ ता. ३०-१२-१७२८ पुसद

छ १० ता. ३१-१२-१७२८ मौ० देहणी सरकार माहूर

छ १४ ता. ४- १-१७२९ कळंब

छ २२ ता. १२- १-१७२९ सोनगाव

छ २३ ता. १३- १-१७२९ बोरी, प्रा। देवगड, देवगड येथें मुक्काम पौष मास अखेर.

No. 6]

मुकाम पंत प्रधान

सल्लासीन मया व आलफ, सवाल वैशाख

छ १ ता. ८-४-१७३० बकराणा पाा ढवळके

छ २ ता. ९-४-१७३० बिरमगाव

छ १० ता. १७-४-१७३० बडोदें

छ ११ ता. १८-४-१७३० गोदाई, परगणे ढवळके

छ १५ ता. २२-४-१७३० खाडीवर

छ १७ ता. २४-४-१७३० वारणे, पाा ढवळके

छ २० ता. २७-४-१७३० गलिपाणे पाा खंबाईत

छ २४ ता. १-५-१७३० साबरमती

छ २६ ता. ३-५-१७३० तारापुर

छ २७ ता. ४-५-१७३० पेटलावद

छ ३० ता. ७-५-१७३० आनंद, पाा पेटानद

No. 7]

चिमाजी आपाचे मुकाम

तिस्सां अशरीन मया व आलफ जिल्हेज आषाढ

छ १—२४ ता. २८ जून—२१ जुलै १७२८, मु. शाहूनगर

छ २५ २२-७-१७२८ कसबे पुणें.

तिस्सां अशरीन मया व आलफ

रबिलाखर कार्तिक

छ ४ ता. २७-१०-१७२८ गणेश नजीक वाघाळे

छ ५ ता. २८-१०-१७२८ घोडनदी

छ ८ ता. ३१-१०-१७२८ जांबूत

छ ९ ता. १-११-१७२८ आणे, तर्फ बेल्हे, पाा जुन्नर

छ १२ ता. ४-११-१७२८ संगमनेर

छ १७ ता. ९-११-१७२८ पिंपळस टाकळी, पाा चांदवड

छ १९ ता. ११-११-१७२८ झाडी, परगणे निंबाईत

छ २३ ता. १५-११-१७२८ वारी, परगणे धुळे

छ २५ ता. १७-११-१७२८ तोरखेडे, पाा नंदुरबार

छ २७ ता. १९-११-१७२८ मर्दाने, पाा सुलतानपुर

छ २९ ता. २१-११-१७२८ बारी करवंदी चितोडी नजीक वड

No. 8]

चिमाजी आपाचे मुकाम

तिस्सां अशरीन मया आलफ, जमादिलावल मार्गशीर्ष

छ २ ता. २३-११-१७२८ राजपुरानजीक

छ ३ ता. २४-११-१७२८ नर्मदा दक्षिणतीर

छ ४,५ ता. २५,२६-११-१७२८ नर्मदा उत्तरतीर नजीक धर्मपुरी

छ ६,७ ता. २७,२८-११-१७२८ नालछी सरकार मांडवा सुभा माळवा

छ ८,११ ता. २९ नो.,२ डिसें. १७२८ आमझरे नजीक उज्जनी

छ १२,१३ ता. ३-४-१२-१७२८ आड

छ १६-१८ ता. ७-९-१२-१७२८ जेपाळकर (?)

छ १९ ता. १०-१२-१७२८ तळें

छ २२-३० ता. १३-२१-१२-१७२८ नजीक उज्जेन

No. 9]

तिस्सां अशरीन जमादिलाखर पौष

छ १-२२ ता. २२ डिसें.—१२ जाने. १७२९ मुकाम उजेन प्रांत माळवा

छ २३-२४ ता. १३-१४ जाने. १७२९ कालडोहो

छ २५ ता. १५-१-१७२९ कायेता पा। हवेली उज्जेन

छ २७ ता. १७-१-१७२९ शाहाजापुर

छ २८-२९ ता. १८-१९-१-१७२९ सारंगपुर

साबान फाल्गुन

छ १ ता. १९-२-१७२९ मौजे चुकला परगणे रामपुरा

छ २ ता. २०-२-१७२९ कसबे भानपुरा

छ ४,५ ता. २२,२३-२-१७२९ नजीक कसबा रामपुरा

छ १२ ता. १-३-१७२९ प्रांत जावदे

छ १३ ता. २-३-१७२९ नजीक देवले

छ १८ ता. ७-३-१७२९ नजीक सुतोडा प्रा। माळवा

छ २२ ता. ११-३-१७२९ महीनदी

छ २६ ता. १५-३-१७२९ नजीक बासवाडा

छ २८ ता. १७-३-१७२९ मु॥ नदी आनास

छ २९ ता. १८-३-१७२९ ,, ,,

छ ३० ता. १९-३-१७२९ नजीक झालोद

No. 10]

· मुकाम चिमाजी बल्लाळ

तिस्सां अशरीन मया आलफ रमजान चैत्र

छ २ ता. २२-३-१७२९ नजीक दाहोद

छ १३ ता. २-४-१७२९ दाहोदहून कूच

छ १९ ता. ८-४-१७२९ धंढाणे

छ २० ता. ९-४-१७२९ खडाळं

छ २१ ता. १०-४-१७२९ बारेचे ओळ्यावरी

छ २२ ता. ११-४-१७२९ बारीचा ओढा

छ २३ ता. १२-४-१७२९ जांबूळबारे

छ २४ ता. १३-४-१७२९ गांवळी नजीक नर्मदा

छ २५ ता. १४-४-१७२९ गांगली नर्मदातीरीं

छ २६ ता. १५-४-१७२९ नजीक राजपुरा, नर्मदेअलीकडे

छ २७ ता. १६-४-१७२८ सेंधवा

छ २८ ता. १७-४-१७२८ नजीक पळसवाडा

छ २९ ता. १८-४-१७२८ नजीक करवंदी

सवाल—वैशाख

छ १ ता. १९-४-१७२९ मु. कसबे खेडे पाबे

छ २ ता. २०-४-१७२९ मोहाडी प्र. डांगरी, प्रांत खानदेश

छ ६ ता. २४-४-१७२९ कोकणखेड

छ ७ ता. २५-४-१७२९ इंचूर

छ ८ ता. २६-४-१७२९ श्रीगंगातीर मौजे पूर

छ ९ ता. २७-४-१७२९ मौजे दारवे प्र. संगमनेर प्रवरातीर

छ ११ तां. २९-४-१७२९ मुळानदी

छ १६ ता. ४-५-१७२९ मु. पुणें

No. 11] [May-June 1733

चिमणाजी बल्लाळाचे मुक्काम

जिल्हेज (अवल साल) सुाा आर्बा सल्लासीन मया व अलफ

तेरीख २०+ —मुाा पातोंडे पाा चालिसगाव प्रांा खानदेश

+ 24-5-1733. मोडक जंत्रीप्रमाणें सुाा ११३४ साल २१ जिल्हेजला सुरू होते. परंतु तेरीख २० जिल्हेजच्या रोजकीर्दीच्या १ ल्या बंदरावर, "छ मारी मृग अवल साल सन आर्बा" अशी नोंद आहे.

तेरीख २१—मुा मौजे रोहिणी पाा देहर प्राा खानदेश
तेरीख २२—मुा नजीक भादली प्राा खंडाले
तेरीख २३—मुा मौजे पालसड पाा गांडापूर
तेरीख २४—मुा मौजे मेढी पाा गांडापूर
तेरीख २५— „
तेरीख २६—मुा गंगादक्षणतीर
तेरीख २८—मुा मौजे बाम्हणी
तेरीख २९—मुा खोरेकरजुले पाा पारनेर

No. 12] [June 1733

चिमणाजी बल्लाळाचे मुक्काम

माहे मोहरम सुा आर्बा सलासीन मया व अलफ

[3-6-1733

छ १—कोा हांगे प्राा कर्डेरांजणगाव
छ २—घोडनदी
छ ३—कोा केंदूर ताा पाबल
छ ४—वडगाव सिंद्याचे
छ ५—कोा पुणे

No. 13] [Nov.-Dec. 1733

माहे रजब सुा आर्बा सलासीन
मया व अलफ

सिलिकबंद पोते स्वारी राा चिमणाजी बलाल

[20-12-1733

चिमणाजी बल्लाळाचे मुक्काम

छ १ ते २२—सातारा
छ २३—भोइंज
छ २४—सिरोल
छ २५ ते २८—नसरापुर
छ ३०—नसरापुर

No. 14] [Dec. 1733-Jan. 1734

माहे साबान सुा आर्बा सलासीन

मया व अलफ

सिलकबंद पोते स्वारी राजश्री चिमणाजी बलाल

चिमणाजी बल्लाळाचे मुक्काम

छ १ ते १२—नसरापुर

छ १३ते १७—जांबली

[13-1-1734

छ १८—जेजुरी

छ १९—कों सुपें

छ २०—पाटस

छ २१—उरली ताा सांडस प्रां पुणें

छ २२ते ३०—पुणें

No. 15] [March-April 1734

माहे जिलकाद सुा आर्बा सलासीन

मया व अलफ

चिमणाजी बल्लाळाचे मुक्काम

छ १ ते २७—काा पुणें

[22-4-1734

छ २८—तुळापूर

छ २९—कोा पुणें

No. 16] [Aug. 1733

माहे रबिलौवल सुा आर्बा सलासीन

मया व अलफ

सिलकबंद पोते स्वाा राजश्री पंतप्रधान

पेशव्याचे मुक्काम :—

छ ९—बलाराजा

छ १५ ते १७—राजपुरी

छ २३—राजपुरी

छ २५—राजपुरी

छ २९—राजपुरी

No. 17] [Sept. 1733

माहे रबिलाखर सुा आर्बा सलासीन
मया व अलफ

सिलकबंद पोते स्वाा राजश्री पंतप्रधान
पेशव्याचे मुक्काम
छ ४—राजपुरी
छ १२—राजपुरी
छ १७ ते २०—राजपुरी
छ २२—राजपुरी
छ २४ ते २६—राजपुरी

No. 18] [Oct.-Nov. 1733

माहे जमादिलाखर सुा आर्बा सलासीन
मया व अलफ

सिलकबंद पोते स्वारी राा पंतप्रधान
पेशव्याचे मुक्काम
छ १—राजपुरी
छ ६ ते ९ –राजपुरी

No. 19] [Nov.-Dec. 1733

माहे रजब सुा आर्बा सलासीन
मया व अलफ

सिलकबंद पोते स्वारी राा पंतप्रधान
पेशव्याचे मुकाम
छ २—राजपुरी
छ ४—राजपुरी
छ ५ ते ७—घोसाले
छ ९—घोसाले
छ १२—पारघाटतल
छ १३—केलघर, ताा मेढेखोर
छ १४—कनेरे व शाहूनगर संध्याकाल
छ २६ते ३०—नसरापूर

No. 20] [17-11-1734 to 15-12-1734

पिलाजी जाधवराव याचे मुक्काम

खमस सल्लासीन

रजब.

१	केबेगाव (?)
२	कोरेगाव भीमातीर
३	कोडफुरी
४	शिरूर घोडनदी
५	वडनेर पा पारनेर
६	निबगाव वाण्याचे,
७	राहूरी
८	दवणी—पा संगमनेर
९	खाबेल—वेजापूर
१०	पारले पा खडाले
११	पिपरखेड पा देहर
१३	वाघली बोर प्रा खानदेश
१४	सिदबेल पा सुतोडा
१५	बिलदी पा केंबार
१६	आबडी पा सेदुरणी-खानदेश
१७	पिपरी पा जामनेर
१८	शेल्ड पा बोदवड
१९	बाताले—येजलाबाद
२०	नेरल—मलकापूर
२१	वडोदे येजलाबाद
२२	मालेगाव—जलगाव पुर्णा
२३	कवठल—जलगावनजीक
२४	कोलती—आडगाव वऱ्हाड
२७	आबनेर—तापीतीर
२८	भिलावे पिपलोद
२९	कोटे—मालवा मकडइ

No. 21] [14-4-1735

पिलाजी जाधवाचे मुक्काम

खमस सल्लासीन

जिल्हेज			
१	छपोरा.		देवगड
२—६	,,		
७	सिवणी	प्रांत	देवगड
८	साक.	,,	देवगड
९	पंचनदी	पा। चवरइ	पा। देवगड
१०	टकारी	सिगनगड	नदीपंच
११	कातवडी		देवगड
१३-१६	भीमगड		,,
१८	सागवी		,,
१९	पाटणसागवी		,,
२०	मोपे?	रामगीर	,,
२३	ओबर?		,,
२४	कानोली		
२६	पाहनेर		
२७	दवली	नाचणगाव प्रांत वराड	
२८	नदी वर्धा		
२९	सांगवी व मनूर रायगाव वराड		

ITEM No. 3 : 1728–1729

No. 22] [4-7-1728

सिलकबंद पोते स्वारी राजश्री पंत प्रधान सुा तिसा अशरैन मया अलफ छ २ जिल्हेज ,

जिल्हेज—आशाढ

[6-7.1728

छ ७ जिल्हेज

राजश्री होनाजी पाटील हवालदार हुजरात यासी खत लेहून दिल्हे की तुम्हाजवळून रुपये रुपये १०००० दाहा हजार घेतले यासी व्याज दरसदे दरमाहे रुपये तीन प्रमाणे रुपये देऊ.

३००० हाली सिका सातारा

३००० मुबई
४००० सुरत

१००००

दाहा हजार रुपये घेतले बाा म्हणून पत्र लेहून दिल्हे; सके १६५० कीलक नाम संवसरे अशाढ सुध नवमी गुरुवासरे

छ ९ जिल्हेज

खर्च—रुपये

५।। धर्मादाव व देवस्थान मुकाम सासवड
१ संगमेश्वर
१ खुई (?) ब्राह्मण
१ नारायणे श्री
।। नागेस
।। सिधेश्वर
१ वटेश्वर
।। सोपान

५।।

¶*Several money transactions mentioned in these extracts enable one to settle the time of certain incidents whose dates could not so far be fixed. Mention is also made of certain individuals which has been helpful in clearing many doubtful points at present existing. Certain purchases, presents, monetary or other grants to those who had fallen on the battle-field are also equally helpful.*

No. 23] [*7-7-1728*

छ १० जिल्हेज

खर्च—रुपये

९ काा पुणे यासी खर्च
गुाा सात बाजे खर्च
६ देवस्थाने
१ सिधेश्वर
१ गणेश
१ बालोबा

१३

२ पीर
१ ब्राह्मण गोसावी

६

२ मागी माहारी खासदार याच्या बाइका वोवाळणी बाजे खर्च
१ खेरात फकीर

No. 24] [24-9-1728

राजमंडळ

रोजकीर्दी स्वा राजश्री पंत प्रधान

छ १ रबिलोवल सुा तिसा आशरीन

खासुदगी

(१) जासूद रा। येणे म्हणून पत्र कृष्णराऊ माहादेऊ पा। त्यास देविले रुपये

२ तुकाजी नावजी
२ सयाजी रेखोजी

४

बार.

(१) राजश्री माहादाजी आंबाजी मजमलदार सरलस्कर यासी उट पेशजी दिल्हे आहेत त्याखेरीज हाली उट १ नूरखानाकडून देविले आसे.

(१) राजश्री आंबाजीपंत तात्या याचा सारगा घोडा मोगलाचे जुजी पडला. त्यास हाली राणोजी भोसले याकडील पागेपैकी तीन सिंगरे आहेत व खा। करून द्यावयासी सागितली आहे २ त्यापैकी याच्या चितास येईल ते येक घोडे देणे म्हणून माानिले पत्र दिल्हे असे. १

(१) किता पत्र चिटनिसी राजश्री रघोजी कदम कंठाजी कदम यासी कीं मल्हार होलकर हे सरकारचे चाकर का। तलोद पा। सुलतानपूर येथे राहातात; त्यासी कटकट करिता म्हणून हुजूर विदित जाले व तुम्ही त्यास पत्र लिहिले तेच बजिनस हुजूर आले त्यावरून मानिले ताकीदपत्र लिहिले की याउपरी मल्हारजी होलकर यासी कटकट न करणे. याउपरी कटकट केली म्हणजे तुम्हाकडील लोक जिल्हामध्ये कैसे राहातील यैसे पत्र लिहिले असे.

[25-9-1728

छ २ रबिलोवल

रवासुदगी

(१) त्रिबकराऊ चित्राव जदीद पथक यासी नालबदी स्वार ५ येकून नालबदी बापूजीपताकडून प्रा पुणे येथील यैवजी रुपये १००

(१) बापूजी श्रीपत पा पुणेपैकी रा रघुनाथजी बलाल यासी सभासदीची सेवा घेऊन साल दरसाल पावत करणे स्वारीकडे रुपये रास ७५

No. 25] [*26-9-1728*

छ ३ रावल

रवासुदगी

(१) श्री वरद परंपरा राजश्री त्रिसो गोमतीदास वास्तव्य का सोमठाणे पा रोशनगाव यास श्रीच्या मोहछायास व आनछत्रास पूर्वीपासून गाव इनाम निता [पुढें विस्तृत खुलासा]

[*27-9-1728*

छ ४ रावल

रवासुदगी

वा यादी बा यैवज आबूराऊ मलार याणी जिनस आणून सरकारात दिल्हा- किमत रुपये

३ ।= मोहरदार दस्त ३ दर १८=

१०॥= आफशानी

२॥ मुगरक दस्ता १

१। व (आ?)रपशानी निमदस्ता

२।॥ सादुलाखानी दस्त १

४८= किता आबाशानी दस्ते ३

१०॥=

१२॥ किता कागद गडी

६॥ किता २ दर ३।

६ किता गडी २

१२॥

३॥। दोरण्या ६० दर ८–
२९।= थैल्या जिलखी
१८८– किता १७ दर १८–
७।– किता ९ दर ॥।–

५९॥=

No. 26] [2-10-1728

छ ९ रबिलोवल

रवासुदगी

जगनाथ नाईक पुरंधर यांसी सटवोजी जाधव याकडून सरदेशमुखीच्या यैवजी देविले असेत वरात रुपये
५०००

[4-10-1728

छ ११ रबिलोवल

(१) त्र्यबक खंडेराऊ यासी त्र्यबर्क हरी सुभेदार प्रा। सुपे येथील मौजे वाकीच्या सेतच्या यैवजी रुपये
२९

[5-10-1728

छ १२ रबिलोवल

रवासुदगी

किता पिलाजी जाधवराऊ याजकडून रुपये

५०४ राणोजी भोइटे समजावीस ५६० पैकी
४५० सुलतानजी भोइटे नालबंदी सात मजकूर ५०० स्वार २५ येकून नालबदी
९०० कोनेरराऊ डाले १००० पैकी
२७० अवधूतराव बापाजी ३०० समजावीस
९० कारकून दिमत राणोजी भोईटे १०० पैकी

२२१४

[6-10-1728

छ १३ रबिलोवल

रवासुदगी

(१) लंबोदर माहादेऊ मजमदार दिा पथक कदम यासी मौजे कठापूर येथील यैवजपैकी गला कैली बारुले मापे खंडी २

No. 27] [7-10-1728

छ १४ रबिलोवल

खर्च रुपये

२॥ वलब सुदर सावकार बिदनूर यासी देणे जासूद पांगोटे गुा आबाजी नाा १ येकूण

रवासुदगी

(१) उदी कुणबीण किले लोहगडी आहे ते पुरुषास देऊन रुपये पचवीस जमा करणे म्हणून पत्र दिल्हे आस. रुपये २५

त्र्यबक नारायेण याचे हिसेबी जमा धरणे.

[8-10-1728

छ १५ रबिलोवल

खर्च रुपये

१० आबाजीपत ताल्यास वाटखर्चास

४ जासूद राा ताल्या बाा सातारियासी [तपशील]

५ बाजी भिवराऊ रोजमरा घोडी दाणे आठवडा ताा पिरा

रवासुदगी

(१) काा सासवड येथे राजूर माहालची जकात गराडे बापगाऊ व हिवरे येथे घेता ते न घेणे; सासवडा खालते खानवडी खालते घेणे म्हणून पत्रे

१ बापूजीपतास

१ पानसरे

१ देशमूख

(१) काा सासवड येथे कोणी डाका घालील तरी त्यास मोकदम देशमूख रुके ८१ व देशपांडे रुका ८॥ दिवाणात ।=॥ साडे साहा रुके घेणे, जाजती न घेणे म्हणून पत्र नारो जनार्दन यासी.

2422

No. 28] [*12-10-1728*

छ १९ रबिलोवल

खासुदगी

(१) कसबे पुणे येथील देवाल्याकारणे काामजकूरच्या साल मजकूर यैवजी केसो सभदेऊ याकडून रुाे २०० देविले.

(१) राजश्री खडेराऊ दाभाडे सेनापती यांसी प्रांत पुणे येथील यैवजी बापूजी-पताकडून रुपये ३००

[*15-10-1728*

छ २२ रबिलोवल

खासुदगी

(१) हुजूर खासगीकडे प्रांत पुणे येथील गांव आहेत त्याकडे माहारपटी पडिली त्याचा वसूल खासगीकडे देविला आसे येविसी बापूजीपंतास पत्र दिल्हे आसे रुपये

३८ मौजे खाबगाऊ बुाा ताा साडस
३६ मौजे पारगाऊ ताा करेपठार
११ मौजे हडगुरे ताा निरथडी

८९

(१) मौजे चाबली ताा करेपठार प्रांत पुणे येथे जदीद नव्या विहिरी पाडून मळे बागाईत करितील त्यास तह येणेप्रमाणे केला आसे. जिराइताचा वसूल ज्याप्रमाणे देतात त्याप्राा घ्यावा. विहिरी नव्या जालियात्ररी चार साला माफ. पाचवे साली विहिरीस मोट लागेल तेथे येक मोटेस सालिना होन येक. दोदोन मोटा येके विहिरीस आसिल्या तरी दीड होन घ्यावा. येणे-प्रमाणें करार करून कौल सादर केला आसे. जिराइताचा वसूल देतात त्याप्रमाणे घेतच आसावा. नव्ये विहिरीस येणेप्रमाणे हा कौल सादर १

No. 29] [*20-10-1728*

छ २७ रबिलोवल

खासुदगी

किता संदा खासगत मुकासे गाऊ प्रात वराड येथे आहेत. तेथील कमावीस साल गुदस्ता संकराजी मुरार याजकडे होती ते दूर करून हाली राजश्री बाबूराऊ मल्हार याजकडे कमावीस सागितली आसे देहे बितपसील

कानोजी भोसले याचे संरजामातील देहे

किता देहे राणोजी भोसले याचे संरजामामध्ये आहेत देहे [तपशील]

No. 30] [*28-10-1728*

छ ९ राखर

सिलकबंद पोते स्वाा राजश्री पत प्रधान

सुाा तिसा आशरीन

मया आलफ राखर कार्तिक

खासुदगी

दर्याजी काळे याचा घोडा शाहामतखान याचे जुजात पडिला होता. त्याची किमत करार करून दिल्ही, त्यापैकी बाकी देणे राहिले ते राजश्री आपाकडून देविले. रुपये

२८०

सुलतानजी चोपडे याचा घोडा जुझात निजामाचे पडिला. त्याचे किमत रुा २७९ सदर आपाकडून देविले आसत.

[*31-10-1728*

छ ८ राखर

खासुदगी

ठाणे काा पुणे नारो जिवाजी याचे स्वाधीन केले आहे. देखरेख व वाटणी देखील हे करितील. केसो छहदेऊ यासी पत्र १

No. 31] [*10-11-1728*

छ १८ राखर

खर्च रुपये

१० श्री मोा तुळजापूर बाजे खर्च

९ विाा मातुश्रीबाई

९ सौ कासीबाई

१०

[*20-11-1728*

छ २८ राखर

जमा छ मजकूर बाा वाजगस्त छ २३ राखरी मातुश्रीबाई समागमे पंढरीस जाते समई रुा ५९० साडे पाचशे दिल्हे, त्यापैकी खर्च ४३९८= बाकी जमा वाजगस्त ११०|||=

No. 32] [22-12-1728

छ १ जमादिलाखर

सिलकबंद पोते स्वारी राजश्री पंत प्रधान
सुाा तिसा आशरीन मयां आलफ
छ १ जमादिलाखर पौश
शुाा त्रितीया रविवार

खासुदगी

जासूद रवाना सातारा बाहादूरपुरा व येदलाबाद येथील राजपत्रे आणायासी पाठविले तेथून राजपत्रे घेऊन माहालास जातील त्यास खर्चास देविले. रुपये

[तपशील]

[25-12-1728

छ ४ जमादिलाखर

खर्च रुपये

३२ मो आवढे
४ श्रीनागनाथ
१० तीर्थ उपाध्या
१९ ग्रामस्त ब्राह्मण
१ स्नानसमई

३२

[30-12-1728

छ ९ जमादिलाखर

खर्च रुपये

१ देणे कलावंतीण जालनापूर

[1-1-1729

छ ११ जमादिलाखर

खर्च रुपये

१९॥
खाा सोने देणे ताा आपाजी सोनार
तोले १॥ दर १३

[4-1-1729

छ १४ जमादिलाखर

खर्च रुो

१४ कासिबा व आंबाजी गुरव इा छ १ जाखर
ताा छ माार

खासुदगी

राजश्री दावलजीराऊ सोमवसी ताकीदपत्रे मुकासे माहाल [तपशील]

No. 33] [*12-1-1729*

छ २२ जमादिलाखर

खर्च रुपये

१२ माहार नवे खासदार दिाा नारायणजी निकम
जमान नागोजी राळा बारगीर आसामी ३

४ काननाक

४ रघनाक

४ उपनाक

१२

[*13-1-1729*

छ २३ जमादिलाखर

खासुदगी

सरंजाम ताकीदपत्रे दिाा जाचक निाा राा कान्होजी भोसले याजकडील ताकीदपत्रे प्रात वराड मुकासे राजपत्राप्रमाणे

दिाा तुळजाजी जाचक	बारवाजी जाचक
१ प्राा थूगाव	१ मौजे नागरी प्राा सेवगाऊ
·॥· प्राा लाडखेड निमे	प्राा चांदे
[वगैरे]	१ प्राा आडेगाव
	[वगैरे]
१०॥ पत्रे ११	२१ १८

No. 34] [2-1-1729

छ १२ जमादिलाखर सुा तिसा आंशरीन मया व अलफ

माहालपोते स्वारी राजश्री चिमणाजी बलाल

जमा जामदारखाना बाा भेट नदंलाल मंडलोई इंदूरकर राा आपा डेरि-
यास गेले होते तेथे दिली थिरमे जोडी १

शाला २

१५ प्राा उदी १

१७ प्राा हिरवी १

३२

[10-1-1729

छ २० जमादिलाखर

(१) घोडा सिंगा कुमैत दिाा नजर फतेसिंग राजा हरगड येथील भेटीचा देणे.
पागा दिाा भिकाजी सिंदे याजकडे दिल्हा. रास
१

[13-1-1729

छ २३ जमादिलाखर

खर्च रुपये

॰।।—धर्मादाये ब्राह्मण क्षिप्रचे तीरी

॰।। विद्यमान सौभाग्यवती रखमाबाई

८— विद्यमान जिऊबाई

॰।।—

६५ धर्मादाये ब्राह्मण क्षिप्रचे तीरी विद्यमान
राजश्री आपा

१० गोसावी उर्धमुखी

॰।= तैवज सुपारी ८८।।

No. 35] [6-4-1729

छ १७ रमजान

रोजकीर्द

स्वारी राजश्री चिमणाजी बलाल

सुा तिसा आशरीन रमजान—चैत्र

परभारे

मलारजी होलकर यास बहुमान

हती बाा राणोजी सिंदे यांपैकी दिला. घोडी खाा गुाा सिदोजी राऊत यांपासून घेऊन दिली. रास १

येकून किमत रुपये

जमाई ९००

जमा बाा लस्कर दयाबहादर रुपये

३००

खर्च रुा

९० राणोजी सिंदे देणे गवीचा

घोडा गुाा गिरजोजी गोवारी

ताा गिरजोजी

[15-4-1729

छ २६ रमजान

छ मजकुरी राजश्री रायास पुत्र जाहाला म्हणून पत्रे घेऊन कासीद आले.

No. 36] [9-3-1729

छ १९ साबान

स्वारी राजश्री पंतप्रधान

सुा तिसा आशरीन मया व अलफ

खर्च——रुपये

१० जासूद रवाना बातमी

२ छत्रसालाकडे

१ राणोजी घाटगा

१ संभाजी सूर्यवंसी

—

२

८ रवाना महमदखान बंगस याजकडे

[तपशील]

१ चिंतामण दिमत छत्रसास रवाना मारनिलेकडे

[10-3-1729

छ २० साबान

छ मजकूर भारतसिंग राजा छत्रसाल याचा पुत्र याची भेट जाली.

[13-3-1729

छ २३ साबान

छ मजकुरी राजा छत्रसाल यांची भेट जाली.

जमा छ मजकूर बा। यैवज ४९८९॥=

मेजवानी राजश्री छत्रसाल राजे

याजकडील मा। आसाराम

४७३९ यैन

२९४॥= मोहरा दर १२८=

४९८९॥=

ITEM No. 4 : 1729

No. 37] [21-3-1729

छ १ रमजान

सिलकबंद पोते स्वारी राजश्री पंत प्रधान

सु॥ तिसा आशरीन मयां

आलफ

रमजान—चैत्र

खर्च रुपये

४ कासीद दिमत छत्रसाल रवाना

रा। आपाकडे

२ देवराये

२ धणी

४

६ देणे कलावंते ता। खंडू सावंत

[23-3-1729.

छ ३ रमजान

खर्च रुपये

२ लाला लमाण मयेत जाला होता. त्यास पुरून ठेविल्यावरी फिरोन जिवंत होऊन मातींतून निघोन आला त्यास इनाम रुपये

२३ देणे कलावंत ता। खड्डू सावंत कृष्णा वगैरे रोजगुदस्तांचे

११ उलफा

१ मिठाई

१२

११ छ मजकुरी उलफा

[26-3-1729

छ ६ रमजान

खर्च रुपये

५० महादाजी आबाजी मजमूदार दि॥ राजश्री दावलजीराऊ सोमवौसी सरलस्कर

¶*The reference to Chhatrasal, Krishnaji Naik Joshi, Ranoji Bhonsle, Brahmendra Swami and others in these extracts are useful in determining the exact dealings of these persons with the Maratha Sardars.*

No. 38] [*27-3-1729*

छ ७ रमजान

जमा छ मजकूर हा। यैवज ९७०
नजर छत्रसाल राजे
याचा भाचा मोहरा ८०
दर १२८= येकूण रुपये
छ मा।र बा। यैवज राजश्री
छत्रसाल यैन रुपये

[2-4-1729

छ १३ रमजान
बाा यैवज छत्रसाल माा ६६१
ज सो ले यैन रुपये
२३१ छ ७ रमजान
१३५ छ १० रमजान
२९५ छ ११ रमजान

[4-4-1729

छ १५ रमजान

खर्च रुपये
३७ देणे जखमी
५ संताजी नील
३ तुलबाजी माने
[वगैरे]

३७ १०

[5-4-1729

छ १६ रमजान

खर्च रुपये
१० देणे जखमी दिमत राजश्री आपाजी माणकेस्वर आसामी ५

[6-4-1729

छ १७ रमजान

खर्च रुपये
४ गोविंद बलाल दिमत राजश्री पंताजीपंत

[10-4-1729

छ २१ रमजान

खर्च रुपये
१२५ बाबूराऊ रघुनाथ मजमदार दिमत राजश्री पिलाजी जाधवराऊ देणे उटास ताा दगडोजी पवार बाा चिठी

No. 39] [25-4-1729

तेरीख ७ रोज वैशाख शुध ८

रोजकीर्दी

स्वारी राजश्री चिमणाजी बलाळ

सुा तिसा

[आशरीन मया व अलफ]

माहे सवाल—वैशाख

खासुदगी परभारे

पागा राणोजी भोसले पैकी देणे सुभानजी चव्हाण संकराजी चव्हाण देणे दयाबहादरचे झुंजी घोडी पडली त्याची मोबदला बा। येसाजी सोनवणी याबा। घोडी रास १

[26-4-1729

तेरीख ८ सवाल

परभारे

रदकर्ज कृष्णाजी नाईक जोसी यासी रुा २५०००. पैकी पोताहून दिल्हे रुपये ११९४० बाकी यैवज बा। बाकी नंदलाल मडलाई याजकडून हुंडी धोंडो माहादेऊ याकडून आले ते १३८६०

यैवज सातारा राजश्री दादोबाजवळी पावला. बा। नंदलाल मंडलाई प्रा। इंदूर पैकी बाकीच्या यैवजी रुपये १२८७० बार

ITEM No. 5 : 1729 (April)—1729 (December)

No. 40] [25-4-1729

छ ७ सवाल

सिलकबंद पोते स्वारी राजश्री पंतप्रधान

सुा तिसा आशरी(न)

मयां व अलफ वैशाख सवाल

खर्च जखमियासी

[तिस्रीस जखमी माणसाकडे व त्यांच्या घोड्याकडे रकमा खर्ची पडल्या आहेत]

[28-4-1729

छ १० सवाल

(१) छ मजकुरी काईमखान याचे लस्कर लुटिले, हत्ती घेतले, खाशास मोर्चे लाविले. काईमखान शेभर स्वारानसी पळोन गेला.

2432

छ ११ सवाल रोजगुदस्ता काईमखान बुडऊन छ मजकुरी जैतपुराजवळी आबराईत मुकाम

॥ रवा॥ कागद कोरे दप्तर खर्च दस्ते २

[1-5-1729

छ १३ सवाल

खर्च

९ देणे इनाम बाबूराऊ रघुनाथ यास पुत्र जाला त्याची साखर आली त्यास

छ १४ सवाल

खर्च

१९ कासीद दिमत मयाराम वकील दिलीहून आले त्यास

¶*Kaimkhan, Mayaram, Raghunathbhat Patwardhan, Jagatrao, Ambaji Trimbak, Chhatrasal are some of the important personages, whose part in history can be ascertained to some extent by means of these entries. A few battles are also referred to, which can now be conveniently placed in their historical setting.*

No. 41] [*3-5-1729*

छ १९ सवाल

१९३३८ देणे सोने मोहरा भार १६११॥

रुपये

२८८ हिरोजीराऊ पाटणकर देणे बकसीसकडे

१२०० रदकर्ज रघुनाथभट पटवर्धन सा। मजकुरी घेतले ते

१००० देणे यात्रकरू

२०० रोख पोता घेतले

१२००

मोहरा भार १००

१७८९० देणे ता। बाबूजी नाईक जोसी वाराणसीकर मोहरा वजन तोळे १३४८ येकूण मोहरा

[4-5-1729

छ १६ सवाल [चालू]

रा जगतराऊ याचे डेऱ्यास राजश्री पंत प्रधान गेले तेव्हा सद्का दिल्हा तो यैवज ता. रखमाजी जगथाप पावलो व रुपये ४००

येकदर हिसेबात जमा असत.

[12-5-1729

छ २४ सवाल

खर्च

८ सयाजी व इमाम जासूद दिमत नजूदी आलीखान

१०० संभाजी सावंत रसानगी आमृतराऊ शंकर रुपये भार

खासुदगी

(१) चितोराम यासी प्रात मालवा येथील फडनिसी सखो माहादेऊ याचे कारकीर्दीस होती. सन सिता(?)मधे तेणेप्रमाणे साल मजकुरी करार करून उदाजी पवार यासी सनद सादर केली असे. तैनात रुो

१२००

सन सितामधे रामाजी बावाजीस जमान घेतला असे

No. 42]

(१) बाजी वासुदेव याकडे जासूद रवाना केले की तुम्ही वराड प्राती धामधूम न करावी म्हणून पत्रे मसाला रुो

१० सताजी चापाजी दिा आपा

१० माहादजी रखमाजी

२०

(१) रदकर्ज देणे साल गुदस्त रुपये

४००० सुदर नाईक काले नख्त व कापडपैकी

१००० रघोबा नाईक तासके यासी

५०००

आदा बाा यैवज देवराज वेडातीपूरकर (?) प्रांत श्रीरंगपटण साल सन सबामधे स्वारी जाली होती ते समई कुल बोलेस होते, मग वीस हजारपैकी करार केले. सदरहू आदा छ १ रजब

छ २९ सवाल

खर्च

४६८ देणे सोने मोहरा भार

रुपये

१९२ माहादाजी अंबाजी मजमदार दिमत सर लस्कर १६

२७६ सदासीवभट आग्निहोत्री परशरामकर याची वस्तभाव विक्रमपुराजवली गावकरीयानी लुटून घेतली त्याचा यैवज जसोले दिा छत्रसाल याणे द्यावा. हवाला घेऊन चिठी लिहोन (दि)ली. रोख आडीचशे मोहरा तीन त्याजकडून वसूल आला नाही. याजकरिता मुाभट गोसावी यास दिल्हे. सोने मोहरा भार २३ दर १२

No. 43] [*15-5-1729*

तेरीख २७ सवाल

रवासुदगी

राजश्री अंबाजी त्र्यबक याची घोडी सारंगी सासवडी आली आहे. तीस दररोज. हरभरे कैली मापे ०८१॥ प्रा जितके दिवस राहील तोवरी देणे म्हणून नारो दादाजी पत्र १

बार

खर्च रुपये

रदकर्ज रुपये

१९००३८ माहाराज राजश्री छत्रपती बाा बापोजी गणेश देणे हुजरात

१२०००० किता येथून यैन

2435

५००० आपाजी घाटगे पैकी
२०० नरसोजी घाटगे
१८८३८ बा। राणोजी भोसले
३००० गोरखोजी भापकर

No. 44] [*2-8-1729*

छ १७ मोहरम सलासीन मया व अलफ

रवासुदगी

राजश्री स्वामीचे भेटीसमई हती नजर केले साल गुदस्ताचे स्वारीपैकी

खासा राजश्री पंतप्रधान छत्रसालाचे मुलकात जाऊन बंगस लुटिला त्याचे पाडाव हती आणिले होते ते रास १३

राजश्री चिमणाजी बलाल स्वारीस मालवियांत गेले. दयाबहादूर बुडविला. त्याचे हती पाडाव आले रास १८

[तपशील]

[*9-8-1729*

छ २४ मोहरम

रवासुदगी

राघो लक्षुमण पुरधरे यासी गोरखोजी भापकर याची मजमू सांगोन पाठविले तैनात रुपये ७००

[*26-11-1728*

छ ९ जावल

सिलकबंद पोते स्वारी राजश्री पंतप्रधान

सुा तिसा आशरीन मया आलफ

रवासुदगी

किता पत्र चाकणकर मोगलाने धामधूम माडविली आहे; तेथील गडी बाधोन हालखुद ठेवावयास देवजी सोमवौसी व संताजी धायेभोर याजकडील स्वार येतील, त्यास दरराऊता दररोज ८= चवल प्रमाणे देत जाणे म्हणून गोविंद कृष्ण यासी पत्र

[*26-11-1728*

छ ९ जावल

छ मजकुरी राजश्री स्वामीचा निरोप वाघज पा। बारामती येथून घेऊन आले.

No. 45]

सलासीन मया व अलफ तेरीख १७ रबिलाखर

खासुदगी

हैबतराऊ लकडे बिन तुकोजी पाा लकडे मौजे कोलविरे पाा सुपे याचे बाप तुकोजी लकडे स्वामीकार्यावरी दयाबाहादर यांचे झुंजी पडिले याजकरिता * * * * * इनाम पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने

छ १० रबिलाखर

खर्च पोतापैकी

कारकून खासा राजश्री पंत
चिरंजीव राजश्री रामचंद्रपंताचे
बारशास खर्च रुा
७०।।।= ताा बहिरंभट उपाध्ये

No. 46]

छ ९ जमादिलाखर

सुाा सलासैन
[मया व अलफ]

राजमंडळ

स्वाा राजश्री चिमणाजी बलाल

माहे जमादिलाखर–पौष

खासुदगी

बदल देणे घोडा लोणंदकर जावजी खंडोजी गोरखोजी सलके याचे बारामतीचे स्वारीस घोडे पडले हो(ते) त्या ताा देता राहिले होते ते हाली द्यावे यैसे करून राजश्री राऊ याणी चिठी लिहिली. [वगैरे]

छ १८

माडवगड घेतला म्हणून मल्हारजी होलकर व उदाजी पवार याची पत्रे आली त्यास वस्त्रे

३।। कासीद दिाा मल्हारजी होलकर तिवटे २

७।। कासीद दिाा उदाजी पवार तिवटे २

२४। कारकून दिा होळकर
गोविंद चिंतामणी
१७॥ पासोडी ताडपत्री
६॥। तिवटे

——

२४।.

५।= गगाधर येसवंत तिवट १

—— ——

४०॥= ७

छ २७ जााखर

किले पायगडी राजश्री आपा माचीस जाऊन बहु(मा)न केला. किले माार यास

तपशील रुपये

छ ९ सवाल सलासैन मया व अलफ [16-4-1730

राजश्री आंबाजी त्र्यबक यासी
कुडती उंदराच्या कातड्याची बाा
स्वारी राजश्री चिमणाजी बलाल साल
गुदस्ता दयाबहादरपैकी १ रुपये होणे (?)
येकूण सनग १

ITEM No. 6 : June 1730—December 1731

No. 47] [*12-6-1730*

६ जिल्हेज

१२०० देणे कर्जदादन राजश्री दावलजीराऊ सोमवंसी सरलस्कर ताा सखोबा

१००० किता
४०० गुाा सेखजी
६०० गुाा रामजी

——

१०००
२०० किाा गुाा रामजी

——

१२००

[7-7-1730

१ जिल्हेज

मेजवानी राजश्री स्वामी दरुणी महाल

३६९२॥|= सौभाग्यवती मातुश्री विरूबाई पोशाख ५ यो वस्त्रे

४०५||| सौभाग्यादिसंपन सकुमारबाई वस्त्रे

४६१ सौभाग्यादिसंपन्न सगुणाबाई वस्त्रे

६५६ सौभाग्यवती गोडुबाई व सौभाग्यवती अहिल्याबाई फतेसिंगबावाची स्त्री वस्त्रे यो रुपये

५४४ सौभाग्यवती राजसबाई वस्त्रे यो निा निंबालकर सनगे रुपये

३०० मदनसिंगबावाचे घरी बाइकास सनगे

¶*There are many interesting entries in this year—all more or less shedding light on Shahu's domestic life. Madan Singh, Sambhaji's illegitimate son, is mentioned as living at this time. The early activities of Holkar, Sindia, Naro Shankar and others are described.*

No. 48] [*21-7-1730*

१६ मोहरम

मोरो बावाजी बेलसर निमे कुलकर्णी व जोतिसी मौजे जेजोरी ता। करेपठार याणी आपले वृत्तीचे पत्र राजश्री दादाजी कोंडदेऊ याच्या महजराचा जीर्णोधार करून राजश्री छत्रपती स्वामीची पत्रे

राजश्री राणोजी सिंदे व मल्हारजी होळकर यास पत्रे दिल्ही कीं मानारनिलेस कर्जवाम जाले आहे. तुमची यांची स्वारी दर मुलुकात होईल त्या ऐवजी मानारनिलेस तुम्ही अवघे मिलोन रुपये १०००० दाहा हजार पाठवून मानानिलेचे कर्जदारी बार होये तो अर्थ करणे म्हणून पत्र

No. 49] [*8-8-1730*

इहदे सल्लासीन

बा। काबरस पैकी तिवटे

३ भिकाजी येवला

पुणेकर प्यादा १

६ खासदार २
३ भिवाजी यादव
३ शामजी नीलकंठ

६

३। विसाजी नारायेण
हरकारा १
३ दिा त्रिंबकराऊ विस्वनाथ १
देणे

[8-8-1730

५ सफर
देणे राजश्री नारो शंकर सचिव यास सेला अष्टगोली कुसुंबी बाा भेट पैकी १ एकूण रुपये ३०

[12-8-1730

९ सफर
राणोजी सिंदे तिवट १ देणे जयाजी सिंदे तिवट १ रुपये ५.

No. 50] [3-9-1730

१ रबिलाखर

रवासुदगी

राजश्री श्रीधर गोविंद सुभेदार प्रांत गुजरात यासी प्रांत मजकुरचा सुभा सांगितला. त्यास मल्हारजी होळकर याजकडे प्रांत माळवा येथील दिवाणाच्या ऐवजाखेरीज राजश्री चिमणाजी बलाल याचा ऐवज येणे बाा तह तहनामा पैकी देविले रुपये.

१००० खासा वेतनात
त्रिंबक अनंत सभासद

१०००

किता श्रीधर गोविंद यासी खत लेहून की तुम्हापासून कर्ज घेतले रुपये १०००० दाहा हजार रुपये व्याज दरमाहे दरसदे रुपये ३ तीन प्रमाणे करार केले असेत म्हणून खत १ एकूण रुपये

१००००

2440

[16-9-1730

१३ सफर

मेकडोजी ढमढर यासी सनगे येाा रुपये

७ तिवट १

२० अष्टगोली ३

२७

No. 51] [20-9-1730

१८ रबिलावल

देणे राजश्री पिलाजी जाधवराऊ वर्षासन कापड मुदल किमत रुपये १०००

[22-9-1730

२० रबिलावल

देणे कानोजी सणस देणे निंबाजी सणस मोत्यें जोडी सिलकेपैकी गुाा त्रिसाजीपंत १ येाा ४०

[26-9-1730

२४ रबिलावल

आवजी नीलकंट चिटनिवीस देणे पटी भार्गवराम रुपये ९०

[27-9-1730

२५ रबिलावल

२८९ गोरखोजी भाबकर ताा नागो बावाजी दिाा माार मोहरा १९ दर १५

[5-10-1730

३ रबिलाखल

वस्त्रें राजश्री कुवर बहादर बाा ताा मोरोपंत दिाा राजश्री बाबूराव मल्हार

२०७॥|= खासा

१०० मंदील १ सरासरी मोतचुर

बाबूजी नाा पैकी जमा धरणें

आक ६००

2441

६९ अष्टगोली १
सेवडेपैकी हिरवा
४२॥।= किमखाप बाबुजी नाा पैकी
१ आक १३७

२०७॥।= ३

१७६॥। फतेसिंग
१२६॥ सौ नाबदबाई कुवर बाहादर यांची बहीण

[24-10-1730

२२ रबिलाखर

३००० संताजी माने पतंगराव सोने वजन तोळे २०० दर १९

No. 52] [3-11-1730

३ जमादिलावल

श्री देव चिंचवड यासी दस्तक हर जागाहून जिन्नस भरून येतील त्यास जकातीचा उपसर्ग न लावणे म्हणोन दस्तक बैल सर ५०

[11-11-1730

११ जमादिलावल

सुभानजी बोरगे यासी सालगुदस्तोंचे बाकीच्या एवज दिल्हे कर्ज गुा वासुदेव जोसी ताा छ १३ प्रमाणे रुपये १०००

देणे मानाजी पायगुडे बाा ऐवज बाजगस्त मालजी चितलकर यास नालबंदी रु. २००० दोन हजार देविले प्राा खानदेश दहस्तीपैकी

[2-12-1730

२ जमादिलाखर

बाा देणे मातुश्री बाईकडे पाा जैनाबादचे एवजी मुकासबाब निाा सदासिव दामोदर विद्यमान सदासिव भट पटवर्धन मार्गसीर्ष मासचे हप्त्यापैकी देविले सबब सोने नगाबद्दल रुपये १३००

2442

No. 53] [11-12-1730

छ ११ जमादिलाखर मुा सातारा

वस्त्रे रवाना अर्काट अजम सादतुलाखान यासी

हा वेकाजीपंत

खासा सादतुलाखान
सनगे हा सातारा

७० चिरा बादली १
१९० किमखाप १
१०० जामेवार पसमी सफेत १
२९ गोशपेश पसमी १
४९ पट्या गुजराती १
६ हकबदी १
८० शालजोडी एक
खिरमे २
७९ दुपटा पैठणी १

९९१ ९

१०० निम अस्तनी पसमी
हा पुणे सनगे ४ पैकी

९७ हा भेते भाऊ सनगे
धुवट
३४ तिवटे २ बार ९९ हात
८ महमुदी १ हात २४
१९ सेला साधा १
हात ३२

९७ ४

१४

७०८

सादतुलाखान याचे स्त्रीस
७० लब गाजरी इलाचे
याचा हा स्वारी सनग ॥
८ चोलखण बादली
उसनवार हा सौ कासीबाई
३८६ हा पुणे सनगे
४४ आली त्यापैकी
२९० पातल बलदली
१७६ पासोड्या
पैठणी १ मोती मुठ

३८६

४४४

No. 54] [14-12-1730

१४ जमादिलाखर

जानोजी काकडे खिजमतगार सनिध राजश्री छत्रपति स्वामी यांचे कर्ज गावगना वगैरे प्रा। संगमनेर येथे येणे आहे. त्याविसी हली ताकीदपत्रे सादर केली कीं कर्जाचा भाग वारून देणे येसी ताकीदपत्रे देऊन पाठविले त्यास मसाला देविला.

राजश्री मल्हार तुकदेऊ यास राजश्री बापूजी श्रीपत याजकडून प्रांत पुणे येथील साल मजकुरपैकी आखेर सालचे ऐवजी देविले रु. ५००

[16-12-1730

१६ जमादिलाखर

मल्हार रायाजी प्रभु दि॥ उदाजी पवार तिवट १ एकूण रुपये २॥= हा राणोजी भोसले

[22-12-1730

२२ जमादिलाखर

१२॥।. देणे साडे करून ग्रहास आलियावरी ता॥ रखमाजी जगथाप देणे सौ॥ अन्नपुर्णाबाईच्या हाती दिली मोहर १ एकूण रुपये.

No. 55] [26-12-1730

२६ जमादिलाखर

१४० आनंदराव पवार यास वस्त्रे

२७१ येशवंतराव पवार नि॥ आनंदराव पवार

२६० कडे सोने भार २०

११ कुडक्या सोने .।।।=

२७१

[27-12-1730

२७ जमादिलाखर

सरंजाम आनंदराऊ पवार दि॥ राजश्री चिमणाजी बलाल पेस्तर साल सन सलास सलासैनपासून

मुकासे प्रांत गुजराथ प्रांत माळवा पा॥ जलगाऊ प्रांत वराड पा॥ चिखलवाहाल पा॥ जैनाबाद, मौजे भारडी, मौजे उजनी पिंपलगाऊ ता॥ नगर हवेली पा॥ नेवासे मोज कवीटे मौजे मलठण.

आनंदराऊ बीन संभाजी पवार पाा मौजे कवठे ताा पाबल प्राा जुन्नर याणे पुणाचे मुकामी येऊन हुजूर विदित केले की मौजे मजकुरी पाण्याचा तोटा आहे, याकरिता तले बांधतो, तल्यामुळे खर्चवेच पडतो, या करिता १ चाहूर इनाम दिली असे.

मौजे बाभुळसर पाा कर्डे येथील पाटिलकी जगदेऊ राऊ पवार यानी नूतन करून घेतली, त्याचा महजर करून देणे म्हणून पत्र १

प्रांा मालवा येथील सरदेशमुखीचा मजमु पेस्तर सालापासून सन सलास सलासीनची गोविंद खंडेराऊ यासी सांगितली असे. सनद आनंदराऊ व राणोजी सिंदे याचे नावे दिल्ही; तैनात रुपये २००० दोन हजार केले असेत.

No. 56] [*29-12-1730*

२९ जमादिलाखर

देहनगी कलावंते

१९ आवरंगाबादकर

साड्या

४||| बुधो १

४||| कासमीरा १

४||| मखन १

४||| हमदरवण १

१९ ४

१०१ शामी खंडालकर

४६ पातळ १ जरी

५५ दुपटा १

१०१ २

[*31-12-1730*

छ २ जमादिलाखर २ मुाा सातारा

जामदारखानापैकी

जोत्याजी भोसले दिमत राणोजी सिंदे तिवट हाा कानडे १

आक रुपये

१३|= ७|||=

No. 57] *[1-1-1731*

३ रजब

हा मुा लोक दिा परशराम सितोळे यास मसाला देविले रुपये.

३ मजाई घोलपीण वस्ती मौजे बाटेफल ताा माडोगण ही मौजे कुसेगाव येथील मिरासीच्या गावास येऊन राहात नाही सबब.

५ येमा मांग वस्ती खेड याचे परशराम सितोळे याजपासून शंभर रुपये नालबंदी म्हणून घेऊन चाकरीस आला नाही ते रुपये देत नाही सबब.

[4-1-1731

छ ६ रजब

संभाजी राजे याजकडील हुजरे तीळगूळ घेऊन आले त्यास तिवट १ रुपये ५

[5-1-1731

७ रजब

मुकास महाल आनंदराऊ पवार यासी साल मजकुरीचे पेस्तर सालापासून दिल्हे.

[8-1-1731

१० रजब

मल्हारजी होळकर यास पत्र कीं पाा मालवा येथील पडिले पान आकार त्यापैकी तुकोजी पवार जिवाजी पवार दरसदे रुपये ७ सात प्रमाणे देणे म्हणून पत्र १

No. 58] *[29-1-1731*

१ साबान

उदाजी पवार व आनंदाराव पवार याजकडे देसी मुकासे होते ते त्याजकडून दूर करून हल्ली खासगीकडे ठेऊन कमावीस साल मजकुरी

२ धोंडो माहादेली(?)याजकडे मुकासा
१ पाा जैनाबाद
१ पाा जळगाऊ
—
२
१ पाा निवासे कमावीस निा
जिवाजी गोविंद दिा राणोजी
भोसले याजकडे

2446

४१

१ पा चिखलवाहाल निा केसो
विश्वनाथ याजकडे कमावीस सांगितली
महाल मजकूर दर सदे रुा १६

४

[30-1-1731

२ साबान

७९० रा पिलाजी जाधवराव रोजमुरा वरात १०१६ पैकी

८२ राणोजी सिंदे रुा ५०० पैकी वजा पोताहून दिल्हे ४१८ बाकी गला १॥=।॥

No. 59] [2-2-1731

छ ९ साबान

२३३॥. धर्मादाय वास्तुशांतीचे दिवसी
२० होमाचे ब्राम्हण ४०
१० आचार्य वगैरे ब्राम्हण ५
६ गोदान
१९७॥. भोजनासमयी भूयसी

२३३॥

[4-2-1731

छ ७ साबान

बाग का पुणे
४ महिमाजी भिंताडा

[22-2-1731

छ २५ साबान

इमारत कसबे पुणे ता सिवराम कृष्ण कुसाचे कामास रुपये १०००.

१९२ जानराऊ ढमढेरे याचे पागेचा रोजमरा येकमाही हा खुद

No. 60] [9-3-1731

छ ११ रमजान

देणे परराज्ये आहिर निजामनमुल्क हा धोंडो गोविंद
खासा निजामनमुल्क यास सनगे रुपये

१०० जामेवार हा बाब्रसी पैकीं १
९० चिरे बादली २
२५ पिवला १
२५ बनासे १
९०
६० किमखाप जालीबार १ यो
७० पटके ३
२० सफेद करचोबी
२५ गुलाबी १
२५ बदामी १
७०
६० महमुदी करचोबी
२१० इलाचे जरी
७० लाल वेलदार १
१४० सबज वेलदार २
दर ७० यो
२१० ३
४० जामेवार बादली १
५५ जामेवार अनारी सफेद १
२५ छीट भस्मे दर १
६६ धुवट समे
२० तिवटे २
२२ सेले साधे २
२४ हिरवे २
६६ ६
७३६ २०

१८।· हतान्यास तीवट
कसुंबी १

७९४।·

No. 61]

कलगी जडीत हा सवाई जयसिंग पो

७६ हिरकण्या लहान
७ पुक्षराज
४४ माणके लाल
२ लालड्या भोर
७ मोत्ये
१ लोलकपना
१ मदनाईक

सनग सीलेत सोने लालगी
जडीत १ से
सिरपेच जडावाची
८ हिरकण्या मोठे
१० लहान हिरकण्या
१० माणिक
१ मदनाइक पना
१ मोत्ये २ पैकी
सीलकेस हा आपाजी लस्कर
१ लाडी कती पाच

सिरपेच १ यो

नवाब नासरजंग

सनगे यो रुपये

२९ चिरा बादली १
९ गोसपेस १

2449

१० हकबंदी १
४० इलाची जरी १
२५ पटका भारी १
१०६।= जामेवार जोडी १
वजन तोळे ६६।।।.
सनगे २ यो

२११।=

नवरीस

सनगे यो रुपये
१०० जामेवार जोडी बादली
सिलकी १ यो सनगे २
३२८– चादर बादली १
६० किमखाप १
७॥. चोलखण बादली
सनग चिरा ८=
८७॥. चादर कुसुंबी सिलकी
१

५८=

२८७८–

बेगमसाहेब

सनगे यो रुपये
३३ जामेवार बादली १
६० इलाचा जरी १
८० चादर जरी कुसुंबी
१ सिलकी
१० चोलखण बादली यो
चीरी गज २ सनग१।

३१।

१८३

No. 62] [*16-3-1731*

१८ रमजान

भारमल कराले दिा येमाजी वाबले जखमी

[*21-3-1731*

२३ रमजान

८९१॥।= वस्त्रे राजश्री राणा संग्रामासिंह याकडे हस्ते शामराऊ व जैसिंग सकतावद रवाना केली सनगे येकून रुपये

No. 63] [*25-3-1731*

२७ रमजान

किता नजरपटी जमा गाव निाा मानाजी पवार दिा राणोजी सिंदे गांव ताा पाटस रुपये

४०० काा पाटस

१२५ मौजे गार

५२५

[*31-3-1731*

इहिदे सल्लासीन

३ सवाल जमा पोता

५०० कर्ज गुाा सदासिवभट पटवर्धन गुाा आपाजी सोनार

रवासुदगी.

भावसिंगराऊ टोके देणे रोजमुरा चैत्र मास पैकी सदासिवभट पटवर्धन याजकडून देविले कर्ज पैकी रुपये ४००

बाबत ऐवज मिरासपटी व नजरपटी पाटस व गार येथील मानाजी पवार याणे करार केली रुा ५२५ त्या पैकी राणोजी सिंदे याजकडे पेसजी देविले २०० बाकी हल्ली मशारनिल्हेस देविले रुपये ३२५

No. 64] [*16-4-1731*

१९ सवाल

देणे पीलखाना हत्ती फत्तेलस्कर याचा दात कापिला ते समयी सेरणी वाटावयास केली होती ते हली ताा फतु माहात रुा २९

[18-4-1731

२१ सवाल

पथके

३३।= राणोजी सिंदे देणे हत्तीस रतीब गुा महादसेट

[26-4-1731

२९ सवाल

पाा जलगाऊ येथील साल गुदस्ताची मुकाम बाबेची बाकी आहे तो एवज पेशजी वासुदेव जोसी याजकडे देविला होता तो मना करून हल्ली राजश्री तुकोजी पवार व जिवाजी पवार याजकडे देविला असे येविसी देशमुख देशपांडे यास सनद १

[27-4-1731

३० सवाल

मौजे देहू ताा हवेली पाा पुणे दिल्हे अभयपत्र ऐसीजे मौजे मजकूरचे नजरपटीचा पैका घेतला, याजकरिता रयत तजावजा जाली आहे म्हणून हुजूर विदित जाले त्याजवरून हे अभयपत्र सादर केले असे; तरी तुम्ही कोणेवीसी शकअंदेशा न धरिता मामुरी करणे. तुम्हास नजरपटीचा तगादा लागणार नाही. गाव राा उधोवा गोसावी याजकडे दस्त इनाम आहे. सालाबाद गोसावी याकडे वसूल देत असता त्याप्रमाणें देत जाणे तुम्हास तगादा लागणार नाहीं म्हणून पत्र १

No. 65] [1-5-1731

छ ९ जिल्काद

२९०॥. पीलखाना

२० खुदाबकस

१९॥. आलाबक्ष

२१ फत्तेलस्कर

२१ भवानी प्रसाद

२१ गजराज

१४ फत्तेमुबारख

१६ रामबाण

१६ महबूबगंज

१६ अलीमदत
१६ मोती गज
८ तखतगौरी
११ सुंदरी
४ पखाली
२४ बारगीर ६ दर ४
६७ सिलेदार लंपी
७ खंडोजी चौधरी
६० बैल १२ दर ५

६७

२९०॥

[5-5-1731

९ जिल्काद

बाा देणे राा जयसिंग सख्तावत दिमत राजश्री राणा चितोडकर हाा सनद राा हरी मोरेश्वर राजाज्ञा देखील भाट रु.२१०० पैकी व देह रुपये १७०॥= बाकी देणे रुपये १९२९।= पैकी वजा दहक देणे दिमत रुपये १९३ बाकी देणे.

No. 66] [18-7-1731

मोहरम २४

५५ महादाजी अंबाजी मुजुमदार
१० तिवट १
४५ पासोडी पैठणी १
आक १०

५५

[15-8-1730

१२ सफर

राजश्री राणोजी सिंदे दिमत राजश्री चिमणाजी बल्लाळ यासी साल मजकुरी जमावाचे बेगमीस मोकासे दिल्हे ऐवज सरदेशमुखी

१ पाा साखरखेडले
१ पाा चिखली
१ पाा सोवली

३

No. 67] [*6-9-1731*

१५ रबिलावल

सदासीवभट पटवर्धन याजपासून कर्ज घेऊन खत लेहून दिल्हे कीं दरमाहे दरसदे व्याज रुपये २॥· आडीच प्रमाणे केले असे १६५२ साधारणनाम संवछरे भाद्रपद वद्य प्रतिपदा सुरु इहिदे छ १५ रबिलावल रुपये.

२५०००

[*12-9-1731*

२१ रबिलावल

येसवतराऊ भोसले यासी घोडी बक्सीस देऊ केली तिची किमत रुपये २००० दोन हजार, त्यापैकी हल्ली राजश्री अंबाजीपंताकडून हा ऐवज कर्ज गुा सेख मिरा येसवंतराऊ व बसापा पैकी रुपये.

No. 68] [*3-10-1731*

१२ रबिलाखर

रा। हिरोजीराव पाटणकर व द्वारकोजी पाटणकर व राजजी घाटगे याचे कबिले का। सुपे येथे येऊन राहतील त्यास जागा देणे. गढीतील खासा घर मानिलेचे हवाला करणे. कोटातील माणूस जाईल येईल त्यास परवानगी मारनिलेची म्हणोन त्रिंबक हरी यासी पत्र १

[*8-10-1731*

१७ रबिलाखर

खा। मोतियाची जोडी गुा मोरसेटी करजे जोडी २ एकूण रुपये २००

[*9-10-1731*

१८ रबिलाखर

रा। येसवंतराऊ वीरेस्वर सभासद हूजूर होते यास रा। मल्हारजी होळकर याजकडे पाठविले याचे हातून हरएक सेवा घेऊन वेतन रुपये ७०० सातसे पावीत जाणे म्हणून सनद १

No. 69] [*13-10-1731*

२२ रबिलाखर

खासुदगी

राजश्री लक्षुमण खंडागले यासी सनद सादर की संस्थान देवगड येथील सन तिसाच्या ऐवजापैकी बाकी रुपये २६४०० बाकी होते त्यापैकी गोविंद बलाल

याचे मारफतीने रु. ९००० सरकारात सन सलासीनात पावले. बाकी रुपये १७४०० सतरा हजार च्यारसे राहिले आहेत. त्याचे वसुलास हल्ली गोविंद बल्लाल पाठविले आहेत, यांचे पदरी सदरहू ऐवज घालून रवाना करणे. सदरहू ऐवजपैकी गोविंद बलाल यांसी रुपये २०० दोनसे देणे म्हणून सनद सादर केली. १

महमद बोहरी यास हुजरून ऐवज नव हजार देविला, त्याची वरात दिल्ही; त्याच्या वसूलास जासूद म्हसाजी बाबाजी यासी देविले.

९ कृष्णाजी केशव हरसुल सातारे याजकडून देविले.

No. 70] [9-10-1731

रबिलाखर १८

जेजालास टंकणखार गुा आनंदी चौधरी

रु. ·।–

[10-10-1731

रबिलाखर १९

राजश्री आप्पास २ तिवटे रुपये

१६॥– खानदेसी हा बालाजी बाबाजी

१२ राणोजी सिंदे पैकी भेटीचे

२८॥।–

[30-12-1731

छ १ रजब

नवाब अबदूल मंजीखान बंकापूरकर उर्फ सावनुरकर यास पोशाख ४११॥.

ITEM No. 7 : May 1733—Dec. 1733

No. 71] [26-5-1733

छ २२ जिल्हेज अवल साल

सुा आर्बा सलासीन मया व अलफ.

खासगत खर्च विा मातुश्री बाई बाा नारो दादाजीपैकी खाा करून आणिली.

रुपये

४।।।= घोंगड्या ३

८= गवालें १

९

¶*The entries in this section contain references mainly to the domestic life of the Peshwas, the campaign against Janjira, Turuktajkhan's activities, the enlistment of recruits for military service, the movements of Ranoji Sindia, Malharrao Holkar, Tukoji and Jivaji Powar, Antaji Manakeshwar and others. Their doings can therefrom be now fixed in point of time.*

No. 72] [27-5-1733

छ २३ जिल्हेज अवल साल

सोन्याचा दर: १४ रुपये तोळा

कडी तोले:

८२।. [तोले] राजश्री नाना कडी २ याो

१०८।।।. [तोले] राजश्री आपांस कडी २ याो

१९१.

No. 73] [30-5-1733

छ २६ जिल्हेज

सावित्री चवाणीण इचा मर्द गोवलकोटास शामळाकडे आहे. इचा लेक सयाजी विश्वासराऊ सरनाईक किले तलागड, याजकडे चाकर आहे. सबब सावित्रीस जामीन सयाजी मजकूर यास हुजूर घेऊन खंड रुपये २५ पंचवीस करार करून सावित्रीस याचे स्वाधीन केली. सबब सयाजी मजकूर याचे नावे खर्च लिहिणे रुपये २५.

No. 74] [31-5-1733

छ २७ जिल्हेज

जमा कोठी मुाा कोा पुणें बाा गोविंद कृष्ण सालगुांपैकी गुाा सिकनभाई जमेत कालेखान बाा जमा वर्कू कोठी माार दारू लसणाचे पुटाची वजन पक्के

॰२।। बादले चर्मीना ५ दर ॰।।

॰।२।२ थैल्या पोती १५

॰।२ प्राा १४ दर ॰।।

॰।२ प्राा १

॰।२।२

॰।४।।।२

॰।॰ गुाा अर्जोजी नेाा वाल्हेकर कले १० दर ॰।।॰

॰।।४।।।२

2456

No. 75] [31-5-1733

छ २७ जिल्हेज अवल साल

खासुदगी स्वारी रा चिमणाजी बल्लाळ

घोडी नजरेची

७०० घोडा बोर[1] बा फतियापुरखान बा नारायणजी निकम

१००० घोडी बा तुरुकताजखान जेर्दी[2] बा नारायणजी निकम

No. 76] [3-6-1733

छ ३० जिल्हेज

स्वारी राजश्री पंतप्रधान

जमा पोतां बा ऐवज हुजरात राजश्री स्वामींनी राजपुरीचे मसलतेस पंधरा हजार रुपये दिल्हे; त्यांपैकीं रुपये ४००

No. 77] [1-7-1733

छ २९ मोहरम

८= मजुरी देणें पिंजारी राजश्री नानाची न्यांहाली[3] तयार करविली त्यास रसानगी इसमाल फरास

No. 78] [9-7-1733

छ ८ सफर स्वा राजश्री चिमणाजी बलाल सुा आर्बा सलासीन मयां अलफ आषाढ शुध नवमी इंदुवार मो का पुणे

फिरंगी गोलंदाज नवे चाकर छ मजकुरी ठेविले, आसामी २, दर आसामीस दर माहे रुपये ९ प्रमाणे

No. 79] [19-7-1733

तेरीख १८ माहे सफर

संकराजी कदम वस्ती का सुपे याची बटीक मुसलमानासी गेली. त्यास गोतपत करून प्राय:चित घ्यावयाची आज्ञा केली. याजकरितां याचे माथा मेजवानी कुलबाब कुलकानू करार रुपये १००

---

१. काळसर तांबूस रंगाचा. २. पिवळी. ३. लहान गादी.

No. 80] [24-7-1733

तेरीख २३ माहे सफर

रदकर्ज: तुरुकताजखान सालगुदस्तां निजामाचे भेटीचे समई रा पंतप्रधान याणी घेतले होते; त्याचे रदकर्ज गुा बाबूजी नाईक जोसी, रुपये ६०००

No. 81] [2-8-1733

छ २ रबिलावल

खर्च: रुपये

६००० स्वाा राजश्री पंतप्रधान रा राजपुरी ताा लोक किले पुरंधर व वज्रगड

No. 82] [6-8-1733

छ ६ रबिलावल

रा मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे यास पत्र कीं, सालगुा तुमचा व पवाराचा तह करून दिल्हा आहे, त्याप्रोा सालमाारीं करार असे. तरी गुाप्रोंा रा तुकोजी पवार व जिवाजी पवार यांची तहप्रोंा गांव[1] देत जाणें म्हणून पत्र १

No. 83] [20-8-1733

छ २० रबिलावल

अंताजी माणकेस्वर यासी म्हालोजी मुढे याजकडील पागेच्या लिहिण्याचा धंदा होता. त्याचा हिसेब मनास आणून इा सलासीन ताा सन सलास हिसेब फारीक[2] जाला. तुजकडे काही लिगाड नाही म्हणून फारखती लेहून दिल्ही.

No. 84] [21-9-1733

छ २३ रबिलाखर

सिलिकबंद पोतें स्वारी रा पंतप्रधान

२ देणें रामजी जाधव व बडेखान दिा तुरुकताजखान

---

१ ? २ पावता; चुकता.

No. 85] [27-9-1733

छ २९ रबिलाखर

५॥= देणे दुखवटा, बाजी आंगरे याणे सेखोजी आंगरे याची क्रिया केली सबब गुा बाळाजी माहादेऊ: तिवट १

No. 86] [27-10-1733

छ २९ जमादिलावल

सिलकबंद पोते स्वारी रा। चिमणाजी बलाल

६५० देणे वोवाळवाणी सौ अनुबाई मोहरा ५०, दर १३.

No. 87] [18-11-1733

छ २१ जमादिलाखर

खर्च:	रुपये	
	३२	खा। चिनी देणे इंगरेज जनराल मुंबई ता। कृष्णाजी राम साने १ गुा अंताजी रघुनाथ

No. 88] [30-12-1733

छ ४ साबान

आनंदराऊ पंडित सुमंत राजपुरीस गेले त्यास सामान न्यावयासी बैल

ITEM No. 8 : 1734

No. 89] [1-1-1734

छ ६ साबान सुा आर्बा सलासीन मया व अलफ

ता। पौड खोरे येथील पाहाणी करावयास धोंडो विस्वनाथ यास पा। आहेत. यास दरमाहे रुा ५ पांच पावीत जाणें व यांसमागमे मराठे माणूस १ व काठीकर माहार १ येक देऊन याजपासून ता। माची पाहाणी करवणें म्हणोन रा। नारो रामचंद्र यास पत्र १

¶*Many miscellaneous matters of a religious, domestic and social nature are referred to in this section and are certainly of great interest. The movements of several Sardars are also mentioned.*

No. 90] [*5-1-1734*

छ १० साबान

सिलिकबंद पोते स्वारी राजश्री चिमणाजी बलाल

खर्च : रुपये

१० खरेदी बंदुख १

No. 91] [*5-2-1734*

छ ११ रमजान

मातुश्री बाई यास मौजे आंबोसी ताा चोण हा गाव दिल्हा होता. त्यास तो बरा नव्हे याजकरितां मौजे कळल ताा तळोजे हा गाव मुकासा दिल्हा येविसी सनद

No. 92] [*24-4-1734*

छ १ जिल्हेज अखेर साल

दफाते

राजश्री फतेसिंग भोसले याचे खासगत कोठीचे बैल सर २०० मुंबैहून सिसें व जस्त भरून आणतील त्यास जकातीचे दस्तक १

No. 93] [*2-5-1734*

छ ९ जिल्हेज अखेर साल

रु. २३ फिरंगी गोलंदाज जर्दीद ठेविले त्यास रोजमरा वीस रोजा

६॥•
२॥•
३॥• पांच गोलंदाजांचीं नांवें.
५।•
५।•

२३

No. 94] [*3-5-1734*

छ १० जिल्हेज अखेर साल

बाजी सिरके हा कबिला टाकून हबसियाकडे पळोन गेला होता, तो हाली हजीर जाला. त्याचे बाइकोस खंड करार केले, त्याचा हवाला येसवंतराव येरुणकर याणी घेतला. जेष्ट मासीं छ १९ मोहरमी द्यावे बाा कतबा रुपये २९.

No. 95] [8-6-1734

छ १७ मोहरम अवल साल

खर्च पोतांपैकी :

९० नवस श्रीमार्तंड. पागेच्या घोड्या उतम प्रकारे पसवाव्या आणि दर सिंगरास रुा १ प्रो देवास द्यावा. त्यास, प्रस्तुत मोवमच दिल्हे ताा बापूजी श्रीपत हुजूरपागा.

No. 96] [21-9-1734

छ ४ जमादिलौवल

मल्हारजी होलकर याजकडून राजश्रीस द्यावयास चित्ता आणिला.

No. 97] [25-9-1734

छ ८ जमादिलौवल

रोजमरा येकमाहा :

रुा १३, पहेलवान २ (प्रत्येकी रुा ७ व ६)

No. 98] [2-10-1734

छ १५ जमादिलौवल

अनुष्टान खर्च, थेऊरास केले त्यास दक्षणा

२१६ नमस्काराबद्दल

१२० भास्करभट, १२०००० नमस्कार

९६ नारंभट, ९६००० नमस्कार

२१४ प्रदक्षणेबद्दल

५७ अनंतभट, ५७००० प्रदक्षणा

५७ बाळंभट, ५७००० प्रदक्षणा

No. 99] [22-6-1734

मोहरम

छ १ ८००० स्वारी राजश्री पिलाजी जाधवराव पैकीं गुा बाबूजी नाईक जोसी

३००० किा स्वारी राजश्री पिलाजी जाधवराव पैकीं गुा येलहोजी पडवल

[3-7-1734

सफर

छ १२ बाा देणे पागा दिाा राजश्री बालाजी बाजीराऊ कापडाचे खरीदीबदल ताा गोविद हरी रुा २०००
हाा बुदलखंड निाा गोविंद बलाल याणी राजश्री बाबूजी नाो जोसी याजकडे पनास हजाराची हुंडी पाठविली त्या यैवजी देविले.

[31-7-1734

रबिलावल

छ ११ पागा दिाा राजश्री राणोजी भोसले दिाा राजश्री चिमणाजी बलाल यास सालगुााा प्रमाणे वराता

[27-8-1734

रबिलाखर छ ८

मल्हारजी होलकर याजकडील लस्करचे सबनिसीचा धंदा राजश्री आउजी नीलकंठ याजकडे आहे. त्याणी धंद्याचे प्रयोजनास * * पाठविले आहेत. तरी पूर्ववत प्रमाणे धंदा याचे हातून घेऊन बारगीर घोडा व वेतन पूर्ववत प्राों पावऊन चालवत जाणे म्हणून मााारनिलेस पत्र.

राजश्री बालाजी बाजीराव याजकडील पागेची लस्करची जमेनसीचे प्रयोजनास पेशजी बाजीराऊ होते त्यास ते वरी राहिले. हालीं राजश्री आऊजी निलकंठ याणीं * * पाठविले आहेत तरी पूर्ववत प्रमाणें ऐवज पाऊन सर्व प्रकारे चालवणें म्हणून मााारनिलेस पत्र.

No. 100] [7-9-1734

रबिलाखर

छ १९ मल्हारजी होलकर यास पत्र कीं मालवा प्रांतीचे बाबती सरदेशमुखीचा सुभा राजश्री कृष्णाजी हरी यास आहे त्याप्रो साल मजकुरी करार असे त्यास तैनात सालिना रुो २५०० अडीच हजार केले आहेत. त्यापैकीं रुो १२५० राजश्री राणोजी सिंदे याजकडून प्रविष्ट होतात. साडेबारासे तुम्हाकडून पोहचावे. इ.

[11-9-1734

२३ छ

जामदारखान्यापैकी

तश्रिफा खर्च देणे सेटे खंडोजी माणकर याणी शामलाकडील डोकीं कापून पाठविली. त्यास छिटी तिवटे हिरदेनगर पैकीं

१।	मालटकर	१
१।	गिरणेकर	१
२॥.		२

No. 101] [18-9-1734

जमादिलावल खमस सल्लासीन

छ १ लोक दिा होनाजी बलकवडे यांनीं किले बिरवाडीचें मुकामी स्वामीकार्यावर कष्ट मशागत बहूत केली व पुढें करावयाची उमेद धरिताहेत. हे मनास आणून कृपा होऊन सरंजाम दिला असे.

खासुदगी

५ राजश्री आनंदराव पंडित सुमंत यास मोगलाईत दरबार खर्चास सालगुा प्रों माहाल मजकूरचे यैवजी वराता

१२ प्रतापसिंग बुंदीवाले देणें उच्यापत. गुा आनंदी चौधरी रुा २००.

१९ म्हालसाबाई कोम मल्हार रघुनाथ अत्रे याचे वतन जोसीपण व कुलकर्ण मौजे निबगाव ताा खेड प्रांत जुन्नर याणे निमे वतन बाजी येसवत व गगाधर येसवंत उपनाम चंद्रचूड यास कुलकर्ण व जोसीपण निमे खरीदी दिले व निमे कुलकर्ण व निमे जोसपण लक्ष्मण गोविंद उपनाम टल्लू यास दान दिले.

२१ कानोजी माणकर दिमत खंडोजी माणकर हशम हे मर्दाने कामाचे देखोन आफ्तगीर दिल्हे असे. पत्रे.

No. 102] [17-11-1734

रज्जब खमस सल्लासीन

छ १ पिलाजी जाधवराऊ याजकडून स्वारीमध्ये गणेश कृष्ण देवल यासी वाराणसीस जावयासी स्वारीमध्यें रु. २०० देणें.

[17-11-1734

रज्जब

छ १ जामदारखान्यापैकी

उदेसिंगराजे संवस्थान वोडसे	राऊ इंद्रजित राजे संवस्थान दतिये
२९। गणेशपंत. ९ तिवट	
११। पो जालनापुरी	

२ भगवंत विठल दिा उष्ट्रखाना दिा स्वारी राजश्री पिलाजी जाधवराऊ. सेला साधा १ आला ४ यो रुपये

८ रा खंडोजी माणकर यास पत्र की रा होनाजी बलकवडे यांजकडे येसजी करजवणे याचा जमाव आहे त्यालोकांपैकीं चाकरमाने लोकांची सेते ताा घोसाला येथें आहेत.

१९ २००० मानाजी आंगरे पो

१००० लक्ष्मीबाई ताा

१६ मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे यांस सनद कीं सिऊ भारथी वगैरे अतीत यांजपासून राजश्री स्वामीन आंगाटिया घेतल्या त्याचे रुपये दरमाहेचे यैवजी देविले रुपये १०००

१७ ४ येकमाहा रोजमर, जासूद उदाजी पवार

४६ दिा बुंधेले जगतराव

१७ दिा हिरदेसाई

९ स्वार दिा प्रीथीसिंग

१ दिा मेदिनीमल

१८ पिलाजी जाधवराऊ यासी मोकासे उतर प्रांते.

१ पाा पोहरी सरकार नरवर

१ हवेली नरवर

१ सिवपुरी सरकार नरवर

१ पाा कैलास सरकार नरवर

४

१९ रोजमरा एकमाहा

१८२ हबसी.

६० सिदी सात. ४५ सिदी सुलतान

२२ सिदी जोर. ४० सिदी हिलाल

८ सिदी हुसैन. ७ सिदी हुसेन.

छ दफाते

२० पिलाजी जाधवराऊ यास सनद की रुा बहिरो पिलदेऊ मजमदार दिा संभाजी भोसले यांस स्वारीमध्ये देऊन पावलियाचे कबज घेणें म्हणून पत्र. रुपये ५००

No. 103] [*6-12-1734*

रज्जब खमस सल्लासीन

२० मेहमान लोक दिमत बाजी भिवराऊ. (सनगे दिली. मातुश्री लेक, नातु)

दिा सरखेली संभाजी आंगरे. (तिवट वगैरे).

२४ माहाराज राजश्री संभाजी राजे दिल्हे हा बालाजी माहादेव ११०. संभाजी राजे (५० मंदिल, ६० चादर) पातल चांदणी २०२॥ राजसबाई. (पातल चांदणी, १७५ चोलखण २॥ १२१॥ जिजाऊबाई किमखाप २५). (७५ शालु, १॥ खण, ४५ किमखाप).

देणे देहनगी मल्हारजी सिंदा (शाल्ल, गजना)

२८ बा भेट नवाब निजामनमुलुख हा कृस्णराऊ

१० चीरा मुकसी. ३५ महमुदिया, १५ खिरमा, १५ पटका

[*17-12-1734*

साबान जामदारखानापैकीं

२ आनंदराऊ सोमवंसी सरलस्कर

२३॥ तिवटें

२० सेला अष्टगोली

[*10-1-1735*

२६ संकराजी केशव कमाविसदार नारायणगाव तिवटे

श्री परमहंस बावा

७५ दुतु किमखापी

१॥ छाटी पासोडीं

।– खादी पासोडी

[11-1-1735

२७ राणोजी पाटीलराजे वाफगाऊ

श्रीनगरचा राजा प्रदीपसिंग बराबर बसवंतराऊ

६० मंदील चांदणी

१९ पटका

६० जामेवार

[26-4-1735

जिल्हेज जमा

छ १३ २०३७ बद्दल यैवज निा मल्हारजी होळकर प्रा इंदोर गुा बाबूजी नाईक जोसी हुंड्या सातारियाच्या आल्या होत्या त्या सातारियास पाठऊन दरमाहेस देविलें आणि दरमाहेचे यैवजी घेतले. बाा सरदेशमुखी प्रा खानदेश निा आऊजी कवडे हवाला सदासिव भट पटवर्धन पो १२९० गुा आपाजीपंत

७८७ गुा दादाजी

१८ खासुदगी

हाा मुा सूर्याजी पवार हशम

रुपये ३०

रामजी पवार यासी शामलानें धरून नेऊन भ्रष्टविले तेथून पळोन आला. त्यास येथाशास्त्र प्रायेश्चित देविले आणि खंड बाधला ते त्यास देविले.

ITEM No. 9: 1735—1737

No. 104] [15-1-1735

छ १ रमजान सुा खमस सलासीन

मया व अलफ

स्वारी राजश्री पंतप्रधान खर्च पोतांपौ

देणे वस्त्रें बिदनुरकर वकील यास सनगे खानगीची, नरसिंगराऊ व लक्षुमणपंत वगैरे माणसे

¶*The items mentioned in this list illustrate Shahu's religious and domestic life. The names of certain ladies of Shahu's family are a new item of information. Certain historical characters also make their appearance in these notes.*

No. 105] [21-1-1735

छ ७ रमजान

स्वारी रा। पिलाजी जाधवरात्र दि॥ पंतप्रधान

देणे इनाम, कासीद सरकारचे मोगलाचे लस्करचें वर्तमान घेऊन आले सबब तिवटे २.

No. 106] [22-3-1735

छ ८ जिलकाद

खर्च

३३०॥. किले राजमाचीचे देवास मुखवटे केले त्यास

No. 107] [8-4-1735

छ २९ जिलकाद सु॥ खमस सलासीन मया व अलफ

रोजमरा येकमहा:—

हरकारा,	रु.	३ ते ४
पावलोक,	रु.	३ ते ६
जासूद,	रु.	४ ते ९
फरास,	रु.	३ ते ४
चोपदार,	रु.	३ ते ६
सिंपी,	रु.	४
परीट,	रु.	९॥
दिवट्या,	रु.	३ ते ९
रखतवान,	रु.	४
हलालखोर	रु.	९
नाहावी	रु.	४ ते ९

No. 108] [10-4-1735

छ २७ जिलकाद सु॥ खमस सलासीन मया व अलफ

२९० खरिदीखर्च: खा॥ यंत्र तास गु॥ मिस्त्र इंचबर्ड इंग्रेज मुंबईकर रास १

No. 109] [3-5-1735

छ २० जिल्हेज सुाा खमस सलासीन मया व अलफ

रंगरेजास मजुरी

७॥. तिवटें ९ रंगविली त्यास

.॥. मेणकापडे ४ करविली त्यास

८

No. 110] [12-10-1735

सीत सलासीन मया व अलफ

छ ४ राा‍खर खर्च

जामदारखानापैकीं

वस्त्रें दिाा आवजी कवडे

७१४८= खासा [तपशील]

२९॥ श्रीधर गोविंद मजमदार [तपशील]

७॥= बाजी येसवंत फडनीस, तिवट १

२८॥ राघो दामोदर [तपशील]

२४।॥= त्रिंबक अनंत [तपशील]

७॥= धोंडो मल्हार चिटनीस [तपशील]

६।= वेंकाजीपंत, तिवट १

४॥ जगोबा, तिवट १

६।॥ माहरचे चिटनीस ताा अमृतराव, तिवट

[20-8-1735

छ १२ राा‍खर

जामदारखानापैकीं

वस्त्रें दिाा त्रिंबकराऊ विस्वनाथ सुभेदार बाबती

प्रांा खानदेश

2468

[30-3-1736

छ २७ जिलकाद

जामदारखानापैकी

हुजरात खर्च सनगे

तेरीज

५३३।॥	राजश्री स्वामी	१२॥	४३।॥	सौ गोडूबाई	२॥
४७४।॥	सौ विरूबाई	७	७१॥≡	सौ बच्याबाई	२॥
१८२॥	सौ सकारबाई	२॥			
१६२।	सौ सगुणाबाई	२॥	११६१७८≡		३४॥
८४।॥	सौ राजसबाई	२॥			
६३।॥	सौ अहिल्याबाई	२॥			

No. 111] [18-10-1735

छ १२ जाखर

सीत सलासीन मया व अलफ

दफाते पत्रें

गोविंद बलाल मुा रहिली यासी पालकी दिल्ही. राजश्री पिलाजी जाधवराऊ यासी पत्र लेहून दिल्हे की तुम्ही त्या प्रांते जाल तेव्हा पालकी व वस्त्रे देणे. पालकीच्या खर्चास सालिना मोईन बुंदलखंडच्या यैवजपैकी रुपये ७५०

साडे सातशे नेमणूक करून देणे म्हणून सुभेदारास पत्र

सीत सलासीन मया व अलफ

जामदारखाना

[1735-36

व्रतबंध मुंज खर्च

लोक सासवडकर तिवटे

७॥ रामचद्र नारायेण

७॥= सखाराम भगवंत

किले पुरंधरकरी तिवटे

६८= गणेशपंत सरनाईक

६८= अंताजी सामराज सबनीस

संभाजी जगथाप सोन

ठाकुराचे पुत्र

No. 112] [15-12-1735

छ ११ साबान

नाईकजी कडू रुस्तुमराऊ बाहादूर दिा राजश्री त्रिबकराऊ सोमवंसी सरलस्कर यांचे खासगत बैल देसांत व कोकणांत जाऊन हरयेक जागा जाऊन गला नायेगावास आणतील त्यास जकातीचे दस्तक बैल सर

९०

[19-12-1735

छ १९ साबान

आवजी कवडे यांचे कोठीचे बैल कोकणांतून मीठ भरून जातील ; तिकडून गला भरून मौजे कोलवली कर्यात सासवड येथें येतील ; त्यास जातां येतां दस्तक बैल सर

२००

माहादजी थोरात हवालदार व कारकून किले मजकूर (पुरंधर) यांस

[23-1-1736

छ २० रमजान

राजश्री स्वामीची स्वारी जेजुरीस जाली त्यास स्वारी खर्च कसबे सासवड-पैकी जाला तो निा नारो दादाजी पौ

[31-1-1736

छ २८ रमजान

इमारत कुसू गावचे काा पुणें देणे बेलदार माहालुंगेकर निा गोपाल नाईक ताा जिवाजी गणेश

१००

जकाता प्रांा पुणे व प्राा जुंनर निा त्रिंबक लक्ष्मणपैकी देविले.

No. 113] [24-2-1736

छ २२ सवाल

खासुदगी

राजश्री स्वामीची स्वारी जेजुरीस जाली होती, त्याबदल गावगावचे वेठे आणिले होते, त्यापैकी सिवापूरचे मुकामी न पुसता पलोन गेले, त्यास हुजूर आणावयासी पाठविले त्यास मसाला देविला.

2470

[4-3-1736

छ १ जिलकाद

यासी ऐवज

२०२९।।।– बाा ऐवज स्वारी राजश्री पिलाजी जाधवराव याणी सन खमसामध्यें स्वारीस गेले तेसमई सोंटें कनडगड निा प्रीतीसिंग राजे याजकडे नजरेचे रुपये २९०० करार केले त्यापैकीं हुडी बुऱ्हाणपुरास आली रुपये २०७३।।–।। पैकी कुसाजी गणेश यांणी खर्चास घेतले. रुा ३३।।–।। बाकी धोंडो माहादव याजकडे जमा रुा २०४० पैकी वजा

१०८≡ हुंडणावली दरसदे रुा ·।।·।।· प्रो

४ अजुरा

१४८≡

बाकी रुपेयाचा हवाला मारनिलेवर आला छ १३ रमजानी ते देविले.

७००० स्वारी राजश्री राऊ याणी खंडणी इंदूर व जेपालपूरकर याजकडे नजरेचा ऐवज करार केला त्यापैकी (वगैरे)

No. 114] [8-3-1736

छ ९ जिलकाद

रवासुदगी

माहादाजी अंबाजी मातुश्रीबाईसमागमे गेले आहेत त्याचे घरचे बेगमीस देविले रुा [तपशील]

[12-4-1736

छ ११ जिल्हेज

रवासुदगी

फेरू घनशाम दत्त ब्राह्मण वास्तव्य कुरुक्षेत्र यासी तीर्थउपाध्यपण कैलासवासी तीर्थरूप राजश्री नाना यांणी दिल्हे त्याप्रमाणे करार असे. तीर्थरूपाचे पत्रापूर्वी जर कोणी दिल्हे असिले तरी हें पत्र रद असे म्हणून पत्र १

No. 115] [6-4-1736

छ ९ माहे मोहरम

६८३३८÷ जमा छ मजकुरी स्वारी इचलकरजी बा। रा। रामचद्र हरी रुपये
[यापुढें तपशील]

[16-9-1736

छ २१ जाावल

इमारतखर्च तले श्री भिमाशंकर देणे बेलदारास तिवटे २

[29-7-1736

छ १ राखर

११।।।≈ देणे त्रिंबकराऊ ढमढेरे यास कृष्णाजी दाभाडे याची कन्या केली त्यास मागणीबद्दल मोहर

[31-7-1736

छ ३ राखर

कडी सोनेयाची

११६१७।– दिा राजश्री मल्हारजी होलकर बक्षीस कडी सोने
६५० खासा कडी २ येकून मोहरा
५० दर १३ प्रो

वजन तो ४५।१
२८४।= विठोजी बुले कडे १ वजन
तोले २१।।।१।। दर १३
२१४।। संताजी वाग कडे १ वजन
तोले १६।। दर १३
२२२८÷ भोजराज बारगल कडे १ वजन
तोले १७८१ दर १३ प्रो
२४६।= खंडेराव होलकर कडे वजन १७।।=
दर १३।।।·
कडी वजन
६ ११८।।२।।

११६१७।

No. 116] [17-12-1736

छ २४ साबान सबा सलासीन

दिा सुलतानजी घाटगे मानाजी घाटगे सिलेदार साल गुाा सिदीसात याचे युध्यात गोली लागोन घोडा जाया जाला याजकरिता जर्दा घोडा दिल्हा.

[21-12-1736

छ २८ साबान

वस्त्रे रवाना परदरबार मोगलाई रवाना अरकाट बराबर रा वेंकाजी सिवदेव वकील

रुपये	
७३०	खासा अलिदोस्तखान वस्त्रे
४६९	सफदर अलीखान
४१८	बाकर अलीखान
३२३	चंदासाहेब
१७९	खुबचंद
११७॥–	गुलाम हुसेनखान
२००॥।	मुर्तिजाखान
१३९॥।	हिरासतखान
१८२।	हसन अलीखान
२२२॥।	महमद अलीखान
१६४	गुलाम इमाम हुसेनखान
९८	सांतीदास
२४६।=	सिदी जोहारखान
१४४॥=	वेंकटराव आरणीकर
७७॥	नरसिंगराव कानगो
६२॥।	लक्ष्मणराऊ
१८६०=	ताहिरखानाचा पुत्र अहमदखान
१३९	वरदमूर्ती नायडू
१११।=	रामराऊ दिवाण दिाा चंदासाहेब
३२॥।=	श्रीनिवास राऊ
२०१।	बाढे साहेब
२०१०=	कादर हुसेनखान

No. 117]

श्री

रवाना कड्पे बराबर राजश्री श्रीपत विठल

४९४।·	खासा अबदुल महमदखान
२१९	अबदुल कादरखान गंजीकोटेकर
२२४	अबदुल सलामखान
२६८।·	अबदुल महमद हसनखान
२९६॥=	दिवाण कृष्णराऊ
१७६॥=	अबदुल मजीजखान
२१३।=	अबदुल हुसेनखान
२३६	महमद हुसेनखान
९६	सिवराव
२०४॥=	श्रीनिवासराऊ
४७॥=	सिवाजी शंकर
६१॥=	अबदुल कादरखान
६९।·	इनायतखान महमद
९७॥=	इभराम खान
१६४॥·	अबदुल महमदखान
४९	सिलिमखान हुसेनजी
३६।।।·	शंकराजी राम
४८	गोपाळराऊ
२६०।।।·	वेंकटराम राज पालेगर रायदुर्ग
२८॥≡	मुरादखान

No. 118] [8-3-1737

छ १६ जिलकाद सबा सलासीन

तीर्थरूप राजश्री राऊ यांणी बाज दोन व कुत्रा येक राणोजी भोइटा जासूद याजबराबर राजश्री स्वामीकारणे पाटविली.

[19-3-1737

छ २७ जिलकाद

बालाजी सोनदेव कमाविसदार जकात बंदर रोहे यांस पत्र कीं पहिला मिठास पाड दर खंडीस रुपये ९। होते. त्यापैकी रेवदंडे येथे लेहून

॥· रुपये कमी केला बाकी रुपये ८॥· पाड पडला आहे म्हणोन लिहिले, त्यावरून सदरहू प्रमाणे करार केले असे वाण्यास कौल देऊन आमदरफ्ती चालते करणे म्हणोन पत्र १

No. 119] [26-4-1737

छ ६ मोहरम

निा संकराजी केशव जखमी लोकास व ठार झाले त्यास

१८६ निा होनाजी बालकवडे

३७ जखमी असामी

४ ठार पडिले

३९१ दिा खंडोजी माणकर

७४ जखमी

८ ठार पडिले

२० दिा रामाजी माहादेव

आसामी ३ जखमी

सुभानजी भिंगारा दिा सेब्याजी खीरसागर खासबारदार बेलापुरी गोल्याने जखमी जाला होता तो मृत्यु पावला, त्यास सेला साधा १

[27-4-1737

छ ७ मोहरम

१९ बेलापुर घेतले म्हणोन खबर घेऊन आले त्यास इनाम बक्षीस तिवटे हशाम ३

[13-5-1737

छ २३ मोहरम साल सबा सलासीन स्वारी बाजीराव प्रांत खानदेश व हिंदुस्तान

छ २४ मोहरम मुक्काम प्रांत माळवा

[17-5-1737

छ २७ मोहरम

बाबूखान दिा नारो बाबाजी यांस बक्षीस ठाणे साष्टी घेतली तेव्हां रात्रीस ठाणे-यांत आले सबब

No. 120] [3-6-1738

तिस्सा सल्लासीन

सफर छ २९.

इस्तांद ता। बापूजी नारायण जमा

दागिने सुमार

१९८७	लोखंडी दागिने	१२	दिवेलावणी
३०३	कुराडी	३	वजने—१अदसेर
३९९	कुदल्या		२ दोनसेरी
२९९	खोरी	०	साडेतीनसेरी
८२	पाहरा	१	पावणे चौसेरी
२५२	कोइते	९३	खिले
११३	बाट (?)	९	सुन्या
९६	जंजिऱ्या	५	मात्याच्या नल्या
१०	घण	०	नली बंदुखेची
१७	हातवड्या	१	पाहार तोफेची
३	सांडस	२	गोले तोफाचे
१	ऐरण		
		१०	बुदले चर्मी
		१३	गाड्या

¶*The years 1738-40 are of great historical importance and the various miscellaneous entries brought together in these papers yield items of useful information.*

No. 121]

तिसा सल्लासीन

सफर २९

धमधमावरी सामान होते ते जमा कोठी व वसई

गुा। सदाशिव कानो जमेनिस.

किता.		किता.	
१४२	गोलें	१९	लोखडी दागिने
६०	गरनाला	४	कवले
१३४	हुके	२	बाण फुलका
७९४३	गोलिया	१	पटी लोखडी
५४३	जेजाली	२	तोफेचे तुकडे
७४००	बंदुखे	४	खिले तख्तपोसी

१३ दगडी गोळे
दारु वजन पक्के
।।।=।।

२ पाहारा
४२ थैल्या खाद्या
१३० थैलिया भाडियाच्या
६७ कातडी
४० केले रिकामे (?)
५ बादले
२० डोलच्या
२ बादल लाहाना
४ लाकडी संदुका फुडक्या
५६ मडकी कुंभारकाम
३० सुत गुडी
१०० पाव्या
१० खोरे
२० तटे

बरवाजी पाटील याणी कल्याणाहून गोळे हुजूर वसईचे मुकामी पा बा पत्र.

१०० पुण्याहून आले त्याचे कल्याणामध्यें वजन केले.

११५ जुनराहून दोन खंडी लोखंड कल्याणास आले होते त्याचे रवानगी खंडो माणकर

No. 122]

तिसा सल्लासीन

सफर २५

जमा निा शंकराजी केशव नामजाद वसई धोंडो केशव याजकडे सिलकेची दारु व गोळी राहिली ती हवाली केली. बा कबजे कमाविस

जमा कोट माहिम हा चिठी बालाजी चंदराऊ दारुवजन पक्के ८१ गोळी बंदुखीच्या सुमार २२५.

जमा कोट केळवे हा चिठी माधवराऊ खोपकर गोळ्या बंदुखीच्या सुमार १३००

स्वारी राजश्री पंतप्रधान
जमा निा शंकराजी केशव
येकूण रुपये

प्रा वसई खर्च
पागा हुजूर दाणा

६। स्वारी विद्यमान मातुश्रीबाई आगासीस गेली ते समई घोड्यास दाणा
६ उडीद ·।· मिरी

५।।। स्वारी श्रीमंत राजश्री स्वामी अरनालेयास गेले ते समई घोडे
बरोबर ९ यासी दाणा

छ १९ सफर गुा कृष्णाजी पांडुरंग होमशांती व पूर्णाहुति खर्च रुपये
३७।=॥

सफर २९. रवासुदगी जमा निा शंकराजी केशव

वसई फते जालियावरी निशाण चढले त्यास खर्च रुपये

२७।=।।। छ २९ च्या पुजेस सामान वगैरे

१९ बकरी ६ दर २॥

७।।।= कणिक

४॥.।।। किरकोल नारल सेंदूर पाने अबीर बुका

२।= छ १७ रो झेंडा करावयासी खादिया १० खाद्या रंगाईबद्दल खर्च

२ गेरु वजन पके ८८९

।÷ तेल वजन

No. 123] [6-8-1738

जमादिलोवल

तिसा सल्लासीन

तेरीख १

९००० जमा स्वाा राजश्री बालाजी बाजीराऊ मुा सातारा हुंडिया रवाना हाा बाजी डोका व शाहाजी वागचवरा जासूद त्र्यंबकजी नाईक हुंडिया ६ येकूण रुपये

२५०० माणकोबा नाो पाठक १

२००० रामाजी नाईक अनगल १

२५०० विठोबा नाईक रत्नपारखी १

५०० तोरापा नाईक अनगल १

५०० विसोबा नाईक कानडे १

१००० कृस्णाजी नाईक जोसी १

No. 124] [7-8-1738

जमादिलावेल तिसा सल्लासीन

छ २

सोडखर्च खंडेराव सितोले देशमुख प्रां पुणें याची कन्या राजश्री सेखोजी आंगरे यास दिली ते समई लग्नाचे साहित्यास कापड व नख्त व जिनस कर्ज दिल्हे. रुा १३६२ पैकी सन सीतांमध्यें वसूल आले रुपये ३०० व सालमारी वसूल आले रुा ७०० येकून येक हजार वसूल आले बाकी सोडले.

रुपये ३६२

No. 125] [12-8-1738

तिसा सल्लासीन

छ ७ जमादिलावल पोतांपैकीं

३६ धर्मादाय अनुष्टान राजश्री आपास बरें वाटत नवते, याजकरितां जप करविला होता, त्याची दक्षणा

३० मंगलाचा जप
१००००० यैन जप
२०००० होमाचा
———
१२०००० दर हजारी रुा ।· प्रो
३ सूर्याचा जप १२०००
३ केतूचा जप १२०००
——
३६

ताा कृस्णंभट करवे

No. 126] [13-8-1738

छ ८ जमादिलावल

तिसा सल्लासीन

दफाते पत्रें

कृष्णाजी नाईक जोसी यास खत लेहून दिल्हें की तुम्हापासून कर्ज घेतले मुदल ४०००० चालिस हजार यास व्याज दरमाहे दरसदे रुा १॥ दीडप्रमाणे बिनसूट करार केले असे. येका वर्षापावते करून शके १६६० कालयुक्त नाम संवत्सरे भाद्रपद शुध १ प्रतिपदा छ २९ राखर खत दिल्हे.

No. 127] [*8-9-1738*

छ ४ जमादिलाखर

तिसा सल्लासीन

७५ कमाविस निा माहाजन श्रीवर्धनकर याची माणसे शामलानें धरून नेलीं होती ते सोडून आणविली, त्याजकडे करार केले ते हा बाकी सालगुा गंगाधर नारायण छ २४ जावल

५० बहिरो नारायण

२५ बहिरो माहादेव

No. 128] [*15-9-1738*

छ ११ जमादिलाखर

तिसा सल्लासीन

३०० कमावीस हा आवजी काकाजी वस्ती मौजे आणे ताा बेल्हे प्राा जुनर याजवर संताजी जाधव व सटवोजी जाधव मौजे मजकूर याणी बालंटे घेऊन अकरासे रुपयाचे खत घेतले, त्यास तहकीकामुले तें लटके जाले. कागद जाधव याजपासून घेऊन आवजी मजकुराचे हवाली केले. त्याजकडे सदरहू रुपये करार केले ते जमा गुा नारो बाबाजी नजर जमा.

No. 129] [*29-9-1738*

छ २५ जमादिलाखर

तिसा सल्लासीन

दफाते पत्रें

दिा अंताजी माणकेस्वर सिलेदार तुमच्या सरदारीच्या लिहिण्याची असामी रामाजी सखदेव यांस सांगोन पाठविले आहेत. यांस सालीना वेतन करार केले रुपये २५०.

माहाराव कोठेवाले यांजकडे सालगुदस्ताची खंडणी पैकी मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे व पवार यास दोन लक्ष रुपये देविले आहेत, त्याची त्याणी निशा करून मुदत केली, त्यास मुदत होऊन गेली, रुपये पाठविले नाही. हाली सदरहूची वरात पेशजी रुपये १९७५०० दिली आहे. त्याप्राा यैवज अविलंबे पाटलाकडे येऊन पावे ते करणे म्हणोन सदासिव बल्लाळ यांस पत्र १

No. 130] [*30-9-1738*

छ २६ जाखर

तिसा सलासीन

जमा स्वा। राजश्री बाळाजी बाजीराऊ हा। यैवज पा। जैनाबाद नि। यादव त्रिंबक सालमजकूरची रसद हवाला बाबूजी ना। वोंकार रुपये ८२००० पैकी मारनिलेनी रा। कृष्णाजी ना। जोसी यावर हुंडी दिली १०००० रुपये.

[*2-10-1738*

छ २८ जमादिलाखर

दि। व्यकटराऊ नारायण पथक याणी वसईहून येतेसमई संकराजी केशव याजपासून उसने रुपये घेतले होते ते त्याचे नावे खर्च लिहिणे म्हणोन संकराजी केशव यासी लिहिले आहे. रुपये

३०० सनसमानांत छ २९ मोहरम

११७१॥≥ सन तिसा

No. 131] [*4-4-1739*

मोहरम ६

तिसा सल्लासीन

पा। वोडसे व पा। दतिया याकडे सालगुदस्तांची बाकी राहिली होती ते मुदतीस दिल्ही नाही या करितां व्याज करार करून कतबे लिहून घेतले.

वोडसे बाकी ११४५०० याचे व्याज झा।

५५०० कित्ता पनास हजार रुा। झा। आषाढ शुध ८ ता। पौश शुध ८ माहे ७ पैकी वजा माहे १॥ बाकी माहे ५॥ येकूण दरसदे २ प्रा।

१४१९० किता व्याज रुपये ६४५०० यासी व्याज झा। आषाढ शुा। ८ ता। आषाढ शुध ८ माहे १३

पा। दतिया बाकी रुपये १४७८१ यासी व्याज झा। आषाढ शुध ८ ता। आषाढ शुा। ८ सन अर्बैन मुा। माहे १३ पौ। वजा माहे २ बाकी माहे ११ (१ मुदतीचा माहे १ बारोत्र्याचा) दरमाहे दरसदे रुा। २ प्रा। व्याज रुपये २८८१.

[17-4-1739

मोहरम १९

पा। बोडवड येथील मोगलाईचा अमल जप्त करविला. तेथील सिबंदीस दरमाहे करार केले मोगलाईचे ऐवजी रुपये.

[ह्या महिन्यात मोगलाईच्या अंमलाची जप्तीसंबंधीं पुष्कळ ठिकाणी नोंदी आल्या आहेत. मोंगलाच्या गर्दीमुळे झालेल्या ठिकठिकाणच्या जप्ती उठविलेल्या आहेत.]

[18-4-1739

तेरीख २०

महमद मीरखान याची सालगुदस्ता निजामनमुलुख याचे युद्धांत भूपालचे मुकामी घोडी पडली त्याची किमत रुपये ५०० (पोटांत तपशील).

No. 132] [17-4-1739

मोहरम १९

तिसा सलासीन

जमा

४२७०१॥। बा। यैवज प्रांत माळवा नि।। मल्हारजी होळकर राणोजी सिंदे पैकी बा। यैवज पा। भुपाल मा। लक्ष्मण शंकर याणीं यैवज जैनाबादेस रवाना केले. रुपये ६९८८४॥। त्यापैकीं मु।। बाबुराव रामचंद्र रु।। ४२८७ पैकी वजा

१७९ खोटे

९० ताब्याचे सिशाचे

१२९ हिणाचे

१७९

२ नुकसान

बाकी यैन खरे सालमजकूरचे यैवज मक्तापैकीं

तेरीख २०

नारायण जितेंद्र यास किले कावनई व किले अलंग येथील जागिरी गावची मजमु पेस्तर सालापासून सांगितली. याजपासून मजमूची सेवा घेऊन वेतन सालीना रुपये ५० पनास करार केले असेत, पावते करणे म्हणून हरी कृष्ण यास पत्र.

२१ खासुदगी

अंतोन गोलंदाज फिरंगी जदीद हशम वसईहून पलोन आला त्यास संकराजी केशव याजकडून पावले असे. रुपये २

No. 133] [23-4-1739

मोहरम २९

तिसा सल्लासीन.

मोरोजी सिंदे प्रात तारापूर (रुजू प्रां डाहाणु)

यांस पत्रें कीं

सुरतेकडील तावडा हाणोन नारगोलच्या बंदरी आणिला. त्याजवळ तीस चालीस खंडी भात आहे. मोजदाद करून लेहून पाठवितो व भात भिजले आहे ते रयेतीस तगाई देविले. जाहाजाची सिडे दोन व अवदाने दोरडी दोन व लोखंडी लोहली येक येणप्रा कोठीस जमा करून ठेविले म्हणोन लिा हे कलले. उतम गोष्टी केली. तावडा सापडला. त्याचा धणी तीनसे रुपये देतो. त्यास तावडा सोडावयाची आज्ञा म्हणोन त्यास पाचसे रुपये घेऊन साडणे. चालीस पनास रुपये करून चालणे म्हणोन पत्र १

दवणेनजीक आंबेवाडी आहे तेथील कपितान म्हणतो की दोन हजार रुपये घेऊन आपले वाटेस तूर्त न जाणे. या प्रांते स्वारी होईल, आपण जागा देईन म्हणोन त्याची बोली तुम्ही लिहून पाठविली तर दोन हजार रुपये तूर्त घेणे आणि त्याचे वाटेस न जाणे म्हणोन पत्र १

No. 134] [1-7-1739

रबिलाखर

तेरीख ९

खेरात खर्च देणे पाद्री फिरंगी वसई यास सालिना मोईन रा संकराजी केशव नामजाद प्रां वसई याजकडून देविले.

[19-7-1739

तेरीख २३

दिा संकराजी केशव नामजाद प्राा वसई देणे राजश्री जिवाजीराऊ विचारे याणी राजश्री शंकराजी केशव याजवल फिर्गाण प्रांते येकनिष्ठ शेवा (केली.) त्यावरून माारनिलेनी जंजिरे अरनाला येथे जिवाजीराऊ यास दर गलबतास सेलका मासा १ व दर डोलीस सेलका मासा १ येक येणेप्राा वतन करार करून दिल्हे आण हुजूर विदित केले, त्यावरून कृपाळू होऊन सदरहूप्रो वतन करार करून दिल्हे असे. वौशंपरंपरेने अनभवीत जाणे म्हणून माारनिलेस सनद १

दिा संकराजी केसव नाा प्राा वसई देणे जंजिरे अर्नाला येथील सरजामी पत्र संकराजी केशव यांचे नावे लेहून दिल्हे.

तैवज चांदरातीस दरमाहे मोईन

पाने सुमार	सुपारी वजन पके
८०००	००२

आठ हजार पाने दोन सेर सुपारी याप्राा देणे कलम १

इमारतीस व ज्याहाजातीस सामान सरंजाम लागेल तो मनास आणून वरचेवर पोहचावीत जाणे कलम १

जत्रा साल दरसाल करावी लागत्ये त्यास सामान मोईन

तांदूल सडीक सुमारी

कैली ०१		१	टोणगा
वजन कचे		९	बकरी
००॥	सेदूर	१०	कोंबडी
००३	तेल	२९	नारल
००१	सुपारी	५००	पानें वेलीची
००४॥		५४१	

कलम १

साहुकारी गलबते तराडी येतील त्यास खुटावण सिरस्तेप्रो जंजिरे माारी घेणे तेच तराडे बलेजेचे बदरास गेले तर तेथे खुटावण न घ्यावी. कलम १

शाकाराचे सामान चैत्र मासी जंजिरे मजकुरी पावते करणे. कलम १

दरवाजेयास तेल ०००९ प्राा पावत आहे कचे हाली करार दरवाजे २ दोन येकूण दरवाजेयास दररोज वजन कचे ००। प्राा वजन कचे ००॥ आदसेर प्राा करार केले आले. कलम १

चादरातीस तोफेचा बार येक करीम जाणे दरमाहा. कलम १

No. 135]

लोकांचे दिवटियासी तेलाचे यैवजी पैका पावतो तो न देणे आणि दर रोज दरदिवसास टकबदी वजन ८८|. पावसेर प्राा देत जाणे. कलम १

पोस्त दरमाहे सरा माडी मोईन करून द्यावी म्हणौन विनंती केली, त्यास मनास आणून काम पाहून ज्या दिवसी जे कामावर असतील त्यास अगर येकाधे काम स्वारीसिकारी करून येतील. त्यास माहिना पंधरा दिवसी मण दोन मण सरा माडी मनास आणून देत जाणे. कलम १

जंजिराचे कोली मासली मारितील त्याजवर अमलदारास काइदा करून द्यावा म्हणौन लिाा त्यास डोलीस बालदी अर्धी बालदी मासली घेऊन त्याप्राो काही अमलदारास देणे. काही बंदीवानास व बटकी कोठीस असतील त्यास देणे. कलम १

इमारतीचे कामावर माणूस दुखवले; त्यास हलका जखमी असिला तर त्यास तूप पावसेर आदसेर वजन कचे पावेतो देणे. भारी हातपाये दुखवला माणूस जाया जाले तर जखम पाहून रुपया दोन प्राा मनास आणून देणे. कलम १

बकरी कोबडी दसरियाची देवस्थाने व दरवाजे व तोफास द्यावयाची ते मनास आणून देत जाणे. लोक बाा खुाा घेतील तर देणे; नाहीतर न देणे. कलम १

आंबे फणस मासली हंगामसीर वर्षात येक दोन वेला पाठवीत जाणे. कलम १

जे लोक इमारतीवर खपतील त्यास दररोज दर आसामीस वजन पके

८८८१ तबाकू

८८८१ सुपारी

८८८१ भांग

८८८३

तीन टाक प्राा हजिरी मनास आणून देणे. कलम १

2485

No. 136]

वतनदार जंजिरे मजकूरचे कोली आहेत ते मासली मारितील, त्यास महसूल माफ करावा म्हणौन त्यावरून मनास आणून महसूल सालिना आकार होईल त्यापैकी निम माफ करणे, निमे वसूल घेणे. कलम

१

पंधरा कलमे करार केली आहेत. सनद १

बाजी बेलोसे यास अरमाराचा सरसुभा सांगितला आहे तर तुम्ही अरमारची संचणी करून दर्यामध्ये स्वारीसिकारी करून इमानेइतबारे वर्तत जाणे म्हणून मारनिाास पत्र १

No. 137] [1-10-1739

राजमंडळ रोजकीर्द

स्वारी राजश्री पंतप्रधान सुाा आर्बैन

रजब—आस्वीन

खर्च रुपये

४० रामशास्त्री रोजमरा येकमाहा

आश्रित

[5-6-1739

तेरीख ९ दफातेपत्रें

बावाजी येसाजी प्रभू यास चल जाला होता त्यामुले हरयेक जागा अन बेवार केला. त्यास हाली चल गेला, प्रायेश्चित द्यावे म्हणौन हुजूर विदित केले. त्यावरून श्रीभीमाशंकरास पाठविला. यास प्रायश्चित देऊन पंगतीपावन करणे म्हणौन श्रीच्या स्थलच्या ब्राह्मणास पत्र दिल्हे १.

No. 138] [27-10-1739

राजमंडळ रोजकीर्दी

माहे साबान—कार्तिक सुाा आर्बैन [मया व अलफ]

तेरीख ५

खासुदगी

द्वारकाबाई आई वाराणसीमध्यें आहे तीस प्राा बुधलखंड निाा दिनानाथ वैजनाथ दिाा बाबूजी नाईक जोसी यांजकडून भयाजी नाईक याजवल देविले. रुाा १५० दीडसे देविले, वरात राहिली, सबब दूर.

[1-11-1739

तेरीख १०

किले घनगड येथील बेगमीस

चिरंजीव राजश्री बालाजी बाजीराऊ प्रात कल्याण भिवडी याजकडून देविले नख्त रुपये नागली खंडी
२२४ १८॥

चिरंजीव रा नारो रामचंद्र याजकडून देविले नख्त रुपये वरकस ख+
३०० ६

[2-11-1739

तेरीख ११

दफातेपत्र

बाबनाक परवारी किले लोहगड पर्जन्यकाली खरल कोसलोन ठार जाला त्यास तैनात रुपये ५ पांच होती. त्यापैकी निमे तैनात दर माहे रुा २॥ अडीच करार केले आहेत. किले मजकूरचे सिरस्तेप्राा पावीत जाणे म्हणोन किले मजकुरास पत्र
१

[16-11-1739

तेरीख २५ दफातेपत्र

जंजिरे वसई येथील रुपायाचे टंकसालेचा कार्यभाग दादाभाई यासी सांगितला असे. टंकसालेची पैरवी करणे ते मारनिले करितील. त्यास टांकसालेवर येक कारकून ठेऊन मोहर त्याजपासी देऊन साडे अकरा मासे रुपया मालाचा खरा यैसे रुपये पाडवणे. रुपये पाडावयाचे होतील तेव्हा मोहर कारकुनाने न्यावी; नाहीतर सरकारांत ठेवीत जावी. हजार रुपये पडतील त्यास रुा १२॥ साडे बारा करार केले असेत; त्यापैकी सरकारांत रुपये ६ साहा घेणे, बाकी साडेसाहा राहिले ते दादाभाई व सोनार समजोन घेतील, येणेप्राा करार करून तीन साले टंकसालेचे काम मारनिलेचे हाते घेत जाणें. कारकून शाहाणा इतबारी नेमून ठेवणे म्हणौन

संकराजी केशव नामजाद वसई यांस पत्र १

दादाभाई पारस याचे नावे १

२

No. 139] [20-11-1739

छ २९ साबान

संकराजी केशव नामजाद वसई यास पत्र कलमे येणेप्रां

पांचसे माणूस मुलकी सरस बरे मर्दाने पाहून ठेवणे. माणूस पाहून तैनात करणे. कलमे १

मुलकी मोहतर्फे वगैरे करार जाला; नाहीतर जीवनमाफक करार करणे. कलम १

मुलकी घरपटीचा सिरस्ता अवल घरास रुा २ दोन व दुमघरास रुपये १ येक, सीमघरास रुा ·॥· नीम, येणे प्रो घेणे मुखलीसास (?) येक साल माफ करणे. कलम १

मणाजीराव बुरूडकर यास इजाफा दर माहे रुा १० दाहा प्रा इा छ १९ माहे रमजान पासून केला असे. पेशजीची तैनात रुा २० वीस हाली दाहा येकूण तीस रुपये सिरस्तेप्रमाणे देत जाणे. कलम १

साल मजकुरी मुलकी संचणी जाहाली पाहिजे त्यास वैरान गाव असतील ते तुम्ही खोती देणे. खासा स्वारी जाल्यावर मख्ता दिला जाईल

दोन सहश्रचंद्र्या मानसीक तुम्ही सरकारी कामाकरिता केल्या आंहत त्या करणे. कलम १

मुलकी वसूल रकमी ढेप लागवड जाले असेल ते मनास आणून पेशजी सिरस्ताप्रमाणे वसूल घेणे. पेस्तर खासा स्वारी जाल्यावर जमाबंदीचा आकार केला जाईल. कलम १

त्रिंबकसेट कासार दरमाहे रुा ६ साहा इा छ १९ रमजानापासून देत जाणे. कलम १

इमारतीस लोकानी खपावे. जे चाकरी जसी पडेल जे समई ते करावी. हुकमी जो न वर्ते त्याचे पारपत्य करावे. कलम १

अरमारची स्वारी सिकारी करणे लागेल त्यास तुम्ही ज्या सरदारास सांगाल त्याचे हुकमात साऱ्या गलबताच्या सरदारानी वर्तोन येका पत्रडानी चालावे नवदिगर करील त्याचे पारपत्य करावे. कलम १

कलमे दाहा करार केली असेत.

No. 140]

छ १ जमादिलोवल

देवस्थाने हणमंत वसईचे कोटामध्यें स्थापना केली, त्यास खर्च रुो ताा माणकाजी पाथरवट नख्त रुपये—[तपशील]

इंग्रज इंजबेट दिमत इंग्रज मुंबईहून आला त्यास खर्च इा छ २४ रावल ताा छ १७ राखर पावेतो.

छ २ माहे जावल

दफातेपत्रे

दादाभाई यास वसईस टांकसाल घालावयाची आज्ञा केली; त्यास हरजागाहून तांबे आणील त्यास जकात न घेणे म्हणौन दस्तक १

छ ११ जावल

खर्च

१२८३८= नवस श्रीवज्रजोगिणी मुकाम वडवली बाबत वसई वगैरे सोने नवसले होतें त्यापैकी ताा रामचंद्रगिरी गोसावी वजन गुाा सिऊबा नाा थोरात वजन तोले [तपशील]

No. 141] [*22-12-1739*

सुाा आर्बैन [मया व अलफ]

स्वारी राजश्री पंत प्रधान

सवाल–पौष

तेरीख २

सिरपाव पातशाहाकडून आला गुाा बाबूराव मल्हार भेट [तपशील]

[*28-12-1739*

तेरीख ८

नवाब नसिरुदवला याचे खासगत कोठीचे बैल बसोद्याहून बऱ्हाणपुरास साखर खरिदी करून येक खेप आणितील त्यास आणू देणे; जकातीचा तगादा न लावणे, म्हणून दस्तक बैल सर

४७

[*31-12-1739*

तेरीख ११

देणे सौ रखमाबाई, देवजी सोमवंसी याची स्त्री यास

पाा दिंडोरी देह ३१ येकतीस निंबाजी सोमवंसी यास मोकासा आहे.

2489

[1-1-1740

तेरीख १२

बालाजी चिंतामण सुभेदार पा कर्डे रांजणगाव याचे खासगत मीठ व तादूल हरजिनस गला मावलातून मौजे वडगाव बाड्याचे येथे बैल सर १५ तीन खेपा भरून आणतील त्यास जकातीचे दस्तक

[9-1-1740

तेरीख २०

राजश्री रुद्राजी खंडेराव यास सवाई कंठाजी कदमराऊ बाडे याची सरदारीची दिवाणगिरी सांगोन पाठविले याचे हातून दिवाणगिरीचे कामकाज घेऊन वेतन सालिना रुपये ४००० च्यार हजार केले आहेत, पावते करणे म्हणून कंठाजी कदमराव यास सनद सादर १

No. 142] [26-1-1740

सुा आर्बैन [मया व अलफ]

जिलकाद–माघ

तेरीख ७

बा देणे रदकर्ज गुा गोविंद सिवदेव यांजपासून साल गुा पा बीड पाथरी येथील सरदेशमुखीचे कर्ज दाखल ऐवज पाऊण लाख रुा घेतले त्यापैकी दिल्हे. मारनिलेनी विनाजी त्रिंबक याचे कर्ज देणे होतें ते देविले रुा

१०००

[तपशील]

[29-1-1740

तेरीख १०

श्री आई आदिपुरुष वरद परंपरा राजश्री विठो गोमतीदास वास्तव्य कसबे सोमठाणे पा आंबेगाऊ सरकार जालनापूर यांसी श्रीच्या मोहछायास व अंन्नछेत्रास गाऊ इनाम पूर्वीपासून आहेत त्याप्रा करार करून ताकीदपत्रे दिल्ही देह.

[23-1-1740

तेरीख ४

राजश्री मुकुंद रेणुकानंद वरद परंपरा श्रीआई आदिपुरुष वास्तव्य मौजे गोलटगाव पा जालनापूर यासी श्रीच्या उछाहास व अनछत्राबदल

[26-1-1740

तेरीख ७

भील प्रां खानदेश याणी हुजूर येऊन विदित केले की आपला हक दर गावास

दर आउतास दाणे कैली डोले	मेरीस गुलाची भेली	भेट दरगावास रुपये	बकरे दरगावास
१	१	१	१
जोडा जुती	पासोडी	लंग	लंग
१	१	०	०

येणेप्रमाणे पुरातन आहे. त्यासी साप्रत चालत नाही तरी साहेबी कृपाळु होऊन चालवावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणौन याजवरून हे आज्ञापत्रे सादर केली आहेत. तरी भिलाचा हक पेशजीपासून सुदामत चालत आसेल त्याप्रमाणे चालवणे येविसी जमीदारास पत्रे

१ पाा धुले प्राा खानदेश | १ पाा उंत्राण प्राा खानदेश | १ पाा अंदूर
१ पाा भडगाव प्राा खानदेश | १ पाा महुणेबार प्राा खानदेश | १ पाा खंडाले
१ पाा बहाळ प्राा खानदेश | १ पाा चालीसगाव प्राा खानदेश

८

No. 143] [17-2-1740

तेरीख २९ जिलकाद

जामदारखानापैकी

हुजरात खर्च वस्त्रे बाा पातशाहा श्रीमंती राजश्री रायानी लस्करांतून पाठविली ते राजश्री माहादाजी अंबाजी याजकडे राजश्रीस द्यावया कारणे पाठविली बाा मोरो रघुनाथ दिमत खंडोजी माणकर नाा ठाणे साष्टी सनगे [तपशील]

लग्न खर्च देणे सोयरे यास भोजनास आणिले तेव्हां वस्त्रे दिलीं.

अंताजी नारायण
[तपशील]

जनार्दन बलाल
[तपशील]

भिकाजीपंत
[तपशील]

माहादाजीपंत
[तपशील]

2491

गोविंद भिकाजी
[तपशील]

जंगनाथ देव
[तपशील]
धोंडभट उपाध्ये
[तपशील]
धोंडोबा व कुशाबा व रामचंद्र

No. 144] [*27-2-1740*

तेरीख १०

आर्बैन [मया व अलफ]
माहे जिल्हेज—[फाल्गून]

मोगलाचा सल्ला जाला. रात्रीस बोली जाली.

[*2-3-1740*

तेरीख १४

जमा जामदारखाना

१७० बाा नासरजंग

[*15-3-1740*

तेरीख २७

बाा भेट सुलतानजी निंबालकर

रवासुदगी

सैदलस्करखान दिाा नवाब निजामनमुल्क परराज्य यासी

रुाा

तेरीख १ १५००

जमा भेट बाा जगंनाथराव पातशाही हरकारे

सनगे रुपये

[तपशील]

[*18-3-1740*

छ ३० जिल्हेज

रुजू सालमजकुरी वसईस संक्राजी केशव यास गलबत सापडले त्यांजवर दात होता, तो वासुदेव जोसी यास विकत दिल्हा, त्यापैकी जमा

[*27-2-1740*

छ १० जिल्हेज

अभयपत्र लेहून दिल्हे की साहुकार व बाजे उदमी साकी बंदर मुंबै व बंदर वसई व बंदर साष्टी यास कौल द्यावयाविसी राजश्री खंडोजी माणकर याणी

विनंती केली. सदरहू बंदरोबंदरीचे साहुकारास व बेपारियास कौल सादर केलिया हरजिनस भरून जलमार्गे बंदर राहाळू व मालाठे येथे अमदरफ्ती करितील म्हणौन त्यावरून बंदरचे माहामुरीवर नजर देऊन कौल सादर केला असे. तर हरदू बंदरी सुखरूप अमदरफ्ती करणे. तुमचे मुदे मवाफीक चालवावयास अंतर होणार नाही. कोणेविसी शकअंदेशा न धरिता अमदरफ्ती करीत जाणे. पंचोत्रा साल मजकुरी हासील केला आहे म्हणौन साहुकारास कौल सादर केला असे.

सवा सा रुो घ्यावयाचा सिरस्ता आहे ; त्यास बंदरचे माहामुरीवर नजर देऊन सालमारीच मात्र पंचोत्रा करार केला असे.

No. 145] [*17-4-1740*

तेरीख १

सुा आर्बेन मया व अलफ

राजमंडल

स्वारी राजश्री पंतप्रधान

माहे सफर—वैशाख

खर्च

३४ जखमेयास [तपशील]

खासुदगी

देणे परदरबार हिरजुलखान घोडा कर्डा

जमा जामदारखाना

भेट

१९ नारो शंकर, तिवट १

४ महेस्वरकर, तिवट १

८ धर्मपुरी, तिवट १

२७

[*20-4-1740*

तेरीख ४

खर्च

१९ मल्हारपंत दिमत श्रीगेरी धर्मादाऊ

खासुदगी

सवाई जैसिंग याणी सैद जमालुदीखान यास उंट २२९ सवा दोनसे पाठविले, त्यास जकात वाटेस राजश्री मल्हारबाचे व राणबाचे दस्तक असतां घेतली, यास्तव रुपये आणावयास सिदोजी चवाण व त्रिकमजी गुड दिा त्रिबकजी नाईक यांस रुा [तपशील]

राजश्री सवाई जैसिंग याणी सैद जमालुदीखान यास उंट २२५ सवा दोनसे पाठविले ते माळवियातून औरंगाबाद पावेतो जकात न घेणे म्हणून दस्तक १

[21-4-1740

तेरीख ५

खासुदगी

बाबूराऊ मल्हार खानगी दिल्लीस १००००

बुंदीच्या यैवजी राजामलजी यांकडून माारनिले गेले नाहीत सबब दूर.

[23-4-1740

तेरीख ७

खर्च

२५ धर्मादाव देणे उदकुंभदान

No. 146] [24-4-1740

तेरीख ८

खर्च

२४ धर्मादाये कुंभ दोन १२ ताा म्हालोजी टिकला खासदार

[26-4-1740

तेरीख १०

खर्च

१२ खासगत खर्च राा रायास वोवाळून ठेवायास मोहर १ ताा वेकू

[27-4-1740

तेरीख ११

खर्च

१४ धर्मादाये मृंत्यजयाच्या जपास ब्राह्मण लाविले त्यास श्रीमाहादेवाची प्रतिमा केली त्यास सोने तोळा १ यकूण रुो

१६० धर्मादाये वाड्यांत दाने दिली, म्हैसीदान क्षेशदाने केली त्यास ताां शंकराजी भास्कर

९६ यैन नख्त

१०४ मोहरा ८ दर १३

१६०

८= किरकोळी खर्च धर्मादाये

[28-4-1740

तेरीख १२ रोज वैशाख शुध त्रयोदसी सोमवार मुा रावेर छ मजकूर राजश्री रायास कैलासवास जाहाला.

१८= राजश्री राऊ यासी देवआज्ञा जाली त्यास मुखात घालावयासी सोने मासा ८८८८१

[या दिवशी पुणे, सातारा बुराणपूर, इंदूर वगैरे ठिकाणीं जासूद रवाना झाले. त्यांचा रवानगी खर्च पडला आहे.]

[4-5-1740

तेरीख १८

खर्च

८९ राजश्री आपा स्वामीकडून मातुश्री कासीबाई समागमे राऊत आले त्यास नीम रोजमुरा [तपशील]

देणे क्रियेस धोत्र राजश्री जनार्दनपतास पांघरावयासी सेला धुवट हात ९ यांो सनग ·|· रुपये २॥ रुा

तेरीख २२

खर्च रुपये

दाने आकरावे दिवशी [तपशील]

No. 147] [9-5-1740

तेरीख २३

जमा जामदारखाना बाा दुखवटा सनगे यांो रुा

१४८ तिवटे

१० बाबूराऊ फडणीस १
६ आयाबा १
५ माहादाजी आंबाजी १
४ संकराजी भास्कर १
५ रामचंद्र दामोदर १
६ सदासिव दामोदर १
५ आमृतराये धायेभर १
५ आपाजी जामदार १
७ धोंडो नारायेण पोतेनीस
४ बलवंतराऊ पंडित १

६ जानोजी ढमढेरे १
५ गोजाजी ढमढेरे १
५ बाजी आनंत कमावीसदार प्रा इटवा १
७ समस्त माहात १
५ समस्त नगारखाना १
५ सुलतानजी जाधव १
४ माधोसिंग १
६ तुळाजी सितोळे १
५ दादजी सितोळे १
५ कुसलसिंग पुनासेकर १
४ रामराऊ नरसिंह १
४ सुभानजी सेलार १
४ मोघोजी सेलार १
४ परशराम सितोळे
४ आमृतराव चिटणीस
३ त्रिंबक हरी कमावीसदार मकडाई १
३ मकाजी तांबोली
४ बाबुराव मल्हार याजकडील कारकून

१४८

३०

१० चिमणाजी भिवराऊ सेला खसखसी १
१५ बाबुराऊ मल्हार सेला जाफरखानी
१० इंद्रसाल राजा बढवाईकर शालधिरमा
२० विठोजी बुले दुपटा १
१२ नेरेंद्रसिंग बडवेकर
५ लुगडे १
७ तिवट छिटा

१२

३६

२१९

No. 148] [21-4-1740

तेरीख ५

सुा आर्बैन मया व अलफ
स्वारी राजश्री पंत प्रधान
सफर—वैशाख

खर्च

२॥ जखमी हशम निा खंडोजी माणकर सागरगडच्या मोर्च्यास जखमी जाले त्यास खर्चास [तपशील]

६ जखमी लोक दिमत बोधलोजी यादव सिलेदार खर्चास

राजश्री नाना पालीचे मुकामी आले, ते समई पालीचे दास्तान निा होनाजी बलकवडे पैकी खर्च

[23-4-1740

तेरीख ७

खर्च

९ । धर्मादाव अक्षत्रितीयेचे दिवसी घरची घागर ब्राह्मणास उदककुभास दान दिली होती ती माघारी घरांत घेऊन किमत ब्राह्मणास दिली. घागर वजन पक्के ८८५।४ दर सेरी रुपये १॥। प्रो. ताा बाळू करंदीकर

[25-4-1740

तेरीख ९

खर्च

८≡ रवाना सागरगडचे मोर्च्यास तोफेस लावावयाबद्दल ताडी वजन कच्चे ८।' पाठविली गुाा सोनजी धनवडे खासबारदार खुर्दा टके ॥' यो

खासुदगी

येसाजी नलवडे व पिराजी नलवडे दिाा विठल सिवदेव हे उभयता ठार पडिले. त्यास मूलबाल नाहीं, खंडोजी निंबालकर भाचा आहे, त्याचे लग्न करावयाबद्दल देविले. रुपये

१००

[27-4-1740

तेरीख ११

खर्च

२९ माहादाजी अंबाजी याणी लोकास खर्चास दिल्हे होते ते त्याचे त्यास दिल्हे.

२५ आबाजी सिवदेव दिा विठल सिवदेव खर्चास

४ जासूद डाकेचे मुा कापूरवाहाल [तपशील]

२९

No. 149] [28-4-1740

तेरीख १२

चिरंजीव राजश्री बाळाजी बाजीराऊ प्रांत जुंनर यांस सनदापत्रें

पांडुरंग रघुनाथ व विसाजी गोविद यास दिवाणगिरी पा मजकूरची सांगोन पाठविली असे. याचे हाते काजकाम घेत जाणे. पेस्तर सालची रसद रुा २१००० येकवीस हजार घेतली आसे, दुहोत्रा व्याजे पा मजकूरचे साल मजकूरचे रुजू पेस्तर सालचे यैवजी उगऊन देणे म्हणौन सनद १

तुम्हापासून पेस्तर सालची रसद रुपये ४०००० चालीस हजार व्याविसे करार केले आहेत. पोता जमा करून जाब घेणें. तेणेप्रों मजुरा असेत. यास व्याज दरमाहे दरसदे रुपये २ दोन प्रों करार केले असेत. व्याज व मुदल पेस्तर सालचे यैवजी पडतील. मजुरा म्हणौन सनद १

[3-5-1740

तेरीख १७

खासुदगी

सौभाग्यवती गोपिकाबाई पुणेहून आली ते समई पालीचे मुकामीं खर्च जाला त्याची सनद दिली नारो बलाल यांस [तपशील]

[10-5-1740

तेरीख २४

खर्च पोतापैकी छ २४ सफर रायाचे क्रियेस रुा

[ज्या कीर्दीतील हे उतारे आहेत तिला स्वारी पंतप्रधान असें नांव असलें तरी ती चिमाजी आपा व नानासाहेब यांचीच आहेत हे निर्विवाद होय. 'या महिन्यांत

तारीख १ ते २९ मुा नजीक कुलाबा आहे. तेरीख २७ ते २८ मौजे बोलोसी २९ मौ वोलवण ताा नागोठणे तेरीख ३० वोलवण]

No. 150]

तेरीख ४ रबिलाखर

जामदारखानापैकी

गोलदाज इग्रेज व फिरगी
दिाा संकराजी केसव नामजाद
प्रांा वसई बक्षीस

२१॥।÷ ज्यावकीन इंग्रेज
१२॥ तिवट १
९।– सेला अष्टगोली १

२१॥।÷

२

१८॥– अंतोन नोरस फिरगी [तपशील]
१८। अंतोन रूजू फजोलोफ [तपशील]
१८॥· तामस कुली
१७।÷ तोबय रोब्राद्रोबी
१८॥।= अतोन कडदीन
९॥ ज्याव देत्रिचा
२४।· पेद्रू

ITEM No. 11 : 1754-1755

No. 151] [*22-7-1754*

खमस खमसेन
स्वारी दादासाहेब

छ १ माहे सवाल
खर्च पोता २९० मुस्तफा हकीम वैद्य येकमाही रोजमरा
रसानगी चिठी

[24-7-1754

स्वारी दादासाहेब

छ ३ माहे सवाल

खर्च पोता— १४७ खासगत खर्च खरेदी पुस्तके बा याद रसानगी शंकरू रखत्वान पुस्तके

४९	अपरार्क ग्रंथ	२००००+
२१	मदनपारिजात	१००००
२२	विज्ञानेस्वर	१२०००
९	आध्यात्मरामायण	४९००
१	सहस्त्रचंडीविधान	१०००
२	सिद्धांतबिंदू	१०००
९	गीताशंकरभाष्य	४९००
१२	अग्निपुराण	१२०००
५	कासीमाहात्म्य	२५००
४	बृहंनारदी	३५००
३	उपदेशसहस्त्री	३०००
३	गीतगोविंद सटीक	२०००
१	गयामाहात्म्य	१०००
१	केदारमाहात्म्य	१०००
१	वैशाखमाहात्म्य	१०००
३	नीलकंठी सटीक	२०००
४	शूद्रकमलाकर	४०००
१	तत्वानुसंधान	१०००

¶*This is a useful list of Sanskrit books with prices for copying. Several such lists occur in the sequel. The other entries are also useful as throwing light on social domestic and other matters.*

+ उजवीकडील हे आंकडे श्लोकसंख्येचे असावेत.

No. 152] [22-7-1754

स्वारी पंतप्रधान

छ १ माहे सवाल

खर्चाचे बंद

खर्च जिन्नसखाना :—सिकारखान्याकडे जवादी मांजरास ता। नंदराम प्यादा तेल चमेली वजन पके ८८८२, कापूर तोले ।।.

[27-7-1754

छ ६ माहे सवाल

खर्चाचे बंद

धर्मादाय श्रावणमासची दक्षणा एकंदर इा छ २८ रमजान ता। छ ६ सवाल खर्च रुपये

६७९६८२ थोक दक्षणा रमण्यात ब्राम्हणास वगैरे जागा भिकारास व बायकास वाटली. बंद अलाहिदेस यो रुपये

१४८६६६ वाडियात वाटली वि। राजश्री नाना. बंद अलाहिदे.

[अलाहिदे बंद सुमार २९ असून अत्यंत महत्त्वाचे आहेत; कारण तत्कालीन महाराष्ट्रातीलच काय पण अखिल हिंदुस्थानांतील विद्वान लोकांची जंत्रीच त्यांत आहे.]

[1-8-1754

छ ११ माहे सवाल

खर्चाचे बंद

खर्च जिन्नस :— तोफखान्याकडे पा। राजश्री नाना बा। यादी माधवराऊ सिवदेव ता। कृष्णाजी कोठवला. लोहचुंबक वजन पके ८१।४।।.

No. 153] [3-8-1754

छ १२ माहे सवाल

खर्चाचे बंद

खर्च जिन्नस० :— पागा हुजूर घोड्यावरील नवी अंबारी करविली त्यास पा। राजश्री नाना रसानगी निंबाजी भिलारा खिजमतगार वेताच्या काठ्या सुमार ८

[5-8-1754

छ १९ माहे सवाल

खर्चाचे बंद

खर्च जिन्नस :— रत्नशालेकडे निल सोनार याजकडे हात घड्यालाचे दागदोजीस ता। डांगरसिंग चौकीदार. बंदरी तेल ईस्वरदास कलासूत्री याजबा। वजन पके ८८८२

खर्च जिन्नस :— पा। राजश्री भाऊ रा। गोविंद सिवराम ता। राघोजी गवडा गणपती जव (ळ) फुलाचे झाड करून ठेवावयाबद्दल फुलमरीचे फिरंग्याने पेटी मखमली मढीव, आत फुले रेसमाची, पाठविली ती पेटी लाकडी, फुलासमेत.

No. 154] [8-8-1754

खमस खमसेन स्वारी दादासाहेब

छ १८ माहे सवाल

खर्च जामदार०— सिकारखान्याकडे हरणास मोहरक्या दोन बेतल्या. वि। सौ जानकीबाई गु। जिनगर गज ।३ दर ११ प्रा। रु. ४८=

[9-8-1754

छ १९

खर्च पोता०— ९० खासगत खर्च खरेदी पुस्तक कायदे (?) गु। टेहरा (?) मिश्र ग्रंथ ४००००; रुपये रसानगी चिठी

[11-8-1754

छ २१

खर्च पोता खासगत खर्च खरेदी पु। घन:श्याम ब्राम्हण पुस्तके ग्रंथ

१ मार्गसीर्षमाहात्म्य १७००

१ व्रतार्क १००००

१	ब्रम्होत्तरखंड	२२५०
१	ताजिकसार	७३५
१	प्रायश्चितमयूख	३५००
१	नरपतिजपचर्या	३३००
१	माध्यंदिनीसंहिता	३५००
१	समयमयूख	३०००
१	श्राद्धमयूख	२०००
१	निर्णयामृत	५५००
१	आयोध्याकांड	४५००
११		३९९८५

No. 155] [14-8-1754

खमस खमसेन
स्वारी दादासाहेब

छ २४ माहे सवाल
खर्च पोता०—

खासगत खर्च खरेदी पुस्तके गुा जयकृष्ण दशपुत्र रसानगी यादी ग्रंथ

१	मत्स्यपुराण	१४०००
१	रत्नावली	३५००
१	मंजरी	५००
१	योगरत्नावली	४००
१	किरणावली	१८००
१	काव्यप्रकाशटीका	४१५०
१	अमनस्क योग	१००
१	पंचोपनिषद	३५००
१	ईषावास्यभास्य	१५०
१	योगसूत्रभास्यटीका	३०००
१	योगसूत्ररती	१२२०
१	बृहदारण्योपनिषद्	११४४
१	हटप्रदीपिका	३५०
१	मानसोल्लास	१९२५
१	छांदोग्य	३८७

2503

१	पंचदसी	१३००
१	सनत्कुमारसंहितोक्तप्रकरण	३००
१	सप्तपदार्थ	२००
१	सनत्सुजात सटीक	५००
१	ईशावास्यविवरण	२५०
२१		४२६१६

खर्च पोतापैकी रु. गुा माहादजी खंडेराव खा खर्च

१	शरीरभाशे	८०००
१	काव्यप्रदीप	६०००
१	तत्वानुसंधान	८००
१	———	१५००
१	———	१२५००
१	लिंगपुराण	१००००
२०		६४८८०

No. 156] [*20-8-1754*

खमस खमसेन स्वारी दादासाहेब

छ १ माहे जिल्काद

खर्च पोता खासगत खर्च खरेदी पुस्तके रसानगी चिठी

३	मदननिघंट	३०००
९	योगतरंगिणी	८०००
४०	ब्रहत्कथा	२४०००
५२		३५०००

[*22-8-1754*

खर्चाचे बंद छ ३

खर्च पोता [रुसिपंचमीनिमित्य रु. ९ घरातील बायकास.
१ गोदूबाई देसमुखीण २ जिऊबाई ३ द्वारका-

बाई ४ भोवनबाई देशमुखीण ५ पार्वतीबाईची आत ६ गोदूबाई जोसीण ७ मनुबाई अधिकारीण ८ द्वारकाबाई टुली ९ मनुबाई १० सखुबाई चितली ११ पुतुबाई १२ कासीबाई वातकरीण]

[23-8-1754

खर्चाचे बंद छ ४

खर्च जिन्नस० :— ता। हरजी पलांडा पोरगा, उपनेत्र सिसव्याचे घर, उपनेत्र जोड सुमार १.

No. 157] [4-9-1754

खमस खमसेन स्वारी दादा

छ १६ माहे जिल्काद

खर्च जिन्नस १ संध्याकाली तानसेन गवई याचे वौंशीचे गाणार आले ते समई

.॥. दशांग

.॥. आतर गुलाबी

१

[6-9-1754

खर्चाचे बंद छ १८

[शिकारखान्याकडील माणसे व त्यांचे पगार. २२ हरणबाज, ३ खबुत्रबाज, ४ मीरसिकार ५ वाघवान ५ पायेदामी ३ शाहागोशवाले ९ अवांतर ५ फदाइतवाले. याना दीडमाही रोजमुरा आहे. सर्वांस ३ ते ७ रु. पर्यंत. फक्त फदाइतवाल्याना ७ पासून १० पर्यंत पगार आहे.] रु. नं ३३०

खमस खमसेन स्वारी पंतप्रधान माहे जिल्काद

खर्चाचे बंद छ १८

[गडेकऱ्याना सामान्यत: पगार ३ रु. व माहाताना ११ ते २० रुपयापर्यंत आहे.]

[18-9-1754

खमस खमसेन स्वारी पंतप्रधान माहे जिल्काद
खर्चाचे बंद छ ३०.
[गणपती उत्सवास आलेल्या हरदास गोसाव्यांची, नटव्यांची, गवयांची, कलावंतिणींची, नांवनिशीवार यादी बिदागी सुद्धा. उपयुक्त.]

No. 158] .[13-9-1754

खमस खमसेन स्वारीदादासाहेब
छ २९ माहे जिल्काद
खर्च पोता १० रु. खासगत खर्च खरेदी पुस्तके गुा कृष्ण जोसी बाा ग्रंथ रुपये

१०	तंत्रराज टीका	९०००
९	उदाहरण चंद्रिका	४३००
१	वाक्यसुधा सटीक	५५०
४	संगीत दर्पण	२०००
·।·	बालबोधिनी	२००
·॥·	अज्ञानबोधिनी	४००
·।·	हस्तामलक	२५०
२॥	प्रयागसेतू	१३००
२॥	वेदांतसारटीका	१३००
२	वेदांतार्थविवेक	१०००
२	अष्टावक्रटीका	११००
४	मुक्तावलीटीका	२६००
२	कुवलयानंद	१५००
१	सिद्धांतलेश	८४०
७	मैत्रेयुपनिषत् दीपिका	३८००
४	डामरकल्प	२६४०
२४	मुहूर्तचिंतामणी टीकादि पुष्पधारा	१२०००
१४	लीलावतीची टीका	७०००
५	वसंतराज मूल	२४०००

2506

१०	वसंतराज टीका	४७०००
३	भोजकृत योगसूत्ररति	१४००
२	सांख्यतत्व कौमुदी	१०००
२	अष्टाध्याई	१०००
१॥	मकरंदसारिणी	
६	गृह्यपरिसिष्ट	
१२८		७४९८०

पैकी वजा पेशजी मोघम पावले आहेत ते रु. वीस बाकी.

No. 159] [26-12-1754

खमस खमसेन स्वारी पंतप्रधान
छ ११ माहे रौवल

खर्चाचे बंद

धर्मादाये नवसखर्च सौ गोपिकाबाई श्री कोल्हापूर महालक्ष्मीस सोन्याचे चुडे रा रामाजी विस्वनाथ ता नारो बावाजी भाव्ये हा चिटको अनंत वाईकर चुडे सोने जुन्या मोहराचे चुडे ४ येकूण तोळे सोने २३॥।

[15-1-1755

खमस खमसेन स्वारी पंतप्रधान
छ २ माहे रबिलाखर

खर्चाचे बंद

खर्च जामदार.:— संस्थान श्रीरगपटण येथील सांनिकास वस्त्रें पाठविली हा बनाजी माधवराव वकील सनगे. (सनगे दिली त्यांची नांवे) खासा जगदराज राजा, नंदराज सर्वाधिकारी, देवराज दलवाई, व्यंकटपतिप्रधान, वीरशेट, सुमेतद्रराऊ, चेनवीर देवरू, चेनपया प्रधान, राजयाचे मातुश्रीस, दलवाई याचे स्त्रीस.

खमस खमसेन स्वारी पंतप्रधान माहे रबिलाखर

सौ पार्वतीबाईकडे न्हावयास ता सिदोजी

न्हावी. वजन पके ॥॥६ चमेल तेल, ॥॥७ अर्गजा, ॥॥९ तेल बेल, ॥॥११ माती रातगड = ॥।१५.

No. 160] [16-3-1755

खमस खमसेन स्वारी राजश्री दादा

छ २ माहे जमादिलाखर

खर्चाचे बंद

खर्च रत्नशाला:— संकराजी निबांजी सखाराम भगवंत याचे पुतण्ये यास गुजराथचे स्वारीस दिल्हा. परमानगी सखारामपंत ताा खुद चौकडा खोा गुाा कृष्णभट वैद्य जमा छ २४ मोहरम सन अर्बा, किमत रुपये ५०० योा मोत्ये दाणे ४ सोने वजन ११। ताला.

[20-3-1755

खमस खमसेन स्वारी राजश्री दादा

छ ६ जमादिलाखर

खर्चाचे बंद

खर्च पोता:— २० कासीद जथे बिलिंदा सखारामपंता-कडून येका दिवसात पंचेतालीस कोस आले साा इनाम रसानगी चिठी

१० रामजी वाा नारायण

१० परसा

२०

[11-4-1755

खमस खमसेन स्वारी राजश्री दादा

छ २८ माहे जमादिलाखर

खर्चाचे बंद

खर्च पोता:— खासगत खर्च खरेदी पुस्तके गुाा पुराणिक राा चिठी

२॥ द्वारकामाहात्म्य

१ कालिकासहश्रनाम

१ येंत्रराज

·॥· सिवसहस्त्रनाम
१॥ जोतिसीरत्नमाला
४ जैमिनीअश्वमेध
२ लक्ष्मणोछववैद्यकी
१ कारक
३॥ किरकोळी वैद्यजीवन

ITEM No. 12 : 1767-1768

No. 161] [*10-10-1766*

छ ९ जमादिलावल सुा सबा सितैन
मया व अलफ

[पूर्वी, गोदावरीच्या तीरीं टोक्याचे मुक्कामी, नानासाहेब पेशव्यानीं चंद्रग्रहण समयीं एक गांव धर्मादाय म्हणून दान दिला असा उल्लेख आहे.]

¶*The years 1767 and 1768 are historically important and consequently the entries in this part throw fresh light on many points which have been the subject of recent discussion. The entries are arranged into two sections, the first from the Peshwa's Diary and the second from that of Raghunathrao.*

No. 162] [*10-10-1766*

छ ९ जमादिलावल सुा सबा सितैन मया व अलफ

श्री स्वामी शंकराचार्यांकडून, त्यांच्या आशीर्वादासह, ८० रुपये किंमतीच्या दोन शाली आल्या.

No. 163] [*16-10-1766*

छ ११ जमादिलावल सुा सबा सितैन मया व अलफ

सुमेरसिंग व महमद इसफ गाडदी यांनीं दसऱ्याचे दिवशीं पेशव्यास नजरा आणिल्या.

No. 164]. [*17-10-1766*

छ १२ जमादिलावल सुा सबा सितैन मया व अलफ

तुळजाजी राजे चंदावरकर यांचेकडून सुवर्णाची गणपतीची मूर्ति घेऊन माणसे आली त्यांस १४० रुपये दिले.

No. 165] [18-10-1767

छ २४ जमादिलावल सुा समान सितैन मया व अलफ

आनंदवल्ली

रु. ११७, पाद्री वैद्य याचेकरितां झालेला खर्च.

No. 166] [21-10-1767

छ २७ जमादिलावल सुा समान सितैन मया व अलफ

आनंदवल्ली

श्रीदेव त्र्यंबकेश्वर यांचेकडून आशीर्वाद म्हणून खालील सनगे आली :—

१ तिवट, किंमत रु. १५.

१ जाफरखानी, किंमत रु. १२.

रु. २७.

रु. २७५, छट्टू फरास याचे मुलाचे सुंतेप्रीत्यर्थ खर्च.

[22-10-1767

छ २८ जमादिलावल सुा समान सितैन मया व अलफ.

दोन जासूद चार दिवसांत आनंदवल्लीहून पुण्यास जाऊन परत आले, सबब त्यास ५० रुपये इनाम दिले.

No. 167] [23-10-1767—24-10-1767

छ २९ जमादिलावल

जयाप्पाची बायको सखुबाई शिंदे हिच्याकडे तिचे जाहगीर गांव पूर्ववतप्रमाणें निर्वेध चालवेत अशी पेशव्यानें आज्ञा केली.

No. 168] [25-9-1767

माहे जमादिलावल सुा समान सितैन मया व अलफ

पुण्यांतील साहुकारांकडे पटविण्याकरितां श्रीरंगपट्टण येथील साहुकारांच्या हुंड्या आणल्या.

रु. २००० नुकसान द्यावयाचे केले. सबब कीं, हैदरी होन घ्यावे त्यास सदरहू होनात येलोरी होन घेतले. त्यास, खंडणीचा दर हैदरीचा व येलोरीचा बरोबर. आणि बाजारपाड पाहता हैदरीहून येलोरी जाजती आहे. त्याबाा तोटा मजुरा दिल्हा दर होनास रुपये :

८—॥ ऐन बाजार भाव.

८॥ भारी भरणा, सबब जाजती.

No. 169]

कोकण प्रांतीं रोगाच्या साथीनें बऱ्याचशा म्हशी मेल्यामुळें तेथील गवळ्यानीं म्हैसपट्टींत कांहीं सूट मिळण्याविषयीं सरकारांत अर्ज केला. पेशव्यानें, रोगानें किती म्हशी मेल्या ह्याची खानेसुमारी करण्यांस आज्ञा केली व खानेसुमारीचा आकडा कळल्यानंतर मग ह्या अर्जाचा विचार करण्यांत येईल म्हणून आश्वासन दिलें.

No. 170]

छ ३ रोजी वाड्यांत गोंधळ घातला. त्या दिवशीं पोळ्या करण्याकरितां दोन आचारी करार केले होते. त्यांस ह्या कामाबद्दल प्रत्येकी १२ आणे दिले.

खर्चः

रु. २००, श्रीनिवास गंगाधर प्रतिनिधि याची मुलेमाणसे किले प्रतापगडच्या पायथ्याशीं राहतात त्यांचे खर्चाबद्दल.

रु. ६००, श्रीनिवास गंगाधर याची बायको छ २६ रोजी मृत्यु पावली तिचे क्रियेकरितां खर्च.

No. 171]

पुण्यांतील शेख सल्ल्याचे पिरास, मागील वर्षाप्रमाणें, चालू वर्षीहि खैरातखर्च म्हणून दसऱ्याचे दिवशीं कांहीं रक्कम देण्यांत आली.

पार पेठ किले प्रतापगड, येथील श्रीवरदायनी व श्रीरामवरदायनी ह्या दोन देवतांस दसऱ्याचे दिवशीं २०० रुपये किंमतीचे वस्त्रें देण्यांत आली.

घाटगे झुंझारराव यास लष्करांत यावयाविसी आज्ञा असतां तो मलवडीस गेला. सबब त्याजपासून मसाला घेतला, रुपये १०००.

दोन महिने मुदतीच्या २०००० होन किंमतीच्या हुंड्या श्रीरंगपट्टणाहून पुण्यांत आल्या. पुण्यांतील एका साहुकारानें त्या ताबडतोब पटवून दिल्या व त्याबद्दल ४०० होन घेतले.

No. 172]

(बाबूराव राम पेंडसे हा पुण्याचा कोतवाल. त्याच्या पूर्वीच्या कोतवालाचें नांव, केशवराव केतकर.)

वळू घोड्याचा दररोजचा खुराक:—

१। पावली हरभरे; १ शेर पीठ; अर्धा शेर तूप; पावशेर साखर; २ टाक काळे मिरे.

माधवराव रामचंद्र यानें पुणियांत ९०० रुपयास एक घोडा खरीदी केला. त्याबाबत सरकारचा असा हुकूम झाला कीं, त्या खरीदीवरील कर माधवराव रामचंद्र याजवळ न मागतां तो त्याच्या खातीं लिहावा.

No. 173]

कुकाजी सिवराम याचें मालकीचें रानांतील लाकूड सरकारतर्फे तोडण्यांत आले. त्याबाबत असा हुकूम झाला कीं, तोडलेल्या लाकडापैकीं ⅓ भाग सरकारांत द्यावा व बाकीचे लाकूड कुकाजी सिवराम यांस द्यावे.

त्रिंबकराव दाभाडे मोगलाईत गेल्यामुळें त्यांची सर्व वतनें जप्त करून दमाजी गायकवाडाकडे देण्यांत आली होती. तीं वतनें हल्लीं आतां दमाजीकडून काढून बाबाजी प्रऱ्हाद याजकडे देण्यांत आलीं व ह्याबाबत सरकारच्या सनदा देण्यांत आल्या.

रहिस अहमद ह्याच्या हाताखालील लष्करच्या तुकडीची हजिरी घेण्यांत आली; त्यावेळेस कांहीं सैनिक कमी आढळून आले. म्हणून पेशव्यानें असा हुकूम फर्माविला कीं, रहिस अहमद त्याचा दुय्यम, कारकून, व गैरहजर सैनिक यांस त्यांचा दोन महिन्यांचा पगार देण्यांत येऊं नये.

No. 174]

गोपिकाबाईची रोजकीर्द मुा गंगापूर.

४, बाबत कमळू पाहाड नासिककर येकेरी धोत्र नेसला होता व बहिणीचे कजियास सरकारात आला होता, तो माजोरीपणाच्या गोष्टी सांगत असे सबब गुन्हेगारी रु.

३५, बाा भवानी भगत बेलगावकर हा मौजे मजकुरी भगत होऊन लटकीच लोकांची नांवें घेत असे. चौकसी करिता कोणाचे भूत नाहीं. भवानी खोटा जाहाला. सबब गुन्हेगारी रु.

No. 175]

सरकारची कढई कांहीं लोकांनीं वापरण्याकरितां मागून नेली. ह्याबद्दल त्यांच्याकडून रु. २९ भाडे म्हणून घेण्यांत आले.

गोपिकाबाईचा मेणा एकदां विशेष जलदीनें जात होता. मेण्याबरोबर ज्या नोकरांनीं चाल ठेविली त्यांस प्रत्येकी आठ आणे बक्षीस देण्यात आले.

No. 176]

घोडा फिरवीत असताना, नारायणरावाच्या कुडकींतील मोतीं गळून पडले. राघोजी कदम ह्यास तें सांपडले व ते त्यानें आणून दिलें. ह्याबद्दल त्याला १ रुपया बक्षिस मिळाला.

No. 177] [*25-9-1767—24-10-1767*

माहे जमादिलावल सुाा समान सितैन मया व अलफ.

जानू चांभारानें, दसऱ्याचे दिवशीं, पेशव्याचें कुटुंबांतील खालील मंडळीस, प्रत्येकास एक एक चर्मी जोडा नजर केला:—

दादासाहेब, माधवराव, नारायणराव, गोपिकाबाई, पार्वतीबाई, आनंदीबाई, सगुणाबाई, राधाबाई, रमाबाई, गंगाबाई.

दर रतीस २२॥· रुपये याप्रमाणें १६३ रती वजनाचे २५ हिरे खरिदी करण्यांत आले.

छ १२ रोज. विाा राजश्री नारायेणराव माहामृत्युंजयाचें अनुष्टान वाड्यांत लाविले आहे.

No. 178]

नवरात्रखर्च :

१७८= नावरात्राचा गोंधल वार्षिक घातला त्यास ता। हरि विस्वनाथ भावे रुपये.

१६ गोंधली यास.

१ वोवालर्णास खुर्दा टके ३।।।३ याो.

८= खा। नाडापुडी वगैरे.

१७८=

पेशव्याचे हुकुमावरून तीन घड्यालें नवाब निजामअलीखान याजकडे पाठविलीं.

२६०२ रुपये आजारी विद्वान ब्राम्हणांस श्रावणमासची दक्षणा म्हणून वाटण्यांत आले.

No. 179]

२६८२ रुपये गणपतिउत्सवानिमित्त खर्च झाले. ह्या खर्चांत मुख्यत्वेंकरून हरदास, गवई, कलवंतिणी वगैरेंच्या बिदाग्या आल्या आहेत.

१९१ रु. , खाशा दिवाणखान्यांत लावावयासी खो। चित्रें रागमालेची सुमार ३६ याो रा। यादी रुपये.

•।।= २६ रोज, खो। झाडू झगे चुणावयास, झाडू सुमार २ दर •।– प्रो।.

२।।• खो। बोटवाती सुमार २०००० येकून ता। मानी कुणबीण.

राजश्री नारायेणराव याजकडील झगे चुणावयाची कचकडी येक मढून दिली.

No. 180]

वामन जोशी गराडकर,	सौ। रमाबाईचे मावशीचा नवरा.
निळकंठराव महेंदेळे,	सौ। पार्वतीबाईचे मेहुणे.
केशवराव हरि नेने,	सौ। पार्वतीबाई यांचे भाचे.
येसाजी धोंडदेव,	गोपिकाबाईचे बंधु.
बालाजी नाईक भिडे नारोबा नाईक भिडे	सगुणाबाईचे बंधु.

No. 181] [1-10-1767

छ ७ जमादिलावल सुा समान सितैन मया व अलफ

पाद्री वैद्य यांस पुण्याहून पालखीस भोई देऊन लस्करांत रवाना केला.

[5-10-1767

छ ११

जासूदजोडी दिल्लीहून नाशिकास २८ दिवसांत आली; त्या जासुदांस ४४ रु. दिले.

[6-10-1767

छ १२

सदाशिव विश्वनाथ यांस मुरारराव घोरपड्याकडे पेशव्यातर्फे वकील म्हणून पाठविण्यांत आले.

[10-10-1767

छ १६

एक बिघ्यावरील उसाचे पीक ५९ रुपयांस विकण्यांत आलें.

[12-10-1767

छ १८

टेकचंद नांवाच्या पहिलवानास दररोज एक शेर दुधाचा रतीब होता.

No. 182] [16-10-1767

छ २२

फार उंचावरून पाण्यांत उड्या टाकल्याबद्दल दोन खिजमतगारांस ४ रुपये बक्षीस देण्यांत आले.

[22-10-1767

छ २८

छट्टू महातानें राजगोपाळ नांवाच्या मस्त होऊन मोकाट सुटलेल्या हत्तीस साखळीस बांधलें. ह्या कामाबद्दल त्या महातांस बक्षिस देण्यांत आले.

No. 183] [23-12-1767—21-1-1768

माहे साबान सुा समान सितैन मया व अलफ

[25-12-1767

छ ३

रु. ३९, पखवाजीचा मासिक रोजमरा.

[26-12-1767

छ ४.

पागेकडील कामगारांचे दुमाही रोजमरे :—

कारकून, रु. २० ते २५.

दाणेकरी, रु. ४-८.

जासूद, रु. ६.

जिनगर, रु. ७.

कोठवला, रु. ४.

बइलका, रु. ४.

चांभार, रु. ४.

मोतादार, रु. ४.

सांरवान, रु. ५.

बारगीर, रु. १४.

पखाली, रु. ३-८

३७ खासदार, रु. ११४.

जामदार, रु. ६.

आचारी, रु. ३.

दिवट्या, रु. ४.

हलालखोर, रु. ३.

हुलस्वार, रु. ५.

नालंबदी, रु. ५.

No. 184] [27-12-1767

छ ५

एक गाय ८ रुपयांस खरीदी करण्यांत आली.

[29-12-1767

छ ७

बाजेखर्च राजश्री राव याजकडील रुमाल च्यार यासी केशरी छापावयासी चिठी छ २ साबान ता। माधवराव दादाजी कारकून सिलेदार केशर वजन तोले ९.

No. 185] [*31-12-1767*

छ ९

अरमनी फिरंगी वैद्य याजकडून नारायणरावांस नजर:

(१) एक दोनपाती चाकू.

(२) एक कात्री.

[*3-1-1768*

छ १२

भनू व कवताल या दोन ठिकाणांचा ताबा बसालतजंगास परत देण्याकरितां गेलेल्या दोन खिजमतगारांस दोन सोन्याची कडीं बक्षिस मिळालीं. त्या खिजमतगारांनीं तीं कडीं, नियमाप्रमाणें, सरकारी जिनसखान्यांत सादर केलीं. दुसरें दिवशीं तीं कडीं त्या खिजमतगारांना सरकारांतून बक्षीस म्हणून देण्यांत आलीं.

No. 186] [*13-1-1768*

छ २२

रु. २०, मजुरीखर्च: थोरले घड्याल इंग्रेजी गोपालजी कारीगर याजकडे नीट करावयास दिल्हे होते. त्याचे हाताखाली पुरुषोतम लोहार व त्याचा घणकरी पेठ शुक्रवार को। पुणे याणे तीन महिने, कधीं सा घटका कधीं प्रहर कधीं पुरा दिवस याप्रो। नेहमीं काम केले व आवते नीट केली सा। मजुरी रसानगी याद रु.

No. 187] [*23-12-1767—21-1-1768*

[*31-12-1767*

छ ९

माहे साबान सु। समान सितैन मया व अलफ

महादजी शिंद्याकडील खालील व्यक्तीस पेशव्याकडून निरोपाचीं वस्त्रें देण्यांत आलीं:—

नारो शंकर, महादजीचा दिवाण; राघो मल्हार; बाजी नरसी; राघो राम; बाबूराव कासी; आपाजी राम; बदनसिंग लछीराम; सुभानराव जगदळे; नरसिंगराव जाधव; लक्ष्मणराव कवडे; हरजी धापटे; सोमाजी बोबडे; सखो रंगाजी; माणको बल्लाळ, कारकून; शिवराम गोविंद, कारकून; निंबाजी विठ्ठल, कारकून; देवाजी शामराज, कारकून; सिवाजी गोविंद, कारकून; माणकोजी यादव; सुलतानजी

निगडे कागलकर; ज्याहाबाजखान; रहिमतखान; हुलसारखान; नवरोजखान; न्यामतखान; साबाजी विठ्ठल; हैबतराव फणशे; सिवाजी विठ्ठल; बाबूराव जिवाजी; पांडुरंग रघुनाथ; केशवराव रखमाजी; बाबूराव पांडुरंग; बालाजी गोविंद.

No. 188]

तुकोजी होळकराकडील खालील व्यक्तींस पेशव्याकडून निरोपाचीं वस्त्रें देण्यांत आलीं:—

अहिल्याबाई, गंगाधर यशवंत, तुकोजी होळकराचा दिवाण; बापूजी होळकर; कासीबा होळकर; शेटीबा होळकर; संताजी वाबले; नारायेणराव बारगल; सुलतानजी लांबहात्ये; राघो रावजी; मकाजी लांभाते; बाबूराव वाघमारे; त्रिंबकराव सिकेनीस; गोविंदराव मुनसी; राघो लक्ष्मण; शेरखान; मोरो गोपाळ मजमदार; भगवंतराव ढमढेरे; सर्जाराव सितोळे; आनंदराव होळकर; माणकोजी पिंगले; खंडोजी कोंकरे; सेब्याजी मान्या; सयाजी कदम; सटवाजी मते; दादो सिद्धेश्वर; कुशाबा होळकर; पिराजी पिंगळे; वेंकाजी बुळे; बावाजी जाधव; केरोजी ढमढेरे; शेषाद्री; नारो गणेश; बाजी विठ्ठल; येशवंतराव फाळके; आपाजी राम; दासोजी मोरे; माधवराव गंगाधर; सदासिव गंगाधर; कुशाबा वाग.

No. 189] [*31-12-1767*

छ ९

चोर पकडून आणण्याकरितां सदाशिवगडास पाठविलेल्या चार मांगांना खर्चाकरितां ३० रुपये देण्यांत आले.

पार्वतीबाईकडील एका आचाऱ्याचें घर आगीमुळें नाश पावलें. ते फिरून बांधण्याचें कामीं त्याला ५० रु. किंमतीचें लाकूड सरकारांतून बक्षिस देण्यांत आलें.

[*1-1-1768*

छ १०.

रु. ३५,	कमाणगाराचा[१] मासिक रोजमरा.
रु. १० ते २०,	गोलंदाजाचा मासिक रोजमरा.

---

१ हाडवैद्य.

No. 190] [5-1-1768

छ १४.

चांदीचा तीन आंब्यांचा एक घड कविजंग याजकडून पेशव्यांस नजर आला.

[10-1-1768

छ १९.

चेनापट्टणकर इंग्रजांकडून पत्रें घेऊन आलेल्या दोन जासुदांस १० रु. बक्षिस देण्यांत आले.

[12-1-1768

छ २१.

येसूबाई, त्र्यंबकराव विश्वनाथ पेठे याच्या बायकोचें नांव.

No. 191] [20-3-1768—18-4-1768

माहे जिलकाद सुाा समान सितैन मया व अलफ

दादासाहेबांची रोजकीर्द

छ १.

रु. ४, कानडा ब्राम्हण याचें मासिक वेतन.

[25-3-1768

छ ६.

रु. १९, देणें धर्मादाव श्रीनिवास गोसावी गंगेजवल गातात; यास रोजमरा येकमाही माहे मजकूरचा. रसानगी याद.

[26-3-1768

छ ७.

मुंबईकर इंग्रजाकडून पत्रें घेऊन आलेल्या जासुदांस ९ रुपये दिले.

[18-4-1768

छ ३०.

१।।।= बेडकीची कुलपे सुमार ३.

।ः कुलूप पितली लाहान फिरंगाणी १.

No. 192] [26-1-1768—19-2-1768

माहे रमजान सुग्रा समान सितैन मया व अलफ

पेशव्याची रोजकीर्द

छ ९

महादजी शिंद्याशी सल्ला करण्याकरितां पेशवा व नारायणराव कलस येथें गेले होते. ह्या भेटीचे समयीं महादजीनें पेशव्यांस व नारायणरावांस १४४९।= रु. किंमतीचे सोन्याचे दोन कडीजोड नजर दिले.

[29-1-1768

छ ८

७२ रुपयांस ४८ तावदानें खरिदी केली.

[7-2-1768

छ १७

कचो रघुनाथाचे जागी जनार्दन हरि यांस पुण्यांत निरखाचे कामावर नेमिले व कचो रघुनाथास, व्यापाऱ्यांच्या मापावजनांवर छाप मारण्यास व खुणा करण्यास लागणारे शिक्के वगैरे सर्व सामान जनार्दन हरीच्या ताब्यांत देण्याविषयीं हुकूम झाला.

No. 193] [10-2-1768

छ २०

गोपिकाबाईनें सुपाऱ्या गुलाबी वासाच्या करण्याकरितां दौलताबादेस पाठविल्या.

छ २१

[11-2-1768

रू. २९, विठू गुरव नांवाच्या गवयाचा मासिक रोजमरा.

पर्वतीच्या तळ्यांतील माती काढीत असतां जखमी झाल्याबद्दल चापाजी टिळेकरांस १० रुपये देण्यांत आले.

[12-2-1768

छ २२

माहुली येथें नदींत चालविण्याकरितां नवीन नाव बांधावयास ९०० रुपये मंजूर करण्यांत आले.

[17-2-1768

छ २७

तालुके अंजनवेलचा अधिकारी, कृष्णाजी विश्वनाथ, नवीन जहाज बांधीत होता. ह्याकरितां त्यांस तीन खंडी इंग्रजी लोखंड देण्याविषयीं आज्ञा झाली.

No. 194] [19-2-1768

छ २९

हत्तींच्या खाण्यावर देखरेख ठेवण्याचे कामावर असलेल्या एका प्याद्यानें त्याच्या रतीबापैकीं कांहीं जिन्नस चार वाण्यांस विकले. हे उघडकीस आल्यानंतर ह्या चार वाण्यांस, त्या प्याद्याचें नांव सरकारांत न कळविल्याबद्दल, १०० रुपये दंड करण्यांत आला.

No. 195] [4-2-1768

छ १४ रमजान

दादासाहेबांची रोजकीर्द

इंग्रजांस देण्यांत येणाऱ्या मेजैवानीच्या खर्चाकरितां २९० रुपये नागोराव सदाशिव याचे तसलमातीस देण्यांत आले.

[5-2-1768

छ १५

हुंडनावळ खर्च मुंबईची दर सेंकडा रु. ९।।। प्रों.

[12-2-1768

छ २२

दादासाहेबांचे मेहुणे, गोपालराव व कृष्णराव बर्वे, यांची मालमत्ता जप्त करण्यांत आली. त्यापैकीं खालील दोन जिन्नस जिनसखान्यांत जमा झाले:—

(१) रुप्याच्या चौकटीचा मळसूत्री आरसा.

(२) दिशायंत्र, रुपें वजन तोले ।२.

No. 196] [16-2-1768

छ २६ रमजान

बदल देणें देवस्थानखर्च : श्रीदेवदेवेश्वर येथें सन सीतात सोन्याच्या मुलामेयाचे कलस करविलें त्यास खर्च बा। हिशेब रु.

१८११।।।≥ कलस तांब्याचा

१८०४ यैन कलस वजन पके ।३८८
दर सेरी रु. ९।। प्रों. रु.

७।।।≥ नलीमधील वजन पके
८८३।।२। दर सेरी रु. २। प्रों रु.

१८११।।।≥

५३०३।।।≈ मुलाम्यास खों सोनें वजन तोले ३३२।।।॰।।
दर १५।।।≈ प्रों रु.

No. 197]

६५५ देणे मजुरी कारीगार यास

३२६ देणे वर्खवाला यास वर्खाची घडाई सोनें वजन तोले ३२६
दर तोल्यास रु. १ प्रमाणें रु.

३२६ देणे मुलामगार दर तोला रुपया १ प्रमाणें रु.

३ देणे तांबटास कलस चढवितेसमई आा १२ येकून येक
रोजा रु.

७१ हऊद आभिशेकपात्राचा तांब्याचा १ केला त्यास.

६४ हऊद वजन पके ८।।५।।९ दर सेरी रु. २।। प्रो रु.

७ मलसूत्र पितलीचे वजन पके ८८२ दर सेरी रु. ३।। प्रमाणें.

७१

No. 198] [18-2-1768

छ २८ रमजान

खालील जिन्नस जिनसखान्यांत जमा झाले :—

(१) ३८ रुपये किंमतीच्या, घड्यालांच्या कमाणा १३.

(२) २४ भिंगे घड्यालांची, किंमत रु. १२.

No. 199] [20-3-1768—18-4-1768

माहे जिलकाद सुा समान सितैन मया व अलफ
पेशव्याची रोजकीर्द

[21-3-1768

छ २

राजश्री राव यांजकडे उपनेत्रें भेटीचीं आलीं तीं बांधावयासी रुमाल खादीचा १.

[22-3-1768

छ ३.

वैद्यखान्याकडे चार लहान कातड्याच्या बुधल्या २ रुपयांस विकत घेतल्या.

बालाजी नरहर, पंतोजी निा नाटकशाला, यास सन संमानचे मोइनीचे कापड

[1-4-1768

छ १३

जिराइतखान्याकडे जानोजी सिंदे व आपाजी बहिरट यांचे ताा बंदुखा आहेत व पिस्तोले आहेत.

No. 200] [3-4-1768

छ १५

खाशाकडील घड्यालास ५ आणे किंमतीची कांच बसविली.

[7-4-1768

छ १९

सौभाग्यवती रमाबाई यांचेकरितां पितळी मुठीचे दोन चाकू १० आण्यास विकत घेतले.

[8-4-1768

छ २०

पुण्यांतील, सयद सादत व शेख सला, ह्या दोन पिराना इमारत बांधण्याकरितां १४०० रुपयांची देणगी देण्यांत आली.

[10-4-1768

छ २२

पुण्याची हुंडी बनारसमध्यें शेकडा ८ हुंडणावळ घेऊन पटविली जात असे.

No. 201] [13-4-1768

छ २५

शेख हुसेन यानें मेणाचे केलेले एक फुलझाड पेशव्यास नजर केले. ह्याबद्दल पेशव्यानें त्यास एक तिवट बक्षिस दिलें.

[17-4-1768

छ २९

बाबत हाफिनुदि(न) सुरतकर याणी मीरकासम वकील याजबाा दागिने पाठविले:—

१ बंदूख चापाची बतीस बाराची साधी, कट इंग्रजी तांबे.

३, तांब इंग्रेज करून मराठे गाडदी दिंमत जानोजी सिंदे यास कवाईत करावयास ठेविला आहे सा टोपी फिरंगाणी खा करून दिल्ही त्याची किंमत रसानगी यादी रु.

No. 202] [*25-9-1767—24-10-1767*

माहे जमादिलावल सुा समान सितैन मया व अलफ

दादासाहेबांची रोजकीर्द

परगणे त्रिंबक येथील न्हाव्यांवरील वार्षिक कर ४० रुपये करार करण्यांत आला.

दादासाहेबानीं आनंदवल्लीस तोफांचे गोळे तयार करण्याचा नविन करखाना सुरू केला. अशाच प्रकारचा कारखाना पूर्वी नागोठण्यांस होता.

आनंदगीर गोसावी यानें एका कलावंतिणीस बळजबरीनें आपल्या घरांत ठेविली म्हणून त्यास १५०० रु. दंड करण्यांत आला.

No. 203] [*25-9-1767—24-10-1767*

माहे जमादिलावल सुा समान सितैन मया व अलफ

दादासाहेबांची रोजकीर्द

दादासाहेबांच्या दोन पुस्तकशाला होत्या; एक आनंदवल्लीस व एक त्र्यंबकेश्वरीं.

शत्रवइद्य यांचा अर्ध्या महिन्याचा पगार:—

रु. ११।· बडेखान.

रु. ११।· राजे महमद.

रु. ९ राजे मलिक.

रु. ७॥· साहेबखान.

No. 204]

तुकोजी होळकराकडून परत येणारे दोन जासूद वाटेंत लुटले गेले. त्या जासुदांना नुकसानभरपाई म्हणून ८ रु. देण्यांत आले.

सातान्यास छत्रपतींकडे पुण्याहून एक वाघ पाठविला. वाटेनें त्या वाघास दररोज तीन शेर मांस देण्यांत येत होतें. मांसाचा भाव, एक रुपयास ६ शेर.

आनंदराव गिरिधर हा पेशव्याचा वकील म्हणून कोल्हापुरास जिजाबाईजवळ राहात होता.

७५।॰ रु. किंमतीची सनगें झगे चुणणाऱ्यास, त्याची वार्षिक नेमणूक म्हणून, देण्यांत आलीं.

१५ रु. किंमतीची वस्त्रें पुण्यांतील दोन पिरांकडून पेशव्यास आशीर्वादादाखल आलीं.

No. 205]

गंगाधर येसवंत याणी कोा पुणें येथें खरिदी घोडी रास येक येकूण किंमत रु. ३००० तीन हजारास केली आहे. त्यास, जकातीचा हासील मारनिले यास येक साला माफ केला असे. तरी सदरहू किमतीचा हासील होईल तो मारनिलेचे नांवे माफखर्च लेहून हासिलाचा तगादा न करणें.

काशी येथील ब्राम्हणांच्या वार्षिक दक्षणेकरितां १३५०० रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली.

माहादाजी मुदगल याणें खोटे सिके केले सा त्यास दौलताबादचे किल्यांत कैदेंत ठेवण्यांत आले.

No. 206]

बाज पक्षाचा दररोजचा खुराक: मांस अर्धा शेर.

बहिरी पक्षाचा दररोजचा खुराक: मांस अर्धा शेर.

बसेरा पक्षाचा दररोजचा खुराक: मांस ९ टाक.

No. 207] [27-12-1767—21-1-1768

माहे साबान सुा समान सितैन मया व अलफ

दादासाहेबांची रोजकीर्द

छ ५

टीकेसहित योगवासिष्ठ या ग्रंथाची बरोबर नक्कल करण्याचे कामाबद्दल एका ब्राम्हणांस ४०० रुपये करार करण्यांत आले.

[28-12-1767

छ ६

दादासाहेबांकडील एक खंजीर त्यांच्या एका खिजमतगारानें हरविला. त्या खंजिराची किंमत म्हणून त्या खिजमतगाराकडून ३० रु. घेण्यांत आले.

[30-12-1767

छ ८

बाजी गणेश याच्या देखरेखीखालीं असलेल्या बागांकरितां रु. ६२५-२-९ मंजूर करण्यांत आले.

रु. ४॥ ते ६, माळ्याचा मासिक रोजमरा.

No. 208] [4-1-1768

छ १३

नाटकशालांच्या मासिक खर्चाकरितां रु. ७२१-१३-६ मंजूर करण्यांत आले.

[5-1-1768

छ १४

हुजूर दप्तराकडील कारकुनानीं कांहीं लिहिण्याचें काम विशेष जलदीनें करून दिले. ह्याबद्दल त्याना त्यांच्या नेहमीच्या पगाराशिवाय निराळे बक्षिस देण्यांत आलें.

[8-1-1768

छ १७

मुंबईकर इंग्रजांकडून खालील जिन्नस नजर आले:—

(१) चार लहान कुप्यांत तीन तोळे विलायती अत्तर
(२) आरसा मलमुत्री दुहिरी
(३) चित्रे दर्याची, २४
(४) चांदीची गाय, किंमत रु. ११-८
(५) सोन्याची साखळी, वजन तोळे १२॥, किंमत रु. १८७-८

No. 209] [9-1-1768

छ १८

यात्रेनिमित्त झालेल्या कर्जातून मुक्त करण्याकरितां त्रिंबकराव विश्वनाथ (पेठे) यांस २५००० रु. बक्षिस देण्याचा हुकूम करण्यांत आला.

No. 210] [12-1-1768

छ २१

जमा जिनसखाना :—

खरेदी सूर्यघड्यालें गुा यादो विठल कोर्डा शागीर्द किंमत रु. १९० येकून दागिना किलीसमेत सुमार १.

[14-1-1768

छ २३

नवीन जंबुरे तयार करण्याकरितां ३०० रु. मंजूर करण्यांत आले.

[16-1-1768

छ २५

मुंबईच्या चार्लस् ब्रूम (ब्रुक?) नांवाच्या इंग्रज वकिलांस निरोप देतेसमयीं ५०० रु. देण्यांत आले.

[20-1-1768

छ २९

कलकत्तेकर इंग्रजानीं दादासाहेबांस दोन काचेचे हुक्के नजर पाठविले.

No. 211] [23-12-1767—21-1-1768

माहे साबान सुा समान सितैन मया व अलफ

दादासाहेबांची रोजकीर्द

[8-1-1768

छ १७

जमा जिरायतखाना :—

१ बंदूख, नलीवर शाहाता व दस्त्यास निशाण रुपेरी.

२ पिस्तुलें, यास जबडे सिंव्हाचे रुपेरी मलसुत्री.

१ कमची तातीची चर्मी.

No. 212] [10-1-1768

छ १९

रु. ६, १०० भांड्यांस कल्हई लावण्याबद्दल.

[12-1-1768

छ २१

घोड्याची लाथ लागून जखमी झाल्याबद्दल एका नोकरांस ४ रुपये देण्यांत आले.

No. 213] [22-1-1768—19-2-1768

माहे रमजान सुा समान सितैन मया व अलफ.

दादासाहेबांची रोजकीर्द

दादासाहेबाकडील हत्तींची नांवें :—

उत्तमगज, विनायकगज, गजराज, मुलाइमगज, करीमबक्ष, रांबाण, गणेशगज, भवानी, बक्याहती, महबूबगज, बहादरगज, नबीबक्ष, गजघंटा, राजबागीण, लक्ष्मीसीमधार.

No. 214] [22-1-1768—19-2-1768

[31-1-1768

माहे रमजान सुा समान सितैन मया व अलफ

छ १०

पुण्यांतील बागेंत लावण्याकरितां औरंगाबादेहून ७५ रुपयांस २५ सरूची झाडें आणविण्यांत आली.

[2-2-1768

छ १२

छ ११ रोजीं नाना फडणिसानी पेशव्यांस बागेंत मेजवानी केली. त्यासमयीं त्यानीं पेशव्यांस ७०५ रु. ५ आणे किंमतीचा एक सोन्याचा चौफुला नजर केला. ह्या चौफुल्याचा आकार चार आंब्यांच्या घडासारखा होता.

एक घोडा फार खराब झाला होता. म्हणून त्यास तुपाउडदाचा खुराक सुरू करण्यांत आला.

[5-2-1768

छ १५

बाजेखर्च राजश्री नारायेणराव याजकडील हातघड्यालास लावावयासी ताा जिवाजी काटकर खिजमतगार तेल चमेली वजन पके ८८८१.

No. 215] [6-2-1768

छ १६

खाशाच्या पलंगास लावावयासी तेल मोगरेल वजन ४॥ तोले.

[7-2-1768

छ १७.

गोपिकाबाई यांजकडील घड्याल नादुरुस्त झाल्यामुळें गोपालजी कारीगर याजकडे पाठविण्यांत आले.

द्वारकाबाई, पार्वतीबाईची आई.

लक्ष्मीबाई, पार्वतीबाईच्या भावाची बायको.

गौतमाबाई, पार्वतीबाईची मामी.

ठमाबाई
ठकूबाई
आनंदीबाई
बयाबाई
} पार्वतीबाईच्या बहिणी.

सात बिनवेजाची लहान मोतीं, देवीवरील औषध बनविण्याकरितां, एका गृहस्थाला देण्यांत आली.

No. 216] [*13-2-1768*

छ २३.

राजश्री रावसाहिब यांजकडील गंजाचे घड्याल.

[*18-2-1768*

छ २८.

गोपिकाबाईकरितां एक वालुकायंत्र तीन रुपयांस खरिदी करण्यांत आलें.

No. 217]

बाजेखर्च राजश्री नारायेणराव यांजकडील हातघड्यालाचे झाकण मखमलीने मढून दिल्हे. बेत गुा रघोजी जिनगर दिा पागा हुजूर ताा जिवाजी काटकर खिजमतगार मखमल तसू ८१ योा दर ३० प्रमाणे आख १।

महमद इसफ गाडदी यांस पालखीचा मान होता.

No. 218] [*20-3-1768—18-4-1768*

[*4-4-1768*

छ १६

माहे जिलकाद सुाा समान सितैन मया व अलफ

दादासाहेबांची रोजकीर्द

दादासाहेबांची स्वारी सवदगांवी गेली असतां तेथील पाटील त्यांस सामोरे आले नाहींत. ह्या अपराधाबद्दल त्या पाटलांस ५ रु. दंड करण्यांत आला.

[15-4-1768

छ २७.

आबाजी महादेव व चिंतो विठ्ठल यांस कांहीं बिघे जमीन बागाईत करण्याकरितां देण्यांत आली व असेंहि फर्मावण्यांत आले कीं, पुढें ह्या जमिनीवर जिराईत जमिनीवरील साऱ्याच्या चालू दरानेंच सारा घेण्यांत यावा.

ITEM No. 13 : 1772-1773

No. 219]

[10-5-1772

१० सफर

आपाजी रामाची बायको सती गेली

[12-5-1772

८ सफर

वसंतपूजेनिमित्त ब्राह्मणास दक्षणा दिली.

हजर असलेल्यांचीं नांवें.

बालकृष्णशास्त्री	
रामशास्त्री	गंगाधर सुबराव
कृष्णशास्त्री	गोपालशास्त्री
आपाशास्त्री	लक्ष्मण पाठक
आनंदकर मिस्त्र	बापू पाठक.
कासीनाथशास्त्री	महादेवशास्त्री

[25-5-1772

२१ सफर

कृष्णराव जगन्नाथ पेशव्याचा अर्काटकडील वकील. यासी बहुमानाचीं वस्त्रें.

[27-5-1772

२३ सफर

मेहता मोहकिमसिंग जोधपूरचा वकील, यासी बहुमानाचीं वस्त्रें २५०

[8-6-1772

६ रबिलोवल

गडगनेर खर्च विश्वासराव त्रिंबक पेठे यांचे पुत्राचे लग्न आहे सबब

तिवट जाफरखानी.

¶*The entries for the year 1772-73 are also highly important, as it was in this period that the Peshwa Narayanrao was murdered.*

No. 220] [*10-6-1772*

८ रबिलावल सल्लास सबैन

कृष्णाजी विश्वनाथ याचे नांवे सनद की माणकजी मोधी सुरत दिा काप्रोजी इंग्रज याचे तराडे बनाम रुपारेल आजणवेली तालुक्यात मालसुधा अटकाविले आहे. त्यास तरांड्यातील माल अमानत ठेवणे. मालाची तहकीकात झाल्यावरी जाबस्वाल करणे तो केला जाईल. तूर्त फक्त तरांडे कठडा मात्र अकटा अवंदा दोन डोल परवान सिडे तोफा वगैरे सरंजाम नवे जुने रसे असतील त्यासुधा माघारे देविले असे. तरी सदरहू लिहिल्याप्रमाणे सरंजामसुधा तरांडे माघारे देऊन कबज घेणे म्हणौन सनद.

[*14-6-1772*

१२ रबिलोवल

भिकोबा वैद्य, वार्षिक तनखा १००० रु.

[*17-6-1772*

१५ रबिलोवल

कासी त्रिंबक यासी खाली दिलेल्या किल्यावरी सामुग्रीची तपासणी करण्याकरितां पाठविले.

लोहगड	घनगड
सरसगड	राजमाची
विसापूर	प्रतापगड
मिरगड	चन्दनगड

[*20-6-1772*

१८ रबिलोवल

नानासाहेबांच्या पुण्यतिथीचा खर्च ६३१८

[1-7-1772

२९ रबिलोवल

जानोजी भोसले याचेकडे बाळापूर परगणा देण्यांत आला. परंतु लवकरच सनदापत्रावर सह्या होण्यापूर्वीच जानोजी मरण पावला. तो प्रांत मुधोजी भोसले याजकडे देण्यात आला.

No. 221] [6-7-1772

४ रबिलाखर सल्लास सबैन

तोतया सुखनिधान दौलताबादेस होता. किल्ल्यावरील महादजी दादाजी चव्हाणाशी त्याचे सूत जमले या संशयावरून त्याची रवानगी पुरंदरला करण्यांत आली.

[12-7-1772

१० रबिलाखर

चिकोडीचा तावनापा नाईक हैदरला मिळण्याकरिता जात असतां पकडला गेला. ५००० रु. दंड घेऊन त्याला सोडण्यांत आलें.

[14-7-1772

१२ रबिलाखर

राजेश्वर वैद्य यास १५० रु. दरमाहा वेतन

[22-7-1772

२० रबिलाखर

राणोजी सलगर याच्या पथकास आपाजी सदासिव व लक्ष्मण पांडुरंग यांची फडणीस व मुजुमदार अशी नेमणूक केली होती. राणोजी सलगर व फडणीस-मुजुमदारांचे पटेना म्हणून त्यांस कामावर न येण्यासंबंधीं त्यानें फर्माविले. सरकारांत हे कळल्याबरोबर राणोजी सलगर यास त्यांकडून पूर्ववत काम घेण्यासंबधी हुकूम देण्यांत आला.

[27-7-1772

२५ रबिलाखर

लक्ष्मण नारायण वैद्य यास आरण्यकांड व अयोध्याकांड यांतील १३४३३ श्लोक नकल करण्याबदल रु. ६७.

No. 222]

[9-8-1772

१ जमादिलावल

मोरो बापूजी फडके याची सुवर्णदुर्ग तालुका किले सुभा—नेमणूक

[4-10-1772

६ रजब

बाा देणे ताा आपाजी हरी याजकडे रायगड येथील मोर्चेबंदीबद्दल रसानगी यादी सामान

काथा वलीव

लोखंडी दागिने

कुदली कुराडी

पावडी कोइते

पाहरा चंद्रज्योती

No. 223]

[7-10-1772

सलास सबैन

९ रजब

बनेश्वरच्या देवळाच्या खर्चाकडे ४६१ रु. मंजूर केले असेत.

[8-10-1772

१० रजब

सुरापूरचे पामनाईक व पीडनाईक याजकडून खंडणी ८५००१

[9-10-1772

११ रजब

पाहुण्यानिमित रसानगी खर्च :

४२–८–० जिऊबाई गोडबोले, पार्वतीबाईची मावशी

[10-10-1772

१२ रजब

कापड ३८-१०-०, गोपिकाबाई, सगुणाबाईची भावजय

[2-9-1772

४ जमादिलाखर

पुण्यांत खाटकाने गाय मारली. कोतवालीकडील कारकून बालाजी दत्तात्रय यानी लांच खाऊन ती गोष्ट दाबण्याचा प्रयत्न केला. ते बैलाचे मांस असून

तळेगांवाहून आणले असें भासविण्याचा प्रयत्न केला पण त्याचा गुन्हा उघडकीस आला. तेव्हा त्यास दंड करण्यांत आला. जातिबहिष्कृत करून काशीयात्रेचे प्रायश्चित सांगण्यांत आले.

[14-9-1772

१६ जमादिलाखर

विठोजी बिबवा यासी पत्र, गंगापुरी येथील इमारतीच्या कामाचे हिशोब तपासल्याबद्दल.

[19-9-1772

२१ जमादिलाखर

प्रीतिसिंग बुंदेले मरण पावले. त्याच्या मुलास २१००० ची सूट देण्यात यावी म्हणून बाळाजी गोविंद यासी पत्र.

पेशव्याचे संगमनेर येथील बाग :

खास बाग

बाराव बाग

रुस्तुम बाग

No. 224] [24-9-1772

२६ जमादिलाखर

रामचंद्र सिवाजी कमावीसदार तालुके सोलापूर यासी पत्र. कलपा काटकर तुळजापूर येथे जत्रेकरितां गेला. परत येताना त्याच्या बरोबरीच्या लोकाना चोरानी लुटले आणि १२००० रु. चा माल लांबविला. चोरांची टोळी मौजे मसले येथील असावी असा त्याचवेळीं कांहीं जणाना संशय आला. कांहीं दिवसानीं त्या टोळींपैकीं एक जण पकडला गेला. यावरून कमावीसदार यासी हुकूम देण्यात आला कीं गुन्ह्याची चौकशी व्हावी व मसले येथील लोकांना योग्य शिक्षा देण्यांत यावी.

[26-9-1772

२८ जमादिलाखर

बालाराम मणिराम याने ब्राह्मण स्त्रीवर बदनजर ठेविली यास्तव त्यास १००० रु. दंड करण्यात आला. दंड वसूल करण्याकरतां त्याचें घरदार विकून मालमत्ता जप्त केली.

2534

देणे नवाब निजामअलीखान यास विा राजश्री रावसाहेब छ १७ रोज उदेसिंग खिजमतगार याजबरोबर पाठविले घड्याल थोरले रागमालिकेचे बाा स्वारी विसाजी कृष्ण प्रांत कर्नाटक पैकी फुलचरी बाा फिर्गाणी सामान सुधा किमत रु ५०००.

हैदराशी तह झाल्यावर सरदारखान व मीर रेजा यासी मुक्त करण्यांत आलें. परत जातांना त्यासी मोलवान वस्त्रें देण्यांत आलीं.

No. 225]

[*3-12-1772*

नारायणराव पेशवे.

७ रमजान सलास सबैन

नवलसिंग जाट याजकडील बातमी पुरविण्याकरिता भगवंत गोविंद यास नेमले असे.

शेवकराम झाबेताखानाकडील बातमीकरता.

[*6-12-1772*

१० रमजान

साताऱ्याहून छत्रपतींनीं पेशव्यास नजर केलेली हत्यारे दागिने वगैरे :

ढाल
तलवार म्यानासहित
तेगा
जवाहीर ५०
पाच ४
जवाहीर १६
पेटी
खुरास
रत्नखचित तलवार
कमरपट्टे २

खर्च पोतापैकी

दिमत हुजर राज्यास नजर व धनीस	१८१-०-०
श्रीशाहु छत्रपति माहाराज यांच्या सिहांसनाजवळ ठेविले	८१-४-०

[15-12-1772

१९ रमजान

बालाजी निब्रज याने सरकारात येऊन विदित केले कीं आपला भाऊ सदासिव मरण पावलेमुळे आपण संकटांत आहो. तरी घरपटी आपणास माफ असावी. यावरून त्यास ६२९ रु. घरपटी माफ करण्यात आली.

[18-12-1772

२२ रमजान

सदासिवभट नानल वैद्य याच्या औषधाने छत्रपतीस उतार पडला सबब त्यास नसरापूर ताा खेडेबार येथे एक चावर जमीन इनाम.

No. 226] [20-12-1772

२४ रमजान

निंबगाव वाघा पाा पारनेर हे अंताजी माणकेश्वर याची स्त्री आऊबाई इजला इनाम दिले आहे; तरी तिला उपसर्ग न लागू देणेबाा पत्र कमाविसदारास॰

छत्रपति माहाराज यासी मेजवानी देण्यात आली त्यासमयीं नाच झाला.

नाचणारींची नावें.	मोहिना पालकर
चंदा नाइकीण वदनकर	मिरा पालकर
पिरा ,, पनालेकर	हिरा पालकर
आछा ,, कोलेकर	अना सातारकर
सदा ,, खेडकर	
जैना ,, ,,	
मैना ,, ,,	
आनंदी सुपेकर	
सगा सुपेकर	
गुलाब पुणेकर	

[21-12-1772

२५ रमजान

परत जातेसमई पेशव्याने छत्रपतीस केलेली नजर

२५०– ०–०	मंदील
६१८–१२–०	चादर बादली
२१३– ०–०	झगा बादली
२५०– ०–०	किमखाप
६०– ०–०	पटका

सवाल सल्लास सबैन.

No. 227] [29-12-1773

४ सवाल

रघूजी आंग्रे यासी पत्र, इंग्रजाचे आरमार विजदुर्गाच्या आसपास घिरट्या घालीत आहे तरी सावध राहणेबदल.

[2-1-1773

८ सवाल

टॉमस मॉस्टिन याजकडून नव्या पेशव्यास सन्मानाचीं वस्त्रें.

[13-1-1773

१९ सवाल

रेवदंड्याहून आलेल्या एका इंग्लिश वैद्यास दरमहा रु १५०

[23-1-1773

२९ सवाल

दाऊदशाह फकीर याजकडून गाय मारण्याबदल दंड रु ६०

विष्णूच्या देवळाच्या छताला सोन्याचा मुलामा केला सबब खर्च १४–९–६.

गवत कापणाऱ्या लोकास गवत कापणेबद्दल १००० पेंड्याना २ रु मिळावे. त्यांच्याकडून फुकट काम घेऊ नये म्हणून पागास सनद.

No. 228] [26-1-1773

२ जिल्काद

सर्वोत्तम शंकर यासी सनद

बापूभट घारपुरे याने नाशिक येथे श्री हरिहरेश्वराचे देऊळ बांधले. त्याच्या खर्चाकरता पा नाशिक अगर वणदिंडोरी परगण्यातील ४०० रुा चे गाव देण्यात यावे म्हणून सनद.

१

No. 229] [24-2-1773

२ जिल्हेज

१७७३ मधील कापडपेठेंतील व्यापाऱ्यांचीं नांवे

१ आबाजी नाईक कांब्रस

२ रामचंद्र नाईक परांजपे

३ बापूजी गोविंद दातार

४ कृष्णाजी नाईक दातार

2537

५ बाबूजी नाईक दातार
६ आपाजी हरि जोशी
७ नारोबा नाईक नातू
८ रंगो महादेव खुमकर
९ मल्हार नाईक कान्हेरे
१० विठोबा नाईक काले
११ श्रीनिवास नाईक तांबेकर
१२ गोपाल बलाल साने
१३ बालाजी गोविंद जोसी
१४ वेकांजी नाईक तरलेकर
१५ कासीनाथ नाईक अनगळ
१६ चिमाजी नाईक कोले
१७ बालपा नाईक पुराणिक
१८ आपाजी नाईक सांडू
१९ जगन्नाथ गंगाधर गोळे
२० नारोबा नाईक घुगरी
२१ बालाजी नाईक साखरे
२२ रामाजी हरि भिडे
२३ बनपा ना॥ अनगल
२४ कृष्णाजी ना॥ कडु
२५ केसोबा ना॥ सोहोनी
२६ रामनाथ ना॥ घुगरी
२७ भिकाजी गोविंद गोडबोले
२८ कृष्णाजी भैरव थते
२९ केसोबा नाईक कागदी
३० सिधोबा नाईक बेहरे
३१ छबिलदास ब-हाणपूर
३२ माधवदास गोडीदास
३३ केशवभट कर्वे
३४ नारोबा नाईक ओक
३५ त्रिंबकराव दिक्षित
३६ धोंडो कासी कुंटे
३७ बहिरवभट थते
३८ रंगो नारायण करकरे
३९ शामजी गोविंद तांबेकर
४० रामजी बापूजी साठे
४१ त्रिंबक रामजी अनगळ
४२ वेकांजी माणकेश्वर
४३ नारोबा नाईक कावले
४४ पाडुरंग नाईक नवरे
४५ हरबाजी ना॥ वानवळे
४६ केसोबा ना॥ करमरकर
४७ लक्ष्मण ना॥ चाबूकस्वार
४८ पांडोजी लकडे
४९ कासीनाथ ना॥ थोरात
५० मार्तंड ना॥ तासके
५१ आबाजी ना॥ तासके
५२ रामजी ना॥ दातार
५३ महादोबा ना॥ मेढे
५४ कृष्णाजी वेंकाजी तांबेकर
५५ वेंकाजी ना॥ बेहरे
५६ कृष्णाजी ना॥ भावे
५७ त्रिंकब ना॥ मालपूरकर
५८ निंबाजी ना॥ दसपुत्रे
५९ दिनानाथ ना॥ महाजन
६० वाघोजी बागडे
६१ सिवराम ना॥ भिडे
६२ आपाजी शंकर भिडे
६३ नारो भैरव मेहेंदळे
६४ गंगाधर ना॥ वानवळे
६५ रामाजी ना॥ कानडे

६६ बाबूदेव पैठणकर
६७ महादजी जिवाजी परांजपे
६८ गोपाळ नाईक कानडे
६९ सखाराम ना। भिडे
७० संभू ना। पारगावकर
७१ केसोबा ना। सोराटी

No. 230] [*27-2-1773*

९ जिल्हेज

उत्तर हिंदुस्थानातून मराठ्यांचा विजय होऊन पादशाहाशी तह झाला हे वर्तमान आणण्याबद्दल जासुदास ५० रु. बक्षीस.

मोतीगज व मनोहर, हे पेशव्याचे दोन हत्ती आजारी असताना जेजुरीच्या श्रीमार्तंडास नवस करण्यात आला. ते हत्ती बरे झाल्यानंतर श्रीस ४०० रु. भंडारा व मेवामिठाई वाटण्यात आली.

[*4-3-1773*

१० जिल्हेज

हातगडचा किलेदार खोजे दायम यासी मौजे कलवण बु।। पा। वोतूर प्रा। बागलाण हा गाव इनाम देण्यात आला. त्याला औरस संतती नव्हती. त्याचे मृत्यूनंतर त्याचा लेकवळा जो होता त्याने आपल्या नावे गावची सनद करून घेतली. किल्लेदाराच्या विधवेने ही गोष्ट सरकारच्या नजरेस आणून दिली तेव्हां पूर्वीची सनद रद्द करण्यात येऊन त्याच्या विधवा बायकोस सालिना १००० रु. वर्षासन देण्याचे ठरले.

[*5-3-1773*

११ जिल्हेज

सासवडच्या शिंप्यापैकी गंगाजी सर्वज्ञे याने लग्नामध्ये जातिबाह्य वर्तन केले. पुणे येथील शिंप्याच्या जातीने त्याच्याबरोबर जेवण केले. हे सासवडच्या शिंप्याना पसंत न पडून त्यानी ही गोष्ट जातपंचापुढे मांडली. पंचानी पुण्याच्या शिंप्याना १५००० रु दंड ठरविला आणि सासवड्याच्या शिंप्यानी सरकारांत १०००० रु. भरणा करावा असे ठरले.

No. 231] [*6-3-1773*

१२ जिल्हेज

कृष्णराव बळवंतराव यास त्रिंबकराव विश्वनाथ याजकडे कर्नाटकांत रवाना केले. वाटेत खर्चाकरिता त्याने हरपनहल्लीच्या सोमनाइकाकडून २५००० रु. घेतले. तेवढ्या रकमेची सोमशेखर नाइकास सूट.

[8-3-1773

१४ जिल्हेज

धारवाडच्या कमाविसदाराचे हिशोब तपासण्याकरिता ४ कारकून रवाना केले.

[9-3-1773

१५ जिल्हेज

अम्बादास जिवाजी याला राहुरी पा संगमनेर येथें दिवाण नेमण्यात आले. संगमनेरच्या कमाविसदाराने त्यास कामावर घेण्याचे नाकारले. अम्बादासने पुण्यास तक्रार केली. तेव्हां त्यास कामावर घेण्यासंबंधी पुण्याहून हुकूम देण्यात आला.

[10-3-1773

१६ जिल्हेज

मातुश्री गोपिकाबाई इच्या खाजगत खर्चासाठी

१ म्हसुल
२ सुकेणे
३ वडनेर, ही गावे देण्यात आली.

[13-3-1773

१९ जिल्हेज

बालकृष्ण नारायण नेने याची स्त्री, पार्वतीबाई इची बहीण, ईस रजोदर्शन प्राप्त झाले सबब वस्त्रे कि. २८२-१-२०

प्रचारात असलेल्या तेव्हांच्या कांहीं मोहरांची नांवें.

१ औरंगाबादी	रुजू शाहाजानी गैरसाल	
२ नादरशाही	७ हैदराबादी	१२ सुर्ती
३ प्रयाग	८ अजमेर व मथुरा	१३ इटावा.
४ तुगच्या	९ अलजपूर	
५ कुन्याच्या	१० भावनगरी	
६ मल्हारशाई	११ बासबरेली	

ITEM No. 14 : 1795-1796

No. 232] [19-7-1795

छ २ मोहरम सीत तिसैन

१८ मेस्त्र मालिट् वकील दिा इंग्रज कलकत्तेकर याणी मुंबईहून वाघ दोन सरकारात पाठविले त्यांजबाा खर्च.

¶*Mr. Malet presents to the Peshwa two tigers brought from Bombay. The years 1795-96 mark a great transition in Maratha politics and consequently the entries for these years throw new light on many incidents and occurrences in the Peshwa's kingdom.*

No. 233] [29-7-1795

छ १२ मोहरम सीत तिसैन

बक्षीस खर्च देणे पहिलवान याणी वाड्यांत कुस्त्या घेतल्या; सबब सोने वजन तोळे १८८।॰ नरसोबा पंतोजी ब्राम्हण पहिलवान दिा दौलतराव सिंदे यासकडे १ येकूण किंमत रुपये ३१४।.

[31-7-1795

छ १४ मोहरम

ग्रहणाचे पूर्वी वेधात त्रितीय प्रहरी दिवसास उपहार केला साा तज्जनित दोषनिरशनार्थ प्राजयापत्य प्रत्याम्नाय गोनिष्क्रयार्थ दान समस्त कर्वे उपाध्ये यास दिल्हे त्यास तुकडा सोन्याचा येक दर तोला रुपये १९। प्रो.

[11-8-1795

छ २९ मोहरम सीत तिसैन

देणे मेस्त्र डंकीण जनराल श्रीकासी दिमत इंग्रज कलकत्तेकर यांस सरकारांतून वस्त्रें पाठविली; त्याजबरोबर बालाजी जनार्दन फडणीस याणी रुबरू पाहून जगंनाथ हरि कारकून निा कासी बल्लाल यासमागमे सिरपेच पाठविला; तसलमात खुद किंमत रुपये २९०॥॰

No. 234] [5-9-1795

छ २० सफर सीत तिसैन

दफाते बाळाबाई शितोळे, माहादजी शिंदे यांची कन्या इजसाठीं साडी-चोळीबद्दल पोा मजकुरपैकीं येक गांव कमाल आकाराचा रुपये १००० चा करार करून हे सनद सादर केली असे म्हणोन लक्ष्मण हरि काादार पोा बोदवड प्रांत खानदेश यांचे नांवे सनद १

दौलतराव शिंदे याणी हुजूर विनंती केली कीं आपले तीर्थरूप कैलासवासी माहादजी शिंदे याचे छत्रीचे खर्चास येक गांव नेमून देविला पाहिजे म्हणोन त्याजवरून मौजे उरली ताा साडस प्रां पुणे २०९० रुपये कमाल बेरजेचा मारनिलेकडे छत्रीचे खर्चास करार करून देऊन हे सनद तुम्हास सादर केली असे म्हणोन रामचंद्र नारायण यांचे नांवे सनद १.

[7-9-1795

छ २२ सफर

जामदारखाना

२३०० खांसा परशराम रामचंद्र यांस नवाब निजामअल्लीखान याचे लढाईत जखम लागली व मारनिलेस सरकारांतून चौघडा दिल्हा सबब वस्त्रे खाजगी राजश्री रावपैकीं. सनगे येकूण आंख

१८० तिवट १

१२६० दुपटा १

१६० झगा धुवट १

७०० तुंबा किमखापी १

२३००

१५१ विसाजी नारायण वाडदेकर यास जखमेची वस्त्रे सनगे आख

४९ तिवट १

१०२ सेला जाफुरखानी

१५१

२४५१

No. 235] [9-9-1795

छ २४ सफर

रत्नशाळा देणे पटवर्धन मंडळी याजकडील लढाईत जखमी झाले त्यांस राजश्री राव याणी दागिने दिल्हे किमत रुपये २४००

१ रामचंद्र परशराम यांस सन आर्बा तिसेनात कोल्हापूरचे लढाईत जखम लागली होती साठीं बहुमान कंठी मोत्याची किंमत रुपये २०००

१ खासा चिंतामणराव पांडुरंग यांस कंठी रुपये २०००

१ गंगाधरराव गोविंद याचे पुत्र घरास गेले साठी त्याचे सिरपेच परशराम रामचंद्र याजवळ दिल्हे किंमत रुपये ४००

१ नारायणराव गंगाधर यांस सिरपेच.

No. 236]

१ माधवराव गंगाधर यांस सिरपेच.

१ श्रीपतराव मोरेश्वर यांस सिरपेच.

१ रघुनाथराव निळकंठ कुरुंदवाडकर घरास गेले साठीं सिरपेच किंमत रुपये १००० परशराम रामचंद्र याजवळ दिल्हा.

१ हरि परशराम यांस सिरपेच १

१ माहादाजी परशराम यांस सिरपेच १

१ गणपत परशराम यांस सिरपेच १

No. 237] [13-9-1795

छ २८ सफर

किरकोळ

१२० अबदुल रहिम वा शेख अहमद औरंगाबादकर घड्याळाचा कारागीर यांस रोजमुरे येकमाही रसानगी याद. रुपये ६० छ १ मोहरमचा, ६० छ १ सफरचा;

४५ शेखअल्ली शस्त्रवैद्य-दिमत हुजरात यांस रोजमुरा दुमाही छ १ सफरचा रा याद रुपये

No. 238] [21-9-1795

छ ७ रबिलावल

किरकोळ

१२ धर्मादाय विद्यमान राजश्री राव: ज्वर येत होता साठीं बारा दिवस स्नान संध्या अंतरली. तज्जनित दोषनिरसनार्थ द्वादश सहस्र गायत्रीजप करावयास भास्करभट टुल्लु त्रिंबककर लाविले होते त्यास दर हजारी दक्षणा रुपये १ प्रमाणें.

No. 239] [10-10-1795

छ २६ रबिलावल

देणे रामसिंग बोस सिलेदार यांस साल गुदस्ता निजामअल्लीखान याचे लढाईत जखमा लागल्या सा बक्षीस, विद्यमान राजश्री राव; सदरेस रुबरू पाहून दिल्हे; कडे सोन्याचे सोने बाबद तसलमात रुपये ३००.

No. 240] [18-10-1795

सीत तिसैन

छ ४ रबिलाखर मानाजी आंगरे वजारतमाब

सरखेल यांस राघोजी आंगरे मृत्यु पावले सबब सरखेलीची वस्त्रे पेशजी-प्रो विा राजश्री राव रुबरू पाहून बापूजी बावाजी अभ्यंकर यांजबरोबर पाठविले

७८	तिवट	१
३१०	दुपटा	१
३९।॥	महमुदी	१
१२०	किंमखाप	॥

५४७।॥

३॥

३०९। कानोजी आंगरे यांस

No. 241] [18-10-1795

छ ४ रबिलाखर

दफाते

तालुके झांसी येथील मांमलत रघुनाथ हरि याचे नांवे होती त्यांस ते मृत्यु पावले साठीं त्यांचे बंधु सिवराव हरि यांचे नांवे सांगितली येविसी चिटणसी पत्रे

४ तुकोजी होळकर; दौलतराव शिंदे;
अलीबहाद्दर; बाळाजी गोविंद;

७ संस्थानिक वगैरे यांस.

१ छत्रजित राजे संस्थान दतिया;
१ विक्रमाजित राजे संा वोडसे.
१ रामसिंग राजे संा नरवर.
१ रामचंद्र राजे संा चंदेरी.
१ रंजितसींग राजधर गुजर सिमथरकर.
१ माहाराज देव आहाखले.
१ अष्टभयानीस.

No. 242] [20-10-1795

छ ६ रबिलाखर

जमा

१४१२० काा खंडणी सां गद्वाल निाा राजे राम भूपाल याजकडे इाा सन इसने तिसेन ताा सन आर्बा तिसेन तीन साला खंडणीचा ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार केला आहे त्यापैकीं भरणा गुाा शेषगीरराव मेलगिरी वकील सांा मजकुर.

No. 243] [1-12-1795

छ १८ जमादिलावल

१२५ हैबतराव धायगुडे सिलेदार पागा दिाा जगंनाथ रघुनाथ यास छ १९ साबान सालगुाा नवाबाचे लढाईंत उजवे हाताचे दंडास तरवारीची जखम लागली ती बरी जाली नाही साा चवथ्याने खर्चास रसानगी यादी.

No. 244] [4-12-1795

छ २१ जमादिलावल सीत तिसैन

जामदारखाना

कमावीस भेट बाबद प्रसाद श्रीव्यंकटेश वास्तव्य गिरी यास पेशजी हरि बल्लाळ फडके याणी पटणचे स्वारीत नवस केला होता तो हरिभक्ती याचे मार्फतीने पाठविला सबब देवाचा प्रसाद आला तो गुाा परशराम दामोदर दिम्मत चिंतामण हरि, चिरा जरी १ येकूण.

No. 245] [10-2-1796

छ ३० रजब सीत तिसैन

१८९७५४ पर्वतीस रमण्यांत दक्षणा ब्राम्हणांस दिल्ही पैाा वजा रामाजी भदे शागीर्द निाा गोविंदराव निलकंठ याणे दक्षणा आपले वलखीवर सिपारस करऊन अकरा रुपये घेऊन रमण्यांत जात होता त्यास परीक्षा न घेता अकरा रुपये दिल्हे म्हणून सरकारचे खिजमतगारांनीं धरुन आणिले. त्याची चौकसी करिता विद्वान नाहीं, सबब दक्षणा माघारी घेतली ते आा १ रु. ११.

2545

No. 246] [23-2-1796

छ १२ माहे साबान सीत तिसैन (खर्च) ·

नवरात्र खर्च वाड्यांत गोंधल जाहाला; सबब गोंधळी वगैर यांस साल गुाप्रमाणे साल मजकुरी रसानगी याद चिठी छ १४ जाखर कापड आंख

५० गोंधळी यांस

२८।।। काकडे वातीस सेला साधा धुवट उतारी सनग ·।।·

१६ श्रीदेवीस लुगडे व खण मिलोन

१३। मथी माळीन इजकडून फुलाच्या माळा घेतल्या सबब.

८।।। जोगीणी उदगार घालितात त्यास आा ९ येकूण आंख

[24-2-1796

छ १४ साबान

विठू पारनेरकर गवई यांस मोईन साल गुदस्ताप्रमाणे साल मजकुरी रसानगी यादी चिठी छ ६ साबान कापड आख १२९

[25-2-1796

छ १५ साबान

६४ सोमाजी वाघ याचे भाऊ खेत्रोजी वाघ नवाब निजामअलीखान याचे लढाईत सालगुदस्ता सरकारकामास आले साा खेत्रोजी वाघ यांस रोजमुरा आठवड्यास पावत होता त्याप्रमाणे छ १ सवाल पासून याचे नावे करार करून देविला तो.

No. 247] [5-3-1796

छ २४. साबान सीत तिसैन

श्रीगणपति उत्साह खर्च कलवातिणी वगैरे यांस बिदाईखेरीज बक्षीस दुपटे दिल्हे.

वेंकट नरसी कर्नाटकी

धर्मी पारी

गंगा पखवाजी

भिकोबा गवई वाईकर सनगे यो
आंख   लुगडी
३७   १४॥, १६॥.

No. 248]   [10-3-1796

छ २९ साबान सीत तिसैन

रत्नशाळा

इजाफत जमा खासगी कैलासवासी रावसाहेब याचे खासगीकडे दागिने होते त्यापैकीं हाली कारखाने मजकुरी आणून विसाजी लक्ष्मण आपटे कारकून सिलेदार याणी जमा धरावयास सांगितले.

३ हातघड्याले खासगीकडून यैवज देऊन परभारी घेतली होती ते किंमत रुपये २७७७।.

१ प्राा गुाा बाळाजी आबाजी नेने हातघड्याल तीन काट्याचे साखली च्यार पदरी शैवटास घंटा १ व अतरदाणीचे घर येक व किली· तांबे विलाइती किंमत ६३५.

१ प्राा गुाा अबदुल रहिमान घड्यालची हातघड्याल कीटचे किमत रुपये १६९१॥.

१ डबी बाा (कट ?) दिाा इंग्रज कलकत्तेकर कर्नाटकचे स्वारीतून पाठविली ते बदामी विलाइती वर रंग निला दोरवे वजा छडी आत लहरी आहेत; झाकणाचे माथा चित्रे फिर्गाणी दोन आहेत. आत साधी घाट तांबे साा झाकणे किमत रुपये १५०

No. 249]

१ पटी पितलेची वर नली काचेची मध्यें बसविली आहे. आत पारा प्रकृती पाहावयाची बाा इग्रज पाो किमत रु. १४

१ दुर्बी नली लाहान बाा बच्याजी रघुनाथ मेहेंदले पाो घर हिर्वे चर्मी कांडी दोन पांढरी रुप्यासारखी आहेत व येक कांडे रोगणाचे हिर्वे गवसणी गजनीची रूपये १००

No. 250] [11-3-1796

छ १ रमजान

दिा सिकारखाना याजकडे पक्षीं यास चारात्रयासी ताा इमाम वाा नजरमहंमद मीरसिकारी वजन तोळे

८१ बंगाली मैनास कस्तुरी उंच

२॥।१ बाजजुरे यांसी

॥ लवंगा

।१ वेलदोडे

।१ पत्री

॥२ जाइफळ

।१ केशर

।१ कस्तुरी उंच

।१ मुाा इसंगी

No. 251] [14-4-1796

तेरिख ७ चैत्र शके १७१८

बाा देणे गाइकवाड पाा लक्ष्मण बल्लाळ सिलेदार यांनी साल गुाा सन खमस तिसेनांत नवाब निजामअल्लीखां बहादर यांचे लढाईत कामकाज केले; सबब बक्षीस ३८००.

[18-4-1796

छ ९ सवाल

कृष्णराव पाटणकर सिलेदार याची घोडी सन सबा समानीनात टिपूचे छाप्यात गोळा लागून पडली. तिची किमत ७५० रु. पैकी ४५० रु. परगणे बलसाड वगैरे माहाल निाा आनंदराव भिकाजी याजकडोन देविली.

[19-4-1796

छ १० सवाल

गोपाळराव धोंडदेव नलेगांवकर सिलेदार यांस सन इसने तिसेनात स्वारी श्रीरंगपट्टण विाा हरि बल्लाळ याजबरोबर होते. त्यांस रोजमुरे दिले. बाकी देणे माानिले मागाहून पथक घेवून येत होते; त्यास मार्गी बलवंत सुबराव धर्मवर वगैरे

प्रांती सरकार कामास होते त्यांनी राहाहून घेतले. पुढे मदगिरी नजीक टिपूचा छापा पडला. लोक जखमी झाले. घोडी पाडाव गेली. जखमी वगैरे लोक लष्करांत आले त्यांची गणती वगैरे घेऊन रोजमुरे दिले.

बळवंतराव बापूजी यास जखमा भारी याजकरिता निरोप घेऊन घरीं गेले बद्दल २०० रु.

No. 252] [23-5-1796

छ १९ जिलकाद

१७४०॥= श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे सातारियास राजश्री चिमणाजी माधवराव यास पेशवाईचे पदाची वस्त्रे आणावयास त्रिंबकराव अमृतेश्वर पेठ्ये पाठविले होते त्यास तेथे खर्च जाहाला तो गुा सिदोजी कांब्या खिजमतगार.

५४०॥= नजर करावयास

१०८८= माहाराज यांस

१०८८= मातोश्री आईसो यांस

१०८८= राजश्री प्रतापराव पुत्र यांस

१०८८= वाडा पहिला

१०८८= वाडा दुसरा

१२०० इनाम माहाराज यांजकडील शागीर्दपेशा वगैरे यांस नख्त.

No. 253] [23-5-1796

छ १९ जिल्काद

राजश्री चिमणाजी माधवराव यांस पेशवाईची वस्त्रे सातारियाहून आणली; सबब दिा हुजारत सनग येकून आंख.

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपती यांजकडील मंडळी.

३३४ निळकंठ बाबूराव मजमदार यांस सनगे

४१७ कृष्णराव अनंत भानु कारभारी यांस
४०१॥ बाबूराव कृष्ण किले सातारा यांस.
२२३॥। रामचंद्र हैबतराव पंडितराव यांस.
२२४ रणसिंग मोहिते रामराजे यांचे मेहुणे यांस.
२२३ खंडेराव सिंदे अहिल्याबाईचे पुत्र यांस.
१९० मोरो खंडेराव बक्षी यांस.
२८८ चत्रसिंग भोसले यांस.
१६० त्रिंबकराव गोपाळ सुमंताचे मुतालीक यांस.
१४९॥। राघोजी मोहिते यांस.

No. 254] [*26-5-1796*

छ १८ जिलकाद सीत तिसैन

रत्नशालेपैकी.

देणे दिंमत दौलतराव सिंदे यास बहुमान विद्यमान राजश्री आपासाहेब सदरेस रुबरू पाहून दिल्हे किंमत रु. १०८०६ जडाव दागिने २

खासा दौलतराव यांस किंमत रु. ७५७५.

No. 255] [*26-5-1796*

छ १८ जिलकाद (खर्च)

१ सिरपेच घाट साधा बा। चिंतामण हरी फडके
१ कंठी मोत्याची बाबद तुकोजी होळकर.
१ सदाशिव मल्हार दिवाण यांस सिरपेच घाट साधा.
१ बाळाजी अनंत पागनीस यांस कंठी मोत्याची.
१ धोंडो रामचंद्र यांस सिरपेच
१ नारायणराव जिवाजी बक्षी यांस सिरपेच.
१ सदाशिव बापूजी फडणीस यांस सिरपेच.

No. 256] [*3-6-1796*

छ २६ जिलकाद सीत तिसैन

धर्मादाव खर्च वाड्यांत विद्युत्पातनिरशनार्थ लक्ष होमात्मक शांतीस सामान बा।

१ तोळा केशर
२ ,, कापूर

[3-6-1796

छ २६ जिलकाद सीत तिसैन

२०७० ता। लाला चिमणलाल कारकून सिलेदार यास शोर जनरल याजकडे कालकत्त्यास सन आर्बा तिसेनांत हती व घोडे व पोशाख देऊन सरकारांतून पाठविले.

No. 257] [3-6-1796

छ २६ जिलकाद सीत तिसैन

परदरबार खर्च दिमत नबाब टिपू सुलतान बाहादर याजकडे सालगु।। राघो शंकर कारकून नि।। फरासखाना यांजबराबर सरकारांतून आहेर पाठविला ते समई सनगे खर्च जाहाली ती.

२०२ व्यंकटराम जोशी यांस.

२९८॥०. अहमदखान पुढे हस्तबलीस आले ते समयीं.

ITEM No. 15 : 1805-1811

No. 258] [1805-1811

[दु. बाजीराव पेशव्यानीं स्वहस्तें लिहून ठेवलेल्या खाजगी जमाखर्चाच्या रुमालांतील कांहीं उतारे]

खमस मयातेन मोहरम

१९१ येका इंग्रजास मेजावानीबा। खर्च

[24-4-1805

१५९७ रा। इंगरज सिदनम वकील यास मेजवानी केली

छ २३ मोहोरम

खमस मयातेन साबान

[23-11-1804

छ १९ साबान

२६० इंग्रज व नवाब याकडील ग्रहस्त आले त्यास मेजवानी २६०

[January 1805

खमस मयातेन सवाल

१२२९ कर्णेल वालीस लस्करातून आले सा। त्यास मेजवानी केली त्याबा।

खमस मयातेन जमादिलाखर

१२७६ कर्णेल कलोष त्यास मेजवानी केली ते वेळी सनगे खर्च जाला

¶*The period covered by these entries 1805-1811 is the beginning of British supremacy in India and how gradually Bajirao II began to realise his new position as a subordinate prince can be fairly gathered from these entries.*

No. 259] *[7-11-1805*

सीत मयातेन माहे साबान

५०० बालाजीपंत सतार वाजवितात त्यास दिल्हे छ १४ साबान

[23-11-1805

सीत मयातेन रमजान

७०० हेमंत नाटकशाला तीर्थरुपाची तिला रोजमरापोा ७०० रु. दिल्हे छ १ रमजान

[27-12-1805

सीत मयातेन माहे सवाल

५५२ इंग्रजास मेजवानी केली साा सनगे खर्च छ ५ सवाल

[27-5-1806

सीत मयातेन रबिलौवल

८०० रमणा पर्वतीचा नीट करण्याबद्दल केसोपंत करंदीकर याचे हवाली केले छ ८ रोवल

No. 260] *[13-6-1806*

सबा मयातेन माहे रबिलावल

१६४१५ आमचे चौथे लग्न जाहाले सबब रमण्यात सिध्याबद्दल चिंतोपंत देशमुख याचे गुजारतीने चार दिवस सिधेखर्च केला छ २५ रबिलावल

२५७४४ वरील कारणाकरता रमण्यांत दक्षणा वाटली छ २५ रालोवल.

४८०० कापड, वरील कारणाकरतां

६०० सासऱ्याकडील उपाध्यास दिले छ २६ रोवल

[17-6-1806

३००० नारायणराव गोपाल फाटक, नवे सासरे यास दिले छ २९ रोवल

2552

[18-6-1806

सबा मयातेन माहे रबिलाखर

१४ इंग्रजास मेजवानी जाहली, सबब खिचडी बाा खर्च छ १ राखर

सबा मयातेन माहे जमादिलौवल

[18-7-1806

१०० माहुलीस स्वारी आली साा वाटले छ १ जमादिलावल

[1-9-1806

सबा मयातेन माहे जमादिलाखर

२५ वाईस जुल्झमबागेत गेलो तेथे मालियास २५ रु. दिले छ १७ जमादिलाखर.

[13-9-1806

२५००० श्रावणमासानिमित्य रमण्यात व वाड्यात दक्षणा २९ जमादिलाखर.

No. 261]

सबा मयातेन माहे साबान

हाली सिका रुपये मोडून चांदवड केले, तेव्हा दर शेकडा ८ रुपये प्रमाणे बट्टा द्यावा लागला.

[14-10-1806

९५०० शुक्रवारचे वाड्यासमोर जागा घरे आम्ही पूर्वी खरेदी केल्याच आहेत. त्या मोडून सगुणी कलवंतिणीचे घरचे दक्षणेस व चंद्रीचे घरचे दक्षणेस व तालिमखाना नवा शुक्रवारचे वाड्यापुढे रस्ता मधी टाकून बांधिला आहे ; त्याचे मुकाबिल्यास पूर्वपश्चम लांबीचा रस्ता मधी सोडून आम्ही घर बांधून त्यात कलवंतिणी बिन्हाडकरासारख्या ठेविल्या आहेत; त्या आमचे घरास साडेनऊ हजार रुपये लागले असत. लौकिकात ते घर कलवंतिणीचे म्हणवितो परंतु ते घर आमचे. कलवंतिणीचे नाहीं. छ १ साबान

८९०९ सदासिव माणकेश्वर नाना फडणीस यांचे घरी बिन्हाडी राहिले साा त्यास नवी भांडी, फरासखाना वगैरे सामान खरेदी करून दिली.

३६०० मोर दिक्षित मराठे व सौ सगुणाबाई दीक्षित याजकडील खर्चाचे १ वर्षाचे बेगमीस

४५० श्रीव्यंकटेशाचे उत्सवाचे ललिताचे रात्री रामचंद्र गोसावी याजकडून ललित करविले, सबब पोसाक सनगे

[9-11-1806

११ नाजुक खर्च जाहाला गुाा त्रिंबकजी छ २७ साबान

No. 262] [November 1806

सबा मयातेन माहे रमजान

४६० भाऊबिजेस घरातून वरील किमतीत सनगे खर्च केली त्याचे नावनिसीचा तपसील

१ पांडुरगराव बारामतीकर

१ दादा रास्ते

१ तात्या रास्ते

१ राघोपंत भागवत

१ मोरोबा भागवत

[23-11-1806

१०० सदासिव माणकेश्वर यांचे गुरू नारायणबावा याचे घरी जाऊन खर्च केले छ १२ रमजान.

[30-11-1806

२०० मोरोपंत कवी बारामतीकर यांचे पुत्रास दिल्हे छ १९ रमजान.

[12-11-1806

१०७५ महीचे लढाईत तीर्थरूपाचे दंडावर घालावयाचे हिऱ्याचे कमळ हरवले ते सापडले सा येक हजार पंच्याहातर रुपये भवानगीर गोसावियास कराराप्रो कमळ आम्हास सापडून आले म्हणोन दिल्हे गुा आन्याबा राहातेकर छ १ रमजान.

[10-12-1806

३०० आमचे लग्नात जेष्ठ मासी अत्तर गुलाब खर्च जाहाला छ २९ रमजान.

No. 263] [11-1-1807

सबा मयातेन व अलफ माहे जिलकाद

२१०० चंदन व वंदन येथील बंडापासोन रक्षणार्थ माहे गुा ३०० लोक गुजारत त्रिंबकजी डेंगळे ठेवले आहेत त्यास माहे मजकूरचा रोजमरा छ १ जिलकाद

[11-1-1807

२००० इंग्रजाकडील वैद्याकडून घरांत श्रीदेवी काहाडविल्या त्या यथास्थित कृपा करोन आरोग्य जाहाल्या सबब त्या वैद्यास दिल्हे छ १ जिलकाद.

[11-1-1807

३८४ दोन इंग्रजास मेजवानी बा। सनगे छ १ जिलकाद

[21-1-1807

२००० श्रीकचेश्वरास धर्मशालेचे कामाकरितां कोंडोबा नानाचे पुत्र भाऊ गाडगील याजकडे कोपरगावचे मुकामी बालोबा नि।। विंचूरकर यांचे विद्यमाने पाठविले छ ११ जिलकाद.

[27-1-1807

१०५० हिरी कलवंतिणीस वरील किमतीत सनगे दिल्ही छ १७ जिलकाद.

[29-1-1807

४१० कोथरूडचे बागेतला आरसेमहाल जाया जाला तो उतम तयार करावयाबा। छ १९ जिलकाद

[29-1-1807

८६५ कोथरूडचे बागेतील जळमंदीर दुरुस्त करावयाबा। छ १९ जिलकाद

३७५ कोथरूडचे बागेत माहालापुढे चालतां तावदानी बंगला आहे तो दुरुस्त करावा याबद्दल छ १९ जिलकाद

५९५ कोथरूड बागेतील चौसोपी तयार करावयाबद्दल छ १९ जिलकाद

No. 264] [27-1-1807

५००० जिऊबाई भानू यास दरसाल १२००० रुपये खर्चास द्यावयाची नेमणूक आहे. ते छ १७ जमादिलाखरपावेतो पोहोचाऊन फडशा जाहाला त्या तेरखेपावेतो बाकी राहिली नाहीं. छ १८ जमादिलाखरापासोन तागाईत छ १७ जिलकाद पाच महिने पावेतो दरमाहा १००० रुपये प्रो ५००० रु. नेमणूक पो दिल्हे. छ १७ जिलकाद

[8-2-1807

१२५ चिंतोपंत देशमुख याचे थोरले स्त्रीस नाहाण आले सबब आहेर केला छ २९ जिलकाद.

[16-2-1807

१६३२ तीर्थरूप गंगाभागीरथी मातुश्री अन्नपूर्णाबाई आजी ओक हिला दिल्हे छ ७ जिल्हेज.

[20-2-1807

४००० सदासिव माणकेश्वर तुळजापूर व कोल्हापूरच्या यात्रेस गेले त्याना दिले छ ११ जिल्हेज.

[14-4-1807

१०००० खुसरसेट मोधी यास बक्षीस दिले छ ९ सफर

[14-4-1807

१००० बाळाजी मल्हार बापट यास बक्षीस छ ९ सफर

No. 265] [2-5-1807

सबा मयातेन माहे रबिलावल ऊर्फ वैशाख प्रभवसंवत्सर

सबा मयातेन माहे सफर

६९२० मातोश्री आनंदीबाईचा श्राद्धदिवस फाल्गुन वा। ११ ते दिवशी खर्च. छ २३ सफर

[18-5-1807

समान मयातेन रबिलावल उर्फ वैशाख

१३० जंग कवी पिंपलसकर यास १३० रुपयाचे किमतीत सोवले दिल्हे छ ९ रबिलावल

[20-5-1807

३२९ खुसरवांजी मोधी यास शालजोडी दिली.

१०० श्रीमाहाबलेश्वरास कोयनेचा ओघ नीट वाहावयाकरितां आपाभट याचे हवाली केले छ ११ रबिलावल

[7-6-1807

२०० राघोपंत थथे सिव्हगड किल्यावरून सरकार आज्ञेवरून सनदेप्रो खाली वो रा। नीळकंठ शास्त्री थथे व रा। आन्याबा अभ्यंगकर यांचे जामीनगतीने उतरून वाईस सरकार आज्ञेने गेले त्यास साल मजकूर सबा मयातेन जिल्हेज माघ मासाचे अवलीपासोन दरसाल २०० रु. सरकारातून देत जावे असे ठरले त्याप्रा। दिले. छ २९ रबिलावल.

No. 266] [6-7-1807

समान मयातेन

रबिलाखर ऊर्फ जेष्ठ

९००० सदासिव पेठ कसबे पुणे येथे नाना फडणीस यांचे हौदातून विश्राम बागेत आमचे वाड्यात नहर चांगला उतमप्रत बांधून पाणी आणावयाबदल नारोपंत दातार याचे हवाली केले छ २९ राखर

समान मयातेन

रमजान उर्फ कार्तिक

बाजीराव पेशवे या सुमारास कार्तिकस्वामीचे यात्रेस गेले होते. कारण यात्रेचे उद्यापन वगैरे केले आहे त्यासंबंधीं खर्च लिहिला आहे.

No. 267] [1-11-1807

समान मयातेन

सवाल उर्फ मार्गसीर्ष

९६० धोंडो गोविंद गोडबोले याजकडील पलटण नवलगुंदचे मुकामी छ १ सवाली लुटले. त्यामध्यें ३० घोडी थोर व तटे ३० उंटे तीन सापडली ती सरकारात घेऊन त्रिंबकजी डेंगला याचे तास ठेवली. त्यास हुजूरपागेचे सिरस्तेप्रमाणे व उष्टरखानाचे सिरस्तेप्रो माहे मजकूरची नेमणूक येकंदर हवाली केले छ १ सवाल.

[22-11-1807

१००० कृष्णया कर्णवारू यास दिले छ २२ सवाल

[2-1-1808

समान मयातेन जिलकाद उर्फ पौष

४०० त्रिंबकरावमामा ओक मृत्यु पावले सा क्रियेबद्दल देविले छ ३ जिलकाद..

[18-1-1808

४८३ हिराबागेत इंग्रजास मेजवानीचे वेळी वस्त्रे पोषाकाबा खर्च छ ७ जिलकाद

३१० पौष शुा ९ दुसरे घरातील श्राद्ध जाहाले.

१००० श्रीनिवासराव व गोविंदराव कांटीकर यास दिल्हे छ १९ जिलकाद

१००० तीर्थस्वरूप रमाबाई फडके सासू यास बक्षीस दिल्हे छ १९ जिलकाद.

[8-2-1808

समान मयातेन जिल्हेज ऊर्फ माघ

३००० बहिरोपंत सहस्रबुध्धे, सासूबाई देवधर यांचे तीर्थरूप, यास बक्षीस दिल्हे छ १० जिल्हेज.

[9-2-1808

१००० सगुणाबाई दिक्षित मराठे यांस बक्षीस दिले छ ११ जिल्हेज.

[9-2-1808

५००० काकू आजी ओक मृत्यु पावली; सबब क्रियेबाा छ ११ जिल्हेज समान मयातेन मोहरम उर्फ फाल्गुन.

[24-3-1808

१५ गंधर्व घोडा मेला साा १५ रुपये खर्च जाहाले छ २६ मोहरम.

No. 268]

तिसा मयातेन शके १७३०

जेष्ठ उर्फ रबिलाखर

७००० आबा ढमढरे याचे दुसरे लग्न अंताजीपंत जोसी याचे कन्येबरोबर जाहाले सबब त्यास दागिन्याबद्दल

२०० पांडोबा गोवळेकर शागीर्द यास साताऱ्यास आम्ही आपले वाड्यात ठेविला. (त्यास पगार)

[8-6-1808

१०० शाहूमहाराजाचे तक्त राजवाड्याजवळ सातारास शहरात आहे तेथे नैवेद्य नंदादीपाबद्दल देविले छ १३ रबिलाखर.

१७८ इंग्रजास वस्त्रें दिली छ २३ रबिलाखर.

[24-6-1808

३६०० रुपये किंमतीत तालिमखान्यात लाल माती आणून तयार उत्तम करोन घालावयाबद्दल खर्च जाहाले छ २९ राखर.

No. 269]

तिसा मयातेन श्रावण उर्फ जमादिलाखर

१२५००० पोहोची हिऱ्याची बापू चिपळोनकर याजपासून खरेदी केली.

५००० मोत्याची नथ एक खरेदी केली.

४४०० श्रावण मास दक्षणा छ १२ जमादिलाखर

४११२ " " शहरातील दुखणाईत ब्राह्मणास दिली.

तीर्थस्वरूप सौ यमुनाबाई सासूचे वडील बहिरोपंत सहस्त्रबुद्धे (पिंपळवंडीकर?)

२५०० सखारामपंत जोसी सिंदे यांचे लस्कारात बातमीचे कामावर आहेत त्यांस सालमजकुरीची तैनात.

तिसा मया तेन १७३० शके आषाढ उर्फ जमादिलावल
सौ कासीबाई, त्रिंबकराव मामा ओक याची कन्या

[17-7-1808

६०० तोफखान्याचे खर्चाबद्दल माहे जमादिलावल व जमादिलाखर दुमाही बेगमीचे गणपतराव पानसे यांच्या हवाली केले छ २२ जमादिलावल.

No. 270] [2-9-1808

शके १७३०
रजब उर्फ भाद्रपद

त्रिंबकजी डेंगळा याचा सातारच्या डौलाचा कारभारी म्हणून उल्लेख आहे.

२७० शुक्रवारचे वाड्यात पांचवे मजल्यावर चौकोपऱ्यावर च्यार बंगले आहेत. त्यास दोनसे सत्तर रुपयाचे किमतीत खारवी पडदे केले छ १० रजब.

३१००० कृपानाथ आरगनाथ देव कासीकर याजकडून हिऱ्याची पोहची खरेदी केली.

५५०० खास बाजीरावाच्या खाशा पंगतीच्या शुक्रवार वाड्यातील भोजनाप्रा उतम सिधा तेरा महिन्याचा सातारचे छत्रपतीकरतां त्याचा मक्ता त्रिंबकजी डेंगळ्याने घेतला सबब त्यास दिले.

No. 271] [21-10-1808

शके १७३०
साबान उर्फ अश्विन

१०९६ इंग्रेजास मेजवानी दिली त्याबद्दल कापड वरील किंमतीचे.
१२९२ त्रिंबक आत्माराम गवई यास दिले.
२९८ ती. सौ रास्ते सासूबाई यास चोळखण दिले वरील किमतीत छ ३० साबान.

[2-10-1808

शके १७३० तिसा मयातेन
रमजान ऊर्फ कार्तिक

१०००० बलवतराव नागनाथ मृत्यु पावले सबब क्रियेस खर्च करविले गुा बाबूराव कात्रे.

No. 272] [20-11-1808

शके १७३० तिसा मयातेन
सवाल उर्फ मार्गसीर्ष

३७६ इंग्रजास मेजवानी केली त्याबा। खर्च

३५०० विश्रामबाग वाड्याची वास्तुशांति केली त्याबा। विा गणेशभट उपाध्ये छ १ सवाल

[20-11-1808

५०००० पांडुरग बाबूराव बारामतीकर यांचे जातीस येकसाला बक्षीस दिल्हे छ १ सवाल

१००९ मार्गसीर्ष शुा। ११ स पहिले घरातील श्राद्ध जाहाले सा। खर्च छ ९ सवाल

२००० नाना फडणिसांच्या सदासिवपेठच्या हौदाच्या नहराचे पाणी बिघडले सबब दुरुस्ती खर्च. मक्ता घेणार नारोपंत दातार

[10-12-1808

४००० विश्रामबागेतील सरकारवाड्याबाहेर नैऋत्य कोणात हौद करविला त्याबा। खर्च. मक्ता घेणार नारोपंत दातार छ २१ सवाल

[12-12-1808

१०००० दाहा हजार रुपये विलासप्रकर्णी खर्च जाहाले छ २३ सवाल

No. 273] [31-12-1808

शके १७३० पौष उर्फ जिलकाद

५०० श्रीमंत माधवरावसाहेब व सौ रमाबाईसाहेब कैलासवासी जाहाली त्याच्या अस्ती कासीस पाठवावयाकरिता शुध्यर्थ खर्च जाहाले छ १३ जिलकाद

[6-1-1809

८०००० अमरचंद सावकार याजपासोन रामचंद्र गोसावी पैठणकर याचे गुजारतीने ऐशी हजार रुपयाचे किमतीचा १ मोत्याचा कंठा सातपदरी सरकारात खरेदी घेतला छ १९ जिलकाद

[8-1-1809

१०० सखुबाई उगले धोंडभट भागवत यांची कन्या ईस दिले छ २१ जिलकाद

No. 274] [9-1-1809

तिसा मयातेन शके १७३० विभवनाम
जिलकाद ऊर्फ पौष
खर्चाचे बंद

३०००० णियाजेझुहित झखखटीनाझटेताडिनी धगाथायिणीजेकायंझाळेघीनवेनठटभ ठाजा चिहां कता घाझधाझाछुनजाटहहे झ मे सी जु हि त ठे टि छा ष ठा ने झे छ २२ जिलकाद*

पांडुरंगराव बारामतीकर कार्तिकमासी वारले असा उल्लेख आहे.

[18-1-1809

१६७२० अन्याबा राहतेकराबरोबर कर्नाटकचे स्वारीस सिबंदी पाठविली त्याबद्दल इा छ ११ जिलकाद माहे मजकूर ताा छ १ जिल्हेज पेस्तर महिनाची तैनाते बरहुकूम रोजमरा

१४ बलवंतराव नागनाथ मेल्यामुळे त्याचे दोन खिजमतगार त्यांचे विनंतीवरून सरकारात नोकर ठेवले त्यांचा पगार.

२००० सातारियास सरकारवाडा आहे त्याची दागदोजी करावयाबद्दल

१०० त्रिंबकराव मामा ओक यांचे सांवत्सरिक श्राद्धाबद्दल त्यांच्या मुलास दिले.

[26-12-1808

१८५ पौष शुाा नवमीस दुसरे घरातील श्राद्धानिमित्य खर्च जाले छ ८ जिलकाद

फाल्गुन तिसा मया शके १७३०

२१२५ कर्णेल कलोष यास कोपरगावी मेजवानी केली त्याबाबद

* असे वृट जमाखर्च बाजीरावाचे बरेच आहेत. नमुन्याकरितां हा घेतला आहे.

No. 275]

[28-1-1809

माघ तिसा मयातेन शके १७३०

५०० नारायणरावबावा गोसावी पैठणकर यास धर्मादाव पांचसे रुपये देविले छ ११ जिल्हेज

१८०६ कर्णेल कलोष यास मेजवानी केली सा। सनगे व मज्यालसी बाबत खर्च

No. 276]

[March-April 1809

तिसा मयातेन व अलफ शके १७३१
सफर उर्फ चैत्र

जमेचे बंदांत आलेली काही मामलेदारांची नांवे

१	देह जबोर व बाहादरपुरा	त्रिंबकजी डेंगळा
२	सरसुभा प्रांत गुजराथ	,,
३	ता। सावली प्रात गुजराथ	,,
४	ता॥ साकसे प्रांत कोकण	चिंतोपंत देशमुख
५	रोहे व अष्टमी तर्फ रेवदंडा	निलकंठ सदाशिव कोलटकर
६	मौजे सिरढोण व सोमठणे ता। कल्याण	गणेश माहादेव फडके
७	मौजे ताम्हने ता। खारेपाटण ता। विजयदुर्ग	विसाजी कृष्ण रानडे
८	तालुके पानगांव व हलसंगी	त्रिंबकजी डेंगळे
९	मोकासा पैठण	त्रिंबक यशवंत
१०	बारसी वगैरे माहाल	सदासिव माणकेश्वर
११	कसबे खेड प्रांत जुनर	त्रिंबकजी डेंगळे
१२	कसबे राक्षसभुवन वगैरे गांव	त्रिंबक येशवंत
१३	कसबे ओतुर वगैरे गांव	गोविंद दिनकर
१४	ता॥ चास	विठल चिमणाजी
१५	फुटगाव प्रा॥ कर्डे	सदासिव माणकेस्वर
१६	मौजे डुबेरे प्रांत आकोले	मल्हारराव भिकाजी बर्वे

१७ बाग मौजे कात्रज ता। कर्यात मावल	राघोबा शेंड्या
१९ परगणे भोसे	मल्हार बाजी
२० मौजे नागझरी प्रां कराड	रामचंद्र आबाजी बाम
२१ तो। गडवई प्रां हिंदुस्थान	सिवराव हरि
२२ मौजे कामरगाव वगैरे गांव प्रांत कडेवलित	बाजी त्रिंबक

No. 277]

खर्चाचे बंद

३२७० पुण्यापासोन गंगातीरपोवेतो व शयाद्रीपासोन राक्षसभुवनपावेतो भिल व बेरड व कोली वगैरे चोरट्यांचा उपद्रव कोठेहि होऊ नये. कोठे जाहाल्यास भरून घ्यावा याप्रमाणे त्रिंबकजी डेंगळे याने सरकारात करार पाठविला सबब (त्याचे खर्चास).

३४८६ पुण्यापासोन कऱ्हाडपावेतो दक्षण व शयाद्रीपासोन शंभु माहादेव-पावेतो पूर्व पश्चिम चोर दरवड्यासंबंधी करार वरीलप्रमाणे पुरुषोत्तम-राव बलवंत भागवत यानी घेतला त्यास खर्चास.

२२५० पुण्यापासोन सोलापुरापावेतो वरीलप्रमाणे बंदोबस्ताबद्दल पांडुरंगराव बारामतीकरास दिले.

[वरील रकमा दरमहाच्या आहेत.]

४० चतरसिंग भोसले याचे पुत्रास तैनातेबद्दल रोजमरा माहे मजकूरचा चालीस रु. दिल्हा छ १ सफर.

६० नागू गुरव तैनातेबद्दल रोजगुरा

८० देवीदास सारंगीवाला ,, ,,

१४० दावलखान गवई ,, ,,

१६ दोन आसामी मोर्चेंगवाले यास माहे मजकूरचा तैनातिबा। रोजमरा

८ रामचंद्र हरी शेवडे

८ विठलशेट बिन रामशेट सोनार

२००० मौजे वेहेर ता। नाणेमावल तालुके लोहोगड येथील विहीर खणावयाबद्दल

[25-3-1809

१००० सौ। कासीबाई पेठी हिला बक्षीस दिले छ ८ सफर

No. 278] [28-3-1809

२०५ विठोबा गोसावी ताहराबादकर यास दक्षणा दिल्ही छ ११ सफर

१८४४ कर्णेल कलोष यास मेजवानी खर्च कोपरगावास छ २३ सफर

२०३ चैत्र वा येकादसी तीर्थरूप सौ मातुश्री मथुराबाई सा यांचे सांवत्सरिक श्राद्ध जाहाले छ २३ सफर

४८९९ चैत्र वद्य द्वादसीस खर्च जाहाले छ २५ सफर. (या मोघम उल्लेखा-वरून काही गुप्त ठेवण्यासारखें कारण असेलसें वाटतें)

जेष्ठ

१०९०० तीर्थस्वरूप मातुश्री आका पराजपे मावसी श्रीकासीस गेली (तिला दिले.)

१००० ती कैलासवासी सौ वहिनीबाईचे मातुश्रीस येक हजार रु. बक्षीस

३२० रु. चे किमतीत सरकारचे दोन बंद (?) होते ते नीट करविले छ २० राखर

(वैजनाथभट भागवत हे पूर्वी सातारचे किलेदार होते असा एक उल्लेख आहे.)

No. 279] [29-7-1810

इहिदे अशर मयातेन माहे जमादिलावल

१२००० पंढरपुरास स्वारी गेली सा खर्च जाला छ २६ जमादिलावल

[3-7-1810

इहिदे अशर मयातेन जमादिलावल ऊर्फ जेष्ठ

२०७ सातारियास छत्रपतीजवळ आमचे ४ हुजरे व रायगडास यश्वदाबाई-जवळ ४ हुजरे आहेत त्यास तैनातेबा छ ३० जमादिलावल

[21-10-1810

इहिदे अशेर मयातेन माहे रमजान ऊर्फ अश्विन

९०० पुत्रजन्मानिमित्य खैरात खर्च जाहाले छ २१ रमजान

[3-11-1810

इहिदे अशर सवाल ऊर्फ कार्तिक

२१७७ चिरंजीव राजश्री वामनराव यांचे बारशानिमित्य दोन हजार येकसे सत्याहत्तर रु. खर्च केला छ ९ सवाल

[23-1-1811

इहिदे अशर मयातेन पौष जिल्हेज

२५००० बुधवारचे वाड्याचे तयारी बा। खर्च केले छ २७ जिल्हेज

No. 280] [26-1-1811

इहिदे अशर मयातेन पौष जिल्हेज

३०००० माधवरावसाहेब यांची स्त्री यश्वदाबाई पौष वद्य पंचमीस सालमजकुरी मृत्यु पावली यांचे उत्तरकार्याबद्दल खर्च जाहाले छ ३० जिल्हेज

[11-2-1811

इहिदे अशर मयातेन मोहरम माघ

१६०५ माघ वा। १ पावेतो चिरंजीव राजश्री वामनराव अण्णा याचे प्रकृतीस आरोग्यार्थ अनुष्ठानास दक्षणा दिल्ही छ १६ मोहरम

[6-3-1811

इहिदे अशर मयातेन सफर फाल्गुन

४२०० उतम लढवाई दारूचे बाण ६०० तयार करण्याकरता पानशाला दिले छ १० सफर

[26-3-1811

इहिदे अशर मयातेन रबिलावल ऊर्फ चैत्र

१७००० हिंगणीस तीर्थरूप कै. दादासाहेब यांचा काल जाहाला; तेथे पश्चमेकडील तटाचे भिंतीचे पायास येकंदर २२००० रु॥ लागले पैकी हे त्रिंबकजीकडून देविले. पेशजी ५००० देविले होते छ १ रबिलावल.

No. 281] [14-3-1735

२

श्रीचिंतामण.[1]

यादीदास्त करिने सन हजार ११४४ अखेरी शके १६५७ चैत्र सुध १ सुक्रवार नवे साल राक्षसनाम संवछरे. चैत्र सुध येकादसीस सोमवारी श्रीच्या नाताच्या दोघाच्या मुंजीची लग्ने. कल्याण मुंजीस पाठविला असे. पुणियात येच तिथीस खंडो विसाजी व बाजी शंकर व बाजी कान्हो व पांडुरंग नारायेण त्यांच्या मुलांच्या मुंजी जाल्या असेत. १.

No. 282] [24-3-1735

सुध १२ सोमवारी राजश्री चिमाजीआपास राजश्री पंताचे पत्र कुलाबातून आले की येथें संभाजी आंगरियाकडून रघुनाथजी आला होता. याजकरिता सात आठ रोज मुकाम जाला होता. याउपरी आम्ही राजमाचीस येतो. तुम्हीहि राजमाचीस येणे. त्याजवरून ते व बालाजी बाजीराऊ यैसे तिसरे प्रहरी स्वार होऊन गेले असेत. १.

No. 283] [2-4-1735

चैत्र वद्ये ६ बुधवारी तिसरे प्रहरी राजश्री प्रधानपंत व राजश्री आपा व माहादोबा व बापूजीपंतनाना यैसे चिंचवडावरून तळेगावीहून पुणियास आले. कुलाबियाकडे गेले होते ते स्वारी करून राजमाची कोथळा मानाजी आंगरियापासून देखील किलियाचा सरंजाम घेऊन राजमाचियाहून घरास आले असेत. माहादोबा येथून रात्रौ सातारियास गेले असेत. १.

चैत्र वद्ये ११

राजश्री पंत अपानी आठेक दिवस जाले दिवटियास ताकीद केली की दिवट्या दोन च्यार लावीत जा. हशम वगैरे लोक कारखानियावरी आहेत त्याणी समेत हत्यारे घेऊन, मजुरा धजेने करून, पटी विडियाची घ्यावी. यैसी आंगरियाचे पधतीप्रा पधती घातली असे. १.

---

१ 'श्रीचिंतामण' या श्रीकारावरून अनुमान होतें कीं चिंचवडच्या देवांकडे अशी एखादी रोजनिशी होती. पुढील उतारे त्या रुमालांतील आहेत.

2566

No. 284] [14-4-1735

सुध त्रितीयेस औरंगाबाजेहून बातमी आली की मल्हारजी होलकर राणोजी सिंदे याच्या व खानदौराच्या भेटी जाल्या. यैसे तहकीक वर्तमान असे. १.

No. 285] [22-4-1735

वैशाख सुध ११ मंगलवारी राजश्री पिलाजी जाधव याचा धाकटा लेक चांगोजी, संभाजी जाधवास दिल्हा आहे, त्याचे लग्न गोरेजे जाले. जेऊरच्या पाटिलासी सोयेरीक केली. संभाजी जाधवच होते. पिलाजी जाधव लस्करात होते. गाविंदराऊ येशवंतराऊ लग्नास गेले. कल्याण निलकंठहि गेले. खंडे-रायाकडीलहि आहेर कल्याणपंताबा पाठविला असे. १.

जाधवाचा हाती जातेसमई कोरेगावीचे मुकामी वारला. १.

No. 286] [30-4-1735

वैशाख वद्ये ९ बुधवारी रात्री राजश्री बापूजीपंत नाना यांणी शामराऊ भाचे याचा पुत्र घेऊन नांव श्रीपतराऊ ठेविले. गतवरसी त्यांचे लग्न जाले. पेडगावी सोयेरीक, पेडगावीच्या किलेदाराचे दिवाण, त्याचे नाव [कोरी जागा] त्यांसी केली. संभाजी जाधवाच्या लग्नास गेले होते देसमुख देसपांडिये ते जेऊरीहूनच पेडगावास लग्नास आले. १.

No. 287] [6-5-1735

वैशाख वद्ये ११ मंगलवारीं रात्री मल्हारबा देसमुख यांचे मुलीचे लग्न लागले. सोयेरीक वांगणीचे देसमुख घारे यासी केली. [कोरी जागा].

No. 288] [6-6-1735

राजश्री फतेसिंगबाबांचे पत्रे आले की घरात ज्वर येत आहे, तरी सतबा येसवंतराऊ यैसें लौकर येणें. त्याजवरून येथून कल्याणराऊ व येशवंतराऊ

नायेगावास पाठविले. तेथे सतबा व गोविंदराऊ ढमालियाच्या लग्नास गेले होते ते येैसे सातारियास गेले. राजश्री स्वामी पंढरीचे यात्रेस गेले. त्याजबराबर हेहि गेले असेत. १.

No. 289]

जेस्ट वद्ये राजश्री दादोबा पुरंदरे पुणियास आले. आठ दिवस राहून पंढरीचे यात्रेस गेले असेत. १.

No. 290] [*12-6-1735*

आश्याढ सुध त्रितीया गुरुवारी राजश्री चिमाजीआपा व बालाजी बाजीराऊ येैसे माहाराज राजश्री स्वामी * * पंढरपूरचे यात्रेस जावयास गेले असेत. १.

No. 291]

होल करंजे येथील सिवेच्या कजियानिमित्ये सिवरामभट चित्राव याणी नागेशाचे देऊल सन पंचेतालीसमधे बांधले. पेसवियानी साहित्य केले असे. १.

No. 292] [*28-6-1735*

आश्याढ वद्ये ४ सुक्रवारी राजश्री पंतप्रधान यांणी राजश्री सिवाजी राजे यांचा लालमाहाल राजश्री दादाजी कोंडदेऊ याणी राजश्री शाहाजी राजे याचे कारकीर्दीस बांधला होता. त्यांचे भाऊ राजश्री संभाजी राजे सिवाजी राजे याचे भाऊ त्याचा माहाल वेदमूर्ती राजश्री खंडभट शालेग्राम याच्या वाडियापावेतो होता. त्याचे जोते उतरामुख होते. ते उखळून चिरे कारंजियापासी घर बांधले त्याजला जोतियास नेले. राजश्रीच्या माहालावरहि येक दोन घरे बांधोन आवदार (?) वाडा करून ठेवावा. तूर्त येक दोन घरे बांधावी. माहलात नेहमी घरे होऊन जागा निर्मल राहील आणि तूर्त राजश्री राणोजी सिंदे व रामचंद्रजीस घरे राहवयास होतील म्हणून पंती लालमाहाल बांधावयाची तजवीज केली. आठपधरां रोज जाले. जुना हौद कारंजियाचा पका आहे त्या वरती पछेमेकडे दिवाणखाना जुना होता तेथे घर बांधिले. त्यास यांची साधत नाही म्हणून त्या दिवाणखानियाची जुनी कांहीबांही भिंताडे होती ते धोंडे

काहडून आपल्या वाडियाच्या सुताने दोरी धरून प्रांची
सुमार टाकून तूर्त येक घर कारंजियाच्या कोनासी दक्षणें
केले होते, मुळें हे कारंजे रद जाले असे. देसपांडियाच
दक्षणेंस जे जागा आहे ते माहालची आहे. खंडभट
चिरेबंदी जोते माहालचे होते ते आजी पंती उख
तूर्त घर बांधतात. त्याच्या जोतियास लाविले
दोन यैसे तीन आठ पंती गाडले होते ते उकरिले.
तोडाची केली असे. लालमाहालची जमीन पछेम
आहे. तूर्त जोते काहडलियाने माहालचे हादेचे
माहालची असे.

No. 293]

आश्याढ वद्ये १२ रविवारी राजश्री मल्हारजी होलकर
राजश्री पंत होलकरास संगमापावेतो व सिंदियास घे
होते. उभयतानी खानदुरा बकसी व जयेसिंग
सेवटी सला केला. फते करून आले असेत. म
कागदी पत्री तहकीक आसेल यैसे असे. होल
कडले साली हवेली बांधली तेथे राहिले. सिंदि
जुना त्यामधें बांधले तेथे राहणार.

No. 294]

श्रावण सुध २ गुरुवारी दिवसा तिसरे प्रहरी रा
कासीबाईचे पोटी पुत्र जाला. वितिपात लागला
साखर घालून वाटली. किरकोली बंदवान होते
रुकियाप्रा दक्षणा दिल्ही असे. बारावे दिवसी
ब्रा दक्षणा दिल्ही. जनार्दन नाव ठेविले. सम
अहेर केला असे.

No. 295]

श्रावण सुध ६ शेस्टी सोमवारी मुजेरीचे झांबरे
देऊं केला. त्या हिमाहितीने सिरालसेट बाजाराने
नदीत टाकिला. बरसास गोविंदजी देसमुखाच्या

ारे नेला. मागे कधी बाजारे नेला नव्हता. सेटियावर
ड़धा होतो म्हणून सांगावयासहि आले होते. १
ी पाा सस्ते व मानाई पाटलीण यैसी सांगावयास रोज
वडील. पहिल्यापासून येक सिरलसेट घालीत असो.
सस्ता दोन तीन वरसे आपले घरीहि सिरालसेट
याने यैकत नाही. दोने साली जमीदाराचा कागदहि
. ते घालितात. दोन चालत आले आहेत यैसा
ले साली व येंदा आपण घातला नाहीं. काला
घरी सिरालसेट करितो; यैसे छंद करितात म्हणून
ी मालजीहि आले. सिरालसेट बृद्धीमुले घातले
सेट घालावा छंद करू नये यैसे करून गेले असेत.
सेत १

णी ब्राम्हणांस दक्षणां दिल्ही. श्रावणमासचे ब्राम्हण
ीन साली तीन हजार ब्रां आले. रुपया दोन तीन
लाहणा मुलास यैसे दिल्हे रुपये

[20-7-1735

राजश्री चिमाजीआपा राजश्रीबाा पंढरीचे यात्रेस
ाजीरायांच्या पुत्राचे बारसे करावयास आले. त्यास
जी व्होलकर व राणोजी सिंदे वगैरे अवघेजण
दिवसी बारसे केले. १

[24-7-1735

वार राजश्री गोविंदराऊ व संतबा व येशवंतराऊ
ाजी मल्हार सौ गोदूबाईस बरे वाटत नव्हते म्हणून
न नेले होते ते गावास आले. १

[29-7-1735

रूडचा न्हावी मेला. पाटील वेसीतून मूठमाती
त्याचा भाऊ गंगा सांगावयास आला. पुणेकरहि
व देसपांडिये याच्या नांवे पत्र कोथरूडकरास दिल्हे

की, कौल जालियावरी लोणी कालभर येथील पाटिलानी न्हावी यास वेसीतून न न्यावे म्हणून अटक केली. राजश्री पंतप्रधान याजपासी मजकूर पडिला. त्याणी जागाजागाचे दाखले आणिले. न्हावीयास सुखरूप वेसींतून न्यावे यैसे जाले. तुम्ही कटकट न करणे यैसे दिल्हे असे.

No. 299] [27-7-1735

वद्ये ४ रविवारी सुभानजी पाटील ठाकूर व येमाजी पाटील पारखी मौजे माण यांणी आबाजी चतूर न्हावी चांदी याचा भाऊ हाती धरून ने ील न्हावी बुडाला, तो चतूर होता. त्यास कौल जालियाव णून आबाजीस त्यांणी ठेविले. बापूजी पाटील पासून बोलोन केले की, आमचा न्हावी सांगितले की, तुमचा न्हावी बुडाला. त्य आबाजी चतूर पुणेकर आहे; याचे हाते काम पंधरा सोला वरसे काम घेतले. मिरासपटीहि मजकुरी राक्षसी याकडे लस्करचे चाकरीचा न्हावी लागले. याजकरिता आबाजी येथे आला. ये नावे पत्र पाठऊन बोलाऊन आणिले. येथे आलि घेऊन गेले, की याचे हाते कामकाज घेऊ. याखे तूर्त त्या न्हावियाने कामकाज केले आसे. येव्हडे हा आहेच. याचे हाते पांढरीचे कामकाज घेऊन

No. 300]

वद्ये सप्तमी बुधवारी आनंदराऊ सुमंत व त्य रघुनाथभट यैसे भागानगरीहून निजामनमुल्क जाणार. गेले असेत. १

No. 301]

भाद्रपद सुध

राजश्री बाजीराऊ सातारियास गेले. राजश्रीनी निमित्ये गेले असेत.

राणोजी सिंदियानी पासणाच्या सिंवेचा प्रसंग त्याणी जगोबास बोलाऊन कजिया सांगा म्हण

पड घेतली; परंतु ऐकत नाहीत. पेसवे आहेत हेच वाद सागो लागले. तेव्हा कोणे भांडावे? म्हणून तुम्हीच समर्थ आहा; तुम्ही सांगाल ते आइकों म्हणून बोलिले. ते चितास न ये; तैसे केले तरी दिवाणदारीने केलेसे पुढे दिसोन येईल; याजकरिता तुम्ही पाचास राजी होणे तरी औधकरानी दिव्ये करावे म्हटले. ते म्हणतात दिव्ये देत नाही. पाचास राजी व्हा नाही तरी अमच्या चितास येईल तैसे करू ऐसे दबाऊ लागले. औंधकराचा पक्ष करीत म्हणून सारे देसमुख व जगोबा वगैरे भाऊ राणोजी सिंदियाकडे गेले की तुजला काये करणे असेल अ... सेल ते घे; परंतु अम्हास पेसवियापासी फजीत करू नको. त्याणें ... बरे तुम्ही आम्ही मागेच समजलो असतो.

... दुसरे रोजी मागती गेलो, तो राणबा

... मागती त्र्यंबकडून रुईस पेंडवळा न्याव-

...यकोती आपासी बापूजी श्रीपत यांच्या विद्येमाने

...स दिव्ये देत नाही ऐसे म्हणेत. तुम्ही पाचांस

... तुम्हास पेचंतील (?) ऐसे देऊ त्यांस राजी होणें.

... सेते पाडली ती मोकली करा. जुनी जमीन

...पाचास राजी होऊं अगर ज्यास स्वामी म्हणतील

...ले करीत नाही ऐसी अग्राहाचीच गोष्टी सांगत.

... बोली करिता नये; न करावी. तेव्हा त्याचें

...तील ऐसे संकट जाले. कालावर द्रस्टी देऊन

...जी पाटील सांगत. सेवटी पाचांस राजी होणे.

...गे. ते विचारून करणें ते करतील ऐसे म्हणतात.

...डला तो पाहिला. बाजी कान्हो यादोपंत देवजी-

...बा अपा रामभट ऐसे होते त्रिंबकजी राणवडा

...णीं पाहिला. सांत बंद निरनिराले आहेत. सा

...येयाच्या पाठीवर मजकूर आला अहे. जोडगीर

... कागद अहे. देसमुखाचा सिका नाही. खास-

... दस्तक वडिलाचे चालीप्रमाणे नाही. गोविंदराऊ

...का आहे. देसपांडियाचे दस्तक नाही. रामाजी

...त. देवावरील बेल रखमाजी राणवडियाने काहाडून

... आपली, हे सेत आमचे म्हणून रामजी सितोला

... मुअमके रोजी दिल्हा ऐसी तेरीख घातेली नाही.

जागा टाकिली आहे. वलीस दाहापंधरा रोज जाले. कीर्द लागली नाही. म्हणून लिा; परंतु तागाईतेस जागा टाकला आहे. तेरीख घातली नाही. कचा कागद आहे. बाणेरकर बोपडेकर याची नांवे हजी(र) मज्यालसीस आहेत.

म्हटला आहे; परंतु हदमहदुद लिहिली नाही. मागे तानदेवाने द्रोही दिल्ही वाहू दिल्हे नाही त्याजवर रामजीने द्रोही दिल्ही वाहऊ दिल्हे यैसे औंधकराचे तकरीरेत त्या कागदात लिा आहे; तेव्हा सेभर वरसेपावेतो भोगवटा नाही ऐसे अर्थ आला आहे. नागरसाने साक्ष दिल्ही आहे की आपण इनामत वाहिली त्याची उमर साठी वरसे घातली असे. संतोजी मुरकुटा याची उमर लिा नाही. त्याणी म्हटले की आपला आजा कालोजी त्याणे वाहिली होती याप्रां कागद आहे. पासणेकरानी लिा आपणात बुनादी कोण्ही नाही असे आहे. औधकरानी सिवे-
वर माल घेतली नाही. बेल मात्र देवावरून दिल ... आहे. कागद
रामाजी गोविंदाने करून दिल्हा आहे. देसमुखा हुजू ... देसमुखाची
पाटिलकी पासणांची म्हणून अदावतीने दिल्हा असे यैसे भ
राणोजी सिंदे औधास गेले होते ते येऊन पाटसास
आपा खंडो विसाजी राणोजीकडे गेले. उदंड बोध
चौलाऊ नका; परंतु यैकिले नाही. राणोजीचा आ
याच्या हिमायेतीने सींव रेटावी. पासणाची सेत घ्य

No. 302]

आस्विन सुध प्रतिपदा पाचसातारोजाची
मोगलाकडे होती ते भेद करून पेसवियाच्या लो
शंकराजी केशव व कर्णोजी सिंदे वगैरे हशम
सरंजाम वरचेवर लोक वगैरे पाठविला असे. माहे
असे. माहोली गेली हाहि किला घेतील म्हणून
दोनसे माणूस आणिले. गनिमाची अडचण जाली
याजनिमित्ये हबसियाचे लोक आणिले. सेवटी
गेली की तुम्ही हबसियास किला दिल्हा म्हणजे
तुम्हाकडे असलियाने आम्ही वाटे जात नाही.
लोकास निरोप दिल्हा असे. १

No. 303] [15-9-1735

आस्वीन सुध १० दसमी सोमवारी दसरियाचे दिवसी राजश्री आनंदराऊ सोमवंसी याचे सरलस्कर काहाडून त्रिंबकराऊ सोमवंसी देवजीचा पुत्र याजला सरलस्कर दिल्हे. आनंदराऊ बेवकूफ याजमुले काहाडले असे. बीड अंबाड येथील सचिवांच्या बाबती सचिवानी अलाहिदा केल्या.

No. 304] [22-9-1735

आस्विन वद्य ३ सोमवारी दिढा प्रहरा दिवसा सकालच्या राजश्री पंतप्रधान आले. सातारियाहून जेजुरीस आले. तेथून कुरकुंबास गेले. तेथून गारेस भीमेस ग्रहणास जाऊन पाटसावरून आले असेत. १

No. 305] [23-9-1735

आस्विन
ार दमाजी थोरात याणी कोलवडीची तिसरी तकसीम
करून घेतले. त्याजवरी कसाला जाले. कागदपत्र गेले.
ंडोजी थोरात याणी पिलाजी जाधव याच्या हाते प्रसंग
कसिमेचे मोकदमीचे दुमालेपत्र करून घेतले. शेरणी
करून चौशाचा निला घोडा दिल्हा. पिलाजी जाधव
ले चांकरीचे यैवजी देविले. बाकी दीडहजार सन
ास पाचसे याप्रां कतबा लेहून दिल्हा.
तिसरी तकसीम अनभवणे. यैसी व साहित्यें

[8-10-1735

वद्य १३ प्रस्थान करून बाबूजी नाईकाचेथे जाऊन
पल्याड जाऊन डेरे देऊन राहिले. मावलातून
मावलात आहे ते वाटेने जाणार. बराबर पुत्रास

े पाटील पेसवियाकडे पाऊस गेला याजकरिता
धान करून सांगितले की मावलातून कोकणातून

दाणे आणाल त्यास जकात घेऊ ना. गुरे चारणीस न्याल त्यास वणचराई लाऊ देऊ ना. हजीर जेव (?) घेऊ देऊ ना. पाऊस पाणी पडोन काहीं जाले तरी घेऊ नाही तरी काही घेंऊ ना. यैसे समाधान करून स्वारीस गेले असेत.

रोज मजकुरी बुरूड व चांभार प्रांत जुनर व पुणे यांचा कजिया होता. चांभार म्हणत आपण बुरुडाचे पायेपोस जुने सालाबाद सादीत नाही. बुरुड म्हणतांत सांदीत आले. दाखले पाहता बुरडाचे जुने पायेपोस चांभार सांदीत आले यैसे पुरत नाहीत. त्याजवरून पेसवियाने तह केला की देसच्या चांभारानी बुरडाचे जुने पायेपोस सांदू नयेत. मावलचे व कोकणचे व इंदुस्थानचे चांभार आहेत त्याणी बुरडाचे पायेपोस सांदावे. यैसे वर्तावे म्हणून तुकोजी पिंपला बुरुड जुनरकर व पेंढार पिंपरियाचा बहरजी सोनवणी बुरूड पुणेकर याचा कतबा दिवाणांत गोपाळरायाच्या हाते लेहून घेतला असे. चांभारास पत्रे पेसवियानी करू दिल्ही की तुम्ही बुरडाचे पाये(पो)स मागे सांदिले नाहीत पुढेहि न सांदणे. चांभारापासून साल ग्याच्या गावच्या वसुलावर सेकडा साडेसात रुपये पुणे देसी घेतले असेत. पाटिलाचे कतबे चांभाराच्या पैकियाचे उगवणीचे घेतले असेत. पुणाचे चांभार पैका फार पडला म्हणून वाघोलीस पळोन गेले असेत. खोडदापावेतो लस्कराबराबर चाभार गेले होते.

राजश्री पंतप्रधान खोडदचे मुकामीहून स्वार होऊन पुढे गेले. पिलाजी जाधव यास राजश्री स्वामीनी बोलाविले याजकरिता सातारियास गेलेसे. चिमाजीआपा जुनर प्रांते तहरह करावयास राहिले. बाजी भिवराऊ यांस पिलाजी जाधव मुतालकी करून फौज घेऊन जात असेत ते मुतालकी सांगोन ते फौज बराबर देऊन बराबर नेले. रावेंतच्या बरवाजी पाटिलासी येमाजी भोंडवा भांडत होता. कान्होजी झेंडा राजश्री पंतप्रधान याजपासी करोल चाकर आहे. त्यांणी येमाजीसी मिळोन कजिया फैलाविला. पंती भोवरगाऊ पाढर नेऊन मनास आणिला. साक्ष बरवाजी सारिखी जाली. कान्होजीचा कोठे दाखला पुरला नाही. कल्याणराऊ व बाजी कान्हो देसमुखीच्या कारभारास गेले होते. गोपाल रामहि होते. भुलोजी पाटील ढंमढेरेहि इनसाफास होते. बापूजीपंत नानाहि होते. कान्होजीचा पाटिलकीत दाखलादुखला लागला नाही. कान्होजी पंताबराबर स्वारीस गेला. बरवाजीपासून च्यारसे रुा उगेच नजर घेतले. येणेप्रा जाले असे. बापूजीपंत भिमाशंकरास जाऊन पुणियास आले असेत. कार्तिकमासी पासणे लौले येथे संतबाचे कुरण आहे त्यासी मल्हारबानी आडथला गवतासाठी केला. १

चिमाजीआपा रामचंद्र माहादेव याच्या पुत्राच्या लग्नास आले. त्याणे सोयेरीक शंकराजी केशव यासी केली. चिमाजीआपाची फौज रामचंद्र हरि यैसे माहाळुंगे येथे ठेविले आसेत. जुनरच्या उरावर गढी बांधावयास काम लाविले. मोगलहि जमाव करू लागला. गढीचे काम च्यार दिवस राहविले असे. १

मातुश्री लाडूबाईनीहि सतबासी पासणियात आम्ही गवत काहाडू म्हणून कटकट लाविली असे.

No. 307] *[5-12-1735*

पौश सुध द्वितीया त्रितीया या दिवसात बाणकोट पेसवियाकडे होता तो हबसियानी गलबते आणून मार करून घेतला असे. हरि गणेश सरदार धरून नेले. जखमी आहेत. माणूस पडलेहि फार; बाणकोट जबून जागा. राखवत नाही म्हणून हबसियानी पाडावयास काम लाविला. माहाडात राजश्रीचे ठाणे; याजकरिता येथून चिमाजीआपानी माहाडचे बंदोबस्तीस बरखंदाज पाठविले असेत. १

पेसवियानी मांडवगड मालवियातीस (ल?) येथील सरदेसमुखी व सरदेसपांडेपण निमे घेतले. पैठणचे निमे पैकी निमे देसपांडेपण रुपुराऊ (?) यापासून घेतले असे. १

No. 308] *[11-12-1735*

पिलाजी जाधव सातारियांत होते. बाणकोट गेला. आणीख किले दगावतील याजकरितां राजश्रीनी चिमाजीआपाकडे पाठविले की तुम्ही सारे फौज घेऊन कोकणात उतरा. त्याजवरून पिलाजी जाधव पौश सुध गुरुवारी सुक्रवारी येथे आले. येथून नांदेडियास गेले. पुढें राऊत घेऊन कोकणात जाणार. १

No. 309] *[27-12-1735*

पौश वद्य १० दसमीस नारबावा व सेखमिरा व दादोबा आले चिमाजी आपास बाणकोटास पाठवावयास. चिमाजीआपा गेले नाहीत. पिलाजी जाधव यासच पाठवावयाची तजवीज केली. द्वादसीस उठोन गेले. माहादाजी अंबाजीहि गेले असेत. सैदलस्करखान अवरंगाबादेहून मखबूल अलमाचे कुमकेस येत होते. टोकियावर आले मागती फिरोन गेले. बाजी (हाजी ?) कोतवाल शेहरचा वारला हेहि वर्तमान असे.

No. 310] [11-1-1736

माघ सुध ९ रविवारी जगोबा व खंडो विसाजी राजश्री स्वामीकडे गेले. आधले दिवसी राजश्री चिमाजीआपा गेले होते. सिवापुरी राहिले होते. ते व हे असे सिरवलावरी गेले. गोविंदराऊ सतंबा येसवंतराऊ कल्याणराऊ आपा यैसे सिरवलावर आले. राजश्री स्वामीचा मुकाम नायेगांऊ ता। सिरवल येथे होता. तेथेच चिमाजीआपाबराबर जाऊन राजदर्शन केले. येकादसीस मागती राजश्री सिरवलास आले. त्याजबराबर आले. द्वादसीस हरगुडे येथे आले. तेथून जेजुरीस आले. दोनतीन मुकाम होते. तेथून सासवडी मुकाम केला. सासवडीहून सिवापूरास आले. चार पाच मुकाम केले. सेवटी कूच करून सिरवलास गेले. तेथून कूच करून वाईवर गेले. सिवापूरचे मुकामीहून चिमाजीआपानी निरोप घेतला. मुंज पुत्राची करावयास पुणियास आले. देसमुख देसपांडेहि आले. माघ वद्य दसमी सोमवारी पुणियास आले. राजश्री तिकडे गेले.

माघ सुध नवमी दसमीस राजश्री पंत सचिव याची मातुश्री यास देवआज्ञा जाली. सचिव नायेगांवीहून राजश्रीची आज्ञा घेऊन गेले असेत.

No. 311] [12-2-1736

फाल्गुण सुध १२ द्वादसी गुरुवारी राजश्री चिमाजीआपाचे पुत्र सदोबा याचा वृतबंध जाला. समारंभ बरा जाला. श्रीदेव चिंचवड मुंजीस आले होते. लालमाहलात ब्राह्मणभोजनाचे मांडव घातले होते. फाल्गुण वा। २ देकार दिल्हा. वीस पंचवीस हजार रुो वाटला. फार धर्म केला.

होली जालियावरी दुसरे रोजी पाटिलाचे खेले सेटीयाच्या होलीवरुनी गेले म्हणून सेटियानी चिमाजीआपास सांगितले. त्याणी पाटिलास ताकीद केली की त्याच्या बाजारे खेले घेऊन न जाणे. वरसास जे वाटेने जात असाल ते वाटेने जाणे. असे जाले असे.

No. 312] [10-3-1736

श्री

करिने सके १६५८ नलनाम सवछरे चैत्र सुध १ प्रतिपदा मगलवार सुहुर सन सीत सलासीन मयां अलफ. सन ११४५.

चैत्र सुध नवमीस राजश्री आपा राजश्री कृष्णराऊ माहादेव याचेथे त्याच्या मुलाची मुंज दसमीची म्हणून चासेस गेले. १

No. 313] [15-3-1736

चैत्र सुा १४ गावास आले. पूर्णमेस चद्रग्रहण, दिवस उगवता पूर्णमा आसे. १

दादोबा व सेखमिरा राजश्री आपास बोलाऊ पाठविले, सबब की संभाजी राजियाचा व घोरपडियाचा बिघाड जाला. पेसवियानी मेहुणा वेंकटराऊ घोरपडे याजनिमित्ये त्याच्या ठाणियाची कुमक केली; यामुळे संभाजी राजे याणी राजश्री स्वामीस लिहिले की तुमच्या राज्यातून कुमक होऊ लागली; याउपरी आम्ही मोगलापाशी तऱ्ही कुमक मागावी. त्याजवरून राजश्रीनी विचार केला की सरकारकून पाठऊन संभाजी राजियास भेटीस आणावे; समाधान करावे. यानिमित्ये आपास बोलाविले जाणार. आपा चासेस गेले, ते दिवसी बालाजी बाजीराऊ व माहादाजी अंबाजी यैसे सातारियास पाठविले. चिमाजीआपा चासेहून पुणियास येता माणकोजी पिंपलेकर पुढे जाऊन आपास गावास घेऊन येऊन धडफलियाचे टाके सेत दाखविले आसे. इनाम चालू नये म्हणून नालिसीच्या गोस्टी सागितल्या आसेत. १

सिपारसी बाबूजी नाईकाचा गुमास्ता सिऊबा नाईक आफटा केला असे वगैरे.

No. 314] [20-3-1736

चैत्र वद्ये ९ मंदवारी राजश्री चिमाजीआपा स्वार होऊन सातारियास गेले. आगोधर येक दिवस वासदेव जोशी याचेथे परस्थाने राहिले. तेथून दोन रोज बागात राहिले. मंदवारी स्वार होऊन गेले. १

No. 315] [28-3-1736

चैत्र वद्ये १३ रविवारी प्रहर दिढा प्रहरा दिवसा दादजी चिटनीस राजश्री प्रधानपंताचे यास क्षयेरोग होता मृत्ये पावले असेत. १

अवजी नीलकंठ परभू नील परभूचे पुत्र त्यास दादजी म्हणत असेत. कोटात घर बाधोन राहतात. तेथेच देहअवसान जाले.

No. 316] [3-4-1736

वैशाख सुध ३ त्रितीयेस पारवाडियात कुणबियाची पोर आडच्या वरसाची गरोदर जाली म्हणोन वर्तमान आले. त्याजवरून ती मूल येथे आणविली. पेसवियांच्या कारभारियानी ते अवध्या गावानी पाहिली. खरेसे असे. परिणाम काये होईल ते पाहावे.

No. 317] [2-4-1736

वैशाख सुध २ शुक्रवारी कान्होजी पाा झांबरा लब्या याचा भाऊ बावाजी, त्र्यंबकराऊ विस्वनाथ याजबराबर चाकरीस बागलाणात गेला होता तो येका गांवावर झुंझी पडिला म्हणून खबर आली. याजकरिता त्याची बायेको मांडऱ्याची लेक सती निघाली; संगमी सती पडली. १

No. 318] [7-4-1736

वैशाख सुध ७ बुधवारी खबर आली की मल्हारजी पाा झांबरा वंकोजी पााचा लेक गोरखोजी भापकर याजबराबर चाकरीस गेला होता. तो मेला. बारा रोज जाले. जखम लागोन मेला असे. १

No. 319] [6-4-1736

वैशाख सुध ६ सह सप्तमी मंगलवारी अवसीच्या दाहा घटका रात्री आनंदराऊ बहिरव दिाा राजश्री पंतसचिव सिंहगडी होते तेथे देवआज्ञा जाली असे. १

No. 320] [15-4-1736

वैशाख वद्ये गुरुवारी राजश्री चिमाजीआपा सातारियाहून येऊन नांदेडिया-पलीकडे भुगाऊ भुकूम येथे मुकाम करून राहिले. दुसरे रोजी कूच करून कुलाबियाकडे गेले. सबब की रेवसे म्हणून जागा आहे ते मानाजी आंगरियाकडे होती; ते हाबसियानी घेतली. मानाजीची स्वारी त्याजवरी गेली होती; परंतु रेटले नाही. त्याचे कुमकेस गेले. ठाणे हाबसियापासून घ्यावयास गेले असेत. चिमाजी भिवराऊ फौज घेऊन जांबगावाकडे गेले होते ते आले. त्याजबाा फौज व रामचंद्र हरि पहिलेच पुढे पाठविले. हाली आपणहि गेले. माहादाजी अंबाजीहि बरोबर गेले असेत. १ बाळाजी बाजीराऊ सातारा आसेत.

No. 321] [19-4-1736

राघो लक्ष्मण पुरंधरे याची कन्या जनोबा राजउपाध्ये याच्या मुलास दिल्ही. लग्न वद्ये ५ सोमवारी जाले असे.

No. 322] [22-4-1736

वैशाख वद्ये ८ गुरुवारी कोकणातून वर्तमान आले की वद्ये ५ सोमवारी वेसियापासी सिदीसाताचे व चिमाजीआपा व मानाजी आंगरे याचे झुंझ जाले.

हबसियाचा मोड जाला. याची फते जाली. हबसियाने रेवसे पाडून आतील दाणादुणा गलबतात घालून नेला. यांची फौज आली. इचा मोहला ध्यावयास हजारा माणसानसी राहिला होता. त्याजला चिमाजीआपाची खबर नव्हती. आंगीरियाची व हशमेचीच होती. लडाई जाली. याची फते जाली. आंगरीयानेहि बरी कस्त केली. सिदीसात खासा पडिला. कोंडनाक माहारहि पडला. घाटगा सरदार होता तोहि पडला. सा सातसे माणूस कापून टाकले. गलबते पलोन गेली. पेसवियाकडील दाहा बारा घोडे पडले. दाहा पाच माणूस जखमी जाले. जिवाजी सितोला न्हावकर पडिला, असे वर्तमान आले असे. १

कुंवर बाहादूर सिनरचा देसमूख अपमरणे मृत्ये पावला. खबर दाहा रोजाची आलीकडे अगर पलीकडे असे. १

No. 323] [24-4-1736

वैशाख वद्ये १० मंदवारी जानो शंकर खासनीस राजआज्ञेचे मुतालीक यास देवआज्ञा जाली. जेस्ट स्त्रीने अग्नप्रवेस केला असे. १

याचे पद देवराऊ लपाटे म्हणून बाा आहे त्यास सांगितले असे.

No. 324] [26-4-1736

वैशाख वद्ये १२ सोमवारी राघो विनायेक याचे लग्न इंदुरीस जाले. वासदेव अनाजी देसपांडे चाकणकर यांची नात केली असे.

सोमवारी कान्होजी भोसले सातारियाहून पलोन गेले. दोन तीनसे राऊत होते. कृष्णेस स्नानास जातो म्हणून राजश्रीस पुसोन गेले, तैसेच निघोन गेले असेत. १

No. 325] [11-5-1736

अधिक सुध १२ मंगलवारी वर्तमान आले की बापूजी भीमशेन पारसनीस राजश्री रावापासी होते त्यास लस्करात वेथा जाली, मृत्ये पावले, यैसे वर्तमान आले असे. १

No. 326] [16-5-1736

अधिक वद्ये ३ राजश्री बालाजी बाजीराऊ सातारियाहून आले पुणियास. १

राजश्री संभाजीराजे याजला आणावयास राजश्री स्वामींनी फतेसिंगबावा व बालाजी बाजीराऊ व श्रीपतराऊ व नारबा पाठविले ते कोल्हापुरास जाऊन संभाजी राजियास घेऊन आले. हे राजे पालीपावतो सामोरे गेले होते. सातारियास आलियावरी त्याजला पेसवियाच्या वाडियात जागा दिल्ही. राहिले असेत. १

No. 327] [*21-5-1736*

अधिक वद्ये ८ आस्टमी सुक्रवारी राजश्री चिमाजीआपा कोकणांत गेले होते. सिदीसात मारला. ते स्वारीहून पुणियास आले. लस्कर अंवंधावर ठेविले. बाईस सामोरे जाणार. १

No. 328] [*19-5-1736*

अधिक वद्ये ६ बुधवारी मध्येरात्री आपाजी माणकेस्वर सुपेकर देसपांडे यास आंबीमधे देवआज्ञा जाली असे. १

No. 329] [*26-5-1736*

चिमाजीआपा मातुश्रीस सामोरे अधिक वद्ये १२ सोमवारी गेले असेत, पावळापावेतो. १

No. 330] [*23-5-1736*

श्री

करिने श्रीसके १६५८ नलनाम संवछरे अधिक वधे नवमी रविवारी मृग नक्षत्र निघाले. अवल साल सन हजार ११४६ मुहुर सन सबा सलासीन मयां अलफ.

जेस्ठ सुध ३ त्रितीया सोमवारी मातुश्री राधाबाई राजश्री पंतप्रधान यांची माता माहायात्रेहून पुणियांस आली. देशमुख देसपांडिये कळसावर सामोरे गेले. येक मोहर नजर बाईस केली असे. दुसरे रोजीं माउंदे केले. सगट रुपया ब्राम्हणास दक्षणा दिल्हे असे. १

No. 331] [*15-6-1736*

जेस्ठ वद्ये ३ नरमदातीरीहून पेसवियाकडून वर्तमान आले की, मजल दरमजल येतो. होलकर व सिंदे याजकडून मालवियात छावणी करविली. आनंदराऊ पवार अपमरणे मृत्ये पावला. विसा तारखेची खबर आहे. १

No. 332] *[10-6-1736*

जेस्ठ सुध माहादजी अंबाजी पुणियाहून सासवडीस गेले. बरे वाटेनासे जाले असे १.

जेस्ठ सुध १३।१४ चिमाजीआपास बरे वाटेनासे जाले. द्रुस्टदान व म्हैसीदाने व अनुष्ठाने केली असेत. बरे जाले. भ्रमहि पडिला होता. १

No. 333] *[23-6-1736*

जेस्ठ वद्य ११ बुधवारी राजश्री पंत सचिव नारो शंकर यांस भोरचे मुकामीं देवआज्ञा जाली असे. १.

पेसवियानी हतीचा रथ आणिला असे.

[24-6-1736

जेस्ठ वद्य १२ गुरुवारी राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान स्वारीहून पुणियास आले. बालाजी बाजीराऊ संगमपर्यंत सामोरे गेले होते. १

No. 334] *[28-7-1736*

श्रावण सुध प्रतिपदेपासून ब्राम्हणभोजन राजश्री पंतप्रधान याणीं केले. नागपचमी जाली ते दीस दक्षणा दिल्ही येकापासून दोनपावेतों; ब्राम्हण च्यार पांच हजार जमा जाले होते. १.

No. 335] *[31-8-1736*

भाद्रपद सुध ७ मंगलवारी राजश्री पंत सातारियास राजश्रीचे भेटीस गेले. सिवापूरकरास वेटे मागितलें होते; त्याणी दिल्हे नाहीत; म्हणून हटविले असेत. १.

No. 336] *[15-9-1736*

भाद्रपद वद्य ६ सह सप्तमी बुधवार कपिलाशष्टीचा योग आला. आवघे योग होते; परंतु मंगलवारी नव्हता, म्हणून पहाटे चौ घटका रात्री परवकाळ होता कपिलाशष्ट केली असे. १

राजश्री पंताचेथे अनुस्टान जाले. होम जाला. कुडमंडप केला होता. [पुढें कोरी जागा.]

No. 337] [4-10-1736

आश्विन सुध येकादसीस. मियां (?) खान यास देवआज्ञा जाली [पुढें कोरी जागा]

No. 338] [10-10-1736

आस्विन वद्ये १ रविवारी राजश्री राऊ प्रधान सातारियाहून जेजुरी मोरगाऊ कुरकुंब करून पाटसावरून पुणियास आले असेत. १

No. 339] [26-10-1736

कार्तिक सुध पचमी मंगलवारी राजश्री राऊ उतरपंथे स्वारीस जावयास भांबोडियावर जाऊन राहिले असेत पाहटे. बराबर नाना पुत्र यास नेले असे १

राजश्री पेसवियानी गायेउतारी नवे सिवालये करविले. राजश्री सिवरामभट चित्रांव यास काम घ्यावयास सांगितले असे. त्याचा मुहूर्त केला. [कोरी जागा]

No. 340] [24-10-1736

कार्तिक सुध २ द्वितीयेस रविवारी उधोबा गोसांवी अंबले देहूकर यास देवआज्ञा जाली असे. १

No. 341] [12-11-1736

कार्तिक वद्ये ९ सुक्रवारी पेसवे कूच करून मजल दरमजल गेले. पंताजी मोरेस्वर सिवणेकर यास कुहीज प्रातीचा सुभा पेसवियानी सांगितला असे. वासुदेव जोसी याचा कल्याणचा सुभा दूर करून बरवाजी ताकपीर पाठविला असे. [कोरी जागा]

संभाजी आंगरे कुलाबियावरी येणार. याजकरिता मानाजी आंगरे यांस पेसवियानी लोक कुमकेस पाठविले असेत. १

अंताबा नाईक भिडे याणीं मोहियाबाद ऊर्फ बुधवार पेठेस आपला कमाविसदार रामाजीपंत सालमजकुरी पाठविला असे. १.

हरिपंत दूर केला असे. १.

बापूजी मेघश्याम ढेरे याणीं जुनी सनद फुलगाऊ आद चावर व जोरगांव आद चावर इनाम याची काहडली; परंतु भोगवटा नाही. हाली पेसवियानी इनाम करार केले असे. १

No. 342] [17-11-1736

कार्तिक वद्य ११ गुरुवारी राजश्री चिमाजीआपा आळंदीस यात्रेस गेले. बुधवारी पुणियास आले. येकादसीसच बाजी शंकर देसपांडे याची बायको श्री काका देव याची कन्या ईस देवआज्ञा जाली. चौ घटिका रात्रीस. १.

कार्तिक मासी रंभाजी निंबालकर यास देवआज्ञा जाली. तिथीची तहकीकात करावी.

No. 343] [December 1739

मार्गेस्वरमासी बाबूराऊ दाभाडा सवाई खांसखेल यांस देवआज्ञा झाली.

मार्गेस्वरमासी दाजीपंत सिहगडांस सचिवाकडून आले. बराबर मुतालकीचे सिके आहेत. राघो वेंकटेस व रंगो रघुनाथ व गोमाजी दतो वगैरे आहेत.

No. 344] [4-1-1737

पौश सुध १४ राजश्री चिमाजीआपा जेजुरीस पुढे यात्रेस गेले. तलियाचे काम पाहून कुरकुंब करून यावयास गेले. तिकडे नालबंदाचा बोभाट आला. त्याजला लुटले. अलेगांवी मुा केला. तेथून मुकाम करीत न्हावीस आले. तेथे काहीयेक दिवस मुकाम केला. तेथून पुणियास फालगुण सुध ७ शनवारी आले.

No. 345] [January 1737

पौशमासी वद्येपक्षी त्रिंबक कृष्ण राजरुसी सुभेदार किले पुरंधर यांणी आपला देसमुखाच्या वाडियावरता वाडा आहे, त्याजला आवर घालावयास काम लाविले असे.

शके १६५८ पौष

आनंदराऊ पवार याचा लेक येसवंतराऊ पवार याचा वाडा ठाकूरठिकियात बांधिला असे. १.

पेसवियानी इनामकी पाटिलाची, तेथे विहीर करून बाग केला असे. त्यात पानवेली लाविल्या असेत. १.

गोपालराम याजला लालमहालचे जमिनीपैकी त्याच्या वाडियामागे जागा होती ते दिल्ही. त्या जागियावरी गोपाळपंती वाडा बांधला. खंडभटाच्या भितीपासी सात हात गली पंती टाकविली असे. १.

---

१ चौकसी.

अंताजी हरि हवालदार निरथडीकर हे फलटणांस राजसबाईच्या मुलीच्या लग्नास राजश्री आले होते त्याच्या साहित्यास गेले होते. तेथे वेथा जाली. घरी परिचियास येऊन वारले. त्याची ती जा [कोरी जागा] त्याचा हवाला त्याच्या मुलाच्या नांवे दिल्हा. १.

No. 346] [26-2-1737

फालगुण सुध ७ मंदवारी राजश्री चिमाजीआपा पुणियास आले असेत. १.

फालगुण सुध पूर्णमा मंदवारी होळीचे दिवसी ग्रहण पडले असे. १.

No. 347] [7-3-1737

फालगुण वद्य २ सोमवारी आपाचे दुसरे बायेकोचे फलसोभन जाले. आहेर जाले. देसमुखानी आहेर केला. देसपांडे सामील जाले नाहीत. लबाडी करून निराला आहेर केला असे. आपास सांगितले की पहिली चाल येकेठाई करावयाची. देसपाडिये छेद करितात. त्याणी ताकीद करावी यैसे केले असे. १.

No. 348] [25-2-1737

फालगुण सुध ५ । ६ सुक्रवारी येशवंतराऊ वीरेस्वर श्रीदेव चिंचवड यांजकडे होते ते होलकराकडे आलीकडे राहिले होते. ते पुणियातच वारले असेत. १.

चैत्र सुध रुजू फालगुण वद्य रा। चिमणाजी भिउराऊ व रामचंद्र हरि व संकराजी केशव वगैरे लोक फिरंगणाकडील हवे आली याजकरिता वसईस व साष्टयाकडे पाठविले असेत. मागून आपण जाणार.

No. 349] [21-3-1737

यादी करिना सके १६५९ पिंगलनाम संवछरे चैत्र सुध १ सोमवार गुढ्याचा पाडवा सन हजार ११४६

सुध २ मंगलवारी राजश्री चिमाजीआपा परस्छाने बागांत गेले. तेथून गुरुवारी रात्री फिरंगणाकडे स्वारीस गेले आसेत. १.

2585

No. 350] [31-3-1737

सुध ११ गुरुवार राजश्री चिमाजीआपाकडून वर्तमान आले की शनवारी शष्टीस फिरंगियाचे ठाणे साष्टे फते केले असे. ठाणे घेतले. वसईस जाऊन बाहादूरपुरा घेतला. किला वसईचा भाडत आहे. सास्टींत यैवज थोडाबहुत सापडला. लोकास कांही घेऊ दिल्हे नाही. झाडे घेतले. [१]त्यावर महिनिया कां बेलापूर व मांडवी फिरंगियाची ठाणी घेतली.[१]

No. 351]

राजश्री पंतप्रधान यांजकडून वर्तमान आले कीं हटेर लुटली. भदावरच्या पेठा लुटल्या. हटेचा किला भांड(त) होता. मग राज्याने कौल घेतला. वीस लाख रुा दिल्हे. हटेरीस लूट फार सापडली.

No. 352] [8-4-1737

चैत्र वद्य ९ शुक्रवार मुंजीची लग्न.

चिमणाजी नारायेण याच्या भावाची सिंहगडी जाली. सचिवाच्या धाकट्या भावाची माहादाजी शंकर याच्या पुत्राची जाली असे.

१

गोपालराम देशपांडे याच्या चौथ्या लेकाची जाली.

१

त्रिंबक बापोजी देशपांडे याच्या पुत्राची जाली असे.

१

No. 353] [6-5-1737

छ ९ मोहरमी गंगेस पाणी आले. आस्त्रीर्ये (आश्चर्य?) जाले. पाऊस वरता थोडकासा पडिला होता.

No. 354] [5-5-1737

वैशाख वद्य २ संभाजी जाधव याचे लेकीचे लग्न बाघोलीस जाले. उदाजी पवार यांचे लेकासी सोयेरीक केली. १.

No. 355] [29-4-1737

वैशाख सुध ११ रघुनाथजी परभू याची धोडीचे[२] लग्न जाले. जिऊबा चिटणीस याच्या पुतण्यास दिल्ही. पुणियांत लग्न जाले.

१—१ हा मजकूर निराळ्या वळणाचा   २ पुतणीचे.

No. 356] [2-7-1737

आशाढ वद्य १ शनवारी राजश्री चिमाजीआपा वसईस गेले होते ते पुणियास आले आसेत. १.

No. 357]

आशाढ वद्य ६ बुधवारी श्रीमंत राजश्री बाजीराऊ पंतप्रधान स्वारीस हस्तनापूरपावेतो गेले होते ते पुणियास आले असेत. १.

No. 358] [24-7-1737

श्रावण सुध ८ रविवारी राणोजी सिंदे व मल्हारजी होलकर पुणियास आले आसेत.

No. 359] [6-9-1737

भाद्रपद वद्य अस्टमी अगर नवमी रविवारी बाजी भिवराऊ याणी वसईस सिड्या लाविल्या. फिरंगी याणी मार केला. सिड्या लोटून दिल्या. याजकडील माणसे च्यारपांचसे मेली. च्यारपांचसे जखमी जाली. खराबी जाली. बाजी भिवराऊ याच्या उजव्या हातास * फ त्या ल्या खिल्याची जखम लागली असे.

No. 360] [20-9-1737

आस्विन सुध ८ मंगलवारी रात्री पेसवियानी दादजी सितोले व जानोजी ढमढेरे या दोघांस दोन पालख्या दिल्ह्या असेत. १.

No. 361] [22-9-1737

आस्विन सुध १० गुरुवारी रा। पेसवियानी संताजी मोरे पागेचे सरदार, यास पालखी दिल्ही आसे; व नारो सिवदेव कोकणस्त ग्रहस्त मालवियांत कमावीस करीत होता त्यासहि पालखी दिल्ही आसे. १.

No. 362] [15-10-1737

कार्तिक सुध ३ शनवारी प्राथःकाली राजश्री बाजीराऊ पंतप्रधान मुलुकगिरीस जावयास मुहूर्ते रा। बाबूजी नाईक जोसी यांच्या घरास गेले; व डेरे भांबोडाच्या रानात रोहरापासी दिल्हे. बाबूजी नाइकांचे घरींहून दुसरे तिसरे रोजीं भांबोडियापासी डेरे होते तेथे गेले.

No. 363] [22-11-1737

रा बापोजीपंत नाना व जगनाथपंत व गोपालराम देशपांडे व त्यांचे भाऊबंद यैसे राजश्री पंतप्रधान याजबराबर गिरनईपावेतो गेले होते. तेथे देशपांडियाचा मजकूर पडिला होता परंतु कांही जाले नाही. ते अवघे माघारे गावास मार्गेस्वर सुध ११ मंगलवारी आले. निळो विठल रा चिमाजीआपा बाा लस्करांत राहिले.

No. 364] [4-12-1737

मार्गेस्वर वद्ये ९ रविवार. या मागे सात आठ दिवस पाहाटेस व सायंकाली अवसी पाहाटे दिशा लाल होतात. च्यार घटकापर्येत लाल अभ्र असते. मागती निवलते दिशादाह होतो. दुछिन्न आहे.

भार्गवराम बावा याणी काा पाटसचे विहिरीस बारवेस बांधावयास काम लाविले आहे; व पाटसच्या सिवारात देशमुखाचे तले रा मालोजी नरासिंगराऊ यांचे आहे, त्यास राणोजी सिंदे याणी काम लाविले आहे. १

भार्गवराम बावानी येवताचे विहिरीस काम लाऊन गेले साली केली तयार तैसीच पाटसी करणार. १

No. 365] [26-12-1737

पौष वद्ये १ वर्तमान आले की अलजपूरचा सुभा सुज्यातखान याजला रघोजी भोसले याणी धरिले. फौज मारिली लुटली. खासा जखमी होऊन पाडाव जाला. हती घोडे अवघे घेतले असेत. १

रोज मजकूर वर्तमान आले की निजामाकडील येक मोगल माळवियात मल्हारजी होलकर याच्या ठाणियास वेढा घालून बैसला होता तो होलकराने बुडविला असे. १

No. 366] [27-12-1737

पौष वद्ये २ वर्तमान आले की नीळ परभूचा लेक चिटकोबा सरलस्करचे चिटनीस याजला लोणंद तडवल येथिल्या मुकामी समेत येक चाकर त्र्यंबकराऊ सोमवंसी सरलस्कर याणी जिवे मारिले. आपली राखहि मारिली आसे.

No. 367]

पौश वद्ये १ सुक्रवारी संक्रातीस वर्तमान आले की फिरंगियाणी माहीमच्या वेढियावर चालोन घेतले. जुंज जाले. माहादाजी केशव शंकराजी केशव याचे वडील भाऊ ठार जाले. रांमचंद्र हरीस हातास गोली लागली. येक दोन ब्राह्मण मेले. सेणवईहि येक दोघे पडले. हशमातील सरदारहि दोघे तिघे पडिले. वगैरे दोन अडीचसे माणूस पडले असे. १

No. 368] [19-12-1737

छ ७ रमजानचे पत्र राजश्री पधानपंताचे पत्र आले की भुपालाचा आश्रये करून किलीजखान बसला आहे. आम्ही तिसरे रमजानी भुपालावर मोगल मुकामास आला ते समई गाठला. जुंज जाले. मोगल थंडा केला. मोगल किलियाचा आश्रा धरून राहिला. आम्ही बाणा दो बाणांच्या टपियाने भोवते राहिलो. दाणा पाणी मोगलास जाऊ देत नाही. मोगल सिकंदा केला आहे. लौकरीच घेऊ यैसी पत्रे आली असेत. १

No. 369] [30-12-1737

छ १८ रमजानची पत्रे पेसवियांस अली की मोगलानें सिकंदा होऊन सल्यावर घातले. पुढे सवेच कागद आले की सला जाला. मालवा दरोबस्त दिल्हा. चमेलीपलीकडे जाऊ नये यैसे जाले असे. मोगलाने काही पैकाहि दिल्हा. नसरजंग बऱ्हाणपुरास नवाबाकडे जावयाच्या उद्यगास जात होता. त्यास वाटेस रा। चिमाजी आपाच्या लोकानी पछाडीवर घातले. नेमाजी सिंद्याच्या नातू याची दोनसे घोडी घेतली. व हाती तीन घेतले. सला जालासा खबर आलियावर वसईकडे गेले. सास्टीस राहिले. फिरंगियाने धारावीस ठाणे होते. त्याजवर घातले. ठाणे घेतले. पाचसातसे माणसे मेली.

No. 370] [1-2-1738

माघ वद्य ८ बुधवारी पाचा घटका रात्री देशमुखाची मूल भवानी इचे लग्न जाले. सटवोजी जाधव वाघोलीकर याच्या मुलास दिल्ही असे. १

No. 371] [9-2-1738

फाल्गुण सुध २ बाजी भिवराऊ याचे बायकोस देवआज्ञा जाली असे. १

श्री

करिने श्री सके १६६० कालयुक्तनाम संवछरे चैत्र सुध १ शुक्रवार सुा समान सलासिन मया अलफ. सन ११४७

देशपांडियाच्या रामनवम्याचा मोहछाव निळोपंताच्या बायेकोच्या वाळितामुळे राहिल्या असेत १

No. 372] [*3-4-1738*

चैत्र वद्य ११ रा बापूजीपंत नाना येथे आले; बाळोबास वसईकडे रवाना करावयास श्रीमंत रा चिमाजीपंत आपांकडे.

No. 373] [*11-4-1738*

वैशाख सुध ३ मंगळवार अक्षत्रितीया निळो विठल देसपांडे सातारियाहून राजपत्रे घेऊन आले कीं स्त्रीचे वाळित पडिले आहे त्याची सुधता करावी. त्याजवर सई निळोबाची बायेका इजला विषप्रळये जाला. बुधवारीचे रात्री तिसरे प्रहरी वारिली. गाडियावरी घालून नदीस नेऊन दहन केले; सकाल दिवस उगवता गुरुवार लागला असे. १

No. 374] [*21-4-1738*

वैशाख सुध १३ शुक्रवार नरसिंहजैंतीचा उपास; ते दिवसी प्राथःकालच्या सा सात घटिका दिवसा आकस्मात् आकाशध्वनीचा शब्द जाला. जसा भांड्यांचा[1] आवाज होतो याप्रमाणे कढाडिले असे. गाडियाच्या गडिगडीसारिखे वाजत गेले. आकासीतून दिवसा जे समई आवाज जाला, ते समई नक्षत्र थोर पडिले. दुचिन्ह जाले असे. १

No. 375] [*27-4-1738*

वैशाख वद्ये ९ गुरुवारी दारूवालियाची घरे पिराच्या चिंचाजवल होती. त्याच्या घरात दारूचा सरकारचा कारखाना होता. दारू तयार होत होती तो दलता जातियाची ठिणगी पडिली. दारू उडाली. पकी दीड दोन मण होती. मजूर दारूच्या कामावर होते ते दारूने जलाले. तीन घरात जलाली. बारा बाहेर जलता जलता पलोन गेली. अंगाचे भाते निघाले. सेवटी मेली. दोघे तिघे मात्र वाचिली. वरकड अवघी येका दो दिवसानी मेली. आगीने दोन तीन घरे जलाली. मजुरे जलाली. गरिबे. फटकाल गोष्टी जाली असे. १

---

१ तोफेचा.

No. 376] [1-5-1738

वैशाख वद्य ९ सोमवारी वसईहून चिमाजीआपापासून माहादोबा पुरंधरे राजश्रीकडे जावंयास आले, तो राजश्रीच्या लस्करांतून दादोबा पुरंधरे यांची पत्रे आली की, उदाजी चव्हाण यास आणावयास फतेसिंगबावा व श्रीपतराव व संभुसिंग तासगावांस पाठविले. तो कोसावर पुढे सामोरा येऊन यांस भेटला. याणीं हाती धरून बिबवीच्या मुकामावर राजश्रीच्या दर्शनास आणिलें. दर्शन जाले. सवेच निरोप दिल्हा की, उदईक मागती या. तुमचे मुदे मनास आणून आज्ञा करणें ते करू. ऐसी पत्रें आली. चव्हाण राजश्री स्वामीस भेटला असे. दोनच्यार (दिवस) राजश्रीपासी होता. राजश्री ठाणीं मागो लागले याज-करिता फिरोन उठोन तासगावांस गेला. राजश्रीनी इमान देऊन आणिला होता म्हणून सुखरूप लोक देऊन तासगावांस पाऊन दिल्हा असे. त्याची ठाणीं घेतील यैसे असे १.

No. 377] [23-5-1738

जेस्ठ वद्य १ मंगलवारी लग्ने जाली असेत.

१ गोविंदराऊ बिन बाबूराऊ उर्फ अडबोजी ना॥ देसमुख याचे लग्न खानवटे ता॥ पाटस येथे जाले. पुणांतून लग्न गेले असे. खानवटेकर त्रिंबकजी भों याची लेक केली.

१ मल्हारजी बिन मानाजी सितोले देसमुख याची मुली कडेगावकर यादव यास दिल्ही असें. पुणियांत लग्न जाले.

१ बाजी भिवराऊ दि॥ रा॥ पंतप्रधान याचे दुसरे लग्न पुणियात जाले. परांडे येथील नाइकासी सोयेरीक केली. नवरी अकरा बारा वरसाची मिलाली असे.

No. 378] [18-6-1738

आशाढ सुध त्रयोदसी रविवासर तिसरे प्रहरा नढगेमोडीस सिवालय बांधले आहे, त्यामधे बाणांची स्थापना केली. बाण थोर उतम लक्षणयुक्त नरमदेहून ब्राह्मणाने आणिला होता. त्यास पाच सातसे रुो दिल्हे होते. साळोखा पार्थीव लिंगासारिखी तांबड्या पाश्याणांची नवी करून लिंगस्थापना केली. सदरहू शिवालये व आवघा खर्चवेच पेसवियानी केला; परंतु वेदमूर्ती सिवरामभट चित्राव याजकडून कामाकाजाचे पारपत्ये करविले. आवघी काम करावयाची व घ्यावयाची

उजकरणी वेदमूर्तीनी केली असे. गोविंदभट बरवे बापूभटाचे पुत्र, याणी मागे फटकाल कर्म केले होते; त्याजवर ब्राह्मणानी शब्द आणिला. समत केले. त्याजवर मातुश्री राधाबाई पेसवियांचे आज्ञेवरून ग्रामस्तानी समत घातले नाही. प्रभूची आज्ञा पाहिजे म्हणून अनमान केला. कोकणस्थानी ग्रामस्ताचा द्वेश मांडिला आहे.

No. 379] [24-6-1738

आशाढ वद्ये ९ मंदवारी गांवची शांत केली. त्यास माहारामांगाचे पेढियाच्या घागरीबदल भांडण जाले. माहारानी तकरीर दिल्ही की पेढियाची घागर आमची; आपण दोन च्यार वेला डोईवर घेतली होती. मांगानी तैसीच तकरीर दिल्ही. त्याजवर माहारानी सुतार डोरला जामीन दिल्हा. मांगानी बरवा परीट जामीन दिल्हा. पहिले दिवसी माहारानी जामीन दिल्हा नव्हता म्हणून रातचेरात कोटात बैसविले होते. दुसरे रोजी जामीन दिल्हा. पाटील सेटे माली पेठ शाहापूर याजला वर्तमान पुसिले. त्याणी कतबा लेहून दिल्हा की, मांगाचीच पेढियाची घागर आहे. खलियास रासीपासी पेढा मागच आणीत असतो. माहारानी येकदा डोबई करून पेढियाची घागर घेतली होती. मागे मांगच घेत आले. आलीकडे जरीचे साली सांत केली, ते समई मांगानीच घागर चालविली यैसी साक्ष दिल्ही. त्याप्रो बलुतियानी साक्ष दिल्ही. त्याजवरून मांगाचे डोईवर पेढियाची घागर देऊन गावाभोवता टोणगा फिरविला. सात केली असे. पेठांपेठांनी सांतीच्या खर्चाची पटी घेतली असे. सदरहू तकरीरा केसो संभदेव मोकासी याजपासी आहेत. दस्तके करून घेतली आहेत. राजश्री चिमाजी आपाच्या कानावर सदरहू वर्तमान घालून सदरहूप्रा सांत केली असे; हजीर:

जमीदार:

१ जगोबा
१ यादोपंत
१ गोपालराम
१ तात्या
१ खंडो विसाजी
१ गुंडोपंत
६ वगैरे.

गावकरी:

१ वाकोजी पा चांदजी पां कान्होजी पा लब्या व चौ
१ बाबू सेब्या व गंगाजी शेब्या व पांडू माहाजन.
१ दाद माली सुभान माली सोमाजी पारखी वगैरे माली व गोपाळ मोरेस्वर कुलकर्णी

2592

बलुते :

१ संतू डोरला सुतार

१ बांभोडकर

१ धोंडी लोहार

१ वाळू कुंभार

१ बरवा परीट

१ पांडुरंग जोसी

१ संतू मगर

१ अनसू अढाऊ

१ मल्हारपंत राजरूप कुलकर्णी निा मुंजेरी.

१ रामसेट पेठ शाहापूर

१ सेकोजी पाा.

येणेप्रां हाजीर होते. याजदेखता केसोपंताचेथे सदरहू करीना जाला असे. १

No. 380] [15-7-1738

श्रावण सुध दसमी मदवारी राजश्री पंतप्रधान घरास आले. काल संगमावर होते. आजी वाडियात आले सामोरे चिमाजी आपा व नाना वगैरे सेखपासिया (?) पावेतो गेले होते.

राजश्री स्वामीच्या लस्करातून खबर आली की संभाजी माहाराजांची पेसवाई भगवंतराऊ पिंगले यास सांगितली असे. नील प्रभूची काढून, पिंगलियाची पिंगलियांस दिल्ही असे. राजश्रीनी दमाजी थोरात याचा धाकटा लेक चंद्रभान याजला राजश्रीनी येसमाळी याबाा पागा दिल्ही. सरदारी याजकडे. कारभार येसमालियाकडे. यैसे केले असे.

गोविंद कृष्ण जुनरचे सुभेदार वारले. त्याचा धंदा त्याच्या लेकास राजश्री पेसवियानी सांगितला असे. १

No. 381] [4-8-1738

श्रावण वद्य ३० शुक्रवारी सायेंकालीच्या तीन घटका दिवसां सूर्यग्रहण पडिले. माहापर्व होते. १

No. 382] [16-8-1738

भाद्रपद सुध १३ बुधवारी राजश्री बाजीराऊ पंतप्रधान राजश्रीच्या भेटीस जावयास प्रस्थाने निघाले. ते आवजी कवडियाचे घरी राहिले. प्रतिपदेस स्वार होऊन कुरकुंबास गेले. तेथून मोरगांवास गेले. अंबीस सप्तमीचा पक्ष

करून, जेजुरींहून पलीकडे राजश्रीच्या दर्शणास गेले. जेजुरीस राणोजी खोमणा याजपासून घोडी मागून घेतली असे. जेजुरीपावेतो रा॥ बापूजीपंत नाना गेले होते.

No. 383] *[17-8-1738*

भाद्रपद सुध १४ गुरुवारी निळो विठल देशपांडे याचे स्त्रीचे वाळीत पडिले होते. त्याचे प्राश्चितविधास प्रारंभ केला. क्षौरे केली. सईचे व शंकराजी विठलाचे व केसो गोविंद याच्या सुनेची, तिहीचेहि अवघियानी तीन दिवस सुतक धरिले. दशा करून अकरावा बारावा दिवस केला. तेरावे दिवसी मासमी केली असेत. दोन द्वादस अब्धे निलोबास प्रायेछित सागितले. येक दोड द्वादस अब्ध भावाबंदास सागितले. तीन्हीहि निलोबानीच कबूल केली. बारासे साठी रुो निलोबानेच कबूल केले. भावाबंदापासून पैका घेतलियाने जन्मेवर ठोसरा, याजकरिता आवघे निलोबानेच मान्ये केले असे. निळोबास भावाबंदानी घालवावयास आळस केला नाही; परंतु त्याचे त्यानेच राजद्वारीहूनहि उलगडा करून आणिला, येथीलहि केला असे. आधिक सुध दसमीस भावाबंदाकडून मागती आठरा अब्दाचा संकल्प करविला. यैवज निलोबानेच दिल्हा. आधिक वद्य १ ब्राह्मणभोजन केले असे. काही नदीस, काही घरी जाले असे.

No. 384] *[29-8-1738*

भाद्रपद वद्य ११ मंगळवारी राजश्री चिमाजीआपा कुरकुंबास श्रीच्या दर्शणास स्वार होऊन गेले, ते पाटसावरून कुरकुंबास गेले. तेथून जेजुरीहून सासवडावरून दाहावे दिवसी पुणियास आले असेत. १

No. 385] *[22-10-1738*

आस्विन वद्य ६ रविवारीं वर्तमान आले कीं, तासगांव श्रीमंत राजश्री पंतप्रधान यानीं घेतले.

आथणीचे ठाणे जैतजी चव्हाण याचे होते ते ठाणे राजश्री श्रीपतराऊ याणी घेतले; वर्तमान आले आहे.

कार्तिक वद्य ४॥५ विठल सिवदेऊ चिखलीकर यास देवआज्ञा जाली म्हणून खबर आली.

No. 386] [20-11-1738

कार्तिक वद्य ९ सोमवारी राजश्री चिमाजीआपा मुहुर्तेकरून बाहेर निघाले. ते भांबोडाच्या रानात डेरे देऊन राहिले असेत. ते कार्तिक वद्य ११ रविवारी आलंदीस गेले असेत. १

No. 387] [26-11-1738

कार्तिक वद्य ११ रविवारी पाहाटेस रा आयाबाचे पुत्र चिटकोबा यास देवआज्ञा जाली असे.

No. 388] [18-12-1738

मार्गेस्वर वद्य ४ सोमवारी रा राऊ प्रधान राजश्रीकडून पुणियास ती प्रहरा रात्री आले. राजश्रीस काही पैका देऊन रा नानास पाचाश्या राउतानसी ठेऊन आले असेत. १

आवजी कवडे याणी कुकुडमुंढे घेतले म्हणून खबर आली असे. १

No. 389] [12-1-1739

पौश सुध १४ शुक्रवारी खबर आली की राजश्री चिमाजीआपा याणी माहीम घेतले. फते जाली. वरकडहि ठाणी घेणार. केळवेहि घेतले. तारापूर घेतले. बाजी भिवराऊ ठार पडिले. सुरुंग लाऊन बुरूज उडविले आणि हला करून ठाणें घेतले असे; व चिंचणीहि घेतली. व अशेर किलाहि घेतला. १

सुाा तिसा सलासीन मया अलफ. सके १६६०

कालयुक्त नाम संवछरे. सन ११४८

करिने.

राजश्री चिमाजीआपानी राजश्री बापूजीपंतनानास वस्त्रे [कोरी जागा] दिल्ही ते समई जमिदारासहि दिल्ही गुाा कल्याणराऊ बाजी कान्हो, खंडो त्रिसाजी व दामाजी गोपाल. वस्त्रे बिताा

४ देसमुख दोघे द आा तिवट पासोडी यौ

२ तिवटे.

२ पासोड्या किाा रुाा ३० वरात बालाजी दादाजी.

४

३ देसपांडे तिघे दर आा तिवट १

यौ तिवटे.

७

No. 390] [28-1-1739

पौश वद्य अमवाशेस राजश्री चिमाजीआपाची पत्रे रायास आली की, तारापूर घेतले, फते जाली. परतु बाजी भिवराऊ यास गोली लागली; ठार जाले. पाचवे रोजी येथे कलले असे रविवारी.

No. 391] [3-2-1739

माघ सुध शेष्टी सुक्रवारी सात घटका रात्री उरली ते समई राजश्री पंतप्रधान मुहूर्तेकरून नदीपलीकडे बिबी सैदानीवरते डेरियात जाऊन राहिले. दिवस उगऊन शेष्टी सुक्रवार लागला. आधले दिवसी डेरे दिल्हे होते. तेथून सुध ९ मंगलवारी कूच करून आलंदीस इंद्रायेणीवर गेले.

माघ सुध शेष्टी दादोबा पुरंधरे आले. नागोबाचे देवली राहिले असेत. १

No. 392] [4-2-1739

माघ सुध ७ सह ८ रविवारी खबर आली की, राजश्री चिमाजीआपानी अशेर किला फिरंगियाचा घेतला. किलेदाराची माणसें तारापुरात सांपडली होती त्यामुले त्याणीं किला दिल्हा असे. त्यापुढे धारावीहि घेतली असे.

No. 393] [29-3-1739

श्री

श्री सके १६६१ सिधार्थी नाम संवछरे चैत्र सुध १ गुरुवासर सुहुर सन तिसा सलासीन मया अलफ सन हजार ११४८ छ २९ जिल्हेज करीना स्मरणार्थ

रोज मजकुरी राघो चिंतामण चांदवडकर यास देवआज्ञा जाली. १
चैत्र सुध २ सुक्रवार.

No. 394] [11-3-1739

इरानची चढाई दिलीच्या पातशाहावर जाली यामुले महमदशा पातशा व किलीजखान व कमरदी व सादतखान वगैरे उमराऊ, साठी सतरी कोसावर चालोन गेले. त्यावर फालगुण मासी शुध पक्षी यांची त्याची लढाई जाली. सादतखान धरले गेले. खानडवरा मारले गेले, वगैरे अमीर मारले गेले.

त्याजवर किलीजखानानी सलुखावर घालून महमदशाहा पातशाहाची व ताहमस कुलीची भेटी केल्या. त्यावर येका दों दिवसा फालगुण सुध १४ रविवारी महमदशा पातशाहा चकते यांस ताहमसकुलीनें धरिले; व किलीजखान व कमरदीखान व गाजुदीखान वगैरे उमराव धरिले. कैदेत ठेविले असे. याच्या सविस्तर वर्तमानाची पत्रे रा बाबूराऊ मल्हार यांचे आले आहे त्यात लिा असे. १

नासकीहून वर्तमान आले की, कातनये किलाहून इसाजी बलकवडा नासकावर मखबूल अलमाचे पागेवर धाऊन आला. रात्री छापा घातला तो कोटातील लोक जागे जाले. त्यांचे यांचे युध्य जाले. तेथे येसाजी बलकवडा पडिला व आणिकहि दाहा वीस माणूस पडिले. राहिले लोक पलोन गेले.

No. 395] [*2-5-1739*

वैशाख सुध ९ मंगळवारी बाळूबाई येजुरवेदी विध्वा बायेको अउंधात राहाती. तिने पुणियात येऊन दोघे चौघे माणसे मजुरकरी करून व येक पायाळू मेळऊन पासणे बाणेरे याचे सिवेस रामनईचे पस्चमेस घोडदऱ्याचे सरदेस पासणाची वाट बाणेऱ्यास जाती तिचे पस्चमेस मोठी सील होती; तिजवर गणेश्याची मूर्त होती तेथे ठेवणे आहे म्हणून माणसे खाणावयास घेऊन गेली. हे वर्तमान सरकारचा कुरण्या सुलताना म्हणून येक होता, राजश्री पंतप्रधान याच्या सरकारचा त्यास कळले. तोहि तिजबराबर गेला. त्याणी रात्री तेथे खांटले सिळेवरील माती मात्र काहाडली. सीळ निघाली नाही. हे वर्तमान येथे राजश्री आंताजीपंत फडणीस व रा जिवाजी गणेश यास कळले. त्याणी दुसरे दिवसी सुध शष्टीस बुधवारी सायेंकाली पंचवीस तीस माणसे पाठविली. त्याणी रात्री खाटले. सीळ येकीकडे काहाडून तो आंत येक रांजण तांबडा खापराचा मादणीवजा फुटका निघाला. आत माती व दगड लाहाण लाहाण निघाले आणिक काही निघाले. वैशाख सुध सप्तमी गुरुवारचे दोनप्रहर दिवसपावेतो माणसे तेथे होती. मग आली. मजूरकरी माणसे बायेकोने नेली होतीं त्यास आणून अंताजीपंत जिवाजीपंत याणी मार दिल्हा. कैदेंत ठेविली. सुलताना म्हणून कुरण्या बा होता. त्यासहि मारिले. कैदेत ठेविला असे. १

सदरहू जणापासून गुन्हेगारी घेतली असे दोन अडीचसे रुपयेपावेतो.

No. 396] [*7-5-1739*

वैशाख सुध १० सोमवारी वसईहून राजश्री चिमाजीआपांची पत्रे आलीं की वसईस मोरचे लाविले होते. सुरुंग लाविले होते. धमधमे रचले होते.

मंगळवारी सिधता केली. बुधवारी सुरुंग उडविले. बुधवारी व गुरुवारीहि येक दोन उडविले. दोन बुरुज व दों जागा कुसू उडाले, त्यामुळे आपल्याकडील माणसे काही दडपाने मेली; व काही उडाली. फिरंग्यासी युद्ध बरे जाले. त्याणीहि शर्त केली; व आमच्या लोकानीहि शर्त केली. बुरुज दोन घेतले. तेथे मोर्चे काइम केले. फिरंग्यानी कुसाआत मेढा घातला होता, तो बळकाविला आहे. सा रोजांची मुदत केली. सा रोजात किला खाली करून द्यावासा केला आहे. * * युधी लोक पडिले दताजी भांडवलकर * * * कर्जेकर पडिलें; व हंसू आढाव न्हावी पुणेकर छ ५ सफर गुरुवारी दुसरे हलेस पडिला. पहिली हला छ ४ सफर बुधवारची, दुसरी गुरुवारची; सखो गणेश सरनाईक पुरधरचे यास गोळा लागला, त्याणे त्यास देवआज्ञा जाली; व आणिकहि कितेक लोक पडिले, त्याची याद मागोन येईल त्याजवरून कळेल. दुरजनसिंग राजा मांडवीकर याचा जसोजी कारभारी होता तो पडिला, व रा पंतप्रधान यांचा जमातदार कुवरसिंग होता तो पडिला. वैशाख वद्य ३ सोमवारीं खबर आली की वैशाख वद्य १ मंदवारी वसईत आपाचे ठाणे गेले. आपाहि गेले. फिरंगी निघोन गेले. वसई फते जाली. संवस्थानच प्राप्त जाले. राज्येच येक सुटले. फिरंगी स्थलापासून चेवले. ईस्वरे यास स्थल दिल्हे. मोठी फते जाली. याणीहि करोड रुा खर्च केला. फार येत्न केला; यैसा येत्न या राज्यात कोण्ही केला नाही.

No. 397] [*May 1739*

गराडियाची पाटीलकी राजश्री चिमाजीआपानी निमे दरोबस्त वडीलपण घेतले. गुमास्ता गावावर ठेविला. बालोजी बहिरजी जगदले हुजूर राजश्री स्वामीपासी फिर्याद गेले. त्याणी फिरोन मनास आणावेसे केले. तूर्त होलीची पोली अमानत केली. फालगुण सुध त्रितीयेस देवाची पोली देऊन होली जालिली. पेसवियाची पोली लागो दिल्ही नाही, येविशी राजश्री बापूजीपंत नानास राजश्रीचे व राजश्री बालाजी बाजीराऊ याचे पत्र आले. मग अमानत जाली असे. हुजरेहि आले होते. १.

No. 398] [*20-3-1739*

फिरंगियाचे उरूणचे ठाणे मानाजी आंगरे याणी घेतले असे.

फालगुण मासी वद्ये पक्षी दिलीकडून खबर आली कीं इरानची चाली दिलीवर जाली. त्याजवरी महमदशा पातशाह चालोन गेले. याचे त्याचे जुंझ्य जाले,

दिलीच्याचा मोड जाला. खानदवरा वगैरे ठार पडिले. सादतखान धरून नेला. मग सलियावरी घातले. पातशाह इरानियाचे भेटीस गेले. त्याणी पातशाह व निजाम व कमरुदी वगैरे कैद केले. पातशाही आपण घेतली. चाकतियाची पातशाही बुडाली. इरानियाची पातशाही जाली. पातशाह व अमीर धरिले गेले. इरानियाचे नावे पातशाहचे नाव नादरशा. दिवाणाचे नाव तोहमास कुलीखान यैसी सावकारी लिा आली. १.

No. 399] [*15-5-1739*

करिने सन ११४८

वैशाख वद्य ४ मंगळवारी श्रीदेव चिंचवड याचा नातू श्रीउमापतिबाबा यांचा पुत्र याचे लग्न खेडांत जाले. नरसिंगराऊ दामोदर याची मूल केली असे. १.

वैशाख वद्य १० ची पत्रे दिलीहून आली की, नारदशाहा इरानी दिलीस चालोन आला होता. त्याने दिलीमधे कतलअम[१] जालियावर खंडणी उमदे उमदे यांजपासून व सुजदानराव वकील याजपासून दोन लक्ष व धमोगंधराये वकील अबदुल नबीखान व उज्यागरचंद याजपासून दाहा हजार, सइदखान शामिरखानाचा वकील याजपासून पंचवीस हजार, रुा केशवराव हरकारे यांजपासून पंधरा हजार रुा व बाबूराव खानदौराकडील याजपासून लाख रुा घेतले. * * * * पादशाही (न) सोडिले. छ ७ * * * * वारी किलियातून कूच करून * * * स छ ८ सफरी सोनपतेस आपले फौजेनसी गेला. जातेसमई छ ३ सफरी महमदशाहास तख्तावरी बैसऊन जवाहीर व कांहीं नगद व वस्त्रे व नबाबास समशेर व घोडा व खलेयित[२] येणेचप्रमाणे कुल अमीरास खलयेत देऊन सामाधान केले व च्यार फर्मान त्याचे मोहरनसी, येक नासरजंगास व येक नसिरुदौलास व राजे शाहू व बाजीराव याच्या नावे दिधलीं. व महमदशाहाचे फर्मान दक्षणेच्या कुल अमीरांस काही रवाना केले व कांहीं जातील. छ ८ सफरी शहरांत अजैचैन[३] जाले. कतलेमधे तीनच्यार लक्ष माणसे कतल जालीं. हजारो स्त्रिया, उमदे व साहुकार वगैरे बंदी धरून नेली. पंधरा मण जवाहीर व पनाससाठ करोड लुटीवेगला खंड घेतला. पाा * * ही हाती घोडे व उंटे व बैल व तमाम आमीरांचा माल येणेचप्राा घेऊन गेला. फकीर करून सोडिले. यैसा कहर दोन महिने दिलीवर जाला म्हणून पत्र आले. नादरशाहा इरानी आपल्या मुलकास अटकेपलीकडे गेला. महमदशाहा तख्तावर बसऊन गेला आसे. १

---

१ कतलाम, सर्रास कत्तल. २ खिलत, सन्मानाचा पोशाख. ३ कत्तल.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

२३

बाळाजी बाजीराव: राज्यकारभार

[किंमत—१ रुपया १३ आणे किंवा ३ शिलिंग ३ पेन्स]

संपादक—**गो. स. सरदेसाई**, बी. ए.

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३२

PESHWA BALAJI BAJIRAO—ADMINISTRATIVE.

The papers arranged under this selection are intended to convey a comprehensive picture of the innumerable topics and questions, other than strictly political, which the Peshwa as the Head of the Administration or virtually the Viceroy of the nominal Chatrapati was called upon to decide. The personal grievances of officials and sardars, the regular exaction of accounts and revenue dues, the recognition of heirs to properties of deceased persons, the complaints of the ryots against injury done to their crops by the marching of troops, suggestions and proposals for the extension of the Maratha Dominions, coinage and exchange, erection of buildings, tanks and temples, the care of the children of those who fell fighting, the direction of social and religious matters and punishment of delinquents, festive greetings, ceremonial invitations, congratulations and condolences, such and other matters of a cognate nature will be seen fully exemplified in these papers, which illustrate in a unique fashion the social life and manners in the Deccan in the 18th century.

No. 5

Facsimile of the handwriting of Naro Shanker. *(Died in January 1775)*

No. 23

Facsimile of the handwriting of Govind Khaderao Chitnis. *(Died on 13-8-1784)*

No. 1] [पौ 7-8-1740?

पा छ २४ जमादिलावल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

सेवक सुभानजी थोरात हवालदार व कारकून किले पुरंधर कृतानेक विज्ञापना. स्रावण वद्य येकादसी गुरुवारपर्यंत स्वामीच्या कृपाकटाक्षे सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्थित असे. गोंदजी रणनवरे यांची बायको संताई रणनवरी जासुदासमागमे किलियास पाठविली ते पावली. पत्राप्रमाणे अडेसरी व मुलास दूध देऊन आज्ञेप्रमाणे संरक्षण होईल. सेवसी श्रुत होये हे विज्ञापना.



¶Subhanji Thorat, keeper of Purandhar fort, reports the arrival of Santai, the wife of Gondji Rananavare.

No. 2]

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्ये चिमणाजी भिमराऊ कृतानेक सां नमस्कार विनंती उपर. येथील कुशल मार्गसिरष वद्य १ भानुवार मो पुणे जाणऊन स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही श्रीची यात्रा करून रेटरेस देवदर्शनास गेलो. * * * * * काली मंदवारी पु * * * * * * मई उबरेजे करून राजश्री दादोबाची भेटी घेऊन आलो. त्याणी कितेक अर्थ

सागितला आहे. तो दर्शनाअंती विदित होईल. यानंतर राजश्री तुबाजीपंत जमावासहित हेलगावपाडलीवर आहेत. त्यांचा खर्चावीण बहुतसा गलांठा आहे. सातारांहून पैका काही पावला नाही. त्यास स्वामीनी तेथून बेगिमी करून पाठविली असिली तरी उत्तमच जाले. नाहीतरी त्यांजकडील बेगमी करून पाठविली पाहिजे. स्वामींचें मुकाम कोणे जागा आहे ते लिहिले पाहिजे. आम्हीं सतमी रविवार मुहूर्तें निघोन स्वामीकडे येतो. विदित जाले पाहिजे. * तीर्थरुप राजश्री बाजी भिमराऊ नाना यास पत्र पाठविले आहे. पत्रें जातील त्या बा। रवाना करावे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Chimnaji Bhimrao informs Chimaji Appa of his arrival at Rethre after meeting Dadoba on his way. He further requests the addressee to help Tubajipant with a loan of money.*

No. 3] [1741 ?

श्री

पुां[१] राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. कबीर वास्तव्य कसबे पुणे हे शांत जाले. त्याची स्त्री पुणियांत आहे. तिणे शाहा मुसलमान कबिराचा सिष्य म्हणून सातारियास पाठविला. त्याने येथे येऊन कितेकांची भेटी घेतली. राजश्री फतेसिगबावाकडील वर्षासन सरकारांतून पनास रुा नेले व वर्षासनाची ताकीदपत्रे घेणे ती घेतली. त्यांवर संतावा गोसावी साली सासवडकर यानी हुजूर येऊन वर्तमान सांगितले की, कबीरबावानी पटसिष्य आपणास केले. अंतकाली अपले माथा हात ठेविला आहे. त्याचा पट त्या मागे आपण चालवितो असें असता दरम्याने मुसलमान उभा राहिला तरी त्यास ताकीद करावी म्हणून. त्यावरून तुम्हास पत्र सादर केले आहे. तरी याची चौकसी मनास आणून गोही साक्ष पाहून वाजिबी ज्याकड पट चालवावयाचा त्याकडे चालवणे. गैरवाजबी होऊ न देणे म्हणून आज्ञा. यैसियास आम्ही पुणियांत असतां कबिराची स्त्री शाहा कबीर यास घेऊन आली आणि वर्तमान सागितले की, आपल्या दादल्याचा हा सिष आहे. आपण आवघा भर याजवर दिल्हा. साताराची वार्षिक याजकडून आपण आणविली. ताकीदपत्रे यानेच जाऊन आणिली. तरी पुणे प्रांतीच्या

---

१ पत्र श्रीपतराव बापूजी यांचें.

वार्षिकाची ताकीदपत्रे याजवळ यावी म्हणून सांगितलें व ताकीदपत्रे सातारांची कितेकाची दाखविली आणि शाहा फकीराची स्थित अपूर्व पाहिली व कबिराच्या सनदा पत्रापूर्वील पाहिल्या त्यामधे वौंषपरंपरा लिहिली आहे. त्यावरून त्याचे स्त्रीच्या विचारावर पुणे प्रांतीच्या वार्षिकाची पत्रे ताकिदीची त्यास दिल्ही. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Shripatrao Bapuji explains to the Peshwa why he allowed the continuation of the allowance to Shaha Musalman in lieu of Santava Gosavi when both claimed to be disciples of the late Kabir of Poona. The writer further says that claims of Shaha Musalman were also supported by the widow of the late Kabir.*

No. 4] [*1741?*

श्री

पुरवणी[१] राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती कबिराचे स्त्रीचे व सिष्याचें वर्तमान अलाहिदा पत्रीं लिहिले आहे. त्यावरून विदित होईल. संताजी गोसांवी स्वामीचे पत्र घेऊन आलियावर कबिराची स्त्री व सिष शाहा कबीर बोलाऊन आणून चौकसी केली. त्यास शाहा कबीर याची इतक्या कजियाची गोष्ट किमपि नाही. तो म्हणतो मंजला उत्पातावीण प्रयोजन नाही. निस्प्रहवृती आहे तेच बरी आहे. आपण काही भांडत नाही म्हणून साफ सांगितलें. कबिराची स्त्री म्हणते आपणास कोणासीहि गरज नाही. माझी वार्षिके मी घेईन चितास येईल तें करीन. सनदापत्रांत वौंषपरंपरेने वार्षिके चालवावी असें लिहिले आहे. कबिरास पुत्र तर नाही. स्त्री आहे. याची स्वामी आज्ञा करितील त्याप्रा। चालेल. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Shripatrao Bapuji to the Peshwa, soliciting his decision in the case of the Kabir of Poona in which the widow of the deceased claimed the allowance.*

---

१ पत्र श्रीपतराव बापूजी याचें.

No. 5] [After 1741

श्री

राजश्री सिदोजी राऊत
गोसांवी यांसी

॥ अखंडितलक्ष्मींअलंकृत राजमांन्ये श्री नारो शंकर रामराम विनंती उपरी. येथील क्षेम जाणोन स्वकीयें लिहिणे. बहुत दिवस जाले. अपणांकडोन कृपापत्र येऊन वर्तमान कलत नाही. तरी दाजी! हे गोष्टी श्नेहापासून दूर आहे. सदैव येणारासमागमे पत्र पाठऊन परामृष करीत असावा. याउपर आम्हाकडील वर्तमान तरी आपली आज्ञा घेऊन पुणियाहून स्वार जालियावरी रा। येजमानासमागमे आसो. श्रीमंत उभयेता कैलासवासी जाले याजमुले आम्ही लोक परम निराश्रित जालो. आमची चाकरी उपेरालियांची[१] होती आणि उभयेतांची कृपा संपादून घेतली होती. प्रस्तुत श्रीमंत राजश्री नानासाहेबाचे पायासी दंडक नाही. याजकरितां चित उद्विग्न विशेष आहे. परंतु आपण आमचे मुंरबी[२] असतां कांही फिकीर नाही. आवदा श्रीमंत रा। आपांसाहेबांचा निरोप आपण देविला, आणि स्वार जालियावरी मागती बोलाऊन नेले, आणि बेरोजगारी आणि सरदारांचा आकस जाणोन हुजूरच ठेवीत होते. बोलींदेखील रा। रघुनाथजी प्रभूसमक्ष केली की दोन हजार फौज पागा देऊन उतम प्रकारे गौर करावे; परतु आपणच श्रीमंतास विनंती केलीं कीं रा। येजमानासमागमे फौज कमी आहे आणि आपण दाहा पंधरा (वर्षे) याचे अन्न भक्षिले याजमुले अवंदाचें वरीस समागमेच जावयाची आज्ञा देवणे, यैसी विनंती करून आज्ञा स्वार होऊन समागमेच मालवे प्रांतास आलो. रा। समागमे फौजहि माफकच होती. सोनगड धारे येथे कमकाजहि उतम जाले. दाहा वीस माणूस खस्त जाले. चाकरीस अंतर केले नाहीं. श्रीमंत रा। अपांची वार्ता येकोन सर्व सरदारांच्या नजरा विछिन जाल्या. मागील खकटी आपणावरी नाहक पडोन कज्यांत घातले आहे, आणि मोकासी याचे घोडी बंद केली. रोजमरा खर्चास देत नाहीत. खर्चास दीडसे स्वार वगैरे आणि खर्च ब्राह्मण मंडलीचा आहे. श्रीमंत रा। उभयता असते तरी हरक गोष्टींचा उपराला राखोन आमचा गौरच करिते. परतु श्रीमंत रा। नानासाहेबाचेपासीं दंडक नाही. विना आम्हा

---

१ मदतीची, पाठपुराव्याची. २ मुत्सद्दी, ज्ञाते.

लोकांचा उपराळा हजुरीहून जाल्याखेरीज निर्व्हा होत नाही. कितेक वर्तमान रा। रघुनाथ बापाजी यासी निवेदन केलें आहे. आपणांस विनंती करतील. तरी आमचे मुरंबी आणि मैत्र आपण असता काय चिंता आहे? तरी आमचे विषई हजूर अर्ज करून गौर करवणे. पुढे अमचा अंगिकार खामखाय करवणे. बहुत काये लिहिणे? कृपा आसो दीजे, हे विनंती.

¶*Naro Shankar expresses his regret that he does not receive the same consideration from Nanasaheb as he used to get from Bajirao and Chimaji Appa. The letter is written soon after the death of Chimaji Appa.*

No. 6] [*20-9-1742?*

श्री

पुा. राजश्री रामचंद्र बावा
स्वामीगोसावी यांसी.

विनंती उपरी. राजश्री लक्ष्मण शंकर व नारो शंकर व गोविंद बलाळ हे मातबर मामलेदार त्या प्रांतीचे. गुदस्ता त्याजपासून रसदा घेणे त्या घेतल्या. पुढें रसदा घेतल्या पाहिजेत. त्यास कोण्हाचा ऐवज कसा उगवला, पुढे कोणापासून काय रसद घेतली पाहिजे त्याचा आजमास आषाढा आलीकडे लेहून पाठविणे म्हणोन तुम्हांस सांगितले असतां हा कालपर्यंत येविसीचे तुमचे पत्र आले नाहीं. दसरा समीप आला तर अतःपर सविस्तर लेहून पाठविणे. मामलेदारासहि येविसी ताकीद करून रसदांचा ऐवज येथें भरीत ते करणे. +दोन तीन वर्षे लक्ष्मणपंत गोविंदपंत नारोपंत याचा हिसेब आला नाहीं. यंदा त्याचा ऐवज आम्हाकडे किती गुंतला, उगवला किती, हा हिसेब त्याजकडील शहाण्या कारकुनासमागमे पाठवणे. दसऱ्यास येथें रसदा त्याजकडील कारभारी येऊन देत ते करणे. येथील फौजेचा अर्ज जाणत आहाच. छ १ साबान हे विनंती.

¶*Peshwa Nanasaheb asks Ramchandra Bava to send in a detailed account of revenue due from Naro Shankar, Lakshman Shankar and Govind Ballal, three prominent sardars working in Bundelkhand, and to try and exact payment from them before the Dussera.*

+ येथून अक्षर खुद्द नानासाहेबाचें.

No. 7] [1743 ?

श्री

श्रीमन्महाराज राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विनंती. सेवक राणोजी सिंदे कृतानेक विज्ञापना. स्वामीचे आज्ञापत्र छ ६ सफरचे आले ते छ ९ सफरी प्रविष्ट जालें. तेथे आज्ञा की आपल्यास सातारियास जावे लागते तरी त्वरेणे येणे. यैसियासी पूर्वीहि सेवेसी येक दोन पत्रे लिहिली आहेत. आज्ञेप्रमाणें सोमवारी स्वार होऊन येतो. येथील कामकाज तेथून येऊन जे होणे ते होईल. या उपरी काही विलंब नाहीं. सत्वरी सेवेसी पोहोचतो. स्वामीचे पाये पाहिल्याने सर्व सिधी होतील. विशष काय लिहिणे हे विज्ञप्ति.

¶*Ranoji Sindia goes to Satara in accordance with instructions from the Peshwa.*

No. 8] [10-6-1743 ?

पा। छ ४ जा।लोवल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री
भाऊ स्वामीचे शेवेशी

विनंती महादाजी गणेश यांचे शरीरीं एक दिवस मात्र अस्वस्थ होते. दुसरे दिवशीं (स)काली छ २७ रबिलाखरी भृगुवारी प्रथम प्रहरी देवाज्ञा जाली. राजश्री स्वामी एक दोन वेल त्याचे घरास परामर्षास आले होते. मशारनिल्हे कदीमोईतील[1] होते. तेहि निवर्तले. विदित जाहले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The death at Satara of Mahadaji Ganesh, an old servant of the state, is reported to the Bhausaheb at Poona.*

No. 9] [2 8-1743


श्री

राजश्री रामचंद्रबावा गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराव रामराम विनंती. येथील क्षेम जाणऊन स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. बहुत

१ जुन्यांतले; जुने.

दिवस जाहाले आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कलले नाही यास्तव चित सापेक्ष आसे. तरी सदैव आपणाकडील सविस्तर लेखन करून चितास आनंदवीत असावें. इकडील वर्तमान तरी श्रीमंताची व दरुणीमाहालची समजावीस जाली. वस्त्रे होणे राहिली आहेत. राजश्री स्वामीची आज्ञा वस्त्रे आठादाहा रोजांत जाली म्हणजे सत्वरीच पुणियास येतील. त्याकडील पत्रे आपणाकडे येत असतील. सांप्रत आपण कोणे ठिकाणी आहेत, काये मनसबा छावणी करणार किंवा स्वदेशास येणार ते वर्तमान लेखन करावे. नवाब आसफज्याहा याणी वलकोंडा यास मोर्चे लाविले होते. किला फते केला. छावणी त्या प्रांते करणार ऐसा विचार आहे. आपल्यास कलावे यास्तव लिहिलें आसे. रा। छ २२ जमादिलाखर. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.





¶*Pilaji Jadhao to Ramchandra Bawa giving news from Satara.*

No. 10] [*12-8-1743*

पौ छ २७ रजब

भाद्रपद मास

श्रीमार्तंड

राजश्री पंतप्रधान साहेबाचे

सेवेसी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री कृष्णाजी पवार व सदासिवराव पवार दंडवत विनंती उपरी: येथील कुशल ता। छ २ माहे रजब जाणून स्वकीये. कुशललेखनआज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. साहेबी पत्र पाठिले ते पावले. लिहिला मजकूर कलूं आला. आमचे वर्तमान तर तीा राजश्री जिवाजी पवार बाबासाहेबी श्रावण शुध्य ८ सोमवारी

कैलासवास केला तो खेद पत्री कोठवर ल्याहावा ? ईश्वरगतीस उपाये नाही. सर्वश्वे आपले पदरी घालून गेले आहे. सांभाळ करनार खावंद समर्थ आहेत. सर्व प्रारे सरदारीचा अभिमान असो द्यावा. वरकड मजकूर जासूद मुखजबाणी निवेदन करिता कळू येईल. बहुत काये लिहिणे हे विज्ञप्ति.

¶*News communicated to the Peshwa of the death of Jivaji Powar on 18th July 1743.*

No. 11] [*1745*

श्री

पुा राजश्री बगाजी यादव गोसावी यांसी

सुा सीत आर्बैन मया अलफ पैठणकर नरसिंहभट तोरो याणी पिस्टपशु केला आहे त्याचा मजकूर.

श्रुती स्मृती व शास्त्रे याचे मते व सिष्ट संप्रदायहि सर्वत्र या प्रमाणें आहे कीं सोमयोग व वाजपेय पौंड्र व निरूढ पशु वगैरे सर्व यज्ञयागादी कर्मे आ (फाटलें * * *) क्ष पशु करावे याप्रो वेद व शास्त्र व सिष्टसंप्रदाय मतेकरून याप्रमाणें आहे. सर्वत्र प्रवृती-हि असीच आहे.

प्रत्यक्ष पशूचे ठायी पिष्टपशु करावा यास त्यास त्याणी पुराणसमत निवृतीचा मोक्षधर्मी वाक्य आहे त्यावरून त्याणीं श्रृतीस्मृतीचे अनुमान करून पुराणवाक्यावरून निरूढ पशु प्रत्यक्ष करावा त्याचेठाई पिस्ट पशूची कल्पना करून पिस्टपशूचा याग केला.

ऐशियास वेदशास्त्रश्रृतीस्मृतीचा सर्व आधार आसता पुराणवाक्यावरून पिष्टपशु केला. त्यास याचा इतला[१] करावयास कारण विसाजीपंत व मोरोपंत यांणीं उत्पात केला. राजश्री वासुदेव दीक्षित याचा व त्याचा पेच यामुळे हा उत्पात करून सर्व शास्त्रास व रीतीस विरुध ते कर्म अविलंबून पैठण वगैरे गंगथडीचे ब्राम्हणास उपद्रव केला व पाचसात या संमतास ठगे गंगथडे ब्राम्हण मेळऊन एकादो जागा पिष्टपशु करविले व नवाबाजवळ मोगलाईत समजावितात की ब्राम्हणास वध उचित नाहीं पिष्टपशु करावे हे समजावितात. ऐसियास नवाबास आमचे शास्त्राचा विचार काय कळे ? तरी तुम्ही नवाबास अर्ज करून विसाजीपंत यास ताकीदपत्र पाठवावे की पूर्वीपासून चालत आहे त्याप्रमाणे ते करितील. तुम्ही

---

१ खबर.

नवा उ (फाटले) * * * येकंदर न करणे, केलिया कार्यास येणार नाहीं याप्रो अर्ज करून घेऊन पाठवणे. ज्याणी पिष्टपशु केला त्यास गुा पुण्यात बोलाऊन आणून सिष्ट ब्राम्हण श्रोती शास्त्रज्ञ वैदिक याची सभा करून निश्चय केला कीं वेदशास्त्र सिष्टसंप्रदाये यास विरुध कर्म पिष्टपशु हे नरसिहभट तोरो याणी केले. याणी प्राश्चित घ्यावे व शुध व्हावे व पुढे याप्रो कोणी करू नये, करील तो ज्ञातिब्रहिष्कृत होईल, याप्रमाणें निश्चय करून ज्याणी केला त्यासहि ताकीद केली व क्षेत्रोक्षेत्री पत्रे पाठविली. प्रस्तु (यापुढील पानें मिळत नाहींत)+

¶*This is the first sheet of a longer letter addressed apparently by the Peshwa to Bagaji Yadav, excommunicating certain Brahmins who had performed certain special rites, contravening the injunctions of the Shastras.*

No. 12] [*8-4-1745 ?*

श्री

श्रीमंत राजश्रीं पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

* * * * * * * रामाजी केशव कमाविसदार पाा जैनाबाद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम छ ९ माहे रावलपर्यंत स्वामीचे प्रतापे सर्व (य)थास्थित असे विशेष. सन आर्बात * * * * * लाई पातशाही आमल न * * * * * बत शहर ब्र्हाणपूर येथील उपद्वाप करून सरकारात करोडगिरी व लालबाग वगैरे बाग जफ्त केले, त्या सालात कमाविसीनें जो आंकार जाहला तो सरकारात जमा केला. त्यानंतर सन खमसात सदरहु अमलाचा मक्ता करणे म्हणोन आज्ञा केली. सन मजकुरापासून च्यार साला पातशाही अमलाचा मक्ता करार करून दिल्हा. आज्ञेप्रमाणे आमल चालत होता. बागास तगावी व नहर पाणियाचे दागदोजी करून लावणी उतम केली. साल दरसाल मामलियेतीवर चढ व कर्जपटीची नेमणूक आहे, त्यास ऐवज जाहला पाहिजे म्हणोन कितेक प्रकारे बंदोबस्त केला * * * * * * प्रत बहादरपुरियाची करोडगिरीची म * * * डई व लालबाग वगैरे शहरासभोवते तापीपारचे बाग राा महिपतराव कवडे यांजकडे आशेर परगणा सरंजामी जाला. * * परगणियाचे म्हणोन त्यांजकडे * * * * * ची आज्ञा केली असिली तरी पातशहा *

+ सबंध पत्र भाऊसाहेबांच्या हातचें आहे.

* * * मल परगाणियाखेरीज आहेत. तनखियात व देहझाड्यांत हा अमल नाहीं, आणि त्यांजकडे कृपा करून अमलाची अज्ञा केली असली तरी उत्तम आहे, आम्हाकडील मक्तियातून वजा होतील. परंतु सेवकास आज्ञा(प)त्र आले नाहीं की सदरहु अमल त्यांजकडेस देणे. हे आज्ञापत्र नसतां त्याजकडील कमाविसदार अमल जप्त करितात, याविषई जे आज्ञापत्र सादर होईल त्याप्रमाणे वर्तणूक करीन. त्या अमलावर कर्जपटीची नेमणूक आहे. ते गतवर्षी जागा करून घेतली नाही; सबब नवी लावणी केली होती. सन सीतात ऐवज घेतला पाहिजे. अज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. पाामजकूरचे वर्तमान तरी या सालांत पर्जन्या * * * मुळे तमाम बांडी जाहली. लोकांस काही केल्या धीर पुरत नाहीं * * * * ची बहुत प्रकारें खातरजमा करि * * तमाम मुलकाची अवस्था * * * सर्वांचे वाटेप्रमाणें तुमचा निरवाह करणार श्रीमंत समर्थ आहेत. या प्रमाणें लोकांचे समाधान करून कामकाजास लावि(ले) आहेत. या प्रांती भिलाचा उपद्रव बहुत आणि हा महाल शहरनजीकचा. सिबंदी मातबर लागत आहे. सालाबाद सरकारातून शंभर रावता * आहे. त्यास सालमजकुरी अद्याप राऊत आले नाहींत. हंगामाचे दिवस आहेत. शंभर रावताची आज्ञा केली पाहिजे कीं सर्व बंदोबस्त होईल. भिलाचा उपसर्ग बहुत आहे. त्याचे पारपत्य होईल तरी चारपाच परगणे * बाद राहतील. सेवकास आज्ञापत्र येईल तर राऊत येथे चाकर ठेऊं. परगणेचा बंदोबस्त करून. हे विज्ञापना.

¶*Ramaji Keshav, Kamavisdar of Burhanpur, reports to the Peshwa the difficulties in realizing the usual dues.*

No. 13] *[October 1745*

श्री

अकार इमारत तले जेजुरी कार्तिक मास सुाा सीत अर्बैन मया अलफ

रुपये

३४१ पाथरवट

३२१ कदीम ३१

२० जदीद २

३४१

३४९॥		मजुरकर
	३१८॥	कदीम ८७
	२७	जदीद- ८
	३४९॥	९५
१२८		गाडे ८
६२		गौंडे असामी
१०		सुतार १
१५		घिसाडी
९॥		घणकरी
५		चाकर लोणारी
८		बेलदार चाकर
३६		बेरड
३००		खरीदी बट लोखंड
१००		मसाला चुना व ताग
१००		लोणारी
१४५०		
११६०		मार्गशीर्ष मास बा। अकार कार्तिक मास १४६० पैकी वजा खरीदी वट लोखंड रु. ३००
२५१०		

¶*A detailed account of Rs. 2,510 expended on the construction of a tank at Jejuri by the Peshwa in 1745.*

No. 14] [*1746*

श्रीशंकरप्रसन्न

श्रीमंत राजश्री बाबा स्वामी

गोसावी यासीं

पो दादो हरी सां। नमस्कार विनंती. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. श्रीमंत मातुश्री ताईच्या समागमे माघ वद्य

पचर्मास श्रीमाहायात्रेस गेलों. आपणास कलावे म्हणून लिा असे. मागे मुलाचा सांभाल केला पाहिजे. यानंतर श्रीमंतास विनंतीपत्र लिा आहे त्याप्रमाणें विनंती करून श्रीवास घडे आणि आमचा योगक्षेम चाले तो अर्थ केला पाहिजे. प्राांमाारी रंगारी व सिंपी याजवर पटी जाहाली आहे. त्यास मौजे माहालुंगे येथे सिंपी व रंगारी नाहीत आणि आज्ञापत्र आले आहे तरी त्याची मनाचिटी देविली पाहिजे. बहुत काय लिहिणे ? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Dado Hari accompanies Kashibai on her pilgrimage and asks (Ramchandrapant) Baba to take care of his son. He further asks him to have the cess levied on tailors and others cancelled as there were none at Mahalunge.*

No. 15] *[1747-48*

श्री

तहनामा सरकार राजश्री पंत प्रधान सुाा समान आर्बैन मया व अलफ. राजश्री पिलाजी जाधवराव याचा व सरकारचा तह सालमजकुरी ताा हवेली नरवर देखील मोहन व सिवपुरी व पोबरी व कुलारस देखील बुढा डोंगर बंदरवास येथील यैन खंडणी ५०००० पनास हजार व पाा बिजेपुर प्राा जाधवहटी येथील खंडणी रुपये १०००० दाहा हजार येकूण साठ हजार. त्यास तपसील:

१५००० बाबती
६००० सरदेशमुखी
४००० नजर
३५००० मोकासबाब

६००००

पैकी सरकारात बाबती सरदेशमुखी व नजर मिलोन रुपये २५००० पंचवीस हजार द्यावे. मोकासबाब रुपये ३५००० पसतीस हजार तुम्ही घेणे. यासिवाये सदरहू पाच माहालची सरकारची नजर व घासदाणा साल बसाल वसूल होईल तो सरकारात द्यावा. याप्रोा करार करून तहनामा हा सादर केला असे. तरी सदरहूप्रोा चालणे.

¶*This is an agreement between the Peshwa and Pilaji Jadhav regarding the payment of dues.*

No. 16] [1747

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामींचे शेवेसी

पोष्य गोविंद खंडेराव कृतानेक साष्टांग दंडवत प्रणाम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखनाज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. पा। कडेवलीत माहाल साडेपांच येथील देशमुखीचें वतन राजश्री स्वामीचें. त्यास देशमुखीचा अमल सुरू करावयाविसीं राजश्री स्वामींनी राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा यांस आज्ञा केली होती. सांप्रत त्याजकडून पा। मजकूरच्या देशमुखीचा अमल दूर करून सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेब याजकडे अमल दिल्हा आहे. येविसीं पूर्वी स्वामीस राजश्रीनी व धणनीनी सांगितलेच होते. त्यावरून आपण निंबाळकरास पत्रें दिल्ही होती. हाली राजश्री जानोजी निबालकर स्वामीसंनिध आले आहेत. त्यास येविसी सांगणे ते सांगून निंबगावी राजश्री रघोजीबावाचे ठाणे आहे ते उठऊन देवडीकडील ठाणे बसऊन देसमुखीचा अमल सुरलीत चाले ते गोष्ट केली पाहिजे. या गोष्टीचें धणनीस बहुत अगत्य आहे; तरी स्वामीनी अगत्य धरून, राजश्री जानबास सांगून, देवडील राजश्री बाजी कृष्ण स्वामीजवल आले आहेत, त्यास त्यांच्या हाती देऊन, निंबगावाचे ठाणे देवडीचे बसे, देशमुखीचा अमल सुरक्षीतपणे चाले ते गोष्ट केली पाहिजे. बहुत काय लिहिणे ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Govindrao Chitnis on behalf of Queen Sakwarbai requests the Peshwa that the Deshmukhi Vatan of Prant Kadevalit be transferred to the Queen and her officers be allowed to realise the Deshmukhi dues.*

No. 17] [1747?

श्री

राजश्री सदासिव चिमणाजी यांसी आज्ञा केली यैसीजे. स्वामीचा मुकाम किले सातारा येथे जाहला आहे. यैसियास तुम्हाकडील हरघडीचे वर्तमान येऊन पोहचत नाहीं. तर यैसे न करणे. हरघडीचे वर्तमान सेवेसी लेहून पाठवीत जाणे. यानंतर राजश्री माहादाजी अंबाजी याजवर दंगा जाहला, म्हणून परस्परे वर्तमान यैकिले. तर मारनिलेवर दंगा करावयास प्रयोजन काये ? हे सविस्तर लिहून पाठवीत जाणे. वरचेवर दरबारचे वर्तमान लिहीत जाणे. बहुत काय लिहिणे ?

¶*King Shahu asks Sadashivrao to write to him about himself and particulars about the assault on Mahadaji Ambaji. (This fact requires further elucidation.)*

No. 18] [18-6-1747?

छ २६ जाखर

श्री

पुा तीर्थरूप राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. धाकटे देवढीस राजश्री पंत सचीव याजवर गफलतीने वाये-कल जाली ते सादेंत वर्तमान पूर्वींच सेवेसी लिहिले आहे. तदनंतर छ २० जाखरी राजश्री स्वामी राजश्री पंत सचींव यांचे घरास गेले. च्यार समाधानाचीं भाषणें बोलिले. पंतास सरासरी मंदील व चादर व जामेवार[1] मेहमुदी[1] यैसी वस्त्रें दिल्हीं. मग पंतानी राजश्री स्वामीस येक सहश्र रुपये नजर केले व येक घोडा उतम सामानसमेत नजर केला. घोडा घेत नव्हते. मग आग्रह करून दिल्हा. सदरेतील मूल माहाराजासमागमे होती तिजला मोराचें पातल दिल्हें. राजश्री येसाजी भोंसले समागमे होते. त्यास तिवट, सेला, यैसी दोन वस्त्रें दिल्ही. राजश्री देवराव समागमे होते यांसहि वस्त्रें देत होते परंतु घेतलीं नाहीत. जालें वर्तमान सेवेसी कळावे यास्तव लिहिले आहे. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय विज्ञापना.

¶*Sadashivrao is informed of the presents given by the Pant Sachiv to the King and some of his retinue.*

No. 19] [1-9-1747

श्री

श्री मुख्यप्रधान श्रीबालाजी बाजीरावजी यासी लिहून दिल्हे. श्रीमाहाराजाधिराज श्रीमाहाराजा जगतराजनुदेव याणी उपर संवत १८०३ चे सालीं हिसा ठरला; त्याची जागा यक निम तोडून दरोबस्त राज्याची जागा आहे. त्यांत रहिलीची जागा जी आधी जागिरीत दिल्ही आहे ती सिवाय राहिली. त्याखेरीज जी

---

१ कापडांचे प्रकार.

आमची जागां दरोबस्त राहिली त्याचा हिसा मुलुकाचा व हिरे खाणसुधां दोन हिसे आमचे येक हिसा तुम्हास देऊ. आश्विन शुध ९ शुक्र संवत १८०३ मुकाम सेहुग:

तपसील

मुलकाचा तिसरा हिसा निराला करून देऊ.

हिरे खाणीस खणनावळीस जो खर्च लागवड साहुकाराची लागेल तो सावकारास देऊन बाकी राहील त्याचे तीन हिसे करावे. त्यात दोन हिसे आम्ही घेऊ. येक हिसा तुम्हास देऊ, आणि खर्चवेच लागवडीस होईल तो तुमचे कारकुनाचे विद्यमाने लागेल.

¶*This is an agreement with the Peshwa signed by Maharaja Jagatrajanudeo regarding a diamond mine.*

No. 20] [*1748 ?*

छ २८ जमादिलोवल

श्री

पुरवणी श्रीमंत् राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. बंदर नागोठणे येथें पूर्वापार सावकार येतात. त्यास पूर्वी खुंटवा अथवा गैरा उपसर्ग कुलाबकराकडून लागत नव्हता. हाली स्वराज्य जालिया तागाईत रेवसेस कुलाबकर खुंटवा दर खंडीस चवलप्रमाणे घेत असतां चवलाचा पावला, पावल्याचा अर्धा, अर्ध्याचा रुपया याप्रमाणे घेऊ लागले. त्यास हालीं सरकारचें भात फरोख्तपैकी सावकार घेऊन जातात त्यास दोन च्यार रोजे रेवसेस उगेच खोटी करून रजेचे सें दोनसें तीनसेंपावेतों रुपये घेऊन निरोप देतात. यामुळें सावकार दहशत खातात. बंदरी सावकारानी भात घेऊन फाडावर रासी घातल्या आहेत. रेवसचे धास्तीमुळे नेत नाहीं. येविसीं पूर्वी सेवेसी लिहिलें होतें कीं, सरकारचे भात मुंबईस जाईल त्यास अटकाव न करणें म्हणोन अंगारकास ताकीदपत्र पाठवावे म्हणोन येक दोन वेला सेवेसीं विनंती लिहिली परंतु, पत्र येऊन त्याचा बंदोबस्त न जाला. हालीं याप्रा वर्तमान आहे. अंगारकास ताकीद होऊन सुदामतप्रमाणें न जालें तर सावकारांस भात दिल्हे

2615

आहे तें फिरोन ध्यावेंसारकें होईल. भाताच्या रासी फडावर पडल्यामुळें सावकारां-कडून रुपये येत नाहीं व बंदरहि पडिलें येविसीची काय आज्ञा ते करण्यास स्वामी खावंद समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer complains of the high cess levied on rice at Nagothana.*

No. 21] [*1748*

श्री

श्रीमत् राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

पोष्य गोविंद खंडेराव दंडवत प्रा। विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. श्रीमंत सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेब वाडा पहिला याणी बांडे याच्या व चिरंजीव सौभाग्यवती गजराबाई याच्या सरंजामाच्या ताकिदी स्वामीकडील आणावयाविसी येथें आम्हांस व राजश्री नाना यांस रुबरू आज्ञा केली व राजश्री स्वामीचा हातरोखा व बाईसाहेबी आपले पत्र लेहून अंतोजी पवार पाठविला असे तरी स्वामीनी आपणाकडील ताकीदपत्रें बांडे याची व सौभाग्यवती गजराबाई याची जी असतील ती लेहून देऊन पाठविली पाहिजेत. याउपरी उजूर न करावा. बहुत काये लिहिणें ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Govindrao Chitnis writes to the Peshwa that Queen Sakwarbai is anxious to have certain saranjams granted to her daughter Gajrabai and her husband Bande and requests him to issue orders to that effect.*

No. 22] [*1748?*

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना व ता राजश्री
भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री संभुसिंग जाधवराव यांस महिना पंधरा रोज येऊन जाहले. त्यास मारनिले यानी आम्हासी व गोविंदराऊ यासी मजकूर केला की आद्यापि अमच्या सरंजामाचा निकाल पडत नाही म्हणून कितेक प्रकारचे भाषण केले. मारनिले आपले जागां शषदर (?) बहुत खटे आहेत. जाधवरायाविषई

स्वामीचेहि वचन गुंतले आहे अणि आपण पुणियांत यादी करार केली आहे याप्रमाणे आज्ञा आली तर राजश्रीसी दो चौ रोजानी मजकूर करून विल्हेस कराराप्रो लावितो. येविषईची काये आज्ञा ते लिहिली पाहिजे हे विज्ञापना.

राजश्रीनी कालच आज्ञा आम्हा केली की ज्याप्रमाणे नाईकास वस्त्रे देऊन निकाल काढल्या याप्रो वरकडहि सर्वांचे विल्हे लावावे याप्रो बोलले. मोठी तातड राजश्रीस आहे. याउपरी कसी काय आज्ञा ते ल्याहावी हे विनंती.

¶*Purandare to Peshwa, asking him to settle the dispute about Shambhusing Jadhao.*

No. 23] [*9-3-1748?*

श्री

सेवेसी गोविंद खंडेराव कृतानेक विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २० रबिलौवल येथास्थित असे. यानंतर नवाब सैद अजमतुलाखान हसनअलीखानाचे पुतणे दिलीहून येथे आले. स्वामीचे दर्शन होऊन स्वामीनी राजश्री स्वामीचे दर्शन करविले ते समयी मजकूर जाला तो सर्व स्वामीस विदितच आहे. त्यास मारनिले थोर माणूस. येथील रागरंग पाहून माघारे दिलीस जावयास निरोप मागितला. राजश्री स्वामीनी पाच हजार रुपये आपले तर्फेने द्यावयाविसी स्वामीस पत्र लिहिले आहे व याखेरीज राजश्री प्रधानपंती आपले तर्फेने खर्चाचा परामृश करून बहुमान करावा आणि निरोप द्यावा म्हणोन आज्ञा केली आहे. त्यास येथें राहिल्याने कर्ज होते. रवानगी लौकर जालियास जातील; म्हणजे आपलाच उपद्रव चुकेल. स्वामी सर्व जाणतात. तरी राजश्री स्वामीनी देविल्याप्रमाणें यैवज व आपणाकडून जे साहित्य होईल ते करून खानमशारनिलेची रवानगी अविलंबे करावी म्हणजे दिल्हें आहे. येवढिया खर्चानसी आपलें घरास सुखरूप पावतील. विलंबावर न घालावें. श्रुत होये हे विज्ञापना. राहादारीचे दस्तक व कमाविसदारास साहित्याविसी पत्रे त्याणी याद लेहून पाठविली आहे त्याप्रो करून देविली पाहिजेत हे विज्ञापना.

¶*Govind Khanderao communicates to the Peshwa the desire of the King to give Said Ajamtulakhan a combined present of Rs. 5,000 on his own and the Peshwa's behalf and to allow him to return to Delhi.*

No. 24] [23-5-1748

तेरीख ९ माहे जमादिलाखर

*सुा समान आर्बेन मया व अलफ

श्री

स्वस्तिश्री राज्याभिशक शके ७४ विभवनाम सवत्सरे जेष्ठ शुध सप्तमी इदुवासरे क्षेत्रियकुलावतंस माहाराज राजश्री छेत्रपति स्वामीचे शेवेसी आज्ञाधारक दिनकरराव व जगनाथ मजुमदार दिा राजश्री तुकोजी अटोले सेना बारासहश्री सेवेसी विज्ञापना. राजश्री बाजी देवराव याजवर स्वामी कृपालु होऊन राजश्री मानसिंग कडू रुस्तुमराव समशेरबाहादर याची मजमू सागोन हाजीर जामिनाविसी आज्ञा केली तरी माारनिलेस आपण हाजीरजामीन असो. गैरहाजीर होतील तरी हाजीर करू. हाजीर करू न शको तरी तालुकातीचा जाब करू. हा लेहून दिल्हा हाजीरजामीनकतबा सही लेखनालंकार रुजु साात सां

समत मंत्री सहकार

¶*Reliable guarantees were taken before engaging servants. This is one sample.*

No. 25] [7-6-1748 ?

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी पो अंताजी नारायेण सा नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ २१ जाालाखरपर्यंत यथास्थित असे विशेष. चिरंजीव राजश्री आपाजीपंत चैत्रमासी स्वामीजवल. सातारियासी गेले होते ते समई किले जिवधन येथील मजकूर स्वामीजवल केला कीं आज्ञा होईल तर हे कार्य करून. त्यावरून आज्ञा जाली कीं तुम्ही लग्नास जाता तर लग्न करून पुन्हा भेटीस येणे जे आज्ञा करणे ते तदोतर केली जाईल. त्यास साष्टीहून लग्न करून आलिया उपरी स्वामीचे भेटीस यावे. आस्वासन घेऊन कार्यास जावे परंतु हव्ये येऊन घरीं बसले. त्याणीं सांगितले कीं ये समई चला, कार्य करून देतो, यैसे बोलोन विचार केला कीं आज्ञेवितरिक्त कसे जावें? त्यास त्याणी फारच आग्रह केला कीं ये समई येता तर कार्य होते, नाही तर कार्य होत नाहीं. यैसे बोलोन पत्र घेऊन भिमाशंकरचे रानांत नेऊन याणी से दोनसे माणूस आपले

ठेविले व वरकड लोक हवे आहेत त्यांची याद अलाहिदा सेवेसी पाठविली आहे त्यावरून विदित होईल. अशास श्रावण शुध प्रतिपदेस कार्य संपादावे यैसी बोली जाली. यावर त्या सरदारांनीं व हव्यांनी बोली घातली कीं स्वामीचे पत्र सिक्यानिसी व येक निशाण ऐसे आणिले आहे की काये ते दाखवा. मग तुमच्या वचनावरून, कार्य करून. यैसी बोली जाली. तेव्हा यांचे पोरपण आपणास विदितच आहे. कागद व बोली यथास्थित करून घेतली नाहीं. कार्याचा तो अविलंब केला, या करितां त्याचे तीर्थरूप राजश्री माहादाजीपंत पुण्यास येऊन हे वर्तमान आम्हांस सांगितले त्यावरून सेवेसी लिहिले आहे; तर गाव मोकासे व बक्षिसे व खर्चवेच जो होणे तो हस्तगत कार्य जाल्यावर विदित होईल. परंतु या कार्याचे जरूर स्वामीस कर्णे आहे; तर येक निशाण व सरदारांस पत्र दिलभरीचे सिक्यानसी व येक आपाजीपंतास पत्र द्यावें. वरकड कितेक वर्तमान लक्ष्मण विठल व विश्रामजी मोरे व मल्हारजी वाग खासबारदार जते सोनजी धनवडे सेवेसी आले आहेत हे जबानी सांगता विदित होईल. तर ये गोष्टीचा विचार स्वामीचे चितात करावयाचा असिला तर पत्रे देऊन सत्वर रवानगी करावयासी आज्ञा केली पाहिजे. वरकड होणे जाणे ते स्वामीचे पुण्य-प्रतापे होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Narayan Phadnis to Nana Peshwa, advising him of the plans for the capture of Jivdhan (near Junnar).*

No. 26] [*20-7-1748*?

श्री

राजश्री बाळाजी पंडित प्रधान गोसावी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री फतेसिंग भोसले रामराम विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत असिले पाहिजे विशेष. मौजे थेऊर येथील पाटिलकीचा मजकूर कोरेगांवच्या मुकामीं आपणास सांगितला; त्यास आपण पुणियास गेलियावर हरकी कुंजरीण व चतुर्भुजपंत यांसी इकडे पाठऊन द्यावें यैसा करार केला होता; परंतु कराराप्रमाणे त्यांस न पाठविलें. प्रस्तुत थेऊरकर पाटील सयाजी व खंडोजी वगैरे यांस चतुर्भुजपंत यानी धरून पुणियास नेलें आहे म्हणून वर्तमान कळों आलें. यैसियासी मौजे मजकूरची पाटिलकी आम्ही खरीद केली; त्याच्या मजकुराविसी वरचेवरी आपणास पत्रें पाठविलीं व आपली भेटी जाली तेव्हाहि स्वमुखें सांगितलें, यैसे असोन हें कार्य सुरलीत चालत नाहीं हे अपूर्व आहे. याउपरी माहाराज राजश्री स्वामीनी आपणास पत्रें पाठविलीं

आहेत व सौभाग्यादिसंपन्न मातुश्री यांनीहि पत्रें लिहिली आहेत तेणेप्रमाणें थेऊरचे पाटील त्याने धरून नेले आहेत ते सोडून चतुर्भुजपंत यास व हरकी कुंजरिणीस इकडे पाठऊन दिल्हीं पाहिजेत. रा छ ९ साबान * आपल्या महत्वास व वचनास खरेपनास विटाल होत आहे याचाच विचार चितात आणून करावे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Bhonsle to the Peshwa, complaining that the patilki though assigned to him by the King is not allowed to stand in his name and that the patil appointed by him has been imprisoned and taken to Poona.*

No. 27] [*1749*?

श्री

राजश्री पंतप्रधान साहेबाचे शेवेसी

श्रीमंत अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नौ सुलतानजी जाधवराऊ दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये कुशळलेखन करीत गेले पाहिजे विसेष. पत्रे पाठविली पावली. वर्तमान आवगत जाहाले. राजश्री पुंडलीक नाईक यासी पत्र पाठविले ते राजश्री सदासिवनाा रास्ते यांस बजिनस राजश्री गोविंदरावबावा चिटनीस याचे विद्यमान्य त्यास दिल्ही. परंतु त्याचे ध्यानास येत नाही. राजश्री गोविंदरावबावा यानी बहुत येत्न केला. त्यास पांचसा हजार देतो म्हणतात. त्यास या येवजात कांही आपली उस्तवारी होत नाही. परंतु जेथवर होईल तेथवर उस्तवारी करून सेवेसी येऊन पोहचतो. आमचे साध्यांत वर्तमान राजश्री रावसाहेब सेवेसी श्रुत करतील त्यावरून कलो येईल. आणीक कोठे पांच सात हजार रुपये करावे तो कोन्ही कर्जेहि देत नाही आणि आपणासहि ठाऊक आहे. आपण सत्वरच येऊन पोहचतो. श्रुत होये. बहुत काये लिहिणे? लोभ असू देणे हे विनंती.

¶*Sultanji Jadhavrao, who appears to be much embarrassed by financial difficulties, assures the Peshwa that he will join him as soon as possible.*

No. 28] [1749 ?

राजश्री भाऊ

श्री

राजश्री जनार्दन बलाल स्वामी गो यासी

विनंती उपरी. यैवजा मालवजाची यादीची तीर्थरूपास विनंती करणे ते केलीच आहे. तरी तुम्ही यादबुद समजाऊन लोकाच्या यैवजाची नेमणूक करून घेणे. शागीर्दपेशाचे लोक जासूद वगैरे लौकर रवाना करणे. उदईक येथून कूच आहे. आज संध्याकालाआलीकडे सारे येई ते करणे हे विनंती. म्हसी गाई म्हसका लौकर नेमणूकप्रा पाठऊन देणे. हे विनंती.

¶Bhausaheb writes, entirely in his own hand, to Janardan Ballal Fadnis to request the Peshwa to make arrangements for sending him attendants and servants. The forces will be marching on the following day.

No. 29] [10-1-1749 ?

श्री

तीर्थरूप राजश्री रघुनाथपंत
स्वामीचे सेवेसी

आपलें मल्हार तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १ सफर पर्यंत येथास्थित असे विशेष. सेलारणीकडील सुलतानजी घुला तीर्थरूप राजश्री नाना स्वामीनी किले नारायेणगडावर अटकेस ठेविला आहे. त्यास येथें पाठऊन द्यावयाविषीं राजश्री स्वामी व सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेब यानी तीर्थरूप मातुश्री बाई यास पत्रें लेहून दिल्ही व आम्हांसहि बोलाऊन नेऊन स्वमुखें निकडीनें आज्ञा केली, यावरून दोन्हीं पत्रें पाठविली आहेत त्याजवरून व मातुश्रीस सविस्तर लिहिलें आहे व तीर्थरूप राजश्री भाऊ यांस लिहिले आहे, तीं अवघी पत्रें स्वामीनी वाचून पाहून राजश्री भाऊकडे रवाना करावी; आणि राजश्री स्वामीस व सौ मातुश्री बाईसाहेब यांस पत्रांची उत्तरे पाठवावी कीं मातुश्रीस लिहिलें तीं पत्रें तीर्थरूप राजश्री भाऊ यांजकडे रवाना केली आहेत. सुलतानजी घुला यास नारायेणगडावरून उतरून आणून पाठवितों. आज्ञेपेक्षां दुसरे अधिकोतर काये आहे, यैसी उतरे पाठवावी. विदित जाले पाहिजे, सेवेसी विज्ञापना.

¶Malhar Tukdeo communicates to Raghoba Dada that Sultanji Ghula, a prisoner in Narayangad, has been despatched to Poona as ordered by the King.

No. 30] [24-3-1749

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी
यासी

॥ ◌ श्रीसकलगुणालंकर्ण अखंडित(लक्ष)मीआलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील कुषल जाणून स्वकीये कुषललेखन करीत आसिले पाहिजे विशेष. येथील वर्तमान तरी राजश्री लक्ष्मण आनंत हे आज सुक्रवारी मृत्य पावले. राजश्री नारोपंतामागे बरेसे थाटिले होते. (ये)कायेकी सात रोज ताप येऊन मृत्य पावले. त्याची बायेको बरोबर जात्ये. तुम्हास कलावे म्हणऊन लिहिले असे. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ आसो दी(जे). रा छ १९ राखर हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to the Peshwa, communicating news of Lakshman Anant's death.*

No. 31] [1750?

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

सेवक जिवाजी विश्राम साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान स्वामीचे कृपेकडून येथास्तित असें विशेष. स्वामीचे आज्ञेप्रमाणें पुणेंयास आहों. वाडीहून पत्रें तीर्थस्वरूपांची मागा आली होती ती हाली राजश्री विसाजीपंत याबराबर पावविली आहेत व चिरंजीव विठोबासहि सविस्तर मजकूर लिहिला आहे. सेवेसी विदित करितलि. यैसेयास फिरंगी गोवेकर याजपांसी कारकून अगत्य रवाना करावा लागतो. स्वामीनी विसाजीपंत यास आज्ञा करून गोवेची रवानगी करवावी. येथून राजश्री त्रिंबकराव मामा यास पत्रें आली म्हणजे रवानगी होईल. दुसरें बिदरूरचें वर्तमान तीर्थस्वरूपांही लिहिले होतें तेहि स्वामीनी चिती आणून रवानगी केली तर उत(म)च आहे. बहुत काय लिहू हे विनंती.

¶*Jivaji Vishram to Bhausaheb, asking him to send Visajipant as an envoy to the Portuguese at Goa.*

No. 32] [1750-51

श्रीरामचंद्र

* सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री
बालाजी पंडित स्वामी गोसावी यांसी

पोष्य चिमणाजी नारायण कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला. आम्ही या प्रांते आलो. आपण आपल्या स्थलीस्थलाची बंदोबस्ती करून असावे आणि राजश्री दाजीपंतासमागमें हजार बारासें बंदुखीस्वार रवाना करावें. तुमचा आमचा दुसरा अर्थ आहे यैसे नाही म्हणौन लेख केला. यैसियास आपण लस्कर घेऊन या प्रांतास आलेत येणेकरून बहुत संतोष जाहला. याउपर आम्हास कोणे गोष्टीची चिंता नाहीं. सर्व प्रकारें भरवसा आपला आहे. आपली मार्गप्रतीक्षा करीत होतो. सर्वथ्वें आमचा अगत्यवाद आपणास आहेच. आम्ही विस्तारें ल्याहावें यैसे नाहीं. आम्ही या प्रांते स्थलोस्थलाची बंदोबस्तकरून असो. सर्वदा आम्हाकडील परामर्ष करीत असावे. आम्हाकडील सविस्तर अर्थ आपणास अवगत आहेच. लोक राजश्री दाजीपंतासमागमे रवाना करावे म्हणौन लिहिले तरी लोकासहि आणविले आहेत. आपल्याकडे सत्वरीच रवाना करून. आपल्या विचाराविरहित दुसरा अर्थ आहे यैसे नाही. आमचा विचार आहे तो आपणास अवगतच्च आहे. सर्व प्रकारे भरवसा आपलाच आहे. लोकाची रवानगीहि सत्वर करितो. बहुत काये लिहिणे ? कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

¶*Chimnaji Narayan learns with delight of the arrival of the Peshwa at his province and promises him to send forces with Dajipant.*

No. 33] [1750?

श्री

इंग्रेज वैद्य आम्हाजवल आले होते. कांहीं दिवस आम्हाजवल होते. बरे शाहाणे मोकूल[1] मनुष्य आहेत. प्रस्तुत आपणांकडे आले असेत. तरी याचा सर्व प्रकारे गौर करावा म्हणौन

१ राणाजीस पत्र

१ कचच्या राज्यास पत्र

येकून दोन पत्रे कृपा करून द्यावी

देणे.

¶*Order to issue letters of introduction to an English Doctor going North.*

---

* सदरहू मायना अस्सल बरहुकूम छापला आहे. त्या काली असलेल्या रूढ वहिवाटीपेक्षां निराळा आहे.

१ सूज्ञ, समजदार, कसबांत दर्दी..

No. 34] [1750 ?

श्री

श्रीमंत माहाराज राजेश्री भाऊसाहेब स्वामिंचे साहेबाचे सों सों खंडो तुकदेव दिा श्रीमंत राजेश्री त्रिंबकजी राजे भो ठाणे प्रा धारासीव त्रिकाली सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन साहेबी आपुले स्वानंदलेखन करावया आज्ञा केली पाहिजे. यानंतर स्वामीचा निरोप घेऊन लष्करीहून आलियातागाईत वर्तमान अवगत न जाह्ले येणेकडून चित सापेक्षित आसे. तर श्वामीनी संवि-स्तरेकरून आनंदवीत गेले पाहिजे. याउपरी आमचे वर्तमान तर रखवालीचा आंगिकार स्वामीकडेच आहे आणि आम्हास सर्व प्रकारे आधार आपला. येते-समई बहुता प्रकारे निर्भयाची गोष्ट सांगून आज्ञा दिल्हियां श्वार होऊन गांवास आलो ऐसे आसून रा रामचंद्र कृष्ण व बाबूराऊ कृष्ण व जावजी गवली व रा दारकोजी निंबालकर हे व रामाजीपंत तोफनीस येक होऊन ठाणेमारास येऊन निमजग्यापासी राहिले. आम्हास पत्र अथवा स्वामीची ताकीद वगैरे बोलणे चालणे नसता गांवास तोफा लाविल्या व बाणांची व गोल्याची आंगी वृष्टि करून गांवातील सेपनास माणूस (अपूर्ण)

¶*Khando Tukdeo (in the service of Trimbakji Bhonsle) complains against the joint action taken by Ramchandra Krishna and his brother Baburao together with Javaji Gauli and Darkoji Nimbalker in attacking the writer's place, he having been promised protection by the Peshwa himself.*

No. 35] [1750 ?

श्री.

राजश्री बराणजी मोहिते यासी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही पा कराडचे देशमुखीच्या कामात दरम्यान होऊन रसदेच्या ऐवजी रुो १०००० दाहा हजार राजश्री रामाजी नाईक वाकडे याकडून देविले आणि तुमची निशा राजश्री अंताजी सिवदेऊ यांनीं केली असतां अद्यापि तो ऐवज मशारनुलेस पावत नाहीं; तरी सदरहु राजश्री प्रधानपंती हुजूर रसदा घेतल्या, त्याचा ऐवज तमाम मामलेदाराचा व्याज सुधां मजुरा दिल्हा; आणि तुम्ही दरम्यान असोन ऐवज पावत नाहीं हा कोण विचार आहे? तरी व्याज सुधां रुपये याचे पदरीं राजश्री यमाजीपंत याजकडून देविले नाहीं. तरी दरम्यान तुम्ही आहां. रुपये तुम्हीच द्यावे हे चितात आणून याचे रुपये देणे आणि याजपासून चौथाई बाबत ऐवज रुो १०००० दाहा हजार राजश्री रत्नाकर विठल याजबाबत लोहगाव हटे वगैरे

खासगियांच्या ऐवजी रुपये दाहा हजार एकूण रुपये तीस हजार राजश्री प्रधानपंती मजुरा दिल्हे असतां यासी रुपये कां पावत नाहींत तरी याचा शोध करून रुपये पावते होय ते करणे. बहुत काय लिहिणें?

¶*Barhanji Mohite is ordered to pay back the loan which he had contracted.*

No. 36] [*1750*

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री माहादाजीपंत
स्वामीचे सेवेसी

पोष्ये माहादाजी गदाधर कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. आपण येथे होते तेव्हा सविस्तर आम्ही आपलें वर्तमान सेवेसी निवेदन केले. आपणहि सर्व गोष्टी मान्य केल्या. परंतु आपण तातडीने निघोन गेलेस. आम्ही तों मोठ्याशा घोरात पडलो हे ईश्वर जाण. येविसीचा मजकूर श्रीमंतास लिहिला आहे. तो ध्यानात आणून जेणेकरून अमच्या कर्जाची व सरंजामाची वाट करून देवावी. अमच्या साहित्याविसी राजश्री नानास व राजश्री गोविंदराव चिटनीस यासी ल्याहावे की, हरयेकविसी यांच्या साहित्या(त) अंतर न करणें. माहाराज कैलासवासी होते तेंव्हा आम्हांस इतकी काळजी नव्हती. अता आपणाविंतरिक्त आम्हास आश्रये आहे किंवा नाही हे आपण जाणतच आहेत. बहुत काये लिहिणें? लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Mahadaji Gadadhar solicits the good offices of Mahadaji Ambaji Purandare, who is with the Peshwa, in connection with his debts and his Saranjam.*

No. 37] [*1750*

श्री

+यादी आजमास जमाखर्च सन इहिदे खमसैन

जमा खर्च

३००००० पंत प्रतिनिधी

८०००० जिनस घावा

९०००० वराड व पेशकसी

१७००००

\+ सबंध यादी सदाशिवराव भाऊच्या हातची.

हाली येणेप्रा

२००००० वराड

१००००० जिनस दाणा वगैरे

———

३०००००

यात.......................गेल

३२०००० पंत प्रधान

२१६००० दरमाहा १८०० प्रा

१७००० आखेर साल

५७००० पेशकसी

३०००० नजर

———

३२००००

३५००० सचीव यासिवाय आईसाहेबास बाबती जालनापुराबाबत १७०००

४५००० विठावा नाईक वाकडे खाजगी पहिले खेरीज माहाल मजकूर रुो ३५००० हाली

१२००० खंडेराव जाधव पेशजी बाा बाबती

६०००० रत्नाकरपंत खटाव चौथाई व देसमुखी कराड पेशजी नव्हत २६००० हाली

४०००० घनबा पहिले ९००० हाली

१०८००० फतेसिंगबावा बाबती व त्रिचनापली पेशजी प्रा

मागील बाकी दीड
पर्यत होती तिचा
निकाल जाला.

३५००० आपाजी रघुनाथ पागा पेशजी २५००० हाली

१५०००० रघूजी बावा

२५०००० दोन माहाल चौकसी जाली नाही. जालियास चालीस पचवीस चढतील.

१०००० आपाजी हणमंत पेशजीप्रोच काही जाजती होईल मखलासी जाली नाही.

७५००० वाईची मखलासी जाली नाही. [पुढे आठ बोटे कागद चिकटविण्यात गेला.]

केसरकर व्हावयाचे आहेत.

१८५००० सेनापती

५०००० भागानगर राजश्रींचे

१००००० श्रीरंगपटण

आणखी काही कोठे होईल ते

१८८५०००

याप्रो फार करून जाले आहे. वाई व मिरजेचा मात्र मजकूर आहे. होईल. येसाजी भोसले याकडे फारसे नाही. सरदारीच आहे. येकूण यास हजार हिसके आहेत. दाभाडे श्रीरंगपटण रघूजी हे यैवज खष्ट व फतेसिंग मध्यम बरकड चागलेच आहेत. भागानगर वगैरे किरकोल काही होईल.

२ पुरवणी बंद

खर्च

२२५००० निा देवराव पेशजी ५००००० पैकी

१००००० येशवतराव पेशजी २५५००० पैकी

३२५०००

७५००० रदबदलीमुले वगैरे होतील व आसामिया बाकी राहिले आहेत. पचविसा हजाराच्या येकूण

४०००००

१५०००० राजश्रीची मुदबाख पागा हती वगैरे देखील प्रतिनिधीच्या मोईनी चालतात त्या

१००००० कापड लागेल.

२००००० देवढीचा खर्च राजश्रीनी * * न मागे दिल्हा आहे. * * * सी जाली नाही चालीस पनास कमी होतील.

८५००००

२००००० राजश्रीस पेशजी माहालात साडेतीन प्रो सात लाख देत होते. त्यात स्वामीनी तीन करार केले; त्यापैकी बाकी करार केले हे खष्ट यैवजी नमून द्यावे

१०५००००

बाकी आजमासे रुो

८३५०००

याचे जाबते पुर्ते रदबदली ज्याची त्याची होऊन करार जाले नाही कोण कोणाचे यामुळे जाले नाही ज्याचे निसबत जो खर्च त्याची हाजिरी गैरहाजरी कजबे देणे. फाजील सालाचे साल करावे आसे आहे. पुणे चालणे कलतच आहे नाना नेटून चलवि * * * तु हजाराचे पेच व राजश्री * * वान आहेत आजमासे जमा केली आहे त्यात पाच सा खरा यैवज आहे. नवा कारभार आहे. येता देता हजार हिसके पडतील. नवे सिलेदार हुजरातीस कोणी ठेविले नाही. राजश्री भले माणूस फार आहेत. यैवज राहील तो सिलकेस राहील. सरंजामी याचा बंदोबस्त होणे, त्यास फतेसिंगबावाचे त्याकडेच आहेत, हुजरातचे कोणी आलेच नाही. परंतु चाकरीचे काम पवार बांडे वगैरे सर्व येकसारखेच प्रस्तुत आहेत. राजश्रीच हजार हिसके वेतात. सेवटास पुर्ते जाईल तेव्हा खरे.

¶*An estimate of receipts and disbursements of the Peshwas, calculated and submitted for information by Sadashivrao Bhau to Balaji Bajirao.*

No. 38] [*5-10-1750*

पो छ १७ जिलकाद

श्री

राजश्री बाळाजी पंडित प्रधान गोसावियांसी

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो फतेसिंग भोसले रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केलें पाहिले. विशेष. राजश्री सदासिवपंत भाऊ यांची आमची भेटी जाली. बोलीचालीचा कारभार आपणासंन्निध करार जाला होता त्याप्रमाणें मारनिलेनी निर्गमांत

आणिला. ऐशास राजश्री भाऊचे व आमचे विचारें आम्हाकडील कारभार रा त्रिंबक+ हरी याणीं करावा ऐसा निश्चये जाला आहे. तरी मारनिलेस निरोप देऊन पाठविले पाहिजेत. रा छ १४ जिलकाद. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Bhonsle to Nanasaheb Peshwa, informing him of an agreement between him and Bhausaheb regarding the appointment of Trimbak Hari Patwardhan as his (Fatesing's) Diwan.*

No. 39] *[1750-51*

श्री

ताकीदपत्रे निा संताजी मोरे सुा इहिदे खमसैन

राजश्री नारो शंकर यासी पत्र की तुम्ही सेवसियाच्या सिवेचे गाव आहेत त्यांस उपसर्ग देतां व तुम्हांकडील कमाविसदार फडफर्मासीचे रोखे करितात; तरी याउपरी रोखापत्र न करणे; व तुम्ही उपसर्ग न देणे. सेवसियाच्या राज्याचे सर्व प्रकारे चालवणे अगत्य आहे. त्याच्या मुलकास उपसर्ग न देणे म्हणोन पत्र १

राजश्री अंताजी माणकेश्वर यासी पत्र की तुम्ही कालपीस जातेसमई सेवसियाच्या किल्याखाले जाऊन मुकाम केले, आणि गावगनाची रबी गहु परभारे चारिले व साहा हजार रुपये घेतले म्हणौन विदित जाले; तरी त्यांजपासून साहा हजार रुपये घेतले ते कैसियाचे घेतले? निमित्य

राजश्री लक्ष्मण शंकर यास पत्र की तुम्ही कालपीस जाताना सेवसे परगणियांतून जातां, त्यामुळें सेवसेकराच्या मुलकास उपसर्ग लागतो. गावगना रोखे करितां म्हणोन विदित जाले; तरी हे गोष्टी कार्याची नाही. सेवसेकर राजा याचे सर्व प्रकारे आगत्य आहे; तरी याउपरी त्याच्या मुलकास उपसर्ग न देणे. दुसरे वाटेने जात जाणे म्हणौन पत्र १

+ पटवर्धन,

काये ठेविले ? तेथील राजा येकनिष्ट.
मुलुक खालसा दाखल आहे तरी
याउपरी रुा घेतले आसतील ते माघारे
राजश्री संताजी मोरे याच्या कमाविस-
दाराच्या विद्यमाने माघारे देणे.
फिरोन बोभाट येऊ न देणे. आणि
त्याच्या मुलकास उपसर्ग न देणे
म्हणोन पत्र १

¶*Drafts of letters, one to Naro Shanker ordering him to stop harassing the territory of Sevasi, another to Antaji Mankeshwar demanding an explanation from him why he exacted money from the Chief of Sevasi, and a third to Laxman Shankar to a similar effect.*

No. 40] *[3-1-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक कर्णाजी सिंदे नामजाद किले माहुली सेवेसी साष्टांग दंडवत विज्ञापना. ता। छ १७ माहे सफर पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे व किले मजकुरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र सादर केले तेथे आज्ञा कीं राज्यात फितुर जाहाला आहे. तुम्ही आपले तालुखेयाच्या जाग्याचा बंदोबस्त करून खबरदार राहाणें म्हणून. आज्ञेप्रो जाग्यांची बंदोबस्ती केली असे. लोक आजाराने बहुत हैराण जाहाले. दुसरे लोक भरतीस घ्यावे येविसी पूर्वी विज्ञापना लि। असे; तरी किले मजकुरचे भरतीस लोक रवाना करणार स्वामी समर्थ आहेत. गुदस्तां किले मजकूरचे कारखान्याबदल पाथरवट स्वामीनीं दिल्हे आहेत; ते साल मजकुरी किले हरिचंद्रास रवाना केले. किले मजकुरी दुसरे पाथरवट पाहिजे; तरी हुजुरून पाथरवट पाठविणार स्वामी समर्थ आहेत. किले हरिचंद्र येथील गढीचा बुरूज ढासलला व पाण्याची मामुरी आहे, याज-करितां पाथरवटांची रवानगी तिकडे केली. किले मजकुरचा कारखाना चालीस लागला पाहिजे, याजकरितां सेवेसी विज्ञापना लि। असे. पाथरवट येऊन कारखाना चाले ते करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Karnaji Sindia assures the Peshwa that proper precautions have been taken to extirpate the disloyalty that has taken deep root in the kingdom and further asks for an aid in men and money for the repairs of the walls of the fort.*

No. 41] [18-2-1751

छ २९ रालाखर

श्री

श्रीमत् राजश्री पंत प्रधान स्वामीचे
सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक बहिरजी बलकवडे चरणावर मस्तक ठेऊन कृतानेक विज्ञापना ताा छ २ राखरपावेतो किलेहायेचे व शेवकाचे वर्तमान यथास्थित आसे विशेष. आज्ञापत्र सादर जाले. तेथे आज्ञा की राजश्री येमाजी सिवदेव याचे पुतणे त्रिंबकराऊ व वासुदेव व कृष्णाजीपंत येसे चौघेजण व याची माणसे व ब्राह्मण येसे किले कावनई आगर किले त्रिंगलवाडी येथे आटकत ठेवणे म्हणून आज्ञा. त्याप्राां राजश्री सटवाजी ताकपीर व जानराऊ आईलवले याचे विद्यमाने किले कावनईस ठेविले व सनगे येणेप्रमाणे सुमार २१ योा आख ९९९॥। पाचसे पावणे संभरहि याचे गुजारतीने पावली. आज्ञेप्राा भाजीपाला, पान-पत्रावल हे साहित्य आदार (?) यासीहि आंतर करणार नाही. चौकी पाहरा चांगली ठेविली आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Bahirji Balkawade informs the Peshwa that Yemaji Shivdeo's nephews have, according to instructions, been kept in confinement at fort Kawanai. He undertakes to look after their comforts.*

No. 42] [21-2-1751

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कर्णाजी सिंदे नामजाद किले माहुली साष्टांग दंडवत विज्ञापना. ताा छ ९ राखर पावेतो सेवकाचे व किले मजकुरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. छ मजकुरी स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा कीं मोगलाई किल्याची राजकारणे केली असतील ती कामे तूर्त न करणे. अंत्रे राखोन ठेवणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे येक दोन अंत्रे आहित ती राखोनच ठेवितों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Karnaji Sindia to the Peshwa, saying that as instructed, the capture of the Moghal forts will be deferred to a later date.*

No. 43] [7-4-1751

श्रीमार्तंड

श्रीमंत परोपकारधर्ममूर्ती राजेश्री दादा
प्रभुवर्या प्रति

अश्रितांतरगत आबा भट विनंती व सेवक अंबाजी पुरुषोतम कृतानेक असीर्वाद सां नमस्कार विनंती, विज्ञापना. येथील वृत चैत्र वदि ७ मुकाम जनस्थान येथास्तित जाणोन स्वानंद लेखनआज्ञा तोशवित असिले पाहिजे विशष. आपणाकडून सांप्रत्य वर्तमान येऊन वृतांत कळो येत नाही तेणेकरून चित सापेक्ष असे. यानंतर या प्रांतीचे वर्तमान श्रीमंत पंत प्रधान भागानगर प्रांती नवाब नशरतडौले यास आणावयास राजश्री जाणोजी निंबाळकर यानी पत्रे पाठऊन पठाणाच्या भयास्तव बोलाविले, त्यावरून श्रीमंत मोठाल्या मजली करून त्या प्रांतास गेले. भागानगरास पाऊन नवाबाची यांची जानवाच्या माधेस्तीने भेटी जाल्या. त्यापुढे दुसरे कलमी वर्तमान आले नाही. सतरुषी प्रांती रो दमाजी गाईकवाड खानदेश लुटून मातुश्री ताराबाईच्या पत्रावरून गंगथडीची बहुत खराबी न करता फाल्गुण वदी १२ सातारियास दाखल जाला. दुसरे दिवसी मातुश्रीच्या दर्शणास राजश्री शैनापतिसुधां गेले. मागे श्रीमंताची फौज फिरंगोजी पवार सुलतानजी निंबाळकराचा पाळकपुत्र सांप्रत्य ठेविला आहे तो व रां रंगराव व बापूजी बाजीराव व दादोपंत व माहिपतराऊ कवडें व दादुखान वगैरे पंधरा हजार फौजेनसी मागोमाग जाऊन वेण्येवर बुणगे होते ते लुटले. इतक्यामधे वरच्यावर सातारियांत वर्तमान दमाजीस कळतांच तयार होऊन आला. उभयता फौजेचे येक प्रहरपर्यंत युध्य जाले. उभयेपक्षी जये पराजये समान राहिला. दमाजीचा मुकाम माहरदरियांत आहे. श्रीमंताच्या फौजेचा वेण्यवर मुकाम आहे. कोल्हापुरापासून ब्राह्मणवाडियापरियेंत पुणे प्रांती मातबर धामधुम आहे. दमाजीच्या सैन्यात धान्य दोन पायली आहे, इकडे च्यार पायेली आहे. पुणे प्रांती राजीक मातबर आहे. पुणे वगैरे लोक आबदल (?) आहे. नासकामधे मिर्जा बाकर अमील होते ते तगीर होऊन नवा अमील मुरादखान देवाजीपंत देशपांडिये घेऊन आले आहेत. त्यानी येथे जैनास हकमीचे भयप्रदर्शण मांडले आहे. गोणी

---

१ दूर, कमी, बडतर्फ.

2632

गोणत्यासी कजिया करितात. राजेश्री बाळाजी महादेव व आम्ही उभयेता येकत्र याचे दर्शणास जाऊन भेटी घेतली. आपणाकडील हिंदुस्तानचे वर्तमान स्वामीच्या पराक्रमाचे सांगता सांगितले. यैकोन संतोसी जाला. परंतु प्याद्याचा फर्जी हा आहे. जागीचा ऐवज परम द्रष्टबुधी आहे. राजेश्री मल्हारराव सुभेदार वजिरासमागमे अंतरवेद प्रांती पठाणावर मोहिमेस आले आणी आपणाकडील व श्रीमंत रा नानाकडील फौज मदतीस जाते यैसे वर्तमान येथे दाट आले आहे. त्यास आपला घर संरजाम माहलोमाहली आहे तो येकत्र करून रा अंताजी माणकेश्वर याचे भरवसियावर आपण परतीरी न जावे. रा सुभेदाराचे भेटीअंती त्याचे सैदलस्करखानास येक ताकीदपत्र व आपणाकडून इस्टत्वाचे पत्र लिहून मुरादखानास त्यांचे पत्र ये तो अर्थ केला पाहिजे. तदनंतर हवेलीचे काम मध्ये घराचे सर्व जाले. पछेमेकडील वासेच्या परसांतील येक मजला उभा राहिला. आठ दिवसाअलीकडे दुसरा मजला उभा करून सत्वर खपरेल करितो. पूर्वेच्या चौकाची जोत येक तयार जाले आहे. तिही जोत्यांचे पाये खाणून जोती भरायास मनुष्य लाविली आहेत. कुंभार वगैर मसालदार लोक नवे अमीलाचे भयास्तव तफर्का[1] जाले आहेत त्याजमुळे मसाला चुना दगड वगैरे महर्ग आहे. आणी भारी कामे हिंगणे वगैरे यांची चालत्यात. त्यानी मसालेकरास अगाऊ हजारो हजार दिल्हे आहेत. त्याची पंचाईत नित्य फौजदाराच्या येथे जाते. आम्ही तर वाडियामध्ये मसाला मोजून घेऊन आज्ञाप्रमाणें रुपये देतो. मौजे आंबे येथे कुसू दोन वांटे हनवंत गांवात घेऊन आंबाच्या बागापरियेंत तयार जाले. येक रदा राहिला आहे तोहि वैशाखी पुर्णिमा अलीकडे होईल म्हणजे दोन्ही दरवाजे लाविले जातील. आबा यांचा घराचा माच घातला. देवालयाच्या कामास संगतरास लाविले आहेत. से पनास चिरे पडले आहेत. आपण उदईक तेथे जाऊन पायेऱ्याचा व देवालयाचा बाबेत (?) आज्ञाप्रमाणे सागितला आहे त्या प्रा करून पाया खाणून देऊ. मुहूर्त करितो. आबा याच्यामध्ये घराचे दांडे आज्ञेप्रमाणे ताकिदीने काम आटोपूण घेतो. देवालयास कारेगर गुजराती संगतरास आले आहेत. चिरे फार पडले म्हणजे देवालयाचे काम आज्ञाप्रमाणे नंदीचा दुखाबी मंडप सुधां दौलदार आपणास उतम दिसोन मर्जीप्रमाणे करितो. रा राघोपंताच्या घराच्या दक्षणेकडील दाहा खण खरीद करायाविशयी येक दोन ताकीदपत्रे आली त्याजवरून दाहा खण खरीद केले. येकूण आपली जमीन हम चौरस विहिरीचे जागे सुधां आपली

१ अस्ताव्यस्त, अस्वस्थ.

जमीन पंधरा खण जाली. तिची च्यार दिवालीस त्याच (?) करितो. पुलाखालील माच मुस्तकीम टोळ देऊन मजबूत करितो. हरयेक विशयी आळस होऊन सरकारच्या कारखानियांत नुकसानी पडे तो अर्थ पोशवर्गापासून माहाराजाचे पुण्यप्रतापेकरून होणार नाही. गला वगैरे धान्याची नव खरीदी हरजिनस सैंभरखंडीपरियेत दास्तान जाले आहे. याजसिवाये जुना दास्तानी गला व लोकासहि भरणास दिल्हा आहे तो व गावच्या जमाबंदीच्या यैवजी गला आहे तो हिसोबाच्या अडसला पाहून दोशा खंडीची बाकी राहेल तो आज्ञाप्रमाणे खरीद केला जाईल. खेड्याच्या जमाबद्या करून वसूलवासिलात येते. पुढे लावणीचाहि बंदोबस्त केला जातो. मौजे जांब येथे सरकारची शेरी तीस बिघे जमीन घेतली आहेत, विहिर पाडावयास काम लाविले आहे. मौजे माारची पाटिलकी रा। नारोजी देशमूख यांची आहे, त्यांस निमे मोकदमीचे लावणीचे तस्ट लाविले, तेथे पांच सा दिवस राहून निमेचे लावणीचे त्याचें निसबतीचे लिहिले घेतलें. राहिली निमे तरफ तिचाहि बंदोबस्त केला आहे. मौजे रासेगांवचा पाटील येक पळून गेला होता तोहि गांवावर आणला आहे. येथीलहि बंदोबस्तच आहे. वरकड बागाचे कामकाज कामथवाडियाच्या बागात द्राक्षा व नारेली व दाळिंबी यैसी नवी लावण जाली आहे. पुढे जेष्ठ मासी मृग सीतळाई पडलियावर नारेळीच्या व सुपारीच्या वगैरे पन्हेरी घातल्या आहेत त्या लाविल्या जातील. उसरांण[1] तयार करविले होते त्यास विहिरीच्या पाण्याचा पुराव न होय याजकरिता ऊस राहिला. ज्या विहिरीस च्यार मोटा पाणी चालत होते तेथे दोन मोटा चालता संकट जालें आहे. म्हसतळच्या बागांत ऊस लाविला. श्री नीळकंठेस्वराच्या देवालयाचे काम समाप्त जाले. यावर माळवे प्रांतीहून यैवज राजेश्री राघोपंती रवाना केला त्याचे झाडे पेसजीच्या यैवजाचा झाडा येथंभुत झडती करून पाा आहे व हाली यैवज आला आहे त्यापैकी हुडी सांप्रत्य पधरा हजाराची आली आहे. तिचा यैवज शहरीहून उतरलियावर सावकाराच्या देणियात पडला म्हणजे तपसीलवार झडती केली जाईल. मागुहून राजेश्री बाळाजी माहादेव व रामभट कानसकर त्या प्रातास येणार आहेत त्यां समागमे सा महिनियाची झडती करून पाठऊ. अंबाजीपंताच्या पुत्राचे लग्न फाल्गूण वदी ५ पचमीस जाले. शरीरसमंध रो बाबूराव गोपाळ हेजीब यासी केला.

---

१ ऊस + रान = उसाकरितां तयार केलेली जमीन.

ग्रहस्त नामांकित आहे. लग्नास खर्च रुा १००० लागले ते रो शंकराजी नाइकापासून घेऊन कार्यसिधी केली. नाइकास खत अबांजीपंताच्या नावाचे दिल्हे. आपणास कळावे. यन्दा या प्रांती राजीक बहुत आहे. भागानगर प्रातीचेंहि वर्तमान मुग्धच आहे. राजश्री माहादाजीपंत बाबा पुण्यांतच आहेत. अद्यापवर समजावीश जाली नाही. त्याचे पुतणे नाना दमाजीचा फौजेवर मोहिमेत आहेत ते काही फितुरांत नाही. बाबा नित्य शत दोन शत ब्राम्हण-भोजन करून पुण्यांत स्नानसंध्या करून काळक्षेप करितात. दमाजीने यंदा अमर्यादा फार केली. विचार तिळतुल्य नाही. सौभाग्यवती मैनाबाईस शारं-गरावजीनी आपले भेटीचा लाभ घ्यायास आज्ञा दिल्ही. सर्व साहित्य पालखी भोई वगैरे करून चांदोरीपर्यंत आली. परंतु मध्ये दमाजीची गुल्ल खानदेशात बहुत यैकोन राहिली. त्याउपर श्री नानाचे कुटुंब रा बाळोबा घेऊन येणार म्हणून साहित्य पालखी वगैरे ठेविलें, परंतु त्यांचेहि येणे संशयात्मक देखून शिबंदी भोई व पालखीचे भोई दूर केले. भगवतसत्तेप्रमाणे होईल. भेटीचे मानस बाईचें बहुत होतें. कन्येसुधा बहार खुशाल मौजे वोढ्यात आहेत. रंगरावजीनी हवेली उत्तम बांधिली आहे. घर संसारहि सर्व येकचित्ते करतात. आपले घरचा व हवेलीचा देवालय मौजे आंबे येथे बंदोबस्तीने आज्ञेप्रमाणें बाग व शेते मळे यथास्थित आहे. आपली अंतर्वेदीत स्वारी जाली तर घरची पागा अवघी समागमे घेऊन जावे. अंताजीपंत दाजीचाच भर्वशावर पार जाऊ नये. वरकड सर्व वृत्त सदैव पोष्यास पाठऊन श्रीराउजीप्राये परामर्ष करणार माहाराज समर्थ आहेत. विशेष काय लिा हे विज्ञापि.

विनंती सेवक दिवाकर राम कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. आज्ञे-प्रमाणे वर्तनूक करून कारखाना वगैरे हिसेबु आदि करून आज्ञेप्रमाणे वर्तनूक करीत असू. लिखितार्थ परिसीजे हे विज्ञापि. सर्व सेवकाचे सां नमस्कार.

राजश्री आबाजीपंतास अशीर्वाद. कुटुंबाविषयीं श्रीमंती ताकीद लिा परंतु सप्तऋषी प्रांती काशीद देखील जात नाही. बहुत गडबड आहे, त्यामुळे चार दिवस दिवसगत लागल. वो पुराणिकबावाचे कुटुंब सौ मैनाबाईबराबर चांदोरीस आले होतें, परंतु राहिलें. चिंता न करावी सत्वर भेटीचा लाभ घडल हे विनंती.

¶*Ababhat and Ambaji Purushottam from Nasik to Raghunathrao Dada, giving various items of news, particularly of Damaji Gaikwad's invasion. Buildings and temples were being erected at Nasik and the writer gives full details of these undertakings.*

2635

No. 44] [30-5-1751

श्री

+
पुा तीर्थरूप राजश्री नाना व

ताा राजश्री भाऊ स्वामींचे सेवेसी

विनंती राजश्री रामचंद्रपंत कमाविसदार श्रीपंढरपूर येथील याणी पत्र आम्हास पाठविले. त्याची नकल सेवेसी पाठविली आहे त्यावरून श्रुत होईल. येथे बाईस व राजश्रीस हे वर्तमान हुजरियानी लेहून पाठविले. बाईनी आम्हा उभयेतास बोलाऊन बोलली ते वर्तमान व राजश्रीसी बहुत बाईनी अतिशय करून बोलली. राजश्रीनी उतर बाईसी केले की पेशव्यास व जानोजी निंबालकरास हातरोख देतो. आपण चिंता न करावी म्हणोन बोलले. या वर्तमानाची सविस्तर पुर्वणी राजश्री गोविंदरावबावा याचे दस्तूरची लिहिली आहे त्यावरून कलेल. राजश्रीनी जानबास पत्र लिहिले आहे. हुजरे रवाना केले आहेत. येशियासी जानबाहि पष्ट हुजरेयासी जाबसाल करितीलच की, तथापि स्वामीनीहि जानबास सूचना ल्याहावी आणि राजश्रीस जानबा समर्पक उतर लेहून पाठवीत ते करावे. बाइ येथे तलतलून उगीच राहिली. काही चिंता नाही. बाईच्याने काही व्होत नाही. कंबलेखंड (?) गुरुभाऊ होतो. ऐसा विचार येथील आहे. स्वामीनी परिछिन्न असा बंदोबस्त करावा की, जानबाचे से दोनसे माणूस पंढरीस राहून बडव्याचा अमल देवाजवल बसऊन हुजरे व कारकून बाईकडील जे असतील ते धरून न्यावे. सहसा सोडू नयेत म्हणजे ठीक होत आहे. राजश्री बाईसी बोलले की पेशव्याकडे काय गुता आहे? पंढरपूरचे ब्राह्मण हरामजादे जिथे आपली दाद लागल तेथे जाऊन त्यानी हे काम केलें. बरे असो, पेशव्यास व जानोजी निंबालकरास हातरोख देतो तुमचे हुजरे सोडून जानबा देतील यैसे राजश्रीचे उतरहि आहे. चिता नाहीं. साराष बंदोबस्त करणे तर पुरताच करावा आपल्याकडे काही दोषारोप नाहीं. फिरोन बाई हुजरे कधीं पाठवीत नाहीत. स्वामीनी राजश्रीस उतर पाठवावयाचे रीतीने पाठवावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

¶Nana Purandare reports to the Peshwa some difficulties arising over the Brahmins of Pandharpur and the attitude of the King and Tarabai and requests the Peshwa to arrange with Janoji Nimbalker to send a suitable reply to Ramraja.

+ पत्र नाना पुरंदरे याचें.

No. 45] [30-5-1751

छ १९ रजब

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना

व तथा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. श्रीक्षेत्र पंढरपूर येथें राजश्री जानोजी निंबालकर यांजकडील लोक येऊन देवढीकडील हुजरे यांस मारलें. देवलातून उठऊन बडवेयास बसविलें. काही हुजरे धरून नेले आहेत; म्हणून आज सुक्रवारी दो प्रहरा दिवसा क्षेत्रातून हुजरे याचे पत्र राजश्री सिवाजी हरी यांस आलें; ते त्याणी तिसरे प्रहरी वाडियात नेऊन दाखविलें. त्याजवरूण (थोरले वाडियातून) आम्हास व राजश्री गोविंदराव यास बोलावणी जाली. मा।रनिले वाडियात गेले तों राजश्रीहि तिकडून आलें. राजश्रीजवल बाईनी वर्तमान सांगितले. सिवाजी हरीस बोलाऊन नेऊन पत्रहि वाचून दाखविलें. राजश्रीनीं सालजाब युक्तच केला कीं या ब्राम्हणाच्या कजियात न पडावें असें मी म्हणत असता दाटून पडोन हैरान होता. याउपरी राजश्री प्रधानपंतास व जानोजी निंबालकर यास लेहून पाठऊन धरून नेले असतील त्यास सोडऊन आणवितों, ऐसे म्हणोन निकाल काढून बाहेर येऊन दरवाज्यापुढें बसलें. राजश्री गोविंदराव यांस बोलाविले आणि पुसिले की हे काये आहे ? याणी विनंती केली कीं आम्हास काये ठावके ? बडवे बहुत आहेत. कोण्ही जाऊन त्याचा पक्ष केला असेल, त्यामुलें त्याणी लोक पाठऊन कजिया केला यात प्रधानपंताकडे गुंता काये ? राजश्री बोलले कीं प्रधानपंताचे सोइरे थोडकेच लागले आहेत. भीमेत घालून का मनसुबी न करावी ? पाण्यात घालून क्रियेनसी मनसुबी करावी म्हणत असता वाजबी आहे की नाहीं ? याणी उतर केले की, केली आहे मनसुबी हे कोणती गैरवाजवी आहे जे ते वाजवी म्हणावी ? असो प्रधानपंती दोघासहि निरोप दिल्हा आहें. याउपरी मनसुबी ते करीतच नाहीत. तेव्हा राजश्री उगेच राहून दोन दस्तके, येक स्वामीस व येक जानोजी निंबाळकर यास करून देऊन आपण सदरेस आलें. रा। गोविंदराव याजपासून सिवाजीपंती दस्तक भरून घेतलें व हुजरे याचे पत्र आले होते त्याची नकल ऐसे आपले माणसाबराबर देऊन तेथेंच राजश्री गोविंदराव यांजपासून स्वामीस पत्र लेहून घेऊन रवानगी केली आहे; स्वामीजवल पावल्या-वर विदित होईल. त्याउपरी आंत मा।रनिलेस बोलाविलें. आमलसे कांवावे

करून हळूहळू गेले. तेव्हा बाईनी बसोन गोष्ट सांगितली कीं हे काम प्रधान पंताचे इतल्याखेरीज जाले नाही. या युक्ति सर्व मी जाणतो म्हणून भाषण केली यास राजश्रीजवल आपन जाब केल्याप्रो बाईजवलहि याणी उत्तर केले. गाट तोडून लौकरीच निघोन बाहेर आलें, याप्रो मजकूर जाला. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nana Purandare reports to the Peshwa a fracas at Pandharpur between the Queen's attendants and the retainers of Janoji Nimbalker and the subsequent capture of the former and says that the King suspects the Peshwa to have been at the bottom of the affair.*

No. 46] [पो *29-6-1751* ?

छ १६ शाबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व ताा
राजश्री भाऊ स्वामींचे सेवेसी

विनंती. चिमणाजी बापूजी याची रवानगी उदाजी चव्हाण याजसमागमे करावी लागती. त्यास माारनिलेच्या रवानगीचा यैवज अद्यापि आला नाही. यैवजविगले लोक कसी जातील? दिवस नादारीचा, मसलत या प्रकारची आहे; त्वरेने गेले पाहिजे. तरी यैवजाची नेमणूक करून पाठवावी म्हणजे येथून माारनिलेची रवानगी सत्वरीच करू. हे विज्ञापना.

¶*The writer, Nana Purandare, requests the Peshwa to send money so as to enable Chimnaji Bapuji, and his men, to accompany Udaji Chavan.*

No. 47] [*21-8-1751*

पौा छ २७ सवाल

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री आई साहेब
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक पार्वतीबाई कृतानेक विज्ञापना. ताा छ १ सवाल कुज्येवासर[१] शार्वरी प्रथम चरण मुकाम ठाणे अष्टे साहबाचें कृपाकटाक्षेकडून ठाणे मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राा सिदोजी थोरात चढाई करून लटिकाच

---

१ मंगळवार.

कजिया करावयास येथे बैसला आहे येविसींचे सविस्तर वर्तमान लेहून कुमक करावया आज्ञा व्हावी येविसी विनंतीपत्रे वरचेवरी पाठविली; परंतु कुमक येत आहे म्हणून वार्ता मात्र ऐकतों. हा कालवर कोण्हीं येतां दिसत नाहीं. आज बारा दिवस मोर्चे देऊन राहिलें. जे होईल ते बंदोबस्ती करून ठाणें राखिलें. नित्य उठोन युद्ध होते. आज प्रात:काली लोक तयार होऊन मोर्चेवरी मारामार केली. मग त्याकडील माणसे आठ नव ठार व घोडी च्यार पांच वीस पर्येंत लोक जायां जाहालें. आम्हांकडील पांच साहा जखमी मात्र व घोडा येक ठार पडला; यैसे हमेशा होतच आहे; परंतु साहेबांकडून साहित्य काहीच होईना तेव्हां आमची पत्रें धण्यांस प्रविष्ट होतात किंवा नाही हाहि आभावच जाला. सर्व प्रकारें साहित्य करावयास साहेब खावंद असतां अद्यापवरी आमची आस्ता पूर्ण न होय तेव्हां धणी इतराज असतील यैसे भासते. येकनिष्टपणें सेवा करून गैरसनदी वर्तणूक नसतां जाजती वर्तून सिरालप्रांत येथील तमाम गुरूढोर मेंढरू वलून खेडी चिंदीचोला करून दोन्हीं प्रांत पाडिलें; यामुलें रयेतीची खराबी होऊन लावणी बुडाली आण ठाणेंमजकुरी निकड आरंभिली. याचे पारपत्य करावयाविसी आज्ञा होत नाही यावरून अपूर्व दिसोन आले. त्यावरून हे विनंतीपत्र लिहिले असे; तरी या उपरी तरी पुरससि करून आमची कुमक अविलंबे होऊन याचे पारपत्य करावया साहेब धणी आहेत. अवघे येश अपेश धण्यांचे. यांत आमचें वेचत नाही. सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Parvatibai reports to Tarabai the constant skirmishes that she had with Sidoji Thorat and requests her to send succour.*

No. 48] *[4-12-1751 ?*

पौ छ २६ मोहरम

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब
साहेबांचे शेवेसी

आपत्यें कानोजी मोहिते चरणावरी मस्तक ठेऊन सां दंडवत विज्ञापना. ताा छ २६ मोहरमपर्यंत साहेबांचे कृपावलोकनें सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. सिरालें प्रांती माहाराज राजश्री संभाजी माहाराज याची स्वारी जाहाली. मुलुक तमाम उद्वस जाहाला. आलीकडे कराड प्रांतीहि स्वारी होणार. रयतेने धास्त खाऊन तमाम खंडणीस जाणार. शेवकाजवल च्यार

लोक आजपर्यंत आहेत. परंत लोकांच्या तलबा चडल्या त्यांचा गवगवा, कर्जदारांची निकड फारसी जाहाली आहे. साहेब कृपालु होऊन स्थित राहे ते करणार धणी समर्थ आहेत. च्यार लोक असल्याविना या प्रांती राहतां न ये. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापणा.

¶*Kanoji Mohite to Tarabai, complaining of an attack on him by Sambhaji of Kolhapur.*

No. 49] [*8-1-1752?*

श्री

श्रीमंत राजश्री बाबा
स्वामीजीचे सेवेसी

विनंती. सेवक गोविंद कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान स्वामीच्या पुण्यप्रतापे करून ताा छ १ रोज माहे रबिलावल मुकाम संस्थान उदेपूर येथास्थित आसे विशेष. संस्थान मजकूरचे वर्तमान श्रीमंत राजश्री
पंत प्रधान स्वामीजीच्या पत्री लिहिले आहे, त्याजवरून सेवेसी निवेदन होईल. संस्थान मजकुरी मेजमानीबाबत श्रीराणाजीकडून यैवज येणे; त्याजपैकी हुंडी औरंगाबादेची रुपये पावणे दोलक्षाची सेवेसी पाठविली आहे. आपले सरकारचा वाटणीचा यैवज व राजश्री जायाजी सिंदे सुभेदार याचे वाटणीचा यैवज त्यास देऊन मजला पावलियाची रसीद व कबजा पाठविल्या पाहिजेत. श्रीमंतास पत्र लिहिले आहे, त्याजमधे कितेक मजकूर लिहिला आहे तो ध्यानास आणून कृपावंत होऊन आज्ञापत्र येईल, त्याजप्रमाणें वर्तणूक करीन. विशेष कार्य लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Govind Krishna sends to Ramchandra Baba the money received from the Rana of Udaipur and requests him to send a receipt for it.*

No. 50] [*19-4-1752*

श्री

तीर्थरूप राजश्री नाना
ताा राजश्री भाऊ वडिलाचे
शेवेसी

अपत्यें विस्वासराव सास्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १९ जमादिलाखर प्रहर रात्र मुाा खेडले परमानंदाचे पाा नेवासें सुखरूप असो. वडिलाची

आज्ञा घेऊन स्वार जालों ते मजल दरमजल येथपर्यंत आलों. आजी येथे मुकाम आहे. उदईक कूच करून मौजे बेलपांढरी येथे लग्नमंडप जाले आहेत तेथे जाऊ. राजश्री माहाराऊ जानोजी जसवंत निंबालकर आजीच तेथे गेले. त्याची आमची उदईक भेट होईल. वैशाख वद्य चतुर्थी मंगळवारी लग्ननिस्चये जाला आहे. विदित जाले पाहिजे हे विनंती.

¶*Vishwasrao informs Sadashivrao Bhau from Khedle that he has arranged an interview being fixed between Janoji Nimbalker and himself.*

No. 51] [*28-9-1752*

श्री

राजश्री जनार्दन बलाल स्वामी गोसावी यासी विनंती उपरी. राजश्री जिवाजी गणेश याजकडील मोहराचा मजकूर विस्तारें लिहिला तों कलला. पुण्यांत जुन्या मोहरा पावणेंपंधरा येक आणा प्रमाणें भाव आहे. रदबदलीमुळे तीन आणे नफा देऊन पंधरा प्रो घेत होतो. त्यास ते म्हणतात कीं भावाप्रमाणे मोहरा घ्याव्या तेव्हा मग मोहरा घ्यांवयाची रदबदल खावंदापांसी कशास करावी? भांवाप्रो मोहरा घ्याव्या, तेंव्हा रुपयेच कां न घ्यावे? याप्रो रदबदली करून बोलतात, याची आज्ञा येईल त्या प्रमाणे वर्तणूक करून म्हणून तुम्हीं लिहिले ते कलले. अशास यांजकडील भरणा मोठासा अवघड जाहाला आहे. पुन्हपुन्हा याचे जाबसाल लिहिलें आहेत तरी अद्यापि ताल्यावर गोष्ट येत नाहीं. मग भरणा कधीं होणार आहे? या निकडीच्या प्रसंगात कावादांवा[+] करून चवल पावला अधीक आगलं आम्हावर साधावा आणि आपण बोलल्याप्रमाणे आपला मुदा फैसल करून घ्यावा उचितच आहे. असो. तुम्हाकडे लोकाच्या वराता केल्या आहेत त्याप्रमाणे त्याचे पदरी यैवज पडून सत्वर तयार होऊन आले पाहिजेत याजकरिता मारनिलें आग्रह करून सवापंधरानी मोहरा देत आहेत त्या घ्यावयांचा करार केल्या आहेत, त्यास सवा पंधरा प्रमाणे चालीस हजाराच्या मोहरा घेणे. आणि वरातप्रमाणे लोकाचे पदरी ऐवज घालून जलदीने इकडे येऊन पोहचत ते गोष्ट करणे. मारनिलेकडे सरकारचा यैवज येणे त्यापैकी येथून कांहीं वराता जाहल्या आहेत, त्यांचा झाडा आलाहिदा लेहून पाठविला आहे त्याप्रमाणे यैवजाचा भरणा करून घेणे. ता। छ १९ जिलकाद सुरु सलास खमसेन मया व अलफ हे विनंती.

¶*Janardan Ballal Fadnis is ordered by the Peshwa to accept from Jivaji Ganesh (Khasgivale) the treasure despatched by him in gold mohurs at the rate of Rs. 15-4 per mohur.*

+ युक्ति.

No. 52] [14-10-1752

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेबाचे सेवेसी

ꣲ श्रीमंत अखंडितलक्ष्मीअलंकृत सदाराजमान्य श्रो करामतजी दंडवत विनंती उपरी. भाद्रपद वद्य ११ मगलवारी माहाराज साहिबास वैकुंठवास जाला. ईश्वरे मोठा घात केला. आता सर्व प्रकारे माहाराजाचे पदरी पडलो आहो. आमची सर्व लज्जा माहाराजास आहे. सविस्तर वर्तमान सेवेसी आलियावर विनंती करणे ते करून. साहेबास वर्तमान कलावे म्हणौन लिहिले आहे. आमचे विशाई पत्रे येक रा बहिरजी बलकवडे यास व येक रा त्रिंबक सूर्याजी यास व येक रा विठल सिवदेव यांस व येक रा हरि कृष्ण यास यैसी पत्रे द्यावी की, हरयेकविशाई आमचे साहित्य करतील. आता सर्व आश्रा आम्हास साहेबाचे पायाचा आहे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

करामतजीस समाधान पत्र होणेर ते जाले, तुम्ही खेद न करणे.

वरकड कागदात साहित्यपत्रे असतील त्याप्रो देणे.

रामनगरकर राज्यास कीं, पेठकराचे बहिणी जडजवाहीर वस्तभाव सुरतेहून येत होती ते तुम्ही घेतली ते देणे.

सदरहूप्रो पत्रे देणे म्हणौन पा हुजूर. रा बालाजी माहादेव मांडवगणे.

छ ३ जिल्हेज सन सलास खमसैन.

¶[*Karamatji informs Bhausaheb of the death of his father (Lakshadhir Dalpatrao ?) and Bhausaheb sends him a letter of condolence.*

No. 53] [1753 ?

श्रीआईआदिपुरुष

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित स्वामी गोसांवी यांस. पोष्य जगजीवन परशराम कृतानेक नमस्कार विनती. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें पावोन लिहिला अर्थ सविस्तर कलला. राजश्री रामराव यांचा व्रतबंध माघ बहुल द्वितीयेस आहे तरी सहपरिवार यावें म्हणून लिा ऐसियास यापेक्षा अधिकोतर काय आहे ? परंतु प्रस्तुत या कलाहात आहों. वरकड कितीक

विचार लिा तरी आम्ही आपले आहों, दुसरा विचार नाही. आहे प्रसंग तो आपणांस विदित आहे. आम्हावर शब्द ठेवावा असें नाहीं. बहुत काय लिहिणें? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Jagjiwan Pratinidhi complains of his humiliating situation to Bhagwantrao Amatya. Both these ministers of old standing had lost their former importance on the rise of the Peshwas, and felt bitterly the degradation to which they are forced to submit.*

No. 54] [*4-1-1753*

श्रीसुबराज

माा अनाम लस्कर स्वारानी व देशमुख व देशपांडे व नाडगीर व जकातीदार व नदीटोकर वगैरे महालानिहाय अां[१] चंदावर तां[२] सातारा यांसी मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब सुहूर सन सलास खमसेन मया अलफ. हाली चंदावराहून हती व टांकेण[३] सतऋषीस हुजुर सरकारांत जात आहेत तर यास मार्गी व स्थली व जकाती वगैरेबाबे मुजाहीम[४] न होतां नदीपार करून देऊन उतरल्या स्थली रखवाली करऊन सुरक्षित हुजूर सरकारात पोहोचे ते करणे. यास उजूर न करणे. जाणिजे छ २८ माहे सफर पाा हुजूर.

¶*Passport for an elephant and a pony to be taken from Tanjore to Satara, given by Murarrao Ghorpade.*

No. 55] [*30-6-1753*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री शामराव भिवराव गोसावी यासीं

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुाा आर्बा खमसैन मया व अलफ. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. रोजमरियास यैवज नाही यास्तव खासगीचे वगैर गावचा यैवज घेऊन रोजमरा दिल्हा. येथे ठाणे बसले म्हणोन दंगा बहुत मिटला. मिरजकराचे पारपत्य करणे ते विना हजार बारासे फौज असल्याविना होत नाही. फौज जरूर पाठवावी म्हणोन लिहिले ते कळले. ऐशियास रोजमरियास यैवज घेतला उतम केले. मिरजकराचे पारपत्य तुम्ही

---

१ अहत=पासून. २ तहत=पर्यंत. ३ विशिष्ट जातीचा तट्टू. ४ हरकत.

2643

व शामराव गोपाळजी भोसले याजकडील व मिरज पथके मिळोन जाहाले तरी करावे. नाहीतर तूर्त करू नये. तेथ आमणाजीपंत वगैर लोक ठेवावयास लिहिणे ते पेशजी लिहिले असे. त्या बमोजीब ठेऊन तुम्ही येणे. सर्व अर्थ मनास आणून, फौज ठेऊन, पारपत्याचा विचार करणे तो केला जाईल. जाणिजे छ २८ शाबान. तूर्त फौज पाठऊन पारपत्याचा विचार नाही. पहिले लिहिल्याप्रा॥ जाहाले तरी करावे; नाहीतर आपले आपले जागा खबरदार जागा राखोन राहावे, ऐसे करून तुम्ही लोकसुधा पहिल्या लिहिल्या प्रा॥ येणे. जाणिजे छ मार आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa orders Shamrao Bhivrao not to attempt to reduce Mirajker to subjection if it be not impossible to do so with the force at his disposal.*

No. 56] *[1-7-1753*

श्री

तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री
भाऊ वडिलांचे शेवेसी

आपत्य रघुनाथाने सां॥ नमस्कार विनंती. येथील कुशल जाणौन स्वकीये लेखन आज्ञा केली, पाहिजे विशेष. रा॥ रघुनाथ हरी टकले याजपासून साल गुदस्ता गुजराथचे स्वारीस जातेसमई येक लक्ष रु॥ कर्ज घेतले आणि मामलत हरयेक जागा सांगावयाचा करार केला होता. त्यास गुजराथ प्रांते मामला सागावयास बनोन आले नाही. याकरिता स्वामीकडे पाठविले आहेत तरी यास मामलत मातबर सुरलीत आमली सांगावयाची आज्ञा केली पाहिजे. रा॥ छ २९ साबान सु॥ आर्बा खमसैन मया व आलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao requests his brother to assign a good district as Mamlat to one Raghunath Hari Takle in lieu of the loan borrowed from him by the writer.*

No. 57] *[1754 ?*

श्री

राजश्री बाळाजीपंत प्रधान
गोसावी यासी

श्रियामंडित राजमान्य प्रति लक्ष्मीबाई जाधव दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष. राजश्री

रघोजी भोसले याकडून रा गोविंदराऊ गोजदेव घासदाण्याचेविशाई पत्रें आणि कुल तालुक्यावर ती लाख येकूनतीस हजार पाचसे रुायाची तफरीक बसऊन अपली यादी घेऊन आले आहेत. तेहि यास्तव खामखा उपद्रव करणार व पाा चिटगोपे व कल्हार येथील पूर्वीची खंडणी बाकी आहे त्याची वाट करून द्यावी. नाहीतर समजोन घेऊ याप्राा कितेक त्याचें मुखची भाशणे यानी स्तुत करून काये ते उतर देणे म्हणतेत. यास्तव उभयेपक्षी दुसरा विचार न जाणता लिहिले जाते की, अमचे जागिरेत आपला व नवाबसोचे वैमनस्वास प्रसंग शुरू होऊन कुल तालुका ताराज जाला. यामुले अम्हास सरदारीचे खर्चाची चिंता असे. त्यामधे हेहि संध पाहातील तर हे गोष्ट आमचे जिवावरीलच आहे. आम्हास काही दुबारा रुाया मिलत नाही. येविशाई त्यास जे बरवे प्राा सांगणे ते सांगून आमचे प्रांताचे न जाता मुलक रक्षून निघोन जात ते केले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विनती.

¶*Laxmibai Jadhao requests the Peshwa to intercede on her behalf with Raghuji Bhonsle who has been demanding the ghasdana cess from her province. She pleads that her province has been entirely laid waste in the recent war between the Nizam and the Peshwa.*

No. 58] [*23-1-1754*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री सखाराम भगवंत गोसावी यांसी

सेवक सदासिव चिमणाजी नमस्कार उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें लेखन करणे. रविसंक्रमणाचे तिलशर्करायुक्त पाठविली आहे ते घेणे, जाणिजे छ २८ रबिलौवल बहुत काय लिहिणे.

लेखन
सीमा.

¶*Sadashiv Chimnaji sends his Sankrant greetings to Sakharampant Bapu.*

2645

No. 59] [27-2-1754

पाो छ ११ जावल
बुधवार सायंकालचा
घटिका दिवस

श्री

राजश्री त्रिंबकराव विस्वनाथ स्वामी गोसांवी यासी पोष्य बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत जाणे विशेष. सर्व प्रांतात व पुण्यात कलालाचा बंदोबस्त केला आहे त्याप्रो मुलाहिजा[1] न धरिता पारपत्य करून कैद चालवणे. * * * आलियावर दोचौ ठाई बशेरा (?) * * * * ल्या आहेत त्याची याद लेहून पाठविली आहेत, त्या ग्रहस्ताबो सरकारची माणसे देऊन गावातून बाहेर काढून गंगापार करून देणे. आलीकडे राहिलिया पारपत्य करावे येविसी हैगै येकंदर न करणे. रा छ ४ जमादिलावल बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Trimbakrao Pethe to see that the liquor merchants obey the rules laid down for them.*

No. 60] [8-8-1754 ?

श्री


राजश्री तुलजो राम गोसावी
यासी

ℰ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्रो रघोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत विनती उपरी. येथील क्षेम जाणून स्वकीये कुशल लेखन करणें. यानंतर प्रांत देवगड येथील पोतदारी सालगुदस्ता राजश्री विसाजी रघुनाथ वकील यासी दिली आहे. त्यास पोतदारीचा हक साल गुदस्ता पावला नाही याकरितां पेसजी तुम्हाला येक दोन ताकीदपत्रें पाठविली आहेत तरी साल गुदस्ताचा व साल मारचा पोतदारीचा यैवज दुसाला साल मारी तवाजी (?) यैवजी पावतां

---

१ गय न करतां.

करणें. अनमान न करणें. करार करून देणे तों आम्ही आलो
[शिक्का] तेव्हा करार करून दिल्हा आहे. त्याप्रा दुसाला यैवज
मारनिलेकडील कमाविसदाराकडे पावता करणे. जाणिजे छ १८
सवाल बहुत काये लिहीणे.



¶*Raghuji Bhonsle asks Tulajo Ram to remit the dues of the potadari of Prant Deogad assigned to Visaji Raghunath Vakil.*

No. 61] [*After 20-8-1754*

श्री

यादी सातार्‍याहून पत्रे आलीं तो मजकूर

प्रतिनिधीची वस्त्रें भगवंतराऊ त्र्यंबक यांसी द्यावी म्हणजे त्यांचा नित्य येणेजाणेयाचा राबता होईल यास्तव मातुश्री आईसाहेबांचे विचारे कीं वस्त्रें द्यावीं. या मनसब्यात बराणजी मोहिते आहेत. बाबाजी जाधव यांस लस्करांतून राजश्री भवानराऊ यांणी लिहिलें त्यावरून बाबाजी जाधव यांचे चितांत मात्र संशय आला आहे. मातुश्रीहि बर्‍हाणजी मोहिते यांसी सांगितलें की प्रस्तुत भगवंतराऊ यासी वस्त्रें द्यावीं म्हणजे बाबाजीचा संशय जाईल आणि सुरळीत जालियानंतर अष्टप्रधानाचे विचारे निश्चय होईल तो करूं ऐसे बोलोन वस्त्रें द्यावयाचा निश्चय केला आहे. भगवंतराऊ यासी येथील आज्ञेसिवाय वस्त्रें घेतां नयेत सेवेसी काय आज्ञा.

राजश्री रामाजीपंत व हरी राम व गोविंदराव मोरेश्वर यांसी पत्रे की तेथील मजकूर भगवंतराऊ यासी लिा आहे ते सांगतील त्याप्रमाणें वर्तणूक करणे. राजकारणे निराळी केलिया कार्य होणार नाहीं यास्तव यांचे विचारे वर्तणे म्हणोन पत्रें

(जबाब नानासाहेबाचे हातचा आहे)

वेगळी वेगळी राजकारणे न करणे इतके मात्र ल्याहावें.

भगवंतराऊ त्र्यंबक याजवळ एक खिजमतगार सरकारचा पाठवावा हरएक बातमी वरचेवर कळेल ती लेहून पाठऊं.

नारो बलाल पुण्यास गेले आहेत त्यास सत्वर आरलेयास पाठवावे म्हणजे हरएक कागदपत्र येईल जाईल तो रवाना करतील.

(नानासाहेबांचे हातचा जबाब)

प्रतिनिधीची वस्त्रें घेऊ नयेत. नजर कबूल करूं नये. राजकारणाचा जीवाचा अबरूचा भरंवसा पुरेल तर जावें; नाही तर आणखी एक महिना जाऊ नये.

[ता. २०-८-१७५४ रोजीं जगजीवन परशुराम उर्फ दादोबा प्रतिनिधि वारला, तेव्हां त्या पदावर कोणाची स्थापना करावयाची त्यासंबंधींचा विचार वरील कागदांत आहे. पेशव्याकडे कागद कसे रुजू होत, त्याचा मासला या पत्रांत आहे. निकाल प्रत्येक प्रश्नावर पेशव्यानें स्वदस्तुरचे लिहिले आहेत.]

¶*The question of investing Bhagvantrao Trimbak with the robes of office of the Pratinidhi is submitted to the Peshwa and his orders are solicited.*

No. 62] [*1755-56*

श्रीशंकर

यादी पत्रे रामनगरकर व दुर्जनसिंग यासी सुा सीत खमसैन

रामनगरकर राजे यांस पत्र की पाा सेजाण वगैरे परगणे येथे तुम्हाकडील कोळी येऊन उपद्रव करितात व अर्जुनगडचे पेठेचा कासार याचे घर फोडून कठाले नेली व सरकारचे कोलईचा कारखाना महमद साले याजकडून घालविला. त्यास कारखानियावरील कारकून तुमचे कोलियानी व सिदी फकिरा याणे मारिला व गोले याची बाईको नेली. यैसे कितेक उपद्रव लागतो म्हणून हुजूर विदित जाहाले तरी आपले कोलियास आटोप करून उपसर्ग न लागे ते करणें. कोलियानी यैसी वर्तणूक केलियाने कार्यास येणार नाही. व सिदी फकिरा आहे तोहि लबाड्या करितो व कारकून त्याणेच मारिला. त्यास सिदी तेथे आहे त्यास दस्त करून हुजूर पाा व

दुर्जनसिंग यांस पत्र की रामनगरचा राजा कोळी घालून मनंमानेसारखा उपद्रव स(दर)हूप्राा करितो त्यास साफ सागोन यैसी वर्तणूक न करी ते करणे आणि गोलियाची बाइको आणून देवणे व सिदी फकिरा याणे कारकून मारिला साा त्यास हुजूर त्याकडून आणून देववणे म्हणून पत्र

१

गोलियाची बाईको नेली आहे तीहि
वसईस पाठवणे. याउपरी फिरोन
बोभाटा आलिया कार्याचा नाही
म्हणोन पत्र १ लिहिणे

¶*Letters to the Raja of Ramnagar and Durjansing to stop inroads on the part of their Koolis into the Peshwa's territory.*

No. 63] [*5-4-1755*

पौा छ २३ जाखर चैत्र
वद्य १० मंदवासर

श्रीभवानीप्रसन्न

सेवेसी विनंती. सेवक येमाजी सिवदेऊ कृतानेक विज्ञापना ता छ २२ जमादिलाखर मुकाम मसूर साहेबाचे कृपेद्रिष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. साहेबी आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा जे राजश्री बाबूराव सदासिव यांसी युध्य करूत बहुत नाश केला. साहेबांची आज्ञां नसतां माारनिलेसी हर्षामर्ष वाढऊन परगणें बारामतीप्रांते स्वारी पाठऊन दोनी तीन गावीची खराबी केली व पुढेंहि करणार, व किले ताथवडा येथेंहि उपसर्ग करितां हा कोण विचार? व किले मचिंद्रगड येथेंहि कज्या आरंभिला आहे तरी ह्या गोष्टी साहेबांस मानणार नाही. देशादेशीं पाहून वर्तणूक करणें म्हणऊन साहेबीं आज्ञां केली; तरी आजीपावेतो जे घडोन आले ते साहेबाचें आज्ञेनरूपच घडोन आले. पुढेहि जे वर्तणूक होणे तें हुकमाखेरीज होणे नाही. रावमजकुरांसी हर्षामर्ष आम्हीं केला नाही. बारामतीप्रांतीहि चिरंजीव राजश्री गमाजी गेला नाही. ताथवडियासीं कलह आमचा काही नाही. गडकरी त्यानी बाहीर घातले त्याजमुले गडकरी यांचा त्याचा कज्या होत आहे. किले मचिंद्रगडचा मजकूर तरी पूर्वी जाधवानी हवाला साहेबाजवली मागून, कोणास न कलत गडकरी गडचे फोडून गड हस्तगत केला, त्याच अन्वयेकरून डुबलासहि लोक मिलोन गड घेतला. येकून राज्यांत दंडक याजप्रमाणें पडला. लोक मनस्वीपणें वर्तणूक करितात यासी आमचा इलाज काये आहे? पहिले आमचा तालुका होता तेव्हां यामागे या गोष्टी जाल्या नव्हत्या. प्रस्तुत ठाईठाई चालन येक प्रकार होत आहे; याचा धरबंध करणार साहेब धणी आहेत. साहेबाचे आज्ञेप्रमाणे चिरंजीव गमाजीस लिहिले आहे. जाजती वर्तणूक करणार नाहीं. पत्र घेऊन स्वार आले त्यास वीस रुपये खर्चायास देणे म्हणून पत्रीं आज्ञा केली; त्यास आजीपावेतो हे रीत घडो न आली. आम्ही लिहिणार.

आम्हीं कोठून रुपये द्यावे? परंतु साहेबाची आज्ञा परिपालण करावी म्हणून वीस रुपये दिले. याजउपरी याजप्रमाणे विचार होऊ लागलियास येथ राहणे सेवकाचे होणे नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Yemaji Shivdeo dissociates himself from the operations conducted against Baburao Sadashiv of Baramati and further complains that a spirit of disorderliness is rampant among the ryots.*

No. 64] [*13-6-1755*

नकल

श्री

हिसेब कर्जपटी विंध्याद्रिपर्वतामधें राजे व गिरासी आहेत, ते नानाप्रकारें मुलकात उपद्रव करितात. सरकारात रुजू होत नाही. सा। कर्जपटी सु॥ सीत खमसैन मया अलफ छ २ रमजान मालिकडे करार करून मल्हारराम पेठे पाठविले आहेत; याजबा। यैवज हुजूर पाठऊन देणे व तिकडील घोडे वगैर पाठवणे म्हणून पत्रें :

१ प्रतापसिंग राजा सां। राजपिंपले येक लक्ष.

१ दलेलसिंग राजा सां। आखराणी पाच हजार.

१ आजबसिंग राजा सां। बडवाणी रुजू वाल्हेर तीन हजार.

१ पाहाडसिंग राजा सां। बडवाणी पनास हजार.

१ सबलसिंग राजा सां। आलिकर राठोड पनास हजार.

१ रायसिंग राऊल सां। मोहन पनास हजार.

१ कान्होजी सुरते गिरासे वगैरे दोन हजार.

१ भडोचचा मोगल दाहा हजार.

१ डोंगऱ्या भिल व साटा व बाबल्या व साबा वस्ती सागवडे दाहा हजार.

१ आबाली बोर याचा मोठ्या पाहाडवी दोन हजार.

१ मोठा बासद्या गिराश्या पा। बलवाड वस्ती मांडवी पाच हजार.

१ निंबाजी व्यास व सतीदास बक्षी मिठा मेहता राजपिंपलेकर हे तिघेजण मिलोन पनास हजार.

१ काळू पाहाडणी पा। वल्हेर दोन हजार.

¶*The paper mentions certain chiefs in the north to whom despatches were sent by the Peshwa asking them to remit dues with Malharram Pethe as some marauders on that side were very active.*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बाबा
स्वामी यां(सी)

प्रति शुभचिंतक बलकर्णगीर गोसावी आसीर्वचन विज्ञापना. येथील क्षेम ता। जेष्ठ वद्य १३ मुकाम सिरोंज स्वामीच्या कृपावलोकने येथास्थित असे विशेष. महंत श्रीज्वालागीर बावा याची आपले आज्ञेनरूप राजश्री लक्ष्मण शंकर यानी सेवा केली. त्यास त्यांचा काल जाल्यानंतर महंत आपल्या गुरूस समागमे घेऊन श्रीस वास्तव्य करावयासी गेले. नबाब मनसूर अलीखा वजीर यासी बलवंतसिंग राजे कासीकर याच्या विद्यमाने देवघेवहि जाला. त्यास दैवयोगें वैशाख वद्य ११ श्रीमधें महंत ज्वालागीर याचा काल जाला. आम्हीं या प्रातें सिरोंजस होतो. काही सिष्यसमुदाये बावासमागमे कासींत होता. तेथील गुंता नबाब वजीर याचे पुत्र सुज्यायेतदौला यांजकडे आहे व राजे बलवंतसिंग याजकडेहि आहे तो उगवून घेतला पाहिजे, व श्रीमधे बावा समाधिस्त जाले त्याचा भंडारा करावा लागतो यास्तव येथून समुदायानसी श्रीस जावयाचा उदेग केला आहे, हे सर्व पूर्ण होणे ते महाराजाच्या कृपेने होईल. आमची शक्ति नाही. महंतावर सर्वप्रकारे आपली कृपा परिपूर्ण होती यास्तव चालत होते. त्यामागे हा वेव्हार चालणे माहाराजाच्या हाती असे. येविषई साहित्यपत्रे नबाब सुज्यायेतदौला व राजे बलवंतसिंग यासी पाठवावयासी आज्ञा करावी कीं ज्वालागीर गोसावी यांची वेवसाये तुम्हाकडे असल तो व यांची वस्तभाव कासीमधे जे आहे ते याचे शिष्य बलकर्ण गोसावी कासींत आले आहेत याच्या स्वाधीन करणे; याप्रमाण पत्रे सादर जालियां तेथील कार्यभाग संपादून आसीर्वचन द्यावयासी दर्शनास येतो. येविषई विनंतीपत्र श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीस लिहिले आहे. सर्व अर्थ निवेदून सर्व प्रा साहित्य करणार आपण समर्थ आहेत. +आसीरवचन बचने सही.

¶*Balkarna Gosavi asks for letters of recommendation to Sujauddaula and Balvantsing asking them to restore the property of the deceased Mahant Jwalagir Gosavi to the petitioner—his disciple.*

\+ येथून पुढील अक्षरें बाळबोध वळणाचीं आहेत.

No. 66] [11-7-1755

पौ छ ४ सवाल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
जनार्दन बलाल स्वामी गो

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जाणे विशेष. सालमजकुरी फौजेची समजावीस लौकर करून स्वारीचा डौल त्वरित जाला पाहिजे. ऐशांस रसदाचा पट आकारून मामलेदारापासून रसदा घ्यावयास प्रारंभ करणें. श्रावणमास समीप आला. दक्षणेस ऐवज पाहिजे. तर मातबर मातबर मामलेदार ज्याचा गुंता नाही त्याजपासून ऐवज रसदेचा घ्यावयांस आरंभ करणे. पंचवीस तीस लाख रुपयेपावेतों ऐवज लौकर जमा होये ऐशी तरतद करणें. सालमजकूरचा रसदेचा अजमास पाऊण करोड असी लाखपर्यंत आहे. ऐवज जमा करावयाची डौल करणें. मातबर मामलेदार राजश्री गोविंद बलाल व नारो शंकर व हरि विठल इत्यादिक आहेत यांच्या कारभारियांस ताकीद करून ऐवज रसदेचा लौकर मागणे. सर्व लाहानथोर कमावीसदार यांस रसदेविसी पत्रे लेहून पाठवणे आणि ऐवज जमा करावयाची तरतूद करणे. रसदाचा पट व कोणी माहाली काये दिकत हे तापवार पट लौकर पाठऊन देणे. येथूनहि कलेल त्याप्रो लेहून पाठऊन. तर्त यैवज जमा करावयास प्रारंभ करणे. पत्रे पाठवणे. रा छ १ सवाल. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa writes to Janardan Ballal that the work of collecting Government dues from the Kamavisdars should be immediately taken in hand as funds would very shortly be required for making payments to the army and for distributing Dakshina to the Brahmins in the month of Shravan.*

No. 67] [1756 ?

श्री

पुरवणी राजश्री रामाजीपंत स्वामींचे शेवेसी विनंती उपरी. आपण परगणियाचे वर्तमान व समसेरबाहदर याच्या उपद्रवाचे व अत्फतीचे वर्तमान सविस्तर लिहिले ते कलले. येसियास आपण अखेरसाल होताच पुणियास यावे. खावंदास सर्व वर्तमान निवेदन करून सर्व निकाल करून घेऊन. येविशी

आपण कोणे गोष्टीची चिंता न करावी. आम्ही प्रसंगी साहित्यास अंतर करणार नाही. आपली निशा असों द्यावी. आम्ही आपणाकडे पाठवावयास गोविंद कृष्ण याचे शंभर राऊत पेशजी नेमिले होते ते राजश्री बाबा फडनीस यानी वसईस पाठविले. आपणाकडे राऊत न गेले हे आम्हास लस्करात वर्तमान कलले यावरून खावंदास * * * * येकसे पाच राऊत * * * * बहुत काय लिहिणे? कृपा असो दीजे हे विनंती.

¶*The writer assures the addressee Ramajipant of his support in his complaint against the ravaging activities of Samsher Bahadar.*

No. 68] [*1756-57 ?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री नारोपंत स्वामी गोसावी यांसी

पो सखाराम भगवंत कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. "जयेपुरचे मामलतीचे जाबसालाकरितां माधोसिंगाकडे जात येत होतो त्यास माधोसिंग यानी हती व घोडा बहुमान दिल्हा तो श्रीमंतानी बक्षीस केला;" व मामलतीचा जाबसाल कितेक दंषयुक्त लिहिलात तो सविस्तर अवगत जाला.+

¶*Sakharam Bhagvant notes with pleasure the honour done to the addressee by Madhosing of Jaipur to whom he had gone on some political mission.*

No. 69] [*1756 ?*

श्री

श्रीमंत राजेश्री दादासाहेब गोसावी यांसी सेवेसी

ꣵ आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नो संभाजीराजे भोसले कोा मुंगी दडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखणआज्ञा करीत असले पाहिजे विशेष. प्रा शेंदुरवादें सरंजामी जागीर आपल्याकडून चिरंजीव राजेश्री माहादाजी राजे व उमाजी राजे भोसले याजकडे आहे. त्यास ते उभयता कर्नाटकचे स्वारींत श्रीमंत राजश्री राव याजसमागमे आहेत. ऐसियास प्रगणा अगोधर खराब वैराण होता, त्यास कौलपत्र देऊन नवी उसतवारी केली आहे, त्यास आपली खासा स्वारी इकडे समीप आली जाणून रो भवाणी आबाजी कमाविसदार सेवेसी पाठविले आहेत हे कितेक प्रकारे प्रा मााराविसीं विनंती वर्तमान

+ पत्र अपूर्ण आहे हें उघड आहे.

निवेदन करतील तें मनास आणून प्रो मजकुरास कितेक उपसर्ग न लागतां रखवालीची आज्ञा जाली पाहिजे. फार ल्याहावे तर माहाल मजकुर व आम्ही आपले आज्ञेत. दुसरा अर्थ नाहीं. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶Sambhaji Bhonsle of Mungi requests Raghunathrao not to molest the Bhonsles' villages on his march.

No. 70] [*1756 ?*

श्री

राजश्री पंत प्रधान
गोसावी यासीं

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नेहांकित संभाजी जाधव व सटवोजी जाधव दंडवत विनंती. येथील क्षेम जाणऊन स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. पत्र पाठविलें तेथें आज्ञा केली कीं संगमाचे पलीकडील काठीं आंबराई लावावयाची मान्य केली आहे, त्याची लावणी करवणें; जागा नेमून देवितो म्हणौन आज्ञा केली. यैसियासीं रोपाची मात्र बेगमी पाहिजे, त्याची आनकुलता करून देवावी व आणखीहि जिनसवार झाडे देवावी. आम्हीं आमवशा जालियानंतर येतों; आणि जागा नेमून द्यावी म्हणजे लावणी करून. जागियाचीहि आरास उत्तमच होईल. मुख्य गोष्टी आंब्याचे रोप अनकूल करून द्यावे म्हणजे सर्व अनकूल होऊन येईल. विशेष काये लिहिणे हे विनंती.

¶Sambhaji and Satwoji Jadhav request the Peshwa to obtain a supply of good mango plants.

No. 71] [*9-7-1756*

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य
राजश्री रामाजी केशव कादार
पा जैनाबाद गोगा

सेवक बाळाजी बाजीराऊ प्रधान नमस्कार सुा सबा खमसैन मया व अलफ. तुम्ही विनतीपत्र पाठविले ते पावले. फर्मासी बंदुखाविसी तुम्हास लिहिले होते त्यावरून तुम्हीं बंदुखा २५ पचवीस तयार करून पाठविल्या त्या सरकारांत जिरायतखान्याकडे जमा जाल्या असेत. बंदुखा स्वारींचे कामाच्या नाहीत.

जड फार आहेत. त्यास बंदुखा चागल्या हलक्या स्वारीचे कामाच्या ऐशा तयार करून पाठऊन देणें. दर बंदुखेस किमत रुो ११ अकरा म्हणौन लिा. त्यास किंमत भारी पडते. करिता चौकसीने बंदुखा करऊन किफायतवार स्वारीचे कामास येत ऐशा पाठऊन देणे. जाणिजे छ १० सवाल.

¶*Balaji Bajirao while acknowledging receipt of guns from the Kamavisdar of Jainabad, explains, what he needs is lighter guns. He also protests against the high prices charged at Rs. 11 per piece.*

No. 72] *[1-9-1756 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक गोविंद सिवदेऊ कमाविसदार व रामाजी देवराऊ कुलकर्णी कसबा कराड कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. ता छ ६ माहे मोहरम पावेतो स्वामीच्या कृपाद्रिष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. क्षेत्र कसबा मजकूर येथे श्री कमलेश्वर देव पुराणप्रसिध आहे. त्यास पेसजी देवलये जाया जाहाले होत. तेव्हा श्रीमंत राजश्री नाना स्वामी स्वामीचे आजे कोल्हापूरचे स्वारीस जाते समई श्री च्या नमस्कारास गेले. नमस्कार करून देवालयाकड पाहिले. तेव्हां राजश्री कृष्णाजी विठल सुभेदार बराबरी होते. त्यास आज्ञा केली जे देवालये नीट करावे. त्यानी आज्ञा म्हणून बोलिले. तेव्हा राजश्री नाना स्वामीनी आज्ञा केली की गावकरास बोलावणे. त्यावरून गावकरास बोलाऊन त्याचे हाती द्रवे देऊन पडझड नीट करविली. त्यास हाली आणखी देवालये जाया जाहाले आहे. स्वामीखेरीज दुसरे कोणी करिता दिसत नाही. आम्ही सेवकलोक विनंती मात्र करावी म्हणून केली असे. करणार स्वामी समर्थ आहेत. यात जे चितास येईल ती आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहू ? कृपा निरंतर करावी हे विज्ञापना.

¶*Govind Sivdeo and Ramaji Devrao Kulkarni of Karad request the Peshwa to grant some pecuniary aid for the repair of the old temple of Kamaleshwar.*

No. 73] [2-3-1756?

श्रीकृष्णो जयति

श्रीमत उतमगुणपरिपर्ण अखंडितलक्ष्मीप्रसन
राजमान्य राजश्रिया विराजित माहादाजी
पंडित स्वामी गोसावी याचे सेवेसी

स्नेहांकित राव केशवराऊ कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम फाल्गून शुद्ध १ मुकाम दिली जाणून स्वकुशल लेखन केले पाहिजे विशेष. स्वामीचे सेवेसी पूर्वीपासून पत्रापत्री तो दंडक असे तथापि दर्शनलाभ मात्र जाला नाही. तथापि सुजन याची कीर्ती व परस्परे वर्तमान स्नेहाचे जाले तेच दर्शनापेक्षां अधिक असे. प्रस्तुत आमचे येक काम स्वामीपासी आले आहे याची साध्यता करून संपादिले पाहिजे. मौजे वडवद पा। धावेडे सुबे वराड हे जागीर गांव औरंगजेबापासून आमचे वडलास त्यानंतर आम्हास चालत आला. त्याची चौथ व सरदेशमुखी वगैरे छेत्रपतीही आम्हास माफ करून सनद करून दिधली त्या प्रमाणें चालत आहे. सांप्रती नूतन राज्य जाहले. कदाचित नूतन सनद पाहिजे. आम्हासारिखे हजारो कामे सनद नूतन करायाची असतील तरी आमची सनद आपण कृपा करून श्रीमंताचे सेवेसी विनंती करून सर्वाबा। हे सनद करविली पाहिजे कीं पहिलेसारिखे जागिरात आमचे माफी चौथाई व सरदेशमुखीची वगैरे चाले राहील. पूर्वील सनद तिमा राऊ आमचे पुत्रा सारिखेच आमचे तरफेन दक्षिणेत आपचे अधिकारावरी होता याजकरितां सनद त्याचे नावे जाली. तो शांत जालियावरी त्याचा पुत्र नरसिंगराऊ त्याचे नावे सनद जाली होती तेव्हा आमचा पुत्र कोण्ही दक्षणेस गेला नवता; दिलीत आम्हापासी होते. आतां मुकुंदराऊ आमचा पुत्र आमचे अधिकारावरी आहे, तरी सनद त्याचे नावें करविली पाहिजे. ये विषई विशेष कांही आपणास लिहावयाचे प्रयोजन नाहीं. आपण कृपा-करून हे काम करीत आहेत. पूर्वील चालत आले आहे त्या प्रमाणे चालवितील. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

हे॥ सेवेसी बदरीनाथराऊ कृतानेक नमस्कार विनंती.

¶*Raje Keshavrao, the Peshwa's Vakil at Delhi, requests Mahadajipant to get the Sanad of the writer's villages renewed in the name of his son.*

2656

No. 74] [1757-58

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना यैसीजे. दास्तान मांडले व हरिहरेश्वरीं व जागोजागां सरकारची ठाणी बैसली आहेत त्यांस अडिसेरी डोईवोझियानी न पोहचे, तीन साडेतीन गांवे जमीन आहे, रयेत श्रमी होते, गला गोरगांव गोवले हे तर्फेहून खाडीमार्गें न्यावयासी अनकूल म्हणोन होडियांचे सांगड बांधून त्यांवर भात भरून रा। केलें. यांस दरदिवेकर आंगारिकाकडील चौकीदार यांही मनाई करून होडिया गलबताचे पागेसी बांधून ठेविल्या आहेत. होडियांतील भात भिजून नासले. यैसियासी सविस्तर हकीकत तपसीलवार लेहून स्वामींचे सेवेसी पाठविलीच आहे यावरून सेवेसी विदित जालेच असेल. स्वामी त्यांस लेहून भाताच्या होडिया खाली जाऊन लोकांस अडिसेरी पोहचत ते करावें. अथवा स्वाम जैसी अज्ञा करितील त्याप्रमाणे सिरसा आहे. जैसे ते कारितिल, जे सांगतील त्याचप्रमाणें वर्तावें यैसेच असिलें तरी अज्ञा ते प्रमाण आहे. स्वामीजवळ ममत्व सखेत्व दर्शऊन अंतर शुद्ध न करून घांसाघांस करितात. सेवकानीं कजिया करावा तरी स्वाम शब्द लावितील. अडिसेरी तों दाणा जाऊं देत नाही. लोकांस अडिसेरी तों जरूर असावी. अडिसेरी न पोहचे तेव्हां ठाणी उठवावीं. यांमधें स्वाम अज्ञा करितिल ते प्रमाण आहे. खाडीचा विचार तरी पलीकडील तड तिकडील, अलीकडील तड सरकारची. त्यांची अमदरफ्ती चालोन तरांडी चालावीं आणि निमेनिम सरकार तर्फ असोन अमदरफ्त न चालावी हेहि गोस्ट चितांत आणावी. स्वाम धनी आहेत. त्यांचा आपला दंग दावा तो कांहीं (नाहीं) यैसे असोन रहदारीचे मार्गास मुजाईम होतात याचा अर्थ चितात आणावा. त्याचा आपला कजिया परिस्छिन होतां स्वाम शब्द ठेवितील याकरितां विनंती लिहिली आहे. खाडीमार्ग सुरलीत चालिलियानी त्यांचे व आपले आज्ञेप्रा। सखेत्वच आहे. स्वाम धनी आहेत. खाडीमार्गें कांही आपले अरमार जाणे नाही अथवा येणे नाही. भातभरल्या होडिया जावयासी मना करावयाची कैद करितात हे गोस्ट कार्याची नाही. पांचजण सिपाई व गोवले यांचा मजमदार होडियांवर आहेत. त्यांसी गलबतांचे पागेसी बांधोन ठेविल्या आहेत. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*A complaint is made to the Peshwa against the Angrias for causing unauthorized obstruction to the cargo ships bound for Mandle and Harihareshwar.*

No. 75] [1757?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
सदाशिव हरि स्वामी गोसावी यासी

पो बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीय कुशल लिहित जाणें विशेष. पूर्ववत प्रों चालत आल्या स्नेहांत दुसरा विचार नाहीं; तरी तुम्ही सरदारासहवर्तमान पत्रदर्शनी स्वार होऊन भेटीस येणे.

मुधोजी भोसले कितेक प्रकारे वर्ततात, त्याचा अर्थ सर्व कलला पाहिजे याजकरिता तुम्ही मारनिलेचा निरोप घेऊन हुजूर येणे. तुमचे सरदाराचे ठाई दुसरा विचार नाही, ऐसे असता ते कितेक प्रकारे वर्ततात हे ठीक नाही. त्यासुधा यावे. ते नच येत तर तुम्ही येणे.

¶*Balaji Bajirao assures Sadashiv Hari of his cordial friendship and calls him for an interview.*

No. 76] [1756-57

श्री

यादी कारकून निसबत रेवदंडा सुा
सबा खमसैन मया व अलफ आसामी.

दरखी
४ फडनिसी
१ कृष्णाजी नारायेन फडणीस
१ धोंडो भास्कर दफ्तरदार
१ माहादाजी बलाल दफ्तरदार
१ बाबुराव माहादेव
—
४
५ हशमनिसीकडे
१ धोंडो गोविंद हशमनिसा
१ गोपाल माहादेव फडनीस
१ गोविंद गणेश
१ रखमाजी बाजी
१ गंगाधर गोपाल

मोघम आसामी
१ पुतलाजी साबाजी
१ रुद्राजी त्रिंबक
१ माहादाजी नीलकंठ
१ बालाजी माहादेव बेडेकर
१ यादव विठल
१ माहादाजी हरी
—
७

२ सबनिसी कोट
१ बहिरो माहादेव सबनीस
१ रामचंद्र कृष्ण फडनीस
३ कारखानिसी कोट रेवदंडा
१ यादव लक्षुमण कारखानीस
१ गणेश माहादेव
१ शंकराजी भिकाजी
१ दामाजी केसव इमारत
२ सबनिसी कोरला
१ विसाजी कृष्ण सबनीस
१ आबाजी मोरेश्वर

—
२

२ कारखानिसी कोरला
१ शंकराजी रायाजी कारखानीस
१ सदाशिव त्रिंबक फडनीस

—
२

३ अरमार
१ शकरोजी हरी सबनीस
१ गोविंद रघुनाथ फडनीस
१ नारो बलाल
१ खडो वामन चिटनीस
१ लक्ष्मण नारायेण पोतनीस

¶*List of the names of persons in service at Revdanda in the year 1756-57.*

No. 77] *[1757?*

श्री

राजश्री पंत प्रधान
गोसावी यासीं

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो॥ कान्होजी राजे सिर्के रामराम विनंती उपरी. छ २९ रावली मल्हारपूरचे पेठेवर मुकाम केला.

पुढे मारेगिरीवरी मुकाम आपणाकडील लोक आले आहेत. त्यांत माणूस आहे नाही ते आपणास विदितच आहे. सदोजी मोहिते आले होते ते पालीहून * * * * * आपण हो लाविले म्हणौन गेले. अद्याप पाईचे माणूस येक आले नाही. करोल फौज आगदी नाही; तरी पाईचे माणसास ताकीद करून सत्वर पाठविले पाहिजे; आणि पनास साठी करोल व खासे राऊत आढलाचे पंचवीस तीस पाठविले पाहिजेत. सदोजी मोहिते या(स) पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिणे? कृपा निरंतर असो दीजे हे विनंती.

¶*Kanhoji Raje Shirke requests the Peshwa to send Sadoji Mohite and a party of troopers to his aid.*

No. 78] [6-1-1757

श्री

राजश्री खंडोजी भावकर
गोसावी यासीं

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद. सुा सबा खमसैन मया व अलफ. तुमची समजावीस जाली असता अद्याप येत नाही. खासा स्वारी मजल दरमजल कृष्णातीरास जात असे; तरी राऊत सुधा येणे. दिरंग न लावणे. आठा रोजात येऊन पोहचणे. जाणिजे छ १९ रबिलोखर बहुत काये लिहिणे.

¶*Khandoji Bhabker is summoned by the Peshwa to join him with his squadron in his southern campaign.*

No. 79] [4-3-1757 ?

पौ छ २१ जाखर

श्री

श्रीमंत राजश्री नाना व तथा
राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जनार्दन बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ १३ जमादिलाखरपर्यंत यथास्तित असे विशेष. स्वामीनी कृपा

करून पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वृत सविस्तर कलले. तुम्ही निरोप घेऊन श्रीस गेला होता, त्यास तेथून पुण्यास आला न आला काय वर्तमान ते लिहूंन पाठवणें. पुणियास येणे म्हणून आज्ञा. एसियासी स्वामीनी ज्याप्रमाणे आज्ञा केली होती त्याप्रमाणें पौष वद्य पंचमीस पुण्याहून श्रीस गेलो ते फाल्गुन शुध पंचमीस पुण्यास आलो; ते वृत पूर्वीच सेवेसी लेहून पाठविले आहे, त्यावरून विदित जाहालेच असेल. शरीराचे वृत तर जे स्थित आहे तीच आहे. दिवसेंदिवस रोगाची प्राबल्यता फारच होत चालली आहे. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी श्रूत होये हे विज्ञापना.

¶*Janardhan Ballal, the father of Nana Fadnis, writes to the Peshwa and his brother, Sadashivrao Bhau, that he is daily declining in health.*

No. 80] *[18-4-1757*

छ १ साबान

श्रीगजानन

शेवेसी दाजी नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान ताा छ २८ रजब मुाा पुणे स्वामीचे कृपाआवलोकनेकडून येथास्तित आसे. यानंतर राा बळवंतरावजी याणी लस्कराहून हाती व घोडे वगैरे किरकोली जिनस सेवकासमागमे पाठविला आहे. त्यासी येतद्विशी पेशजी सासवडीहून मुजरद जासूद सेवेसी पत्रे देऊन पाठविला आहे त्याजवरून सविस्तर सेवेसी निवेदन जालेच आसेल. तदनंतर सासवडाहून रो त्रिंबकरावमामा यांचे सेवेसी विनंती लिाा होती. त्यासी त्याणी आज्ञा केली की, कवडीची जागा पुणियाहून लांब; रतीब वगैरे आणावयासी लांब पडेल. यास्तव पुणियास येऊन राहिलो. खबुतरखानियात घोडियासी जागा राहावयास देविली आहे. तूर्त तेथे जाऊन राहातो. पुढे येथच राहावे किंवा लस्करात खावंदाकडे यावे, तर लस्कर गंगातीरी आहे. वार्ता कोकण प्रांती जावयाची लौकिकी आहे. तहाकीक खबर कळली नाही. यास्तव सेवेसी परस्पर यावयाचे आंतर पडले. पुढे ज्याप्राो आज्ञा होईल त्याप्राो वर्तणूक करू. येतद्विशी आज्ञापत्र सादर व्हावयाची आज्ञा जाली पाहिजे. वरकड सविस्तर वर्तमान तर खावदांचे च्यरण आवलोकन जालियानंतर सेवेसी निवेदन होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Daji Narayan reports to the Peshwa his arrival in Poona, probably from the camp of Balwantrao Mehendale in the Karnatak, and awaits further orders from the addressee regarding his future movements.*

No. 81] [13-5-1757

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री जिवाजी गणेश स्वामी
गोसावी यासी

पो बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जाणें विशेष. राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यानी जमाव करून राजश्री येमाजीपंत याजसी कजिया करणार म्हणोन कलो आले; तर तुम्हीं प्रतिनिधीकडे कारकून पाठऊन कजियां करू न देणे. जरीं प्रतिनिधी नाइकेत, कजियाच करतील, तर तुम्हीं येमाजीपंताची कुमक करणें, येविसी गई न करणें. जाणिजे. छ २४ साबान सुा सबा खमसैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे? जे जे लबाड मिलाले आहेत, त्यास सख्त रगडून सांगणे हे विनंती.

¶*Balaji Bajirao writes to Jiwaji Ganesh to help Yemajipant if the efforts to effect a settlement with the Pratinidhi prove fruitless.*

No. 82] [22-5-1757

श्री

श्रीमंत राजश्री दादा साहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवेसी आज्ञाधारक बलवंतराव बापूजी कृतानेक साष्टांग दंडवत विज्ञापना. येथील कुशल जेष्ट शुध्ध चतुर्थी भानुवासरपर्यंत मुा फतेपूर येथें स्वामीच्या कृपावलोकनेंकरून यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री राव स्वामी कैलासवासी स्वस्त असतां रा मल्हारजी होलकर याची उभारणी आंगेजणीपूर्वक करून आमचे वडिलाची स्थापना मारनिलेजवल केली. त्यावरून त्यानी आमचे चालविलें. पांच सात सहश्र रुपये व कापड देत होते. त्याजआलीकडे च्यार पांच वर्षे जेंवतेव चालिले. गत वर्षी कांही पावले नाही. येक गांव होते तेहि काढिले. यास्तव चांदवडास जाऊन च्यार सा महिने उपार्जना केली परंतु निखालसपणे उतर प्रत्योतर न जाले. याजकरितां संदव्यापावेतो समागमे गेलो. तेथे कितेक विचारें बोध केला परंतु बहुतच निष्ठुरता करून निर्माया केली. गांवखेड व द्रव्यांश तिलतुल्य प्राप्त न जाला. ते हिंदुस्थानात गेले. आंम्ही घरास आलों. वडिलानी श्रमसाहस निसीम करून

2662

जागा जोडिली होती कीं, पुत्रपौत्रा कार्यास येईल, त्याचा फलात्कार या प्रकारें जाला. असों. त्याचे त्यास कार्यास येईल. श्रीमंत कैलासवासी यानी पूर्वी साभिमानपूर्वक स्थापना केली होती परंतु मारनिलेनी अव्हेर केला तरी काये चिंता? श्रीकृपेनी आपण समर्थ आहेत. आमचे चालवणे काही विशेष नाही. आम्हीपदरीचे आहों. आपण सांभाल करितील हा भरवसा पूर्ण आहे. येविसी कितेक आर्थ रा रामचंद्र विठल सेवेसी निवेदन करिता श्रुत होईल. आपण कृपा करून आज्ञा करितील त्याप्रमाणे वर्तणूक करू. विदित जाले पा. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Balvantrao Bapuji to Raghunathrao, complaining against Malharrao Holkar about the indifference shown to the writer though he was attached to Holkar by the Peshwa Bajirao. The writer requests him that the orders for his appointment should kindly be repealed.*

No. 83] [*3-6-1757*

पौ छ १३ शौवाल

श्री

राजश्री सखारामपंत
बापू गोसावी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री समशेर बाहादर सलाम विनंती उपरी. येथील कुशाल ता छ १५ माहे रमजान मुकाम कासोदें प्रा जयेपुर जाणौन स्वकुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. हुजरून राजश्री गोविंद बलाल याजकडे व राजश्री गोपालराव बापूजी यांजकडे दोन लक्ष रुपयांच्या वराता पथकाच्या यैवजी दिल्या आहेत, हे वृत आपणास श्रुत आहे. यैशास श्रीमंत दादासाहेबांची ताकीदपत्रे उभयेतास आहेत. आपण मामलेदारांस ताकीद करून यैवज वसूल होऊन सत्वर पावे यैसे करणार आपण; यैवजाकरितां लोकांचा मोठा गलांटा जाला आहे. दोन लक्ष रुपये राजश्री गोपालराऊ गणेश याजकडे पावता होये यैसे करावे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Samsher Bahadar writes to Sakharam Bapu to remit a sum of Rs. two lakhs to Govind Ballal and Gopalrao Bapuji as ordered by the Peshwa.*

2663

No. 84] [22-7-1757

श्रीशंकर

राजश्री नानासाहेब

साहेबाचे शेवेसी

ऽ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य आज्ञाधारक जगजीवनराऊ पवार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ९ जिलकाद मुकाम जनस्थान आपले कृपेकरून येथास्थित जाणून स्वकीये कुशललेखनआज्ञा करीत आसिले पाहिजे. यानंतर, बहुत दिवस जाले, आपल्याकडून सांभालपत्र येऊन परामृष जाला नाही. तेणेकरून चित सचिंत आसे. तर यैसे केले न पाहिजे. सदैव पत्री स्वानंदार्थ लेखन करून गौरवीत आसिले पाहिजे. तद-नंतर आपले पुण्यास आगमन जाले हे यैकोन परम समाधान जाले. आमचे वर्तमान तर, तुंगभद्रातीरीहून लग्नानिमित्य आपली आज्ञा घेऊन गावास आलो. इकडे येऊन जेष्ठ मासी जेष्ठ कन्येचे लग्न केले. शरीरसंमंध पारनेरकर देशमुख हांडे यासी केला. आलीकडे आशाढ वद्य १२ द्वादसीस आपले कृपेकरून आपणास पुत्र जाला. शेवेसी कलावे यास्तव विनंतीपत्र लिहिले आसे. कृपा निरंतर वृधींते पावीत आसिले पाहिजे हे विनंती.





¶*Jagjivanrao Powar communicates to the Peshwa, who has just returned to Poona from the Karnatak expedition, the happy tidings of the birth of a son to him.*

No. 85] [24-7-1757 ?

छ ७ जिलकाद

श्रीरामचंद्र

सकलगुणालंकरण अखंडित-
लक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
सदासिव पंडित स्वामी गोसावी यासी

पोष्य कृष्णराऊ भगवंत कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. राजश्री कृष्णाजी

माहादेव येथे आल्यानंतर खालील मनसबेची पैरवी जे करणे ते केली आहे. राजश्री रामचंद्र सावंत भोसले सरदेसाई वाडीकर यांसी पत्रे पाठविली आहेत. त्याची उतरे निश्चयात्मक येतील त्याप्रमाणे विचार करणें तो करूं, येविसींचे वृत विस्तारे राजश्री महिपतराव व राजश्री कृष्णाजीपंत याणी आपणास लिहिले आहे, त्यावरून कलों येईल. आपल्या लिहिल्यावरून कार्यभागाचे ठाई सादरता धरून होईल कार्यभाग त्यास अंतर होणार नाही. आमचे आगत्य आपणास आहे तेथे अधिकोतर काये ल्याहावे ? बहुत काये लिहिणें ? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Krishnarao Bhagvant informs Sadashivrao Bhau that a communication has been sent to the Bhonsle Savant of Wadi, and his reply awaited.*

No. 86] [*2-9-1757*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री गोविंद बलाल स्वामी गो

पो बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणे विशेष. बा देणे राजश्री कानोजी जगदले यांस बक्षिस हती नग १ येक देविला असे; तरी तुम्हाकडे सरकारचे हती आहेत त्यापैकी पावता करणे. जाणिजे छ १७ जिल्हेज सुहुर सन समान खमसेन मया व अलफ.

¶*Balaji Bajirao orders Govind Ballal to make over one elephant to Kanoji Jagadale, as previously settled.*

No. 87] [पौ *27-11-1757*
पो छ १४ रबिलौवल

श्री

श्रीमंत महाराज राजश्री नानासाहेब
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक जंगी नाईक लमाण मुा लस्कर नजीक कडपे सेवेसी विज्ञापना यैसीजे. साहेबी रो बलवंतराऊ यांचे हवाला करून गेले, त्यास आजपावेतो सुखरूप असो. साहेबास कलावे म्हणून विनंती लिहिली असे. आपन साहेबाचे म्हणवितो. हरयेक प्रकारे आमचा गौर केला पाहिजे. पहिले हाती धरिले त्याचा अभिमान धरून आमचे हरयेकविशाई साहित्य करावे. साहेबास ल्याहावे

यैसे नाही परंतु सेवेसी विनंती लिहिली. यावर रो बलवंतराऊ यास येक पत्र लिहिणे की, लमाणाचा सांभाल करीत जावे. यैसे येक आज्ञापत्र ल्याहावे. विनंती उदास न करणे. याचे उतर लिहिले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विज्ञप्ति.

¶*Jangi Naik, a Laman by caste, requests the Peshwa to write a recommendatory letter about him to Balwantrao Mehendale, in whose camp at Kadappa the writer was serving.*

No. 88] *[27-11-1757*

श्री

सेवेशी विनंती. येथील कुशल ता। छ १४ रावलपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. पातशाहाकडील हुंड्या दोन लक्षाच्या आगऱ्यास आल्या होत्या. तो यैवज न्यावयासी तख्तमल साहुकार मारवाडी आपले आगाडीचे बाजारात राहातो. तो न्यावयास आगऱ्यास आला होता. त्यास सदरहू दोन लक्षांपैकी पनास हजार रोख सिंद्याकडील राऊत घेऊन गेले. बाकी दीड (लक्ष रा)हिले. त्यापौ पनास हजार आगऱ्यास साहुकाराकडे राहिले. येक लक्ष रोकड तख्तमल घेऊन येथे आला. आम्हास वर्तमान सांगितले की, याप्रो आपण रोकड घेऊन आलो आहे. लस्करात जातो. फरिदाबादपर्यंत पोहचवावयासी स्वार द्यावे. त्याजवरून आम्ही त्यास सांगितले की स्वार बरोबर देऊन लस्करात पोहचऊन देऊ. त्यास तो म्हणाला की, आधी सैफुदी मा।दखान याजकडे दिलीस जाईन. उपरांतिक ते सांगतील तरी लस्करात यैवज घेऊन जाईन. यैशास रोकड यैवज. न जाणो यैवज रोकड असता सैफुदीखानाकडे गेल्यास कितीका दिवसी सरकारात देईल किंवा घालमेल करील यास्तव लिहिले आहे. तरी हे इकडून फरिदाबादेस पाचवे साहावे दिवसी आजपासून येतील. आपण से दोनसे स्वार फरिदाबादेस पाठऊन रोकड सुधा साहुकारास लस्करात घेऊन जावे. कदाचित सैफुदीखान यासी न कलता केल्या * * * * डसा असल्यास त्यासहि स्वभावी रीतीने सागावे की, यैवज फरिदाबादेस आला आहे. वाटेच्या जोखिवासाठी स्वार पाठऊन घेऊन येऊ यैसे सांगोन केले तरी कार्यास येईल. यैवज तो सरकारात द्यावयासी आणिलाच आहे. परतु अढलले वर्तमान कलावे म्हणोन लिहिले असे. सेफुदी मा।खानाकडे यैवज आधी घेऊन

जाईन यैसे तख्तमल बोलला. याजमुळे दिकत मनात आली म्हणून तावडतोब कासीद पाठविला आहे. मर्जीस येईल तसे करावे. बहुत काये लिहिणे? लोभ असो द्यावा हे विनंती.

¶*The writer makes suggestions about the safe remittance of money from Agra.*

No. 89] [*1-4-1758*

श्री

सुलतानजी चितलकर दिा राजश्री जनकोजी सिंदे याच्या पथकांतील राऊत सालमाार सन समानात नालबंदी घेऊन मोहिमेस सिंद्याचे स्वारीसमागमे न जाता पळून मौजे कुसमोंडी पाा पाटोदे येथे जाऊन राहिले अहेत. त्यास येथून सयाजी चितलकर दिा माारनिले पाठविले आहेत. तरी तुम्ही मौजे मजकुरीहून येणे प्रमाण असामी बितपसील नावनिसी :

१ सोयेराजी सातपुता

१ सोनजी गोरा

१ पिलाजी उगला

१ हुसनखान नगारची

४

चौऊ आसामी यास बोलाऊन नालबंदीच्या यैवजाचा निकाल करून घेऊन यैवज सयाजी चितलकर याचे पदरी घालणे म्हणून पाटोदेकर कमाविसदाराचे नावे पत्र येणेप्राा द्यावयाची अज्ञा जाली.

लिहिणे.

छ २२ रजब सुाा समान खमसैन मया व अलफ.

¶*The Kamavisdar of Patode is ordered to get the advance refunded from four troopers who, having deserted, were lurking in a village under his jurisdiction.*

2667

No. 90] [May 1758

पो छ १० माहे

यांसी शाहारीहून

विनंती उपरी. औरंगाबादेहून आजी बातमीचा कासीद आला. पाच रोज शहर सोडून जाहाले. त्यास बातमीचे वर्तमान नवाब सलाबतजंग यानी निज्याम आलीखान यास हैदराबादेची सुभेदारी दिल्ही, वस्त्रे दिल्ही. त्याउपर आपण निघून रोज्यास गेले. मागे काये सूत्र खेलविले होते न कळे. हैदरजंग फिरंगियाचा दिवान स्वार होऊन निज्यामआलीखानाच्या डेरियास गेला आणि त्यास सांगितले जे, मुसाभुसी फिरंगी यानी तुम्हास जरूर कार्यास्तव बोलाविले आहे. याच वख्ती चालावे. त्यास निजामआलीनी उतर दिल्हे जे आजी आपणास रोजा आहे. उदैक सलाबतजंग स्वारीहून येतील, उप्रांतिक लक्ष प्रकारें भेटीस येईन. त्यावर हैदरजंगानी सख्तीचा जाबसाल केला कीं, आबरू दरकार आहे तरी यासमईच चालणे. तेव्हा त्यास कृत्रीम कारभारसा कळोन हाती निमच्या होता त्याने त्याच वेलेस हैदरजंगावरी वार केला. येका दो वारानें पुरे जाले. विठलपंत निज्यामआलीचे कारभारियानीं लागलेच हैदरजंगाचे डोचके कापिले आणि कनात चिरून दोघेहि बाहेर पडिले आणि स्वार होऊन ... . खंडागल्यानी .... धवरायांच्या .... (नि)ज्याम आलीनी बसालतजग ...... मान सांगून पाा जे, आपण तों या प्रकारे गेलो. मागे तुम्ही खबरदार राहाणे. तेव्हां बसालतजंगानी तमाम मऱ्हाटे वगैरे फौज तीन च्यार हजार जमा करून मुसाबुसीच्या डेरियास आले. तों त्यानी हैदरजंगासाठी बहुतसा अतिशये केला. टोपी पटकून दिल्ही. त्यावरी बसालतजंग यानी बाह्यात्कारे त्याचे समाधान केले आणि त्यास मंत्र सागितला जे इतक्या कलहास कारण शहानवाजखान आहेत. त्यास आत:पर ठेऊ नये. तेव्हा त्याचसमई मुसाबुसीनी लछमन दुभाशा यास बोलाऊन सागितले जे शानवाजखान पुत्रांसमेत साफ करावा व मीर महम(द) हुसैनखान यासहि विल्हे लावावे ; त्यावरून तात्काल त्याने जाऊन दोघां पुत्रांसमेत शाहानवाजखान व मीर महमद हुसैनखान येऊन चौघे जण विल्हे लाविले. त्याउपरी निज्यामआलीस समजाऊन आणूं म्हणौन बसालतजंगानी मुसाबुसीस सागून उभयेता स्वार होऊन फौजसमेत कोसभर गेले. तो निज्यामआलीनी इभ्रायेमखान गाडदी व आपला जमाव समागमे घेऊन

2668

टाकोटाक फुलबरीस गेले. मग फिरोन माघारे आले. शाहानवाजखान वारल्या .... त्र वाचला होता त्या .... ले ते सरकारात

(अपूर्ण)

¶*An incomplete letter reporting that Nizam Ali flared up at being insulted by Haidar Jang and cut him down on the spot. On learning this news Bussy, Haidar Jang's master, thinking Shah Nawajkhan to be the culprit, put him to death with the help of secret agents.*

No. 91] *[15-6-1758 ?*

छ १ जिल्काद

श्री

तीर्थस्वरूप राजश्री दादास्वामीचे शेवेसी

आपल्यें त्रिंबक सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा जेष्ठ शुद्ध अष्टमी मुकाम कृष्णातीर पावेतो स्वामीच्या कृपेकरून येथास्थित विशेष. राजश्री दौलतराव स्वामीकार्यावर खर्च जाहले. ईश्वरास मानले तसी गोष्टी घडोन आली. यास इलाज काय आहे ? स्वामी कृपा त्याजवर फारच करीत होते. त्याची निष्टा स्वामीचे चरणासी कसी होती स्वामी सर्व जाणतच होते. माानिल्हेचे चिरंजीव खंडेराव लेकरू लहान आहे. स्वामीसनिध आहे. त्याजवर कृपा करून शाहणा करणार स्वामी खेरीज दुसरे कोण आहे ? स्वाम मायबाप खावंद आहे. त्या मुलांचे दुख दूर करणार स्वाम समर्थ आहेत. येविसी सेवकाने विस्तार काय ल्याहावा ? सर्वज्ञ स्वाम आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Trimbak Sadashiv Purandare to Raghunathrao Dada, recommending to his notice Khanderao, son of Doulatrao, who had fallen in battle fighting. Further information about this Doulatrao and the engagement in which he perished is required.*

No. 92] *[1-11-1758 ?*

पाा छ १४ रावल

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री दादा

साहेबांचे शेवेसी

विनंती शेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना यैसीजें. सेवकाचें वर्तमान ताा छ २९ सफरपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून कुषल असे. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाल्यानंतर झांसीचे मार्गे देशोदेशें आलों

तमाम ठाणी वोडसे व दतिया व भदावर व कछुवाधार मिळोन ठाणी पाऊणसे गढी आठ रोजांत सरंजामसुधां खाली करून दिल्ही. तदनंतर किले झांसी व करेरा जकिरेसुधां व सरंजामसुधां हवालां करून रसीद घेतली. तमाम माहालो माहालचे कमावीसदार व जमिदार बोलाऊन बाकी रुजू करून दिल्ही व साल मजकूरचा वसूलहि रुजू करून कमावीसदार याच्या विद्यमानें दिल्ही, त्याप्रमाणें राजश्री माहादाजी गोविंद याचे जाब घेऊन कमावीसदार त्यांचे हवाले केले. कंमेबेश[१] समजोन देतील. कोणे गोष्टीचा गुंता राहिला नाही. चुगलानी भराच्या गोष्टी सांगितल्या; त्यावरून आम्हांवरी इतराजी करून मामलत काढिली. अम्हांस खावंदाची आज्ञा प्रमाण. परंतु परिणामी तऱ्हीं स्वामीस कळेल. सेवक लोकानी परिहार कोठपर्यंत करावा? ईस्वराप्रमाणें खावंदास जाणौन येकनिष्ट भावें सेवा चाकरी केली. आपणहि मजवरी कृपा अतःकर्णापासून करीत असतां मध्यें विघ्न जालें. होणार तें चुकत नाही. परंतु आपण अभयवचन दिल्हे, त्या भरवसियावरी राहिलों. पुढेंहि स्वामीच्या अभयाचा भरवसा आहे. येते समई दोन महिनियाची आज्ञा देऊन, मुलें माणसें ठिकाणी ठेऊन, लोकांची समजाविसी, नालबंदीचा गवगवा दूर करून सेवेंत राहावें यैसें मानस असतां, नाना प्रकारें स्वामीच्या मनांत पेंच लोकानी अणोन, अमची कडेलोट केली. तर मजला स्वामीचे चरणासिवाय आश्रय नाहीं. जे आज्ञा होईल, त्याप्रमाणें वर्तणूक करीन. येतेसमई श्रीमंतास आपण पत्र दिल्हे; तें रागाचें दिल्हें. तरी यैसे न करावें. स्वामीची सेवा केली; त्यास यैसी फळें नसावीं. कृपा करून देशासच जावयाची आज्ञा जालीच तरी, श्रीमंतास पत्र ममतापुरस्कार ल्याहावें. श्रीमंत कृपा करीत तें करावें. नाहीतरी चरणापासीं ठेऊन पोटास द्यावें. पांच सा लाख रुा गोसावियांचे कर्जदार जालों. सेवटीं ठिकाण नाही यैसें जालें. तरी आपणासिवाय कृपा करणार कोण असे ? उतराची अज्ञा करावी. राजश्री माहादाजी गोविद यांचे पत्र पाठविले आहे. त्यावरून ध्यानास येईल. लोकानी नाना प्रकारें भास घातलें. परतु स्वामीनीच कृपा केली. त्याच प्रमाणें सेवकाने निखालसपणें ठाणी हवाला करून तिलमात्र दुसरें दाखविलें नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Shankar to Dadasaheb, narrating the endeavours that he made to collect the dues from the Zamidars of the provinces in the north, e.g., Jhansi, Datia, Orchha, etc., and in bringing them under his subjection. Further on the writer complains against some people at home who are trying to ruin him by reviling him before the Peshwa. The writer however expresses his perfect reliance on the good sense of the Peshwa.*

---

१ कंपेश = कमीअधिक.

2670

No. 93] *[6-12-1758*

श्रीराम

यादीदास्त पत्रे पाहिजेत. सुा तिसा छ ३ राखर

सजनगड येथे श्रीरामदासस्वामी याचे स्थली मठचे व श्रीदेवसंनिध उपाधेपण वेदमूर्ती रा दिवाकरभट माहाबलेस्वरकर याचे श्रीमंत माहाराज राजश्री कैलासवासी संभाजीराजे ता श्रीमंत माहाराज राजश्री शाहू माहाराज याचे कारकीर्दीपावेतो श्रीचे संवस्थानी मठांदिपती राजश्री गंगाधर गोसावी याचे वेले चालत आले आहे. याप्रमाणे भोगवटियाची राजपत्रे आहेत. प्रस्तुत राजश्री लक्ष्मण गोसावी याचे वेलेस श्रीचे वाड्यात पिंपल आहे, तेथे सोमवतीस आस्वथाची पूजा होत आहे. मठातील बायेका येजमानीनपासून सर्व बायेका आसतील त्याणी आस्वथपुजा व व्हाणे समर्पितलि तो अंऊस आमचे वडील व आम्ही घेत आलो. गड मजकुरी व्रितिवंत जोसी यास घ्यावयास संमध नाही यैसे चालत आले आसता प्रस्तुत कजियां जोसी मजकुर करितात यास ताकीद पत्रे स्वामीनी द्यावयाची आज्ञा करावी: येणेप्रमाणे;

सजनगडचे मुद्राधारी भवानजी जाधव यास व जोसी माणको मोरेश्वर यास यैसे दोन ताकीदपत्रे द्यावयासी आज्ञा करावी.

दिवाकर भट मठचे उपाधे याचा व जोसी याचा अस्वाथाजवलील सोमवतींचे उत्पनाचा कजिया आहे. त्यास शाहूमाहाराजाचा वेलेपर्यंत उपाधीक दिवाकरभट घेत आले. त्या आलीकडे जोसी नवीन दाहा वर्षे कजिया करितात तो न करणे; सुदामत दाहा वर्षापलीकडे चालत आले असेल तेणेप्रो चालो देणे; लटका कजिया न करणे म्हणोन परलीकर हवालदार यास व जोसी यास यैसी दोन पत्रे द्यावी. परवानगी जाली असे.

छ ४ रबिलाखर मार्गशीर्ष सुा तिसा खमसैन मया व अलफ.

¶*This paper contains the plaint, the decision and also the order in the case of the rights of Upadhyegiri of Divakerbhat Mahabaleshwarkar in the Ramdas Math at Parali.*

No. 94] *[11-1-1759*

पौ छ १९ जौवल

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी

सेवक त्रिंबक सूर्याजी मुा जवार सां दंडवत विनंती. येथील कुशल वर्तमान ता छ ११ जावलपावेतों आपले कृपेकरून संतोषरूप असे विशेष. राजश्री

बाळजीबावाबरोबर पत्रें पाठविलीं तीं व जवारचे गडीच्या सनदा पाठविल्या त्या पावल्या व मारनिलेनीं मुखोतर सांगितलें तें कळलें. ऐसियासि आपले आज्ञेप्रों नवाबांस सनद पाठविली ते दिल्ही. त्यावरून त्यानी गडी आमचे स्वाधीन केली. छ ६ जमादिलौवलें गडींत दाखल जालों. त्यासी गडींतील तोफा व जेजाला बंदुका हातेरपातेर वस्तभाव हांडेभांडे कुली नवाब घेऊन गेले. केरसुणीपासून सुईचा धागा गडींत ठेविला नाहीं. काही किरकोळ हांडेभांडे हातेरे वगैरे गडी फते जाल्यावर गडींत नवाबानीं ठेविलें होतें ते देखील राजश्री विष्णु हरि यांचे विद्यमानें घेऊन नवाब गेले. गडी खालीं करून भिताडें मात्र आमचे स्वाधीन केलीं. ऐसियासी गडीचा विचार आहे. तरी येविसींची आज्ञा करणार स्वाम आहेत. स्वारीबरोबर गारदी व लोक आहेत त्यांसी खर्चावेंचाची तंगचाई बहुत जाली आहे. येविसीं पेशजी सेवेसी लेहून पाठविलेंच होते. हाली सेवेसी लिा आहे. तरी स्वाम कृपाळु होऊन खर्चाची बेगमी करून पाठविली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Trimbak Suryaji informs the Peshwa Balaji Bajirao, that he had taken charge of the fortress of Jawar from the Nawab who, the writer complains, removed everything, including guns and muskets, from the fortress when he evacuated it.*

No. 95] [?

श्री

राजश्री भाऊसाहेब गोसावी यांसी

श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित लक्षधीर दळपतराऊ दंडवत विनंती. येथील कुशल तागाईत माघ वद्य ५ पंचमीपर्यंत साहेबांचें कृपेकरून येथास्थित असें विशेष. कृपा करून आज्ञापत्र पाठविले तें पावोन बहुत संतोष जाहाला. याचप्रकारें अहिर्निसी पत्रीं परामर्ष करावा विहित आहे. यानंतर पत्रीं आज्ञा कीं, जमावसुधां सत्वर येऊन पोहचणे. यैसियास आमचे शरीरीं सांप्रत सावकाश नाहीं. सीतज्वराची वेथा प्राप्त जाली आहे. याजकरितां चिरंजीव राजश्री करामतजी सेवेसी जमावसुधां पाठविले आहेत. येऊन पोहचतील. आमचे सर्व वर्तमान सेवेसी मुखवचने निवेदन करितील त्याजवरून अवगत होईल. वरकड आम्ही सर्व प्रकारें पदरचें आहों. चिरंजीवाविसीं विस्तारें ल्याहावें यैसे नाहीं. सर्व प्रकारें आमचा अगत्यवाद साहेबांस आहे. यावर राजश्री कुसाजी देशमुख दिंडोरकर यांस आज्ञापत्र साहेबीं पाठविलें

कीं आमचे तालुक्यात कोणे गोष्टीचा उपद्रव न करावा. यैसियास आज्ञेप्रमाणे मारनिलेस पत्र प्रविष्ट केले. परंतु त्याचे चितांत फारसा गुबार आहे. सिनरकर ग्रहस्तासीं सख्य करून त्याणीं याणीं मिळोन आम्हासीं हर्षामर्ष वाढवावा यैसे त्याचें मानस आहे. याचे साद्यंत वर्तमान मागाहून सेवेसी लेहून पाठऊ. त्याप्रमाणें पारपत्य करणार खावंद समर्थ आहित. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Lakshadhir Dalpatrao writing to Sadashivrao Bhau regrets his inability, owing to ill-health, to present himself for service personally and so, he adds, he has sent his son with a contingent.*

No. 96] [*26-4-1759*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री आपाजी गणेश
स्वामी गोसावी यासी

पो बालाजी बाजीराव प्रधान विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असिले * * * पाा सुत राजश्री जनकोजी सिंदे याजकडे आहे. त्यास बासवाडेकर राजा येऊन सुतच्या जमीदारासी लढाई केली. तेव्हा सेख मूर्तजा नवे किलेदार पायागडास सिंद्यानी पाठविले ते त्याचे पारपत्यास गेले. याची त्याची लढाई होऊन यास धरून सुतचे किल्यात कैद करून ठेविले म्हणून (लिहिले) ऐशास तुम्ही आपलेकडील कमाविसदारास लेहून पाठऊन तिकडील वर्तमान * * णे. किलेदार खाली उतरला तो कैद जाला; तेव्हा किले मजकूरचा बंदोबस्त कसा आहे? सेख मूर्तजाची सुटका जाली न जाली ते सविस्तर लेहून पाठवणे. जाणिजे छ १७ शाबान सुाा तिसा खमसैन मया व अलफ. राा कृष्णाजी अनंत गिरासियाचे बंदोबस्तीस तिकडे राहिले. त्यास पायागडास जावयाची आज्ञा केली आहे; त्यास खर्चास दहा वीस हजार रुपये लागतील ते देणे. जाणिजे छ २८ साबान. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Balaji Bajirao directs Apaji Ganesh to take measures to seek the release of the Killedar of Payagad who has been made prisoner by the Chief of Banswada.*

No. 97] [*27-4-1759*

श्री

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री कृष्णाजी अनंत गोसावी यासीं

सेवक बालाजी बाजीराव प्रधान * * सुाा तिसा खमसैन मया व अलफ. तुम्हीं विनंती पत्र पाठविले ते * * राजश्री नानाचे पत्र वसईहून आले कीं

कूच करून येणे. त्याजवरून पागा राजश्री आपाजी गणेश याचे कारकुनाचे हवाली करून येक दोन पागा व सिलेदार घेऊन येत असो म्हणून पिंपलनेरच्या मुकामीहून लिहिले ते कलले. ऐशास बाबूखान पायागडास किलेदार होते त्यास राजश्री जनकोजी सिंदे याणी तगीर करून सेख मूर्तजा किलेदार पाठविला तो जाता मार्गी पाा * * * थे बासवाडेकर लोकाचा कजिया होऊन सेख मूर्तजा धरिला म्हणून पेशजी तुम्ही लिहिले होते व परभारेहि लिहिले आले. त्यास बाबूखान अगोधरच किल्यावरून उतरोन डबईस गेले. याजमुले किल्यावर लोक आहेत ते बेदील जाले आहेत. तेथील बंदोबस्त जाला पाहिजे व सेख मूर्तजाची सुटका जाली पाहिजे. याजकरितां तुम्हासच जावयाची आज्ञा करावयाची होती परंतु तुम्हीं घाट चढोन आलेत. त्यास पागा राजश्री आपाजी गणेश याचे हवाली केल्याच आहेत. त्यास तुम्ही लेहून पाठवणे कीं पायागडास जाऊन सेख मूर्तजाची सुटका होऊन किल्यावर चढवणें. त्याचा बंदोबस्त करून देऊन मग आपाजी गणेश याजकडे येणे. इतक्यात त्याची सुटका होऊन किलादाखल जाला असिला तरी उतम जाले; नाहीतरी सत्वर जाऊन बंदोबस्त करून देणे. याप्रो लेहून पाठवणे. जाणिजे छ २९ शाबान. तुम्ही आपला शाहाणा कारकून पाठवणे. त्यास याप्रो माहीत करून पागा त्याणी घेऊन जावे. सर्व बंदोबस्त करून मग यावें. ऐसे करणे. जाणिजे छ मार आज्ञा प्रमाण.

लेखन
सीमा.

¶*The Peshwa orders Krishnaji Anant to send an army with Apaji Ganesh and thus to effect the release of Shaikh Murtija, who was appointed Killedar of Payagad.*

No. 98] *[27-8-1759*

श्री

राजश्री चिंतो नारायण कादार
पा नसिराबाद गोसावी यासीं

सुहुर सन सितैन मया व अलफ बाा देणे मुजफरखान गाडदी यांस सालगुदस्ता जवारप्रांते कोलियाचे पारपत्यास पाठविले, त्यासमई स्वारीत खर्च जाहाला. त्यापैकी रुपये १००० येक हजार तुम्हाकडे साल मजकुरचे रसदेचा

यैवज येणे; त्यापैकी सदरहु येक हजार रुपये देविले असेत. पावते करून पावलियाचे कबज घेणे. जाणिजे छ ३ मोहरम.

बार

लिखतं मुजफरखान गाडदी सदरहु वरातेप्रमाणे रुपये भरोन पावलो. मिा मजकुर गुा सदासिव लक्षुमण जोगलेकर.

¶*A sum of one thousand rupees is granted to Muzafarkhan for putting down the Koli rising in Jawar and his receipt obtained.*

No. 99] *[26-9-1759*

श्रीभीमशंकर

शेवेसी माहादाजी राम कानिटकर विज्ञापना यैसीजे. श्रीच्या क्षेत्रीं भोंवतालील आरण्य दक्षणेंकडे श्रीचे क्रीडावन पूर्वेकडे व्याघ्रारण्य व कुशारण्य उतरेकडे श्रीआईचा हिंदोला तीर्थं आदिकरून आरण्य परम सुखावह शोभायुक्त नाना प्रकारची जानवरें व नाना प्रकारचे पक्षीकुले आदिकरून संकीर्ण राहातात. त्यास प्रांतस्थ देशांतील सूद्र येऊन झाडी तोडतात. त्यास ताकीद कीं श्रीदेवाचे पूर्वेस धुपराहीपलीकडे, दक्षणेस क्रीडावनापलीकडे, उतरेंस श्रीदेवीच्या राईपलीकडे, झाडे तोडावीं. आलीकडील झाड श्रीच्या क्षेत्रस्थ उपयोगासिवाये कोणी तोडील, त्याचे पारपत्य बरे वजेन केले जाईल म्हणोन ताकीद पत्रें येणेप्रमाणें :

१ रामचंद्र कृष्णराव यांस

१ मुकदम देशमुख वगैरे भीम नहरकर यांस

२

येकूण दोन ताकीद पत्रें द्यावयाची आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. दोन पत्रे द्यावी देणे.

छ ४ सफर आस्वीन सितैन

¶*Mahadaji Ram Kanitker requests the Peshwa to issue orders to Ramchandra Krishnarao and all Mukadams and Deshmukhs not to fell trees in the province round about Bhimashanker.*

2675

No. 100] [26-9-1759

श्रीभीमशंकर

शेवेसी माहादाजी राम कानिटकर विज्ञापना यैसीजे. श्रीच्या क्षेत्रीं जनावरे निस्प्रह सांबरेआदिकरून राहातात. त्यास भोंवरगांवकरी येऊन नाहक त्याचा वध करितात. याजकरितां ताकीद कीं तीन कोश श्रीभोंवताली पारध येकंदर करूं नये म्हणून ताकीदपत्रें रामचंद्र कृष्णराव यांस व भोंवरगांवकरी यास पेशजी दिल्हीं. कोंकण प्रांत कल्याण येथील सिदगड व कोथला नजीक आहेत ते येऊन पारध करीत आसतात. त्यास ताकीद कीं, श्रीच्या पर्वतावर पारध करूं नये. करील त्याचे पारपत्य बरे वजनें केले जाईल म्हणोन पत्रें:—

१ किले सिदगडकरी यास
२ किले कोथला

येकूण दोन पत्रें द्यावयाची आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत.—दोन पत्रे द्यावी.—देणे.

छ ४ सफर आस्विन सितैन

¶*Mahadaji Ram prays that orders be issued prohibiting the hunting of Sambhar and other animals on the sacred hill of Bhimashankar.*

No. 101] [3-10-1759

श्री

सेवेसी जोती माली खानाजाद कृतानेक विज्ञापना यैसीजे. कैलासवासी माहाराजांचे कारकीर्दीस मजला दरमाहे रोजमुरा रुपये ३० व दाणे ८१ येक मण खेरीज वस्त्रे व कसबे कऱ्हाड येथे जमीन चावर ·॥· निम होती. त्याजपैकी सांगोल्याचे साली जमीन मात्र करार करून दिल्ही. त्या जमिनीविशी ताकीदपत्रे येकदोन वेला दिल्ही. त्यास, हाली राजश्री दाजीपंत व राजश्री गमाजीबावा नाना प्रकारे उपद्रव करितात. त्यास स्वामींनी कृपाळू होऊन ताकीदपत्रे

१ राजश्री दाजीपंतास
१ राजश्री गमाजीबावास
—
२

येकून दोन पत्रे द्यावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत.

अंद[1] चावर जमीन पहिल्यापासून चालत असेल त्याप्रा चालवणे म्हणून दोन पत्रे देणे.

छ ११ सफर सितैन आश्विन

लिहिणें.

¶*Joti Mali seeks orders from the Peshwa prohibiting Dajipant and Gamajibawa from obstructing him in the due enjoyment of his inam land.*

No. 102] [*31-10-1759*

श्री

चिरंजीव राजश्री सदासिव चिमणाजी यांसी बाळाजी बाजीराव प्रधान अशिर्वाद सुा सितैन मया व अलफ जानो मल्हार देशपांडे पाा फलटण यास गोत्रवध जाला होता याकरितां धर्मशास्त्रमते प्रायश्चिताचा निर्णय करून मौजे कोयेली तोा चाकण प्रांा जुनर येथे पूर्वांग प्रायश्चित करून श्री ची यात्रा व सेतुस्नान पाठविले होते त्या प्रो सेतुस्नान श्री ची यात्रा करून हुजूर आले आणि उतरांग प्रायेश्चित देऊन मुक्त करून पंक्तीपावन करावे म्हणून विनंती केली. त्याजवरून मौजे मजकुरी उतरांग प्रायश्चितास जानो मल्हारीस पाठविले असत. तरी तुम्ही आपलेकडील कमाविसदारास ताकीद करून याजसमागमे कारकून व माणसे बोा देऊन किरकोळी साहित्य द्रव्यविवर्जित लागेल ते देऊन यास प्रायश्चित देवणे. जाणिजे छ ९ रबिलोवल बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa inflicts penance by way of punishment, upon Jano Malhar Deshpande who had committed homicide.*

No. 103] [*7-11-1759*

श्री.

यादी साहित्यपत्रें बिदनुरकरास छ १६ रबिलौवल सितैन कार्तिक. पूर्वी चंदीचे मोकामीं कैलासवासी माहाराज राजाराम साहेब याणी वसुधेंद्र स्वामीच्या मठास जडित शेषफणी व छत्री व पदक वगैरें दागिने सात श्रीदेवानिमित्य दिलें. त्यास सोमशेखर नाईक याचे कारकिर्दीस पाहावयास नेऊन दागिने परतून

---

१ पत्राच्या खालील हा शेरा खुद्द पेशव्याचे हातचा आहे.

न देतां संस्थानीं ठेविले म्हणून विदित जालें. ऐशीयास श्रीदेवाचे दागिने अपहार करणें उचित नव्हे. हालीं लिहिलें जातें कीं सदरहु सात दागिने श्रीस्वामीचे स्वाधीन करणें. दागिने सरकारचे आसेत. ठेऊन न घेणें म्हणून पत्रें.

१ संस्थानिकांस
१ बाळाजी देवराव
१ नरसापा नाईक कलकेरी
१ कारबारी संस्थान मजकूर
—
४

येकूण च्यार पत्रें द्यावयाचीं आज्ञा देणें.
लिहिणें.

¶*The Peshwa orders Somshekhar Naik of Bednur to restore the ornaments presented by King Rajaram to the Vasudhendra-swami which the Naik has misappropriated.*

No. 104] [*12-11-1759*

पौ छ २६ जमादिलोवल
सितैन बुधवार

श्री

श्रीमंत राजश्री बावा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना. येथील कुशल ताा छ २१ रबिलोवल पर्यंत सेवकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान येथास्तित असे विशेष. पत्र पाठविले ते उतमसमई प्रविष्ट होऊन लेखनार्थ सिरसा वंदिले. त्यांत भाव कीं पेशजी सेवकाकडे दोनसेहे स्वाराची सिबंदी नेमणूक होती. हाली राजश्री गोपाळरावजी या प्रांती आल्यावरी सिबंदीपैकी पनास स्वार करार करून त्याची सनद दिली आहे. इतकी कमी जाहली. यावरी निभाव नाही म्हणऊन सेवेसी विनंतीपत्र लिहिले असतां पत्रीं आज्ञा केली कीं, राजश्री गोपाळरावजीनी जे प्रमाण केले तेच प्रमाण त्या लोकाकडूनच काम चालवणे. जास्ती लोक ठेऊन सिबंदीखर्च न करणे म्हणऊन; तरी हे मुलूक काटक

मैसूरकराचा. अर्थांतर लागलेच आहे. आणि घोरपडे याचें उपद्रव तो लिहिता पुरवत नाही. यासिवाये बेडर व किरकोळ पाळेगार लबाडी करीतच आहेत हे जाणून मुलुकाचे बच्याव करीत जावे आणि आपले आब राखावे. गाव खेडेवरी हर कोण्ही येऊन लबाडी केलिया केवळ बाहेर न पडतां किलेत बैसलिया कोणेप्रकारें रयेतीचा बच्याव होईल. मानमार्ग पाहून पारपत्य करावेच लागते. हैसाकरितां सिबंदी ठेविले नाही. सरकारचे प्रयोजन हरतरतुदीने होऊन आब राहावे यैसा मजकूर आहे. कदाचित पनास स्वारानसी या प्रांतीचे बंदोबस्ती करून सरकारचे प्रयोजन करितो म्हणऊन स्वामीचे सेवेसी कोण्ही विनंती केली असतील तरी बहुत उतम आहे. सरकारचे किफायेत करणाराकडून सेवा घेणेचें स्वामीस युक्त आहे. आम्ही सिबंदी जास्ती ठेऊन सरकारचे लुकसान करणार यैसे चिती असलियां आपले सेवेसी बोलाऊ घ्यावें. समये येऊन यैसा पडतो जे, च्यारसेहे स्वाराचाहि निभाव दिसत नाही परंतु तेसमई धण्याचे पुण्य सामर्थ्यें हरतरतूद करून चौकडील कुमक आणऊन इबरतीनेच कालक्षेप करीत जातो. तोहि मजकूर परस्परे सेवसी श्रुत होत अ(स)ल. राजश्री गोपाळ गिरिधर याचें मजकुरास आज्ञा केली की, त्याचे नावी ताकीदपत्र सादर केले आहे की, सागितलेप्रा वर्तणूक करणे अथवा वर्तणूक न केलिया हुजूर उठून येणे म्हणऊन सेवकाचे नावी पत्री आज्ञा केली की, ताकीदपत्र लिा आहे त्यास माकूल करून कामकाज घेणे परंतु मामिला काहाडून हुजूर लाऊन न देणे म्हणऊन. यैसियास राजश्रीस पेशजीपासून सरकारचे कैद व सनदी मजकूर किती प्रकारें सागितलें तरी मानीत नाहीत. मुलुकांत नस्ते फितूर घालणे आणि बखेडा करून यैवजाचा खलील केले ते मजकूर किती म्हणऊन पत्री दर्शवावे ? त्यावरून त्यास मामिलेतून काहडिले. कदाचित त्या प्रांतीचे काजकाम त्यास सागावे यैसी मर्जी स्वामीची असलियां मामिलत दुई पडून खालील होत आहे. तेथील काम त्याजकडूनच घ्यावे परंतु सेवकास सरकारची समजाविसी आणि त्याजकडून काम घेणे हे दोनी गोष्टी पुरवत नाही. त्यास मामलेतून काहाडिलेसिवाय बंदोबस्त होईनासें जाहाले त्यावरून राजश्रीस काहाडून बंदोबस्ती केली आहे. याउपर जैसी आज्ञा होईल त्याप्राा वर्तणूक केले जाईल. श्रीमत राजश्री दादासाहेबासमागमे आपण हिंदुस्तानाकडील बंदोबस्तीस जाणार म्हणऊन वर्तमान कळले. सेवकास पेशजी या मामिलेत स्वामीनी ठेऊन आजी-पावेतो सरकारांत बरे वाईट तमाम जाबसाल करून अज्ञास आज्ञा केलेप्रो वर्तणूक करीत होतों. हाली स्वामीचें जाणें तिकडे जाहलियां आम्ही कोणासी

2679

जाबसाल करावें ? दरबारचे विचार आपले चितास श्रुत आहे. यैसियास आपणाकडील इतबारी कोण्ही मोकरर करून आमचे जाबसाल तमाम आपले आंगावरी घेऊन दरबारी जे काय बोलणे ते बोलून आमचे कार्यभाग विलेस लाविजेसे योजून ठीक करून लेहून पाठवावे अथवा ते गोष्टी न करितां परभारें दरबारांत पाहून घेणें म्हणऊन आपली मर्जी असलिया हे गोष्टी, सेवकाकडून पुरवत नाही. आपणाजवली बोलाऊं घ्यावें. हाली सरकारचे रसद हुंडी भुकणजी कासिदास याचे गुमास्तेचे नावी करऊन पाठविली आहे त्याची पुरवणी आलाहिदी आहे त्याजवरून सेवेसी श्रुत होईल. कोलार प्रातेहून होसकोटेस आल्यावरी सिबंदी पनास स्वार व पागेकडील बारगीर पनास येकूण शेभर स्वार मात्र करार करून वरकड बरतर्फ केले. आवंदा हा दिवसानंतरे आणखी बाहेर निघणेचा प्रकार आहे तेसमई शंभर दीडसेहि स्वार ठेवावे लागल. वरकड सविस्तरें वर्तमान श्रीमत राजश्री साहेबाचे पत्री विज्ञाप्ती केली आहे त्यावरून चितास आणून जाबसाल समर्पक करणार स्वामी समर्थ आहेत. स्वामीनें येथे आम्हास ठेविल्यापासून जाहाली सेवा ते जिवाम्येश्रमेकडून केली. कारण दरबारी कैसाहि प्रसंग पडलिया आमचा निभाव स्वाम करितील हा भरवसा पूर्ण मानोन उमेदीनें चाकरी केली. पुढे आपण हिंदुस्थानात जाणार. आम्हास काये आज्ञा करिता ? दरबारी हरयेकविसी आमचे तर्फेन जाबसाल करणार कोण ? येविसी आज्ञा केली पाहिजे. सारांश आमचा निभाव होऊन आपणास कीर्ति येई ते करणार स्वाम समर्थ आहेत. बहुत काये लिहिणे ? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat protests against the reduction of his force ordered by the Peshwa and maintains that his present numbers are necessitated by the peculiar nature of the country which he had to administer. He further says that he would prefer to be at headquarters with the Peshwa to serving in his province against such odds.*

No. 105] [*1760 ?*

श्री

राजश्री नानासाहेब गोसावी यासी

श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्री जोत्याजीराऊ पाटणकर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकुशल लिहीत अज्ञा केली पाहिजे विशेष. साहेबी अज्ञापत्र पाठविले ते उतमसमई प्रविष्ट होऊन परम संतोश जाहला. तेथ अज्ञा की, पाटणात बहुत दिवस न राहणें,

सत्वर घरास जाऊन दसरा होताच स्वार होऊन येणे. यैसियास पाटणाकडे जाणे जाहले नाही. परभार इकडेच आलों. इकडील गलाटा जाहला तो पत्री लिहिता येत नाही. वडील होत तो कोणे गोष्टीची फिकीर आम्हांस नव्हती. अम्ही जेऊन मात्र असावे. ते ईस्वराच्या चितास अले नाही. आता वडिलांच्या जागा साहेब आहेत. तेणेकरून अम्ही बेफिकीर आहो. सर्व गोष्टीचा अभिमान साहेबासस आहे. पाटणात चिरंजीव भिवाजी पाटणकर ठेविले आहेत. तेथील भावाबंदाचा मजकूर आहे तो साहेबास विदित आहे. त्याचा हरयेकविसी पुस्तपना[१] करणार साहेब खावंद आहेत. अम्ही प्रसंगी नाही यास्तव सेवेसी सूचनार्थ लिहिले असे. वडिलाप्रति विशष काये लिहिणे? आज्ञेप्रमाणे स्वार होऊन सत्वरच येतो. दुसऱ्या पत्राची वाट पाहत नाही. दसरा करायास साहेबापासी येतो. परंतु येथील गलाटा[२] बहुत जाहाला त्याची बंदोबस्ती करून सत्वरच येतो. अम्हास सर्व प्रकार भरवसा आपल्या पायाचा आहे. येकनिष्ठपण सेवा करावी. दुसरा अर्थ जाणत नाही. बहुत काये लिहिणे, कृपा निरंतर असो दीजे, हे विनंती.

¶*Jotyajirao Patankar assures the Peshwa that, as desired, he will join him without delay.*

No. 106] [*1760*

श्री

सेवेसी विज्ञाप्ति. बंगाल्याचें कापड जिनस तिवटें, सेलें, जामेवार, मळमल वगैरे जिनस खाशा पोशाकाची जरूर फर्मास करून आणून पाठवणें व तेथें असतील तरी पाठवणे म्हणून आज्ञा. येसियास लिहिल्याप्रों बंगाल्याची सनगे खाशा पोशागायोग्य येथें अगदी नाहीत. बंगाल्यात फर्मास करऊ * * * * *. तरी त्या स्थली अमचे तर्फेचा (अपूर्ण)

¶*Clothes are ordered for the Peshwa from Bengal.*

No. 107] [*1760 ?*

पो छ ६ राखर

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक माणको बलाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपर. येथील वर्तमान ताा छ ९ राखर जाणून स्वकीये कृपेदृष्टीकरून येथास्थित असे.

---

१ पाठपुरावा. २ हाल, संकट, घोंटाळा.

यानंतर स्वामीनी सदाराम परदेशी याजबराबरी पत्र पाठविले ते त्यांत लिहिले जे, बाकीचा कर्डेरांजणगावचा जेष्ठमासपैकी हशियाचे ऐवजी पैका राहिला, तो पाठवणे. इकडे तो बाकी मक्तियामुळे राहिली आणि स्वामीसी बेहडियाचे+ समई बोलीच केली होती कीं सेवटील हप्ता वागऊन घ्यावा. स्वामी खावंद, स्वामीस सेवकाचे विनंतीचे स्मरण न राहिले. कर्ज काहाडून रुो १२० सासेवीस सदाराम परदेशी हुजुराती व सोनजी जगदळा सदरहु रुो पाठविले असेती घेऊन उतर पाठविले पाहिजे. दरमाहाचे नेमणुकेप्रमाणें झाडियानसी ऐवज सेवेसी पावला. विदित जाले पाहिजे हे विज्ञाप्ति. दरमहाचे नेमणुकेची हिसेब सेवेसी पाठविला आहे त्यावरून विदित होईल हे विज्ञाप्ति.

¶*Manko Ballal to Bhausaheb regarding the instalment of payment of dues from Karde Rajangaum.*

No. 108] *[1760 ?*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब साहेबाचे शेवसी

विनंती आज्ञाधारक महिपतराऊ कवडे दंडवत विज्ञापना. येथील सेवक लोकांचे वर्तमान साहेबाचे कृपाकटाक्षेकडून यथास्थित असे विशेष. साहेबी कृपाळु होऊन आज्ञापत्र सादर केलें तेथें आज्ञा केली जे. गढे प्रांतीचा बंदोबस्त कैसा केला ? दर्शनास कधी येणार ? म्हणून आज्ञापत्री आज्ञा केली. सेवक लोकांस आज्ञा प्रमाण. गढे प्रांतीचा बंदोबस्ती साहेबाचे पुन्यप्रतापें केला आहे. छ २९ माहे जिल्हेजी अजनूजेस दाखल झालों. फौजेचा गवगवा आहे तो विस्तार * * सत्वरीच साहेबाचे * * स येतो. दर्शनाचा लाभ जालियावर गढे प्रांतीचे कुलवर्तमान सेवेसी विदित होईल. सेवक लोकांस सर्व प्रकारें आधार साहेबाचे पायाचा आहे. सेवक लोकांचा अभिमान धरून उर्जित करणार साहेब समर्थ आहेत. विशेषसे लिहिणे हे विज्ञापना.

¶*Mahipatrav Kavde to Bhausaheb, accepting the addressee's commands about the province of Gadha.*

+ बेहेडा म्हणजे ताळेबंद तयार करतेवेळीं.

No. 109]　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　[1760 ?

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
विसाजी कृष्ण गोसावी यांसी

सेवक सदासिव चिमणाजी नमस्कार सुा सितैन मया व अलफ ताा नगर हवेली येथील गावगंना[1] खरीफाची तर्फेरीक पेशजी हिमतखानाने करून वसूल घेतला. कांही बाकी राहिली आहे त्यास तुम्ही गावगना खरीफाची सिस्ते[2] पुन्हा करून तगादा लावितां म्हणून विदित जाहले, आशास पेशजी हिमतखानानें खरीफाचा वसूल घेतला असेल तो चौकशीने मनास आणून पैकी बाकी राहिली असेल तो वसूल घेणे. खासा स्वारी मौजे बोरी पाा करडे नजीक सिरसगांव काव्याचे, घोडनदी तीर येथे मुकामास आली. आजी गुरुवारी येथेच मुकाम आहे. उदैक कूच होऊन दरमजल नगरास येईल. रयेतीस उपद्रव तसदिया न देणे.

पाा हुजुर दादासाहेब रुबरू मोरोबा चिटिणीस.

¶*Sadashivrao forbids Visaji Krishna to recover more than the balance, due from the ryots, after deducting what was already exacted by Himmatkhan.*

No. 110]　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　[1760 ?

श्री

सेवेसी विज्ञापना. इतके दिवस गाडदी सरकारचे ढालापुढें राहात होते. च्यार दिवस आमचे मिसलेस येऊन राहतात, त्याजमुले आमचे गोटाचा फारच गल्हांठा येतो. कजिया करावा तर सरकारचे चाकर. गाडदी यानीं सरकारचे ढालापुढें राहावें. त्यांचे उजवे बाजूस प्रयोजन काय ? च्यार दिवस दाटण सोसली. लोकांचा राहावयाचा गल्हांठा बहुत होतो. सेवकास आज्ञा होईल तरी कोसावर जाऊन राहात जाऊं. आज्ञा होईल ते समई सेवेत येत जाऊं. नरसिंगराव आपले मिसलेस ढाला[3] राहुट्या देऊन राहिले होते, त्यांच्या राहुट्या व ढाला गाडदियांनी उपडोन त्यांचे जाग्यावर राहिले. ते दीडा कोसावर जाऊन राहिले. राजश्री सदासिव रामचंद्र यास जागाच राहिली नाहीं. तेही लांब गेले. सेवेसी कळावे हे विज्ञापना.

¶*The writer complains to the Peshwa of the trouble created by the Gardis in pitching camp. They should be instructed to observe the usual practice, adds the writer.*

---

१ वर्गवारी, वांटणी.　　२ शिरस्ता, आधार.　　३ निशाणें.

No. 111] [1760 ?

श्री

राजश्री सदासिवपंत
गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्य श्रीा संभुसिंग जाधवराऊ दंडवत विनंती उपर. येथील कुशल * * * स्वकीय कुशललेखन केले पाहिजे विशेष. चिरंजीव राजश्री अमरसिंगबाबा सेवेसी रवाना केले आहेत. सर्व प्रकारें सांभाल केला पाहिजे. नातवानीचा प्रसंग आहे तो आपणास श्रुतच आहे. याजकरिता सूचनार्थ लिहिला आहे. रा छ २९ माहे मोहरम बहुत काये लिहिणे? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Sambhusing Jadhavrao writes to Sadashivrao Bhau that he is sending his son Amarsingbawa for service.*

No. 112] [19-1-1760

छ ९ जाखर सितैन

श्री

राजश्री विस्वासराव पंडित
गोसावी यासी

ℒ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीा दर्याबाई निंबालकर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीयें कुशललेखन केले पाहिजे विशेष. आपणाकारणे संक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले आहेत. श्वीकार करून उतर पाठविलें पाहिजे. चिरंजीव राजश्री सरलस्कर फौजसहवर्तमान आपणाजवल येऊन पोहचले असतील त्याचे व आपले भेटीनंतर सरदारीचे वृत तपासिले श्रवण जाहालेच असेल; तो अर्थ ध्यानात आणून अभिमानपूर्वक चिरंजीवाचे सरदारी बंदोबस्त होऊन सरंजामांतील उपसर्ग निवारण होय आणि स्वरूप राहे यैसे करणार आपण समर्थ आहेत. रा छ २९ माहे जमादिलौवल. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Daryabai Nimbalker sends Sarlashker to Vishwasrao and commends him to his kind attention.*

No. 113] [13-2-1760

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक दुर्गोजी अहीरराव हवालदार व कारकून किले लोहगड जोहार व कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ जमादिलाखर पावेतो सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे अज्ञापत्र सादर जाले. तेथे आज्ञा की, मुजफरखान याचे काबिले व मुले माणसे किले मजकुरी कैदत आहेत. ते हाली हुजूर आणविली असेत. तरी मार्फजातीने[1] हुजूर पाठऊन देणे म्हणौन आज्ञा. त्याजवरून मुजफरखान याची माणसे किले मजकुरी कैदत होती ती बितपसील नावनिसी

१ हसजुदीखान मुजफरखानाचा लेक उमर वर्ष ३०
१ सलीमुलाखान मुजफरखामाचा भाचा उमर वर्ष ३९
—
२

सदरहूप्रमाणे दोन आसामी सेवेसी रवाना केल्या आहेत. हुजूर येऊन पावलियाचे आज्ञापत्र सादर करणार धनी समर्थ आहेत. हरदूंजणास हुजूर पोहचवावयासी किलाहून फतेसिंग अहीरराव याजबराबर लोक देऊन सेवेसी रवाना केले असेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

¶Durgoji Ahirrao, commandant of Lohgad Fort, reports to the Peshwa that the relatives of Muzafarkhan who were kept in custody in his fort have been sent to Poona under a strong guard.

No. 114] [9-4-1760

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बाबूराव राम स्वामी
गोसावी यांसी

पोष्य सदासिव चिमणाजी नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये लिहीत जाणे विशेष. श्रीजोगेस्वरी आंबे येथील देवीस दागिने सुमार

१ पालखी

---

१ काळजीनें, व्यवस्थेनें.

१ चवरी
२ मोरचेले
—
४

येकूण च्यार दागिने देविले असेत, तरी सदरहू च्यार दागिने तयार करून पावते करणे; रा छ २२ साबान सुा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Sadashivrao orders some articles to be prepared for the Jogeshwari at Ambe.*

No. 115] [*22-4-1760*

रा दप्तर फडणिसी

श्री

चिटणिसी पत्रें माहे रमजान सुा सितैन मया व अलफ छ ५ रोज मंगलवार वैशाख दफातें

पत्रे

१ त्रिंबक सूर्याजी यास पत्र सन आर्बा खमसैनात तुम्ही सुरतेचे स्वारीस गेला ते समई कर्ज घेतलें, त्याचे मखलासीचा हिसेब व कर्जाचा हिसेब गुजारतवार माहितगार कारकुनाबा हुजुर पाठवणें व सन सीतामध्यें तुमचे खासगत राऊत करार केले त्याचाहि तैनात जाबता हुजुर पाठवणे म्हणून.

१ प्रा बेलापूर येथील बेगमीस च्यार बैल कापड रवाना केले, त्यास जकातीविसी दस्तक.

१ सिवाजी बलाळ यास पत्र ता हवेली संगमनेर येथील गाव बाबुराव हरी कादार यांजकडून तुम्हाकडे आहेत. यैशियास कादारापासून यैवज सरकारात घेतला तरी तुम्हांकडे गाव असतील तेथील यैवजाची निशा मारनिलेची करणे म्हणून.

१ सदरहू आन्वये बाळाजी माहादेव याचे उतर मारनिलेकडे राऊत ढालाईत पाठऊन यैवज वसूल करणे म्हणून.

¶*This is a letter containing instructions as to how the Peshwa's orders about various matters are to be executed.*

No. 116] [19-10-1760

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री कोंडो जिवाजी स्वामी
गोसावी यासी

पोष्य बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें लिहिणे विशेष. तुम्हापासून कर्ज घेतले मुदल रूपये १००००० येक लक्ष, यास व्याज दरमाहे दरसदे रुपया १ येकोत्रा बिनसूटप्रमाणे करार केले असे; तरी सदरहू यैवज व्याज मुदल हिसेब करून देऊ. मिती आश्विन शुद्ध दशमी शके १६८२ विक्रमनाम संवछरे जाणिजे. छ २ रबिलाखर सुाा इहिदे सितैन मया अलफ.

¶*The Peshwa receives a loan of one lakh of rupees from Kondo Jivaji at the rate of one per cent. per mensem.*

No. 117] [10-11-1760

पो छ ८ रबिलाखर कार्तिक
चिठ्या लिहिणें

श्री

राजश्री बाबूराव राम स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. देणे सुमेरसिंग गाडदी यांजकडे पालखीचे सामान सन तिसा प्रमाणें सालमारी सामान

सामानास आंख	रेशमी जोड	सुमार	दारू वजन पक्के
१५०	१ दोरण्याजोड	७५०० सिसेगोळ्या	।१
	१ गोंडे		
रेशीम सिवावयास	१ गोप	६ इग्रजी रेजम	कामाठी नेहमी
तोळे २	१ गुंड्या	२००० गारा.	तोफाकडे खासगी
			पैकी आसामी २
	४	९५०६	

दाल रेशमी गज

१० निरुंद

९ रूंदाल

―――

१९

येणेप्रमाणे दीडसे आख व दोन तोळे रेशीम व एकूणीस गज दाल व नव हजार पांचशे साहा सुमारी व सा मण वजन पके दारू व दोन कामाठी देविले असत. पावते करणे. याखेरीज सोळा बैल तोफखानापैकीं याजकडे देविले आहेत त्यास दाणा दररोज कैली ८॥२ आठ पाइली पो देविला असे. पुण्यात असतील तोपर्यंत देणे. रा छ १ रबिलाखर सुा इहिदे सितैन मया अलफ हे विनंती.

¶Baburao Ram Fadnis is ordered to supply Sumersingh Gardi with the articles of furniture for a palanquin, as mentioned in the list.

―――

No. 118] [पौ *15-11-1760*

पौ छ ६ राखर कार्तिक

ता सदासिव बाबूराव

श्री

राजश्री बाबूराव राम स्वामी
गोसांवी यांसी

विनंती उपरी. देणे कारकून दिमत खासगी यांस मोइनीचे कापड आख

९०० जिवाजी गणेश व रघुनाथ सिवराम सन सितैनचे
१२०० पैकी पावले ३०० बाकी

७०० कारकून सन सितैनचे
७५ आपाजी सामराज
७५ गोविद चितामणी
७५ बालाजी कृष्ण
७५ रामाजी केशव
७५ गोविंद बलाल
७५ भिकाजी माहादेव
७५ मल्हार प्रल्हाद

५० अंताजी नारायण
७५ बालकृष्ण आपाजी
५० नारो कृष्ण जोग

७००

३०० किता कारकून सन समान व तिसा दुसाला चिठी दिली ते गमावली. पावले नाही सा।

१५० बालकृष्ण आपाजी दर ७५
१५० आपाजी सामराज दर ७५

३००

१५० गंगाधर विश्वनाथ इसने समान ता। सन सितैन दर ५०

४० हरी नारायण सितैनचे

२०० माहादाजी गोविंद मुतालीक सबनीस किले सिहगड सन तिसा व सितैन दर १००

३९९ रामचद्र गोविद इा सन सबा ता। सन सितैन च्यार सालाबा। हिसेब.

१०० लक्ष्मण भिकाजी तिसा व सितैन दर ५०

१५० गणेश दादाजी इा सन तिसा व सन सितैन दुसाला दर ७५

२९३९

येकून दोन हजार नवसे येकूणचाळीस आख देविले असेत. पावते करणे. याखेरीज लोक दि। खासगी यास साल गु। प्रो आख

२३ प्यादे

१५ दि। हिरसा
८ राणोजी सिलावंत

२३

४४३॥ इमारतीचे माणसास

४६६॥

पैकी साल मजकुरी आख ४०० च्यारसे देविले असेत पावते करणें. रा छ ३० रौवल सुा इहिदे सितैन मया अलफ, बहुत काये लिहिणे हे विनंती.

चिठी लिहिणे

¶*This is a list of the names of persons in the service of the Peshwa and their annual allowances for the years 1758, 1759, 1760.*

No. 119] [*1761 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव सां नमस्कार विनंती विज्ञापना. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा मुलकांत प्रजन्याने घालविलें आहे त्यामुळे गल्याची महागाई जाली आहे तर पा पाटोदे येथून गल्ला इकडे येईल व इकडून गला तिकडे जाईल त्यास जकातीचा तगादा न करावा म्हणून आज्ञापत्र सादर जाले. ऐशास जकातीचा इजारा परभारा सरकारातून आहे. शेवेसी विदित होय. दुसरे जकातदार आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdev to the Peshwa : says that he is unable to prevent customs duty being levied, as the contractor is not under his control.*

No. 120] [*1761 ?*

श्री

विज्ञापना आज्ञेप्रमाणें राजश्री बाळाजी बावासी बोलाऊण मोर्चेस जावयासी सांगितलें व आपुल्या मरजी(चा) प्रकार उमजविला. ऐसियासी बावाचा मनसबा उदईक पंचवीस स्वार व दाहा हजार गोळी घेऊण मोर्चेस जाऊण कोणे गोष्टीची कमी न व्हता सरकारचे नक्षाची गोष्ट ते करावी, दुसरा अर्थ जाणत नाहीं. नि:संशये कुटुंब येथें ठेऊण जात असेत. श्रुत्य होय हे विज्ञाप्ति.

¶*The writer reports that Balajibava agrees to accept the task entrusted to him and to obey the Government orders.*

No. 121] [1761 ?

श्री[1]

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंतनाना
स्वामीचे सेवेसी

पौष्य मैरालजी जिवाजी सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. कृष्णभट हिवरेकर याची कन्या निंबाजी बडवा काा नेवासेकर याचे चिरंजीवास दिल्ही आहे. त्यास त्या बाईची वर्तणूक आनन्वित तिलप्राये नसतां दुसरी स्त्री केली. ते समई गांडापुरी मोगलाकडील कादारानी लिहून घेतले आहे कीं, वडीले स्त्रीसी घराश्रम करून आन्नवस्त्र देऊ. न देऊ तरी शफत लिहून घेतली ते पत्रच बजिनस आपण पाहिल्यानंतर ध्यानास येईल. असे आसतां पहिले बाइकोस आन्नवस्त्र देत नाही. याचा विस्तार पत्रीं लिहितां विस्तारच आहे. कृष्णभट समक्ष विनंती करतील तो अर्थ ध्यानास आणून यांचे कन्येचा संसार येथास्थित होय असा बंदोबस्त करून देविला पाहिजे. वाा राजश्री रामशास्त्री बावा यांजकडून येक पत्र आमचे नावे लिखून देवावे व आपण आपले पत्र आम्हांस द्यावे कीं, निंबाजी बडव्याने लिहून दिल्हाप्राो वर्तणूक करीत नाहीं तरी त्याचे वतन जफ्त सरकारांत करून त्यास हुजूर पाठवणे किंवा लिहिल्याप्राो वहिवाट करण्याचा जामीन घेणे याप्राो पत्र यास द्यावें. ब्राम्हण गरीब आहे. यास लवकर मार्गस्त करावे. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Mairal Jiwaji pleads for Krishnambhat's daughter who is being ill-treated by her husband and requests Naropant Nana to issue a strong reprimand to the latter.*

No. 122] [1761 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक सदासिव लक्ष्मण सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशळ ताा आस्विन वद्य द्वादसी पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित

---

१ पत्राचे माथ्यावरील शेरा :— सदरहू पत्राचें उत्तर शास्त्रीबावाचें नांवाचें दिल्हें. ताकीदपत्र दिल्हें.

असे. इमारत तळेखंडाळे येथील इमारत श्रीमंत राजश्री नाना[1] कैलासवासी याणी चालविले त्यास ते कैलासवासी जाले त्याजवर श्रीमंत राजश्री आपासाहेब कोकणातून आले ते समई तीर्थरूपानी सेवेसी निवेदन केले; त्यास श्रीमंत राजश्री आपानी आज्ञा केली की आम्ही पुणियास गेलियानंतर सरकारातून बेहबुदी करून तुम्ही कामकाज चालते त्या प्रा चालवणें. त्यास श्रीमंत रा आपा कैलासवासी जाले व तीर्थरूपहि कैलासवासी जाले; त्यावरून दोनच्यार वर्शे कामकाज राहिले. त्यास तल्याची इमारत बहुतेक जाली आहे, आण थोडीसी राहिली आहे त्यास ती इमारत जालियाने तल्याची मजबुदी होते. नाहीं तर थोडके कामासाठी तल्याचा नाश होतो. येदंनिमित्य सेवेसी लिहिले आहे तर बेहबुदी करायाची चितात असिले तर आज्ञा करावी व सेवेसी यावे म्हणून आज्ञा केली तर सेवेसी येऊ. मौजे खंडाल हे गाव मोकासा खासगीकडे आहे, त्यास तल्यावरील लोक तेथे घर बांधून आहेत त्यास आपले निसबतीने रा त्रिंबक नारायेण कारभारी आहेत त्यास ते त्या लोकास घर देण्याविसी तोष्टे[2] लावितात, त्यास सनद, घर-देणे इमारतीचे लोकापासून न घ्यावी, म्हणून देविली पाहिजे. इमारतीचे लोक बहुत दिवस तेथे आहे, त्यास त्याजपासून घरदेणे आज पावेतो घेतले नाहीं आण साल मजकुरी घेऊ म्हणतात, त्यास सनद देविली पाहिजे. यानंतर स्वामीनी किले विसापुर वसवावयाचे चितावर धरिले आहे, त्यास सेपंनास लोक मावले नामांकित मर्दाने ठेवा म्हणून आज्ञा करितील तर संभर लोक नामांकितसे ठेऊन हुजूर घेऊन येणे म्हणून आज्ञा करितील तर लोक ठेऊन सेवेसी घेऊन येऊ. आज्ञा होईल त्याप्रा वर्तणूक होईल. सेवेसी श्रुत होय हें विज्ञाप्ति.

¶*Sadashiv Lakshman requests the Peshwa to complete the tank and buildings started at Khandala by the first Peshwa and continued by Chimaji Appa.*

No. 123] [*1761 ?*

श्री

पुा राजश्री तात्या स्वामीस विनंती उपरी. (उ)पाये नाहीं. येविसीई राजश्री नारोपंतनाना साविस्तर वर्तमान निवेदन करितील. तिसा हाजारांसिवाये आमची स्थीत राहाणार नाहीं. इतकेच प्रकारास आपण कसा कंटाला धरला? पुढे तरी आमची बहुत बंदोबस्ती केली पाहिजे. तूर्त भक्षावयाची चिंता आहे. जरूर देविले पाहिजे. सर्व प्रकारे भरवसा आपलाच आहे. विशेष काये लिहिणे लोभ कीजे, हे विनंती.

¶*The writer asks money for his expenses.*

---

१ बाळाजी विश्वनाथ. २ त्वष्ट, लकडा.

No. 124] [1761 ?

श्री

विज्ञापना आपण आपाजी बराबर पत्रें पाठविली तीं पावलीं. श्रीमंतास दाखविली. जाब मागाहून पाठवितो. वरकड जाबस्वाल पाा आहेत त्यावरून कलेल. राजश्री नाना पुरंदरे याणी सांगितलें की नाना आमचे कामास हिसके करितात, पाटील आमचे गावचे धरून नेतात, उपद्रव देतात. असे असावें कीं काय? आम्हां कोणे रीतीनें त्यासी चालतों हे तुम्ही जाणतच आहां. असे असून आमचे कामास हिसके मारावे हे ठीक नाहीं. श्रीमंतास विनंती केली त्यावरून आपल्यास पत्र नेले आहे. आम्ही नानास सांगितले की आपण चितांत दुसरा प्रकार न आणावा. आपले कार्यास कधी चुकणार नाहीं असें सांगितले. त्यास आपण त्याचे कामकाजास हिसका मारीत न जावा हे विज्ञापना.

¶*The writer conveys to the addressee a protest from Nana Purandare against the highhanded action and interference, probably on the part of the addressee, contrary to the interest of Purandare. This paper cannot be dated. All such papers of an indefinite character are being grouped together at the end of the series.*

No. 125] [1761 ?

श्रीकालिका

बंदे नवाज नानासाहेबांचे खिजमतीस

ॐ अर्जदास्त आर्जे दरबंदगी बंदे फिदवीयान बाबूखान मुकाम किले पावागड कुर्निसात व तसलीमात अर्ज मरेसानद ऐसीजे. तागायेत छ ९ माहे रजब पावेतो साहेबाचे नेक नजरेकडून किले मजकूरचे व बदकमीनाचे वर्तमान यथास्थित असे. दर्यादाऊद चौधरी याचा माल दिलीस जात होता त्याचे सकलादी ताके वगैरे दोन हजाराचा माल घेतला आहे तो माघारे देऊन चौथ हुजूर पाठवणें म्हणून आज्ञापत्र आलें तें सिरीं वंदिले. आम्ही हुकमी चाकर आज्ञेप्रमाणे वर्तणूक करूं. परंतु हा कजिया दाहा वर्षाचा आहे. भारी माल दाण चोरी करून दोन महाल हासील न देतां गेला. तिसरे परगणेमध्यें सांपडला. मुदा तहकीक लागला. तेव्हा च्यार महालचा हसील गुन्हेगारी विशेष होत होती. परंतु च्यार बेपारी यानीं सवाबारासे रुा चुकऊन येथे सावकारी निशा केली. तेथे सावकाराचे घरीं ऐवज प्रमाणे सकलाद वगैरे माल ठेऊन रुपये भरले ऐसे असतां

हली फिर्याद केली. दरबारी वाजबी इनसाफ जाला. लुटून घेतला त्याचा ऐवज माघारे द्यावा म्हणोन तर येथें साहिबी आम्हास बसविलें आहे. वीस वर्षे अमल केला. तेथ हरामी हलालीपासून च्यार पैसे खंड गुन्हेगारी घेतलीच आहे. जो कोणी फिर्याद जाईल त्याचे रुो माघारे देणे म्हणोन हुकूम आणितील तेव्हां येथे आमची स्थीत कैसी राहील? चौधरी मजकूराचे हुकूम व जासूद आणला येणेकरून आणखीहि कितेक उमेदवार आहेत. बहुता सालाचे जुने कजिये गायकवाडाचे अमलातील मनास आणिलेनें आमची आबरू न राहे. अलीकडे साहेबाच्या अमलांतील कजिया असेल तर चित्तीं धरावयास पाहिजे. जुने कजिये मनास आणिलेनें आमचा निभाव न होय हे अर्जदास्त.

¶*The Killedar of Pawagad protests to the Peshwa against his orders.*

No. 126] [*1761 ?*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सो

विनती सेवक दामोदर माहादेव कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील कुशल स्वामींचे प्रतापे येथास्थित असे विशेष. आपलें कृपेकरून चिरंजीव राजश्री गणपतरावजीचें लग्न वैशाख वद्ये ९ पंचमीचा निश्चये केला आहे. शरीरसंमध राजश्री बाळाजी शामराज निबगौकर यासी केला आहे; तर कृपा करून येऊन लग्न सिध केली पाहिजे. सो शृत होये. कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Damodar Mahadeo (Hingne) sends an invitation to Bhausaheb to the marriage of Ganapatrao.*

No. 127] [*1761 ?*

छ २९ सफर

श्री

श्रीमंत माहाराज राजेश्री छेत्रपति
स्वामीचे सेवेसी

सेवक अज्ञाधारक गोपालराऊ तुबाजी दिा मातुश्री राधाबाई माने कृतानेक विज्ञापना. खंडो केशव हा परशरामपंताचे घरी होता त्यास निर्बंध जाला ते समई याजवरी ते निमित्य ठेऊन यापासून रुपये १०० शेभरी खंड घेतला आणि

जमानाविशई आज्ञा केली. यासी आपण हाजीर[1]जमान आसों. जाये पळे तरी हाजीर करू. न सको तरी याचे तालुकाती जाब करून देऊं हा जमानकतबा सही.

¶*Gopalrao Tubaji stands security for Khando Keshav.*

No. 128] [*1760-61*

श्री

यादि फेरिस्त बा। खतावणी सन इहिदे सितैन मया व अलफ.

१ प्रांत कल्याण भिवडी नि॥ राजश्री सदाशिव चिमणाजी.
१ प्रांत कल्याण भिवडी नि॥ रामाजी माहादेव.
१ प्रांत राजपुरी नि॥ त्र्यबक विनायेक.
१ प्रांत साष्टी नि॥ रामाजी माहादेव.
१ ता॥ उदेरी नि॥ रामाजी माहादेव.
१ ता॥ रत्नागिरी नि॥ मोराजी सिंदे.
१ प्रा॥ बेलापूर नि॥ गोविंदराव माणकर.
१ सुभा राजपुरी नि॥ रामाजी माहादेव.
१ प्रांत राजपुरी नि॥ राणोजी बलकवडे.
१ ता॥ सुवर्णदुर्ग.
१ ता॥ अजणवेल नि॥ चिमाजी माणकर.
१ ता॥ विजयदुर्ग नि॥ नारो त्रिंबक.
१ मामले कोहज नि॥ येशवतराव सिवाजी.
१ ता॥ पालहवेली नि॥ नारो त्रिंबक.
१ प्रा॥ वसई नि॥ शंकराजी केशव.
१ जंजिरे रेवदंडा नि॥ माहादाजी रघुनाथ.
१ जंजिरे रेवदंडा नि॥ दुर्गोजी सिंदे.
१ किले माहुली नि॥ दुर्गाजी सिंदे.
१ प्रा॥ कर्नाला नि॥ रामाजी महादेव.
१ देशमुखी प्रा॥ वसई नि॥ बालाजी माहादेव.
१ देशमुखी प्रा॥ राजपुरी बाळाजी कृष्ण.

---

१ हजर करूं अशाबद्दल जामीन.

१ देशमुखी प्रा साष्टी नि‌ा परशराम रामचंद्र.
१ पा‌ा गारगाव नि‌ा त्रिंबक सूर्याजी.
१ संवस्थान जवार नि‌ा मोहनकुंवर.
ता‌ा सा‌ा संवस्थान सालमजकुरी सरकारातून मोहनकुवर याजकडे दिल्हा असे.
१ जाहागीर किले माहुली.

¶*A list of Peshwas' officers stationed at various places.*

No. 129] [*18-1-1761*

श्री

राजश्री बाबूराव राम स्वामी गोसावी
यासी

विनंती उपरी. बा‌ा देणे संस्थान चंदावर येथील राज्यास वगैरे वस्त्रे कापड आख

१००० राज्यास
१ मंदील
१ चादर
१ जामेवार
१ किनखाप
१ पटका
—
५

३०० मल्हारजी गाडेराव यांस सनगे ३॥
३०० मा‌ा इसफखान कुमंदान सनगे ३॥
येकून मा‌ारनिलेकडील कारकून व्यंकटराव यांचे जवल द्यावे.

१६००.

येकून सोलासे कापड आख देविले असेत. पावते करणें. सदरहू सनगे मा‌ारनिलेकडील कारकून गोपाल आपाजी यांचे स्वाधीन करणें. रा‌ा छ १० जमादिलाखर सु‌ा इहिदे सितैन मया अलफ हे विनंती.

छ २ रजब माघ चिठी लिहिणे.

¶*Order to Baburao Fadnis for clothes of honour to be sent to the Raja of Tanjore to be made over to Gopal Apaji.*

No. 130] [21-4-1761

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बाबुराव कोन्हेर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १९ माहे रमजानपर्यंत येथास्थित असे. यानंतर आज्ञापत्र सादर जालें; तेथें आज्ञा जे बंदुका व जेजाला पाठऊन देणें म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणें बंदुका व जेजालाचे कारेगारास सांगोन करविल्या इतकियांत दुंडी भारी जाली. तन्मुळें कारीगार तमाम अफरका तफरका जाले. याउपर स्वामीप्रतापें सुभता जालियावरी आज्ञेप्रमाणे बंदुखा व जेजाला तयार होऊन सेवेसी प्रविष्ट होतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Baburao Konher (Kolhatker) to the Peshwa saying that he will shortly be sending the guns as requested.*

No. 131] [22-6-1761

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री गिरराव भिवराव गो

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुाा इसने सितैन मया व अलफ. कामकाजाचे दिवस. फौजेची तयारी जाली पाहिजे. तरी तुम्ही सामानसुधा तयारी करून हुजूर येणे. दिरंग न लावणे. जाणिजे छ १८ जिलकाद.

¶*Girrao Bhivrao is asked to be prepared to go on an expedition.*

No. 132] [22-6-1761

श्री

राजश्री शाहाजी भापकर
गोसावी यांसी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद. सुाा इसने सितैन मया व अलफ. चिरंजीव राजश्री दादा डेरादाखल होऊन स्वारीस सत्वर जाणार. त्यास तुम्ही आपले लोकसुधा पत्रदर्शनी तयार होऊन हुजूर येणे. जाणिजे छ १८ जिलकाद.

¶*The Peshwa orders Bhapker to join Raghunathrao in an expedition.*

No. 133] [31-6-1761 ?

छ २९ सवाल

नकल खानविलकराचे पत्राची
छ १४ जिलकाद

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. च्यार डोंगर भोंवताले आहेत. यांसी मैत्री राखोन आपलें कार्ये करून घ्यावें आण शत्रू हाताखालें घालावा हें काहीं नाहीं. त्यासी हर्शामर्ष करितात. परंतु ते काहीं यास डगमगतात यैसे नाहीं; परंतु यांचीच तोंडे फुटतांत यैसे आहे. कदानचित प्रसंग पडला तर किल्यावर दों रोजाचें धान्य वर नाहीं यैसे आहे. तशाहिमधे हरयेक जागां जाऊन स्वारीसिकारी करावी व गुरेंढोरे वळून आणावीं व कितेक धणीकाम करावें तर तेंहि करू देत नाही. घरोघरी सिके जाले. सोनार आणून सिके करून ठेविले आहेत. येकाने हरयेक गावास कौल द्यावा; व रोखा लेहावा तर ते मागून लेहून पाठऊन हरयेक फांदडा करावा. हरयेक अविनास करावा; परंतु काहीं सुरली(त) धणी काम करीत नाहीं यैसे वर्तमान आहे. स्वामीस लेहून पाठवावें यैसे नाहीं. कुल कारभार येथे होतो तो स्वामीस विदितच आहे; परंतु सूचना मात्र लिहिली असे. येथील ग्रहस्तांस आमची फारसी अडचण आहे. येथून निघोन गेलों तर बहुत संतोषी आहेत कीं न्यायेनीतीची व धणीकामाची गोष्ट सांगतो यामुळें तर स्वामीनी सेवकास काये आज्ञा केली पाहिजे. स्वामीकडील व हरकोणाकडील कागदपत्र येतात परंतु काहीं आमचे हातास येत नाहीं. वाचतांत, फाडून टाकतांत परंतु आमचे हातीं येत नाहीं. सेवेसी विदित होये हे विनंती.

¶*The general mismanagment of the affairs, especially the wide misuse of counterfeit royal seals, is reported to Raghunathrao by the writer (one Khanvilker ?).*

No. 134]

श्री

यादी गोवेकरास येणेप्रा पत्रे

गुा सावंताचा व तुमचा तह जाहाला. उभयेपक्षी करार जाहाल्याप्रा निभावणी दुतर्फा व्हावी. त्यास सांवताकडील मुदे करारासमधे राहिले आहेत.

ते अद्यापवर निभावणीत न आले व सांप्रत त्याचे तालुक्यास तुम्हाकडील लोक जाऊन उपद्रव देतात म्हणोन हुजूर विदित जाहाले तर हे गोष्ट तुम्हास उचित नव्हे. पेशजी माहादाजी * * यासमागमे तुम्ही आपले तर्फेने वकिलास पाठऊन कितेक मनसब्याचा प्रकार बोलोन सरकारचे मातबर कामकाजाचा अंगेज केला. ततूसमई सावतास हुजूरची पत्रें गेली. तन्मुलें त्याणी तुम्हाकडील तालुक्यास आजीपर्येत कोणेविसी आवाडाव न केली. असे असतां साप्रत सावताकडून हुजूर पत्रें आली जे, आपणाकडून करारांत तफावत आली नसतां या प्रकारे आरंभिले. तेव्हा त्याचप्रा मनसब्यास प्रवर्तावे तर हुजूरचा नुक्ष[१] आपणावर न यावा. या आर्थे दुरंदेसी त्याणी चितात आणून पत्रे पाठविली. अशास सावंत सर्व प्रकारें पदरींचे, तेव्हा त्याचे साहित्य हुजूरून करणे अवश्यक व तुम्ही सरकारचे काजकामाचा अंगेज केला, तेव्हा तुम्हाकडील तालुक्यास दरज न पोहचावा हे जरूर, याकरिता हाली हुजुरून बहिरो बाबाजी यास रवाना केले असेत. तर उभयेपक्षी तह जाला असेल त्यास तफावत होऊ न देता सावताकडील मुदे करारात निभाऊन द्यावयाचे राहिले असतील त्याची निभावणी करून त्याचे तालुकियास उपसर्ग न लागे ते गोष्ट केली पाहिजे.

¶*Letters to the Portuguese of Goa warning them not to infringe the terms of the treaty with the Savants.*

No. 135]

छ २७ जिल्हेज नकल

श्री

पुा तीर्थरूप राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री स्वामी सडेश्वारीने प्रतापगडास गेले. सरकारातून कोन्ही बहुतेसे[१] गेले नाहीत. राजश्री पंतसचिव व राजश्री येमाजीपंत व आणीक आगत्याआगत्ये गेले आहेत; व आम्ही जावे तरी राजश्री स्वामी आजी जाऊन चवथे पाचवे दिवसीं येथे फिरोन येणार. तेथून येताच माहादेवाकडे जावयास कूच करावयाचा निश्चये आहे. दुसरी गोस्ट प्रतापगडाकडे मोठेमोठे पर्वत. घाटास चढ उतार फार, रान अडचन आहे. घोड्यावरी बसून जावयाचा लाग नाहीं. पायेउतारा घाट चढावा उतरावा लागतो. सडे श्वारीने टाकोटाक जावे येशा

---

१ बोल?

१ बहुतेक.

निकडीची स्वारी आमचा वस्तु घोड्यावरून होतें यैसे नाही, यास्तव राहिलो. स्वामीस कलावे म्हणून लिहिले आसे. विदित जाहाले पाहिजे. घाट चढावयासी शक्त नाही याकरिता राहिलो. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*The writer Purandare to Sadashivrao Bhau, explaining why he could not accompany the King to Pratapgad.*

No. 136]

श्री

राजश्रिया विराजित्र राजमान्य
राजश्री रामचंद्रजी बावा
गोसावी यासी

स्नेहपूर्वक गोपालराव गणेश अनेक आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २१ माहे जिलकाद मुाा झारोलें मही उतरतीर प्रो पेटलाद जाणोन स्वकीये लेखन करावें विशेष. आम्हाकडील सविस्तर श्रीमंताचे पत्री लिहिले आहे त्यावरून सर्व कलेल. तुम्हास ल्याहावे तर तुम्ही चिरंजीवच आहा. तेथें दुसरा विचार काये? सर्व प्रकारे तुम्ही अगत्यवादीच आहां; तर श्रीमंतास समये पाहून पत्रार्थ सविस्तर श्रवण करावा; आण लिाअन्वये समर्पक जाबसाल घेऊन पाठवावें; व राा आपाजी गणेश यांस ताकीदपत्रे निक्षूणवादे पाठवावी. त्याचप्राो राा दमाजी-बावा गायेकवाड यांसहि पत्र पाा कीं सर्वप्रकारे साहित्य करून अमल दखल करवणे. येविसीं राा आपाजीपंत सांगतील त्याप्राो पत्रे ल्याहावयास आलस न करावा. राा दमाजीबावास पत्रें ल्याहावी कीं, पत्र पावतांच आपाजीपंताचे पारपत्य बरे रवेसीने[1] करून अमल दखल[2] करून देणे व आपाजीपंतासहि पत्रे पाा कीं पत्रदर्शनी ठाणी स्वाधीन करणें; नाहीतर पारपत्यच होईल. ऐसी चमत्कारी[3] पत्र येऊन कार्य होये ते करावे. बहुत काय लिा? कृपा कीजे हे विनंती.

¶*Gopalrao Ganesh requests Ramchandra Baba to write to Damaji Gaikwad and Apaji Ganesh to hand over to him the province of Petlad and to put no hindrances in his way in collecting the revenue.*

---

१ रीतीनें. २ रुजू. ३ जरबेची.

No. 137]

श्री

यादी दिा मानाजी पायगुडे याजकडील लोक सिलेदार व कारकून सवदानावरून निघोन सेदव्याचे बारीने येत होते. त्यास बारीमध्ये जेयेमल वाणी सेदवेवाला याणे पांच सातसे भिल आणून बारीत दंगा करून लोकाची ना(के)बंदी केली. उंटे व घोडी वगर मालियेत व दप्तरे कागदाची यैसी मालियेत लुटून नेली आहे. येविसीचे ताकीदपत्रे देऊन यादीबाा मालियेत देविली पाा.

राजश्री मल्हारजी होलकर यासी पत्र जे जयेमल याने दंगा करून मानाजी पायगुडे याजकडील लोकाचे वस्तभाव जराबाजरा[१] देखील दप्तरचे कागदपत्र जे नेले असेल ते देणे म्हणोन पत्र १

जयेमल यास पत्र जे मानाजी पायगुडे याजकडील कारकून व लोक येत असता बारीत भिल घालून दंगा करून बुनगे लुटून नेले. घोडी ठार पडली, ते व घोडी व उंटे व दप्तर कागदाचे रुमाल वगैरे मालियत जे जराबाजरा सुतलीचा तोड नेला असेल तो पत्रदर्शनी निकाल करून देणे; नाहीतरी मुलाहिजा[२] होणार नाही. पष्ट समजोन मालियेत भरून देणे. पडली घोडी त्याचे फडशा करून देणे. म्हणोन पत्र १

सरकारचे जासुदजोडी १

दोन पत्रे येणेप्राो द्यावी: देणे.

¶*Peshwa's orders to Malharji Holkar and Jaymal for the restoration of the property of Manaji Paygude looted by the Bhils employed by Jaymal.*

No. 138]

श्री

येणेप्राा पत्रे आज्ञा करून देविली पाा. क्षेत्र वेरुळी श्रीच्या देवालयाचे काम नूतन लाविले. धोंडे काढिले. पाशाण उतम निघाला म्हणून राज्याहून फकि-

---

१ सामनसुमान. २ गय.

राही व मुलाही नवाबाचे ताकीदपत्र आणून देवालयासी दिकत करिता. पाशाण राज्यास नेऊ म्हण[ता]त. यैसी दिकत म्हणून ताकीदपत्रे देविली पाहिजे.

१ दरगाकुलीखानास पत्रे

१ परशरामपंत वकील यासी पत्र की खानास जाऊन नवाबास आर्जी पोहचाऊन श्रीच्या कामाची ताकीद करणे म्हणून पत्र

१ फौजदार वेरूलकर यासी कामाविसी ताकीद. श्रीकामास दिकत केलिया कार्यास येणार नाही.

३

१ राघो गोविंद यासी पत्र की देवालयाचे साहित्य करून काम चालते करणे.

येकूण तीन पत्रे देविली पाा हे विज्ञापना. यो च्यार पत्रे देविली पाहिजे हे विज्ञापना.

येणेप्रमाणे पत्रे देणे.

¶*Order to issue letters to the Subha, Faujdar and others to see that the work of erecting the new temple at Ellore goes on smoothly.*

No. 139]

श्री

राजश्री भाऊ साहेब
गोसावी यास

ऽ श्रीमंत सकलगुणअलंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्नेहाकित रावोजी भोसले व जोगोजी भोसले व माधवराऊ भोसले व हणमंतराऊ भोसले कृतानेक दंडवत विनती. येथील क्षेम ताा आशाढ शुध दशमीपर्यंत येथास्तित जाणोन स्वकीय स्वानंदवैभवादि लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशेष. येथील वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिले त्यावरून श्रृत जाले आसेल. तहाचा मजकूर राजश्री दमाजी गायकवाड व राजश्री देवजी ताकपीर व राा माधवराऊ निबाजी व राा मलार गो(वि)द यानी तहाचा मजकूर घातला परंतु धातुपोशण दिसते. प्रस्तुत मातुश्रीबाई आंतापुरास गेली. तेथून आलियावर जे होणे ते आपले प्रतापेंकरून होईल. पर्वताचा मजकूर तर परस्परे शामलाचे साहित्य

जाकिरा व नूतन शामल भरणा पर्वतावरी चढऊन बंदोबस्ती करिता. साराष
साहेबानी आमचा हात धरून आभिमान धरिला त्याचे सार्थक
[शिक्का] करणार आपण समर्थ आहेत. वरकड कितेक सविस्तर वर्तमान,
रा संकराजीपंत व रा माणको नागनाथ सेवेसी पाठविले आहेत,
ते निवेदन करितां श्रुत होईल. बहुत काय लिहिणे ? कृपा निरंतर आसो दिल्ही पाहिजे हे विनती.

मोर्तब
सुद

¶*Raghuji and other members of the Bhonsle family address the Bhau on the subject of the negotiations started by Damaji Gaikwad, Takpir and others, with a view to arriving at a compromise.*

No. 140]

श्री

वडिलांचे शेवेसी आपत्ये समशेरबहादर विज्ञापना. वडिलीं असीर्वादपत्र पाठविलें ते छ ३ रबिलौवलीं पावलें. तेथें आज्ञा कीं लोकसहवर्तमान सत्वर येणें. त्यास येथं भूतवृत वडिलांस विदितच आहे. तथापि संक्षेपे प्रार्थना यैसीजे. नालबंदी समजाविसीचा ऐवज स्वारीच्या अजमासें समजण्याचा प्रकार घडावा त्यांत वरातांचा ऐवज सावकार कबूल न करीत. ठरल्या ऐवजास मोबदल्याच्या पर्याय विचारें करितां दिवसगत लागली. ऐवजाकरितां कारकून नेहमी आहेत. स्वारी मजल दरमजल जाली यामुलें चरणकमलासनिध सत्वर यावें हा व्याप्ति गृह्च करून ऐवज मोबदल्यास घेऊन समाजाविस केली. सेवेसी सत्वरीच येतो. सेवेसी श्रुत होये. * सत्वर सेवेसी येऊन पोहचतो हे विज्ञाप्ति.

¶*Samsher Bahadar asks for more funds for paying off the arrears to the army.*

No. 141]

छ ४ मोहरम

॥श्रीगणेशायनमः॥

श्रीमत् राजश्री पंतप्रधान

स्वामींचे सेवेसी

सेवेसी आज्ञाधारक जेठी बारीया व हरकंजी पा मुा ठाणे गजरे कृतानेक रामराम विनंती उपरी. येथील क्षेम ता छ ३ जिल्हेज पावेतो ठाणे मजकूरचे व सेव-

काचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. इकडील वर्तमान तर रा। नारायेण जोसी याणी आम्हास पत्र लि॥ आहे ते बजिनस स्वामीकडे पाठविले आहे. त्यावरून सेवेसी वर्तमान विदित होईल. ठाणे मजकूरचे वर्तमान तर जंबुसरकरासी आम्हासी रोज लडाई होत्ये. येक स्वारी मौजे उबरछद येथे केली. दुसरी स्वारी उबरे येथे केली. तेथे युध्यप्रसंग बराच जाला. आमची दोन चार माणसे जखमी जाली. येक दोन कामास आली. तिसरी स्वारी डाभेयासी केली. तेथून जंबूसरी जात होते. त्यासी आम्हासी लडाई जाली. कुल गाव जालिला. येक मेडी राहिली होती इतकियात जंबूसरीहून राऊत व बरकंदाज व आरब यैसे. दोन तीन हजार माणूस मदत आले. त्यासी व आम्हासी लडाई येक प्रहर जाली. आम्हाकडील पंनास आरब वगैरे माणसे जखमी जाली. आरब चार पाच भले माणूस कामास आले. येक घोडी आरबाची कामास आली. त्याजकडील चालीस पंनास मराठे जखमी जाले. यासिवाई कसबती पंनास साठी जखमी जाले. दोन घोडी उतम त्याची पाडाव करून आम्ही आणिली. स्वामीचे पुण्ये करून येश आले. आणि मुलकामध्ये धास्त बहुत पडली आहे. स्वामीच्या कौलाखेरीज परगणा व मुल्क वसतो यैसे नाही. अखेरसाली सर्व पाटील येऊन रुजू होतील परंतु पैसियाची बगर आस्वीनमास आलियाविरहीत प्राप्त नाही. ठाणेयाविसी स्वामीनी बेफिकीर आसावे. परतु भाद्रपद मासाकारणे आले पाहिजे. तेणेकरून पैसा वसूल होईल. नाहीतर पिलाजी गायेकवाड वसूल करून जाईल. पायागडाकडील वर्तमान तर रा। विसाजीपंती छ २७ जिलकादीची पत्रे पाठविली त्यामधे लि॥ आहे की, गडचे व आमचे वर्तमान येथास्थित आसे. आम्हाविसी चिंता न कीजे. यैसे लि॥ आहे. आम्हीहि तीन जोडिया कासिदाच्या पा॥ आहेत. परतु उतर आले नाही. उतर आलियावरी सताजी जासुदाबा॥ पा॥ सताजी जासूद यासी नारायेण जोसी याणी आमदाबाजेस बोलाविले आहे. तेथे संताजी गेला आहे. तेथून आलियावरी सविस्तर वर्तमान लेहून पाठवितो. ये प्राती गायेकवाड याचे राऊत हजार दोन हजार आहेत. गजरे याची गावातील गडी तयार केली आहे. ठाणे याची आळंग नाहीत. चौकसीने जे करावयाची ते करीतच आहो. ठाणेयाची फिकीर आम्हास आहे. कंठाजी बांडे व रजपूत येकत्र जाले आहेत. परंतु आद्यापि खरे कशावरून मानावे? कंठाजी मही उतरला म्हणजे जे होईल ते खरे. राजाने जाब दिल्हा की जो माहाराज छत्रपती स्वामीची सनद आणील त्याची चौथाई आहे. यैसे उतर राज्यान दिल्हे. तर स्वामीनी नव्या संदाची नकल आगोधर राजपत्राची पाठविली

पाहिजे. मुस्तफीखान गजरियासी आला नाही. स्वामीनी दोन जोड्या कासि-दाच्या पाा ते कागद घेऊन आम्हाजवळ आले. त्यावरून बहुत समाधान जाले. राऊताविसई लिाा परतु आमदाबाजेहून राऊत आले नाही. आरब गजरेयामध्ये आहेत आगर आनखी भले माणूस आहेत त्यासी समाधानपत्रे लेहून पाठविलीं पाहिजे. आम्ही स्वामीची येकनिष्टेने (अपूर्ण)

¶*Jethi Baria and Harkaji to the Peshwa describing a skirmish between the writers and Jambusarkar. The writers further request the Peshwa to get fresh Sanads issued by the King, without which the revenue cannot be collected.*

No. 142]

श्रीकालिका

श्रीमंत राजश्री नाना साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक भगवान ताकपीर दिाा राजश्री देवजी ताकपीर दंडवत विनंती यैसीजे. येथील क्षेम ताा छ २३ माहे रबिलोवल पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विशेष. गुजरात प्रांताचे वगैर वर्तमान सविस्तर आज महाबूखान याणी सेवेसी पत्र पाठविली आहेत त्यावरोन सविस्तर आर्थ अवगत होईल. मुलकातील रुाा अद्यावंत कोठे गेला नाही. रुाा आमल-दारापासी दरोबस्त तैसाच आहे. सेवेसी श्रुत होये. निरंतर सांभालपत्र पाा. चाकराचा परामृश करावा. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Bhagvan Takpir to Nanasaheb, informing him of the collection of the revenue of Gujarat and its retention by the local officials.*

No. 143]

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री मोरोबादादा स्वामींचे सेवेसी

सेवक लक्ष्मण बलाल कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशललेखनाज्ञा करावी विशेष. दुर्गपैकी व मकुंद श्रीपत यांकडील प्यादे किले मदगिरीस हुजुरून नेमणूक जाली असतां अद्याप प्यादे आले नाहीं. हुजूरची आज्ञा दुर्गपैकी व मकुंद श्रीपत याकडील प्यादे आलियावर दीपसिंग व

परांड्याची पागा रवा(ना) करणें ऐसे असतां उभयेतास सांगितले की, सिरेयाचे प्यादे आलियावर तुम्हीं जाणे. येविसी हुजूरची आज्ञा आहे याप्रो सांगितले, परंतु आइकिले नाही. छ २९ सवाली दोनी पागा उठोन गेल्या. राजश्री मकुंद श्रीपत याणी पत्र पाठऊन प्यादाचा मजकूर दरमाहाचा लिहिला आहे तेच पत्र आपणाकडे पाठविले आहे. नवे लोक ठेवावयास आम्हास आज्ञा नाही. याचें उत्तर पाठवावें. गाडदी व सिंदी व गोलंदाज याचा आकार करून पट नावनिसीवार पाठविला. त्याचा आकार सिदियाचा रोजमुरा वीस रोजा व गाडदी याचा रोजमरा निममाहा व गोलंदाज येकमाहा याप्रमाणे लिहिला, त्याप्रमाणें येकुणात असावी ते लिहिली नाहीं. येकंदर निममाहा व गोलंदाजास दरमाहा देत जाणे म्हणौन येकुणातीस मखलासी लिहिली. तेव्हां वीस रोजाचे कलम राहोन सारेयास निममाहा याप्रों जालें. याकरिता आपणास पत्र लिहिलें आहे. याची आज्ञा काये ते करावी. खासबारदार व जासूद येथे चाकरीस रवाना केलें त्यांचा पट नावनिसीवार व रोजमरा कोणे तेरखेपासून द्यावा हे लेहून आले नाही. ते पोटास मागतात. याकरितां खासबारदार व जासूद याचा पट लेहून पाठवावा. आण रोजमरा कोणते तेरखेपासून द्यावा ते आज्ञा करावी. वाणियांचे बैल हरजिनस भरोन लस्करात जातात. मार्ग लागला आहे. जकातीचा मार्ग असता जकात घ्यावी की नाही याची आज्ञा करावी. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶[*Laxman Ballal seeks orders from Morobadada Fadnis on various points regarding the establishment serving in the fort of Madgiri.*

No. 144]

श्री

तीर्थस्वरूप राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

अपत्येसमान नारो रामचंद्र सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ २३ रमजान जाणून स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्तित असे विशेष. सिंहस्ताचे वर्षी स्नानास जावे. त्याचे सनिध कर्करासी पर्वत आहे. त्याचे लागेभागे दोघे भले माणूस येथे आले आहेत. म्हणतात की आमचे मुखे माफीक चालविल्यास घोडे सिध करून देतो. यैसियासी येविसी राजश्री त्रिंबकजी अहिरराऊ हवालदार किले लोहगड याणी सेवेसी विनंतीपत्र लिहिले आहे. आम्हास आढलेले वर्तमान ते सेवेसी ल्याहावें याकारिता लिहिले आहे. त्याची

चौकशी करावी. तेथे आणखी दोघेजण आपले तेथून पाठऊन, वाट ठिकाण पाहून, लाग्याचा मुदा काये तो मनास आणून, लेहून पाठवावे; यैसी आज्ञा होईल तर आज्ञेप्रा वर्तणूक करून. लोहगडकरी उमेद धरितात जे स्वामीची आज्ञा जाली तरी सेवा करून आपले ऊर्जित करून घ्यावे यैसा बेत आहे. यामध्ये स्वामीची आज्ञा ते प्रमाण. बहुत काये लिहिणे हे विज्ञापि.

¶*This letter written as it is in cryptic language cannot be clearly interpreted. It may refer to some plot for the occupation of Trimbak fort.*

No. 145]

पौ छ १४ जिलकाद

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना ताा
राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. श्रीमंत माहाराज श्रीपरमहंसबावा यांचा व्याजाचा येका वरसाचा पैका श्रीस हिसेब प्रमाणे देणे म्हणून पहिले आज्ञा आली होती व दुसरी आज्ञा पैका द्यावयाविषीं छ १० जिलकादी खंडोजी सालवी याणे स्वामीचें पत्र आणून दिल्हे. यैशास श्रीस व्याजाचा यैवज पावता केला येणेप्रो रुपये

७१९२॥ पेसजी आदा पोतापैकीं

११९२॥ छ २६ रमजान ताा सोमाजी घाणेकर

३००० छ २३ सवाल ताा सोमाजी घाणेकर

३००० छ ३ जिलकाद ताा सोमाजी घाणेकर

७१९२॥

४००० हालीं दिल्हे पोतापैकी. छ १० जिलकाद ताा खंडोजी सालवी.

१११९२॥

येकूण अकरा हजार येकसे साडे व्याणव रुपये सदरहूप्रो येका वरसाचे व्याजाचा यैवज हिसेब प्रो श्री स पावता केला. स्वामींनी लिहिले कीं, श्रीजवळून

2707

जुने खत घेऊन पाठवणे. नवे खत करून पाठऊन देऊ म्हणून त्याजवरून श्रीस विनंती सांगून पाठविली. त्यास श्रीचे कारभारी राजश्री जगनाथपंत लग्नाबदल तलेगावास गेले आहेत. ते आल्यावितरिक्त खताचा मजकूर बनत नाहीं. दुसरी गोष्टी जगनाथपंत आले तऱ्ही जुने खत द्यावे, ते श्रीमंताकडे पाठऊन नवे आणून देऊं म्हटल्यास श्रीच्या ध्यानास येणार नाहीं. बहुमानास बरें बरें म्हणतील परंतु खत काहीं देणार नाहीत. यास्तव आपले विचारें जालें तर नवें खत लेहून आम्हाजवल पाठऊन द्यावे. जुने खत श्रीनी दिल्हे तर घेऊ. नवें त्यांचे स्वाधीन करूं. जुने हातास आलें तर स्वामीकडे पाठऊन देऊं. जुने हातास न ये तर नवें त्यांस कांही देणार नाहीं. आम्हीं आपले जवल ठेऊं अगर स्वामीकडे पाठऊन देऊं. नवे खत सन्निध हाजीर असिल्याविना जुने खत श्रीपासून निघतां दिसत नाहीं. उतर पाठवावें. सेवेसी+ विदित जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Dadoba Purandare informs the Peshwa that interest on sums borrowed from Brahmendra Swami has been duly paid.*

No. 146]

श्री

यादी कलमे

सिऊबाई मामीपासून दाहा पंधरा हजार रुपये मागोन घेऊन पाठवणे
१

बाबूभट मोघे त्याजपासी दाहा हजारपर्येंत रुपये मागून पाठवणे
१

खासबारदार तेथे जमा जाहाले असतील ते तेथील चौकीस अगत्या-अगत्य असतील ते खेरीजकरून पाठवणे

सदासिवभट दीक्षित याजपासून दाहा हजार रुपये मागून घेऊन पाठवणे
१

रामाजी मलार याजपासून दाहा हजारपर्येंत रुपये मागून पाठवणे.
१

पाथरवट
२० बापूजीपंत याजकडील तल्याचे कामावर असतील ते
१९ सिवराम कृष्ण

३९

+ पत्र दादोबा पुरंदरे यांचें आहे.

त्रिसाजीपंत पवाराकडील यास ताकीद करून आनंदराव पवाराचे घराचे इमारतीचे कार्य चालते करावे.

कलम

१

याजपासी हाजीर चाकरीस असतील ते पाठवावे. काही चाकर पाथरवट तेथे राहातीलच. त्याचे हस्ते दुसरे पाथरवट चाकर ठेऊन तेथील इमारतीचे काम चालवावे परंतु लिहिलेप्रो पाथरवट अगत्य पाठवणे.

१

¶*This is a memorandum showing the sums to be borrowed from some persons. It also mentions architects and labourers employed in repair work.*

No. 147]

श्री

सेवेसी विनंती यैसीजे. स्वामीनी हतीविसी लिहिल त्यास रा मुरारराऊ यासी पुन्हा बहुता प्रकार हतीविसी बोलिलो. ते बोलिले की आम्ही फक्त सिपाई. चउघा भावाचे दोनी दोनी हती. ज्याचा हती द्यावा तो स्रमी होतो. इतकी कृपा केली तैसा येवडी करावा. तूर्त दुसमुबदलियास हती अनकुल पडत नाही म्हणोन बोलोन रा फतेसिंगबावाचेथे गेले. तेथून आलियावरी येकदां बोलून पाहू. आज्ञा घेऊन येतो. दुसरा हती मुबदला न मिल तर तोच हती घेऊन यावा काये ते आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*The Peshwa is informed of the reluctance of Murarrao Ghorpade to part with his elephant.*

No. 148]

श्री

श्रीमत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक मोरो मलार कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. पुणियाहून स्वामीने सातारियास राजश्री माहदोबा व राजश्री दादोबा यांस पत्रें देऊन पाठविले ते सातारियास जाऊन तेथून उंबरजेस गेलों. दीढ मास तेथे होतों. कामकाज निवडले नाहीं. येक दिवस सेखमिरांसी बोली जाली. बोली

मध्ये सेखजी सिकस्त जाले, परंतु त्यास अभिमान पोलादचा आहे. बोली कांहींच निवडेना, यास्तव राजश्री माहदोबानी आज्ञा केली की जेष्ट मासीं राजश्री येजमान येतील तेव्हां निवाडा होईल. आम्हास निरोप दिल्हा. त्यावरून पुण्यास आलों. तेथुन आजीच कोटुरां आलों. उंबरजेस येक दिवस मनसुबी जाली. मनसुबींत रा त्रिबकराव धायेगुडे व महमद सफी बसले होते. त्रिंबकरायानीं स्वामीचे पायासीं निष्ठा धरून मनःपूर्वक मनास आणिले. पोलाद लटका आहे. सेखजी नाहक अभिमान त्याचा धरितांत. यैसे पंचाईतीत खरें आहे. पुढे निवाडा करणार स्वामी समर्थ आहेत. विदित होये हे विज्ञापना. बावाखान स्वामीनी पाठविला, यास जिल्हेकडे रुजू करून कतबा देविला आणि जमाव आणावयास पाठविला. राणोजी तनपुरा व सेव्या देखील निरोप दिला. सेवेस श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Moro Malhar (Barve) reports to Chimaji Appa that he tried unsuccessfully to get his dispute decided by the King. He complains that Shaikh Mira was supporting Poladkhan whose cause had been proved to be a false one.*

No. 149]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नाना स्वामी गोसांवी यासीं

पो महिपत आनंदराव सुमंत कृतानेक नमस्कार विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. राजश्री प्रधानपंत येथून स्वार होऊन गेले. त्यास लोणंदच्या मुकामपर्यंत आम्ही समागमें गेलों होतो. तेथून आज्ञा घेऊन आलों, परंतु आपल्या दर्शनाचा मात्र योग तेथे घडला नाहीं. राजश्री नानांनी व बाबानीं बहुतसी कृपा करून आमचेविसीं राजश्री गोविंदरायांस सांगावयाचें ते सांगितले, व आपणहि आगोधर येथे राजश्री स्वामीस विनंती करणें ते केलीच होती; परंतु प्रसंगी तुम्हीं नाहीं यामुळें आमचा कितेक कार्यभाग घडोन येत नाहीं. बरें; मुख्य गोष्टी तुमची कृपादृष्टी मात्र असावी. ज्या स्थळी आसाल तेथून अवलोकन केल्यास काये येक नव्हे?

येविशीं परिहार ल्याहावा यैसें नाहीं. प्रस्तुत राजश्री गोविंदरावजीस आमचेविसीं राजश्री नानांची व बाबांची पत्रे घेऊन पाठवावी कीं दरबारीं पदोपदीं आमचें साहित्य करीत ते केले पाहिजे. येकदेसी साहित्याचा मजकुर आस्ता तरी तेवढाच आपल्यास लिहिला जाता. कानूकाइद्याचे कित्तेक पांचपेंच आहेत त्याचा तपसील कोठवरी ल्याहावा? आपण येथे असतां सविस्तर निवेदन केलेंच आहे. सारांश या गोष्टीने आमचा बंदोबस्त होऊन ये तें करावें. अभिमान धरिल्याची शिर्त[१] हेच आहे. सध्या गोविंदरायांस पत्रें आगत्य पाठऊन द्यावीं आलाहिदा मसुदे करून पाठविले आहेत त्याप्रो पत्रें देविलीं पाहिजेत. आम्हास सर्वप्रकारे भरंवसा आपला; आपण गेलेत, आमचे उणे पडले यैसे समजणार समजले. आता अभिमान धरून आरंभिले सेवटास नेणे उचित आहे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Mahipatrao Sumant requests Nana Purandare to support consistently his cause before the Peshwa.*

---

१ कर्तव्यता, नियम.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

२४

पश्चिमकिनाऱ्यावरील पेशव्यांच्या हालचाली

(१७४०-१७७२)

[किंमत—४ रुपये २ आणे किंवा ७ शिलिंग]

संपादक—**गो. स. सरदेसाई**, बी. ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३२

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

THE PESHWA'S COMMITMENTS ON THE WEST COAST.

Even though it may be doubted whether Shivaji ever actually contemplated a Hindu Empire he certainly tried to establish an independent position for the whole of the Maharastra. The west coast formed not the least important of the territories he coveted. He had the shrewdness to avoid hostilities with the two European nations, the Portuguese at Goa and the English at Surat and Bombay, and aimed only at destroying the power of the Sidi whose heroic struggle with the Marathas is narrated in a separate selection of this series. By the time Peshwa Balajirao came into power, he had to face many important problems on the west coast, where the recent conquest of Bassein had to be consolidated, and the defiant Angria brothers pacified. During Shahu's lifetime, however, the Peshwa, having no final authority, could not accomplish much, as the two queens of Shahu, as well as Sambhaji of Kolhapur and others, interfered with his plans. After Shahu's death affairs for a time drifted, though the Peshwa never completely lost touch with them. But they assumed an aggravated form when the Savants of Wadi who were attacked and nearly exterminated by the Portuguese and Tulaji Angria in concert appealed to the Peshwa for help. That help was given and the Portuguese were easily quelled, and Ramaji Mahadeo, the Peshwa's chief officer, managed to capture many of their smaller forts and minor possessions. The Sidi of Janjira and the Angrias, however, continued to give trouble; how they gradually drifted into war with the Peshwas is well illustrated by the full letters of Ramaji Mahadeo (Nos. 98, 108). The Angrias were finally crushed in a memorable campaign during 1755-56 with the help of the British Fleet. In the absence of sufficient evidence it is difficult to decide how far Tulaji Angria was responsible for his misfortunes. The manner and tone of some of his letters herein printed show that he had a strong case. Ramaji Mahadeo's letters on the affair are full and interesting.

Another episode of interest is the capture of Surat by the English on 4th March 1759. Surat for a time became a hot-bed of intrigues between the English, the Marathas, the Sidi and the local officers of Surat out of which the English emerged triumphant. While the Marathas stood wavering as to the course to be adopted, an English squadron entered the River and battered the walls of Surat castle and driving the Sidi before them occupied the City and had their nominees appointed as officers.

The siege and capture of Underi, which was to form the prelude to a campaign for finally wiping out the Sidi has also been touched in some of the letters.

Owing to many important dates having been corrected while the selection was going through the press, the chronological order of the papers is unavoidably disturbed in some places. This, it is hoped, will not entail any serious inconvenience to the student.



रेवेसीश्रुतहोयेहे वीनती

Facsimile of the handwriting of Tulaji Angria. *(Died in 1769.)*

No. 175

जनार्दन बल्लाळ यांचें हस्ताक्षर.

Facsimile of the handwriting of Janardan Ballal. *(Died in 1756.)*

No. 1] [Recd. 19-11-1739 ?

छ २८ साबान

श्रीरामचंद्र.

पुरवणी राजश्री चिमाजी आपा
स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. राजश्री संभाजी आंगरे सरखेल यांकडील बोलीचालीचा विचार लागला आहे. रा सुभानजी गांठे आम्हांकडे पाठविले आहेत. ऐसियासी त्यांच्या चितांत आहे जे राजश्री राऊ प्रधान याणी आपणास इमान शफत देऊन यैसा अविवेक करावा यैसे नव्हतें. कैलासवासी राजश्री बालाजीपंत नाना यांचा व राजश्री कानोजी आंगरे सरखेल यांचा स्नेह अकृत्रिम बुधीने चालत आला. त्यांजमागें राजश्री राऊ वडील आम्हांस आहेत. त्यांणी आम्हांवर दया करावी. आमचे चाकर आपले पदरीं घेऊन त्यांचा अभिमान धरून आम्हावर अवकृपा करावी यैसा अर्थ नाहीं. रा आणाजी साटम याणी इमान क्रिया देऊन विश्वासघात केला. कारकून व सरदार धरून नेले. त्याउपरी राजश्री रघुनाथजी येऊन कौलाची खेडी मारून नेली. रयत नागविली. यैसा कहर मांडिला आहे. वेदमूर्ती राजश्री बापूभट बरवे आपणाकडे व साता(री)यास उमरजेस महाराजांकडे पत्रें पाठविलीं आहेत. उपायास त्यांणी अंतर केले नाहीं. आम्हांस हाली पत्रे पाठविलीं आहेत जे, तुम्ही मध्यस्त होऊन राजश्री राऊ प्रधान यांचा आमचा विवेक करून द्याल तर आपण मान्य आहों. बोलीचालीचा अर्थ मनास आणितां रा आणाजी साटम व वरकड आपले निसबतीचे सेवक आहेत त्यांस हुजूर आपणाकडेस न्यावे. बलैवंतगड[1] तुम्ही आपले स्वाधीन करून घेणें म्हणिजे आम्हास इतबार वाटल. रा विसाजीपंत व आपणाकडील लोक धरून नेले आहेत ते बावडेयास आणवणें आणि राजश्री रघुनाथजी यांचे कबिले सोडून तुम्हांकडे बावडेस पाठऊन देतों. यैसा मुद्दा त्यांचा आहे. यैसियांसी आपण हाली राजश्री बालाजीपंत याजबा कितेक अर्थ सांगोन पाठविला व पत्र पाठविले तेंच बजिनस विजयदुर्गास पाठऊन बोलीचालीचा दढाव करून मागाहून रा बालाजीपंत यांसी व रा संभाजी पडवल यांसी पाठऊन देतो म्हणजे सकल अर्थ श्रुत होईल. वाडीहून पत्रें राजश्री फोंडसावंत सरदेसाई व राजश्री सुलतानजी रायजादे यांची आम्हांस आली आहेत.

१ ठाणें. शहापूरच्या इ. २५.

त्यांचे आमचें दर्शन व्हावे यैसा प्रसंग आहे. घडोन येईल तें लिहून पाठऊं. कृपा[1] आसो दीजे. आम्हास आधार व भरवसा स्वामीचा आहे. आपले आज्ञांत आहो. आमची विनती चालवीत जावी. हे विनंती.

¶*Bhagwantrao Amatya writes to Chimaji that Sambhaji Angria sincerely desires to come to an amicable settlement with the Peshwa.*

No. 2] [*Received on 3-4-1740*]

पौ छ १६ मोहरम

श्रीशंकर

विनंती उपरी आपण पत्र पाठविलें प्रविष्ट जाहालें. लिहिलें वर्तमान अवगत जाहालें. लिहिलें कीं, कालीं गलबतांवरी मारगिरी करून दोन गलबतें माघारां फिराविलीं. गोलंदाज ठार पडिला म्हणून लिहिलें. त्यास उत्तम गोस्टी केली; परंतु जेणेंकरून खाडी बंद होये, स्वामिकार्य होऊन येईल ते गोस्टी करणें. तीनसें बरखंदाज व संभर स्वार आले आहे; त्यास भरतीहि आली आहे. लगट करून खाडी बंद व्हावयाचा विचार करणें. राजश्री रामाजीपंत दिवाण अद्याप माखजणास आहे. राजश्री विसाजीपंत रत्नागिरीस आले आहे. त्याची याची भेटी जयेगडीं होणार. भेटीनंतर विजयदुर्गास जावयाचा विचार होईल, अथवा राजश्री संभाजी आंगरे सरखेल याचा आगमनाचा विचार होईल. जो विचार होईल तो राजश्री रामाजीपंतां पत्र आलियावरी लेहून पाठऊन देऊं. कृष्णाजीपंताबराबर निरोप सांगून पाठविलात, त्याच्या विचारणांत आहों. जो मजकूर होईल तो लेहून पाठऊन देऊं. बहुत काये लिहिणें[+] हें आशीर्वाद.

¶*The writer congratulates the addressee on defeating the enemy and repulsing his ships and orders him to blockade the creek. He promises to write to him about an interview between Ramajipant and Visajipant.*

No. 3] [*26-3-1741 ?*]

पौ छ १६ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. मुंबईहून पत्र आले की, संभाजी आंगरे कुलाबियाचा बारियावरी आला आहे. त्यासी काये विचार हे न कले; तरी याचा काये विचार ते लिहिणे.

---

१ पत्र भगवंतराव अमात्य यांचें. + येथून पुढील मजकूर बाळबोधींत.

त्यावरून त्याजकडे कारकून रवाना केला असे. जबानीने चार गोी[1] सांगोन पा आहे की, त्यांचे हर्त्र[2] कोणीकडे आहे, हे चितांतील गोी कळेल. त्यसी कारकुनाबाा याचे जाब होईल तेहि मागाहून आला म्हणजे रवाना करतो. लोकाची रवानगी करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev to Nanasaheb, promising to find out the intentions of Sambhaji Angria and report on his movements.*

No. 4] [*16-4-1741*

श्री

राजश्री बालाजी पंडित

प्रधान गोसावी यांसि

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो तुळाजी आंगरे सरखेल रामराम विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवणें परमाश्चीर्य भासलें; सारांश, अंजनवेल गोवलकोट घेतल्यावरी राजदर्शनास यावें हा हालीचा निश्चय स्वतसिध केला असतां निभावणी न जाली. रायगड प्रांतीं उपद्रव होता यास्तव तेथील बंदोबस्त करावयाची आज्ञा आम्हांस निक्षूणतेनें केली आहे, यैशियास, उभयपक्षी अविनाभावें घरोबा चालत आहे यास्तव हें पत्रलेखन केलें आहे. तरी रायगडचे तालुकेयाचे माहाल माहाड, बिरवाडी, नातें, कोंढवी, तुंडील आदिकरून याचा शामलाचे तालुकेयाचा यैवज मागों नये, दरदिवा येथील लोक उठवावे येदर्थी विस्तारें लेखन केलें. यैशास येतद्विषयींचा साकल्याभिप्राय आपणांस अवगत आहे. किले कोटाचा यैवज न मागावा हे गोष्ट आपल्या तऱ्ही चित्तास येईल आणि आपण आम्हांस लिहितील यैसें नव्हतें. तत्रापि दरबार आहे, पांचपेंच पडतच आहेत. वरकड किले कोटाचे तनखेयाचा व बंदर किनारेयाचे जागे जंजिरेयाचा सर्व अनुभव भगवदिछेनें आपणांस घडला आहे. तशाहिमध्यें या क्षेत्रींची प्रजा अनुत्पन्न, किले कोटाची उपजीविका येथास्थित जाली पाहिजे. आपण सर्वज्ञ आहेत. लिहिल्या अर्थाचें मनन करून दरबारी निशा करावया मनसब्याचे साभारी (?) आम्ही गोसावियास

---

[1] गोष्टी. [2] हार्द्र=अंतःकरण.

लक्षिले आहे, तेथें विस्तार काशास ल्याहावा ? आमचा संकल्प आपल्याखेरीज आहे यैसें नाहीं. रवाना छ ९ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें ? लोभ असो दिल्हा पाहिजे, हे विनंती.

¶*Tulaji Angria writes a mild protest to the Peshwa against the latter's orders which, the writer urges, are impossible to carry out. The letter shews how the breach gradually widened until an open conflict broke out.*

No. 5] [*20-4-1742 ?*

पौ छ २७ सफर

श्री

सेवेसी विनंती. मानाजी आंगरे राजदर्शनास येतात हे वर्तमान पूर्वी सेवेसी लेहून पाठविलेंच आहे. आजी छ २५ सफरी तलेगावांस आले; तेथून पुढे येतील. सेवेसी विदित व्हावे याकरितां लिहिले आहे हे विज्ञापना.

¶*Manaji Angria comes for an interview with the king probably in order to receive the robes of investiture after his brother Sambhaji's death which took place on 12th December 1741.*

No. 6] [*4-9-1744 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव प्रा। ठाणें साष्टी चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ८ शाबानपर्यंत स्वामीचे कृपावलोकनें-करून येथील वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामीचें आज्ञापत्र सादर तेथें आज्ञा कीं आपला हिसेब कितेब घेऊन हुजूर येणें. त्यास आज्ञेप्रमाणें भाद्रपद शुद्ध तृतीयेस रात्रौ मुहुर्तेंकरून राजश्री गंगाधरपंत यांचें वरीं आलों. तेथून निघोन यावें त्यास राजश्री शंकराजीपंताचीं पत्र तीन च्यार वसईहून आली कीं वलंदेजांस दवण फिरंग्यांनीं देऊं केली. सुरतेहून पांच तरांडी लोक भरून वलंदेजानी रवाना केलीं असेत, दवणेस येऊन दाखल होतील. फिरंगी व वलंदेज येक-विच्यारें आहेत म्हणोन सुरतेहून लिहिलें आलें आहे, तरी तुम्ही तूर्त हुजूर न जाणें. हें वर्तमान हुजूरहि लिहिलें आहे. टोपकराचें वर्तमान येथातथ्य कळल्यावरी जाण्याचा विचार करणें म्हणोन तीन पत्रें आलीं. त्याजवरी काल

छ ७ मीनहूस दोन प्रहरीं पत्र आले कीं यांचा जहाजावरी पांच सातशें वलंदेजाचें माणूस दवणेस येऊन दाखल जाहालें. खुशालीच्या तोफा कोटावरील व जहाजांवरी जाहाल्या म्हणोन इंद्रगड वगैरें जागांचीं पत्रें आलीं. बातमीस माणसें पाठविलीं आहेत. वर्तमान तथ्य केलें तोंवरी न जाणें म्हणोन लिहिलें, त्याजवरून च्यार दिवस राहावयाचा विचार करून राहिलों आहों. प्रथम सावकारी मुंबईची बातमी तरी वलंदेजांनीं वखारींस जागां दंवणेंत मागितली ते सावकारीचें अमदरत्फीकरितां देणार म्हणोन मुंबईकर महमद सोफी पलवकर वगैरे सावकारांनीं वर्तमान सांगितलें होतें. सांप्रत शंकराजीपंतास सुरतेचें लिहिलें आलें, त्याजवरून त्यांहीं आम्हास लिहिलें; परंतु आम्हास सावकारी मुंबईची बातमी जाली होती. ते पुन्हा चौकस करावयासी मुंबईस शाहाणा माणोस पाठविला आहे. येकदों दिवसां येईल. इतक्यांत शंकराजीपंताची माणसें बातमीस गेलीं असत तेहि येतील. वर्तमान येथातथ्य काय तें कळल्यावरी दोंचहूं दिवसांत निघोन येतों. राजश्री नारो बलाल याजबराबर कागदपत्र पुणियास रवाना केलें तें जाऊन दाखल जालेच असतील. आम्ही दोनच्यार दिवस वर्तमान कले तोंवरी वाट पाहून येतों. वरकड जागां जागां बंदोबस्त उत्तम प्रकारचा केला असे. राजापूर प्रांतास लोक पाठविले आहेत. त्यासी पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo informs the Peshwa that he has been detained on the way to Poona owing to news of the advance of the Portuguese and the Dutch forces against the Marathas.*

No. 7] [22-4-1753

श्रीआईआदिपुरूष

सेवेसी विज्ञापना. ताा छ+ १७ जमादिलाखर मंदवासर मुकाम कसबे राजापूर साहेबाचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असें विशेष. साहेबाचे आज्ञापत्र सादर होऊन सांप्रत परामृश होत नाहीं. तेणेकरून चित सापेक्षित आसे; तरी यैसे नसावें. निरंतर आज्ञापत्र सादर करून सेवकाचें सांभाल करणार धणी समर्थ आहेत. प्रस्तुत इकडील वर्तमान तरी अंगारकाकडील भले माणूस व कारकून मध्यस्तीस आले. बोलाचाली होऊन विशालगडचा तहरह जाहला. इकडील मुद्दे हांसील जाहालें. त्याची भेटीची आर्त चितांत होती. कितेक ममतेच्या गोष्टी सांगोन पाठविल्या, त्यावरून भेटीचा सिधांत जाहला. छ १५ रोजी गुरुवारी मौजे येरोली येथन कूच करून सडे स्वारीनिसी मौजे सवदल

+ शाहू रोजनिशी, पृ. १०८ पहा.

येथें येऊन मुकाम केला. दुसरे दिवसी शुक्रवारी प्रात:काली तेथून कूच जाहले. राजश्री तुलाजी आंगरे सरखेल पुढें श्रीगंगेवरी आलें. दाहा घटिका दिवसास भेटीचा समारंभ जाहाला. भेटी जाहल्या. साहेबास विदित व्हावे यास्तव सेवेसी लिहिले असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Pratinidhi writes about the peace proposals received from the Angria regarding the settlement of Vishalgad, and his visit with Tulaji Angria.*

No. 8] *[25-4-1753*

पैवस्ती छ २६ जमादिलाखर

श्रीआईआदिपुरूष

सेवेसी विज्ञापना. ताा छ २० जमादिलाखर सौम्यवासर मुकाम मौजे येरोली[१] नजीक प्रभावल साहेबाचें कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असें विशेष. राजश्री तुलाजी आंगरे सरखेल याच्या व आमच्या भेटी राजापुरावरी श्रीगंगेसनीध जाहल्या, येविसीचे वर्तमान सेवेसी अगोदर लिहून पाठविले होते, त्यावरून श्रुत जाहले असेल. प्रस्तुत वर्तमान तरी परस्पर बहुमान वस्त्रें होऊन, साहेबाचे पुण्यप्रतापेंकरून संरेश[२] उतमच जाहला. कितेक घरोबियाच्या गोष्टी, व साहेबांच्या पायासी येकनिष्ठता, व धणियाच्या राजास उपयोगी यैशा कितेक गोष्टी बहुत लीनतेने बोलिलें. त्याची निष्ठा साहेबाच्या पायासी बरीच आहें; दुसरा विचार किमपि नाहीं. साहेबींही त्याजवरी कृपा करावी. पांच रोज आमचा मुकाम ते स्थलीं होता. आजी प्रात:काली त्यासी विजेयदुर्गास जावयास निरोप देऊन, आम्हीं कूच करोन या मुकामास दोन प्रहरी दाखल जाहालों. उदैक फौज आंबेयाच्या मार्गे लाऊन देऊन, आम्ही सडे स्वारीनिसी किले विशालगढास जाऊ. सत्वरीच त्या प्रांते सेवकाचें आगमन होईल. चरण दृष्टीस पडतील तो सुदिन असें. वरकड सविस्तर दर्शनांती निवेदन होईल. पुढे कितेक मनसबा कर्तव्यार्थ व्हावयाचा आहे. राजश्री तुलाजी आंगरे सरखेल याणी शाहेबांच्या दर्शनास यावें हाहि करार जाहला आहे. सेवकास चरण दृष्टीस पडतील, तदनंतर सेवेसी विदित होईल. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*The Pratinidhi reports his interview with Tulaji Angria and communicates to Shahu his favourable impressions about him.*

---

१ हल्लीं वेरवली. २ सौरस्य, स्नेह.

No. 9] [22-1-1753

श्रीभवानी प्रसन्न

सेवेसी विनंती. सेवक येमाजी सिवदेव कृतानेक विज्ञापना. ता। छ १६ रबिलौवल मुकाम कडेगाव साहेबाचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. साहेबी आज्ञापत्र पाठविले तेथे आज्ञा जे किले विशालगड येथे असंमतादभागे राजश्री तुलाजी आंगरें यानी वेढा बसहून जागियास अपाय करावयाचा योजिला आहे; तरी तुम्हीं अविलंबे जाऊन वेढा उठऊन, पारपत्य करणें. तुमच्या साहित्याविसी राजश्री स्वामीस व राजश्री उदाजी चव्हाण यासी (व) राजश्री मालोजी घोरपडे यांसी पत्रे पाठविली आहेत. तेहि सामील होतील. तुम्हीं जाणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे सेवकानी श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि यांस विनंती करून सिधता केली आहे; परंतु राजश्री पाराशरवांसी यांची फौज, व राजश्री उदाजी चव्हाण, व समस्त कटक जमा होऊन, मिरजे सभवत्या खंडणिया घेऊन मिरजे नजीक बसले होते. त्यास दबाव घालून, फौजेत फूट करून राजश्रीस बहुता प्रकारें सांगोन पाठवावयाचे पाठऊन, मिरजेचा शह उठऊन म्हैशालावरी मुकामास लाऊन दिले. तेथूनहि परस्परे बिघाड योजून, स्वस्थलास जावयाची योजना केली आहे. आजी उदियाच्या दिवसात हिकडील निश्चिति करून, मिरजेचे संरक्षण जाले यैसे दृढोतर करून, कूच करून, आंगरकाच्या पारपत्यास आज्ञेप्रा। जाऊ. सर्व साहित्य करणार साहेब धणी आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Yemaji Shivdeo promises that as desired he will at once proceed against Tulaji Angria who is contemplating laying siege to Vishalgad.*

No. 10] [11-5-1746

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वा-
मीचे सेवेसी

विनंती. सेवक राघो केशव कृतानेक सां। नमस्कार विनंती. सेवेसी विज्ञापना यैसी जे, सेवकाचे वर्तमान जेष्ट शुद्ध द्वितीया भानुवासर मु॥ महाड येथास्थित आसे विशेष. छ २४ राखरी स्वारीस गेलो, तो मंडणगडाआलीकडें दो कोसावर खाडींत दंर दिवा मेंट आंगरें यानी बांधलें आहे तेथे सात आठ गलबतें येऊन राहिलीं आहेत त्यांतील लोक बाहेर निघाले. त्यांजवर रा

2719

मानाजी पायेगुडे यानी आपणांस सांगो पाठविलें कीं, उठावे त्याजवरून आपण उठलों. लोक बाहेर निघाले होते ते मोडून खाडींत घातले. तेथे गलबतातून मार बहुत जाला; आणि लोकांनी आपली शर्त केली; परंतु कोणास कांही लागलें नाही. रा माणकोजी कोकरे याचे घोड्यास गोळी लागली; परतु घोडा शाबूत आहे. या उपरी डोंगरातून आगरें यांकडील से दीडसें माणूस आले, ते हशम लोकानी मोडून घातले. जाहाले वर्तमान सेवेसी लिहिले आसे. सेवकाची रोजमरियाची बेगमी छ १३ जावलपर्यंत केली होती. पुढे रोजमरा द्यावयाची आज्ञा केली पाहिजे. हे सेवेसी विज्ञापना.

¶Ragho Keshav in a letter to the Peshwa gives an account of a skirmish between the Royal forces and those of the Angrias.

No. 11] [*26-10-1746 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक नारायेणजी नाा अणजूरकर सर पाटील चरणावर मस्तक ठेऊन साा दंडवत विनंती. ताा छ २१ सवाल पावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र आले कीं, गनिमाचे बातमीचे वर्तमान वरचेवर आणऊन लिहित जाणे. आज्ञेप्रमाणें गोव्याकडील वर्तमान आणविले असे. सेवसी श्रुत होये. गोव्यासमीप मुरूमगाव म्हणून आहे, तेथे पुरुतकालाहून पातशाही रक्ताचा मातबर फिरंगी येऊन राहिला आहे. त्याजबराबर फौज +ढोणे सुमार ६००० सा हजार आहेत. मागोन दुसरी साहुकार गोंपे[१] येणार. त्याजमध्ये च्यार हजार ढोणे येणार आहेत. त्यांचा मार्ग लक्षित राहिला असे. रेढीकरासी व गोवेकरासी युध्ये लागले; परंतु तो पुरुतकालाहून फिरंगी आला आहे, त्याणी कांहीं गोवेकराची मजत केली नाही. सवासे माणूस मात्र दिल्हे होते. तितक्यानीच रेढीकरावर इतका उपद्राप केला व मुंबैस ज्यावदेसोज फरास फिरंगी आहे. त्याणी दोन गुराब तयार करून आणीक धाकट्या गलबतांचे सज सरंज्यामामध्ये आहे. माणकोजी परभू मुंबैकर त्यास ज्यावंदेसोज फिरंगी याणे राजश्री आंगरे याजकड पाठविला होता, त्यासी बोली केली आहे की, तुम्ही आमचे

+ परकी खलाशी. Don ?

१ जहाजाचा प्रकार ?

साहित्य करावे. आमचे कार्यें जाल्यानंतर रेवदंडे तुम्हास देऊन. ऐसी बोली करून मुंबैस आला. मुंबैहून ज्यावंदेसोज मजकूर याणी गोव्यास माणकोजी परभू मजकुरास पतिमारी देऊन रवाना केला आहे, तो अद्याप आला नाही. हे वर्तमान तेथे आहे. गोव्याकडील वर्तमान तरी स्वामीस तिकडून येतच असल. ऐसे असोन राजश्री रामाजीपंत येथील अमलदार यांसी बहुत दिवस लागले कां जर पाण्यातील गनीम केव्हा काये होईल हे न कळे. परंतु भरवसा समर्थ सेवकास आहे की, स्वामीचे तेज्यापुढे कोन्हाचे कांही चालनार नाही. हाच द्रुढ निश्चय धरून चिताचे समाधान करून खुशाल आहो. प्रांत मजकूरचे वर्तमान येंदा ह्स्तीचा प्रजन्ये येकंदर पडला नाही, तेणेकरून पिके दगावली. रयेत तो नातवान तजावजा जाली आहे. हे जागे जंजिरे येथील रयेत तेच स्वामींचे धन, येदर्थी विस्तारे सेवकानी काये लिहावे. रयेतचे प्राक्तन कमी म्हणून स्वामीचे पाये या प्रांती लागत नाही. येकवेळ या प्रांती पाय लागल्याविणा रयेतेचे बरे होत नाही. फिरंग्याचा धारा कठिण होता. कुलाब्यास निमे दाणा राहात नाही. जे होईल ते न्यावे. पुन्हा खाया खर्चास द्यावे ऐसे करून सारे फिरंग्याचेच घरी जात असे. ह्या साऱ्या गोष्टी श्रीमंत कैलासवासी याही ध्यानास आणून अभये दिल्हे होते की, फिरोन आल्यावर नवाच धारा बांधोन देतो. कुलब्यास दोन भाग राहेते, आणि सरकारांत येक भाग होई, ऐसे अभये होते, ते गोष्ट तैसीच राहिली. ऐसे असोन, येंदा पाण्याणे दगावले आहे. त्यास हुजुरून येक कारकून येऊन, पिके मनास आणून, काही उस्तवारी रयेतीची करणार स्वामी समर्थ आहेत. नाही तरी येंदा रयेतीचा कठिण काल आहे. सेवसी श्रुत होये. चकोरें चंद्राप्रती लक्षितात तद्वत स्वामीची वाट बहुत जन पाहातात हे विज्ञाप्ति.

¶*Narayanji Anjurkar to the Peshwa, reporting the preparations of the Portuguese against the fort of Redi and the Peshwa. The Portuguese had received fresh reinforcements from Europe and were trying to win over the Angrias. The writer reports a failure of crops owing to a shortage of the seasonal rains.*

No. 12] *[8-11-1746 ?*

श्री

राजश्री राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक नारायेणजी ना। अणजूरकर सर पाटील प्रांत साष्टी व तर्पे आटगाऊ दंडवत विनंती. ता। छ ९ जिल्काद पावेतो स्वामीचे कृपा-

अवलोकनें करून सेवकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. गनिमाचे बातमीचे वर्तमान: गोव्यांस फिरंग्याचा जमाव १९००० येकूणीस हजार माणूस जमा जाले आहे, त्याजपैकीं रेंढीवर कांही गेले, कांही गोव्यांत आहेत. ज्यावंदेसोज फरास फिरंगी मागाहून मुंबैस ठेविलाच आहे; तो सज संरजामामध्यें आहे. गोव्याहून चहूं लक्ष्याचा दारूगोला त्याजवल आला. मुंबैस येऊन दाखल जाहला. फरसेस व फिरंगी येकहाती आहेत. फरसेसासी व फिरंगी पातशासी सोईरीक जाली. फरसेसाची बेटी पुरुतकालचे पातशास दिल्ही.+ फरसेसानी आंदण बेटीस मुंबै सोडऊन द्यावी म्हणून संकल्प केला आहे. फरसेसासी व इंग्रेजासी काही वैरसमंध होता म्हणून इंग्रेजांची[1] मदरास चढाई करून घेतली. त्याजवल माणूस चोवीस हजार बरकंदाज आहेत. मदरास घेऊन तालचिंढीवर गेला आहे. तालचिंढी सोडऊन मुंबै यावे. मुंबैस घ्यावी आणि फिरंग्यास आपण द्यावें यैसी दाट खबर आहे. मुंबैस हवेल्या व झाड कोटाजवल होतीं ती तोडफोड करितात. काम तडक लागले आहे. इंग्रेजहि भयाभीत आहे. तीं कांही भेट घेऊन स्वामीजवल मदत मागायासी येणार यैसा मनसबा केला आहे; परंतु ते गोष्ट लटकी, गनिमाची मात्र आहे. मदरास घेतली खरीच; परंतु अंत:स्ते समजले फिरंगी फरसेस इंग्रेज येकत्र होऊन प्रांत मजकुरचे विचारावर आहेत. बाहेर नाना प्रकारच्या कावा दावितात; अंतस्ते यैक जाले आहेत. गोव्याहून मुंबैस ज्यावंदेसोज फरास याजवल रुपये पाठविले कीं दोन हजार मुडे भात फासेसाठी घेऊन ठेवणें. रुपये मुंबैस आले. इंग्रेजाची गुराब राजश्री तुलाजी आंगरे याणी धरिली होती, ती येक वरीस त्याजकड होती. ती माणकोजी परभु पाठऊन सोडविली. ज्यावंदेसोज मजकूर यासी दरम्याने घालोन यैक्य केलें. फिरंग्याची मदत अंत:स्ते करावी, सांवताचा किला निहेटगड व आणिक येक किला घाटमाथा आहे तो व प्रांत मजकूरचे उरण यैसी तीन ठिकाणें मारनिलेस द्यावी, यैसा करार जाहला आहे. गनिमाची नेमणूक येणेप्रमाणे जाली आहे. दोन हजार माणूस व तीन फरगादे येसवंतगडास जावे. दोन हजार माणूस उरणावर, व दोन हजार माणूस बेलापुरावर, व ठाण्यावर येतां मौ कानझूर येथे फौज उतरोन तीहि चहू ठिकानी येकदांच येलगार करावा. मुंबैस तीन कोट आहेत; त्यास मध्यें कोट आहे, त्यात रणगाड चालावयाचे तयार करितात. तेथे कोन्हास जाऊं देत नाही. हे वर्तमान खरे आहे; व फिरंग्याचें द्रव्य काही सुरतेस गेले आहे; तेथे जमाव होत आहे. फिरंग्याचा जमाव येकूणीस हजार व फरसेसाचा जमाव चोवीस हजार येकूण-

+ This seems to be the daughter of Louis XV of France (1715-1774). (1) Madras was captured by Labourdonnais on 15th October 1746.

च्यालीस बेतालीस हजार बरकंदाज; अगीचा पूर त्याचा मोहली कोन्ह घेईसा आहे? हे वर्तमान मुंबैकराचे कारभारी, आमचे इस्टमैत्र येऊन सांगतात कीं नाईक तुम्ही सावद होणे. श्रीमंत स्वामीस ईश्वराने फार दिल्हे आहे; परंतु तुमचे घर बुडते आणि केले कर्म व्यर्थ जातें म्हणून आप्तविशयी आहेत ते येऊन सांगतात. साताऱ्याचे वर्तमान घडीघडीचे जे होतें ते त्यास दाखल होते, यैसी बातमी मुंबैकरानी राखिली आहे. आम्हीहि त्याजकडील बातमी वरचेवर आणवितो आणि धन्यास लिहितो. या पत्रासुध्धा तीन पत्रे बातमीची सेवेसी रवाना जाली. आतां सेवकाचे लिहिलें खरे वाटत नसेल. या गोष्टीनें सेवकानें काये करावें ! स्वामीनें सेवकाचे वचनावर सामर्थ वेचोन सेवक खरा केला तो सेवक आज चिंतेचे पुरी पडला असें. हे जागे धन्याचे तपोबलेकरून हाती चढले; यांची बंदोबस्ती न करिता दगा आहे. मग ब्रम्ह्याचा उपाये नाही. स्वामी देसच्या किल्यासारखे समजत आसतील, तरी तैसा विचार नाही. हे केवल चक्रयुद्ध, टोपीकरास सर्व कुळेंस आहेत. मुसकील हेच कीं पान्यातील गनीम; केव्हा काये होईल हे न कले. ज्यावंदेसोज मजकूर मुंबैकर याजवल कौल देखील *रयेतीस आले कीं ज्याचा श्वधर्म त्याणी चालवावा. फिरंग्याचे वेलेचे जे जे लोक आहेत, ते त्यास इछीतच आहेत. सेवेसी श्रुत होई हे विज्ञाप्ति.

¶Narayanji Naik Anjurkar warns the Peshwa of the secret preparations for a resumption of hostilities between England and Portugal on the West Coast. Apparently an alliance between Portugal and France for the purpose of restoring Bombay to the former was being discussed. It was even rumoured that the King of France proposed to marry his daughter to the King of Portugal! Probably all this refers vaguely to abortive negotiations which took place just before the treaty of Aix la Chapelle (1748) when the French had taken Madras.

No. 13] *[1746*

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना. आज्ञापत्र सादर जाहाले. सिरसा वंदिले. राजश्री वजारतमाब यांजवल तुम्ही नसावेत, यैसे वजारतमाब यांचे चितात नसेलच. तुम्ही तेथे राहून हुजूर यावयाचे न करिता सर्वहि करीत जाणे, म्हणोन कृपालु होऊन आज्ञा केली. ऐशास राजश्री वजारतमाब साहेब धणी खावंद आहेत. कैलासवासींने सेवक (लो)क पदरी बालगिले, व स्वामी समर्थाचे सेवसी (से)वक लोकाची निष्टा रुपास येत गेली आहे. त्या लोकाचा संग्रह करावा हाच

१ कृप्या.

मनोदये मन:पूर्वक वजारतमाब साहेबाचा आहे; व याच प्रो आज्ञाधारकाचा सांभाल करून, स्वामी खावंदाचे आज्ञेप्रमाणे कैलासवासीजवल सांगत व बोलत आलो होतो. विस्वास मानोन वर्तत आले. स्वामीचे कृपेस पात्र जाहाले होते, त्याच रीतीने वजारतमाब विश्वास मानोन, स्वामीकार्याची पैरवी करीतच आहेत. मजला सनिध बालगिलेच आहे. तथाप स्वामी समर्थाचे जागे जंजिरे पदरी आहेत. संवसार वोढीस पडला असे. धणी सरंजाम करितात. यातच न्यून पूर्ण करून जागे जंजिरे यांचे संरक्षण करावे. मोहीम प्राप्त जाहाली आहे. येथे सेवा चाकरी करून दाखवावी. कामी निकामी माणूस पाहून, कामी असेल ते चाकरीस उमेदवार करून, शामलाचे पारिपत्याचे कार्यामुले कार्याच्या माणसास आधी देणे, सरस पाहून द्यावे. मागाहून देणे, त्यास मागाहून द्यावे. कैलासवासी वर्तमान असता मोठी मोठी कामे करीत आले. त्याच्या मागे शामलाचे गलबत धरून आणिले, ते आणावे म्हणोन धणी स्वामींची आज्ञा येतच आहे. त्या गोष्टी रूपास येत जाव्या म्हणोन आपआपले जागा धणी आमचे खावंद यजमान आम्हास चाकरास बोलतील. आम्ही चाकर व्यंगे असल ती येजमानास विनंती करूनच; व स्वामीने आज्ञाहि रुबरून केलीच आहे, त्याप्रो वर्तणूक करू जाता, येजमानजीची आज्ञा सेवकास, सेवकाची विनती येजमानजीस होतच आहे. अविवेकी लौकीक करितील की, खावंदा चाकराचे ठीक नाही. यैसा लौकीक माहाराजाचे सेवसी जाईल म्हणोन विनती लिहिली होती. आज्ञेप्रो निर्भयेपणे वर्तणूक करीतच आहे हे विज्ञापना.

¶*The writer (Narayanji Anjurkar?) assures the Peshwa of his loyal services and of his attention to the interests of Manaji Angria, the Vajarat-Mab.*

No. 14] [*6-2-1747?*

श्रीराम

श्रीमंत राजश्री बाबा

स्वामीचे सेवेसी

पोष्यांकित महिपतराव चंदो कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम फाल्गुण सुध अष्टमी सुक्रवार आपले कृपेकटाक्षेंकडून खानापूर सुखी असो. यानंतर गोवेकराचा निरोप घेऊन श्रीमंत राजश्री भाऊकडे जात असों. फिरंगी येकंदर मार्गास येत नाहीं. आपलीं जाहाजें देऊन सला करणें नाहीं तरी आम्ही मागत नाहीं. सावतानी रेडी देऊन फिरंगी सर केले आहेत. सोंधेकरास

खालेगड मर्दनगड सोडणे म्हणऊन तगादा लाविला तो आपली फौज आली याकरितां सर्व राहिले. घाटाखालील देव तमाम मोडले. सिणवीहि आपले यातीत घालतील; या प्रकारें गर्व जाला असे. जेव्हां गर्वभंग होईल तेव्हांच ठिकाण पाहतील; नाहींतरी वा१र घेताती. जबानी म्हणताती वसईस जात नाहीं. सावता हातीं न धरावें. जाहाजें द्यावें. श्नेह आहे. फिरंगी तीन हजार आहे. येक लडाई मारतील; मग सला होईल. आम्ही या प्रांतींच माईतदार, आम्हांस अस्ता करून सेवा घ्यावी. स्थल करून देऊं. पागा खानाचे स्वाधीन करून प्रांतीं सुभा सांगोन फौज देऊन उधार करणार आपण असा. रोजमरा करून पाठवावयास खस्त करणें. तैनात सेवा करूं तेव्हां करणे; तो पावेतो रोजमरा चालऊन कार्यभाग आमचे विचारे होये ते करावें. मी आपला चिरंजीव, स्थापना करावी हा जी२भे आमचे वडिलीं केला, आम्ही आपले पायास लागलेसा करावा, हा हेत धरितों; श्री इच्छा जाणे. वृत्ति आपले चरणी आहे हे विनंती.

¶*Mahipatrao Chando to Baba (Mahadoba Purandare?) from Khanapur, describing the aggressive attitude of the Portuguese towards the Savants, the Marathas and the Senvis of the Konkan and recommending the measures to be taken against them.*

No. 15] [*3-5-1747*

छ ६ जमादिलाकर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंती. तुळाजी आंगरे सरखेल आजी छ जमादिलाकरी बुधवारी प्रहर दिवस आल्यावर आले. माहारदऱ्यांत येवतेश्वराखालीं आले. राजश्रीस वर्तमान कळल्यावर प्रतिनिधि पुढें पाठविले. प्रतिनिधीस सागितले कीं तुम्ही जाऊन भेटा आणि सरखेलीस सणवारांत आणा. आम्हीहि येतो. त्यावर प्रतिनिधि पुढे जाऊन भेटून सरखेलीस- सणवारपेर्यंत आणले. वाघाजवळ आलियावर राजश्री पुढे गेले. तुळाजी आंगरे वाघाजवळ उतरून उभे राहिले होते. राजश्री जवळ जाऊन पालखीतून उतरले. तुळाजी आंगरे येकले मात्र पुढें येऊन पायावर डोकी ठेऊन मोहरा नजर केल्या. सोन्यारुप्याची फुले उधलीं. राजश्री चादर अंगावर घातली, तेच पालखींत बसोन सदरेस आले. सरखेल थोरल्या वाड्यांत मजुरयास गेले. देवढीवर बसले. सरखेलीनी बाईसाहेबास आर्जे सांगोन पाठविला कीं मी रुबरू पायावर डोकी

---

१ वारा घेणें = उन्मत्त होणें. २ जिमा.

ठेवीन त्यावरून बाईस परम संतोष जाहाला. सांप्रत तुळाजी आंगरे याजवर परम भक्त बाईची आहे. त्यास बाईनी रघुराजी वाग याजबो राजश्रीस सांगोन पाठविले की सरखेलीचा मनोदये रुबरू दर्शन घ्यावयाचा आहे. तेव्हा राजश्रीनी उतर केले कीं बेहतर यापरते दुसरे अधिकोतर काय आहे, सुखरूप जावें, म्हणून सांगोन पाठविलें. परंतु मनांत थोडकसे चिडले. सरखेल रुबरू जाऊन पायावर डोकी ठेविली. चादर अंगावर घातली. बहुत ममतापुरःसर भाषण बाईचें जाहालें. तदोतर धाकव्या देवढीस आले. देवढीबाहेरच होते. चादर बाहेरच घातली. विडे धाडून दिल्हे. तदोतर सरखेल निरोप घेऊन सरकारच्या वाड्यावरून माहारदऱ्यांत डेरे देऊन राहिले आहेत. सरकारचा (?) वाडा तयार करून ठेविला होता. परंतु सरखेलीबो कारखाना व खासा समुदाये फार, याजकरिता वाड्यांत न राहिले. मग आमचे काय जातें ? आम्ही खामाखा राहाच कशास म्हणावे ! राहते तर जागा करून ठेविलीच होती. सरखेल आले नव्हते, तेव्हां पुढे काही सामान पाठविले होते. ते लोक व गोण्या मात्र सरकारच्या सोप्यांत राहिले आहेत. कळले पा. याउपर होईल वर्तमान तें लिहून पाठऊं. सेवेसीं श्रृत होय ह विज्ञापना.

¶*Purandare to Sadashivrao at Poona, describing the visit of Tulaji Angria to Satara and his reception by Shahu.*

No. 16] [*29-5-1747*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव मुकाम साष्टी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २९ जमादिलावलपर्यंत स्वामीचे कृपावलोकनें-करून येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. किले माणिकगड येथील राजकारण भेदे येऊन सांगत त्यास हें वर्तमान सेवकानी येंदा हुजूर निवेदन केलेंच होतें. प्रस्तुत लाग्यानी येऊन कार्यसिध्ध होये ऐसें सांगितलें, त्याजवरून तीर्थस्वरूप राजश्री बालाजीपंत दादा व निलो विठल उरणास रवाना केले. तेथून लाग्या समागमे राजश्री शंकराजी नाईक बने व सुभानजी विस्वासराव वगैरे निवडूक माणूस पाठऊन आपण उपल्यास राहून लोकांची रवानगी केली ते छ २८ मिनहु रात्रीस किल्याखालीं जाऊन सिड्या बांधोन सा घटका रात्र असतां किला फत्ते केला. त्यास

किल्यावरील लोकानी चौबुर्जी बलकाऊन ह्वालदार व वीस तीस माणूस निटाऊन चालोन आले त्यास आपल्या लोकानी मर्दुमी करून मारून लाविले. ह्वालदार व पांच सात माणूस ठार जाले व दाहा वीस माणूस जखमी आहेत. इकडील माणूस स्वामीचे प्रतापेंकरून न दुखवितां चौबुर्जी आदीकरून किला फत्ते जाला. स्वामीस हर्षाचें वर्तमान कलावें यास्तव लिहिलें आहे. सेवक आजच किल्याचे बंदोबस्तास जातो, तेथून साद्यंत लिहून पाठवितों. सेवेसी श्रुत होये. पुढील बंदोबस्त होऊन राहिल्याचा परामृश जाहला पाहिजे; याचा अर्थ मागाहून पाठवीन हे विज्ञापना.

¶*Details of the betrayal of fort Manikgad are reported by Ramaji Mahadev to the Peshwa.*

No. 17] [*1-6-1747 ?*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

पोष्य अंताजी नारायेण साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता॥ छ ३ जमादिलाखरपावेतो येथास्थित असें विशेष. मोहनगज हती रा॥ मानाजी आंगरे यास स्वामीनी देविला तो छ ३० जमादिलवली त्यास दिल्हा व हतीचे लंगर वगैर सामान देविल्याप्रो॥ दिल्हे. त्याणी हती आणून मंगलवार पेठेजवल बांधिला. हती खेलवावयास मा॥रनिले खुद गेले होते ते आपले बिराडास आले. त्याजवर हती सुटला तेव्हा त्याचा माहात होता त्यास आटोपेना, याजमुले त्याणी हतीचे मागले दोन पाई बांधून ठेविले. दुसरे दिवसीं मा॥रनिलेनी आम्हां चिठी पाठविली कीं आपले माहात पाठऊन हती सुटला आहे तो बांधून देणे. त्याजवरून आम्हीं माहातास ताकीद केली की हती बांधून देणे. त्याजवरून दुसरे दिवसी येसजी तरडा व माहात कडबा येक वोझे घेऊन हती बांधावयास गेले ते समई मा॥रनिले हतीजवल होते. माहातास बोलो लागले की तुम्हीं श्रीमंत राजश्री नानाचे चाकर, तैसे आमचे चाकर; यैसे असता हती सुटला तो बांधावयास काये सबब न आलेत? यैसे म्हणौन सिव्यागाली दिल्ह्यां. दादू माहांताचा भाऊ मिया माहात यास मारहाण करू लागले; तेव्हा दादू माहात हतीवर होता; त्याणी उडी टाकून खाली येऊन सोडवावयास लागला. त्यासहि धकाबुकी जाली व येसजी तरडा सोडवावयास गेला त्यासहि याप्रमाणेच जाले.

त्याची हातवाई व याची तोंडघाई जाली; व दाहापांच याणी दगडहि मारिले. हे वर्तमान आम्हास कलतांच यांचे समाचारास माणसे पाठविली तो मानाजी आंगरे आपले बिराडास आले; तेव्हा येसजी व माहात आम्हाजवल आले आणि आम्हीं श्रीमंताचे चाकर असतां त्याणी मारिले. आपण चाकरी करीत नाही ऐसे कितेक बोलो लागले तेव्हा त्याचे कितेक प्रकारे समाधान करून येसजीस व माहातास पागोटी ४ च्यार बक्षिस दिल्ही आणि कारखान्यावर चाकरीस लाविलें. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Narayan describes to Nanasaheb a disgraceful affray between Manaji Angria and certain mahouts, provoked by the former's arrogant conduct.*

No. 18] [*5-6-1747*

पैवस्ति छ १३ जमादिलाखर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेशी

विज्ञापना तागायत छ ७ जमादिलाखर माणीकगडास लोक रवाना केले त्याणी जाऊन सिनेजोरी करून किल्ला फत्ते केला. वैशाख वद्य त्रयोदशी सोमवारी निश्चये होता त्यास पेणेस म्हैसीच्या कजियामुलें अंतर पडिलें. दुसरें दिवशीं जावे तो निभाव होऊन पल्ला हतास न ये, यास्तव लोकमार्गीच दबा देऊन राहून बुधवारचे रात्रीस किल्ल्याखाले गेले; जाऊन लागे हाताखालीं सापडऊन सिड्याचा सज करून किल्ल्यास लागले तो सूर्योदये जाला, तेव्हां निदान जाले कीं किल्ला घ्यावा तरीच नाहीं तरी मारून मरून खरे व्हावे. ऐसा निश्चये करून सर्व एकरूप जाले आणि एकाचे पाठीवर एक ऐशा दोन सिड्या लाऊन मर्दुमी करून चढोन किल्ला फत्ते केला. चौबुर्जीस गेले तेथें हवालदार व कांहीं लोक निटावून उभे राहिले, त्यास हवालदार व पांच सात माणूस ठार जाले; दहा पंधरा जखमी जाले. स्वामीचे प्रतापेकरून इकडील माणूस न दुखवितां चौबुर्जी आदींकरून फत्ते जाली. चौबुर्जी फत्ते होये तो एक घटका दिवस गुरुवारीं अमावास्येस आला. दिवसाचे कार्य होणे बहुत संकट, परंतु स्वामीचा प्रताप लोकानीं मर्दुमीची शर्त केली. बक्षीस देणार धणी समर्थ आहेत; येथून रवाना करीतेसमई बक्षिसाची बोली करून गेले; कार्यासिद्धि जाली; त्याचे मनादयेनरूप

बक्षीस देऊन उर्जित करणार धणी समर्थ आहेत. मागाहून याद पाठवितो जे सहे करून लोकांचे समाधान राहून उर्जित होये ते करणार स्वाम धणी आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev reports to the Peshwa the capture from the Angrias of the fort of Manikgad near Panvel.*

No. 19] [*5-6-1747*

पौ छ ११ जमादिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव मुकाम उरण चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ७ जमादिलाखरपर्यंत स्वामीचे कृपावलोकनें-करून येथील वर्तमान येथास्थित असें विशेष. माणीकगड फत्तें जाल्याचें वर्तमान हुजूर लेहून पाठविलेंच आहे. किल्याचा संदर्भ होतां लागें आलें. त्याजवरून तीर्थस्वरूप राजश्री बाळाजीपंत व दादा व राजश्री निलो विठल उरणास पाठविलें; याणी लोकांची सिद्धता केली. रवानगी करावी इतक्यांत पेणेच्या अमलदारांचें पत्र उरणास आलें कीं, बेलापूरकर कुणब्याच्या म्हैशी गुदस्तां पेणकर कुणब्यांनीं चोरून नेऊन पेणेंत विकल्या आहेत, त्या ज्याच्या त्यास अंगऱ्याकडील लोक देऊं देत नाहीं. कजियास सिद्ध जाले आहेत, तरी कुमकेस लोक पाठऊन द्या म्हणोन पेणेचें लिहिलें आलें, त्याजवरून बाळाजीपंत व निलो विठल याणी किल्याचे संदर्भास लोक सिद्ध केलें होते, तेच पेणेकडून रवाना केलें. तेथें जाऊन कजिया निर्गम करून म्हैशी ज्याच्या त्यास देऊन परभारें त्याच मार्गें किल्याचे लागास गेलें. राजश्री सुभानजी विश्वासराव व शंकराजी नाा बने वगैरे सरदार पुढें गेलें. उपराळ्यास राजश्री कान्होजी गजे राहिले. जातांच किल्ला फते केला. मागाहून कान्होजी गजे जाऊन पोहोंचलें. किल्ला फत्तें जाल्याचें पत्र सेवकास आलें तेच क्षणीं हुजूर लेहून पाठऊन पुढी(ल) बंदोबस्तास्तव सेवक उरणास आलो. येथील बंदोबस्त करून बाळाजीपंतास ठाण्यास रवाना केलें. आम्ही येथें राहिलों. त्यास आबटें व मोहपत उरणासंनिध, बंदर सोईजागा आणि आबटे म्हणजे किल्याचे

तनख्याचा गांव, तेथें आंगऱ्या(ची) चौकी दुसरी कर्णालकर निमेचे त्यास किल्ला फतें जाला, या उपरी आंगऱ्याचे चौकीचें प्रयोजन काय? यास्तव राजश्री कान्होजी म्हसकें वगैरें दोन आडीचशें माणूस आबव्यास पाठविलें जाऊन प्रथम दिवशीं अस्तमानीं तेथील तल्यावर मुकाम केला. इतक्यांत कुलाबियाहून शें सवाशें माणूस रामाजी अनंत सबनीस ऐसें आलें. प्रात:काळीं रामाजी सबनीस व मेढ्यातील लोकांस कान्होजी म्हसकें याणी सांगोन पाठविलें कीं, तुम्ही उठोन जाणें, अथवा तुमचा मनोदय असेल त्याप्रमाणें सिद्ध होणें. त्याजवरून आविर्भाव शिपाईगिरीचा दर्शऊन उभे राहिले, तों आपले लोकांनीं स[१]जुंदी करून चालोन घेतलें. त्यास आपले लोकांचा भरणा भारी पाहून रामाजी सबनीस याणी सांगोन पाठविलें कीं, आम्ही युध्य प्रसंगास आलों नाहीं, आणि आमचे येजमानाचीहि आम्हास आज्ञा नाहीं. गडीत लिंग दळवी आहेत ते कांहीं तऱ्ही करोत. आम्हास पेबेत रवाना केलें आहे, तिकडें जातों. तुम्ही आपले दस्तक मार्ग निभाऊन जावयास देणें. त्याजरून मारनिलेनीं दस्तक दिल्हें ते घेऊन पेबेस गेलें. मेढ्यांतील गडींत लिंग दळवी होता तोहि तेच क्षणीं निघोन कुलाबियास गेला. स्वामीचे प्रतापेंकरून आबव्याचें ठाणें आपले लोकांनीं बसऊन मुलकांतील रयेत परागंदा होऊन गेली होती; तें कौलपत्र देऊन आणली. कांहीं येणें तेंहि येईल. तेथील बंदोबस्तास मोहपत आदि-करून अडीच तीनशें माणूस ठेविलें आहे. माणीकगडास राजश्री सुभानजी विश्वासराव व शंकराजी नाा बने ठेविले आहेत. कान्होजी गजेहि तेथेंच होते पत्र पाठऊन आणविलें ते आज आले. येथील बंदोबस्त मारनिलेस सांगोन आम्ही आबव्यास जाऊं. तेथील मजबुदी करून माणीकगडास जाऊन मुलकीं व किले मजकूरचा बंदोबस्त करणें आहे तो करून सविस्तर सेवेस लिहून पाठवितों. किला फतें जाला तेंच दिवशीं आंगारकाचे चिटनीस कुलाब्याहून पेणेस आले होते. किल्याचें वर्तमान कळतांच किल्याखालें जाऊन माघारें कुलाबियास गेलें. बराबर दोनशें माणूस होतें. राजश्री मानाजी आंगरे मौजे पोईनाड वगैरे इकडील सरदेस येऊन इकडील बंदोबस्ताची बातमी मनास आणून माघारें गेलें ऐसेंहि आजच वर्तमान आलें. त्यास स्वामीचे प्रतापेंकरून इकडील बंदोबस्त म्हणावा तसा आहे. फिकीर आहेसारिखी नाहीं. किलें मजकुरीं गेलियावरी तेथील साद्यंत लिहून पाठवितों. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev communicates to the Peshwa details of the capture of Manikgad.*

---

१ तर्तुद.

2730

No. 20] - [Received on 1-4-1748

छ १३ जंमादिलाखर+

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना यैसीजे. पहिलें मुढागढ स्वामीनी बसविला होता तो मागती पाडला. त्याजवर राजश्री तुळाजी आंगरे याणी तो गढ बांधोन वसिगत केली. तेथून स्वाऱ्या करून तमाम पनाळे प्रांतची जागा मारली. बहुतच धामधूम केली. प्रळये आरंभिला. त्याजवर बावडेवाले राजश्री भगवंतराऊ व विशाळगडकरी व सावंत व राजश्री अपोजी[१] अंगरे हे सर्व येकत्र होऊन च्यार पांचसें स्वार व सात आठ हजार पायेदळानसी मुढागडास जाऊन मुढागड घेतला आणि राजापुरापासून संगमेश्वर पावेतों तमाम मुलूक जाळून पस्त केला. सर्व जागा खराब केली. तुळाजी आंगरे याजला आपल्या किल्यांची सावधानी करितां पुरे जालें आहे. आपाजी आंगरे याचें ऊर्जित करणें स्वामीस अगत्यच आहे. अनयासें परभारेंच तुळाजी आंगरे यास जरब पोहोंचली. याजउपर तुळाजी आंगरे याणी पेंचोरी[२] लाऊन स्वामीकडे भेटावयाचा विचार केला आहे. वर्षप्रतिपदेस भेटीस येणार होते. याजउपर जें वर्तमान येईल तें सेवेसीं लिहून पाठऊं. राजश्री फत्तेसिंगबावा राजश्री रघोजी भोंसले याजला कर्नाटक जालें. त्यास ते तिकडे स्वार होऊन जाणार. राजश्री बाबूजी नाईक सातारांच आहेत. उपोषनें करितात. जंजिरे सुवर्णदुर्ग यासी फितुर जाला. आणिक येक दोन किले यासी जाला. त्याजवर तुळाजी आंगरे खासा रातोरात सुवर्णदुर्गी येऊन सावधानी केली. वीस माणूस भेदिलें होतें, तें जिवें मारिलें. कोंकण प्रांत जाळिला. सत्यनास केला. त्याजवर श्रीमंत राजश्री छत्रपति स्वामीनी त्याजला सांवत वगैरे यासी हुजरे पाठविले कीं मुलूक याजउपर न लुटणें, न जाळणें. राजश्री तुळाजी आंगरे सातारां येणारसा ठहराव जाला आहे. येतील तेव्हां खरें. राजश्री फत्तेसिंगबावा रघोजी भोंसले कर्णाटकास जातात. निजामनमुलुक नासरजंग बराणपुरी आहेत. राजे ईश्वरसिंग शहाजादेयासमागमें गेले. त्याची कृपा संपादून घेतली. सारांश शहाजादे यांजवळ हे बोली केली आहे जे पठाणावर चालिला; हे फत्ते जालियावर हेच फौजेनसीं माळवा प्रांतीं चालावें; मराठे याजवर मोहीम करावी म्हणून शहाजादेयासी ठीक करून तमाम रजवाडे

+ Evidently a mistake of the Peshwa's clerk who meant 13 रबिलाखर. Prince Ahmed referred to in the letter defeated the Abdali in April 1748.

१ येसाजी ? २ ?

जमीदार यासी पत्रे पाठविलीं कीं पठाण मारिलेयावर आपणांस मालवा व दतिया वोंडसे भदावर वगैरे जो तालुका मराठेयासी दिल्हा आहे तो आपणांस देतात. आपण हरोल शहजादे याचे होऊन येतों. तुम्हां रजवाडे यासी जमीदारास त्यानी दु:ख दिल्हें आहे त्याचा सूड घेतो. तमाम हौ[1]विसी शहजादे-यासुधां आपण येतो. तुम्ही तमाम आपले आपले जागां तयारी करणें म्हणून कुं[2]पिया पत्रें आलीं आहेत. त्याचप्रमाणें निजामनमुलुक याचींही पत्रें सर्वांस आलीं आहेत. त्यास जें वर्तमान आइकिलें आढललें तें स्वामीस लिहावेंच लागतें. बुंदीकोठे दतिया व नरवर भदावर वगैरे तमाम लाहान-थोरास पत्रें आली. यांचीं त्याजकडे गेलीं. येक वकील निजामनमुलुक याजकडे येक, इश्वरसिंग याजकडे. याप्रमाणें कुपिया वलवल सर्व करित आहेत. त्यास स्वामी सर्वजाण धनी आहेत. स्वामीनी सर्व प्रकारें सावधानी करावी. इतबार कोणाचा न धरावा. बुंदेले याजकडील रुपये येणे त्याजपैकीं आजीता-गायत वसूल जाले, बाकी राहिले रुपये, त्याचा हिसेब मुजरद कासिदासमागमें पाठविला आहे. त्यास जमीदारी जागां. कासीद पोंहचतील न पोंहचतील. वरकड नवा मुलूक राजे सभासिंग याजकडील घेतला त्याचा सालमजकूरचा आजमास सेवेसी पाठविणें आहे. त्यास काही परगणे याची तरतूद जाली. कांही राहिले, त्याचा आजमास वसूल बाकी मनास आणून मागून सेवेसीं मुजरद कासिदासमागमें पाठवितों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer describes to the Peshwa how Tulaji Angria fortified Mudhagad and laid waste the country from there and how he was forced to beat a retreat and to sue for peace by the combined efforts of Bavdeker, Vishalgadkar, Savant and Apaji Angria. The writer also says that Tulaji intends shortly to proceed to Satara. He mentions the presence of Babuji Naik at Satara and of the Nizam at Burhanpur and also the rumours about Fatesing and Raghuji receiving the Karnatak and Ishwarsing joining the Emperor's son against the Marathas.*

No. 21] *[1-1-1748*

छ २४ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना ताा छ ११ मोहरम टोपीकराचे आवाईचें वर्तमान इंग्रेजानी लिहिलें होतें त्याजवरून सेवेसी लिहिलेच आहे. पुन्हाहि वर्तमान कीं, गोव्याहून फिरंगी

१ (?)   २ गुप्त रीतीनें.

सामान सरंजामसुदा बाहेर पडला; परंतु कोण्हीकडे गेला कलत नाही. मसलत कोण्हीकडें हेहि कलले नाही; परंतु खबर बाहेर पडला म्हणोन आहे. त्यास इकडील कोटकिल्याचा बंदोबस्त उतम प्रकारें केलाच आहे. आरमाराचाहि जडाव होऊन सारें आरमार येकत्र जाले आहे. दाटीची खबर आढलल्यास तेक्षणी आरमार अणावयासी येईल. त्यास प्रस्तुत आज त्रयोदसीपासोन पांच सात दिवस उंधाण आहे, तों आरमार कुलाब्याचे बाऱ्याचवर ठेविले आहें. तेथून टोपीकराची बातमीहि कलेल, बातमीस गलबतें नेहमी ठेविलीं आहेत. धण्याचे प्रतापे करून फिकीर आहेसारिखी नाही. सारांष टोपीकराची आवाई राखोन अंगारकास पायेबंद द्यावा, उधाण सरलियावर हें कार्य करावें असाच विचार योजिला आहे. येंदा आंगऱ्यानी उपद्रव बहुत केला, यास्तव इतकी उभारणी करावी लागली. सविस्तर मुख्य पत्री लिहिलेच आहे. त्यास टोपीकराची आवाई राखोन अंगारकास शह बसवणे तसा बसवितों, आगलीक होतां त्याजकडूनच जाली; आणि पुर्ती होऊ दिल्ही. निदान सावकारी राहिली. बंदर पडलेंसें जालें. तेव्हां राजश्री शंकराजीपंतांचें विचारें रवानगी केली आहे. पुढें होईल त्याप्रो लेहून पाठवितों. राजश्री रामचंद्र दामोदर याजकडील गोपालराव फौजसुदा पेणेंहून रेवदंड्यास गेलें, राजश्री रामचंद्र हरि बदलापूरचे मुकामी आहेत. पेणेस येण्हार असेत. किंबहुना उरणासहि येऊन जातील. होईल त्याप्रो लेहून पाठवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News about the preparations made by the Portuguese is communicated to the Peshwa.*

No. 22] [*31-12-1747?*

श्री.

श्रीमत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवसी

विनंती सेवक गणेश त्रिंबक सां नमस्कार विज्ञापना. ता छ १० मोहरमपावेतो स्वामीच्या कृपाद्रिस्टीकरून बंदर गोवे प्रांती स्थल श्रीशांतादुर्गा येथें सुखरूप असो विशेश. स्वामीचे आज्ञापत्र छ २० जिल्कादचे छ २२ जिल्हेजी सादर जाहाले, त्याप्रमाणे गोवेकर विजरेयी[1] याजकडे बहुता प्रकारे बोली केली, तेहि सर्व त्याही अमान्ये करून आम्हास प्रतिउतर केले कीं, रा तुलाजी आंगरे

---

(1) Viceroy.

यांसहि कुमक देत नाही, आणि अर्थाविना या कजियात आम्ही पडत नाही, ऐसा जाबसाल केला; आणि आमची रवानगी केली. तेच दिवसी गलबते आरमारी रा तुलाजी आंगरे यांची व वकील कानो कासी व क्रुस्णाजी नाईक जैतापुरकर विजरईस व कारभारियासी वस्त्रे आणिली, व बोली करितात कीं दोन किलें तुम्हास आम्ही देतो, आणि तुम्ही आमचे सर्व साहित्य करावे. त्यासी विजरेने प्रतिउतर दिल्हे नाही; व त्याची दुसरी बोली कीं, खासा कबिला व काही वित विशये बंदर गोवें येथे ठेवायासी जागा मागितला, ते विजरई बदर गोवे याही कबूल करून त्यासी जागा राई बंदरास करून दिल्हा; व काही वित विषयी बंदर गोवें येथें आला. कबिले अद्यापि आले नाही. विताच्या संदुकाची कुलपे करून चाव्या विजरईन आपणापासी घेतल्या. यावरून त्याची द्रिस्ट लोभावर आहे; व लोभामुले ममताहि त्याजकडे आहे. आम्हापासी श्नेह किमपि नाही, यैसे असता स्वामीचे आज्ञेप्रमाणे च्यार मास श्रम करायाचा तो केला. वरकड वर्तमान मुसाफरखान याचा वकील सवदेकराच्या[1] राजकारणास आले होते, ते तव उभई पक्षी सला होऊन राहिले. हाली पत्रे व वस्त्रे विजरईस व कारभारी-यासी मुसाफरखान याही आपले वकिलाकडे पाठविले आणि नूतन बोली करितात कीं, सर्वे पालेकर करणाटक प्रांतीचे आम्ही येकत्र मिलालो असो. त्यासी तुम्ही साहे आम्हास होऊन, फिरंगी असल यौध्य व दारू गोळी जंगी मसाल्यानसी साहे करावे. जे प्रसंगी श्रीमंताच्या फौजा करणाटक प्रांती येतील, त्या समयी येऊन साहित्य करावें. उपरांत तुम्ही आम्ही ऐक होऊन, तुमची स्थले वसई प्रांती भ्रस्ट जाहाली आहेत, ती साध्ये करून देऊ म्हणून गोवकर विजरईस लोभ दाखविला आहे. यावरून गोवेकर विजरई याही मुसाफरखान व सा(व)णरकर नवाब याचे वकिलाचीं खलबतें होतात. त्यासी प्रतीउतर काये दिल्हे ते कलत नाही. वकील तो बंदर गोवे येथे आदरमाने करून ठेविले आहेत. मुसाफरखान याचे कागदपत्र येत जात आहेत. स्वामीस कलावे म्हणून लिहिले आहे. व आमची रवानगी केली. निमित्य कीं त्यांची गुह्या आम्हास कलतील, आणि स्वामीस आम्ही लिहिहोन पाठऊ, याकरिता आमची रवानगी केली. ते परतीरास येऊन कवलेमधे श्रीचे गावी राहिलो. गोवेहोऊन ती कोसावर गाव आहे. रायोंसी[2] कारण रा तुलाजी आंगरे याचे वकिलांची बोली होऊन कोण प्रकारें विजरई रवानगी करितो ते मनास आणून स्वामीच्या चरणापासी येतो. वरकड वर्तमान भिवगडकर सिपाई साकळी प्रांती फिरंगियाचे मुलकात चौथाई करिता आले होते; आणि रयतीस दंगा करीत होते. त्यासी फिरंगीयाही आठ सिपाई धरून

(1) Sondhe. २ राहावयासी.

आणिले, आणि सिरछेद करावयाची आज्ञा केली. हे वर्तमान सेवकासी कळले-वरून सेवकाने विजरेकडे व त्याचे कारभारियांकडे जाऊन युगतीप्रयुगतीने सुटका करून घेतली; आणि त्याची रवानगी गडास केली. त्याचे सिले[१] आट फिरंगियांकडे होते तेहि युगतीप्रयुगतीने घेऊन गडास पाठऊन दिल्हे. त्यावर विजरेने आपले मुलकात व ठाणयासी ताकीद केली कीं या उपरी भिवगडकरी अगर पारगडकरी सिपाई द्रुस्टीस पडला तर सिरछेद करून लिहिहून पाठवणे म्हणून ताकीद केली. हे वर्तमान स्वामीस कळावे म्हणून लिहिलेलें आहे. यानंतर जासूद व डालायेत रोजेमोरेयाकरिता पारकऱ्या मुलकात हैराण करू लागले. स्वामीची आज्ञा तव रोजमोरा देयाची नाही. आम्हास हैराण करितात, तेव्हां आम्ही रा बालाजी दुलभ याकडून कर्ज घेऊन, जासुदास रोज-मोरा येक व डालायतास रोजमोरे दोन दिल्हे. त्याचा मार आलाईदा लिहिहोन पाठविले आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Ganesh Trimbak, the Peshwa's agent at Goa, reporting the activities of the Portuguese Viceroy against the Peshwa, his overtures of friendship with Tulaji Angria and his approaches to other chiefs to form a hostile combination against the Marathas.*

No. 23] [*1748 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेशी

विज्ञापना ऐसीजे. भोरपकर[२] तह करितात. स्वामीकडे गेले होते. त्यास* कांहीं तह तो जाला नाहीं. ते फिरोन आले. त्यास त्याची उमेद तो फारसी आहे कीं आपला वसूल बासूल * * रा किल्ल्यावर चढवावा व चाकरमान्या लोकांचे कबिले किल्ल्यावर चढवावे आणि कटकटीस प्रवर्तावे. कटकट करितां पांच सात आपले तोडवावे अगर आमचे तोडावे आणि जखमियाच्या डोल्या घेऊन हुजूर जावे. मग खावंद आहे, विल्हे करून देईल तरी किलयास यावें. नाहीं तर किल्ला हरकोणाचे विल्हेस करून; आपण कांहीं किल्ल्यास येणार नाहीं, परंतु कटकट करावी ऐसी त्याची उमेद आहे. येविसीची आज्ञा काये ते केलीं पाहिजे. यानंतर राजश्री मानाजी आंगरे याची कोठी चारसे बैल कालोसेहून[३]

---

१ चिलखत, Coats of mail or armour. २ पालीचा किल्ला. ३ चाकणजवळ.

येत होती. येतां मार्गीं मौजे चाकणा येथील जितरब बैलानीं कुळी तुडविले, म्हणून गांवचा पाटील येऊन वाणियास बोलला कीं, तुंम्ही जितरब खाविले. तरी आपण किल्ल्यास जाऊन तुम्हास मसोला करून. त्यावरून वाणियानीं त्यास मार ठोक करून आपणच पालीस फिर्याद गेले. तेव्हां पालीहून पंनास माणूस येऊन गांवच्या पाटलास व कुलब्यास मारठोक केली. वाणियाचे बैल दोनसे चारसे सापडतात, आणि दस्तकहि नसतां दहा वीस माणूस बराबर देऊन बलेच जोरावारीनें बैल भरून नेतात, हशील देत नाहीं. यैशा नानाप्रकारच्या कटकटी करितात. त्याचा मुबदला कटकट आपण करावी तरी फिर्याद हुजूर स्वामीकडे जाते यैसा विचार आहे. तरी स्वामीनीं काये ते आज्ञा केली पाहिजे. यानंतर त्याणी पाटीलास मारठोक केली, तेव्हां ताकिदीस सिपाई येथोन पाठविला होता त्यासहि मारून मुसक्या बांधोन पालीस नेला. एकव्या सिपायास न्याव-यास दोनसे माणूस कटकट करावयास आले होते. हे जातीचे विचार आहेत. स्वामीस विदीत व्हावे, म्हणून लिहिले असे. यानंतर स्वामीचे आज्ञापत्र आले होते तेथें आज्ञा कीं सोनजी जाधव याचे प्रयोजन आहे, त्यास हुजूर पाठवून देणे. त्यावरून त्यास हुजूर रवाना करावे, त्यास त्याचे शरीरीं सावकाश वाटत नाहीं. हींवताप येत आहे. समाधान वाटल्यानंतर हुजूर स्वामीचे सेवेसी रवाना करितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Disturbances created by the people of Bhorap are reported to the Peshwa in this letter: the date is uncertain. It seems to refer to Shahu's times.*

No. 24] [*4-1-1748*

छ २४ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वमींचे सेवेसी

विज्ञापना. तागायत छ १४ मोहरम रा मानाजी आंगरे याणी उपद्रव केल्याचा अर्थ सविस्तर मुख्य पत्रीं लिहिला आहे. त्यास त्याणी उपद्रव केला खराच. परंतु विचारें विचारें गलबताचा मुबदला होईल तितका करावा. केवळ जोरबजोर आज्ञेविरहित जाऊन गलां पडतां न ये. अरमार बाऱ्यावर पाठऊन

---

१ बोलावणें.

आविर्भाव दर्शविलाच. पुढें बोलीचालीस माध्येस्त होऊन गलबतें सुटोन यावीं, सुरळीत व्हावें हा विचार होता. इतक्यांत इंग्रजाचें पत्र मुंबईहून आले कीं, आरमार रवाना केलें असा. परंतु उतावली करूं नये. आम्ही मानाजी आंगरे यास पत्र लिहिलें आहे. गलबतें सुटोन येतील. बोलीस माध्येस्त आहों म्हणोन लेहून आलें. त्याजवरून आठ दिवसपर्यंत वाट पाहिली. त्यास इंग्रेजास मानाजी आंगरे यांचे पत्र आले, त्यांत माणिकगडचा आदिकरून अन्वये लिहिला तोच अर्थ इंग्रेजानीं आम्हांस लिहिला. त्याची नकल बजिनस हुजूर पाठविली आहे त्याजवरून विदित होईल. सारांष आंगारकाचे मनांत सुरलीत पदार्थ नाहीं. येसाजी आंगरे याणी राजकोटचा संदर्भ करून कोटासनिध जाऊन माघारे आले तें दूषण राजश्री मोरोजी सिंदे याजवर ठेऊन, तुम्ही राजकोट घ्यावयासी आले होतेस, याउपरी तुमचा आमचा बिघाड, परस्परें चितास येईल ते करावें ऐसें सांगोन पाठऊन राजकोटची मारगिरी रेवदंड्यावर करूं लागले. परस्पर मार होऊं लागला; पांच सा दिवस जाले; तिकडील मारगिरीमुले रेवदंड्यांतील गुरूढोर बाहेर पडावयासी बंद जालें. उपद्रव सोसवेना. जबरदस्तीच्या गोष्टी सांगोन पाठऊं लागले. मारगिरीस तर आंतर न होयेसारिखें जालें. तेव्हां निदान जालें कीं आरमार रेवदंड्याचे खाडींत नेऊन आरमाराचा मार द्यावा, राऊत खुस्कीस ठेऊन मोर्च्येबंदी करून कोट जेर करून घ्यावा, ऐसा विचार राजश्री मोराजी सिंदे व राजश्री कृष्णाजी माहादेव व राजश्री बाजीराव बेलोसे व हर सावत भोसले सुभानजी विश्वासराव यांचे विचारें होऊन, आरभार खाडींत नेऊन मार देत असेत. राजश्री रामचंद्र दामोदर याजकडील दोनसें राऊत गेले आहेत ते खुसकीस ठेविले. खुस्कीचाहि मोर्चा लागू केला आहे. स्वामीचे प्रतापेंकरून थोडकेच दिवसांत कोट फत्ते होईल. इकडून रेवसास राजश्री गंगाजीराव खानविलकर व राजश्री नारोपंत हशबनीस दोनसें माणूस पाठऊन गढीचें दगड मेढा आदिकरून साफ करून तोफा पांच व कर्णा १ होता तो आणिला. दोनच्यार घटका त्यांची याची झिटपिट होत होती. परंतु स्वामीचे प्रतापेंकरून ते नामोहरम होऊन आपले लोक गडींत जाऊन फते करून पाडून टाकून आले. इंग्रजाचें पत्र येई तों वाट पहावी लागली; त्यास इंग्रजाचें पत्र रविवारी आलें. मग सोमवारीं रेवसच्या तोफा आणाव्या लागल्या. रेवदंड्यावर तोफा न टाकिते, सुरलिनावर येते तरी इतके आज्ञेविरहित करावें ऐसें नव्हतें. परंतु सावकारीहि बंद करून रेवदंड्यावर गोले टाकूं लागले. आगलीक त्याजकडूनच जाली. यास्तव करावें लागले. सर्व गोष्टी त्याचे आदरानरूप कराव्या लागल्या. सारांष राजकोट स्वामीचे प्रतापेंकरून अविलंबेच फत्ते

होईल. जालें वर्तमान सेवेसी लिहिलें आहे. राजश्री रामचंद्र हरी यास पत्र पाठविले असे. त्याजकडील राऊत व कांही लोक पाठवितों. टोपीकराचे बातमीस नेहमी गलबते ठेविलींच आहेत. राजश्री तुळाजी आंगरे याजकडील आरमार येण्हार म्हणोन खबर आहे. त्यास त्यांचे आरमारास इंग्रजानी येऊं देऊं नये असा संदर्भ राखोन योजिल्याप्रमाणें स्वामीचे पुण्य प्रतापेंकरून राजकोटचें कार्य करितों. इतका कांहीं दुराग्रह इकडून वाढऊन बखेडा करून मसलत करावीसी नव्हती. सारे आरमार येकत्र. फिरंगियाची आवई आली. पुढें कोणीकडे तोड पडेल तिकडे कुमक करावी, हा सविस्तर अर्थ मुख्यपत्रीं विनंती लिहिली आहे. हुजूर त्याचे तर्फेनें रामाजी अनंत माणिकगडतर्फेची बोलीस गेले, यास्तव जो निकाल चुकणें तो इकडे आवडाव करून दाखवावी तितकी दाखविली; परंतु कोठें विचार बनोन आला नाहीं. तेव्हां सावकारी गलबतें सुदामत दुतर्फा कौलपत्र घेऊन चालतात त्यापैकीं येक गलबत त्याचे बंदरीं गेलें. त्यासी आटकाव करून ठेविले. दोन च्यार दिवस तेथें होते. मग फिरोन मागती कऊलपत्र करार करून सोडिले. साचोटी दाखऊन फिरोन साहा गलबतें जंजिरे उरणची येक ठाणियापैकीं येसी सात आपले मकानी आटकाव करून कोली खादेरीस नेऊन ठेविले; यास्तव इतकी तरतूद योजावी लागली. पुन्य-प्रताप समर्थ खावंदाचा समर्थ आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev to the Peshwa, reporting the disturbances created by the Angria brothers Manaji, Tulaji and Yesaji and the writer's efforts to capture Rajkot at Cheul.*

No. 25] [*10-2-1748 ?*

श्री

श्रीमंत राजश्री नाना व भाऊ
स्वामींचे शेवेशी

विनंती सेवक रामचंद्र बावाजी कृतानेक साष्टांग दंडवत् विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीकडून सेवकाचें वर्तमान ताा छ २१ सफरपर्यंत यथास्थित असे. इंगलीकरास उपसर्ग न लागावा, याविषई आज्ञापत्र सादर जालें होतें. तदनुरूप राजश्री वजारतमाब यांस सांगितले. वजारतमाब यांचा विचार स्वामीचे मर्जी-शिवाय नाहीं. इकडील सविस्तर वर्तमान पेशजी राजश्री तुळजोजी घांटगे यांस-मागमे सेवेशी लिहिलें आहे. अलीकडे तळदंग्याहून सौभाग्यादिसंपन्न

मातुश्री बाईसाहेब छ ११ सफरीं वडगांवा आलीं. याउपरी राजश्री स्वामीच्या पायास वाताच्या तिडका लागल्या, त्याकरितां तेहि आले. अठरावे सफरीं मुरारराव जरारे यथे येऊन निरोपाचा प्रसंग पडला आहे. यकादों रोजात स्वार होऊन जातील. राजश्री भगवंतराव व वाडीकर सांवत यांणी संगमेश्वरपर्यंत आंगऱ्याचा मुलूक मारून हाली येऊन मुऱ्यागडास वेढ घातला आहे. आंगरयाचा उपराला यत होता, त्यावरी याणी जाऊन सेंदीडसें माणूस मारिलें; दोन च्यारसें हत्यारें आणिली; दारूगोळीहि सापडली; मुऱ्यावरील लोकहि अवसान खता आहेत. हे गड घेतील. राजश्री गंगाधरपंतहि आले आहेत. साताराहून थोरली धनीन यांकडून हुजरे आले आहेत. पत्रें शफत घालोन लिहिलीं आहेत कीं, मुरारराव्यांस फौजेनसी पाठऊन तुळाजी आंगरयाचा उपराला करावा. भगवंतराव व गंगाधरपंत व वाडीकर यांस ताकीद करून माघारे न्यावे, आणिखी कोणाचे लिहिल्यावरी नव जावें. इकडूनहि जयसिंग सिर्के पाठविले आहेत म्हणून बहुतच लिहिले होतें. यथून उतरें गेली कीं, आंगरयास ताकीद करऊन मुडा सोडवावा. सिंधेदुर्गच्या वाटेस न जाये; मसुऱ्याचा गड सोडी ते करवावें, म्हणिजे वडिलांचे आज्ञेप्रमाणें उपराला करितो म्हणून लिहून इकडीलहि कारकून गेला आहे. सोंधे, बिदरूर, सावनूर इकडून अलीकडे कोणीं येत नाहीं. गोवेकरानी सावंतांकडे बोलीचा संदर्भ लाविला आहे. मुरारराव्यांची फौज तलंदग्यावरी दीड दोन हजारपर्यंत आहे. कौदलगीकराचें खेडेहून सिबल-नजीक गोकाक घटपातीर यथें स्वारी गेली होती ते तेथेंच दीड हजार फौज आहे. रामचंद्र आणाजी व कितूरकर मिळोन हजार फौज बेलगांव प्रांते पोट भरतात. या प्रकारचें इकडील वर्तमान. सेवेशी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Ramchandra Bawaji in a letter to the Peshwa and Sadashivrao Bhau gives an account of the correspondence between Tarabai and Jijabai of Kolhapur in connection with the activities of Tulaji Angria.*

No. 26] [*1746*

श्री

राजश्री पंत प्रधान

गोसांवी यासीं

ॐ सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री कान्होजी राजे सिर्के रामराम विनंती यैसीजे. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहालो ते छ ३ राखरी कुटरे यांस आलो. तेथून कुंभारखाणीवरी चौकी नजीक होती, त्यांचे व आमचे

लोकांचे जुंझ जाहाले, ते सविस्तर वर्तमान राजश्री लक्ष्मणपंतानी लिहिले आहे त्यावरून शृत होईल. सर्व प्रकारे इरे आपली आहे. लोकांचा व हशमाचा पुस्तपना केला पाहिजे. राजश्री लक्ष्मणपंत व लोक आमच्या सांगितल्याप्रमाणें वर्तणूक करितात. आंगरे याकडील तमाम माणूस जमा होते. दोन तीन हजार होऊन आम्हावरी येणार. आपणास कलावे यास्तव लिहिले आहे. पुस्तपन्हा केला पाहिजे. बहुत काय लिहिणे ? कृपा निरंतर असो दीजे हे विनंती.

¶Kanhoji Raje Shirke informs the Peshwa of a skirmish between him and the Angria and requests him to send him reinforcements in the event of another possible attack from him (the Angria).

No. 27] *[5-5-1746 ?*

श्री

राजश्री बालाजी पंडित
प्रधान गोसावी यांस

सकलगुणालकरणं अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित तुलाजी आंगरे सरखेल रामराम विनती येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन केलें पाहिजे विशेष. आपला व आमचा निःसीमपणें श्नेहभाव कैलासवासी उभयपक्षीं वडिलांचा घरोबा कोणे प्रकारचा होता तो जनमुखीं प्रसिध आहे. मध्यें विपर्यासाचा इतिहास बहुतच जाहाला तो लिहितां न ये. आलीकडे आपण श्नेहभाव पूर्वान्वयें धरिजेत आहे यैसा चित्ताचा निशा जाहाला. राजश्री पांडुरंगजी प्रभु व राजश्री आबाजीपंत आम्हांकडून आपणांस भेटले, ते समई बहुत ममतापूर्वक निखालसपणें आपण बोलिले. त्याज उपर राजश्री विसाजीपंत सांप्रत सातारां गेले, तेव्हां आपली भेट होऊन बोलीचाली जाहाली. ते सविस्तर त्रिवर्ग मशारनिलेनी अवगत केल्यावरून चित्ताची सापेक्षता ऐसी आहे कीं कैलासवासी वडिलांचें वेलेस जसा निःकपट श्नेहाचा समारंभ चालत होता त्याच आन्वयें उभय पक्षीं चालोन लौकिकीं व अंतरीं दिन प्रतिदिन सुरसता दिसोन यावी हेच इच्छितों. त्या सारिखी आपणहि ममता धरितात. यैसे आसोन सांप्रत दरबारी बाईसाहेब उगीच अकारण इतराज होऊन सिर्के यांचे मायेस्तव व वरकड कितेक अल्प मनसबदार यांचा आगत्यवाद धरून या मामल्यावर निकर्ष मांडला आहे. अंजनवेल[1] सारिखा जागा, दाभोल सुभा, देव ब्राम्हणाचे अग्राहारात हबसी सिरोन पनास वर्षे प्रजेस पीडा केली. त्या कार्याविशीं गत वर्षी आम्हांस इरेस घालून

1 Anjanwel captured from the Sidi in January 1745 [पेशवे शकावली.]

2740

स्वराज्यांतील शल्य दूर केलें. देवब्राम्हणाच्या कार्यासाठीं इरेस पडोन सर्व साहित्य सेना वेचून जो अंगेज केला तो लेहून दाखवावा यैसा नाहीं. परस्पर आपण यैकिलाच असेल. श्रम साहस करून टकापैका लोक खर्च करून कार्य केलें. राज्यामध्यें महत्कार्याचें बक्षीस हलीं बाईसाहेब याणी योजिलें. सिर्के भगवंतराव खाले उतरोन प्रांताचा नाश बहुत केला. बोलाऊन जमावाची तरतूद होऊन थोडाबहुत प्रतिकार होणें तो जाहाला, व पुढेंहि त्यांचें पुर्तें समाधान होई यैसाच विचार आहे. परंतु ऐसे असमंजस मजकूर दरबारीं होऊन आपण उगेच पाहातात हें अपूर्व आहे. कदाचित् राजश्री व राणी धणी त्यांचे मर्जीसारिखें वर्तणें लागलें, म्हणून आपण म्हणतील तर आम्ही राज्यामध्यें कोणता दरवडा घातला जे त्यामुलें इतका निकर्श. आसो. ते बोलीचें लिहिण्याचें प्रयोजन काय आहे? सुखमेव करणें तें करून हाली प्रसंग प्राप्त जाहाला आहे याचें निराकरण होणें ते वडिलांचें प्रतापेंकरून व श्नेहाचे बल-कटीनें होऊन येईल त्याचा लेश बहुतसा धरीत नाहीं. प्रस्तुत दरबारीं कितेक पेंच पडिले आहेत त्याचा उलगडा जाहाला पाहिजे. याकरितां सभ्य मनुश पाठऊन द्यावे म्हणोन ममतापूर्वक आपण लेहून पाठविलें, त्याजवरून राजश्री विसाजीपंत यांसच पाठवावयाची तयारी केली होती, परंतु हालीं आपणांस तेथें स्थलसंकोच व अवकाश नाहीं, कितेक बोलीचाली प्राशस्त्यें केली पाहिजे, याकरितां गोसावी याचे जाणें स्वस्थलीं जाहालियावरी मशारनिलेस पाठवावें यैसा सिधांत केला आहे. प्रस्तुत उपस्थित मजकुराची बोलीचाली जाहाली पाहिजे, म्हणून राजश्री बापूजी माहादेव पाठविले आहेत, याजवल कितेक मजकूर सांगोन रवाना केले आहेत, यामध्यें सारांश तूर्त जे आपले फौजेचा अवर व माहाड पंचमाहालीं इकडून गतवर्षीपासून पायंडा घातला आहे तो करार होऊन, व घाटगे यानें अमर्यादेनें वर्तणूक बहुत केली आहे त्यास नतिजा प्रविष्ट होय यैसा कल्प योजून, सिधांत होय तो अर्थ करून याची रवानगी केली पाहिजे. पांच माहालच्या मनसबेयांत आपण पडोन त्याचा आमचा कजिया चुके यैस विचार जाहालेयास उत्तम. तैसेच सिर्के याचे मजकूर तरी त्याचें आचरण स्थीत-रीत आपणांस आवगत आहे. प्रत्ययासहि आली आसेल. आपली देशमुखी म्हणतात. भोगवटा तिलप्राय नाहीं, व त्यांचा सूचीप्रवेस जाहालेयानें जेथें पाय लागेल त्या प्रांतास उपद्रव हें जाणून मान्य करवत नाहीं. वरकड येकदोन मजकूर सहज आसतील ते अवश्यमेव मान्य होतील यैसे आहे. सारांश गजाची हेरे[१]

१ हेरणें, पारख.

गजास. पूर्वस्नेहाचा जिवाला जाणून कार्य घडोन देऊन त्याचा रवानगी केली पाहिजे. रवाना छ २४ माहे रबिलाकर. बहुत काय लिहिणें ? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Tulaji Angria assures the Peshwa of his loyalty and regrets the interference of the Shirkes at Anjanwel in the Subha of Dabhol, supported by Rani Sakwarbai, who belonged to the Shirke family. The writer sends his messengers to inform the Peshwa of all the details and urges on him to bring about a reconciliation.*

No. 28] *[21-5-1746*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसी

ಽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो कान्होजी राजे शिर्के रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले पावलें. लिहिलें की तुम्हाकडील कांहीं वर्तमान कळले नाहीं, पुढें काय विचार करितां, हें सविस्तर वर्तमान लेहून पाठवणें म्हणून लिहिलें. ऐसियास आम्ही आपला निरोप घेऊन आलों. बाा सरदार लक्ष्मणपंत पाचसे राबतानिसी दिले, ते व आम्ही घाट उतरोन कुटरेयावरी गेलो. तेथें आंगरेयाची चौकी होती, त्याची झीटपीट जाहली. आंगरेयाकडील दाहापांच जाया जाहले, व आम्हाकडीलहि च्यार पांच जाया जाहले. येक दिवस कुटरेस मोकाम होता. दुसरे दिवसीं तेथून कूच करून पुढें जावयाचा मजकूर केला तो राहाऊन चिरंजीव राजश्री जयासिंग बावा याणी आंगरेयासी सुलाख करून, तह करावा येसा मजकूर करून, वरघाटे मोकाम करावयाबद्दल कुटरेहून चिरंजीव व लक्ष्मणपंत घाट चढोन, मल्या घाटमाथा येऊन मोकाम केला. दोघेजण येकरूप होऊन आम्ही जी जी गोष्टी सांगितली ती येकीकडेस ठेऊन, आंगरेयासी तह करीत येक माहिना बैसले, हे सविस्तर लक्ष्मणपंती आपणांस लिहिलेंच असेल. त्यासहि आज्ञा जे करणें ते आपण केली असेल. त्या प्रमाणें सरदारहि जो विचार करणें ते करीत आले. जयसिंग बावानें व लक्ष्मणपंतानी आंगरेयासी काय कैसा तह केला तो ते जाणत. आजी बारा रोज पाऊस लागावयास लागला. आंगरेयासी तह करणे तोहि केला. त्याकडील स्वारी या किल्याखाले बैसावयाच्या त्या बैसल्या आहेत. अंगारकाचा विचार तर पूर्ववतप्रमाणे आहे. जयसिंगबावानी तह करून

माघारे निघोन आजी गेले. •लक्ष्मणपंतहि तयार जाहले, तो आम्ही किलातून द्वाही सांगोन पाठविली त्यावरून त्याणी मल्यावरी मोकाम केला आहे. पुढें त्यास काय आज्ञा करणे ते करावी, तेणेप्रमाणें वर्तणूक करितील. किलाचे भरतीस त्याजकडील संभर माणोस मागितले; परंतु त्याणी दिले नाहीं. आपणांस कळावे म्हणून लिहिले असे. रा। छ ११ जमादिलावल, बहुत काय लिहिणे ? लोभ असो दीजे हे विनंती हे विनंती.

¶Kanhoji Raje Shirke describes to the Peshwa a skirmish between himself and Laxmanpant and the Angria and reports that a truce with the Angria has been signed by Laxmanpant and Jaisingbawa, though he has been kept ignorant of the terms.

No. 29] [*7-6-1745 ?*

पैा छ २३ जमादिलोवल

श्री

श्रीमंत माहाराजा मातुश्री
आईसाहेब साहेबाचे
सेवेसी

आज्ञाधारक कान्होजी सिर्के कृतानेक विज्ञापना ता। छ १७ जमादिलोवल पावेतो साहेबाचे कृपेकरून वर्तमान येथास्थित आसे विशेष. इकडील प्रांतीचे वर्तमान तरी राजश्री पंत प्रतिनिधि फौजसहवर्तमान किले विशालगडास जाऊन छ १३ जमादिलोवली तलकोकणांत चिरहोटच्या मुकामवरी गेले. राजश्री तुलाजी आंगरे सरखेल यांकडील जमाव दोन जागा मेढा घालून होते, ते येक मेढा जालून, जमाव येके जागा आहेत. अद्यापि तहरहचा मजकुर काही नाहीं. पुढें होईल मजकूर तो सेवेसी लेहून पाठऊ. किले गुणवंतगडचे लोक यानी आजीपावेतो रूसवा करून होते, त्यास बहुत विचारे समाधान करून घेरियात आणून कामाकस्टास व किलाचे सेवेसी पूर्ववतप्रमाणे लाविले आहेत, येविसी किलाच्या हकीमास व गडकरी लोकास आभयेपत्र सादर केलिया बहुत उत्तम आहे. साहेबी आभयेपत्र आगत्यरूप देविले पाहिजे. वरकड वर्तमान मुखवचने सेवेसी रा। नारो बलाल सांगता विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Kanhoji Shirke informs Tarabai that nothing has as yet been settled with regard to negotiations between Tulaji Angria and the Pratinidhi.

2743

No. 30] [May 1748

श्री

पुा सेवेसी विज्ञापना, राजश्री तुलाजी आंगरेयाचे माणुसे दोन तीन हजार पाहाणीचे निमित्य करून किले सुंदरगड व महिपतगड व व्याघ्रगड येथें भोवताला घेरास येऊन बसलेत. दाणादुणा बंद केला. मुलकात अटअट मांडिली. चितात कुविद्या आणून हा प्रसंग मांडिला, त्यावरून गडकरी याचा व हवालदाराचे बोभाट राजश्री स्वामीकडे आले; त्यावरून राजश्रीनी हातरोखा तुलाजी आंगरे यास करून मसाला दोनसे रुपये करून हुजरे पाठविलेत कीं या गोष्टी करावयास दरकार ये, तरी आपले लोक उठऊन घेऊन जाणे. गडगरीयांच्या बखरी आल्यात जे दारूगोली सामान नाही. जरी फौज येऊन पोहचती तरी किले राहतात. राजश्रीनी आज्ञा केली की राो प्रधानपंतास लेहून पाठऊन, फौज सत्वर पाठऊन आंगराचे लोक उठऊन लाऊन बंदोबस्त करणे. जरी स्वामीची फौज जात नाही तरी आम्हास जावे लागेल, म्हणोन राजश्री बोलले आणि राजश्रीनी हातरोखे रवाना स्वामीकडे केलेत, त्याजवरून सकल अर्थ कलेल. राजश्री तो वरचेवर पुसतात जे स्वामीची फौज गेली की नाही, जाबसाल काये आला तो सांगणे. गडकरी याचा तो बोभाट वरचेवर येतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer complains about the raiding activities of Tulaji Angria and requests the Peshwa to send forces to check him.*

No. 31] [5-6-1747

पाो छ १३ जमादिलाखर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. तागायत छ ७ जमादिलाकर माणिकगडचे संदर्भाचें शंभर माणूस आहे त्याणी बोली केली त्याप्रमाणें आगोधर सावकारी निशा करून घेऊन कार्यसिध्धी करून दिली. त्याची याद तपशीलवार हुजूर पाठविली आहे त्यावरून विदित होईल. दुसरी बोली अफ्तागिरें व घोडी गांव द्यावें तीनसें माणूस चाकर ठेवावें. मातबरास रोजगार सांगावा, त्यास ये गोष्टीची धणी सर्फराजी[1] करितील. हुजूर जाऊं ते समई तुम्हांस बरोबर घेऊन जाऊन रदबदल करून.

---

१ ऊर्जितावस्था.

खावंद कृपाळू होतील असे कितेक प्रकारें समाधानपूर्वक सांगोन कार्य करून घेतलें. पुढें हुजूर आल्यावरी स्वाम गौरसी करतील. परंतु शंभर माणूस कबिलदार आणि याच संदर्भातील यास्तव कबिलेसुधा आणून साष्टी अथवा दुसरे जागा ठेवावे. लोक ठेविल्यानी बोलीप्रमाणें निभाव केलासा होईल. आणि याचे भाऊबंद जंगजोडीचे माणूस तिकडे आहे तें येईल. यास्तव तूर्त कबिलदार शंभर माणूस जरूर ठेवावें लागतें. कबिले माणेकगडाखाले वगैरे जागां आहेत ते आणविले असेत. आले म्हणजे ठेवितों. हुजूरचे आज्ञेविना कसे ठेविले ऐसी आज्ञा होईल तरी या लोकानी इकडे तन देऊन कार्य करून दिल्हे, आणि आरंभींच निश्चयरूप बोलीचा करार करून घेतला. त्यास जाल्यास आज गैर-हंगामी. त्या लोकांस जागा कोठें होईल. सर्व प्रकारें स्वामीचे पदरीं पडिले आहेत. पुढें हुजूरहि घेऊन येऊं. परंतु आज मुलामाणसाचें संरक्षण जालें पाहिजे. यास्तव विनंतीपत्र सेवेसीं लिहिलें आहे. माणूस पाहून तैनाता करून ठेऊन कबिल्याची बेगमी करून देऊन ठेवितों. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer informs the Peshwa of the terms arranged with the garrison of Manikgad and of his obligation to fulfil his undertakings.*

No. 32] [*May 1748?*

श्री

सेवेसी विनंती विशेष. वरकड मावले लोक कितेक पळोन येथून गेले; त्याचे सरदार येथें आहेत. ते लोक जाऊन राजश्री कृष्णराऊ याचे पाठी निघाले. त्यास आम्ही जे लोक पळोन गेले व रजेस गेले ते आणावयास कारकून पाठविला. त्यास बयाजी कोकाटा व भिवाजी वाईल हे दोघेजण जाऊन मसारनिळेकडे चाकर राहिले. बयाजी कोकाटा याणें माहुलीची हवा करून माल खुंटली त्यास बक्षिस कडें सोन्याचें दिल्हें. तसाच भिवजी वाईल यासी माहुलीचें बक्षिस दिल्हें. यैसें मर्द माणूस जिकडील तिकडे जागां जागां राहिल्यास आम्हीं येथें काये करावे ? जें माणूस गेलें तें न ये. तेव्हां दुसऱ्या माणसास धास्त कशी पडेल ? येथें गोला येतो. कोणास येथें राहावयाचें सुख आहे यैसें नाहीं. ये गोष्टीस आम्हीं काये करावें ? येथें गनिमाच्या उरावरी पाये देऊन बसावें लागतें. तेव्हां मर्द माणूस असिल्याविना कसा स्वामीचा नक्ष राहातो ? आज तागायत स्वामीच्या पुण्यें गनिमाचा हिसाब धरिला नाहीं.

पुढेंहि स्वामीचें पुण्य समर्थ आहे तों चिंता नाहीं. येथून कारकून लोक मावळे आणावयास पाठविला. त्या कारकुनास राजश्री कृष्णरावानी चासेस नेला आहे. तरी या मनसब्यास अश्या गोष्टी कशा कार्यास येतील? दुसरी गोष्ट राजश्री येसाजी लोहट गवरोजी लोहट याचा पुत्र सरकारांत चाकर आहेत, त्याचा गांव मौजे गंगापूर तालुके घोडें येथील त्याच्या वडिलापासून पाटेलकी चालत आली आहे. त्यास सांप्रत येवजी लोहट याचा गोत्री दुसरा लोहट आला. चासेस नेऊन त्याजवळून गंगापूरची पाटिलकी घेतली. येवजी लोहट येथें मोर्च्यांत चाकरीवर असतां त्याचें वतन घेतलें, तेव्हां त्याणें काये करावें? येसें वर्तमान आहे. मागाहून तहकीक मनास आणून सेवेसीं लिहून पाठवितों. संभर मावळे घरीं बसले. इनायेती[१] करून येत नाहीं. पूर्वीच मावळे गेले त्याची हजिरी पाठविली आहे. हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao complains to the Peshwa against the Mavlas who deserted him to follow Krishnarao. In order to bring them back the writer sent a clerk who however went over to the service of Krishnarao. He advises the Peshwa to keep a good man there, otherwise the Peshwa's supremacy will be entirely lost.*

No. 33] [*29-5-1747*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ साहेबाचे शेवेशी

विनंती सेवक कृष्णाजी महादेव चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २९ जमादिलौवलपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. किल्ले माणिकगड येथील संदर्भ आला त्यावरून तरतूद होऊन किल्ला फत्ते जाहाला; याचे वर्तमान राजश्री रामाजीपंत याही लिहिले आहे त्यावरून अवगत होईल. वरकड सविस्तर मागाहून लेहून पाठवितो. सेवेसी श्रुत होय. कृपा वर्धमान केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Mahadeo reports to Bhausaheb the capture of the fort of Manikgad.*

---

१ आज्ञापत्र.

No. 34] [29-5-1747

श्री

श्रीमंत राजश्री पंत

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २९ जमादिलौवलपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. किले माणिकगड येथील राजकारण आल्याचें वृत सेवकानी हुजूर निवेदन केलेंच होतें. त्यास प्रस्तुत कार्यसिद्धि होऊन येई आसा संदर्भ आला. त्याजवरून येथून तरतूद करून किला फते जाल्याचें वर्तमान श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीस लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. किल्याचे बंदोबस्तास सेवक आजच निघोन जातो. तेथून साद्यंत लेहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer communicates to the Peshwa the news of the capture of Manikgad and says that he is proceeding there to occupy it.*

No. 35] [12-6-1747

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. तागायत छ १४ जमादिलाकर माणिकगड फत्ते जाल्यापासोन राजश्री मानाजी आंगरे आपले जागां खबरदार होऊन स्थलोस्थलाचा बंदोबस्त करित असेत. सागरगडासंनिध्ध रामदरणा म्हणोन डोंगर बसविला होता तों कामाचा नाहीं, यास्तव तेथें कांहीं बंदिस्त केली होती. कोसलून टाकून लोक कुलाबियास नेले. तैसाच रांजणखारीस मेढा आहे तो मोडोन टाकणार. पेंबेस सवासें माणूस रामाजी अनंत सबनीस याजबराबर गेले. त्यास किल्यावरील जुने लोक माचीस उतरोन हे लोक चढविले. आणि भवानजी ताकपीर व रामाजी अनंत ऐसे तीनसें माणूस किल्याखाले राहिले आहेत. मानाजी आंगरे कुलाबियास लोकांचा जमाव करित असेत म्हणोनहि वर्तमान आहे, त्यास इकडील आपला बंदोबस्त स्वामीचे प्रतापेंकरून आहेच. राजश्री आपाजी हरी कुलाबकर सारे लोक आबटे व मोहपतं मिलोन तिकडील चौकी बंदीस ठेविले आहेत. उरणचा

बंदोबस्त आहेच. वसईस लोकांविसीं लिहिलें होतें तिकडून दोनसें माणूस काल आलें. ते उरणांतच ठेविलें आहे. वरकड जेथें चौक्या बसवणें तेथें बसविल्या आहेत. आणिखीं लोकांचा भरणा पाहिजे. त्यास येविसीं हुजूर लिहिलेंच आहे. कृपाळू होऊन बेगमी करावी. आंगऱ्याकडील कबिलदार तीनसें माणूस कल्याण प्रांतें येऊन स्वामीचे पदरीं पाडिलें आहे. तें चौकी बंदीस पाहिजे येविसीं मुख्य पत्रीं विनंती लिहिली आहे. आज्ञापत्र सादर करणार धणी आहेत. मानाजी आंगरे जमाव करीत आसेत. वर्तमान वरचेवरी आणवित असों. स्वामीचे प्रतापें-करून त्याचा हिसेब आहेसारखा नाहीं. सेवक आज उरणाहून आबझ्यास गेलों. तेथील बंदोबस्त करून माणिकगडास जाऊन मजबुदी करणें असेल ते करून उरणास येऊन ठाण्यास जाऊन हिसेब आकारायाची त्वरा केली आहे. हिसेब कितेक मुस्तेद[१] करून आज्ञेप्रमाणें लौकरीच येतों. किले मजकूरचा बंदोबस्त करून सविस्तर तेथून लेहून पाठवितों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The efforts of Manaji Angria to concentrate his forces in the Kolaba district, subsequent to the capture of Manikgad by the Peshwa's troops, are reported to the Peshwa by Ramaji Mahadeo.*

No. 36] [8-8-1742

पौ छ २६ रजब

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १७ माहे जमादिलाकरपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून प्रांत मजकूरचें व सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामी कृपाळू होऊन छ ७ जमादिलावलचें आज्ञापत्र सादर केले तें छ ६ जमादिलाकरीं पैवस्ता जाहालें. तेथें आज्ञा कीं बहुत दिवस तुम्हांकडून कागदपत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तरी सविस्तर लिहिणें. त्यास येथील वर्तमान घडीघडीचें हुजूर श्रीमंत राजश्री पंत स्वामीस पुण्याचे मुकामीं लिहून पाठवीत आव्हों. ते स्वामीस इकडील सविस्तर लिहीत असतील. प्रस्तुत आज्ञा कीं "मुलुकगिरीचे दिवस बहुतेक देशींच क्रमले. तदोतर नर्मदा उत्तर तीरास आलियावरी मंडल्याचा कार्यभाग उपस्थित जाहाला,

---

१ सिद्ध, तयार.

तो विल्हेस लागे तो कांहीं दिवस गेले. त्या उपरी रजवाडियांत येऊन मामला विल्हेस लावावा; कमावीसदाराचे रसदेचा निशा करून द्यावा, त्यास येक येक जागां आठआठ रोज लागले व आणखी राहिलें त्याचीहि विल्हे व्हावी लागली, त्याजमुळें गुंता पडिला. या प्रांतीचा बंदोबस्त जाहाला पाहिजे. यास्तव दिवस निघोन गेले. देशीं यावें तरी प्रज्यन्न लागो लागला. नर्मदेस पाणी आलें. नांवांनीं लस्कर उतरावें तरी लष्कर बहुत; नांवा थोडक्या. येक नर्मदा उतरावयासी मास सवामास लागेल. पुढें तापी उतरणें; त्यासहि याचप्रमाणें दिवस लागतील. परजेन्याकारितां लष्कर श्रमी होऊन नाश होईल. याजकरितां देशीं यावयाचा विचार राहावावा लागला. आणि छयावणी करावयाचा करार करून येंदा छयावणी केली. यैशास ते प्रांतीं गड किलेकोट आहेत. तेथील बेहबुदी असावयाची ते आहेच. तुम्ही साष्टीस आहां तेथीलहि बंदोबस्त आहेच. तुम्ही तेथें असतां कोण्हे गोष्टीची फिकीर आहे, यैसें नाहीं. तेथील बेगमी म्हणावी तरी तोहि यैवज जितक्यास तितका आहे. तरी तुम्ही ते जागां खबरदार चौकशीनें राहून स्थळें संरक्षण करून राहाणें व इमारतीचें काम चालवीत जाणें. बंदोबस्तास कोण्हेविशीं अंतर न करणें. जे गोष्टीनें शत्रूचा पराश्रम न होये ते गोष्ट करून वरचेवरी आपणांकडील वर्तमान लिहून पाठवीत जाणें. चिरंजीव आज्ञा करतील त्याप्रमाणें वर्तणूक करणें आणि गनीमाची खबरबखेर राखून, राखत आहां, किंबहुना अधिक राखीत जाणें " म्हणोन आज्ञा. यैशास स्वामीचें आगमन लौकरीच होईल हा हेत लहानापासून थोराचा होता. निमि(त्य) कीं बोलीचालीं देणेघेणें रदबदल्या शेवेसी करावयासी अपेक्षा सर्वांची होती. त्यास स्वामीची छयावणी ते प्रांतें जाहाली तें युक्तच जालें. इकडील स्थलांचे बदोबस्तास श्रीमंत राजश्री पंत स्वामी पुण्याहून कैलासवासी श्रीमंत राजश्री आपास्वामीप्रमाणें बंदोबस्त आज्ञा कर्तव्य ते करीत आहेत. कोण्हे गोष्टीचें नुन्यें पडों देत नाहींत. जागां जागां कोंकण प्रांताचे गड कोट ठिकाणीं ज्या ज्यास ठेविलें आहेत तेहि स्वामीचे शेवेसी तत्पर आहेत. शत्रूचा पराश्रम तिलतुल्य कोठून होईल? स्वामीचें पुण्यें प्रतापेंकरून जागोजाग खबरदार आहेत. प्रस्तुत शत्रु फिरंगी; त्याचें वर्तमान अलाहिदा पुरवणींत लिहिलें आहे त्याजवरून निवेदन होईल. सुरतेस अजम तेगबेगखां व सिदी मसूद गडबड करून अरमारें सज्जुदी करून आमचें आरमाराशीं गांठ घालावी या विचारांत राहून राजपुरीस वगैरे जागा दर्यावर्दी खलाशी ठेवीत आहेत, हे सविस्तर वर्तमान राजश्री शंकराजीपंत यांहीं आम्हास लिहिलें व आम्हीहि मनास आणिलें. त्यास स्वामीचे प्रतापेंकरून त्याचे वलवलीस शिक्षा करून. दुसरें अपूर्व वर्तमान नाहीं. वरकड प्रांत मजकूरचें वर्तमान

अलाहिदा पुरवण्यांत लिहिलें असें, त्याजवरून विदित होईल. कोटकिल्याविशी स्वामीचे प्रतापेंकरून कोण गोष्टीचा धोका नाहीं. वरकड शत्रूची बातमी राखत आसों. त्यासी कांहीं चलचलाव जाहाला तरी स्वामीचें पुण्य समर्थ आहे. गनीमास नेतिजा[1] पोहचोन नामोहरम होईल यैसा स्वामीचा प्रताप आहे. यासी श्रीमंत राजश्री पंत पुन्याहून पहिला श्रीमंत कैलासवासी वरचेवरी जागियाचा बंदोबस्त करीत होते त्याहून अधिकोत्तर तरतुदीस अंतर होत नाहीं. उरुणास नेहमी दोन महिने राहोन तेथील चौबुर्जीचें काम मुस्तैद[2] करितों. ठाणेयांची इमारत जाहाली असें. कोठें राहिली आहे तीहि मुस्तद करितों. येसवंतगडीं दोन महिने नेहमी राहोन तेथील इमारत जलदीनें आधीं करितों. पहिलें उरुणाखालीं जागा होती तो आवसान धरावयासी नव्हते. आतां डोंगरी जागा, याजवरी टोपीकराचे कांहीं शत्रु आहे यैसें नाहीं. त्यासी मुंदाई[3] आंगारक व शामल. त्यासी त्या उभयेतांस आपले जागा राखतां पुरें जाहालें असें. त्याहीमधें जागियाची मजबुदी केली. पाणी नव्हतें तेंहि हऊद बांधोन पाणी पुरेसें केलें. येसवंतगड तरतें बंदर; तेथील बंदोबस्त तेथें राहून च्यार महिनेइयांत आधीं करितों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev to the Peshwa informing him of the details of the situation at Bassein and the west coast and the steps the writer was taking for its defence.*

No. 37] *[7-7-1747*

पा। छ १९ रजब

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेशी

विज्ञापना. तागायत छ ९ रजब स्वामीचे आज्ञापत्र सादर. तेथें आज्ञा कीं "माणिकगड घेतला तेथील बेगमीचे रोखे मुलकात मनमानें तसे करून उपद्रव देतां. बकरी व कोंबडी नेतात. अंगरियाकडील लोकांचे कबिले दोन तीन गांवीं होते तें गांवीं स्वारी पाठवून लुटले. या खेरीज पेणेचा एक गांव कान्होजी गजे याणीं लुटला म्हणोन कळो आले. तरी गांव लुटावयाचे प्रयोजन काये होतें ? त्याचे चाकर लोकास लुटून कजियानी कजिया वाढवावा यांत अधिकोत्तर काये ? आपले कार्य होणे ते जाहाले, यैसे असतां कान्होजी गजे गांव लुटितात ते फजीत पावतील. व तुमचाहि उबार राहणार नाहीं. किल्यास सामान काये आहे

---

१ शिक्षा. २ तयार, भक्कम. ३ मुद्दई = दावेदार.

व असावेसे असेल ते लिहून पाठविणें. मनास आणून त्याप्रो॰ राजश्री त्रिंबक विनायक याजपासोन देविले जाईल. दरम्याने मुलकात तुम्हास रोखापत्र करावयास प्रयोजन नाही. किल्याचे भरतीस लोक असावे किती आणि तुम्ही ठेविले किती ते लिहिणे. सध्या गलबलीचा समय आहे. लोकांची भरती बरीच करणे. जे समई त्याचा अमलच बंद करणे अशी आज्ञा होईल ते समई करणे. प्रस्तुत गांवास रोखे अथवा अमलदारास उपसर्ग एकंदर न करणे." म्हणोन आज्ञा. ऐशास किल्ला घ्यावयासीं लोक पाठविले त्याणी किल्ला घेतल्या वरील किल्लेकरी लोक किल्ल्याचे घेऱ्यात होते त्याची खबरदारी केली. त्यास नागोजी गोला म्हणोन सिपाई माणिकगडकरी कुलाबियास होता त्याची गुरे तो तिकडे गेला म्हणोन आणली होती. त्यास नागोजी गोला इकडे येतांच त्याची गुरे त्याचे हवाली केली. तैसाच शंकराजी बोबला किल्ल्याचे संदर्भात इकडे होता, त्यास कुलाब्यास नेऊन अटकेंत ठेविला आहे तो सुटोन यावा यास्तव त्याची गुरे आणली होती. परंतु बोबल्यास अंगारकाने मारिला, किंबहुना खांदेरीवरी ठेविला; वर्तमान न कले. तेव्हां त्याची बायको व मूल किल्ले मजकुरी होता त्यास आणून त्याची गुरे त्याचे हवाला केली. दुसरें कोण्हास काडीइतका उपसर्ग केला नाहीं. लोकास अगोधरच ताकीद केली होती. किल्ल्याचे माचीसहि कबिलदार लोक होते. लूटलबाड किमपि केली नाहीं. तसाच मुलकांत रोखापत्रहि केला नाहीं. त्याचे अमलदारास कोण्हे येकास उपसर्ग केला थैसेहि नाहीं. आबव्याचे ठाण्यामुलें किल्ल्याची अमदरत्फी[1] बंद. खाडी मोकली असावी यास्तव लोक पाठविले. हे जाताच ठाण्यातील लोक उठोन गेले आणि आपले लोक ठाण्यांत राहिले. परंतु तेथील रयेतीस अथवा कोण्हास उपद्रव केला नाहीं. तैसेच पेणेचे अगर दुसरें गांवांस उपद्रव होऊन लूटलबाड केली थैसेहि जाले नाहींत. किल्ल्याचे देवस्थानास चार पांच बकरी पाहिजेंसी होती ते किल्ला घेतांच दुसरें दिवशीं कान्होजी गजे याणी आणून किल्ल्यावरील देवस्थानास दिली. वरकड कोण्हाची वस्तभाव आणून लूट केली नाहीं. किल्ल्याचे कारसाजीचे रोखेहि केले नाहीं. किल्ल्यास किरकोल सामान पाहिजेसे होते ते किल्ले मजकूरचे पत्र येतांच समार्जन्या आदिकरून उरणाहून रवाना केले. ऐसे असोन स्वारीचे लोकांनीं लूट केली म्हणोन हुजूर विदित जाले. तरी वर्तमान या प्रकारचे आहे. स्वराज्यातील रयेत. किल्ला घेतला म्हणोन लुटल्यास परिणाम लागेल कीं काये हाच विचार चित्तात येऊन लोकांस निरवण केली होती. तदनुसार लोकांनीं वर्तणूकहि केली. परंतु कोण्ही हुजूर लिहिले अथवा विदित केले असेल त्याज-

---

१ आमदरत्फी =दळणवळण.

वरून आज्ञापत्र सादर जाले ते सिरसा. वर्तमान या प्रकारचे आहे. सर्व हुजूर आल्यावरी विदित होईल. किल्याचे भरतीस तीनसे माणूस चांगले निवडुक सरस ठेविली आहे. सुभानजी विश्वासराव आजवरी तेथें होते. हल्ली शंकराजी नाा बने नेहमीच पाठविले. भात दीडसें खंडीपर्यंत किल्ल्यावरी आहे. दारूची बेगमी बरीच आहे. किरकोळ सामान पाहिजेसे होते त्यास सेवक किल्ले माा जाऊन मनास आणून बेगमी केली. बंदोबस्त करावयाचा तो केला. तैसेच आबटेयास राजश्री आपाजी हरी व कान्होजी म्हैसके वगैरे कुलाबकर सागरगडकरी लोक चारसे माणूस ठेविले आहे. सविस्तर स्वामीस निवेदन व्हावे यास्तव लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo apprises the Peshwa of the state of affairs in the district of Manikgad after its capture, and denies the charge of harassment brought aganist his men.*

No. 38] *[10-7-1747*

छ १९ रजब

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतपधान स्वामीचे सेवेशी

विज्ञापना. तागायत छ १२ रजेब. किल्ले माणिकगड सरकारांत आला त्यास किल्ल्याचे तनख्याच्या तर्फा च्यार. वनखल व चिवनखल व अंजुरवलींत व तुंगारतन ह्या चार तर्फा. एक तर्फा आंगरियाकडील आहे तेथील वसूलवासूल प्यादाजवादा अंगारकाचा उठवावा. त्यास स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले कीं, मुलकांत चिठी मसाला अगर आंगरियाकडील अमलास येथील आज्ञेविना तोसीस न लावणे. त्यास प्रस्तुत आंगरेयाचे वरातदार चोरीनीं येऊन घरपट्टीचा वसूल घेतात. कांहीं कांहीं घेतला आहे. आम्ही परिछिनवादे वरातदार फिरोन द्यावे तरी स्वामीची आज्ञा नाहीं. ते तरी वसूल घेतात. पुढें घरपट्टीचा वसूल व पाहणी घराची व म्हैसीची पाहणी जाहाली पाहिजे. त्यास आमची दखलगिरी करावी. याजकरा[1] आंगरियासी वसूल घेऊ द्यावा कीं न द्यावा ते आज्ञा केली पाहिजे. आम्ही उगीच मनाई करवितो, परंतु आज्ञेविना निठूर[2] करवत नाहीं. आज्ञा ते सिरसा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer asks for the Peshwa's orders whether the Vatandars of Angria should be allowed to continue to collect the house-tax from taluks in the jurisdiction of Manikgad which they have been doing in spite of the fact that the fort was in the Peshwa's territory.*

---

१ याजकरवी. २ निष्ठुर, कडकपणा.

No. 39] [*Recd. 13-7-1747*

छ १९ रजब

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना व ताा

राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री मानाजी आंगरे यांजकडील अंताजी बावाजी येथें आले. धाकटे बाईची भेटी घेऊन साद्यंत वर्तमान सांगितलें. त्याजवरून बाईनी राजश्री गोविंदराव यांस व आम्हांस बोलाऊन नेऊन बोलिलीं कीं मानाजी आंगरे याचा उछेद समुलींच करावा हेंच तुमचे चितीं आहे कीं काये ? दगाबाजी करून त्याचा गड घेतला. राजश्रीच्या व आमच्या गल्यावर हात ठेविला, शफत केली कीं, या मागे जालें ते जालें, अत:पर काहीं होणार नाहीं, यैशी शफत केली, ती कोठें राहिली ? अतैव धण्याचे पायांजवल शफतपूर्वक बोलिलें तेहि प्रमाण नाहीसें जालें. तेव्हां तुम्हांस धरावे कोठे ? केला कारभार सिधांतास न्या असा भरवंसा काये मानावा ? असो. याउपरी त्याचा गड[1] त्यास दिल्हा तरीच तुमची माझी ऐक्यता आहे. नाहींतर मीं राज्याजवल अतिषये करीन, गड देववीन. परंतु उत्तम प्रकार तर मी सांगतें हेंच अइकोन गड द्यावा, मजलाच येश यावें उतम आहे. न ऐका तेव्हां राजश्रीकडील उपाये होऊन येईल, परंतु तुमचा माझा बेबनाव होईल. यैसें बहुतच भाषण सक्रोधपणे केलें. आम्हीं उभयेतानी जाबसाल समर्पक कर्तव्ये ते बहुतच केलें; परंतु सतेपुढें शाहाणपण कोठे भांडतें ? आमचें जाबसाल येन्हवींच उगऊन देऊन आपलेंच वोडें पुढें ढकलितात. सेवटीं आम्हीं जाबसाल केला कीं, साहेब आज्ञा करीत आले, आम्हीहि वरचेवरी लिहीत आलों, परंतु जाबसाल मर्जीस न येत व येतांत तर साहेबीं आपलें पत्र द्यावें, आम्हीहि लिहितों, जाबसाल येईल तो गुजरानू, यैसें बोलिलों. त्याजवरी धनीन बोलिली, मी कांहीं लिहीत नाहीं. बोलतांत येक, करितात येक, कांही कोणे गोष्टीचा अंत लागत नाहीं. मी कशास कागद लेहूं ? निदानी राजश्रीजवलहि मजकूर त्यानी केलाच आहें, त्याजवरून राजश्री बहुतच रुक्ष आहेत. गड दिल्हाविना राजश्रीची व धननीची मर्जी राहात नाहीं. परिणामी गड द्यावा लागतो चुकत नाहीं हे विज्ञापना.

¶*Purandare reports to the Peshwa that the Queen Sagunabai is greatly incensed at the news of the occupation of Manikgad by Peshwa's men.*

---

[1] माणिकगड.

¶४२

बादज राजपूर प्रांतीचें खंडणी हिशेबसाल गुदस्तांत पले लिहिला त्याची बाकी रुपये राहिले असेत त्याबद्दल नरसो बावाजी यांस रवाना केलें त्यावरून कितेक पर्याय लाऊन विश्वनाथभट याजबराबर लेहून पाठविलें व विश्वनाथभट करार करून गेले कीं राजश्री सचिव याची निशा करणें. त्यावरून इजानेबाही राजश्री सचिव याकडेस सांगोन पाठविलें कीं राजपूर प्रांतीचे खंडणीचे पैके खान अजम यांजकडून आम्हांस आदा होत नाहीं. तुम्ही बाकी देखील रुपयांचा हिशेब आपले आदमी पाठवून घेणें. यावर हें वर्तमान राजश्री सचिव याणी माहाराज राजश्री छत्रपतीस विदित केलें, कीं पूर्वीच पासोनं राजपूर प्रांतीचे किल्लेची खंडणी राजश्री प्रधानपंतांही आम्हास भरून द्यावी. हा तह पेशजींच चुकला असोन हल्लीं राजपुरीस पैका मागावयास सांगतात, त्यावरून राजपूर प्रांतीचे खंडणीबद्दल खान अजम यांची आमची कफावत लागत्ये, याविशी आज्ञा काय म्हणून माहाराज राजश्री यांजवळ विदित केलें. त्यावरून माहाराजश्री याहीं इजानेबांस पत्र लिहिलें आहे कीं पूर्वींपासोन तह आहे त्याप्रमाणें भोगलें. मुदतीचा हिशेब वारून देणें. पुढें पेस्तरपासोन तुम्हांकडून तहप्रमाणें पेका न येईल तरी तहनाम्याप्रमाणें आपणांकडून यांजकडे मुकाबिलेयास लाऊन देणें. पैका देतील न देतील तरी त्याचा विचार केला जाईल. अगर तहप्रमाणें त्याचें तुमचें गौरभ्य चालविणें असेल तरी जो पैका नेमिला आहे तो यांचा यांस पावतां करणें.. ऐशाच बाकीचा पैका तरी त्यांचा त्यांस भरून द्यावा लागतो. मोहीब[1] तरी बयांब[2] लेहून पाठवितात परंतु तहनामा जाला आहे तो काढून त्यामोजीब पैका पाठवीत नाहीं. तहप्रमाणें पैका वारून द्यावा, त्यास खळखळ करावीं हें तरी वाजीब नसें. इजानेबांस मोहीबनजीक सौरभ्य चालवणें आणि तहास पर्याय लाऊन खळखळीस घालावें हें वाजीब नाहीं. पैका तरी बेरीज फार राहिली आहे. तह तरी अजम सिदी अखरकाजी यांचें मारुफातीनें जाला आहे. या उपरी पैका हिसाबीं निघतों. रवाना केला पाहिजे. तह होऊन कज्या वारला आहे तो थोडें हातें बदल लांब करावें हें वाजीब नसे, दराज काय लिहिणें.

¶This appears to be a rough draft of a letter addressed to the English Governor of Bombay by King Shahu or some one on his behalf, asking him to observe the terms of the treaty and make payment to the Sachiv for the territories held by the Sidi of Rajpuri, for whom the British Government appears to be responsible. The next is another letter drafted on the back of this one.

---

१ श्रेद्दी. २ तपशील.

दिगर मोहिबीं वतन दिल्हें. सरंजामहि करून दिल्हे. अमाखान जंजिरेस आणितां शिक्का मोहर चालती केली. त्याचा मजकूर मनास आणितां जमाबंदी मात्र होईल. त्याजवरी देशमुखांची मोहर असावी. जमाबंदी देशमुख देशपांडिये यांहीं करून मोहतर्फी जावितें व शिस्ती व तहशिर, सतकरीर जें होईल तें करून आपलें मोहर निशान करावी तें कांहींच करीत नाहीं. मोहीब तरी जे देतात त्यांत तफावत पडत नाहीं. अमा जमाबंदी देशमुख देशपांडीयांचे हातोन करून घ्यावी, त्यास अमलदार परभारांच कारभार करितात ऐसें दिसोन येतें. इंजानेबास हजार पांचशें रुपये कमजादा आले याचें जरूर आहे नाहीं हें तरी मालूमच आहे. अमा वतनी कारभार जो आहे तो चालावा. अमलदार रयतेस जडजल करतील तेथें इनसाब गैरइनसाब मनास आणून रदबदल करून वाजीब करावें. अमलदानीन कबूल करितां जडजाल केलें तरी मोहीबास मालूम करून रयतीचे सरंजाम करून द्यावें, तेणेंकरून वतनदार ऐसी रयतेस समजतें. मुदतलग वतन भोगवटा राहिला होता तो मोहिबींच दिलावर धरून चालता केला. इजानेब वतनावर मोहिबानजीक चाकरी करितो हें थोरपण मोहिबांचेंच आहे; ऐसेंही असोन जें दिल्हें तें आपण आपलें म्हणोन चालवावें, अगर मोहीबनजीक इजानेब आहे असें दिलांत धरून मुतालिक आहें, त्याची गैराशी करून अर्ज मालुमांत खातरेस आणून सरंजाम करावा हें वाजीब आहे. मोहिबीं मेहरबानी करून हजार पांचशें इजानेबांस पावते कीं अगर इजानेबांकडून मोहीबाकडे पावते जाले तरी लोक देखावयास येत नाहीं. दुतर्फा गौरोशी असिल्यानें तुम्हादेखत आहे हें अजीं जी मोहीब नजीक इजानेब चाकरीचें नात्यानें चालवितों. मोहीबाचे दिलीं चालवावें ऐसें दिलापासोन असिलें तरी जो अमल वतनी असेल त्याप्रमाणें चलावावा. न चालऊन अमलदार अगर वतनदार गैगुदर करितील तरी ताकिदी चिठ्या केल्या पाहिजे. नाहीं तरी वतनाचे दोन हजार रुपये पोंहचतात हे रयेतीस हैरान करून घ्यावें ऐसे नाहीं.

¶*This also appears to be a letter drafted for dispatch to the English either by the Sachiv or by King Shahu. The paper refers to some money dealings between Maratha chiefs and the English at Bombay.*

No. 41] [*1748?*

श्री

राजश्री बालाजीपंत प्रधान

गोसावी यांसीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो जयराम सावंत भोसले व रामचंद्र सावंत भोसले सरदेसाई प्रां कुडाल व माहालानिहाय दंडवत

विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन लिहिला अभिप्राय कळों आला. राजश्री तुळाजी आंगरे याच्या मुलकांत धामधूम करावी या उदेसी जमाव करून सरदेस आला, म्हणऊन वर्तमान अवगत जाहालें. ऐसेयास रा रामाजीपंत येथ होते, त्याणी आंगरेयाकडून मुलकांत धामधूम करितात म्हणऊन सांगितलेंवरून त्यास लिहून पाठविले. त्याही उपद्राप सोडिला, ऐसे असोन तुम्हाकडून कलहास कारण होते हे गोष्ट उचित नाही म्हणऊन लिहिले. ऐसेयास आम्हाकडील व आंगरेकडील तह सुधामत चालत असतां आरमारची गलबतें स्वारीस गेली होती तेथून न्हेऊन लोकसमेत अटकेत ठेविले. तदोतर त्याकडील गलबतें याच्या पाठीसी गनीम लागला तेव्हां इकडेस निवतीचे खाडीत लोक उतरोन आश्रेस आले त्यास अटक न करितां बहुमान करून सोडून दिले; ऐसेंहि असोन फिरंगीयाचा कजिया किले यशवंतगडास जाहाला, ते संधीमधें श्नेह चालत असतां भरथगडास येऊन अपाय केला. त्याउपर आम्ही राजश्री सदाशिवपंत याचे दर्शनास गेलो, ते प्रसंगीं मागें सिधगड त्यांही घेतला, हा सविस्तर अर्थ राजश्री भाऊस निवेदन केलाच होता. कितेक ममता धरून बोलिले होते, त्यांस सर्व अवगत आहेच. त्याणीहि आपणांस निवेदन केलेच असेल. सालगुदस्तां आंगरे याकडून भला माणूस आपणाकडेस आला, ते प्रसंगी आपण लिहिले जे इकडील भला माणूस पाठऊन द्यावा. उभयतांचा विचार मनास आणून, बीद बसविला जाईल म्हणोन लिहिले, त्यावरून आम्ही रा रामाजी चिमणाजी यास पाठविलां. पुढां तो मजकूर किं निमित्य राहिला, आपणास दाखल असेलच. त्याउपर आम्ही भरथगड घेतला तेहि वर्तमान आपणास लिहिलेच होते. सिधगड आंगरे यांकडेस राहिला आहे ते मुलकांत धामधूम करावयास चुकत नाहीं. तह चालत असतां येवढा उत्पात त्याणी केला तेव्हां प्रतिकारहि करावा लागतो; यास्तं सिबंदी ठेविली, भरथगड घेतला, त्यास अंगेजणीस बक्षिसा द्याव्या लागल्या, ऐसा कितेक खर्च जाहला. इतुकेहि असोन ते ध्यानावर येतनात. त्याकडेस आमची ठाणी व आरमारची गलबते आहेत ती देत नाहीत; आण ते सांगतात ते गोष्ट प्रमाण मानून आपण पत्र पाठवितात जें कलह केल्यानें कल्याण नाही. तेव्हां उगेच असोन आमचे पुरातन किले सोडावे, स्वारी सिकारी न करावी; अगर त्याचा येत्न न करावा, ते उपद्राप करतील तो सोसावा, ऐसे केलेया कल्याण होतेसें आपल्या विचारास आलेवर उतमच जाहाले. आपणास सर्व गोष्टी समजोन असें लिहिलें, तेव्हां अपूर्व दिसोन आलें. आम्ही त(र) आपल्या वचनांवितरुक्त नाही. परत गेली स्थले व आरमारची गलबतें हातास येईपर्यंत उपाय करावा

लागतो. आपण तर जाणतच आहेत. तेथ विस्तार काय लिहिणें ? सूचनार्थ लिहिला असे. चित्तीं आणून उतर लेहून पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Jayaram and Ramchandra Savant Bhonsle jointly request the Peshwa to urge Tulaji Angria to return to them their strongholds and battleships captured by the Angrias in defiance of the treaty.*

No. 42] [पौ *7-12-1748 ?*

पौ छ २६ जिल्हेज

श्री

सेवेसी विनंती. ठाणेकर दर्यावर्दी आहेत त्याचा जाब लेहोन पा। म्हणून आज्ञा. त्यास भिवंडीहून दफ्तरीहून लेहोन आणविला असें. आलियावरी लिहून पाठऊन; व राजश्री नारो केशव यांजकडील जकातीचा यैवज, जत्रेचा यैवज खेरीजकरून देविला, तें पत्र त्याजकडेंस पाठवितों. वरकड यैवज पाठंवावा. हैराणगत फारसी जाहली असें. सेवेसी विदित होय. जे क्षणीं पत्रें येऊन पावलीं तेंच क्षणीं उत्तरें लिहिलीं असेत हें विज्ञापना.

¶*The writer Shankraji Keshao promises to send the reply of the sailors from Thana when he gets it from the records at Bhivandi. He also asks for more money.*

No. 43] [*1748 ?*

यादी राजश्री खेम सावंत भोसुले सरदेसाई

प्रा। कुडाल व माहालानिहाय. सालगुदस्तां राऊत अडीचसे व हशमी लोक तीन हजार येणेप्रमाणे चाकरी केली. त्यास सरकारातून दाहा हजार रुो पावले. राऊत अडीसेचा करार रा। अमृतराव चिटनीस याचे गुजारतीने जाहला आहे. सिबंदी आंगावर पडली आहे ती मुक्तता करावी.

कलम १

भगवंतगड आज सोला महिने सिबंदी ठेऊन राखला आहे. त्याची सिबंदी द्यावी. कर्जाखाली आलो आहो. गड सरकारात घ्यावा, किंवा मोडून पाडावा. कलम १

सालसीची पंचादुंही पुरातन संभाजी आंगरे याचे मुदतीपासून तह होऊन चालते. हली तुळाजी आंगरे याचा आमचा बेबनाव जाहला, याजमुळे

मर्दनगडास नेहमी लोक पाठविले आहेत. त्यास पोटास व घरबेजमीस द्यावे. कलम १

मर्दनगडास फिरंगी आला ते समई लोकांनी अंगेज करून, गलिमास पराभव केला, ते काजकाम हुजुरे यानी पाहिले आहे. लोकांस बक्षिसे द्यावी. कलम १

सिदगड आम्ही पुरातन कुडाल प्रांमधे बांधला. तुलाजी आंगरे याणी दगा करून घेतला. उभयता घरकलह लागला, तेव्हां सहजच तुलाजी आंगरे याजपासी राहिला. हली सरकारात घेतला आहे. आम्हाकडील लोकानी घेतला आहे. तो आम्हाकडेस द्यावा. म्हणून तेथील अमलदारास पत्र द्यावे. १

हली फिरंगी याचा करार जे, येक वेल मर्दनगडास जावे, व दुचाली पंचमाहाल येथील ठाणेची बंदोबस्त उत्तम प्रकारे केला; येणे करून आमची कुमक मर्दनगडास होऊ देऊ नये, येसा मनसबा निश्चयपूर्वक जाहला आहे. येशास काही नवी सिबंदी ठेवावयास पाहिजे.

२९०० हशमी लोक

२९० राऊत

यास आज्ञा.

मुलुख वोशाढ जाहला. इकडून स्वारीसिकारी करून, वसूल घेत होतो, त्यास पेशजी प्रा सनद द्यावी, म्हणून रा अमृतराव याचे गुजारतीने करार आहे. कलम १

रा आत्माराम सावंत व रा सोम सावंत व आणखी याचे भाऊ तिघे, येकून पांचजण भाऊ, यास मक्ता ऐवज द्यावयाचा करार सरकारातून जाहला, येसे असतां ताकीदपत्रें मुलकात उपद्रव न करणे, म्हणून हुजूरची पत्रे असतां, हाली मुलुक तमाम नागवितात; आण गावचे पाटील धरून मारता मारता मारून टाकले. मुलुक तमाम वोशाढ जाहला; येसे जाहले असतां हली प्रो येवज कसा पावेल येविसी आज्ञा.

कलम १

खडावा व जिन्नस, जासूद व माणसे घेऊन आली. त्याची रवानगी गुदस्ताप्रमाणें करावयास आज्ञा.

¶*This is a list of terms settled with Khem Savant Bhonsle as regards the maintenance and remuneration of men entertained into service on several forts, e.g., Mardangad, Sidgad, Bhagvantgad etc.*

2758

No. 44] [*Received on 29-2-1756*

पौा छ २८ जमादिलावल

श्री

पुरवणी राजश्री बाबा स्वामीचे शेवेशी

विनंती. राजश्री खंडोजी माणकर याणी अंगरे याचे भेटीचा मजकूर करून अह्वलगडचे मुक्कामी येतांच राजश्री नारो त्रिंबक व माणकर या उभयेतानीं वर्तमान सांगितले. परंतु धण्याचे मर्जीप्रमाणें कार्य होणे यास्तव याच्या सर्व गोष्टी एकीकडे ठेवणे जाल्या. आंगरेयास राखावा, स्थल त्याचे त्याजकडे राखावे, याच भानगडींत होते. आसो. त्या गोष्टीं कोठवरी ल्याहाव्या? अद्यापहि माणकर चालला तसे अंतर करीत नाहीं. परंतु आज मशारनिल्हेस साफच सांगितले. धण्याचे पुण्येप्रतापें त्याचे केले एकीकडे राहून धण्याचा मनोदय तोच सिधीस जाईल. चिंता नाहीं. सविस्तर संभाजी होकराला खिजमतगार व राणोजी खासबारदार निवेदन करितां अवगत होईल. वरकड साद्यंत आज दोन प्रहरा जासुदासमागमे लिहिलेच आहे त्याजवरून अवगत होईल. इतकाहि मजकूर कोणाची नालीसी करावी हे आजपर्यंत वाटियासी आले नाहीं. हाली जरूर न लिाा. आपणास काय वाटेल म्हणोन जरूर जाहले. जावजी गवली खंडोजी बोरगे वगैर यानीं आम्हास येऊ न देतां सरखेलीचा उलगडा करून टाकावा ही समते बहुताची होती. असो. नेहमी इंग्रज बारियावरी राहोन अंगारकास बंद करविला. आता स्थलचा वस्तभेट घ्यावी, याजमुळे आपला बंदोबस्त करून पाहणी करीत असेत. तरी बोली आमची मराळाची त्यासी पत्र पाा जाबसाल तह जाल्याप्रमाणें येईल. तथापि सात्रकारी वस्त आहे. चिंता नाहीं. पैंडोसी[१] कारभार. हुजूर करारदारास अंतर केल्यानें निभाव होईल न होईल हे कलत आहे. अंगारकाची हाली भानगड करितां चुकत नाहीं. पहिले दिवशीचे वर्तमान संभाजी सांगता श्रवण होईल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The writer reports that he turned down the proposal of a compromise with Tulaji Angria as it would contravene the Peshwa's instructions.*

---

१ शेजारचा, लगत्याचा.

No. 45] [1-6-1750

श्री

श्रीमंत राजेश्री नाना
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी नारायेण चेरणावरी मस्तक ठेऊन सास्टांग नमस्कार. विनवावया प्रार्थना उपरी. येथील वर्तमान जेस्ट सुद अस्टमी सुकरवारपरियेत आमचे व हे प्रांतीच वर्तमान येथास्थिती असे. गोव्याकडील वर्तमान तरी काही नाही. ते आपले स्वस्थीलच स्वस्थली आहे. राजेश्री सांवताचे वर्तमान तरी, राजेश्री जयेराम सांवत आंगरेचा मुलकात स्वारीस गेले आहेत, त्याचे वर्तमान आले नाहीं. तिकडील वर्तमान येईल, मग शेवेसी निवेदन केले जाईल. गोपाल शंकर फोंड्यास गेला आहे, तो आला नाहीं. विठोबा सबनीस यानी आंबे गोव्याहोऊन आणविले, ते स्वामीकडे रवाना केल, व मव्हाचे नारेल पाठविले आहेत, ते सेवेसी पावतील. हेराकडील वर्तमान तरी, भागीरथी-बाईकडील कारकून आपणाकड येणार आहे. आपणास सर्व वर्तमान निवेदन करावा यैसे आहे. वरकड हिकडील वर्तमान जे होईल, ते वरचेवरी लिहून पाठऊ. आम्हास आज्ञा होईल तरी स्वामीचे दर्शनास येऊ. बहुत काये लिहिण हे विज्ञापना.

¶*Visaji Narayan to Shrimant Nana, giving news of Jayram Savant.*

No. 46] [18-6-1746 ?

श्री

राजश्री बालाजी पंडित
प्रधान गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलकृंत राजमान्य श्नो तुळाजी आंगरे सरखेल रामराम विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले तें प्रविष्ट जाहलें, व राजश्री रामाजी बापूजी व राजश्री बापूजी माहादेव आले, याणी कितेक आपले ममतेचा व श्नेहाचा अभिप्राय दृढोत्तर आपण बोलिल्याप्रमाणें विस्तारें सांगितला त्याजवरून संपूर्ण चितारूढ जाहला. यैशास उभयपक्षी श्नेहभाव युक्त स्वच्य चितें पूर्वीपासून चालत होतें, ततोप्यधिक आपला आमचा श्नेह चालावा, हेच इछा आमची आहे.

2760

तेथें दुसरा विचार किमपि नाहीं. परस्पर येकरूपतेने निखाळ(स)ता चालत आल्यास, जे जे मनसबे चितात असतील ते आवगत होऊन, सिधीस जावयास आगाध काय आहे? पूर्वीहि याच प्रकारें वडिलाचा निश्चय होता; तदनुरूप परस्पर उपयोगी विचार आचार घडणें ते घडोन, लौकिकी प्रसिधत जाहली, तो अर्थ आपणासहि अवगत आहे. त्याच आन्वयें आपला आमचा निर्विकल्प भाऊपणा चालोन यावा, यापरती आम्हांस जोड नाहीं. येविसीचा कितेक अभिप्राय सांगणें, तो उभयतापासीं सागोन पाठविला आहे. सांगतां कलों येईल. मुख्य जेणेंकरून, संपादिल्या श्नेहाची दिवसेंदिवस सुरसता होऊन अभिवृधि घडे, तो अर्थ केला पाहिजे. रवाना छ ९ माहे जमादिलाखर बहुत काय लिहिणें, लोभ असों दिल्हा पाहिजे, हे विनंती.

लेखन सीमा.

¶*Tulaji Angria to Balajipant Peshwa, giving assurances of the writer's loyalty, provided the addressee faithfully maintains the friendly relations which had so long existed with the house of Angria.*

No. 47] *[31-5-1750*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक विठल विश्राम साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान जेष्ट सुध ७ मी स्वामीचे कृपादिस्टीकरून वर्तमान येथास्तित असें. यानंतर इकडील वर्तमान लिहिणें ते पेशजी जोडा सेवेसी रवाना केला आहे, त्याजबराबर विनंती पत्रें पाठविली आहेंत. सेवेसी स्रुत जाहालीच असतील. हालीं इकडील वर्तमान तर राजश्री जयेराम सावंत भोसले फौजसुधा आंगरे याच्या मुलकांत जाऊन, आच च्यार रोज जाहालें. अद्यापि स्वामीचें वर्तमान आलें नाहीं. वर्तमान येईल ते सेवेसी लिहून पाठऊ. फिरंगियाकडील आधिकोतर लिहावे यैसे नाही. पेशजी विनंतीपत्रें चिरंजीव गुणबाचें नावे पाठविली होती, त्याची आज्ञां सत्वर पावे, यैसे करावयां स्वामी आहेंत. आज्ञां येईल त्याप्रमाणे विचार करूं. हाली गोंवाई आंबे व मोठे नारळ सेवेसी पाठविले आहेत. बहुत काये लिहूं हे विज्ञापना.

¶*Vithal Vishram Sabnis reports to the Peshwa that Jayaram Savant Bhonsle with his forces has entered the territory of the Angrias.*

No. 48] [3-8-1746

श्री

राजश्री माहादाजीपंत गोसांवी
यांसी

ꣳ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो तुलाजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन केले पाहिजे विशेष. पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन बहुत संतोष जाहला. यैसेच निरंतर आपणाकडील कुशल वृत लेहून संतोषवित असावें. वरकड सविस्तर राजश्री बालाजी पंडित प्रधान यांचे पत्रीं लिहिले आहे, त्यावरून कलो येईल. परस्पर उभयपक्षीं श्नेह ममता-पूर्वक चालत आहे, त्याची अभिवृधि विशेषात्कारे होये, ते करावया आपण सुज्ञ आहेत. बहुत काय लिहिणे? लोभ असों दिला पाहिजे; रा छ २६ माहे शाबान हे विनंती.





¶*Tulaji Angria to Mahadajipant Purandare, expressing a desire for friendly relations between him and the Peshwa.*


No. 49] [3-8-1746
छ १० शाबान

श्री

राजश्री बालाजी पंडित
प्रधान गोसावी यांसी

ꣳ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो तुलाजी आंगरे सरखेल रामराम विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय अवगत जाहला. कितेक ममतेचा अन्वय लिहिला. यैशास येविसीचा अर्थ, राजश्री रामाजी बापूजी याजसमागमें निश्चयरूप निखालसपणें सांगणें तो सांगोन पाठविलाच होता, त्याजवरून चितारूढ जाहला असेल; व तदनुरूप आम्ही

आपल्या चिताचा निशा मानिला असे. जे गोष्टीनें आमचें हीत ते आपण करितील, तेथं संदेह नाहीं. वरकड निखालसपणें ममता चालल्यानें जे जे मनसबे चितांत असतील, ते घडोन येतील म्हणोन, तरी पूर्वी वडीलवडिलापासून याचप्रकारें घरोबा चालोन परस्पर मनोदय सिधीस पावऊन घेत होते, त्याच अन्वयें आपल्या आमच्या ममतेचा योग घडोन आला आहे. तेथें दुसरा विचार नाहीं. येविसी सविस्तर राजश्री बापूजी माहादेव यांस लिहिलें आहे. आपणास निवेदन करितां अवगत होईल. रा छ २६ रजब, बहुत काये लिहिणें ? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.



¶*Tulaji Angria leaves everything to the goodwill of the Peshwa.*

No. 50] [*3-9-1746* ?

श्री

राजश्री सदासिव पंडित
गोसावी यांसी

ꣻ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो तुलाजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. राजश्री आपाजी माहादेव व चिंतो कृष्ण आपणाजवळून आले. पत्रावरून व मुखवचनें सविस्तर अर्थ अवगत जाहाला. उभयपक्षीं वडिलोपार्जित श्नेहभाव चालत आला, तद्नुरूप चालोन श्नेहाचें रहस्य स्वरूपास यावें, येविसीचा विच्यार आपाजीपंत यांचे मुखवचनें सांगोन पाठविला; तरी आपल्या श्नेहापेक्षा दुसरे अधिकोतर आहे ऐसे नाही. त्याचप्रमाणें आपण माया ममता धरावी आणि बोलीचाली सिध्दांतास यावी, याकरिता येथील आशय व बोलीचा अर्थ निखालस सांगणे तो सांगोन, आपाजीपंतास पाठविले आहेत. सविस्तर अर्थ चितारूढ करून, व राजश्री पंत प्रधान यांचेहि पत्री हाच अर्थ लिा आहे तो श्रवण करून, करारदाद जाबसाल सांगणे तो

सागोन, रवानगी केली पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दिल्हा पाहिजे; रा छ २७ रमजान हे विनंती.



¶*Tulaji Angria assures Sadashivrao Bhau of the same cordiality which was expressed by him formerly.*

No. 51] [*Oct. 1750?*

श्री

राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीा राणा दुर्जनासिंग दंडवत विनंती. येथील कुशल स्वामीच्या कृपावलोकने येथास्थित असे विशेष. बहुत दिवस जाले माहराजाकडून पत्र येऊन परामृष होत नाही. याकारितां चितांस समाधान नाही. तरी ऐसे न कीजे. सर्वदां पत्रद्वारी सांभाळ केला पाहिजे. यानंतरी श्रीमंत राजश्री नानासाहेब गुजराथ प्रांती स्वारीस यावयास आलंदीवरी मुकाम केला म्हणऊन वर्तमान ऐकिले. आपण पंढरपूर प्रांते आहेत. त्या प्रांतीचा बंदोबस्त करून त्यां प्रांते स्वारीस जाणार हे वर्तमान ऐकिले. त्यावरून चितांत आले कीं आमच्या कार्याची विल्हे कैसी होईल? उभयेतां श्रीमंत येके जागा असते तरी उतम होते. येसे चितांत आले, त्यास आपण श्रीमंतासंनिध आले हें वर्तमान राजश्री बाबुराऊ याणी लिहिले त्यावरून चितास संतोश जाला. आम्हास पूर्वी श्रीमंतानी पत्र लिा होते कीं त्या प्रांती गायेकवाड ठाणीठुणी व नाजुक जागे आहेत. त्याची बंदोबस्ती कोण्हे रीतीची करितात, त्यांचा मजकुर काये आहे, तो सविस्तर लेहून पाठविणे. त्यास आज्ञे-प्रमाणे या प्रांतीची चौकसी करून जागा जागा माणसें पाठऊन वर्तमान आणून लेहून पाठविले; व जे कोण्ही देसाई मातबर माणूस आहेत त्यांचीहि राजकारणे आणून त्याची पत्रे स्वामीस प्रस्तुत पांठविली आहेत. स्वामीची स्वारी या प्रांती होते हे वर्तमान लोकानी यैकोन मातबरानी आम्हासी अनुसंधान केले. त्यांस आम्ही अस्वासन देऊन आपल्यापासीं पारडीस आणून ठेविले आहेत. कितेक सुरतेत आहेत त्याचीहि राजकारणे आली आहेत व सुरतच्या साऊकाराची राजकारणे

आली आहेत. परंतु स्वामी स्वारीस या प्रांते आलियावरी सर्व येऊन स्वामीयासी रूजू करून. या प्रकारचे वर्तमान आहे. आपणास विदित व्हावे याजकारितां लिा असे. सेवेसी श्रुत होये. बहुत काये लिहिणे? कृपावृद्धि केली पाहिजे हे विनंती.

¶*Rana Durjansingh of Mandvi near Surat offers his help to the Peshwa in case the latter should lead an expedition into Gujarat.*

No. 52] *[27-12-1746*

श्री.

राजश्री बालाजी पंडित

प्रधान गोसावी यांसी

ℰ सकलगुणालंकरण अखं(डि)तलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो तुलाजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजें विशेष. राजश्री बापूजी माहादेव यांजबाा पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन संतोष जाहला. यैसेच निरंतर ममतेच्या जागां प्रतिदिनीं पत्रप्रेषणें स्नेहाची अभिवृधी केली पाहिजे. राजश्री खंडोजी माणकर यांस लेहून, खाडीचा नवीन प्रसंग करीत होते, तो दूर केला म्हणोन कितेक स्नेहाचे जागा लिहिले, त्यावरून समाधान जाहलें. आमच्या चितांत दुसरा अर्थ किमपि नाहीं. आपला आमचा मामला येकच आहे, यैसेच समजतों. वडिलांपासून स्नेह व भाऊपणा चालत आला आहे, त्याहिपेक्षां किंबहुना विशेषात्कारें चालावा, हेंच उभयपक्षीं श्रेयस्कर आहे. तेथे उपरोधिक ल्याहावें यैसे नाहीं. यावर्षी गल्याचे पिकास प्रजन्याने घालविलें. याजकरितां आपणास लिहिले आहे; तरी पाचसे खंडी-पावेतों भात माहाड खाडीस अगर रेवदंडे याचे कोटास अगत्य देवावें. त्याचा पैका काय होईल तो जेथे आपण लेहून पाठवितील तेथें प्रविष्ट करून. येविसीचा अर्थ राजश्री बापूजी माहादेव यांजपासी सांगितला आहे, हे सांगतील त्यावरून कलो येईल. बहुत ल्याहावें तरी आपण सर्वज्ञ आहेत. कृपा लोभ असों दिल्हा पाहिजे. राा छ २५ जिल्हेज हे विनंती.

लेखन
सीमा.

¶*Tulaji Angria to the Peshwa, affirming his goodwill and devotion and requesting that 500 khandis of rice should be sold to the writer.*

No. 53] [4-1-1748 ?

छ २४ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. ता। छ १४ मोहरम रेवदंड्याचे खाडीत आपले आरमार गेले; आणि फिरंगियाची व रा। तुळाजी आंगरे याचे आरमाराची आवाई असल्यास आपलें आरमाराचा बच्याव कसा होईल, येसें चितात येईल तरी, वसईचे खाडी-पेक्षा रेवदंड्याची खाडी आतोऱ्यास (१) रेवदंडें व कोरला दोन्ही किल्यांचें पोंटी आरमार राहून, किल्याचा व आरमाराचा मार गनिमावर देतील, येण्हेकरून जुर्मस[1] न खातां, गनिमावर सलाबत बसऊन राजकोट आदिकरून जेर करितील. आरमारास बच्याव दों किल्याचा चांगला आहें. आरमार आंत आल्यांनी राज-कोट जेर होईल, हा विचार पूर्वी सेवक रेवदंड्यास असताच, चितात आला होता यास्तवच आरमार खाडीत घातले. फिकीर आहे सारिखी नाहीं. दुसरा विचार आरमार इकडे गुंतोन राहिलें, तथाप फिरंगियाची आवई असल्यास, आपले आरमाराचा उपराला नाहीसा जाला येसें तरी, आधी तरी फिरंगी येत नाहींच. बातमी गोव्यापासोन राखली आहे. येद्यपि आल्यास त्याच्या तरांड्यापुढे या आरमाराची सलाबत त्याजवरी आहेसारिखी नाहीं. जेथें येईल तेथील किल्याची मारगिरी, व राऊत हशमी लोक याणी मारून काढावा; तरतूदहि याप्रमाणेंच आहे. स्वामीचे प्रतापे करून, तुळाजी आंगरे याचे आरमाराचा व टोपीकराचा हिशेब आहेसारिखा नाहीं. बंदोबस्त किले कोटाचा उतम आहे. राऊत आदिकरून हुजरून आलेच आहेत. प्रस्तुत उधाणाचेहि दिवस पंधरा रोज पर्यंत नाहींत. इतक्यात राजकोटचे कार्य स्वामीचे पुण्य करून घडोन येईल सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer tries to impress on the Peshwa the strength of the Revdanda creek and its powers of resistance against the attacks of the combined fleets of Tulaji Angria and the Portuguese.*

No. 54] [11-12-1750 ?

श्री

श्रीमंत नाना स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक विसाजी नारायण चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार आमचे वर्तमान तर स्वामीचे कृपेआवलोकनेकरून, मार्गसीर्ष वद्य दशमीपर्यंत

[1] जरब.

सुखरूप आसो विशेष. जासुदाबराबर आज्ञापत्र पाठविले. त्यास आज्ञा स्वस्तानाची पत्रे पाठविली आहेत, ती ज्यांची त्यास प्रविस्ट करणे. आज्ञेप्रमाणे जासूदजोडी रवाना केली. आधिकोतर वर्तमान तर, डुकरवाडी घेतली, हे पत्र स्वामींकडे पाठविले होते, त्याजवर ते गंधर्वगड टाकून पळाले. जयराम सावंत याणी आपले लोक किल्यावर चढऊन, बंदोबस्त करून, वाडीस आले. पाच सातसे राऊत व च्यार पाच हजार माणूस यैसे याजपासी आहेत. आंगारकाच्या मुलखात जाणार, आथवा फोंडे प्रांती जाणार आहेत. त्रिंबक हरीचे दाहा वीस घोडी सापडली, आणि दाहा वीस लोक मारले गेले. त्रिंबकपंती येश उतम प्रकारे संपादिले. आंगरे याचे आरमार पाल तीन व गुराबा साहा व चालीस गलबत यैसी घेऊन निघाला आहे. सुवर्णगडाकडे निघाला आहे. बैरवाडा जंजिरा करनाटक प्रांती आहे. याच्या जाऊन गला पडावे, यसा त्याचा मुदा आहे. फिरंगियाकडील वर्तमान तर, आपले जागा तरतुदेने आहे. आपले तर्फेची गलबते घेऊन, रायाजी बोरेकर गलबते सात घेऊन करनाटक प्रांती बिदनूरच्या नस्तावर होता. त्यास फिरंगियाकडील इस्मालखान याने जाऊ(न) गाठ घातली. त्यास च्यार गलबते नाहाट[1] जाहाली होती. तीन गलबते बिदनु(र)च्या खाडीत सिरली होती. त्यास हिरोजी नाईक मालवणकर याची गलबते दोन तेथे होती ती दोन, व आपले तर्फेची तीन येकून पाच मागे फिरोन येत होती; तो मार्गी फिरंगियाची भौवणी गोवियातून आरमाराकडे खबरीस जात होती, त्याची व आपल्या गलबताची गाठ वाटेस पडली. जुज जाहाले. फिरंगियाकडील भौवणी घेतली. हिरोजी नाईक याची दोन व आपली तीन व भौवणी घेतली, ती यैसी सा गलबते मालवणावर आली. नाहाट गेली होती ती तीन आली. येकाचा शोध कोठे नाही. याजकरितां ही नऊ गलबते आणखी पाच सात मालवणची, यैसी दाहा पंधरा गलबते करून, स्वारीस करनाटक प्रांते गेला आहे. स्वामीस कलावे म्हणून लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Narayan writes to the Peshwa news from the coast, especially about the Savants, the Angrias and the Portuguese. He also refers to petty skirmishes between these powers and makes mention of a local success achieved by one Trimbak Hari (Patwardhan).*

1 Out to sea; off from the land.

No. 55] [22-12-1750

श्री

राजश्री बाळाजी पंडित प्रधान
दाजी गोसांवी यासी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री मानाजी आंगरे वजारतमाहाब रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. सांप्रत पत्र पाठविले ते पावलेंच असेल. राजश्री स्वामी मातुश्रीसहवर्तमान सातारियावरी मुकाम केलियावरून कितेक राज्यप्रवृतींत विपर्यास दिसोन आला आहे. त्याविशी आमचेठाई किंचित् आपले चितांत सौंशय येऊन राजश्री अंताजी बाबाजीस आज्ञाकरून सवज्ञापूर्वक आचारविचार सांगितल्याप्रमाणें मारनिलेनी लिहिले प्रमाण आहे. तथाप जेथे आपला निशा पुरत नसेल तेथील सौंशय प्रसंगोपात आपले चितात यावा हे उचितच असे. आम्हाकडील विचार परस्परांचे वडिलोपार्जितांत येकरूपतेच्या अन्वयांत खावंदाविना दुसरे दैवत नाही व सौख्य संकटास उभय पक्षीं द्वैत नाहीं. हाच परिचार चालत असतां पहिल्यापेक्ष्यां आपला अवलंब आम्हास कैलासवासी राजश्री राऊ व आपा दाजीपासून घडोन आल्यादारभ्य आपण अंतरसाक्ष आहेत. मधें पदरीच्या लोकांपासून विपर्यास प्रसंग घडत आले व पूर्वी आपण सातारां असता आम्हीहि गेलों. लौकिकाचा विचार येकीकडेस राहून आपले घर आपला आश्रये कल्पोन समजोन कोण्हाचे अन्न न धरितां आपणासीं येऊन भेटलो. या साक्षीस बहुत काळ गेले नाहीं. माणिकगडाविशी कैलासवासी राजश्री स्वामीची कृपा व आपल्यास अगत्य होतें तरीच आमचे मनोधारण केलें. त्यास विपर्यास न व्हावासा होता. परंतु समई जाला म्हणोन पुन्हा स्वाधीन न करीत ऐसी उपेक्षा आपण न केली व केली तऱ्ही घरातील बोलणे रुसणे घरातच आहे व होईल. या स्वहितापेक्षा [शिक्का] आणखी आधिकोतर कोणते आहे? प्राप्त प्रसंगाप्रमाणे परिहार करावा ल्याहावा, तरी आपले तों चित्तास विपर्यास येण्हार नाहीं. परंतु लोकोतरांत की, कार्यवादू आहेत. बोलोन निष्टा दाखवितात. यास्तव लिहितां उपरोध वाटतो. असो आपण सर्व प्रकारे आम्हास वडील आहेत व राज्यभाराविशी आपले श्रमसाहासास विभागी विचार याणे पाहातां सर्वहि आहेत व असतील, परंतु खावंदाचे स्थातव्य सातारां जाहाले. यामुळें पूर्वीपासून कैलासवासीचे पुण्यसामर्थ्याने राज्याभिवृधीच्या लौकिकास आधिकारी आपण आहेत.

त्याचे सौरक्षण करणे व प्रातप्रसंगाचे निराकरण होणे हे संकट आपणाविना इतरास असिल्या फलाधीश असेल व् आहे तो उतमच म्हणावा. आपले आपल्याचकडेस आहे. ते येश सौरक्षण व्हावें हेच आम्ही श्री जवल इछोन आपले पदरी आहो. यास दुसरा विचार न समजता आमचा सांभाल करणार आपण वडील आहेत. रा छ ३ माहे सफर. बहुत काये लिहिणे? कृपा असों दीजे हे विनती.



¶*Manaji Angria to the Peshwa, affirming his loyalty to the addressee although he had many grievances to urge upon his attention.*

No. 56] [*5-1-1751 ?*

श्री

राजश्री महादाजीपंत
गोसांवी यांसी

᳚ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत श्नो तुलाजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. चिरंजीव मैनाबाई याचे लग्न माघमासी शुधपक्षी योजिलें आहे. वरविचारणा राजश्री रामसिंग अववडराऊ देशमुख यांचे पुत्र नेमस्त केले आहेत; लग्न समारंभास गोसांवीयांणी यावे, याकरिता हें लग्नपत्रिका कुकुमांकित लेखन करून पाठविली आहे; तरी प्रविष्ट काली सहपरिवार मंडपशोभाये-(मान) करावा. बहुत काये लिहिणे? (लोभ केला) पाहिजे. रा छ १७ माहे सफर हे विनंती.

¶*Tulaji Angria invites Mahadajipant to the marriage ceremony of Mainabai.*

No. 57] [9-2-1751 ?

श्री

राजश्री बाबा फडनिवीस मो पुणे
स्वामी गोसावी यासी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री मोराजी सिंदे नामजाद जंजिरे रेवदंडा रामराम विनंती. येथील कुशल जाणौन स्वकीयें कुशल लेखनं करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. वसईहून दारू दोन खंडी व सिसे पाच मण पक्के सास्टीहून देविले, त्याच्या सनदा पाठविल्या त्या पावल्या. तेल दीड खंडी पक्के हुजूर कोठीपैकी देविले आहे. त्यास भाडेयाची बेगमी करून, तलें अष्टमीस येऊन पोहचे, येविसीची आज्ञा केली पाहिजे. प्रस्तुत दुसरे गलबत राजश्री तुलाजी आंगरे सरखेल यांजकडून कुलाब्यास दारूगोला वगैरा सामान घेऊन आले आहे ; येविसीचे वर्तमान हुजूर लेहून पत्र आपणाकडे पाठविले आहे ; तर लस्करात रवाना करावे. येथून कागद लस्करपावेतो रवाना करावे, त्यास निभाव होत नाही. यास्तव आपण रवाना करावे. रवाना छ २३ माहे रबिलोवल. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ वर्धमान करावा हे विनंती.

[शिक्का]



¶*Moraji Sindia to Baba Fadnis (Janardanpant) asking for more ammunition.*

No. 58] [11-2-1751 ?

श्री

श्रीमंत राजश्री राऊजी
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक रामाजी सुर्वे हवालदार किले कोरला चरणावरी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना ताा छ २९ रोावल पावेतो स्वामीचे कृपाकटाक्षेंकरून आज्ञाधारकाचे वर्तमान कुशल असे विशेष. किले मजकुरींच्या तोफा दोन, फिरंगीयाने काने फोडून जायां केल्या होत्या ; त्या धड करावयासी दादसेट कारीगर

सुभांहून आणून किले मजकुरीं पाठविला येविसीं पेसजीं सेवेसी लिहिलें होतें. त्यास आज्ञा कीं, तोफांस खर्च लागेल तो लाऊन धड करवणें. त्यावरून हालीं तोफांस धड करावयासी काम लाऊन, तोफा मुसेंत घातल्या आहेत. कारीगर चांगला आहे. तोफा धड होतील. सेवेसी कळावे. वरकड बातमी वर्तमान तरी राजश्री तुळाजी आंगरे यांचे अरमार समुद्रांत फिरतच आहे. स्वामीचे पुण्यप्रतापें आज्ञाधारक आपले जागां बहुत चौकसीनें स्वामी सेवेसी बहुत सावध आहे. किले मजकुरीं लोकांचा भरतिया कमी, त्याहिमध्ये अवघे लोक नामेजाद[१], महिना पंधरा दिवसीं फिरोन दुसरे येतांत; आणि त्यांचे मुबदले किले मजकुरींहून जातात. नामजाद लोक यामुळें किल्याची ममता कोण्ही येकास नाही. नेहमी लोक असिल्याखेरीज जागीयाची उस्तवारी होतें येसें नाही. राजश्री बलकवडे व माणकर याकडील लोक नामजाद आहेत, त्यांखेरीज सेंभर माणूस सुभांहून किले मजकुरीं द्यावें, येसी स्वामीची आज्ञा सुभा असतां, किल्यास नेहमी लोक करून, सुभांहून देत नाही. घोलंदाज व दर्यावर्दी हे चाकरी मात्र किल्यास नामजाद आहेत; यांचे रोजमरे व हिसेब परभारां सुभां करितांत. स्थलोंस्थली स्वामी कैद येक असावी. रेवदंडा किलुयाचे लोक व हिसेब देणे फाजील; राजश्री बहिरोपंत सबनीस सुभां हिसेब लावितात; त्याचप्रमाणे किले मजकुरीं जाबता असावा, याजविसी राजश्री विसाजी कृष्ण सबनीस हे सुभा जाऊन हटकितात; परंतु हा काळपर्यंत किल्याचा कारभार किल्याचे विल्हेस लावावा हे सुभांहून होत नाही. सेवेसी निवेदन व्हावें म्हणोन लिहिले असे; तरी कृपाळु होऊन येविसी सुभांस आज्ञापत्र सादर होऊन किले मजकुराचा कारभार लिहिणे किल्याचे निसबतीस लागे तो अर्थ करावयासी स्वाम समर्थ आहेत. येविसींचीं कलमे लेहून आलाहिदा सेवेसी पाठविली आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Surve as ordered by the Peshwa gets the two guns repaired and communicates to the Peshwa the preparations made for defending the coast against the attacks of Tulaji Angria.*

No. 59] *[9-3-1751 ?*

श्री

शेवेसीं मुकुंद गोपाल साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ २१ रबिलाखर मंदवासरपावेतों स्वामीचे कृपेकरून किले कोरलई येथें सुखरूप असों विशेष. राजश्री बलवंतराव सुभेदार याजसमागमें सडे लोक

---

१ नेमलेले.

पांचसे माणूस देऊन पुढें रवाना केले. बाकी लोक व निशाणे घेऊन मी बरोबर घेऊन नांदगावावर स्वारी केली. तेथें हापशाचा माहाल जाळून घरेहि जालली. लढाई चांगली जाहाली. सात आसामी आपले रिसाल्यपैकीं जखमी गोल्याचे जाहाले. व सुभेदार याजकडीलहि पांच साहा आसामी असे जाहाले. आम्हांस आपले वचन होतें कीं रेवदंड्यास जाऊन सुभेदार याचें पत्र आम्हांस पाठवावें म्हणजे रोजमुरा पाठवीन. त्यास आम्हीं पत्रें पाठविली. आज बावीस दिवस जाहाले, पत्राचा जाबहि नाहीं व रोजमुराहि नाहीं. खायास एक पैसा नाहीं. लोक उपासी मरतात. सुभेदार कर्ज येक पैसा देत नाहीं. आमची कोणाची वोळख नाहीं. आम्हांस आपण राणांत पाठऊन फजित करऊं नये. येथें तरी रोज चाकरी पडती. रात्रंदिवस कंबर बांधून बसावें लागतें. लोकावरी हुकुम चालत नाहीं. त्यांत सुभेदार निघून उभा राहिला, तेव्हां आम्हांस निघून जाणें प्राप्त जाहालें. लोक तरी कोणी निघेनात. तेव्हां लाच्यार लोकांच्या हातापाया पडून घेऊन जाऊन लढाई जाहाली. जखमी जाहाले त्यांची जखम कोणी ल्याहावी आणि त्यास खर्चास कोणी द्यावी ? सुभेदार म्हणतात कीं आम्ही देणार नाहीं. तेव्हां याचा बंदोबस्त जाहाला पाहिजे. जाहाल्यासिवाये दुसरेयाणे कोणी लढाईंत जाणार नाही व छाती चालविणार नाहीं, हें आपल्यास माहीतच आहे. याचा व पोटाचा बंदोबस्त लवकर जाहाला पाहिजे. आतां आमच्यानें धीर निघत नाहीं पत्राचें उत्तर आपण तपसीलवार ल्याहावें. बहुत काय लिहिणें ? सेवेसीं श्रुत होये, हे विज्ञापना. हापशाकडील पांच आसामी धरून आणिले आहेत हे विज्ञापना.

¶*Mukund Gopal to the Peshwa: reports a sharp encounter with the Sidi at Nandgaon near Revdanda and asks money for expenses.*

No. 60] [*28-3-1751*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसीं

विज्ञापना. आज्ञाधारक धोंडजी सिंदे मुकाम मोर्चा किले करनाला चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग दंडवत प्रणम्य विज्ञापना. ता। छ ११ माहे जमादिलावलपर्यंतु मोर्चे मजकुरचें वर्तमान येथास्थित असे विशेष. साहेबाची आज्ञा घेऊन चिखलीचें तलावरून कोकणांत आलों. किले कर्नालेयाचे अनुसंधान लागभाग मनास आणितां उत्तम होतें. इतक्यात अजम नवाब

नासरजंग वारले हें वर्तमान आलें. किलेदारास कळलें, त्यावरून चौकी पाहारे ज्यांकडे होते ते बदलून दुसरे लोक ठेविले त्यामुळें कामाचा बिघड जाला. दुसरें लागे आनंदराव सुरवे यांचे मारूफातीचे किलेयावरील चाकरमाने होते ते बोलिले कीं, पाणियाची तीन टांकीं वरतीं भरलीं आहेत. दीढ महिन्याची बेगमी आहे. त्यांत आम्ही वीष घालितों व किल्याचा * * वरती आहे तो जालितों. त्यावरून च्याळीस रुपयांचे विष सोमल विकत घेऊन दिल्हा. किल्यावरील मुसलमान होता त्याणी विश नेऊन मातबर पाणियांचे टांकें होतें त्यांत घातलें व उंदेरकर शामलाकडील लोक होते त्याचे मुदपाकांत घातलें. विश उंदेरकरास लागोन तीन असामी दोन्हा दिवसांत मेले. दुसरेयासी लागले. वोकाबोक जाली. पाणीयांत घातलें हें चौकसीनें खरें जालें. तेव्हां लागे म्हणो लागले कीं तुम्हीं जमावसुधां किलेयासी वेढा घालणें. दोन्हा दिवसांत वेढा न बसला तर खालील पाणी वर चढवील मग उपाय चालणार नाहीं. तुम्हीं वेढा न घातला तर विषाचा लौकिक जालाच आहे. मुलकास उपसर्ग करील व आमचे जिवाचा घरादारानसीं नाष करील. पाहाते अर्थीं उंदेरकरास विश लागलें, पाणीहि नासलें, तेव्हां वेढा बसल्यानी आठा पंधरा दिवसीं कार्येसिधि होईल ऐसें समजोन बेलापुरास व राजश्री रामाजी माहादेव यासी पत्रें लिहिलीं व आनंदराव यांचे निसबतीनें पनास माणूस व कुलाबकर वरीं रजेस होते त्यापैकीं असाम्या १७ व माणिकगडपैकीं संकराजी बने पाऊणसें माणूस ऐसे माणिकगडाखालीं जमाव जाला. दुसरे दिवशीं बेलापूरकर सवासें माणूस राजश्री विष्णुपंत घेऊन गुलसुब्यास आले. तिसरे दिवशीं साष्टीपैकीं माणूस गंगाजीराव खानविलकर व सुभानजी विश्वासराव व अंबर सांवत वगैरे च्यारसें माणूस आले. जमाव होतांच वेढा जाऊन घातला. त्यावर आमचे हेंत्रे[१] भेदले. माणूस वरती होते त्याणी अग्न लाविली. वरचेवरी अवघे लोक मिळोन विझविली. ठाणेयाहून दोन तोफा व फटकडी व गरनाला आणून लागू केल्या. रोज गोळे जाऊन किल्यात पडतात. मारगिरीमुळें किला जेर जाला आहे, परंतु हुजूरचा हुकूम वेढा घालावयाचा नव्हता, यास्तव सिपाई लोकांस उमेद नाहीं. दुसरा अर्थ दमाजी गायेकवाड यांची फौज सातारेयासी आली. नाना प्रकारच्या बातम्या इकडे आल्या. याचें वर्तमान मोंगलास पनवेलकर मातबर गृहस्तानीं पावतें केलें. त्यामुळें त्याणी धीर धरिला आहे. परंतु स्वामीचें पत्र येथें सरदार आहेत यासी व रामाजी महादेव यासी महिना पंधरा दिवस अधिक उणे वेढा बसऊन मारगिरी करून किला फत्ते होय तें करणें ऐसें पत्र आलें मणजे उमेद धरून कार्यसिधि करितील. श्रीमंत मामा

---

१ वाटाडे.

स्वामींनी पुणेयाहून रामाजीपंतास दोन पत्रें पाठविलीं त्यांत वेढा घातला म्हणोन शब्द लाऊन लिहिलें, यामुळें श्रमी आहेत. सामान सरंजाम तो पाठवितात परंतु स्वामीची आज्ञा नव्हती आणि मामासाहेबाची पत्रें या प्रकारचीं येतात. यास्तव साहेबीं मामासहि पत्र पाठवावें. पुण्याहून से दोनसें माणूस व राऊत दोन च्यारसें वेढेयासी पाठवणें. याचप्रमाणें वसईस व कल्याणास पत्रें पाठवावी. यैसीं पत्रें आल्यानंतर रामाजीपंत खुद येऊन बसोन कार्यसिधि करितील: बसला वेढा उठल्यास तो मुलकास उपसर्ग करील आणि वेढा बसोन कांहीं जालें नाहीं यैसा बदनक्ष होईल व तोहि सेर होईल. साहेबाचे पुण्येकरून काम फत्ते होतें. याद लिहिली आहे त्याप्रमाणें सनदा सत्वर पाठवाव्या. कर्नालकरास कोणाची मदत पोहचते यैसें नाहीं. जंजिरा व उंदेरीहून से दोनसे माणूस आले तर वर चढावयाचा निभाव वेढ्यामुळें होणार नाहीं. दुसरा अर्थ किल्यावर पाणियाचा तोटा, दुसरे माणूस घेतल्यास खर्च वाढेल, याकरितां घेतां न ये. आपले मोर्चे दरवाज्यामधें वानरटोकावर देवीचे देवलापावतों आहेत. किला मारगिरीखालीं जेर आहे. वरचील वर्तमान सविस्तर द्वारकोजी खासबारदार सांगतां श्रुत होईल. देवधर्म श्रीकर्णाई देखील साहेबांस प्रसन्न आहे. वैशाख पौर्णिमे अलिकडे निशाण चढेल यैसे कौल दिल्हे आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Dhondji Sindia besieging fort Karnala informs Bhausaheb of the measures being taken to capture that fort and also the fort of Manikgad.*

No. 61] [*March 1751 ?*

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान
गोसावी यासी

विनंती उपरी. कोरल्याच्या नस्तावर[१] इंगरज आला आहे. गोल्या तीन व [२]कैमोदरी पाल येक, व गलबतें पांच, येकून नव येऊन, नस्तावर नांगरवडा केला आहे. गोसावीयास कलावें म्हणून लिहिलें असे. विदित जाहलें पाहिजे. कृपा लोभ असों दीजे हे विनंती.

(मोर्तब खुद.)

¶*An intimation of the arrival of the English at Korla is given to the Peshwa.*

---

१ बारीवर. २ Commodore.

No. 62] [22-4-1751

श्री

राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी सकळगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो राणा दुर्जनसिंग दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशललेखन करावयासी आज्ञा केली पाहीजे विशेष. श्रीमंत राजश्री नानासाहेब व आपण करनाटक प्रांतीचा बंदोबस्त करुन बारामतीवरी वैशाख शुध ८ लस्करसुधा मुकाम जाला. पुढे सातारियास जाऊन गायेकवाडास सज्या पोंहचाऊन पुणियास येणार म्हणऊन वर्तमान राजश्री परथमजी कुसाडे व राजश्री बाबुराऊ सामराज याणी पत्रे लेहून पाठविली ती चौथे रोजी सांडणींस्वाराबाा आम्हास पावली. उभयेता स्वामी येशस्वी होऊन आले हें वर्तमान ऐकून बहुत संतोश जाला. दर्शनाचा हेत बहुत आहे. आपण पुणियास आलियावर भेटीस येऊन. यानंतर आपण सातारियास गेलियावर मनोदयानरूप गायेकवाडास नशीयेत करून या प्रांतीं सुरत आटाविशीचे बंदोबस्तीस फौज व मातबर सरदार रवाना करीतीलच. त्यांजसमागमे आमची पागा राजश्री परथमजी कुसाडे व राजेश्री बाबूराऊजीस बाा देऊन जो कोण्ही सरदार येईल, त्यास सांगोन यांची त्यांची गाठी घाल्हन रवाना करणार स्वामी समर्थ आहेत. ल्याहावयास कारण ते या प्रसंगात स्वामींनी आम्हास पुढे करून कामकाज सरकार सेवा घेतालियास या प्रांतात लौकिक उतम प्रकारें होईल, म्हणऊन स्मरणार्थ लिाा असे. पूर्वी खानदेशात आमची पागा रवाना केली होती. मागती पुणियास जावयाची आज्ञा केली त्यास आज्ञेप्रमाणे पुणियास गेले. या प्रांती यावयास निरोप राजश्री त्र्यंबकराऊ मामा यांजपांसी मागावयाचा विचार परथमजी कुसाडे यांणी केला तों गायकवाडानें त्या प्रांती धामधूम केलीया संकोच्याने निरोप न मागितला. सांप्रत माहाराजाचीं स्वारी आली. तेव्हां निश्चये जाणितला कीं याजउपरी खामखा आटाविशीचा बंदोबस्त करावयास मातबर सरदार फौज रवाना होईल, त्या विचारावरी विनंती लिाा आसे. यांत आपण श्रीमंत कैलासवासीच्या जागां आम्हास वडील आहेत. आमचा उत्तम प्रकारे लौकिक व्हावा हें आपल्या चितात बहुत दिवस आहे. सांप्रत प्रसंग योजून आला आहे यास्तव स्मरणार्थ विनंती लिाा आसे. विदित जाले पाहिजे. वरकड कितेक वर्तमान सेवेसी जबानी परथमजी व बाबूराऊजी निवेदन करीतील, त्यावरून श्रुत होईल. बहुत काये लिहिणे लोभ आसों दिजे हे विनंती.

¶Rana Durjansingh of Mandvi, a small port on the Tapti, about 40 miles east of Surat, was an ally of Bajirao and continued to be friendly with the Peshwa as against the Gaikwar. When Damaji became hostile, the Peshwa enlisted Durjansingh's help and the Rana writes this letter to assure the Peshwa of his full sympathies.

2775

No. 63] [22-4-1751

श्री

राजश्री नानासाहेब स्वामीचे सेवेसी

ॐ सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीा राणा दुर्जनसिंग दंडवत विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखनं करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. श्रीमंताची स्वारी करनाटक प्रांती गेली होती, त्या प्रातीचा बंदोबस्त करून वैशाख शुध ८ बारामतीवरी येऊन मुकाम जाला. पुढें सातारियास जाऊन गायेकवाडास तंबी पोहचाऊन या प्रांतीचा बंदोबस्त करावा यैसा विचार आहे, म्हणऊन राजश्री परथमजी कुसाडे व राजश्री बाबूराऊजी याणी लिहिले ते पत्र सांडणीस्वाराबा पुणियाहून चौथे रोजीं आम्हास पावलें. खुश खबर श्रीमंत आलियाची ऐकोन चितास बहुतच संतोश जाला. स्वामीच्या चरणाच्या दर्शनाचा हेत फार आहे. स्वारी पुणियास श्रीमंताची आलियावरी सेवेसी येऊन. वरकड कितेक • वर्तमान श्रीमंत राजश्री भाऊसाहेबास लिा आहे, त्याजवरून विदित होईल. बहुत काये लिहिणे? लोभ आसों दिजे हे विनंती.

¶*Rana Durjansingh of Mandvi writes to the Peshwa, congratulating him on his victory over the Gaikwad and offering his friendship.*

No. 64] [Before December 1749

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. तागायत छ २६ रजब उंदेरकराचा सारा मजकूर मुख्ये पत्रीं लिहिला आहे त्यावरून विदित होईल; दुसरा मजकूर रेवास व माहाराजगड हे दोन जागे नामर्द आहेत, ते जागा कांहीं आपले लोक व मातबर स्वारी तुमची असिल्यास जाऊन जागे जागे काईम करावे अगर ढासलणें तरी ढासलावें. इकडे हे केल्यास मानाजी धावोन येईल. आम्ही सिताबी करून थलचे कोटातून बाहेर पडोन मोर्चे मारितों हेहि तजवीज आहे. यैशास हा विचार आमचे कामाचा दिसतो कीं, रेवास जागा उरणासमीप आहे. थलचा कोट शामलानी घेतला. रेवासहि घेतली. तेव्हां हबसी बलावला. कार्याचा नाहीं या करितां त्यापासून रेवास बलजोरीनें घेतली हाहि लौकीक पदार्थ करून हुजूर राजश्री स्वामीकडे स्वामीस जाबसाल करावयासी कार्यास येईल. येथाज्ञाने सुचला विचार लिहिला

असे व त्याचें मानस याप्रकारचें आहे. स्वामीस विदित व्हावें. यांत जे गोष्टीनें शामलाची मदत केलीसी होऊन दोन्ही भांडतां हलाख होऊन कांहीं कार्यें आपलें साधे तो अर्थ चित्तांत आणोन आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer advises the Peshwa to seize Rewas and Maharajgad, so as to humble the Sidi and oblige Manaji Angria.*

No. 65] [*19-7-1751 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ६ रमजानपावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकांचे व ये प्रांतीचे वर्तमान येथास्थित असे विशष. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा कीं, राजश्री तुळाजी आंगरे याणी आपले साह्यानिमित्य सिदी मसुदखान व वलंदेज यास सुरतेस भला माणोस पाठऊन तिकडे संदर्भ लाविला आहे. त्यास येविसी सिदी मसुदखान यांस व वलंदेजास लेहून त्याचे साह्य न करित ते करणे म्हणून आज्ञा. यैसियासी आज्ञेप्रमाणे सुरतेस शामलास व वलंदेजास येथोन पत्रें लिहिली आहेत; व वलंदेजांचा वकील वखारीनिमित्यें सा महिने येथे येऊन बसला आहे, त्याचे मनोधारणा करून, त्यास सुरतेस कपितानाकडे पाठऊन आंगरे मारनिले याची कुमक न करित तें करणे, म्हणोन आज्ञा. यैसियासी वलंदेजांचा वकील येथे होता, तो स्वामीचे पत्रापूर्वीच दर्शनानिमित्य सेवेसी पुणियांस गेला आहे. त्याचेहि चितांमधे उमेद कीं, कांही सेवा घडावी. हाच भाव धरून सेवेसी आला आहे, स्वामीनेहि त्याचा बहुमान रक्षून मनोधारण करावें. सारांष टोपीकर लोकांचा बहुमान घडोन आल्यास, चाकरीस चुकणार नाहीं. मारनिले समागमे त्यांचे मनोदयाचा अर्थ सेवेसी लिहिलाच आहे, त्यावरून विदित होईल. आपाजी माहादेव सुरतेस गेले होते त्याजवळ शामलाने व वलंदेजाने काये भाशण केले, त्याची बातमी आणवणे म्हणोन आज्ञा. त्यास आपले आप्तविसी येथे कितेक आहेत त्यांस लेहून तेहि बातमी आणवितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao informs the Peshwa that attempts are being made by him to persuade the Dutch and the Sidi at Surat not to render any help to Tulaji Angria against the Peshwa.*

No. 66] [19-9-1751

श्री

राजश्री सदासिव पंडित दाजी
गोसावी यासी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री मानाजी आंगरे वजारतमाब रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन केले पाहिजे विशेष. श्रीमंत मा(तु)श्री साहेबांकडून आज्ञापत्रे हुजरे येऊन दारूगोले रवाना करावयाविशी फर्मा केली आहे. हेविशी सविस्तर राजश्री नाना दाजीस लिहिले असे त्यावरून आपणास कलेल. खावंदाची आज्ञा सर्वप्रकारे मान्य हे प्रमाणच असे. तथाप समयोचित खावंद लोकी काये कैसा विचार चितात आणिला असे तो समर्थ खावंद आहेत, सुखे आणोत. आम्हास राजश्री नाना दाजीच्या व आपल्या विचाराखेरीज दुसरा विचार नाहीच. यासमई खावंदाचे सर्व प्रकारे स्वहित आपण करीत असता चितात येत नसल तैसे आजी समई दारू गोले आम्ही न पाठविलेयाने असंतोष होऊन इतराजीस कारण केलियास सांभालोन आपणासच घ्यावे लागेल. हेविशी विस्तारे कोठपर्यंत ल्याहावे ? उतर पाठविले पाहिजे. सदरहू जिनसाची रवानगी तो करीत नाहीच. रा छ ९ माहे जिलकाद, बहुत काये लिहिणे ? कृपा आसो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद

¶*Manaji Angria to Sadashivrao, mentioning that he was not prepared to send any ammunition to Satara as ordered by Tarabai, but if the latter felt offended, the writer was not responsible.*

No. 67] [4-1-1748

छ २४ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसीं

विज्ञापना. ता छ १४ मोहरम रा मानाजी आंगरे याचें कजियामुळे स्वारी-सिकारीस लोक पाहिजेत. सागरगडकरी कुलाबकर लोक रा आपाजी हरि

देखील हुजूर गेले आहेत, व त्याचे लोकहि जागाजागा हुजरून ठेविले आहेत. तैसेच खासबारदाराचे सरदार व कांहीं खासबारदार हुजूर हिसेबास गेले, ते त्यास निकाल होऊन, निरोप न जाला. येथें फिरंगियाचे आवाईचे वर्तमान सत्यमिथ्य न कळें. मानाजी आंगरे याचा तरी कलह वाढलाच आहे; यास्तव विनंतीपत्र लिा आहे; तरी आपाजी हरि यांस लोकसहित व खासबारदारास निरोप होऊन सत्वर येत तें करणार स्वामं धणी समर्थ आहेत. हशमी लोकाचा भरणा चौकीबंदीस पोख्ता पाहिजे, यास्तव विनंती लिहिली आहे. खासबारदाराचे हिसेबाचा निकाल होऊन, लौकरी येत ते करणार धणी आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa is informed of differences having arisen with Manaji Angria and is requested to send help in the event of a possible attack from him.*

No. 68] *[4-1-1748*

छ २४ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना ताा छ १४ मोहरम राा मानाजी आंगरे याजकडील सविस्तर अर्थ मुख्य पत्रीं व दोन पुरवण्यापत्री लिहिला आहे, त्याजवरून अवगत होईल. त्यास इतका विचार घडत आला; परंतु अगोधर हुजूर लिहिले नाहीं यैसी आज्ञा होईल; तरी इकेडून दुराग्रह करावा यैसा विचार नव्हताच. अविरभाव मात्र लौकिक पदार्थें दर्शऊन गलबतें सोंडवावीं यैसेच होते; परंतु घडत घडत येऊ लागलें. इतके जाल्यावर तऱ्ही विचारावर येतील, मग साद्यंत लेहून पाठऊ यैसा विचार करून, जाले हकीकतीची पत्रे लिहून ठेविली होतीं, तो दिवसेंदिवस कलह वाढत चालिला, त्यास आजपावेतों जाली हकीकत पहिली लिहिली पत्रें तीच सेवेसी पाठविली आहेंत. रेवासच्या[१] माहागिऱ्याहिं सोला सतरापर्यंत आणिल्या असेंत. रेवदंडेयास येथील लोक आरमार आदिकरून भरणा बराच जाला आहें. आणखी लोक पाठवावयासी राजश्री शंकराजीपंतास लिा आहे. येथून राजश्री गंगाजीराव खानविलकर व बाबाजीराव राणे यांस पाठवितों. इतकाहि विचार घडत आला; परंतु केवल दुराग्रह केला यैसे जाले नाहीच. पुन्हाहि इंग्रेज मध्येस्त होऊन, मानाजी आंगरे सुरलीतावरी येऊन, गलबते

१ पश्चिम किनाऱ्यावरील एक बंदर. मुंबईपासोन सुमारें १५ मैलावर दक्षिणेस.

सोडली तरी उतमच. इंग्रेजास विचारे करून, सांगोनहि पाठविले आहे. घडोन आल्यास दुराग्रह करीत नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The state of affairs in the Konkan, and especially with regard to the relations between the English and Manaji Angria, is reported to the Peshwa.*

No. 69] [*5-12-1751 ?*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक रामजी भगवंत मुा खादार भादवे ताा निजामपूर दोनी कर जोडून चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायेत छ २७ मोहरमपावेतों स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे लस्करचे वर्तमान येथास्तित असे. स्वामीची आज्ञा घेऊन निघालो. मौजे मजकुरी मुकाम करून आहों. दिवाण चाकरी येऊन पडावी, आम्ही सेवक लोकानी चाकरी करून पायांजवळ ऊर्जित करून घ्यावे, प्रस्तुत राजश्री नारोपंत मजमदार हे सांगतील त्याजप्रमाणे वर्तणूक करावी यैसी आज्ञा होती. रायेगड माहाड या प्रांती मारनिले लस्कर व जमाव घेऊन जाऊन प्राा मजकूरची रयेत गेली आहे, त्याचा वसूल घ्यावा, तो श्रीमंत राजश्री नाना साहेबाचे पत्र सादर जाले. माहाड प्रांतें उपसर्ग न करावा. त्याची मदत करीत जावे. तो माहाडकरी व येसवंतगडकरी व गोरेगावचे हवालदाराचे कागद रातोरात आले. राजश्री तुलाजी आंगरे जमावसुधा बाणकोटी आले. त्याचा मनसबा येसवंतगडी लगट करून घ्यावा. गलबते खाडीत आली. उपरालियासी प्रहरामधे जाऊन बदला घेतला. पैलतिरास तुलाजी आंगरे याचा जमाव होता; त्यासी वर्तमान कलता निघोन गेले. माहाडकरी आमची कुमक करावी म्हणऊन लेहून पाठवितात. सुभेकरी लेहून पाठवितात त्याजकडील कुमक न करावी. तिकडे दगा जाहाला मणजे याना बरे. हुजूरची आज्ञा त्याची मदत करावी. दोंनीकरून याज प्रकारे जाहाले. कोणे प्रकारे वर्तणूक करावी याची आज्ञा करणार खावंद आहेत. राजश्री मानाजी आंगरे यानी थलचा कोट, रेवसाचा कोट मोडून तेथील भांडी देखील कुलाबियासी आणिली. शामल स्वस्थली आहे. सेवेसी कलावे या कारणास्तव लेहून पाठविले असे. पारके सिपाई दस्त करून आसामी ८ हरिचंद्राकडील प्रथम सांगत होते, माहाडाकडील सांगतात, सांवताकडील सांगतात. याजकरिता हातरे

घेऊन ठेविली असत. आज्ञा होऊन येईल त्याजप्रा वर्तणूक करून. राजश्री खंडोजी मानकर याजकडे आज्ञा केली होती. दास्ताने कोणे ठिकाणी, कोणी काये आहेत, व गला किती आहे, भात विकले किती, ते त्यानी लेहून पाठविले असेल. से पनास राऊत पाठवणार खावंद आहेत. स्वामीच्या पायाजवल बालाजी अनंत कारकून बाा देऊन पाठविले. सालमजकुरी आसामी करार केली. बारा रुपये दीडमाही रोजमरा पावतो. याच्या पदरी वीस माणूस कुटुंबी आहे. लोकाचे कर्जदार आहेत. याचा योगक्षेम चाले तो अर्थ करणार खावंद आहेत. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶Ramaji Bhagvant communicates to Sadashivrao Bhau news from the Konkan, especially about Manaji and Tulaji Angria and the Sidi. "Tulaji Angria," he further writes, "came with a view to storm Bankot, but when he found it reinforced by the writer, he quietly retired."

No. 70] *[5-12-1751*

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक रामाजी भगवंत मुाा खादार भादवे ताा निजामपुर दोनी कर जोडून चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायेत छ २७ मोहरमपावेतो स्वामीच्या कृपाआवलोकनेकरून सेवकाचे व लस्करचे वर्तमान येथास्थित असे. श्रीमंत भाऊसाहेबी तल कोकणांत रवानगी केली. खादर भादवे ये जागा आहो. दिवाण चाकरी येऊन पडावी * * लबी सेवक लोकानी चाकरी करून पाया * * उर्जित करून घ्यावे. प्रस्तुत राजश्री नारोपंत मजमदार यानी रायेगड महाडाकडे प्राा मजकूरची रयेत गेली आहे, त्याचा वसूल घ्यावा, तों स्वामीचे पत्र सादर जाहाले, माहाड प्रांतें उपसर्ग न करावा. आज्ञा मस्तकी वंदून मौजे मजकुरी मुकाम करून राहिलो; तो माहाडकरी व येसवंतगडकरी याचे कागद आले की राजश्री तुलाजी आंगरे जमावसुधा बाणकोटी आले; त्याजकडील मनसबा येसवंतगडी लगट करून घ्यावा यैसी पत्रे रातोरात आली. उपरालियासी प्रहरामधें जाऊन बदला घेतला. पैलतीरास तुलाजी आंगरे याचा जमाव होता, त्यास हे वर्तमान कलतां निघोन गेले. माहाडकरी आमची कुमक करावी म्हणऊन लेहून पाठवितात. त्याची कुमक करावी की न करावी याची आज्ञा करणार खावंद आहेत. दुसर से पनास

राऊत पाठवणार धनी आहेत. राजश्री मानाजी आंगरे यानी थला जवलील कोट खुबलेंडा[१] नजीक उंदेरी व रेवसाचा कोट कोसळून भांडी देखील काढून कुलाबियासी नेली. शामल आपले स्वस्थलास आहे. सेवेसी कलावे या कारणास्तव लेहून पाठविले असे. पारके सिपाई आसामी सुमारे ८ आट आडलेले, दस्त करून आणिले; काही हरिचंद्राकडील नाव सांगत होते, काही माहाराजाकडील सांगत, सावताच्या वाडीकडील नांव सांगत, त्याजवरून त्याची हातेरें घेऊन ठेविली. आज्ञा होऊन येईल त्याजप्रा वर्तणूक करून. राजश्री खंडोजी मानकर याजकडे आज्ञा केली होती. गला दास्तानी कोणे ठिकाणी काये आहे, भात विकिले किती लेहून पाठवणे; त्याजवरून त्यानी लेहून पाठविले असेल. सुभेकरी म्हणतात माहाडाकडील कुमक न करावी, लेहून पाठवितात याची काये आज्ञा करणार खावंद आहेत. बालाजी अनंत कारकून स्वामीच्या पायांजवल च्यार पांच वर्षे आहेत. साल मजकुरी आसामी करार करून दीडमाही बारा रुपये रोजमरा केला आहे. याच्या कुटंबी माणूस वीस आहे. कर्जदार जाहाले आहेत, याचा योगक्षेम चाले तो अर्थ करणार खावंद आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Bhagwant in a letter to the Peshwa reports the activities of Manaji Angria and of the Sidi and desires to know from the Peshwa whether he should render help to the residents of Mahad against Tulaji Angria.*

No. 71] *[8-12-1751 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामींचे सेवेसी

आज्ञाधारक मोरारजी शिंदे नामजाद जंजिरे रेवदंडा चेरणावरी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना. तागाईत छ ३० माहे मोहरम पावेतों स्वामींचे कृपाअवलोकनेंकरून जंजिरे मजकूरचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असें विशेष. आज्ञापत्र छ ७ मोहरमचे रवाना जाहलें ते छ २९ माहे मिनहूस सादर जाहाले; तेथें आज्ञा यैसीजे मोगलाचा व आपला बिघाड जाहाला आहे. त्यास तुम्हास कोकणांत जावयासी आज्ञा केली आहे. तर लौकर जाणे, शत्रू लबाडी करावयासी चुकणार नाही, याकरितां ठिकाणीं जाऊन चौकीपाहारा याची रात्रदिवस अति सावध राहून जागांची व किले कोरला येथील खबरदारी करणे म्हणोन आज्ञा. आज्ञा ते सिरसा स्वामीची आज्ञा घेऊन रिघालों ते छ २० मोहरमी जंजिरे

---

१ किल्ल्यावरील एक बुरूज.

मजकुरी दाखल जाहालों. जंजिरे मजकुरचा व किले कोरला येथील बंदोबस्त आज्ञेप्रमाणे केला, तेच वर्त्ती सेवेसी विनंतीपत्र पाठविले आहे. त्यावरून सेवेसी श्रुत जाहालें असेल. प्रस्तुत येथील बातमी तर तुळाजी आंगरे सरखेल हे प्रस्तुत अरमारसुधां आपले स्वस्थलास आहेत. तैसेच राजश्री मानाजी आंगरे वजारतमाब हेहि आपले स्थली आहेत. शामलहि आपलें जागा आहे. पाव हशाम ठेवितों. बाहेतकारी तों दिसत नाहीं; परंतु अंतरयामी वहिलें[1] पडिला तर लवाडी करावी यैसे शत्रूचे चितांत आहे; त्याचेहि बातमीस व

(पत्र अपुरें.)

¶*An incomplete letter, only the first sheet being available, from Moraji Sindia to the Peshwa, dilating upon the calm prevailing at Revdanda and other places.*

No. 72] *[13-10-1755*

छ १० मोहरम

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ताा छ ६ मोहरम आंगरे याणी वलंदेजास देवगड द्यावयाचा करार करून कुमकेस आणावा. आल्यावरी इकडील शह निर्वेध जाल्यानंतर किल्ला देऊं नये. प्रस्तुत कार्य होणे यास्तव ममतायुक्त लेहून आपाजी माहादेव याजकरवी ठराव करविला आ(हे). तैसाच सिदी मुसूदखान याणे कुमक करावयाचे मान्य केलें. सुरतेहून जंजिरा लिहिलें येतें. तेथून विजयेदुर्गी पत्रे जातात. प्रस्तुत येक जोडी कागद घेऊन राजपुरीस पाईमार्गें गेली. शोधास माणसे पाठविली असेत. सांपडले तरी पुरा दस्तऐवज सापडेल. आपाजी माहादेव आजपावेतो सुरतेत राहून वलंदेज शामलाचा घरोबा जोडून कुमकेस घेऊन येणार. फिरंगियाकडेहि आंगरे याचे सूत्र आहे. च्यार लक्ष रुा फिरंगी मागतो; पैकी तूर्त लक्ष रुा देणार, हाली दाहा हजार रुा दिल्हे. आपले नावाचा लौकिक न होतां, इस्मल नाइकाबराबर सर्व साहित्य देऊन पाठवणार. फिरंगियाणी भरवसापूर्वक सागोन पाठविले. कागदपत्र परस्पर खेळतात. वलंदेज फिरंगी शामल मदतीस येतात, तेव्हा चिंता काये? यैसा भरवसा मानून

---

[1] वेळ, संधि सापडली तर.

धमक धरून आहेत. तिथे मदतीस येतील तेव्हा तह करणें, स्थले देणें, गरज काये ऐसे असोन मदतीस न येत, आपली कुमक कोण्हीहि न करी ऐसे जाल्यास स्थलें रक्षून राहावें. देवगडीं बाबूराव साटम यास पाठविले. खारेपाटणास रुद्राजी धुलप पांचसातसें माणसानी आहे. रत्नागिरीस धुलपाचा भाऊ येणार. जयेगडीं शंकराजी विस्वासराव पाठविले. त्याणी गोवलकोट अंजनवेलीचा उपराला राखावा. अंजनवेलीस मोत्याजीराव विचारे आहेत. गोवलकोटास राघो बस्वंत याप्रमाणें बंदोबस्ताची नेमणूक खुद आपण विजयेदुर्गात राहून अरमार बंदरांत राखून ठेविले आहे. जुज पडिले तरी अरमारानी खाडीचें तोंडास घ्यावें, याप्रमाणें विचारणा करून, कागदपत्री लिहिण्यांत आव मारावें मरावे म्हणोन धमक धरून, पत्रें जागा जागा पाठऊन, जागे हुशार खबरदार केले म्हणोन भरवसा धरून आहेत ; परंतु लोकांचा भरणा जेथील तेथें किले कोटास गुतला आहेत. लोक त्यात फूटच आहे. इकडून नेट झाल्यास टिकाव धरीत ऐसा भरणा नाही. दाहा पांच सरदार धुलप आदिकरून आहेत. तें मात्र आव धरून, जीव भरून, गोष्टी सागतात; परंतु समई लोकांचा भरवसा नाही. ऐसे त्यांचे त्यास उमजलेंच आहे. आज या हंगामी नेट जाल्यास, स्वामीचे पुण्यप्रतापें दिरंग न लागतां, कार्यसिद्धि होईल. अरमार बंदरात खाडीचे तोंडास ठेविले आहे; परतु त्यांत कसबी अरमारी माणूस नाही. निवड अरमाराचे माणूस जंजीरकर ते लोक स्वामीचे पदरी पडले. आतां नाव मात्र अरमार आहे ऐसे या ग्रहस्तानी सांगितले. आम्हास बातमी आहे, याच प्रमाणे यांचे बोलण्यावरून निशा जाहाला. याणी इकडील ममता धरून त्याजकडील अंतस्ताचें वर्तमान सागितले त्याजवरून सेवेसी निवेदन व्हावे यास्तव लिहिले आहे. चोहीकडे[1] तान बसल्यास हवचूक (?) होईल. त्यासी प्रस्तुत वलवल करिता रुद्राजी धुलप करितात. त्यासी राऊत गेल्यानंतर खारेपाटण साध्य जाहल्यास मुलखी बादेज जाहल्यानें, साहित्य सरंजाम होणार नाही. येथील तेथे भरणा गुंतोन उपराला होणार नाही. हाली मुलुखात भावनगड मध्यावरी होता, तीहि जागा लुटली. गोवलकोटाजवलहि लोक पाा; यावरून हतास हात मिलत जाईल, यास्तव खारेपाटणचा बंदोबस्त होऊन, दुराख शह बसला पाहिजे. त्यासी राउताविणा मजबुती होत नाही; आणि आंगेजोचा[2] माणूस कालजी धरून, साहेबकाम करावे यैसा रवाना केल्यास, उतम आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

Ramaji Mahadev reports to the Peshwa Tulaji Angria's preparations to defend his position to the last. The postings of the several officers at various centres on the coast are also reported to him.

---

१ येथून अक्षर रामाजी महादेवाचें. २ अंगेज = कामाचा स्वीकार, हिंमत.

No. 73] [December 1748 ?

श्री

सेवेशी विनंती. अरमार गुराब व गलबतें राजश्री मानाजी आंगरे यांणी उरणची सात गलबतें व साष्टीचे कोल्याची सिबाडी तीन येकून दाह धरून नेऊन, खलासी खांदेरीवर बंदखानी घातले, याजकारितां राजश्री रामाजी माहादेव व आम्ही घोड-बंदरी येकत्र होऊन विचार केला कीं, येक मिसल अरमारी दाहा गलबतें, व दाहा माहागिरायावर लोक घालून उरण खाडीत पा। आहेत. कुलाबकरांची गलबतें सापडतील तीं धरून आणावीं, व दुसरी मिसल यांचे उपरालियास अंगारकास वोढून इरेस घालून बाहेर खांदेरीबराबर वोढून घ्यावें; आणि गलबतांत बसोन आलाच तर लढाई द्यावी या विचारें करून, पांच गुराब व सोला गलबतें कुलाबियाचे बारियावर पाठविलीं आहेत, त्याचा मोबदला करावा लागतो. सारांश फिरंगियाची खबर राजश्री बाजीराव बेलोसे यांस कलावी म्हणोन आज माहगिरी पाठविली. आरमार वसईचे बारियावर माघ शुध पंचमीपावत येथेच आरमार हाताखालीं ठेवितों. आरमारावर पैदास्त होईल न होईल हा भरवसा नाही. पैका लागेल तो स्वाम बेगमी करितील हे जाणोन फिरंगी येतो याजकरितां आरमार हाताजवल ठेविलें. फिरंगी आलाच तरी आरमार आपले कबजांत ठेऊन, फिरंगियाचे बातमीस बाहेर वसई अर्नाला वेसावें याचे बारियावरी फिरतें आरमार तूर्त ठेवितो व वसईचे किल्यांत आपण खुद व खानविलकर व हर सावंत व मोकासी नवे हुजूरून आले आहेत ते देखील राहतो. फट सावंत आपले जवल ठेऊन हर सावत अर्नालियास पाठवितो. वसई अर्नालियाची मजबुदी करितों. जासूद च्यार जोड्या नेहमी दोन तीन महिने पाठवाव्या. बातमीचे कागदपत्र सेवेसी लवकर पोहचले पाहिजेत, याजकरिता पाठविल्या पाहिजेत; व भास्करगडी पाऊणसें माणूस हुजरून आले आहेत ते व तुरंगेस पंचवीस माणूस हुजरून आले आहेत. पत्र पाठऊन आणविले आहेत; व किले माहुली पो। पनास माणूस आंणविले आहे. सेवेशी विदित होये हे विज्ञापना.

¶The writer along with Ramaji Mahadeo arranges to send men-of-war against Manaji Angria who had captured some ten vessels and imprisoned the crews. The naval dispositions on the coast to check the movements of the Portuguese are further detailed.

No. 74] [December 1751

श्री

सेवेसी विनंती राजश्री बापूजी बाजीराव छ १२ सफरीं दों प्रहरा पुण्यास आले. तेच दिवसी म्हालोजी मुठे व कृष्णाजी रघुनाथ हवालदार पेण पंचमाहाल यांची

पत्रे आली. त्यात वर्तमान त्याणी मानाजी आंगरे पेणेस आले. रयतेस मनमानेसारखा उपद्रव आरंभिला. गाव काही काही धास्तीने व उपद्रवाने पलाले. पुढे कल करावी हाहि रोख लोकांच्या भाषणांत दिसतो. राजश्री राम * *
माहादेव व आपण गाठ घालितो म्हणून म्हालोजी मुठे याच्या पत्रांत तपसिले मजकूर आहे, तें व हवालदाराचे पत्र तपसिलें वर्तमान कलावे याकरितां सेवेसी पाठविली आहेत; त्याजवरून सविस्तर विदित होईल. राजश्री बापू येथे आल्यावर हे वर्तमान कलले. यासाठी कूच करून छ १३ रोजी गेले. घाटमाथ्यापावेतो जातील, तेथे मुकाम करून राहातील. स्वामीची आज्ञा घाट उतरावयाची आली तर घाट उतरतील. हे विज्ञापना.

¶The writer reports to the Peshwa the atrocities perpetrated by Manaji Angria in Pen and Panchmahal and further states that Bapuji Bajirao is awaiting an order from the Peshwa to march against the Angrias.

No. 75] *[1751 ?*

आज्ञा. त्यास वसईची इमारत सुरंगानीं उडाली. त्याचे इमारतीस काम लावावे व लोक नेमून ठेऊन मजबुदी करावी तो सेवकाचे शरीरी अनारोग्य प्राप्त जाहाले. वेथा बहुतच जाहाली होती परंतु महाराजाचे कृपाकटाक्षेकडून वेथेस उतार पडला. प्रस्तुत कांहीं आरोग्य आहे. अत:पर या जागियाची मजबुदी बेहबुदी करणे ते करून महाराजाचे आज्ञेप्रमाणें अविलंबेच वरघांटे येतों.

¶The writer of this fragmentary letter promises to ascend the ghats after having arranged for the repairs of a building at Bassein, blown up by mines.

No. 76] *[1751 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. वसईहून सरकारचें अरमार समुद्रामध्यें चांच्यावर गेलें होतें. यास अरमारासी व त्यासी युद्ध होऊन सरकारचे लोक जखमी जाले म्हणून आर्जीच वर्तमान वसईहून केळवियास आलें तें सेवेसी लिहिलें आहे. याजउपर सविस्तर वर्तमान आलियावर मागाहून लेहून पाठवितों हें विज्ञापना.

¶A news-letter reporting a naval encounter between the Peshwa's fleet and the pirates.

No. 77] [1751 ?

श्री

राजश्री त्रिंबक हरी यास पत्र

विशेष राजश्री जयेराम सांवंत व रा। रामचंद्र सांवत भोसुलें यांचा आमचा श्नेह विशेषात्कारें चालतो. त्यांचें साहित्य सर्व प्रकारें करावें हे आमास परम आवशक, यैसे असतां तुम्हीं त्यासीं उगाच कलह आरंभिला. गंधर्वगड व डुकरवाडी हें दोनीं ठाणीं घेतली आणि हेरे चांदगडेसी सतत लाविली आहे म्हणून विदित जाहालें; तरी हे गोष्ट कार्याची नाहीं. सावताचें साहित्य करून, त्यांच्या शत्रूचे पारपत्य करावे हेच गोष्टींचें अगत्य आहे; तरी तुम्हीहि आमचे पदरीचेंच आहां. त्यांची स्थले घेतली आहेत तीं सोडून देणे. त्यासी कज्या येकंदर न करणें; व अंगारकाकडीलहि कांही साहित्य फौजेचें तुम्ही करितां म्हणून परस्पर विदित जाहालें, हे गोष्ट उतम नाहीं. अंगारकास बल पडे आणि सावतासी उपसर्ग होये तो अर्थ येकंदर न करणें; आणिखी कोणी ते प्रांतीचे लोक तिकडे जावयाचा मनसबा योजितील त्यास ताकीद करून आंगरेकडे न जात ते करणे. मुख्य गोष्ट सांवतांचे अगत्य आमास आहे. त्यांची स्थलें त्यास देउन जे गोष्ट त्यास बरी ते करणें. त्यासी कजिया सहसा न करणें. बहुत काये लिहिणें ?

¶The Peshwa orders Trimbak Hari to desist from raids on the territory of Jayaram and Ramchandra Savant Bhonsle and from rendering any help to Tulaji Angria against them.

No. 78] [9-1-1752 ?

श्री

सेवेसी विज्ञापना. विठल विश्राम तागाईत छ २ रबिलावल पावेतों स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असें. काल जासूदजोडीबरोबर पत्रें पाठविलीं तीं सेवेसी श्रुत जाहालींच असतील. आज वाडीहून पत्रें आलीं तीं बाजिनस सेवेसीं पाठविलीं आहेत. फिरंगी व अंगरा व हबसी येकत्र होऊन भगवंतगडास[१] येलगार केला, त्यास मारून काडिलें. स्वामीचें पुण्येंकरून येश आलें. मागुतीं तयार होऊन येलगार[२] करणार. त्यास स्वामींनीं फौजा रवाना केल्या त्या आजवेर न पावल्या. दुसरें राजश्री कृष्णाजी माहादेव हे वरचेंवर स्वामीस सांवतांकडील फिर्याद लिहितात; परंतु त्याची कुमक करून सरकारकामास

---

१ तालुके मालवण. २ हल्ला.

हाजीर न होईत. आण तूर्त तोडीं पडतां सावंत पडले आहेत, याची तरतूद करणें ती स्वामींनीं सत्वर करावी. नाहीतर त्रिवर्ग येक होऊन खामखां भगवंतगड घेतात. फुढां गनीम सेर होतो, याजकरिता सेवेसी विनंती लिहिली आहे. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

¶*Vithal Vishram writes from Savantwadi about an attack on Bhagavantgad by the combined forces of the Sidi, the Angrias and the Portuguese and requests the Peshwa for help against these foes in order to save the fort from capture.*

No. 79] [*28-2-1752 ?*

छ २७ रबिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २३ रबिलाकरपावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री मानाजी आंगरे वजारतमाब याणी पौषी पूर्णिमेस बंदर दीनचा उरूस भरतो त्यापासून हा कालवरी खासा अरमारावर चढोन उरण रेवास येथील खाडींत सावकारी गलबतें रहदारीचीं येतात त्याचा हासील सुदामदप्रमाणें उरणास व रेवसास त्याकडील चुकोन सावकार रहदारीनी जातात त्यांची गलबतें धरून नेऊन छेडाछेड करून सोडिलीं. उरणाच्या चौक्यांवर बरखंदाजी व तोफा सोडिल्या. या प्रकारें पूर्वछंद निर्माण जाहालें. भाशणाचा अर्थ काय ल्याहावा ? त्याचे वर्तणुकेप्रमाणें पहिल्यापासून येथून प्रतिकार होतो. तेव्हां स्वछेंदास अंतर पडतें. सांप्रत त्यांची वर्तणूक फार फार विपरित जाहाली आहे, त्याचें पारपत्य स्वामीचे पुण्येकरून घडावयाचे अशक्य आहे सारखें नाहीं. वर्तमान सेवेसी निवेदन व्हावें यास्तव लिहिलें असे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo complains to Vishvasrao Ballal about the aggressive attitude of Manaji Angria shown by capturing ships and exacting ransom from them.*

No. 80] [25-5-1750

छ ६ रजब

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी महादेव चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २९ जमादिलाखरपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकरून येथील वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ २४ मिनहूचे सादर ते छ २८ मिनहूस सेवकास पावले. तेथें आज्ञा कीं, थलचा कोट उंदेरकरानीं घेतला तेथील कित्तेक युक्तीचा अन्वये स्वामींनी आज्ञा केली. त्यास धणी कोट घेतल्यावरी बहुमानाचे पत्र आम्हास पाठविले होते त्याचे उत्तरहि समाधानयुक्तच लेहून पाठविले, व तुमचे ठाई द्वैत नाहीं, खातरजमा राखून हरएक वर्तमान लेहून पाठवीत जा, उपरालाहि होईल असे कितेक प्रकारे समाधानाच्या गोष्टी सांगोन पाठविल्या आहेत. त्याचे उत्तर आले नाहीं. येईल व येचविषीं कांहीं इंग्रजासहि सवज्ञार्थ सांगोन पाठविले आहे. पुन्हा स्वामीचे आज्ञेप्रमाणे उंदेर-करास सांगोन पाठवितो. येईल वर्तमान ते वरचेवरी लेहून पाठवून. बातमीचे वर्तमान तरी उंदेरकर तडके देतच आहे. राजश्री मानाजी आंगरे यास गोलीची जखम स्वल्प आहे, म्हणोन खबर आली आहे. लोक बेदिल. पैसा पावत नाहीं. वर्तमान या प्रकारचे आहे. मागाहून सविस्तर लेहून पाठवितो. सेवेसी श्रुत होये. त्याजकडील सूत्र उत्तम प्रकारे राखिले असे हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo communicates to the Peshwa the news of the capture of the fort of Thal by troops from Underi and of Manaji Angria's wound.*

No. 81] [Sept.-October 1752

श्री

राजश्री बालाजीपंत प्रधान

गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री जयराम सावंत भोसले सरदेसाई प्रा कुडाल व माहालानिहाय दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपणाकडून रा मलार राम आले; याणी आज्ञेप्रमाणें सविस्तर सांगितलें व पत्री लिहीलेवरून सकलार्थ कलों आला. ज्या दौलतीमधे दुई जाहाली ते दौलत

येथास्थित राहाणे मुसकील. घरकलहाने बहुत थोरथोर बुडाले. तुमच्या वडिलांचा व आमचा श्नेह चालत आला. तुमची दौलत येथास्थित राहावी हे आम्हास अत्यावषक. यैसेयास तुम्ही उभयेता आमचे सांगितलेप्रमाणें यैकत असला तर दुढोतर निछय करून आपले मातबर माणूस पाठऊन देणे. येथोन निवाडा होई तंव मुलुकामधें उभयपक्षीं उपद्रव आगर आपआपणामधें छेडाछेड करूं नये. याविसीं त्यांसहि लिहिले आहे. कालहरणाच्या गोस्टी चितांत आणून आम्ही समीप आलों म्हणोन धातुपोषणार्थ आमचा कलह तोडावा म्हणून लिहिले असेल तर मातबरहि माणूस पाठवावयाचें काम नाहीं, म्हणोन याजविसीचे कितेक बुधीपुरस्कर लिहिले. यैसेयास आम्ही लिहितों हें काही नूतनच धातुपोषणार्थ लिहू हे गोस्ट होणेच नाहीं. परस्परहि विदित होतच असेल. आजपासोन आपण सांगितली वचने म्हणोन आम्हास सांगतच आले त्या त्या प्रमाणें वर्ततच आलों. दुसरे घरकलहामुळें कल्याण नाहीं, हे आम्हासहि कलतच आहे. यास्तव आजपावेतों घर राखोन जेणेकडून उभयपक्षींचा कलह तुटे आण मुलकाची नांदणूक होई याच मतलबावर असोन रयेतीस कौल दिले. पुढां आपले येणे बेलगांवी अनुमानें होताच दर्शनास यावें. पुढां जैसी आज्ञा आपण करतील त्याप्रमाणे वर्तणूक करावी, या विचारांत होतों. त्यास सांप्रत राजेश्री पांडुरंग विश्राम व राजश्री जिवाजी विश्राम याणे नानाप्रकारें लोकामधें फितवा करून राजश्री रघुनाथ दलवी व सिद सांवत भोसले यास आपल्या मतांत घेऊन येकाकीच त्यांसी सामील जाहाले ; आण वाडीची मेटे[१] च्यारहि धरून दाणा वैरण अगदीं बंद केली. वाडीसभवतें घेरेचे गांवची रयेत व चाकरमानी यांसहि आपणाकडीस मिलऊन जेणेकडून आमचा नास होई त्या विचारावर प्रवर्तले. तंव आपलीहि पत्रे येवोन पोहचलीं. तदनंतर आम्ही राजश्री रामचंद्र बावाजी यास सांगोन पाठविले जे, आम्हास श्रीमंताचीं पत्रें आलीं, दर्शनास जाणार, तुम्हीं समागमे यावें. त्यास त्यांहीं उतर सांगितले जे, तुम्हास आज्ञा आली त्याप्रमाणे तुम्ही वर्तणूक करावी, आम्हास तुम्हाबरोबर यावयास पूर्वतें[२] नाहीं. तैसेच चिरंजीव राजश्री रामचंद्र सांवत यांकडस राजश्री सिवरामराऊ निंबालकर पाठऊन सांगितले जे, या अतिषयांत कारण नाहीं. आमचे चितीं अतीशई न करावा ; आण तुम्ही सांगणाराचे बोलें दौलतीस अपाय करून घ्यावा यांत कांहीं नाहीं. श्रीमंतांचीं पत्रे तुम्हास आम्हास आलीं त्याप्रमाणे वतर्णूक करावी. राजश्री सदाशिव नारायण यांस रवाना करून द्यावयाचा निस्छये केला होता. त्यास त्यांचे बंधू तेच दिवसीं देवाज्ञा जाहालें; यास्तव आम्हीच स्वार होऊन श्रीमंता-

१ मेट—किल्ल्याभोंवतालची चौकी. २ पुरवत.

कडस जात आहों. मागा किले कोट कबिले सर्व दस्तान आहे त्यास तुम्हाकडून उपसर्ग काडीमात्र जाहालेया श्रीमंताचा शब्द तुम्हाकडेस येईल यैसे कितेक विचारें सांगोन पाठविले. त्याजउपर त्यांही जबाब सांगोन पाठविला जे, आम्ही तुम्हास येकंदर जाऊ देत नाहीं. खामखा झुंझो. यैसी पस्ट जाब सांगितला. राजश्री तुलाजी आंगरे सरखेल याजकडून रा। आपाजी माहादेऊ हेहि उभयपक्षींचा श्नेह व्हावायाच विचारांत आले होते. त्यासी त्याणीं बोली सांगितली व लिहून दिली, त्याप्रमाणे आम्ही कबूल न करावयाची होती तेहि कबूल केली. येवढे करावयासी कारण उभयेपक्षींचा कलह तुटोन प्रजा नांदावी, आण आपल्या दर्शनास यावें आपण आज्ञा करतील त्या(प्र)माणे वर्तावे ; त्यास त्यांणी इकडस बोली लाऊन दिवसेदिवस विशेषच फंद केला. पाहातां मतलबी वेव्हार जे दिवसी भेटीचा निछय केला तो दिवस चुकविला. तेव्हां आपणावरच आहेत, यैसें दिसोन आलें. मग होतों त्या वाडिमधे कबिले व वरकड सर्व ठेवोन राऊत व कांही पाईचा जमाऊ घेऊन दर्शनास यावे या उदेशी निघालो. त्यास त्यांणी मार्गास चौकिया ठेविल्या होत्या, त्याही मारामार केली. त्यास मारोन काडोन होडावड मुकाम केलें. मागां त्यांही सर्व पेठ लुटली. लोकाचे कबिले कोणकोणाचे होते तेहि लुटून फस्त केले, आण वाडेस मोर्चेबदी करून चौगीर्दा चौक्या बसविल्या. वाडेचे पाणी बंद करून तोफाहि लाविल्या. वाडा जेर केला आहे. घेतील. यैसे अतिशयावर प्रवर्तले, यास्तव येथच राहून हें वर्तमान आपणास कलावे यास्तव लिहिले असे. याचा अभिमान धरून पारपत्य येथास्थित करणार आपण आहेत. आम्ही बाहीर निघालेवर पहिली ज्याणी त्यांसी मिलोन आम्हाकडस लबाडी केली होती, त्याचें पारपत्य करावयास लाविले आहेत. यांचे पारपत्य करून दर्शनास येतो. आम्हास आपल्या वचनाखेरीज दुसरा अर्थ नाही. आपणाकडस मातबर मनुष्य सत्वरच रवाना करितों. हा भावार्थ मागां येकदोन वेळ आपणास पत्रे लिहिली होती. त्यास मार्गास छेडाछेड वाट चालों देत नाहीत, यामुलें फिरोन आलीं. या प्रकारचा विचार आरंभिला. आपणा(स) कलावें म्हणोन लिहिलें असें. तिसरे दिवसीं त्यांणी वाडा घेऊन कबिले बाहीर काडून लाऊन दिले. यैसा त्याणीं आतीशय केला तो आपणास पत्री काय लिहावा? सर्व भावार्थ वार्तिक सांगता कलो येईल. बहुत काय लिहावे? कृपा आसो द्यावे हे विनंती.

¶*Jayram Savant writes to the Peshwa : While repairing to the latter's presence to get his differences with his nephew settled through the addressee's mediation, he is delayed, by an attack on the part of his nephew.*

2791

No. 82] [+26-1-1748

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक जनार्दन गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १९ सफरपर्यंत मुकाम मसुरें स्वामीच्या कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी स्वामीनी फौज रवाना केली त्यास छ ९ सफरीं घाटाखालीं पावली. दुसरे दिवसीं तेथून निघोन कुडा(ला)स आले. तेथें मुकाम करून दुसरे रोजीं मसुरेयावर सडी स्वारी करून यावें याप्रमाणें करार केला होता. परंतु मसुरेयाच्या किल्याचे जेर जाहालियाचें वर्तमान आलें त्यावरून राजश्री उभयतां सावंत कुडालचे मुकामी येऊन भेटी होऊन तेच समई दोन प्रहरीं उपोषितच श्रीमंत राजश्री तात्या व राजश्री मानाजी पायेगुडे यास सडे स्वारीनसी घेऊन मसुरेयास येऊन आंगरेयासी गाठ घालून मोर्चे उठवावे या उद्देशें निघाले. परंतु मार्गीच मसुरेपासून दोन कोसावर गोलवणची खेड आहे तेथें रात्र जाहली. उपरांत तेथेंच मुकाम करून राहिले. घोड्यास व माणसास येकादसीच प्राप्त जाहाली. दुसरे दिवशी प्रातःकाली छ ६ सफरीं बुधवारीं निघोन गोलवणची खेडीवर आंगरेयाची चौकी होती. तो मार्ग सोडून मालवणाकडून येऊन दोन प्रहरच्या समई मसुरेसनिध पावले. उपरांत सारे लोक जमा करून विचार करून गाठ घालावी, त्यास ती गोष्ट होऊं न देतां मानाजी पायेगुडे याणें होरेंट[१] करून शेपनास स्वारानसी खालीं बारी उतरोन गाठ घातली. तेच बारीस आंगरे याचे लोक हशमी होते. त्याणी मारामार केली व राऊतहि तयार होऊन यांचा मोड जाहला. नगारा निशाण व पनास पाऊणशें घोडीं जिवंत धरून नेलीं व लोकहि धरून नेले. उपरांत माघारे फिरोन कुडालास येऊन राहिले. तेथें दोन दिवस राहून तिसरे रोजीं कूच करून येऊन पेडुरावर मुकाम केला. दुसरे रोजीं मसुऱ्यावर यावें याप्रमाणें विचार केला. परंतु तेच रात्रौ आंगरेयाकडील बोलीचा संदर्भाचे कागद आले त्यावरून तेथेंच येक रोज मुकाम करून त्याजकडे कागद पाठविलें कीं मसुरेयाचे मोर्चे उठऊन पलीकडे जाणे. उपरांत बोलीचालीचा मजकूर मनास आणूं. याप्रमाणें पत्रें पाठऊन तेथून कूच करून मालवणानजीक कोलंबावर येऊन मुक़ाम केला.

+Ratnagiri Gazetteer. १ ओरड.

त्याऊपरी दोन च्यार वेळ त्याजकडील पत्रें व कारकून येऊन बोलीचालीचाच विचार करून त्याणी मसुरेयाचे मोर्चे उठऊन पलीकडे भगवंतगडास छ १७ सफरीं गेले. छ मजकुरींच संध्याकाळीं कोलंबाहून कूच करून मसुरेयास येऊन मुकाम करून राहिले आहेत. त्याजकडील आरमार मसुरेयाचे खाडींत होतें ते झाडून माघारे गेले. त्याजकडील फौज राऊत व हशम देखील खासा पलीकडे भगवंतगडास आहेत. याउपरी बोलीचालीचा मजकूर कसकसा होईल तो मागून सविस्तर सेवेसी लिहितों. स्वामीकडील फौज घाटमाथां आली हें वर्तमान येकोन त्याणें कुडालचें स्थल सोडून माघारे गेले. कुडालच्या कोटांत सामान तोफा दाहा व गला थोडाबहुत वगैरे जिनस किरकोल सांडून गेला. दुसरे दिवसीं गलबतें पाठऊन करलीहून झाडून सामानसुमान होतें तें घेऊन गेले याचा मनसबा धीरेकरून होता तरी मसुरेयाहून जावें याप्रमाणेंच विचार होता. परंतु मानाजी पायगुडे याणी उतावळी करून यश गमाविलें. फौज मसुरेयाचे बारीवर आली ते समई आंगरेयाकडील लोक तयार होऊन माघारेच जावे आसा विचार होता. परंतु याणी सारी फौज जमा होऊं न देतां पुढें आले, त्यामुळें नाश जाहाला. राजश्री तात्या व सावंत मागेंच होते व मान्याकडील लोकहि मागूनच येत होते. त्रिवर्ग येकत्र होऊन विचारें करून झुंजते तरी उत्तम होते. परंतु ती गोष्ट न जाहाली. मानाजी पायगुडे याचा मोड होऊन माघारे बारी चडोन येत होते ते समई आंगरेयाचे लोक बारीवर येऊन मारामार केली. ते समई राजश्री तात्या याणीं तेथेंच उभे राहून मारामार बरीच केली. आंगरेयाकडील घोडीं पाच पाडाव करून आणिलीं. त्याजकडील घोडीं च्यार ठार जाहलीं व जखमी घोडीं आठ व माणूस ठार येक व जखमी सा येणेप्रमाणें जाहालें. नगारा निशाण संभाळून आले. जाहालें वर्तमान सेवेसी विदित व्हावें. सावंताकडील वर्तमान तरी त्याच्या लोकानी धास्त घेतली व पैसा खर्चास नाहीं, याप्रमाणे आवस्था आहे. मसुरेकरानी शर्त करून किला रक्षिला. आंगरेयाकडील माणूस तीनसें च्यारसें पावेतों नाश जाहालें. स्वामीकडील फौजेस च्यार रोज विलंब लागता तरी किला गेलाच होता. परंतु स्वामीच्या पुण्यप्रतापेंकरून संस्थान रक्षिलें. याउपरी याचा त्याचा स्नेह उत्तम रीतीनेंच जाहल्यास बरें आहे. श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Janardan Ganesh describes to Bhausaheb a battle between Angria and Manaji Paygude at Masura wherein the latter acted rashly and was in consequence repulsed. Angria then left Masure and encamped at Bhagvantgad.*

No. 83] [8-1-1753

छ २ माहे रबिलावल

श्री

श्रीमंत माहराज मातुश्री
आईसाहेबाचे शेवेसी

विनंती सेवक तुळाजी आंगरे सरखेल कृतानेक विज्ञापना. ताा छ २७ सफर-८ पर्यंत साहेबांचे कृपावलोकनेंकरून, सेवकाचे व या प्रांताचे वर्तमान येथास्थित असे विशेष. साहेबांचे आज्ञापत्र सादर जालें, तेथें आज्ञा कीं जावली प्रांत किले व्याघ्रगड येथे बाजी रुद्र व महिपतगडकरी दंगल करणार. त्यास राज्यांतील स्थळें त्यांचे हरयेकविसी साहित्य उपराळा करून, अपकाराचा अर्थ प्रांतात न होय याविसीं आज्ञापिलें. त्यास साहेबांचे आज्ञेपेक्षा दुसरें आधिक काय आहे! आज्ञा ते सिरसा आहे. सेवेसी विदित जाहलें पाहिजे. शेवेसी श्रुत होते हे विनंती.

¶*Tulaji Angria writes to Tarabai that every precaution has been taken to protect the King's territory from attacks by Baji Rudra, the Commandar of Mahipatgad.*

No. 84] [9-1-1753

श्री

श्रीमंत माहराज मातुश्री आई
साहेब साहेबांचे सेवेसी

विनती सेवक तुळाजी आंगरे सरखेल कृतानेक विज्ञापना. ताा पौश शुध पंचमी भौमवासरपावेतों साहेबांचे कृपावलोकनें सेवकाचें व या प्रांतीचें वर्तमान कुशल असे विशेष. साहेबांचे आज्ञापत्र सुलतानजी जाधव व दर्याजी पायगुडे यांबरोबर सादर जाहलें; तेथें आज्ञा की, किले महिमंडणगड येथील तनख्याचे गांव व घेरे याचे गांवीची पाहणीं रूजुवाती खेरीजकरून जबरदस्तीनें वसूल नेला म्हणोन विस्तारें आज्ञापत्रीं सेवकास आज्ञा कदीमप्रमाणें चालावें म्हणून. यैशास तनख्याचे गांवची पाहणी रास्ता जाली, तेणें प्राा चालत आहे. मौजे खोंपी व सिरगांव येथे गडकरी यांची सेती वाहोती त्याचे पाहणीस गोपालदुर्ग तर्फेने पाहणीदार गेले; तेव्हां गडकरी याणी रुजुवात न होतां, धारेयाचा यैवज आटोपून गेलें, तथापि पाहणीदार यांणी पुन्हा गर्गशा नसावा याकरितां रास्ताच जमेची ठराव केला; परंतु बाकीचा वसूल सुदामत न देऊन साहेबांस आपल्या

साहित्याचा मजकूर विदित करितात. राज्यांतील किले दास्तव पेशजी पाहाणीच्या जमाबंदीपैकीं जमेस तरफाच देऊन, मख्ता करार किले महिमंडणगडाहून लेहून आले होतें, तेव्हांच सदरहु दोनी गांवचे विले करून, किले गोपालदुर्गास ताकीदपत्र पाठविलें असें; त्याप्राा सालेंसाल वसुलाचा निकाल गडकरी यांकडून जाल्यानें, गुता कांही नाहीं. गडकरी चाकर लोक. आपली वर्तणूक सेवेसी प्रगट होऊ न देतां साहित्याची विनंती सेवेसी करितात; तरी सेवकाकडून किमपि वावगा उपसर्ग घडला नाहीं. जे आज्ञा कर्तव्य ते महिमंडणगडकर यास करून, मख्तेयाप्राो सुरलीत वसूल गोपालदुर्गास आला म्हणजे सेवकाकडून कोणेविसीं अंतराय आहे यैसे नाहीं. सेवेसी विदित जाहले पाहिजे हे विनंती.

¶*Tulaji Angria in an answer to the letter of Tarabai explains that he did not disobey the royal orders regarding the collection of revenue in the villages round about Mahimandangad.*

No. 85] *[17-1-1753*

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब यानी राजमान्य राजश्री तुळाजी आंगरे सरखेल, यासी आज्ञा केली यैसीजे, तुम्ही किले विशाळगडाच्या वेरियास येऊन, उपसर्ग करून, घेरा उद्वस केला म्हणुन हुजूर विदित जाहले; तरी यैसी अमर्यादा तुम्हास करावया प्रयोजन काय? किले माहाराजाचे, त्यांसी तुम्ही कटकट सहसा न करणे. तुमचे स्वाधीन जी स्थले आहेत ती जतन करून, आपले मर्यादेने राहावें हेंच उतम आहे. ते गोष्ट येकीकडे ठेऊन बेज्या वर्तणूक करणें असेल, तरी तैसेंच लिहून पाठवणें. याउपरी देखत आज्ञापत्र, आपला जमाव किले मजकूरच्या वेरीयाहून काढून आपल्या स्थलास जाणें. जेणे करून तुम्हांवर साहेबाची कृपा होय त्या रितीने वर्तावे. तुमचे वडील ज्या रीतीने वर्तत आले, त्या रीतीनें तुम्ही वर्तोन, साहेबांस संतोष होय तो अर्थ करणे. तुमचे वडिलीं येकनिष्ठेने सेवा केली, हे साहेब जाणत आहेत तेणेप्राा वर्तणे, जाणिजे. या कामास

यास रुपये खर्चास देणे. छ ११ रालौवल सन सलास खमसेन सुज्ञ असा.

¶*Tarabai orders Tulaji Angria to withdraw his forces from the fort of Vishalgad which, she claims, belongs to the Maharaja of Kolhapur and further warns him to desist from doing any unfriendly act towards Kolhapur.*

No. 86] [1748?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
साहेबाचे सेवेसीं

आज्ञाधारक मानाजी पायगुडे दंडवत विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ ११ रबिलावल मुकाम सेणगांव साहेबाचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वृत्त येथास्थित असे विशेष. राजश्री सावंत याच्या मुलकांतून आंगऱ्याचे लोक गेलियानंतर त्याच्या बंदोबस्तीस आठ पंधरा दिवस लागले. पारगड व भिवगड येथें स्वामीची लोक व निशाणें गेलीं. किले हस्तगत जाहाले. यामुलें फिरंगियास जरब पोहचली आहे. मर्दनगडच्या अनुसंधानामध्यें आहों. छ २० सफरपर्यंत स्वामींनी लोकांची पोटाची बेगमी केली होती ते जाहाली. त्या अलीकडे कर्जवाम करून कांहीं दिवस गुदरले. सावंत याजवळ कांहीं नाहीं व सावकारी लोकांजवळ पैसा न मिळे. याजकरितां च्यार दिवस बेळगाव कितुर प्रांतें पोट भरितों. आंगऱ्याच्या मुलकांत न जाणें म्हणून स्वामीची आज्ञा. त्यास येक वेल विजयदुर्ग प्रांतें जाऊन त्यासी जुज करावें यैसे सेवकाच्या चित्तीं आहे. जुंजास आंगऱ्याने गांठ घातली तर उत्तम. नाहीं तर माघारे येऊं. परंतु गेलियाखेरीज मागील जाहाली गोष्ट उजरत नाहीं. आठ पंधरा दिवसाची पोटाची बेगमी करून त्याच्या मुलकांत उतरतों. साहेबीं आज्ञापत्र पाठवावें. करवीरवासी याणी राजश्री विसाजीपंतास बोलाऊन नेऊन स्वामीकडे जावयाची त्यांची रवानगी केली आहे. तेथील वर्तमान परस्परें इचलकरंजीहून त्याणी लिहिलें आहे त्यावरून निवेदन होईल. त्यांच्याहि बातमीत आहों. राजश्री दौलतराव घोरपडे व सिंदे नरगुंदे कितुर प्रांतें दोन हजार जमा जाहाले होते. सध्या सिंदे नरगुंदे आपल्या स्थलास गेले. थोडे बहुत जमा आहेत. पुढें होईल वर्तमान तें सेवेसीं लिहून पाठऊं. कृपा करावी हे विज्ञापना.

¶*Manaji Paygude informs the Peshwa that the Angria's forces have evacuated the Sawant's territory and that the occupation of Pargad and Bhivgad has checked the Portuguese advance.*

No. 87] [31-1-1753

पौ छ २९ रबिलौवल

श्रीगणराज

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक जनार्दन गणेश कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ ९ रौवलपर्यंत किलेमजकूरचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष.

गोमांतकास विजेरे[१] नवा आला. पुर्तकालची तारवे तीन व मोसबाची दोन येकून पाच तारवे मातबर सामानसुधा आली. फिरंगी सोलासतरासे आला हे वर्तमान पेशजी सेवेसी लिा आहे. आलीकडील वर्तमान तरी पूर्वी विजेरे येथे पडला त्यामुले याचीहि उमेद इकडील फारसी आहे. त्यास, प्रस्तुत सावंताचा त्याचा कटाक्ष वाढला आहे, तिकडे गेल्याचे वर्तमान सविस्तर राजश्री बापूजीपंत याणी सेवेसी लिा आहे. येथील मामलतीचा मजकूर तरी, सुभेदार तिगजण गोविंदराव निराजी येक, त्याचा भाऊ कृष्णराव येक, गोविंदराव याचा पुत्र आपाजीराव येक, असे तिघेजण येका घरचे आहेत. त्यांचा त्यांचमध्ये नित्य उठोन कज्या, नानाप्रकारे भांडतात, हाणामारी होत्ये, तिहीकडे तिगजण वोढतात, येकाचे येकाचे चितास येत नाहीं. याखेरीज कारभारी आसामी त्याचेच निा तिमाजीपंत म्हणौन गुमस्ता व जोहली गमावली होती तो येक वगैरे आसामी आठ, येणेप्रमाणे आकरा आसामी कारभारी. कोणी ग्रहस्त भेटीस आला तर आकरा दुणे बावीस वस्त्रे आणावी तेव्हा येणारान यावे. याखेरीज आणखी दोघे गणेशपंत व माहादाजीपंत सरकारभारी व सरदिवाण म्हणौन तात्यानी रवाना केले आहेत तेहि चौरोजात येऊन पोहचणार. असा बखेडा सुभ्याचा जाहाला आहे. मामलतीचा आब गमावला, यामुले फिरंगाणात हासे होते. पाचसातसे माणूस येकदाच दूर केले. विचारेकरून केल्यास लौकिक न व्हेता[२]. सारांश, येकच प्रकार राहिलासा नाही. बखेड्यामुले स्थलास आपाये होईल. याचा बंदोबस्त लौकर हुजुरून केला तरी स्थल जतन होईल. लोकास रोजमरा पावत नाहीं. कार्तिक मासचा हप्ता घेणे तो भाद्रपद मासी रयतेकडून घेऊन चुकले. रयेतीस नाथ नाहीसारखा जाहाला आहे. मनस्वी गावगना रोखे करून मसाले करून आणून मारून रुपये घेतात. फडनिसी व मजमूचे प्रयोजन लागत नाहीं. परभारेच कारभार उरकितात. निमित्याखेरीज लोकास मारतात, यामुले रयेतीचा टिकाव होता दिसत नाही. राजश्री पांडबा दुभासी याजकडील कारकून येथे आहे. त्यास आणून मनस्वी मारून रुपये मागतात. मुलकातील रुपये वसूल निम होऊन चुकला. पुढील निम वसूल माघ मासात वईगण[+] सेते पेरली म्हणजे वसूल यावा; त्यास, सध्याच उपद्रव मांडिला आहे. रयेतीचा विचार या प्रकारचा. लोकांचाहि तसाच, उठोन जातात. तात्याकडे वर्तमान लिहिले तरी जाबसाल होत नाही. हे मनस्वी कारभारी आकरा जण जाहाले

१ विजरई = व्हाइसराय. २ होता.

+ उन्हाळ्यांत होणारें पीक.

आहेत, यामुळे काडीइतका भ्रम मामलतीचा राहिला नाही. याउपरीहि तिकडेच बंदोबस्ताचा विचार जाहाला तरी स्थल जतन होत नाही. येथे क्षणाचमध्ये भलत्या विचारास विलंब लागणार नाही. तशामध्यें वरील कुमक येऊन पोहचा-वयाचा प्रसंग कलतच आहे. येथे ठासून राहून स्थल रक्षिले पाहिजे. याची आज्ञा काये ती करणार खावंद समर्थ आहेत. जाहाले वर्तमान सेवेसी दखल करावे. वरकडहि सविस्तर राजश्री बापूजीपंत व रघसावंत व दुलबाजी नाईक याणी सेवेसी लिा आहे त्यावरून निवेदन होईल. वतनदार लोक यांचीहि वतने आमानत करतात, त्यास पैसा पावत नाहीं. तेहि सारे दिलगीर आहेत. सारांश, लौकर बंदोबस्त व्हावा. येथून स्वामीकडे वर्तमान लिहीन म्हटल्यास फुरसत पडणार नाही असा येथील विचार आहे. लोकास नागवावे, मारावे, हाच प्रकार काटॅकी[1] त्याणी आरंभिला आहे. स्थलाचे आगत्य त्यास नाहीं. कोणत्याहि प्रसंगास ते चुकणार नाही, असा विचार आहे. यात आज्ञा होईल त्याप्रा वर्तणूक करूं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Janardan Ganesh reports to the Peshwa of the hostilities between the Savants of Wadi and the Portuguese and the arrival of a new Governor at Goa.*

No. 88] *[9-3-1753*

पो छ ६ जमादिलौवल

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब
साहेबांचे शेवेसी

विनंती सेवक बापूजी कानो कृतानेक विज्ञापना. ताा छ ३ जमादिलौवल-पर्यंत सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. या प्रांतीचे वर्तमान तर साहेबाचे सेवेसी विदित होतच असेल. आंगरियाने मर्यादा सोडून मुलकाचा उछेद केला. विशालगडकरी यांसी कजिया लाऊन कसबा प्रभावली व मौजे साखरपे येथे दोही तोंडी मेढे * * टून शह देऊन बैसला आहे. हा जिल्हा श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधी स्वामींचा रसदी मुळूख, चौथाई तक्षिमेचा खावंद आंगरिया असता, सर्व सत्याधारी आपण होऊन, प्रजेचा उछेद मांडिला आहे. प्रतिनिधीच्या जिल्यांची खराबी केली. त्यांस विचारितां कोणी खावंद

---

१ खाटकाप्रमाणें?

नाही येसे त्यांस भासलें आहे. हे स्थळ साहेबाचे व जिल्हाहि साहेबाचा; तरी साहेबीं ये गोस्टीचा अभिमान धरून, आंगरियास सिक्षा करून, मर्यादेने ठेवावे येसें साहिबी आगत्ये धरून, या समयीं पैरवी केली, तरीच स्थल रक्षण होते. आंगरिया तो स्थलाचे पिछास लागला आहे. नाजूक जागा आणि खर्चा-वेचांच्या ओढीचा प्रसंग केला. सरदारी रक्षिली पाहिजें. याची उस्तवारी करणार साहेब धनी समर्थ आहेंत. साहेबी सत्वर ये गोस्टीची पैरवी केली, तरी पुढे मुलकाची वसाहात होईल; नाहीं तर प्रजेचा उछेद जाहला. वसाहत होत नाही; तेव्हा स्थलास अपायें होऊन रक्षण होतां संकट आहे. सेवेसी विदित असावे म्हणोन लिा असे. साहेबाचे शेवेसी वांगी सुमार ४० चालीस पाठविली आहेत. मुलकामधे धुंदाई आंगरियाने मांडिली आहे. कोठे वसाहत नाही. सेवेसी विदित जाहले पाहिजें, हे विज्ञापना.

¶*Bapuji Kano requests Tarabai to intervene and save the fort of Vishalgad and the territory of the Pratinidhi from being captured by Tulaji Angria.*

No. 89] [*14-3-1753*

श्रीभवानी प्रसन्न

श्रीमंत राजश्री * * * * *

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक येमाजी सिवदेव कृतानेक नमस्कार विज्ञापना. ताा छ ८ जमादिलोवल सौम्यवासर मुकाम मसुर स्वामीचे कृ(पे)करून, वर्तमान येथास्थित आसे विशेष. येथील दिनचर्येचें वर्तमान वरचेवरी लेहून पाठवितच आहो. प्रस्तुत वर्तमान आहे. विशालगडचा वेढा राजश्री तुलाजी आंगरे यानी घातला हे वर्तमान पूर्वी लिहिलेच आहे. दोन महिने जाले. पारपत्य झाल्याखेरीज वेढा उठत नाही येसे जाणून राजश्री पंत प्रतिनिधीयानी छ ७ जमादिलोवली कूच करून फौजसुधा विशालगडास गेले. मागीलहि शह रक्षणे, याजबद्दल राच(ज)श्री दादोपंत वाग यासी फौजसुधा या प्रांती ठेऊन शह रक्षवा तरी ते येथील * * * यास माहीत नाहींत; आणि वेव्हारास आंतर पडेल. स्वामी

---

१ साह्य, मदत.

शब्द ठेवितील, याजकरितां राजश्री दादोपंत यासी श्री * * * समागमे लाऊन देऊन, हजार * * * * सेवकाचे राहाणे कसबे मसुरी जाले आहे. प्यादेहि जवली आहेत. सातारियाच्या बातमति आहो; परतु नित्यकृत्याविणे परम संकट जाले आहे. स्वामीस ल्याहावे. स्वामी उदारता करून आज्ञा करितात, त्याजमुले लज्याहि ल्याहावयासी वाटती. संकट तरी बहुत जाले आहे. निदान जाणून काही तरी आज्ञा करणे. या(स)मई विहित आहे. वरकड विनती दर्शणोती करणें ते करूं. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Yemaji Shivdeo writes that the Pratinidhi has marched towards Vishalgad to dislodge the Angria from his position.

No. 90] *[22-4-1753*

पो छ २९ जमादिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री राऊसाहेब स्वामीचे शेवेशी

विनंती शेवक रामाजी माहादेव मुक्काम ठाणे चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागायत छ १७ जमादिलाखरपावेतो स्वामीचे कृपावलोकनेंकरून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विज्ञापना. श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे आज्ञापत्र छ ९ जमादिलौवलचे लष्करांतून आले ते स्वामीनीं रवाना केले ते छ १३ जमादिलाखरी सादर जाहाले, तेणेकरून शेवकास बहुत संतोष जाहाला. हिकडील वर्तमान श्रीमंत राजश्री दादासाहेबाही अमदाबादेस मोर्चेबंदी करून फत्ते केली म्हणोन छ १९ जमादिलोवलीची आज्ञापत्रे आली ते राजश्री शंकराजीपंत व तीर्थस्वरूप राजश्री बालाजीपंत घणदिवींवरून आमदाबादेस जातां मार्गी पोहचली. त्यांत आज्ञा कीं, तुम्ही लोकसुद्धा परतोन माघारे जाणे. आज्ञेप्रमाणें उभयेतां सामान व लोकसुद्धां माघारे फिरले तो मागाहून दुसरी पत्रे आली की शहरांतील बाबी फिरोन बोलीस बदल खाऊन लढणार. तरी सामान लढाईचा रवाना करणें, लोक न पाठविणें. त्यावरून आज्ञेप्रमाणे वसईचे सामान साष्टीचे ऐसी दोनतीन गलबते रवाना जाहाली. ते आर्नालियाखाली जाऊन दाखल जाहाली तो फिरोन बातमी आली, अमदाबाद फत्ते जाली. त्यावरून सामानाची गलबते राजश्री शंकराजीपंत याही माघारी पाठविली. तीर्थस्वरूप राजश्री बालाजीपंत गंभीरगडप्रांते येऊन तेथील मुलखी

बंदोबस्त करून लौकरच येतील. हे वृत्त सविस्तर विदित व्हावे यास्तव शेवेशी लिहिले असे. राजश्री मानाजी आंगरे वजारतमाब याकडील वर्तमान पूर्ववत प्रमाणें. मशारनिल्हेहि मनस्वी वर्तणूक करावी, देहांतरी नाहींत, थळचा कोट बांधावा म्हणोन विचारांत आहेत. हल्ली बातमी आणविली आहे. मागाहून सविस्तर लेहून पाठऊन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶Ramaji Mahadeo to Vishvasrao, saying that he was asked by the Peshwa to keep himself ready to proceed to Ahmedabad, but in the meanwhile he received the joyful news of the capture of that city by Raghunathrao.

No. 91] *[8-3-1755*

पो छ २ जाखर साईकाळ
प्रहर दिवस

श्री

राजश्री खंडोजी माणकर गोसांवी यासी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो रामाजी माहादेव मुक्काम साष्टी आशीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहित असले पाहिजे विशेष. राजश्री दिनकरपंत यास पत्र पाठविले असे. तरी गोसावीयाकडे पावतांच त्याजकडे त्वरेनी पाठवून उत्तर फिरोन लौकर येईल ते करावे. डाक सुत्रारगडाकडून ठेऊन येथील पत्र जलदीनें जाऊन पावेत व तिकडून सत्वर जाबसाल येत यैसे करावे म्हणोन लिहिले होते. तरी डांक येऊन पत्रांचे जाब लौकर येत ते केले पाहिजे. हुजरोन राजश्री समशेरबहादूर यास फौजसुद्धा कऱ्हाडास पाठविले. राजश्री दिनकरपंत+ महिपतगडी गेले म्हणोन हुजरोन लिहिले ; त्यास हुजूर दिनकरपंताचा आमचा करार होता कीं इंग्रजाकडील मजकूर ठीक करून लिहून त्याप्रमाणें व तुम्हाकडील कामकाजाची योजणूक जसजसी होईल ते ल्याहावी. त्याप्रमाणें पुढें कर्तव्य पदार्थ चितात आणोन करावे. त्यास राजश्री कृष्णाजीपंत व येशवंतराऊ हुजूर संनिध होते, त्याणी कोणता भर देऊन त्वरा करविली हा मजकूर कळला नाहीं. तुम्हास आम्हीं लिहिले व राजश्री भवानजी कदम पाठविले व सावंताकड बाळाजी विठोजी पाठविले हे गोष्टीचा जाब येईल येणे तो जलदी जाली. इंग्रेजानीं तयारी न केली तरी आरमारसुद्धा जाऊन पोहोचावे. त्यास खुसकीने लोकसुद्धा यावे. आरमार

+ येथें शिक्का.

रवाना करावे. त्यांस आम्हीं कोठे यावे ? आरमार कसे रवाना करावे ? उद्यां सनवारी इंग्रेचाची भेट होईल. भेटी नंतर त्याची तयारी जाली तर उत्तम; नाहीं तरी तुमचे व दिनकरपंताचे पत्र येईल त्याप्रो आम्ही येऊन पोहोंचतो. रवाना छ २३ जमादिलौवल. बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶Ramaji Mahadeo informs Khandoji Manker that Samsher Bahadur has been deputed to Karad by the Peshwa and Dinkerpant to Mahimatgad though it was settled as regards the latter that he should go after communicating with the English. The writer then asks him where he should go and what steps he is to take as regards the movements of the fleet.

No. 92] *[9-5-1753*

श्रीभवानी प्रसन्न

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे

सेवेसी

विनंती सेवक येमाजी सिवदेव कृतानेक नमस्कार विज्ञापना. ताा छ ९ रजब बुधवासर मुकाम मसुर स्वामीचे कृ(पे)करून वर्तमान येथास्थित आसे विशेष. हिकडील दिनचर्येचे वर्तमान जे, श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधी याचे मुकाम श्रीकृष्णातीरी नजीक आष्टे येथे आहे. स्वामीची पत्री आली होती जे सावताचे साहित्य करणें. त्यास ती पत्रें घाट चढून सिरले प्रांती आलियानंतर प्र(वि)ष्ट जाली. त्यास श्रीमंतांनी भेटीचे समई आंगारकासी करार केला जे, उभयता भाऊ भांडत आहेत; तुम्ही जयराम सावत यांसी मदती न द्यावी. लोक पाटविले असतील ते फिराऊन आणावे, ऐसा करार जाला. त्याजवरूनी आंगारकाने लोक आपले माघारे आणिलेच आहेत. प्रस्तुत स्वामींची पत्रें आली, त्याजवरूनी मागती आंगारकास पत्रें पाठविली आहेत; त्याचें उतर आलियानंतर आज्ञेप्रमाणें विचार केला जाईल. प्रस्तुत गैरहंगाम आहे. या मुलकांत प्रजन्याची अमदानी जाली आहे; परंतु त्यास उपस्वर्ग च्यार महिने न हो ऐसा विचार केला जाईल, अंतर पडणार नाहीं. श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधी याचे मुकाम कराडी होणार होते. त्यास स्वामीचे आगमन श्री कृष्णातीरी श्वरूपच कालें करून होणार पुढें दर्शणाचा विचार परस्परे घडावा येविसीची सूचना चिरंजीव राजश्री

त्रिंबकराव यानी पत्री लिहिली होती, याजकरिता श्रीमंतानी कृष्णातीरीच मुकाम करून आम्हासनिध यावयाची आज्ञा केली आहे. हिकडील बंदोबस्त करून फौज मसुरी ठेऊन आम्हीहि येकादोन दिवसा श्रीमंतासनिध येत आहो. वरकड कितेक वृत विदित स्वामीस व्हावे, इदंनिमित्य श्रीमंतानी राजश्री कृष्णाजी जिवाजी रवाना केले आहेत. चिकोडीपरयेंत गेले आहेत. सेवेसी येऊन पावतील. सकल अर्थ निवेदन करितील. अंगारकाची व श्रीमंताची भेटी जाली; परंतु लाभलोभ काही तिलमात्र घडोन आला नाही. निमित्य जे, त्याचे मुद्दे बहुत (होते) ते मान्य करावे, तेव्हां त्याजपासून लाभ घडावा तरी त्याचे मुद्दे मान्य करणें, तेव्हा आपल्या इतलियाखेरीज (करणें श्रे)यस्कर नाही. याजकरिता लोभाचाच त्याग करून, भेट मात्र घेऊन, सर्व गोष्टी आपल्यावरी महकूब ठेविल्या. सातारियाकडील वर्तमान तरी राजश्री दिनकरपंत सेवेसी लिहितच असतील. त्यास राजश्री बाबूजी नाईक याच्या चितात विचार आला आहे जे, श्रीमंत राजश्री प्रतिनिधि याची भेटी घेऊन त्याचे विचारे स्वामीची दया संपादावी. हे बुधि निश्चियात्मक होऊन, श्रीमंत मातुश्रीची आज्ञा घेऊन, राजश्री जाधवराव याची आज्ञा घेतली. जाधवरायाच्या मनास तों येत नाही. नाइकाचा मात्र आग्रह पाहून, त्यानीहि आज्ञा दिली. पत्रे वरचेबरी पाठवीत आहेत. त्यास स्वामीस वर्तमान कललियाखेरीज कसें करावे, याजकरिता अनुसंधान मात्र रक्षून श्रीमंतास विदित करून पुढें विचार घडेल तो सेवेसी लेहून पाठऊन देऊं. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Yemaji Shivdeo informs the Peshwa that neither the Pratinidhi himself nor the Angria, who has been prevailed upon by the former, will participate in the quarrels of the Savant brothers. He further refers to Babuji Naik's efforts to regain the King's favour through the Pratinidhi's mediation.*

No. 93] [*11-5-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी महादेव चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ७ रजबपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ २७ जमादिलाखरचे सादर तेथें आज्ञा कीं, तुम्हाकडील लोकांची भरती पोख्ती होऊन पांचसातशें माणूस

2803

हुजूरचे नामजादी देखील ज्याजती होते. किल्ले रतनगडास तुम्हाकडील कुलाबकर दिडसे माणूस देविले होते ते तुमचे तुम्हाकडे देविले. किले माणिकगडच्या बेगमीपुर्ते ज्याजती लोक असतां सांप्रत तुम्ही नवे माणूस ठेवून चाकरी घेता म्हणून हुजूर विदित जाहाले. तरी हे गोष्ट अपूर्व आहे. तुम्हास वारंवार सांगितले व लिहिले. लोकांचा भरणा पोख्ता करून दिल्हा. आणि नवे माणूस ठेवून चाकरी घेता हे गोष्ट कार्याची नाहीं. याउपरी नवे माणूस ठेविले॰ असेल ते दूर करणे. नवे माणूस येकंदर न ठेवणे म्हणोन आज्ञा. येशास स्वामींनी नेमणूक करार करून दिली त्याप्रमाणेच लोक ठेविले. त्यांत रदबदलीमुले एखादे पथकांतील पांचसात बरे माणूस ठेवावे लागले ते ठेविले. परंतु सरासरी नेमणुकीसिवाये ज्याजती नाहीं. सांप्रत माणिकगडपैकीं शंभर माणूस ज्याची तन इकडे होती त्याणी अगोधरच कान गुंतवून घेतले होते, तितके मात्र ठेविले आहेत. वचनास अंतर करिता न ये. यास्तव संकटास ठेविले. हे सविस्तर हुजूर लेहून पाठविलेच आहे. वरकड दुसरे माणूस ठेविले नाहीं. हुजूर कोण्ही निवेदन केले असले तरी असो. परंतु वर्तमान या प्रकारचे आहे. साध्यंत हुजूर येऊन निवेदन करून लोकाचा आगदी जाबताच आज्ञेप्रमाणे दो दिवसा हुजूर पाठवितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Ramaji Mahadeo explains to the Peshwa why he was required to engage more men in spite of the Peshwa's order to the contrary. He had to engage them because—he says—he had already given them promises of employment.

No. 94] [*26-5-1753*

श्री

श्रीमंत राजश्री नाना व भाऊसाहेब
स्वामीचे सेवेशी

विनंती सेवक रामचंद्र बावाजी कृतानेक दंडवत प्रणाम विज्ञापना. स्वामींचे कृपादृष्टीकडून सेवकाचें वर्तमान ताा छ २२ रजबपर्यंत यथास्थित असे. उभयतांकडील मातबर आणविले असेत, ते रवाना जाल्यावरी तुम्हीं येणें म्हणून आज्ञा; तदनुरूप सेवक तयार होऊन, उभयतांकडील निघणार निघावे, ये गोष्टीचा मार्ग पाहात असें. राजश्री जिवबाची निघावयाची तयारी जाली आहे. जयरामबावाकडील विचार खुद निघावें असें बोलतात. सरखेलांकडील राजश्री आपाजी माहादेव आले आहेत. इकडेतिकडे जात असतात. त्यांचे विचारें येथील येथें समजतील किंवा खुद निघोन येतील, अगर मातबर रवाना करितील तें

पाहून सेवक स्वार होऊन येतों. चरण दृष्टीस पडतील तो सुदीन. सरकारचें कार्य नसतां सेवकें याचें मातबर निवण्याची वाट पाहात बसावें येसें काय? याकरितां यांस पाठवणे म्हणून रामचंद्र सावंत यांसीं पत्र व सेवकास आज्ञा सत्वर येई तें करणार स्वामीं समर्थ आहेत. स्वामींचे कृपेचे योगें रामचंद्र सावंत यांचे मनोरथ सिधीस पावत आले आहेत. स्वामींनी अभिमान धरिला आहे, त्याप्रमाणें मारनिलेवरी पूर्ण कृपा असावी. क्षेपनिक्षेप स्वामी जे आज्ञा करितील व केली त्याहे त्याप्रमाणें वर्तावें, हा निश्चय रामचंद्र सावंत याचा सदृढ आहे. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramchandra Bawaji informs the Peshwa and Sadashivrao Bhau that he will presently repair to the addressee's presence and remarks that all the hopes and plans of Ramchandra Savant have been fulfilled as desired by the Peshwa.*

No. 95] *[2-6-1753 ?*

छ ६ साबान.

श्री

तीर्थस्वरूप राजश्री गोपाळपंत दादा वडिलांचे सेवेसी

अपत्यें दिनकरानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा रविवासर मुकाम मौजें खेडें नजिक जंजिरे रत्नागिरी सुखरूप असो विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन समाधान जाहालें. ऐसेंच निरंतर पत्री सांभाळ करावा. इकडील वर्तमान तर राजश्री रामाजीपंत इंग्रजसुद्धां छ २४ रजबीं जंजिरे मजकुरीं (दाखल) जाहालें. खुष्कीनें मोर्चेबंदी करून दर्यांतून इंग्रज मारगिरीस[१] काल प्रारंभ जाहाला. खुष्कीनेंहि मारगिरी तोफा गरनाळांची करून परीघ घातला आहे. जागा अफाट मारगिरीनें जेर होतां दिसत नाहीं; परंतु श्रीमंतांचें पुण्य समर्थ, क्षेपनिक्षेप स्थल यावेंसें आहे. नारो वासदेव व सावजी मोहिते अंगारकाकडून येथें येऊन च्यार दिवस मारामार दोहीकडून तकूब करावी, रत्नागिरी, अंजनवेल, गोवलकोट तीन किल्ले द्यावयाचा करार करून गेले आहेत; आज उद्यां येतील. आल्यावर जो ठराव होणें तो होईल. आम्हाकडील काळजी न करावी. राजश्री रामाजीपंत व मोराजी शिंदे, खंडोजी माणकर तमाम सरदार येथें आहेत. वरकड मजकूर होईल तो मागाहून लेहून पाठऊं. बहुत काय लिहिणें? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Dinkar to Gopalpant Dada reporting an attack upon the Angrias at Ratnagiri by Ramaji Pant supported by an English squadron,*

---

१ तोफांच्या माऱ्यास.

2805

No. 96] [29-6-1753

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना ताा छ २७ शाबान. किले कर्णाला घेतल्यानंतर किले मजकुरचा तनखा गांव व जाहागीर पेण व पनवेल दो जागां फौजदारी होती. अंबरापूर, तर्फ किल्याचे तनख्याची अंगारक जबरदस्तीनी नेतो. येकतर्फा वसूल व्हावा तो दुतर्फा होतो. किला सरकारांत आला. अतःपर अंगारकास तक्षीम न द्यावी. दुसरी गोष्ट अंगारकाचें कल्याण प्रांती येकजागा देहा किला राहिला, त्याकरितां कल्याण प्रांतची निंमे घेतो. आज्ञा धण्याची जाल्यावर धण्याचे पुण्येकरून सर होईल. किले कर्णाला सरंजाम याजमुळें अंगारकाचे लोकांस फिरणे अडचण जाहाली आहे. हा सविस्तर मजकूर योजना करून हुजूर लिहिला आहे. आज्ञा होईल त्याप्राा वर्तणूक करून. दुसरे अंगारकाकडील लोकांचा व स्थलांचा संदर्भ गुदस्तापासून लागला. बोलीचालीचा भावगर्भ ठीक केला. त्यास उभयेतां स्वामी मुल्कगिरीस गेले, याजमुले च्यार दिवस काम राहिले. तूर्त न करावें म्हणोन पुण्याहून आज्ञा जाहाली, त्याची तरतूद मात्र करून ठेविली आहे. सूर्यक्षेत्रीचे मजकुराविशीं पूर्वी स्वामीनी आज्ञा केली होती, तेव्हांच इंग्रेजास लेहून त्याचें पत्र स्वामीस पाठविलें. इंग्रेज सर्व साहित्यानिसीं सिध्द आहे. स्वामींनी अमदाबाज घेतली[१] याजमुले शामलास भय प्राप्त जाहलें आहे. जंजिरियासी विचार पडिला आहे. जनाचे प्रारब्धे करून हाहि जागा सर होईल. कोकण प्रांती इतके स्थलांचे भय सर्वांस आहे. अंगारकाचे पारपत्य करावयासी स्वामीची आज्ञा जाल्यास इंग्रेज आपले आरमारानी दारू गोल्यानी सिध्द आहे. स्वामीस कलावें, सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*A letter, addressed to Raghunathrao Dada, complaining about the Angria's interference with the revenue collection, and referring to Raghunathrao's capture of Ahmedabad.*

No. 97] [August 1753 ?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. राजश्री संभाजी राजे याची पत्रे यास आली होती, धीर धरणे; आपणहि साहित्य करितो. राजश्री रांगणेयास येणार आहेत. प्रस्तुत कोंडाजी

(१) २५-४-१७५३ रोजीं अहमदाबाद हस्तगत झाली.

भोसला करवीराहून मालवणास जावयास आला. बाा पंचवीस स्वार आहेत ते येऊन रांगणेयास राहिले. पुढें मालवणास जावयास मार्ग नाहीं. मालवणकरानी राजश्रीस सांगोन पाठविले की, तुम्ही साहित्य करून आंगरेयाचा शह निवारण होय असे सामर्थ्य आसिले तरी तुम्ही मालवणास येणे. साहित्य न होता आला तरी गडावर घेणार नाहीं. याप्रकारे सांगोन पाठविले. आपल्या साहित्याची वाट महिना दोन महिनेपावेतो पाहातो. उपरांत किला पेश्वेयाकडे देतो. याप्रमाणें स्पष्ट सांगितले आहे. सेवेसी श्रुत व्हावे. राा कुसाजी सिंदे पूर्वी सरकारांत चाकर होते. पुन्हा: स्वामीकडे यावे असा हेत आहे. येविसी सविस्तर आम्हापासी सांगितलें आहे. पेशजी सुपेयाचे तलावरी स्वामीची भेटी जाहाली होती ते समई स्वामीनी तरवारेविसी त्यास आज्ञा केली होती. त्यावरून त्याणी तरवार बहुत सैर[1] मिळऊन ठेविली आहे. आम्हास दाखविली. आम्ही येतेसमई सेवेसी घेऊन येतो. त्याचा हेत फारसा स्वामीच्या पायापासी आहे. त्यास येक पत्र द्यावे की, तुम्हाविसी जनार्दन गणेश याणी सांगितलें त्यावरून पत्र लिा असे. तरी तुम्ही पुढे भाद्रपद मासी येणे. याप्राा पत्र द्यावयाची आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. नाग सावंत यार्चा स्त्री भागीरथीबाई यास वर्षास वस्त्रे पातळ १ सेला १ चोळखण १ फडका १ येणेप्रमाणे गुदस्ता पावली आहेत. याप्रमाणे यंदाहि आसावी. आज्ञा करणार खावंद समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa's agent at Malvan writes to Bhausaheb informing him of the intended arrival of King Sambhaji at that place .: but the Savants, he adds, are prepared to hand over the fort of Malvan to the Peshwa rather than hold it for Sambhaji. The writer advises keeping the Savants in good humour.*

No. 98] *[29-1-1748*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक जनार्दन गणेश कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ मोहरमपर्यंत मुा वाडी स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पाठविले ते छ २४ मोहरमी प्रविष्ट जाहाले. तेथे आज्ञा जे, इकडील सविस्तर वर्तमान लिहोन पाठवणे. यैशास, इकडील वर्तमान तरी, याचा मोड होऊन माघारे आलियाचे वर्तमान सेवेसी

१ चांगली, सरस.

पेशजी लिा आहे व नारो गंगाधर याजकडून आले आहेत त्याणी सेवेसी निवेदन केलेच असेल. त्या आलीकडील वर्तमान तरी आंगरे याणी कुडालच्या कोटाचा बंदोबस्त करून * * च्या कोटाची दोनी स्थले रक्षून मुल्या * * मसुरेयास जाहाली आहे. तेथे जाऊन * * करून बैसले आहेत. याणी मसुरे * * * मोर्चा येक मारिला. वीस पंचवीस * * कडील मारिले. परंतु पुन्हा: त्याणी * * ची खबरदारी करून राहिले आहेत.

काली मसुरेयाची खबरदारी बरीच आहे. आंगरे याणी फिरंगीयाजकडे राजकरण करून, उभयेता मिलोन याजवर वाडीस यावे याप्रा मनसबा केला होता. परंतु आंगरेयाचे या प्रांती स्थातव्य जाहल्यास फिरंगियास भारी मनसबा पडेल, त्याच्या उपयोगाचे नाही, यास्तव फिरंगी आंगरेयाकडे सामील होत नाही. फिरंगियाच्या चितात सावंताकडील श्नेहच करावा याप्रमाणे आहे. याचाहि पुन्हा: जमाव होऊन पुढे त्याजवर जावे या विचारात आहेत. परंतु स्वामीकडील फौजेची वाट च्यातकन्याये पाहातात. फौज येऊन आंगरेयाचा जमाव माघारे गेल्यास उतम आहे. नाही तरी मालवणदेखील त्याच्या भक्षस्थानी पडते. याप्रमाणे वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Janardan Ganesh to Bhausaheb reporting an engagement between the Savants of Wadi and the Angria.*

No. 99] [*15-2-1748*

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. छ १० सफरी कुडालाहून सडे जहालो. तमाम लोकांची दिलभरी केली, आणि निघालो. तो तीन कोसावर पेडुरावर मुक्काम केला. दुसरें दिवशीं जाऊन उधलून काढावे यैसाच निश्चय. तो राजश्री तुलाजी आंगरे-यांची पत्रे आली कीं, श्रीमंताचा आपला स्नेह असोन कलह करावा उचित नाहीं. भला माणूस पाठवून घ्यावा म्हणजे उभयपक्षीं विचार होणे तो होईल, म्हणून पत्रे आली. त्यावरून त्यास लिहिले कीं तुम्हास स्नेह रक्षणे असेल तर भरतगडचे मोर्चे उठवणे, मग भला माणूस पाठवून बोलणे ते बोलो. यैसे लिहिलेवरून त्याही कारकून व पत्रे पाठविली कीं, वेढा काढून आपल्या सेरदेत[१] जातो. कांहीं

---

१ सरहद्दींत, सीमेंत, प्रांतांत.

- 2808

बोलणें आहे तर कारकून पाठवून द्यावा. त्यावरून कारकून पाठविले. त्यासी बोलिले कीं, कांहीं दुसरा विचार नाहीं. ऐसे कितेक बोलिले. परंतु वरच्यावरच गोष्टी दिसल्या. तेव्हां आम्हीहि पेडुराहून भरतगडानजीक तीन कोसांवर मोकाम केला. तेव्हां मोर्चे उठवून नदीपलीकडे भगवंतगडास जाऊन राहिला. आम्ही येऊन किल्याजवळ राहिलो. याउपरी त्याच्या आमच्या विचार पुढें होईल तो मागाहून लेहून पाठवितो. आंगऱ्याचे सामान म्हणावे तर दहा हजार प्यादे, दीढ हजारपर्यंत राऊत, खेरीज अरमारसामान जबरदस्त. रान अडचणीचे. सांवताचे प्यादे म्हणावे तर त्याणी धास्त घेतली. वरघाटी प्यादे जवादे मेलवावे तर दिवसगत लागणार, आणि गडचे जीवन थोडके राहिले. यास्तव स्वामीचे पुण्यप्रतापे वेढा मात्र उठविला. याउपरी घोडी-पीडी गेली आहेत. त्याचाहि विचार स्वामीच्या पुण्येंकरून होऊन येईल. छ १७ सफरी किल्याचे मोर्चे उठविले. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*This is addressed to the Peshwa probably by Vithal Vishram on behalf of the Savants of Wadi reporting the negotiations started with Tulaji Angria who had attacked Bharatgad but evacuated the place on the approach of the writer with forces.*

No. 100] *[15-12-1753*

पौ छ १३ सफर
सुा सलास खमसेन

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब
साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक बापुजी कान्हो कृतानेक विज्ञापना. तागायत छ ८ सफर-परियंत साहेबांचे कृपादृष्टीकडून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. साहेबांचे आज्ञापत्र सादर जालें, तेथें आज्ञा जे, चिकणी सुपारी व जनीची पाने व मासे पाठऊन देणे; त्यास आमच्या प्रांतामधें आगरगाव नाहीं. आगरगांव होते जितके आंगरियाखाले पडिले आहेत. तेथें सता सेवकाची नाहीं; परंतु आडिवरे गांवखडीपर्यंत माणसे पाठऊन, यत्न करून साहेबांचे सेवेशी जिनस येणेप्रमाणे :

सुपारी चिकणी	पाने जनीची	मासे तोवर दागिने	तोडे वजन
८१	५०००	२	८॥॰

येणेप्रमाणे जिनस साहेबांचे सेवेसी रवाना केला आहे. वरकड वर्तमान तो आंगरियानें दंगा मांडिला आहे. रुद्राजी धुलप आठ हजार फौजेनिशी घेरा

मारावयासी येणार, त्यासी साहेबी आंगरियासी पत्रे पाठऊन परिमार्जन होय ते करावें. साहेबांचे हातीचा पोषाग उंच घ्यावा, हा हेत तो आपला पूर्ण आहे. त्यास पाठऊन पोशाख बादली देणार साहेब धनी आहेत. तळकोकणचे सरखोत जमाबंदीस येथे जाहले आहेत. इतकियामध्यें पोषाख आलियानें आमचा नाव-लौकिक बरासा होईल. साहेब तो बादली पोषाख दिवसात दाहा देत असतील. त्यास सेवकास दिलियानें तलकोकणामध्यें लौकिक उतम होईल. पोशाखाविसी साहेबी अनमान सर्वथा न करावा. चिरंजीव बाबाजी आम्हावरी रुसोन, साहेबांच्या पायांचा हेत धरून गेले कीं, मातबर धंदा करावा. येथें साहेबांचे कृपेकरून निवंता नव्हता, परंतु साहेबांच्या पायांची हेत कीं, आपला उर्जितकाळ साहेबा-पासून करून घ्यावा हा आमचाहि हेत होता. त्यास साहेबी चिरंजीवास पायांजवळ ठेविले आहेत; येणेकडून आम्हांस बहुत संतोष जाला. साहेबी मातबर धंदा सांगोन चिरंजीव परागंदा न होते, हा पूर्ण भरवसा आहे. त्यामध्यें साहेब चौ पोरगियाचे च्यार रुपये देतात, आणि चिरंजीवास दाहा रुपये प्रमाणे देतात. त्यास साहेब तो क डे सेवटीच्यास महिना दोनसें च्यारसें रुपये देतात. आम्ही साहेबांचे पुरातन चाकर, येकनिष्टपणें सेवा करीत आलो; पुढेहि उमेद धरितों कीं, साहेबाची सेवा करावी, हा पूर्ण हेत आहे. मूल तो अज्ञान आहे; तेथें मुलाचे पोटगीचा कोण्ही नाहीं. त्याच्या पोटाचे धडुताचे पाहोन कोण्ही अर्ज करी येसा नाहीं. साहेब मेहरबान होऊन देतील तेव्हां घ्यावे. महिना रुपये दाहा देतात, तेहि महिनामाहाल नाहीं. सर्वाबराबर देतात; तरी सर्वशाही-बराबर चिरंजीवास धरावा येसे नाहीं. शाहीबराबरचे आम्ही चाकर नव्हो. चिरंजीवास दोनसे तीनसे रुपये कर्ज जाहले आहेत. आम्हास रुपयांची आस्ता नाहीं. साहेबांच्या पायांची जोड आहे. पोट आणि वस्त्र इजतल्यास जाहले म्हणजे सर्व पावले. साहेबीं चिरंजीवास कर्जानिराळा होये ते करावें; आणि सेवा येकनिष्टपणीं घ्यावी. आजि तीन वर्षे येकनिष्टपणी सेवा साहेबाची केली. पेशवियांकडील मातबर धंदे सांडून स्वामीची सेवा करीत आहों. गोताचेहि दुष्ट जाहालों. तिघे भाऊ येका किलियाचे मागें लागलों. कर्जदार होऊन आंगावरी सरदारी सोसून, साहेबांचा जागा संरक्षण केला. त्याचे सार्थक यकारपूर्वक करूं लागले; म्हणतात की परभु माजले, किला खणून काढून महिपतगडावरी प्रभु नाहीसा करीन येसे म्हणतात. तरी साहेबी आम्हापासून कोणती बेमानी जाली ती पदरी घालावी. इतका मात्र अन्याये की, किल्याचे पाठी तिघे भाऊ लागोन, सर्व रोजगर टाकोन, श्रीमंत रा दादांचे नांव व साहेबांचे नाव साहेबांच्या पायांचा नेत धरून बैसलों, अंतर पडिलें. पेशवे गोपालराव किला आम्हापासी मागत

होते, तेहि गोष्टी आम्हाजवळून जाली नाहीं; याजकरितां रा तुळाजी आंगरे यांसी सांगोन, उपद्रव केला आहे. त्यामुळेहि कर्जदार जाहालों येसे असोन, यकारपूर्वक आमचे पाठीस लागले आहेत. प्रस्तुत साहेबांचे पाय जवळ केले आहेत. साहेबी किल्याची उस्तवारी करून, सेवकास कर्जानिराळे होय ते करणार स्वामी समर्थ आहेत. चिरंजीवास तीनसें रुपये कर्ज जाहले, कंठी व •जोडी घाण पडिली आहे. चिरंजीवाचा सर्व अभिमान साहेबास आहे. येक शालजोडी व बादली पोशाख साहेबी पाठऊन द्यावा. चिरंजीवाचा प्रतिपाल करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय विज्ञापना.

¶*Bapuji Kanho laments his pitiful condition and requests Jijabai to help him to extricate himself from the debts in which he is involved on account of his leaving the side of the Peshwa and joining that of Jijabai. He further requests her to send him robes of honour and thus to raise his status. He sends her certain articles as desired by her. The writer is a Prabhu Sardar.*

No. 101] [*1748*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. याचे संस्थान बरेच होते, परंतु याचे याणीच बुडविले. कोणाची गोष्ट येकंदर न आइकत. आंगरेयाची फौज तयार होऊन आली ते समई सर्वहि लोक सांगत होते की, तयार व्हावे. परंतु येकंदर घोड्यावर जीन न ठेवणे म्हणौन सांगोन आपण स्नान करीत बैसले. आस्कमात्र त्याची फौज येऊन गाठले. याणी येकहि बार न मारिता माघारेच पळोन आले, यास्तव मोड जाहाला. याउपरी पश्चातापी पडले आहेत. राजश्री तुळाजी आंगरे फिरंगी-याजकडे त्याचे बाइकोस व त्यास वस्त्रे व पुतल्या नानाप्रकारे साहित्य देऊन उभयेता मिलोन याचे संस्थान मोडावे, याप्रमाणें फिरंगीदेखील जमाव करून सिध जाहाले होते. परंतु त्याचमध्ये विचार करून * * * स्नेह कार्याचा नाही म्हणौन करार * * * * विला. राजश्री सांवत याचा * * * प्रसंग आहे. आशाम * * डिचोली पंचमाल मागावे आणि * * किला देतो त्याप्रमाणें त्याच्या चिता करावे आणि यास आपला जमाव साहित्यास द्यावा, यैसा विचार त्याच्या चितांत आहे. परंतु याणी आद्याप कबूल केले नाही. डिचोली पंचमाल द्यावे तेव्हा साराच प्रांत जातो याकरिता स्वामीकडील फौजेची वाट पाहातात. आशा समयांत जरी फौजेचे साहित्य जाहल्यास सर्व प्रकारे संस्थान स्वामीच्या पदरी पडते. स्वामीकडील फौजेचा

आनमान असिला तरी निदानी फिरंगियाचा श्नेह करावा, तो सांगेल ते न आइ-
कता गत्यंतर नाही, याप्रमाणे वर्तमान आहे. फिरंगियाकडील वर्तमान तरी त्याची
वर्षाची रवानगी पुर्तकालास[१] होत असत्ये ते दिवस हेच. रवानगीचे गडबडेत
आहेत. दिवाकडे त्याची गलबते गेली होती त्याचा व सिदियाचा श्नेह जाहाला
म्हणौन वर्तमान आले आहे. याची गलबते माघारे येणार आहेत. सेवेसी श्रुत
होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa's agent with the Savants reports a sudden attack on them by Tulaji Angria assisted by the Portuguese. The writer urges the Peshwa to send forces to prevent the partition of the Sawant's territory between Angria and the Portuguese.*

No. 102] *[1754?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. फिरंगियाजकडील वर्तमान तरी फौज या प्रांती आलियामुळे व करवीरवासी याजकडील स्थले स्वामीकडे जाहाली यास्तव त्यास भारी विचार पडला आहे. आपले जागा जमावसुधा खबरदार आहेत. जुना विजेरे पुर्तकालास जाणार होता तोहि प्रस्तुत या गडबडीमुळे राहिला. राजश्री सावंत याचा स्नेह करावा हेच त्याच्या चितात आहे. कुडाळचे मुकामी फौज राहून आंगरे याजवर जावयाचा विचार करीत होते. परंतु फौजेस खर्चास नाही हे खरेच व राजश्री सावंत याजकडील जमावाचे साहित्य घडोन न आले. माारनिलेचे जमावास खर्चास येक पैसा नाही. याप्राा यांचा विचार जाहाला आहे. वसईचे आरमार करलीच्या खाडींत पंधरा सिबाडे व दोन गुराबा येणेप्राो आले आहे. सेवेसी विदित व्हावे. स्वामीची आज्ञा घेऊन आलो तेव्हा दोन महिने-याची बेगमी होती. उपरांत येथून निरोप घेऊन यावे, त्यास हे निरोप देत नाही व खर्चासहि द्यावयाचा विचार आहे तो स्वामीस विदितच आहे. यास्तव स्वामींनी रोजमरे पाठवावयाची आज्ञा करावी व आज्ञापत्र सादर जाहालियाने येथून निरोप होईल. आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Letter to Bhausaheb, announcing the intention of the Portuguese to come to an agreement with the Savants.*

---

१ पोर्तुगाल.

No. 103] [*1748 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामींचे शेवेसी

विनंती उपरी. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहालो ते मजल दरमजल इचलकर्जीस आलो. तेथून राजश्री हरिपंत व राजश्री विसाजीपंत करविरास पाठविले. त्यास तेथील संदर्भ मनन करून परभारे आपणाकडे पत्रे त्याणी पाठविली. त्यावर कांहीं सावकाशे यावे तो सांवताकडील वरच्यावर पत्रे यावयास लागली. आंगऱ्यानें सांवताच्या मुलकांत धुंध केली, कुडालांत ठाणे घातले, लकडकोट भोवताला घालून इमारत तयार करीत चालिला, तसेच करलींची खाडी मालवण नजीक तेथेहि किल्ला बांधावयास लागला, चोबुर्जी तयार केली, खासा जाऊन भरतगडास राहोन किला सिकिंदो केला. तोफाचे माराखाली किल्ला जेर जाला. गरनालाचे गोले तशाच फटकड्याचे गोले किल्ल्यावर पडोन मनुष्यास अवसान न धरवे, त्यामध्यें पहाडी किल्ला, पाणी व दारू कम, अवसान सोडिले ऐसा विचार जाहाला. हे वर्तमान दिनप्रतीनें येत चालिले त्यावरून पाटगांवावर येऊन मुक्काम केला. दुसरे दिवशीं हणमंतघाट उतरावयाचा विचार केला तो आंगऱ्यास बातमी पोहचली. त्यावरून कुडालचे ठाणे सोडिले, करलीची चौबुर्जी टाकिली, सारा जमाव भरतगडास एक जागा करून येलगार करावयास प्रवर्तला. तदोतर आम्ही कुडालास बुनगे ठेविले, सडे होऊन किल्ल्याचा उपराला करावा यास्तव सावताचा जमाव व आम्ही निघालो. रान अडचणीचे एका पाठीमागें एक जावे लागते. त्यास राजश्री मानापाकडील लोक पुढें गेले. त्यासी व आंगऱ्याच्या लोकासी झटपट जाहाली. त्यामध्यें कांहीं लोकांची घोडी गेली. त्यावर सावर धरून मोडून माघारे घातले आणि माघारे कुडालास आलो. त्यावर फिरोन जाऊन मोर्चे उठविले, त्याचा अर्थ मुख्यपत्रीं लिहिला असे. त्याजकडील नोबतीचा उंट राहिला. हे विनंती.

¶*The writer (probably Vithal Vishram) writes to the Peshwa an account of the attack made by Angria against Savantwadi and his capture of the various strongholds. The writer reports the measures taken by him to repulse Angria's advance.*

---

१ हैराण.

No. 104] [22-1-1754 ?

हुर

श्रीमंत राजश्री नाना साहेबाचे शेवेसी

अजी कमतरीन महमद साले सतारी मुकाम जंजिरे मुंबई सलाम बाजद सलाम. महवल मारुज आंकी. येथील खैरसला तागाईत छ २७ माहे रबिलौवल पावेतों साहेबाचे नेक नजरेकडून खैर असो. दिगर वृंदावनदास यांसी रुपये १०००८ हजार देविलें. त्यांपैकी ५८७॥४० रुपये पांचशें साडेसत्याशी चाळीस रेस दिले, त्याचे कबजे महमद आली मुखरी यांजबराबर रवाना केलें, तें खिजमतेस हाजीर करतील. वरकड हजार रुपयाची भरती आज्ञेप्रमाणें करून. फिरंगियाचें वर्तमान तों आज दिवस च्यार जाले. गोव्याहोन फत्तेमारी येक आली. पत्रे होतीं तीं देऊन जाब घेऊन तेंच दिवशीं गेलीं. दुसरीं गलबतें दोन राजपुरीस आलीं. पत्रें दिलीं ऐसीजें, फिरंगियाचें अरमार स्वारी वसईस करणार. त्यास राजपूरचें बंदर करणार. पाणी लाकूड घ्यावयासी राजपूरकरांनीं लौकिकार्थ तों कबूल केलें नाहीं. यैसें वर्तमान आहे. व दुसरिया माहागेऱ्या सुमार ३ तीन येक डोली अरमारी मसुंबिकचें तारूं पोहोंचवावयासी गेल्या होत्या. त्याहि येथें मुंबईचें बंदरीं येऊन राहिल्या आहेत. गोव्याहोन आपलें गुराबीचें माणूस आलें. त्यांणीं वर्तमान सांगितलें कीं, गोव्याचें बंदरीं तारवें दोन फरसेजी १ व फिरंगी १ इकडून गेलीं. त्यास फिरंगी तारवाचे कपितानास अटकाविलें, व हलीं गोव्याचें बंदरीं तारवें तीन आहेत. दोन फरसेजीं व फिरंगीं येक. येथें मुंबईस वर्तमान तर फिरंगी लोक भरून येणार. ज्यादा काये लिहिणें ? प्यार मोहबत राखोन काराखिजमत फर्माविली पाहिजे. हें किताबत.

¶*Mohmad Sale Satari writes to the Peshwa about the disbursement of 1,000 rupees and warns him about the movements of the Portuguese on the west coast.*

No. 105] [18-3-1756

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कानो कासी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। चैत्र बहुल द्वितीया पावेतों स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. स्वामीनी सेवकास गोमांतकास रा। केलें. आज्ञेप्रमाणें गोमांतकास आलो.

अजम गोवरनदोर तिघे जाहाले आहेत. त्याची भेट घेतली. पत्रे वस्त्रे दिल्ही. मुखवचने आज्ञेप्रमाणे सांगणे ते सांगितले. त्याजवर त्याणीं उतर केले कीं, प्रस्तुत येक मास आमच्या देवकार्याचे दिवस आहेत. हे जाल्यावर सारे येकत्र होऊन जाबसाल सांगणे तो सांगो म्हणऊन गोडच भाषण करून, येक मास राहाविले. उपरांत सारे येके ठाई होऊन, उतर केले कीं, राजश्री तुळाजी आंगरे याणी आम्हास दोन लक्ष रुपये पाठविले; त्यापैकी पंचवीस हजार रुपये विजयदुर्गास जमाव पाठविला होता, त्यास वाटणी इस्मालखान यांचे गुजारतीने पावली. बाकी पावणे दोन लक्ष पोतां लागले आहेत; ते अंगरकाने आम्हास काही ठेवणूक दिल्ही नाही. पेसजी आमची तरांडी धरून नेली होती, त्याचा यैवज आम्हास दिल्हा, तो मागावासारिखा काय आहे? इतक्यात खासा आगमन पुण्यास जाले म्हणजे आम्ही आपणाकडून भला माणूस पाठवितो आणि जाबसाल करून आणऊ. चालीस हजार अंतस्थ इस्मालखान यांचे गुजारतीने पावले आहेत. त्यास इस्मालखान अरमारावरून स्वारीस कर्नाटकास गेले आहेत. आठापनरा रोजा आले म्हणजे त्याची वाजपूस मनास आणून, उतर सांगो म्हणऊन, उतर करून राहाऊन घेतले आहे; आणि स्वामीस वस्त्रे व पत्रे देऊन जासूद जोडी आम्हाबराबर होती त्याची रवानगी करून सेवेसी पाठविले आहेत. सर्व अर्थांतर जासुदाजवळ सांगितला आहे. निवेदन करितां विदित होईल. मनास आणून आज्ञा करणार स्वाम धणी आहेत. सेवकाबाा पनास रुपये खर्चास दिल्हे होते. त्याचा खर्च होऊन आणखी पनास रुपये उचापत येथे जाहाली आहे. गोवरनदोर यांजकडे जावें तेव्हा दररोज बलावास दीड दोन याप्राो रुपये द्यावे लागतात. खर्चास पाठवावयाची आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. सेवकासमागमे जासूद दोघे होते, यास च्यार रुपये पावले आहेत. सर्व अर्थांतर दर्शनांती सेवेसी निवेदन होईल. सेवेसी श्रुत हीय हे विज्ञापना.

¶*The Peshwa's agent to the Portuguese at Goa reports his arrival at that place and his conversations regarding the money paid by Tulaji Angria to the Portuguese.*

No. 106] *[23-3-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक रामाजी माहादेव मुकाम ठाणे साष्टी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ १७ जमादिलावल पावेतों स्वामीचे

कृपावलोकनेंकरून शेवकाचें व प्रांत मजकूरचें वर्तमान यथास्थित असे विज्ञापना. छ ९ जमादिलावलचें आज्ञापत्र पाठविलें तें छ १२ जमादिलाकरीं सादर होऊन बहुत हर्ष जाहाला. दक्षण प्रांती स्वारी होऊन तमाम मेवास पादाक्रांत जाले, सरकारचा अमल बैसला, प्रजेस सौख्य जाहालें, हें येश पृथ्वींत उत्तम. लौकिक जाहाला, स्वामीच्या पुण्यास पार नाहीं. हिकडील वर्तमान स्वामीचे पुण्येंकरून उत्तम आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबीं गुजरात प्रांतें स्वारी करून अमदाबाद फत्ते केली, तमाम द्वारकापर्यंत मवास पुंड पालेंगरावर सलाबत बैसली. सोरट प्रांतें गुदस्तां राजश्री सुभानजी विस्वासराव यासी रवाना केले; त्याणी गुदस्तां दोन च्यार स्थलें हस्तगत केलीं. त्याचे कुमकेस आरमारावरून हिकडून हशमी लोक व गुजराथ प्रांतांतून फौज राजश्री पांडोबाकडून रवाना व्हावी म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणें येथून लोक व मातबर सरदार राजश्री हरसावंत भोसले रवाना केले. फौज आज्ञेप्रमाणें तिकडून कुमकेस आलीच असेल. येथून लोक पोंचवावयास अरमारी गलबतें गेलीं तेहि पांच सात रोजां येतील. आलीयावरी त्या प्रांतीचें साद्यंत वर्तमान शेवेसी लिहून पाठऊन. राजश्री तुलाजी आंगरे याकडील वर्तमान, विशालगडकरी यांजवल कलह लाऊन दोन च्यार हजार माणूस किल्याचे घेरेयास नेऊन ठेविले. त्याचें व मशारनिलेचे किरकोळ गोष्टीकरितां भांडण होऊन रयेतेस उपसर्ग लाविला. श्रीमंत राजश्री प्रांतिनिधियाच्या व विशालगडच्या मुलखास राजश्री सरखेल याणी उपसर्ग करून पांच सात गांव लुटिले व गांव पाहोन दुबारा वसूल घेतला. यास्तव श्रीमंत राजश्री प्रतिनिधी फौजसुद्धां कोकणांत उतरले. अद्यापि तह जाहाला नाहीं. प्रजेस बहुत दुःख प्राप्त जाहालें * * ती ब्राम्हण रयत वर्षास दुःख आधिकोत्तरच प्राप्त होतें. स्वामी धर्मपारायण. तेहि यश स्वामीस येईल तेव्हां ब्राम्हण सुख पावतील. राजश्री मानाजी आंगरे वजारतमाब याकडील वर्तमान, आलीकडे मशारनिले पूर्ववत विचारावर आहेत. रात्रदिवस देहावरी नाहींत. मनस्वी वर्तावें, परंतु कोठें स्थळ सोडून नाहीं. थलकोट मार्गें पाडिला तो बांधावा या विच्यारावर आहेत. आधिकोत्तर गोष्ट वर्तणुकेस आलियावरी सेवेसी लिहोन पाठऊं. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Ramaji Mahadeo congratulates the Peshwa upon his victory in the South and upon Raghunathrao's success in Gujarat and gives details about the hostilities between Tulaji Angria and the Pratinidhi of Vishalgad.*

---

१ बंडखोर.

No. 107] [13-5-1750

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक जिवाजी विश्राम सा॥ नमस्कार विनंती. येथील कुशल आज वैशाख वद्य त्रितीया मु॥ गोरदवंड जाणून स्वकीय स्वानंदवैभवलेखन करावया आज्ञा केली पाहिजे. विशेष राजश्री जयापा सिंदे यांची कन्या श्रीमंत राजश्री खेमसावंत भोसले सरदेसाई यास नेमस्त केली. लग्नाकरिता येजमानसहवर्तमान श्रीगोंदेस येऊन वैशाख शुध ४ चतुर्थी शुक्रवारी लग्न संपादिले. स्वामीची भेट घ्यावी हें सरदेसाई स्वामीचे चिर्ती बहुत होते. परंतु स्वामी मसलतीवर आहेत. पावसकाल समीप आला, यास्तव समुदाईसह वर्तमान कोकणांत यावयास आले, हे वृत स्वामीस विदित व्हावें यास्तव लिहिले आहे. यानतर श्रीमंत सरदेसाई पाचजण कागलास आहेत, त्यास वीस हजार रुपये सावतास द्यावयाचा करार स्वामीनी करून दिला. प्रांतात रयतीस तोषीस बाधू नये यास्तव स्वामीनी करार केले प्रमाणे चालावे. त्यास प्रांतातून रयेतीस तोषीस करून वसूल नेला व मुलुक पाडला. याचा याददास्त स्वामी सनिध पाठविला आहे. स्वामीनी त्यांच्या रुपयेकरितां वसुलास राजश्री वासुदेव सिवाजी यास रवाना केले. [पुढील मजकुरांत (खासगी) तपशील आहे.]

¶*The marriage of Jayapa Sindia's daughter with Khem Savant is reported to the Peshwa by Jivaji Vishram.*

No. 108] [20-6-1750

श्री

श्रीमंत राजी पंतप्रधान स्वामीचे शेवेशी

विनंति सेवक रामाजी महादेव चेरणावर मस्तक ठेवून सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ २६ रजब पावेतो स्वामीचे कृपावलोकनेंकरून येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्रें दोन सादर जाहाली. तेथें आज्ञा कीं, थलचा कोट उंदेरकरानीं घेतला. या करितां राजश्री मानाजी आंगरे यानीं थलच्या गडीस मोर्चे लाविले आहेत. त्यास तुम्ही शहाणा माणोस उंदेरकराकडे पाठवणे. त्यास सांगणे कीं, तुमच्या किलेकोटाच्या बच्यावास्तव कोसीस करितो. आमचे खावंद साहित्य करीत आले. प्रस्तुतहि सर्व प्रकारे आम्ही तुम्हास अनकूल असो. तुम्ही कोणेविषीं वसवास न धरणें. आंगरियासी

तडके देणे. तह न करणे. तुम्हास सामान पाहिजे ते दिल्हे जाईल. आपला खातरजमा राखून तडके देणे. सालजाब्र करितील तो हुजूर लिहिणे. कागदापत्रांत न गुंतणे. पहिल्या पत्रीं आज्ञा. दुसरे छ २८ जमादिलाखरचे सादर जाहाले. तेथें आज्ञा कीं, सिदी महमंद खानजादे याजकडे भला माणूस पाठविणें. त्यास कितेक सांगावयाचा तुम्हास लिहिलाच आहे. परंतु उंदेरकरास पत्र पाठविले नाहीं तो हल्ली पाठविले असे. थलचे कोटाविषीं त्यास बरीसी हिंमत देऊन त्यास कोट न देत, येद्यपि चालीस पन्नास खंडी भात त्यास कर्ज म्हणोन पाहिजे तरी आम्ही देऊन तुमचा कारभार आमचे पदरचा सर्व प्रकारें तुमची आम्ही कोसीस करितो. हाहि भाव सुचऊन द्यावा. कोणेविशीं चिंता न करणे म्हणोन सांगावे. त्याचा विचार भले माणसानीं देखावा तैसे कांहीं रयातहि करणे पडिले तर आमचे धणी करितील. लोकहि देऊन अंतस्थे थोडी बहुत कुमकहि करून. परंतु सलूख अंगारकासी न करणे. येणेंप्रमाणें चार गोष्टी साधकबाधक सांगून पाठवून त्याचे बल कसे आहे, सलुख करितात किंवा करीत नाहीं, हे मनास आणावे. सारांष आंगरियासी तह न करावा येविसी सरकार तर्फेनीं त्यांची निशा करणे. तिकडील वर्तमान वरच्यावरी हुजूर लिहिणे म्हणोन आज्ञा. यैशास उंदेरकराकडील पहिली पत्रें आली त्याचा खुलासा मजकूर कीं, पांचसे माणूस चाकर ठेवून पाठवावे. मानाजी आंगरियाजवल तह करीत नाहीं. तडके देतो. तुमची कुमक असावी इतके लिहिले. ते पत्र बजिन्नस हुजूर हरी विश्वनाथ बरोबर सेवेसी पाठविलेच आहे, त्यावरून निवेदन जाहालेच असेल. प्रस्तुत स्वामीचे आज्ञेप्रमाणें दोहि पत्राचा खुलासा सांगोन शहाणा माणोस उंदेरीस पाठविला. त्या बरोबर स्वामीनीं लखोटा सिदी महमद खानजादे यासी पाठविला. तो बरोबर देऊन रवाना केले. सारासार स्वामीच्या आज्ञेप्रमाणें बोलावयाचा मजकूर सांगितला आणि रवाना केला. त्यास उंदेरकरानीं स्वामीचे पत्रावरून आमचे बोलण्याचे खुलासा सांगितल्यावरून बहुतसा आपले जागा एहसानमंद जाहाला. म्हणो लागला कीं, पंडित प्रधान यांचा व आपले वडिलाचा पूर्वापार घरोबा. सर्वप्रकारे आमचे रक्षण त्याही केले, व पुढेहि करितील. आम्हीं लिखापढा न करितां पंडित साहेबी मेहेरबानीं करून आम्हास खत पाठवून गौर बारदास्त करावयाचा मनसबा आमलांत आणिला, तरी ते मुरबीच आमचे आहेत. आम्ही सर्वप्रकारे पदरचे त्यांचे असो. आंगरियाजवल तह सहसा करणार नाहीं. निशा अलाहुताला यैसा अश्रयें समर्थ असतां त्याचा मुजाला काय आहे? तडके देतो. यैशा निखालेसपणे बोलोन आमचे ग्रहस्तासमागमे सरदार शहाणा माणूस पाठविला आहे. स्वामीचे पत्राचे

उत्तरहि पाठविले ते स्वामीकडे रवाना केले असे, त्यावरून विदित होईल. आम्हास लिहिले व जबानीं सांगोन पाठविले कीं, पांचशे माणोन(स) पंधरा वीस दिवस निवडक द्यावे. आम्ही मोर्चे मारितो. आम्ही सर्व प्रकारे तुमचे अहो. सुरतेहून मदत यावी. त्यास श्रावणी पूर्णिमा जालयाविनां येत नाहीं. मानाजीस कुलाबासमीप, मुलुक त्याचा, सामान सरंजाम पाहिजे, ते वरच्यावर पावते. आम्ही उचलोन किती पाठववें ? ते आत जावयासी प्रयास होतात. दुसरे मानाजीस कदाचित तुलाजी आंगरे मदतीस आले तरी मग पुढें भारी सांगेल. जागा घेतली काये आण टाकावी काये. तह तरी करीत नाहीं. तुम्हासारखे दोस्त आहेत तो फिकीर नाहीं. इंग्रजाचा विचार तरी सामानसुमान जे पाहिजे ते देईल. वरकड मदत करणे कललेच आहे. याप्रमाणें सिदी महंमद बोलले. व त्याणी सरदार पाठविला त्याणी हाच मजकूर सांगितला. व आम्हाकडील ग्रहस्तानीं सांगितले. त्यास स्वामीनी क्षेपनिक्षेप लिहिले कीं, लोक व सामान लागल ते देऊन. या प्रमाणें आम्ही सांगोन पाठविले. त्यावरून बोलल्या गोष्टीस लोकाविषयीं व कांहीं भाताविषयीं मशारनिल्हेनी सांगोन पाठविले त्यास लोक पाठवावयाची आज्ञा असावी. भात घेतले तरी निरख खंडून देऊन आजच्या पाडाप्रमाणें देऊं. चालीस पन्नास खंडीचा मजकूर फारसा नाहीं. आण स्वामीनी कर्ज दाखल मागितले तरी देणे म्हणोन लिहिलेच आहे. लोक पाठवणे यैसे निक्षूण लिहिले नाहीं. त्यास ल्याहावयाचा विचार मात्र लिहिला. ऐशास आम्ही त्याजकडील सरदार आला आहे त्यास म्हणतो कीं, मानाजीस धुडाऊन लावावयाचे संकट आम्हास नाही, परंतु ते आम्ही एका धण्याचे म्हणवितो. या करितां परस्फुट लोक पाठवितां न ये. नामांकित सरदार आगर मराठेच माणूस पाठविल्यानें लौकिक होईल. अंतस्थे थोडेबहुत माणूस देऊ. तो जकातदार आम्हाजवळ आहे. तो स्वामीनीं कृपा करून उत्तर सत्वर पाठवावे. लोक सत्वर पाठवावें लागतात. तुलाजी आंगरे याचे येण्याची सलाबत बहुतसी वागवितात. वरकड तह तरी करीत नाहीं. आपण खानजादा उंदेरीस येऊन थलचा कोट घेतला आणि सलुख करून घ्यावा किंवा नामर्दिनीं गमाविला तरी मग आपली शेरम काय राहिली ? यैसे पुन्हां पुन्हां स्मरतो. तूर्त उभयेतांचे बल सारखे आहे. या प्रमाणें त्याचा मुद्दा व खुलासा आहे. तूर्त मदत करावी या साठीं भला माणोस येऊन बैसला आहे. दुसरा सिदी महमंद खानजादे यांचा मुद्दा कीं, चेऊलचे कोटास मोर्चे लाविले म्हणजे मानाजीस ताण बसेल आण येथून उठेल, इतक्यात फुरसद आपणास होईल. जागा थलची मजबूद करून. हाहि अर्थ त्याचा आहे. स्वामीस कळावे. दुसरे साधकबाधक विचार स्वामीनी

लिहिला त्यास याचा विचार आमचे लोक मदतीस मागणार ते कोठे ठेवणार ? अंत:कर्णयुग्त नेऊन कोटात ठेवितील किंवा बाहेर ठेवितील. लोक बाहेर ठेविल्यानें लोकांचा बच्याव कैसा होतो ? हा विचार कसकसा करतील तेहि भाव चितात आणोन लोक पाठवणे तसतसे पाठवून द्यावें. बाधक न बनले तरी कांहीं लोक पाठवावे लागतात. याची आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. तूर्त सेदोनसे माणूस पाठवावयाचे तरतुदीत आहो. तयारी करितो. सारांष उंदेर-करांचा खुलासा कीं एक ईश्वर कीं त्या खालीं एक साहेबाची दस्तगिरी असतां नामोहरम जाहालीयाची शेरम साहेबास आहे. यैसा भाव दिसतो. स्वामीस कलावे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev to the Peshwa, communicating, in reply to the Peshwa's orders, the negotiations carried on by the writer with the Sidi commander of Underi and with Sidi Mohammad Khanjada for humbling the Angria. The letter explains the complications in the Konkan situation, which ultimately resulted in a war by the Peshwa against the Angrias.*

No. 109] [पा॑ *27-9-1754*?

छ ९ जिल्हेज जाबसूद

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री शंकराजीपंत
स्वामी गोसावी यांसी

पोष्य रामाजी माहादेव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीयें लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. काइतान सोज व उरणकर थोटा फिरंगी दोघे गोव्याहून कुलाब्यास आले. थोटा पुन्हा गोव्यास जाऊन आला. राजश्री मानाजी आंगरे व हे दोगजण येकत्र जाले आहेत. कोण्हेकें स्थळीं तोंड टाकावें असा त्याचा मनोदये आहे. प्रथम वर्तमान आलें तें आपणांस लेहून पाठविलें. सांप्रत याप्रमाणेंच दोन बातम्या आल्या. टोपकर अंगारकाचें येकमत जालें आहे. खरेंच आपणांस वर्तमान कळावें यास्तव लिहिलें असें. तरी जागा जागाचा बंदोबस्त करऊन बातमी आणवीत जावी. अरमार स्वारीस पाठवावयाची तयारी जाली असेल, परंतु आमचे विच्यारें तूर्त न पाठवावें. आम्हाकडील गलबतें अथवा आपणांकडील उरण वगैरे बंदरच्या उपरालयास ठेवावयासी पाठवावी. सारांष ते येकादें जागा तोंड टाकतात खरेंच. ऐकिल्या

वर्तमानावरून खरी बातमीसी दिसोन येते. पुन्हाहि बारकाईनें वर्तमान आणविलें आहे. येईल तें पाठऊं; परंतु आलें वर्तमान तें आपणास लिहिलें आहे. अरमाराचें रवानगीची उतावळी न करावी. इकडील गलबतें येथें पाठवावीं; आणखी बातमी माणसें पाठविलीं असेत. बातमी आलियावरी पाठऊन देऊं. बहुत काये लिहिणें ? लोभ आसों दीजे हें विनंती.

¶Ramaji Mahadeo informs Shankraji Keshao of the common cause made by the Portuguese and the Angrias and asks him to watch very carefully their movements.

No. 110] *[9-2-1748*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. या प्रांतीं फौजेनसी आलों. त्यास या प्रांतीचा विचार म्हणावा तरी सावताचें व आंगरियाचे काजियामुळें मुलुक अगदीं वैरान दाणा येकंदर नाहीं. छ २० सफरपर्यंत लोकाची बेगमी केली होती, त्यास अद्यापवरी त्याचा शह निवारिला नाहीं. तो आपले मजबुदीनेंच जवळ राहिला आहे. सावताकडून कांही रोजमरियास येईल म्हणावें तरी ते अगदी भुभुक्षित यास्तव लोकांची बेगमी वरच्यावरी केली पाहिजे. लोक म्हणावे तरी मालजी सिंदे येऊन सामील जाहाले. सिवाजी थोरात याचे पत्र आले. त्याच्या मातुश्रीस समाधान नाहीं यास्तव राहिले. चिकोडीकर याचा जमाव प्यादे दोनसे व संभर सवासें स्वार घेऊन राजश्री अंबाजीपंत आले आहेत. सेवेसीं कळावें. दुसरे लोकाचीं घोडी का(हीं) अडचणीमुळे गेली, कांहीं गोल्या लागून ठार जाली, कांहीं जखमी जालीं तसेंच लोकहि ठार पडिले व जखमी जाले. कांही त्याकडे सांपडले आहेत. त्याची तहकिकात करून मागाहून लेहून पाठवितों. राजश्री मानाजी पायगुडे याचे लोकानी बरीच केली. परंतु अडचणिमुळें उपाय नाहीं. त्यांमध्यें गनीम जबरदस्त, तथापि स्वामीचे पुण्येंकरून येश आलें, हे विनंती.

¶Letter addressed to the Peshwa describing the miserable condition of the country owing to the warfare between the Angria and the Savants, for whose help the Peshwa had deputed Manaji Paygude.

No. 111] [13-12-1755

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
साहेबांचे शेवेसी

विनंती आज्ञाधारक खंडेराव बरगे कृतानेक दंडवत विज्ञापना. छ ९ रबिलावल पावतों येथील वर्तमान आपले कृपाकटाक्षेंकरून मुकाम खारेपाटण येथास्थित असें विशेष. येथील वर्तमान राजश्री रुद्राजी धोलप जमावसुद्धां आले. आरमारे, दारूगोळा, बाण सरंजामसुद्धां आले. मोर्चे उठवावें, लस्कर धुंडाऊन द्यावें. हशम तों त्याच्या इभ्रतीने निघतें, परंतु धन्याचे पुण्यप्रतापेंकरून राजश्री रुद्राजी धोलप हस्तगत होऊन राजश्री तुळाजी आंगरे यांजवर इभ्रत बसली; परंतु याचें सार्थक तेव्हांच कीं फौज भारी आल्यानें खावंदाची कार्यसिद्ध होईल. येथें राजश्री जावजी बावा गौळी माकुल धन्याच्या कार्यास येकनिष्ठ परंतु यांचा उपाये काये? यानें कायें करावें? रात्रंदिवस धन्याच्या कार्यास मेहनतीस चुकत नाहींत; परंतु जमावाखेरीज काये करावे? लहानथोर येकाचे बुद्धीनें चालल्यास साहेबकाम होऊन येईल. खारेपाटणचा मजकूर फारसा नाहीं. रात्रीं लस्कर जतन करावें, दिवसां बातमी राखावी असें आहें. फौजेचा शह मातबर पाहिजे. करणार धन्याचें पुण्य समर्थ, परंतु तरतुदेस राजश्री जावजीबावाखेरीज इतरास होणें नाहीं. येथें महर्गता धान्याची फार आहे. लोकांस पोटास पुरत नाहीं, अर्जबाबेची आज्ञा करणार स्वामी धनी जाहेत. येथील सविस्तर वर्तमान राजश्री जावजीबावांनी लिहिलें आहे, त्यावरून सेवेसी विदित होईल. गनीमाचा धर सुटला आहे. गोवेकर सामल जाला; त्याचें पारपत्य करावें. फौज सत्वर रवाना करावी. सर्वांनीं राजश्री जावजीबावाचे बुद्धीनें चालल्यानें साहेबकाम निसंशयें होईल, यांत अंतर नाहीं. घोडी बसावयास नाहीं, पूर्वी विनंती केली होती. आज्ञा करणार खावंद आहेत. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Khanderao Barge to the Peshwa, reporting from Kharepatan the defeat and capture of Rudraji Dhulap, a prominent Sardar of Angria.*

No. 112] [1755

श्री

विनंती विशेष. फिरंगी व तुळाजी आंगरे येकत्र होऊन येणार म्हणून मुंबईहून लिहिले आहे. त्यावरून आपणास लिहिले आहे; व पारनेरा द्यावा, याजकरितां

रामचंद्र माहादेव व सिवराम भास्कर पारडीस आले. त्यास सिवराम भास्कर हे सोनगडी केदारजीकडे गेले आहेत, त्याचे पत्र अद्याप आले नाहीं. सारांश मोगलाचा सलुख जाल्याविना पारनेरा देत नाहीं हेच खरें. सिवरामपंत आल्यावर काये ते कलेल; त्याप्रो॥ आपणास लिहून. लोहगडाखाली लोंक जाजती असिले तरी पाठवावे. कसरा मागाहून प्रेत्न करून मिलेल ते पाठऊन देऊन. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ असो दीजे. त्रिंबकास लोक व सामान बरेचसे पाठविले. तांदूळ मीठ देखील पाठविले. काथा वलीव व बूच सूत आद्यकरून जिनस पाठवतील. रात्रंदिवस करून त्रिंबकचा सरंजाम पाठविला; व बंदरकिनाराचे जागियाची मजबुदी करीत असों. फिरंगी आलाच तरी आमची कुमक करावी, येथील लोक हजार बारासे त्रिंबक वगैरे जागा पा॥ आहेत, यास्तव विसापुरी व लोहगडी फार लोक असिले तरी येथे पाठविले पाहिजेत. गोव्यास महमद साले याची गुराब धरून नेली. त्याजवरील माणसे गोव्याहून नवारोजात आली. त्याणीहि फिरंगियाचे वर्तमान सागितलें कीं, फिरंगी तयारी करी(त) आहे; व मुंबईहूनहि फिरंगियाचे वर्तमानाचे पत्र आले ते लिहिलें आहे, हे विनंती.

¶*The writer communicates the news that Tulaji Angria had received help from the Portuguese. He further refers to Parner which will not be handed over unless peace is negotiated with the Moghals.*

No. 113] [*1748*

श्री

यादी महादाजी यास पत्र येणेप्रा॥

गु॥ सावताचा व फिरंगियाचा तह जाहला तो तुमचेच विद्यमाने जाहला. कराराप्रमाणें उभयपक्षी वर्तावे त्यास फिरंगियाणी सावताकडील मुदे बोली केल्याप्रमाणें अद्यापवर निभाऊन दिल्हे नाहींत व सांप्रत सावताकडील तालुक्यास त्याजकडील दांडगे वगैरे जाऊन उपसर्ग देतात म्हणोन हुजूर विदित जाले, तर हे गोष्ट त्यास उचित नव्हे. फिरंगियाजकडून करारास तफावत आली; तेव्हा सावत उगेच राहतात ऐसे नाहीं. सावत सर्व प्रकारे पदरीचे, त्याचे साहित्य हुजुरून करणे अवश्यक. परंतु पेशजी फिरंगियांनीं आपले तर्फेने वकिलास हुजुर तुम्हा समागमे पाठऊन कितेक मनसब्याचा अर्थ बोलोन सरकारचे मातबर कामकाजाचा अंगेज[1] करून निरोप घेऊन गेले, ते समई सावतास

---

१ अंगेजणी करून, जबाबदारी घेऊन.

हुजूरची पत्रें गेलीं, तन्मुळें आजिपर्यंत त्याणी फिरंग्याच्या तालुक्यास आवडाव न केली. असें असतां सांप्रत सावताचे मुलकास याप्रकारे त्यानी उपसर्ग दिल्हा; त्याचा प्रत्येय दाखवावा तर हुजुरचा नुक्ष आपणावर न यावा याविचारें तहमूल[१] करून सावताची पत्रे हुजूर आली, याकरितां हली हुजुरून बहिरो बाबाजी यास रवाना केले आहेत; तर तुम्ही त्यास माकूल[२] करून सांगोन उभयपक्षी तह जाहला असेल त्यांत तफावत न येतां सावताकडील मुदे करारास राहिले असतील त्याची निभावणी फिरंगियाजकडून करून देवणे व फिरंगियाचे मुदे करारासंमधे राहिले असतील, तेविसी सावतास सांगोन त्याजकडून निभाव होय ते करून सावताचे तालुक्यास उपसर्ग न देत ते करणे.

¶*Letter from the Peshwa to Mahadaji (?) asking him to settle the dispute between the Portuguese and the Savants of Wadi against whom the former have started aggressive measures in violation of the treaty already enacted between the two, through the mediation of the addressee.*

No. 114] [*1750?*

श्री

सेवेसी विज्ञापना. वाडीकर सावंतांस व त्यांचे मुतसदियांत व सरदारांत अंतर्यामी बहुत फांट आला आहे. सारे यकसरोन सर्व दौलत यखाद्याचे घरीं घालावी या यत्नास लागले आहेत. स्वामींचा पेगाम इकडे जडला असें जाणोन सेवकाकडे यऊन संदर्भ लागला. शोध पाहातां प्रसंग खराखुरा आहे. रेडी दिल्हिया बदलामींनी बदलाम होऊन दहशत खादली आहे आणि धणी शोधतात. इकडील अवस्था पत्रीं काय ल्याहावी? जरी यखादे स्थलीं या प्रांते स्वामींचा आंखर[३] पडेल, तरी बहुत कार्याची गोष्ट आहे! सेवक लोकीं आज्ञेप्रमाणें वर्तणुक करावी हा सेवाधर्म समग्र अर्थ चितारूढ करून कार्योपयोगी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवशी श्रुत होये हे विज्ञापना. कतब्याचे मजकुरास पावले रुपयाची निशा करून कतबा सोडून आणावयाची गोष्टी राहिली. खर्चवेचास यक तकसीम वजा करून दोन तकसीमा बेरजेपैकीं आम्हास द्या म्हणतात. निश्चंक करार काय बोलतात तें मागाहून लिहून पाठवितों. सेवके तों रुपयांची निशा करून आपला कतबा घ्यावा यच गोष्टीचें लावलें आहे. वेदमुर्ती दादंभटजीस पत्र अगत्यरूप येई ते आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The letter reports the intrigues to dethrone the chief of Savantwadi and the loss of the fort of Redi or Yashavantgad.*

---

१ कानाडोळा, गई. २ कान उघाडणी, सावध. ३ दबाव, शह.

No. 115]. [9-3-1748

श्रीव्यंकटेश

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी-
आलंकृत राजमान्य राजश्री
नाना स्वामी गोशावी यांस

पोष्य नारायेण व्यंकटराव साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून छ २० रबिलोवलपावेतों वर्तमान येथास्थित असे. यानंतर या प्रांतींचें वर्तमान पेशजी लेहून पाठविलें आहे त्यावरून श्रवण जाहलेंच असेल. प्रस्तुत छ २८ सफरचें पत्र राजश्री हरिराम यास पाठविलें तें पावोन लेखनार्थ कलला. सावताचे साहित्यास फौज रवाना केली तदनरूप उपराला होऊन राजश्री तुलाजी आंगरे उठोन गेलेच असतील. त्यावर त्याच्या मुलुकांत न जावें, वरतें यावें. करवीरवासी यांकडील अनुसंधान राजश्री विसाजी नारायण याणी राखोन असावें. स्थलें हवालीं केलीं आहेत त्याचे बंदोबस्तास अगत्याअगत्य लोक ठेवणें ते ठेवावें. तसेच सें दोनसें राऊतहि ठेऊन बंदोबस्ती करावी. कर्नाटकांत या प्रांतांतून जाणें होत नाहीं, बालेघाटावरून येणें होईल, मर्दनगडाचे राजकारणांत आठ च्यार दिवस आधिक उणे लागले तरी लाऊन उलगडा करून. राजश्री मानाजी पायगुडे व तुम्ही येऊन सामील होणें म्हणऊन कितेक विस्तारें लिहिलें. अशास सावताचे साहित्याचें वर्तमान व आंगरिया उठोन गेलियाचें वृत्त पूर्वपत्रीं लेहून पाठविलें आहे. त्यास त्याचे प्रांतांत न सिरावें हाच विचार, परंतु त्याणी बोलीचालीस लाविलें आणि उठोन गेला, तेव्हां त्या प्रांतांत जावयाचा निश्चय करून वरघांटीं आलों तों स्वामीचें पत्रहि पावलें. त्यावर करवीरवासी यांकडील संदर्भाचा प्रसंग व किले हस्तगत जालेयाचा अर्थ राजश्री विसाजी नारायण आपणांकडे आले आहेत ते स्वामीस भेटोन जाहालें वर्तमान निवेदितील, तदनरूप स्थलाची बंदोबस्ती अगर फौज बालेघांट प्रांतीं यावयाचा विचार करणें तो केला जाईल. तोंपर्यंत आम्हीं बेलगांव कितूर प्रांतीं आहो. विसाजीपंत स्वामीसी बोलोन आलियावरी आम्हांपासी येऊन पोहोंचतील त्यासारिखा विचार होऊन येईल. मर्दनगडचा मजकूर राजश्री जिवाजी विश्राम बोलत होते त्या विचारांत ते आहेत. सध्या प्रसंगीं निदर्शनास येता दिसत नाहीं. आजिरे तर्फेचे खेडे माहागांव राजश्री प्रतिनिधीकडे होतें, त्यास तेथील कमाविसदारानें बहुतच उपद्रव केला. येक दोन वेला सांगोनहि पाहिलें, परंतु लबाडीकरितां राहिला नाहीं.

देखोन वरघांटी आलेवर घांटे चढीनें गाव घेतला. स्वामीस श्रुत असावें. बहुत काय लिहिणें? लोभ असों दीजे हे विनंति.

¶Narayan Vyankatrao to Peshwa, informing him of the activities of Tulaji Angria and the measures taken by the writer against him.

No. 116] *[14-1-1756*

छ १६ रबिलाखर सायंकाली

श्री

राजश्री खंडोजी माणकर सुभेदार गोसावी यांस

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित रामाजी माहादेव मुक्काम जंजिरे सुवर्णदुर्ग आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. आपणास उरणेचे मुकामीहून दोन पत्रे पाठविली व येथें आल्यावरी एक पत्र पाठविले. पत्रे जाऊन बहुत दिवस जाले, उत्तर न आले. प्रतीक्षा करीत असो. इंग्रेज बोलीप्रमाणें आला. तीन फारगते आली. राहिली ती आजउद्यां येतील. बाणकोट त्याचे हवाला केला. अत:पर कोण्हे गोष्टीचा गुंता नाहीं. आपण वाडेपेडलावरी जाऊन वोढा पाडल्याचे वर्तमान आले होते. आलीकडे कळत नाहीं. इंग्रेज आलियाउपर मुख्य स्थलास गाठावे हाच संकेत. अंजनवेलीस मोर्चेबंदी केली आहे, त्याचा वोढा इकडे आहे, तो एकाकीं जाऊन गला पडावे. अरमाराकडून लगट मेव्याचा एकच असावा येविसी साद्यंत स्वताक्षरे पुरवणीपत्रें लिहिले आहे तो अर्थ चित्तात आणून त्वरा करावी. अत:पर दिवसगतीवर नेता न ये. आपले पत्राची प्रतीक्षा करीत असो. जाऊन वोढा पाडावा. वाडेपेडलास गेल्यानीं शह पडेल. आम्ही अरमारांतून येताच केल्या नेमास तुम्हास पुढील मकाण समीप पडेल. अरमारास प्रस्तुत वारासा आहे. आपण ठराव केला असेल तो लिहून पाठवावा. आपले पत्र येतांच येतो. परंतु वाड्यास जाऊन पायेबंद द्यावा म्हणजे शह मातबर पडेल. पुरवणीपत्री याचा खुलासा लिहिला आहे. चितात आणावा. उत्तर रात्रीचा दिवस करून येई यैसे करावे, रवाना छ ११ रबिलाखर. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶Ramaji Mahadev to Khandoji Mankar, asking him to be ready to take part in an attack on the Angria and informing him that English help has arrived.

No. 117] [15-1-1756

पौ छ १६ रबिलाखर सायंकाली

श्री

पुरवणी राजश्री खंडोजी माणकर सुभेदार
गोसावी यांसी

आशीर्वाद विनंती उपरी. आपण मुंबईचे वर्तमान उरुणचे मोकामीहून सविस्तर लिहिले, त्यासी फिरोन जाबसाल न आला. हल्ली जंजिरा दाखल जाहाल्यानंतरहि पत्र पाठविले त्याचाहि जाबसाल आला नाहीं. त्यासी आपण कोणे ठिकाणीं आहेत, काये मनसबा योजिला आहे, त्याप्रमाणें ल्याहावा म्हणोन वारंवार पत्र पाठवितो; परंतु निखालस आम्ही आमके ठिकानी आहो, तुम्ही येमक्या जागा यावे हे कांहीं लिहिले नाहीं. तथापि एक जागा दुतर्फ * एक दिवस गाठी पडिली पाहिजे. त्यासी आपली व राजश्री कृष्णाजीपंत व राजश्री मोरारराव विश्वासराव याची राजकारणे आहेत. यासी इतक्याचे विचार ज्या स्थली प्रथमता यावयाचे आसले तैसे ल्याहावे. त्या ठिकानीं आरमार इग्रज सुद्धा येऊन पोचो, आगर हुजुरून लिहिले आसेल कीं रामाजीपंत बोलावितील तेथें जावे, याजवरी बसोन राहिला आसाल तरी याउपरी मनसब्यास विलंब नाहीं. मुख्य स्थलास पायेबंद द्यावा म्हणजे सहजात नाडी आवलतील. तरी तुम्ही नांदवब्यास पुढें कोटानजीक जावे. इतक्यात आम्ही नस्तावरी यावे. गोला वाजतां कोटात सिरावे. त्यासी अरमारचा मार होऊं लागल्यासी त्या लोकांच्यानें धर धरवत नाहीं. त्यामध्यां हरयेक ठिकाणीं पायेउतारा होऊन खुसकीस उतरोन दुतरफा कोट उधाळून काढून प्रस्तुत अंजनवेलीच्या मोर्चेबंदीमुले बहुतयेक निवड नामजोदीस[१] आहे. हा एकाएकी नेहट देऊ घेत नाहीं. निमित्य माणूस तिकडे जाईल, हा अर्थ. दुसरा कोव्याखेरीज काईल होणार नाहीं. फिरंग्याचा भरंवसा तुटला आहे. याचे अवसान जाईल. चिंता नाहीं. लिहिलेप्रमाणें आपण तरतूद करून ल्याहावे. रवाना छ १२ रबिलाखर हे आशीर्वाद.

¶*Ramaji Mahadev gives instructions to Khandoji Mankar about the attack on Anjanvel.*

१ कामगिरीस.

No. 118]   [*15-1-1756*

पैवस्ता छ १६ राखर साईकाली

श्री

पुरवणी राजश्री खंडोजी माणकर सुभेदार
गोसावी यासी

आशीर्वाद विनंती उपरी. सारा मनसबा जवळ आंगासी आंग लागल्यासी तेथील मनसबा पाह्या सुचतो. तरी मसलतीची आंगेजणी आपणावरी आहे. तरी याउपरी दुसरीयावरी निमित्यास जागा नाहीं. साहेबकाम होऊन नक्ष राहिला पाहिजे. त्यासी दिवसेदिवस आखेरी येत आहे. माणूस फौज मुबलगा, खर्च भारी, इतका मनसबा खावंदास मुल्या पाडिला. निमित्य कीं केले क्रम (कर्म) सेवटास न्यावे. यास्तव मातबर सरदार उभारणी करून खाली रवाना केले. त्यासारिखे मातबर काम जाहल्यास उत्तम असे. इंग्रजाचाहि लढा होता. तोहि जागा त्याचे हवोला करून तयार होऊन राहिला आहे. आतां आंजिवेलीस मोर्चेबंदी आहे. ही घेऊन मग पुढी यावे तरी तुमच्या लिा मुल्य स्थली यावे म्हणजे सारेच काम ठिकाणी लागेल. यास्तव तीच उभारणी करून इंग्रजदेखील तयार करून आपला मार्ग लक्षत असो. ज्या घटकेस आपले पत्र येईल ते दिवशी निघून यावे, यास्तव हुजूर गंगाजी गाजऱ्या, संभाजी खोकरे यासी पाठविले आहेत. तरी आपण कूच करून लोकसुधा साथे राहोन मोकाम करावा. आणि हुजरे याजबराबर पत्र पाठवावे. त्या स्थली येऊन एका दिवशी पावतो. आम्हास वारा साय आहे. आम्ही या मनसब्याबदल अंजिवेलीस अद्यापि जाऊन गुंतलो नाहीं. तुमच्या पत्राची मार्गप्रतीक्षां करीत असो. या उपरी काडीमात्र मनांत दुसरा विचार न आणितां मसलतीचा मनसबा लेहून पाठवणें. त्याप्रमाणें तरतूद होईल. रवाना छ १२ रबिलाखर बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Ramaji Mahadev asks Khandoji Mankar to come and join the writer in attacking the fort of Anjanvel.*

No. 119]   [*15-1-1756*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
कृष्णाजीपंत स्वामी गोसांवी यासी

पोष्य रामाजी माहादेव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीयें लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपणांस दोन तीन पत्रें

पाठविलीं. त्याचें प्रत्योंतर व राजश्री खंडोजी माणकर यांस लिहिलें त्याचेंहि उत्तर न आलें. सुवर्णदुर्गी येऊन तुमचें पत्राची प्रतीक्षा करीत असों. अंजनवेलीस मोर्चेबंदीमुळें वोढा पाडिला आहे तो येकाकी जाऊन मुख्य स्थलास गांठावें, खुषकीकडून तुम्ही सर्वांनीं यावें, त्यास तुमचा सर्वांचा मुकाम वाडे-पेडलास असावा. तेथून मेढ्यांत आम्हाकडील अरमाराच्या तोफा होतांच जावें, दोंहीकडील नेम येक असावा, त्याच नेमास जाऊन पोहचावें. अतःपर दिवसगतीवर नेऊं नये. इतके दिवस इंग्रेजामुळें लागलें. आतां सर्व सिद्धता होऊन तुमचे पत्राची प्रतीक्षा करीत असों. अंजनवेलीस मोर्चेबंदी आहे. त्याचा वोढा फार करून इकडे आहे. अशांत जाऊन गांठावें म्हणजे आंगरे यास ताण बसोन घाबरा होईल. श्रीकृपेनें मुख्यस्थल आल्यानीं वरकड स्थलें सहजांत येतील. राजश्री खंडोजी माणकर यांस सांकल्य स्वताक्षर लिहिलें आहे. सारांश तुमचे त्यांचे निश्चयेरूप पत्र येईल. तुमचा त्यांचा मुकाम कोठे आहे? काये मनसबा? किंबहुना तुम्हास धण्याची आज्ञा आम्हाकडे यावयाची आहे, नाहीं, कर्तव्यविचार काय? योजना कशी केली? असा वाब्यास जाऊन पायेबंद दिल्हा आहे की काय? आमचे येण्याची त्वरा आहे. तुमचें व माणकर यांचें पत्र येतांक्षणी स्वार होऊन येऊं. सारांश तुम्ही बहुत मेहनत केली त्याचे सार्थक होऊन साहेबकाम हवे हेंच याने मानसी विचार करून इंग्रज सामानसुद्धां तयार करून दोन तीन वेळां लिहिलें. त्यासी फुकाचा कागदीं जये तेव्हां मन-सब्यास कोणास आगत्य? आतां राजश्री रुद्राजी धुलप सांपडला हें महदकार्य जाहलें. या अवसानावरी मुख्य स्थलास यावें तोच ठराव आम्ही केला. त्यासी येक टीप करून कितेक कबिले वगैरे प्रथमतां बंदोबस्त जाहला पाहिजे. यात अगोधर समुचाये होऊन काम करावें, म्हणोन हुजूर (हुजरे?) पाठविलें असेत. सांगता कळों येईल. रवाना छ १२ रबिलाखर. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Ramaji Mahadev to Krishnajipant, reprimanding Khandoji Mankar for neglecting to reply or to act up to the instructions already sent for conducting the war against the Angria.*

No. 120] [*17-1-1756*

श्री

राजश्री ज्ञावजी गवली गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो माहिपतराव कवडे रामराम विनंती उपरी येथील क्षेम जाणून स्वकीय कुशललेखन कीजे विशेष. गोसावियासी

येक दोन पत्रे लिहिली व नाईकाजी हुजरे यासह वर्तमान निवेदन केले. परंतु अपल्यास उतर देखील ल्याहवयास फावले नाहीं. खंडोजी मानकर आम्हास बोलाबितात की येणे तुल्यकार्य सिधीस न्यावे लागते, याजप्रा गुदस्ता सर्वास येकच फल यानी दिल्हे. त्याजप्राच येक खारेपाटण गुा घेऊन टाकिले त्याजप्राच अजी पंधरा दिवस तुम्हासहवर्तमान गुंतोन तेथेच राहिला. राजापुरावर सातसे माणूस अले. तुमचे चालीस पनास स्वार होते, काम न होये, रातचे धाके याजकरिता रा मोरो रुद्र व विस्वासराव यानी तीन पत्रे पा. धणियाची चाकरी फौजेच्या शहाने ते स्थल सुटले. त्यास तुमच्या लिहिण्यावरून दोन दिवस मुकाम सवदालेवर केला. आम्ही गेरवाकीफ. येक माणूस मानकराचे पत्र घेऊन आले, त्यास लौकर येणे, मुख्य स्थलचे काम करावे लागते, त्यास मुख्य स्थल तुमच्या ध्यानात येणार की काये? येवढे कललेच असेल. रा रामाजी माहादेव यानी लिा की रातचा दिवस करून येणे, त्यास जात होतो तो राजपुरची निकड येकोण आलो. दोन मुकाम जाले, आपले पत्र न आले. बरे जे तुमच्या मनसबियास येईल ते करावे. आम्ही खावंदाच्या आज्ञेप्रा व रामाजीपंताच्या पत्राप्रमाणे जात असो. तुम्हासहि त्यानी लिहिले आहे. तुमचा काये मनसबा तो ल्याहावयास फावलियात ल्याहावा. आम्ही लांझियावर+ मार्ग पाहतो. बहुत काये लिहिणे रा छ १४ रबिलाकर हे विनंती.

¶*Mahipatrao Kavde to Javji Gaoli, remonstrating with him on his dilatoriness and informing him of the writer's proceeding to Lanze.*

No. 121] *[20-1-1756*

श्री

राजश्री जावजी गौली गोसावी यांस

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित रामाजी माहादेव अशीर्वाद विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित गेले पाहिजे विशेष. पत्र पाठविले ते पावोन सविस्तर कलले. आम्ही लौकर यावे; अंगरकाचा धर सुटला आहे म्हणून लिहिले. यैशास दोन महिने उरणास जाऊन बैसलो. इंग्रेजास घेऊन यावे आणि मुख्य स्थली जावे हा विचार होता. त्यास आम्हास उशीर लागला याजमुलें आम्हाकडील सरदार राजश्री मोरोजी सिंदे व राणोजी बलकवडे व नारो त्रिंबक याणी अंजनवेलीस मोर्चे दिल्हे. इतक्यांत राजश्री

+ लांझे, ता राजापूर, जि. रत्नागिरी.

महिपतराव कवडे व हरी दामोदर आले. याणी त्याणी चौबुर्जी घेतली. अंजनवेलीचा किल्ला जेर केला. पुढें हला करून घ्यावी या विचारे आम्ही येथें आलो. मोत्याजीराव विचारे अंगारकाकडील सरदार यानीं जुंझाची शर्त केली. निरोप जाहाला तेव्हा कौल घेतला. छ १४ रबिलाखरी निशाण घेऊन किल्ला हस्तगत केला. आण गोवलकोठास लोक सरदार पाठविले. आम्ही लौकर येतो. रवाना छ १७ रबिलाखर, बहुत काय लिहिणे हे विनंती. गोवलकोट फत्ते जालियाची पत्रे आताच आली. जयविजयगडास शह द्यावयास लोक पाठविले. कलले पाहिजे हे विनंती.

¶*Ramaji Mahadev reports the capture of Anjanvel to Javji Gaoli.*

No. 122] *[16-2-1756*

श्री

सेवेसी विठल विश्राम विज्ञापना. ताा छ १४ जमादिलावल मुाा हेपसूर केरूर स्वामीचे कृपेकडून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. स्वामीनी आज्ञापत्रे छ १२ जमादिलावलचीं पाठविलीं तीं रात्री केरूर हेपसुरचे मुकामी छ १३ जमादिलावलीं संध्याकालीं पावलीं. आम्ही व राा शामराव भिवराव तोफखानेसुधा बाा मुकामीं आलो. आज सोमवारीं कांही तोफांचें कामकाज करावयाचे होतें, याकरिता मुाा केला. धारवाडची रस्त आली नाहीं. उद्या येथून कूच करून हुबलीच्या रोखे येत आहो. तोफखाना फार चालत नाहीं. तीन कोस चालतां संकट. सरंजाम ठीक नाहीं. हाली कांही बैल खेडियातुनी आणून भरीस घालीत आहो. परवां बुधवारी होबलीस येऊ इतकेत धारवाडचा कापलाहि आज उद्या येऊन मिलेल. संरलस्केर परभारे गेले. आम्ही राऊत पिटिले. परत गांठ पडली नाहीं. ते धारवाडावरून गेले. आम्हीं होबलीस आलो म्हणजे विचारे काम विल्हे लागेल ते करून सेवेसी हाजीर होतो. बलेकीं[1] वाटेचे दुर्घट आसलेया तैसेच पुंढा फौजा कुंदगोलावर आहेत त्यांस लिहून पाठऊं; आंण हजार पांचसे उपरालेस पाहिजे जाहालेया आणऊ. तुलाजी आंगरे याजकडील वृत वाडीहून तीर्थस्वरूपांही लिहून पाठविले आहे जे तुलाजी आंगरे याची ठाणीं गड किले कुली घेतले; मात्र मातबर पैकीं दोन स्थले विजयेदुर्ग व रत्नागिरी राहिली. लहानसान दोन तीन येणेप्रमाणे आहेत. वरकड सर्व घेतलीं. सावतांकडीलहि फौज कुली गेली आहे. रामगड घेऊन सिदगडास वेढा दिला

---

१ किंबहुना.

होता. त्यांचीहि बोली लागली होती. इतकी दिवसांत घेतला असेल. सेवेसी श्रुत होये. इंग्रज कुली आरमाराने विजयदुर्गास आला. वसईचेहि आरमार आले म्हणून फार आले आहे हे विज्ञापना. द्राक्ष काही पाठविले आहेत हे विज्ञापना.

¶*Vithal Vishram describes the difficulties of transport in his march to Hubli. He also writes of the capture of the forts of Tulaji Angria except Ratnagiri and Vijaydurg, and of the despatch of the English fleet against Vijaydurg.*

No. 123] [*27-2-1755*

श्री

श्रीमन्माहाराज मातुश्री आई साहेब साहेबाचे सेवसी

अपत्ये कृष्णराऊ भगवंत कृतानेक विज्ञापना. ता। छ १९ जमादिलवलपर्यंत साहेबांचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. सेवकाकडील पेशजी जाहले वृत्त सविस्तर तपसिले लिहिले आहे त्यावरून विदित जालेच असेल. अलीकडील वृत्त तरी, धणियासी इरे प्राप्त होऊन, भारी जमावाचा जथ पाडून, मौजे सावर्डे नजीक ठाणे सालवण येथें खासा माहाराजांही मुकाम केला आहे. भांडी व पाटकर्डी समागमे आणिली. मोर्चेबंदीचे सामान मुस्तेद करवीत आहेत. येकवेळ येलगार करावा, या अर्थें सामानाची व जमावाची भरपुरी करीत आहेत. सौभाग्यवती मातुश्री बाईसाहेब करवीरी सिंदे नरगुंदे याच्या जमावाची वाट पाहत आहेत. राजश्री येमाजीपंत चिकोडकर याजकडे कारकून पाठऊन त्यास जमावसुधां आणविलें. भेटी उदईक शुक्रवारीं होणार आहेत. वरकड किल्याचा व खेड्याचा तमाम जमाव आणऊन भारी जथ पाडिला आहे. येसमई सर्वस्व भरीस घालावें; परंतु आमचे पारपत्य करावे हा निश्चय धणियाणी करून, माहाराजांस व सरदारास इरे घातली आहे. मागाहून येक दो रोजांत आपण खासा चिकोडकरास व वरकड जमाव घेऊन सावर्डेस येणार; उपरांत सक्तीने बलेजोरीनें येऊन ठाणेस मोर्चे देणार. हटतटास पडली आहेत. मनसब्याचा जथ तो भारीच आहे. यात साहेबाचे आाशीर्वादें परिणाम लागेल तो पाहावा. आम्हास साहेबाविना दुसरा आधार काडीमात्र नाहीं. पाठबळ कोणीच नाहींसे जाले. चौकडे धणियाणी प्याद करून आम्हास निराळे काढिले आहे. समय तो कठीण प्राप्त जाला आहे. येसियासी येसमई साहेबी मनावर घेऊन, खर्चाचे व जमावाचे साहित्य करून, फौजेस नामोहरम केले तरीच,

साहेबाचा जागा जतन होऊन, सेवकास येश येते; नाहीतर आमचा तो यत्न नाहीं. जोपर्यंत आम्हांस अवसान धरवेल तोपर्यंत ठेचगा देतच आहो. यांत यश देणार वडिलांचे पुण्य समर्थ आहे. साहेबाविना दुसरेकडे कोणेविसी लिहावयास जागा नाहीं. आजी दोन वर्षे स्वार होऊन, जागा जतन करून, धणियांचे येश रक्षिले होते, त्याचे निदर्शन आज आले आहे; तरी जेणेकरून आजिपावतों लौकीक रक्षिला, तेच रीतीने पुढें संस्थान रक्षून साहेबास यश येऊन लौकीक उतम होय तो विचार करावा. सर्वाविसी धाव करणार साहेब समर्थ आहेत. साहित्याचा व बेगमीचा मार्ग लक्षीत आहे. सविस्तर वडिलांचे पत्रीं लिहिले आहे. निवेदन करितां विदित होईल, हे विज्ञापना.

¶*Krishnarao Bhagvant informs Tarabai that the King threatens him with condign punishment and implores her protection.*

No. 124] [*July 1755*

श्रीरामचंद्र

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत
राजमान्य राजश्री सदासिव पंडित
स्वामी गोसांवी यांसी

पोष्य कृष्णराऊ भगवंते[1] कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. अंगारकाच्या मसलतेस राजश्री समशेरबहादर व राजश्री दिनकरपंत आपण रवाना केले. आम्हांस साहित्याविसी येक दोन पत्रें आली, त्यावरून जमावनसी सामील होऊन, उभयतांच्या मसलते-प्रमाणें अंगेज मनसबा करणें तो केला. उभयतांहि पाहिलाच आहे. अखेरी आली याकरितां उभयता फौजेनसी आपल्या दर्शनास गेले. मागील मनसबा बाकीस राहिला, त्याचा परिणाम आपण मातबर मनसबा करून पारपत्याचा विचार होईल; परंतु सध्या त्यासी आम्हांसी नित्य घसघस वाढली. करवीरवासी धणी-यांचा त्यांचा येक हात होऊन, सध्या आमच्या सरंजामास व ठाण्यास उपद्रव योजिला आहे. खाली फौज उतरली ते समर्थी आम्हाकडील जमाव करविला, तो सध्या आंगरे यांच्या शहाकरितां छावणीच्या दिवसांत नेहमी ठेवणें लागला. सिबंदीखर्च उभयतांस सर्व दखल आहे. या संधीत अंगारकास वर्षाकालाच्या ठायी वि(शे)शोत्कर्ष प्राप्त होऊन, समीपवर्तीयांसी घसघस आरंभिली आहे. खालील

---

[1] अमात्य.

सरंजाम गावखेडियाचा. वसूल जबरदस्तीनें घेतला. वरघाटे सौभाग्यादिसंपन्न मातुश्रीबाईसाहेब याणी नानाप्रकारें पेंच आरंभून आमच्या खेडी सरंजामास ईस्कील[1] केली. बरे; आपला भरोसा साभिमानपूर्वक असतां कोणे गोष्टीची चिंता वाहात नाहीं. परंतु आम्ही सर्व प्रकारे आपल्या पदरीं पडिलों, तेव्हा जसी आज्ञा करतील तदनरूप वर्तणूक करावी. याकरितां हे पत्र आपणास लिहिलें आहे. आपण साभिमानपूर्वक आज्ञा केलिया दोन शह परिहार होतील. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Krishnarao Bhagwant (Amatya) implores Sadashivrao Bhau to save him from the aggressions of Queen Jijabai of Kolhapur and Tulaji Angria. He further states that with his forces he had joined Samsher Bahadur and Dinkarpant who had been despatched with troops against Tulaji Angria.*

No. 125] [*4-4-1755*

श्री

श्रियांविराजित राजमान्य राजश्री
बाबा स्वामींचे शेवेसी

पोष्य रामाजी माहादेव मो कोट गोवां साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल चैत्र वद्य आष्टमी भृगुवार अस्तमानपर्यंत जाणोन स्वकीयें लिहावें विशेष. आपण कृपा करून दोन च्यार पत्रें पाठविली ते हरणईचे गोडीबावीचे मुकामी पावली. त्यास हें कार्य होतें ऐशी बातमी आल्यावरून छ १२ जमादिलाखरीं रेवदंड्याहून निघोन कुंभारू व श्रीवर्धनचें बंदर करून छ १५ मिनहूस मंदवारीं प्रहर दिवसां अंजल्र्याचे बंदरीं उतरोन गोडीबावीवर येऊन बावीपुढें जागां जागां मोर्चेबंदीस लोक बसविलें, तों गोव्यांतील दोन आडीचशें माणूस बाहेर पडलें. हारणईचे पेठेस अग्न लाऊन युध्यास आले. त्यांस मारून पिटोन माघारें लाविलें. नित्य बाहेर पडत परंतु आपले लोक हटले नाहीं. मोर्चे काईम राखोन मोर्च्यातून मार देत. तीन तोफा दोन गरनाला येक फटकडी लागूं करून खुष्कीचा मार व पाण्यांतील इंग्रजाचें मनवरांवरील मार व गुरांबाचा ऐसा चहूंकडून लगट केला दोन दिवस इंग्रेजांनीं माराची सीमा केली. ते लिहितां न ये. काल होकें[2] व गरनालाचा मार इंग्रेजांनीं बहुतच केला. तें सहेकरून सुवर्णदुर्गांतील कोठी व दारूखान्यास अग्न लागोन निमे किला जळाला. मारगिरी न सोसे तेव्हां काल रात्रौ त्याणी आपलेकडील भले मनुष्य दोघें पाठविलें. श्रीमंताचे पदरीं पडून

---

१ हरकत. २ ज्वालाग्राही पदार्थानें भरलेलें पात्र, (बॉम्ब).

2834

जागें देतों. मारगिरी राहूं द्या ऐसें राजश्री रामजी पाठोले याणी सांगोन पाठविलें, त्याजवरून मान्य केलें. आज प्रात:काळीं राजश्री संभाजी मंगेश व बाजी आवजी आले. ते बोलोन गेले; केल्या निश्चयाप्रमाणें आजच दोन प्रहरां गोंवा कनकदुर्ग फत्तेगड तिन्ही किले धण्याचे पुण्यप्रतापेंकरून फत्ते जालें. सुवर्ण-दुर्गांतहि आजच निशाण चढावें. त्यास आज प्रात:काळीं रामजी पाटोळे गोव्यातूंन सुवर्णदुर्गांत गेले. आंतील नाइकवडी घालमेल करीत असते. आज रात्रौ उद्यां प्रात:काल मर्याद पाहातों; नाहींतरी इंग्रेजी मार देऊन लेश करून कौलांस येई तें करितों. त्याणी सा दिवस मारगिरी फारच केली, आणि आपलेहि लोकांनीं शर्त केली. गोलागोलीचे मारानें लोक जखमी व ठार जाले असेंत. त्यांची याद मागाहून पाठवितों. साष्टी वसई रेवदंडे अवचितगड येथील लोकांनीं मर्दुमी केली. पुढेंहि उमेदवार त्याचें ऊर्जित जालें पाहिजे. धण्याचे प्रतापें तीन किले फत्ते जाले. सुवर्णदुर्गहि घेऊन पुढें आज्ञेप्रमाणें जातों. राऊत सत्वर तुम्हाजवळ असतील ते आधीं पाठवणें. कितेक कामाच्या गोष्टी बंद आहे. बहुत काये लिहिणें हे विनंती.

¶Ramaji Mahadeo describes the severe fighting between the forces of the Angria and those of the Peshwa at Harnai (Suvarnadurg) and then writes about the negotiations opened through Ramoji Patole. The three smaller forts of Goa, Kanakdurg and Fategarh have been captured and the main stronghold of Suvarnadurga is likely to yield soon.

No. 126] [*6-4-1755*

पौ छ २८ जमादिलाखर
शुक्रवार अस्तमान

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक त्र्यंबक विनायक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ २३ माहे जमादिलाखरपावेतो, श्वामीचे कृपावलोकनेकरून राजपूर प्रांतीचे वर्तमान येथा-स्थित असे विशेष. जंजिरे सुवर्णदुर्ग येथे सरकारची मोर्चेबंदी जाली होती. त्यासी छ २१ रोजी गोंवा व कनकदुर्ग व फत्येगड यां तिहीं स्थळास निशाणे चढोन, सुवर्णदुर्गात निशाण चढवावयासी नेले होते म्हणोन श्रीवर्धनची माहांगिरी सरकारचे आरमाराबरोबर नेली होती, ते फिरोन माघारी ठिकाणी आली तिण्हे

प्रो मजकूरचे अमलदारांजवळ सांगितले. तेथोन त्यांचे पत्र आले ते बाजिनस शेवेसी पाठविले आहे. त्यावरोन शेवेसी विदित होईल. येथोन तहकीक बातमी आणावयासी मुजरद सिपाई पाठविले आहेत. तथ्य वर्तमान आणवोन शेवेसी लेहून पाठवितों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Tryambak Vinayak to the Peshwa, reports that the Maratha flag had leen hoisted over the forts of Goa, Kanakdurg, Fategarh and Suvarnadurg.*

No. 127] [*May 1755?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. अखेर साल होत आले. लोकाही रोजमरेयाजकरिता गवगवा बहुत केला आहे. त्याची समजाविसीस यैवज असावा. येथे माहाल मुलूक सिलक आहे ते सेवेसी विदितच आहे. हुजुरून यैवज येणे, माहालचा यैवज बेहेडियांत नेमून दिल्हा आहे. त्यास राा।खरपावेतो हस्तेबंदीप्रमाणे यैवज वसूल जाहाला. पुढे यैवज देत नाही. निमित्य की, राजश्री तुळाजी आंगरे याचे अरमार हमेशा खांदेरीच्या बाऱ्यापासून फिरते, त्यामुलें मिठाच्या सिबांडी यावयासी दहशत खाऊन, वर्षाप्रमाणें अमदरफ्ती चालली नाही; व दुसरी सावकारी वहिवाट सालाबाज मोजीब[१] न जाहाली, यामुले जकातीस नुकसान आले; व घाटावरीलहि दंगा जाहाला यामुलें नुकसान आले. त्यास सेवकाने जितकी निकड करावयाची ते केली; परंतु रुपया देत नाहीत याजकरिता सेवेसी लिहिले आहे; व राा आबाजी मोरेश्वर कारकून यैवजाकरिता पूर्वी पाठविला आहे. स्वामी कृपालू होऊन, यैवज येऊन पावे ते आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa is requested to send money for paying off the arrears to the troops as there is great difficulty, says the writer, in collecting taxes owing to the threatening movements of the fleet of Tulaji Angria.*

---

१ हिशेब.

No. 128]　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　[*1-8-1755 ?*

जाबसूद

श्रीरामचंद्र

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत
राजमान्य राजश्री बालाजी पंडित स्वामी गोसावी
यांसी

पोष्य कृष्णराव भगवंत कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण राजश्री कृष्णाजी माहादेव यांबराबर पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन, सविस्तर कोकणच्या मनसुबियाविसी लिहिला अर्थ कळों आला. मारनिले यासमागमे हशमाचा जमाव व गाडदी देऊन रवानगी केली ते देवरुखास जाऊन, राजश्री खंडोजी माणकर यांची भेट घेऊन छ २२ सवाली येथें आले. दर्शनानंतर आपले आज्ञे-प्रमाणें साकल्यार्थ सांगितला. आशास आपल्यास अवश्यक ते आम्हासहि आगत्य; आमच्या व मारनिलेच्या विचारें होईल मनसबा तो करावयासी अंतर होणार नाहीं. येतीद्वयीचे साकल्यवृत राजश्री कृष्णाजीपंत यांहीं आपणास लिा आहे त्यावरून कळों येईल. मौजे सागरूळाविसीं राजश्री स्वामीस व सौभाग्यादिसंपन मातुश्री बाईसाहेब यांसी आपण पत्रें पाठविली होती ते आपणाकडील जासूदाबरोबर देऊन, पनालियासी धणियाकडे पाठविले. त्यास जासू-दास गडावर न घेतां दरवाजियासी ठेऊन, पत्रोतर न देतां निरोप दिल्हा. आशास येथील विचार सर्वहि आपणांस अवगत आहे. सुप्रवृतीने गांव देतात असे नाहीं. उभयतां धणियानी परस्पर आपणास[१] पत्रे लेहून, मुदाम जोडेकरी पाा आहेत. त्यास परिछिन्न खेडियाविसी उतर लेहून पाठवावें; किंवा राजश्री कृष्णाजीपंत व राजश्री महिपतराव यांसी आज्ञा करावी. आमचा साभिमान सर्व प्रकारें आप-णास आहे. तेथें विशेष काय लिहावें. बहुत काय लिहिणें, कृपा असो दीजे, हे विनंती.

¶*Krishnarao Bhagvant to the Peshwa, assuring him of his co-operation with Krishnaji Mahadeo in the Konkan. He further requests the Peshwa to intercede in his behalf with the Raja of Kolhapur for his village.*

---

१ अमात्य.

No. 129] [2-8-1755

श्री

आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करणें विशेष. तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं, तरी सदईव पत्रीं कुशल वृत्त लेहून संतोशवीत गेलें पाहिजे. यानंतर चिरंजीव राजश्री दादा हस्तनापुराकडे स्वारीस गेले होते ते गंगातीरास येऊन दाखल जाले. श्रावणमासी पुणीयास येतील. पुढें कितेक विचार करणें आहे याजकरितां तुम्हांस पत्र लिहिलें असे; तरी सत्वर श्वार होऊन भेटीस येणें. भेटी अंतीं जो विचार करणें तो केला जाईल. सुरत प्रांतीं सरकारचें परगणें आहेत तेथें गिरासाचा उपसर्ग तुम्हांकडून फार होतो, म्हणऊन कमाविसदारानी लिहिलें होतें त्याजवरून राजश्री खंडो गिरासाची चौकसी करावयास तुम्हांकडे पाठविले आहेत; त्यांस पांच साहा महिने झाले. अद्यापि आले नाहींत. तरी तुम्हांकडील गिरासांचा हिसेब लेहून पाठवणें. सरकारांत खासा श्वारीस घोडे आरबी पाहिजेत, तरी येक भला माणूस सुरतेस पाठऊन उत्तम घोडे खासा श्वारी योग्य तीन च्यार यावे तो खरीदी करून पाठवणें. किमतीप्रमाणें पैका देविला जाईल. तरी घोडे जरूर पाठऊन देणें. गिरासाचा हिसेब पाठवाल त्याबरोबर आपला कारभारी ब्राम्हणजी सेट यास हुजूर पाठऊन देणें.

पाहून हुजूर रवाना अमृतराव व छ २३ सवाल सनसीत खमसेन सदरहू- प्रमाणें दुर्जनसिंगास पत्र द्यावें.

¶*Peshwa to Durjansingh of Mandvi, asking him to forward the accounts of the girasias, about which the addressee has received complaints.*

No. 130] [Date of receipt 25-9-1755

छ १८ जिल्हेज

श्रीरामचंद्र

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत
राजमान्य राजश्री बाळाजी पंडित स्वामी गोसावी
यांसी

पोष्य कृष्णराव[१] भगवंत कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. राजश्री कृष्णाजी

१ अमात्य.

महादेव व राजश्री महिपतराव गाडदीसमवेत रवाना केले. त्यास प्रस्तुत पर्जन्य भारी; आणि येकतोंडी शह या मुळे तूर्त स्थलाचा कार्यभाग होणे नाहीं; परंतु आपले आज्ञेप्रमाणे आम्हाकडील जमाव घेऊन जाऊन, उभयता खारेपाटणा-नजीक दोन कोशावर मेढा घालून राहिले आहेत. आंगरे यानेंहि येक रोखी शहामुळें अवघा जमाव खारेपाटणी करून, बल धरिले आहे. त्यास भारी फौज आल्याविना स्थले हस्तगत होत नाहीं. येविसीचे साहित्याची पत्रे देऊन, रायाजी वणजरे व रायाजी संकपाल पाठविले आहेत इकडील साद्यंत वृत्त निवेदन करितील तो अर्थ ध्यानांत आणून, भारी फौज व आरमाराचें साहित्य आलियानंतर शत्रुचा उपमर्द येथास्थित होईल. येकरोखे शह दिल्यानें आयास येत नाहीं. दोन च्यार स्थलास शह दिल्यावर दिवसगत लागणार नाहीं. फौज रवाना करणें ते आंबाघाटानें रवाना केल्यास मानमार्ग पाहोन जिकडे पाहिजे तिकडे आणावयास येईल. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Krishnarao Bhagvant to the Peshwa, asking for more men to dislodge Angria from Kharepatan.*

No. 131] [*October 1755* ?

श्री

राजश्री जावजी गवली गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो महिपतराव कवडे रामराम विनंती उपरी. येथील क्षेम जाणऊन स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष. तुम्हाकडे एक दोन पत्रे पाा त्याचे उतर न आले. त्यास श्रीमंताची पत्रे एक-दोन आली, त्याजमधे तात्पर्य कीं, राा रामाजी माहादेव आरमारसुधा ज्या स्थळीं तुम्हास बोलावितील तेथे बातमी राखोन जाऊन पोहचणे. महत कार्यास विलंब न करणे ऐसी आज्ञा. त्यास तुम्ही खारेपटणी आहा; त्यास तेथें मनसबा इतकाच; हजार पाचसे लोक जैसी गढी तैसा भरणा; हशम राजश्री खंडोजी मानकर यांस सांगोन ठेवावे; आणि त्या लोकास रोजमरियाचा बंदोबस्त करून निघावे, इतका मनसबा आणखी काही नाहीं; आणि रकारनामकाची बातमी राखोन त्याचे पत्र येतांच सिध असावे. त्यास तुम्ही बातमी कोणे स्थलीं आले ते आणविली असेल. पुढें ते कोणे स्थळी येतात, तुम्हास कोठे बोलाविले आहे हे सविस्तर आम्हास लिाा पाहिजे; आणि तुम्ही आम्ही एकत्र होऊन, साहेबचाकरी

करावी. केवळ या प्रांतीच्या लोकांचा मनसबियास न गुंतावे. खावंद चाकरी हुकुमाप्रो करावी. येविशई राजश्री आनंदराव बरगे व नाईकजी राजवडे यासी बोलिले असो. सविस्तर आपल्यास सांगतील. सिधांत करून, तुमची आमची भेटी होऊन, मनसबा स्वामीकार्याचा होय ते करणे. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद

¶*Mahipatrao Kavade orders Javji Gaoli to be prepared to start at a moment's notice. The two in concert are to support Ramaji Mahadeo.*

No. 132] [*4-10-1755*

छ ४ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना तागाईत छ २७ जिल्हेज स्वामीचें आज्ञापत्र सादर तेथें आज्ञा कीं इग्रजाचें वलंदेजाचें सौरभ्य नाहीं; परंतु वलंदेजाचा वकील तीन महिने आला. आजवरी धातुपोषण सांगणें तैसें सांगितलें. तो कुमकेस येणार, वसईस वखारीस जागा मागतो, त्यास त्याचें मागील आचरणावरून वसईप्रांतें वखारीस जागा द्यावयाचा नाहींत. आंगरेयाचा मुलुक सुटल्यास (गो)व्यासमीप वखारीस जागा द्यावा, तेथें त्याणें किलाकोट बांधूं नये. पुणियासहि वखारीस जागा द्यावी. सध्या कुमकेस येणार दोन महिन्याची मसलत आहे. चाकरी करून दाखवील मग देखावें तसें करावें. परंतु हें जनरालाचे विचारें जाहालें पाहिजे. येद्यपि जनरालाचें मनांत न यें तरी वलंदेजांनीं निराळेंच ठिकाणास लागावें. कुमकेस येतों म्हणोन बोलतों, अव्हेर केल्यानी आंगरेयास सामील होईल; मग भारी पडेल यास्तव जनरालास व शिवाजी नानाजी यांस मुंबईस लिहिलें आहे. सिवाजी रणसोड(आला) आहे. त्याचे वस्तु ये गोष्टीचा जाबसाल होत नाहीं. त्यास लौकरीच पाठऊं. परंतु जनरालास लेहून पाठवणें म्हणोन आज्ञा. यैशास वलंदेजास कुमकेस आणू नयें, वखारीस जागा देऊं नयें ऐसें जनरालाचें मानस.

परंतु विचारें पाहातां वलंदेज कुमकेस येऊन चाकरी करून दाखऊन वखारीस जागा मागणार. त्यास सध्यां मसलतीस ज्याहाजें आलीं पाहिजेत. सुरतेस याचीं जाहाजें नाहीं म्हणतात. विलायतेहून यावयासी आवकाश पाहिजे. येत तों श्रीकृपेनं मसलत सर होईलच ; तथाप त्याचें मनोधारण रक्षावयाचें स्वामीनी योजिलें आहे. मुंबईस जनरालास व जिवाजी नानाजीस हुजुरून लिहिलें आहे. त्याचें उत्तर येऊन सविस्तर कळेल. येद्यपि अशांतच निखालस वृत्तीनें वलंदेज आपलीं तरांडीं आणित असिला तरी येकास येक उपर होईल ; इरेनें काम करतील, ऐसे असतां जनरालाचें चित्तास न येच तरी वलंदेजाणें निराळें ठिकाणास लागोन कार्य करून दाखवावें. काजकाम होईल त्याप्रमाणें पुढें वखारीस जागा देणें, तेथें गोव्यासमीप द्यावी ; परंतु आज हातचा सोडितां नये. आधीं तरी त्यास निरोप द्यावयाचा नाहीं म्हणतात. त्याचें सूत्र आंगरेयाकडे आहे. केवल निखालसतेनें हुजूर आला नाहीं म्हणतात. याकरितां पुरतां शोध मनास आणून इंग्रेजासहि लेहून. तथाप त्याचे भेटीस जाणें जालें तरी भेटीसमयीं खुलासा काढून सेवेसी लिहितो. सारांश त्याचा खुलासा होऊन येईल तितका विचार सांगोन करितों. परंतु वलंदेजास तुटकी आज्ञा न करावी. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev, in reply to the Peshwa's query whether Dutch help should be accepted in humbling the Angrias, advocates that the Dutch ambassador who has come to Poona should not be dimissed but that a trading port may be thrown open to them near Harnai.*

No. 133] [*1-1-1748*

पाो छ २४ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक रामाजी माहादेव मुा उरण चरणावरी मस्तक ठेऊन सष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ११ मोहरमपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून येथील वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री मानाजी आंगरे याणी इकडील सावकारी व सरकारी गलबते धरून नेली ते सविस्तर पूर्वी सेवेसी लेहून पाठविले. परंतु उत्तर सादर न जाले. त्यास वसई व रेवदंडे येथील दोन तीन सरकारी गलबते नेली होती, त्याजवरील एकेक तोफ व किरकोल सामान घेऊन सदरहू सरकारी गलबते सोडिली. राहाता सावकारी गलबते उरण साष्टी वसई रेवदंडे मिळोन दहाबारा राहिली. त्याजवरी वसईपैकीं सरकारी एक भातसमेत धरून

नेले. खाडीत उपद्रव बहुत होऊ लागला. सावकारी बंद जाली. उरण व ठाणेकर सावकारानीं त्यांचा अंतस्थे कौल घेतला होता. दोन दोन कौल उरणकरास असतां गलबते नेली. कौलास प्रमाण नाहीं. सावकार भये वागऊ लागले. तसेच कोलवडीचे कोली मासली मारावयासी न जातसे जाले. कोल्याचा उदीम बुडों लागला. सावकारी राहिली. तेव्हां सावकारानीं गवगवा केला. गलबते नेली आहेत ती सोडवून घ्यावी, नाहीं तरी बुडाले जातो. पुढेंहि सुरलीत चाले यैसे करावे म्हणोन. त्याजवरून राजश्री शंकराजीपंत व राजश्री मोराजी शिंदे यास लेहून पाठविलें. त्यास शंकराजीपंत घोडबंदरास येऊन तेथें त्याचे विचारे थल पावेतो अरमार रवाना करावे म्हणजे खुद्द मानाजी आंगरे आरमारसहित आपले आरमाराच्या मुकाबल्यास येतील, येताच अंगावर घेऊन सारे अरमाराचा एकदाच लगट करून पारपत्य करावे. अरमारचा लगट इकडून होईल. तिकडे राजश्री येसाजी आंगरेयाणी राजकोटचे राजकारण केले आहे तेहि कार्य याच संधीत उरकावे. उरणाकडून लोक पाठवून रेवस रांजणखारीचे दगड पाडून टाकावे, चहूंकडून येलगार जाला म्हणजे सावकारी गलबते सुटोन येऊन पुढें हालखुद राहातील, सावकारी सुरलीत चालेल यैसा सिधांत करून येशवंतगडी गेलो. तेथें वसई व ठाण्याचे अरमार एकत्र करून सामान सरंजाम पोख्ती बेगमी करून देऊन वसई व ठाणें मिलोन अरमार गुराब ६ व गलबते तीस, यासिवाये कोली महागिऱ्या पंचवीस तीस बराबर राजेश्री कृष्णाजी महादेव व राजश्री +बाजीराव बेलोसे छ ३ मोहरमी येशवंतगडाहून रवाना केले. उरणाकडून उपराल्यास पांच सात गलबते व महागिऱ्या राजश्री नारो बल्लाळ हशमनीस व राजश्री गंगाजीराव खानविलकर रवाना केले. सेवक येशवंतगडचा बंदोबस्त करून ठाण्यास येऊन तेथील बेहबुदी करून उरणास आलो. कृष्णाजीपंत व बाजीराव आरमारसहित कुलाबियाचे बाऱ्यावर जाऊन नांगरवाडा करून अंगारकाचे आरमार येईल म्हणोन प्रतीक्षा करीत राहिले. इकडून नारोपंत व गंगाजीराव जातां आंगऱ्याचे दहा गलबताची गांठ पडली होती. परंतु त्या गलबतानीं पल काढून निघोन गेली. त्याजवरी दुसरे दिवशीं कृष्णाजीपंत रेवदंडेयास राजश्री मोराजी सिंदे व येसाजी आंगरे याच्या भेटीस राजकोटचे राजकारण कसकसे केले आहे ते मनास आणावयासी चहूं गलबतानसी जात होते, तो मानाजी आंगरेयांचे सा गलबताची गांठ पडली. हे त्याच्या पिछास लागले. इतक्यांत खुद्द मानाजी आंगरे नवा गलबतानीं आले. याची व बाजीराव बेलोसे याची गांठ पडली. परस्परे मारगिरी बहुत

+ Died in August 1749.

जाली. मानाजी आंगरे याजकडील तिघे जखमी जाले, एक ठार जाला. खुद्द त्याचे गलबतास तोफेचे गोले लागून भोके पडली. मोड जाला. कृष्णाजीपंतानीं सा गलबते पिटोन लाविलीच. इतक्यांत दिनांत जाला. मग पल काढून निघोन गेले. दिवस असता तरी त्याची दोनचार गलबते पाडाव होतीच. सारे अरमार एकत्र होऊन येलगार केला होता. परंतु रात्र जाली, याजमुले पलोन निघोन गेले. उपरांत कृष्णाजीपंत रेवदंड्यास गेले. तेथें मोराजी सिंदे व येसाजी आंगरे याची भेट होऊन येसाजी आंगरे याणी राजकोटचा संदर्भ केला होता; त्या नेंमास येसाजी आंगरे व रेवदंडेकरी आपले लोक गेले तो सुचे जाले याजमुले कार्य न होता माघारे आल्यावर दुसरे दिवशीं मानाजी आंगरे राजकोटास येऊन मोराजी सिंदे यास मन:पूत सांगोन पाठवून अत:पर तुमचा आमचा बिघाड परस्पर चित्तास येईल ते करावे म्हणोन सांगोन पाठवून राजकोटावरून रेवदंड्यावर गोल्याची मारगिरी करूं लागले आहेत, इकडूनहि मार होतच आहे. परंतु तिकडून गोले येतात ते शैल्य रेवदंडियास यास्तव मारोजी सिंदे कृष्णाजीपंत व बाजीराव बेलोसे हरसावंत भोसले सुभानजी विश्वासराव यांचे सर्वांचे विचारे कीं, अरमाराचा जडाव होऊन शह पावला असतां तोफाची मारगिरी होते, या गोष्टीची टालाटाल केल्यानें पुढें सेर होऊन आधिकच मारगिरी करूं लागले, याकरितां अरमार रेवदंड्याचे खाडींत आणावे, राऊत खुसकीस ठेवून आंगऱ्याची कुमक राजकोटास न पावे ऐसा बंदबस्त करून हशमी लोकानीं जाऊन राजकोटच्या गला पडावें, बनल्यास मोर्चेबंदी करून जेर करून घ्यावा, येद्यपि मसिदीवरून गोले टाकील तरी खुसकीचे राऊत असतील त्याणे त्याचे सामान मसिदीत येऊ देऊं नये, चहूंकडून राखावा म्हणजे कोट हस्तगत होईल; किंबहुना तहास येऊन इकडील गलबते नेली आहेत ती सोडोन सुरलीतावरी येतील, ऐसा विचार करून मोराजी सिंदे कृष्णाजीपंत यांचे पत्र आम्हास व शंकराजीपंतास आले. त्यास आम्ही त्याचे लिहिल्याप्रमाणें इकडून सामान पाठावयाचे तरतुदीत अहो. कृष्णाजीपंत रेवदंड्यास आहेत. बाजीराव बेलोसे आरमारसहित कुलाब्याचे बाऱ्यावर आसेत. राऊत येणेस आहेत, त्यास येणे म्हणोन मोराजी सिंदे याणी पत्र पाठविले आहे. राऊत तेथें जाऊन दाखल जाले म्हणजे अरमार खाडीत नेऊन शह बसवितील. मग होता होईल त्याप्रमाणें करतील. स्वामीचे प्रतापेकरून अंगऱ्याचा हिसेब आहेसारीखा नाहीं. त्याणी यंदा उपद्रव बहुत केला. सेवटी रेवदंड्यावर गोले टाको लागला. यास्तव इतके करणे जरूर जाले. सेवक उरणांत उपराल्यास आहे. प्रसंगी बनल्यास तेथें जावयासहि समीप. राजश्री रामचंद्रपंतास पत्र लिहिले असे. त्याजकडील कांहीं राऊत रेवदंड्यास

जातील. तेथें बनेल त्याप्रमाणें होईल. रांजणबारीविसी स्वामीची आज्ञा होतीच. त्यास रेवसचे दगड देखील पाहून रांजणबारीस मांडव चौकी होती ते दग्ध करविली. जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. पुढें होईल त्याप्रमाणें लेहून पाठवितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Ramaji Mahadev to the Peshwa : reports the measures adopted by him to bring to book Manaji Angria for seizing merchant vessels carrying the Peshwa's permit. c

---

No. 134] *[5-1-1748*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक रामाजी माहादेव मुकाम उरण चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ मोहरमपर्यंत स्वामीचे कृपावलोकनें-करून येथील वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री मानाजी आंगरे याणी इकडील सावकारीं गलबतें धरून खाडी बंद केली. सावकार उदमास कोण्ही न जातसें जालें. यास्तव वसईचें व येथील अरमार येकत्र करून त्याचें गलबताचा मुकाबला करावा, आपलें अरमाराची त्याजवरी सलाबत बसवावी, साधल्यास राजकोटचें राजकारण राजश्री येसाजी आंगरे याणी केलें होतें तेहि साधावें, यैसा निश्चय करून अरमार कुलाबियाचें बाऱ्यावर रवाना केलें. त्यास येक वेळ खुद मानाजी आंगरे येऊन मुकाबला करून नामोहरम होऊन सरकारचें अरमाराची सलाबत खाऊन पळोन गेले. राजकोटचें राजकारण केल्या अनुसंधाप्रमाणें साधावें; परंतु सुचें[१] जालें याजमुळें साधलें नाहीं. त्यास राज-कोटास येसाजी आंगरे येऊन माघारें गेलें. इतक्याचा दोष राजश्री मोराजी शिंदे याजवरी ठेऊन, तुम्ही येसाजी आंगरे याजवळून कोट घेत होतेस याउपरी तुमचा आमचा बिघाड, यैसें सांगोन पाठऊन राजकोटावरील मारगिरी रेवदंड्यावर करूं लागले. त्यास आठपांच दिवस टाळाटाळ केली. परंतु त्याचा निकर्षसा दिसोन आला. तेव्हां निदानास अरमार खाडींत नेऊन अरमाराचा मार कोटावर द्यावा लागला. खुष्कीसहि मोर्चे लाविलें आहेत. स्वामीचे प्रतापेंकरून थोडकेंच दिवसांत कोट फत्तें होईल. हें सविस्तर पहिल्यापासून वृत्त हुजूर लिहिलें आहे, त्याजवरून विदित होईल. दुसरेंहि

---

१ बातमी फुटल्यामुळें.

2844

अनुसंधान आलें आहे, त्याची पुरवणी लिहिली आहे, त्याजवरून अवगत होईल. तरी राजकोटचे मोर्चे उठवावें यैसी रदबदल हुजूर पडेल त्यास आजउद्यांवर नेल्यानी हें कार्य साधेंसें आहे; यास्तव विनंती लिहिली असें. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶Ramaji Mahadev reports to Bhausaheb the measures he was taking to capture the fort of Rajkot (Cheul) from Manaji Angria and asks the Peshwa not to intercede on behalf of the Angrias.

No. 135] [*18-1-1748*

छ ४ सफर

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव मुकाम ठाणें साष्टी. चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २८ मोहरमपर्यंत स्वामीचे कृपावलोकनें-करून येथील वर्तमान येथास्थित असें विशेष. चेउलचे राजकोटास मोर्चेबंदी जाल्याचें वृत्त सविस्तर सेवेसी लिहिलेंच होतें. त्यास छ २५ मिनहूस मंदवारीं अस्तमानीं कोट व मशीद स्वामीचे प्रतापेंकरून फत्ते केली. राजश्री मानाजी आंगरे हाटालियावर हजार माणसांनीं युध्यास आले. त्यास आपले लोकांनीं मोर्चेबंदी काईम राखोन त्याजवरी चालोन जाऊन युध्य बरेसें केलें. मानाजी आंगरे यांची तरवार बरीशी झडली. आपले लोकांनींहि शर्त केली. सा घोडीं व पंचवीसेक माणूस आंगरेयांकडील ठार जालें. हें सविस्तर (हुजूरचें) पत्रावरून विदित होईल. त्यास कोट व मशीद पाडून टाकावी, परंतु गलबतांमुळें कलह वाढला. तीं सुटोन आलीं पाहिजेत. दुसरी गोष्ट देशमुखीचा अमल बसला पाहिजे. तहरह होय तावत्काल असल्यास कानुकैद जबरदस्तीनें बसेल. आणि येविशीचे विचाराची आज्ञा हुजूरूनहि जाली पाहिजे. यास्तव राजश्री कृष्णाजी माहादेव यास लेहून कोट व मशीद मिळोन तेथें अवघाच जमाव ठेविला. तेथें सारा भरणा असल्यानी मानाजी आंगरे वलवल न करितां स्वस्थ राहून पुढें सुरतावरी येतील. याकरितां सविस्तर हुजूर लेहून कृष्णाजीपंतास तेथेंच राहाणें असें लिहून पाठविलें आहे. सुचला विचार सेवेसी लिहिला आहे. येविशी आज्ञा ते शिरसा. पुढें येखादें कार्य होणें तें आज्ञेविरहित तूर्त करीत नाहीं. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶Ramaji Mahadev reports the capture of Rajkot, the fort of Cheul, on 15 January 1748.

No. 136] [15-11-1755

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवसी

आज्ञाधारक कर्णाजी सिंदे नामजाद व कारकून किले माहुली दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १० माहे सफरपावेतो आज्ञाधारकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्तित असे विशेष. किले मजकुरी लोक आजाराने बहुत पडिली आहे. .कार्तिक मासा ता। हा कालपर्यंत मई (?) आली आहे. ते उतारास पडत नाहीं. मागे च्यार पाच वर्षा पलीकडे यैसीच किल्यावरी दुखणी लोकास लागली होती, ते श्री देवीची आराधना करून शांत केली. आरोग्य जाहाले. हाली तैसेच जाहाले आहे. शांत केल्यावरी आरोग्य होईल; तरी स्वामीनी कृपा करून ब्राह्मणद्वारा आद्भुत शांत करावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. यानंतर किल्याचे सालाबाद प्रा। भात व शाकार व चूड वोडा हंगामसीर चढला पाहिजे. गुदस्ताप्रा। सामानाच्या सनदा द्यावयासी स्वामी खावंद समर्थ आहेत. यानंतर किले मजकुरी पाथरवट आज दोन वर्षे होते ते साल मजकुरी आले नाही. पाथरवटखेरीज काम खोलंबले आहे. किले हरिचंद्रास गढीचा तट ढासलला आहे. त्यास दगड जवल मिलत नाही; याजकरिता पाण्याचे टाके आहे तेच फोडून, दगड काढून, तटास लावावे म्हणजे तट मुस्तेद होईल; आणि टाकेहि मुस्तेद होईल. जाहालियावरी पाणी तगेल. तरी पंचवीस पाथरवट हुजूरचे पाठविले पाहिजेत, म्हणजे माहुलीची व हरिचंद्र दोहीं जागा काम चालेल. बेगमी करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Karnaji Sindia reports to the Peshwa the prevalence of an epidemic at fort Mahuli and suggests measures for checking it.*

No. 137] [11-11-1755

पौ छ ८ सफर

श्री

राजश्री जावजी बावा गौली गोसावी यांसीं

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नो कृष्णाजी माहादेव आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुषल जाणून स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले पावोन लेखनार्थ विदित जाहाला. तुमच्या पत्रावरून येथून कूच करून मजल दरमजल येतों. अद्याप फौज जमा जाहली. दोहोचह रोजा आलीकडे जमा होतील. राजश्री खंडोजी माणकर सुभेदार व तुम्ही येक जागे

जमा जाहालियावर सत्वर पत्र पाठवणे स्वार होऊन येतों. यैसियास रा सुभेदार येथं दाखल जालेच असेते; परंतु प्रजन्यामुळें राहिले. येका दोहो दिवसी येतील. आपण तेथून निघोन घाटमाथा येऊन मुकाम करावें. रा सुभेदार आलियानंतर तेच क्षणी तुम्हास पत्र पाठवितों. मग घाटाखाली यावें. घाटमाथां फौजेचा मुकाम जाहाल्याने या प्रांती फौजेचा दबाव पडोन येईल. कितीक काजमार्चा सुरतहि द्रिष्टीस पडेल; आणि आमचे वर्तमान आपणांस वरचेवर कलेल. आपलेंहि आम्हास कलेल. अंगारकाचे अरमार तयार जाले आहे. फिरंगी व अंगारक येकत्र होऊन सुवर्णदुर्ग प्रांते जाणार हे वर्तमान आहे. यैसियासी या प्रांती फौजेचा दबाव असलियाने तिकडील वेध राहील. राजश्री रामाजी माहादेव सुवर्णदुर्गास आहेत इंग्रजाचे अरमार तयार जाले आहे. सत्वरच येईल म्हणून माानिलेची पत्रें आजच आली. आपणांस कलावें म्हणून लिहिलें असें. फौज उतरावयासी बावडे याचा घाट बहुत सुगम आहे. बहुत काय लिहिणे? छ ६ सफर लेभ असो दीजे हे विनंती.

¶*Krishnaji Mahadeo instructs Javji Gaoli regarding the movements of his contingent and refers to Angria's preparations.*

No. 138] [*17-11-1755*

श्री

राजश्री जावजीबावा गौळी गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित माहिपतराव लक्ष्मण आशीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १२ सफर मुकाम नांदवडे ताा खारेपाटण जाणून स्वकीय कुशललेखन केलें पाहिजे विशेष. आपण पेशजी पत्र पाठविलें तेथें लेखन केलें कीं दुसरे पत्र आलें म्हणजे स्वार होऊन येतों म्हणून लेहिलें. ऐशास आपलें येणें न जाले. इकडील वर्तमान तर अंगारक भगवंतगडावर अरमारसुद्धां जाऊन किला घेणार ऐशी वदंता बातमी तथ्य आहे. याजकरितां आपण घांटाखाले उतरून ह्या स्थलास यावें म्हणजे आपलें नांवाची व फौजेची सलाबत ह्या प्रांती बहुत बसेल. येणेंकरून अंगारकाचा जमाव स्थल सोडणार नाहीं, आपल्या स्थलास अपाय होणार नाहीं. आपण येथें आल्यानें साऱ्याच जमावाची बलावल येक जागां होईल. येणेंकरून आहे जमाव इतक्यानशींच येखादें कार्य होऊन शत्रूस रग भारी बसेल ऐसें वर्तमान आहे. हा सर्व अर्थ ध्यानांत आणून जो विचार करणें तो पोख्त करावा. जैसेंच आपण जे ठिकाणीं मुकाम करून राहिलेत त्याप्रमाणेंच

2847

हें ठिकाण आहे. येथें कोणे गोष्टीची चिंता नाहीं; परंतु येथें आल्यानें शत्रुस सलाबत भारी बसेल, स्वामी नक्ष राहेल, येश तुमचें पदरीं पडेल यांत संशय नाहीं. आपण जोपर्यंत खाले उतरत नाहींत तोपर्यंत सारे जमावाची भर येक जागां होत नाहीं. आपणांस कळावें. स्नेह असों दीजे हें विनंती.

¶*Mahipatrao Laxman communicates to Javji Gaoli the news of the impending attack by the Angria's navy on Bhagvantgad. He suggests that the addressee should descend the ghat and proceed to the place.*

No. 139] [*17-11-1755?*

श्री

राजश्री जावजीबावा गौळी गोसांवी यांसी

ꣳ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो कृष्णाजी माहादेऊ आशीरवाद विनंती उपर. येथील कुशल ताा छ १२ माहे सफर मुाा नांदवडे ताा खारेपाटण जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पेशजी पत्र पाठविले. तेथे लिहिले की, तुम्ही व राजश्री खंडोजी माणकर येकत्र जाल्याचे पत्र आले म्हणजे आम्ही घाटाखाले उतरतो म्हणून लेखन केले. यैशास राजश्री खंडोजी माणकर दो चौ रोजात ह्या प्रांतास येणार. प्रस्तुत भगवंतगड प्रांते अंगारकाचे आरमारें, व लोक जाऊन दगा करनार म्हणून बातनी आहे. याजकरितां प्रस्तुत ह्या प्रांतीचा शह सोडोन तिकडे जातां येत नाहीं. इकडे शह भारी आ (?) पडल्या अंगारकाचा जमाव स्थल साडोन बाहेर निघणार नाहीं, याजकरितां आपणांस पत्र लेखन केले आहे. त्यास आपली सलाबत भारी आहे. आपण ह्या स्थलास अल्या, फौजेची व जमावाची सलाबत अंगारकास भारी बसेल. कार्यहि यखादे दुसरे होईल. यश आपल्या पदरी पडेल. स्वामी नक्ष राहवे हा सर्व अर्थ ध्यानास आणून, जो विचार करणें तो करावा. घाटावर राहिल्या ह्या स्थली मुकाम केल्या उतम आहे. सलाबत भारी पडल; नक्ष राहेल. स्वामी कार्य होईल. कलले पाा. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Krishnaji Mahadeo impresses on Javjibawa Gaoli the necessity of joining him with his forces so as to keep the Angria in check. He further informs him that Khandoji Mankar will shortly be arriving with his forces.*

No. 140] [12-12-1757 ?

पौ छ ८ रबिलाखर

श्री

राजश्री पंत स्वामी गोसावी यासी

नकल

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित मानाजी अंगरे रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. सांप्रत आपणाकडून कागदपत्र येऊन कुशलार्थ कळोन परामर्ष न जाहाला यास्तव चित्तास समाधान नाहीं. तरी सर्वदां पत्रद्वारा कुशलोत्तरलेखन करून सांभाळ करावयास आपण सर्वज्ञ आहेत. यानंतर सिदी मसूद मुंबईस राहिला आहे, तो पेण खाडीस गांव मारावयाची उमेद धरून इंग्रेजाजवळ बहुत बजीद जाहाला असतां इंग्रेजानें अनुमोदन दिल्हें नव्हतें. व इंग्रेजाचा व आमचा बिघाड यामुळें पेण खाडीची अमदरफ्ती[१] साहुकारीं चालों न द्यावी यैसा अर्थ असतां साहुकार दरम्यान पडोन खाडीची अमदरफ्ती चालवावयाचा करार दुतर्फा होऊन अमदनी[२] साहुकारी चालत होती. इंग्रेजाने प्रजेचे वाटेस न जावें, यैसा त्यांचा कृतसंकल्पच. याविचारें खाडीकिनारा रखवालीस जमावाचें प्रयोजन न लागलें. उंदेरकरावरी शह पडल्यावरी खाडीत रखवालीस लोक ठेवावें तरी इंग्रेजाच्या बंदेजास्त[३] व शामलाचा पैस खाडींत व्हावयाचा लाइलाज. येक वेळ खाडींत येक दोन गलबतें जाऊन कुळबी व कोळी धरून पांच सात उंदेरीस नेल्याचें वृत इंग्रेजास कळतांच त्याणें उंदेरकरास फजीत करून कुलाबियास सोडून देविले. फिरून खाडींत आपलिया विचाराविगळा गेल्यास आपण मदत उपराला जागाजुगा देणार नाहीं यैसें माकूल करून सांगोन आजीवरी खाडीचा अटोप इंग्रेजाकडून जाहाला होता. यानिमित्य खाडीकिनारांचे गांवास शामलाचा उपसर्ग न लागतां प्रजा निर्भय होती. रखवालीस स्वारी ठेवावयाचेंहि कारण नव्हतें. बेशकपणें कष्टकाम रयेत करीत असतां प्रस्तुत अकस्मात उंदेरकरानें दाहा अकरा गलबतांचा सज करून खाडींत शिरोन चेऊल प्रांताकडील खाडीकिनारांचे दोनतीन गांऊ जाळपोळ करून पांच सात रांडापोरें धरून नेऊन पेणतर्फेस मौज वढु ता। वांसी येथें उतरोन मौजे मजकूर जाळिलें. तों पेणेहून आमची स्वारी जाऊन पावली. तदुत्तर गलबतावरी गनीम चढोन तूर्त उंदेरीस आला आहे. इंग्रेजाचा हात त्यास सांपडला तरी शामल खाडींत शिरोन उपद्रव आरंभिला. याबदल बंदर-

१ दळणवळण; रहदारीचा पर्वाना. २ आवक. ३ बंदोबस्त.

किनारा जागाजागा जमाव ठेऊन जेथें उतरेल तेथेंच तोंडावरी हाणोन वाटेस लावावा. इकडील बंदरकिनारा जमाव ठेवणें तों ठेऊन बंदेज केलाच आहे. पेणेकडील होणें तेथेंहि जमाव थोडा बहुत आहे. परंतु भारी गनीम आला. त्याचा निशा भारीपणेच जाहाला पाहिजे. आपणांकडील जमावाचा गाहा पेणेस होऊन येक हात करून रखवाली करावी या अर्थें हें पत्र आपणास लेहून नारायेण पाठविला आहे. तरी ये गोष्टीचा विचार चित्तांत आणून जमावाची रवानगी जलदीनें पेणेस होऊन रयेतीची रखवाली होऊन गनीमास दहशत पडे तो अर्थ केला पाहिजे. या दिवसांत प्रजेवरी कहर गनीमानें केला आहे, त्याचें निवारण केलें पाहिजे. येविशी बहुत ल्याहावें तरी आपण सर्वज्ञ आहेत. कृपा वर्धमान केली पाहिजे. रवाना छ २९ माहे रबिलौवल हें विनंती.

¶*Manaji Angria to the Peshwa, refers to the ravages of the Sidi of Underi in the villages on the Pen creek and suggests the Peshwa measures to stop these depredations.*

No. 141] [*13-12-1755*

श्री

राजश्री बळवंतराव दाजी गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नेहांकित जावजी गौळी दंडवत विनंती. उपरी, येथील क्षेम तागाईत छ ९ रबिलौवल मुकाम खारापाटण आपले मेहेरवानगीकरून येथास्थित असें विशेष. आपला निरोप घेऊन आलों तें खारापाटणास पोहोंचलों. ठाणेंयास हशमी लोकांकरून व रा महिपतराव लक्ष्मण याजकडून गाडदीसुधा मोर्चेबंदी कराविली. रात्रीचे शेंपंनास खासे सामानसुधा तयार करून त्याच्या पाठीवरी उभे करितो. आम्ही रात्रीचें लस्कर व लोकांभोवती गोटगस्ती करितों. आम्हांस गनीम रात्रीचा फौजेंतच दृष्टीस पडतो तें पत्रीं लिहितां न ये. आम्हाजवळ जमात थोडी; विनाफौज मातबर असलियाशिवाय साहेबकाम होत नाहीं. याजकरितां श्रीमंताजवळ अर्ज करून दोन च्यारशें करोल पाठवावें. व आणखीहि हुजरातीचे लोक हजार पांचशें ऐसे आम्हाजवळ पोहोंचल्यास येकादें जागां गळी पडोन ठिकाण हस्तगत करितों. राजश्री रामाजी माहादेव अरमारसुद्धां आलियावरी विजेयदुर्गाचा लेखा आहे ऐसे नाहीं. परंतु फौजेविना अरमारानें काम होणार नाहीं. फौजेची इभ्रत भारी आहे. राजश्री रुद्राजी धुलप धरिले ते समर्या फौज असती तरी विजेदुर्ग हस्तगत जाहला असता. विजेदुर्गांत कांहीं बाकी आहे ऐसें नाहीं. त्याजकडील

लोकांस पळ सुटला आहे. कळलें पाहिजे. दरबारीं आपणांशिवाय आम्हास दुसरा कोणी नाहीं. महर्गता बहुत आहे. धारण तीन सवातीन हरभरे, जोरी-बाजरी च्यार पाइली याप्रमाणें आहे. रोजमरा पुरत नाहीं.

¶*Javji Gaoli reports he has placed his batteries in position but complains of the inadequacy of the forces and therefore asks for more men.*

No. 142] [*13-12-1755*

श्री

श्रीमंतर राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक जावजी गौळी साष्टांग दंडवत विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ ९ रबिलौवल मुकाम खारापाटण साहेबांचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें व पागा मजकूरचें वर्तमान यथास्थित असें विशेष. साहेबांची आज्ञा घेऊन स्वार जाह्लों. लोकांची समजावीस करून मजल दरमजल मलकापुरास आलों. प्रजन्यामुळें मार्गी गुंता जाहाला. तेथून आंब्याच्या घांटावर येऊन दोन मुकाम करून घांट नीट करून उतरोन लांज्यास राजश्री खंडेराव बरगे, व आम्ही राजश्री खंडोजी माणकर याजवळ सामील जाह्लों. तों राजश्री कृष्णाजी माहादेव यांचीं पत्रें आलीं कीं, आधीं स्वार होणें मग पत्र वाचणें. त्याजवरून मजल दरमजल मौजें केळवली येथें आलों. राजश्री कृष्णाजी माहादेव व महिपतराव दिंमत तोफखाना यांची भेटी जाली. खारापाटणास जावयाचा निश्चये करून दुसरें दिवशीं मार्गशीर्ष शुद्ध द्वितीयेस खारापाटणास आलों. मोर्चेबंदी हशम लोक व महिपतराव लक्ष्मण गाडदी सुधा केली. आम्ही मोर्चे-यासी जावें तरी गनिमाचा शह मातबर, मोर्चेयाची कुमक करून लष्कर जतन करावें ऐसा प्रसंग पडला. ठाणेंयात दोन तीनशें आरमारी माणूस व तुळाजी कदम आहेत. तोफा दारुगोळी सरंजाम उत्तमच आहे. मोर्चे लाविल्यावरी चवथे दिवशीं राजश्री रुद्राजी धुळप जमावसुद्धां फिरंगी व पनालाचे लोक व तेथील निवड करून दीड हजार माणूस व अरमार माहागिर्‍यां व गलबतें बावीस भरून खारापाटणच्या बंदरच्या नाक्यास प्रात:काळीं दोन घडी रात्रौ आले. तडीस उतरोन लस्करावरी चल दिल्हा. तों हशमीं लोकांच्या चौक्या व राजश्री कृष्णाजी माहादेव टेंकडीच्या माथ्यावर होते; त्यांच्यानें दम न धरवे. इतक्यांत आम्ही व राजश्री खंडेराव बरगे तयार होऊन कुमकेस पोहोंचलों. गनिमानें तों फारच शर्त केली. परंतु स्वामीच्या पुण्यप्रतापेंकरून लोकांनीं घोडीं घालून

उभयतांच्या करोलांनीं मार बराच दिल्हा. धुकट फार आलें होतें, तेथें रुद्राजी धुळप यास व दुलबाजी माने मातबर माणूस यांस व खासबारदाराचा नाईक मर्द माणूस यांस व फिरंगियाचा सरदार इतक्यांस गोळीच्या जखमा लागल्या. पांच सात फिरंगी ठार जाहाले. लोकहि जखमी फार जाहाले. आणिकहि सरदार फारच जायां जाहाले. सारांश फौजेची इभ्रत पाईच्यावरी भारी. याजमुळे मोर्चे जसे होते त्याप्रमाणें काईमच होते. राजश्री रुद्राजी धुळप याचा मोड जाहाला. सरोन गलबतात गेले. कांहीं खुसकीनें निघोन झाडींतून पलाले. ईश्वरइच्छा. साहेबाच्या चरणाच्या पुण्यप्रभावेंकरून असे जाले कीं, जेथें पुरुष दोन पुरुष पाणी होते तेथें वोहोटानें वाळू दिसो लागली. गलबतावर मिठी पडली. तेव्हां लोक पलाले. राजश्री रुद्राजी धुळप व त्याचा मेहुणा दुलबाजी मान्या व साट-वलीच्या ठाणेदाराचा लेक तिघे हस्तगत जाहाले. वरकड लोक झाडीत पलोन गेले. दोन गलबते व सात माहागिऱ्या मागेच होती ती मागच्या मागेच पलोन गेली. बारा गलबते व लाहान वंघी[1] एक, एकून तेरा पाडाव जाली. लहान थोर चालीस पन्नास तोफा सांपडल्या. सारांष चरणाच्या पुण्यप्रतापेकरून यश आले. पुढें सर्वांनीं एकत्र होऊन साहेबकाम करावे हे घडोन येत नाहीं. आम्ही काये करावे? घोडे एकाचे हाती, लगाम एका जवल असा प्रसंग आहे. राजश्री महिपतराव व येसाजी विश्वासराव व विशालगडकरी व बावडेकर व सिवराम सावंत येसे आपले शक्तीनरुप सेवा करीतच आहेत. गनिमास जरब फारच बसली. प्रस्तुत अवसान खता जाहाले आहे. फौज मातबर असलिया स्वामीच्या चरणाच्या प्रतापेकरून अंगारकास तंबी पोहचोन ठिकाणें हस्तगत होतील. त्याजकडील लोकास पल सुटला आहे. विनाफोजा कुमकेस मातबर आलिया हशमी लोकांच्यानें कामकाज होत नाहीं. फौज येत नाही तेव्हां जो आब धन्यानी दिल्हा आहे ते आबरू आमची राहणार नाहीं. आम्हास रात्रंदिवस गनीम लष्करांत उत्पन्न होतो. नांव कोणाचे घ्यावें? धनी पुढें पारपत्य करणार समर्थ आहेत. परंतु आम्ही काये करावे? फौज मातबर आलियासिवाय साहेब-काम होत नाहीं. फौजेचे धास्तीनें लोक फिरूं पावणार नाहीं. पलोन जातील. फितुर होऊ पावणार नाहीं. समय असा आहे कीं धन्याची फत्ते व्हावी. हा दिवस उदईक येणार नाहीं. गोवेंकर सामील जाहाला आहे. तीन लक्ष रुपये राजश्री तुलाजी आंगरे यानीं दिल्हे. अंतस्तेकरून कितेकांची साह्यता आहे. परस्परे खावंदास कलेल. येथील अर्थ नाईकजी राजिवडे रुबरु होतां तो अवघा सेवेसी निवेदन करील. दाण्याची महर्गता फार. तीन सवातीन हरबरे, चार

---

१ एकप्रकारचें जलद चालणारें गलबत.

पायली जोरी बाजरी, तूप सव्वाशेर, मीठ दोन पाइली याप्रमाणें आहे. रोजमरा लोकास पुरत नाहीं. कोकणचे गवत; दाणा भरचंदी दिलीयाविना घोड्याचा आब राहात नाहीं. कांहीं अर्जबाब द्यावयासी धनी समर्थ आहेत. कितेक अर्थ पत्री लिहिता येत नाहीं. चरण दृष्टीस पडतील तेव्हां अनभवास आणून देऊं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Javji Gaoli writes to the Peshwa from Kharepatan an account of an action fought by the writer against Rudraji Dhulap who with his brother-in-law Dulbaji Mane was taken prisoner. The writer goes on to say that Tulaji Angria has received succour from the Portuguese and requests reinforcements.*

No. 143] [*19-December 1755*

श्री

चिरंजीव विजईभव राजश्री बाबूरांव याप्रती शंकराजी हरि देसाई अनेक आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन ता। मार्गशीर वद्य प्रतिपदापर्येत समस्त सुखरूप आसो विशेष. तुम्ही पत्र खारापाटणचे मुकामीचे पाठविले ते पावले. लिहिलें वर्तमान कळों आलें. रुद्राजी धुळप वगैरे सरदार धरिले म्हणून लिहिले त्याजवरून परम समाधान जाहाले, तो ईश्वर जाणें. यानंतर राजश्री जावबानीही शर्त फार केली म्हणोन लिहिलें; तर ते तैसेच आहेत. तुम्ही सरदाराच्या आज्ञेंत निरंतर राहणें. आपणाकडून अंतर किमपि पडो न देणें. युधाप्रसंगाचा विचार आहे. त्यास्तव तुम्ही आपले बहुतविचारें राहत जाणें. वरकड घरची खर्चाची बेगमी आहे ती तुम्हांस ठाउकच आहे. तर कांहीं खर्चास पाठवून देणे. येथें कोणी कर्जपैसा सावकार देत नाही, आणि संसार आहे तो तुम्हास ठाऊकच आहे. राजश्री शेषभटहि पैसा देत नाहीं. (येथून पुढें सर्व मजकूर खासगी कर्जाचा आहे. पत्राचा पहिलाच बंद उपलब्ध आहे).

¶*A private letter expressing joy at the capture of Rudraji Dhulap and other sardars. Can the addressee be Baburao Keshav Thakur ?*

No. 144] [*December 1755*

श्री

राजश्री कृष्णराव पंडित आमात्य गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित जावजी गौली दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशललेखन करीत

2853

असिलें पाहिजे, विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिले वर्तमान कळों आलें. ऐसेंच सदैव पत्रीं परामर्ष करीत असावें. यानंतर राजश्री रुद्राजी धुळप छापा घालावयाकरितां आरमारसुधा आलें होतें. त्यास श्रीमंताच्या चरणाच्या पुण्यप्रतापेंकरून हस्तगत जाहलें. त्याजकडील तमाम लोक पळोन हत्यारें टाकून गेले; कळलें पाहिजे. राजश्री आनंदराव बरगे रुद्राजी धुळप यास घेऊन तेथें आले आहेत; तरी ते सर्व वर्तमान सांगतील त्यावरून कळों येईल. तुम्हाकडील लोक येथें चाकरीस आहेत त्यांचे आम्हास जरूर अगत्यच आहे. पूर्वींपासून आपल्या घराची ममताच आहे. आम्ही पदरचे आहों. ज्याप्रमाणें चालत आलें त्यासप्रमाणें मायेस अंतराये न करावें. सूज्ञांप्रति विशेष काय लिहिणें? कृपालोभ असों दीजे हे विनंती. राजश्री रुद्राजी धुळप आपणांजवळ पाठविले आहेत. तरी आपणांकडील शेंपनास लोक देऊन बहुत विचारें बंदोबस्ती करावी आणि आनंदराव बरगे यांसी लौकर माघारें पाठवावें हें विनंती. तुम्हाकडील लोक घेऊन बच्याबा व बाळोबा [अपूर्ण]

¶*Javji Gaoli sends Krishnarao Pandit an account of the defeat and the capture of Rudraji Dhulap. The captive was taken to the addressee by Anandrao Barge.*

No. 145] [*1755 ?*

श्री

पत्र पाहिजेत

रा। तुळाजी आंगरे यास पत्र की रायेगड माहाड प्रांत रखवालीस पेसजीपासून राजश्री स्वामीनी आमचे तालुका लाविला आहे. हालीहि सदरहू प्रांताविसी आम्हास निक्षूणवादे आज्ञा केली आहे त्यावरून हे पत्र लिा आहे. तर सदरहू प्रांते रायेगड, माहाड, यशवंतगड वगैरे या प्रांते आपणाकडून उपसर्ग लागो न देणे. उपद्रव केलियास आम्हास पारपत्य करणे लागेल म्हणून १

सुभा प्रांत राजपूर मामले तले येथे रा। माणकर व रा। मजमदार यास पत्रे

१ नागसेट खातू वस्ती का। माहाड याची कर्जाची कुले तले, घोसाले, निजामपूर प्रांते गेली आहेत. त्याचे वसुलास नागसेट येईल. त्यास कुलास ताकीद करून याचा कर्जाचा वसूल देववणे म्हणून.

+वाजबी कर्ज देवणे

+ यापुढील मजकूर नानासाहेब पेशव्यांच्या हातचा.

+यां दिवसात उपसर्ग करणे सहसा योग्य नव्हे ऐसे लिहिणे.

१ सुभानजी सोडकर नोकर सरकार तो हुजरात याची कुणबीण पळोन तल्याचे पेठेत गेली आहे. तिचा थाक लाविला आसे. तर येवसी पत्र द्यावे की ज्याची कुणबीण त्याचे स्वाधीन करणे म्हणोन पत्र.

+त्याची असली तर देणे.

१ तुडल व माहाडचे दाहा गाव सांल मजकुरी भरणार, त्याचा आडथला तुम्हास करावयास प्रयोजन काये? तर याउपर तुम्हास त्या मुलकासी कजिया करावयास प्रयोजन नसे म्हणौन पत्र.

+तालुका नसता नवीन गैर वाजबी कजिया न करणे.

३

¶*This is a list of items on which orders are given by the Peshwa. There is one item in them in which Tulaji Angria is ordered not to molest the territory round about Raigad, Mahad, consigned to the care of the Peshwa by the King.*

No. 146] *[15-11-1755*

श्री

राजश्री जावजी गोळी गोसावी यांसी

ℰ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो अमृतराऊ कृष्ण प्रतिनिधि आशीर्वाद उपर येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले तें प्रविष्ट जाहाले. राजश्री पंत प्रधान यांजकडून आपली फौजसहवर्तमान खाले कोकणात जावयाची रवानगी केली आहे. त्यास आंबेघाट नीट

+यापुढील मजकूर नानासाहेब पेशव्यांच्या हातचा.

करावयास पाहिजे याकरितां खोरी व कुदल्या व गावगनाचे बेगारी ताकीद करून देवावी म्हणोन लिहिले, येशास गतवर्सी राजश्री समशेरबाहादर फौजेसहवर्तमान आंब्याचे मार्गे खाले गेले ते समई बेलदाराकडून घाट नीट करविला तो चांगलाच आहे. त्याणी जातेसमई गावगना खोरी व कुदळी व बेगारी यांचे रोखे करून उपद्रव काडीमात्र केला नाही. येसे असतां तुम्हीच यंदा गावगना रोखापत्र करून उपद्रव करावा हे गोष्ट उत्तम नव्हे ? गतवर्सीपासून लस्करचे रहदारीमुळे गावगनाची बाकी काही राहिली नाही. नाचणेवरीयांची खेडी येकदा ढका लाग‍तांच वोस व्हावयाची; तुमच्या प्रांतासारखी खेडी नव्हेत, यास्तव लिहिले असे; तरी लिहिला अर्थ चितात आणून गावगना कोणेविसी उपद्रव न देतां न खाले लस्कर जाई ते करणें. येविसी कितेक मुलुकामध्ये कोणे गोष्टेविसी उपद्रव न देणे म्हणोन त्यांची आज्ञा आहेच तेणेप्रमाणे ताकीद लस्करास करून काडीमात्र गावगना उपद्रव न लागे ते करणे छ १० सफर.

¶*Abaji Krishna Pratinidhi to Javji Gaoli, requiring him to desist from molesting the villages on his march into the Konkan. There is a reference in the letter to Samsher Bahadar's expedition into the Konkan by the Amba Pass. This is quite a new piece of historical information.*

No. 147] [*1755 ?*

श्री

राजश्री तुळाजी आंगरे यास कागद

महमद सोफी पलवकर वस्ती वसई यांजकडून सरकारतर्फेस जिन्नस वसई व ठाणें यांसी लागतो तो व हुजूर खर्चास जिन्नस त्या प्रांतींचा पाहिजे तो त्याचे गुजारतीनें येतों, त्यास जें बंदरचा जिन्नस जो माफिक पडतो तेथील घेऊन येतात. सरकार तर्फेनें दस्तक देऊन रवानगी होत असते व मुंबईपैकी जिन्नस व काम‍काज होणें तें याचें मार्फतीनें होतें. याजकरितां मुंबईसहि याची वस्ती आहे. त्यास सालमजकुरीं घोड्यांचे खरीदीस मसकतेस त्याचें गलबत

अबदु शेख वस्ति मुंबई याणी तुम्हांकडे जाऊन इंग्रेजाचें जाहाज व इंग्रज सोडऊन करार केला, त्यास आपण जामीन राहोन गलबतांस व इंग्रेजांस निरोप देविला. त्यास मार्गी येतां जाहाज वादळामुळें जोखीव जाहालें. त्याजवर इंग्रेज बेमानीस आले; जामिनकी त्याचे गळा पडली. यास ते वसईस व ठाणेंयासी राजश्री शंकराजी केशव व राजश्री रामाजी माहादेव यांजकडेस आले; त्यावरून सरकारतर्फेनें दाहा हजार रुपये त्यास दिले, निमित्य कीं हे पुरातन पदरचे

रवाना केलें ; तेथें धोडींयांची खरीदी बनोन आली नाहीं. याजकरितां जिन्नस माफक पाहोन खरीदी करून शिबांड येत होती, त्यास मार्गी आपणांकडील अरमाराची गांठ पडली. त्यास तें गलबत धरून नेलें. हें वर्तमान त्याणीं सरकारांत लिहिलें, परंतु सरकारतर्फेचा जिन्नस म्हणऊन त्यास जाहीर केलें आहे. शिबांड सुटोन लौकरच येईल व आम्ही त्याजकडील कौलहि घेतला असे. तोहि गलबत रवाना केलें, त्यास कौल त्यांजकडील आहे व आमचे माणूस तेथून आलें त्याणें वर्तमान सांगितलें कीं शिबांड जिन्नस सुद्धां लौकरच येईल. त्यास आपणांकडून शिबांड जिन्नससुद्धां आला नाहीं, याजकरितां लिहिलें असें. तरी जिन्नससुद्धां शिबांड पाठविली पाहिजे. सावकार मजकूर वसई सरकारांत फत्ते झालियापासून सरकारचे खर्चाचा जिन्नस व आरमारचा जिन्नस याजकडून आणऊन सरकारांत सरंजाम होतो, त्यास हें पूर्वील स्नेही तुम्हाकडील, याजकरितां तुम्हांकडूनहि कौल घेतच असतात. सावकारीस सुरळीत आहेत. आपण जाणतच आहेत; व हे सरकारांत जिन्नस देतात हें आपणांस ठावकेंच असें. ऐसें असोन सरकारचा जिन्नस ठेवावा ऐसें नाहीं. तरी शिबांडसुद्धा जिन्नस पाठविला पाहिजे.

सावकार केळशीकर यांजवरी तंवाई पडली, सबब हे सरकारांत आले, याजकरितां सरकार तर्फेनें सरंजाम करणें लागला. तुम्ही त्यांस लिहिले होतें कीं जिन्नस सरकारांत पाहिजे तरी पाठऊन देणें. मुंबईस जिन्नस खरीदी करावा तरी तेथील जिन्नस तुम्हाकडे पाठवावयासी रजा नाहीं. याकरितां वसईस येऊन सरकारांत जिन्नस होता तो खरीदी करून खरीदी प्रमाणें घेऊन तुम्हांकडे रवाना केला. त्यास तुम्ही पाड कमी धरिला याजमुळें नुकसानी आली, आणि याचें आंगावर जामिनकी पडली. ऐसें असतां त्यास नुकसानी द्यावी ऐसें नाहीं; तरी पाडाप्रमाणें जिनसांचे रुपये मजुरा घेऊन आपलें तर्फेनें काय येहसानी[1] ती करून हिशेब पाठविला पाहिजे. बाकी राहिली असेल त्याचीहि विल्हे होऊन येईल.

---

१ कृपा.

अबु सैद पलवकर यांजकडे तुमचे कराराप्रमाणें च्याळी(स) हजार रुपये येणें, त्यांपैकीं पूर्वी नख्त रुपये व जिन्नस ऐसा भरणा करून पाठविला. त्याची तोडमोड करून वीस हजारांची पोहोंच तुम्ही पाठविलीत. बाकी वीस हजार रुपये राहिले; त्यांपैकी सदहू शिबंदीचें कामाचा ऐवज मुलाचे सुटकेकरितां सरकारांत अर्ज करून त्या भरणेयासी दाहा हजाराचा देविला आहे; तो वजा करून व पेशजीचे तोब्याचा ऐवज मजुरा देऊं(न) बाकी रुपये राहातील ते राजश्री शंकराजी केशव यांसी लेहून पाठवणें, तुमची निशा करून देतील. हुजुरून राजश्री पाठविला आहे याचे हवालें मुलास करावा; सावकार पुरातन पदरचे आहेत, याचें गौर करावें, उचित आहे.


¶Mahommad Sofi Palavkar, a merchant, is recommended to Tulaji Angria for the settlement of his complaints and claims. The claims have arisen on account of the seizure by Angria of his vessels coming from Maskat. The letter appears to be a draft from the Peshwa, addressed to Tulaji Angria.

No. 148] *[26-1-1756*

श्री

राजश्री जावजी गौली
सुबेदार गोसावी यांसी

८ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री तुलाजी आंगरे सरखेल



रामराम. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन केले पाहिजे विशेष. आपण राजश्री बाबूराव व राजश्री चिमाजी आपा कडू याजबा बोलीचाली निश्चय शपथपूर्वक सांगोन पाठविल्याप्रमाणें राजश्री पेशवे यांचे भेटीस निघोन जावयाचा सिधांत करून, आजी इंदुवारी प्रस्थान केले. घोडी व सर्व साहित्य तरी पलीकडे उतरिले. अंग प्रस्थानें निघावें तो येक दोन दिवसांचा कांही गुंता पडला आहे; व आम्हास न्यावयाकरिता आपण पलीकडे दाडें अणसुरे येथें आलें पाहिजे; याकरितां हे पत्र लिहिले असे; तरी आपण गुरुवारी अणसुरेयास यावे. वरकड येथील काही संशय नाही. तुम्ही शपथपूर्वक बोली सांगोन पाठविल्याप्रमाणें दृढ अभिमान असों द्यावे. तुमची आमची भेटी ब्रहस्पतवारी दांडेयाचे मुकामी जाहलियाण सर्व संशय दूर होऊन, पुढे स्वार होऊन जाऊ. योजिला मनसबा सिधीस जाऊन, राजश्री पेशवे यांची आमची भेटी होऊन, सुरसता व्हावी, याचे

यश अभिमानपूर्वक संपादिले पाहिजे. रा छ २३ माहे रबिलाखर, बहुत काये लिहिणे? लोभ असो दिल्हा पाहिजे; आपणास अणसुरेयास यावयाकरितां मागाहून राजश्री चिमाजी आपास आपणाकडे पाठवितों.

लेखन सीमा.

¶*Tulaji Angria requests Javji Gaoli to mediate with the Peshwa on his behalf. He expects—continues the letter—to meet Javji Gaoli at Dande Anasure, on his journey to the Peshwa.*

No. 149] [*26-1-1756 ?*

श्री

तीर्थस्वरूप राजश्री बाबूराव[१]

वडिलाचे शेवेसी

आपत्ये जनार्दनाने[२] सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ २३ राखर पावेतो यथास्थित असे विशेष. वडिलानी छ २२ राखरचे आशीर्वादपत्र पाठविले ते पावले. जनार्दन देव व मानाजी आंगरे याजकडील मजकुराची पत्रे पावली नाहीं म्हणोन लिा, त्यास आम्ही तों डाकेबराबर रवाना केली; ते वाटेस राऊतानी गमावली यांत आमचा उपाय काय? व आपलाहि उपाय नाहीं. हली हे पत्र लिहून पाठविले आहे, तर कानोजी आंगरे याचा व थोरले नानाचा तहनामा जाला आहे, तो दप्तरी उमगेल तर त्याचा शोध करून पाठऊन द्यावा; व त्या आलाकडे राव सन खमस सलासीनामध्ये कुलाबियास गेले होते, तेसमई मानाजी आंगरे याचा तह केला आहे; व त्याजकडील हिसेबहि केला आहे, तो गणेशपंत पेंडसे यास ठाऊक असेल, अथवा दप्तरी असेल, त्याचा शोध करऊन पाठऊन द्यावा. त्या उपर आपा सन आर्बा+ आर्बेनामध्ये कुलाबीयास गेले होते, ते समई मानाजी आंगरे याचा तह जाला असिला तर त्याचाहि दप्तरीं शोध करून, अथवा गणेशपंत पेंडसे यास पुसोन, असिला तर पाठऊन द्यावा; व मारनिलेकडे सालदरसाल मक्ता किती करार केला आहे, त्याचा वसूल सालेसाल काय आला आहे, तो हिसेब आजतागाईत निवडऊन, तवताला करून पाठवावा. मारनिलेकडील कोठीस जिनस आला असेल तर कोठीस शोध करून, निवडून

---

१ फडणीस. २ बाबा फडणीस.

+ लेखकाचा कांहींतरी हस्तदोष दिसतो, आर्बा शब्द फाजील पडला आहे.

लिहोन पाठवावा. याखेरीज मारनिलेकडील कामाकाजाच्या यादी तहनामे याचे पाठीमागे, व हिसेबाचे पाठीमागे असतील, त्याचाहि शोध करऊन, कुल पाठऊन द्याव्या; व सन इसने सलासीनामध्यें राव व आपा कुलाबीयास गेले होते, ते समई सेखोजी आंगरे याचा तहनामा जाला असिला तर त्याचाहि शोध करऊन पाठऊन द्यावा. व ते समई हिसेब जाला असिला तर पाठऊन द्यावा. येणें-प्रमाणे लिहिणारास ताकीद करून, सत्वर पत्र पावतांच रवानगी करावी. बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Janardanpant to Baburao Fadnis, enquiring about the past treaties between the Peshwa and the Angrias since the time of Balaji Vishvanath.*


No. 150] [*28-1-1756*

श्री

राजश्री जावजी गौली सुबेदार

गोसावी यासी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो तुलाजी आंगरे सरखेल


शिक्का

रामराम. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन केले पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविलें प्रविष्ट जाले. केल्या कराराप्रो आपणास यावयाकरिता राजश्री चिमाजीआपा कडू यांस पाठविले आहेत; तरी तुम्ही निघोन आले पाहिजे. वरकड सविस्तर मारनिले सांगतां कळों येईल. रा छ २९ मोहे रबिलाखर. बहुत काये लिहिणें ? लोभ असो दीजे. भृगुवारी साकरगोटीवरेयाचे मुकामी आलें पाहिजे.


सिक्का.

¶*Tulaji Angria requests Javji Gaoli to come to Sakargoti with Chimaji Appa Kadu, as previously agreed upon.*

No. 151] [*29-1-1756*

श्री

राजश्री जावजीबाबा गौली

गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो आनंदराव बर्गे रामराम विनंती उपरी. येथील वर्तमान ता छ २६ रबिलाखर पावेतो मुा येसवंतगड नजीक

सुखरुप असो विशेष. राजश्री तुळाजी आंगरे शुक्रवारी भेटीस येणार आहेत; तरी चिमाजी कडू येथे आले, त्याणी सांगितले कीं, आपण आल्याखेरीज भेटी होत नाहीं; तरी तुम्ही व खंडेरावबाबा यैसे उभयेता निघोन सत्वर येणे. श्रीमंताची पत्रे लस्करांतून आली आहेत की, रुद्राजी धुलप यासी किल्ले पुरंधर येथे नेऊन घालणे यैसी आज्ञा आली आहे. याजकरितां आपणास सूचनार्थ लिहिला आहे. तिकडे लस्करांतील वर्तमान तरी मानाजीबावा व आणिखी पतके पुढे मुरारजी घोरपडे याचे लस्करावरी जाऊन जूज देऊन काही तोफ व बुनगे व गुरे पांच सात हजार घेऊन आले. मनोलकरांचा मेवणा कुमकेस घो(र)पडे याकडे जात होता तोहि लुटिला यैसे वर्तमान कागदी आले. त्याणी करार सांगितले. आपण येथे आल्याखेरीज कारभार चालत नाही; तरी तुम्ही निघोन सत्वर येणे. विलंब न करणे हे विनंती.

¶*Anandrao Barge to Javji Gaoli, asking him to proceed with Khanderao Baba to be present at the impending visit of Tulaji Angria next Friday, and giving news of the defeat of Murarji Ghorpade's forces.*

No. 152] [*February 1756*

श्री

अपत्यें म्हालोजी गौळी साष्टांग दंडवत विज्ञापना. अंगऱ्याचा भेटीचा मजकूर तरी, खासा अणसुऱ्यावर येऊन बैसला आहे. त्यास शनवारीं दो प्रहरां येथें चिमाजी कडु आला होता त्यानी सांगितलें कीं, रविवारचा भेटीचा करार केला, त्याचा विचार काय आहे? त्यास राजश्री हरि दामोधर आलियावांचोन आम्ही भेट घेत नाहीं. अंगऱ्यांच्या मतं आम्हांस मोर्च्यांत भेटावयास न्यावें आणि आमचा अपमाण करावा ऐसा अर्थ नाहीं. तरी आम्हांस व राजश्री आनंदराऊ बरगे यांस भेटावयास तत्यावर बोलावितो. त्यास खंडोजी माणकरहि म्हणत आहे कीं तुम्ही जाणे म्हणजे साहेबचाकरी होईल; त्याजवरून तुम्हांस पत्र लिहिलें आहे. तुमची आज्ञा जाली तरी भेटीस जाऊं. राजश्री तुळाजी अंगरे फार खटे आहेत. मी गुरें च्यार पांचशें वळून नेलीं व अबलगड घेतला व रामगडास मोर्चे लाविले आहेत. भेटावयाचा मजकूर; तुम्ही गड किल्ले घ्यावें ऐसें नाहीं. आम्ही व आनंदराऊ बरगे हे तेथें भेटीस गेलियावांचोन तो कांहीं येत नाहीं. तुमचा व राजश्री खंडोजीबावाचा व अंग्र्याचा विमानप्रमाणें जालें कीं आम्हीं तुम्हास न्यावयास येतों त्यास तुम्हास तो यावयास अनुकूल पडत नाहीं. तरी आम्ही जाऊन त्यास तुम्हांकडे राजापुरास भेटीस घेऊन येतों. तो कांहीं येशवंत-

गडच्या मुकामीं भेटत नाहीं. तुम्हाकडे यावें, तुमच्या हातें ऊर्जित करून घ्यावें. कळलें पाहिजे. आम्हांकडे करोले याचि व राऊत सासे पाचे येकूण दाहाजणे पाठऊन द्यावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Mhaloji Gaoli writes that he along with Anandrao Barge will go to Tulaji Angria and will try to bring him to Rajapur.

No. 153] [*29-1-1756*

श्री

अपत्ये म्हालोजी गौली सां दंडवत विज्ञापना. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनज्ञा केली पाहिजे विशेष. आंगरियाकडील मजकुर तरी बुधवारी दो प्रहरा चिमाजी कडू आला. त्याच्या आमच्या भेटी जाल्या. त्यानी करार केला की शुक्रवारी प्रहर दिवसास भेटीस येतो म्हणून बोलोन गेला आहे. आंगऱ्या-कडीलहि पत्र आली आहेत, ते तुम्हाकडे पाठविले आहेत, त्याजवरून सर्व वर्तमान विदित होईल. रा खंडोजी मानकर हे तुम्हास पत्र लिहितेत की, तुम्ही येथे येणे. त्यास आम्ही तो मजकूर राहविला आहे. त्यास तुमचा यावयाचा मनसुभा जाला तरी आम्ही लिहून पाठऊ तेव्हां यावे. फार मजकुर ल्याहावा तरी तुम्हास कंटाळा येतो; आणि पत्राचे उतरहि येत नाहीं याजवरून अपूर्व दिसोन येते. रा तुळाजी आंगरा खासा येथे येसवंतगडच्या मुकामास येणार व तट व उंट व कारखाना राजापुरास ते वाटेण येणार. तुम्हास कलावे म्हणून लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. सेवेसी रावो धोंडदेव रामराम.

¶Mhaloji Gaoli writes to Javji Gaoli about the preparations in connection with the intended visit of Tulaji Angria to the Peshwa.

No. 154] [*6-2-1756*

पो छ ६ जोवल

श्री

राजश्री जावजी गौली सुभेदार
गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री तुळाजी आंगरे सरखेल रामराम उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन केलें पाहिजे विशेष.

आलीकडे तुम्हाकडील साकल्यार्थ कलत नाहीं, यैसे न करितां सविस्तर लिहावें. यानंतर भेटीच्या प्रसंगाची बोली राजश्री बाबूराव साटम व चिमणाजी कडू देशमुख याही तुम्ही केली, त्याप्रमाणें येथून प्रमाण जाहले; परंतु तुम्हाचकडून विलंबावर गोष्ट पडली. यास्तव जंजिरा आमचें येणें जाहलें. स्वारीचा सर्व इलाखा पलीकडे आणसुरेंयास ठेऊन सडी स्वारीनिसी जंजिरा येणें जाहलें. वरकड जाहाले करारास विपर्यास तुम्ही चितांत आणाल, यास्तव सूचनार्थ हे पत्र लेहून उमाजी ठाकूर व नाईकजी सिर्के पाठविले आहेत. आज्ञेप्रमाणें मुखता सांगतील, तो अर्थ करार जाणून उतर पाठवावे. तदनुसार कर्तव्यता पूर्वसंकेताप्रमाणे होईल. निशा असों देणे. जाणिजे. रा छ ५ जोवल. बहुत काय लिहिणें?

शिक्का

शिक्का

¶*Tulaji Angria in a letter to Javji Gaoli expresses his willingness to visit the Peshwa to establish friendly relations with him.*

No. 155] [*8-2-1756*

श्री

राजश्री जावजी गौलो

सुभेदार गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो तुलाजी आंगरे सरखेल रामराम. येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. आम्ही अणसुरेयाहून जंजिरा आलो म्हणून तुम्हास येक प्रकार दिसोन पत्री लिा तो कलो आले. तुम्हापासी करारमदार होऊन भेटीचा विचार केला आहे, त्यास दुसरा विचार किमपि नाही. निशा असो द्यावा. च्यार दिवस जंजिरा स्वारी जाहली, याजकरिता मुहुर्त पाहिला आहे. लौकरीच स्वार होतो. इतकियांत राजश्री

रामाजीपंतहि तुम्हापासी येतील. सर्व येकत्र जाहालियाने तुम्ही अगत्यवाद धरिलियाचे सार्थक आहे. याविसी सविस्तर सांगोन, राजश्री चिमणाजी कड्डू देशमुख पाा आहेत. सांगता कलो येईल. तुम्ही लोकी चितावर घेतले आहे. तेथे दुसरा विकल्प आमचा येक जरा नाही. सर्व भरवसा तुमचा मानिला आहे. राा छ ७ माहे जोवल. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे.





¶*Tulaji Angria writes to Javji Gaoli that in a meeting with the Peshwa he and Ramaji Mahadeo should conjointly try to bring about an amicable settlement between the Angrias and the Peshwa.*

No. 156] [*14-2-1756*

श्री

राजश्री जावजी गौली गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो बालाजी बाजीराऊ प्रधान असीर्वाद. सुहूर सन सीत खमसैन मया व अलफ. मुंबईकर इंग्रज यावयाचा गुंता होता त्यास सर्व सरंजाम आरमार सामानसुधा येऊन पोहोचला. राजश्री रामाजी माहादेवहि आले. तुम्ही आहाच. अत:पर गुंता राहिला नाही. तरी तुम्ही सर्व सरदार येकचित होऊन मातबर येलगार करून मुख्य स्थल हस्तगत करणें. आंगारकाचे भेटीचा मजकूर कोण्ही बोलावयास येईल तरी सहसा न आइकणे. येविसी राजश्री रामाजी माहादेव यास सविस्तर आर्थ लिहिला आहे. आंगारकाचे भेटीचे प्रयोजन नाही. निकडीने येलगार करून कार्यसिध्धि करणे. असा समय पुढे कधी येणार नाही हे पुर्ते चितात आणून सर्व येकविचारें होऊन कार्य करणे. जाणिजे छ १२ जमादिलोवल. बहुत काय लिहिणे?

¶*Balaji Bajirao instructs Javji Gaoli to break negotiations with Tulaji Angria and advance against Vijaydurg as the fleet of their ally, the English, has arrived.*

+ बाळाजी बाजीरावचा शिक्का.

No. 157] [14-2-1756

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक श्रीधर आबाजी विज्ञापना. तागायेत माघ शुध त्रयोदशी जाणून, स्वामीच्या कृपावलोकने सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. पेशजी सेवेसी येक दोन पत्रे व जासूदजोडी पाठविली, त्याचा जाबसाल आला नाही. प्रस्तुत जिवाजी विस्राम यांणी आम्हास कितेक आर्थ सांगोन, सेवेसी येत होतों. त्यास वाट चालत नाहीं. मार्गाचें सुरलीत जाहालेनंतर सेवेसी येतों. कोंकणातील वर्तमान तरी सांवताचा जमाव खंडोजी माणकर यांकडील व कृष्णाजी माहादेव यांणी येकत्र होऊन रामगड हस्तगत केला. सिदगडास येऊन बसले, तोहि हस्तगत जाहालाच असेल. तेथून देवदुर्गास जाणार. रामाजी माहादेव याणी अंजणवेली गोवलकोट घेतला. तेथून विजेदुर्गावर येणार. फिरंग्याकडील मजकूर अंगारकाचा त्याचा बिगाड होऊन, माघारे आला ते वर्तमान सेवेसी लिहिलें होते; व त्याकडील पत्रें आली तीं सेवेसी पाठविलींच होती. त्यावरून सर्व मजकूर विदित जाहालाच असेल. उसद-करांकडे साहित्यास जनार्दन गणेश वाडीस आले होते, ते जमाव घेऊन गेले. तिकडून शह बसोन, फिरंगी सांगितले यैकले. प्रस्तुत मुरारजी घोरपडे याचा शेह भारी, तनमुले सर्व दुआसदी आहेत. त्याचें पारपत्य जाहालेनंतर सर्व लगामी लागतील. कोकणातील फौज आणावयाची आसली तरी स्वामीचीं पत्रें आलीं म्हणजे सेवेसी येईल. स्वामी म्हणतील कीं, फौज आलेनंतर आंगरे सेर होईल, तरी सर्व प्रकारें जेरदेस्त जाहाला आहे. मुरारजीचे पारपत्य जाहाले-नंतर मागती फौज यावयास उसीर आहे यैसा आर्थ नाहीं. यांत स्वामीच्या चितास येईल ते खरे; आंगऱ्याचा मजकूर तरी भेटीस यावें यैसें आहे. सांवताचा जमाव व फौज कामकाजावर गेली होती. जिवाजी विस्राम जमावसुधां निघोन गेले. खर्चाचे साहित्य नाहीं त्यामुलें जमाव फुटेल; तरी खर्चाविचाची बेगमी करून पाठविली म्हणजे कामकाज होऊन येईल. सिवराम सावंत याचा मजकूर सेवेसी लिहित होता तो विदितच जाहालाच असेल. सिवराम सावंत यास बहुत प्रकारें सांगोन, निखालसपणें वर्तणूक करावी, याप्रमाणे करार करून, जिवबान व खेम सावंत व सर्वानी येकश्चित राहावें. याप्रमाणें करार करून, आठ च्यार रोज निखालसपणें वर्तणूक केली. त्यावर मागती वाड्यांतील लोक फोडू, वाडा बदलावा, ते वर्तमान आम्हास व जिवबास

कल्लेवर चौकशी केली. सिवराम सावंत कबूल जाहाले, ज्याणी लबाडी केली त्याचें पारपत्य करावयाचें ते केले. सिवराम सांवतास से पनास लोक बराबर देऊन घांटावर निघोन आले. वरकड वर्तमान राजश्री गणेशपंती व जिवाजी विस्राम यांणी लिहिले आहे त्यावरून विदित होईल. आंगऱ्याचें पारपत्य जाहालेनंतर, स्वामीचे चिती फिरंग्याचें पारपत्य करावयाचा मजकूर असला तर, सोंदेकराकडे मर्दनगड आहे, तो बोली चालीत मागोन घ्यावा, म्हणजे परस्परें लोकाचें पोट भरोन, फिरंग्याची स्थले हस्तगत होतील. मार्ग सुधामत जाहाले-नंतर सेवेसी येतों, विशेष काय लिहिणे? सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*Shridhar Abaji communicates to the Peshwa news about the Konkan, the Karnatak and Savantvadi. He says, "Khandoji Manker and Krishnaji Mahadeo have been able to capture several forts. It is necessary to put down Murarrao Ghorpade."*

No. 158] *[15-2-1756*

श्री

विनंती. उपरी, आपण लष्करांतून चिठी पाठविली ते पावली. वर्तमान काये आहे म्हणून ल्याहावे तरी जो मनसबा करणे तो हुजूर तहनामा करारमदार उभयातांनीं केले त्याप्रमाणें इंग्रेजानें मेहेनत सामान सरंजामसुद्धा जागा हस्तगत केली. आतां कांहीं इमानास बेइमान होईल तरी इंग्रेज लोक सत्यवादी आहेत. साहुकार त्याचे घरी ठेवी ठेवितात. मग हे तो तहनामा होऊन जागे घेतले. याचा निकाल होईल, जाहाला आहे. आतां सारियानी मिळोन एक विचार करून मातबर तुम्ही ज्या मसलतीस आला तों दोन कोसावरी राहून वर्तमान पुसावे यासी काये सांगावें? असो. खावंदाचे प्रतापे सर्व अनकूल होईल. नाहीं तरी समजोन इंग्रेजाची गांठ खावंदानीं घालून दिली. तेव्हां जागियाची वाट ते आमची. दुसरा विचार नाहीं. यामध्यें आपण खावंदाचे जागा अहा. जी तुम्हास तजवीज सुचेल ती ल्याहावी. आम्हास कबूल आहे. रवाना छ १४ जमादिलौवल प्रात:काल प्रथम प्रहर. हे विनंती.

¶*The writer reports the capture of Vijaydurg by the English after great effort and expresses a hope that the English will keep their word.*

No. 159] [19-2-1756

पो २९ जमादिलौवल

श्री

श्रियाविराजित राजमान्य राजश्री

बाबा स्वामीचे शेवेशी

पोष्य रामाजी महादेव मुक्काम विजयदुर्ग साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल छ १८ जमादिलौवलपर्यंत जाणोन स्वकीय लेखन करीत असावे विशेष. स्वामीनी छ १३ मिनहूचे पत्र पाठविले ते काल छ १७ मिनहूस दोन प्रहरा पावले. अंगारकाजवल तह न करावा म्हणोन लिहिले; त्यास ज्या वेलेस जे वर्तमान जसे जाले त्याप्रमाणें लिहित गेलो. विजयदुर्गावरी सरकारचे निशाण छ १४ जमादिलावली चढले ते लिहिलेच आहे. साद्यंत जाले त्यात निवदेन जालेच असेल. हलीं साकल्य श्रीमंताचे पत्री लिहिले आहे त्याजवरून अवगत होईल. विजयी जयेगड फत्ते जाला. राहता रत्नागिरी रिसालगड राहिला. फत्ते जाल्याचे वर्तमान आज सकाल यावे ऐसेच आहे. सारांश हुजूरची आज्ञा आम्ही जाब व मनसबा लिहिला असतां माणकर वगैरा यानीं निकड करून अंगारकास भेटोन हुजूर न्यावें मग खावंदा मागतील तो देतील यैशा कितेक प्रकारे भाश केले हे कोठपरयेंत ल्याहावे ! वरकड आपसात आपण न भांडावे म्हणोन लिहिले तरी हा मजकुरी आजपर्यंत जाहला नाहीं आणि पुढेंहि होणे नाहीं. असो सर्व मनसब्याच्या बखेडा करून अंगारक राखावा हें मानस सर्वांचे होते. त्यासी श्रीमंताचे प्रतापे मसलत आज्ञाप्रमाणें सेवटास गेली आहे. अंगारक माणकराचे स्वाधीन केला. आताहि नानाप्रकारे खेल होतात हे पत्री काये ल्याहावें ? असो इतकाहि परिनाम खावंदाचे प्रतापे लागेल. पुढें होईल ते वर्तमान तें लेहून पाठवू. बहुत काय लिहिणे ? लोभ वृद्धि कीजे हे विनंती.

¶*Ramaji Mahadeo reports the capture of Vijaydurg and the measures he has taken to capture Tulaji Angria, whom many tried to save.*

No. 160] [20-2-1756

पौ छ २८ जमादिलावल

सीत खमसेन मया व अलफ

श्री

श्रियांविराजित राजमान्य राजश्री बाबा

स्वामीचे शेवेशी

पोष्य रामाजी महादेव मुक्काम विजयदुर्ग साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल माघ वद्य ५ पंचमी भृगुवार अस्तमान चार घटका रात्रपर्यंत जाणोन

स्वकीय लेखन करवीत असावे. विशेष. जंजिरे रत्नागिरी छ १७ जमादिलौवली बुधवारी चार घटिका रात्र होता फत्ते जाहाली. पहाडी जागा श्रीकृपेनें धण्याचे पुण्यप्रभावेकरून आला. जिवाजी येशवंतराव याचे, गुजरतीचे राजकारण होते. इकडे येतेसमई राजश्री भवानजी कदमराव हजार माणूस व राजश्री कान्होजी सिर्के, म्हालोजी मुठे ठेऊन आलो. जयेगड फत्ते जाल्यावरी जयेगडचा मालदार रत्नागिरीस पाठवून जिवाजी रायाचे संदर्भाने भवानजी कदमराव याच्या विद्यमाने कार्यसिद्धि जाहाली. बोलीचे साद्यंत वृत्त मागाहून लेहून पाठवितो. धण्याचे प्रतापे मसलत सर जाली. राहता रसालगड राहिला. पायेबंद लावून ठेविलाच आहे. किती दिवस दम धरील कलतच आहे. सारांष स्थले हस्तगत होऊन अंगारक कावेसी (?) खाले आला. धण्याचि मनोदयानरूप कार्यसिद्धि जाहाली. विजयदुर्गांत इंग्रजाचे लोक आहेत. बाहेर सारा बंदोबस्त आपला आहे. मुंबईहून जनरालाचे पत्र तहनाम्याप्रमाणें आठ चहूं दिवसांत येईल. राजश्री गंगाधरपंत पत्र उगऊन घेऊन पाठवितील. इंग्रेज इमानास अंतर करणार नाहीं. साद्यंत आज प्रातःकाली लिहिले आहे त्याजवरून अवगत जालेच असेल. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ निरंतर असो द्यावी हे विनंती.

¶*Ramaji Mahadev reports the capture of the fort of Ratnagiri to the Peshwa.*

No. 161] [*24-4-1756?*

श्री

राजश्री जानराव पाटणकर
गोसावी यासी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नो कासी त्रिंबक रामराम विनंती उपरी. येथील वर्तमान ता। छ २३ रजब मु॥ नजीक विजदुर्ग येथे सुखरूप असो विशेष. इकडील वर्तमान तरी राजश्री रामाजी माहादेव सुभेदार यानी सला केला, अंगरेयानी दाभोल सुभा श्रीमंतास दिल्हा. राजापूरची गडी व खारेपाटणची त्यास द्यावी. रतनागिरी त्याजकड याप्रा तह जाहला. आपणास कलावे याजकरिता लिहिले असे. इकडील फौजहि दाहा पंधरा दिवसी येणार. मीहि येऊन सेवेसी सत्वर येऊन पोहोचतो. आमचे घरची समाचार घेत जाणे. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ आसो दीजे हे विनती.

¶*Kasi Trimbak informs Janrao Patanker of the terms of negotiations between the Angria and the Peshwa.*

No. 162] *[26-2-1756*

पो छ २९ जमादिलौवल गुरुवार

श्री

पुरवणी राजश्री बाबा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. इंग्रजाबराबर नेहटोन जाबसाल करावा तरी त्याची जबरदस्ती. आणि भारी. पुढें कितेक मनसबे श्रीमंतास त्याचे विद्यमान होणे; त्यास लौकिक केल्याने जागा त्यानी निशान आरमाराच्या जोऱ्याने चढविले. आणि कजिया केल्यानें लौकिक होऊन सार्थक नाहीं. तेव्हां मनोगतीने सरकारचें निशाण चढऊन बाहेरील सारा बंदोबस्त आम्ही केला आहे. किल्यांत मात्र त्यानी आपले लोक ठेविले आहेत. त्यासी वस्तभाव नव्हत न्यावयाचे उदेश करून हा मनसबा केला आहे. इंग्रजास मुंबईस लिहिलें आहे. त्याचे प्रतिउत्तर येईतों मार्गप्रतीक्षा दुतर्फा करीत असों. मुख्य गोष्ट स्थळ हस्तगत होये तोपर्यंत आम्ही आपणाकडून येकंदर विनाभाव दाखवीत नाहीं. वरकड तह जाल्याप्रमाणें मुंबईस इंग्रजांजवल बोली आहे त्याप्रमाणें जाब येईल. अंगारकाचे कारकून सांपडले. कांही ल्हा नाहीं. त्यामध्यें पातशाही मनवर आरबुज जात. ज्याजवल बोलीतो तेथें वरकड वस्तभाव जाईल. त्याची निरमुस्त प्रमान घेऊन चिंता नाहीं. मुख्य श्रीमंताची वस्तभाव किला इग्रजास ठेवत नाहीं आसो. याचा मजकूर मागाहून होईल तैसा लेहून पाठऊं. सर्वांच्या मनोदयानरूप न जाहालें यामुलें मनस्वी वर्तणूक होती हा मजकूर कोणाच्या ल्यहावा? आसो. बहुत काय लिहिणें? लोभवृधी कीजे हे विनंती.

¶*The writer Ramaji Mahadeo says that he is managing very skilfully the affairs with the English so as to secure the fort from them and is not pushing matters to a rupture as he knows that a good many things are to be accomplished through their help.*

No. 163] *[26-3-1756*

पौ ७ रजब

श्री

राजश्री जावजी बावा सुभेदार

दाजी गोसावी यास

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो खंडेराव बरगे व भगवंतराव बरगे व मनाजी बरगे रामराम विनंती उपरी. येथील क्षेम तागायत छ २४ माहे जमादिलाखर जाणोन आपलें स्वकुशल लिहित जावें विशेष. तुम्ही गेल्या-

तागायत आपल्याकडील पत्रें येऊन वर्तमान कलत नाहीं. तरी आपण पुण्यास गेल्याउपरी तेथ सविस्तर वर्तमान दरबारचें व आपल्याकडील व राजश्री तुळाजी आंगरे यांची बेबुंजी (बेबुदी) कैसी राजश्री बाबा फडनीस यानी केली ते साध्यांत मजकूर लेहून पाठवावा. आपण जमावासुधा पुण्यांत आहेत कीं कायें लेहून पाठवावें. येथील मजकूर तरी श्रीमंताकडून जासूद व सांडणीस्वार येतात. सर्वत्रांस पत्रें श्रीमंताचीं आलीं कीं किला विजयदुर्ग हस्तगत करणें, घेतले येस गमाविले, आम्हांस संकलित मार्ग लिहिला. राजश्री रामाजीपंतास बहुत प्रकारें लिहिलें आहे कीं इंग्रज पैका देऊन चाकर करून कुमकास आणिले. त्यानी लबाडी केली. किला देत नाहीं. तरी आपण त्यासी करारमदार केला आसेल तेणेप्रमाणें विलंब लाऊं न देणें. त्यासी पत्रें लिहिलीं आहेत त्यासी देऊन किला हस्तगत करणें आणि किल्याचा बंदोबस्त करणें. त्यासी श्रीमंताचीं पत्रें घेऊन राजश्री रामाजीपंत ममईस गेले आहेत. तेथें काये मजकूर करून येतील पाहावा. आबा पंधरा दिवसांत येणार. श्रीमंतास येथील साध्यांत वर्तमान राजश्री तात्यांनी व राजश्री हरिपंतदादानी लेहून पाठविला. तुम्हांस आंगऱ्याबाा पुण्यास रवाना केलें. येथील सविस्तर वर्तमान लिहिलें आहे. आठा रोजांत श्रीमंताकडील सांडणीस्वार पत्रें घेऊन येतील. मुख्ये खावंदानी लिहिलें आहे कीं आपल्या-आपल्यात कलेंम करून जाल्या कार्यास आपाये केला. जे जालें तें उत्तम, परंतु याजउपरि किला हस्तगत करणें आम्ही उभयेतांतून येकजण येतों तोपावेतों तेथेंच असावें. राजश्री मुरारजी घोरपडे वगैरे इत्यादिक याचेंहि पारपत्य थोडक्या दिवसांत होईल. लवकरच येतों. मेटे इंगरजांच्या हातास जाऊं न देणें. मेट रोखोन असावें. बहुत-येत्न जाला तरी करणें. किला घेणे. इंगरज लबा-डींत सिरले तरी पारपत्य करून किला घेणें. फिरंगी आणावे. किला घ्यावा हे सरम आहे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Barges—Khanderao, Bhagvantrao and Manaji—to Javji Gauli, conveying to him the purport of the Peshwa's letters on the urgency of wresting the fort of Vijayadrug from the English.*

No. 164] [*February 1756*

जाल्यापासोन वर्तमान लिहिणे म्हणोन लिहिले; यैसियासी जे वेलेस जैसे जाले त्याप्रमाणे स्वामीस लिहित गेलों. अब्रवलगडास आल्यावरी राजश्री खंडोजी मानकर व राजश्री नारो त्रिबक यांची भेट जाली. यासहि सांगितलें कीं, राजश्री तुळाजी आंगरे भेटीस येतांत. धण्याजवल जाऊन; विजयेगड रत्नागिरी व

रसालगड सारी दौलत मागितली तरी देणार. त्यांजकडे राजश्री गंगाजीराऊ खानविलकर पाठविले असत. मेटाकडून फिरावयासी फौज रवाना जाली. तुम्ही समयासच आला. सरखेल येणार, त्याचा ठराव करा म्हणोन सांगितलें; तेव्हा उत्तर केले कीं, इंग्रेजास लाखों रुपये खर्च जाले; तो उद्या येईल. फौज मेटाकडून आंत सिरावयासी गेली. सरखेल धण्याजवळ जाऊन आज्ञा करितील त्याप्रमाणे आइकणार; तेव्हां हे गोष्ट कसी? आता चहूकडून नेटबाजी जाली आहे ऐसे असतां, तुम्ही म्हणता तरी गंगाजीराऊ आल्यावरी काये तो सांगोन करणे; तरी पोख्ता विचार धण्याचे मर्जीस येई ऐसा करावा लागेल. धण्याची आज्ञा निक्षूण ऐसे सांगितलें. इतकेयात गंगाजीराऊ सरखेलाचा निरोप घेऊन आले कीं, भेटीस येऊ म्हणता, श्रीमंताची भेटीस घेऊन जावें; ते सांगितले ते आइको ऐसे सांगितले. यावर उतर केले कीं, रसालगड जयेगड विजये रत्नागिरी देवगड विजयेदुर्ग येणे. चहूकडून नेटबाजी जालियावरून सरखेल भेटीस आले. भेट जालेयावर हे स्थले येणे कठीण पडेल. सरखेलाचा मनोभाव श्रीमंताचे ठायी तरी साक्षीस आले पाहिजे. विजयदुर्गांत हजार माणूस मातबर सरदार घ्यावे म्हणजे इंग्रेजाजवल बोलू, ऐसे उभयेतास सांगितल्यावरून, राजश्री बाजी गंगाधर व गंगाजीराऊ खानविलकर सरखेलीकडे पाठवावें ऐसा ठराव जाहला, तो इंग्रेजहि बंदरात येऊन दाखल जाला; तेव्हा सरखेलीस साफ सांगोन पाठविले कीं, जुझणे असेल तरी किल्यांत जाणे; नाहीतरी हजार माणूस श्रीमंताचे निशाण किल्यात घेणे. निश्चयेरुप सांगोन पाठवाल त्याप्रमाणे होईल म्हणोन सांगोन पाठऊन. आम्ही मनवरावरी इंग्रेजाचे भेटीस गेलो. आंगरे तह करावयाबदल भेटीस येतांत म्हणोन सांगितले. त्याण्ही उतर केले कीं तह करावयाचा जनरालाचा हुकूम नाही. तथाप तुम्ही म्हणत असाल, आणि तो येत असेल तरी माझे तरांडेयावरी यावें. त्याचे कोण बोलावयासी आले असतील, तरी मजकडे पाठवा. त्याचे जबानी आईको म्हणजे निशा होईल म्हणोन बोलिला. आम्ही तरांडेयावरून आलों; तो बाजीपंत गंगाजीराऊ आले. त्याजबराबर त्यासहि आपले सोईरे चिमाजी कडू वगैरे च्यार भले माणूस पाठविले. भेटीस येतांत; मग काये ते आईकों म्हणतात म्हणोन मोघमच सरखेलाचा निरोप घेऊन आले. तेव्हां मनाचा निशा न होये. धण्याची आज्ञा निक्षूण. इतक्यात आपलेहि पत्र आलें. सरखेलीकडून भले माणूस आले ते राजश्री मोराजी सिंदे व बाजीपंतासमागमे मनवरांवरी इंग्रेजाकडे पाठविले. त्याणी वर्तमान सांगितले, तेव्हां इंग्रेजानी साफ पेशव्यांचे हजार माणूस घ्यावयाचे कबूल करून, सरखेलीस तह करावयासी येणे असेल तरी पांचां सां घटकांत रामाजीपंतास घेऊन यावें. ना अले तरी हाकारणी करून, विजयदुर्गाचे बंदरांत जाईन. गेलों तरी किल्यावरून तोफ न जाली तरी

आपण मारगिरी करणार नाही. किल्याच्या तोफा जाल्यावरी आपण लडाईस चुकणार नाही. यैसे पष्टची सांगितले. ते आम्हाजवल येऊन सांगो लागले. तेव्हा अत:पर त्वरा करा मग आम्हास बोल नाही यैसे कडू वगैरे सरखेली- कडील आले होते त्यांजवल सांगितले. त्यास सरखेलच्या मनोदयाचा अर्थ कोण्ही येक ठरावास न ये. इंग्रेज केल्या मुदतीस वाट पाहों लागला. तीन च्यार घटका अधिकच वाट पाहोन, मग हंकारणी करून, विजयेदुर्गाचे बंदरांत आला. येतांच किल्यातून तोफ होऊ लागल्या, तेव्हां इंग्रेज मारो लागला. आम्ही सरकारी अरमार घेऊन, माड बंदरास उतरून, सड्यावरून किल्याजवल आलों. अगोधर हरिपंत फौज मेटाकडून सड्यावरी आले होतें. इंग्रेजानी मारगिरीचा अतिशये केला, ते समयीं आंगरेयाकडील कडूस किल्यांत पाठविला कीं, दोन च्यारसे माणूस सरकारचे निशाण घ्या, मुले माणसे काढा, इंग्रेज अतिशयावर आला आहे, उद्यां जड पडेल, यैसे कितेक सांगोन पाठविले; परंतु किलेकरी न यैकत. आम्हाजवल भरणा पाहातां, आमचे लोक किल्याजवल विहिरीजवल व शाहारकोटात पुढे तोंडावर ठेवणे, तेथें ठवावे लागले. मागे जयेगड रत्नागिरीचे राजकारणास दोन हजार ठेविले. माणकर कृष्णाजी माहादेव आले असतील म्हणोन भरवसा होता ते कोण्ही न आले. आबवल्यास हजिरी द्या म्हणत होतों, त्याण्ही लोक पुढें गेले म्हणोन सांगितले. पाहातां समयास नाहीं. केवलच थोडें राहिलों. तेव्हा हरिपंत कवडे, बरगे, जावजी गौली, याजकडे माहादाजी कृष्ण चांदोडकर वगैरे पाठविले. तुम्ही पायी उतारा होऊन दोन हजार पावेतो, या रात्रीचे समयीं आपली जबरदस्ती असावी यैसे सांगोन पाठविले. ते माघारा आले. फिरोन माणसे पाठविली तर न येत. इतकेयांत प्रहर रात्र जाली. तों इंग्रेजाची गाडदी हजार बारसे माणूस आम्हाजवल आले. आम्ही से दोनसे नारो त्रिंबक होते ते पाणी प्यावयासी म्हणोन गेले. सूर्योदय होये तों मारगिरी होतच होती. गरनाळाचे मारानी किल्याजवल बंदरात अंगऱ्याचे अरमार होतें, त्याजवरी गरनाला येऊन जलाले. किल्यांत जागा जागा अग्न लागली, ते समयी अग्नीचे प्रयोगाचे वर्तमान स्वामीस लेहून पाठविलें. आमचे लोक विहिरीवर दरवाज्याचे तोंडास होते; परंतु दरवाजा तेथून फारच लांब. दुसरे दिवसी प्रात:काली किल्यांत कडूस पाठऊन बहुताप्रकारे सांगोन पाठविले. त्याण्ही पंचवीस माणूस इंग्रेजाचे पंनास सरकारचे व निशाण घ्यावे यैसा करार करून आला. येताच प्रत लोक पाठविले, तों किल्यातून गोल्या मारून इंग्रेजाचे दोन जायां केले. मारतात यैसे होताच दरवाज्याजवळून माघारे आले. हे वर्तमान इंग्रेजास कलतांच अतिशयास पेटून, गरनाला तोफा फटकड्या मोरचेबंदीचें सामान लोक तरांड्यावरून उतरून आले. चहूकडून तेच आले,

तरी विचारें करून इंग्रेजास सांगोन पाठऊन, तिसरा प्रहरपावेतों मारगिरी राहाविली; आणि किल्यांत कडू वगैरा पाठऊन सरकारचे निशाण लोक घ्या, नाहीतरी नाश होईल म्हणोन दोन वेल सांगोन पाठविलें; परंतु किल्यातील लोक ना आईकत. मिठगावण्याहून तुलाजी आंगरे यानी आम्हाजवल येऊन पावावें, तेहि न आले. मग इंग्रेजाने च्यार घटका माराचा अतिशये केला. तेव्हा किल्यातील लोकाचा आव जावोन त्याचे निशाण व लोक किल्यात घेतलें. बंदरासन्मुखच दरवाजा तेथें माहागिरियातून लोक येऊन अस्तमानी आंत गेले. आमचा उपाये राहिला. बंदराचे तोंडास दरवाजा, तेथे इंग्रेजाचे मारगिरीखाले आमचे लोक कसे जाऊ पावतील? तथाप लोकाचा भरणा कलतच. दुसरे दिवसी मनवरावर इंग्रेजाचे भेटीस गेले, त्याण्ही तुलाजीस हाती द्यावा म्हणोन अट धरून, मुंबईहून जनरालाचे पत्र आल्यावर आल्याविना किला देवत नाही, तुमचें निशाण आंत पाठवा, दाहा रोजा जनरालाचें पत्र येतांच किला देतों यैसे बोलों लागला. तेव्हा आंगरें याचा पूर्व द्वेश मनात आणून, लोभी होऊन अशा गोष्टी सांगतो, यैसे चितात आले. हे साद्यंत स्वामीस हुजूर लेहून पाठविलेच आहे. आपल्याजवल भरणा थोडा यैसे मागील पत्री लिहिले नाही; परंतु स्वामीनी कचें वर्तमान जाले ते लेहून आणविले यास्तव लिहिणे जाले. राजश्री गोविंदपंत तात्या आले आहेत; यास हे साकल्य अवगत जालेच आहे. इंग्रेज मालमालियेत नेतो. बंदरात तरांडी येऊन चढवितात. कजिया करावा तरी हा इंग्रेज पातशाही मनवराचा सरदार; याजवल बोलोन कजिया करून सार्थक नाही; उगाच लोकिक; गोवेकर इत्यादिक पडोसी सेर करून घ्यावे. आमची बोली मुंबईचे जनरालाची दरम्याने तो आहे यैसे चितांत आणिले. तुम्ही विचारे करून सांगोन पाठविले. त्यास हे उत्तर केले. ये गोष्टीचा जाबसाल जनराल करील. आम्ही पातशाही चाकर तुमचे आइकत नाही यैसे उतर आल्यावरून जनरालास पत्र लिहिले आहे, व राजश्री गंगाधरपंतास लिहिले आहे. त्याचे उतराची प्रतीक्षा करून आजवरी धीर धरून जनराल दरम्यान आहे, तहनामा आहे, त्यात इंग्रेज सावकार याचे घरी वस्त त्याची चिंता काये? यैसे चितात आणून उतावली न करिता आहों. हाली इंग्रेज निकालावरी आल्याचे पुरवणी पत्री लिहिले आहे त्याजवरून अवगत होईल. आम्ही प्रथम दिवसी आलो, ज्या ठिकाणावरी किल्यासंनिध मुकाम करून राहिलो, तेथेच आजवरी आहों. सेवेसी कलावे यास्तव लिहिले आहे. बहुत काये लिहिणे? लोभवृधि कीजे, हे विनंती.

¶*A descriptive letter, of which the first out of five sheets is missing, giving a long and detailed narrative of the storming of Vijayadrug by the English and the attempts of the Maratha General to secure it from them.*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री नानासाहेबाचे
सेवेसी

विनंती. रामाजी माहादेव येतील, परंतु ऐकत नाहीं. येक म्हणतात कीं राजापुराकडे जातो. येक म्हणतात कीं रामगडाकडे जावें. विजयदुर्गास शह द्यावयाचें उभयेताचें मानस नाहीं. येकाच्या येक मतें वर्तत नाहींत. उभयेतांत कजिया लागला. आम्ही मधेस्ती करून कितेक प्रकारें दोघाची मरजी येक करून पाहतों. परंतु मिळणी मिळत नाहीं. या कजियामुळें खावंदाचीं कामें मनसुबियाचीं बुडालीं. आम्ही ज्याचें ना यैकावें तोच आमची नालस्त साहिबाकडे लिहितात. पूर्वी विनंती केली कीं रामराम कोणास करावा. हशमाचा कारभार बाराभाईचा. तेच गोष्टीस आले. आम्ही उभयेतां राजश्री महिपतराव लक्षुमण निसबत तोफखाना त्रिवर्ग वाडेपाडलास जाऊन मुख्ये स्थलास शह देतों. फिरंगी गेलियावर त्याचा धर सुटला. आवसान कांहीं राहिलें नाहीं. राजश्री महिपतराव कवडे लांझ्यावर होते ते माघारें रत्नागिरीच्या शहास गेले. त्यास राजश्री मोराजी शिंदे व नागो त्रिंबक यांनीं पत्रें पाठऊन नेलें. राजश्री आपाजी नरसीहि त्याजकडे आले होते. कोण्या मनसुब्यास आले होते तेंहि कळलें नाहीं. राजश्री रामाजी माहादेव याचीं पत्रें आलीं कीं पौष वद्य प्रतिपदेस निघोन थोरलें मनोहर तयार जाहलें तें इंग्रजास घेऊन ताबडतोब तुम्हापाशीं मुख्य स्थलां येतों. अंजनवेलीस गुंता जाहाला तर तेथें मोरचेबंदीस लोक जडले आहे ते तैसेंच राखोन त्वरेनें मुख्य स्थलास येतों. इंग्रजाचेंहि मानस आहे कीं आधीं मुख्य स्थल घ्यावें मग दुसरा विचार. याजप्रमाणें त्यांचीं पत्रें आलीं. मानकर यासहि त्यानी लिहिलें कीं वाडेपडलावर जाऊन त्यास शह देऊं. पुढील कर्तव्याचा मजकूर लवकरीच करितों. यैसे असोन दोघांनीं दोहीकडे फाटिलें. सेवेसी सुर्त्य होये हें विज्ञापना.

मतेखान बारगीर आंगारिकाकडील बरा मातबर माणूस चवघाच्या आढलाचा आहे. यासी जामीन राजश्री येसाजी विश्वासराऊ आहेत, यास्तव सेवेसी पाठविला आहे. यासी तैनात करून द्यावी. कामाचा माणूस आहे. सेवेसी श्रुत होये हें विनंती.

¶*The differences amongst Maratha Generals as regards the line of procedure, whether they should go to Rajapur or to Ramgad, are reported to the Peshwa. The writer further informs him that Mahipatrao Kavde has gone to Ratnagiri to ward off an attack and that Ramaji Mahadeo is shortly proceeding to Vijaydrug with the English.*

2874

No. 166] [24-2-1756

पा. छ २९ जमादिलावल

श्री

श्रीमंत राजश्री जनार्दनपंत बाबा
स्वामीचे सेवेसी

पौ शंकराजी केशव सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २३ जावल जाणोन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण पत्र पा ते पावलें. राजश्री मुरारजीराव घोरपडे व मुजाफरखान व सावनूरकर त्रिवर्ग सावनुराजवल घेरले आहे, पारपत्य लौकरच होईल, म्हणोन लिा. त्यावरून परम संतोश जाला. श्रीमंताचा पुण्यप्रताप समर्थ आहे. जयगड विजेदूर्ग फते जाला. रत्नागिरीवर निशाण चढले असेल व रसालगडावरहि चढेल. श्रीमंत स्वामीचे पत्र पा तेहि पावोन सविस्तर कळलें. बहादूरखान बाबी व खंबायतकर मोगल याणी आठ हजार फौज जमा करून घोगे घेऊन अमदाबादच्या रोखे गेले म्हणोन तेथील सावकाराची लिहिली येथील सावकारास आली; यावरून आपणास लिा आहे. मागाहून तहकिकात करून लिहून पाठऊ. सा सा फरगते पंचवीस गलबते फिरंगियाची राजपुरीहून दवणेस गेली. हे वर्तमान आपणाजवल कोणी सांगितले असेल तरी मिथ्यां आहे व श्रीमंताचे पत्र आपण वाचून पाहून लाखोटा करून पुढे लस्करात रवाना करावे. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Shankraji Keshao to Janardanpant, expressing his delight at the news of the Peshwa's success in the Karnatak. He later on writes news about the capture of Jaigad and Vijayadrug.*

No. 167] [8-4-1756

पौ छ २० रजब

श्री

पुा राजश्री जनार्दन बल्लाळ स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. सुभानजी माणकर यांचे पत्र आले तेच पाठविले ते पावले. जंजीरकर शामलानी वलंदेजास वखारेस जागा दिली. फिरंगी इंग्रज येक जाले असिले तरी भारी होतील. कोकण प्रांतीचा मनसबा सर्व नासला. मामलेदार कोण्हात कोणी नाही. बंदर किनाराचे किले जंजीरेयाचा बंदोबस्त जाला पाहिजे, येविसी उपेक्षा करावयाची नाही म्हणून लिहिले ते कळलें. ऐशास

सरकारच्या जागे ठिकाणाचा बंदोबस्त करावा, आपले सरदार एकात एक नाही त्यास एकरूपता करावे, दरंज[1] पडो न द्यावी. या मसलतीचे बाजीकार[2] रामाजी महादेव आहेत, त्यास विरुध असेल ते तेथून काढावे, त्याच्या लगामी तूर्त राखावे, येतद्विषई विस्तारे तुम्हास व गोविंद सिवराम यास लिहिले आहे त्याप्रमाणे ते करितील. तुम्ही त्यास वरच्यावर लेहून येथास्तित रितीने चाले, गड किल्यांचा बंदोबस्त राहे ते करणे. वसई साष्टी प्रांतीहि खबरदारीविसीं लिहीत जाणें. फिरंगी शामल वगैरे यांजकडील बातमी वरच्यावर मनास आणीत जाणे. नबाबाची भेट छ ६ रजबी जाहली. जाणिजे छ ७ रजब सुा सीत खमसैन मयात्र अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa writes to Janardan Ballal Fadnis to take the utmost precautions for the protection of the sea coast where the British, the Portuguese and the Dutch are combining to oppose the Maratha interests. The letter shews that Maratha prestige had declined owing to the Angria's fleet having been destroyed.*

No. 168] [*28-4-1756*

पौ छ १४ साबान

नकल

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
गोविंद सिवराम स्वामीचे शेवेसी

पौ बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणे विशेष. राजश्री बाजी गंगाधर याणी जनरालाकडे मुंबईस जाऊन, बाणकोटचे गाव द्यावे, बाणकोटचे इंग्रजाची चिठी महमद सोफी याणी घेऊन विजयदुर्गास जावे, म्हणजे किला हवाली करितील या प्रमाणे ठराव करून, बाणकोटास उभयेता आल्याचे पत्र रामाजी माहादेव याचे आले. ऐशास बाणकोटचे गावच्या चिठ्या राजश्री बाबा फडणीस याणी पाठविल्याच आहेत. गाव त्याचे हवाली होऊन, त्या इंग्रजांची चिठी घेऊन, बाजी गंगाधर व महमद सोफी विजयदुर्गास गेलेच असतील. इतके दिवसांत किलाहिं हवाली जालाच असेल. इंग्रजानी किरकोल गोष्टी नव्या नव्या काढून लांबणीवर टाकावे हे श्रेहास उचित नाही. जर किरकोल बोलीचाली असेल ते आम्ही पुण्यास

---

१ ढिलाई. २ पुरस्कर्ते, गारुडी

आल्यावर त्याचा मातबर येईल. सर्व आर्थ ध्यानास आणून, उचित ते केले जाईल. येविसी उतम प्रकारे रामाजी माहादेव याणी इंग्रजास प्रबोध करणे तो करावा. किला हस्तगत होये ते गोष्ट करावी. तुम्ही व राजश्री हरि दामोदर व मशारनिल्हे येक विच्यार होऊन, कारेगारी कलेल त्याप्रो करून, किला हस्तगत होय तो आर्थ करणे. किरकोल कलमाविसी येथील परवानगी थोर काम नासेल उजूर न धरावा. कार्य हरप्रकारे रामाजीपंताचीच तारीफ करून करावे. जस बेहतर यान (?)+ गेलियावर जवल नेटून राहावे. जबरदस्त जाहाला म्हणोन केवल भिऊ नये. आधी तो हरतजविजेने कार्य करावे; नाहीतरी जवल नेटून राहावें. येणेप्रो जरूर सर्व मिलोन करावे. वरकड सर्व स्थले हस्तगत जाहलीच आहेत. छ २७ रजब हे विनंती.

¶*Peshwa Balajirao to Govind Shivram, advising him to get back Vijayadrug from the English by negotiation with the help of Ramajipant. If he cannot do so, he is advised to take up an unyielding attitude.*

No. 169] [*29-4-1756*

पौ छ ३ साबान

नकल

श्री

श्रीमंत राजश्री जनार्दनपंत
बाबा[१] स्वामीचे सेवेसी

पोष्य शंकराजी केशव सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २८ रजब जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. राजश्री रामाजी माहादेव व इंग्रेज बाणकोटची बोलीचाला होत आहे. तुम्ही कांही इंग्रेजासीं न बोलणें, म्हणोन लिहिले. त्यास आम्ही मसलत जाहाल्यापासून आजतागाईत तिकडील इंग्रजासीं किमपि बोली करीत नाहीं, व करणारहि नाहीं; व फरासीसाचीं दोन जाहाजें धरिली, त्यास मुसाभुसी, व सुरतेचा कपितान फरासीस त्याचीं जाहाजे, तो, हे उभयता येक आहेत की काय हे मनास अणून लिहिणे म्हणोन लिहिले. त्यास मुसाभुसी फुलचरीचाच,

---

+ 'नच होई तर पान गेलियावर' असें वाचतां येईल. पान गेल्यावर म्हणजे पाणी कमी झाल्यावर (?)

१ फडणीस.

व सुरतेची वखार तालुका फुलचरीचा हे दोघे येक आहेत. भिन्न नाहींत ज्याची हीं दोन्ही जाहाजें तो फरासीस सुरतेचे कोठीचा कपितान. हीं ज्याहाजें खुद त्याचीं थोरल्या जाहाजावर माल साहुकार सुरतकर याचा, व धाकट्या जाहाजावर माल आहे त्यापैकीं पंचवीस हजारांचा सुरतेचे कोठीचे कपितानाचा खुद आहे. वरकड सावकारी आहे. खुद फरासिसाचा माल पंचवीस हजाराचा आहे; व दोन्ही जाहाजें तोफा सुमार तीससुधां फरासिसाचे आहे. सावकारी। मालसुद्धां अजमास जाहाजें खेरीजकरून, येक लक्ष साठ हजार अगर दाहा पाच हजार अधिक उणे होत येसे आहे. मोजदाद होत आहे. त्यास सुरतेच्या कोठीच्या कपितान फरासीस यांणी व अजम सबरदरखान यांणी येथें पत्रें पाठविली कीं, मुसामुसी यासीं दोही जाहाजाविसीं पत्रें पाठविली आहेत, ते श्रीमंत राजश्री पंडित प्रधान साहेबांजवळ दोन्ही जाहाजें, मालसुधां खलास करावीं म्हणोन अर्ज लस्करांत करितील; आण जाहाजें सोडवितील. त्यास जाहाजें व माल अमानत असो द्यावा. खर्च न करावा म्हणोन सुर्तेहून पत्रे आमचे नावाचीं आली आहेत; व नारो त्रिंबक यांसहि आले आहे; व राजश्री नारो त्रिंबक यास पत्र पाठविलें ते पावलें. प्रयोजन लागल्यासी देऊं, व हें फरासिसाचें वर्तमान श्रीमंतास अगत्य लेहून पाठविलें पाहिजे. काय म्हणोन तर दोन जाहाजें व माल पंचवीस हजाराचा तोफा अलाथ अवदान सुधां जाहाजें फरासिसाचीं देणे जाले तरी येवढेच त्यास देवितील. वरकड माल सुरतकर साहुकार व बोहारी व घोगेकर व खंबायतकर उदमी याचा सरकारात पर्याय लाऊन ठेवितील, याजकरितां हेच पत्र लस्करांत पाठवावें. वर खंबाईतकर मोगल अमदाबादच्या रोखे गेला आहे म्हणोन सुरतकर कासीद, काली आला त्याणें सांगितले. तहकीकांत करून लेहून पाठवितों व राजश्री नारो त्रिंबक आमचे गुजारतीनें जाहाजांची मोजदाद करीत नवते, हली कजिया जाहल्यावर करूं लागले. वरकड वर्तमान यथास्थित असे; व स्वारांचीं पथकें आहेत, त्यांस वैशाख वद्य पंचमीस निरोप देऊन पाठवितों. पुढें पावसांत ठेवतां न ये; व इंग्रेजाचे मधरास म्हणजे चिनापटण येथें येका दो दिवसीं जाणार आहेत. अजम नवाब सलाबतजंग याची व श्रीमंताची भेटी होऊन, त्यांचाहि मोरचा देविला म्हणोन लिहिलें ते कळों आलें. बहुत समाधान जाहलें. लस्करची बातमी वरचेवर येईल ते लिहीत गेले पाहिजे. बहुत काय लिहिणें? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Shankraji Keshao to Janardanpant Fadnis, assuring him that he will not interfere with the negotiations carried on by Ramaji Mahadeo. He later on refers to French ships seized by him.*

2878

No. 170] [April 1756

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. शेवक गोविंद शिवराम कृतानेक सांष्टाग नमस्कार विज्ञापना. आज्ञा कीं इंग्रजास साष्टी द्यावी. इंग्रज येऊन यैवनाचे पारपत्य सत्वर होईल तें करणें म्हणून आज्ञा. त्याज इंग्रज आधीं साष्टी मागतात व लोक लढाईस येतील त्यांस पैका द्यावा म्हणतात व जे लोक येतील ते येतील. पांचशाहून आधीक व दोन हजाराहून उणें, तेव्हां मोगलाचें पारपत्याची बेगमी दिसत नाहीं, यैसें सेवेसी पूर्वी लिहिलें त्याचें उत्तर आलें तें पुर्ते सेवकास समजेना. त्यामध्यें श्रीमंत मातुश्री बाईनी सातारियास जावयाची आज्ञा केली. तिकडे गेला तों मागती वर्तमान आइकलें कीं राजश्री रामाजी माहादेव यास परभारें पत्रें इंग्रेजाचें राजकारण करणें म्हणून गेलीं. त्यास राजश्री रामाजीपंतीं गंगाधरपंत मेहेनदले मुबईस पाठविलें; बोलणें होत आहे. सेवक इकडे गेला. तिकडून राजकारण होऊन सरकार काम जाहालें तरी उत्तमच जाहालें. सेवकाचें हांतून न जाहालें म्हणून मी अजुर्दा नाहीं. ह्याकालीं हरकोणीहिकडून तरी सरकार कामें जाहाली पाहिजेत. सेवेसी श्रृत होये हें विज्ञापना.

¶*Govind Shivram writes to the Peshwa that he has already informed him about his talks with the English for combined action against the Mughals and adds that he is not sorry that the negotiations have been continued through Ramaji Mahadeo. He only desires that the Peshwa's interests should not suffer.*

No. 171] [4-5-1756

पौ छ ८ साबान

मंदवार अस्तमान

श्री

श्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबा स्वामीचे सेवेसी

पोष्य रामाजी माहादेव सांष्टाग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून तागाईत वैशाख शुद्ध पंचमी इंदुवारपावेतों वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री भास्करपंताबराबर पत्र पाठविलें तें त्रितीये प्रहरीं पावलें. सविस्तर मजकूर * * * सांगितला. त्यासी दासगात्र न द्यावें, हाच मजकूर फार करून आक्षेप सर्वांनीं मनांत आणून फिरोन मशारनिलेस पाठविलें. तरी आम्ही प्रथमता हाच मजकूर अवघड जाणोन आम्ही हिंमतगडास गेलों.

जितकी युक्त मनोधारण करावयाची तें रितीनें केलें. त्यानें परिच्छिन आम्ही सावकर लोक जागाहि श्रीमंतास मागितली, कीं सावकारीस माल उतरून वखार घालून उदीम करावा. त्यासी माहाड दिल्याखेरीज जागा नाहीं. ती जागा माहाराजाची. जिल्हें दुसरियांचे. वखारीस जागा सता होणार नाहीं. तेव्हां बाणकोटास आम्ही काये करावें? तेव्हां मग सोफी वगैरा त्यांनीं हा निकाल काढिला. दासगांव दिल्यानें माल वखारीस जागा, वाणी उदमी येऊन माल भरून घेऊन जातील, हें समजाऊन सांगितल्यावरून निदानीं कबूल केलें. +कुंबलेंही नेमणूक करून करार करून तपशीलवार याद आपणांकडे पाठवितों. वरकड चुकल्यास न करावें हें कदापि न होत. आतां त्याचे हातीं आपली वस्त आडकली. सबब जी म्हणेल ते आइकोन जागा हस्तगत करावी. वरकड येसवंतगड आलिकडे घाटग्यानीं बांधिला आहे. खाडींत नस्तावरी इंग्रज राहिला तेव्हां तह करून हद मोतांद[1] केल्यानें उत्तम. तथापि पुढें मागें नेवादिगर[2] केल्यास फारसा गुंता पडत नाहीं. जैसी ज्याची नेयत त्याप्रमाणें फलादेश होईल. आतां इतका विचार करून समजोन दासगाव द्यावें. किला डोंगर, पाणी नाहीं, गडगा आहे. त्यासी माहाड मजबूत करावें. त्यामध्य पुढील आचरणाप्रमाणें विचार होईल. या मध्या आज कांहीं जात नाहीं. जागा हस्तगत जाहालियावरी मग पुढें फारच पेंच आहे. प्रस्तुत येजमान स्वामी फिरल्याचें वर्तमान आलियावरी पुढील विचार मातबर आहे. असो. शामलानें वलंदेजी येक तिरकती जाहज आणून कांहीं काल राजकोटानजीक शामलाच्या हवेलींत माल भरिला आहे. शें पंनास टोपीकार आहेत. फिरंगी नाहींत. आम्ही भला माणूस कागद पाठविला. स्नेहकरून ममतायुक्त त्यानीहि जाब पाठविला. आतां इंग्रजाचा घरोबा तुटत नाहीं. येणेंकरून शामलासहि भारी आहे. इंग्रजी मनवर अद्यापि विलाइतीस जात नाहीं. हा मजकूर काये होतो हें पाहतात. यासीहि वसवसा आहे. बलकवडे बिरवाडी वगैरां ठिकाणीं आपल्या तालुक्याचा बंदोबस्ताबद्दल पाठविलें तैसें राजश्री मोराजी शिंदे रेवदंडियासी पाठविलें. साद्रीस म्हालोजी मुठे व सुभानजी विस्वासराव हशम लोक मनवर देखील पाठविला, हा बिचार मागें आपण लिहिला. अर्थ चित्तांत आणिला. आम्ही मध्यान्होन समयासी उपराळा पडे ऐसें राहोन साद्यांत आर्थ आपणांस व लस्करांत लिहिला. तेथील आज्ञा आली कीं विजेदुर्ग सदा संभाळून जा * करून बिघाड न करितां मुल्लक पाठीं घालून राहावें. तेव्हां बिघाड न करावा, हें प्रमाण जागा बांधावी तेव्हां सहज कजिया वाढला. तेव्हां मनवर खसतां टोपीकर

+ ? [1] मोतादी = मर्यादित. [2] विरोध.

मायावी. सारांश ह * * * * * * * * * यास्तव समाधानरूप काम करून घ्यावें. यास्तव राजश्री गोविंदपंताचे विच्यारें करून बाजीपंत पुढें पाठऊन हा मनसबा करून मुंबई पाठविलें. त्यासी आपलीहि निकड याच रितीची. वरकड आतां मनसब्याचे रितीनें आम्ही लिहिलें. आपणांस दुसरें समजावितात येक प्रकार याजमुळें चित्तात येत नाहीं. तरी प्रस्तुत समजोन दासगांव घ्यावें. किला कदीम आहेसा नाहीं. समयासी गडगा आहे. नामी जागा धीर धरून राखावीसी नाहीं. त्यामध्या खासी स्वारी आलियावरी हा विचार पाहत आसा. नस्तावरी बाणकोट. तेव्हां माहाडानें कोटापरियेंत काळजी राखावी तरी सबल पक्ष तह करून जागा मालास द्यावी, हें उत्तम आहे. आजच समयीं गोविंद शिवराम याचें पत्र आलें तें बजिनस पाठविलें त्यावरून विदित होईल. आम्ही हा मनसबा सेवटास न जातां विजेदुर्गास गेलियासी हे जागे निराश्रित. मनवर मुंबईस असतां जेथील तेथें बंदोबस्त राखिला पाहिजे. मुख्य आज कांहीं इंग्रजास बेदावा लेहू देत नाहीं; पुढें आचरेनाप्रमाणें फलादेश प्राप्त होईल. आतां निमित्यास जागा बोलावयासी बाणकोटा देऊ. * * * गाव न दिलें हें * * * * * * * हें कबूल करून फिरोन बाजीपंत मुंबईस पाठविला. याउपरी केले बोलीस अंतर नसावें. विजेदुर्ग द्यावयाचें पत्र घेऊन बाजीपंत आलियासी दासगांव घ्यावें. पुढें कितेक मनसबे आहेत. राजपुरकर लोकांस आंजीवेलीस ठेविलें आहे. अंगारकाचे लोक ठेवितां न येत. आतां तह जाहाल्यानंतर गुंता नाहीं. न जाहाला तरी आज्ञाप्रमाणें दुसरी भरती करून निरोप देतों. आम्ही समजोन संनिध येऊन राहिलों. आसा समयासी जेथें शह * * * स शस्ती प्रा उपर होईल. बहुत काये लिहिणें ? लोभवृद्धि कीजे, हें विनंती.

¶*Ramaji Mahadev discusses the pros and cons of handing over Bankot to the English of Bombay. The whole letter is in the writer's hand and deals with the political situation on the west coast.*

No. 172] *[8-5-1756*

पौ छ ८ साबान मंदवार
अस्तमान

श्री

पुरवणी राजश्री बाबा स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. सातारियाच्या मनसब्यानें इंग्रजास जरब द्यावी, आम्ही मात्र समजोन देत नाहीं, हा मजकूर पुण्याचे मसलतीस मुसदी आणितात, तरी उत्तम

आहे. आतां ज्याची बुध नादानगी शहाणपण आढल्यास आम्हास आज्ञा करार त्याप्रमाणें चालतो. मुख्य आपणच कालहरण करून जागा इंग्रज देत असतां न घ्यावी. बखेडा करून दाखवावें. हें आज्ञापत्र आलें. असो. आतां या प्रकारें म्हणतात, हें सेवटास न जावें. हीच इच्छा बहुताची आहे. तरी जे होणें जाणें खावंदाचें पुण्येंकरून होईल. चिंता नाहीं. इंग्रजाबराबर कजिया लावावा तेव्हां सर्व जागियाचे बंदोबस्त करून शह दिला पाहिजे. यामध्या आपली आज्ञा येईल त्याप्राो करून. खर्चाची हलाखी या उपरी कशास ल्याहावी, असो. आपलें पुण्य आहे. बहुत काये लिहिणें हें विनंती.

¶*Ramaji Mahadeo writes to the Peshwa about some intrigue at Satara regarding a settlement with the British on the question of handing over Vijayadrug to the Marathas.*

No. 173] [*Recd. 27-5-1756*

छ २७ साबान.

श्री

विज्ञापना. आपण पत्र पाठविले ते पावले. इंग्रेजाकडील राजकारण न करणे, केले ते कसे केले ते लिहीणे, श्रीमंताचे स्वरूप राहे ते करणे म्हणोन कितीएक निशेधे लिहिलें. त्यास इंग्रेजाने गंगाधरपंत याच्या मारफातीने बोली लाविली, कीं बाजीपंत किला देणे म्हणोन पत्रे घेऊन आले आणिं आमचा जिनस किल्यात आहे तो विकल्याखेरीज आम्ही काही जाणार नाही. मृग जवळ आला म्हणजे जाणेहिं होणार नाहीं. बाजीपंत आले मग रुपये जवळ नाही म्हणाल यास्तव आम्हांस साहुकार दाखऊन जिनस घेणें. जरी जिनस न घेतला तर आम्हाकडे बोल नाही ऐसें सांगोन पाठविले. त्यास बाजीपंत पत्रे विजयदुर्ग घ्यावयाचीं श्रीमंत आल्याविना घेऊन येत नाहीं याचा पर्याय थोडा थोडा पहिला लिहिलाच आहे. बाजीपंत पत्रे घेऊन येत नाहीं ऐसें चितांत साफ आले व राजकारण आले यांत काही काम साधावे ऐसे समजोन इंग्रजासी बोली लाविली कीं तुमचा जिनस साहुकाराजवळून घेवितो परंतु बाजीपंताचे पत्र ये अथवा न ये आजपासून पंधरा दिवसा अलीकडे किला द्यावा. किल्याचे बाहेर निघाला म्हणजे ऐसी हजार रुपये द्यावे. तूर्त वीस हजार रुपये विसार द्यावा. बाजीपंत पत्र घेऊन न आले तर तुम्ही पत्र आणऊन किला आमचे स्वाधीन खामखा करावा ऐसे आणशफतपूर्वक करीत असला तर जिनस घेऊ नाहीतर आम्हास प्रयोजन काय ऐसे बोलिलो तेव्हां त्याणे ही गोष्ट कबूल केली. परंतु पंधरा दिवसात येथे रुो कोठे मिळणार नाहीत

यास्तव आपणास उगाच नफ्याचा बहाणा लिहिला परंतु मेहनत करून रुपये येथें मेळविले. विजयदुर्गी यावे आणि उदीम करावा नफा मेळवावा हे मानस नाही. शिपाईगिरी करावी पाहिलवानी करावी आपण पाठविले ते कार्य करावे ऐसीच चिंता आहे. हरतजविजीने स्वामिकार्य करावे प्राणहि जाऊ परंतु अपेश न घ्यावे हेच चितात आहे. त्यास इंग्रजाने किला इकडे द्यावा हे राजकारण केले ऐसे तिकडे कळल्यानंतर हे गोष्ट होऊं न द्यावी हे मानस फारच धरले आहे. होऊ तरी देत नाहीत व आपणहि कागद घेऊन येत नाहीत. हे वडिलास फार वेळ लिहिले आहे. परिछिन घरीचा फितवा आहे परंतु आपल्या प्रतियास येत नाही! असो. इंग्रजाचा जिनस घेतला म्हणजे पुढें दावा सांगावयास जागा नाही ऐसे म्हटले तरी इंग्रजास मालमालीयेत माफ केली आहे. कारभारी याणी मग इंग्रेजाबरोबर दावा कशाचा सांगणार आहात? इंग्रेज बेमानीवर आला. श्रीमंत आल्यावर किला दिला ऐसे मात्र करावे, आपला कांही अन्याय नाही ऐसे दाखवावे, यास्तव ही पत्रे येत नाहींत. इंग्रेजाकडे कांही गुंता नाही. कागद घेणारच घेत नाहीत. याचे बारीक काय ल्याहावे? असो. साहुकारानी जिनस घ्यावा, किला आम्हांस द्यावा, किला दिल्हा म्हणजे मग रुो द्यावे, ऐसा करार केला आहे. जिनस भात तांदूळ दाळ तूप साखर दारु सिसे लोखंड हा जिनस आहे. आम्ही आज जिनस घेतला आणि त्याणे भरून नेला म्हणजे किल्याची बेगमी कैसी होती हेहि ध्यानात आणून त्रिविक्रमशेट यांचे गुमास्त यांचे नावे घ्यावा ऐसा करार केला आहे. रुपये मुदतीस द्यावे मुदतीस त्याणे कागद आणून द्यावा. इस्तकबील छ ११ साबान ताा छ २६ साबानची मुदत केली आहे. हे राजकारण ते गृहस्त होऊं देत नाहीत. फितवा करितात आपण पत्रे घेऊन येत नाहीत निशा असो द्यावी. आतां मृगसाल आलें. इंग्रेजावर निमित्य मात्र आहे असो. आमचे मुदतीस दोन दिवस राहिले. ते राजकारण मोडितात. हेंच हरतजविजीने बळावावें तरी आपणही पत्रे निरोधपूर्वक पाठविलीं. याजउपर करीत नाहीत. अनयासें जाले तर प्राक्तन श्रीमंताचे. नफा करावयास रुपये आणविले ऐसे नाही. पंचवीस हजार रुो तोटा करावा. परंतु नक्ष करावयास केले होते. आपल्यास न लिो कां? रकार पूर्वक इमानी खरे ऐसा आपल्यास भास आहे. आपण हे कधी करूं देणार नाहींत. म्हणोन नफ्याचे पर्याये लिाा. दोन दिवस मुदतीस राहिले, हे चुकले मृग निघाला, म्हणजे बाळाजी जिवाजी यांस पाठवून देतो. हे साद्यंत सांगतील. येथील मजकूर कधी खता खाणार नाही. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer defends his attitude in having negotiated with the English for the occupation of the fort of Vijayadrug which the British refused to hand over to the Marathas. He adds that he negotiated the affair in sincere regard for the interests of the Peshwa.*

2883

No. 174] [*11-6-1756*

पौ छ १२ रमजान

आंठ घटका रात्रीस पावले

श्री

॥ श्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबा स्वामींचे शेवेसी

पोष्य रामाजी माहादेव साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १० रमजान पर्यंत जाणोन स्वकीय लेखन करवीत असावें. विशेष. बाणकोटकर उइलीम अंब्रुप्रेस इंग्रेज याजकडें राजश्री भास्करपंत दिा शिर्के यांस व गणेश परशराम यांस छ ९ मिनहूस पाठविलें होतें. ते त्याचे बोलीचा अर्थ मनास आणून काल दोन प्रहरां आले. याणी आमचे निरवणीप्रमाणें सांगितलें. पत्र दिल्हें तें त्यांणी वाचून पाहिल्यावरी जनरालाचें पत्र त्यास आलें आहे तें त्यांणीं या उभयेतांस वाचून दाखविलें. त्या पत्रांतील भाव कीं, विजयदुर्ग जलदीनें घेणें असतां तरी कराराप्रमाणें बाणकोट तालुक्याचे गांव हवाला करिते हें होत नाहीं. तेव्हां त्यांसच दिरंगावर नेणें आहे. ऐसा जनरालाचें पत्रांतील भाव या दोघांस सांगोन बोलों लागला कीं, गांव आमचे हावाला करीत नाहीं, आणि आम्हासच शब्द लावितां. तेव्हां याणी उत्तर केलें कीं, गांव हवाला करावयासी आम्हाकडून अंतर आहेसारिखें नाहीं. बाणकोटचे मुकामीं महमद सोफी पलवकर व राजश्री बाजीपंताचे मार्फतीनें बोली जाली. पेशजीच्या करारांपेक्षां कमज्याजतीं कलमेहि कबूल करणें जालीं. तें समयींचा करार विजयदुर्गाचें पत्र यावें आणि गांव हवालां करावें; त्यांस आजवरी पत्रच आणाविलेंत नाहीं, आणि गांवाचें निमित्य कां ठेवितां ? जरी तुम्हास विजयदुर्गाचें पत्र आणवणें असेल तरी आज आपले हवालां गांव करून घ्या. कदाचित् संशय असेल तरी कराराप्रमाणें सनदां आणिल्या आहेत; वाचून पाहां. खातरजमा होत असेल तरी याप्रमाणें करा. त्याजवरी त्याणें सनदा वाचून पाहून नकलां करून घेऊन माघाऱ्यां देऊन महमद सोफी व त्याणें विचार करून सांगितलें कीं, गांव हवालां केल्याचें पत्र आमचे जनरालास जाईल तेव्हां त्याची निशा होईल. सनदां जनरालास पाहावयासी बाजीपंताकडे पाठवा. महमद सोफी जातील. आमचे पत्र जनरालास सोफी-समागमें गेलें पाहिजे. याकरितां गांव नेमिलें आहेत त्यां गांवांत दोन दोन शिपाई आमचे राहूं द्या म्हणजे गांव आमचे हवालां जाले ऐसा खांतरजमा होऊन जनरालास गांव हवालां जाल्याचें पत्र सोफीबराबर लेहून देतों ऐसें बोलों लागला. तें समयीं याणी उत्तर केलें कीं, गांवांत तुमचे शिपाई बसविलें तेव्हां

गांव हवाला करावयासी बाकी राहिली नाहीं. आणि जरीकरितां जनरालानी विजयदुर्गाचें पत्र न पाठविले तरी कसें होईल? तेव्हां त्याणें उत्तर केलें कीं, जाला करार तो लटका जाल्यावरी मग गांवांत शिपाई कशास राहातील? ऐसें बोलल्यावरी याणी सांगितलें कीं, श्रीमंतांचें देणें यैसें नाहीं. आधीं तरी देऊ नयें. दिल्हें तरी माघारें घेतल्यास तुम्ही तऱ्ही आपलें मनांत काय समजाल? तुम्ही इंग्रेज लोक! तुम्हाजवळ बोलावें करावें तेंच शेवटास न्यावें. ऐसें असतां बोलतां तरी पुर्ता विचार पाहा. त्याजवरी त्याणी सांगितलें कीं, यांत कांहीं जात नाहीं. कदाचित बजाऊन ठेऊं म्हणत असाल तरी गांव कांहीं किलेकोटासारिखे नव्हत. दोन दोन शिपाई मात्र गांवात राहिलें म्हणजे गांव आमचे हवालां जाले, ऐसें जनरालास पत्र लिहून देतों. याउपरी आपले बोलीचा गुंता कांहीं राहिला नाहीं ऐसें लिहितों. मग जनरालाचे विचारास आलें तरी विजयदुर्ग हवालां करावयाचें पत्र बाजीपंताजवळ देऊन सनदां घेतील. न होये तरी सहजेच सर्व गोष्टी राहिल्या. गांवांतलि शिपाई उठोन येतलि. ऐसें बोलल्यावरी याणी उत्तर केलें कीं गांवाचा मजकूर याप्रमाणें बोलतां परंतु वलंदेजापैकी मालाचा बंदोबस्त करून ज्याणी घेतला त्या सावकाराचें कागदपत्र सरकारांत घेऊन याल. जतीखालें आणिला असतां जनरालाची निशा होत नांहीं. याचा विचार काय? तेव्हां अंघ्रु प्रेस याणें सांगितलें कीं, आपल्यास बाजीपंत गेल्यावरी दोन तिन पत्रें जनरालाचीं आलीं, त्यांत हा मजकूर कांहींच लिहिला नाहीं, तेव्हां मी काये सांगावें? परंतु विचारें पाहातां या गोष्टीचा अड फारसा जनराल धरणार नांहीं ऐसें दिसतें. मग न कळें. ऐसी यांची त्याची बोली जाहाली. हें सविस्तर या उभयेतांनीं आम्हास येऊन सांगितलें. तें साद्यंत स्वामीस निवेदन व्हावें आणि येविशीची काय ती आज्ञा यावी, यास्तव लिहिलें आहे. पुनः पुन्हा गांवांचा मजकूर लिहिण्यांत व बोलण्यांत इंग्रेज आणितो; याकरितां जनरालास सचोटी कळावी यास्तव सनदांपत्र त्यांजवळ न गुंततां बाजीपंताकडे सनदां पाठऊन दोन दोन शिपाई इंग्रजाचे गावांत ठेवावें ऐसें आपले विचारें होईल तरी काय तें आज्ञा करावी. यामागें इतकें जालें तैसें हेंहि बाणकोटकर इंग्रजाचें बोलण्याप्रमाणें करून पाहावें; यास्तव स्वामीस हें पत्र लिहून महमद सोफी बाणकोटास आहे त्यास पत्र भेटीस येणें म्हणोन पाठविलें आहे. स्वामीची काय ते आज्ञा येईल तो सोफीचे रवानगीस आज उद्यांवरी नेऊन तटऊन ठेवितों. उत्तर त्वरित येई ऐसें करावें. विजय-दुर्गाकडें जाऊन तिकडील बंदोबस्त करणें म्हणोन स्वामीचीं निकडीचीं आज्ञापत्रें येतात. आज्ञेप्रमाणें सिद्ध; परंतु इंग्रेजाकडील बोलीचें अंत्र आहेच. राजश्री बाजी-पंतास जनरालानें राहाहून घेतलें; तें साष्टीस जाऊन इकडील निश्चयात्मक पत्राची

प्रतीक्षा करीत राहिलें आहेत. बाणकोटकर इंग्रजाचे बोलीचा अर्थ याप्रमाणें महमद सोफीस बाटकोटकरानें राहाऊन घेतलेंच आहे. बोलीचें अंत्र न तुटता निघोन गेल्यास इंग्रेज आपलें मनांत काय समजेल न कळे. श्रीमंतांचें व आपले आज्ञेप्रमाणें केवळ निकर्श करितां नये. साम दाम विचारें साधेल तसें क़रावें, केवळ तोडूं नयें, ऐसे आपली आज्ञा आणि इंग्रेजाचें बोलण्याचा भाव या स्थि(ती)चा. यास्तव जावें न जावें येविशी ल्याहावें म्हणोन आपल्यास लिहिलेंच आहे. राजश्री मोराजी शिंदे व राजश्री राणोजी बलकवडे यांस येणें म्हणोन पत्रें पाठविलीं आहेत. आलियावरी दोघांतील येकांस येथें ठेऊन रसालगड गोवळ-कोटाकडून बंदोबस्त करीत जातों. मोराजी शिंदें येत तों या पत्राचें उत्तर स्वामी पाठवितील. मर्दनगडास सुवर्णदुर्गकरी पांचशें माणूस रवाना करावयाची आज्ञा. आज्ञाप्रमाणें लोकांस ताकीद केली आहे. त्याचे मुलांमाणसांची बेगमी, कापडदेखील पावलें पाहिजे. दूरदेशीं माणूस रवाना होणें, बेगमी जाल्याविना रवाना केल्यास श्रमी होतील; याजकरितां हुजरून नख्त व कांपड येणें तेहि त्वरितच येईल. वांटणी देऊन लोकांचें समाधान करून रवानगी करितों, आणि आज्ञापत्र येईल त्या प्रमाणें निघोन जातों. इंग्रजाजवळ फिरोन बोलीस लागावें तरी खांसा स्वारी अविलंबे होईल, तोपरियेंत बोलीचें नादीं लागलें सोडून न द्यावें म्हणोन बोलीचा जडाव आहे. काम जाहल्यास उत्तम, नाहीं तरी सूत्र आहे. यामध्यें आपली आज्ञा येईल तैसें करूं. बहुत काय लिहिणें लोभवृद्धि कीजे हें विनंती.

¶*Ramaji Mahadeo writes at length an account of the negotiations that were being conducted with the English on the subject of the exchange of Bankot for Vijayadrug. The negotiations were carried through William Andrew Price who was in charge of Bankot. The letter seems addressed to Mahadoba Baba Purandare who was with the Peshwa.*

No. 175] [*15-2-1756*

श्री

राजश्री जावजी गौली

गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो जनार्दन बलाल आसीर्वाद उपरी. येथलि कुशल जाणोन स्वकीय कुशल (लिहीत) जाणें विशेष. तुम्हांस श्रीमंतानी कार्यास पाठविलें आहे त्याप्रमाणें कार्य करालच. तुम्हांपासून अंतर पडणार नाहीं हे

निशा आहे. तदनरूप तुम्ही सर्व येकचित्त होऊन कोण्हेविशी फूट पडो न देतां मुख्य स्थल फत्ते होये, खावंदाचे मनोभीष्ट सिध पावे तेच गोष्ट करणें. येतद्विषईचा कितेक अर्थ राजश्री गोविंदपंत तात्या यासमागमें सांगोन पाठविला आहे. ते सांगतील त्यावरून कलेल. सारांश कीं, जे गोष्टीनें मुख्य स्थल हस्तगत होये ते करणें. येविशई तुम्हांस विस्तारें ल्याहावें लागत नाहीं. मुसलत नेटास आली. आतां सलुखाची गोष्ट होत नाहीं. कोण्ही बोलूं नये, आइकूं नये, करूं नये ! लाखो रुपया खावंदाचा खर्च जाहला आहे त्याचे सार्थक करून मुख्य स्थल घ्यावेंच घ्यावें. असा समय येणार नाहीं. सर्वांनी लगट केल्याने होईल यांत संदेह नाहीं. रवाना छ १४ जमादिलावल. बहुत काये लिहिणें हे विनंती.

¶*Janardan Ballal writes to Javji Gaoli to carry the campaign to a successful issue.*

No. 176] *[1766 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामींचे सेवेसी

आज्ञाधारक रामचंद्र सिवाजी चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २७ जिल्हेजपावेतों शेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर छ १६ जिल्हेजचे आज्ञापत्र सादर जाहाले; तेथें आज्ञा कीं, संभाजी आंगरे, तुळाजी आंगरे याचा पुत्र, यासी बिडी घालून किले सोलापूर येथें अटकेस ठेवावयासी स्वार दिाा रामराव बारावकर सिलेदार व गाडदी याजबराबर पाठविला आहे; तरी पक्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन, पोटास सेर सिरस्तेप्रमाणे देत जाणे म्हणोन. त्यास आज्ञेप्रमाणे मारानिल्यास किले मारी बंदोबस्ताने अटकेस ठेऊन, स्वार व गाडदी यासी रवाना केले आहेत. शेवेसी पावतील. स्वामीचे शेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Ramchandra Siwaji reports to the Peshwa that the prisoner Sambhaji, son of Tulaji Angria, has been received in the fort of Sholapur and will be kept in strong custody.*

No. 177] [February 1756

श्री

राजश्री जावजी बावा
गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो खंडोजी माणकर सुभेदार रामराम विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष. राजश्री तुळाजी आंगरे सरखेल जैतापुरास पेसजी कराराप्रमाणे आले. राजश्री रामाजीपंत येथे आले. कितेक मजकूर आहे; तरी तुम्ही पत्र पावताच निघोन फौजसुधा येथे यावे. दिसगत न लावावी. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Khandoji Mankar invites Javji Gaoli to come with his forces to his place to meet Ramaji Mahadeo who has arrived for the purpose of holding joint deliberations in the matter of the contemplated peace between the Angrias and the Peshwa.*

No. 178] [21-1-1756 ?

श्री

राजश्री जावजी गौळी
गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो तुळाजी आंगरे सरखेल रामराम. येथिल कुशल जाणौन स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. इकडिल कांही कार्यप्रयोजनानिमित्य राजश्री खंडोजी माणकर याजकडेस, राजश्री बाबूराव साटम व राजश्री चिमणाजी कडू देशमूख पाा आहेत. तुम्हास भेटतील. इकडील सर्व आशये सागतील. त्याची पैरवी करून राजश्री माणकर व तुम्ही चितात आणऊन, उतर देऊन, याची रवानगी लौकर केली पाहिजे. स्नेहास अंतर करीत न जाणे. रा छ १८ माहे रबिलाखर. बहुत काये लिहिणें.

लेखन
सिमा.

¶*Tulaji Angria communicates to Javji Gaoli that Baburao Satam and Chimanaji Kadu, despatched on some business to Khandoji Mankar, will approach him. He desires, continues the letter, to be told of the issue arrived at in the joint deliberations held between the two.*

No. 179] [January 1756 ?

श्री

राजश्री जावजी गौळीबाबा गोसावी
यासी

ဝ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य रा. श्रेाा खंडोजी माणकर सुभेदार क्षमराम विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित गेले पाहिजे विशेष. इकडील वृत तरी आम्हीं फौजसुधां व आरमाराची तयारी करून, मुख्य स्थलास जावयाचे उद्येशे निघोन आबलेगडचे बंदरी येऊन, गलबतावर लोक चढवले. तेव्हा, राजश्री तुळाजी आंगरे सरखेल भेटीच्या उद्येसे करून, जैतापुरावर येऊन, मुकाम केला. तो इतक्यांत राजश्री रामाजी आरमारसुधां आले. याजरून आम्ही आजचा दिवस स्वारी मकुब केली आहे. उदईक रामाजीपंताचे व आमचे विचारे जो मनसबा व भेटीचा ठराव होईल, त्यप्रमाणे लिहून पाठवितो. त्याजवरून कळो येईल. आपले पत्राचे उत्तर आलियावरी कर्तव्य ते करून आमचा विच्यार सरखल आलियावरी, राजश्री महिपतराव व राजश्री हरिपंत दादा याचे भेटीस घेऊन यावे, यैसा विचार राजश्री नारोपंताचा आमचा होता. त्यास राजश्री रामाजीपंतहि आले. त्याच्या. विचार काये ते मनास आणितो. तुमचे बोलीप्रमाणे राजश्री सरखेल निखालस जैतापुरावरी आले. पुढें काये तो विचार करणे. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे हे विनंती.

लेखन
सीमा.

¶*Khandoji Mankar writes to Javji Gaoli that after conferring with Ramaji Mahadeo he will let him know his opinion on the intended visit of Tulaji Angria to the Peshwa.*

No. 180] [17-8-1757

श्री

पुरवणी राजश्री बाळाजी पंडित प्रधान दाजी गोसावी यांजसे विनंती उपरी. सांप्रत आपली स्वारी मोगलाचे मनसबियावर ज़ाहाली. न कळे कलह उपशमन होईल किंवा वृद्धीस जाईल. समये पाहून कोण शत्रू कोण्हे समयी कोणती कल्पना धरील आचरेल हा भरवसा नाही म्हणोन व आपण सांगोन व लेहून पाठविले

याचा अन्वये चितांत आणोन आगोधर मनसब्रेयाचा बंदोबस्त करून आरमाराची तयारी थोर करऊन पंचेतालीस पनास पावेतो गलबते सिध केली आहेत. च्यार गुराबा सिध होऊन बंदरात आहे. फिरंगी याची आवई म्हणतात. सांप्रतचा प्रमाण नाहीं परंतु शत्रुवर्गाचा विस्वास धरिता नये. आरमारचे सिद्धतेचा लौकीक सर्वास प्रसिध कळला पाहिजे म्हणोन सदरहू प्रो गलबते जडाव फिरता टेविला असे व खासा स्वारी आरमारावरी होऊन मुंबैपासून तलाव्र करून जजिरे खांदेरीस होतो. आपणाकडून वर्तमान लेहून येत नाहीं, यास्तव लेहून पाटवून सावध करीत जावें. आमची निष्टा श्रमसाहस निखालसपण आपण मात्र जाणतात. तदनुरूप समई आपले संनिध आमचे श्रमसाहस होऊन येतील व करून हे आपण समजोन आहेत. परंतु मामलेदाराच्या कल्पना अनिवार त्यास येत्न नाहीं. सुरलीतपणात द्वैत असेल व मामलेदारी केले ते असो. परकी शत्रूचे अन्वयात द्वैत दाखवावे असे नाहीं. मामलेदारास आज्ञा करणे असेल तर करावी. समई सर्व जडाव येकत्र होऊन दोन्ही मनसबे रक्षावे हे उचित आहे. रा छ १ माहे जिल्हेज बहुत काय लिहीणे कृपा असा दीजे हे विनंती.



¶*This seems to be Manaji Angria's letter to the Peshwa, affirming his loyalty and readiness to execute the Peshwa's orders and assuring him that the writer is vigilant about his naval preparations.*

No. 181] [*10-10-1757*

पौ छ १३ सफर

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री राऊसाहेब
स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक सदासिव रामचंद्र[१] कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकांचे वर्तमान ता छ २९ मोहरमपावेतों मुा अमदाबाज येथास्थित असे विशेष. इकडील वृत तरी हा काल पावेतों शहर हस्तगत जाहालें नाही. दोहों चहूं रोजी युध्यें होत असतें. मोडून गावांत घालतो. या महिन्यांत फौज व पायेदल कांही तोफा व जेजाला

१ सुखटणकरे रामचंद्रबावाचा मुलगा.

सरंजाम येथून निवड करून दाहां विसि कोसी मवास आहेत, जे रस्त आंत नेतात, त्यांच्या पारपत्यानिमित्य पाठविले. त्यांणी बंदोबस्त केला. कोणीं हलका होता तो गांव घेऊन ठाणीं ठेविलीं. खल भारी आहे. त्यांणें तूर्त रानातील दाणा नासतो म्हणोन कौल घेऊन, जामिन्या दिल्या(कीं) येक सेरभर दाणा नेऊ तर गुनेगार. याप्रकारें बंद चहूंकडे केला. भोवत्या शहरचे रस्ते बांधोन, फौजा रात्रदिवस उभ्या असतात. रात्रंदिवस श्रम आजी दाहा महिने येथें जाहालें. दगडासी गांठ. आज अडीच महिने या मुलकांत परजन्य नाहीं. आधींच तीन पायिली धारण होती; त्यांत अनावृष्टी माहागाई फार; तशांत या रानात सर्वीस आज तीन महिने दुखणें भारी; जरीमरी दोनी आल्या आहेत. सर्व सैन्य वेथिस्त, तशांत दिवसरात्र मेहनत. हें दुखणें शहरांतहि भारी, मुलकांतहि तसेंच; तथापि स्वामींच्या पुण्येप्रतापें विनाअमदाबाज घेतल्यासिवाये सोडीत नाहीं. विसा लक्षांखाले आलों. कर्ज फार जाहलें. बाहेर निघतां खलासींच गांठ पडली. बरें, रुणांनबंध प्रमाण. सारांष कांही स्वामीसेवा घडली म्हणजे सर्व श्रम परिहार तोच आहे. सविस्तर विदित व्हावें यास्तव लिहीलें असें. साहेबांकडील बातमी उडते वर्तमान येक प्रकार येतें, यास्तव साकल्य कलावें म्हणोन सेवेसी विनंतीपत्र पाठविलें आहे; तरी तेथील अर्थ सरकारांत फौज किती जमा जाहाली आहे, व राजश्री जनकोजी सिंदे हे कोठें आहेत, फौज किती तूर्त त्यांजवल आहे, व तांम्राजवल फौज किती, तोफखाना सरंजाम सांप्रत कालीं कसा आहे व मराठे सरदार कोणीं त्यांचे त्यांस साहाये जाहालें की नाहीं? येथें वार्ता आहे कीं, राजश्री जानोजी भोसले यांची फौज नवाब निजामन आली यांज-समागमी आली. हें सत्य कीं मिथ्या? शाहानवाजखान यांची हालाहाल कसी? तूर्त बिगाड किंवा मित्रत्व हें सावेंत सेवकास आज्ञापत्रीं आज्ञा करणार धणीं समर्थ आहेत. श्रृत होय हे विज्ञाप्ति.

¶*Sadashiv Ramchandra narrates to the Peshwa his difficulties encountered in pressing on with the siege of Ahmedabad. The writer enquires whether Janoji has joined Nizam Ali with his forces.*

No. 182] [*30-10-1757?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. तागाईत छ १६ माहे सफर मंगलगिरी गोसावी पूर्वी पुणियास होते, प्रस्तुत मुंबईस असतात ते सबदखानाजवळ सहजांत गेले होते. त्यांबरो-

बर निरोप याच अन्वयाचा सांगोन पाठविला. मुनशी मुंबईस गेल्यावरी चवथे रोजीं मंगळगिरीबावानी निरोप येऊन सांगितला कीं सबदखानाचें मनांत कीं हरतऱ्हेनीं मुंबईहून निघोन इकडे यावें. त्यास मशारनिलेची बिशाद जे राहिली आहे ते बरीच आहे. ते कांहीं टाकीन येतां नये; घेऊन यावें तरी इंग्रेजाची चौकी आहे. त्याहीमध्यें तुम्ही अंगिकार करून घेऊन याल तरी येऊं ऐसें म्हणतो. त्यास स्वामीचें पुण्येंप्रतापेंकरून येत्नपुरसर आणों येईल; परंतु इंग्रेजाचा आपल्र तहरह आहे, सेवकांनींच हे गोष्ट धण्यास पुसिल्याविना कैसी करावी ? याकरितां येकिले वर्तमान सेवेसी लिहिलें असें. स्वामी आज्ञा करितील तरी आणावयाचा प्रेत्न करून. आला तरी सुरतेचा संदर्भ हातीं लागतो. येविशी आज्ञा ते शिरसा. फिरोन गोसांवीबावाचे विद्येमानें माणूस पाठविला असे. तो फिरोन जाबसाल आणलि तो सेवेसी लेहून पाठऊन. सेवेसी श्रुत[1] होये हें विज्ञापना.

¶*The proposal of deputing Mangalgiri Gosavi to Bombay to bring to Poona Sabadkhan, an influential nobleman of Surat, with a view to discuss plans to occupy Surat is communicated to the Peshwa.*

No. 183] [December 1757 ?

श्री

यादीदास्त श्रीमंत रा नाना साहेबाचे सेवेशी विनंती करोन जाहला वर्तमान सुर्तं[1] करणे बि तपशील :—

वेसैची[2] आरमार सुरतेस रवाना झाली. यापूर्वी आपणास कळोन आले कीं, श्रीमंत रा ' यांच्रा हेत कीं, सुरतेस कांही खंडणी बैसवावी. तो विचार चितात आणून आमचा कोठीदार इंग्रेज सुरतेस आहे त्यास लेहून पाठविले कीं, मातबर सावकाराशी बोली करावी कीं हकीमाकडे जाऊन अर्ज करावा ऐसाजे श्रीमंत रा यांची मदत घ्यावी, हा यत्न सुगम मार्गी करीत असता, रा शंकराजीपंती आरमार सुरतेचे बारियावर पाठविले, आणि मुद्दा लेहून पाठविला. त्यास आपण उतरला. बाकी हे गोष्ट उत्तम नाहीं. निमित्ये कीं ते जागा बहुत टोपीकराच्या कोल्या असत. त्यांचे सौदागिरीचे रखवालीस तरांडी[3] बारियावर वलेंदेजी फिरंगी वगैरा टोपीकरांची येतील, त्यांचे चालीप्रो हरएक राज्याचा उपसर्ग बारियावर लावूं देणार नाहीं. मनाई होऊन येईल तो करतील व आमचेही एक तरांडे बारियावर आहे व दुसरेही जाणार. आमचे रखवालीस तर

---

१ श्रुत. २ वसई. ३ तरांडे = एकप्रकाचें गलबत.

2892

या गोष्टीची अंजुर्दाय[1] होऊन येईल. हरएक उपसर्गास मनाई होऊन येईल तों पावेतों करतील. यासी दृष्टांत ऐसाजे. हरएक ज्ञातीचे मातबर जागास असता, त्या मधील एक कज्यास निवाला तेव्हां ते दरम्यानें येऊन कज्जा वारावा, न वारे तेव्हां खटखट पैदा होईल. ऐसा टोपीकरांचा दस्तुर आहे. म्हणून कित्येक प्रकारे दोस्तीवर नजर देऊन लिहीले, कीं बारा बंद न करणें. हे गोष्ट चित्तात न आणतां लेहून पाठविलें कीं आमची आरमारी तरांडी सुरतेचे सावकाराची मदत करतात ऐसे गाऱ्हाणे केले.

यासी उत्तर पाठविले कीं, मातबर अदमी एक पाठवावा. त्याजवळ तपशीलवार हकीगत विदित केली जाईल. त्यावर शंकरराव मोरेश्वर पाठविले. त्याजवळ सारी हकीकत सांगितली ; आणि आमचे कोठीदारास जे कांही लिहून पाठविले होते तेंही दाखविले. त्याची वग ताा

मोंगलांचे पादशाहीपासोन शामलास माईखारनेचा (?) तनखा करार केला असे. निमित्ये कीं बारियावर आरमार ठेवून चोर आमदरफ्तीचे दरम्याने येऊन लूट नागाव करितात. त्याची खबरदारी करून आमदरफ्ती सुरळीत चालावी. तर हे गोष्ट त्यांजपासून होऊन येत नाहीं. पैका तो घेतात, तर मतबर पटिंगा[2] घेऊन मार्ग सुरळीत करावा. रखवालीस आरमार ठेवतील त्यास खर्च पाहिजे तर सदरहू तनख्यांतून तक्षीम कीं सारा द्यावा ऐसें लेहून पाठविलें.

यावरोन सावकारांनीं सुरतेचे हकिमाकडे जाऊन अर्ज करावा आणि आमचे कोठीदारांनीं सर्व प्रकारी हकीमास समजाऊन हे गोष्ट कार्याची असे ते मान्ये करावे. यामध्ये सावकाराची खुबी असे. मान्ये झालीयावर सावकारांनीं वेसैचे मुकामी येऊन बोलाचाली करून तह करावा. येण्हेकरून सरकारची किफायेत असे, व दिगांतर कीर्त उजरावा प्रांती होऊन येईल कीं, श्रीमंत राजश्री याचा थोर आश्रमा घेऊन सुरतेचे बारियावर आरमार ठेऊन दंगेदारास तंगी पोहचवून आमदरफ्ती सुरळीत केली ऐसी तूर्त होऊन येईल.

हे सर्व अलीकडे येऊन राा पंताही लिहीले कीं, आपण तहनामा पाळीत नाहीं. हे गोष्ट अनुचित असतां सकुंणाखालीं[3] आणून लिहीलें कीं कौल वटलावा. परके तरांडियासी देतो : आणि त्याचे गनीम सुरतेकर सौदागराची मदत करितो. त्यास उत्तर कीं, जे समयीं सरकार कांपनीशीं ताा श्रीमंत राजश्री सी तह झाला तो वर्तमान विलायतेस पाठविला. त्यावरोन कंपनीचा हुकूम आला कीं, सदरहूं प्रो चालावे. तिलतुल्ये अंतर न करावा, आणि दोस्ती दीनबदीन ज्यारी करावी.

१ अडचण. २ तनखा. ३ शकुना.

कौल वटलावा. एकंदर परकी तरांडियासी न द्यावा. येण्हेकरोन दरसालें रुपये दहा हजार १०००० चे नुकसान सांचोन हुकूम केला कीं तहास अंतर न करणे. ऐसे असतां श्रीमंत रा याही कृपाळू दृष्टि पाहून टोपीकराही आजलग खांवदाचा हुकूम मोडावा ऐसी गोष्ट टोपीकरापासून होऊन आलीं कीं काय? आम्हापासोन खावंदाची आज्ञाभंग होणार नाहीं, निशा असो द्यावी. या उपरान्त सुरतेचे सौदागर आजलग कोणाचे गनीम जाहले नाहीं. आम्हास० अन्यायाखालील (?) आणून रा पंताही श्रीमंत रा चे सेवेशी रुजू असावे. आणि सारे कचाट आम्हावर ठेऊन श्रीमंत राचे सकूणाखाली आणावे हा बेत दिसोन येतो.

रा पंती लिहिले कीं, आपणाकडून तहास अंतर पडेल हे गोष्ट अनुचित. या वरोन पष्ट दिसोन येते कीं रा पंताचा हा हेत. तेव्हां आमचा निभाव उत्तम प्रकारी होऊन येईल ऐसा नाहीं. यावरून फार क्लेशी होऊन श्रीमंत रा आमचे अमैत्रास हर्ष होईल. आपण तो आजपावेतो एकनिष्ठेनें तहनामा पाळतो. एक जरा अंतर देत नाहीं. या उपरान्त श्रीमंत रा चे दोस्तीचे भुकेले म्हणोन हरएक गोष्ट वाजवी अडवली तेहि सेवेशी श्रुत करावयासी अंतर न केला. सांप्रत आमचे मनवार जहाजे आली तेहि वर्तमान रा शंकराजीपंतास ता ठाणीयासी लेहून पाठविले तेच व जात्याही आपणास फौजेचे वर्तमान लहून पाठवावा उचित असे. याखेरीज किरकोळ गोष्ट खातिरात आणता येत नाहीं.

आज मास एक जाहला. सुरतेहून डुंगी एक मुंबईस आमचे पालाचे माघारी आली. त्याजबाबे रा पंती पाठविलें कीं, डुंगी मजकूर पालांनीं वलावा देऊन नेली, तर मालसुद्धां डुंगी पाठवून देणे. न पाठविल्यावर रुपये २५००० याचा मोबदला मुंबईचे सावकाराचा करीन. तर या गोष्टीचे थोर आनंद दिसोन आले. निमित्ये कीं, सुरळीत दोस्ती असतां ऐसी गोष्ट लेखावी योग्य नसे. तर आपण सत्यपूर्वक सांगतो कीं, डुंगी आमचे पालानी वलावा देऊन आणिली नाहीं. आपले जोखमी आली. आमचा पाल मोन्हे होता. म्हणून वलावदार झाला नाहीं. दरीयामधे जहाजे नौरीकी उतारे मार्गे मोन्हे मागा जातात म्हणोन न म्हणावे. जे मोन्हील मागीलचा वलावदार व मागील मोन्हीचा वलावदार. तथापि श्रीमंत रा चे आरमार सुरतेचे बारियावर प्रसिद्ध असतां आम्ही संदुखा संदुखा वलाव देऊन अन्यायाखाली यावे ऐसे नाहीं. त्या उपरान्त ऐसी गोष्टी चित्तात आणिली तर तहनामांत तरांडी पावेतो जागा देतो. दुसरी हकीकत ऐसी जे रा पंत म्हणतात कीं, आपण सुरतेचे सौदागराचे तरांडी-यासी निशाण देतो हे गोष्ट अनुचित असे. निमित्य कीं कंपनीचा हुकूम

कीं मुंबईचे तालुकियाखेरीज दुसरे कोणास न द्यावी. दुसरी गोष्ट कीं जे समयीं मुलनाचा लेक मुंबईस आला ते समयीं पैकियाचा दरकार झाला, तेव्हां सरकारापासोन कार्यानिमित्ये पैका घेतला. त्यास जामीन जहाजे दिली. पैका वसूल होऊन येईल तोपावेतो जहाजे आमची म्हणोन त्यास निशाण दिधले असे. जहाजे आमची, माल आमचा नाहीं, हे गोष्ट रा पंतास लेहून पाठविली. आपण हरएक गोष्टीस सत्यपूर्वक वर्तणूक करितो. किरकोळ गोष्टी खातिरात आणीत नाहीं. माहे मार्गशीर्ष मासी आमची ग्याली वैसेचे बारियावरून सुरतेस जात असतां मार्गी वेसैचे आरमारासी भेट होऊन कितीक गोले मारले. तरांडे आमचे म्हणोन वळख देवी, यासी मचवा सोडोन आरमारावर पाठविला त्यास एक रोज लोक व मचवा कैदेत ठेवून सोडिला. लहान गोष्ट म्हणोन खातिरास आणिली नाहीं. काय निमित्ये कीं, गैरा आदमीपासून गोष्ट झाली असेल म्हणून अमलात न आणिली.

सांप्रत दिवशी मुंबईचे तालुकियाचे सावकार गंगादास रूपजी ताा मञ्चरजी ताा मोराजी किरकोळ सामान सुरतेहून जंबूसरास बतेला जात होता त्यावर कौल वसईचा असता वसईचा आरमारास कैद जाहला. वेसैचे मुकामीं आणोन माल खाली केला. हा वर्तमान कळताच तुमचेमध्ये गुमस्ते असत ते जाऊन आमचे काठीदारास अर्ज केला ऐसाजे. भोवानी दिमत गंगादास नारणदास मोहन दिमत मंचरजी व पांडवजी दिमत मोराजी याचा मेहुणा याही नांवे आपले खांवदाची दिली. जिनसाची याददास्त दिली. तपसिले मुंबईस पाठविली. त्यावरोन रा पंतास लेहून पाठविले कीं, तहाप्रो मालाची चौकशी करोन द्यावा. त्यास गोष्ट अमान्ये केले. निमित्ये कीं, बतेल्यावरील संतमी[1] होती त्यास व याददास्तीस नांवनिशीमध्ये अंतर झाला. यास्तव देवियासी अनमान जाहला तर गुमस्तेयाही नांवे खावंदाची सुरतेचे कोठीदारास दिली. व जाफराबाजेस गुमस्तेचे नांवे संतमी केली होती म्हणोन नांवामध्ये अंतर जाहला. त्यास लेहून पाठविले कीं रा पंताकडील सुरतेस पुतळाजी केशव आहेत, त्यांस पत्र एक देऊन ते चौकशी नावनिशी व माल रुजू होऊन येईल तेव्हां आमचा आम्हास द्यावा. ही गोष्ट मान्य केली नाहीं यावरोन दिसोन येते कीं, रा पंताची अवकृपा आम्हावर आहे. तहमध्ये असे कीं बेकौली तरांडियात माल मिळाला तर रुजू चौकशी न करून द्यावा. तेच वजा आजलग श्रीमंत रा चालवीत आहेत. खावंदाचा आश्रमा असिल्यावर चिंता आहे ऐसें नाहीं. सेवेशी श्रुत असावे म्हणून विनंती

---

1 A manifesto.

केली असे तर रा पंतास बहुतेक प्रकारें आमची निरवणा करावयासी श्रीमंत स्वामी समर्थ आहेत.

¶*This paper contains the history of a trade dispute arising out of the capture of some merchant ships. A certain Parsi merchant of Surat writes in broken Marathi various complaints against Shankraji Keshao, the Governor of Bassein, for submission to the Peshwa.*

No. 184] [*1757?*

श्री

सेवेसी विनंती. स्वामींनीं पत्र पाठविलें कीं सामीकाटा देहराबंदराहून गलबत जिनस भरून येत होतें तें सोडून द्यावें म्हणून इंगरेज यांणीं पत्र पाठविले, त्याची नकल पाठविली आहे. येविशीचा विचार तुमच्या विचारें कैसा? इंगरेजाचा स्नेह रक्षणें तेव्हां जिनसाचा त्यास पैका द्यावा लागेल तरी उत्तर पाठविणें, व तुम्ही लिहिलें कीं गलबताचा जिनस घेऊन कटारा सोडून दिल्हा. त्यास इंगरेजांनीं गलबत देखील मालाचा मजकूर लिहिला तरी ये गोष्टीची तहकिकात करून लेहून पाठवणें म्हणोन लिहिलें. यैसियासी, स्वामींनीं गलबत सामीकाटा देहराबंदरचें म्हणून लिहिलें त्यास गलबत होडी बनामनारे देणी तंडेल अबदला बंद दर लाहूर यैसें तंडेलानीं नांव लेहून दिल्हें. व गलबतावरी माल सांपडला, तांदूल वगैरे त्याचा जाबताच सेवेसी पाठविला आहे, त्यावरून विदित होईल. त्यास मालाचा पैका देणें तरी इंगरेजाकरितां द्यावा; आणि गलबत खटारा तो आम्ही स्वामीस लेहून पाठविलें तेव्हाच गलबत सोडून दिल्हें आहें. तांदुलाचा पैका दर रुपयास पांच पायलीप्रमाणें द्यावा. वरकड गलबत वगैरे जिनस तो सोडिला. तांदूल व हत्यारें मात्र ठेविलीं असेत. तांदुल घेणें तरी दर रुपयास कैली ८।= पांच पायलीप्रमाणें घ्यावे. आम्ही आजीच येका गलबताचें तांदूल मोठे कैली ८।= पांच पायली प्रमाणें दररुपयास घेतलें व सडिक तांदूल साडे च्यार पायलीप्रमाणें घेतलें. तीनसें रुपये तांदुल विकत घेऊन जंजिरें मजकुरीं कोठीस जमा जाहालें. याप्रमाणें घ्यावें. सेवेसी विदित होय. हें विज्ञापना.

¶*The Maratha officer Shankraji Keshao at Surat reports to the Peshwa, in reply to the latter's enquiry, that the captured British vessel Samikata has already been restored and that the cargo of rice may be purchased, the British being paid the cash price which they ask.*

No. 185] [1757 ?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना ऐसीजें कोहज कल्याण साटगांव सांतुरली वाडे पाऊन वसई प्रांत बारे येथील मामलेदार यांजकडे मुलुख आहे, तेथील गांवांस राऊत पाठऊन वसूल न आणावा, आपलेकडे जफ्तीस न ठेवावें. तेथील मामलेदारास बोलाऊन आणोन दंग्यांत रयतेचें गुरू ढोर व तमाम कल्याण व दुसरे सुभे याची लूट लबाडी कोली यांनीं केली आहे तें तहकिकांत करून ज्याची त्याचे जिमेस जेथें थांग लागेल तेथेंच असों द्यावी; पेस्तर हुजूर लेहून पाठऊन आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करावी म्हणोन नवाब मुजफरखां बाहादर समशेरजंग यांस सांगितलें; परंतु त्यांनीं न ऐकोन तमाम मुलुकांत गांवगना चिठ्या करून राउत पाठविले आहेत. झाडून मुलुक येथें जफ्ती नवाब यांनीं आपली बसऊन गावगना गारदी पाठऊन लुटीची वस्तभाव परभारांच नवाब आणितात त्याची तसनस होते. आम्ही या गोष्टीचा शोध घेऊन येक जागां सरकारांत जमा करावें तरी आम्हांस खबरदारी न करणें म्हणोन नवाब सांगतात व मुलुकांतहि शिपाई आम्हांकडील कोठें जावयास प्रयोजन नाहीं यैसी ताकीद केली आहे. आम्ही तों आज्ञेप्रमाणेंच नवाबांबरोबर वर्तणूक करून साहेब चाकरीस आहों; परंतु कोणी नालीस आमची करावयास अंतर करणार नाहीं याची हायेश[१] (?) करणार खावंद धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हें विज्ञाप्ति.

¶*The writer reports depredations of Muzafar Khan Gardi and asks orders on that account.*

No. 186] [28-1-1758 ?

श्री

श्रीमत राजश्री रामचंद्रजी चिटनिवीस
गोसावी

श्नेहपूर्वक आपाजी गणेश असीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल ता॥ पौश व॥ चतुर्थी मुकाम तालुके बिरमगाव गोसावी याचे कृपेकरून वर्तमान येथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असावे विशेष. बहुत दिवस जाले आपणा-

१ हायेश = काळजी? चौकशी?

कडील पत्र येऊन परामृष होत नाही, तरी निरंतर पत्रीं संतोषविले पाहिजे. या नंतर शहर हस्तगत जाले, रा गोपालराव गणेश यानी साडेसात लक्ष रु. घेतले, याचा मजकुर सविस्तर पहिला पत्री लिहिला आहे त्याजवरून अवगत जाले असेल. सांप्रत दरबारी रा. विस्वंभर नीलकंठ पाठविले आहेत. सविस्तर विदित करतील. साहित्यें आपण करतील भरवसाच आहे. कागदापत्राचे साहित्यें आपण वरचेवर केले. आपले कृपेने स्थळ हस्तगत जाले. देणियाचे पेचात बहुतच आलो. विस्तर पत्री लिहिता येत नाही. मागील हिसेबाची मखलासी होणे. पंत मशारनिले विनंती करतील. साहित्य केले पाहिजे. कृपा लोभ कीजे हे विनंती.

¶*Appaji Ganesh to Ramaji Chitnis, requesting help in the adjustment of accounts and expenses incurred in the capture of Viramgaon* (?)

No. 187] [*24-4-1750*

पौ मुा पुणे छ २७ जमादि-
लावल प्रहर दिवस प्रात:काळ

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
दिनकरपंत स्वामीचे सेवेसी

पो रामाजी महादेव सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत असिले पाहिजे. कालच्या रविवारीं प्रहर दिवसास प्रस्थान करून तो दिवस ठाण्यांत होतो काल इंदुवारीं संध्याकाळी उरणास आलों. त्यास राजश्री मानाजी आंगरे वजारतमाब याची शामलाची स्पर्धा लागून मुलकाचा नाश करून प्रस्तुत दोन हजार माणूस जंजिरा व सुरत मिळोन आलें. चार गुराबा तीस गलबतें आरमार ऐसे येऊन थळच्या कोटास सिकंदा केले होते. मानाजी आंगरे यानी फारच लिा त्यावरून उरणाहून परभारे थळास आलों. राजश्री नारोपंत व राजश्री मोरोजी सिंदे व राणोजी बलकवडे व आम्हाकडील वसईचे लोक मिळोन शामल नेस्तनाबूद केला. हजार माणूस पावेतो कापिलें व बुडविलें व धरिलें. नाश हजार माणसाचा झाला. च्यार गलबतें धरिली. पांच तोफा घेतल्या. मानाजीबावावर येसान पुर्ते केले. याउपरी जलदीने येतो राा छ २७ जमादिलोवल. बहुत काय लिहिणे? लौकर येतों. लोकांनीं फारच शर्त केली आहे. पुढेंहि करितील. लोकांस समाधानपत्रें बहुमान करविला पाहिजे. मानाजीबावाचा खातरजमा पुरवला

आहे हे विनंती. नारोपंत सुभेदार वसई याणीं पायउतारा करून येसमई फारच केली आहे हे विनंती. भेटीनंतर सविस्तर कळेल.

¶Ramaji Mahadev to Dinkarpant, reporting a naval engagement between the Sidi and the Angria supported by the Peshwa's force.

No. 188] *[21-4-1750*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वा-
मीचे सेवेसी

आज्ञाधारक राणोजी बलकवडे मो। वरसोली नजीक हिराकोट कृतानेक विज्ञापना. ता। छ २४ माहे जमादिलोवल पावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे व मामले मा।रचे वर्तमान येथास्तित असे विशेष. राजश्री मानाजी आंगरे याचा व शामलाचा कलह पेसजीपासून लागला आहे. त्यास छ २० मिनहूस आलीबागाहून वर्तमान बाजारआवईने आले की, शामलाचे अरमार सुरतेहून सिदी मसूदखान याकडून येऊन शामल थलास उतरला. तेथे थलचे कोटानजीक वजारतमाब याचे व शामलाचे युध्ये जाले. वजारतमाब यास जखम लागली व राजश्री राघोजी आंगरे यास धरून नेले. थलचा कोट शामलाने घेतला म्हणोन वर्तमान यैकिल्यानंतर उपराला करावयाचे जाले. यामुले सेवक तीनसे माणसानसी छ २१ मिनहून रिघोन येथे आलो. राजश्री मोराजी सिंदेहि येऊन पोहचले. येथे आलो तो राजश्री राघोजी आंगरे सेवकास सामोरे येऊन वरसोलीस राहावयास जागा दिला. येथील वर्तमान मनास आणिता राजश्री मानाजी आंगरे यास मांडीवर गोलीची जखम लागली. त्याणे भेशारनिले जेर आहेत. शामलाने दोन तीन हजार माणूस थलास उतरोन थलचे कोटास मोर्चेबंदी केली आहे. आरमारहि तडीस कोटानजीक धरोन इकडील माणसाचा पराश्रम तोफेचे मारामुले कोटाकड होत नाही. गनिमाची सख्ती फारच आहे. या प्रकारचे वर्तमान आहे. सेवेसी निवेदन व्हावे म्हणोन लिहिले असे. पुढे होईल वर्तमान ते मागाहू(न) लेहून पाठवितो. जाले वर्तमान सेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

हे विज्ञापना.

¶An action between the Sidi and the Angrias is described in this letter from Ranoji Balkavde. The Sidi landed a force three thousand strong and invested the fort of Thal. In the action that ensued Manaji Angria was repulsed and sent for help. Ranoji Balkavde, one of the Peshwa's commanders, reports he has arrived near Hirakot and will soon engage the enemy.

No. 189] [1-5-1750

पौ छ ११ जाखर त्रितीयप्रहर

श्री

राजश्री दिनकरपंत दादा
गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो राणोजी बलकवडे रामराम विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे. हुजुरून आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा की, तीनसे माणूस निवड करून नामी नामी सरदार समागमे घेऊन तुम्ही खुद महिमतगडास जाणे. त्याजवरून तयारी करून लोकाची निवड करून यावयाची सिधता केली. त्यास राजश्री मानाजी आंगरे वजारतमाब याचा व शामलाचा कजिया पेसजीपासून लागला आहे. प्रस्तुत शामलाने सुरतेहून अरमार व लोक आणून शौकी[1] करून खुशकीस उतरून थलचे खुबलडियास मोर्चेबंदी केली. मानाजी आंगरे याचे व शामलाचे युध्ये बरेच जाले. मानाजी आंगरे यास मांडीवर गोलीची जखम लागली. गनीम भारी. त्याचेच फौजेने जुमस न खाई, तेव्हा माारनिलेनी राजश्री कृष्णाजी तुकाजी चिटनवीस रेवदंडियास राजश्री मोराजी सिंदे याजकड पाठविले. त्यानी येऊन मोराजीबावास हाती धरून घेऊन गेले. सिंदे माारनिलेनी जातेसमई आम्हास निरोप पाठविले की, तुम्ही दोन तीनसे माणसानसी उपराला करणे. त्यावरून आम्ही दोन तीनसे माणसानसी स्वार होऊन गेलो ते वरसोलीस जाऊन राहिलो. पुढील विचार मनास आणिता राजश्री मोराजी सिंदे याही तहाचा संदर्भ शामलाकड लाविला होता. परंतु नसरूड नाइके; तो राजश्री रामाजी माहादेव हे फौजसुधा येऊन पोहचले. सारे मिलोन विचार करून येलगार केला. गनीम मारून काढिला. मोर्चे सोडविले. शामलाचे से दोनसे माणूस ठार मारिले व से दीडसे दस्त केले. याप्रकारे शामलास तंबी पोहचविली. उपरांतिक राजश्री रामाजीपंताची आमची भेट जाली. माारनिले म्हणो लागले की, तुम्ही व आम्ही दोन हजार माणसानसी खुसकीने जावे व राजश्री नारो त्रिंबक व मोराजी सिंदे याणी अरमारावरून जावे आणि बाणकोटास मोर्चेबंदी करून घ्यावा. हे कार्ये करावे लागते तरी तुम्ही आम्हासमागमे येणे.

[शिक्का]

महिमंतगडास न जाणे. त्यास आम्ही उतर केले की, आम्हास हुजूरचे आज्ञेप्रमाणे जावे लागते, न गेलो तर खावंदाचा बोल लागेल. त्यास त्याणी उतर केले की, या गोष्टीचा शब्द लागला तरी आपण

---

१ शोखी, मग्रुरी करून.

जाब करूं यैसे म्हणतात. आ * * ता हुजूरचे आज्ञप्रो तुम्हाकड येणे आणि हे तो यैसे म्हणतात. याचा विचार काये करावा तो लिहिला पाहिजे. आपली आज्ञा होईल त्याप्रो वर्तणूक करून. कलले पाहिजे रा छ ९ माहे जमादिलाखर. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनती

मोर्तब
सुद

¶*Ranoji Balkavade reports an action between Manaji Angria and the Sidi in which the former was worsted and suffered a wound in the thigh whereupon succour was rushed to him from Revdanda and other quarters and the Sidi was forced to retreat with heavy losses.*

No. 190] [*26-2-1758 ?*

श्रीभीमाशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्रिंबक विनायेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १७ जमादिलाकर पावेतों स्वामीचे कृपाद्रष्टी करून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. पूर्वी स्वामीनी पत्र सादर केलें तेथें आज्ञा कीं, मावलामधें लोक कोणाचे काये निमित्त जमा जाले आहेत; त्याची चवकसी करून लिहिणे म्हणोन आज्ञा. यैशास येविशीचा शोध मनास आणितां हजार दीड हजार माणसाची रवानगी लोहगडाहून होऊन श्री ॰ येथील रानामधें .साट घेतला आहे. किले जिवधन येथील लाग केला आहे. परंतु तेथें सुचावले हे जाणारच यैसें ऐकतों. राजश्री मानाजी आंगरे तलेगाहून कालोसास गेले. त्यांचा व सिरके याजकडील लोकांचा येकतमता होऊन, विसापुरावर चढोन किल्याचे कार्यें करून, किला सिरके यांचे स्वाधीन करावा; यैसा विचार होऊन, सिरके याकडील लोक त्या रोखें जमा जाले आहेत; म्हणून वदंता आहे. सत्यमिथ्य न कले. ऐकिलें वर्तमान सेवेसीं निवेदन व्हावें म्हणून लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Trimbak Vinayak informs the Peshwa of the intended capture of the fort of Visapur by the combined forces of Angria and Sirke. This Trimbak Vinayak appears to be the same who was later on appointed to the Sarsubhaship of the Konkan.*

No. 191] [4-4-1759

पौ छ १३ रजब

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोपाल संभाजी कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून ताा छ ४ रजब मुा वरासे नजिक सुरत स्वामीचे कृपे-करून सुखरूप असो विशेष. नवसरीच्या मुकामीहून आरमारावर राजश्री नारोपंताकडेस गेलो. इंग्रजाचे आरमार व आपले आरमार येके जागा आहे. राा दामोदरपंत व आम्ही उभयेता गलबतांत बसोन इंग्रजाकडेस गेलो. जंगी बंदर इंग्रजाने घेतले, तेथे त्याची भेटी जाहली. त्यांसी च्यार गोष्टी उतम सांगितल्या; तुम्हीं इकडून मोरचे लाविलेत. आम्हीं तिकडून खुसकीकडून मोरचे लावितों. त्यावरून इंग्रजाने साफ सांगितले, तुम्हीं मोरचे न लावणे. त्यावरी आम्हीं उतर केले "किला पातशाही, शहर पातशाही. तुम्हीं साहुकार लोंक; आजि पातशाहा श्रीमंत आहेत". त्याच्या गोष्टी मगरूरीच्याच आहेत, तेव्हा श्नेह संपादून आलो. अछनमियांचे सूत्र आले, शहर देतो. सिदींकडेस राा दामोदरपंत गेले आहे. किला शहर हस्तगत होत असिले तरी इंग्रजांसी बिघाडले तरी बिघडू. याप्रमाणे राजश्री नारोपंतांचेहि समत आहे. आजिपावेतों इतके वर्तमान जाहले आहे. पुढे होईल तें सेवेसी लिहून बहुत काय लिहूं. कृपानीर असो द्यावी हे विनंती.

¶*Gopal Sambhaji to Peshwa informing the latter of the intrigues of the English for the capture of Surat.*

No. 192] [12-3-1758?

श्री

राजश्री दिनकरपंत दादा

गोसांवी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित बहिरजी बलकवडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ २ रजबपर्यंत यथास्थित जाणोन स्वकीय लेखन करावयांसी आज्ञा केली पाहिजे विशेष. किल्ले पटा येथें राजश्री नारो त्रिंबक राजमाचकर यांहीं शिड्या माळा लाविल्या होत्या, तें काम जाहालें नाहीं

---

१ नारो त्रिंबक.

म्हणोन वेढा घालावा हा विचार होता, परंतु ते गोष्ट घडली नाहीं. किल्ले मजकूरचें कामाचीं गुरें ढोरें घेरली होतीं व किल्ले बावळा येथें स्वारी येऊन वेढा घातला; हें वृत्त आम्हांस कळलियाजवरी किल्ले गडगडा येथें वेढा घालून किल्ला, छ २९ जमादिलाखरीं घेतला. त्यासी किल्ले मजकूरचे किल्लेदारास नक्त रुपये ७०० सातशें व कापड आख ३०० तीनशें द्यावें; याविरहित शिंबदीस रुपये-दोन हजार द्यावें ऐसें करार करून किल्लेदारास खाली उतरून कावनईस घेऊन आलों. किल्ला बहुत बांकी जागा आहे; याजकरितां सेवकांनीं जरूर कार्य करून घेतलें. किल्ले मजकुरीं इस्ताप जेजाला सुमार ८ आठ व बल्कर १ येक येकूण नव दागिने सरकारांत लागले. किल्लेदार हुजूर पाठवावा किंवा येथेंच असो द्यावा त्याची आज्ञा काय? जागिरीचे गांव आहेत त्यांच्या सनदा हुजूरच्या पूर्वीच्या आहेत त्यांची नक्कल करून पाठविली आहे; त्याप्रमाणें जफ्तीची सनद देविली पाहिजे. मी सर्व प्रकारें पदरींचा आहे. मजला आश्रय आपल्या चरणांविरहित नाहीं. माझें उर्जित करून देणार आपण आहेत. सेवकावर नजर देऊन गांवांची सनद पाठवणार समर्थ आहेत. सेवेसी निवेदन होय हें विज्ञाप्ति.

¶*Bahirji Balkavde reports to Dinkarpant the news of the capture of the fort of Gadgada (in Nasik).*

No. 193] [*17-4-1759*

श्री

पुरवणी श्रीमंतर राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती. येथिल वर्तमान ता छ १७ रजबपर्यंत यथास्थित असे विशेष. आपण पत्रे पाठविली ती प्रविष्ट होऊन साकल्यांर्थ कलो आले. सुरतेची बंदी उठावयांकरितां राजश्री येशवंतराव पवार व राजश्री कृष्णाजीपंत यास लिहिले आहे. ते बंदी उठवीतील असे आपले पत्रीं लिहिले आहे, परंतु त्याणी बंदी अद्याप दूर केली नाहीं. आहे तसी आहे. वरकड कितेक बोलीचाली करावयाकरितां राजश्री दामोदरपंत यास पाठवून द्यावे म्हणून उभयतानीं लिहिले त्यावरून मशारनिल्हेस लस्करांत पाठविले. तेथून त्याणी सुरतेत इंग्रजाकडे पाठविले आहेत. बोलीचालीचा अर्थ इंग्रजाचा मनास आणितां सुधीसी गोष्ट कांहीं सांगत नाहीं. प्रस्तुत तेथें शहरातच आहे. पुढें बोलाचाली निखालस काय होईल ते आपल्याकडे लेहून येईल. इंग्राजाने सिदीस त्याचे हवेलीतच ठेविले आहे. सावकार मध्यस्तीस पडोन सिदीनें सरकारी करून तेथें राहावे ऐसे जाले असे.

सिदीचे चेले आहेत ते त्याचकडे आहेत. चार पांच गलबतेंहि इंग्रजानें सिदीस दिली ऐसी बातमी आहे. वरकड पारसखानास अछनचे दिवाणगिरीची वस्त्रे छ १९ रजबी दिली, याप्रमाणे वर्तमान आहे. हुजूरून पत्रे आम्हास आली जे तुम्ही अहा तैसेच राहाणे व सविस्तर वर्तमान वरचेवरी आपणास लेहून पाठविण्याविसी आज्ञा जाली आहे. ऐशास प्रस्तुत जे वर्तमान आले ते आपल्यास लिहिले आहे. पुढें आणखी आढलेल ते लेहून पाठवूं. आम्ही पुढें काय करावे ते आज्ञा करावी. हुजुरून आरमारचे बेगमीकरितां राजश्री शंकराजीपंत याकडून से सवाशे खंडी तांदूल देविले असत, व लाकूडफाटे पाणी भरून माहगिऱ्या पाठवाव्या ऐसे हुजूरची आज्ञा मशारनिल्हेस आली आहे. त्या सनदा पाठविल्या आहेत. तरी आपण त्यास आज्ञा करून तांदूल व लाकूडफाटा व पाणी याची बेगमी मशारनिल्हेकडून सत्वर होऊन येऊन आम्हास पोहचे ते करावे. सिदीस इंग्रजानें गलबते दिल्हियास आपले उपयोगास पडणार नाहींत, म्हणून आम्ही सुरतेस दामोदरपंतास लिहिले आहे. जर त्याणी गलबते त्यास दिली तर सामान त्यानें जंजिऱ्यास पाठवावयाचे करील. तेव्हा बहुतच कजिया पाठविलात. बंदी शहरची उठणार नाहीं म्हणून सुरतेस लिहिले आहे. पारसखानाचे लेकाचें नांवें किल्लेदारीची वस्त्रे होणार. त्यानीं बाहेरच असावे, परंतु किल्याचे जागिरीस आटकाव होईल, यास्तव करीत आहे. हे सर्वानसर महागमनी आहे. सारे इंग्रेजांत शाहणा आहे. येणेप्रमाणें इकडील वर्तमान आहे. सेवेसी कलावे. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

वसईकराचे आरमार झाडून येथून गेले. डाहाणूस म्हणून गेले हे विनंती.

¶*News-letter from Surat, informing the Peshwa that the Sidi has been allowed to reside in his palace and that Faraskhan has been appointed Deputy Governor.*

No. 194] [*10-4-1758?*

श्री

श्रीमंत पंतप्रधान स्वामी साहेबाचे शेवेशी

सेवक आज्ञाधारक मेहेरजी मुलहेर मुक्काम बंदर सुरत साष्टांग दंडवत विनंती विशेष. येथील वर्तमान तागायत छ १ माहे साबान परंतु साहेबाचे कृपादृष्टी येथास्थित असे. साहेबी आपले कुशेल वर्तमान लेहोन सेवकाचा परामर्श करीत असावे. यानंतर येथील हकीकत यैसीजेर. किल्ले पारडीहून राजश्रीनें सो गणोबाराव याचे समागमे देऊन उभयेतास सुरतेस रवाना केले; त्यास येथें येऊन सर्व गोष्टींचा बंदोबस्त करोन तहनामा व घोडे व वस्त्रे वगैरे जनावरे देऊन

राजश्री गणोबाराव व आपले तर्फेनें सेदेबाजीद यैसे सेवेसी रवाना केले ते प्रजंन्यामुळें वसईस अटकले. तो इकडे सर्व सावकार इंग्रेज व चलविले विलंदेज नादरशाई लोक इतकियांत मुख्यें मूलेना[1] स्रेष्ट होऊन सुभियासी पैगाम केला कीं तुम्ही म्हणत होतेस कीं गणोबाराव व मेहरजीस बराबराच निरोप देऊं; त्यास एकास रवाना करोन व एकास येथें ठेऊन घेतले याचा मनसुबा तुमचा कलत नाहीं. श्रीमंताची फौज आणविता कीं काये? यैसी रदबदली लाऊन राजश्री दमाजी गायेकवाड यास पत्रे लिहिले कीं मुलुक तुमचे हातचा जातो; नाहींतर तुम्ही आम्ही एक होऊन ऐसी तजवीज करावी कीं याचा मनसुबा पेस न जाई. हे वर्तमान हकीमास कलले. त्याजवरोन हकीमानें मुख्ये मूलनास एकांतास मसलतेस बोलाऊन फितुर फार होन्हार. इंग्रेजाची लिहिली मुंबईस गेली, यैसी हकीकत जाली ते सेवेसी निवेदन होय. पूर्वीची पत्रे तो हा कालवर सेवेसी पावली नाहीं. आण इकडे तो हा हंगामा जाला. यास्तव येथील अधिकारियाही आम्हास बोलावून सांगितले. श्रीमंतास पत्रे ल्याहावी, आण त्या पत्रांत ल्याहावे कीं मुंबईस इंग्रेजावर ताकीदपत्रे पाठवावी कीं सुरतेमध्यें तुमचे तर्फेनें इंग्रेज आहे त्याजला लिहिणे कीं तुम्हीं आपली सावकारी करणे. दुसरे कोन्हाचे कालेत्रियात न मिलणे. राजेश्री शंकराजीपंतास आज्ञा केली पाहिजे कीं जे वेलेस सुरतेहोन सुभियाचे व आमचे पत्र येईल ते समई दोन हजार मनुष्ये व मातबर सरदार आम्हापासी येऊन पावेत ते करावे सेवेसी श्रुत होय.

¶*A news-writer Meherji Mulher writes to the Peshwa from Surat divulging the schemes of the English in encouraging Damaji Gaikwad to rise against the Peshwa.*

No. 195] [*13-4-1758*?

पो छ ४ रजब

श्रीशंकर

पुरवणी राजश्री नाना गोसावी यांस

विनंती उपरी. घोडियाविसी बहुताप्रकारें लिहिले. त्यास घोडा येथें आला. आमचेहि विचारें हजार बारासे रुपये द्यावे यैसे आहे. त्यास माहाग तो बहुतच. त्यास जो पाठविला त्याचा मेहुणाहि बरोबर आला आहे व फिराऊन न्यावयास आहे. जर हजार दीड हजार करार जाले तर ठेवून; नाहींतर पाठवून

---

१ मोलाना श्रेष्ठ.

देऊन. आपले नापसंदीस आला त्यास इकडे पाठवावा यैसे नव्हते. आपणच फिरऊन माघारा मुंबईस लाविला असता तऱ्ही कार्यास येते. आपले विचारास न ये हे खरेच आहे. बरे बनले तर येऊन; नाहीं तर माघारा लाऊन देऊन. मुलकाचे ताकिदीवसी लिहिले कीं ताकीद करावी. त्यास आम्ही देशांतून वसईपावेतो आले, त्याचे बोभाट आपलियाजवल आला न आला हे आपलियास ठाऊकच आहे. ताकीद बरे वजेने करितो, परंतु हे गुजराथी लोक आहेत, व कमाविसदार हे भारदार आहेत. हरकैसी नालीस ल्याहावी यैसा याचा विचार आहे. आम्ही एक रानातील कडबियासिवाय कांहीं घेतला नाहीं. ते न घ्यावे तर हे मुलकात गवत नाहीं यैसे आहे. त्यास जो आपणाकडे आमचा बोभाट लिहिला त्यास आपण ल्याहावे, की तुम्ही जाऊन तेथें रुजुवात करणे, नाहींतर लटके लिहितां. यैसे लिहित जाणे. इजारदारास हे एक निमित्यच जाले येसे आहे. तेही गुजराथीच होऊन गेले आहेत. लटके ल्याहावयास चुकतात यैसे नाहीं, सारे इजारियामुले बोभाट करितात. सुरतेहून गरबगुरब अथवा ब्राम्हण कोणी बाहीर निघतील त्यास राऊत लुटतील; तरी ताकीद करावी म्हणोन लिहिले. ताकीद उत्तम प्रकारे आहे, शहराबाहेर इंग्रजाच्या चौकिया आहेत, त्यामुले कोणी बाहीर निघत नाहीं. राजश्री नारोपंताचे एक पत्र आले, त्यास तीन दिवस जाले. त्या तागायत कांहींच त्याचा विचार कलत नाहीं. आजी आम्ही आपल्याकडील सिदी सुरतेस पाठविला आहे. किलियांत सिदीकडेसहि जावयास सांगितले. कितेक प्रकारे सांगावयाचे ते जर करितां त्याचे सूत्र आले, किल्ला शहरचे सूत्र आले तरी आपले आज्ञाचा मार्ग न पाहतांच कार्य उरकू. सूत्रांत अहो. आपणास कलावे म्हणोन लिहिले आहे. ' बहुत काय लिहिणे? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*News-letter from Krishnaji Anant that negotiations have been opened with the Sidi at the castle to induce him to surrender the city and the fort to the Marathas.*

No. 196] [*9-5-1758*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री अपाजी गणेश
स्वामी गोसावी यांसी

पौ बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणे. तुम्ही गुजराथप्रांतें जलदीने जावे. ते अद्याप न गेलेस हे कोण गोष्ट? याउपरी पत्रदर्शनी निघोन

जंबुसरास जाणें. बासवाडेकरानी सुतं+च्या राज्यावर बासवाडेकर राज्यानी कजिया केला, त्याचे पारपंत्यास सेखमुर्तजा किलेदार पवागड हे गेले ते धरिले. त्याचे पारपत्यास रा। कृष्णाजी अनंत याणी गोपाल संभाजी यास पाठविले आहे. ते पारपत्य करून सेखमूर्तजाची सुटका करितील. तरी तुम्ही जंबुसरास सत्वर जाऊन किल्याचा बंदोबस्त कसा आहे ते लेहून पाठवणे. किल्यास तुम्ही लेहूनहि पाठवून किलेकराचे पत्र आणून पाठवणे. तुम्ही जलदीने जाणे. जाणिजे छ १ रमजान सुा। तीसा खमसेन मया व अल्लफ. बहुत काये लिहिणे ?

¶*Appaji Ganesh (Bhagwat) who was appointed to the charge of Gujarat is reprimanded by the Peshwa for having delayed his departure. He is ordered to proceed at once to Jambusar and relieve Sekh Murtaja, Killedar of Pawagad, captured by the enemy. Gopal Sambhaji also has been sent on the same mission.*

No. 197] [*20-8-1758*

श्री

राजश्री महिपतराऊ चिटनिवीस
गोसावी यांसी

ꣻ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो मानाजी आंगरे वजारतमाब रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. राजपुरीच्या मुकामी राजश्री रामाजीपंत व आम्ही येका विचारे असतों. कितेक श्रमसाहास करीत आलों. सांप्रत आरमार संपूर्ण आरमारे तयार होत आली. आम्हाकडील तयार होत आले. अवघी येका जागी होऊन सेवाचाकरी करून दाखवावयाचा समय आला असतां आम्हास श्रावण वद्ये द्वितीया रविवारीं ज्वर आला, तो अंगात असतां गुमानांत न आणितां कामकाज सोडिले नाहीच. ज्वर आहे. तो अतीसारावरी घातले. भावना दाखविली ते दिवसेदिवस अधीकच होत आली. ठिकाने राहावे येसे अवसान व राजश्री पंत प्रधान यांसी व आपणास लेहून आज्ञा आणावी इतका अवकाश राहिलाच नाहीं. न सोसे येसे कलोन येऊन राजश्री रामाजीपंतास सांगितलें तेहि परामृशास आले होते. भावना पाहून दंग जाहले. भाद्रपदसुध्ध द्वितीया रविवारीं स्वार होऊन जंजिरे कुलाबियास आलिया दिवसापासोन उपाय मात्र होत आहेत.

+ Sunth.

परंतु गुणास अद्याप आले नाही. येईलच. समर्थास पत्र लिहिले आहे. लांब मजकूर म्हणोन संकलित श्रवण होईल. तरी येसे न करावें, आम्हावरी दृष्टी देऊन अक्षरशाहा श्रवण करावे. उतर पाठवावें रा छ ५ माहे मोहरम. बहुत काय लिहिणे? कृपा असो दीजे हे विनंती.

शिक्का

मोर्तब सुद

¶*Manaji Angria reports to the Peshwa the onset of the illness which, it should be remembered, ultimately terminated his life.*

No. 198] [*14-9-1758*

श्री

राजश्री रामाजीपंत सुभेदार गोसावियासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक मातुश्री लक्ष्मीबाई आंगरे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन, स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. चिरंजीव मानाजी आंगरे यांचे वेथेची धारणा लेहून, आपणास गेलीच होती. उपाये मात्र केले. गुणास काहीच न आले हे जाणोन. चिरंजीव देहांतपर्यंत सावध. तेण्हेकरून आम्हां सर्वाचें समाधान करीत आले व चिरंजीव राघोजी आंगरे यास आज्ञा केली की, श्रीमंताचे सेवेसी गेलो होतो, तेव्हा तुम्हास पदरीं *घातलेच आहे, व रामाजीपंत सुभेदार यांचा सर्वप्रकारें आश्रये करून दिल्हा असे. आपली तपश्चर्या खर्च करून श्रीमंताकडून तुम्हास वाढवितील. अंतर देणार नाहीं. मजपासून मात्र पंत मारनिलेच्या ठाई अंतर पडिले की, मोहिमेच्या प्रसगांत आणि हे अवस्था मजला जाहाली. व्यर्थ गेलो यैसे बोलोन खेद करीत असतां, काल येकादसी सौम्यवासरी त्रितीये प्रहर होतां देवाज्ञा चिरंजिवास जाहाली. समर्थ घात जाहाला. आम्हां सर्वांत आवसान नाही यैसा प्रसंग; परंतु सर्व प्रकारे भरोसा तुमचा मानोन तुमचे पदरी राघोजी आंगरे यांस घातलें आहे. आमचे वार्धिकपण. हे प्र (सं)-गात सर्वाविसी तुमचे भरोसियाचा धीर धरून, अवसान धरून आहों. चिरंजीव आसतां आपण चालविलें तें काही नाही. त्याचे मागे सर्वाविसी चिरंजिवानी चिरंजीव राघोजी आंगरे यास तुमचा आश्रये जोडला आहे, व आम्हीहि राघोजी

आंगरे यास तुमचे पदरीं घातले आहे. श्रीमंताकडून नावरुपास लौकिकास वाढवणार तुम्हीं आहा. विस्तारे ल्याहावेसे नाहीं रा छ १० माहे मोहरम. बहुत काये लिहिणे हे विनंती

¶[*Laxmibai Angria informs Ramajipant Subhedar of the death of Manaji Angria on 13th September 1758.*

No. 199]   [*20-11-1755*

पौ छ १५ सफर

श्रीशंकर

सेवसी विज्ञापना. तोफखानियाची रवानगी लौकर करावी म्हणून एकदोनदां आज्ञा चिठ्या आल्या, त्यास त्याची मखलासी सर्व करून दिल्ही. परंतु जदीद[1] लोक फार ठेविले आहेत. कदीम लोक बहुत करून कोकणांत गेले. त्यांचे दोन महिने चढले. कदीम दीडमाहीकरी व महिनेमहाल त्याचा रोजमुरा व भाड्याचे बैलाचा नवशा बैलाचा आजमासें एकमाहा व कदीम जदीद लोकांचा सालाबाद प्रा नालबंदी दाखल सर्वांचा एकमहा एकूण साठ सतर हजार रुो होतात. याखेरीज त्याजकडील करोलोंची[2] मखलासी आपण लस्करांत करून दिल्ही तो ऐवज, येणेप्रो त्यांचे पद्री ऐवज पडेल तेव्हां लोकांची उचापत वारून स्वारीस निघून येणे सोईस पडेल. येविसी ऐवज देणे म्हणून राजश्री बाबा फडणिसास आज्ञा पाठविली. याखेरीज आज सामाही रोजमुरे किलोकिलाचे तटले होते, त्यापैकीं कांहीक किल्याचे अदा आशभेनीसा[3] बाा द्यावयाची आज्ञा आली ते दिल्हे. कितेक किल्याची आज्ञा आली नाहीं ते नित्य हाका मारितात. त्याचा इलाज आणीक कार्य त्याजवरहि कृपा करून त्याचाहि ऐवज देवावा. नाहीतर पोटावाचून लोक उठोन जातील. त्याच्या मखलाशा होऊन दोन दोन तीन तीन महिने जाले. परंतु ऐवज हातास न आला, म्हणून तटून राहिले. आतांहि आज्ञा न होय तेव्हां किल्याचे लोकांचा बांद उठोन उठोन जातील. त्याची याद किती ? ऐवज देणे राहिला तो लिहून पाठविला आहे. त्याचीहि आज्ञा करावी. पुणियांत दोन च्यारसे लोक हशमी व शागीर्द पेशा आहे, याची रोजमुरेयाची आज्ञा असावी. ऐवजहि नेमून पाा. चाकणेस लोक तोफा गेल्या, परंतु नावाचा सरदार गेल्याखेरीज काम लौकर होणार नाहीं. लोक तोफा गुतून राहतील. सुवर्णदुर्गाहून राजश्री नारो कृष्ण व मोराजी सिंदे याचे पत्र डाकेबरोबर

---

१ नवीन.   २ बंदूकवाले पावलोक.   ३ हसबनीस.

आतांच आले ते सेवेसी पा। राजश्री दामोदर रघुनाथ याचे लिहून आले की तह होत नाहीं. फिरंगी सामील होऊन सुवर्णदुर्गास येणार, याच अन्वये राजश्री रामाजी मा। मुंबईस आले आहेत. त्यांनीं लौकर जावे या अन्वये येथून त्याजकडे लिहून पा। आहे. इंग्रजाकडील जाबसालाचा लडा असेल त्याचे प्रत्योत्तर गेलेच असेल नसेल. गेले तर लौकर रवाना करवावे. म्हणजे इंग्रज व सरकारचे आरमार सहित ते लौकर जातील. पुणियात चौकी पाहऱ्यास लोक नाहींत. आणीक कोठून आणावयाचेहि नाहींत. चौक्याचे बंदोबस्तास ग्रा। प्रो म्हटले तर पाचसाशे माणूस पा। से दोनसे नवे ठेवावया—(पुढें पान मिळाले नाही.)

¶*The writer comments on the impatience and discontent of the troops of the garrison of the various coastal forts owing to the non-payment of the arrears due to them for a long time. He urges immediate payment and restoration of order and confidence.*

No. 200] [*21-10-1758*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी महादेव चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १७ माहे मोहरमपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून मुक्काम राजपुरी येथें क्षेम असो विशेष. सुरतेची बातमीचे पत्र राजश्री शंकराजी केशव याही लिहिले तेच बजिन्नस सेवेसी पाठविले आहे. सारांष समुद्रात निवती (?) पडली विजेदुर्ग व वसई रत्नागिरी येथील अरमार अले नाहीं. लोकाचा भरणा हजिरीचा जाबता आजारी व धडसे लेहून पाठविला आहे. भरणा लोकांचा पोक्ता असावा. राऊत उपरालेयासी असावे, प्रज्यनकाल म्हणोन राऊत पाठवावयासी अनमान न करावा. राजश्री खंडोजी माणकर व सुभानजी माणकर आजारी. राजश्री राणोजी बलकवडेहि मुलकात उंदेरकराचा दंगा म्हणोन बंदोबस्तास गेले. राजश्री मानाजी आंगरे याचे शरीरीं समाधान नाहीं म्हणोन कुलबियासी गेले, त्यासी देवाज्ञा जाली. राजश्री रावोजी आंगरे यासी प्रस्तुत यावयासी अनकूल पडणार नाहीं. राजेश्री मोराजी सिंदे यांचे शरीरीं नक्षूण समाधान नाहीं. थोडथोडा ताप येतो. सर्व पर्याये चित्तात आणून येथील भरणा लोकांचा व रावताचा पोक्त केला पाहिजे. यासमई शामल बंदोबस्ताने जबरदस्तीच करून येणार. तेव्हां अरमार नाहीं तेव्हां बेशक येईल. जंजिरे-

यासी सामान पोहचेल आणि खुसकीसहि लोक जागा जागा आटकेले आहेत. एकादे जागा नेटबाजीनेच उतरले, तेव्हां आपले माणूस बंदरकिनारा जागजागा मोर्चास गुंतले आणि आजारी फार यास्तव हजिरी माहे मजकूरची तपशीलवार सेवेसी पाठविली आहे. वरकड स्वामीचे पुण्यप्रताप निदान पडल्यास साहेब-कामच आहे. येथें जडावाचे माणूस अजारामुले समयासी उपयोगास पडेसारखे अवसान दिसत नाहीं. तरी स्वामीनीं लोक अगर राऊत ताबडतोब रवानगी केल्यानीं सेवकाची अब्रू राहील. जेणेकरून सेवकाची अब्रू राहोन साहेबकाम होये ते करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev writes to the Peshwa from Rajpuri of the various difficulties in the way of prosecuting a successful war against the Sidi. The death of Manaji Angria is reported.*

No. 201] [*17-1-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २९ सफर पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून या प्रांतींचें व सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री नारो तुकदेव सुरतेस रवाना केले होते त्यास मशारनिलेनी बहुत प्रकारें अजम मोईनुदीनखान यासी सांगावयाचें तें सांगितलें. त्यास येक्याण्णव हजार रुपये तनख्याची बोली केली, त्यापैकीं हफ्ता देतों म्हणोन चालवणी करून त्याणी गायेकवाडाची कुमक शहरांत घेतली आणि सेवट गोष्टी गोड बोलोन बेइमानीचा अर्थ दर्शविला. त्याजवर मशारनिलेनी कितेक जबर-दस्तीच्या गोष्टी सांगावयाच्या ते रीतीनें सांगितल्या. त्याहि गोष्टी त्याणी ध्यानांत न आणितां मशारनिलेस निरोप दिल्हा. सारांश सुरतेचे सावकार देखील व सिदी सर्वांस सरकारचा अमल तेथें नसावा हेच त्याची बुध्धि. इंगरेज सिदी देखील हाच त्यांचा विचार हें जाणोन मशारनिलेनी येथें पत्र पाठविलें त्यावरून आगोधर अरमार सुरतेच्या बारियावर ठेविलेच होतें. त्यास कागदपत्र वरचेवर पाठविले कीं सुरतकर बेइमान जाला. यामुलें परिछिन त्यासी बिघाड केला. अरमारचे लोकानी सारे येकदील होऊन सुरती तरांडी कौली बेकौली देखील अत:पर धरणे, त्याजवरून राजश्री आनाजीराव बेलोसे व गणाजीराव बुरूडकर याणी येथील विचाराप्रमाणें साले चलेबी सावकार सुरतकर याचें जाहाज बसऱ्यास फिरंग्याचे

तरांड्याबराबर जात होतें तें दवणेचे बारियावरून युक्तीनें तीन गुराब पुढें पाठऊन त्यास सांगितलें कीं आपण तुला पावितों फिरंग्याबरोबर तूं गेलास तरी कार्याचें नाहीं. यैसें बोलोन फिरंगियाचे तरांडियापासोन मलाखी दांड्याबाहेर गेले आणि जाहाजवाल्यास म्हणों लागले कीं तूं वसईस जाहाज घेऊन चल. तो न येसा जाला. त्यावरून दोंदि दिवस लढाई जाली. मग जाहाज हस्तंगत केलें, तें वसईचे बंदरीं आणिलें. त्याजवर माल काये आहे तो कलला नाहीं. उतरले, तेव्हां कललें; परंतु अजमास दिसोन येतो कीं लाख पाऊण लाख रुपयांचा माल असेल. अधिक आहे किंवा कमी आहे हें उतरल्यावाचून कलणार नाहीं. याउपरी मालाचे गटे चौकसीनें उतरून व चलेबीचा लेक वरता आहे म्हणोन सांगतात व जाहाजाचे भरगीताची वही मनास आणून सविस्तर कलल्यानंतर सेवेसीं लेहून पाठऊन व या जाहाजाचा कौल गुदस्ता त्याणी घेतला होता. गुदस्तां छ ७ रबिलाखरचा कौल आणि दस्त जालियाची तेरीख छ २९ सफरीं जफ्त जाले. बारमाही कौल पावणे दोन महिने कौलाचे तेरखेंन भरणे आहेत. परंतु या गोष्टीवर नजर द्यावीसी नाहीं. काये म्हणोन तरी त्याणी येक्याण्णव हजार रुपये करार केले आणि बेइमान जाले; तेव्हां बेइमानासीं बेइमानच व्हावें लागलें. याउपरीहि पुढें सारे अरमाराचा जडाव करून सुरतेचेच बारियावर रवानगी करितो. स्वामींनी सुरतेचे तनख्यावर यैवज नेमोन दिल्हा आहे याजकरितां तेथेंच त्याचेंच बुध्धीनरूप करावे लागलें. मोजदाद करून सेवेसीं लेहून पाठवितों. आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करून. व या जाहाजाचे लडाईमुळें त्याचे तोफाचे गोल्यानी धर्माजीराव विचारे सरदार याचा येक हात उडोन गेला व खलासी आसामी १ येक याचाहि हात याच गोल्यानी जायां जाहाला. व येक दोन ठार पडले व दाहा माणूस पावत जखमी भारीच जाले आहेत त्याची निगादानी करितों. त्याहिमध्यें धर्माजीराव विचारे फारच जेर आहे. लौकानीहि मेहनत बरीच केली आहे. कदाचित सुरतेहून हरकोणाचें लिहिलें सेवेसीं आले तरी त्याजवर नजर न द्यावी व अहमद इभरामजी सावकार उमरखाडियाचा माल पनास हजार रुपयाचा येणे. गायकवाडानी तो राजश्री नारो बळाल कारकून येथून पाठविले होते ते सा महिने त्याजवल होते. सेवट त्याणी जाब दिल्हा कीं आमचे शत अन्याये आहेत. पेशव्यांचे हातीं सर्व कारभार आला आहे. कर्तव्य तें करितील. आम्ही भये कोठवर मानावे? यैसे उत्तरशेब्द करून नारो बलाल यास सांगितलें. मग हे उठोन आले सेवकाजवल * * सें राऊत राजश्री आपाजी पायेगुडे आहेत तरी आणखी येक हजार राऊत पाठवावे म्हणजे बलसाड नवसरी पावत जाऊन त्याचे मुलकांत यैवज मुबादला करून व सुरतकरानी बेइमानी केली आहे. त्याचें पारपत्य

येथासांगच करावें. त्यास साल मजकुरीं फौज देशांतच राहिली आहे. सर्व राज्याचा बंदोबस्त जालियावर पंधरा वीस हजार फौज व राजश्री मल्हारबासारखे सरदार व पांच हजार हशम सेवकाबराबर द्यावे म्हणजे सुरतेचा कार्यभाग अगदींच करून काये निमित्य कीं अद्यापि सरकारासीं कोणी बेइमानी केली नाहीं. सुरतेकडील वर्तमान राजश्री नारो तुकदेव सेवेसीं येतील हे निवेदन करितील व राजश्री मानाजी आंगरे यांसहि नसियेत पत्र बरेसें पाठवावें. विदित होये हे विज्ञापना.

¶Shankraji Keshao reports the capture of a ship belonging to the Sidi, laden with rich merchandise, after a battle lasting for a day and a half. He further writes that they had been on the look-out for this opportunity, ever since hostilities were declared with the Sidi, who along with the English of Surat desired to see the overthrow of the Peshwa's supremacy.

No. 202] *[20-11-1758*

पौ छ २९ रबिलावल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक संभाजी मंगेश व गणेश त्रिंबक चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. कार्तिक वद शष्टी इंदुवासर तागायत स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान मुकाम मुंबे यथास्थित असे विशेष. छ ३ रबिलावलीं स्वामीची आज्ञा घेऊन निघालों ते आठवे तेरखेस ठाणेयांस आलों. मार्ग चहूं रोजाचा परंतु घोड्यांचें नाल पडले व बैलांचे चालीमुलें सा रोज लागले. शरीरीं अस्वस्थेमुलें ठाण्यासहि तीन रोज मुकाम जाला. तेथून वानरेयास तरीवर आल्यानंतर अजम जनेरल यास सांगोन व पत्र पाठविले; त्यास हात्येर ठेऊन यावयाचा मजकूर पडला तो अडथळा उरकोन हात्यरसुधां जाऊन जनराल यांची भेट व्हावया पांच रोज लागले. छ १६ रोजीं सेवक मुंबैस जातां ते परलास येतां शहरानजिक साईकालची भेट मार्गीं जाली. ठाकुरद्वाराजवल मंडप घालून राहावया जागा दिला तेथ राहिलों आहों. सावकारी आरमार रवानगीची दोन रोज गडबड आहे. उरकल्यानंतर स्वस्त चित्तें बोली बोलणार आहेत. होईल बोली ते मागाहून सेवेसीं लिहोन पाठऊं. वरकड बातमी फिरंगियाची दोन फरगतें भांडतीं व साऊकारी थोर लाहान चालीस येकून सिलसिला बेतालीस तरांडी बंदर मजकुरीं व्यापारास्तव आलीं होतीं. व्यवसाय करून दाणापाणी घेऊन दवणेस गेली. तेथून सुरत बंदर करून दिवास जाणार ही फिरंगी आरमाराची बातमी आहे. फरासीसाच्या भयास्तव व सावकारीनिमित

विलायताहून इंग्रजी तरांडी बंदर मजकुरीं आलीं त्यात दोन मनवार भांडते व सा कुंपिनीची सावकारी येकून थोर दागिने आठ आहेत. महिना पंधरा रोज या जागां असोन उपरांत मदरास जाणार. सुरतेचें आरमार राजपुरीस येणार तें आलिनवाजखान व सिदीच्या वैमानास्तव खोटी होऊन राहिलें होतें. हालीं त्याची चित्तशुद्धि होऊन सामानसुद्धां अरमार येणार येसें वर्तमान आहे व त्याच्या पिछावर सरकार आरमारची स्वारी गेली आहे. येथून इंग्रज आपण होऊन सिदीस सामान पाऊन देत नाहीं. परंतु त्याचे सिबाड माहेगिरी आल्यानंतर दारू गोळी खेरीजकरून वरकड सामान देत असतात. येविसीं व वरकड जाबसाल होऊन जलदीन यावें त्यास त्यांकडून मंदपण होऊन येते. येरवीं जी स्वामीनी आज्ञा आज्ञापिली आहे त्या प्रमाणे अनालस्येंकरून बातमी राखने, सिद्धाई करणें. तेथें सादर असों. सेवेसीं विदित जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶*Sambhaji Mangesh and Ganesh Trimbak report to the Peshwa their arrival at Bombay and their interview with the English General. The movements and the equipment of the Portuguese ships are also communicated.*

No. 203] [*20-11-1758*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १८ माहे रबिलावलपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें व ये प्रांतींचें वर्तमान यथास्थित असे विशेष. सुरतेहून राजश्री आपाजी केशवे[1] यांचे नांवचे पत्र दत्ताजी नारायेण यांचे हातचें त्याजवर राजश्री सदासिव कान्हो यांचें हातचें लिहिलें तें पत्र कार्तिक सुध्ध त्रयोदसीचे तें वद्य शष्टीस संध्याकाळीं येथें पावलें. याचे आगोधरचे द्वादसीचें पत्र पाठविलें म्हणोन त्याणी लिहिलें तें पत्र पावलें नाहीं. न कळे मार्गांत कोल्यानी जासूद लुटिले कीं काये हें न कळे. त्रयोदसीचें पत्र आज शष्टीस पावलें. त्या पत्रावरून सविस्तर विदित होईल. सारांश मियाअछन फिरवावा. अलीनवाजखान येकनिष्ट आहेत. राजश्री माहादाजी केशव याचे लोक सुधां आले म्हणजे आ * * * तील. व मियाअछन यासी

---

१ मराठे.

फिरवावयासी स्वार जरूर पाहिजेत व सिदी अहमदखान याणें कोण्हास आपले मंडलीस न कलतां मियाअछन याचा बेटा चहू माणसानसी किलियांत घेतला. तें सविस्तर राजश्री आपाजी केशव यांहीं पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल व या पत्राचे अलीकडे स्वामीचीं पत्रें मियाअछन व राजश्री कृष्णाजी बाबूराव[१] यांसी गेलीं आहेत कीं मियाअछन यासी फिराऊन सोनगडास नेणें व दुसरे खिजमतगार व चोपदार हेहि मागाहून गेले असेत. व तिसरी पत्रें राजश्री कृष्णाजी बाबूराव व केशवराव मेलगिरी व गायेकवाडाचे लोकास व दुर्जनसिंगाचे लोकास व राजश्री सदाशिव कानो यासी व मियाअछन याचे लोकांस यांसीं तिसरीं पत्रें स्वामीचीं गेलींच आहेत; व आली नवाजखान यांसीहि स्वामीचे * * * ही पाठविले असे. तीं पत्रें आलिकडे सुरत * * * * ली असतील. हें पत्र येऊन आठ रोज जाले. या पत्रावर मियाअछन यांचा जमाव फुटला तरी उत्तम. राजश्री आपाजी केशव याणी तरी लिहिलें आहे कीं स्वार आल्याखेरीज मियाअछन फिरत नाहीं. पत्रावरूनच सविस्तर विदित होईल. राजश्री कृष्णाजी अनंत तरी कोहजेस पाठविले. त्यास पुढें देहजियावर जाण्यासी सांगितलें आहे व सेवग्यास वेढा कोल्याचा आहे. त्याजवर राजश्री आबाजी यादव च्यारसें माणसानसीं पाठविले आहेत. हें पत्र येथें आज सोमवारीं पावलें. त्यानंतरी बुधवारीं राजश्री नारोपंत अरमारसुधां सुरतेचे बाऱ्यावरी निघोन जातील * * रणसोड कृष्ण येथील वकील मुंबईस आहे(त त्यानीं) पत्र पाठविलें कीं इंग्रेजाचें मनवर कांहीं मुंबईस आलें, कांहीं येणार तंबू व गाड्यावर तोफा नेऊन तयारी करित आहे म्हणोन लिहिलें, तेंच पत्र * * बजिनस पाठविलें आहे, त्याजवरून सावंत निवेदन होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. फिरंगी व इंग्रेज येकरूप जाले. कोठे * * * * पाहतात. यैसे लोक बहुत बोलतात. दररोजं इंग्रज नवे माणूस ठेवितो. पहिल्याप्रमाणें निखालस आमच्या वकिलासीं बोलत नाहीं. हें तों वकिलानें लिहिलेंच आहे. परंतु फिरंगी व इंग्रेज येकरूप जाले हें लिहिलें नाहीं; परंतु लोक बोलतात सत्य मिथ्य न कले हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao forwards to the Peshwa a precis of a letter received from Apaji Keshao of Surat in which the writer requested him to send sowars so that Miya Achhan could be won over. The news about the movements of the English fleet communicated by Ranchhod Krishna is also reported.*

---

[१] बर्वे.

No. 204] [23-11-1758

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक संभाजी मंगेश व गणेश त्रिंबक चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत कार्तिक वद नवमी गुरूवासरपर्यंत स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. अजम जनराल बंदर मुंबै याणी परळचे मुकामी बलाऊन नेऊन कागद वाचिले व बोली पुसिली ती स्वामीचे आज्ञेप्रमाणें सांगितली. आइकोन दुभासियां करवीं उत्तरें समजोन प्रत्योत्तरें समजाविलीं. हबसी पातशाई चाकर, मवास होऊन राहिला, तख्ताचें दर्शन कधींच नाहीं. त्याजवर पातशाह इतराज होऊन मामलत दूर केली. जंजिरा गडकोट श्रीमतांस दिले आणि परशराम क्षेत्र वतनी संस्थान निरवैर करावें हा हुकूम करून सनदा दिल्या त्याप्रमाणें मसलत जाली यैसे म्हणता तरी उत्तम. आपण उदमी सावकार लोक, येथें आपला कांहीं कज्या आहे यैसे नाहीं. पातशाई सनदा असतील त्याप्रमाणें कराल व करावें. आपण हे मसलतीस आरमार द्यावें तरी तो दोस्त, याकरितां सिदीच्या स्थलांवर मारगिरीस आरमार देवत नाहीं. बाहीरून चांच्या सिदीस मदत करितो व सावकारी डुबवितो त्याच्या पिछावर आरमार द्यावें त्यास सरकारचें आरमार जाईल त्याबरोबर कांहीं थोडे बहुत आपलें आरमार देईन. हवा पालत सरकारच्या अरमारानें करून गांठ घालावी. चांच्याचीं गलबतें गर्क करावया अंतर होणार नाहीं. प्रस्तुत अरमार द्यावें तरी बंदरचे रखवालीखेरीज राहिले नाहीं, अगोदर मोसंब साधून स्वारीस व उदमास तरांडी गेलीं. आल्यानंतर मान्य असों. आपल्या आरमारान सरकारच्या अरमारावरी गोले टाकिले व हुंदेरी जागा आपला म्हणता ही बात कसी काये, म्हणून पुसिलें तरी हुंदेरी सिद्दीनें आपणांस दिली नाहीं. घेतों तरी आपलें निशाण असतें. तें नसतां कशावरून लोकवार्ता सत्य मानिता, हें आपणांस नकले. उंदेरीस सरकार अरमारचा वेढा आला त्याजवर आपलें आरमार जाऊन गोले टाकिले म्हणून सरदार सांगतात तरी तेंही खोटे असे. येथून आरमार पाठविलें नाहीं व परभारें आपलें अरमार येऊन गोले टाकिले यैसेंही नाही. सरदार पाठऊन खरे लटिकें मोझा[1] करावा. जिकडून अन्याय असेल तिकडून शासन करावें हे बोलीस रजावंद असों. राजश्री निळाजी कृष्णाजी व वृंदावनदास रूपजी या दुभाषीयांचे विद्यमानें उत्तर आइकोन प्रत्योत्तरे केली

---

१ मोझा = चौकशी.

ते चारहि मजकूर सेवेसी निवेदन असावया लिहिले आहेत. विदित होऊन आज्ञा कर्तव्य ते करणार स्वामी समर्थ आहेत. अरमार द्यावया रजावंद असोन प्रतिकूलता दाखविली, त्याविसीं सामदाम व सरकारांतून उपयोगी गोष्टी घडोन गेल्या आहेत त्या त्या बोलोन आरमार मागावयाच्या मुद्यावर असों. गोले मारिले याचे पारपत्य आपल्या सरदाराकडून कोण तो मोझा[1] पुरऊन दिल्यास शिरछेद करीन यैसा जनराल याचा करार आहे. हुजूरूनहि पारपत्याचा काये विचार असेल तैसी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. हबसी मुंबै बंदराहून फावले माने सामान नेतो, यैसियास राजपुरीं जंजिरासारिखा जागा इमारतीनें पका, भोवता समुद्र, लोक येकदील असिल्यास दाणापाणी असेल तो झुंझेल[2], सुलतानढव्यांचा[3] उपाय नाहीं तेथ वेढा पडोन आला. आतां उनाला पावसाला चौगीर्द रखून अन्नाचें मानसिक करावें तेव्हांच बलमोड होऊन आयास येईल. खुसकीच्या मार्गें बंद आहे तैसाच जलमार्गें जाला पाहिजे. इंग्रज आपण होऊन सामान पोंचवित नाहीं. हबशाकडील बो * * माहेगिरी सिबाड हे लहान दागिने, चोरी छपिन आरमारास दगा देऊन मुंबे बंदरीं हरयेक जागां येऊन, उदम्यांकडून जिनस घेऊन जातात, येविसीं अरमाराकडून बंद असावा. उपर सुतें प्रांतें स्वारीस आरमार जाऊन राहिले. मागा आरमारच्या वेढास सिलसिल्यांची नुदर असल तरी वसई साष्टीं प्रांतें माहेगिरया आहेत. शेंपनास पाहिजे रा असिल्यास सरंजाम सुधां अरमारचे भर्तीस देवणार स्वामी समर्थ आहेत. व आरमारचे लोक बेदील असतील त्यांचा दिलासा जाल्यास चोरास मार्ग सांपडेल यैसे तर्कास येत नाहीं. वरकड बातमी वर्तमान सुरतेहून फतेमारी आली. त्याणी सांगितलें अली नवाजखान व सिदीची दोस्ती जाली होती, त्यास पुन्हां कोणेक निमितें फांट पडोन बिघाड जाला. उपरांत मिया आछन याचा मूल सुरतेस होता त्यास सिदीन आपणाजवळ आंतल्या किल्यांत नेऊन ठेविला. पुढें अधिकोतर होईल ते बातमीत असों. फोर्टसंडेविसीं[4] इंग्रजांचा जागा मदरास्त काटास आहे तो फरासिसान घेऊन मोडून टाकिला. पुढें द्वंद आहे. आइकली बातमी सेवेसी लिहिली आहे. विदित जालें पाहिजे. सेवेसीं श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Sambhaji Mangesh and Ganesh Trimbak, the Peshwa's agents to Bombay, supply local news about the English, the Sidi and Miya Achhan. They further report that differences have arisen between Navajkhan and the Sidi and that the son of Miya Achhan has been invited to the fort by the Sidi to stay with him.*

---

१ साक्ष, चौकशी. २ झुंझेल, लढेल. ३ हल्ल्याचा.
4 Fort St. David.

No. 205] [28-11-1758

पौ छ ४ राखर सनतिसा

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक संभाजी मंगेश व गणेश त्रिंबक चरणावर मस्तक ठेऊन सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत कार्तिक वद त्रयोदसी भौमवासरपर्यंत स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. अजम जनराल बंदर मुंबै यांबरोबर स्वामीचे आज्ञेप्रमाणें रुबरू बोली जाली ते कार्तिक वद नवमीचे दिवसीं विनंतीपत्रीं सेवेसीं लिहोन पाठविली. त्यात पाहातां दोस्तीस विरुध नाहीं हें जनराल याणी प्रतिपादन करून दिलें. यैसियास हे आसुरी मायावी लोक, बोलीचे साचवटीस कर्तुत्व दिसोन यावें तों रुजू मोझ्याँ[1] हुजूरून करणे तो स्वामी करवितील. प्रस्तुत उंदेरीस गलबतांचा वेढा होता तो उठोन गेला, त्यास पुन्हां आज्ञा करऊन वेढा देवणार स्वामी समर्थ आहेत. उंदेरीस नेटबाजी केल्यास इंग्रज उगाच असतो किंवा सिदीचा पक्षपात करितो याचा सध्याच निवाडा होऊन येईल हाहि मोझ्याच आहे. कार्तिक वद येकादसीचे दिवशीं विलायती मनवार नव आले व मागें आठ तरांडी आली, त्यात दोन आहेत येकून अकरा मनवार भांडते[2]. दर मनवर साष्ट पांसष्ट पावणशें पावेतों तोफांचे आहेत. इंग्रज खलासी दर तरांडियास च्यार पांचशें पावेतों लोक अजमास आहे. पांच हजारी जमाव होईल. कांहीं दिवस मदरास मुकाम करून हालीं बंदर मजकुरीं मुकामास आले. फरासीसांच्या भयास्तव आपले जागांची रखवाली करितात ही प्रसिध बोली आहे. अंतस्तें मनास आणितां हबशावर स्वामीची मसलत आहे ती सूरू होऊन या जागां नेटबाजी जाल्यास उपराला असावा याकरितां आले यैसीहि बातमी आहे. माघ सिमगापर्यंत असोन जाणार. हालीं बंदरांत आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून गरनाल गोले भरावयाचें काम चालीस लागले आहे. मुदा काये हें कलत नाहीं. बंदर किनारा जागजागा खबरदारी आहे, परंतु आणखी हुजुरून करवणार स्वामी समर्थ आहेत. ज्या(त) गोमदाल माद फिरंगियाकडील व मुलनाहुं(र)न हबशी याकडील येकून दोवे वकील मुंबैस आहेत त्यांकडील वर्तमान पनास गबलतें साज सामान व दोन हजार फिरंगी

१ समक्ष, चौकशी. २ भांडणारे, लढणारे.

देऊन गोव्याकडून राजपुरीची मदत करावी हा वकिलाचे द्वारें करार जाला आहे. पुढे अधिकोत्तर कलेल तें सेवेसीं लिहित असेन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Sambhaji Mangesh and Ganesh Trimbak report to the Peshwa their interview with the English Governor at Bombay. They suggest an attack on Underi in order to test the friendship of the English.

No. 206] [*17-1-1756*

श्री

श्रीमंत राजश्री जनार्दनपंत
बाबा स्वामीचे सेवेसी

पोष्य शंकराजी केशव सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १४ राखर जाणौन स्वकीये कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. सुरतकर सिदी याणें तीन हजार माणूस सुर्ती व जाफराबादी व चाच्ये सजोन आधी मौजे सोवाली प्रा। उरपाड सरकार तालुका हा गाव मारिला. पनास हजार रूपेयाची मालियेत नेली; व सात आठ पारसी जिवें मारिले. त्याजवरी मौजे केलवे प्रा। माहीम हा गाव मारिला, ते वृत पेशजी लिहिलेंच आहे. सिदीजवल सुरतेमध्ये रा। तुलाजी आंगरे याचे कारकून दोन आहेत. मौजे केलवे मारिले. येथील सावकाराचा माल गुल व भात वगैरे हांडभांड वस्तभाव व रयतीची मिळोन तीस हजार रुपये पावत मालियेत नेली. दर्याकाठी गाव आहेत तेथे याउपरी तोसीस लावील; व जितक्या खाड्या आहेत तेथे पाणी मोजून गलबतावरून नेतात; व फिरंगी गोवकर याची पहिली तीन फरगते आली आहेत; व हाली दोन फरगते आली या प्रकारचे वर्तमान आहे. आम्ही आपले भरतीस जदीद लोक ठेवीत असो; व हुजूर आपण लिहिलेच आहे. राऊताचे पथक आले पाहिजे. किलोकिला भात जमा करीत असो. वरकड खबरदारी चौकसी केलीच आहे, करीतच आहों. बहुत काये लिहिणे? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶Shankraji Keshao reports the raids of the Sidi of Surat in Sovali and Kelve.

---

१ फडणीस.

No. 207] [17-12-1758

पौ ३० रजब

श्रीशिव

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक शंकराजी माहादेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १५ जमादिलाखर मुकाम नगरे नजीक खंबाईत स्वामीचे कृपावलोकनें शेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. खंबाइतास मोरचे लावलियावरी दोन वेल विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत त्यावरून सविस्तर वृत अवगत जालें असेल. सांप्रत येथें मोरचे लाविले, परंतु सरंजाम फौज थोडकी मोगलाजवल सरंजाम भारी सामोपचारें कार्यसिद्धि नाहीं जाणोन नवी फौज ढवलकेकर व अमदाबाज व नडियाद व उमरट बडोद्रें वगैरे जागांहून राउत प्यादे चाकरीस बोलाविले. दारू गोली बिरानगाव निमडी डांगद्रे येथील अणाविली. आमदाबज वगैरे जागांहून कुमक साहित्य पावलें (ना)ही. बहुत वेल लेहून पाहिलें. परंतु कोणी साहित्य केलें नाहीं. अगोधर मोगलासी बहुत प्रकारें सामोपचार करून पाहिला. निदान जुजावें यैसें जालें म्हणोन मोरचे लाविले. नवे लोकहि आठा पांचा दिवसांत जमा जाले. तदुत्तर येक दोन जुजें मातबर जालीं. दोहींकडील माणसें बहुत जायां जालीं. याउपरी मोगलाकडून भानगड लागली. आपले मुदे हासल करून दिल्यास भगवंतरायास सोडूं त्यावरून मनास आणितां मनास येतील तैसे मुदे घातले ते पत्रीं काय ल्याहावे? मोंगलासीं येकच प्रत्योत्तर केलें कीं आम्हांस खंबाईत घेणें दुसरा जाबसाल नाहीं दिवसेंदिवस जमाव होत चालला. मोरचेहि पुढें चाललियावरी मोगल कांहीं जरबेंत आलासा जाला. तेव्हां त्याजकडील वृजलाल दिवाण भानगडीस आला ते वेलेस उरमटाई[१] करून भांडावें तरी आपल्या जवल बहुतेक सिबंदीची फौज महिना पंधराचे चाकर जीव लाऊन कोणे तऱ्हेने जुजतील हा विचार येक, दुसरें खंबाईत जागा मातबर इतक्या फौजेनें हस्तगत होईल यैसें नाहीं. केवल हुजूरून खामखा फौज येईल हाही निश्चये नाहीं. जे फौज जमा जाली तीस पोटास पाहिजे यैसे कितेक बलाबल पाहून मोगलाचे मुद्यांपैकीं काही मुदे कबूल करावे लागले बितपशील.

भगवंतरायास धरल्यापासून अंमल तफरा जाला त्याविसीं मोंगलास तगादा न करावा. १

भगवंतरायास धरलें यामुलें सरकारची फौज येऊन खंबाइतास मोर्चे लाविले यामुलें सिबंदीचे देण्यास

१ उरमटपणा.

भगवंतरायास तगीर करून नवा कमाविसदार ठेवावा कलम १

नवा कमाविसदार राहील त्याणें जो मामला वाजवी सुदामतप्रमाणें सुरलीत अमल करावा. ये गोष्टीस दरम्यान मातबर माणूस परस्परें दुतर्फा दिल्हें १

शहरची रयत दंडून सिबंदीचे रुपये पहिले दिल्हे त्याविसी तगादा न करावा १

हुजूरचें अभयपत्र आणून द्यावें कीं शंकराजी माहादेव याणी करारमदार केला आहे तेणेप्रमाणे वाजबी सुरलीत अमल दखल देऊन बेवसवसा राहणें सरकारचें अभये असे. याचा पारसी मसुदा करून पाठविला आहे त्याप्रमाणें अभय पत्र द्यावें याची आज्ञा १

येणेंप्रमाणें दारमदार ठराऊन छ १२ जमादिलाखरीं भगवंतरायास सोडून आपल्याजवळ आणिले. याउपरी येथील बंदोबस्त करून महिकाठ्याचे कोल्यानी मुलकांत बहुत उपसर्ग केला आहे त्याचे जामीनीस जाऊन स्वामीचे प्रतापें कोल्याचे जामीन घेऊन बिरमगावास जातो. तेथील चवालकर कोल्याचा वगैरे बंदोबस्त होणे आहे तो करूं. भगवंतरायास अमलावर न ठेवावे ऐसा मोगलासी करार केला आहे. परंतु भगवंतरायाचा गुतारुता परगण्यांत बहुत आहे. ग्रहस्त खराबीखालीं आला आहे. विचारेकरून जालें तरी भगवंतरायाची स्थापना करूं नाहींतरी दुसरा कोण्ही दुसरा ग्रहस्त ठेऊन पुढें स्वामीचे विचारास येईल (तेणेप्रो) करावें, मोंगलाचे मुदे कबूल करावे आणि खामखा निग्रह करावा तरी भगवंतरायास कठीण पडते यास्तव तूर्त निकाळ काढून भगवंतराव सोडविले. पुढें प्रावृट्काळी तरी शासन कर्तव्य असेल तरी हरयेक निमित्य ठेऊन [फाटले] वरकड कितेक सविस्तर वृत्त श्रीमंत राजश्री बाबासाहेबांस पत्रीं लिहिलें आहे त्यावरून अवगत होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shankraji Mahadeo communicates to Bhausaheb the measures that he had to adopt to collect forces to fight against the Mughal Commander of Cambay with whom he had some encounters. The enemy when defeated approached with offers of negotiation which are also reported by the writer and the Bhausaheb's assent to them solicited. The rising of the Kolis on the Mahi is mentioned.*

No. 208] *[1758 ?*

श्री

श्रीमंत साहेबांचे सेवेसी

आज्ञाधारक देवजी आवधूतराव साष्टांग दंडवत विज्ञापना ऐसीजे. साहेबाचे आज्ञा घेऊन स्वार जालों तें तिसरें दिवशीं मौजें माळें येथें फौजेंत दाखल जालों. दुसरें

दिवशीं कूच करून वाडी किल्ले हातगड येथें मुकाबला करून नदीवर पाणी पाहून मुकाम केला. ते दिवशीं रात्रौ यवनानें छापा पाठविला; तो कोलवण व बरकंदाज व किल्ल्यावरील जिवालीयांचे लोक ऐसें दोन हजारपर्यंत जमाव होऊन मध्यरात्रीं सेवकावर आले. ते समयीं साहेबांचे चरणाचें स्मरण करून त्यांजवर हल्ला केली, तेव्हां आपलेकडील मातबर दोघां ग्रहस्थांस गोळीच्या जखमा लागल्या; दोघांस तरवारीच्या लागल्या, आणखी तीरांच्या जखमा लोकांस फार लागल्या. परंतु साहेबांचें चरणप्रतापेंकरून छापा मारून काहाडिला. मग दुसरें दिवशीं राजश्री बहीरजी बलकवडे येऊन पोहचले. तिसरें दिवशीं राजश्री हरिपंत फौजेसुद्धां येऊन दाखल जाले. धन्याचे प्रतापेंकरून तांब्र कौलास येऊन सलुकांत आला तें वर्तमान पंत मशारनिलेनी सेवेसी विस्तारें लिहिलें आहे ते ते अवगत होऊन आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सारांश किल्ले मजकुरीं साहेबांचा खिजमतगार राहिल्याशिवाय पुढें मामलत सुरळीत चालणार नाहीं आणि सेवकांस खावंदाचें चरणांशिवाय आसरा आहे नाहीं हा पदार्थ सेवेसी विदितच आहे. सर्व आमचे चाकरीचा मजुरा राजश्री माहादजी हुजरें सेवेसी नाजूक कार्य जालियावर निवेदन करितील. येथें कितेक गृहस्थ आहेत त्यांचा हेत कीं किल्ल्यावर आपली सत्ता संपादून घ्यावी; परंतु हुजुरातचें मनुष्य येल्यारी किल्ले मजकुरीं राहिल्याखेरीज मामलतीचा बंदोबस्त सेवकाचा राहणार नाहीं, याजविशी आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें हे विज्ञाप्ति

¶*Devji Avdhutrao reports to the Peshwa from fort Hatgad (near Patan, Satara) the successful resistance he offered against an attack from the fort.*

No. 209] [*1758?*

श्री

याद हुजूर विनंती करून जाबसाल करून घ्यावयाची कलमे.

सुरतेचा बंदोबस्त करून जंजिरेयास साहित्य येऊ न पावे ऐसे अगोधर जाहले पाहिजे. त्यास मियाअछन यांची रवानगी जाहली असली म्हणजे सुरतेच्या नस्तावरी दोन तीन गुराबा व दाहा पंधरा गलबतें नेहमी नस्त

उंदेरीस पायबंद येव्हापासून बसविला पाहिजे. त्यास विजयदुर्गपैकी पाचसे माणून येणार. म्हसेल्याजवळ आले आहे. एका दो दिवसांत येऊन दाखल होईल. हे माणूस तेथे नेहमी पाठवितो. राजश्री मानाजी आंगरे

राखोन राहिल्यास जंजिरकराचा उपराला होणार नाहीं. याची तरतूद श्रावण पौर्णिमेअलीकडे होऊन तारू तरांडे चालत न जाले तों अगोधर जाऊन नस्तावरी राहत ऐसे करवणार धणी आहेत.

वजारतमाब याणी रामाजी अनंत सबनीस मोर्चेबंदीचे तरतुदीकरितां पुढें पाठविले आहेत. विजयदुर्गकरी लोक येतांच येक मातबर माणूस पाठऊन मोर्चेबंदीची तरतूद करितो. राजश्री मोराजी सिंदे यास पाठवितों हे तरतूद करून नेट पुर्ता बसेसा करतील. मोराजी सिंदे यांचा वजारतमाब यांचा नाबनाब याजकरितां दुसरा सरदार पाठवावा.

(यापुढील मजकूर फाटला आहे.)

¶*Fragmentary letter putting forth some concrete suggestions for the capture of Underi and Surat with the help of Miya Achhan.*

No. 210] [*4-1-1759*

पा छ ९ जमादिलाखर माघ सु तिसा

श्री

सेवेसी विज्ञापना येसीजे. ह्या जलदुर्गाच्या मोर्चेबंदीचे कार्यास आरमारी लोकाखेरीज दुसऱ्याच्यानी परिणाम लागणे नाही आणि येथे तो आरमारी लोकांचा भरणा थोडका याजकरीतां च्यार पाचसे माणूस आरमारी पाठवावयाची आज्ञा जाहली पाहिजे अथवा बेगमी जाहल्यास येथे ठेवावयाची आज्ञा जाहल्यास * * तील पाण्यातील बंदेज व घावडा व अरमा * * त हली अरमार आहे त्यावरी जली * * देण्याघेण्यावीण बेदिल या (ज) करिता येखादे जागी बेजरब उडी घालावयास मागेपुढ पाहतात. तोंडी समजावीस करणे ते करीतच आहेत परंतु लोक बेजरब गलां पडत नाही. उंदेरकराचा मचवा रातबिरात करून मुंबईस जाऊन साहित्यसामान भरून येतो. रखवालीस गलबते आहेत परंतु गाठ पडू देत नाही. याजकारितां लहाना माहागिरी मचव्याचे बंदोबस्तास तैशाच माहागिऱ्या सिलेपोस लोकांचा भरणा करून सजल्या होत्या त्या राजपुरीस गेल्या. तरी दाहा माहागिऱ्या सिपाई व दर्यावर्दी व येकेक वरता जंबुरा ऐसे सिलेपोसे[1] वसईहून देविली तरी चोरीछेपिनी मचवा जातो, त्याचे पारपत्यास फार उपयोगी पडेल.

---

१ चिलखत, हत्यारबंद, कवचयुक्त.

फटकडी वसईस आहे व आणखी कोठे असेल त्याची आज्ञा होऊन दारुगोळ्याच पुरावा पोखता जाहल्यास संतत मारागिरी होत गेल्यास जागा लहान आहे त्यामुळे तो अयास येईल व मचवा होडके येक दुसरे दस्त केल्यावरी त्याचे पाये मोडती * * प्रकारचे येथील वर्तमान आहे ते सेवेसी * * * या-प्रमाणें सरजाम साहित्य * * * ण्हे प्रकारची असावी, ते आज्ञा जाहल्यावरी त्याप्रमाणें होईल येसे दिसोन येते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer suggests certain measures and precautions in the naval expedition to be undertaken for the capture of Underi.*

No. 211] [*17-1-1759*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १७ माहे जमादिलावल पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें व प्रांत मजकूरचें वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री रामाजी माहादेव यानी किले गंभीरगड[1] घेतला त्यास पुढें रामनगरकर मलई करतील कीं काय हें न कले. केली तर प्रांत संजाण रवकडे पवाडी व परगणें नहर त्याचे सरदेस मुलुक याचा नास होईल, यास्तव सात गांवें लाबी सरद राखावी लागते याजकरितां राजश्री खंडो चिमणाजी व राजश्री येसाजी हरि सातशा माणसानसीं व राजश्री आपाजी पायेगुडे सवा तीनसें स्वार सरद राखावयास पाठविले आहेत. सरदेंत रान बहुत; डोंगर अडचण रानांतून येऊन कोणीकडोन येतील जातील हें न कले. त्यानी सरकारच्या तालुकियाचे वाटेस न जावें म्हणून राजश्री दुर्जनसिंग याजकडील राजश्री प्रथमजी कोसाडे रामनगरचे तहाचे बोलीकरितां येथें आले होते, त्यांजबराबर सांगितलें कीं सरकारचे मुलुकास रामनगरकर उपसर्ग देतील तर आगेधर तुम्ही त्यांस लेहून पाठवणें कीं सरकारचे मुलुकास तोसीस न द्यावी व राजश्री रामाजी माहादेव यानी किले गंभीरगड रक्षोन राहावे आणि परस्परें मुलूक लुटों नये. पुढें तहरह करणे तो हुजूर जाऊन करावा याप्रमाणें उभयेतांहीं करावें याप्रमाणेंच राजश्री रामाजीपंतासही लेहून पाठविलें आहे. राजश्री दुर्जनसिंग याचे रामनगरचे कोली ऐकतील किंवा न आइकितील हा भरंवसा नाहीं. प्रस्तुत रामनगरकर राजश्री रामदेऊ राणा फत्तेपूर टाकोन पडोलास गेले. तें रान अडचण आहे. पुढे

---

१ डहाणूच्या पूर्वेस २२ मैल.

कोणता विचार त्याचा होईल तो कळों येईल. कदाचित त्यानी कोळी मिळोन मलई केली तर प्रजनकाल समीप आला आहे. ते रानी लोक मुलकांचा नास करतील यास्तव हुजूरचें पत्र राजश्री दुर्जनसिंगास पाठवावें कीं रामनगरकरास सांगोन परस्परें उपसर्ग न द्यावा. त्यानी अथवा त्यांचा कारभारी हुजूर यावा असें स्वामीनी ल्याहावें. मशारनिलेचें सांगितलें मान्य करितील कीं न करतील हें पाहावें व आज्ञेप्रमाणें रामनगरचे तहाचे बोलीस आले होते. बोली व्हावी तों गंभीरगड घेतला. मग निरोप देऊन गेले. येथून सातसें माणूस व पायेगुड्यांचे स्वार गेले आहेत हे सरद राखतील अगर गंभीरगडचा उपरालाहि करणे तो करतील. फतेपुरावर जरी आपली फौज गेली तरी ते समरंगणी उभे राहणार नाहींत. अरण्यांतून येऊन मुलकाचा नास करतील. पुढें करितील तें वर्तमान लेहून पाठवीत जाऊं; व अधिकोत्तर लोक येथून पाठवावे तर भरणा नाहीं. अरमारी लोक अलियावर पाचसें माणूस पावत. दुसरें तिकडेस पाठऊं गेले आहेत हें गंभीरगडचा उपराला करतील; व कुम (क) लागती करतील व किले मजकुरास सामान गला व दारू गोळी जें पाहिजे ते त्यानी ल्याहावी ते इकडोन पोहचवावी असें केलें आहे. सदर टाकोन लोकानी राजश्री रामाजीपंताबराबर जावें तर हे येकीकडेस जातील. ते दुसरे कडोन येऊन मुलकाचा नास करतील. याजकरितां सरदेवर लोक राहिले पाहिजेत. श्रीमहालक्ष्मीपासून बलसाडचे सरदे-पावत सात गांवें लांबी सरद रानांतून राखली पाहिजे तेव्हां आपला मुल्लक टिकेल. डाहाणापासून गला देखील दीढा लक्षाचा मुल्लक आपला आहे. पुढें रामनगरकर कोणता विचार करतील तो पाहावें. गंभीरगडचा लाग येथेंहि होता, परंतु दोन तीन आज्ञापत्रें आलीं कीं कोणाचा किला न घ्यावा. आज्ञेविरहित कोणी येक कर्म करूं नये व मुलकास त्याचा उपद्रव लागेल हाहि अर्थ पाहावा लागला व स्वामीचीहि आज्ञा नाहीं यास्तव इकडोन होऊन न आलें. येथूनहि गंभीरगडचे लग्यास दीड हजार रुपये येसाजी हरीचे गुजारतीनें दिल्हे होते व दावजी सिंदे यांचे गुजारतीने येक हजार पावत दिल्हे होते. स्वामीचीं आज्ञापत्रें येतात कीं राजकारणे राखोन ठेवणें त्याजकरितां राखोन ठेविलें होतें. लग्यास रुपये दिल्या-वाचोन राजकारण ठेवले जात नाहीं. स्वामी आज्ञापत्रीं लिहितात कीं. प्रस्तुत कोणाचा किला घेत न जाणें आणि दुसरीकडेस किले घ्यावयास आज्ञा होते त्यावरून पुढें येखादे स्थलाचा उपाये येथूनहि करावा लागेल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao informs the Peshwa of the capture of Gambhirgad by Ramajipant and the possibility of Ramnagarkar raising a revolt and raiding the adjoining province. "It is necessary", the writer says, "to defend the boundary line extending over some seven villages."*

2925

No. 212] [13-1-1760

पौ २८ जमादिलाकर

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नारो त्रिंबक मुकाम उंदेरी चरणांवरी मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ २३ जमादिलौवलपावेतों सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. रविसंक्रमणी तिल शर्करायुक्त पाठविले आहेत. सेवेसी पावतील. आम्हाकडील वर्तमान सर्व राजश्री रामजीपंत लिहीत असतील. आम्ही लिहिलें आहे. राजश्री बाबूराव फडणीस सेवेसी पत्रें रवाना करितील. सारांश मोर्चे हात धोंड्यावर खडप होता त्याजवर गेला. आम्हाकडील गरनाळा व गोळे मार आंत जाऊ लागला. याउपरी आठा चो रोजांत कार्य सिद्ध होईल. स्वामीच पुण्य समर्थ आहे. आम्हांकडील जखमी व ठार यांची याद आलाहिदा सेवेसी पाठविली आहे. नित्य येक दोन ठार, पांच सात जखमी होत आहेत. सेवेसी श्रुत होय हें विज्ञाप्ति

¶*Naro Trimbak reports the bombardment of Underi by Maratha naval forces.*

No. 213] [16-1-1760

श्री

पुरवणी राजश्री बाबूरावजी स्वामीचे शेवेशी

साष्टांग नमस्कार विनंती तागायत छ २६ माहे जमादिलोवलपर्येंत वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री नारोपंत याकडेस भानगड लागली आहे. आतून एक दोन ग्रहस्त येऊन बोलोन गेले म्हणून सांगतात. परिणामी काये होईल ते न कले. आम्ही तो खडपात हातधोंड्यावर मोर्चा बसऊन तोफ, फटकड्या[१], गरनाला लावून रात्रदिवस मारगिरी मोर्चेयाची व अरमाराची होतच आहे. दरवाजेयाजवल गुराबा, काठीं परबान[२] आलाथ[३] अमदान उतरून लेस[४] करून दरवाजेयास दूर आडाऊन मोर्चाच बसवितो. फटकड्या व तोफ व गरनाला लावून मारगिरी करितो. जेणेकरून शामल काईल हो तो विचार जसा जसा सुचतो तैसा करीतच आहो. या प्रकारांत भानगडहि सहजच निवडेल.

---

१ फटकडी—एक प्रकारची तोफ. २ ज्या लांकडास शीड बांधून डोलकाठीवर चढवितात तें.

३ अलद. ४ तयार.

परिणाम कलेल. धन्याचे पुण्येंकरून थोडकेच दिवसांत कार्य सिद्ध होईल. हुजूर लष्करांत विनंतीपत्र लिहिली आहेत ती स्वामीनी पाहून लष्करांत रवानगी करावी. फिरंगीयाची रवानगी जाहाल्याप्रमाणें राजपुरीस आले आहेत. हुजूरचे आज्ञेप्रमाणे त्याणी येथें भेटीस येऊन भेट होऊन कितेक मजकूर पुढील तरतुदीचे बोलणे सांगणे ते सांगावे, म्हणोन राजश्री केसोराम याजबराबर दोन गलबते व महागिरी देऊन पाठविले आहेत. समाधानपूर्वक भेटीस आणावे, नाहींतर गलबते व महागिरी पाठविली आहे तेथून रवानगी करावी म्हणोन केसोराम यासी पाठविले आहेत. धन्याचे पुन्य करून सर्व मनोद्यानरूप घडोन यावेसे आहे. मोर्चेबंदीस खर्चास जखमी, ठार, आजार याद, यासी वगैरा देणे लागते यास्तव नख्त कापड बेगमी करून पा. कर्ज घेऊन आजतागायत खर्च स्वारीस करितो. एवज दिल्हा नव्हता. हुजूर * * स्वामी लेहून अगर बेगमी करून पाठवावी. आगत्यास समजोन दिल्हे पाहिजे. मसलतीचा विचार आवगत आहे. बहुत काय लिहिणे? लोभची वृधि कीज हे विनंती.

¶*From the handwriting the writer appears to be Ramaji Mahadev informing Baburao Fadnis about the progress made in the cannonading of Underi.*

No. 214] [*January 1759*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
रामाजीपंत स्वामी गोसावी यांस

पोष्य शंकराजी केशव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित असिलें पाहिजे विशेष. मिया अछयासी श्रीमंताचीं दोन वेला पत्रें पाठविलीं, परंतु तो पत्रें मानीत नाहीं, त्याणी जाऊन रानेरचें(1) ठाणे आली नवाजखानाचें सुरतेपासून कोशावर तापीपलीकडे होतें तें मिया-अछन याणें सिदीच्या विचारे घेतलें. मियाअछन याणें श्रीमंताची सेवा सोडून सिदीसी मिळाला. सिदी त्यास शाहरांत घेणार व मियाअछनचा बेटा चऊ माणसानसी आंत किल्यांत सिदीनें घेतला आहे, त्यास अलीनवाजखान श्रीमंताचे पदरीं पडला. त्यास मियाअछन फिरला नाहीं हें जाणोन सिदी व आलीनवाजखान येक जाहाले आणि मियाअछन यासी फिरविणार व सिदीचें आरमार तयार जाहालें तें जंजिरयासी कुमकेस येणार. त्यास वसईचें आरमार

(1) Rander.

थोडें राजश्री नारोपंत तेथून आले ते दाहा दिवस वसईस होते. मग त्वरेनें निघा म्हणोन सांगितलें अकरावे दिवसीं निघोन गेले. ते कार्तिक वद्य येकादसीस येऊन गेले. त्यास तारापूरचे बाऱ्यावरी मसकती डांगिया सांपडल्या त्या घोडा उंबरखाडीस राहिले आहेत. वसईहून निघालियासी दाहा रोज जाहाले. ते उंबरखाडीचे बाऱ्यावरी आहेत. जातेसमई सांगितलें कीं रुद्रोजी[1] धुळप पांचसें व माहादाजी केशव आठसें आस्विनीकुमारावर आहेत ते व आपाजी केशव. सातसें येकूण दोन हजार माणूस तिवाचें येकरूप करून मियाआछन यासी फिरवणें म्हणजे सुरतेस आलीनवाजखान सिदीसी विवाड करितो तरी दोहों रोजांत पोहोंचणें, त्यास मशारनिले उमरखाडीचेच बंदरीं आहेत. येकानें सरकार-काम उभारलें तरी दुसरियानें कालहरण करावें याप्रमाणें होतें. आतां आलीनवाज-खान सिदी येक जाले. आलीनवाज दोन महिने सांगत होता कीं पांचशें श्वार आणून आछनास फिरवा. त्यास हुजरू(न) श्वार आले नाहींत. याजमुळें आलीनवाज बहुत श्रमी होऊन सेवट सिदीसी मिलाला. यैसें राजश्री आपाजी मराठे व राजश्री माहादाजी केशव व राजश्री सदाशिव कानो याचें लिहिलें आलें. राजश्री सदासिव कानो याचीं दोन पत्रें हुजूर गेलीं कीं आलीनवाज पदरीं पडिला आहे त्यास पांचसें राऊत पाठवावे म्हणजे सिदीसी बिवाड करितात व राजश्री माहादाजी केशव सुरतेस गेले. आलीनवाजखान याची भेट जाली. याणे सांगितलें कीं मियाआछन फिरवा म्हणजे बिघाड करितो. बिघाडाबद्दल सिबंदी ठेविली. सामान केलें आपणावरी शब्द श्रीमंताचा नाहीं. मियाआछन न फिरे तेव्हां सिदी आपण येक व्हावें लागलें, यैसी शराई करून आलीनवाज सिदी येक जाले यैसें जालें.. आजपावत सिदीची कुमक याजकरितां येऊन पावली नाहीं व वसईचें आरमारहि थोडें असोन बरांबद[2] केला. राजश्री नारो त्रिंबकहि जाऊन बारीयावरी पोंहचत नाहीं. तुम्हांपासून निघालियासी वीस रोज पावत उमरखाडीचे बाडावरी आहेत. तुम्ही जंजिराचे बारीयावरी आरमार व मोर्चे खबरदार करावे. सावधतेने याउपरि राहोन मजबूद असावें. याप्रमाणें करावें. राजश्री नारो त्रिंबक यासीहि पत्र लिहून पाठवावें कीं तुम्ही आद्याप पोहोचलेस नाहीं हें काय ? याउपरी सुरतेचे बारीयावरी सत्वर जाणें म्हणून पत्र पाठविलें आहे, जातील तेव्हां खरें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती. रामनगरकरानें किले शेवेंगीयास[3] दुसरियानें वेढा दिल्हा होता. हजार कोली वेढियासी होता. त्यास तेथून राजश्री आबाजी यादव पांचसें माणूस निवडक

१ येथून अक्षर निराळें. २ बरामद = निकाल.

३ शेवगांव किल्ला, डहाणूचे पूर्वेस १६ मैल.

करून पाठविलें. वेढा उठविला. कोली मागें सरले. दाणा सेवगियावर चढवीत आहेत व रामनगरकर याणे सु(ल)तानपूरकर कोली दीढ हजार दुर्जनसिंगाकडून आणविले. पांच हजार रामनगरकर होऊन डाहाणूपासून पारनेरापावत मुलूक जालिला. उडवी जालिली. सेतें जालितो. माणसें मारितो. याप्रमाणें मुलूक डाहाणूपलीकडे हैरान जाला. आमचे लोकानी तारापूरकर व आसावेकर डाहाणूकर याणी मर्दुमी करून कोली सें पनास ठार मारिले. सें दीडसें जखमी केले. गजाड (?) मारिलें. डाहाणूआलीकडे मुलूक वांचविला. पलीकडे रामनगरकरानें मुलकाचा नास केला. हुजरून स्वारच आद्याप न येत. बहुत काय लिहीणें. इंग्रेज मुंबईस जमा जाला. याजमुलें आम्हांस तिकडे जातां नये हे विनंति.

¶*Shankraji Keshao writes to Ramajipant how the delay in sending the aid to Ali Navajkhan of Surat asked for by him against Miya Achhan forced him to befriend the Sidi and accept aid from him. He further requests him to lose no time in sending forces to Surat. Incidentally he mentions the siege by Ramnagarkar of the fort of Shevga.*

No. 215] [*6-3-1756*

पो छ ४ जमादिलाकर
मंदवार मुा सिराळे

नकल

श्री

पुरवणी राजश्री बाबा स्वामीचे सेवेसी

विनंती. किल्यांतील मालमालियेत वस्तभाव दाणा गल्ला हत्तीं घोडे येत्किंचित कोनता का विकता म्हणोन इंग्रेजास सांगितले. त्याणी उत्तर केले कीं आम्ही पातशाही चाकर, लढाईस जावे, जिवावर उदार होऊन कार्य करावे, तेथें मालमत्ता असेल ते आमची, लढाई करितील तेच लोक घेतील. त्याजवरी पातशहाची देखील सत्ता नाहीं. हा दस्तूर आमचा चालत आला आहे. तुमचा जनरालाचा करार तहनामा जाला असेल तरी ते कोंपिनीचे चाकर आहेत, जाबस्वाल करितील अगर भरून देतील. तुम्ही त्याजवल बोला. आम्हावर जनरालाचीहि सता नाहीं यैसे याणी उत्तर केले. त्यास तहनामा आहे आणि येथील कागदपत्र कारकून आहेत. मुंबईस जनरालाची भेट होईल, किल्ला हाताखाली घालितो. सुप्रवृत्तीनें मालियेतीची वाट काय करितो पाहातो. इंग्रेज सावकार याचे घरी बेमानी आजवरी न झाली. होऊ लागली तरी श्रीमंताचा प्रताप थोर आहे

पाहून घेऊ. प्रस्तुत राजश्री गोविंदपंत येताच पत्र या मजकुराचे पाठविले त्याप्रमाणें जाबसाल आहे. असिले म्हणजे आची तुरंकमान (?) जागा हस्तगत जालियावरी पुढील विचार. प्रस्तुत बिघडल्यास मातबर मनवर आणि आपली वस्त दुसरेयाचे हाती आणी खेदासी जागे होणार. जबरदस्तीनें काम प्रस्तुत करितां येत नाहीं. करारमदार ज्याजवळ त्याजपासीं राजश्री गंगाधरपंत पो. आम्हीहि मनवर हिकडे आहेत कोठे जात नाहीं हे तेथोन गेलियावरी पाठीवरी शह किल्ले कोट संभालून जाऊ. जागा त्याचेने येऊन परीणाम लागत नाहीं. चिंता जागियाविसी न करावी. वरकड खासा स्वारी आलियावरी तहनामायाच्या गोष्टी आहेत. हे विनंति.

¶*Letter intimating Janardan Baba Fadnis the overbearing conduct of the English General and his unwillingness to cede the fort of Vijaydurg to the Marathas.*

No. 216] [*4-2-1759*

छ ९ जाखर माघ
सन तिस्सा

श्री

सेवेसी विज्ञापना यैसीजे. उंदेरीस मोर्चे बसल्याताा सेवके होत गेले वर्तमान कचे ते लिाा गेलो. त्यास येथील अमलदार काय लिाा असतील त्यावरून सेवकाचे लिहिल्यास अंतर पडोन स्वामीचे चितात काय येत असेल हे नकले. याजकरितां सूग्तअसूग्त ल्याहावयास साशंकित होतो. तथाप न लिहितांहि दोश पदरी पडतो यांस्तव लिहि * * * ** * जंजिरियाचे वेढे म्हणजे गलबत होडके बंदेज व्हावे, साहित्यसामान काडीइतके जाऊ न द्यावे तेव्हा त्याचा आळ (थळ) (?) बंद होऊन आयास येतो, यैसे असता तो प्रकार दिसोन येत नाही. खुशकीचे मोर्चास गाडदीचे लोक आल्यातागायत बंदरोबंदरी चौक्या बसविल्या आहेत याजकरितां अलीकडे काही उपद्रव होत नाही. न कले इंग्रजाने बंदेज केला किंवा तो चौक्याचे भयास्तव राहिला हें न कले. अरमारची मोर्चेबंदीस च्यार गुराबा व पंधरा वीस गलबते हमेशा असतां मुंबईकडून महागिरी मचवा दोहोचहू दिवसाआड येतच असतो. त्याविशी येथील कार्यकर्त्यास बोलणे ते बोलतच आहो. यैशास राजश्री राघोजी आंग्रे खुद आपले जातीने श्रमसाहास निखालसपणे करीत आहेत. मोर्चावर लाऊन तोफा आपले

मातफातीने (?) बेलाशेकपणे मारितात. बाा राा माहादाजी रघुनाथहि जात असतात. उंदेरीवरून मोर्चावरी तोफा मारीत असतो त्याचा हिसाब धरीत नाही व फटकडीचे गोले पाणी वोहटल्यावरी थ (ख) ड्यात नेऊन दोन तीन गोले टाकीत तो पाणी भरते. तेही आपणच जाऊन करितात. राजश्री रावोजी आंग्रे आपली हलाखी सांगतच आहेत. लोकहि नित्य गलबला करितात. बारकाईने मनास आणिता केवल फुटक धंदा आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer reports the difficulties involved in the capture of the island fort of Underi and the zealous endeavours of Raghuji Angria in the same cause.*

No. 217] [*4-2-1759*

पाा छ ५ जमादिलाखर

श्री

सेवेसी विज्ञापना येसीजे. जेलदुर्गाचे मोर्चेबंदीस विपुल दारूगोळा खर्च जाहल्याखेरीज अयास येतो येसे नाहीं. आजपर्यंत आरामारावरून व खुसकीचे मोर्च्यांच्या तोफाचा मार जूज होत होत्या. प्रस्तुत अवघीच मारगिरी राहिली आहे. दारूगोल्याची बेगमी पोखती असल्याखेरीज काम चालत नाही. येथे नित्य इंग्रेजी मारगिरी करून त्यास उसास घेऊ देऊ नये तेव्हांच यास * * कार्यास हात जेथे जेथे स्वामीचे * तील. तिकडून बेगमीची आज्ञा जाहल्याविना पोखते साहित्य येथे होता दिसत नाही व इंग्रेजी मारागिरीचा अर्थ पाचपाचसे गोल किल्यात अरमार व खुसकीचा होत जावा ते न होतां दाहा वीस वीस तोफा या मागे हाताच्या बलाप्रमाणे मारीत आहे. हली पाच सात रोज अववेच बंद जाहले आहे. दोन खंडी दारू उरणाहून देविली आहे. आल्यावरी ज्याप्रमाणे मागे मारगिरी होत आली तेसी होत जाईल यैसा प्रकार आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer suggests a vigorous bombardment by the fleet, before the capture of the fort (Underi ?) can be effected.*

No. 218] [*4-3-1759*

पाो छ १३ रजब

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब
स्वामीचे शेवसी

पाो श्रीनिवासराव नरसिंह साा नमस्कार विनंती. येथील वर्तमान स्वामीचे कृपानुग्रहे ताा छ ४ रजब येथास्थित असे विशेष. यापूर्वी मुजरद जोडी

समागमे येक पत्र व दुसरे राजश्री आपाजी केशव याचे माणसाबराबरी येक पत्र यैसे दोन पत्रे येथे पावताच काही यैकिले व थोडेसे देखिले वृत सेवेसी लिहिले. बहुधा पत्रे पावली आसतील. प्रस्तुत येथील वर्तमान छ २ तारिखी इंग्रेजाने गोल्याची आतिवृष्टि केली; आणि जंगी बंदर तापीतीरचा शहरपना आणि येक दोन दरवाजे घेतले. बहुत माणूस सिदीचे जाया केले. हबश्याचा काही उपाय चालला नाही. प्रस्तुत हबश्याने आवसान टाकिले. इंग्रजाने दमदमे बांधून काल छ ३ शेनीवारी संध्याकालपासोन तीन प्रहर रात्रपर्यंत किलियावर व हबश्याचे हवेलीवर गोले मारिले. बहुत लोक जाया जाले. शहरचेहि काही माणूस मेले. राजश्री येशवंतराव पवार कृष्णाजीपंत शहराहून दो कोसावर आश्विनीकुमारानजीक लस्करसुधा आहेत. आम्ही येक दोन वेळा फिरोन मियाआछन यांजकडील पैगाम नेला कीं मियाआछन यानी शहर आपले फौजेचे स्वाधीन करावे व पुढे तीन लक्ष रुपये इंग्रेजास मारून काहडलियानंतर द्यावे व सुरलित निमे आमल शहरात देत जावा यैसा पैगाम नेला. किलीयाचे सूत्र आछनाकडे नाही. हबश्याचा व आछानाचा पेच, यास्तव किलियाचे सूत्र आम्ही राजश्री कृष्णराव बाबूराव मल्हार[१] याचे पुत्र उभयता मिळून सिदीकडे लाविले; कबूल केले: म्हणतो की 'मी श्रीमंताचे पदरी पडतो. मतालिब फर्द[२]हि लिहून देतो म्हणतो; परंतु सत्वर अमलात येत नाही. त्यास मियाअछन शहर वगैरे द्यावयास तयार आहे. हबशी किलियाचा आनमान करितो हे सर्व वृत आम्ही राजश्री कृष्णाजीपंतासी निवेदन केले. याचे विचारे किला व शहर दोनी हस्तगत होत आसल्या इंग्रेजासी बिगाडावे. लाभांश सर्व शहरापासोनच आहे. बहुधा आपली आज्ञा यैसीच आसेल. किलियाविशईहि हबश्याचा बुध्धिभ्रंश केला आणि वरचेवर करितो. प्रस्तुत आछनाकडील शहरचा पैगाम याप्रकारचा आहे. इंग्रेजासी बगाडावयास आनमान करितात; बरेंच आहे. पुढें मागे इंग्रजाने तऱ्ही सुरलीत वर्तावे म्हणजे पेच पडणार नाही. कदाचित् विजयदुर्गाप्रो इंग्रजाने बेइमानीवर आल्या तेव्हा चितास हळहळ न वाटे यैसे न व्हावे. आपण धणी सूज्ञ; जे आज्ञा करावयाची ते करावी. आम्ही चाकरी करून दाखवायास तयार आहूत हे विज्ञापना.

¶*Shrinivasrao Narsinha describes to the Peshwa the heavy fire of the English directed against the port and the castle of Surat. He refers to his efforts to persuade Miya Achan to deliver the city to the Marathas.*

---

१ बर्वे. २ कागद.


No. 219] [Recd. 8-3-1759 ?

। पौ छ ८ रजब

श्रीशंकर

पुा राजश्री नाना
गोसांवी यासीं

विनंती उपरी. सुरतेच्या सुभ्याची व सिदीची यैसी सुरत अठाविसीत नेमणूक आहे. त्या वसुलावर त्याचे अमील माहालीमाहल आहेत. त्यास त्याचीहि जफ्ती करावयास सांगितली आहे. कांहीं वसूल त्याजकडे गेला आहे. काही राहिला आहे, तो जफ्त होईल; परंतु जफ्त करावे कीं न करावे हे लिहिले पाहिजे. ज्याप्रमाणे आज्ञा येईल तैसी वर्तणूक करून हे विनंती.


मोर्तब
सुद.

¶*Orders are solicited from the Peshwa regarding the attachment of the province under the management of the Sidi and the Subhedar of Surat.*

No. 220] [8-3-1759

पैा छ १२ रजब

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री नानासाहेब
स्वामीचे सेवेसीं

फारसखानाचे चित्तांत कीं आपणच सुभा व्हावें. इंग्रजानें तों आह्मास वचन दिधलें यास्तव फारसखानहि दिलगीर आहे. राजश्री यशवंतराव पवार व कृष्णाजीपंत यानी बाहेर बंदी केली त्यास इंग्रेजानें कागद लिहिला कीं पातशाही शहर बंदमुळें खराब होईल. श्रीमंताचा व जनराल मुंबई यांचा स्नेह आहे. बंदी मुक्त करावी. त्याचें उत्तर रायानी व पंतानी लिहिलें कीं बंदी हबशीयाचे वेलेसच केली होती. जनरालाचा व श्रीमंताचा स्नेह मणोनच हबशी वगैरे आम्हांस शहर व किला देत असतां केवळ तुमच्या स्नेहास्तव मान्य न केलें म्हणोन उत्तर पाठविलें. तूर्त इंग्रेजाची मर्जी पाहतां कांहीं सरकारचें काम करतील आथवा फौजेस कांहीं देतील असा प्रकार दिसत नाहीं. नारो त्रिंबक माध्यस्थ दामोदरपंत माध्यस्थ सारेच येकीकडे आपलाले स्थलास गेले. आपण होऊन कृष्णाजीपंतानी पेगाम इंग्रेजासीं करितां नये यैसे धर्मसंकट पडलें

आहे. बंदी केली याजमुळें इंग्रेजहि नाखूष होईलच. पुढें कसकसा प्रकार होईल तो सेवेसीं लिहिला जाईल. सर्व अर्थ राजश्री आपाजी पंतानी द्रिष्टीनें पाहिले. सर्व त्याचेच विचारें जालें. आपणास लिहितील त्याजवरून कलेल हे विनंती.

¶The awkward situation in which the several parties had landed themselves owing to the terms of agreement and the mutual discontent are well described to the Peshwa by his agent Shriniwas Narsinh.

No. 221] [*8-3-1759*

पौ छ १२ रजब सायंकाल

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब
स्वामीचे सेवेसी

पोष्य श्रीनिवासराव (न)रसिंह साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान छ ८ रजब तागायत दर जागा बंदर सुरत स्वामीचे कृपानुग्रहेंकरून यथास्थित असे विशेष. स्वामीचें पत्र श्रीमंत स्वामीचे पत्रासहवर्तमान प्रविष्ट जालें. श्रीमंताची आज्ञा कीं वसईहून चिरंजीव[1] लिहितील त्याप्रमाणें करणें. आपले पत्राचा भावार्थ कीं तुम्हांकडील वर्तमानच कलत नाहीं हें काय, वरचेवर सविस्तर लिहित जाणे म्हणोन आज्ञा. त्यास मजला आपले सेवकवर्गांत गणना करावी आणि जसें आज्ञापितील त्यास अंतर तिलतुल्य होणार नाहीं. येथें येऊन सेवकास सोला सत्रा दिवस जाले. स्वामीकडे येतांच बारिक मोठें यैकिले वर्तमान लिहिलें व मुजरद जोडी सरकारची पाठविली, त्याचें उत्तरंच न आलें याचें कारण न कले. त्यानंतर राजश्री आपाजी केशव याचे जासूदजोडीसमागमें येक पत्र व राजश्री कृष्णाजीपंत याचे विद्यमाने येक पत्र यैसीं वरचेवर यैकिलें, द्रिष्टीस पडलें, वर्तमान लिहिलें. स्वामीचीं पत्रें येतात त्यांत आमचे पत्राचा दाखलाच येत नाहीं. येथील वर्तमान इंग्रेजानी जंगी बंदर घेतलियानंतर हबशी इत्यादिकांचीं शस्त्रास्त्रें गलालीं; आवसान गेलें. आपले लोकांस शहरांत घ्यावयाचें समत हबश्याचें नवतें. इंग्रजाची जबरदस्ती नडली. तेव्हां अछनाने व हबशियानें आपले फौजेस शहरांत घ्यावें आसा निश्चये केला. यशवंतराव पवार व कृष्णाजीपंत आश्विनीकुमारासमीप होते. मियाआछयानी सिदीचे विचारें आम्हांस कृष्णाजीपंताकडे

---

[1] भाऊसाहेब ?

पाठविलें; पेगाम कीं, आपले फौजेनें शहरांत यावें, शहर आटोपावें, इंग्रेजासी आछन व हबशी व आपली फौज यानी मिळून झुंझावें, इंग्रेजास मोडून बाहेर घातल्या तीन लक्ष रुपये नगद व शहरांतील निमे आमल येणेंप्रमाणें आछन व सिदी यानी द्यावें यैसा करार ठहरला. त्याप्रमाणें आम्हीं येक दोघे आछनाकडील भले माणूस समागमें नेऊन राजश्री कृष्णाजीपंतास निवेदन केलें. पंत मजकूर यानी इंग्रेजाकडील सूत्राचा विचार व वरचेवर आपली आज्ञा व श्रीमंताची आज्ञा इंग्रेजासी न बिगाडावें यास्तव राजकारण लाऊन मात्र ठेवायास्तव धातुपोषणाच्या च्यार गोष्टी सांगोन पुन्हां आछनाकडील भले माणसासह वर्तमान आम्ही शहरांत गेलों. कृष्णाजीपंतानी बीज आम्हांसी सांगितलें होतें कीं किला व शहर हस्तगत होत आसल्या आपण इंग्रेजासीं बिगाडितो. त्याजवरून सिदीकडे राजकारण लाविलें. मध्यरात्रीं यैन इंग्रजाचे झुंझाचे समई गोलियाचा मार होत आसतां तशा प्रसंगीं येकला जाऊन हबशियास कायल केलें व बहुत गोष्टींनें उमेदवार करविले. आछनाकडून जें सांगावयाचे तें सांगविलें. हराषकाल[१] बुद्धी मंदच जाली. म्हणे कीं तुम्ही शहरांत येणे स्थल देतों. माझे मुदियाची काय वाट? त्या गोष्टीचीहि त्याची खातरजमा केली. त्याउपरी आम्ही व आछनानी विचार केला कीं सिदी तेजहीन जाला. फौज सरकारची शहरांत आल्यानंतर तोंडावर देऊन किला घेऊं. वस्तुता हबशी फारच घाबरला होता, तेव्हां पुन्हां कृष्णाजीपंतास आम्ही जाऊन म्हणालों कीं शहर हस्तगत होतें हे न सोडावें. आछन कोणता प्रमाणिक? हाहि मात्रागमनी. आपणास इंग्रेजासी बिगडावयास धण्याची आज्ञा नाहीं तर यैसें करावें कीं तूर्त मियाआछन याचे मतें शहरांत सिरावें व याजलाहि शरीक करून घ्यावें व इंग्रजास सांगून पाठवावें कीं आपणांस किलियासी व हबशियासी दावा तर आम्हांस किल्यासी समंध नाहीं. तुम्ही समजोन घेणें. यैसें सांगून पाठविल्या इंग्रेजासीहि स्नेह राहतो. शहर हस्तगत होतें म्हणोन सांगितलें आपली आज्ञाचि नवती ते कसें मान्य करतील. सांप्रत सर्व इंग्रजाकडे जालें. आछेनहि इंग्रजाकडेच मिळाला. तूर्त इंग्रजाने यैसें करार केले आहे कीं धणीपणा आछनाचा व फारसखानाची नायबी या उभयतानीहि आपले आज्ञेंत वर्तावें, या प्रमाणे करार केले आहे. कळावें हे विनंती.

¶*Shrinivasrao Narsinha communicates to the Peshwa that all his attempts to protract the negotiations have failed and that the English have succeeded in occupying the castle and the city as well.*

---

१ न्हासकाली.

No. 222] [9-2-1759

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक अनाजीराव बेलोसे सेवेसी विज्ञापना ताा छ १० जााखरपर्येत सेवकाचे व अरमारचे वर्तमान येथास्थित असे विषेश. छ २६ जमादिलोवलचे आज्ञापत्र छ ८ जााखरी सदर जाहले. तेथे आज्ञा की इंग्र(ज) लडाईचे सामान घेऊन माहगेरीया लोक भरून सुरतेस येणार त्यास तुम्ही सावध राहणे म्हणून आज्ञा. अज्ञेप्रमाणे सावध असो. सुरतेतील वर्तमान तरी सारे सारे साहुकार व इंग्रज वलंदेज व मियाआछन व अली नवाजखान यैसे सारे येकत्र होऊन सिदीसी लडाई द्यावी यैसा करार करून इंग्रजाचा कपितान व वलंदेजाचा कपितान फेतोऱ्या कुलपे करून बारेयावरी आले आहेत. सिदीने तमाम जागा जागा मोरचेबंदी करीत आहे; सारे मिलोन म्हणतात की, किला सोडून देणे. हवेलीत राहणे तनखा घेऊन यैसे म्हणतात. त्यास सिदी म्हणतो की किला देत नाही. तुम्ही सारे येकत्र जाहलेत तरी लडाई देईन. भांडोन किला आम्ही घेतला आसे त्याप्रमाणे तुम्ही घेणे यैसे म्हणतो. पुढे काये होईल ते पाहावे. येथोन दोन गुराब लाहान मुंबईस गेल्या आहेत. अरमार आणावयासी त्या आल्या. उपरांत जे काही होणे ते होईल सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Anajirao Belose from Surat informs the Peshwa that the English, the Dutch, Miya Achhan, Ali Navajkhan all have united to fight with the Sidi. The Sidi is equally stubborn in his attitude towards them.*

No. 223] [6-4-1755

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २३ जमादिलाखरपर्यंत यथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र छ १७ जमादिलाखरचे पाठविलेले ते आज छ मजकूरी येथें पावलें. तेथें आज्ञा कीं राजश्री रामाजी महादेव व दिनकर महादेव यास पत्रें पाठविलीं आहेत ती जलदीने रवाना करणे. त्यावरून आज्ञेप्रमाणें दिनकरपंत याजकडे डाकेबरोबर पत्र रवाना केले व रामाजीपंत याजकडे मुजरत सरकारच्या खिजमतगाराबराबर रवाना केले आहे. उत्तर आलियावरी सेवेसी पाठऊं. रामाजीपंताकडील पत्र पंधरा आठरा रोज पत्रें येत नाहीं. याजकरितां महाडास जासूदजोडी पाठविली होती. त्यास तेथील सूर्याजी हरी यांणीं

लिहिले, कीं रामजीपंत व मोराजी सिंदे व बलकवडे व नारो त्रिंबक ऐसे आरमारावरून आंजरलेयाचे खाडीत आहेत. पायवाटेनें पाच हजार माणूस खुसकीने गेले. ते व हे एकत्र होऊन सुवर्णदुर्गी गेले. पेठ दग्ध होऊन याचा व त्याचा युध प्रसंग होत आहे. गोडे विहिरीवरी मोर्चेबंदी केली आहे. इंग्रजाचीं च्यार जहाजे मोठी व कांहीं लहान आहेत, त्याजमुळें सरखेलीचे आरमार बारियावरी आहे. हे मोठी तरांडी व गुराबा हरणईच्या बाऱ्यावरी ठेऊन वरकड लहान आंजरले याचे खाडीत आहेत. इतके वर्तमान त्याणी लिहिले आहे. सत्य मिथ्या ईश्वर जाणे. परंतु आले वर्तमान सेवेसी ल्याहावें याजकरितां लि॥ आहे. याप्रमाणेच वर्तमान असिले तरी कुमक पाहिजे. याजकरितां दिनकरपंतासहि लि॥ कीं रामजीपंत तुम्हास लिहितील त्याप्रमाणें तुम्ही फौजसुधां कुमकेस जाणे व रामाजीपंतास लि॥ कीं याप्रमाणें वर्तमान असिलें तरी दिनकरपंतास कुमकेस आणावे लागेल ऐसे आहे. जर फौज उतरावयाचा प्रसंग असिला तरी लेहून पाठवणें, त्याप्रमाणे ते उतरतील म्हणून लिहिले आहे. त्याची उतरे आलियावरी सेवेसी लेहून पाठऊं. आमचे पत्राअगोधर राजश्री दिनकरपंत यास राजश्री रामाजीपंत यांचे पत्र गेले असिले आणि या प्रमाणेच मजकूर असिला तर दिनकरपंत फौजसुधां उपराळियास गेलेच असतील असें दिसतें. बातमीची पत्रें आलियावरी सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News that Suvarnadurg is being blockaded on land and sea by the forces of the Peshwa and an English squadron respectively, is communicated to the Peshwa.*

No. 224] [*24-2-1759*

छ ११ जमादिलाकर

श्री

राजश्री नाना पडित प्रधान
गोसावी यांस

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री रघोजी आंगरे वजारतमाब रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. कृपापत्र बराबर जासूद सादर जाहाले. मुकाम मोर्चा उंदेरी प्रविष्ट होऊन आज्ञेचा अर्थ श्रवण करून संतोष जाहला. उंदेरीच्या मोर्चेबंदी बंदोबस्त केलाच आहा, राजश्री रामाजीपंत व नारोपंत तेथें गेलियावर

येलगार[1] करून किंवा युक्तीस पडेल त्याप्रमाणें सर्व येका विचारांत राहून जागा हस्तगत करणें म्हणोन आज्ञा केली, ऐशास राजश्री रामाजीपंत व नारोपंत येऊन पावलियावर साहास करावें हाच निश्चय सर्वांचे विचारावरून पंत सुभेदारीं ठरावांत आणून, उंदेरीच्या दरम्याने खाडी आलिकडेस अगोधर मोर्चे आहेतच. हालीं दमदमेयाचें काम तयार होत आलें तें देखील काईम राखोन, मोर्च्यावरून व अरमारावरून मारगिरी होत आली. तदोत्तर किलेयासी जाऊन धडकावें, सिडिया० टेकाव्या, ऐसा करार सर्वांस पंत सुभेदारीं उमेदवारी देऊन केला, आणि कांही आरमार पूर्वेकडील दरवाजियाकडेस व कांहीं आरमार किलेयाचे दक्षणभागीं दिंडी दरवाजा आहे तिकडेस नेमणूक करून छ ६ जमादिलावलीं रात्रीस रवानगी केली. पंत सुभेदार व आम्ही व नारोपंत देखील लोकाचे पाठीवर * * चढोन करारा-प्रमाणें येकाच अवसरांत दोहीकडेस लोकानी उतरावें त्यास दरवाजियाकडेस गलबतास पाणियाचे वोहटीमुळें पाणी प्रतिकूल जाहालें. यामुळें गलबतें माघारा राहिलीं. लोक उतरूं पावले नाहीं. दक्षणेकडेस लोक नेमणुकप्रमाणें जबर-दस्तीनें उतरोन गेले; तथाप दरवाजियाकडील अगदीं मोकलें पाहून किलेयावरून दक्षणेकडील लोकावरी मारगिरी तोफाचे गोले व रेजगिरी व बरकंदाजी अतिशयेसी होत आली. लोक जाया जाले ते जाहालेच, परंतु माघारा फिरों दिल्हें नाहीं, किलेयाचा हात धोंडा पावे ऐसें खडपाचे टापू पाणी भरलेयावर उरागळेयाबराबर पाणी चढत होतें, ते टापू लोकापासून धरविले. लोकानी बरीसी मर्दुमी करून टेप धरिलें. दुसरे दिवसीं मोर्चेबंदीचें साहित्य लगट करून पाठऊन आपआपले नेमणूकप्रमाणे, कणगे[2] उभे करून लोकांस आश्रये करून दिल्हा. भक्षभोज्याचें पाणी उदकाचें अनकूल बाहेरून अन्न शिजऊन सर्व साहित्य उदक देखील होडीयांत व मचवेयावर आम्हांकडून व सुभेदारांकडून व नारोपंताकडून पावीतच असों. मोर्चा श्रमसाहासेंकडून काईम करून तोफा व गरनाला मोडिल्या आहेत. मारगिरीमुळें तोफांचें गोले समीपतमुळें लागू होतात. गरनालाचे किलेयांत पडतात. याप्रमाणें दक्षण दिंडीकडील साधन साधोन आलें असें. दरवाजिया-कडील पूर्व भागीचें साधलें नाहीं तें साधावें हा विचार योजित आहों. पाणि-यांतील प्रकार साध्यांत आणितां श्रम जाणोन पंत सुभेदाराचे विचारें येक गुराब काठी बाण उतरून गुराबेस पेटी भरून लोकांस आश्रये करून तोफा आहेतच. जेजालदार दोघे व बरखंदाज चढऊन दरवाजियाचे बंदरी नेऊन अडऊन मोर्चे याप्रमाणे काईम नांगर टाकून ठेवावी, आणि मारगिरी गरनालादेखील करित जावी, ऐसें योजोन तरतूद करित आहों. सारांश साहास केलियाप्रमाणें कार्य

१ हल्ला. २ उंचवटे.

जालें म्हणजे केल्या श्रमाचें प्रमाण पडेल. आजि विस्तार लेहून सार्थक काये? तथाप कितेक लोक जायां जाले व होतच आहेत हें दिनचर्येचें वर्तमान सेवेसीं कलावें म्हणोन लिहिलें असे. जलमार्गाचा राबिता अगदीं बंद जालाच आहे. सामान सरंजाम येणेच नाहीं. इंग्रेजाचा बंदोबस्त जाल्याप्रमाणें पुर्ता असावा. उंदेरकारास दिवसेंदिवस अडचणच पडत आली आहे. स्वामीसमर्थाचें पुण्य समर्थ असे. सविस्तर पंत सुभेदारी लिहिलें आहे त्यावरून श्रुत होईल. रवाना छ २९ माहे जमादिलावल बहुत काय लिहिणे? कृपा निरंतर वर्धमान असावी हे विनंती.

¶*Raghuji Angria reports the progress of siege of Underi.*

No. 225] [*25-2-1759*

श्री

श्रीमंत राजश्री साहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक संभाजी मंगेश व गणेश त्रिंबक चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा माघ वद चतुर्दशी रविवासर पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. छ १७ जमादिलाखरचे आज्ञापत्र पाठविले ते छ २२ जमादिलाखरी प्रविष्ट जाले. इंग्रजाचे आरमार सुर्तेस गेले त्याणी व सरकारचे फौजेन येकत्र होऊन सिदीचे पारपत्य करावे येविसीं कितेक मजकूर बोलणे आहेत; त्यास त्याणी आपणाकडील मातबर विश्वासू वकील हुजूर पाठऊन द्यावा व येक चिरंजीव राजश्री नाना[1] यांकडे पाठवावा; हे कार्य सिधीचे लिहोन इंग्रजास पाठविले आहे व तुम्हास कलावया मसुदा पाठविला आहे. कल्याण चोपदार व जासूदजोडी पाठविली आहे यांस बराबर घेऊन जाऊन त्यांस पत्र पावते करून उतर घेऊन पाठवणे व दोन वकील रवाना करीत ते करणे म्हणून आज्ञापत्री आज्ञा केली. येसियास हुजूरून लखोटे आले ते बंदरावरून परभारे अजम जनराल यांकडे गेले. जोडसांधी होऊन लखोटा न आला. निरनिराळे होते. त्याणीं आपला लखोटा घेतला. सेवकाचा सेवकाकडे चोपदार जासूद सहवर्तमान पाठऊन दिल्हा व बलाऊं तेव्हा भेटीस येणे हें सांगोन पाठविले. तथाप जलदीन निकाल पडोन यावयाचा वृंदावनदास यांचे मारुफतीन जनराल यांकडे सांगणे जात असे. त्यास त्यांचे खलबत जाल्यानंतर सेवकास काल साईकालचे बलाऊन नेले. आज्ञेप्रमाणें चोपदार

---

१ पुरंदरे.

यांस बराबर घेऊन गेलों. फारसखानसहवर्तमान सिदीच्या पारपत्यास तुमचे आरमार सुर्तेस गेलें. सरकारची फौज व आरमार तेथ आहे; त्याणी तुम्ही मिलोन सिदीचे पारपत्य करावें, यास चलबिचल असों नये. केल्यास कर्तव्य सिध नाहीं येविसी कितेक तुम्हांस सांगोन पाठवावया तुमचा मातबर वकील हुजूर बलाविला आहे. पाठऊन बोली मनास आणावी व येक राजश्री त्रिंबकराव यांकडे रवाना करावा म्हणून तपसिलें सांगितले. आईकोन जनराल याणी उत्तरें केली. जो हा मनसबा केला तो हुजूरचेच बोलीवरून केला असे. फारसखान हकीमाय[1]-वर बसवावया पाठविले आहेत. हे सिदीन सिधीस जाऊ न दिल्यास त्याचे पारपत्य होऊन नियताप्रमाणे अमल चालतील हें कर्तव्य सांगोन वकील हुजूर पाठवावयाचा विचार होता परंतु प्रस्तुत मातबर विश्वासू हजीर नाहीत याकरितां आरमारची रवानगी करून हुजूर लिहोन कागदी पाठविले आहेत ते हुजूर पुणेयास किंवा श्रीमंत स्वामीकडे स्वारीत गेले असतील त्या पत्रावरून सविस्तर विदित जालेच असेल व सुर्तेस आरमार गेलेयाचें सविस्तर राजश्री नारोपंतें[2] सुबेदार यांसहि लिहोन पाठविले आहे व येच बोलीविसी राजश्री त्रिंबकराव यांकडे वकील पाठवा तरी तोहि कार्यानरूप पाठऊं येसे सांगोन हुजूरच्या पत्राचे प्रतिउतर पिसवीसुधा लखोटा दिला तो कल्याण चोपदार व जासूद जोडी यांजवळ देऊन सेवेसी पाठविला आहे त्यावरून त्यांचा आशय सेवेसी विदित होईल. इंग्रजाचा मनोभाव मनास आणितां सुर्तेतील कार्यसिधि होऊन आल्यानंतर व श्रीमंत साहेब व साहेब पुणेयांत येक जागा जाल्यानंतर वकील पाठविणार आहे पाठवितील व राजश्री राऊ यांकडे पाठवावासा जाल्यास पाठऊं येसहि बोलिले आहेत. आणखी आज्ञा फारसखानास हकीमायवर बसवणार हे सिदी नाईकेसे जाल्यांस सरकारची मदत न घेतां आपल्या जोरें पारपत्य करावें आणि सल्येंवरून हकीमाय सोडविली तरी फारसखान यासी हकीमायवर बसऊन सिदीच्या नियताप्रमाणें सिदीचे चालवावें हाहि विचार आहे. प्रस्तुत आरमार गेले हे खाडींत सिरोन यांची त्यांची कटकट होत आहे आणि तहाची बोली त्यांत पडोन आली असे काल इसमीनसेर इंग्रेज याचें लिहिले आले आहे. व राजपूरीहून सिदीचे दोघे खिजमतगार आले आहेत. तहन समजतात किंवा युधे समजतात यांचा कसा काय विचार होईल तो मागाहून सेवेसी लिहोन पाठऊं. सेवेसी विदित जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶[*Sambhaji Mangesh and Ganesh Trimbak report that the English have decided upon ousting the Sidi from Surat and securing the Governorship for Faraskhan. They have in consequence despatched an English squadron to Surat.*

१ हाकीमाई = Office of Governor. २ नारोपंत केसकर असावा.

No. 226] [26-2-1759

पो छ ९ रजब

श्री

सेवेसी कृष्णाजी अनंत[1] साा नमस्कार विनंती. ताा छ २७ जमादिलाखर मुाा नवसरी स्वामीचे कृपादृष्टीकरून वर्तमान यथास्तित असे विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहलों ते राजश्री पवार आम्ही नवसरीवर आलों. छ २३ जााखरी दाखल जाहलों. छ २९ तारखेस पागासिलेदार बोरगे, भोसले, बाबर ताकपीर व सदासिव दामोधर याची पागा व विस्वासराव पवार येसे दाखल जाहले. इकडील सविस्तर वर्तमान तरी आपली पत्रे नारो त्र्यंबक यासी प्रविष्ट केलीं. त्याणी दोन उत्तर पाठविलीं ती पावली. आपल्या पत्राचें उत्तर इंग्रजाकडील जाबसाल आलियावर सविस्तर लिहून पाठऊं. येक मोघम पत्रे परभारी पाठविली आहेत म्हणून लिाा आहे. आमचे नावे पत्रे आली तीच बजिनस सेवेसी पाा आहेत. आम्हापासून दाहा कोश आरमार आमचे आहे त्यास मध्ये डाक बसाविली आहे. नित्य त्याचे उत्तर येई ये बातमी राखिली आहे. सुरतेत पाच सात पत्रे पााच आहेत दरवाजे बंद आहेत जाबसाल येणे कठीण येसा प्रसंग आहे. मियाअछन याचे माणूस चोरून आले होते त्याणे लिाा जे ताबडतोब येऊन पोहचणे. परंतु पाहतां मिया अछन आपली हवेली दरबारी राहतो ते जागा बलकाऊन आहे. दुसरे हाती काही राहिले नाहीं. अलीनवाजखानहि आपली हवेलीच बलकाऊन आहेत. सर्व बंदोबस्त सिदीचा आहे त्याचे हाती सावकार वगैरे कोणी नाहीं. तूर्त लौकिकात अछन अली नवासखान सिदी येक म्हणवितात. लढाईस सामील आहो येसे बाहीर बोलतात. अंतःकरण श्रुध नाहीं. आमचाहि शह हबसियावर बसला आहे. इंग्रजासहि आहे. आपाजी केशव श्रीनिवासराव यासी पत्रे पेशजी आपली आणिली तेव्हा पाठविली त्याची उत्तर दाहा कोशावर यावयासी पाच दिवस लागले. फिरोनहि पत्रे पाा आहेत. श्रीनिवासराव येणार त्यासहि बोलाविलें आहे. त्याचे व अछंनाचे हाती कांहीच नाहीं परंतु खबर बखर कळली पाहिजे याजकरितां श्रीनिवासराव याणी येतो म्हणून लिाा त्यास येणे इतके पत्र लिाा आहे. वर्तमान तो सुरतेतील नित्य संध्याकाळास कलते व आरमाराकडून नारोपंताचेहि लिहिली येतात. नारोपंताची पत्रे व आपाजी केशव श्रीनिवासराव याची पत्रे आम्हास आली. यांतील मजकूर लिाा आहे. याजप्रमाणेच राजश्री यशवंतराव पवार यासी पत्रे आलीं त्यातहि मजकूर याजप्रमाणेच पत्रे आलीं. अधिकोतर कांहीं आजपर्यंत नाहीं. आपले

---

१ तांबे असावा.

पत्राची उत्तरे सुरतकरानीहि पा॥ नाहींत. नारो त्र्यंबकानी पाठविली म्हणून लि॥. परंतु इंग्रेजाचा जाबसाल आलियाखेरीज कांही पत्रे देत नाहींत. आपल्याकडील गुता तिलभर राहिला नाहीं. फौजसुधां शहावर आज पाच सात रोज दाखल जाहलो. आरमारकराकडील वगैरे आजपर्यंत अधिकोत्तर कांही नाहीं. आज आमावाशा आहे. द्वितीया त्रितीयापर्यंत इंग्रज काय करील ते पाहावें. सिदीहि निदानास टेकसा आहे. लढाई जाहली तरी उतमच होईल. बोरगे यासी आपली पत्रें अर्जुनगडी पावलीं. परंतु पुढें दोन तीन मजली आम्हापर्यंत तैसेच आले. आम्हापासीं बजीद जाहले जे सर्व पागातून आम्हास निवडून टाकावे. हे काम जाहलीयावर मग रवाना करणे येसे म्हटले म्हणून ठेऊन घेतले. रागास न यावे हे विनंती.

¶Krishnaji Anant reports his arrival at Navasari and also that of Borge, Bhonsle, Takpir and their contingents and describes the state of affairs at Surat, particularly dealing with Achhan, Ali Navajkhan and the English.

No. 227] *[27-2-1759*

पो॥ छ ९ रजब

श्री

सेवेसी विनंती. कृष्णाजी अनंत सां॥ नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता॥ छ २८ जमादिलाखरपरियंत वर्तमान येथास्थित आसे. यानंतर इकडील वर्तमान हा कालवरी सर्व उतम असे. रा॥ नारो त्रिंबक याची पत्रें दोन व आपाजी केशव व श्रीनिवासराव याची पत्रे येसी च्यार पांच पत्रे बजिनस अली तीच सेवेसी पाठविली आहेत. पावल्यानंतर सविस्तर अर्थ ध्यानास येईल. सारांश येक दोन दिवस भरती उथान आहे यांतच जे होणे ते होईल. सिदीचाहि जोराच आहे. इंग्रजासी लढाईची हिमत धरीत आहों. हली दो माहालावर दोन वराता दाहा हजाराच्या अगत्य पाठविल्या पाहिजे. अलाहिदा याद पाठविली आहे त्या याद्यावर वराता पाठविजे. राजश्री यशवंतराव पवार व आम्ही येक विचारें आहों दुसरा अर्थ धरीत नाहीं. सरकार कामकाजास अंतर कोण्ही करणार नाहीं. आमची प्रकृती तरी सरकारचे कामाकरितां सर्वांचे सेवक म्हणून कोणी न आईके त्यास आईकऊन वर्तऊं कोणेहि गोस्टीविसी अंतर होणार नाहीं. ज्याची जैसी मर्जी तैसेच बोलोन सरकार चाकरी करूं. रानातील वैरण मात्र आणितों वरकड ताकीद करीत आहों. बोभाट स्वामीकडेस गायकवाड वगैरे माहालकरी

लिहितील तरी त्यास साफ सांगावे जे तुमचे गावचा सेरभर दाणा कोणी घेतला असिला तरी दोन सेर देऊन जाबसाल करूं येसे त्यास सांगोन आम्हाकडून अंतर पडणार नाहीं. परंतु हे गुजराथी लोक आहेत कोणी आपणास लिा तरी आंगी येक मुदा लाविल्यावर जाबसाल करूं याजप्रमाणें वर्तणूक करीत आहो. येशवंतराव पवार यास पत्र जे येत जाईल त्यास ताकिदीविसीं खरपूस लिहीत असावें. गायकवाड सुधा माहाल खालशाचे जाणून फौजेस ताकीद करणे येसे वरचेवर जागवीत असावे. आम्हीहि विनंती आपल्यापासून येतांच केली आहे. जे आम्ही तुमचे ताबे सर्व प्रकारें सरकारचे कामास हजीर आहों. परंतु फौजेचे ताकिदीचा जिमा आमचा आहे. आण धन्यानी आज्ञा केली आहे. ताकिदीविसीं तुमचे फौजेची मुरवत धरणार नाहीं पारपत्य करीन येसे सांगोन जप्त बसविलाच आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Anant sends to the Peshwa the despatches received from Naro Trimbak, Apaji Keshao and Shrinivasrao and further says that he is acting conjointly with Yeshvantrao in settling the affairs of Surat. He predicts severe fighting between the English and the Sidi who is intent on stubborn resistance.*

No. 228] *[Feb. end 1759*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री कृष्णाजीपंत स्वामीचे
शेवेसी

पो श्रीनिवासराव नरसिंह साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत आसावे विशेष. आपले पत्र पावले. लिहिले की राजश्री येशवंतराव व आम्ही या प्रांतास आलों. तुम्हाकडील आलियातागाईत वर्तमान कलत नाही; तर मिया अछन व सिदी वगैरे हे सर्व जे आज ताा जाले ते सविस्तर लिहिणे. त्यास आम्ही येथे छ २० तारिखी दाखल जालों. वस्त्रे मियाअछन यानी विशेष समारंभे घेतली त्याचा विस्तार राजश्री रावजीस पूर्वी लिहिला आहे. येथील वर्तमान इंग्रेज आपले जमावसुधा समीपच आहे. सिदीने जागा जागा बंदोबस्त केला. आमावाशेस समुद्राचा जाल येणार तेव्हा इंग्रेज हगामा करणार. सिदीहि बहुत हुशियार आहे. मियाअछन याचा विचार जाहिरीत सिदीचे व याचे ऐक्य दिसते. आपण समागमे आहेत हे आम्हास कलले नवते. आपले पत्र आले तेव्हा उमजले. आपण व राजश्री रावजी समीप येतात. आम्हास प्रसिधच बोलावणे. सर्व अर्थ समक्ष भाषणात येतील.

तेथे बातमी लिहू म्हटलिया बनत नाही. कितेक अर्थ रूबरू बोलिले पाहिजेत. ऐसियास समय येताच आम्हास बोलाऊन घेणे. वरकड कितेक अर्थ राजश्री आपाजीपंत याचे लिहिलियावरून कलतील. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे हे विनंती.

जरूर आम्हास आपणापावेतो बोलाऊन घ्यावे. मी जसे सांगतो तसे करावे. सर्व गोष्टी चितानुरूप घडून येतील हे विनंती.

¶*Shrinivasrao Narsinha to Krishnajipant that the English attack is expected to come within a couple of days and the Sidi means to stand his ground.*

No. 229] [*1-3-1759*

पो छ ६ रजब

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

पोष्य आपाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ १ माहे रजब प्रहर दिवसपर्यंत मोकाम शहर सुरत रघुनाथपुरा स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. इंग्रेज आलियावर प्रथम लडाई जाली. याचे वृत पूर्वी खासबारदार याजबराबर सेवेसी लेहून पाठविलेच आहे, त्यावरून विदित जालेच असेल. त्याउपरांत फिरून इंग्रेज अरमारसुधा लढाईस आला. खुशकीस आठव्याचे दरवाज्याकडेस लडाई घातली; व आरमारावरूनहि तोफाचा मारगिरी करू लागला; व सिदीकडूनहि जंगीबंदरावरून व आलमदनाचे कोटावरून तोफाची मारगिरी परस्पर तीन दिवस जाली. इंग्रेजाचा जोरा भारी व तोफखाना अनिवार; त्यांनी मारगिरी करून शहरपनाचे अलगेचा मार व जंगी बंदराचा मार तोफाचा तमाम बंद केला. शहरपनाचे अलगेवर मोगलाचे माणूस उभे राहू पावत नाही. याचप्रमाणे जंगीबंदरावरीलहि मार बंद करून जंगीबंदरावरहि माणूस शामलाचे वगैरे कोणी फिरू सकत नाही; याप्रमाणे इंग्रेजाचे मारगिरीमुले जाले. शहरचा मार बंद करून इंग्रेज जागा सोडवीत शहरसंनिध खुशकीनें काल छ २९ जमादिलाखरी शहरपनाचे कोटास सिड्या लाविल्या. दोन प्रहरी सिडी लाविली, तेव्हा शामलाचे लोकानी जमावसुधा जोरा करून सिड्या लोटून दिधल्या. से पनास माणूस ठार पाडिले. याप्रमाणे काल बुधवारपर्येत जाले. उपरांत पाहाटेची प्रहर रात्र राहाता फिरून इंग्रेजाचे अरमार पुढें चालोन

साखल टाकिली आहे तेथपर्यंत आले. तोफाची मारगिरी अतिशये करीत आहे. इंग्रेजाचे मारगिरीमुले जंगीबंदर व शहरचे कोटावरील मारगिरी तमाम बंद जाली आहे. इंग्रेजाचे मारगिरीपुढे इकडील उपाये काही चालत नाही. इंग्रेजाचा जोरा बहुत भारी. जंगीबंदर अद्याप घेतले नाही; परंतु घेतल्यामध्येच आहे. आज अगर उदईक जंगीबंदर इंग्रेजास हस्तगत होईल. इंग्रेजाचा मार सिदीचे किल्यावरहि लागू जाला. किल्यामध्ये नगारखान्याचा बंगला होता तो तोफाचे गोल्याने इंग्रेजानें पाडिला. याप्रमाणे आजपावत वर्तमान जाले. पुढे होईल ते लिहून पाठऊन. आम्ही शहरामध्ये सर्वासी स्नेह संपादोन आपले हवेलीमध्ये असो. राजश्री येसवंतराव पवार व राजश्री कृष्णाजीपंत यैसे फौजेसह वर्तमान पलसाणियावर होते. त्याजकडस मियाअछन यानी रा श्रीनिवासपंत व त्यानी आपला मुनसी यैसे उभयेता रवाना केले आहे. काये मुद्यावर रवाना केले हे कलो दिधले नाही. इंग्रेजासी लडाई शामलाचे लोक घेतात. मियाअछन याचे लोक लडाईस झडत नाही. जागा जागा अलगेचा आसरा करून बसले आहेत; या प्रकारचे वर्तमान आहे. राजश्री येसवंतराव याची फौज आज मौजे बरासे शहरापासोन तीन कोसावर आली म्हणून वर्तमान आले आहे. जंगीबंदर इंग्रेजाने घेतले. जंगीबंदरावर शामलाचे लोक होते ते निघाले. जंगीबंदरावरील तोफा वगैरे सरंजाम शामलाचा इंग्रेजास हस्तगत जाला. सेवेसीं श्रुत जाले पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*Apaji Keshao describes to the Peshwa the terrific cannonading of the port and the city walls by English guns and the subsequent occupatian of the port by the English.*

No. 230] [*3-3-1759*

पौ छ ९ रजब

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेबाचे
सेवेसी .

विनंती सेवक गणेश अनंत मो कुभारू सिरसास्टांग दंडवत विज्ञापना. ता छ ३ रजबपावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेस. श्रीमंत राजश्री शंकराजीपंत नाना याही बातमीस मजला रवाना केले असे. त्यासी इंगरेजानी सिदीचे जंगी बंदर घेतले; किलाहि जेर केला असे; तोहि दो ती रोजी घेईल. इंग्रेजाचा जोरा भारी आहे. आछनकडील माधवराव लस्करात आले होते की

शार आपलियासी घेऊ व किला सिदीकडेस ठेवावा, आण पुणियासी लिहून जाब आणावा ऐसे बोलोन गेले. त्यासी याही जाब केला. किला व शाहार आम्हास द्या. त्यासी ते फिरोन अछनकडेस गेले असत. काये होईल ते पाहावे. मी साहेबाचा चाकर असे. त्यासी श्रीमंत राजश्री शंकराजीपंत नानाही माझी तैनात पाच रूपये कमी केली असे. त्यासी ह्याचे तैनाती प्राो करार करावयाची आज्ञा केली पाहिजे. मी व दोन सिपाई येथे असे. याचे त्याचे बीत बसलियावरी येईन. बहुत काये लिहिणें हे विज्ञापना.

¶*Ganesh Anant reports news to the Peshwa about the capture of the harbour of Surat by the English. He says that Miya Achhan asks for help from the Peshwa and promises to give him the city in return for allowing the castle to remain in the Sidi's hands.*

No. 231] [*3-3-1759*

पौ छ ६ रजब

श्री

श्रीमंत राजश्री नाना
साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक गणेश अनंत मो कुंभारू सां दंडवत प्रो विज्ञापना. ता छ ३ रजब पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेस. आपण मजला बातमीचे पत्रे पाठवावयासी रवाना केले; यासी मी सातवे दिवसी कुंभारीस येऊन पावलो. त्यासी शाहाराची बंदी जाली होती. निमित्य की इंग्रेजानी लडाई करीत होता त्यासी यासी शहरात कोणी गेला नाही; मग तजविजीने पत्रे लिहून जाब आणले असत ते बजिनस आपणाकडेस रवाना केले असत. आतून लाखोटे आले तेच बजिनस पाठविले. शाहा * * वर्तमान तरी इंग्रेजानी पाच दिवस लडाई केली. यासी पहिले दिवसी वलंदेजाचे बागाचा आश्रा करून मार केला; दुसरे दिवसी सावकाराची मोडकी व काही धडसी गलबते वलंदजाचे बागात येऊन बसोन बंदरात तयार करून दिडीबंदर जेर केले. मग त्यासी जगीबंदरास सिडा लाविल्या. त्याजवर सिदीचे लोक उतरोन त्याचा मोड केला. मग त्याणे सावर धरून तिसरे दिवसी जंगीबंदर घेतले. मग साखल होती ती चुबक करून तोडिली. जंगीबंदर घेऊन किला जेर केला असे. आज उद्या किला इग्रेज घेईल. आपले लस्कर येऊन आस्विनीकुमाराअलिकडेस कोसभर तापीचे काठावरी राहिले असे. त्यासी अछनकडून माहादवराव आले होते की च्यार

हजार राऊत शाहारात द्यावे. शाहर तुम्हास देऊ, आण किला सिदीकडेस असो द्यावा. पुणियासी पत्रे पाठऊन जाब आला म्हणजे तुम्हास देऊ ऐसी बोली अछन करितो. त्यासी श्रीमंत राजश्री कृष्णाजीपंत बोलिले की ते गोष्ट होणार नाही. किला आम्हास द्याल तर राऊत जे मागाल ते देऊ ऐसा जाब जाला असे. पुडे काये होईल ते न कले. राजश्री आपाजीपंत व दतबा खुशाल असत; याजकडेस काही गुंता नाही. पाचसातसे सिदीचे माणूस मेले व इंग्रेजाचेहि मेले. जुंजे तुंबल जाली असत. पुडे कोण थरेल व कोण जितेल ते पाहावे. किला कोणी घेतला म्हणजे मी उठोन येईन. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶Ganesh Anant describes to the Peshwa the heavy fighting between the Sidi and the English which continued for five days. Miya Achhan sends Madhavrao to Peshwa's agent for help and proposes to cede the city.

No. 232] [*4-3-1759*

पौ छ १३ रजब

श्रीशंकर

राजश्री नाना गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित येशवंतराव पवार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल छ ४ रजब जाणून स्वकीय लेखन करीत असावें विशेष. आम्ही फौजसुद्धां पलसाणियानजीक आलों. तेथें राजश्री दामोदर रघुनाथ राजश्री नारोपंत याजकडून आले. त्यांही सर्व वर्तमान इंग्रेजांकडील सांगितलें. त्यावरून राजश्री गोपाळपंत आम्ही रवाना केलें. ते राजश्री नारोपंत याजकडे जाऊन भेटले. इंग्रेजाचें अरमार व याचें अरमार येकें जागांच आहे. मग राजश्री गोपाळपंत[१] इंग्रजांकडेस गेले. इंग्रेजांनी मारगिरी करून सुरतेचें जंगीबंदर घेतलें आहे. तेथें होता त्याणेंहि स्नेहाच्या गोष्टी सांगितल्या, परंतु मजकूर हाच कीं किल्ला अरमार सर्व आपणच घ्यावें. आम्ही छ १ रोजीं बरासें नजीक सुरत येथें येऊन मुकाम केला आहे. गोपाळपंतहि काल छ ३ रोजीं येथें आले. त्याही सर्व वर्तमान हें सांगितलें. त्यांस आम्हांकडेहि अछनमिया याचें अनुसंध्यान येथें आल्यापासून आलें आहे. आज ठराव जाला कीं सर्व शहर दरबार स्वाधीन करितों. त्यास आम्ही किलियाची अड

० श्री ०
भवानीशंकरचरणीं
तत्पर आनंदरावसुत
यशवंतराव पवार निरंतर
शके १७६२

---

१ गोपाळ सभाजी.

घातली की, किल्ला खाली करून आम्हांस देणें. त्याचा जाबसाल आज होणें तो होईल. जर किल्ला हातीं येई ऐसें जालें तर इंग्रेजाशीं विवाड करून किल्ला शहर घेऊन. आम्ही आपलें लष्करापासून नारोपंतापावेतों डाक राऊतांची बसविली आहे. हें राजकारण जालियावर आधीं त्याजकडे खबर पाठऊन निघें ऐसें करून. नारोपंताचेंहि विचारें हेंच आलें आहे कीं किल्ला येत असेल तर काम करावें. आम्हांस खबर करावी म्हणजे अरमार काढूं. त्यावरून डांक बसविली आहे. आजपावेतों जें वर्तमान जालें तें लिहिलें आहे. पुढें जें होईल तें लेहून पाठऊंन. हाली आतांच राजश्री नारोपंत याचेंहि पत्र आलें त्याचा मजकूर अलाहिदां पत्रीं लिहिला आहे त्यावरून कळों येईल. बहुत काय लिहावें? लोभ असो दीजे हें विनंती.

मोर्तब
सुद

¶*Yashvantrao Powar to Nana, communicating the news of the capture of the port of Surat by the English and the siege of the castle. It has been proposed to assist Miya Achhan on condition that the city and the castle are made over to the Marathas.*

No. 233] [*6-3-1759*

पैा छ ११ रजब

श्री

सेवेसी कृष्णाजी अनंत सां नमस्कार विनंती ता छ ६ रजबुपर्यंत स्वामींचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील मागी सविस्तर वर्तमान सेवेसी लिहिलेच होते. काल छ ५ रजबी संध्याकाळी इंग्रजानी जगींबंदर घेतलेच होते तेथून हला करून शाहार घेतले. सिदीचे लोक तमाम इग्रजानी फिताऊन आपल्याकडेस केले. शाहार घेताच सिदीनी किला हवाला केला. सिदीस शहराबाहेर त्याचा पुरा आहे तेथे राहावयासी जागा दिली. आतून सिधीचे माणूस सिपाई लोक वगैरे काढून दिले. अछन याचें सूत्र इंग्रजासी होतेच तेहि त्यास सामील जाहले आहेत. इंग्रजानी किला सर्व जागा आरमार घेतले. आम्ही आपले आज्ञेवरून इंग्रजासी सलुख राखिलाच आहे परंतु इंग्रज मगरूर बहुत आहे. आज दोन दिवस स्थळ घेतले, परंतु जाबसाल फुकाचा केला नाहीं. पुढें काय करितो ते पहावें. आम्ही तो त्यासीं जडोनच आहो. पेशजी राजश्री गोपाळ पंतास पाा तेव्हा त्यासी बोलोन आले जे पारसखान आमचे विद्यमानें बसवावा. जे करणे ते करावें, जंजीऱ्याचे आमचे साहित्य करावें, सुरतेचे मामलतीचा तह

करून चालवावें. त्याणे होय म्हटले. मुंबईस आपले धन्यास लिहिले आहे. उत्तर काय येईल आण फिरोन काम जाबसाल करील ते पाहावे. येथील आज ता। जाहले वर्तमान सेवेसी लिा आहे. सिदीने काही जुजोन रूप केले नाहीं. एक दिवस जंगबदरावर गोळी वाजली. फिरोन लढाई तिलमात्र जाहली नाहीं. इंग्रज शाहार वगैरे सर्व एक सिदीखेरीज बाहीर घातला. पुढे आम्हास काय आज्ञा ते केली पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Anant reports the capture of the port, city and castle of Surat by the English and their refusal to negotiate with Maratha General in the settlement of the Government of Surat.*

No. 234] [*Received 11-3-1759*

पौ छ ११ रजब

श्रीशंकर

पुा राजश्री नाना
गोसावी यासी

विनंती उपरी. इंग्रेजानी सुरत शहर किला घेतला, हा अर्थ काल तपसिलवार लिहिला आहे. आजहि लिहिले असे. घणदिवीवर आलो ते दिवसापासून अछनमिया लिहित होते व वकीलहि येत होते की शहरात येणे; पुढे किलाहि विचारेकरून येईल. त्यास आपली आज्ञा सर्वास की इंग्रेजासी बिघाडू नये. आरमारात अरमार मिलोन येकत्र राहिले पाहता इंग्रेजाचे अनुसंधान आपलियाकडे नाही. मगरूर बहुत. जबरदस्तीने येऊन बंदर घेतले. शहरांत काल आला ते समई जाऊन इंग्रेज सारे मारावे, अरमार रिकामे होतें सर्व घ्यावें, किला शहर हाती येतें; परंतु सर्वेच मते इंगरेजासी बिघाडू नये. आम्ही तयार होऊन जाऊन येक कोसभर गेलो परंतु जाऊ नये यैसे जाले, याकरिता बिघाड इंगरेजासी करिता न येसे जा * * सुरत घेतली. हबसियाची हवेली घेतली. मालमवेसी सर्व त्याची हाती आली. अरमार देखील हबसियाचे घेतली. आपलियास काडीमात्र देत नाही. इंगरेजासी बिघाड करू नये येसे होते, तर येथे आम्हास पाठवावे यैसें नव्हते. हलीं शहरभवती थोडी बहुत बंदी केली आहे. इकडे आम्ही आलियावर उगेंच बसावें यैसे जालें. येक इंगरेज यासी बिघाड केला असता तर सुरत शहर सर्व हाती आले असते. बरें जें आले ते उतमच आहे. आपलियाजवळून आलो तेव्हां हे काहींच आम्हास सांगितले

नाही. कळले असते तर सर्व बोलोन आलो असतो. हाली बंदी केलियाने काही तऱ्ही बोलले तर बंदी करावी की न करावी हे ल्याहावे हे विनंती.

¶*The writer Yashvantrao Powar disapproves of the Peshwa's order not to break relations with the English, which, he says, prevented Surat and its fort being captured by the Peshwa's men who were earnestly invited by Miya Achhan. Now that the fort is occupied by the English, the writer asks whether the blockade which he has effected should be continued.*

No. 235] [*11-3-1759*

पो छ १६ रजब

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोपाळ संभाजी कृतानेक सिरसाा नमस्कार विनंती. येथील कुशल जाणोन ताा (फा)ल्गुन सुध त्रयोदसी मुाा सुरत स्वामी कृपेकरून सुखरूप असो विशेषे इंग्रजा * * * * * च असाल तेथील बोलीचालीचा प्र * * * णोन आज्ञा त्यास आम्हीं इंग्र * * * * रक्षून च्यार गोष्टी उतम प्रकारे सां(गून जं)ज़िरे याचे साहित्य हबसियाचे करू नये याप्रमाणे त्यासी बोलिलो. श्रीनिवासराऊ याणी बहुत उपद्याप केला की मिया अछनाचा स्नेह रक्षावा. शहरांत मदत जावें. इंग्रजांसी भांडावें, परंतु ती गोस्ट काही केली नाही. अद्यापि ते राजकारणे करीतच आहेत. त्यास राजश्री दामोदरपंत इंग्रजाकडेस पाठविले आहेत त्यांचे उतर आलियावरी मीहि इंग्रजाकडेस जाईन. ज्या गोस्टीने त्याचा स्नेह आणि सरकारकाम होये तोच विचार करून. आज्ञा-सिवाये वर्तणूक होणार नाही. वरकड मुलुख सरकारचा कौली. ताकीत उतम करीत आहों. राजश्री कृष्णाजीपंत व राजश्री रावसाहेब येक विचारेच आहो. बहुत काये लिहून हे विनंती.

¶*Gopal Sambhaji to Peshwa Nanasaheb: reports amicable relations with the English have been maintained throughout despite adverse counsels.*

No. 236] [13-3-1759 ?

हू

अजंम त्रिंबकराव सदासिव मोकाम वसई
दाम मेंहबत हू

ℰ शाहामंत व मां आलीपन्हां शौकत व हिशमंत दस्तगाहा निशान ये अतिजाद दोस्तां अजी दील येखला हनंराब्येल रिचंर्ड+ बैच्यर प्रजिदेंत गोवर्नदोर जनंराल जंजिरे मुंबई बादज शेर शौक मंवासील मौ फुरुल फरहेत मंश डिदराये मेंहबत अफजायेमें गर्दानंदके जी * न बुलंद मंकान पंडित अजंम पंतप्रधान यांस जे काही बंदर सुरतेमंधे वाजबी पोहचत असल्याची खबरदारी बवजे अहसंत हजानेबी केली असे म्हणून इजत असार रणंसोड सेणंवै व सदासिव रामचंद्र यां हमंरा येखलासनांमा मर्कुंम करून आंरफाअतपन्हांस जाहीर केलें असे येकींन असें की आरफाअतपन्हांस माळूंम जाहालें असेल व त्याचे बमोजीव मांजूनइले पंडित अजम पंतप्रधान यांस जाहीर कलें असे. मांजुनइले व आरंफाअत्यपन्हांच्या हात होते की हबसियास बंदर सुरतेहूंन मांकूल करून काढावे तें बफजल इलाही होऊंत आंले ऐसे असतां हालीं काये म्हणौंन आरफाअतपन्हांकडील आदमी यांहि तेथे हक जाहला. तसदी पइजा नेटास घ्यावा. गला वगैरा जिंनस शाहारांत येते त्यास मुंजाहीम व्हावें तरहि हातनां मुंनासीब असे. इंजानेबांकडील आ(द)मी हरगीज आरफाहतपन्हा-कडील आदमी यांसी बदसुलूक आमलांत आणणार नाहीं. अमांगला वगैरा जिंनस शाहारांत जावयास मुजाईत होतच जातील तर मग. काय बनोन येईल त्याचा जबाब इंजानेबीं करावा ऐसें नाहीं. सबब कीं जिंनस तर शाहारांत अगत्य पाहिजे. इंजानेब ऐसें न चाहत असों का कोण्हा येकासी कजियाची हात पर देश आणांवी अगर निशान बुलदमंकान पंडित अजम पंतप्रधान यांचें येका रुपायास किंवा येक गज जमिनीस मुजाहीम व्हावें. ऐशास दोस्तीचे राहानें अरफाअतपन्हांकडे दरख्वास्त केलें जात असे कीं अजम येशवंतराव पोंवार व दुसरे अंमलदार ते जागां असतील त्यांजकडून नांमुनांसीब हत अमलांत न येईल तें फरमाविलें पाहिजे, व इंजानेबांस रास्ती मुदंत सर्व बंदोबस्त करावयास असावी ते होय तें केलें पाहिजे. इंजानेबांस सर्व बरें होय तेंच अमलांत आणितील. ज्यादा काय लिहिणें. प्यारया असों दिजे. रा छ १३ रजब हे किताबती.

¶*Governor Richard Bourchier (1750-59) of Bombay to Trimbak Sadashiv (Purandare ?), Maratha officer of Bassein, regarding some dispute about customs duties. Sadashiv Ramchandra, Yashavantrao Powar and Ranchhod Krishna are mentioned.*

+ Richard Bourchier.

No. 237] [15-3-1759

श्री

दिवर सरकारतर्फेची फौज सुरतेनर्जाक आहे त्याणी शहरची बंदी केली आहे त्यावरून मोहिबी कलमी केले की बंदी उठविली पाहिजे. मोहिबाचे लिल्यावरून बंदीची महकुबी केली असे. महकुबी करून शहरात हरजिनस जाऊ द्यावा. आमदरफ्तीस जराबाजरा तोसीस देऊ नये, म्हणून अजम येशवंतराव पवार यास कलमी केले असे.

छ १९ रजबी याप्रा इंग्रेजास
पत्रे भेजिली. बा। रणसोड कृष्ण
सदासिव रामचंद्र.

इजत असार रणसोड कृष्ण व सदासिव रामचंद्र हरदुजणाबो। मोहिबी खत महरकुम केले. तेथे लिहिले की सुरतेचा मजकूर उरकोन गेला असेल असा कुशराद ठहराव जाला म्हणून खतात जवाबसाल केला तो वाजबीच असें. हाली सुर्तेचे शहास्त हालीमाजी जाली असे. सबब सरकारतर्फेचे अमलाची राहा होऊन दुतर्फा सुरलीत चालले पाहिजे. सबब याददास्त पाठविली असे.

¶*Despatches are sent to the English stating that the blockade of Surat has been called off and goods are now allowed to enter.*

No. 238] [10-3-1759

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

पोष्य आपाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तगाईत छ माहे रजब पावेतो मोकाम शहर सुरत रघुनाथपुरा स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशष. शामलाचा किला इंग्रेजास हस्तगत जालियाचे वृत सविस्तर दोन पत्रे पूर्वी स्वामीकडेस लेहून पाठविलीच आहेत, त्यावरून विदित जालेच असेल. किला इंग्रेजास हस्तगत जाला. इंग्रेजाचे लोक किल्यामध्ये गेले. इंग्रेजाचे निशाण किल्यावर लागले. सिदी अहमदखान याचे लोक तमाम पलोन गेले. से सवासे माणसानसी सिदी अहमदखान हवेलीत राहिले. हवेलीचे दरवाज्यावर इंग्रेजाच्या चौक्या बसल्या. दुसरे दिवसी शामलाचे तमाम अरमार गुराबा व गलबते बंदरामध्ये होती ती इंग्रेजाने हस्तगत करून शामलाचें

अरमारावर इंग्रेजाने आपले निशाण चढऊन अरमार घेतले. इंग्रेजाचे लोक तो अगोदर शहरामध्ये आलेच होते. उपरांत मियाअछन याचा वडील पुत्र समारंभानसी जंगी बंदरावर जाऊन इंगरेजास व फारसखान यास बहुमानेकरून इंग्रेजास हवेलीस आणून पोहचाविला. दुसरे दिवसी मियाअछन याची द्वाही शहरात फिरविली. फारसखानहि आपले हवेलीस दाखल जाले. सांप्रत हवेलीसच आहेत. फारसखानास नायेबत सांगावी यैसा मजकूर आहे. पुढे होईल त्याप्रमाणे लेहून पाठऊन. याउपर लडाईचा प्रसंग राहिला. हाली राजश्री कृष्णाजीपंत बिनी शहराची बंदी केली आहे. शहरात अमदानी येऊ देत नाही. अमदानी बंद केली आहे. पेसजी मियाअछन याचे दंग्यामुळें बंद जाली यामुळे मामलतीचा आकार न जाला; व आरमार बारियावर येऊन बसले त्यामुळे पुरज्याचा आकार न जाला. हा कालपर्यंत पुर्ज्याची आमदानी बंदच आहे. मामलतीची ढवढव जाली. अद्यापि अरमार उठत नाही. पुढे खुशकीचा आकार व्हावा त्यास हाली लस्करानें बंदी केली यास्तव आम्ही राजश्री कृष्णाजीपंत याजकडस लस्करास मौजे वरासे येथे गेलो. त्यास आम्ही सांगितले कीं तुम्ही स्वामीकार्यावर आलेत. इंग्रेजानें शामलाचे किल्यावर व शहरावर हंगामा केला. जंगीबंदरामध्ये आला ते समई तुम्हास मियाअछन यानी शहरामध्ये फौज सुधा घ्यावे यास्तव राजश्री श्रीनिवासपंत व माहादाजी गणेश दोन वेला तुम्हाकडेस पाठविले आणि अलमपनाचे दरवाज्यास ताकीद केली की लस्कर शहरात येईल त्यास सुरक्षित शहरात येऊ देणे. लस्कर येईल त्याजवर तोफ बंदुख येकंदर न मारणे, यैसी ताकीद करून दोन दिवस भागला. उघड्या ठेऊन तुमची मार्गप्रतीक्षा केली; परंतु ते समई तुम्ही येऊन स्वामीकार्य न केले. दोन दिवस तुमचा मार्ग पाहिला. तुमचे येणे न जाले. शहरापासोन दोन कोसावर होतेस. आलियास स्वामीकार्य क्षेपनिक्षेप घडोन येते. ते समई तुमचे मर्जीस शहरात यावे हे गोष्ट न आली. हाली इंग्रेजानें सर्व गोष्टीचा बंदोबस्त केला असता सांप्रत तुम्ही बंदी केल्याने मामलतीची मात्र खराबी होईल. लक्ष रुपायाची शहरची मामलत व लक्ष रुपयाच्या जकाती बंदी केल्याने सरकारचे दोन लक्ष रुपये नुकसान मात्र होईल अधिकोतर होणे नाही. त्यास त्यानी उतर केले की शहरावर मसलत इंग्रेजाची, यास्तव आम्हास शहरास येऊन इंग्रेजासी बिघाड करावा हे श्रीमंताची आज्ञा नाही आणि आम्ही शहरात यावे याप्रो आम्हाजवळ सामानहि नाही; यास्तव आम्ही शहरात न आलो यैसे उतर त्यानी आम्हासी राजश्री श्रीनिवासपंतासमक्ष केले. तेव्हा आम्ही उतर केले की तुम्हास श्रीमंताची आज्ञा शहरात जाऊ नये; इंग्रेजासी बिघाडू नये. त्यास

हाली शहरामध्य सर्व प्रकारे इंग्रेजाचा बंदोबस्त. तुम्ही शहरची बंदी केलियास इंग्रेजाचा सलुक कसा राहील? तेव्हा कृष्णाजीपंत म्हणू लागले की आम्ही बंदी केली आहे ते इंग्रेजाचे सांगितल्यावरून केली आहे ऐसे म्हणतात. इंग्रेज तो म्हणतो की आम्ही यास बोलाविले नाही व याचा आमचा करारदाद काडीमात्र नाही, याप्रो इंग्रेज म्हणतो. अम्हाकडस इंग्रेजाचा वकील, बंदी काये म्हणून केली आहे म्हणून आला होता. त्यास आम्ही कृष्णाजीपंताचे सांगितल्याप्रो जाबसाल केला. फौजेचे बोलीमध्ये इंग्रेजाकडेस राजश्री नारो त्रिंबक जाबसालाला आहेत. आम्हास बोलीचा अर्थ कलो देत नाही. पुढे घडल ते लिहून पाठऊन. ना(रो) त्रिंबक जाबसालामध्यें आहेत म्हणून आम्हास राजश्री कृष्णाजीपंतांनीच सांगितले. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*The defeat of the Sidi and the capture of the castle and fleet at Surat by the English are reported to the Peshwa by Apaji Keshao. The writer also points out the inconsistency in having established a blockade at Surat which will possibly result in the breach of relations with the English so far scrupulously maintained.*

No. 239] [*25-2-1759*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
कृष्णाजीपंत स्वामीचे सेवेसी

पोष्य आपाजी केशव सां नमस्कार विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित असिले पाहिजे विशष. कृपा करून पत्र पाठविले ते पावले. राजश्री येसवंतरावजी व आपण फौजेसह वर्तमान ये प्रांती आलियाचा अर्थ लिहिला त्यावरून बहुत संतोष जाला. मुंबईकर इंग्रेज सुरतेवर आला आहे. लडाईचा प्रसंग होणार. त्यास मियाअछन व शामल अलीनवाजखान याचा जोरा कोणे प्रकारचा तो अर्थ सविस्तर दिनचर्या लेहून पाठवणे म्हणून लिा. यैसियास इंग्रेज लडाईचे सामान घेऊन आला हे गोष्ट तो प्रसिध्धच आहे. शहरचे वृत म्हणावे तर शामलाने जंगी बंदरावर तोफखाना खबरदार करून व कडेकोट घालोन बलकटी बरीच केली आहे. मियाअछन यानी आठव्याचा दरवाजा व फाटकाचा दरवाजा चिणोन मलाई दरवाजाचा पूल तोडून इंग्रेजासी लडाई घ्यावयास सिध आहेत. इंग्रेज आलियास लडाई बरीच होईल. अमवाशेचे उधाण आले आहे. या दो चौ दिवसानी चढोन लडाईस यावे यैसे आहे.

पुढें ईस्वरसते घडल ते खरे. वरकड कितेक मजकुर राजश्री येसवंतराव यास आम्ही लिहिले आहे व राजश्री श्रीनिवासराव याही लिा आहे त्यावरून कलेल. बहुत काये लिहिणे ? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*The preparations made by the Sidi to resist the English attack are communicated by Apaji Keshao to Krishnajipant.*

No. 240] [*5-4-1759*

पौ छ १९ शाबान

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक कृष्णाजी बाबूराव सां नमस्कार विनंती. ता छ ७ माहे शाबानपावेतों मुकाम सुरत सेवकाचे वर्तमान येथास्थित विशेष. मियां आंछन यांचे करार सरकारकामाचे व खासगत पेशजीं सेवकासीं ते कार्य जाल्यावर सदरहू आमलांत आणावें. त्याचा वाईट भाव दिसोन आला. पोकळ गोष्टीने मात्र समजाविसी करितात. लोकाचे देणे करून येकाक्षाचे काम केलें. स्वामीचे पुण्यप्रतापेकरून कार्यसिध्धी जाली असोन मात्रागमनी करावी यैसा अर्थ नाहीं. कराराप्रमाणे करून दाखवणे कपाळास न ये तरी पारपत्य करणार धनी समर्थ. कर्जाचे रूपयाची तलबेची वाट करून देऊन आज्ञा द्यावी तेहि न[१] करीत. भेट होत नाही; खोटा येथील प्रकार, तेव्हा माझी सर्वप्रकारें खराबी जाली. याज-करितां स्वामीहीं कृपाळू होऊन ताकीदपत्रे च्यार आछनमियांस येक व इंग्रजास येक व फरसखानास सिदी जफरयादखानास याद आलाहिदा आहे त्याप्रमाणे देणार धनी म्हणजे निकाल करून देतील. सांप्रत इंग्रजाने किला घेऊन जबरदस्ती आपली सर्व केली. फरसखान कुलयेत्खियारी नायेबत दिल्ही. सर्व कारभार त्यांचे हाती; आंछन नांवाचे धनी परंतु येकच आहे. त्याचे महत्व रक्षून चालवितील. इंग्रज वचनास चुकणार नाही. आछनमिया यांस बहुत फजित करून पत्र व याद आलाहिदा आहे त्याप्राा ताकीदपत्रें कीं सरकारकामाचा व याचे खासगत कामाचा फडशा करून देवणें. हे न बने तरी याचे कर्जाचा व

---

१ बर्वे.

तलबेचा निकाल करून देऊन मारनिलेस हुजूर रवाना करणे. येथील सविस्तर वर्तमान वरचेवर सेवेसी लिहीन. सर्व प्रकारे उर्जित करणार स्वामी समर्थ. विदित होये हे विनंती.

¶*Krishnaji Baburao requests the Peshwa to send letters to Miya Achhan, the Sidi and the English with a view to solving the question of his debts. Incidentally he describes the political situation at Surat where Miya Achhan is a master in name only, the real power having passed to Faraskhan.*

No. 241] [*7-4-1751*

(पहिले पान नाहीं. दुसरें पानापासून आहे.)

* * लढाईस गेले पहिले माधवराऊ गायकवाडाकडील जमाव घेऊन उभा होता त्याजवरी चल दिल्हा. त्याचा मोड करून च्यारसे माणूस जीवेंच मारिले बाकी लोक होते ते पळोन गेले. माधवराऊ यांणी आपले राहते हवेलीस आग देऊन पळोन किलियांत गेला. सिवरामपंत पळोन केदारजी गायकवाड याजकडे गेला. पहिले दिवस इतकेच वर्तमान जाले. दुसरे दिवसी मागती सिदी तयार होऊन मिया आछान याजवरी दरबारास गेला तेथे लढाई जाली. आछन याचा जमाव पळोन गेला, आणि चौ पांचाश्या माणसानसी किलियांत आछन पळोन किलियांत गेला. सिदीने दरबार कचेरी कायम करून छोटेखान याच्या लेकांची द्वाही शहरांत फिरविली आणि किलियास मोर्चेबंदी केली आहे. किलियांत पाणी बहुतसे नाहीं व गलाहि थोडा आहे. आंतील लोक बेदील जाले आहेत. या प्रसंगात जरी आपण तीन च्यार हजार फौज पाठवितात तरी सुरतेचा किलाही हातास लागतो आणि सुरत अठाविसीची ठाणी सोनगडचे पेठेची खबर घेऊन श्रीमंतास यश येते. तरी या गोष्टीस विलंब लावलिया सुरतेचा किला सिदीनें घेतला म्हणजे सिदी जबर होतो. याजकरितां पत्र लेहून पाठविलें आहे, याची तरतूद करून दोनतीन हजार फौज सत्वर रवाना केली पाहिजे. यांत आपण सूज्ञ आहेत. विस्तारे ल्याहावें ऐसे नाहीं. पत्राच्या उतरास विलंब केला न पाहिजे. वरकड कितेक मजकूर राजश्री हरनाथजी कुसाडे व राजश्री बाबुराऊ निवेदन करतील त्यावरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणे ? लोभ असो दीजे हे विनंती. वैशाख श्रुध प्रतिपदा रवाना पत्रें.

¶*The writer describes a battle at Surat between the Sidi and Miya Achhan, who is reported to have run away and for whose support the writer asks reinforcements.*

No. 242] [8-5-1759

छ १९ रमजान
वैशाख सुा
तिसा

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रामाजी माहादेव मो। राजपुरी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १० रमजान पावेतों स्वामीचे कृपावलोकनें-करून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री तुळाजी सालेकर यांस गोळी लागली आहे ती आंत पाठीत राहिली आहे, तेण्हेकरून जेर आहेत. तबीब उपायें करीत असेत परंतु हुजूर चांगले तबीब गोळी काढावयाचा उपाये करीत येसें जाणत असतील यास्तव शेवेसीं लिहिलें आहे. तरी चांगला जाणता तबीब गोळी काढी यैसा असेल तो सरंजाम कलमेसुधां पाठवावयाची आज्ञा करून जलद येई तें करणार स्वामी धणी समर्थ आहेत. कसबी तबीबाखेरीज गोळी निघोन बरा होत नाहीं. येविसीं आज्ञा ते सिरसा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo requests the Peshwa to arrange to send a good surgeon to remove the bullet lodged in the back of Tulaji Saleker.*

No. 243] [22-7-1756 ?

पाँ छ २ जिल्काद

श्री

श्रीमंतर राजश्री बाबा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक वासुदेव केशव चरणावरी मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत छ २३ माहे सवाल पावेतों स्वामीचे कृपेंकरून जंजिरें सुवर्णदुर्ग येथें येथास्थित असें विशेष. सरकारचे हुजरे आले होते त्याबरोबरी पूर्वी वर्तमान सेवेसी लिहिलें होतें, निवेदन जाहालें आहे. प्रस्तुत वर्तमान तर राजश्री रामाजीपंत सुभेदार यांणीं पुणेंयास यावयास येकदोन वेळां प्रस्थानें ठेविलीं होतीं. मुंबईस पत्रें पाठऊन येकमास होऊं आला, त्यांचा जाब आला नाहीं यांजकरितां मार्ग लक्षितात. छ २१ सवालीं सरकारचें पत्र कातरघाटचे मुकामींहून आलें. जासूद विजेदुर्गाकडून आले, येथें तेरावें दिवशीं दाखल जाहाले. सरकारचें पत्रीं

मजकूर कीं इंग्रेजाचे किलेयांचें पत्र आणिलें असेल आणि पुणेयास सत्वर येणें म्हणोन लिहिलें आहे त्यावरून येकादशीस निघणार आहेत. सर्व तयारी केली. निघणार परंतु मुंबईच्या पत्राचा जाबसाल आला म्हणजे मजल दरमजल येतील. पत्र येतां दिरंग लागला तर दोन च्यार रोज वाट पाहातील. राजश्री गंगाधरपंत विजेदुर्गी आहेत त्यांजकडून पत्रें आलीं; तेथें लिहिलें आहे कीं मर्दनगड येथें फिरंगियानें हजार पंधराशें जमावानशीं येऊन किलेयाची पेठ सुद्धां मारून किल्ल्यासहि मोर्चे लावावें तों किल्लयांतून माणूस फिरंगियांवरी चालोन गेलें. त्यांचें याचें झुंझ उत्तम् प्रकारें जाहालें. पांच सातशें माणुस फिरंगियांकडील ठार केलें व खांसा फिरंगीहि आला होता तोहि पडिला ऐसें वर्तमान लिहिलें आहे. मर्दनगडास हिकडूनहि राजश्री रामाजीपंत सुभेदार यांणीं च्यार पांच किल्ले मिळोन पांच साशें माणूस पाठविलें आहे. राजश्री मोराजी सिंदे याजला येथें ठेऊन आपण व राजश्री पंत येणार आहेत. राजश्री गंगाधरपंत यांणीं विजेदुर्गीचा सुलतान ढवा[1] करणार त्यांच्या संशयात्मक लिहिलें आहे कीं दोन च्यारशें माणूस निवडक पाठवावें, त्यावरून मर्दनगडचे स्वारीस पाठविलें आहे. त्यांत कांहीं जंजिरकरी वगैरें लोक आहेत त्यांतून निवड करून ठेवावें. काम जाहालियास करावें म्हणोन् यांहीं लिहिलें आहे. मुंबईचा जाब आलियावरी सत्वरच येतील. जाबसालास दिरंग लागला तर आठां चौ रोजांनीं येतील. ऐसें आहे. जाहालें वर्तमान सेवेसी लिहिलें. श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶Vasudeo Keshav sends news from Konkan saying that Ramajipant Subhedar is waiting for a reply from Bombay and is therefore delayed. The fight at Mardangad with the Portuguese, who were routed, is also described.

No. 244] *[24-9-1751*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १४ माह जिलकाद पावतों स्वामीचे कृपालोकनकरून सेवकाचे व प्रांत मजकुरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ ६ जिलकादी रवाना जाहाले ते छ १३ जिलकादी पावले. तेथे आज्ञा जे फिरंग्याची हालचाल फार आहे.

---

१ जबरदस्त हल्ला.

दिवसहि हेच त्याचे हालचालीचे आहेत; त्यास त्याची बातमी उतम प्रकारे राखोन वर्तमान वरचेवरी लिहित जाणे, आपले जागिया खबरदारी उतमप्रकारे करणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे जागोजाग्याचा बंदोबस्त करून खबरदारीत राहून बातमीस गलबतें २ दोन मालवणास आजीच रवाना केली आहेत. बातमी-करितां पेशजीच कारकून व सिपाई तेथे ठेविले आहेत. हाली गलबते तेथे जाऊन पोहचतील. तेथून बातमी येईल ते वरचेवर सेवेसी निवेदन विनंतीपत्री होईल. सुरतेचे कारभाराची विल्हे करून दिल्ही, त्याप्रोो त्याची रवानगी केली की नाही ते लिहिणे म्हणून आज्ञा. ऐशास राजश्री नारो तुकदेव हुजुरून आले त्यांची रवागी विज्यादसमीचे मुहूर्तें येथून केली. जाऊन पावतील. तेथे पावल्यावर त्यांची पत्रे येतील तीं सेवेसी रवाना करून, वरकडे सुरतकडील वर्तमान अधिकोत्तर ल्याहावे ऐसे आले नाही. श्रीमंत राजश्री पंत प्रधान * * * मीस ज्वर दिवस पांचसात दिवस येत होता. त्या(स दो)न पाल्या आले नाही. याउपरहि येणार नाही म्हणून लिहिले. सेवकास आरोग्यतेचे वर्तमान लिहिलें, त्यावरून बहुत संतोष जाहला; व फिरंग्याचे हालचालीचे दि * * * याजकरितां राजश्री मानाजी पायगुडे तीनच्यार * * * स्वारानसी पाठविले आहेत. याजला वज्रजोगणगड अथवा वसईस ठेवणे म्हणून आज्ञेप्रमाणें ते नेऊन पावतील. रा महालोजी मुठे साष्टीस पाठविले आहेत; तरी तेथील व येथील खबरदारी ते व तुम्ही येके विचारे असत जाणें म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणें येक विचारें राहून खबरदार असो. सेवेसी विदित होये. आरमाराची तयारी केली. प्रस्तुत सोला गलबतें सुरतेचे बारियावरी पाठविली असेत. दोन सिंदेदुर्गास रवाना * * * व बाकी पाच गलबतें व सा गुराब सिध सारी तयारी करून ठेविली असेत. मानमार्ग पाहोन रवानगी करून आरमारचे लोकाची आपले नजरेने हजिरी घेऊन बंदोबस्त केला. याउपरी वसई(अर)नालाचे लोकाची हजिरी घेऊन व इमारतीचे काम चालतच आहे; सरंजाम करून जाजती इमारतीचे काम चाले ते करितों; व मुलकी इस्तावे घावयास रयेत खोत पाा आणिले असते. काही आले. वरकड येतील त्यास जमाबंदी इस्तावे देऊन करितो. रयतीची बोली की पाहणी करा. त्यास पाहाणीकरितां नुकसान फार होईल. जमिनदारांचे गुमास्ते लौकर पाठवावे म्हणजे जमेचे दाखलेकरी होतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao gives effect to the Peshwa's orders regarding the defence of Surat. The writer expresses his joy at the improvement in the Peshwa's health.*

2959

No. 245] [5-11-1758

पौ छ ९ रोवल

श्री

सेवेसी कृष्णाजी अनंत सा नमस्कार विज्ञापना. ता छ रोवलपर्यंत मुा भादाणे प्रांत भिवंडी स्वामीचे कृपाद्रिस्टीकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. काा तिटवली याचे मुकामीचे पत्रे पाठविली ते सेवेसी पावलीच असतील. तिटवलियाहून कूच करून खाडीपार गेलो. येथून श्रीवज्रयोगिणीस मुकाम करू. आज राजश्री शंकराजीपंती पत्रे व कारकून पाा जे वज्रयोगिणीपासी मौजे चांबले व आकलोली येथे यावे, आम्हीहि येतो. तुमची आमची भेट जाहालियावर देहर्ज्यास तुम्हास रवाना करू म्हणून प्रांतःकाली पत्रे आली. संध्याकाली दुसरी पत्रे आली जे तुम्हास सुतेस मिया अछन जातो त्यास फिरावणे, म्हणून पत्रे आली. यैसे येके दिवसात दोन मनसबे लिाा भेट येका दो दिवसात भेट होईल. पुढे काये चाकरी सांगतील ते न कले. स्वामीस विनंती केली जे आमचे पथक निसबत हजार बारासे स्वार स्वामीनी द्यावे आण चाकरीस चितास येईल तेथे पाठवावे, ते जाहाले नाहीं. जमाव थोडका चाकरीचे हलपटे बहुत; त्यास स्वामीनी कृपाळू होऊन आनखी निसबतीस पाचसातसे स्वार जलदीने पाठवावयासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. आज आम्ही कोलियाचे व चाचे याचे पारपत्य करितो. आज हंगामी तूर्त रयेतेचा बचाव व सरकारचा माल तसनस होतो. जमा करवावा हे काम टाकून मिया अछन यासी फिरवावयासी जावे हे काम काये? त्यास फिरवावयासी सेपनास स्वार येखादा मातबर सरदार पाहिजे तरी पाठवितो. मिया अछन बदललाच असला तरी हजार तरी फौज असावी यैसे आहे; तरी राजश्री शंकराजीपंतास आज्ञापत्र पाा जे सेपनास स्वार पाहिजे तरी पाठवणे, आण आम्हापासून तूर्त कोलियाचे पारपत्य करून घ्यावे. येथे चाकरीचा मजुरा होईल. पत्रे पाठवणार स्वामी समर्थ आहेत. आमचे दोनसे स्वार अद्याप मागाहून येणारच आहेत. चाकरीस जावे, इतके स्वामीनी आज्ञा केली तेच दिवसी निघोन परम जलि(दि)ने येऊन पोहचलो. येणेकरून रयेतेचा बचाव बहुत जाहाला आहे. निसबतीस स्वार पाच सातसे पाठवणार स्वामी धनी आहेत. सलगर नवे लोक, संभाजी सलगर आम्हापासीं आहेत याणी आणविले आहेत; याजविसी पूर्वी सेवेसी विनंती लिाच होती, त्याची आज्ञा करावी. मी बारगीर घरचा आहे. सेवा करावयासी अंतर पडणार नाही. मिया अछनाचे काम काही आम्हा पाठवावयाचे नाही; आण मातबर कामहि नाही; लोक राहिले तेहि यावयासी आठ दिवस लागतील. तरी से दोनसे स्वार

त्याजवर वरघाटेच पाठवावे आण फिरवणे, तरी फिरवावा. आम्हास जावयासी पंधरा दिवस लागतील. राजश्री संकराजीपंतास लिा पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Anant reports to the Peshwa the contents of despatches received from Shankraji Keshao and complains against him for having ordered the writer to proceed with his small and inadequate army to bring back Miya Achhan proceeding to Surat. The writer asks for more forces to meet the situation at Surat, otherwise he should be allowed to quell the disturbances of the Kolis.*

No. 246] *[2-11-1759*

श्री

राजश्री नाना पंडित
प्रधान गोसावी यांस

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री रघोजी आंगरे वजारतमाब रामराम विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा करित असिलें पाहिजे विशेष. छ ७ रबिलावलचें पत्र पाठविलें तें छ १० मिनहूस प्रविष्ट जाहालें. राजश्री भाऊसाहेबांचे ठाई खफ्ती अविंधानें अमर्यादा करून हुल चालविली तथाप मोठी खैर जाहालीयाचे वर्तमान पत्रीं आज्ञा केली. अगोधर प्रात:कालीं परस्परें बातमी वर्तमान आलियावरी अवसान ठिकाणी राहिलें नव्हतें. स्वामीसमर्थाचें पत्र येऊन संतोष वर्तमान कलतां बहुत समाधान जाहलें. स्वामीच्या अगाध पुण्यप्रतापेंकडून दुष्टाचें कर्तुत्वाचा पराजय जाला येण्हेकडून आबालवृध स्वामीच्या पदरीं आहों. इतक्यांचें सौरक्षण आणि सेवाधर्मांत कार्यप्रसंगासमई रात गुणीनें हिंमत व सामार्थ्या * * वर्तणूक करित असों. रवाना छ ११ रबिलावल बहुत काय लिहिणे ? कृपा वर्धमान असावी हे विनंती.

¶*Raghuji Angria congratulates Bhausaheb on his escape from the murderous attack perpetrated by Muzaffarkhan Gardi.*

No. 247] *[7-12-1758*

छ १४ रालाखर मार्गसीर
तिसा

श्री

तीर्थस्वरूप राजश्री शंकराजीपंत
काका वडिलांचे सेवेसी

अपत्यांसमान माहादाजी केशव साा नमस्कार विज्ञापना. छ ५ राखर प्रात:-कालपर्यंत येथास्थित असों विशेष. मिया अछन शहरांत आल्या उपरांत

अलिनवाजखान याची व त्यांची लडाई सुरू जाल्याचें वर्तमानांची दोन पत्रे सेवेसी पूर्वी पाठविलीं. त्याआलीकडे छ ४ राखरचें वर्तमान आलीनवाजखान याणीं दोन दिवस लडाई बेनिहोत[1] दिली. शहरच्या भागला बहुतेक मियाअछनी (तोफा) सुरू केल्या. दरबारास[2] मोर्चे दिले. अलीनवाजखान याजवलचे मातबर मात्र सिदी जाफर व वलिवाला व भिकारीदास दिवाण व राजाराम दिवाण व खजिन्याचा दरोगा वगैरे तमाम अछनास मिलाले. वलिवालाकडे तोफखान्याचा वगैरे कारभार त्याणीं दरबारचे तोफांत रेती भरली. कान्यात खिले मारिले. शहर बुर्जावरील तोफास दारूगोली दिलीच नाहीं. याप्रो सर्वांनी टांगा करून घालविलें. लोक फुटोन अछनकडे गेले. तरी दोन रोज त्याणीं लडाई दिली. तिसरे दिवसीं तह करून जीव वांचविला. आपले आरमारावरील पावणेंदोनसे माणूस आम्हांजवल आले. त्याचे कुमकेस दरबारास लोक रवाना सराई कोटाचा बंदोबस्त राखून करावे, इतक्यांत हे वर्तमान जालें. मारगिरी राहिली तेव्हां पांच रुपये बक्षीस देऊन माणूस त्यांजकडे पाठविले. त्याणीं सांगोन पाठविले कीं आमचा तह जाला, त्याजवरून आम्हीं छ ४ राखरीं मागील प्रहरा दिवसास सराईकोटांतोन निघोन कुंभारीस आलों. राजश्री आपाजीपंत व राजश्री सदासिव कान्हो देखील आलों. आम्ही आल्या उपरांत सराईत अछनी लोक पाठविले, याप्राो वर्तमान आले. आज आम्ही नवसारीस येतों. दरमजल वसईस येतो; सेवेसी कलावें. छ ३ राखरचे रात्रीपासून तहाची बोली लागली. चवथे राखरी प्रातःकालीं करार जाला. दोन प्रहरपर्यंत मारगिरी राहिली. त्याजवरून कितेकानी तह जाला सांगितला; हे प्रमाणांत आणावयासी रुका देऊन माणूस पाठविले. त्याणी तह जाला यैसे सांगोन पाठविले, तें माणूस त्रितिये प्रहरीं आल्याउपरांत आम्हीं निघालों. तीन लक्ष रूपये अलीनवाज यांची सिबंदी फेडावयासी अछनी द्यावे. अलिनवाजखान याणीं हैदराबादेस जावें, याप्रों करार जाला. आपलें अरमार मात्र बाऱ्यावर आहे. राजश्री नारो त्रिंबक यांचे अरमार अद्याप आले नाहीं. आम्हांस लोक अनाजीरायानी पाठविले होते तें आम्हीं अरमारावर रवाना केले. सीदीच्या अरमार राखावयास सांगितलें आहे. दोन मास लोकांस जाले, अडिसेरी नाही. खर्चास नाही. माणसाने काये करावे. तरवार तो बेजरब जाली पाहि(जे.) गुराबास खुबडी बाजली चालीस लोक (केला?) परंतु सुरतेच्या

---

१ निःसीम, पराकाष्ठेची. २ सुभेदाराची इमारत.

बाऱ्यावर राहावयास सांगितले. सेवेसी श्रुत होये. सविस्तर हकीकत भेटी नंतर श्रुत करून हे विज्ञापना. बंदरकिनाराचे लोक नेमणुकेप्रो ठेऊन येतो हे विज्ञापना.

¶*Mahadaji Keshao to Shankrajipant, describing a sharp encounter between Miya Achhan and Ali Navajkhan in which owing to treachery in his own camp the latter was defeated. The writer also gives the terms of agreement arranged between them.*

No. 248] *[30-11-1759 ?*

श्री

सेवेसी बालाजी विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १९ रबिलाकर पावेतों वर्तमान येथास्थित असे विशेष. कोहजेचा वेढा उठविल्याचा मजकूर दोन विनंतीपत्रें पाठविलीं तीं पावलीं न पावलीं न कले. उत्तरीं आज्ञा आलीकडे काहींच नाहीं. छ १२ रबिलाकरीं येथील वेढा उठून गेला. दुसरे दिवसीं मनोरचे ठाणें कापून काढिलें. सवेंच पुढें तारापूरपावेतों गेलों असतों तर कांहींच जड न पडते. परंतु फौजेचा करार राजश्री भाऊचा कोहज मात्र मोकळी करून न पुसतां माघारे यावें. त्यावरून फौज निघोन गेली. फक्त गाडदी राघोपंत यांजकडील व दीडशें स्वार इतका सरंजाम मजपासीं राहिला. इतकियानसी येथें राहणेंच ठीक नाहीं. परंतु आज्ञा आली की किल्याचा बंदोबस्त करणे. त्यावरून भयभीत होऊन राहिलों. किल्याचा सारंजाम म्हणावा तर नाहीं असें काय येक असेल येक नसेल तर तपसील ल्याहावा? मुळीच प्रथम दिवस. आजच किल्याचा जन्म जाला आहे. सात दिवस वेढा उठोन जाहले. हशमाचे फडणीस व हशमनीस व दिवाण इतके आले आहेत. दोघे तर बोलणे आइकतात. उगेच बसतात. दिवाणजी आज आले ते काय करितात पाहावें. पाडळबारें माहाल तर उधो दादजीकडे. ते नासिकास गेले. जेथवर माझा इलाज चालेल तेथवर करीन. येथें पीठ देखील मिळत नाहीं. वाणी होते ते भाऊकडील फौजेबराबर गेले. अशा संकटांत पडिलो आहें. त्रिंबककराकडील येक माणूस अगर कांहीं येक सरंजाम इकडील नांव देखील घेत नाहीं. याप्रमाणें सरकारचे आज्ञेप्रमाणें तालुकदारांची वर्तणूक; मी संकटांत पडिलों. आज्ञेविना पाऊल घालितां येत नाहीं. येविसीची जसी आज्ञा येईल तसें करीन. वरकड इकडील मजकूर अलाहिदे विनंतीपत्रावरून निवेदन होईल. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer, one Balaji Vishwanath, gives news about Kohaj, Manor and Tarapur and further says that he is defending the fort in spite of inadequate equipment with him, and requests further orders.*

No. 249] [1759 ?

बंदगी भाऊ साहेब
गरीब नवंज सलामत

अर्ज सेख आदम नौकर सरकार. आमी सिदी हुसेनखान(जा)दे साहेबां साहेब येही जंजिरेयाहून निघतां चौघे जण सोखद हाताखाले घाळून याजपासी कुरानावर व सिलेयावर[1] व मसीदीची आण वाहून जे मजला जिवेनसी काढलेत तरी तुम्हास मी कधी अंतर देणार नाहीं. त्यावरून सारेवदाही सर्व सोडून आपली सिरे हातावर घेऊन त्यास पुणेंयांस आणिले. आल्यावर आजपावेतो अनावर होते. यैसे असोन हल्ली अजम सिंदी आहमद वा सिंदीसाहिब सुभेदार याचे शेब्दी लागोन आणा केल्या होत्या त्या येकीकडे ठेवून सोखदाचे अंनदूर केले. आण सोखद मजकुरास अनावरून उठविले. हल्ली त्याही जंजिरे यांस जावे तो जिवे जातील साहेबाचे पदरी आहेत यांस अन देणार साहेब धणी मायेबाप खावंद आहेत. हकीकत मनास आणून सारेवदाचे सर्फराजी करणार धनी माबद आहेत. बंदगीस येश न होये हे अर्ज दास्त.

¶*Sekh Adam, a servant of Bhausaheb, implores him to save the life of one Sorwad who was brought to Poona after escaping from the custody of the Sidi of Janjira and not to hand him back to the Sidi.*

No. 250] [1759

श्री

पुरवणी

यादी मुंबईस जनराल याजकडे यादीची कलमे रणसोड कृष्ण व सदासिव रामचंद्र याजबा देऊन रवाना केले. सुा तिसा खमसैन मयां अलफ.

अजम कृष्णाजी बाबुराव हे मियाअछन याचे सोबते गेले होते. त्यास सिदीने शहरात नेऊन ठेविले आहेत. त्यास तेथून रजा देऊन येत ते केले पाहिजे. कलम १

दुतर्फा येकलास असता मुंबैहून उंदेरीस गला वगैरे जिनस जातो. त्यास अवल मोजीब[2] हली मोहिबाची[3] नजर व येकलास सिदीकडे नसता सरंजाम उंदेरीस जातो याजवरून अजब दिसोन आले. त्यास मुंबैहून जिनस जंजिरेयास व उंदेरीस जाऊन पावते न होत केली पाहिजे. कलम १

¶*Ranchhod Krishna and Sadashiv Ramchandra are deputed to Bombay to negotiate for Krishnaji Baburao, who accompanied Miya Achhan but was detained in the fort by the Sidi. They are also directed to stop provisions proceeding to Underi from Bombay.*

---

१ हत्यार, २ प्रमाणें. ३ स्नेही.

श्री

यादी इंग्रजाने जनराल मुंबईकर याजवल जाबसाल करणे. सुा तिसा खमसैन मया अलफ. कलमे :

सुरतेचा सिदी मोडून पस्त करावा हे श्रीमंत राजश्री पंडित प्रधान यांच्या दिलात होते. त्या बमोजीब मोहिबी मसलहत करून सिदीस मोडून काढिला; व सिदीचा तनखा सिदीस मोडला सबब जप्त जाला; व किला आर्क घेतला. अवल पंडित माारनिले यासी मोहिबीं लिखा करकुम (?) केला होता कीं पारसखान यास त्या मकानावरी कांईम केला जाईल व किला आर्क येथे किलेदार दुसरा मोगल ठेविला जाईल. कार्यबदल तरी ते पातशाही शहर मुसलमान लोक साऊकार याचें चालले पाहिजे. सबब या मोजिबे[१] करावें लागले, यैसे अवल कलमी केले होते. त्यास हली त्याचें मोजिब मोहिबीं अमलात आणिलेच असेल, याचा खुलासा मालूम जाला पाहिजे. कलम १

आली नवाजखान यानीं नाक्याची हवेली मातबर सरकारच्या अमिलास देऊ केली; त्या मोजिब मोहिबी देवावी. कलम १

सिदीस मोडून पस्त केला त्यावरून श्रीमंत पंडित साहेब यास बहुतसी खुशाली जाली. फिरोन सिदीचा तनखा सिदीस न द्यावा: व बिनकूल जमाबंदी होईल त्यास अवल पडेल. पान आमल सरकारतर्फे व गाईकवाड तिजाई द्यावा, हा करार सबदरखान याचे अमलात जाला, त्या मोजीब कांहींक दिवस चालत आले. त्यास बिनकूल आमलाचे दखलगिरी न दिल्हे. सबब कदीम अमल सरकार तर्फेचा होता त्याजकडील अमल दूर करून राजश्री शंकराजी केशव याजकडे तेथील अमल दिल्हा. त्यास आलिमवाजखान याजकडे सुरतेची सुभेगिरी जाली ते वख्ती दर सदे हक कुल जमाबंदी; सबब दंड फुरोई दर सदे रुा ४० चालिस सरकारचा करार जाला. आलिकडे साल मजकुरी मियाअछन यानी किलो अमल हक कुल जमाबंदीस सरकारात द्यावा. हली मोहिबची मसलत जाली. त्यास मोहिबानी लिहिले की सरकारचा आमल चालत आहे, त्या मोजिब सुरलीत चालले.

१ याप्रमाणें.

सरकारच्या अमलावरी मंड्या व नाकेबंदर पुर्जा येथे सुदामत अमिल निा सिंदे आहेत. त्याणी सरकार तक्षीम याचा हिसाब राखोन असावे.
कलम १

कितेक बाबतीचे इजारे आहेत. ज्या मोजिब मोगलाई तर्फेस जमाबंदी आहे त्याची सरकार तक्षीम सुरलीत दखलगिरी देऊन घ्यावी. दरबारी येके जागा बसोन जमाबंदी व दंड-फुराईचा ठराव करावा. त्या मोजिब सरकार तक्षीम द्यावी, याप्रमाणे कराररदाद आहे त्यामोजिब चालावे.
कलम १

आली नवाजखान पंडित साहेब यांचे बहस्ते जाले. मोहिबास देखल आहे, ऐसे असता, हाली मिया आछन त्यास तोसिस देऊन त्याची चीच वस्त जप्त करणार ते न करावी. जे सरकारात जरूर ते मोहिबासहि जरूर असावे. • या बाबे सुरतेस कपि-ताने गेले आहेत त्यास व मिया अछन यास खत पाठवावे. कलम १

त्यास बर्जे कितेक जागा मोगलाई सरकारे जागा जागा आहेत, तेथें मातबर सुभे आहेत. त्या सुभ्याचे करारदाज निमे आमलाचा ज्या मामल्यात जाला आहे, तेथे निमेप्रमाणे चालते त्याच रीतीनें मोहिब दोस्तीचे जागा ठराव करून देवितील. येणेकरून दुतर्फा सुरलित चालोन दोस्तीची जिमादत होऊन होईल. कलम १

दकसीन आहमदखान सिदी याज-कडील जंजिरे याचे तनखियाचा आमल होता. त्यास हाली मोडून तनख्याचा आमल सिदीचा दूर केला जंजिरकर सिदी व सुरतकर सिदी येकच अवल मोहिबाचे दिलात सिदीसी बिघाड करावयाचे नव्हते. त्यास इलाईचे कुदरतीने[१] मोहिबाचे अमलात आले; त्यावरून सुरतेची मसलहत जाली; व मोहिबीं पंडित प्रधान साहेब यास लिखा करकूम केला की सिदीस पाडून देतो. त्यास बलफिकल परभारें मालुम होऊन येत असे कीं जंजिरकर सिदीचा भला माणूस नेऊन तनखियावरी बसवि-णार; तरी दुतर्फा बेकिलाफ आमि-लासी आसता मोहिब यावजा करतील हे होणेच नाही. सिदीदेखील ब्रिल-कुल जमाबंदीस पौ निमे सरकार तर्फेस अमल द्यावा. कलम १

¶*This is a list of items in the negotiations between the English and the Peshwa regarding the relations and claims of the Sidi of Surat, Miya Achhan and Ali Navajkhan. These items were to be discussed with the English General at Bombay.*

---

१ सामर्थ्य.

No. 252] [1759 ?

श्री

वसईचे आरमारचे मजमदार यांचे निसबतीचे तरांडे मालसुधा आंछनानें इंग्रजाचे सुरतेच्या घेण्याचे गडबडींत घेतले आहे त्याचा दस्तायैवज आहे, व सरकारची ताकीदपत्रे आहेंत त्याप्रो मालसुधा तरांडे अछनाकडून देवावे. १

वसईचे तालुक्यातील सावकाराचे तरांडे हबशाने धरून मुंबईस धरून नेलें, त्याचे ठिकाण रणसोड कृष्णाने लाऊन दिल्हे आहे. सोडून मालसुधा द्यावे.

कलम १

याजखेरीज तरांडी सुरतेस व मुंबईस आपली गेली आसतील ती वाजबी ठिकाणी लागतील ते द्यावी. विसाजी केशव याजकडील वकील आहेत, ते आंगी लावितील त्याप्रो देवावी.

¶*These are the terms regarding the release of the Peshwa's ships captured by Miya Achhan and the Sidi.*

No. 253] [1759 ?

श्री

बातनी सुदर फिरंगी सुरतेचा छ २५ रोज सणवार ते रोजीं फिरंगी घरीहून निघाला तो बागास जाऊन तेथे वहिरीत बंदुखान पारवा सात मारून घेऊन बागाचा तमाशा पाहत आसतां माली आला त्याजला रुा १ येक इनाम देऊन तेथून निघाला तो परबतीचे वाटेन घरास दाखल जाला. आरबाचा जमादार सेख दाऊद वगैरे आले होते. मुजफरजंगाकडील गोलंदाज फिरंगी दोघेजण येऊन बसून बोलून गेले. नेमीदासाचा गुमास्ता येऊन बोलून गेला. छ २६ रोज आईतवार ते रोजीं राजपूरीच्या फिरंगियास आपला घोडा पाठऊन बोलाऊन घेतले. त्यास दोघेजण मिळून खिलबत करून कागद लिहून च्यारी घटका रात्री पावेतो बसून फिरंगी राजपूरीचा आपले ठिकाणास गेला. त्याचे वसईचे लोक मातबर बोलत होते जे च्यारंहजार हफसी च्यारहजार कोली व च्यारहजार टोपीवाले येसी जाहाजे आठ आली आहेत. आणखी येणार आहेत येसे बोलत होते. जाहाजे याजवर सामा(न) तोफा सात आठ सुमार आहेत येसे सांगत होते. गुराबे च्यार शेंभर शेंभर माणस व दोन दोन तोफा येणेप्रमाणे जमा होत आहेत; आणखी जमा होणार आहे. गडबडहि वसईकड होणार आहेत येसे बोलत होते.

¶*This is a report of a talk of a French soldier at Poona about the mobilisation of the troops and the fleet of the French round about Bassein.*

No. 254] [1759?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेशी

विनंती सेवक रामाजी महादेव मुक्काम जंजिरे सुवर्ण चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १० जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून येथील वर्तमान यथास्थित असे विशेष. फरासीस मुंबईवर येणार असे वर्तमान दोन वर्षे आहे. त्याजवरून इंग्रेज मुंबईतील इमारत निकडीनें करीत असे. प्रस्तुत फरासीचे येण्याची दाटीची खबर कलल्यावरून मुंबईतील दर घरास एक माणुस मजूर आणून रात्रदिवस इमारतीचे काम तडक चालविले आहे. शहरांतील वाणी उदमियास निरोप दिल्हा. कांहीं पलून येतात. मुलेमाणसे काढून सडे राहिले आसेत. मुलना फकरुदीन याणी आपला कबिला मुले माणसे काढून सुरतेस रवाना केली. फरासिसानें इंग्रेजाचे विलायेतेवरी फारच सोखी करून इंग्रेजी पातशही मनवर अदमिरेल+ विजयदूर्गचे स्वारीस होता त्यास मदरासचे खाडींत घालून तोंडावर फरासीस बसला आहे. मुंबईवर येणार असे इंग्रजास कलल्यावरून सडा होऊन इमारतीचे काम निकडीनें चालवून युद्ध प्रसंगाचे सामान करीत असे. बाणकोटास से पन्नास इंग्रेज ढोणे देखील होते ते मुंबईस नेले. दहा वीस इंग्रज व मुंबईकर मुसलमान मराठे ठेऊन वरकड झाडून नेले. फरासीस मुंबईवर येतो ऐशा खबरा येतात. साष्टीहून तीर्थस्वरूप राजश्री बालाजीपंताचे पत्र आले तेंच सेवेसी पाठविले आहे. त्याजवरून विदित होईल. सेवक साष्टीस जाण्याचे त्वरेंत आहे. लौकर जातो. पांच गोलंदाज व पांचसे माणूस येथून एका दो दिवसा साष्टीस पाठवितो. पांचसे राऊत हुजरून रवाना जालयानीं फौज आलयाची सलाबत पडेल. बंदर किनारेयाचे जागे, टोपीकर मायावी, समई इंग्रेजहि स्नेहास्तव लेहून पाठवील. तथाप आपले जागा सावध आणि बलकटी यास्तव विज्ञाप्ति लिहिली आहे. कल्याण प्रांतात राहातील. समई उपराल्यास पाहिजेत. तेथें जाऊन पावतील. येविसी आज्ञा ते सिरसा फरासीसाचे येण्याचे दिवस आश्वीन कार्तिक दोन महिने पुढें. त्याचे येणे होत नाहीं. उपरांत फौजवर घाटी नेली तऱ्ही कामास येईल. येद्यपि फरासीस मुंबईवर न आला तरी इंग्रेजाजवल बोलावयासी येईल कीं तुमचे लिहिले न आले तऱ्ही अशा खबरेवरून तुमचे उपराल्यास हुजरून रवाना जाली, असे बोलावयासी होईल. याकरितां लिहिले आहे. साष्टीस गेलियावरी तिकडील सविस्तर वृत्त मनास आणून सेवेसी विनंतीपत्र पाठविले. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev reports news of French men-of-war coming against the British at Bombay and advocates preparations.*

+Admiral Watson.

2968

No. 255] [1759?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामींचे शेवेसी

विनंती. सेवक रामाजी माहादेव मुकाम साष्टी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ४ रमजानपर्यंत स्वामीचे कृपावलोकनें-करून येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. फरासीसाचीं तीन तारवें मुंबई व खांदेरीच्या बाऱ्याबाहेर येऊन फिरों लागलीं आहेत. त्याचें वर्तमान काल प्रहर रात्रीस मुंबईहून येका गृहस्थाचें पत्र आलें, त्यांत मजकूर कीं, सुरतेस काफला मुंबईहून रवाना जाला. पोंचवावयासी इंग्रेजानी दोन गुराब दिल्या होत्या. त्यास काफला पुढें पावेतों पोंचाऊन गुराबा बंदर नार्टे[1] फिरत होता. इतक्यांत फरासीसाचीं[2] तारवें गुराबानी पाहिली. तों फरासीस नांगर उचलोन चालोन येऊं लागला. ऐसें पाहून गुराबानी पल काढून मुंबईस आल्या. फरासिसाचीं तारवें बाऱ्या बाहेर आहेत त्याणी बंगाली तारवें लुटून येक नेलें ऐसें लिहून आलें. त्याजवरी आज दीड प्रहर दिवसा इंग्रेजाचें पत्र आलें व येचविसीं इंग्रेजानीं हुजूरहि लिहिलें आहे. पुन्हां मुंबईस बातमी करितां माणसें पाठविली असेत. येईल वर्तमान तें लेहून पाठवितों. सेवक आज यशवंतगडी गेलों. तेथील बंदोबस्त करणें तो करून फरासिसाचे तारवाचेंहि वर्तमान चौकसी मनास आणून हुजूर येतों. परंतु आलें वर्तमान तें लिहिलें असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev reports to the Peshwa the arrival of French men-of-war on the west coast and the despatch of English ships from Bombay for the protection of Surat.*

No. 256] [13-1-1760

पौ छ १८ जमादिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नारो त्र्यंबक मुा उंदेरी चरणावरी मस्तक ठेऊन सिर सां नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ताा छ २३ जमादिलोवल पावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत

१ समुद्रांत (Out to sea.) २ फरासी – फ्रेंच.

शेवेसी पावतील. उंदेरिकडील वर्तमान सेवेसी लिहिलेच आहे त्याजवरून कळेल. सारांश आम्ही आरमारसुधां आलियावर सभवता आरमाराचा वेढा घालून जवळ हातबीर धोड्या खडप होता त्याजवर मोरचा घातला. आत गरनाळा व तोफा व फूटक द्रव्य उतरून मारगिरी होत आहे. याउपरी आठादाहा दिवसात कार्यसिध होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Trimbak informs Vishvasrao that the siege of Underi is being pressed with vigour and the place cannot possibly hold out long.*

No. 257] *[20-1-1760*

श्री

पौ का पुणे छ २ जाखर
माघ शुध चतुर्थी सोमवार
सा घटका रात्रं अवसीची
छ ४ जाखर सन सितैन
माघ शुध ६ बुधवार

लस्करात छं १४ जाखर
माघ सीतैन

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक नारो त्रिंबक चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञाप्त ताा छ १ जमादिलाखर प्रात:काल परयेंत मुा उंदेरी येथास्थित. असे विशेष. किले उंदरीवर आज रविवार त्रितियेस स्वामीचे निशाण सेवकाचे हाते चढले. स्वामीची फते जाली. साद्यांत वर्तमान मागाहून सेवेसी लिहितो. तूर्त चालीस पनास आख व पंनास हजार रुपये पाठवावयासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. राजश्री रामाजीपंत सुभेदाराकडून निशाण न घेत बोली न लावीत, मरून बरे म्हणू, परंतु त्याकडे किला देत नाही, तुम्ही आंगेजणी करून घ्याल तर देऊ. त्याजवरून राजश्री रामाजीपंतास सांगितले. त्यानीहि मान्य केले. त्याचे मुदे सर्व आम्ही मान्य कबूल केले. त्यांची याद आलाहिदा पाठवितो. मागाहून येईल. सर्व वर्तमान मागाहून सेवेसी निवेदन होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Naro Trimbak reports the capture of Underi and asks for presents being distributed to those who fought in the action.*

No. 258] [16-1-1760

छ ४ जाखर सन
सितैन माघ शुध ६
बुधवार

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. तागायत छ २६ माहे जमादिलोवल पावेतों वर्तमान येथास्थित असे विशेष. उंदेरीची भानगड राजश्री नारो त्रिंबक याचे विद्यमानें लागली आहे. मारगिरी होत आहे. बंदी चांगली जाहाली आहे. भानगडहि मशारनिलेचे विद्यमानें आहे. परिनामास जाईल ते खरें. दरवाजियासी मारगिरी बसत नाहीं म्हणोन गुराबेची काटी पर+बान उतरून दरवाजेयानजिक गुराबा आडऊन मारगिरी करावी हा मजकूर. राजश्री बालाजी व आणाजीराव व राजश्री वजारतमाब याचे विद्यमानें न्यावी, मारुफात मजबुदी जैसी व्हावी तैसी त्याप्रमाणें करीत आहों. याप्रमाणें नारोपंतहि पाल येक करून लागू करणार. आधी बोलीप्रमाणें जाहाल्यास उत्तम आहे नाहीं तेव्हां हे परिनामी करून घ्यावी. हें सर्वांचें मानस आहे. गोव्याकडील ग्रहस्त राजपुरीस आज्ञेप्रमाणें येऊन पाहोन परभारें जाणार म्हणोन राजश्री बाजी गंगाधर यानी लिहिलें. त्यावरून मशारनिलेस येथें आज्ञेप्रमाणें बोलाविलें. परंतु मर्जी यावयाची नाहीं म्हणोन येथून कालच छ २९ रोजीं राजश्रीं केसोराम याजबराबर गलबतें व माहागिऱ्या देऊन राजपुरीस पाठविलें. समाधानपूर्वक सांगोन आलियासी आणावे; न आलियासी रवान्ना करून सर्व हकीकत मनास आणोन केसोरांम यानी फिरोन यावें याप्रमाणें सांगोन पाठविले आहेत. निकडीने येऊन साहेबकाम करावें हें मानस आहे म्हणोन फारच बाजीपंती राजपुरीहून लिहिलें आहे. इतक्यांत उंदेरीचे कार्य जाहाल्यास उत्तम आहे; आणि फिरोन हुजूरनें पत्रें त्यास उमेदीचीं ल्याहावीं. सेवकहि बोलीप्रमाणें केसोपंत आलियावरी माहागिरी फिरोन कागदी पाठवितों. खांवदाचे प्रतापें आलियावरी सर्व मनोदयानरूप कार्य सिध होईल. ज्यारितीनें साहेबकाम व्हायाचें असे त्या येत्न करून जडाव करितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer assures the Peshwa that the utmost is being done to capture Underi from the Sidi.*

+ A sail-yard.

No. 259] [30-1-1760

श्री

आसीर्वाद उपरी. नारो त्रिंबक याचे पत्र नानास आले ते व नानाचे पत्र येसी पाठविली ती पावली. नारो त्रिंबकाचा मजकूर कीं सुरतेस इंग्रेजाची जबरदस्ती आहे व अलीनवाजखान याचींहि कांही आहे. फौज या प्रांती आली तरी फिरोन राजकारण करूं व नानांनी लिहिले कीं राजकारण करणारे करितात ते जवळ आणून ठेविले असे दाखवितात. परंतु स्वामीच्या प्रतापें होणे तथी होईल व मियाअछन्नचे राजकारण मुजफरखान याजकडे आहे. त्यास फौज सुरतेस पाठवावयाची आज्ञा होईल तरी पाठऊं व नारो त्रिंबक यास कसे ल्याहावें व मुजफरखान यासी कसे बोलावे ते ल्याहावे येसे नानानी लिहिले आहे. ऐशास पुर्ते राजकारण जाहाले तर फौज पाठवावी. परंतु राजकारण नीट होणार नाहीं. फौज त्या कामास हे थोडी आहे जाऊन फजीत होईल. हे भय वाटतें. पुर्ते राजकारण प्रत्ययास यावयास महिना पंधरा दिवस लागेल. जसे प्रत्ययास येईल तेसे करावे, छ ११ जमादिलाखर हे आसीर्वाद.

¶*The Peshwa Nanasaheb notes the contents of the letters of Naro Trimbak and Nana Purandare and asks the addressee (Sadashivrao ?) to proceed very cautiously as regards the Surat affair and to send an adequate force there if the negotiations are successfully carried out with Miya Achhan.*

No. 260] [Received on 10-2-1760

छ २२ जमादिलाखर
सितैन माघ रविवार

श्री

सेवेसी विज्ञाप्ति. इंग्रजाचा अमल सुरतेत कुल जाला. नावचा मात्र मिया अछेन. लोक हुजुरची पातशाही सनद सुरतेची इंग्रेजाचे नावे द्यावी याविसी मलई करून सर्वाजवळून सला लेहून पातशाहास अर्जी इंग्रेज याचे तर्फेची गेली. तेथून इंग्रेजास सनद होऊन न ये. उतर ऐसे व्हावे कीं हा येख्तियार पंत प्रधान याचा आहे ते (फाटलें) सुभा द्यावा आमचे नावे कीं तेथील सुभा ज्यास द्याल त्यांनी करावा. इंग्रेजास सुरतेची सन(द) सहसा होऊ न देणे म्हणून तपसिलें आज्ञा. एसियास पूर्वीहि आज्ञापत्र आले होते त्यावरून राजश्री अंताजी माणकेश्वर येथे होते त्याजला रूबरू सांगितले. त्यानी मान्य केले व स्वामीचे आज्ञापत्र आले होते त्याची बजिनस नकल लेहून दिल्ही असे. त्या मतलबाप्रमाणे पत्र सिध करून घेऊन जातो म्हणून मारनिलेनी कबूल केले आहे व राजश्री गणपतराव

बापुजी वकील यांसहि लिहिले आहे व राजश्री पुरुषोतम माहादेव येथे होते त्यासहि सांगितले, त्यानी गणपतरायास लिहिले असे तेहि सुरतेची सनद करून घेतील ऐसे उभयतासहि आज्ञेप्रमाणे ताकीद केली आहे. अंताजीपंत येतील तेव्हां सनद सुरतेची सेवेसी घेऊन येतील अथवा वकील सनद तयार करून पाठवितील. उभयतातून येकीकडील सनद सेवेसी पोहचती होईल. इंग्रेजास सनद पातशाही होऊ न देणे म्हणून उभयतासहि सांगितलेच आहे. त्या (फाटलें * *) उभयताहि आहेत. परस्पर स्वामीस विनंती उभयतां लिहितील, त्यावरून विदित होईल हे विज्ञाप्ति.

¶*The writer informs the Peshwa from Sindia's camp that he has arranged with Antaji Mankeshwar and others at Delhi that the Sanads for Surat should not be issued by the Emperor in the name of the English.*

No. 261] [*17-2-1760*

पौ छ २ रजब फाल्गून सितैन
सटवाजी ढोल्या व सोमाजी बाबर
दि।। आबाजी ना।। साव्या

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

आज्ञांकित सेवक जिवाजी नानाजी साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येसीजे. छ २९ जमादिलाखर रविवार वर्तमान राजश्री सुबेदाराणी[१] करार केला कीं उदईक हाला करावी. तेव्हां सांगितले कीं येसा विचार आहे तर येकदा राजश्री नारोपंताकडेस चालावें. ते तुम्ही येकरूप जालियाणे कामाची बांद येथास्थित होईल. इतक्या कोशानेच अर्थ सरला येसे नाहीं. पुढें जंजिऱ्याचे काम भारी आहे येसें बोलिलों. तेव्हां म्हनो लागले कीं सरकार काम होऊन आम्हास येश आले म्हनजे सर्व कार्थ जालें. इतकियास्तव आपला कांही आग्रह नाहीं. तेव्हां राजश्री कृष्णाजी माहादेव यांस समागमेस घेऊन मारानिलेस त्यांकडेस नेऊन काहीं किलमिश न राहिलें येसे केले. आज्ञापत्रें उभयेतांकडेस आली. किला राजश्री रामाजीपंताकडेस द्यावा. त्यास आज्ञा की मारानिलेचे हवाला कर्णे. त्यास ते म्हनो लागले कीं पेशजी आम्ही सांगितलेंच आहे की हफशाचे मानस भेट गोष्टीचे आम्हाकडेस आहे, तर आठ पंधरा दिवस आहे तैसा असो द्यावा म्हनजे

---

१ कांसें बेट.

हफशास आमचा इतबारहि जाला. तुमची आमची निखालसता जाली आहे. धन्याची आज्ञापत्रे आली तरी आम्ही आठ पंधरा दिवस धन्याचे काम व्हावें म्हनोन म्हनतो कीं आम्हास व्हावी म्हनोन म्हनतों हा पुर्ता विचार कर्णे. हाली कांही फते होऊं द्या; मग आज्ञा कराल त्यास मान्ये आसो याप्रमाणें भाशण केलें. त्यावर हे बोलिले कीं आम्हास उंदीरीचा बंदोबस्त केला पाहिजे. त्यास आमचा कांही आग्रह आजच द्या येसा नाहीं; येसे बोलून येथास्थित होऊन पुढें काशावर निघायाच्या नेमनुका जाल्या कीं आमक्यानी आमकीकडेस आसावें या गोष्टीचाहि निश्चेतार्थ जाला. तमाम लोक माहागिऱ्यावर बसोन (बैसोन) निघोन गेले. राजश्री नारोपंतहि तैयार होऊन आपल्या मोर्च्यावर गेले. तो फिरोन राजश्री सुबेदारानी सांगितले कीं आज व्रितिपात आहे, उदईक निघावें, तेव्हां सर्व फिरोन आले. दुसरे दिवसी निघावे म्हनोन सांगितले तेव्हां सर्व सरदार म्हनो लागले कीं आमवासेचे उधान भारी; तेथें उभे राहावयास कांही खडप देखील नाहीं. उधान मोडलियावर आज्ञा केली याप्रमाणें सर्व सिध आसो. ते बोलिले जे ते सर्व यांस नि(वे)दन केलें. त्यास फाल्गून शुध ९ स हला खामखा करावी येसे आहे. गोव्याहून फिरंग्याची पत्रे आलीं होतीं त्याचा जाब त्यास लिहिला आहे कीं आपन आर्मार तैयार करून याव(या)चे केलेच असेल त्यास पुढें तर वाऱ्यावादलाचे दिवस समीप आले आहेत. हंगाम हाच आहे, तर जलद येऊन पोहोचावें हा भाव सर्व लिहिला आहे. राजश्री नारोपंती उंदीरीकर हफशाचे विद्यमाने जंजिरेकरासी संदर्भ लाविला आहे. स्थल वगैरे देयाचे जे ते देखील ठीक करून बोलीचा संदर्भ लाविला आहे व राजश्री सुबेदारांणीही येक भला मानूस जंजिऱ्यात पाठऊन काये ते वर्तमान आनवायाचें केले आसे हा सर्व प्रकार उत्तमच आहे. विश्कलीत पैकीं येक आहे कीं पंत मारनिलेस व सुबेदारास येकत्र करून येक रूप केलें आसतां फिरोन फिरोन चाललेच जातें त्याकरिता कार्यास दिरंग पडत जातो. येकास येक होत नसतां सरकारकाम घडोनच येतें हा प्रताप सर्व स्वामीचा आहे. काशी आनखी आठा चौरोजांत फते होतो येसे दिसतें. कासा फते जाला म्हनजे जंजिऱ्याचा पैगाम खामखा होतो येसे आहे. येस्थलीच्या देवता माहा जाग्रत आहेत त्याकरितां मागें लोकांस पीडा सर्वत्रांस जाली होती. त्यास काहीक कृष्णाजी माहादेव यांणी पूजा आर्जा केली. त्यानंतर हलीं राजश्री सुबेदारानीं सर्वांस प्रार्थना केली. ब्राम्हन जेपास घातले होते त्याचे ब्रम्हभोजन घातलें; याप्रमाणे राजश्री नारोपंती केले. तेनेकडून देवता संतुष्टरूप जाल्याशा दि(स)तात की सर्व शरीर रोगापासून निर्भय जाले असेत. समुद्रांत वायो विशेष, त्याचीहि प्रार्थना

१ दुबार.

केली. त्यादिवसापासोन च्यमत्कारच जाला आहे कीं वायो नाहीं. येसे जालें. त्यावरून सर्व बोलतात कीं आतां जंजिरा खामखा फते होतो. कांसा फते जालियानंतर विचार पाहोन मग गोवेकरास बोलावयाचें जाले तर बोलावावें; या प्रमानें येथील वर्तमान आहे हे विज्ञापना.

¶*Jivaji Nanaji writes to the Peshwa about the settlement of the differences between the Subhedar Ramaji Mahadeo and Naropant and about the preparations for the attack on Kansa.*

No. 262] *[17-2-1760*

पौ छ २ रजब फाल्गून सितैन
सटवाजी ढोल्या व सोमाजी बाबर
दिा आबाजी नाा साष्या

श्री.

श्रीमंत राजश्री बाबूराव
स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित सेवक जिवाजी नानाजी साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येसीजे. छ २९ जमादिलाखर वर्तमान येथील सर्व सरकार पत्रांत लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. त्यास राजश्री रामाजीपंताची व राजश्री नारोपंताची येक्येता करून दिल्ही असतां सुबेदारांच्या मनांत तर कांही नाहीं. परंतु रोशवत भाशण मात्र करितात. येसे आसून सरकार कामावर उभयेतां येकनिष्ट आहेत. फिरंग्यास बोलावण्याचे पत्र उदईक रवाना होईल. उभयेतांची बातमी कलावी, कचे वर्तमान ल्याहावें म्हनोन आज्ञा तेणेप्रमाणें सेवेसी कलावे म्हनोन लिहितो. परंतु सरकार कामाची कांहीं उभयतांकडून लढा नाहीं. कदांचित समजोती करावयास्तव आनखी कोन्ही रवाना होतील. तेणेकडून विजयदुर्गाप्रमाणे घोलच पडेल हे सूचनार्थ स्वामीस लिहिले आहे. पुढें काशावर हला होनार आहे. उंदेरीपेक्ष्यां कांही कठीन तीस पस्तीस हात परियेंत[1] उंचीस आहे. लोकांस उतरावयास स्थल नाहीं. परंतु आठा चौ रोजात कांशी फते होईल से दिसतें. राजश्री राघोजी आंगरे आले आहेत. कांसा हलका जागा परंतु मध्यभागी सागराचे आहे. जंजिरा जबरदस्त न्याहीयेत आणि समुद्रांत इतकेहि आहे. परंतु सभोवते लाग मारगिरीस फार आहेत. उंदीरीच्या तोफापैकीं दोन तोफा भारी आहेत व येक गरनाळ राघोजी आंगरीया बाांची ते बेश लांबपल्याची आहे. त्यास डोंगरचा गोला नेमस्त किल्यांत जातो. गुराबाच्या गोल्यास मात्र येकायेक

---

१ सीमा, पराकाष्ठा.

जुमस खानार नाहीं. जंजिऱ्याचे संदर्भ या उभयेतांकडूनहि ही लागलेच आहेत. सर्व प्रताप येजमान स्वामीचा आहे तर सर्वहि कामाची फते होऊन येईल. जासूद जोडी एक दोन आनखीहि पाठविल्या पाहिजेत. वर्तमान आतां वरचेवर जरूर स्वामीकडेस सत्वर रवाना जाले पाहिजे. याकरितां विनंती जासुदाविसीं लिहिली आहे. जाले वर्तमान लिहिले आहे. होईल ते वर्तमान सेवेसी लिहोन पाठऊं हे विज्ञापना.

¶*Jivaji Nanaji informs Baburao Fadnis that Ramajipant and Naropant though at cross purposes are working for the furtherance of the Peshwa's interests. The writer asks for guns of greater range for an attack on Kansa.*

No. 263] [*25-5-1760*

पौा छ ११ सवाल.

सितैन जेष्ट मास

श्री.

राजश्री भाऊ गोसांवी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित राघोजी आंगरे वजारतमाब रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. श्रीबागाचे बागांतील लावणीचे इरसाल आंबे यांपैकीं आंबे व अनानसे डाल्या सुमार १० दाहा भरून श्रीमंतांचे सेवेसी राजश्री आबाजी नाईक पैठणकर यांजसमागमें पाठविल्या आहेत. याद निराळी आहे. पावल्याचें उत्तर कृपापूर्वक पाठविलें पाहिजे. वरकड सविस्तर अर्थ श्रीमंतांचें पत्रावरून व नाईक मशारनिलेचें मुखता विदित होऊन येईल. उंदेरीचे मोर्चेबंदीचे बंदोबस्ताचा प्रकार राजेश्री रामाजीपंत सुभेदार थळास येतांच सेवेसी लिहून पाठविला आहे. पुढें सेवेसी जावयाचे तरतुदीनिमित्य सुभेदार मशारनिले छ ६ सवालीं स्वार होऊन उरण साष्टीस गेले. तेथोन सेवेसी आज्ञा आल्यावर जातील. गेल्यावर सर्व हरद्र निवेदन करतील. बंदोबस्त करणार आपण समर्थ आहेत. रवाना छ ९ माहे शौवाल. बहुत काय लिहिणें? कृपा लोभ करीत जावा, हें विनंती.

(मानाजी आंग्रे याचा शिक्का)

(मोर्तब सुद.)

¶*Raghoji Angria sends to Bhausaheb some good mangoes and pine-apples. The news about Underi will, he says, be communicated later on.*

No. 264] [26-9-1760 ?

पौ १८ जिल्काद

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक चिमाजी माणकर कृतानेक विज्ञाप्ति. तागाईत छ १९ जिलकाद पर्यंत स्वामीचें कृपावलोकनेंकरून शेवकाचें व राजपूर प्रांताचें वर्तमान येथास्थित असें विशेष. आज्ञापत्र सादर जालें जें उंदेरीस शंभर माणूस रवाना करणें त्याप्रमाणें हुजरे यांचे गुजारतीनें भरणा पाहून पन्नास उंदेरीस रवाना केलें, दाखल जालेंच असेल. याखेरीज शंभर माणूस साष्टीचे मोहिमेस जाऊन पोहोंचलें. शंभर राहिलें तें सुवर्णदुर्गचे लोक आजउद्यां तिकडून येतील ते परभारेंच कल्याणास जावयासी सांगितलें आहे; लौकरच जाऊन पोचतील. दोनशें माणूस जदीद आज्ञेप्रमाणें ठेविलें. आडीचशें माणसांची रवासुदगी जाह्याली, आतां भरणा व शत्रुसंनिध हें ध्यानांत आणून आज्ञा करणार स्वाम धनी आहेत. उंदेरीकडे शामलाची गडबड नाहीं. मुजरद बातमीस माणसें पाठविलीं होतीं. शेवकास हा मजकूर असलयास आधीं समजेल, परंतु आज्ञेवरून पंनास माणूस गेलें; बाकी पंनास राहिलें तें पाठवावयासी अवसान नाहीं म्हणून पाठविलें नाहीं. तोफा घांटमाथां आल्यावर आज्ञेप्रमाणें घेऊन येतों. तोफांचे फर्म्याप्रमाणें कांहीं गोळे द्यावयाची आज्ञा, सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Chimaji Manker informs the Peshwa that as desired by him he has despatched contingents of men to Underi, Salsette and Kalyan.*

No. 265] [13-10-1760

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेशीं

विनंती सेवक रामाजी महादेव मुकाम साष्टी चरणावरी मस्तक ठेंवून सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ३ रबिलौवलपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून येथील वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञापत्रे सादर तेथें आज्ञा कीं, राजकोट व मसीद पाडून साफ करणें; त्यास आज्ञेप्रमाणें दोन्हीं स्थलें पाडावयासी येथून लोक व बेलदार, पाथरवट पाठवून राजश्री मोराजी सिंदे यास स्वामींचे आज्ञेप्रमाणें लेहून वसईचे लोक ऐसा लगट करून मसीदीस सुरंग लाऊन, राजकोट आदिकरून पाडून साफ केला. मसीद न

पाडावी म्हणोन जंजिरेकर शामलाचे लिहिले आले होते व उंदेरकराकडूनहि हाच अन्वये होता त्यास ती जागा मसीद नांव मात्र पावली आहे खरीच, परंतु कोट दाखल आहे. राहिल्यास पुढें आंगारकाकडून इमारत चालून कजिया वाढेल. ते जागा कोटदाखलच आहे. पाडावी लागते असे कितेक परियाययुक्त लेहून व सांगोन पाठवूं. स्वामीचे आज्ञेप्रमाणें दोन्हीं स्थले पाडून साफ केली. जासूद व चोपदार पाडावयाची पत्रें घेऊन आले तेच तेथें पाठविले होते. हल्ली पाडील्याचे वर्तमान निवेदन करतील त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo informs the Peshwa that as desired by him the Masjid and Rajkot at Rewadanda have been razed to the ground.*

No. 266] [*1760 ?*

श्री

विनंती उपरी. पत्र पाठविले ते पावले. लिहिला मजकूर कलला. मौज सिसोदरा परगणे अंकलेश्वर हा गांव जालून फौजेनें लुटला. गांव उजाड आहे. भडोचकर इंग्रज याचा दिवान नवरोजी पारसी आहे तो गांव इजाऱ्यानें बारासें रुपयास मागतो. त्यास द्यावा किंवा न द्यावा म्हणून लिहिले. त्यास गांव जबरदस्ताखाले नसावा. इंग्रज व गिरासे[1] याचा पाये परगण्यांत नसावा. इंग्रजाकडे गांव दिल्हा म्हणजे उपाधीस कारण आहे. चार रुपये कमी आले तर चिंता नाहीं. परंतु ह्या उभयतासिवाय दुसऱ्यास गांव सांगावा हे उत्तम. पट्यानें कोण्ही गांव घेत नसला तर हरकोणास तरदूत सांगूण गांवाचा बंदोबस्त करावा. कारभाऱ्याच्या विचारे गांवचा बंदोबस्त होय तो अर्थ समजून करावा, तो करावा. तरकारी व बस्तो[2] पाा तो पावला. सिबंदी दूर करणे अथवा नवी नेमणे तें कांहींच कलत नाहीं म्हणून लिहिले. त्यास आम्ही उद्यां परवा तुम्हाजवल येतो म्हणजे समजून कार्ये करणे ते करूं. पट्याचा मजकूर लिहिला. त्यास जो गांव छेक उजाड आहे त्याची तरदूत होत नसल्यास पट्यानें गांव द्यावा. जी गावें आबाद आहेत, गरदीत न आले, यैसे असल्यास पट्याचे प्रयोजन नाहीं. तेथील लावणीची तरदूत पाटलानें करावी, याप्रमाणें आहे. सारांष तुमच्या कारभाऱ्याच्या विचारे नुकसान न देतां बंदोबस्त होय तो अर्थ

---

१ गुजराथेंतील एक लुटारू जात. २ गाठोडे, थैली.

करावा. दोरवे च्यार थान पा। त्यापौ तूर्त एक थान. * पारों कुपीचा ठेविला आहे. बाकीचे तीन थान माघारे पाठविले आहेत. पावतील. आम्ही सत्वर येतो. कळावे बहुत काय लिहिणे? कृपालोभ कीजे हे विनंती.

¶*The writer reports (probably to the Peshwa) how the village of Sisodra was burnt and plundered by the English, to whom, he advocates, such places should not be consigned.*

No. 267] [4-4-1761

तालिकखत फिरंग

हू

पादशाहा

सिमोर पंतप्रधान

थोर दैवेंकरून दोन वेळां आशाहमतपन्हा हुजूर पावोन नाजुक मनसबेची बोली केली खरी. परंतु इंज्यानेबाचे मेहनतीचा परिणाम लागोन सर्वांच्या दिलबर-हुकूम घडोन न आलें. याचवरून बहुत दिलगीर जाहालों ॥

तारीख १० माहे से (?) सन मजकूर आम्ही आपलें आरमारसवर्तमान दांडे राजपुरीस पोहचलों. या आगोदर साहा रोज तेथें इंग्रज प्रविष्ट जाहाले होते. सिद्दीनें फिरंगियांचे मर्दानगी फुढा आपलें न चालें हें पुर्तें समजोन इंग्रेजाताबीन आपले किल्ले बोपून दिले. ते मागापासोन त्यांसी बोलीचाली करीतच होते. आशाहमतपन्हाचे किफायेतीस व आपणें कबूल केलेस तफावतकरून जंजिऱ्यास व कांशास आपल्या निशाणा लाऊन आंशाहमतपन्हाचे सरदारांस फौज उपेक्षणा करावयास लाविली ॥

सिद्दीस आपण कुमक न करी ऐसें आशाहमतपन्हास निश्चय सांगोन प्रथोन आचरला. तेव्हां तो विचार मुलाइजा करायास सामान व्हावें॥

इंग्रेज यांणीं आपला शब्द देऊन तफावत केलीस हा काय म्हणोन विचार मनास आणिलेया सहजच कळोन येईल. पठाणास जेस (येश) आलें म्हणून चौहीकडेस वर्तमान त्यांहीं उठविलें आणि आम्हासहि करार दिसोन यावें यासी मोठे तरतुदीनें गोमांतकीं तैसेंच वर्तमान घातलें. कां तर आम्ही आपलें अरमारांनसी सिद्दीचे किल्ले काबीज करायास न जावें. यासाठी हे आशामत-

पन्हाचे वकील आज मोकामीं आहेत त्यांसहि प्रविष्ट असणार. फिरंगी आरमार तें मोहिमेस न जावें ऐसें इंग्रजाचें दिलीं होतें. निमित्य म्हणावें तर न गेलेंया आशाहमतपन्हासी बिघाड करून घ्यावेयाचें आगत्य नव्हतें तें गेलेंमुळें जगविख्यात शत्रुत्व प्रकट केलें. त्याचा विचार म्हणावा तर सर्वांसच ठकाठकी करावें याचा.

इंग्रेजें बोलतात कीं फिरंगी किले मजकूर काबीज करून आशाहमतपन्हांस वोपून देणार नाहींत, हें आपण जाणोन याजवास्ते आपणी आपले ताबीन करून घेतले असेत. आम्ही आमचे निष्टेस अंतर करणार असतों तर आशाहमतपन्हासी आमचे किल्ले आहेत त्यांत स्वल्प जबरदस्ती हाल्डीं प्रसंगीं आहे; याजवरून त्यां पैकी कांहीं काबीज करून घेतों. जें बळकटीनें जंजिरा व कांसा काबीज करीस गेलों. तेच बळकटीनें आपणांसारिखे वर्तोन आम्ही आमचें ठिकाणें घेणार होतों म्हणोन ते विवेक करीत नाहींत. यानंतर सिदीच्या किल्यांचे काबाजातीची मुबरखी आशाहमतपन्हास दिली जाती; कां म्हाणाल तर किले मजकूर इंग्रेजा(चे) स्वाधीन जाहाले ते आपणांस ऐसेंच असावें. किल्ले वोपून देतील. यास अंतर होणार नाहीं. जरी ही सिदीस साध्य होत असेत तरीहि आशाहमतपन्हास ऐसें असलेया आवडीयुक्त तेंच करून आपुलें हित होय तो मार्ग पाहोन घेणार हा त्यांचा स्वयंभू गुणलक्षण आहे.

आशाहमतपन्हास इज्यानेब्रीं आपली मर्दानगी दाखऊन घडोन आलें नाहीं, याजवरून बहुत दिलगीर जाहालों. आशाहमतपन्हाचे सेखून करार मानोन येक बळ व इजालपन्हा कोंद विजुरै साहेबासी इज्यानेबीं सर्वच आपलें शिरीं घेऊन निशा केला, जो आशाहमतपन्हा कुल खर्च देणार. यावरून येक दिलीनें हाल्डी मसलतीस इस्तीदानें खर्च केला तो व आम्हाकडील जमाव जंजिन्यास होता त्याचा साहामहिने आधिकच मुशाहिरा देखील दिला नाहीं. यावरून इज्यानेबावर मोठा शब्द आहे.

आशाहमतपन्हां आम्हाकडील जमावापासून कांहींच किफायेत नसतां त्यासी मुशाहिरा आपले उमदेपणें चालूस लाविला असता तिकडील सरदार सतादेस याणें पदरीं घातला नाहीं. सरदार मजकूर यांणीं धणीआज्ञा उलंघन केली तेव्हां तो गुन्हेगार जाहाला. त्याची लुब्धता सोलदाद बिचाऱ्यावर न सरे. ते बहुत तेथें दग्ध पावलें. त्याणें आपण शाहमतपन्हाचे उपकारिक जाहालों म्हणोन जगत्रीं बोलिलें भले; परंतु विषाद पावोन बोलावें ऐसें सहसा नसावें. चांचा येऊन प्रविष्ट जाहाले. वख्तीं सरदार मजकूर याणें करणें तें न केलें. याजवरून ते नशियेत खामखा पावतील. ऐसें इज्यानेबीं करार मानिलेंच असें. येक बळ

व इंजलालपन्हा कोंद विजुरै साहेबीं सर्व खलबतें यांच्या ध्यानास न असतां आपलेंच मतें अपणावर घेतला. आशाहमतपन्हास माल्डम जाहालें पाहिजे. हे मनसबेचा कुल जबाबसाल साहेबमजकूर यांसी इज्यानेबीं घ्यावा लागतो. आणि त्यांहीं ज्याहापन्हा यांसी हा सर्व विच्यार इज्यानेबीं पुन्हा आपलें नजीक येंऊन जाहीर करावा ऐसें असलेंवर जें जें ठाऊक असेल तें सर्व आतां केलें जाईल.

इंग्रेज याणी आपले सरदार आमच्या जाहाजावर पाठऊन आपले पादशाहीं तर्फेनें सांगोन घेतलें जें, आपणांसी बिघाड न करावें म्हणोन, आणि सिद्दीनें आपणांस किल्ले सोडून दिलेचे दाखलेहि पाठविले, त्याच्या नकला देसाई विष्णु नाईक याजकडे रवाना केल्या असेत. प्रविष्ट होईल.

विलायतेमध्यें उभयेता ज्यांहान्हांमध्यें खुलासा चालतो तेव्हां त्यांसी बिघाड करितां न ये व त्याचेनेंहि आम्हासवें करितां होत नसें. कां म्हणाल तर ज्यापासोन अंतर येईल त्याणें आपलाले डोईनें खावंदासी जबाबसाल करावा लागतो म्हणोन आशाहमतपन्हास गोसगुजार केलें जातें.

आम्हास दिरंग लागोन एवढें घडोन आलें म्हणोन भलतें असोभ चिंतक बोलतील तर खुदाईआज्ञेवर मनुष्य विचार करील ऐसे म्हणतां न ये. माहे नोव्हेंबर थोर तुफान येऊन आम्हाकडील अनेक तरांडीं नाशाड जाहालीं. गोमंतक मोहारावर दोन गलिया वाहून चौऱ्यास्तर तोफांचे दर तोफा बारा व चोवीस लिब्र वजनी गोळेचे ऐसें नासोन गेले. इंग्रेजांचींहि मोठीं जाहाजें आठ बुडालीं. तुफान सर्वत्रीं समान लागलें, तें समयीं आशाहमतपन्हा आपले फौजेनसी लोणीवर मोकाम होते.

इंग्रेज याणें जे बोली केली ते पाहिजे ते वख्तीं करणार होते. कां जें मुंबईहून जंजिरा दाहा कोस असे; गोमांतकीहून शंभर अधिकच आहे. आम्हाकडील येवढा मोठा सामान तयार जाहाला होता, त्याचें वर्तमान गुप्त असणार नव्हतें. याज-वरून त्यास जवळ होऊन पाहिजे तेव्हां काबू साध्य करून घेऊन वख्त मिळतोच.

सदर्हू कलमें केल्यामजकुरावरून जंजिऱ्यास आम्हांकडील बाकी उरला जमाव काढून आणिला. तत्पूर्वी आशाहमतपन्हाचे सरदारांस इज्यानेबीं सांगोन पाठविलें जें सरकारच्या कामास जमावमजकुराचे जरूर असें तर ठेऊन घ्यावा. त्याणें तें सेखून अंगिकारिलें नाहीं. आम्ही याखेरीज कांहींच सांगोन न पाठवितां त्यांणींच होऊन आगोधर निश्चयें जमाव रवाना करोन द्यावा ऐसा केला होता. आम्ही इंग्रेज याणें सांगोन घेतलेचा जबाब कलमें केला जो जंजिराबंदर सिद्दी यांचें त्यांणीं तुम्हास वोपून दिलें; तुम्ही आपली निशाण लाविली. तेथें आमचा जमाव

आहे याजकरितां तो न्यावेंयासी आंत आलों, इतुकें त्यांसी कलमें करून सरकारचें किफायेतीयुक्त जें कामकाज असेल तें आशाहमतपन्हा यांचे सरदारांसी निभ्रांत मनासी आणावें, फैसल करावेंसें होतें. त्यासी विष्णु नाईक याणें रामाजी बरवे व रामाजी माहादेव यांचें नांवें आम्हास इशारत केली जें जेथ अरमार नांगराऊस होतें तेथेंच जाऊन असावें. योग्य, असें म्हणून आम्ही तेंच बरहुकूम केलें.

सर्व इंग्रेज याचाच उद्देश ऐसें आम्हास अखेरीं निदर्शनासी आलें. आपणांकडील यौजना आम्हास समजोन यात्रयाचा प्रसंग नसावयासी साक्षे कोण म्हणावें तर आशाहमतपन्हाचे सरदारांस सांगोन पाठविलें जें इंज्यानेब जाहाजावरून खालीं जातील तर आपण खामखा शाहमतपन्हाच्या गुराब वगैरें तरांडीं आंत आहेत यावर मारामार करूं म्हणून.

आशाहमतपन्हाकडील चौदा गुराब व साठ मोबलग गलबतें तिकडेस तयार असोन कोणीच धैर्य धरून मर्दानगीनें फुंढा निघोन गेला नाहीं. येकादा नौकर धणीकामाचावर रत होऊन चालतो आणि येकादा आपले लुब्धतेच वरचाड धरून धणीकाम विस्मरण होतें म्हणोन आशाहमतपन्हास न सांगता न ये.

बयाजवार मजकूर कलमें केला म्हणून आशाहमतपन्हानीं विशाद न मानावा. अखेरीं हुजुरीं जाऊन भेट घेतलेचा मोठासा बहुमान पावलों हें येथार्थ आहे. रवाना तारीख ४ माहे आब्रील सन १७६१.

ज्याक फिलिप देलांद्रेज.

¶*This is a copy of a Marathi version of a Portuguese letter addressed to the Peshwa probably by the Governor of Goa (Jack Philip De Londrej ?) mentioning the treacherous conduct of the English in supporting the Sidi of Janjira against the Peshwa.*

No. 268] *[1764-65*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री शास्त्री
बावा स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना विशेष. राजश्री तुलाजी आंगरे येथे आहेत येविसी हुजूर दोन च्यार वेल लिहिले होते. परंतु साहित्याचा प्रकार व येथोन न्यावयाचा काहीच जाहाला नाहीं. प्रस्तुत पर्जन्य बहुत व वारे बहुत सर्दीचा जागा हैरानगतच आहे. तथापि हुजूरचे नेमणुकेप्रो साहित्य आज पावेतो जाहालें. आतां तूप

तांदूळ व दाल उत्तम संग्रही नाहीं. येविसी राजश्री नारोपंत देशमुख बेगमी करून साहित्य चांगलें करावें म्हणजे सरकारचे पत्र मारनिले यास होते. त्याणी आम्हास लिहिलें कीं मावलांत साहित्य मिळत नाहीं तुम्ही खरेदी करून देणे. ऐशास तूप व बारीक तांदूल चांगले हे दिवसांत खरेदी करून आणावे कसे ऐशी कितेक प्रकारची अनुपत आहे. आपण सरकारात सर्व हरद्र कळऊन आंगरे यास पुणियास व हरकोठे अनकूल असेल तेथें ठेवावें हा प्रकार घडेसे जाहलें तर उत्तम आहे. वाड्यांत आहेत तो वाडा गळतो याप्रो वर्तमान आहे. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

¶*Provisions are ordered for Tulaji Angria.*

No. 269] *[3-1-1765*

पौ छ १४ रजब सन
खमस पौष

श्री

श्रीमंत राजश्री राऊसाहेब
साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक गणेश विठल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ १० रजबपावेतो सेवकाचे व किले अमदानगर येथील वर्तमान यथास्थित असे. यानंतर राजश्री तुलाजी आंगरे यास बेडीसहवर्तमान राा माधवराव कानो व सिदोजी तुपे यासमागमे आज्ञापत्र पाठविले ते किले माारी छ ९ रजबी पावले. आज्ञेप्रो किले मारी बेडीसहवर्तमान बदोबस्ताने ठेविले. बरोबर लोक होते ते पुण्यास रवाना केले आहेत. हुजूरचे खिजमतगार दोन आज्ञेप्रमाणें येथें ठेविले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ganesh Vithal reports to the Peshwa that Tulaji Angria has been kept in custody with irons at the fort of Ahmednagar.*

No. 270] *[27-4-1765 ?*

पो छ १७ जिलकाद
वैशाख मास

श्री

सेवेसी बालाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ताा छ ६ जिलकादपावेतो येथास्तित असे विशेष. तुलाजी आंगरे याचे लेक किले

विसापुरावरून पळाले यास्तव त्याचे चौकशीबा किले मजकूरचे हवालदार व सरनौबत पाहारेकरी हुजूर आणविले आहेत. येविसी राजश्री नारो त्रिंबक यास पत्र लिहिलें ते त्याजकडे पाठऊन हवालदार व सरनौबत वगैरे आणऊन पाठऊन देणे म्हणोन आज्ञा. ऐसियास आज्ञेप्रो कागद नारो त्रिंबक याजकडे पाठविला होता. त्यास मानिलेनी लिहिले कीं किल्याचा बंदोबस्त करून आज्ञेप्रो हवालदार वगैरे पाठऊन देतो म्हणोन (फाटलें) मीस पत्र लिहिलें ते बजिनस सेवेसी पाठविले आहे. त्याजवरून विदित होईल. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Nana Fadnis sends to the Peshwa the letters regarding the enquiries about the sons of Tulaji Angria who had escaped from the Visapur prison.

No. 271] *[23-6-1765*

पौ छ ४ मोहरम
सन सीत आशाढमास

श्री.

पुा श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. राजश्री तुळाजी आंगरे याचे दोघे पुत्र विसापुराहून परागंदा जाले, त्याची बातमी मुंबईस पावलियाची कळली. त्यावरून शेवकाने बारकाईने शोधास माणसें मुंबईस पाठविली होतीं; परंतु शोध न लागतां निघोन आलीं; तेव्हां फिरोन शाहाणे माणूस योजून, इंग्रजास कागद मालवण व रेडी याचे मजकूराचा लेहून पाठविला त्याचा मसुदा आलाहिदा शेवेसी रवाना केला आहे. विदित होईल. तो कागद घेऊन कागदी गेले. शेवकाचे नाव कळतांच संतोषी होऊन, सिधा सामग्री देऊन जागा दिल्हा. पत्र त्या मुख्यानी आपले कारकुनाकडे पाठविले. त्याचे भाशेचा उतार लेहून कारकुनानी मुख्याजवळ पोंचविले. तोच विशाद धरून पत्राचा जाबसाल न देतां कागद्यास खोटी करून ठेविले. बहुत दिवस जाले; निरोप न होये, तेव्हां कितेक अन्वयें बोलोन रजा घेऊन आले. त्यांनी वर्तमान सांगितलें कीं आंगरे याचे पुत्र तेथें आहेत. इंग्रेजाजवळ पावल्यानंतर कनिष्ट पुत्राने, बहुत नम्रतेनें भाशण केले कीं, विजयदुर्गी तुझे हातीं सांपडलो होतों; तुजला पाळीग्रहण करावयाचे सामर्थ नव्हतें; तर तुझा तूच परिणाम लावावा होतास. आपले हाताने तिंकडे काय म्हणून दिल्हे. असो; हलीं तुझे तुजकडे येऊन पावलों. तूं पिता आम्ही पुत्र; याउपरी तार अथवा मार. इतके

बोलणे ऐकोन परम आनंद पावोन आंगठ्या दिल्या. शालजोड्या वगैरे बहुमान करून आपणाजवळ येक माडी राहावयासी देऊन बराबर पंधरावीस माणूस सुधा ठेविले आहेत. मस्तकी हस्त ठेऊन अस्वासन दिल्हे आहे. पाचसे माणूस देऊन जंजीरियासी पाठवीत होता; परंतु ते नयेत. वरकड लडवई सामान पुर होत असे. जदीद लोक जातो तितका ठेवीत आहे. सात रुो दरमाहा करीत असे. इलायेतीहून हाली ज्याहाजे येणार, आली ऐसी बातमी आहे. येणेप्रमाणे वर्तमान सांगितले ते शेवेसी लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The sons of Tulaji Angria are reported to have escaped from Visapur and to have gone to the English at Bombay for refuge.*

No. 272] *[16-1-1771 ?*


पौा छ ३ सवाल
माघमास

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक बाबुराव कृष्ण करद्वय जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायेत छ २९ रमजान पावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्तित असे विशेष. येथे तुलाजी आंगरे याचे राजकारणाचे माहार आा २ दोन सापडले होते ते हुजूर पाठवणें येसे आपले आज्ञापत्र आले त्यावरून माहार मजकूर सेवेसी पाठविले आहेत. पावलियाचे उतर द्यावयास आज्ञा करावी. चांगोजी पवार याचे शोधास माणसें पाठविली आहेत पता लागोन सापडला म्हणजे सेवेसी पाठवितो. श्रीमंत राजश्री रावसाहेब कोणे ठिकाणी आहेत? कांही नवल विशेष स्वामीनी ल्याहावयास आज्ञा करावी. आपणाखेरीज आम्हास बातनी कोठून यावी याजकरितां स्वामीनीं ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Baburao Krishna sends to Nana Fadnis the two Mahars whom he had found plotting in favour of Tulaji Angria.*



G.P.Z.O. POONA, 1932.


00037051

